# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२०/०१/२०१८

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/०१/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

८

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०/०१/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता घेण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | २५ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | २६ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | २७ | श्रीमती लिलाबाई लक्षमण आशान |
| ६ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | २८ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | २९ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| ८ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३० | श्री. धनंजय बाबुराव बोडोरे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३१ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १० | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ३२ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| ११ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ३३ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १२ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ३४ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| १३ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा | ३५ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १४ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ३६ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १५ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ३७ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| १६ | श्री. भगवान शंकर भालेराव | ३८ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १७ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ३९ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| १८ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ४० | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| १९ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ४१ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २० | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ४२ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २१ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | ४३ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २२ | श्री. सुमित सागर सोनकांबळे | ४४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव | ४५ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २४ | श्रीमती ज्योती शामराव माने | ४६ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती पुजा सचिन भोईर, २. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ३. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ४. श्रीमती पंचम उमेश कालानी, ५. श्रीमती आशा नाना बिराडे, ६.श्री. अशाक बच्चुमल छाप्रु, ७. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ८. श्रीमती रेखा अशोक ठाकुर, ९. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, १०. श्री. महेश पहिलराज सुखरामनी ११. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, १२. श्रीमती शुभांगीनी निकम, १३. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १४. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, १५. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, १६. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, १७. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), १८. श्रीमती पुष्पा नाना बागुल, १९. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, २०. श्री. राजेंद्र शांताराम चौधरी, २१. श्री. रवी किशनचंद जग्यासी, २२. श्रीमती इंदिरा जमनादास उदासी, २३. श्रीमती कविता लाल पंजाबी, २४. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे), २५. श्री. गजानन प्रल्हाद शेळके, २६. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई), २७. श्रीमती मिताली राजेश चान्दूर, २८. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, २९. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे, ३०. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, ३१. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, ३२. श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे, ३३. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, ३४. श्री. विजय चाहु पाटी, ३५. श्री. आकाश परशुराम पाटील, ३६. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त

२. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त

३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

४. श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)

५. श्री. राम जैसवार, शहर अभियंता

६. श्री.मिलिंद सोनावणे, नगररचनाकार

७. डॉ. राजा रिझवानी, प्र.वैद्यकिय आरोग्य अधिकारी

८. श्री. महेश सितलानी, प्र. कार्यकारी अभियंता

१०. डॉ. युवराज डी. भदाणे, जनसंपर्क अधिकारी

११.श्री. संतोष जाधव, सहाय्यक मुख्य लेखाधिकारी

१२. श्री. अशोक जाधव, सहाय्यक लेखा परिक्षक

१३. श्री. हनुमंत खरात, कनिष्ठ अभियंता

१४.श्रीमती छाया डांगळे, प्र. सहाय्यक आयुक्त

१५. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त

१४. श्री. नंदलाल सामतांनी, प्र. सहाय्यक आयुक्त

१५. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. सहाय्यक आयुक्त

१६. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त

१७. श्रीमती अलका पवार, प्र. सहाय्यक आयुक्त

१८. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त

१९. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी

२०. श्रीमती. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

२१. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी

२२. श्री. सोनावणे, शाखा अभियंता

२३. श्री. रहेजा, शाखा अभियंता

२४. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

२५. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक

२६. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक

२७. श्री. विजय मंगलानी, लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

४. श्री. बाळु भांगरे

दुसरी महासभा सायंकाळी ५.३० वाजता सुरू करण्यात आली.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, संपुर्ण सभागृहाने आज इथे अशा प्रकारे आपण निर्णय घेतले आहेत. पहीली महासभा चालवू आणि आता खुप वेळ झाला आहे, ५.३० वाजले आहेत. पाणी पुरवठा विभागाचे विषय आहे आणि आपल्या कार्यालयामध्ये सभा बोलवायची आहे आणि त्यावर निर्णय घ्यायचा आहे. शहरामध्ये पाण्याचे लिकेज आहेत, त्यासाठी विरोधी पक्षाचे सदस्य खाली बसले होते. सत्ताधारी यांनी पण आरडाओरडा केला आणि दुसरी माझी सुचना आहे. मा. महापौरजी, मा. आयुक्तातर्फे जो स्वच्छता अभियान चालवला जात आहे. स्वच्छ सर्वेक्षण सन २०१८ त्यामध्ये त्यांनी आपल्याला आणि शहराच्या आदरणीय दोन संताना ब्रॅड अॅबेसेंडर बनवले आहे. साई कालीरामजी आणि भाईसाहेब रिंकुजी महाराज तर मी आपल्या सर्वांना आणि संपुर्ण सभागृहाला निवेदन करतो की, आजची मिटींग लक्षवेधी स्विकारल्या नंतर जे आपण स्थगित करू आणि ज्या तारखेला आपण ठेवू त्या तारखेला सभागृहाने त्या दोन्ही संताना बोलावून त्यांचा सत्कार करण्यात यावा आणि त्यांना निवेदन केल जावे की, आपण संपुर्ण शहरामध्ये काही ठिकाणी लोकांना बोलावून स्वच्छता विषयी मार्गदर्शन करण्यात यावे आणि आपली टीम, आपले नगरसेवक त्यांच्या बरोबरच राहतील. तर लक्षवेधी स्विकारल्या नंतर या मिटींगला स्थगित करण्यात यावे. मा. महापौरा बरोबर सर्व सभागृह मिळून आपण वेळ निश्चित करू आणि त्या दिवशी दोन्ही महान संताचे सत्कार करण्यात यावा आणि मा. महापौरजी मिटींग स्थगित केल्या नंतर त्वरीत आपण मा. आयुक्तांना आपल्या कक्षामध्ये बोलावून, सदस्यांना बोलावून, पाणी पुरवठा विभागाचे जे पण अधिकारी आहेत, हा जो पाणी पुरवठयाचा गंभीर विषय आहे, त्यासाठी फक्त आजच बैठक घेण्यात यावी. त्या नंतर सतत सोमवारच्या दिवशी, मगळवारच्या दिवशी, डेली काय रिजल्ट आला? किती लिकेज बंद झाले आहेत? किती लोकांच्या जवळ पाणी आले? आणि काय काय झाले? त्याची आढावा बैठक घेण्यात यावी. तर लक्षवेधी स्विकारल्या नंतर ही मी आपण स्थगित करा आणि तारीख व वेळ सांगा.

**महापालिका सचिव:—** मा. सभागृह नेता यांनी मिटींग स्थगित करायला सांगितले आहे, परंतु प्रश्नोत्तराचा तास वगळल्या नंतर लक्षवेधी घेता येते. तर प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** प्रश्नोत्तराचा तास वगळा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय :—** प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सूचकाचे नांव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नांव :— डॉ. प्रकाश नाथानी

**महासभा ठराव क्र.५९अ (१)** **दिनांक :—२०/१/२०१८**

ही महासभा आज दिनांक २०/१/२०१८ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** माझ्याकडे पाच लक्षवेधी आलेल्या आहेत. मा. महापौरांनी दिलेल्या आदेशानुसार सर्व संमतीने प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात येत आहे. मिटींग स्थगित करणार आहेत. आणि यामध्ये लक्षवेधी पाच आल्या आहेत. मी वाचून दाखवते त्यात दोन लक्षवेदीचा समावेश करून मग नंतर ही मिटींग मा. महापौरांच्या आदेशान्वये स्थगित करण्यात येईल.

**महापालिका सचिव:—** लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत श्रीम.जयश्री पाटील व अनुमोदक आहेत श्रीम पुजा सचिन भोईर.

**विषय:—** कोटयावधी रूपये रूपये खर्च करून सुध्दा चाळीसलाख लीटर पाणी साठयाची क्षमता असलेल्या जलकुंभात पाण्याचा साठा होत नसल्या बाबत. दुसरी लक्षवधी सुचना आहे, सुचकाचे नाव आहे, श्रीमती कांचन लुंड अनुमोदकाचे नाव श्री. सुनिल सुर्वे व श्री. शंकर लुंड

**<u>विषय:—</u>** पाणीपट्टी देयकावर अभय योजना चालू करणे बाबत. तिसरी सुचना आहे, सुचकाचे नाव आहे, श्री. भगवान भालेराव, अनुमोदकाचे नाव आहे, श्री. प्रमोद टाले

**<u>विषय:—</u>** उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत विविध विकासकामे हाती घेण्यात आलेली असून, सदरची विकासकामे अनधिकृतपणे सुरू असल्याने याची चौकशी करून निर्णय घेणेबाबत. लक्षवेधी सुचना आहे. लक्षवेधी सुचना क्रमांक ४ सुचकाचे नाव श्री. प्रमोद टाले आणि अनुमोदकाचे नाव श्री. राजश्री चौधरी.

**<u>विषय:—</u>** दैनिक लोकमत दिनांक १०/१/२०१८ ला आलेली बातमी उल्हासनगर महानगरपालिकेत झालेला भरती घोटाळा (नोकरीच्या अमिषाने लाखोची फसवणूक) बाबत. पाचवी आहे, सुचकाचे नाव श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे,

**<u>विषय:</u>**— उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व रेस्टॉरंट व रेस्टॉरंट ॲन्ड बार यांची अग्निशमन विभागाकडून (Fire Audit) करणेबाबत. या पैकी मा. महापौरांनी दोन लक्षवेधी सुचना स्विकारल्या आहेत. ती आहे, पहीली लक्षवेधी सुचकाचे नाही आहे, श्रीम. जयश्री पाटील व दुसरी लक्षवेधी श्रीम. कांचन अमर लुंड यांची या दोन लक्षवेधी स्विकृत केल्या आहेत.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** सन्माननिय महापौर मॅडम, तुम्ही आज पर्यंत तुम्ही आता एकीकडे सत्ताधारी आणि विरोधी पक्ष अशी प्रस्तावाची सुचना आणायचे, लक्षवेधी मान्य करतात आता तुम्ही दोन्हीही सत्ताधारीचे मान्य केल्या आहेत.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** नाही एक श्री. सुनिल सुर्वे यांची केलेली आहे,

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** दुसरी गोष्ट अशी आहे की, मा. महापौर मॅडम मी लक्षवेधी मांडलेली आहे, माझ्या लक्षवेधीला जरी तुम्ही प्राधान्य दिलेले तसेल तरी माझ्या ज्या भावना आहेत, त्या तुम्ही ऐकुन घ्यावे, अशी माझी विनंती आहे. विषय असा आहे की, महानगरपालिकेच्या वतीने ४ नंबरची शाळा, १४ आणि १५ नंबरची शाळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वाचनालयाची इमारत आणि सिंधूभवन इमारत सपना गार्डनमध्ये आहे. अशा प्रकारे चार ते पाच वास्तु आपण महानगरपालिकेच्या वतीने बांधत आहेत. माझी सुचना एवढीच आहे की, शाळे सारखी इमारत आणि जिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका होणार आहे. अशा ठिकाणी विद्यार्थी शिकणार आहेत. तुम्ही तुमच्याकडे या बिल्डींगची वास्तु म्हणजे नगरविभागाचे प्रमाणपत्र नाही, वास्तु बांधण्या संदर्भातले, कुठल्याही प्रकारची परवानगी नाही. असे असतांना सुध्दा आपण या वास्तु बांधत आहे. त्याची जबाबदारी कोण घेणार आहे? महापौर आपण घेणार आहेत का? जर उद्या त्या बिल्डींगचे स्ट्रक्चरल कोसळले त्याची जबाबदारी आपण घेणार आहेत का? मला रिजेक्ट करण्याचा तुमचा उद्देश लक्षात ठेवा. जबाबदारी तुम्ही घेणार आहेत का? मग ही वास्तु नगररचना विभागाकडून मंजूर होऊन का गेली नाही? त्याचा प्लॅन का झालेला नाही? या संदर्भात चर्चा होणे आवश्यक आहे. ही माझी आग्रहाची विनंती आहे. भविष्यामध्ये आपण असे अनधिकृत बांधकाम करीत आहे. इकिकडे आपण अनधिकृत बांधकामावर कारवाई करतो आणि दुसरीकडे महानगरपालिका अनधिकृत बांधकाम करीत आहे. असे जर जेव्हा नगररचना विभागाला त्याच्या संदर्भात पत्र दिले, त्यांनी सांगितले या इमारतींना कुठल्याही प्रकारची आमची एनोसी नाही, आम्ही कुठल्याही पध्दतीची मान्यता दिलेली नाही. म्हणून हा विषय अत्यंत गंभीर आहे, उद्या त्या शाळेचे स्ट्रक्चरल कोसळे किंवा त्या वाचनालयाचे स्ट्रक्चरल कोसळले किंवा सिंधूभवनाचे स्ट्रक्चरल कोसळले तर याला जबाबदार कोण? महानगरपालिका जबाबदार राहणार आहे का? किंवा संबंधित इंजिनियर त्याचा कोण आहे? ती इमारत कोणी बांधली? कोणी मंजूर केली? कसे काय झाले?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मा. महापौरजी, लक्षवेधीवर चर्चा चालली आहे की, मिटींग स्थगित करण्यासाठी स्विकार करती आहेत, हे काय चालले आहे, मला समजतच नाही.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** डॉ. बाबासाहेबांच्या अभ्यासिकाला एक दलित माणूस विरोध करीत आहे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** उल्हासनगरमध्ये अशा किती तरी वास्तु बनत आहेत,

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय? बोलत होते ते समजून आले नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** विरोधात आहे, असे बोलू नका, ही वास्तु फक्त सिंधूभवनच नाही, विरोधात बोलण्यास लावू नका? अनधिकृत बांधकाम करतात, तुम्ही बाबासाहेबांचे नाव देत अहात आणि तिथे आमची मुले शिकण्यासाठी जातील आणि ती इमारत पडली तर त्याला जबाबदार कोण राहील? तुम्ही राहणार का?

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** एक दलित माणूस विरोध करीत आहे, याची मला खंत आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** आम्ही खंडन करीत आहे की, पुज्य डॉ. बाबसाहेब आबेंडकरांच्या ....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** डॉ. बाबासाहेब, हे कायदयाचे रक्षक आहेत, अनधिकृत बांधकामाचे बाबासाहेब रक्षक नव्हते. ते कायदयाचे रक्षक होते, तुमच्या सारख्या अनधिकृत बांधकामाचे सपोर्टर नव्हते. बाबासाहेब कायदयाचे रक्षक होते.

**महापालिका सचिव:—** ही मिटींग मा. महापौरांनी, २३ तारखेला ३.३० वाजता..

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** २३ तारखेला बाळासाहेब ठाकरेंचा वाढदिवस आहे....

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** २३ तारखेला शिवसेना प्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे, यांची जयंती आहे, त्यामुळे २३ तारखेला नको अशी आमची विनंती आहे, २४ ला किंवा २५ तारखेला ठेवा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** २५ तारखेला ठेवा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** अनिश्चित कालावधीसाठी ठेवा. मॅडम.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** ही मिटींग अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे.

**महापालिका सचिव:—** ही सभा मा. पीठासीन अधिकारी यांनी अनिश्चित कालावधी साठी स्थगित केली आहे._तरी कृपया राष्ट्रगितासाठी उभे राहवे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५.४० वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— १७/२/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१७/२/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

## ८—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक २०/१/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित केल्याने सदर सभा शनिवार दिनांक १७/२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती. अर्चना गोकुळ करणकाळे | २८ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ३ | श्रीमती. पुजा सचिन भोईर | २९ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ४ | श्रीमती. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३० | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ५ | श्रीमती. ज्योती दिलीप गायकवाड | ३१ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३२ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ७ | श्रीमती. चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३३ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ८ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३४ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ९ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ३५ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १० | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ३६ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| ११ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ३७ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १२ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ३८ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| १३ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ३९ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १४ | श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी | ४० | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १५ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ४१ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| १६ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ४२ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १७ | श्रीमती शुभांगीनी निकम | ४३ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १८ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४४ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १९ | श्रीमती चक्रवर्ती उर्फ अडसुळ छाया सुजित | ४५ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २० | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ४६ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २१ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ४७ | श्रीमती मिनाक्षी रवि पाटील |
| २२ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता उर्फ पप्पू गुप्ता | ४८ | श्री. विजय चाहू पाटील |
| २३ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ४९ | कु. कविता सुरेश गायकवाड |
| २४ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ५० | श्री. विकास परशुराम पाटील |
| २५ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ५१ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २६ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ५२ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| २७ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१) श्रीम. मिनाकौर लबाना २)श्रीम. पंचम कालानी ३) श्री. जमनादास पुरस्वानी ४) श्रीम. आशा नाना बिराडे ५) श्री. रविंद्र बागुल ६) श्री. कलवंतसिंग सोहता ७) श्रीम. गीता साधनानी ८) श्रीम. अपेक्षा भालेराव ९) श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग १०) श्रीम. चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग ११) श्रीम. डिम्पल नरेंद्र ठाकुर १२) श्रीम. दिपा नारायण पंजाबी १३) श्रीम. शुभांगी बेहनवाल १४) श्री. राजेंद्र शांताराम चौधरी १५) श्रीम. इदिरा उदासी १६) श्रीम. कविता लाल पंजाबी १७)श्री. दिपक सिरवानी १८) श्री. रमेश चव्हाण १९) श्रीम. दिप्ती दुधानी २०) श्रीम. ज्योती चैनानी २१) श्रीम. सुनिता बगाडे २२) श्री. राजेंद्र वानखेडे २३) श्रीम. मिना सोनेजी २४) श्रीम. आकाश पाटील २५) श्री. मनोज सयानी २६) श्री. सुरेंद्र सावंत २७) श्रीम. आशा इदनानी २८) श्री. चंद्रशेखर यादव २९) श्रीम. रेखा ठाकुर ३०) उप–महापौर ––श्री. जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. संतोष देहेरकर, उप– आयुक्त (मुख्यालय)
४. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
५. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखापरिक्षक
६. श्री. अशोक जाधव, सहाय्यक लेखा परिक्षक
७. श्री. संतोष जाधव, सहाय्यक लेखा अधिकारी
८. श्री. मीरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
९. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१०. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
११. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त
१२. श्री. नंदलाल समतानी, प्र. सहाय्यक आयुक्त
१३. श्रीम. छाया डांगळे, प्र. सहाय्यक आयुक्त
१४. श्री. दशोरे, शाखा अभियंता (पाणी पुरवठा)
१५. श्री. हनुमंत खरात, कनिष्ठ अभियंता
१६ श्री. दत्तात्रय जाधव, भांडार विभाग प्रमुख्य
१७. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरीक्षक
१८. श्रीम. श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

दुपारी १.१५ वाजता वंदेमातृरम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

**सदस्य श्री. प्रदीप रामचंदानी:–** मा. महापौर जी मी श्रध्दांजलीसाठी सर्व सभागृहाचे सदस्यांनी विनंती करतो की, आमचे खासदार मा. श्री. चितांमण वनगा जे पालघर संसदीय क्षेत्रातून येणार होते यांचे आकस्मित निधन झाले आहे. आणि ठाणे जिल्हयाचे नेते श्री.वसंत डावखरे जी यांचे सुध्दा निधन झाले आहे.तो मी हा सभागृहानां विनंती करते की त्यांचा निधनामुळे दोन मिनिटे श्रध्दांजलीसाठी उभे रहावे. आणि मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यात यावी.

**सदस्य श्री. प्रमोद टाले**:– मा.महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब. गेल्या महिनामध्ये आपले विधान परिषदे उप सभापती मा. श्री. वसंतरावजी डावखरे यांचे निधन झाले आहे. त्यांची या उल्हासनगरमध्ये मोठे योगदान दिले होते.

**महापालिका सचिव :–** कृपया दोन मिनिटे मौन पाळावे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव**:— मा. महापौर मॅडम, वसंत डावखरे यांच्या संर्दभामध्ये बोलायला गेलो तर उल्हासनगर शहरासाठी वसंत डावखरे यांचे मोठे योगदान आहे. जे ८५४ बिल्डींगस जे आहे ते रेग्युलाइज करण्यासाठी वसंत डावखरेनी यांनी फार प्रयत्न केले. अशा उल्हासनगरच्या संर्दभामध्ये आदर, प्रेम आणि जाणिव असलेला हा नेता आज आपल्यात नाही आहे. त्यामुळे उल्हासनगर शहरावतीने मा. चिंतामण वनगा आणि वसंत डावखरे साहेबांना भावर्पूवक श्रध्दांजली माझ्या पक्षाच्यावतीने आणि महानगरपालिकातर्फे करावी अशी माझी विनंती आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** एक जिंदादिल व्यक्तीमत्व हे राजकरण करताना जिथे सबंध कसे जपायचे शिकायचे असेल तर आमचे दिंघे साहेब आणि वसंत डावखरे साहेब ठाणे जिल्हयामध्ये एक वेगळी जोडी होती दोघेही आपआपल्या पक्षांशी निष्ठुर राहिले परंतु राजकरण करताना व्यक्ति सबंध कधी वितळू दिला नाही आणि समाजाचा विकासासाठी कुठला पक्षपात केला नाही. राजकरण जेव्हा करायचे तेव्हा केले पण जेव्हा समाजिक प्रश्न आले तेव्हा उप सभापती असतांना उल्हासनगरचे जे जे विषय त्यांना घ्यायचे असतील तेव्हा आवर्जुन एकत्र बसायचे आणि घ्यायचे, उल्हासनगरचा पाणीचा प्रश्न असतांना हक्कांनी बैठक लावायची, महापौर कोणीही असू दया, विद्याताई निर्मले असू दया, राजश्री चौधरी मॅडम असू दया, अपेक्षाताई पाटील असू दया, कोणीही महापौर कुठल्या पक्षाचा असला तरी हक्कांनी उल्हासनगरवासी तिथे जायचे आणि वसंत डावखरे साहेब मुख्यमंत्री कोणीही असतील किंवा इलेक्शन मिनिस्टर मला आठवते की इरीकेशन मिनिस्टर अजीत दादा पवार होते. अशोक चव्हाण एम.आय.डी.सी मध्ये सर्वाना एकत्रीत करून उल्हासनगरचा प्रश्न प्राधान्याने सोडवायचे जसे आताचे पालक मंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे साहेब उल्हासनगर विषय प्रत्येक प्रश्न अगदी मनापासून प्रत्येक प्रश्न बारकाईने लक्ष देऊन सोडविण्याचा प्रयत्न करतात. डावखरे साहेब एक चांगले व्यक्ति आणि एक चांगला मित्र म्हणून मैत्री संबंध जपणार पक्षाचे पलीकडे जाऊन एक असा प्रकारचा व्यक्ति म्हणून ठाणे जिल्हयातून आणि संपूर्ण महाराष्ट्रच्या विधान परिषदेचे उपसभापती होते मोठे नुकसान झालेले आहे सतत सोळा वर्ष उपसभापती त्यांनी पद उपभोग करताना त्यांनी महाराष्ट्रासाठी चांगले योगदान दिलेले आहे. असे चांगले व्यक्तीमत्व असल्याने संपूर्ण ठाणे जिल्हा मुकला आहे. मी शिवसेना पक्षावतीने आणि संपूर्ण सभागृहाच्या वतीने आणि उल्हासनगरच्या वतीने मा. डावखरे साहेब आणि खासदार चिंतामण वनगा यांना श्रदांजली अर्पित करतो.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—** मा. महापौरजी, ८५५ बिल्डींगच्या मुददा त्यांनी चांगल्या प्रमाणे उचलला होता आणि स्वत:हुन उपसभापती पदावर येऊन त्यावेळी जेव्हा कॉल अटेंशन मोशन आले होते तेव्हा ते स्वत:हुन आले होते जेव्हा तो मुददा आला होता. त्यानी ऑब्जेक्शन केले होते. तिकडचे आमदारा बरोबर बसून ८५५ बिल्डींगचे मुदृदयावर त्यांनी त्यांच्याबरोबर बसून चर्चा केली. मी तो दिवस विसरणार नाही जेव्हा ते आमच्या सोबत होते. सर्वात मोठी गोष्टी लहानात लहान कार्यकर्तासाठी दिवस असो किंवा रात्र असो कधी ही कोणत्या ही समस्या आल्या की ते स्वत: तिथे येत होते. आपल्या कार्यकर्तासाठी पोलिस स्टेशन असो किंवा मारामारी होवो मला स्वत:चा अनुभव आहे की मला पण काही समस्या झाली होती जेव्हा मी हॉस्पीटलमध्ये होतो तेव्हा साहेब माझ्याकडे दोन तास बसले होते. तेव्हा मी त्या पार्टीमध्ये सुध्दा नव्हतो. तेव्हा मी भारतीय जनता पार्टीमध्ये होतो. साहेबांनी कधी त्यांनी पक्षाचा विचार केला नाही की कोण कोणात्या पक्षाचे आहे कधी हा विचार केला नाही. साहेब उपसभापती राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे होते. परतु पक्षपात कधी ही केले नाही की तुम्ही शिवसेनेचे कार्यकर्ता आहे की तुम्ही भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ता आहे असे कधीही बोलले नाही. मी धन्यवाद देतो आणि त्यांच्या आत्मशांतीसाठी प्रार्थना करतो आणि सर्वाना विनंती करतो की त्यांचे परिवाराला ध्येर्य मिळावे ज्यांनी आपला माणुस हरवला आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी:—** राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षातर्फे मी वसंत डावखरे साहेब यांना श्रदांजली अर्पित करित आहे आणि ते आमचे नेते होते त्यांनी उल्हासनगर शहरासाठी जे योगदान दिले होते ते सर्वांच्या समोर आहे ज्या प्रमाणे ८५५ आणि दुसरे जे मुददे होते किंवा विरोधी पक्ष होवो किंवा सत्ताधारी पक्ष होवो कधी ही त्यांनी बघीतले नाही आणि एका जागेवर सर्वांचे काम करत होते कोणाला निराश करत नव्हते आणि त्यांच्या कामाचा रिझल्ट मिळत होता परत फोन करून त्यांच्याकडून जेवढे काम आज पर्यंत घेऊन गेले निराश कधी झाले नाही सत्तापक्ष असो किंवा विरोधी पक्ष असो मला वाटते की त्याच्यासाठी किती ही श्रदांजली दिली तरी कमी आहे.धन्यवाद.

**सदस्य श्री. किशोर वनवारी—** मा. डावखरे साहेबांचे चरणांना वारंवार नमन करावे जेवढे त्यांच्यासाठी बोलावे खुपच कमी आहे.जसे आबाने बोलले की दिघे साहेबांसारखा माणुस आणि वसंत डावखरे साहेबांसारखा माणुस या सात जन्मात परत जन्म घेणार नाही त्यांना साक्षात नमन आहे त्यांनी सर्वांवर उपकार केले आहे. आणि सर्वांवर त्यांचे उपकार आहे ते कधी ही पार्टीत पॉलिटिक्स बघीतले नाही दोघे ही ठाणे जिल्हा नाही तर पूर्ण महाराष्ट्र भारताचे गर्व होते. त्यांना नमन आहे आणि सर्व मिळून त्यांना श्रदांजली दयावी. धन्यवाद

**महापालिका सचिव :—** कृपया सर्वानी दोन मिनिट मौन पाळावे.

सुचकाचे नाव :— श्री. प्रदिप रामचंदानी
डॉ. प्रकाश नाथानी
श्री. मनोज सयानी
श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे
श्री. प्रमोद टाले
श्री. भगवान भालेराव
श्री. भारत राजवानी

**शोक प्रस्ताव**

ठाणे जिल्हयाचे नेते व विधान परिषदेचे उपसभापती श्री. वसंत डावखरे यांचे निधन झाले आहे. सतत १६ वर्षे ते उपसभापती पदावर होते. त्यांचे उल्हासनगर शहराच्या विकासकामी फार मोठे योगदान होते. उल्हासनगरच्या ८५५ इमारती रेग्युलाईज्ड करण्यासाठी त्यांनी फार प्रयत्न केले होते. उल्हासनगरचे अनेक प्रश्न त्यांनी सोडविले व तडीस नेले. अर्ध्या रात्री छोटयात छोटया कार्यकर्त्यास काही अडचणी आल्या असतील तर ते स्वत: धावुन येत होते. सरपंच ते विधानपरिषदेचे उपसभापती अशी झेप घेणारे श्री. डावखरे यांनी राजकरणापलिकडे मैत्री जपणारा नेता अशी ओळख निर्माण केली. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक दमदार नेता गमविला. पुणे जिल्हयात शिरुर तालुक्यात गरीब शेतक—याच्या घरात त्यांचा जन्म झाला. अर्थार्जनासाठी कुटुंब ठाण्यात आले होते. वसंतरावांचे शिक्षण ठाण्यात झाले पण, त्यासाठी संघर्ष करावा लागला.

**राजकारणात अनेक डावखरे करून दाखविणारे आणि पराभव पचवून नव्या उमेदीने कर्तृत्वाचा वसंत फुलविणारे वसंत डावखरे हे प्रसन्न व्यक्तिमत्व होतेण हिरवे गावचे सरपंच बनून त्यांनी राजकारणात उडी घेतलीण मग शरद पवार यांचे बोट धरून अल्पावधीत अनेक चमत्कार घडवलेण १९८७ साली शिवसेनेची सत्ता घालवून डावखरे यांनी ठाण्याचे महापौरपद काबीज केलेण आनंद दिघे यांना हा धक्का होताण मात्रए त्यानंतरही दोघांचे मैत्र फुललेण शिवसेनाप्रमुखांकडेही डावखरे यांच्या शब्दाला वजन होतेण त्यामुळेच २०१० साली विधान परिषदेत ते बिनविरोध आलेण १९९२ ते २०१६ अशी सलग २४ वर्षे ते विधान परिषदेत होतेण १९९८ साली ते उपसभापती झालेण ते २०१६ पर्यंत कायम होतेण ठाणे व कल्याण लोकसभेची निवडणूक त्यांनी लढवलीण सामाजिक जीवन निर्विष आणि प्रसन्न असावेए असे वाटणाऱ्या मोजक्या नेत्यांमध्ये वसंत डावखरे एक होतेण ही प्रसन्नता आता संपली**! त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ५९ब** **दिनांक:— १७/२/२०१८**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. वसंत डावखरे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

श्री. प्रदिप रामचंदानी

अनुमोदकाचे नाव :—श्री. प्रमोद टाले

श्री. भगवान भालेराव

**शोक प्रस्ताव**

पालघर संसदीय क्षेत्र येथिल खासदार श्री. चिंतामण वनगा यांचे आकस्मित निधन झाले आहे. त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.** ५९क **दिनांक:— १७/२/२०१८**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. चिंतामण वनगा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** ही स्थगित सभा आहे लक्षवेधी पासून सुरूवात होणार आहे.

**सदस्य श्री.प्रदीप रामचंदानी :—** मा. महापौर मॅडम जी श्रदांजली नंतर एक अभिनंदन प्रस्ताव आहे ज्या प्रकारे ठाणे जिल्यामध्ये पालकमंत्री आहे श्री एकनाथ शिंदेजी आता ठाणे जिल्हयामध्ये दुसरे पण पालकमत्री श्री. रविंद्र चौव्हाणजी यांना रायगड जिल्हयाचा पालकमंत्री बनविलेले आहे. मी हया महासभेला विनंती करत आहे की आपल्या ठाणे जिल्हयाचे पालकमंत्री रविंद्र चव्हाणजी जे आपल्या ठाणे जिल्हयाचे प्रतिनिधित्व करित आहे त्यांना भारत सरकार यांनी ठाणे जिल्हयाचे, रायगड जिल्याचे पालकमंत्रीच्या जबाबदारी दिली आहे त्यांना भविष्यात राजनितीमध्ये यश मिळावे. आणि आमच्यासाठी आनंदाची गोष्ट आहे म्हणून मी अभिनंदन करीत आहे आणि सर्वाना विनंती करित आहे की अभिनंदन प्रस्ताव करावा, धंन्यवाद.

---

**अभिनंदन प्रस्ताव**

महाराष्ट्र शासनाने श्री. रविंद्र चव्हाण (राज्यमंत्री) यांना रायगड जिल्हयाच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी सोपविली आहे. ते ठाणे जिल्हयाचे प्रतिनिधीत्व करतात. भविष्यात त्यांना चांगली राजनिति प्रगती होवो याकरीता त्यांचे अभिनंदन करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.** ५९ड **दिनांक :— १७/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. प्रदीप रामचंदानी
अनुमोदकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी

ही महासभा श्री. रविंद्र चव्हाण (राज्यमंत्री) यांचे रायगड जिल्हयाचे पालकमंत्री म्हणुन नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य श्री. भगवान भालेरावः–** मा. महापौर मॅडम आज सभा चालवणार ज्या खुर्चीवर अतिरिक्त आयुक्त मॅडम बसलेले आहते, त्या खुर्चीच्या चार्ज त्यांना आहे का? आणि तुम्हाला चार्ज दिलेला आहे का? तुम्ही निर्णय घेऊ शकतात का?

**डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तच्या स्थानी प्रधिकृत अधिकारीः–** मा. महापौर तथा सन्मानीय सभागृह आज माननीय आयुक्त साहेब इथे अनुपस्थित आहे ते रजेवर आहे अथवा कुठे आहे आता मला कल्पना नाही आणि लेखी आदेश पण मला दिलेला नाही सर्व सभागृहात मी फक्त ऐवढे सागते की प्रोटोकाल प्रमाणे फक्त माझी इथे उपस्थिती आहे की मी आज कार्यरत आहे मा. आयुक्तांची खुर्ची या सभागृहाचा मान ठेऊन खुर्ची रिक्त राहणार हे प्रशासकीयांना धरुन नाही म्हणून मी स्थानापन्न झालेली आहे फक्त आपल्या सर्वाची माहितीसाठी, मग कोणत्या ही निर्णयला किंवा कोणत्या ही निर्णय घेण्यासाठी मी आपल्या मत व्यक्त करू शकणार नाही.किंवा मी प्रशासकीय दृष्टिने आयुक्तांची प्राधिकृत म्हणून कोणत्या ही निर्णय घेऊ शकणार नाही.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः–** मा. महापौर जी जेव्हा – जेव्हा आयुक्त साहेब सुट्टीवर केले आहेत तेव्हा– तेव्हा आपल्या चार्ज आयुक्तांचा चार्ज उपायुक्त देहरकर साहेबांना देऊन जातात. ते उपायुक्त आहेत, जर अतिरिक्त आयुक्त आहे तर त्यांना तो चार्ज दिला पाहिजे. पण ते चार्ज देतात उपायुक्तानां, जर उपायुक्तानां चार्ज आहे तर जबाबदारी पण उपायुक्तांची आहे की आयुक्त नंतर महानगरपालिकाचे कामकाज ते करणार परंतु इथे जेव्हा आयुक्त सुट्टीवर जातात कधी कुठे जातात तर स्थायी समिती हो किंवा महासभा हो त्यावेळी आयुक्तांची खुर्चीवर बसणेची वेळ येतात तर त्यावेळी उपायुक्त बसतात, अतिरिक्त आयुक्त मॅडम बसतात.त्यावेळी चार्ज कोणाकडे दिला पाहिजे, अतिरिक्त आयुक्तकडे दिला पाहिजे की उपायुक्तकडे दिला पाहिजे, नियम काय म्हणतात? तुम्ही आम्हाला समझावून सांगा,तर चांगले होईल.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः–** मॅडम कायदा काय आहे, अतिरिक्त आयुक्तांना दिला पाहिजे नियमा प्रमाणे

**सदस्य श्री. भगवान भालेरावः–** नाही, नाही मॅडम दुसरी गोष्ट अशी आहे आयुक्त कुठे गेले आपल्याला माहित पाहिजे जेव्हा सुचना काढतात तेव्हा आपल्याला अश्वासित करत असेल, त्या दिवशी राहतो म्हणून मग विचारून सुचना काढत असेल की तेव्हा आपण त्या दिवशी राहणार का? आयुक्त कुठे जातात, आज कुठे गेले आहे? रजेवर गेले आहे की कामासाठी गेले आहे. आम्हाला सभागृहाला अवगत करावे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः–** मॅडम कायदा काय आहे अतिरिक्त आयुक्तांना दिला पाहिजे नियमा प्रमाणे.

**सदस्य श्री. भगवान भालेरावः–** काय? नक्की काय मॅडम. सांगा साहेब ते कसे होईल?

**श्री. संतोष देहरकर, उपायुक्त मुख्यालय :–** मा. महापौर, मा. आयुक्त, सन्मानीय. सर्व सदस्य. मा. आयुक्त साहेब आज सद्या कोर्टाचे कामाने बाहेर आहेत. अतिरिक्त आयुक्त कंठे मॅडम त्यांच्या जागेवर बसल्या आहेत.

**सदस्य श्री. भगवान भालेरावः–**कोर्टात कोणती केस आहे ती आम्हाला कळले तर बरे होईल. मी सभागृहातून बोलतो आहे.

**श्री. संतोष देहरकर, उपायुक्त मुख्यालय :–** एवढी सविस्तर माहिती आमच्याकडे नाही, पण कोर्टात ......

**सदस्य श्री. भगवान भालेरावः–** साहेब पण कुठली केस आहे? ते आम्हाला कळले पाहिजे, कोर्टाच्या कामात, कोर्टाच्या कामात आम्हाला लावले ती तारीख दुसरी आहे आता नविन तारीख कुठली आली.

**श्री. संतोष देहरकर, उपायुक्त मुख्यालय :–** ती माहिती उपलब्ध नाही. पण कोर्टाचे कामाने बाहेर जात असताना....

**सदस्य श्री. भगवान भालेरावः–**त्यांच्या कोर्टाचा एक लक्षात ठेवु त्यांना कोर्टाचा वकील महानगरपालिकाचे पैश्यातून तिकडे दिले जातात न केस लढण्यासाठी ते आम्हाला कळू दया.महानगरपालिकाचे सदस्यांना. ते कुठल्या केसच्या संदर्भात गेले? आणि कुठल्या कोर्टात आहे?

**श्री. संतोष देहरकर, उपायुक्त मुख्यालय :–** ही माहिती सद्या तरी उपलब्ध नाही.

**सदस्य श्री. भगवान भालेरावः–** सद्या तरी उपलब्ध नाही तरी पिठासीन अधिकारी आम्हाला माहिती देऊपर्यत उपलब्ध होत नाही तर हया मॅडम बसून काय अर्थ आहे? ती खुर्ची रिकामी ठेवा. ती रिकामी ठेवा खुर्ची. रिकामी ठेवावी लागेल. काय अधिकार आहे त्यांना?

**सदस्य श्री. भगवान भालेरावः–** अरे पण पैसे आपले जात आहे ना महानगरपालिकाचे.

**सदस्य श्री. मनोज सयानी:—** मा. महापौर जी, सन्मानीय सदन, जे माझे मित्र श्री भगवान भालेरावजी यानी आज येथे प्रश्न उपस्थित केलेले आहे आयुक्त नाही आहे तो काय नाही आहे? कारण काय आहे? देहरकर साहेबांनी सागितले आहे की कोर्टाचे कोणत्या कामाने गेलेले आहे आजपर्यत आपणस बोलत होते की काय नाही आले आज कोर्टाची तारिख होते आयुक्त पण बोलत आहे. आज नविन बातमी ऐकण्यात आली आहे की आयुक्त साहेब श्री राजेंद्र निंबाळकर आयुक्त साहेब जेव्हा पासून या उल्हासनगर महानगरपालिकामध्ये आले आहे तेव्हा पासून त्यांनी अशी व्यवस्था बनुन ठेवली आहे की इथे कोणी काम होत नाही, लहान ते लहान कामासाठी प्रत्येक विभाग असा म्हणतो की आयुक्त साहेबांनी थांबवले आहे. आयुक्त साहेबांची परवानगी घ्यावे लागेल. आयुक्त साहेबांना विचारावे लागेल. लहान ते लहान कामासाठी आम्हाला आयुक्तांच्या दालनमध्ये जावे लागते, तिथे बसावे लागते, एवढी मोठी महासभा चालत आहे आणि एवढी मोठी सुचना पटलवर महत्वाचे विषय आहे तर आयुक्त साहेबांनी तो कायदा बनुन ठेवला आहे सेन्टरलाइज नाही करून पूर्ण व्यवस्था आपल्याकडे ठेवलेली आहे तर आज जर आयुक्त नसणार तर प्रश्नाचा उत्तर कोणाकडून मागणार? आपल्या समस्यांचे समाधान कोणाकडून मागणार. आमच्या मनात जे शहराच्या हिताचे प्रश्न आहे जनतेचे जे प्रश्न आहे त्याचे उत्तर कोणाकडून मागणार? आणि माझी सर्व सदनला तुमचाकडून विनंती आहे की आयुक्तांना सांगण्यात यावे की जेव्हा जेव्हा महासभा होतात त्यावळी आयुक्त साहेब तिथे उपस्थित रहावे. सर्व कामकाज सोडून कारण ऐवढे सर्व नगरसेवक, जनप्रतिनिधी आपल्या सर्व कामकाज सोडून इथे महासभामध्ये विषय पटलावर चर्चा करणेसाठी येतात. महापौर उपस्थित होतात सर्व अधिकारी उपस्थित होतात आणि सर्व पत्रकार बंधु उपस्थित होतात आयुक्त साहेबांची उपस्थिती नसल्यामुळे ही महासभा जशी झाली पाहिजे तशी होणार नाही. तर माझी सर्वांना विनंती आहे की ही महासभा स्थगित करण्यात यावी. आणि आयुक्तांना महासभेच्या माध्यमातून आदेश दिली पाहिजे की जेव्हा जेव्हा महासभा होईल तेव्हा तेव्हा आयुक्त साहेबांची उपस्थिती झाली पाहिजेत, धन्यवाद.

**सदस्य श्री प्रदीप रामचंदानी:—** मा. महापौर मॅडम हा दु:खद गोष्ट आहे की आपल्या अतिरिक्त आयुक्त मॅडम बसल्या आहे आणि त्या म्हणतात की मी अतिरिक्त आयुक्त असुन पण मला निर्णय घेण्याचा अधिकार नाही यांचे जे म्हणणे आहे ते मोठे आहे. कोणी अतिरिक्त आयुक्त म्हणणे की मी मिनिस्टर विदाउट पोंटफोलिओ आहे मी अतिरिक्त आयुक्त आहे पण माझ्याकडे कोणताही अधिकार नाही. हा सभागृहाचा अपमान आहे या सदनचा अपमान असल्यामुळे आहे की जर शासनाने व्यवस्था ठेवली आहे की जर कोणी अधिकारी अनुपस्थित राहिला तर शासन किंवा प्रशासन त्यांचे खालचे अधिकारी यांनां त्यांचे पूर्ण अधिकार दिले पाहिजे. जे प्रतिनिधी निवडुन येतात आणि एवढी मोठया सभागृहामध्ये काही बोलले तर आणि तिथे जनतेचे विषय मांडणेसाठी आम्हाला महिन्यामध्ये एक वेळ बोलणेची संधी मिळते त्यावेळी जर आयुक्त नसल्यास तर काही हरकत नाही कारण की कोर्टात जावे लागतात. ब—याचवेळा व्यक्तिगत गोष्टी होतात, ब—यावेळा भांडण होतात सर्वानां न्यायालयात जावे लागतात जर तुम्हाला कोर्टात जायचे असते तर तुम्ही आपले अधिका—यांना आपले अधिकार का देत नाही? ही एक व्यवस्था झाली आहे. मी जबाबदारीने बोलत आहे की जर एक कुत्रा पण मेला तर आयुक्तांचे दार ठोकाव लागते, की आयुक्त साहेब कुत्रा मेला आहे. आणि आम्हाला सांगतात की करामध्ये वाढ केली पाहिजे. तुम्हाला सांगण्यात मला दु:ख होते की ज्या प्रकारातून काम निघतात त्या प्रकारे त्याच्यात अशी अटी टाकतात जसे की प्रतियोगिता न व्हावे. आणि त्या एक व्यक्तिच्या अधिकारामुळे महानगरपालिकेचे बरेच नुकसान होते. जसे की अधिकारी राहणार की नाही राहणार आयुक्त इथे किती दिवस राहणार परंतु आपण इथे राहणार आहोत. तुम्ही शहराच्या महापौर आहात तुम्हाला लोकांनी सत्ताचे कार्यभार सोपविलेला आहे तुम्हाला लक्ष दयावे लागेल.आणि अशा गोष्टीचे ज्या शहरात आम्ही राहतो त्या शहरात आपण जनतेचे काम नाही करू शकतो आणि आयुक्त नसणार त्या गोष्टीच्या आम्हांला दु:ख आहे. आणि मी याबाबतीत असे सांगु इच्छित आहे की जे सेन्टरलाईज पॉवर आहे ते बरोबर नाही ते चुकीचे आहे. पावर डी सेन्टरलाईज व्हायला पाहिजे. काम व्यवस्थित झाले पाहिजे. काम व्यक्तिने नाही केले पाहिजे जर काम फक्त व्यक्तिने केले तर तो व्यक्ती लोकतंत्राने काम नाही करु शकणार. तर ही अलोकतांत्रिक बाब होईल, लोकतांत्रिक गोष्टीने काम करायचे आहे. आयुक्त असो किंवा नसो सिस्टमने काम करावे लागेल. आपण एका व्यक्तीच्या आधाराने निवडून आलेलो नाहीत. त्यासाठी मी सभागृहाला विनंती करतो की ही सभा स्थगित केली तर आमची भावना पोहोचवली पाहिजे की डी सेंट्रलाईज सिस्टम ठेवली पाहिजे. सेंट्रलाईज केली नाही पाहिजे. धन्यवाद।

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**सन्माननिय महापौर महोदया, विधी विभागाचे कोण आहे त्यांना जरा बोलवा, आम्हांला काही विचारायचे आहे. आयुक्त साहेब जर कोर्टात जात असतील तर विधी विभागाची कोणती केस आहे हे जरा सांगा. ती कल्पना आम्हांला दया.

**डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**सन्माननिय विभागाकडुन माहिती घेण्यासाठी मी थोडा वेळ घेते.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**मा. महापौरजी, आता श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले की महापालिकेचे कामकाज एका माणसाच्या इशा—याने व जे महापालिकेचे जे आयुक्त यांनी महापालिकेस खाजगी मालमत्ता बनवुन ठेवली

आहे. मला जे वाटेल मी ते करेल अशी ही उल्हासनगरवाशियांची व उल्हासनगर महापालिकेच्या सर्व नगरसेवकांची व महापौर निवडून आल्या त्यांची ही मालमत्ता आहे परंतु आयुक्त यांनी स्वत:ची मालमत्ता बनवुन ठेवली आहे. त्याचे कारण मी सांगतो की, मागील महासभेत पाण्याचा विषय येथे आणला होता, पाण्याच्या विषयावर येथे चर्चा झाली व चर्चा झाल्यानंतर पाण्याचा प्रश्न झाला काय झाले लोकांना पाणी मिळाले का, लोक पाण्यासाठी ओरडत आहेत. नगरसेवक पाण्यासाठी जमिनीवर बसतात दोन–तीन तास पाण्यासाठी महासभा चालते. त्यानंतरही पाण्याची समस्या सुटत नाही, त्यानंतर आयुक्त आपली हुकुमशाही करत आहे, दादागिरी करत आहेत, आम्ही हेच करणार. जर असे झाले तर तसे होईल व तसे झाले तर असे होणार. मागील वेळेस जे आयुक्त होते त्यावेळी लोकांना पाणी मिळायचे. स्थायी समितीत सुध्दा सांगितले, त्यावेळी जे आयुक्त होते त्यावेळी लोकांना दोन वेळ पाणी मिळत असायचे. आता तर पाणीच मिळत नाही. त्यासाठी आपण काय करणार. तर म्हणतात नाही, मी म्हटले की एकच वेळ पाणी मिळेल. तर ही दादागिरी व हुकुमशाही झाली आहे. श्री. प्रदिप रामचंदानी यांनी जसे सांगितले की आपण महापौर आहात, आपली जबाबदारी आहे, जशी सिस्टम सुधारणा झाली पाहिजे, त्यासाठी आपण जबाबदार आहात, आपली ही जबाबदारी आहे. या सिस्टमला सुधारले पाहिजे व जो कोणी दादागिरी करत असेल तर त्यास रोखणे हे आपले काम आहे.

**श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय:–**आयुक्त साहेब, लष्कर मिळाले तेथे गेले आहे श्री. नंदन भावकर संदर्भातील कार्यालयातील केस आहे त्यासाठी गेले आहेत.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:–**ठिक आहे.

**सदस्य श्री. विजय पाटील:–**मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब नाहीत तर येथे काम होणार नाही तर आम्हांला येथे कशासाठी बोलाविले आहे. जर आयुक्त नसतील तर काम होणार नाही. आम्हांला बोलावले कशाला याचे उत्तर कोण देणार. एवढया नगरसेवकांना कामे नाही काय. कोणी ऐकुन घेणार नसेल तर आम्हांला बोलावतात कशाला सभेला? यांना अधिकार नाहीत तर आम्ही येथे येवून काय करणार? काय चाललय काय?

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**मा. महापौरजी, एक गोष्ट लक्षात घ्या...

**सदस्य श्री. विजय पाटील:–**आंधळ दळतंय आणि कुत्रं पिठ खातय् असे चाललय. कसली महापालिका आहे ही.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**मा. महापौरजी, मी एक सांगतो प्रत्येक सभेमध्ये निर्णय घेतला जातो तर त्या निर्णयाची अंमलबजावणी होते की नाही. महापौर म्हणुन आपले कर्तव्य आहे. मागील महासभेत आपण एक निर्णय घेतला होता की, खालचे युनियनचे ऑफिस जे दोन ऑफिस आहेत ते खाली करण्यासाठी निर्णय झाला होता. परंतु अदयाप ते खाली झाले नाही. जो निर्णय घेण्यासाठी आयुक्तांना सर्वांची सहमती घेण्याची गरज होती ती म्हणजे श्री. भगवान भालेराव यांची कॅबीन बंद केली ती न सांगता बंद केली. तेव्हा महासभेची परवानगी घेतली नाही त्यांच्याशी चर्चा केली नाही, त्यांना नोटिस देखील दिली गेली नाही आणि महासभेत ८३ नगरसेवकांनी आदेश केल्यानंतर त्यावर कार्यवाही अजुन होत नाही. मला वाटते हे काम कोणाचे आहे, आयुक्तांचे आहे की मा. सचिव महोदयांचे आहे, हे मला मा. देहेरकरजी जरा सांगाल का? एखादा निर्णय महासभेत झाल्यानंतर, तुमच्याकडे प्रत आल्यानंतर त्यावर अंमलबजावणी करायची की नाही करायची? हे तुम्ही ठरविणार की महासभेचा निर्णय वर विखंडीत करायला पाठविला आहे असे काही आहे का? मग त्या कॅबीन का नाही बंद होत, म्हणजे माझे म्हणणे एवढेच आहे, सदस्यांची कॅबीन तुम्ही दादागिरीने बंद करता त्याच्याशी चर्चा न करता. महासभा तुम्हांला आदेश देते, महासभेने घेतलेले निर्णयाची तुम्ही अंमलबजावणी करत नाही, ही दादागीरी चालणार काय? महासभेने घेतलेला कोणत्याही निर्णयाची अंमलबजावणी होत नाही तर आम्ही ही महासभा चालवु देणार नाही. सभा लावु नका. ठाण्याला आणि कल्याणला महापौरांनी निर्णय घेतला की एकही सभा लावु नका. मी सांगतो स्थायी समितीची सुध्दा सभा लावु नका. हुकुमशाही आहे की लोकशाही आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**मी बोलतो, महापौर महोदया, आपण मागील दोन सभेच्यावेळी, श्रीमती अलका पवार यांना पदावरुन दुर करण्यासाठी आपले मंत्री महोदयांनी आश्वासीत केले की श्रीमती अलका पवार यांना त्यांच्या पदावरुन २४ तासात काढले जाईल. तरी देखील तुम्ही विधानमंडळाचा आदेश पाळत नाहीत. दुसरी गोष्ट अशी आहे की, मला एक आपणांस विचारायचे आहे की, स्वच्छता अभियांनावर आपण एवढे पैसे खर्च करतो, स्वच्छता अभियानाची जी समिती बनविली, आम्हांला सोडुन दया विरोधीपक्षाला, तुम्हांला तरी विश्वासात घेतले आहे का. एवढी मोठी समिती जी ४० कोटी खर्च केले ते कोणाला विचारुन केले? कोणाच्या संमतीने पत्रकार घेतले गेले. जो पत्रकार २०–२५ वर्षापासुन असेल तर आम्ही त्यास समजु शकतो. तुम्ही कोठले लोक त्या समितीवर घेतले कोणाची संमती घेवुन? आपणांस विश्वासात घेतले असेल तर आम्हांला सभागृहाला सांगावे. मनमानी कारभार आयुक्तांचा चालला आहे. जी तानाशाहीची दक्षिण कोरीयाची भुमिका आहे ना तशा पध्दतीने कारभार चालला आहे. आणि यास सर्वस्वी जबाबदार मा. महापौर व आपण सर्व आहोत. तुमची तानाशाही खपवुन घेत आहोत. आपली आपण भुमिका बदलली पाहिजे. अशा अशा पध्दतीने निर्णय आपण लादतात. समितीने जी केली आहे त्यास

महासभेची परवानगी नाही. आणि कुठलीही गोष्ट जर महासभेची परवानगी नसेल तर ती समिती चालवु नये. मनात उठेल तशी माझी प्रापर्टी. ७/१२ मध्ये नाव टाकायला पाहतात. कुठल्या पध्दतीने हे काम चालले आहे. लोकल बॉडी काय आहे, त्याचे अधिकार काय आहे हे माहित पाहिजे. हे जर आयएस दर्जाचे आयुक्त असते ना तर असे झाले नसते हे प्रमोटेड अधिकारी आहेत. यांना अजुनपर्यंत ती भाषा कळली नाही आणि लोकल बॉडीला कसे घेवुन चालायचे ती त्यांना भुमिका कळली नाही. त्याठिकाणी लोकलबॉडीने अविश्वास ठराव केला. तेथुन त्यांना हकलुन पाठविले आहे आणि आता उल्हासनगर महापालिकेतुन त्यांना हकलुन पाठविण्याची वेळ आलेली आहे. महापौर महोदया आपल्या कार्यकाळात असे चालले आहे. ही जी बॉडी बनविली त्याबाबत आपल्याला विश्वासात घेतले नाही. भविष्यकाळात ही बॉडी बरखास्त केली पाहिजे. मी मागील महासभेत सांगितले होते ते आज आले नाहीत त्यांना समितीवर घेतले पाहिजे, त्यांना समितीवर चांगले ज्ञान आहे. असे कसे लोक तुम्ही समितीवर घेतले त्यांना काय ज्ञान आहे.

**सदस्य श्री. शंकर लुंड :—**समितीवर सांगा श्री. भालेराव कोण कोण आहेत ते. आम्हांला याची माहिती नाही.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**श्री. प्रदिप रामचंदानी सांगातात त्या समितीवर कोण आहे. त्यांनी पाठविलेल्या पॉम्पलेटवर ती नावे आहेत. तुम्ही केलेले आहे.

**सदस्य श्री. शंकर लुंड:—**साहेब, आम्हांला नाही माहित.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**मा. महापौरजी, याबाबत खुलासा व्हावा.

**सदस्य श्री. अरुण आशान:—**श्री. सुर्वेजी एक मिनिट, मा. महापौरजी, श्री. भगवान भालेराव यांनी आता जे सांगितले की एवढा सर्व महापालिकेचा पैसा त्या समितीवर खर्च केला जात आहे. जी समिती तज्ञ आहे, त्याचा काही अनुभव नाही. आपणास सुध्दा काही माहित नाही की समिती कधी बनली. मा. महापौर आपणांस सुध्दा माहित नाही का त्या समितीवर कोण पत्रकार आहे, कोण वरिष्ठ आहे. कोणास कोठुन दिले आहे, मा. महापौर महोदया आपणांस माहित आहे का? कृप्या या बाबतीत खुलासा करावा. ही समिती कधी व कोणी व कशी बनविली? कृपया खुलासा करावा.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**मला सुध्दा सांगण्यास दु:ख होत आहे की ही समिती कधी बनली याची मला सुध्दा माहिती नाही.

**सदस्य श्री. अरुण आशान:—**ऐका, ऐका जगवाले, आता आम्ही म्हणणार वाकडी नजर ना आमच्यावर टाका. जर काही निर्णय या महासभेत होतात व शहरात होतात, जर आपण शहराच्या प्रथम नागरीक आहात आणि आपणांसच माहित नाही तर सांगा. श्री. भगवान भालेराव तर १०० टक्के खरच सांगत आहेत. हुकुमशाही तानाशाही चालु आहे. आयुक्त साहेब कधी येणार ते माहित नाही, त्यांच्या जागी आज अतिरिक्त आयुक्त बसतात तर त्यांना काही माहित नाही. तर काय करावे? छोटया छोटया गोष्टीवर आयुक्त महोदय गरम होतात.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**आयुक्त महोदय एक मिनिट ऐकुन घ्या जरा. आम्ही एक वर्षापासुन पाहत आहोत, एक नगरसेवक त्याची सुनावणी झाली आहे. एक वर्षात एक नाली नाही बनवू शकत. एक वर्षात गल्ली नाही बनत व आपल्या शहराच्या नागरीकांची जप्ती घेतात. परंतु लोकांच्या सुविधासाठी काही किंमत नाही. जनप्रतिनिधींची काही किंमत नाही. आता हे पत्र आले आहे.

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजामध्ये कोण नेमके काय म्हणत होते हे समजुन येत नव्हते.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**ही सभा अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यात यावी.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—**एक वेळ सर्वांना बोलण्याचा अधिकार आहे.

**सदस्य श्री. अरुण आशान :—**सभागृहात एवढे वरिष्ठ नगरसेवक बोलत आहेत तर ऐकुन घ्या.

**सदस्य श्री. सतमरादास जेसवानी :—**हे पत्र वारंवार आमच्या घरी येते. आपण जरा एक वेळ या तर आपणांस समजेल की आपणांस कसे काम करायचे आहे. गोवाला जा व आपण शिका की कसे काम करायचे आहे ते.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**या सभागृहाची भावना लक्षात घेवुन ही सभा अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करु या. आणि आयुक्त महोदयांना सांगा की जोपर्यंत ते महासभेत येत नाही तोपर्यंत भलेही विपक्ष असो किंवा सत्ताधारी असो ही सभा चालवु देणार नाही.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**श्री. देहेरकर यांना खुलासा करण्यास सांगा की कॅबीन का नाही बंद केले.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सभा आपण आता स्थगित करु या. आपल्या सर्वांचा वेळ अगदी किंमती आहे. आयुक्त साहेब नाहीत.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**मा. महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्य, ज्या दालनाबाबत वाद झाला होता ती दालन बंद केली आहे. त्यावर निर्णय झालेला नाही.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—**मागच्या वेळेस महासभेत युनियनची दोन कार्यालयाबाबत निर्णय झाला आहे तर ते का बंद झाले नाही. कधी?

**सदस्य श्री. अरुण आशानः—**कधी करणार?

**सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—**चार दिवस, पाच दिवस, २४ तास कधी?

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**या येत्या १५ दिवसात कारवाई करणार.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**श्री. देहेरकर साहेब, समिती कधी बनविली ते सांगा ना महापौर महोदयांना.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**ही सभा अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**मा. महापौर महोदया, आता जसे उल्हासनगरमध्ये स्वच्छता अभियानाचा कार्यक्रम चालु आहे त्याप्रमाणे महासभेमध्ये आपले नेता यांच्या प्रतिमेवर फार धुळ बसली आहे ती जरा साफ करण्यात यावे.

**महापालिका सचिव :—**मी सार्वजनिक बांधकाम विभागास सांगते. दुस—या सभेचा निर्णय तुम्हांला घ्यायचा आहे त्यामध्ये लक्षवेधी आहेत.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**मा. महापौरजी मागील सभेत आपण सांगितले होते की जे अधिकारी सभेत उपस्थित नसतील तर त्यांना नोटिस दिली जाईल. जेव्हा जेव्हा हे विषय येतील तेव्हा तेव्हा संबंधित अधिका—यांनी सभेत आले पाहिजे. आता आज ते स्वतः नाहीत. मला आपण बोलु दया, आम्हांला बोलायचा अधिकार आहे. आयुक्त महोदयांनी काय सांगितले होते, आपण उत्तर देणार काय? आपणांस माहित आहे का? आपण उत्तर देत असाल तर दया, नाहीतर मी अतिरिक्त आयुक्त बसल्या आहेत त्यांना विचारतो. आपण होत्या त्या सभेत, आयुक्त महोदयांनी काय सांगितले होते. सर्व अधिकारी येतील, सर्व आले काय?

**सदस्य श्री. अरुण आशान :—**स्वतः आयुक्त साहेब नाही आलेत.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**जर कचरा साफ नाही झाला तर सफाई कामगारास दंडित केले जाते, त्यास निलंबित केले जाते, त्यांच्याकडुन दंड वसुल केला जातो, हा कोणता अत्याचार आहे. सफाई कामगारांकडुन ५० रुपये, १०० रुपये घेतात. आणि अधिकारी नाही आले तर त्यांच्यावर काय दंड असेल. प्रभाग अधिकारी का नाही आलेत, त्यांचे कर्तव्य काय?

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**दोनच अधिकारी उपस्थित आहेत, बाकी दोन प्रभाग अधिका—यांना नोटिस दया.का उपस्थित राहत नाहीत. आयुक्त उपस्थित राहिले की अधिकारी उपस्थित राहतात.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**गरीब सफाई कामगारांवर अत्याचार होतो हे फार चुकीचे आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**कोणकोणत्या विभागाचे अधिकारी नाही त्यांच्यावर कारवाई केली जावी.

**सदस्य श्री. अरुण आशानः—**नोटिस काढणार तर त्याचा निर्णय होणार काय? आयुक्तांनी सांगितले की मला फक्त खुर्चीवर बसविले आहे. सचिव महोदया दोन मिनिट ऐका.

**महापालिका सचिव :—**मला महापौर महोदयांनी आदेश दिला आहे की, ही सभा स्थगितचे जाहिर कर आणि दुसरी सभा सुरु कर.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**मला उत्तर दया.

**सदस्य श्री. विजय पाटीलः—**कोणी उत्तर देणार नाही तोपर्यंत ही सभा संपणार नाही.

**डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**सन्माननिय महापौर व सन्माननिय सभागृह, मला या सभेत कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार नाही.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**सुटलेला शब्द परत घ्या. सुटलेला शब्द परत घ्या. सुटलेला शब्द परत घ्या. असे शब्द बोलु शकतात काय आयुक्त. तुम्ही आयुक्तांच्या खुर्चीवर बसला आहात, हे शब्द आयुक्त बोलु शकतात काय? हे शब्द परत घेवुन दिलगीरी व्यक्त केली जावी.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**आपणांस उत्तर पाहिजे तर कृपया शांत रहा.

**डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**सन्माननिय महापौर व सन्माननिय सभागृह मी आपणांस अगदी नम्रपणे सांगितले आहे की मी आज येथे कार्यरत असल्यामुळे या खुर्चीला रिक्त ठेवता येत नाही. सभेच्या नितीशास्त्राप्रमाणे मी या खुर्चीवर बसले आहे. कोणतेही कार्यभार आयुक्त साहेबांकडुन मला मिळाला नाही. त्यामुळे निर्णय घेणेवगैरे कोणत्याही प्रक्रियेमध्ये मी सहभागी होवु शकणार नाही. मी स्पष्टपणे सांगितले आहे की आजच्या या अधिकारात मला कोणतेही अधिकार नाहीत.

**सदस्य श्री. विजय पाटील :—**महापौर महोदया, ही प्रशासनाची कशी सभा चालु आहे. सभेचा अर्थच काय आहे?

**सदस्य श्री. अरुण आशान :—**ही कशी सभा आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**ही सभा आता स्थगित केली जावी.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**ही सभा स्थगित करण्यांत आली आहे. दुसरी सभा सुरु करण्यात यावी.

**सदस्य श्री. विजय पाटील:—**ही सभा चालविली नाही, दुस—या सभेचे काय? आमचे कोण ऐकणारेच नाही, एकाने डोळे बंद केले, एकाने कान बंद केले.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सचिव महोदया, दुसरी सभा सुरु करावी.

**महापालिका सचिव :—**पहिली सभा संपली आहे आता दुसरी सभा सुरु करण्यांत येत आहे.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**पॅनल्टीचे काय उत्तर दिले.

**सदस्य श्री. अरुण आशान :—**डॉक्टर आपल्या विषयाचे उत्तर देत नाहीत तोपर्यंत मी खाली बसणार.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**डॉक्टर नाथानीजी, आपण समजदार आहात. जेव्हा आपल्या आयुक्त स्थानी बसलेल्या महोदयांना अधिकार नाही तर ते उत्तर देवुच शकणार नाहीत.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**तर मग त्यांनी खुर्ची खाली करुन निघून जावे ना. आयुक्त नाहीत तर आम्ही सुध्दा आले नसतो ना. उल्हासनगर शहरात मेघा कॅम्प चालु आहे मी ५० डॉक्टरांना सोडुन आलो आहे. तेथे मेडिकल कॅम्प चालु आहे, दुसरे डॉक्टर बसले आहेत. याचा अर्थ असा नाही की मी मेडिकल कॅम्प सोडुन आलो तर बंद झाले असे नाही दुसरे डॉक्टर तर चालवत आहेत ना. म्हारळ गाव येथे मोठे मेडिकल कॅम्प चालु आहे, वैदयकीय अधिका—यांना विचारा आपण तेथे आला होतात ना. त्यांना विचारा आम्ही तेथुन उठुन आलो की नाही आलो, काय आमच्याकडे वेळ होता का, आम्ही मेडिकल कॅम्प सोडुन आलो, आम्ही काय फालतु होतो का, यांच्याकडे अधिकार नाही तर आम्हांस फोन केला असता आम्ही येथे आलोच नसतो. आज गरीबांचे काहीतरी झाले असते ना.

**सदस्य श्री. विजय पाटील:—**मा. महापौर महोदया, आम्हीही तेच सांगत आहोत. तुम्ही जे बोलत आहात तर आम्हीही येथे तेच ओरडुन सांगत आहोत. त्यांना अधिकार नाही तर आम्ही येथे कशासाठी आलो आहोत आम्हांला तुम्ही कशासाठी बोलाविले आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**मा. महापौरजी, ज्यांचा अधिकार आहे त्यांना खुर्चीवर बसवा ना, यांची खुर्ची खाली करा ना.

**महापालिका सचिव :—**कृपया, लक्ष दया,मा. महापौर महोदयांनी ही सभा स्थगित केली आहे.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सदरची सभा स्थगित करण्यांत येत आहे.

---

सूचकाचे नांव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नांव :— डॉ. प्रकाश नाथानी

**<u>स्थगित प्रस्ताव</u>**

दिनांक २०/०१/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित केल्याने सदर सभा दिनांक १७/२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत आयुक्त नसल्याने सदर सभा स्थगित करण्यास प्रस्तावित.

**<u>महासभा ठराव क्र. ५९ इ</u>** **<u>दिनांक : १७/०२/२०१८</u>**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १७/०२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी २.३० वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— ५/३/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ५/३/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

**८ ब**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०/०१/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा स्थगित झाल्याने दिनांक १७/२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली व सदर सभा पुन्हा स्थगित झाल्याने सदरची सभा दिनांक ५/३/२०१८ रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित करण्यांत आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३७ | श्रीमती ज्योती प्रकाश (पिंटो) बठिजा |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३८ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३९ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ७ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४० | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ८ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४१ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४२ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४३ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ११ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४४ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १२ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४५ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १३ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४६ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १४ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४७ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १५ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४८ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १६ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ४९ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १७ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५० | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५१ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १९ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५२ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २० | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५३ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २१ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५४ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २२ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५५ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २३ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५७ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २५ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५८ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| २६ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ५९ | श्री. विजय चाहु पाटील |
| २७ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६० | कु. कविता सुरेश गायकवाड |
| २८ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६१ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २९ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६२ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३० | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६३ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३१ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३२ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६५ | श्री.सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३३ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६६ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| ३४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६७ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३५ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती पुजा सचिन भोईर, २. श्रीमती आशा नाना बिराडे, ३. श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा, ४. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ५. श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी, ६. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ७. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, ८. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ९. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, १०. श्री. सुमित सागर सोनकांबळे, ११. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, १२. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, १३. श्री. शंकर गोविंदराम लुंड, १४. श्रीमती कविता सुधिर बागुल, १५. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार
५. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
६. श्री. संतोष जाधव, सहा. मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. वानखेडे, लेखा अधिकारी
९. श्री. एस.के. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
१०. श्री. महेश शितलानी, उप अभियंता, साबांवि
११. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विदयुत
१२. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१३. श्री. तिजोरे, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१४. श्री. तरुण शेवकानी, प्र. उप अभियंता
१५. श्री. प्रबोधन मवाळे, सहा. आयुक्त
१६. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, आरोग्य
१७. श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त
१८. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१९. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२०. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२१. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२२. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

२३.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२४.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२५.श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपिक
२६.श्री. दिपक ममतानी, लिपिक, विधी विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

दुपारी २.४० वाजता वंदे मातरम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

यावेळी श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

**महापालिका सचिवः—** ही स्थगित सभा आहे.

लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्रीमती कांचन अमर लुंड व अनुमोदक आहेत श्री. सुनिल सुर्वे व श्री. शंकर लुंड

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सुचकाचे नाव :— श्रीमती कांचन अमर लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

श्री. शंकर लुंड

**विषय :—** पाणीपट्टी देयकावर अभय योजना चालू करणेबाबतची लक्षवेधी सूचना

उपरोक्त लक्षवेधी सूचनेनुसार सभागृहाचे विनंती पुर्वक लक्ष वेधू इच्छिते की, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील व्यापारी मालमत्तांना महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत पाणी पुरवठा करण्यात येत असून पाणी पट्टीची थकबाकी असल्याने त्यांना नाहक विलंबशास्ती रक्कमेचा भुर्दंड बसत आहे. महापालिकेने नुकतीच घरपट्टीसाठी अभय योजना राबविली असून नागरीकांनी सदर अभय योजनेस मोठया प्रमाणात प्रतिसाद दिलेला आहे. त्याच धर्तीवर पाणीपट्टी वसूलीवर देखील अभय योजना लागू केल्यास व्यापारी नळग्राहकांना फायदा होवून महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. तरी कृपया सदर लक्षवेधी सुचनेवर सभागृहात चर्चा विचार विनिमय होवून पाणीपट्टी देयकावर देखील अभय योजना लागू करावी ही विनंती.

---

**सदस्या श्रीमती कांचन लुंडः—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, जसे की, ही अभय योजना टॅक्ससाठी लावली होती, तर माझे असे म्हणणे आहे की, पाण्यावरही ही अभय योजना चालु करावी त्यामुळे नागरीकांना त्याचा फायदा होईल धन्यवाद.

**सदस्य श्री. किशोर वनवारीः—**मा. महापौरजी जी आमची बहीण कांचन लुंड यांनी जो मुद्दा उपस्थितीत केला हा जो मुद्दा आहे खुप चांगला आहे आणि हा विषय चांगला आहे. कारण आजपर्यंत आम्ही अभय योजना हाउस टॅक्सवर ब—याच वेळा लावली आहे. परंतु पाण्यावर जी अभय योजना आजपर्यंत लावली नाही ती एकदा लावावी त्यामुळे लोकांना फायदा मिळेल आणि व्याजामुळे लोक टॅक्स भरत नाही ही बाब महापालिकेलाही माहीत आहे. म्हणून पाण्यावर अभय योजना चालु करून टॅक्स गोळा करावा हे महापालिकेच्या फायदयाचे आहे.

**<u>श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय</u>—**मा. महापौरजी, मा. उप महापौरजी सर्व सन्मानिय सदस्य माझी आयुक्त साहेबाशी चर्चा झाली आहे साहेब म्हणतात ५ ते १० मिनिटे देतो एक पॉलिसी फ्रेम करून आपण त्यावर निर्णय घेतो त्यावर दुसरा पुढचा विषय घ्या आल्यानंतर त्यावर व्यवस्थीत चर्चा करता येईल.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>** मागविण्यानंतरच कारण काय आहे. पुर्वीची थकबाकी किती आहे आणि गेल्या ५ वर्षामध्ये वसुली किती झाली आहे. आणि वसूली न होण्याचे कारण काय आहे हे आकडे असतील मात्र वर्षानुवर्ष एरियर्स वाढत चालले आहे वस्तुस्थिती अशी आहे की, सन ९५ पासून आपल्याकडे वाटर सप्लाय वेगळी नाही आहे. एम जी पी ने आपल्याकडे हॅण्डओव्हर केल्यानंतर ९८ मध्ये आपण हा ठराव पारित केल्यानंतर प्रॉपर्टी करामध्येच पाण्याचे बील सुध्दा ॲड करावा त्यामुळे राहीले ते कर्मशियल डिस्प्युटेड पण पाणी पुरवठयाची थकबाकी एवढी बाकी आहे वर्षानुवर्ष की ती वसूल होण्यासारखी आहे किंवा नाही. आणि ज्यांची बाकी होती त्यांना आता सुध्दा पाणी चालू आहे. तेव्हा अभय योजना चालू करण्यापुर्वी ती माहीती दयावी की आता दरवर्षीचे करंट डिमांड किती, एरियर्स किती आहे. आणि डिमांड मधून दरवर्षी वसूली किती होते याचे आकडे असतील मला वाटते. तोपर्यत आयुक्त येईपर्यंत चर्चा करावी ते सांगावे.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः</u>—**महापौरजी, उप महापौरजी आणि आयुक्त साहेब पाणीपट्टी बाबत जे महापालिकेचे पैसे बाकी आहेत काही व्यापाऱ्यांकडे, दुकानदाराकडे त्यांच्याकडे जे मोठे मोठे बील जातात त्यामध्ये मुळ रक्कमेपेक्षा जास्त व्याज आहे. काही व्यापाऱ्यांकडे दुकानात नळ आहेत पहील्या काळात होते दुकानदारांनी दुकाने विकली काही गरीब आहेत ज्या लोकांकडे असे मोठ मोठी रक्कम हे आणि मुळ रक्कम बरीच कमी आहे आणि त्या लोकांनी रक्कम भरली तरी अनेक वेळा सर्वांकडे फेऱ्या मारतात. तरी कृपया या विषयात थोडी मदत करावी यामध्ये अभय योजना व्याज माफीसाठी जसे अभय योजना राबविली होती तसे पाणी पट्टीतही व्याज माफी मिळाली तर आम्ही आभार मानु धन्यवाद.

**<u>श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :</u>—**मा. महापौर महोदय, आयुक्त साहेब, उपमहापौर, आणि सर्व सन्मानिय सदस्य, ही जी पाणी पट्टी, ९४ च्या आगोदर या ज्या पाणी पुरवठयाच्या योजना आहेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून महापालिकेला हस्तांतरण झाले होते सुरूवातीला महाराष्ट्र जिवनप्राधिकरणा मार्फत पाणीपट्टी मिटरव्दारे कंजूमर किती पाणी वापरतात त्यावर बील आकारले जात होते त्यांच्यानंतर महापालिकेकडे आल्यानंतर १९९८ मध्ये बील आकारण्याची पध्दत बंद करून टॅक्स मधुन आपली पाणी पट्टी वसूल करण्यात येत आहे. म्हणजे चाळ असली तर वेगळा रेट बिल्डींग असली तर वेगळा रेट झोपडपट्टी असली तर वेगळा रेट अशा प्रकारे विभागणी केली जाते पण ९४ च्या अगोदर पासून एन जी पी कडून स्कीम आपल्याकडे आल्यानंतर ज्या ग्राहकाकडे थकबाकी होती ती वर्षानुवर्षे तशीच बुक बॅलेन्समध्ये असते आणि प्रत्येक वर्षामध्ये त्याच्यामध्ये व्याज वाढत जातो आणि प्रत्येक कंजुमरच्या नावावर ज्या जागेच्या नावावर बील जात असतो पण जागेवर कुठलेही कनेक्शन तसे दिसत नाही.आणि ज्या ठिकाणी बॅरेक होते १० रूम होते त्या ठिकाणी १० रूमची आकारणी केली जात नव्हती बॅरेकला एक कॉमन कनेक्शन होते त्यावरच १० रूमचे पाणी जात होते ते एक जे कनेक्शन आहे त्या बीलाचे आता कोणीच स्वीकार करत नाही आणि त्याच्यामध्ये असलेली थकबाकी १० हजार रूपये आजच्या घडीला १ लाख १० हजारापर्यंत गेलेले आहे. त्यामुळे जी मुळ रक्कम अशी वाढत वाढत जावुन आजच्या स्थितीमध्ये दोनशे पस्तीस कोटी येणे बाकी आहे असे बुक बॅलन्सला दिसते. परंतु ही रक्कम गोळा होणे शक्य नाही आहे. म्हणजे मुळ रक्कम जी लोकांकडे थकीत ती वसूल करण्यासाठी हया योजना राबविणे गरजेचे आहे आणि श्री. बोडारे साहेबानी विचारले होते महीन्याला किती बील आकारणी करतो साधारण ते वर्षाला ५ कोटी रूपये आपण जे बिलींगसाठी दोन हजार पाचशे कनेक्शन आपल्याकडे आहेत बिगर घरगुतीचे त्याचे आपण डिमांड देतो परंतु त्याची वसूली अडीच ते तीन कोटी पर्यंत दरवर्षामध्ये होते.

यावेळी आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर यांनी सभागृहात प्रवेश केला व आपल्या स्थानी आसनस्थ झाले.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे :</u>—**काय आहे मा. महापौरजी, त्याच्यामध्ये विषय असा आहे. एक तर ती थकबाकी दाखविली जाते ते थकबाकीदार येथे नाहीच आहेत पहीली गोष्ट ज्या व्यक्तीकडे कनेक्शन नाही आहे गेल्या वीस वर्षामध्ये म्हणजे १८ वर्ष झाली आपण २००० हजार पासून बीलामध्ये लावतो तेथे कनेक्शन नाही आहे त्या लोकांनी अर्ज पण केलेले आहेत की आमच्याकडे कनेक्शन नाही आहे तरी आपले डिर्पाटमेंट त्याच्यावर निर्णय घेत नाही माझ्याकडची दोन प्रकरणे आहेत एक मनोज महेशपती आणि रामलखन यादव अशी दोन प्रकरणे आहेत मी वारंवार पाठपुरावा केला मला असे वाटते की, माझी पाठ दुखायला लागली पाठपुरावा करून तर असे काही प्रकार आहेत की जेथे कनेक्शनच नाही उदा. एक मंदीर आहे माझ्या घराच्या कोपऱ्यावर २००७ साली बांधलेले आहे. त्या मंदीराला टॅक्स पावती आहे त्याचे लाईट बील येते आता मंदीरामध्ये पाण्याची गरज कधी लागते रोज तेथे पिण्याचे पाणी ठेवले आहे का असा सुध्दा काही प्रकार नाही हया ज्या चुका प्रशासनाकडून होतात आपल्याला ते भोगावे लागते हा निर्णय सुटला पाहीजे ज्या लोकांनी अर्ज केले आहेत की सदर जागी पाण्याचा कनेक्शन नसतांना आम्हाला पाण्याचे बील येते बऱ्याच ठिकाणी बिल्डींगमध्ये सेक्रेटरीच्या नावाने बील येते सेक्रेटरीला बील हे टेरकेसला अर्धा भागाला लागतो माझी माहीती अशी आहे परंतु त्यात पाणी बीलही येते सोसायटीच्या सेक्रेटरीला तर या अख्या उल्हासनगरच्या इमारतीच्या हा जो भौगोलिक अकडा दिसतो आपल्याला पाणी पट्टीचे ऐवढे राहीले आणि तेवढे राहीले आता तुमच्यापैकी बरेच लोक इमारतीत राहतात ना उल्हासनगर मधल्या

अधिकारी राहतात कर्मचारी राहतात त्यांना एवढे कळत नाही की जे चुक आहे एखादे मंदीर आहे त्या मंदीरामध्ये काय लागणार आहे, पाणी मंदीरात तो पुजारी थांबणार आहे त्याला काय पाणी लागणार आहे का रोज मंदीर धुतले जाते काही गोष्टी याचा पण प्रशासनाने विचार करावा नाहक नागरीकांना त्रास दयायचा लोकांना चकरा मारायला लावयाच्या काही लोकांच्या चुकांमुळे लोकांना त्रास होतो आज आपण पगार कोणाचे घेतो नागरीकांच्या करामधून जे पैसे जमा होतात त्याचे पैसे घेतो त्या पैश्यांमधून आपला पगार होतो. कमीत कमी याची तरी जाणीव ठेवा त्याकरीता आम्हाला उलट सुलट बोलावे लागते अधिकाऱ्यांशी काय गरज आहे आज ही योजना आणली आहे चांगल्या आमच्या बहिणीने चांगली योजना आणली आहे माझी हाऊसला विनंती आहे त्या योजने सोबत जी काही खोटी बील त्यामध्ये लावली आहेत हे तर समजा ज्याचे बील आहे त्यांनी भरले नाही त्याला व्याजसहीत बील भरायला सांगता तुम्ही. ती चांगली गोष्ट आहे आणि ते शासनाला पास करावे परंतु ज्याच्याकडे पाण्याचे कनेक्शन नाही आणि त्याच्या नावावर पाण्याचे बील येते तर उद्या जर तो ती प्रॉपर्टी विकसित करायला गेला तर ती एनओसी नसल्यामुळे तर त्याची प्रापर्टी विकसित होणार नाही का? थोडा महासभेच्या अनुषंगाने मी तुम्हाला विनंती करतो या गोष्टीवर बारीक लक्ष दयावे आयुक्त साहेब आले की यावर चर्चा होईल मी जे मुद्दे तुम्हाला नोंदविले आहेत त्याची कृपया खुलासा थोडा बहुत करावा मी जे आरोप करतो मी तक्रारी नावानुसार करतोय कुठल्या दोन प्रॉपटर्या माझ्याकडे आहेत अशा सर्व नगरसेवकांकडे लोक जातात आणि म्हणतात की आमच्याकडे कनेक्शनच नाही तरी आम्हाला बील येतेय पाण्याचे आणि मग ते थकीत आहे.

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा**:—मा. महापौर महोदय ज्या प्रॉपर्टीच्याच नावावर कनेक्शन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत दिले गेले होते आणि जी प्रॉपर्टी चेंज करताना त्याच्यातील लायबिलीटी न पहाता प्रॉपर्टी नावावर होऊन जातात.म्हणजे प्रॉपर्टीच्या नावावर ज्या पत्यावर ज्या व्यक्ती नसल्यातरी त्या प्रॉपर्टीच्या नावावर थकीत असलेले बील आमच्या पाणीपुरवठा विभागाकडून दिले जाते परंतु त्याचे माफ करण्याची पावर पाणी पुरवठयाला डायरेक्ट नसल्याने मागे दोन तीन वेळा मा. स्थायी समितीच्यापुढे हा विषय आम्ही आणला होता.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**साहेब नाही आणला मी तेच सांगतो ज्या काही प्रॉपटर्या आहेत ना विशेष कोणीतरी असेल ना आता समजा मी एखादया प्रॉपर्टीच्या मागे लागला तेव्हा याचे क्लीयर करा तेव्हा तुम्ही स्थायीला पाठवता सरसकट आलेले अर्ज आणि सरसकट आलेले असे त्यावर नाही होत सर्वसामान्य माणूस आमच्या पर्यंत पोहचतो तसे नाही आहे सगळया नगरसेवकांकडे त्याच्या ओळखीने म्हणा तुमच्याकडे आलेला अर्ज आहे त्या अनुषंगाने तुम्ही तेथे गेले पाहीजे हा अर्ज आहे तुझ काय आहे कनेक्शन नाही आहे ते दाखव जो कर्मचारी तुम्ही नेमला आहे जो लिपिक, जो इस्पेक्टर तुम्ही नेमला आहे त्याचा रिपोर्ट पाहीजे तुमच्याकडे म्हणजे जेईकडे गेला पाहीजे, उप आयुक्तांकडे गेला पाहीजे तुमच्याकडे आला पाहीजे ही प्रोसेस आहे त्यानंतर तुम्ही जेव्हा त्यावर निर्णय घेवून तुम्ही जेव्हा स्थायीला पाठवाल तेव्हा आम्ही निर्णय घेवू ना मी जी दोन उदाहरणे नावासकट सांगितली त्याला सात सात आठ आठ वर्षे झाले पाठपुरावा करून अजुन आहे तसेच आहे वाटल्यास ते एपल्किेशन मी आणले नाही ते मी मागवून घेतो मागवून घेवू ते अर्ज किती तारखेला केलेत.

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा** जे स्थायी समितीकडे पाठविण्याचे प्रस्ताव आमच्याकडे आले होते माफ करण्याचे ते आम्ही पाठविले होते सर तेव्हा आपण म्हणाले की पुर्णपणे ज्या लोकांकडे थकबाकी आहे ते पुर्णपणे आणावा त्यांच्यानंतर आपल्याला निर्णय घेता येईल असे आपण बोलले होते त्यामुळे हा विषय मोठा २३५ कोटीचा थकीत असल्यामुळे याला माफ करण्याचा अधिकार महासभेला आहे

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**साहेब संपुर्ण रक्कमेचे नाही म्हटले आम्ही ज्या प्रॉपर्टीला कनेक्शनच नाही आहे त्या प्रॉपर्टी बाबत बोललोय मी जे थकीत आहे ना ते २००० पासून लावले ना टॅक्सला.

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा** :—पण त्यानी ९४ मध्ये त्याच्या प्रॉपटीमध्ये असलेले १००० रूपये त्यांनी भरले नसल्याने पुढे वाढत गेले आहे. त्यांनी कधीही भरायचा प्रयत्नच केला नाही प्रॉपटी ते विकून गेले प्रॉपटी डेव्हलप झाली त्या ठिकाणी कोणी पैसे भरलेले नाही आजच्या स्थितीला ते व्याज आपल्याकडे जे १८ टक्के.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**व्याज माफीचे जे आणले आहे तो विषय चांगला आहे परंतु जे त्याचे आहे तेवढी ॲक्च्यूल रक्कम तुम्ही कमी करा ना जी असेल ती

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा** :—तसा प्रस्ताव पाठवणार आहे आणि आपण विचारले होते मंदीर जे की मंदीरामध्येही कनेक्शनचे बील येतात पण ती पॉलिसी अशी आहे सर, ते तीन टाइपेच रेट आपण वापरतो एक बीगर घरगुतीसाठी वेगळा रेट आहे घरगुतीसाठी वेगळा रेट आहे आणि नो लॉस नो प्राफिट की जे सरकारी ऑफिस आहे, शाळा आहे, मंदीर आहे त्याच्यासाठी एक वेगळा रेट आहे म्हणजे आपण किती पाण्यासाठी खर्च करतो त्या रेटच्या आधारावर ते रेट दिले जातात ते मंदीर असले तरी त्याप्रमाणे ते कनेक्शन दिले आहे त्या कनेक्शनच्या आधारावर बील थकीत असतील ती सुध्दा बीगर घरगुती कनेक्शन असेल तरी ते आपण बीलींग करतोय त्याची वसूलीपण चालु आहे सर.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**दोन हजार पाचशे जे बीगर घरगुती कनेक्शन आहेत आणि त्या पोटी आपण दरवर्षी आपण ५ कोटी बील देतोय आणि अडीच ते तीन कोटी वसूली होते म्हणजे जवळपास १२०० ते १३०० प्रापर्टी बील आमची अशीच जातात की जे नाही आहेत जी ९४ पुर्वी होती त्यांच्यानंतर कटींग चालू आहे असेच आहे ना पण हे साहेब प्रशासनाकडून आले पाहीजे आम्ही ट्रान्सपर फंड बोलतोय मग मालमत्ता कर असू दे किंवा पाणी पट्टी कर असू दे जर प्रशासनच्या लक्षात आले की जर प्रॉपर्टीच नाही आणि वांरवार त्याचे बील प्रोडयूस होते आणि ते बील आपण देतोय त्यामुळे इकडे काय होते की दर वर्षी अडीच तीन कोटी ते ॲरियस वाढते म्हणजे आता ९४ पासूनचा अडिच तीन कोटी एरियर्स म्हणजे ते आपल्या बजेटमध्ये किती तरतुद आहे ते नाही आहे म्हणजे प्रशासनाला ही वस्तुस्थिती कमीशनरच्या किंवा जनरल बॉडीच्या लक्षात आणून दयायाला हे १२०० कनेक्शनचे दर महीन्याला जर १०० जरी कनेक्शन आले तर हे बोगस कनेक्शन आहेत ते नाही आहेत तर आता पर्यंत क्लीयर झाले असते तेव्हा आम्हाला माहीत नाही पण प्रशासनाला माहीती आहे की सी ब्लॉकला बॅ. नं. १२५४ किंवा ८५४ आहे तो अस्तित्वात नाही परंतु आमच्याकडून बील प्रोडयुस होते आणि ते बोगस आहे तर असे प्रस्ताव प्रशासनाने जनरल बॉडी समोर आणले पाहीजे एक वैयक्तिक नको आहे जीवन इदनानी उप महापौर आहेत म्हणून त्यांनी जेव्हा सांगीतले तेव्हा ते कनेक्शन रद्द करण्यासाठी आले तर धनंजय बोडारे विरोधी पक्ष नेता आहे जमनु पुरस्वानी सभागृह नेता आहे म्हणून त्यांनी जेव्हा सांगितले तेव्हा ते कनेक्शन रद्द करण्यासाठी आले हे सर्वसामान्याचे काम नाही हे कोणीतरी अप्रोच होते म्हणून ते काम होईल म्हणून जसे सुर्वे साहेबांनी सांगितले की एक वैयक्तिकपणे नको ती कॉमन पॉलीसी झाली पाहीजे की सर्वसामान्यांना त्याचा फायदा झाला पाहीजे त्यामुळे प्रशासनही पारदर्शक पाहीजे की आमच्याकडे एवढे उत्पन्न आहे जर बोगस उत्पन्न दरवर्षी अडीच कोटी असेल तर दहा वर्षांनी ते पंचवीस कोटी त्याचे चक्रवाढ व्याज ते किती होणार आहे ते कुठेतरी थांबले पाहीजे ना जे नाही आहे ते आम्ही लोकांना दाखवतो मग प्रशासन काय करते आणि म्हणून सांगीतले की अभय योजना आणावी लागेल की दोन वेळा चार वेळा की आम्हालाच माहीती नाही की उत्पन्न आहे किती मग तुम्ही सांगीतलेली प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवता येत नाही कारण ती खरी आहे ते समजत नाही तुम्हाला माहीत आहे मग आणत का नाही तुम्ही साहेब. त्यांनी सांगितले अडीचशे कनेक्शन आहेत तर आम्ही दरवर्षी डिमांड करतो ५ कोटी. तर वस्तुस्थिती अशी आहे की दरवर्षी उत्पन्न कितीही आटापीटा केला तरी अडीच कोटी तीन कोटी म्हणजे ५० टक्के जे नाही आहे ते आमच्या पेपरवर येते म्हणजे जे चुकीचे आहे ते काढायला एवढा किती वेळ लागतोय गेल्या ९७ पासून ते २०१७, वीस वर्षामध्ये महानगरपालिका ही जे बोगस किंवा चुकीचे बील जातात तेही करू शकले नाही असे आमचे प्रशासन असेल तर काय उपयोगाचे आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी सेलवन साहेब जे सांगत आहेत ना की ९३ नंतर महानगरपालिकेचे बील टॅक्समध्ये गेले ते साफ चुकीचे आहे महानगरपालिका त्यावेळेस नव्हती नगरपालिका होती ९२ साली निवडणूक झाली होती एक वर्षाच्या काळात महानगरपालिका सस्पेंड झाली होती ९३ मध्ये जाधव साहेब प्रशासक होते तेव्हा नगरपालिका होती एम आय डी सी ने महानगरपालिकेला दिले कि तुम्ही बील पाठवावे त्यानंतर ९७ पर्यंत मिटरव्दारे बील जात होते त्यानंतर नरेंद्र राजानी स्थायी समितीचे चेअरमन बनले मी सदस्य होतो ९७ मध्ये मेजरमेंटनुसार पाण्याचे बील दिले जात होते. त्यानंतर साई टेंकचंदानी व इतर लोक कोर्टात गेले त्यानंतर पुन्हा हाऊस टॅक्समध्ये पाण्याचे बील लावून दिले त्यानंतर ते चालू झाले ९७ च्या नंतर ९८ मध्ये त्याच्याबरोबर कर्मशिअलचे असे ठेवले अॅजपर कंजेक्शन त्यामध्ये जेवढे ग्राहक आहेत कर्मशिअल वाईज त्यांना कर्मशिअल वाईज बील जात आहे मीटरचे तीन रिडींग जाते कोणाला मिनिमम कोणाला ॲवरेज व कोणाला ॲक्च्यूल लागून लागून पाण्यामध्ये राहील्याने मीटर खराब होत जात होते कोणाला पाच हजार कोणाला दहा हजार कोणाला पंचवीस हजार असे एक एक महीन्याचे बील लावून लोकांना पाठवत होते बऱ्याच लोकांनी कर्मशियल कनेक्शन कापून टाकले एवढे बील कोण भरेल त्यानंतर ज्या लोकाचे राहीले आहे त्यांना सुध्दा व्याजावर व्याज असे १ नंबर पासून ५ नंबर पर्यंत कमीत कमी ३००, २००, ४०० प्रॉपर्टी असेल ज्यांचे आज पर्यत कनेक्शन कट आहे परंतु त्यांना आजपर्यंत बील जात आहे. अनेक वर्षापासून लोकांनी अर्ज दिले आहेत तर इकडे बोलले जाते नगरसेवकाला पकडा स्टॅडींगमध्ये आणा एक एक केस करून येते तर आज पर्यंत जे आमचे मॅडम कांचन लुंड यांनी ही लक्षवेधी लावली ती या विषयावर आहे की कर्मशिअलवाल्यांना पाण्यासाठी कधीही अभय योजनेचा लाभ मिळाला नाही आहे. आपण जे हाऊस टॅक्स बाबत जे सांगीतले होते त्याबद्दल सभागृहानेही सांगीतले होते की आता यापुढे घराचे हाऊस टॅक्स बाबत अभय योजना येणार नाही हे शेवटचे आहे हा जो विषय आहे पाणी पुरवठयाचा दिपक सिरवानी यांनी सुध्दा हा विषय मांडला होता त्यावेळेस जर अभय योजना हाऊस टॅक्स बरोबर पाणी पाणी पट्टीवर सुध्दा लावली असती तर हा विषय आजपर्यत राहीला नसता तर एक वेळा शहरातील लोकांना जे व्याजावर व्याज लावून जे बील पाठविले आहेत एक वेळा अभय योजना पाणी पुरवठयाबाबत ठेवावी कारण त्यांचे जे ग्राहक आहेत ते त्याचा लाभ घेवू शकतील आणि महानगरपालिकेला सुध्दा ते लोक व्याज सोडून जी मुळ रक्कम आहे ती भरण्यास तयार आहेत त्यामुळे महानगरपालिकेचेही उत्पन्न वाढेल तर माझी सभागृहाशी, आयुक्त साहेबाशी महापौर असे त्यांना आदेश देतील की एक वेळा पाणी पुरवठयाचीही अभय योजना लागली पाहीजे आणि शहरातील लोकांना फायदा झाला पाहीजे धन्यवाद.

**सदस्य श्री. किशोर वनवारी:—**मा. महापौरजी, आयुक्त जी दोन महीन्यापुर्वी या दालनात मिंटींग झाली होती पाणी बद्दल अभय योजने बद्दल मी याची माहीती देवू इच्छितो आठवण देवू इच्छितो की तसे पत्रही आयुक्तांना गेलेले आहे या बद्दल अभय योजना चालू केली पाहीजे आणि जे डबल बीलींग होत आहे

त्याबद्दल आम्ही पत्र दिले होते त्याची सुध्दा अंमलबजावणी झाली नाही त्या बद्दल आमच्या किशोर भाईनी सांगीतले तर त्याबद्दल आमचाही होकार आहे का त्याचे काय झाले.

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा** —मा. सर्व सदस्य आपण जसे मालमत्ता करा बाबत अभय योजना आणली होती तशी पाणी पट्टी बाबतही अभय योजना आणायला हवी ते आमच्या त्यावेळेस लक्षात आले होते परंतु त्यासाठी आम्ही चर्चा केली तर फक्त मालमत्ता करासाठीच अभय योजना होती परंतु याबाबत आमचे काही दुमत नाही पाणी टॅक्स बाबतही आमची आऊट स्टॅंडीग रक्कम आहे ती खुप जास्त आहे २३५ करोड आहे त्यामध्ये ८० टक्के व्याज आहे आणि २० टक्के फक्त मुद्दल आहे तर याप्रकारे आम्ही प्रॉपर्टी टॅक्स मध्ये आम्ही तीन प्रकारामध्ये अभय योजना चालू केली होती तर मला वाटते असाच प्रकार आपण याबाबत चालू करू शकतो

**सदस्य श्री. धनंजय बोडारेः—** अभय योजना ७५ टक्के नको ती १०० टक्के करा कारण पहील्यांदाच ही योजना पाणी पट्टीवर होत आहे तर पहील्या १५ दिवसा करीता १०० टक्के त्यानंतर ७५ टक्के त्यानंतर ५० टक्के कारण ही पहिल्यांदाच होत आहे

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय** :—यापुर्वी सुध्दा जी अभय योजना चालू होती त्यावर आम्ही पुर्णपणे व्याजावर माफी दिली नाही

**सदस्य श्री. मनोज संयानीः—**ज्यावेळेस सुरूवात झाली होती मालमत्ता कराची त्यावेळेस घरपट्टी बाबत आम्ही १०० टक्के केली होती दोन वेळा खतगावकर यांचे वेळी आणि हिरे साहेबांच्या वेळी केली होती दोन वेळा १०० टक्के त्यावेळेस लेंगरेकर होते फस्ट स्टेज १०० टक्के दुसऱ्यादां ७५ टक्के आणि तिसऱ्यादा ५० टक्के

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः—**जर असे असेल तर १०० टक्के आपल्याला देयाला पाहीजे कारण याच्यात कसे आहे की आपले कनेक्शन कट होवूनही त्याच्यावर सतत बील आलेले आहे तो वेगळा मुद्दा आहे तुम्ही जे मुळ पैसे घेणार आहे ते बरोबर आहे पण कित्येक लोक असे आहेत ज्यांचे कनेक्शन नाही आहे १५ वर्षा पासून पण त्यांना सतत बील येतोय तर तो तुमच्याकडे येणार आहे माझ्याकडे १५ वर्षापासून कनेक्शन आहे पण मी मुळ बील कशाला भरू माझ्याकडे कनेक्शनच नाही

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—**त्याचे दोन भाग होवू शकतात एक तर एका मध्ये ९५ मध्ये कनेक्शन घेतले असेल २००० साली ती प्रॉपर्टी डेमोलेशन करून नवीन बनवीली असेल २००० साली ते येणे चुकीचे आहे ९५ ते २००० साला पर्यंत त्यांनी जे वापरले आहे त्याची तर वसूली करण्यात येईल तर हा सर्व रेकॉर्ड विभागातुन घेवून मी बोलून करू शकेन.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**मा. महापौरजी मा. आयुक्त साहेब हा विषय जो कांचन लुंडजीने मांडला आहे हा पुर्ण १०० टक्के याच्यात व्याज माफी दिली गेली पाहीजे कारण कित्येक वर्षापासून ही व्याज माफी पाणी पट्टीवर दिली नाही आणि बऱ्याच लोकांनी कर्मशियलचे कनेक्शन कापले आहेत आणि त्यांच्याकडे त्याबाबत अर्ज सुध्दा आहेत दहा दहा वर्षा पासून १५ वर्षा पासून व्याज लागून लागून कोणाला १० लाख २५ लाख याप्रकारे बील येत आहेत परंतु मुळ बील एक लाखापेक्षा कमी आहे काहीना १०००,१००००,१५००० असे बील येत आहेत परंतु ५ लाख बील येत आहेत तेव्हा कृपया एक महीन्यासाठी पहीला महीना आहे तो १००टक्के त्यानंतर आपण ७५ टक्के दयातर अनेक लोक जे यासाठी वेठीस धरले आहेत महापालिकेमध्ये फेऱ्या मारीत आहेत आम्ही १० वर्षा पुर्वी आमचे पाण्याचे कर्मशियल कनेक्शन कापले आहे आमच्याकडे आमच्याकडे पाणी नाही आहे तरी आम्हाला १० लाख २०लाख बील येत आहे तर हे खुप चांगले शहरासाठी जे लोक त्रस्त आहेत एक मोका आहे आणि आज पासूनच आपण किंवा तीन चार दिवसाचा वेळ घेवून एक महीन्यासाठी पुर्ण माफी आणि बाकीचे एक महीन्यासाठी ७५ टक्के अशा प्रकारचा प्रस्ताव पास करावा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर** —ठिक आहे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः—**याच्यावर प्रस्ताव घेता येणार नाही महापौराचा आदेश तसा झाला पाहीजे आणि हो धोरणात्मक निर्णय म्हणून आयुक्तांनी घ्यावे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर** :—१६ मार्च पासून १५ एप्रिल पर्यंत एक महीन्याचा १०० टक्के करतोय १६ एप्रिल पासून ३० एप्रिल पर्यंत ७५ टक्के सेकंड टर्म असेल आणि १मे पासून १५मे पर्यंत ५०टक्के असा तिसरा टर्म असेल

**सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—** . परंतु तुम्ही योजना दिली परंतु ज्या लोकांनी पहीले अर्ज करून सात सात आठ आठ वर्षापासून ज्या लोकांचे फायनल झाले नाही त्याचे काय करणार

**सदस्य श्री. मनोज सयानीः—**आयुक्त साहेब यामध्ये महापौर एम जी पी चे एक केस आहे कारण २००४ च्या आधी बिलींग एमजीपी करत होती बरेच आमचे असे ग्राहक आहेत कस्टमर आहेत त्याने कनेक्शन घेतले परंतु कापले नाही आता त्यांना बोलले जाते कारण प्रॉपर्टी विकली तर ओवर इनव्हेटर कुठे करायची असे दोन तीन केस आल्या होत्या त्यांना एमजीपी जायला लागले होते अंबरनाथमध्ये तेथे त्यांचे

वेगळेच नाटक आहे तर एमजीपीसी बोलून एमजीपीची महानगरपालिकेची आम्हाला एमजीपीने हॅन्डर्वक केले आहे परंतु एनओसी त्यांची पाहीजे २००४ साला पुर्वीचे

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर** :—जेवढया सोप्या पदधतीने आपण करणार तेवढे करू

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**साहेब मी दोन प्रकरणाचा उल्लेख केला होता आपण नव्हता तेव्हा रमापती रामरतन यादव आणि अशोक महेश्वरी हयाच्यांकडे सहा सात वर्षापासून कनेक्शन नाही म्हणून त्यांनी अर्ज केला त्याची पीसी तयार झाली आहे पण त्याच्यावर निर्णय झाला नाही त्या दोन प्रकरणावर आपण कसे करणार ते थोडे विशेष लक्ष देवून पहीले करायला सांगा

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**आमचे पण रेज्यूलेशन २०१२ मध्ये केले होते२००७ पासून २०१२ पर्यत की जेवढे एमजीपीचे आमचे थकबाकी आहे ती थकबाकी झीरो केली आहे तर आजपर्यंत आमचे ते रेज्युलेशन इफेंक्ट आहे तर त्यासाठी एमजीपीच्या एनओसीची गरज नाही लागली पाहीजे किंवा एमजीपीची एनओसी आम्ही लोक मागणार त्याची काही जरूरत नाही. असे आपण घोषीत केले पाहीजे आमचे लोक एनओसी घेवून आले ते ठिक नाही. दुसरे काही लोकांना ॲवरेज बील दिले जाते पहीले दोन वर्ष ॲवरेज बील दिले २५००० हजार रूपये पर महीना ॲवरेज लाईन तीच आहे १५ एम एम ची आणि १५एम एम ची लाईन आहे त्याचे ॲवरेज बील दिले ५०००० हजारपाणी उल्हासनगर मध्ये वाढले नाही आहे पण त्याला ॲवरेज केले ५०००० हजार त्यांनी अर्ज केला आहे बरेच अर्ज पाणी पुरवठा विभागात पडले आहेत तर त्यांचे सुध्दा निवारण झाले पाहीजे

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**मा. महापौर, आयुक्त साहेब आपले धन्यवाद जसे आपण बोलले १५ मार्च आज ५ मार्च आहे दहा दिवस आज १६ मार्च साहेब माझे प्रश्न आहे एक तर सिंगल वींडो तयार करा ज्यांचे डीसपुटर प्रश्न आहेत तर सिंगल वीडोमध्ये त्याचे शार्ट आऊट केले पाहीजे आज अभय योजने बद्दल बोलणार आम्ही अभय योजना चालू केली तर अभय योजनेचा लाभ घेतला नाही ड्रीस्पुटर बिलाचे काय करणार पहीले ड्रीस्पुटर बिलासाठी एक सींगल वींडो तयार करण्याप्रमाणे बील शॉर्टींग झाले पाहीजे बील शॉर्टींग झाल्यानंतर आपण आता बोलले १६ तारखेस भले आपण १६ तारखेचे २१ मार्च तारीख करा फक्त शहरामध्ये अवेअर झाले पाहीजे जागृत होता होता एक महीना निघून जाईल लोकांना १०० टक्के लाभ होत नाही फक्त ७५ टक्के लाभ होतो तर माझे असे म्हणणे आहे की हा सर एस सर थॅक्यु सिंगल वीडोचे जर प्रावीजन होत असेल खुप चांगले आहे, धन्यवाद.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सन्मानिय सदस्य, सन्मानिय आयुक्त साहेब, उप महापौरजी मागच्या वेळेस मी एक आदेश काढला होता महासभेच्या दिवशी जे जे अधिकारी येत नाहीत त्यांच्यावर सक्त कारवाई झाली पाहीजे आज जे अधिकारी आले नाहीत मी आयुक्त साहेबांना आदेश देतो की त्यांचे लेखी स्वरूपात कारण जरूर घ्यावे आणि माझ्या टेबलावर पाठवावे असे माझे आदेश आहेत.

**महापालिका सचिव:—** दुसरी लक्षवेधी आहे सुचकाचे नांव श्रीम. जयश्री पाटील अनुमोदकाचे नाव श्रीम. पुजा भोईर

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.....................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचकाचे नाव :— श्रीमती जयश्री पाटील

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती पुजा भोईर

विषय :— कोटयावधी रुपये खर्च करुन सुध्दा चाळीस लाख लीटर पाणी साठयाची क्षमता असलेल्या जलकुंभात पाण्याचा साठा होत नसल्याबाबतची लक्षवेधी सूचना

उल्हासनगर नं. १ या भागात बॅरेक नं. २०४ जवळ हा जलकुंभ बनविण्यात आलेला आहे. सदर जलकुंभाच्या बांधकामाचे डिझाईन चुकीचे बनविल्यामुळे जलकुंभात पाणीसाठा होत नाही असे पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी व कोणार्क कंपनीचे ठेकेदार एकमेकावर आरोप प्रत्यारोप करत असल्याची बाब मा. आयुक्त साहेबांसमोर उघड झालेली असून सुध्दा याबाबत कोणतीही प्रकारची चौकशी का होत नाही?

सदर बाबीची मी या सभागृहात चौकशीची मागणी करीत असून या जलकुंभाच्या चुकीच्या बांधकामास जबाबदार असणा—यांवर कारवाई होईल किंवा नाही हे मा. महापौर व मा. आयुक्त साहेबांनी सांगावे, ही विनंती.

---

**सदस्या श्रीमती अर्चना करनकाळे:—**मा. आयुक्त साहेब मा. महापौर मॅडम सर महापौर दालानामध्ये आपण या विषयावर चर्चा केलेली आहे सदर आरोग्य विभागाला स्वच्छते बाबत आपण सांगितले होते परंतु एक वेळा परत सर्व अधिकाऱ्यांना पाठवून त्या टाकीची पहाणी करून आणि तेथील स्वच्छतेची पहाणी करावी कारण ते सांगितल्या प्रमाणे झाले नाही त्या मिंटीगला विरोधी पक्ष नेते बोडारे साहेब पण होते मी सर्व सदनला विनंती करते की शहरातील पाणी विषयाबाबत आपण स्वत: तेथे जावून लक्ष दयावे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**महापौर महोदया लक्षवेधी आपण घेतो कोणत्या लक्षवेधी घेतो कोणत्या टाळतो आता हा लक्षवेधीचा विषय नव्हता तसा तर हा सर्वस्वी अधिकार तुमचा आहे लक्षवेधी कुठल्या घ्यायच्या लक्षवेधी घेतल्यानंतर त्याच्यावर गांर्भियाने चर्चा झाली पाहीजे लक्ष संपुर्ण सभागहाचे आले पाहीजे करनकाळे मॅडमनी सांगीतले की महापौरांकडे बसून चर्चा करून अशी लक्षवेधी होऊ शकत नाही यापुढे असे होता कामा नये उप महापौर आपण पण लक्ष दयावे लक्षवेधी म्हणजे दोन वेळा त्यावर वांदगपण माजला होता की आमची लक्षवेधी का घेतली नाही हा लक्षवेधीचा विषय नाही आहे आपण कटाक्षाने लक्ष दया की सभागृहाचे गांर्भिय तसेच चालेले पाहीजे एका वाक्यामध्ये लक्षवेधी संपते ती लक्षवेधी होऊ शकत नाहीयापुढे लक्षवेधी स्वीकारतांना आपण कटाक्षाने काळजी घ्या.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**मा. महापौरजी विषय सुरू होण्यापुर्वी पाण्या बाबत मी बोलू इच्छतो पाणीच्या विषयाबाबत बऱ्याच वेळी सभागृहात चर्चा होत आहे मा. महापौरजी आपल्या दालानात सुध्दा मा. आयुक्तजी पाणी पुरवठा अधिकारी बैठक घेत आहेत पण पुर्णस्वरूपात समाधान काही गोष्टीत जे की लहान लहान गोष्टी आहेत त्यांचे निवारण आजपर्यंत होत नाही. एक विषय आहे लिकेजबाबत मा. आयुक्त जी सांगतांना मोठे दु:ख होते आमच्या शहराचे आमदार मा. ज्योती कलानीजी एक विषय पाहीला तर आपल्याकडे तक्रार करून किंवा पाणी पुरवठा अधिकाऱ्याशी बोलले आणि आठ आठ दिवस एक छोटेसे काम जे दोन तीन तासात पुर्ण होईल ते सुध्दा होत नाही तर ही गोष्ट या महासभेसाठी खास करून माझ्यासाठी दु:खद घटना आहे की आमच्या शहरातील आमदार एखादी तक्रार देते आणि त्यांच्या तक्रारीलाही आठ दिवस लागतात तर सर्वसाधारण जनतेचे काय होणार खेमाणी रोडवर जेथे आमदार निवास आहे जेथे प्रभाग समिती कार्यालय होते त्याला आता शिप्ट केले आहे यात्री निवास तेथे एक मोठा लिकेज आहे दोन ठिकाणावर आणि बऱ्याच वेळा स्थायी समितीमध्ये किंवा पाणी पुरवठा विषयावर कधी चर्चा होते तर सेलवनजीना आपण सुध्दा त्या मिंटीगला असाल या विषयाला मी मांडले आहे मी बोललो पण आहे आणि आज मला आमच्या आमदारांचा फोन आला सभागृहामध्ये की आम्ही लोकांना काय सांगणार जे छोटेसे काम लिकेजचे आहे आम्ही शहराच्या आयुक्तांना सभागृनेत्याला पत्र दिले आहे आणि हे काम होत नाही हे काम कधी होणार एक लिकेज की जे चोवीस तासाच्या आत बंद झाला पाहीजे मी कित्येक वेळा सांगीतले आहे की लिकेजची पध्दत अशी झाली पाहीजे चारी प्रभागामध्ये एक प्लंबर, वेल्डर,कर्मचारी तयार असले पाहीजे आणि जशी एखादी तक्रार येईल तसे चोवीस तासाच्या आत तिचे निवारण झाले पाहीजे परंतु आठ आठ दिवस शहराचे आमदार लिकेजसाठी तक्रार करणार आणि तक्रार पुर्ण होणार नाही किंवा एखादा अधिकारी त्यांना भेटणार नाही तर हे आमच्यासाठी आमच्या सभागृहासाठी ही दु:खाची गोष्ट आहे मा. आयुक्तजी समजा कोणी कोणत्या पक्षाचे आहे किंवा कोणीही नगरसेवक आहे किंवा कोणी साधारण शहराचा नागरीक आहे जर लिकेजची तक्रार करत आहे जसे पुर्ण देशात चालले आहे की पाणी आम्हाला वाचवायचे आहे जल है तो कल आहे बरेच होर्डींग पाहतो देशभर पंतप्रधान होर्डींग लावत आहे मुख्यमंत्री होर्डींग लावत आहे परंतु आमच्या शहरात लाखो लिटर पाण्याची नासाडी होत आहे तर मी आपल्याला विनंती करतो की अशा प्रकारचे विषय आहेत लिकेज बाबत लगेच निवारण झाले पाहीजे परंतु जे राजकीय प्रशासनावर बसलेले पद अधिकारी जर अशा प्रकारची तक्रार करतात ते कोणत्याही पक्षाच्या संबधीत असो संविधानिक व्यक्ती आहे जन प्रतिनिधी आहे नगरसेवक आहे ग्रामपंचायतचा सदस्य आहे किंवा आपल्या शहरातील पंचायतीचा सदस्य आहे तर त्यांचे कामे लगेच झाली पाहीजे कामामध्ये काही अडचण येत असेल तर अधिकारी यांनी संबधीत सदस्याशी तसे सांगितले पाहीजे चर्चा केली पाहीजे मी आपल्याला विनंती करतो की आजच आपल्या अधिकारी यांना सुचित करावे आमदारा बरोबर तसे बोलून घ्यावे काय अडचण आहे त्याचे निवारण कसे करता येईल कशा प्रकारे लिकेज बंद करावे ही कारवाई व्हायला पाहीजे उद्या मी तक्रार करेन अधिकारी नाही येणार काम नाही होणार ही वेगळी गोष्ट आहे याचे दु:ख होते मी आपणास विनंती करेन मा महापौरजी हे काम आजच झाले पाहीजे शहराचे आमदार मला फोन करतात ही खेदाची बाब आहे

**सदस्या श्रीमती पंचम कालानी:—**मा. महापौर मा.आयुक्त मी मॅसेज पाठविले आहेत तरी आज काम चालू झाले आहे मला सांगा एवढे लाखो लिटर पाणी वाया गेले त्याचा भरपाई कोण देणार उद्या शहरामध्ये एखादी इमरजन्सी झाली तर तीन दिवस आपण सुट्टी घेवून बसणार आमची तर सुट्टी आहे आम्ही काम करणार नाही आज का चालु आहे काम आठ दिवसापासून अडचणी आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** त्याच दिवशी मी सुचित केले होते परंतु काही टॅकनिकल अडचणीमुळे ते काम झाले नाही आज ते काम आम्ही करत आहोत

**सदस्या श्रीमती पंचम कालानी:—**परंतु त्याचे कारण काय आहे

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर** :—ते सांगतील सेलवन

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—**शट डाऊन होते तर हे काम आधिच केले पाहीजे होते त्यावेळेसही सर्वांना झोप लागली होती दुसरे काम करायचेही नव्हते त्या विभागाचा जो मिस्त्री आहे कमीत कमी त्याला तर दंड करा एवढे दुर्लक्ष का होते लिकेजवर जो माणूस सुचना देतो साधारण माणूस त्याला धन्यवाद दिले पाहीजे जो एक फोन करून आपल्याला सुचीत करतो भाऊ अमुक ठिकाणी पाणी लिकेज आहे ते लवकरात लवकर बंद करा आपण सर्वांनी त्याला धन्यवाद दिले पाहीजे कृपया या गोष्टीवर लक्ष दयावे धन्यवाद.

**सदस्य श्री. महेश सुखरामानी:—**मी सभागृहाला अवगत करू इच्छितो की माझी सतत तक्रार याबाबतीत होती किशोरजीकडे, ठाकरेजीने दोन वेळा प्रयत्न केला होता परंतु ती चोवीस तासाची लाईन होती तर पाणी बंद केल्याशिवाय ते काम होऊ शकणार नव्हते परंतु सगळयात मोठी अडचण येत होती जो काम करणारा ठेकेदार होता त्याचे म्हणणे असे होते की आयुक्त साहेबानी इस्टिमेंट बनविणेसाठी नकार दिला आहे तर काम आम्ही कसे करणार आम्हाला पैसा कसा मिळणार अशा वेळी तात्काळ काही ठेकेदार आमच्यावर विश्वास ठेवून काम करण्यास तयार होते परंतु याची जबाबदारी कोण घेणार तर मी किशोरजीला सांगितले तर ते म्हणाले आम्ही काही करू शकणार नाही वारंवार माझा त्यांना हाच प्रश्न होता तर माझी सभागृपुढे आयुक्तासमोर विनंती आहे की अशा विषयावर गांर्भियाने विचार करून ते काम पुर्ण करावे जेव्हा पाणी चालू होते तेव्हा तेथे असे दृश्य होते की जसे स्वीमिंग पुल चालू आहे पाणी संपुर्ण रोडवर वाहत होते एवढे लोक येत होते माझा वार्ड आहे सर्वांना मी सांगत आहे परंतु कोणी ऐकण्यास तयार नव्हते आज सकाळी आयुक्तांशी माझे बोलणे झाले परंतु त्याचे इस्टीमेंट बनविणेस आयुक्त साहेबानी मनाई केली आहे पुढे या गोष्टीची आठवण ठेवा आपण

**महापालिका सचिव:—**विषय क्र. २

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—** सेलवनजी मला आधी खेमाणीचे उत्तर दया आधी आपल्याला तक्रार बरेच दिवसापासून मिळाली आहे या आधी १५ दिवसापुर्वी आपली चर्चा एका विषयावर चालू होती त्यावेळेसही कोणत्या तरी सदस्यांनी या विषावर भाष्य केले होते खेमाणीचे तुम्ही मला सांगा एवढे दिवस काम का होत नव्हते का इस्टिमेंटची अडचण होती खरे सांगा

यावेळी मा. महापौर हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—**खेमाणीच्या चौकात जे कनेक्शन आहे ते तीस वर्षापुर्वीच्या पाईप लाईनच्या कनेक्शनवरून पाणी येत होते तेथे अशी अडचण आहे की एक कलर्व्हट आहे कलर्व्हटच्या खालून सहा ते आठ पुठाची खाली पाईप लाईन आहे त्याच्यावर प्रत्येक वेळेस लोकांनी दोन इंच तीन इंच पाईप लाईन टाकून गेलेले आहे आणि ती लाईन आता सडून गेल्यामुळे तिथून ते लिकेज होते आणि आमच्या लोकांनी गेले दहा दिवसापासून बरेचवेळा लिकेज बंद केला तरी पुर्णपणे तो बंद होत नाही आणि खालचा जो वॉश आऊट आहे त्याची एम आय एस पाईप लाईन असल्यामुळे पाण्यामध्ये ती सडून गेलेली आहे तर ते बंद करण्यासाठी कॅम्प १,२,३ नंबरचे पुर्ण पाणी बंद करावे लागेल आम्ही शुक्रवारी नियोजन केले होते परंतु शुक्रवारी पाणी पुरवठा चालू असल्याने होळीमध्ये ते आम्ही करू शकलो नाही आणि काल पण आम्ही तेथे जावून लागणारे साहीत्य मनुष्यबळ घेवून आम्हीआज काम चालू केले आहे सर पुर्णपणे खोदून भले तीन चार तास पाणी बंद ठेवून आम्ही ते करून घेणार आहे सर

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**सेलवनजी मागील आठ महीन्यापासून भगवान भालेरावजीने सांगितले आहे दहा वेळा तेथे लिकेज बंद करण्याचे काम झाले आहे परंतु ते कधीही कायम स्वरूपी बंद झाले नाही पुन्हा तेथून पाणी बाहेर निघते त्यामुळे तेथे खड्डेही होत आहेत तेथे दुर्घटना सुध्दा होत आहेत लासी बिल्डींगच्या समोर एवढा मोठा खड्डा झाला आहे की तर माझे म्हणणे काय आहे की जेथे जेथे आपल्याला पाईप बदली करायचे आहेत जे पाईप बऱ्याच वर्षापासून आहेत ते सडले आहेत तर ते पाईपचे तुकडे लावून बंद होत नाही ती मेन लाईन आहे कोणत्या नगरसेवकाची जबाबदारी नाही आहे ती आमच्या इस्टीमेंटमध्ये पास झाले नाही ते सोडून दया परंतु मेन रोडवर पाणी एवढे वाहिल तर रुहाणी संत्संग तेथे सुध्दा आपल्याला पाईप बदली करावी लागणार आहे आणि जे लासी बिल्डींगच्या समोर आहे. तेथेही मोठा खडडा झाला आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**लासी बिल्डींग जवळ जो खड्डा आहे तो किती वेळा आपण रिपेरिंग केला आहे मला सांगा मी तो सहा वर्षे पाहात आहे आणि काही सदस्य म्हणतात १५ वर्षे जर १५ वर्षापासून ते लिकेज निघत नाही मग का थांबले एवढे काम मग त्याला पण पैसे नाहीत का आता नविनच तुम्ही काढले आहे की ज्या ठेकेदारानी काम घेतले आहे त्यांनी ते काम करायचे निघाला की तो खड्डा १५ दिवसापासुन तुम्ही तो खणून ठेवला आहे.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—**सेलवन साहेब भालेराव साहेबांनी सांगितल्याप्रमाणे १५ वर्षा पासून ते काम प्रलंबित आहे. या बद्दल तुम्हाला काही बोलले तर त्याचा प्रशासनाला राग येतो एवढे लाखो लिटर पाणी वाया चालेले आहे ते बंद करण्याची ताकद तुमच्या मध्ये नाही त्यानंतर तुम्ही वेगवेगळया विषयावर बोलतात ते चुकीचे आहे तुम्ही जर पाणी वाया घालवत असाल तर ती चांगली गोष्ट नाही एका बाजुला लोकांना पाणी मिळत नाही आणि दुसरे तुम्ही पाणी वाया घालवता ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**मा. महापौर,मा. उप महापौर आणि आयुक्त साहेब शहाड स्टेशनच्या समोरही खड्डा केलेला आहे किती पाणी वाया जाते आणि कोणार्क कंपनीच्या समोर खड्डे करून ठेवले आहे एवढे पाणी लिकेज होते की पाणीच पाणी तेथे झाले आहे कृपया ते पाणी लवकर बंद करावे स्टेशन समोर काल शिवजंयती होती ती पाण्यामध्ये गेली.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**आयुक्त साहेब बरेच शहर असतात की त्यांना नदी नसते त्यांना पाणी येते आमच्या शहरातुन उल्हास नदी जाते तरी आम्हाला पाणी येत नाही किती खेदाची गोष्ट आहे उल्हास नदी असून सुध्दा आम्हाला पाणी मिळत नाही आणि जे पाणी येते ते रोडवर वाहून जाते आताच एक जण क्लीप दाखवून गेला त्याला काय करायचे होते क्लीप दाखवून आयुक्त साहेब दोन महीन्यापुर्वी जेव्हा बॉटलचा विषय आला होता तर आपण मला सांगितले होते की यापुढे मी बॉटलची ऑर्डर देणार नाही सॉरी, तेव्हा काय झाले होते की मी आपणास विनंती केली होती साहेब पाणी पुरवठयाचे सा.बा.विभागाशी एकमत न होऊ शकल्याने ते लिकेज चालू आहेत जर ते लिकेज बंद झाले नाही तर माझे पार्टोज नाही बनले आता जमनुजी नाराज झाले होते जमनुजी तेथून दिवसातून २५ वेळा जातात पोस्ट ऑफिस पासून १ नंबर पासून जमुनजी तेथुन जातात त्यांनाही ते लिकेज दिसते जर हे नगरसेवकांचे काम आहे किंवा आमदारांचे काम आहे सर्व आधिकाऱ्यांना बसवून बोलायचे की हे लिकेज बंद करा प्रभाग अधिकारी फिरत नाही अधिकारी फिरत नाही खाली नगरसेकांनी लक्ष दयायचे नगरसेवकांना हेच काम आहे. कारण आपल्याकडे फंड उरलेच नाही नवीन काम करण्यासाठी आता महापौराचेही काम होणार नाही आमदाराचेही काम होणार नाही नगरसेवकांचेही काम होणार नाही सर्व शहरामध्ये लिकेज बघायचे दुसरे काय करणार मिंटीग येणार प्रभाग समितीमध्ये गाडी येणार,वेल्डींग होणार परंतु काहीच होत नाही मिंटीग चाटींग एवरिथिंग चांटीग ओवर हिअर आयुक्त साहेब लिकेजचे काम लवकर करा ही विनंती ध्यनंवाद.

**उप—महापौर :—**मा. सदस्य मा. महापौरजी मॅडमचा असा आदेश आहे आयुक्त साहेबांना की जेथे जेथे लिकेज आहेत पुर्ण शहरात तेथे एक विशेष मोहीम चालवा हे सर्व लिकेज बंद झाली पाहीजे आणि लिकेज बंद होत नाही तर सदस्यांचे नेत्याचे आणि सर्वसाधारण जनतेच्या तक्रारीनुसार लिकेज बंद होत नसतील तर मा. महापौराचां आदेंश आहे की जेथे जेथे अशी लिकेज दुर्लक्षीत केली जात आहेत तर त्या एरियातील प्रभाग अधिकारी आणि पाणी पुरवठा अधिकारी यांच्या कारवाई करण्यात यावी कारण पाणी लोकांना मिळत नाही आणि पाणी वेस्टेज होणार नाही आणि हे काम लवकरात लवकर व्हावे

**सदय डॉ. प्रकाश नाथानी:—**उप महापौरजी मी एक गोष्ट करू इच्छितो की आपण एवढे चांगले बोलेले आपण बोलले की महापौर मॅडमने आयुक्ताला आदेश केले पाहीजे तर माझा एकच प्रश्न होता आजपर्यंत महापौरांनी जेवढे आदेश दिले आहेत आयुक्त साहेबांना त्यामधून किती पुर्ण झाले आहेत महापौर मॅडम आपल्या आदेशाचे पालन कुठे झाले आहे. मला उत्तर द्या.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—** मा. वानखेडे साहेब मी आपल्याला सांगितले की जेव्हा मी तेथे बसलो होतो महापौर मॅडमचाही तो आदेश होता

**सदस्य श्री. राजेश वानखेडे:—**मी तर एवढेच विचारले कि आजपर्यंत जे आदेश केले आहेत ते किती निकाली काढले आहेत.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—** आजपर्यंत जेवढे आदेश दिले आहेत ते लागू होतील

**सदस्य श्री. राजेश वानखेडे:—** खोटे आश्वासन देता त्यावर काहीच अंमबजावणी होत नाही.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २०/११/२०१७ (त्यात १८/१२/२०१७) आणि विशेष महासभा दिनांक १६/१२/२०१७ (त्यात २२/१२/२०१७, २८/१२/२०७ व ३/१/२०१७) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** मागील सभेचे दिनांक दिनांक २०/११/२०१७ (त्यात १८/१२/२०१७) आणि विशेष महासभा दिनांक १६/१२/२०१७ (त्यात २२/१२/२०१७, २८/१२/२०७ व ३/१/२०१७) रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. २ :** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २०/११/२०१७ (त्यात १८/१२/२०१७) आणि विशेष महासभा दिनांक १६/१२/२०१७ (त्यात २२/१२/२०१७,

२८/१२/२०७ व ३/१/२०१७) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. भगवान भालेराव

**महासभा ठराव क्र. ५९ ई** **दिनांक ५/३/२०१८**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक २०/११/२०१७ (त्यात १८/१२/२०१७) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ३० पर्यंतचे, विशेष महासभा दिनांक १६/१२/२०१७ (त्यात २२/१२/२०१७, २८/१२/२०७ व ३/१/२०१७) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ७६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिवः—**विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

——————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ३:—** श्रीम. शोभा सुरेश शिरपुरकर यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणे.

——————————————————————————————————————————

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—** नियमाप्रमाणे, नियमात राहून.

**काही सदस्य :—**पास—पास......

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :—** श्रीम. शोभा सुरेश शिरपुरकर यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणे.

**प्रस्तावना**

कै. सुरेश शिरपुरकर, वाहन चालक, यांना स्वताच्या वैदयकिय उपचारासाठी हॉली क्रॉस हॉस्पिटल कल्याण, येथील खाजगी रुग्णालयात दिनांक ५/१०/२०१६ ते दिनांक १३/१०/२०१६ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये २,१४,५९५/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी १७/०३/२०१७ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. हॉली क्रॉस हॉस्पिटल कल्याण, हे शासन मान्य रुग्णालय नाही. यास उपरोक्त नियमानुसार मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ९० टक्के एवढा खर्च अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणे शिवाय १) ह्रदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक ह्रदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, कै. सुरेश शिरपुरकर, वाहन चालक, यांचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार अ.क्र १ व १५ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,८९,३८८/— इतका मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणेत येत आहे.

**महासभा ठराव क्र: ६०** **दिनांक:— ५/३/२०१८**

सूचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. भगवान भालेराव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीम. शोभा सुरेश शिरपुरकर यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,८९,३८८/— इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :—** महापालिका आस्थापने वरील वर्ग— १/२/३/४ विविध संवर्गातील पदे नामनिर्देशनाने भरणे.

---

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—**कुठले फायरमनचे ना हा त्यांना मान्य करावे लागतील

**सदस्या श्रीमती पंचम कालानी:—** सर कॅलक्युलेशनच्या प्रमाणे ३५ टक्के नाही आहेत आणि आपण कॅलकुलेट केल्यानंतर २५ टक्के आहेत

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—**मा.महापौर मा. आयुक्त सर्व सन्मानिय सदस्य उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये २००३ नंतर भरती झालेली नाही त्यामुळे जवळपास आपल्याकडे ५०० च्या वरती पोस्ट रिक्त होत्या पण सद्यस्थितीत आपला अस्थापना खर्च पहाता अंत्यात भरणे आवश्यक आहेत विकासाच्या दृष्टीने असे उप अभियंता कनिष्ठ अभियंता त्यानंतर उप अग्निशमन अधिकारी आणि फायरमन असे ७१ पैकी ६९ पोष्ट भरणे बाबत प्रस्ताव ठेवलेला आहे त्याच्यावरती साधारण वार्षिक खर्च दोन कोटी पाच लाख येणार आहे हे सर्व तातडीने भरणेची जी पदे आहेत तीच घेतलेली आहेत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—** सचिव मॅडम एक मिनीट मागील जे विषय आहेत ते वाट न पहाता लागू करावे धन्यवाद

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**आपण आता घोषवारामध्ये लिहीले आहे कि अस्थापना खर्च ३५ टक्के पेक्षा जास्त आहे आता बजेट जो आपण सादर केला त्याच्यावर चर्चा झाली तर तेथे आयुक्त साहेबांनी

सांगितले की आस्थापनेचा खर्च आपला २५ टक्के आहे तर हा पेपर खरा आहे का आयुक्त साहेबांनी स्टॅंडिंग कमिटीमध्ये सांगितले ते खरे आहे आस्थापना खर्च २५ टक्के आहे पेज नं. ३ वर लिहिले आहे

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**सद्या उल्हासनगर महानगरपालिकेचा अस्थापनेवरील वरील खर्च ३५ टक्केपेंक्षा अधिक आहे. तर जेव्हा बजेट सादर केले त्यामध्ये आपण सांगितले की आमचा अस्थापना खर्च आहे जो २५ टक्के आहे हे ३५ टक्के बोलले आहे आपण तेथे २५ सांगितले

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**कॅलक्युलेट करण्याचे वेगवेगळे प्रकार आहेत काही महानगरपालिका एकूण आपला रिव्हेन्यु आहे त्यावर टक्केवारी काढतात ज्यामध्ये शासनाचे जे ग्रॅंड असते ते सामिल करत नाही तर अंदाजे मी बोललो असेल आपला खर्च २५ टक्के नसून ३५ टक्क्याच्यावर आहे

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**करायला काही हरकत नाही पण येथे तुम्ही म्हटले आहे की ३५ टक्क्याच्यावर आहे खर्च चालु आहे २० ते २५ कोटी २० ते २१ कोटीचा भार पडणार आहे सर्व पदे भरल्यास २० ते २१ कोटीचा भार पडणार आहे बरोबर आहे सातव्या वेतन आयोगा प्रमाणे अजून वाढणार आहे

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—** आता जे टेबल आपण दिले आहे त्या टेबलमध्ये सिरीअल नं. ४ सहा. आयुक्त प्रभाग क्षेत्र अधिकारी एकुण मंजूर पदे ६ आणि सरळसेवा प्रमाण पत्र २५ तर आपल्याकडे सहा. आयुक्त ६ आहेत तर किती पदे भरले आहेत माझ्या मते एक पण नाही तर सर्व पदे भरली पाहीजे आपण रिक्त पद एकच लिहीले आहे

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—** त्यामध्ये डेप्युटेशनचे २५ टक्के तुम्ही पकडत नाहीत २५ टक्के प्रमोनचे आहेत आणि २५ टक्के सरळसेवा आहे असे चार भाग आहेत याच्यामध्ये त्यामुळे तो एक आलेला आहे सॉरी प्रमोशन ५० टक्के आहेत अरोग्य निरीक्षक १८ (५०टक्के ९ ५ ४)

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—** तर आपण आरोग्य निरीक्षकही नमुद केलेले नाही कही जागेवर तर मजुर जे आहेत ते शिकलेले आहेत तर त्यांना आपण एस आय चा चार्ज दिला आहे जर पद रिक्त आहेत तर आपण ते चार पदे भरली पाहीजे

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—** माझा प्रस्ताव महासभेला अस राहील की आपल्याकडे ज्या काही लेडी कर्मचारी असतील आपला अस्थापना खर्च वाढवायचा नाही आपल्याला ही भरती पण करायची आहे आणि आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये काही शिकलेले ज्यांच्याकडे शैक्षणिक पात्रता आहे तर त्याच्यामधून एक इंटरनल भरती केली तर फार चांगले होईल

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—** आपण बोलता खर्च वाढवायचा नाही आता महानगरपालिकामध्ये कमिशनर आणि डेप्युटी कमिशनर ही दोन पदे सोडून बाकीच्या सर्व पदांवर तीन पदे अशी आहेत ती डायरेक्ट भरती केलेली आहे बाकी जेवढी पदे आहेत सर्व लोक प्रभारी काम करत आहेत असिटंट कमिशनर प्रभारी आहे जेवढे आपले एचओडी आहेत जेसे मालमत्ता, स्टोर किंवा सार्वजनिक आरोग्य विभाग असेल किंवा सार्वजनिक बांधकाम असो तर येथे सर्व जागेवर प्रभारीही काम करीत आहेत जोपर्यंत त्या पदास योग्य असलेले अधिकारी भरती केली जात नाही तर येणाऱ्या काळात अडचणी निर्माण होतील गार्डनचा जो विषय आहे तो वेगळा आहे आता विधी अधिकारीची पोष्ट रिकामी आहे सादरकर्ता आहे चौकशी अधिकारी आहे ड्राफ्ट्समन खाली आहे जो हेल्फर पाहीजे त्यांना विदयुत विभागाला पाहीजे पाणी पुरवठा विभागाला पाहीजे दुसरे विभागाला पाहीजे जो सामान त्यांना पाहीजे मजुर सुध्दा नाहीत आणि सर्व ठिकाणी ठेकेदाराचे कामे चालू आहेत तर आमच्या मते ही पदेही भरली गेली पाहीजे विधी अधिकारी प्रेझेंटिंग अधिकारी सादर कर्ता चौकशी अधिकारी ड्राफ्ट्समन आणि वाहन व्यवस्थापक ही पदे आपल्याकडे खाली आहेत ही पदे पण भरले पाहीजे कारण जसे इंजिनिअर भरती केली आहे त्यांना मुकादम मिळणार नाही तर इंजिनिअर स्वत: जाऊन माप घेणार नाही

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—** जो नविन आकृतीबंध २००६ अन्वये नगरविकास विभागाने नगरपालिकेसाठी दिलेला आहे त्याच्यामध्ये बाकी चौकशी अधिकारी हे पद नाही आहे त्यानंतर तुमचा विधि अधिकारी नाही आहे आणि सगळयात महत्वाचे म्हणजे आपल्याकडे जे सेवा प्रवेश नियम आताच २०१६ मध्ये झालेला आहे त्याच्यामध्ये याबाबत कोणतीच तरतुद नाही आहे पण एक मात्र पुर्वीचा जो आकृतीबंध २००२ मध्ये झालेला होता त्याच्यामध्ये ही पदे होती परंतु आताचा जो सेवा प्रवेश नियमावली आहे मंजूर होवून आलेला आहे शासनाकडून आपण जो सादर केलेला आहे त्याच्यामध्ये या बाबत कोणतीच तरतुद नाही.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**सन्मानिय सदस्य वर्ग १ वर्ग २ या बद्दल ही जी चर्चा चालू आहे जेव्हा एखादा इजिनिअंर असतो त्याच्या पाठीमागे मुकादम लागतात बाकीचे मिस्त्री लागतात वगैरे परंतु वर्ग क्र. ३ व वर्ग क्र. ४ याच्यामध्ये आज या महानगरपालिकेमध्ये जेवढे कर्मचारी आहेत जे पदोन्नतीस पात्र आहेत ज्यांच्या फाईल्सपण बऱ्याच तयार असतील अशांना पदोन्नती आजपर्यत आपण का नाही देत जर ती दिली नियमानुसार तर मला वाटते जे खालचे कर्मचारी आहेत ते मिळू शकतील

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—** सन्मानिय सदस्य हे मान्य आहे की पदोन्नती २००३ नंतर २०११ ला शेवटी पोष्टची झाली होती त्यानंतर झालेली नाही आहे त्याची माझ्याकडे लिस्ट आहे की

आपल्याकडे २०७ पदोन्नतीची पदे रिक्त आहेत आम्ही सिनिरिटी लिस्ट तयार करायला घेतलेली आहे सिनिरिटी लिस्ट तयार केल्यानंतर या सहा महिन्याच्या आत जेवढे पदोन्नतीचे पदे आहेत ते जेवढे शक्य आहे तेवढे आम्ही पुर्ण करणार आहोत त्या संदर्भात आम्ही जो काही अभ्यास आहे तो चालू केलेला आहे तयारीपण चालू केलेली आहे

**<u>सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>** वर्ग तीन आणि चार..........

**<u>श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—</u>** सर्वच घेतलेली आहेत मी टोटल लिस्ट काढलेली आहे मी तुम्हाला सांगतो वर्ग अ ची १२ पदे रिक्त आहेत वर्ग ब ७ आहेत क ची १६७ आहेत ड ची २१ आहेत अशी २०७ पदोन्नतीची पदे आहेत.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**आयुक्त साहेब काही बोलणार होते मी त्यासाठी थांबलो माझे म्हणणे असे आहे की साहेब मदतनिसचे जे पदे आहेत ते आपण घेतले नाहीत खालचे जे दुसरा जे माझे म्हणने आहे साहेब २००३ मध्ये जी भरती झाली होती तेव्हा महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर बरेच आरोप लागले होते तर ही जी आपण ६९ पदे भरण्याची लिस्ट पाठविली आहे तर ते आपण कसे भरणार आहेत आणि आम्हाला असे नको आहे की त्यामध्ये काही गैर भरती होवून ती भरती स्थगीत होणार

**<u>श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—</u>** १९ सप्टेंबर २०१७ ला शासनाने जीआर काढलेला आहे त्यानुसार महापारिक्षा एक पोर्टल सरकारने चालू केलेला आहे या पोर्टल मार्फतच ही भरती केली जाईल यामध्ये कोणतेही मुलाखती नसणार आहेत रिर्टन परिक्षा राहणार आहे आणि त्यातुन जो मिरीटमण्ध्ये येणार आहे त्याची थेट निवड केली जाणार आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**ठिक आहे साहेब यामध्ये ६९ पदे अधी भरा त्यानंतर जेथे गरज असेल तेथे बघता येईल याला इतिवृत्ताची वाट न पहाता त्वरीत त्यावर कार्यवाही झाली पाहीजे कारण बराच काळ हा विषय पेंडींग आहे

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>** मा. महापौरजी खाली जो हे महापालिकेत प्रथा आहे ना याचे घेवून या त्याच घेवून या ही प्रथा चुकीची आहे पुर्ण लोकल स्टाफचे आज पर्यत कापडणीस साहेब होते डि एम सी खुप उशार होते त्यानंतर संतोष देहरकर साहेब आहेत खुप उशार आहेत सर्व डि एम सी जेवढे आलेले आहेत सर्व उशारच आलेले आहेत परंतु एकाने सुध्दा आजपर्यंत हे काम केलेले नाही आज नारायण नागदेव सार्वजनिक बांधकाम विभागात ४०वर्ष झाले लिपिक आहे आज जुन मध्ये सेवानिवृत्त होणार आहे जुनमध्ये तो आपल्या कुंटूबाला समाजाला काय सांगणार की ४० वर्षा पर्यंत मी लिपिक होतो ४० सालही मी लिपिक राहीलो त्याचा प्रमोशनवर हक्क बनत नाही काआज जर आपण स्थानिक स्टाफला प्रमोशन दिले महापालिकेचे सर्व सदस्य माझ्या या म्हणण्याशी सहमत असतील की महापालिकेच्या स्थानिक कर्मचाऱ्यांना प्रमोशन मिळाले पाहीजे आणि जसे स्थानिक कर्मचाऱ्यांना प्रमोशन मिळेल खालचे रिक्त पदे पुन्हा आपण भरती करू शकाल आज मी आयुक्त साहेबांना मंत्री महोदयाबरोबर बोलल्याचे पाहीले साहेब बोलले की येथे उलटे आहे ७० टक्के भरणार मोठया अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत आणि ३० टक्के जे खालच्या वर्गाची पदे रिक्त आहेत तर ती आयुक्त साहेबांच्या आदेशाने भरली तर भरली जातील आज आपल्याकडे अनुकंपाचे केसेस ३१ पेडींग आहेत अनुकंप ज्याला बोलतात की जे कर्मचारी ऑन डयुटीवर होते त्याचे ॲक्सीडंट झाले तो मृत्यु पावला त्याच्या बदल्यात त्याच्या कुंटुबांतील व्यक्तीला घेतले पाहीजेमुलगा किंवा मुलगी त्या केसेस सुध्दा पेंडींग आहेत तर जेवढे पण प्रमोशन पेंडींग आहेत जेवढे पदे रिक्त आहेत जेवढे अनुकंपाचे पेर्डीग आहेत आणि ते आपण भरती करणार तर आपल्या महापालिकेत तेवढे कर्मचारी वाढतील कामाला येईल आणि बाकीच्या कर्मचाऱ्यांना पदेउन्नती मिळेल तर माझी आपल्याला विनंती आहे की नारायण नागदेव जो ४० वर्षापासून लिपिक आहे त्याला हेडक्लर्कचे प्रमोशन तर द्या तर साहेब जेवढे स्थानिक कर्मचाऱ्यांचे प्रमोशन आहेत अनुकंपचे केसेस पेडींग आहेत हे सर्व प्रस्ताव एकदम घ्यावेत ध्यनंवाद.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—</u>** महापौर साहेबजी किशोरजीने जे सांगितले ते बरोबर आहे एक कुमार जग्याशी आपल्याकडे अधिकारी आहे किती वर्ष झाले त्याला येथे काम करतांना कधी न्याय मिळेल त्याला कधी प्रमोशन मिळेल त्याला प्रमोशन मिळता मिळता तो सेवानिवृत्त होणार कृपया अन्याया कोणावर आन्याय होऊ देवू नका नियमानुसार त्याला न्याय द्या ध्यनंवाद.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>**महापौर मॅडम उप महापौर आयुक्त साहब आणि सेक्रेटरी, देहेरकर साहेब मला आपल्याला एक असे विचारायचे आहे की कॉलम सहा कनिष्ठ अभियंता एकूण मंजूर पदे २६ आणि त्यापैकी भरलेली पदे १० रिक्त पदे १६ आणि दुसऱ्या पेजवर तुम्ही म्हणताय की कनिष्ठ अभियंता सार्वजनिक बांधकाम व पाणी पुरवठा रिक्त पदे २६ तिथे १६ आहेत येथे २६ म्हणजे आम्हाला हा जो प्रस्ताव आहे याच्यात अजून खूप चुका आहेत जेव्हा तुमची रिक्त पदे १६ आहेत तर तुम्ही २६ कशी भरती करू शकता आजून चुका दाखवू का तुम्हाला हा जो कोणी प्रस्ताव बनवतो मला असे वाटते तो डोके लावत नाही ते ही काम आमचेच आहे आम्हाला वाचायचे आहे आणि चुका काढून दयायाचे आहे एवढे तुम्ही सर्व आणि आम्ही ५वी ७वी ८वी शिकलेले लोक हे वाचून वाचून तुमच्या चुका काढतात तुम्ही ग्राज्युवेट मोठ मोठे अधिकारीहे का बघत नाही आता २६ लोकांचा तुम्ही ७० लाख खर्च दाखवला

आणि खर्च येणार आहे १६ चा आणि येथे खर्च कमी होणार आहे प्रस्तावच तुमचा बरोबर नाही आहे याच्यावा काय म्हणणे आहे तुमचे

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**६ नंबरचे १६ आहेत स्थापत्य बरोबर आहे आम्ही येथे पाणी पुरवठा आणि सार्वजनिक बांधकाम विभाग एकत्र केलेले आहे

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**याच्यात पाणी पुरवठयाचे दाखवा कुठे आहे.विदयुतचा वेगळा भाग आहे पाणी पुरवठयाचे बोला

**सदस्य श्री. भारत राजवानीः—** मा. महापौर मा. उप महापौर मा. आयुक्त साहेब चुकीचा एक मुद्दा आम्ही पण उठवला आहे की जे बोकस नोकरीवर दुसरेच्यावर नावावर लागले आहेतत्या विषयावरही आपण आज पर्यंत काही कारवाई केलेली नाही आहे.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**पाणी पुरवठयाची आहेत ती १० पदे आहेत

**सदस्य श्री. भारत राजवानीः—** कनिष्ठ अभियंता विदयुत उप अभियंता विदयुत मंजुर एकूण पदे दोन सरळ भरलेले पदे एक रिक्त पदे एक आपण पाणी पुरवठयाचे पहीले प्रस्तावात नाही दिले आहे आणि अंतिम प्रस्तावात आपण १६आणि १० एकूण २६ लिहीले आहेत चलेगा

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः—** आणि याच्यात कसे आहे आपण म्हणता आहेत की या महापालिकेची आर्थिक स्थिती एवढी नाही आहे की आपण पुर्ण सगळे पदे भरू शकू सरकट तुम्ही जेवढया पदाची लिस्ट दिलेली आहे आपण त्या स्थितीमध्ये नाही आहेत असे लिहीले आहे तुम्ही हे बघा काय लिहीलेय २१ कोटीचा आर्थिक भार महापालिकेला शक्य आहे त्याप्रमाणे सातवा वेतन आयोग प्रमाणे शासन निर्णयाच्या प्रमाणे वाढणार आहे उल्हासनगर महापालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेतांना सर्व रिक्त पदांची भरती करणे योग्य होणार नाहीबरोबर आहे हे मान्य केले पण तुम्ही काही पदे आहेत ते सर्वच्या सर्व भरताय म्हणजे कनिष्ठ अभियंता तुम्ही सर्वच्या सर्व भरतात म्हणजे परत तुम्ही इन बॅलेस करतात जर कुठ तुम्हाला २६ ची आवश्यकता आहे तेथे जर तुम्ही १५ भरले तर बाकीमध्ये तुम्हाला भरता येईल. म्हणजे तुम्ही जे सांगितले आहेत ते १०० टक्के भरता

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**सन्मानिय सदस्य एक थोडक्यात सांगतो आपल्याला डाटा बेसेसवरती कुठेही कोणतीही पदे उपलब्ध होऊ शकतात या मध्ये तांत्रिक पदाच्या बाबतीत अनेक अडचणी येतातजर आपल्या स्वत:चे कर्मचारी असतील तर त्याची एक वेगळी जबाबदारी असते इतर जी पदे आहेत त्यापेक्षा ही नक्कीच महत्वाची आहेत म्हणून ती सर्व पदे भरतो आणि

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः—** माझा तुम्हाला असा सल्ला आहे की जर आपली अर्थिक स्थिती १००टक्के सर्व पदे भरण्याची नाही आहे तर बाकी विभागाचे  जे म्हणजे आपले गरजेचे पदे आहेत तेही भरायचे आणि १०० टक्के ऐवजी जेवढे तुम्हाला लागतील तेवढे भरावे आशी आमची इच्छा आहे

**सदस्य श्री. धनंजय बोडारेः—**देहरकर साहेब येथे मिटर रिडर आवश्यक नाही आहेत काम्हणजे प्रशासनाने जीस एन आर ची योजना बारगळी आहे हे कबुल केलेले आहे प्रत्येक घरामध्ये आपण मिटर बसविलेतर मिटर रिडर आवश्यक आहे आणि जेव्हा पाण्याचा प्रश्न सेलवान साहेबाकडे घेवून जातो तेव्हा ते म्हणतात की आमच्याकडे मनुष्यबळ नाही आम्ही करणार काय सार्वजनिक बांधकाम विभागाचे सर्व इंजिनिअर तसेच झालेत आणि ते हॅडीकॅप झालेत मला वाटते म्हणजे ही पदे भरून चालणार नाही म्हणजे वरीष्ठ भरपूर आणि कनिष्ठ अजिबात नाहीम्हणजे इंजिनिअर फक्त बसून राहतील आणि हाताखाली काही नाही अशी स्थिती होणार आहे तेव्हा खालची पदे सुध्दा भरणे आवश्यक आहे म्हाणजे आम्ही वांरवार सांगतो की पदे भरा नगरपालिका असतांना जेव्हा पदे जेवढी होती तेवढी पदेही आता नाहीत त्यामुळे आता अशी परिस्थिती झाली आहे की लोक प्रतिनिधी बोंबा मारून  मारून सुध्दा लिकेज बंद होत नाहीत कोर्णाकची योजना बारगळी त्याची कारणे ही आहेत प्रशासनाने हे लक्षात आणायचे की बाबा कोर्णाकची वास्तवीक पहाता ती जीएनआरची योजना परंतु त्याची नीट अमलबंजावणीच झाली नाही मिटर रिडर त्याला पाहीजेतच ना आतापर्यंत ती योजना कार्यन्वीत होवून पर्ण झाली असती आणि मिटर रिडरची आवश्यकता असती तर काय केले असते हे ही लक्षात ठेवले पाहीजे जे एस आहेत म्हणजे प्रभारी प्रभारीचालवलेले आहे आज स्वच्छता अभियान चालू आहे शेवटी घोडा आणि गाढव याच्यामध्ये फरक आहे त्यांचा अनुभव वेगळा असतो तर प्रभारीवर आमचे काम चालेले आहे जे पात्र आहेत त्यांना पदोउन्नती दिली गेली पाहिजे आणि ज्या ठिकाणी सरळसेवेनी भरती करायची आहे त्या ठिकाणी ती केलीच पाहीजे अशी पदे भरा तर मला वाटते प्रशासनाने जी पदे आणली आहेत

**सदस्य श्री. राजेश वदारियाः—**सदर ही जी पदे आणली आहेत ती भरून घेतली पाहीजे कारण एकत्र पदे भरण्यास खुप वेळ लागेल.

**सदस्य श्री. भारत राजवानीः—**देहरकर साहेब आपण माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही यामध्ये जे खोटी नोकरी मिळवीली आहे त्यांच्यावर काही कारवाई केली नाही

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**त्या संदर्भात आम्ही अधीच एक पत्र दिले होते गुन्हा दाखल करणे बाबत आम्ही डिसेबंर मध्ये पत्र देवून सुध्दा त्यावरती कोणतीही कारवाई केलेली नाही आहे कोणी त्याच्यावरती लेखी स्वरूपात पत्र दिलेले नाही आहे आम्ही स्पष्ट लिहीलेले आहे की त्यांच्यावरती गुन्हा दाखल करावा म्हणून

**सदस्य श्री. भारत राजवानीः—** मला जेवढे माहीती आहे कीकोणत्याही आधिकाऱ्याला पत्र दिलेले नाही का त्याच्यावर गुन्हा दाखल करा

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**त्या पत्रावर मा. आयुक्त साहेबांची स्वतःची सही आहे आणि त्यामध्ये स्पष्ट लिहिले आहे की गुन्हा दाखल करावा.

**सदस्य श्री. भारत राजवानीः—**कोणत्या अधिकाऱ्याला सांगितले आहेत की त्याच्यावर गुन्हा दाखल करावा

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**श्री. सासे यांना तसे सांगितले आहे

**सदस्य श्री. भारत राजवानीः—** मग का गुन्हा दाखल करीत नाही आजुनपर्यत

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**आम्ही आता वरीष्ठ स्थरावर त्याचा पाठपुरावा करू

**सदस्य श्री. भारत राजवानीः—**सुर्वे साहेब एक मिनिट दुसरा यामध्ये जर पुरावा झाला आहे की ते खोटया नोकरीवर आहेत त्याला आपण महापालिकेत ठेवू शकतो का याचा मला खूलासा करा

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**त्यामध्ये लिहीले आहे की त्याच्यामध्ये वरीष्ठ स्थरावरती आम्ही पाठपुरावा केला आहे

**सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—**पण किती दिवसात होईल आता मागे जेव्हा ते हाटणार होते ते हाटले नाही.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**त्याच्यामध्येआपल्या डिपार्टमेंटशी संबधीत नाही ते पोलिस डिपार्टमेंटशी संबधीत आहे तसे पत्र २० डिसेंबरलाच दिलेले आहे

**सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—**मग त्याचा पाठपुरावा करायचा नाही पुन्हा त्याला रिमांयडर दयायाला पाहीजे की नाही साहेब

**सदस्य श्री. भारत राजवानीः**—आपल्याला त्यांच्याकडून पत्र आलेले आहे की आपला कोणताही अधिकारी येवून गुन्हा दाखल करीत नाही. महापालिकेचे कर्मचारी यांचा त्याच्याशी संगनमत आहे नाही मग तो आता पगार का घेत आहे जर त्याचे कागदपत्रे सर्व आलेले आहेत की खोटा आहे मी आपल्याला पेपर देवू का? कोणत्या कायदयाला धरून आहे की आपण त्याला नोकरीवर ठेवू इच्छिता जेव्हा खुलासा आले आहे तर

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**तपासून घेतो आणि उत्तर देतो.

**सदस्य श्री. भारत राजवानीः—**मा. महापौरजी महासभा सुरू आहे आणि या महासभेचा अपमान करून कमिशनर उठून जातात आपल्यालाही सांगत नाही आहेत त्यांच्या अधिकाऱ्यांना सुध्दा सांगून जात नाही आहेत तर अशा प्रकारे महासभेचा आपण करीत आहेत आपल्याला सांगून जायाला पाहीजे त्यांनी आम्ही येथे विषय मांडत आहेत विषयावर चर्चा करीत आहेत आणि आयुक्त साहेब उठून बाहेर जात आहेत हा महासभेचा आपमान आहे आपला आपमान आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारेः—**मा. महापौरजी मा. आयुक्त साहेब जसे रिक्त पदांचा विषय चालला आहे तर सर्वात प्रथम विषय आहे उल्हासनगरमध्ये डॉक्टराचा तीन डॉक्टरांच्या पोस्ट खाली आहेत दोन फार्मसिस्ट रिक्त आहेत बाकी इतर कर्मचारी पदे खाली आहेत देहरकर साहेब या बाबत काही सांगा़ प्राथमिक आरोग्य केंद्र किती आहेत आणि त्यांच्यामध्ये डॉक्टरांची संख्या किती आहे त्याबद्दल आपण काही सांगितले आहे का

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे** ज्या विषयावर चर्चा आहे त्याच विषयावर घेतली पाहीजे वेगळेच विषय काढू नका

**उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—**बोडारेजीने जो विषय काढला आहे पहीले त्याला पुर्ण होवू दया नंतर बाकीचे विषय

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः—** यांनी येथे जे पदे दिली आहेत त्यावर सन्मानिय सभागृह नेता बोलणार त्याआधी वर्ग ३ आणि वर्ग ४ हे प्रमोशन आहे ते आयुक्त साहेबांच्या हातात आहे त्याला महासभेची मान्यतेचीही जरूरत नाही आहे नारायण नागदेवचे नाव घेतले सार्वजनिक बांधकाम विभागात ४० वर्ष लिपिक आहे आणि लिपीकच सेवानिवृत्ती होणार का असे बरेच कर्मचारी आहेत त्यांना प्रमोशन मिळाले पाहीजे आणि आपण आदेश करा आयुक्त साहेबांना की त्यांना लवकरात लवकर प्रमोशन दयावे

**सदस्य श्री. धनंजय बोडारेः—**मा. महापौरजी हा जो विषय आलेला आहे ६९ कर्मचाऱ्यांचा जसे प्रशासनाकडून आलेला आहे त्याप्रमाणे इतिवृत्ताची वाट न पहाता त्याचबरोबर मा महापौरजी जे पदे रिक्त आहेत त्यामध्ये अतिआवश्यक पदे आहेत त्याबद्दल मी सभागृहाला सांगू इच्छितो की आमचे अधिकारी

दुसऱ्या सभेत किंवा चांगल्या प्रकारे अभ्यास करून ते घेवून येणार ज्याची आम्हाल खूप गरज भासत आहे बरेच माळी आहेत त्याबद्दल आम्ही टेंडर पदधतीने काम करण्याची त्याची आवश्यकता नाही आहे परंतु सभागृहामध्ये आमच्या सदस्यांनी सांगितले मिटर रिडर आणि लिपिक त्यांची गरज आहे तर १५ ते २० मिटर रिडर आणि लिपिक भरले गेले पाहीजे लघुलेखक निम्न श्रेणीच जे आहेत ते कमीत कमी तीन ते चार असायला पाहीजे

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** त्याच्यामध्ये वालमन सुध्दा लागतील की आताची परिस्थिती अशी आहे की जे वालमन देत आहेत त्याच्यावरच महापालिका आवंलबून आहे

**<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—</u>**वीज तंत्री जे आहेत ते पण चार विदयुतसाठी जे मदतनिस आहेत ते सुध्दा चार आसावेत आणि अग्निशमन विभासाठी जे बोडारेजीने सांगितले त्याप्रमाणे अभ्यास करून३० ते ४० लोकाचे आजुन प्रस्ताव आपण घेवून यावे आणि दुसरे सर मी आपल्याला सांगितले आताच सभागृहामध्ये आमचे किशोर वनवारीजी चर्चा करीत होते प्रमोशनच्या विषयाबाबत जो आपल्या अधिकारात येत आहे तर ती प्रमोशन सुध्दा सेवानिवृत्तीच्या आधि काही वर्षापासून जे अधिकारी कर्मचारी जे या महापालिकेत काम करीत आहेत त्यांना प्रमोशन मिळाले पाहिजे तर आपल्या स्तारावर जे आपण करीत आहेत ते करा आणि अनुकंपाचा जो विषय मला चांगल्या प्रकारे माहीत आहे मा. महापौरांच्या दालनात आम्ही बसलो होतो मा आयुक्तजी आपण आमच्या बरोबर होते आणि अनुकंपाचे कर्मचारी आपल्याला भेटायला आले होते रक्षाबंधनचे दिवस होते आणि त्याच्या १५ दिवस अगोदर आम्ही बसलो होतो आणि आमच्या त्या बहिणी येथे ज्या काम करीत आहेत त्यांना तुम्ही आश्वासन दिले होते की रक्षाबंधनाला आपल्याला एक खुशखबर दिली जाईल आणि अनुकंपावर ज्या लोकानां घ्यायाचे आहे नियमानुसार रक्षाबंधन पर्यंत घेतले जाणार त्यामुळे खूप दु:खाने सांगू इच्छितो आयुक्त साहेब आज फेब्रुवारीचा महीना संपला आहेआणि रक्षाबंधन नंतर होळीचा सण सुध्दा संपला जो वर्षाचा शेवटाचा सण समजला जातो आणि गुढीपाडवा आमचा नविन वर्षाचा जो सुरूवातीचा सण आहे तो येत आहे तर मी आपल्याला विनंती करतो की तर त्यामध्ये जर काही अडचणी होत असतील तर आपण त्याचा अभ्यास करून तर हा जो नविन वर्षाचा सण आला आहे गुढीपाडवा त्यावेळेस अनुकंपाच्या कर्मचाऱ्याचे जरूर काम करावे येथे एक विषय स्थायी समितीमध्ये आला होता आमचे सुरक्षा कर्मचारी आहेत त्यांना गणवेश दयायाचा आहे जेव्हा त्यांच्या गणवेशाची यादी तयार केली तर सहा असे जे कर्मचारी आहेत ते अनुकंपावर नोकरी करीत आहेत त्यांना गणवेश दिला जाणार नाही हा कसा प्रस्ताव आहे ते कर्मचारी अनुकंपावर आहेत १०००० पगारावरती आहेत परंतु त्यांना कपडे आणि जे सामान आपण देतो ते त्यांना मिळाले पाहीजे तर सहा कर्मचाऱ्यांचे नावे त्या यादीमध्ये नव्हते तर मी आपल्याला विनंती करतो की यावर सुध्दा विचार करा आणि त्यांनाही गणवेश मिळाला पाहीजे आणि अनुकंपाच्या प्रत्येक वर्षी जागेचा विचार करावा आणि आनुकंपाची जी यादी आहे ती पास करा आणि या विषयाला इतिवृत्ताची वाट न पहाता पास करा ध्यनवांद.

**<u>महापालिका सचिव:—</u>**हा ठराव असा येईल की ही महासभा वरील प्रस्तावाने नमुद केल्याप्रमाणे महापालिका आस्थापनवरील वर्ग १,२,३,४ विविध संवर्गातील ६९ पदे शासन निर्देशानुसार नामनिर्देशन प्रक्रीयनुसार भरण्यास मान्यता देत आहेत इतिवृत्ताची वाट न पहाता

**<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—</u>**मॅडम सचिव मॅडम यामध्ये मा. महापौरांच्या आदेशानुसार ही जी ६९पदे भरण्याची महासभेने मान्यता दिली आहे त्याच्याबराबर पुढच्या महासभेमध्ये जी पदे मा. विरोधी पक्ष नेता बोडारे किंवा सभागृह नेता जमनु पुरस्वानी आणि आमचे वधारीयाजी, किशोर वनवारजीने सांगीतले आहे ते रिक्त पदे भरण्यास प्रस्ताव आला पाहीजे त्याचबरोबर वर्ग ३ आणि वर्ग ४ चा प्रमोशनचा प्रस्ताव आहे ते दिले गेलेले नाही ते आयुक्तांच्या अधिन आहे ते प्रमोशन देण्याची कृपा करावी आणि वर्ग १ व २चे जे प्रमोशन राहीले आहेत ती महासभेला पॉवर आहे तर महासभेच्या पुढे पुढच्या मिटींगमध्ये हा प्रस्ताव आणा मा.महापौराचे असेही म्हणणे आहे की प्रत्येक भरतीमध्ये प्रमोशनमध्ये काही त्रुटी असतात तर आमचे आयुक्त सक्षम आहेत ते स्वत: या अन्य अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून ती पदे भरावी

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**मा. महापौरजी आणि कोणाला आपले म्हणणे मांडायचे असेल तर ते सुध्दा महासभा देईल जसे मी सफाई कामगार बद्दल म्हणणे मांडले तर त्याच्यात ज्या त्रुटी आहेत ते सुध्दा महासभा देणार

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>**मा महापौराने जो आदेश दिलेला आहे त्यानुसार जो प्रस्ताव आहे तो पास करणेसाठी आपल्यापुढे ठेवला जात आहे

**<u>श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—</u>**मा. महापौर मा. उप महापौर मा. आयुक्त सर्व सन्मानिय सदस्य फक्त एक विनंती आहे जो काही आदेश दिला आहे पदोन्नतीचे जे काही आहे त्याला वेळ लागणार आहे कारण का २००३ नंतर एकही झालेले नाही जवळ जवळ २०७ पदांचे आहे पण एकाच वेळी सर्व करीत आहोत तर त्याच्यामधील जी सिनीअरीटी आहे ती सर्व एकदा परत चेक करावी लागणार आहे दुसरी गोष्ट अशी आहे की आता जे शासनाचे आदेश आलेले आहे मध्यंतरी की त्यामध्ये रिर्जवेशन ठेवू नयेत तर त्या बाबतीत परत आपल्याला तपासणी करावी लागणार आहे ती लवकरात लवकर आम्ही करून आणू

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**बघा, त्याला सुध्दा एक निश्चित काळ ठेवला पाहीजे की हा निर्देश आला दुसरा निर्देश आला त्याला पेंडीग ठेवले असे नाही झाले पाहीजे तर यासाठी आम्ही महापौरांना विनंती करतो की, आपण प्रशासनाला आदेश द्या की एक महीन्याच्या आत ती कारवाई केली पाहीजे.

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>**सादरवर चादर असली नाही पाहिजे.

**<u>उप—महापौर :—</u>**श्री. राजेश वदारियाजी यापुर्वीच मा. महापौरांनी आदेश दिला आहे की, याबाबत टाइमबॉन्ड प्रोग्राम असला पाहिजे. जेवढा जनरल विभागाचा स्टाफ आहे त्यांचे सहकार्य घेवुन लवकरात लवकर १५ दिवसाच्या आत आले पाहिजे. आपणांस किती वेळ जाईल ते कृपा करुन सांगावे.

**<u>श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—</u>**यास कमीत कमी सहा महिने जाणार आहे. त्यामध्ये आपण एक करु शकतो. वरच्या स्तरावरुन खाली खाली येत आहोत, वर्ग—१, वर्ग—२ तर वरच्या स्तरावरुन जसे खाली येत राहू तसे पद खाली होत राहतील. सिनॅरीटी यादी प्रसिध्द केल्यानंतर त्यावर हरकती येणार आहेत. जर ही प्रोसिजर फॉलोप नाही केले तर अनावश्यक सर्व कोर्ट मॅटर वगैरे होणार आहे.

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>**आपण वन बाय वन जावु या. साहेब ऐकुन घ्या, जे जे आणु शकता ते तर आणावे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**यास दोन महिन्यात पुर्ण करा कमीत कमी. यापेक्षा जास्त आम्ही वेळ नाही देवु शकत.

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>**यापुढे जेव्हा जेव्हा महासभा लागणार त्या त्या वेळी स्टाफचे विषय आलेच पाहिजे. आपणांस काही लिगली अडचणी असतील जे काही असेल ते सोडुन. अनुकंपाचे, क्लास—१, क्लास—२ जे जे आपण आणु शकतो.

**<u>श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—</u>**कमीत कमी एक महिना हरकतीवर जाईल.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**आपण एक महिन्याच्या आत यादी प्रसिध्द करा, एक महिन्याच्या आत त्याच्या हरकती व सूचना धरुन दोन महिने, त्यात क्लास—१ व २ चे जे आहे त्यास सोडुन क्लास—३ व ४ जे आयुक्तांचे अधिकार आहे, तर आपण कमीत कमी एक महिन्याच्या आत यादी अंतिम करावी. एक महिना हरकती व सूचना व एक महिना आपली जी काही पध्दत आहे ती.

**<u>श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—</u>**याच्यामध्ये आता आरक्षणासंदर्भातील जे काही निर्देश आलेले आहेत. तर आपल्याला त्याबाबतीत काय करायचे आहे ती रिजर्व ठेवायची की काय ते घ्यावे लागेल.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**साहेब आपणांस एक महिन्याची मुदत देत आहोत, एक महिन्यात सिनॅरिटी यादी बनविली जावी. त्यानंतर त्यास पब्लीश करा, हरकती व सुचना घ्या व एक महिन्यात हेअरींग घेवुन एक महिन्यानंतर महासभेत घेवुन या.

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>**साहेब आपण आपले ग्रिव्हेनसेस सांगु नका ना. कोणत्याही परिस्थितीत याचा पाठपुरावा करावा आणि प्रत्येक महासभेत आले पाहिजे.

**<u>श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—</u>**एका महिन्यात यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्यानंतर एक महिन्यात आम्हांला त्याची छाननी करायला दया आणि त्यानंतर तिस—या महिन्यात आम्ही क्लीअर करु.

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>**आपण ते करा व अनुकंपाचे विषय साहेबांच्या अधिकारात आहे ते करावे.

**<u>सदस्य श्री. मनोस सयानी :—</u>**धन्यवाद साहेब, धन्यवाद।

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>**मा. श्री. देहेरकरजी, आपण दोन महिन्यात करावे.

**<u>महापालिका सचिव :—</u>**मा. उप—महापौर साहेबांनी जे मुद्दे मांडले आहेत ते सर्व ठरावात समावेश करायला सांगितले आहेत. आता ठरावात त्यानुसार बदल करावा लागेल. मा. उप—महापौर साहेबांनी आदेश दिला आहे की या सर्व गोष्टीचा समावेश करावा वर्ग—३ व ४ पदे भरणे बाबत व दोन महिन्याची वेळ दिली आहे त्याचा समावेश ठरावात करण्यास सांगितले आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**ठराव करण्यास काही अर्थ नाही त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे, आपण हा आदेश दिला आहे, निर्देश दिला आहे ते स्पष्ट करावे, नाहीतर महासभा आहे ना परत येथे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**मा. महापौरजी, हे ठरावात टाकण्याची गरज नाही. हा ठराव जसा आहे तसा पास.

**<u>महापालिका सचिव :—</u>**ठिक आहे, ६९ पदे नियमानुसार.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपण जो ठराव वाचला तो पास आणि प्रशासनास जे निर्देश दिले आहेत त्यासाठी महासभा येथे आहे.

**महापालिका सचिवः—**ठिक आहे, पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

**उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४:—** महापालिका आस्थापने वरील वर्ग— १/२/३/४ विविध संवर्गातील पदे नामनिर्देशनाने भरणे.

**प्रस्तावना**

१. महापालिका आस्थापनेवरील वर्ग—१/२/३/४ मधील खालील विविध संवर्गातील पदे रिक्त असल्याने महानगरपालिका क्षेत्र्यातील नागरीकांच्या आरोग्य तसेच सुविधेच्या दृष्टीने आवश्यक अशी कामे उदारणार्थ रस्ते, पाणी पुरवठा, नाले, साफसफाई इत्यादी करताना अनंत अडचणी येत आहेत व पर्यायाने शहरातील कामे कालमर्यादेत होत नसल्याने महापालिका सदस्य व नागरीकांच्या तक्रारी येत आहेत, त्याचप्रमाणे विविध योजना अंतर्गत कामे कालमर्यादेत होत नसल्याने निधी शासनास परत करण्याची वेळ येत आहे. विविध योजनांअतर्गत तसेच महानगरपालिका निधीतून सुरू असलेल्या विकासकामांच्या दर्जेदार होणेसाठी पर्यवेक्षण आवश्यक आहे, तथापि तांत्रिक कर्मचारी आवश्यक संख्येने उपलब्ध नसल्याने, विकास कामांवर पर्यवेक्षण करणेत अडचण येत आहे.
२. राज्य शासनाने वेळोवेळी उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर केलेली मंजूर पदे विचारात घेउन तसेच उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ मधील तरतूदी विचारात घेता महापालिका आस्थापनेवरील वर्ग— १/२/३/४ मधिल विविध संवर्गाची सरळ सेवेकरिता मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे याबाबतची माहिती. (दिनांक ३१/०८/२०१७)

| अ. क्र. | संवर्गाचे नाव/पदनाम | एकूण मंजूर पदे | सरळसेवाभरतीचे प्रमाण | सरळ सेवेसाठी मजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कार्य. अभियंता(सा.बां.)(पा.पु) | २ | ५०: | १ | ० | १ | समांतर आरक्षण लागू नाही |
| २ | **उप अभियंता (सा.बां.)** | **१०** | **५०:** | **५** | **०** | **५** | समांतर आरक्षण लागू |
| ३ | **उप अभियंता (विद्युत)** | **२** | **५०:** | **१** | **०** | **१** | समांतर आरक्षण लागू नाही |
| ४ | सहा. आयुक्त/प्रभागक्षेत्र अधिकारी | ६ | २५: | १ | ० | १ | समांतर आरक्षण लागू नाही |
| ५ | उपकरनिर्धारक व संकलक | २ | ५०: | १ | ० | १ | समांतर आरक्षण लागू नाही |
| ६ | **कनिष्ठअभियंता (स्थापत्य)** | **२६** | **१००:** | **२६** | **१०** | **१६** | समांतर आरक्षण लागू |
| ७ | **कनिष्ठअभियंता** | **७** | **१००:** | **७** | **२** | **५** | समांतर आरक्षण |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **(विद्युत)** | | | | | | लागू |
| ८ | बाजारनिरीक्षक | २ | ५०: | १ | ० | १ | समांतर आरक्षण लागू नाही |
| ९ | प्लान्टऑपरेटर | १ | १००: | १ | ० | १ | समांतर आरक्षण लागू नाही |
| १० | मिश्रक | २ | १००: | २ | ० | २ | समांतर आरक्षण लागू नाही |
| ११ | उप अग्निशमनअधिकारी | २ | ५०: | १ | ० | १ | समांतर आरक्षण लागू नाही |
| १२ | आरोग्य निरीक्षक | १८ | ५०: | ९ | ५ | ४ | समांतर आरक्षण लागू |
| १३ | आरेखक/ड्राफट्समन | ३ | १००: | ३ | ० | ३ | समांतर आरक्षण लागू |
| १४ | कनिष्ठलेखापरिक्षक | ६ | २५: | २ | ० | २ | समांतर आरक्षण लागू नाही |
| १५ | विजतंत्री | ११ | ७०: | ८ | १ | ७ | समांतर आरक्षण लागू |
| १६ | लघुलेखक निम्नश्रेणी | ६ | ७५: | ४ | ० | ४ | समांतर आरक्षण लागू |
| १७ | लसटोचक | २ | ५०: | २ | ० | २ | समांतर आरक्षण लागू नाही |
| १८ | उप स्थानकअधिकारी (अग्निशमन) | ६ | ५०: | ३ | ० | ३ | समांतर आरक्षण लागू |
| १९ | लिडींगफायरमन | १४ | ५०: | ७ | ० | ७ | समांतर आरक्षण लागू |
| २० | संगणकचालक | ८ | १००: | ८ | ६ | २ | समांतर आरक्षण लागू नाही |
| २१ | अनुरेखक/ट्रेसर | ३ | १००: | ३ | १ | २ | समांतर आरक्षण लागू नाही |
| २२ | मिटरचेकर/दुरूस्तीकार | ४ | १००: | ४ | ० | ४ | समांतर आरक्षण लागू |
| २३ | लिपीक/मिटररिडर/टंक लेख | २८५ | ७५: | २१४ | १२८ | ८६ | समांतर आरक्षण लागू |
| २४ | मिस्त्री | १९ | ५०: | ९ | ४ | ५ | समांतर आरक्षण लागू |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २५ | वाहनचालक | ६० | ५०: | ३० | ९ | २१ | समांतर आरक्षण लागू |
| २६ | फिटर | १९ | ५०: | ९ | ४ | ५ | समांतर आरक्षण लागू |
| २७ | यांत्रिकी मेकॅनिक | १ | १००: | १ | ० | १ | समांतर आरक्षण लागू नाही |
| २८ | पंपचालक | २१ | ५०: | ११ | ३ | ८ | समांतरआरक्षणलागू |
| २९ | फायरमन | ६० | ५०: | ३० | ९ | २१ | समांतरआरक्षणलागू |
| ३० | सुरक्षा रक्षक | ९६ | १००: | ९६ | ६३ | ३३ | समांतरआरक्षणलागू |
| ३१ | शिपाई | १४४ | १००: | १४४ | ६८ | ७६ | समांतर आरक्षण लागू |
| ३२ | मजुर/हेल्पर/वॉलमन/ झारीवाला | ४१८ | १००: | ४१८ | २८५ | १३३ | समांतर आरक्षण लागू |
| ३३ | माळी | ५२ | १००: | ५२ | २६ | २६ | समांतरआरक्षणलागू |
| ३४ | विद्युत मदतनीस | ५६ | १००: | ५६ | ४६ | १० | समांतरआरक्षणलागू |
| ३५ | वहन मदतनीस | ५ | १००: | ५ | ३ | २ | समांतर आरक्षण लागू नाही |
| | **एकूण** | **१३७९** | | **११७५** | **६७३** | **५०२** | |

१. सद्या उल्हासनगर महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ३५ टक्कयापेक्षा अधिक आहे. उपरोक्त सर्व पदे भरल्यास साधारणपणे वार्षिक २० ते २१ कोटीचा आर्थिक भार महानगरपालिका वर पडणेची शक्यता आहे. त्याच प्रमाणे भविष्यात ७ वा वेतन आयोगाप्रमाणे लाभ देणेबाबत निर्णय झाल्यास आर्थिकभार यापेक्षा वाढणार आहे. सबब उल्हासनगर महानगरपालिकेची सद्याची आर्थिक स्थिती विचारात घेता सर्व रिक्त पदांची भरती करणे योग्य होणार नाही.

२. मात्र शहरातील विकास कामे होणे व सदरची कामे दर्जेदार होणेसाठी तांत्रिक वर्ग उपलब्ध असणे अंत्यत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अग्निशमन विभागासारख्या अत्यावश्यक सेवेतील रिक्त भरणे सुध्दा आवश्यक आहे.

३. उल्हासनगर महानगरपालिकामध्ये साधारणपणे सन २००५ नंतर कोणती भरती झाली नाही. त्यामुळे सेवानिवृतीमुळे व इतर कारणास्तवरिक्त झालेल्या पदे आज अखेरपर्यंत रिक्त असल्यामुळे कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचेवर कामाचा व्याप वाढला आहे. सदर मुद्दे विचारात घेता उप अभियंता, कनिष्ठ अभियंता या संवर्गातील व अग्निशमन विभागातील खालील पदे तातडीने भरणे आवश्यक आहे————

| पदाचे नाव | ग्रेड पे रू | रिक्त पदे | भरणेची प्रस्तावित पदे | अंदाजित वार्षिक खर्च (रू. लक्ष ) |
|---|---|---|---|---|
| उप अभियंता सा.बां.वि. व पा.पु. | रू.५४०० | ५ | ५ | ३० |
| कनिष्ट अभियंता सा.बां.वि. व पा.पु. | रू.४३०० | २६ | २६ | ७० |
| उप अभियंता विद्युत | रू. ५४०० | १ | १ | ६ |
| कनिष्ट अभियंता | रू. ४३०० | ७ | ५ | २२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| विद्युत | | | | |
| उप अग्निशमन अधिकारी | रू. ४३०० | १ | १ | ५ |
| उप स्थानक अधिकारी | रू. ४३०० | ३ | ३ | १४ |
| लिडींग फायरमन | रू. २४०० | ७ | ७ | १८ |
| फायरमन | रू. १९०० | २१ | २१ | ४० |
| | | ७१ | ६९ | २०५ |

४. उपरोक्त प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रशासकीय निकड विचारात घेता तांत्रिक तसेच अत्यावश्यक सेवेतील अग्निशमन विभागातींल रिक्त पदे तातडीने भरणे आवश्यक आहे.

५. अधिकारी—कर्मचारी भरती प्रक्रिया शासननिर्देशाप्रमाणे करणेत येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावित रिक्त पदे शासननिर्देशा प्रमाणे प्रक्रियानुसार भरणेस मा. महासभेच्या मान्यतेस्तव सादर.

**महासभा ठराव क्र: ६१** **दिनांकः— ५/३/२०१८**

सुचकाचे नाव :—श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिका आस्थापने वरील वर्ग— १/२/३/४ विविध संवर्गातील कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभाग २६ ऐवजी १६ पदे असे करुन ६९ ऐवजी ५९ पदे शासन निर्देशाप्रमाणे नामनिर्देशन प्रक्रियेनुसार भरणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

वर्ग ३ व ४ चे पदोन्नती देण्याची प्रक्रिया सुरु करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना असल्याने त्यांच्या स्तरावर २ महिन्यात पदोन्तीने पदे भरण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करण्यात येत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५ :—** सार्वजनिक पुजा अर्चा करीता वापर होत असलेल्या मालमत्ता क्र. 38BO019054400 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीस मालमत्ता करात सवलत देणे.

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**सदरचा विषय स्थायी समितीत आला होता.

**सदस्या श्रीमती जोत्स्ना जाधव:—**या विषय क्र. ५ मध्ये...

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**यामध्ये चर्चा करु दया आम्हांला.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**महापौरांनी पत्र दिले, विरोधी पक्षांनी पक्ष दिले, सभागृहनेत्याने पत्र दिले म्हणुन एक मालमत्तेबाबत या सभागृहामध्ये चर्चा होणे हे बरोबर नाही. नियम सर्वांसाठी सारखे आहे. प्रशासनाच्या लक्षात आले सार्वजनिक व जे धर्मादाय संस्था आहे त्याच्या करामध्ये माफ करायचे तर हा धोरणात्मक निर्णय आहे. एक संस्था आली व ती अप्रोच झाली तर परत तेच होते. आपल्याकडे संपर्क साधला तर त्याला ती सुट व बाकीचे नाही आले तर त्यांना नाही हे बरोबर नाही. महापौर महोदया, महासभेने निर्णय घ्यावा की ज्या संस्था अशा ज्या चॅरिटी कमिशनरकडे नोंद आहेत, व सार्वजनिक उपक्रम राबवत आहेत हे एकत्रित यायला पाहिजे होते, अशा प्रकारचा प्रस्ताव यायलाच नको आहे. एकाला अंगाशी व एकाला मागाशी. मला वाटते यामध्येच नमुद करा की या प्रस्तावाच्याद्वारे ठराव असा करा की यापुढे, मला वाटते श्री. सुरेंद्र सावंत यांनी प्रस्ताव आणला होता यापुर्वी, सार्वजनिक विश्वस्थ संस्था आहेत ज्या चॅरिटी कमशिनरकडे नोंद आहेत त्यांना त्या अधिनियमाखाली करमध्ये सुट असतील त्यांना सवलत सरसकट सर्वांना लागु करण्यात यावे, फक्त एकच संस्था नको आहे. आशाराम बापु असो किंवा जे राधास्वामी असतील तर ते सर्वच येतील मग काय करायचे. ज्यांना आवश्यक असेल, ज्यांना कर माफी आवश्यक आहे ते आपणाकडे पोहचु शकत नाही. अशा सर्वांचाच ठराव करा.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**आपण सर्वांचे तसेच करा जे चॅरिटी कमिशनरकडे नोंद असतील व त्यांनी रेग्युलर तीन महिने बॅलेंसशिट सर्टीफाय असली पाहिजे, त्यांचेच झाले पाहिजे नाहीतर ब—याचशा संस्था अशा आहेत जे रजिस्टर नसतात व सलग नसतात. जर त्याची सलग तीन वर्षाची बॅलेंसशिट असेल तरच त्यास लाभ मिळेल जर एकदा त्यास पास केल्यानंतर तीन वर्षानंतर परत त्या व्यक्तीस प्रत्येक तीन वर्षाची बॅलेंसशिट देणे आवश्यक आहे. नाहीतर काय होईल आज मी फायदा घेईल आणि नंतर ३० वर्ष मी चॅरीटी कमिशनरकडे जाणार नाही असे होता कामा नये याची नोंद घ्यावी.

**सदस्या श्रीमती जोत्स्ना जाधव:—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, विषय क्र. ५ मध्ये सार्वजनिक पुजा अर्चा होत असलेल्या, सार्वजनिक जागेचा वापर करीत असलेल्यांना सवलत देण्याचा विषय ठेवण्यात आलेला आहे. त्या विषयास अनुसरुन माझ्या प्रभाग क्र. १३ मध्ये लालचक्की रोड, स्टेशन रोड येथिल आयप्पा मंदिर यांनी दिनांक १३/१२/२०१७ रोजी मालमत्तेत सवलत देण्याबाबत अर्ज केलेला आहे. तसेच माझे पत्र व सन्माननिय गटनेते श्री. रमेश चव्हाण व सन्माननिय महापौर कार्यालयात दिलेले आहे. सार्वजनिक पुजा अर्चा त्याठिकाणी होत असते, ते प्रार्थना स्थळ आहे. त्यामुळे त्यांना मालमत्ता करात सवलत देण्यात यावी ही नम्र विनंती आहे. तसेच या महासभेत मी महापालिका सचिवांना माझे पत्र व आयप्पा मंदिर यांचे पत्र व मालमत्ता कराची पावती छायांकित प्रत माझ्या पत्रासोबत जोडुन देत आहे.

**महापालिका सचिव :—**श्रीमती ज्योत्स्ना जाधव यांच्या प्रस्तावासहित, श्री. धनंजय बोडारे व डॉ. प्रकाश नाथानी यांचे जे मुद्दे होते ते टाकुन ठराव पास?

**सदस्य श्री.धनंजय बोडारे :—**सर्व अशा असतील त्यांना.

**काही सदस्य :—**पास—पास......

**उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५:—** सार्वजनिक पुजा अर्चा करीता वापर होत असलेल्या मालमत्ता क्र. 38BO019054400

अन्वये नोंद असलेल्या मिळकतीस मालमत्ता करात सवलत देणे.

**प्रस्तावना**

मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 38BO019054400 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमतः पात्र व्यक्ती म्हणुन Secretary अशी नोंद आहे. सदरचा तपाशिल खालीलप्रमाणे

| Const. Type | Occu. Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Ac Sheet Bricks | Owner | Residental | 0 | 1Apr-86 | 68 | 0 | 68 |
| Ac Sheet Bricks | Owner | Residental | 0 | 1Apr-91 | 18 | 0 | 18 |
| Open | Owner | Residental | 0 | 1Apr-86 | 86332 | 0 | 86332 |

श्री. मुकेश जी. कारीया उल्हासनगर–३ यांनी दिनांक २५/०२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये संदर्भित मिळकतीस कर आकारणीत सुट मिळणेबाबत विनंती केली आहे. तसेच सदर **मा. महापौर यांनी दिनांक ११/०७/२०१७ रोजी पत्र दिले आहे.** सोबत खालीलप्रमाणे कागदपत्र सादर केली आहेत.

१. सोसायटीचे नोंदणी प्रमाणपत्र

२. राधास्वामी संत्संग या संस्थचे नाशीक येथील शाखेला नाशीक मनपाद्धारे मिळालेल्या सवलतीची प्रत

३. राधास्वामी संत्संग या संस्थेचे पिंपरी चिंचवड येथील शाखेला पिंपरी चिंचवड मनपाद्धारे मिळालेल्या सवलतीची प्रत

१) मनपा कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. ३८ठ०१९०५४४०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत वापर सार्वजनिक प्रयोजनासाठी/धार्मिक पुजाअर्चासाठी होत असल्याने आढळुन आले आहे. तसेच संदर्भित मिळकतीचे क्षेत्रफळ मनपा कर आकारणी नोंदवहीप्रमाणे जागेवर असल्याचे आढळुन आले आहे.

२) सद्यस्थितीत मिळकतीचा ताबा सेक्रटरी राधास्वामी संत्संग हॉल उल्हासनगर–३ यांचेकडे आहे.

३) सदरील संस्था सार्वजनिक धार्मीक संस्था म्हणुन नोंदलेली आहे. संस्थचे वापर धार्मीक कामासाठी होत असल्याचे आढळुन आले.

४) महाराष्ट्र महानगपालिका अधिनियामातील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या इमारती व जमीनींवर मालमत्ता कर आकारणी करण्यात येते. त्या अनुषंगाने कर आकारणी सुट देण्यासंदर्भात पुढीलप्रमाणे तरतुदी आहे.

अ) **कलम १३२ (१) (ब)** केवळ सार्वजनिक पुजाअर्चा किंवा सार्वजनिक धर्मादाय प्रयोजनासाठीच भोगवटयात असलेल्या व वापरण्यात येत इमारती व जमिनी किंवा त्यांचे भागाव्यतिरीक्त शहरातील सर्व इमारतींवर जमिनींवर बसण्यिात येईल.

ब) महाराष्ट्र शिक्षण रोजगार हमी उपकर अधिनियम १९६२ अतंर्गत शिक्षण कर व रोजगार हमी उपकर

५) सबब मिळकतीस अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता कर आकारणीत अनुज्ञेय सुट देवुन वर्ष २०१७ – १८ करीता बिल लागु करणेसाठी महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: ६२** **दिनांकः— ५/३/२०१८**

सुचकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे तसेच सभेत झालेल्या चर्चेनुसार शहरातील सार्वजनिक पुजा अर्चा करीता वापर होत असलेल्या मालमत्ता क्र. 38BO019054400 अन्वये नोंद असलेल्या आणि अशाच प्रकारच्या मिळकतीस मालमत्ता करात सवलत देत आहे.

**परंतु**

१. त्यासाठी सार्वजनिक विश्वस्त संस्थाची धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणी असणे आवश्यक असेल.

२. तसेच संस्थेकडे सलग ३ वर्षाची बॅलेंसशिट असणे आवश्यक असेल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :— लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना ठराव क्र.** 63 **दिनांक** 18/12/2015 **बाबत निर्णय होणे**

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**मा. महापौरजी, उल्हासनगर महापालिकेच्या हद्दीत पुर्वी ९ प्रभाग रिजर्व असायचे आता २०१७ मध्ये रिजर्वेशन टाकलेले आहेत. तर सर्व प्रभांगासाठी दलित वस्ती निधी मिळाला पाहिजे त्यासाठी १८/१२२२०१५ रोजीचा ठराव क्र. १५ केला होता तो रद्द करुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन आमच्या समोर १३ प्रभागांची व ४८ जे रेकनाईज्ड झोपडपट्टी आहे त्याचे प्राकलन बनवुन महानगरपालिकेच्या महासभेत प्रस्तृत करावे.

**सदस्य श्री. भगवान भालेरावः—**सन्माननिय महापौरजी, श्री. राजेश वदारिया यांनी जो प्रस्ताव मांडला त्या प्रस्तावास आमची सर्वांची सहमती आहे.

**महापालिका सचिव :—**तर मग ठराव असा बनेल. ही महासभा हा ६३ नंबरचा ठराव रद्द करुन सर्व १३ प्रभाग व ४८ घोषीत झोपडपट्टया यांचे प्राकलन तयार करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय :—**मी सभागृहास सांगु इच्छितो की जो २६ आहे तो १६ आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**हा जो ठराव आहे तो इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा. आणि प्रशासनाने संबंधीत विभागाला आदेश देवुन तसा आराखडा तयार करण्यास सांगावे.

**महापालिका सचिव :–**हे ठरावात घेत नाही.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**फक्त इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता घ्या.

**महापालिका सचिव :–**होय ते घेते.

**काही सदस्य :–**पास–पास......

**उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ६:– लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना ठराव क्र.** 63 **दिनांक** 18/12/2015 **बाबत निर्णय होणे**

**प्रस्तावना**

दलित वस्ती सुधारणा योजना शासनाचे वर्ष १९९६-९७ मध्ये लागू केली आहे. शासन निर्णय क्रमांक विघयो-१०२००/१५९२/प्र.क्र.१८९/नवि-४ दिनांक ०५/०३/२००२ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार **अनुसूचित जातीकरीता राखीव असलेल्या प्रभागांमध्ये तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसूचित जाती वनवबौ**ध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आहे अशा वस्त्यांमध्ये नागरी सुविधा विषयक कामे हाती घेणे तसेच शहरातील अनुसुचित जाती व नवबौध्द यांचेसाठी आरक्षित प्रभात तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द नागरीकांचे प्रमाण जेथे तुलनेत अधिक असेल तेथे प्राधान्याने (उतरत्या क्रमाने) या योजनेअंतर्गतची अनुज्ञेय कामे हाती घेणेच्या मार्गदर्शक सुचना नमुद आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे प्रस्ताव तयार करुन मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे निधी उपलब्धतेकरीता सादर केले जातात.

वर्ष २०१५-१६ मध्ये एकूण ११६ कामांचे रुपये १८,८०,९१,४००/- (अक्षरी रुपये अठरा कोटी ऐंशी लक्ष एक्क्याण्णव हजार चारशे मात्र) एवढया रक्कमेच्या कामांना ठराव क्र.६३ दिनांक १८/१२/२०१५ अन्वये मान्यता प्रदान केली होती. या ठरावाप्रमाणे एकूण ११६ कामांचे अंदाजपत्रके तयार करुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता/ निधी उपलब्धतेकरीता दिनांक १३/०१/२०१६ रोजी सादर करण्यात आले होते.

सदर ठराव क्र.६३ दिनांक १८/१२/२०१५ अन्वये मंजूर केलेल्या ११६ कामांपैकी रु.५.०० कोटी खर्चाच्या ३९ कामांना मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळाली. सदर कामांचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले असून कामे प्रगतीपथावर आहेत.

तद्नंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना या विषयावर दिनांक २८/१२/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता जिल्हास्तरीय समितीच्या आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत सन २०१६-१७ याकरिता उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत करावयाच्या कामांकरीता रुपये ३.०० कोटीची मान्यता प्राप्त झाली होती. त्यानुसार ठराव क्र.६३ दिनांक १८/१२/२०१५ अन्वये मंजूरी मिळालेल्या उर्वरीत (११६-३९ =७७) ७७ कामांपैकी रुपये ३.०० कोटी खर्चाच्या मर्यादेतील एकूण १८ कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यात आला आहे. अद्याप मंजूरी अप्राप्त आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक वर्ष २०१७ फेब्रुवारी रोजी पाड पडली. सदर निवडणूक बहुसदस्यीय पध्दतीने पार पडली असून चार सदस्यांचे पॅनल याप्रमाणे एकूण २० प्रभाग निश्चित झाले आहेत. त्यानुसार महापालिका सदस्यांची एकूण संख्या ७८ एवढी आहे. यामध्ये प्रभाग क्र.१ अ, ३ अ, ४ अ, ७ अ, ८ अ, १० अ, १२ अ, १३ अ, १४ अ, १५ अ, १७ ब, १८ ब व २० अ हे एकूण १३ प्रभाग अनुसूचित जाती या प्रवर्गाकरीता राखीव आहेत.

शासन निर्णयाप्रमाणे उर्वरीत ०७ प्रभागांमध्येही अनुसूचित जातीच्या नागरीकांची संख्या कमी / जास्त प्रमाणात असल्याने त्या प्रभागांमध्येही विकास कामे होणे आवश्यक आहेत. त्याअनुषंगाने उर्वरीत ६५ प्रभागांची एकूण लोकसंख्या व त्या प्रभागातील अनुसूचित जातीच्या नागरीकांची लोकसंख्या यांचे प्रमाण सोबत जोडलेल्या तक्त्यात नमुद आहे.

मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांचे संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये सदर योजनेअंतर्गत वर्ष २०१७-१८ या वर्षाकरीता कामांचे प्रस्ताव सादर करणेच्या सुचना दिल्या आहेत.

दलित वस्ती योजनेअंतर्गत करावयाच्या ११६ कामांकरीता यापूर्वी मंजूर झालेला ठराव क्र.६३ दिनांक १८/१२/२०१५ यामधील ५९ कामे शिल्लक आहेत. मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे वर्ष २०१७-१८ करीत प्रस्ताव सादर करावयाचा असल्याने पूर्वीच्याच ठराव क्रमांक ६३ मधील उर्वरीत ५९ कामांचे प्रस्ताव पाठवावे अगर कसे याबाबत मा.महासभेपुढे निर्णय होणे आवश्यक सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र: ६३** **दिनांक:— ५/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे वर्ष २०१७—१८ करीता उर्वरीत ५९ कामांचे प्रस्ताव सादर करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

**तसेच**

पुर्वीचा महासभेचा ठराव क्र. ६३, दिनांक १८/१२/२०१५ हा रद्द करुन १३ वार्डाचे व ४८ घोषित झोपडपट्टयांचे प्राकलन बनवुन ते महासभेसमोर आणण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. सचिन गणेश जाधव यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**पास.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**इतिवृत्ताची वाट न पाहता.

**काही सदस्य :—**पास—पास......

**<u>उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ७:–** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. सचिन गणेश जाधव यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार कै. गणेश गौतम जाधव, दिवंगत सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांचा मुलगा श्री. सचिन गणेश जाधव, यांनी प्रस्ताव सादर केला आहे त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण २ री पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी–२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६–ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे.

लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भसल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्री. सचिन गणेश जाधव, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** ६४ <u>दिनांक:–५/३/२०१८</u>

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. सचिन गणेश जाधव यांची शैक्षणीक पात्रतेची अट शासन निर्णयानुसार शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. सुमित रामचंद्र गोयल यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**सारखाच विषय आहे, इतिवृत्ताची वाट न पाहता.

**काही सदस्य :—**पास—पास......

**उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ८:—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. सुमित रामचंद्र गोयल यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार कै. रामचंद्र टप्पु गोयल, दिवंगत सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांचा मुलगा श्री. सुमित रामचंद्र गोयल, यांनी प्रस्ताव सादर केला आहे त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण ३ री पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे.

लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भसल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्री. सुमित रामचंद्र गोयल, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: ६५** **दिनांक:—५/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. सुमित रामचंद्र गोयल यांची शैक्षणीक पात्रतेची अट शासन निर्णयानुसार शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ९ :–** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. शेखर हिरामण वालेकर यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**काही सदस्य :–**पास–पास......

**उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ९:–** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. शेखर हिरामण वालेकर यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार कै. हिरामण कोंडीबा वालेकर, दिवंगत सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांचा मुलगा श्री. शेखर हिरामण वालेकर, यांनी प्रस्ताव सादर केला आहे त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण २ री पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी–२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६–ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे.

लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भसल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्री. शेखर हिरामण वालेकर, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: ६६** **दिनांकः— ५/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. शेखर हिरामण वालेकर यांची शैक्षणीक पात्रतेची अट शासन निर्णयानुसार शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :—** सन २०१८ मध्ये राष्ट्र पुरूष/थोर व्यक्तींचे जयंती/पुण्यतिथी दिन व अन्य राष्ट्रीय कार्यक्रम साजरे करणेबाबत माहिती देणे.

---

**सदस्य श्री. भगवान भालेरावः—**ठिक आहे परंतु यामध्ये मराठी दिवसाचा उल्लेख यामध्ये केला नाही तर मराठी दिनाचा उल्लेख येथे करण्यात यावा.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**होय मराठी भाषा दिनाचा उल्लेख.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**मराठी भाषा दिनाचा उल्लेखच म्हणतो. कारण ही महाराष्ट्राची भाषा आहे. सर्व कामकाज हे मराठीत चालते.

**सदस्य श्री. महेश सुखरामानी :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, सर्वांना निवेदन आहे की सिंधी भाषा दिवसाचा सुध्दा त्यामध्ये उल्लेख करावा.

**श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी :—**मा. महापौर महोदया, उप—महापौर महोदय, मा. आयुक्त व सर्व सन्माननिय सदस्य, मा. शासन निर्णयानुसार आपण जे एकंदरित कार्यक्रम साजरे करतो ते मा. महासभेपुढे अवगत करण्यासाठी पाठवितो. परंतु आताच मा. सदस्य श्री. भगवान भालेराव व मा. सदस्य श्री. महेश सुखरामानी यांनी सुचविले आहे की मराठी भाषा दिन व सिंधी भाषा दिनाचा यामध्ये समावेश करावा त्याचा समावेश नव्हता, परिपत्रक हे कार्यक्रमाच्या अनुषंगाने १० किंवा १५ दिवस अगोदर येते त्या अनुषंगाने कार्यवाही होते. सन्माननिय सभागृह ठरवत असेल हे दोन कार्यक्रम घ्यायचे व या अतिरिक्त जर काही कार्यक्रम टाकायचे असतील तर सभागृह यामध्ये समाविष्ट करु शकते.

**सदस्य श्री. मनोज सयानी:—**मा. महापौरजी, याचबरोबर शहिद हेमु कलानी जयंती व पुण्यतिथी दिन तसेच भगत कंवरराम यांचे शहिद दिवस, साधु वासवानी यांचा जन्म दिवस हा सुध्दा समावेश करावा.

**श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी :—**याठिकाणी सन्माननिय श्री. सयानी साहेबांनी जो समावेश करण्यात दिलेला आहे त्या अनुषंगाने तारखेप्रमाणे किंवा तिथीप्रमाणे सन्माननिय संत व महापुरुषांचे हिंदुवर्षाप्रमाणे असेल त्याप्रमाणे तशी परिपुर्ण माहिती जी असेल ती दयावी.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**पास करा.

**महापालिका सचिव :—**सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे पास करण्यात येत आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १०:—** सन २०१८ मध्ये राष्ट्र पुरूष/थोर व्यक्तींचे जयंती/पुण्यतिथी दिन व अन्य राष्ट्रीय कार्यक्रम साजरे करणेबाबत माहिती देणे.

**प्रस्तावना**

शासनाकडील परिपत्रक क्र.जपुती २२१७/प्र.क्र.२५७/२९, दिनांक २९ डिसेंबर, २०१७ व मागील परिपत्रक क्र. जपुती—२२१६/प्र.क्र. १३६/२९, २७/१२/२०१६ रोजीच्या परिपत्रका अन्वये सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयात राष्ट्र पुरूष /थोर व्यक्तीं यांची जयंती, राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम इंदिरा गांधी पुण्यतिथी, दिन विशेष कार्यक्रम साजरे करणे कामी शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार खाली दर्शविलेले एकुण ३५ कार्यक्रम साजरे करावयाचे आहेत.

| | |
|---|---|
| **१) सावित्रीबाई फुले जयंती** ............ | **०३ जानेवारी, २०१८** |
| **२) जिजाऊ माँसाहेब जयंती** ............ | **१२ जानेवारी, २०१८** |
| **३) स्वामी विवेकानंद जयंती** ............ | **१२ जानेवारी, २०१८** |
| **४) नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती** ............ | **२३ जानेवारी, २०१८** |
| **५) संत सेवालाल महाराज जयंती** ............ | **१५ फेब्रुवारी, २०१८** |
| **६) छत्रपती शिवाजी महाराज जयंती** ............ | **१९ फेब्रुवारी, २०१८** |
| **७) संत गाडगे बाबा महाराज जयंती** ............ | **२३ फेब्रुवारी, २०१८** |
| **८) यशवंतराव चव्हाण जयंती** ............ | **१२ मार्च, २०१८** |
| **९) शहिद दिन** ............ | **२३ मार्च, २०१८** |

| |
|---|
| १०) महात्मा ज्योतिबा फुले जयंती ..........................................................................११ एप्रिल, २०१८ |
| ११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती .........................................................................१४ एप्रिल, २०१८ |
| १२) महात्मा बसवेश्वर जयंती.................................................................................२८ एप्रिल, २०१८ |
| १३) संत तुकडोजी महाराज जयंती ....................................................................... ३० एप्रिल, २०१८ |
| १४) दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस ..................................................................२१ मे, २०१८ |
| १५) स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती ..........................................................................२८ मे, २०१८ |
| १६) अहिल्यादेवी होळकर जयंती.............................................................................३१ मे, २०१८ |
| १७) महाराणा प्रतापसिंह जयंती........................................................................... १६ जुन, २०१८ |
| १८) राजर्षि शाहू महाराज जयंती.......................................................................... २६ जुन, २०१८ |
| १९) वसंतराव नाईक जयंती ............................................................................... ०१ जुलै, २०१८ |
| २०) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती..............................................................२३ जुलै, २०१८ |
| २१) साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती...............................................................०१ ऑगस्ट, २०१८ |
| २२) क्रांतीसिंह नाना पाटील जयंती ....................................................................... ०३ ऑगस्ट, २०१८ |
| २३) सद्‌भावना दिवस...........................................................................................२० ऑगस्ट, २०१८ |
| २४) राजे उमाजी नायक जयंती ............................................................................. ०७ सप्टेंबर, २०१८ |
| २५) पंडीत दिनदयाळ उपाध्याय जयंती......................................................................२५ सप्टेंबर, २०१८ |
| २६) महात्मा गांधी जयंती.....................................................................................०२ ऑक्टोंबर, २०१८ |
| २७) लाल बहादूर शास्त्री जयंती..............................................................................०२ ऑक्टोंबर, २०१८ |
| २८) डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती..................................................................१५ ऑक्टोंबर, २०१८ |
| २९) महर्षि वाल्मिकी जयंती..................................................................................२४ ऑक्टोंबर, २०१८ |
| ३०) इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस...........................................................३१ ऑक्टोंबर, २०१८ |
| ३१) वल्लभभाई जयंती व राष्ट्रीय एकता दिवस......................................................३१ ऑक्टोंबर, २०१८ |
| ३२) पंडीत नेहरू जयंती......................................................................................१४ नोव्हेंबर, २०१८ |
| ३३) बीरसा मुंडा जयंती .................................................................................... १५ नोव्हेंबर, २०१८ |
| ३४) इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय एकात्मा दिन.......................................................१९ नोव्हेंबर, २०१८ |
| ३५) संविधान दिवस..........................................................................................२६ नोव्हेंबर, २०१८ |

इतर राष्ट्रीय कार्यक्रम

| |
|---|
| १) प्रजासत्ताक दिन,.........................................................................................२६ जानेवारी, २०१८ |
| २) स्वातंत्र्य दिन.............................................................................................१५ ऑगस्ट, २०१८ |
| ३) महाराष्ट्र दिन.................................................................................................०१ मे, २०१८ |

उपरोक्त ३८ कार्यक्रमासह शासन वेळोवेळी निर्देश देईल त्या प्रमाणे उल्हसनगर महानगरपाकातर्फे सन २०१८ मध्ये कार्यक्रम साजरे करणेत येणार आहेत. सदरच्या कार्यक्रमा विषयी सन्मानिय महापालिका पदाधिकारी व सदस्य/सदस्या यांना माहिती करीता मा. महासभेपुढे सविनय सादर.

**महासभा ठराव क्र: ६७** **दिनांक:— ५/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सन २०१८ मध्ये राष्ट्र पुरूष/थोर व्यक्तींचे जयंती/पुण्यतिथी दिन व अन्य राष्ट्रीय कार्यक्रम साजरे करणेबाबत माहिती नोंद करीत आहे.

**तसेच**

सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे मराठी भाषा दिन, सिंधी भाषा दिन, शहिद हेमु कालानी जयंती व शहिद दिन, भगत कंवारराम शहिद दिन व साधु वासवानी जन्मदिवस तारखे किंवा तिथी नुसार साजरा करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ११ :—** उपद्रव शोधक व निर्मुलन पथकासाठी एजेन्सीमार्फत १०० व्यक्तींची मानधन तत्वावर नियुक्त करणे.

————————————————————————————————————————

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**कृपया सभागृहाला माहिती देणारे कोण आहेत त्यांनी माहिती दयावी. काय काम करणार आहेत, नाहीतर म्हणणार आम्ही हे काम नाही करत, ते काम नाही करत ते तर समजायला पाहिजे ना आम्हांला नाहीतर आम्ही समजणार कुत्रे उचला तेथुन आणि ते म्हणतील नाही आमचे काम नाही, म्हणुनच मी म्हणतो.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्य, आताच आपली चर्चा झाली की आपला स्टाफ खुप कमी आहे. तर त्यादृष्टीने शहरातील महत्वाचे म्हणजे स्वच्छता राखणे, अनधीकृत बांधकामावर नियंत्रण, वाहतुक नियंत्रण ठेवणे, ...

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**श्री. देहेरकर साहेब, एक मिनिट, यापुर्वीचा जो विषय पास झाला आहे तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—** अनाधिकृत नळ जोडणी या सर्व कामासाठी आपल्याला काही व्यक्तीचा गरज होती.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**साहेब, खुलासा करा ना. वर वर सांगितले तर नाही चालणार, जर खुलासा झाला तर बरे होईल. कसे आहे, गाडया रस्त्यावर वर्षानुवर्षे पडल्या आहेत त्या ते उचलणार का? म्हणजे नेमके ढोबळ नका सांगु, कामाचे स्वरुप सांगा. स्पेशिफिक सांगीतले तर आम्हांला समजेल.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—**त्यांची कर्तव्य आणि जबाबदारी अशी राहिल की, रस्त्यावरील आणि पद पथावरील फेरीवाले यांना हटविणे, हा एक झाला. सार्वजनिक ठिकाणी घाण कचरा टाकणे अथवा अस्वच्छता

पसरविणा–यास दंड घेणे, नंतर अनाधिकृत बांधकाम, अतिक्रमणासंबंधीत अधिकारी यांना देणे व त्यांच्या निर्दशनानुसार तात्काळ कार्यवाही करणे, वाहतुक नियमाचे वाहतुकीत बेकायदेशीर पार्किंग असलेल्या वाहनांवर कारवाई करणे, पोलिसांच्या मदतीने. शहरातील अनाधिकृत नळजोडणी शोधणे व त्यावर कारवाई करणे. मा. आयुक्त यांच्या निदर्शनानुसार अन्य नियमबाहय गोष्टींवर उचित कारवाई करणे व नियंत्रण ठेवणे.

**सदस्या श्रीमती ज्योत्स्ना जाधव :–**मा. आयुक्त साहेब, आपण जो विषय ठेवलेला आहे तो कौतुकास्पद आहे. परंतु मुंबईसारख्या महानगरात दंडात्मक कारवाई करणे बंधनकारक आहे आणि आपल्या शहरात त्याची आवश्यकता आहे. कारण की ज्या त–हेने आपल्या शहरात प्रकार घडतात त्याठिकाणी दंडात्मक कारवाई युक्त आहे, परंतु आपण आपल्या अटींमध्ये असे दिलेले आहे, आपण ज्या विषयासाठी व ज्या गोष्टींसाठी कर्मचारी नियुक्त करणार आहोत. अनाधिकृत बांधकाम, अनाधिकृत नळजोडणी, हातगाडयावाल्यांना हटविणे वगैरे. हे विषय असे आहेत की जेथे भ्रष्टाचार होण्याची शक्यता नाकारता येत नाही, परंतु आपल्या अटींमध्ये आपण असे दिलेले आहे की जर एखादया कर्मचा–याचे काम समाधानकारक असणार नाही तर आपण त्यास कामावरुन कमी करण्याचे अधिकार आपणाकडे ठेवले आहेत. परंतु आपण हे कर्मचारी एजन्सीतर्फे नेमणार आहोत त्यामुळे कर्मचा–यांना हे माहित असणार आहे की ही नोकरी आपली सहा महिने व जास्तीत जास्त वर्षभर असणार आहे त्यामुळे कामावरुन कमी करण्याची भिती वाटणार नाही, एखादा महापालिकेचा अधिकारी लाच घेतांना पकडला गेला तर त्याच्यावर दंडात्मक कारवाई किंवा फौजदारी गुन्हा होतो तर आपण यामध्ये त्यांना कुठलीच भिती ठेवलेली नाही, तर मला असे वाटते की आपण त्या अटीमध्ये अशी अट ठेवावी की तो कर्मचारी लाच घेतांना किंवा भ्रष्टाचार करतांना आढळला तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई किंवा दंडात्मक फौजदारी गुन्हा दाखल होवुन अशा पध्दतीचे कडक कुठलेतरी धोरण ठेवावे जेणेकरुन ते कर्मचारी भितीने काही करणार नाही व आपल्या शहराला एक वेगळे वळण लागणार आहे. जसे आता आपल्या देशामध्ये स्वच्छता अभियान सुरु झाले तसे एखादया वेळेस पाच दहा वर्षांनी भ्रष्टाचार मुक्त सुध्दा सुरु होईल आणि जर हे अभियान आतापासुन सुरु केले तर कदाचित आपल्या उल्हासनगर शहराला ते पहिले बक्षिस भेटु शकते. मला एवढेच सांगायचे आहे आयुक्त महोदयांना की त्यांनी त्याच्यामध्ये अशी एक अट ठेवावी, कठोर कारवाईची की जेणेकरुन त्यांनी कुठलीही लाच व भ्रष्टाचार केला नाही पाहिजे माझी एवढीच विनंती आहे.

**सदस्या श्रीमती सुरेखा आव्हाड:–**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आपण हा जो प्रस्ताव आणलेला आहे यामध्ये आपण त्यांना एजन्सी मार्फत भरती करणार आहोत तर जेव्हा आपण त्यांना एजन्सी मार्फत भरती करणार आहोत जर त्या लोकांनी सर्वसामान्य जनतेला त्याच्याकडुन अडवणुक करुन एक्स्ट्रा दंड वसुल केला तर त्यासाठी त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहोत. म्हणजे आपण काही ठिकाणी जसा दंड ठेवलेला आहे, सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यास वेगळा आहे, उघडयावर शौचास जाण्यासाठी वेगळा आहे, आपण जर ५०० रुपये दंडाची पावती ठेवलेली आहे, एखादयाकडुन जर या लोकांनी जास्त दंड वसुल केला तर त्यासाठी आपण काय कारवाई करणार आहोत.

**श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय:–**पहिली गोष्ट अशी यामध्ये आम्ही जी निविदा प्रारुप केली आहेम त्यात अत्यंत कठोर तरतुदी केल्या आहेत. जर आम्हांला निदर्शनास आले की त्यास जो एरिया दिला आहे तेथे जर नियमबाहय काम चालु आहे, तर आम्ही दुस–या दिवशी त्यास कामावरुन काढुन टाकु. आणि दुसरे ज्यावेळी तो आपल्या महानगरपालिकेने जेव्हा एखादयाकडुन पैसे घेतले तेव्हा तो लोकसेवक म्हणुन डिक्लेअर केला जातो, जर का त्याने लाच घेतले असेल तर त्याच्यावर ज्याप्रमाणे लाचलुचपत मार्फत आपल्या कर्मचा–यावर कारवाई करतो त्याप्रमाणे त्याच्यावर कारवाई करण्यात येईल.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, या प्रस्तावामध्ये पार्किंगच्याबाबत विषय आलेला आहे की, जे कर्मचारी पार्किंगबाबत कारवाई करतील तर बोर्ड लावण्याची व्यवस्था महापालिकेकडुन झाली पाहिजे. जेथे नो पार्किंग असेल किंवा नो एन्ट्री असेल किंवा नो पार्किंगमध्ये गाडया उभ्या केल्या असतील तर आपणाकडुन बोर्ड लावण्याची कारवाई करावी.

**श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय:–**ती कारवाई करु.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**श्रीमती जाधव व श्रीमती आव्हाड महोदयांनी ज्या सूचना केल्या, त्या सुचनांचा अंतर्भुत सर्वांकष विचार करुन, काय आहे की वेळ निघुन गेल्यावर त्याचा काही उपयोग नाही. टाटा कंन्सल्टंन्सी म्हणुन १९९९ मध्ये श्री. आर.डी. शिंदे आयुक्त असतांना त्यांनी एजन्सी नेमणुक केली की मालमत्ता सर्व्हेक्षण करण्यासाठी

त्यासाठी त्यांनी ८४ लाख ॲडव्हान्स दिला. माणसे नेमणुक करण्यासाठी लोकांकडुन पैसे घ्यायचा सुरुवात केली. टाटा कंन्सल्टंन्टी वाल्यांनी शेवटी ८४ लाख परत केले नाही आणि त्याचे काय झाले ते माहित नाही. त्यासाठी तक्रारी आल्या कारण लोकांकडुन मोजमाप करण्यासाठी पैसे घेतले, सर्व्हे करतांना ही वस्तुस्थिती आहे तसे होते कामा नये. जसे आता जेएनयुआरएमची योजना झालेली आहे, पहिला टप्पा झाला, दुसरा झाला. लोकांशी गैरव्यवहार करु नये किंवा लोकांमध्ये चुकीचा मॅसेज जावु नये. एकदा चुकीचा मॅसेज गेला म्हणजे लोक बंडखोरी करतात. जसे पार्किंगमध्ये १७ सेक्शनला झाले होते की जो वॉर्डन आहे, त्याचा आपणांस कसा फायदा होतो. परंतु तरी सुध्दा ट्राफिक होते. काल शिवजयंती असतांना, ट्राफिक विभागाने सतर्क असायला पाहिजे होते, पत्र दिले असतांना हाल झाले. एवढे ४५ वार्डन भरुन सुध्दा परिस्थिती जशी आहे तशीच आहे. म्हणजे त्यामध्ये आपले नियंत्रण राहत नाही. आता या दोघींनी सुचना केलेल्या आहेत सभागृहामध्ये की प्रशासनाने एक परिपुर्ण असा प्रस्ताव बनवावा. जसे महोदयांनी सांगितले की त्यांना माहित आहे की सहा महिन्यांनी माझी नोकरी जाणार आहे. म्हणुन तो सहा महिने जेवढे आपले पोट भरता येईल तसे तो भरेल. तसे होवु नये म्हणुन ठेकेदारावर बंधन असले पाहिजे. आणि जर तसा प्रकार झाला तर त्यावर काय करायला पाहिजे. आणि सर्वांकष असा प्रस्ताव तयार करायला पाहिजे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, मी धन्यवाद देतो की आपण शहरासाठी जे आणले आहे, तो खुप आवश्यक विषय आहे, आज शहतील दोन कमतरता जसे स्वच्छता यावर नियंत्रण याबाबत आपले प्रशासनाने अधिका—यांनी व मा. आयुक्तांनी खुप प्रयत्न करुन आपण सफाईसाठी चांगला परिणाम दिला आहे. आणि दुसरी समस्या ट्रॅफिक व अवैध निर्माण व पार्किंगची बरीचशी समस्या आहे यासाठी आपण १०० लोकांचा जो प्रस्ताव आणला आहे त्यास मान्यता देत आहोत. त्या प्रस्तावास कशाप्रकारे यांचा वापर, त्यांच्याकडुन काम कशाप्रकारे केले जावे ते आपण पुर्ण तयारीनीशी करावे. जसे श्री. बोडारेजी यांनी सांगितले की लोक आपणाकडे असतील व त्याचा वापर कसाप्रकारे व कोणाच्या अधिकार क्षेत्रात करायचे आहे, कोणाच्या नियंत्रणाखाली ते काम करतील, आणि योग्य प्रकारे त्याचा लाभ आपण घेवु शकणार. त्यावर दंडाची कारवाई करायची आहे तर ती योग्य प्रकारे होवो. या प्रस्तावास आम्ही मान्यता देतो, इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा. आपण या कार्यास सुरु करा. व आम्ही हा अधिकार मा. आयुक्त महोदयांना देतो, धन्यवाद।

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**यास मान्यता देणेपुर्वी मला बोलायचे आहे. सन्माननिय देहेरकर साहेब आपण जरा व्यासपीठावर आलात तर बरे होईल. श्री. देहेरकर आपण सांगितले की आरोग्याच्या संदर्भातील, वार्डन व ट्राफिकच्या संदर्भात जे काम करणार, आता जी आपली यंत्रणा आहे ती कुमकुवत आहे ना तुमच्या म्हणण्याप्रमाणे. आतची यंत्रणा काय करत आहे आपली.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**आपणाकडे स्टाफ कमी आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**आपल्याकडे यंत्रणा कमी आहे ना याचा अर्थ. काम होत नाही ना. ईलिगल बांधकाम वाढले आहे ना, आरोग्याचे बांधकाम वाढले आहे ना.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**फक्त अनाधिकृत बांधकामासाठी नाही.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**तुमच्या आरोग्याच्या समस्या, ट्राफिकच्या समस्या, अनाधिकृत बांधकामाच्या समस्या असतील तर याचा अर्थ आपली महानगरपालिका सक्षम नाही. आपणांस माणसांची गरज लागली.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**स्टाफ कमी असल्यामुळे आपणांस हे घेणे आवश्यक आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**आणि हे कोणाच्या नियंत्रणात आहे. अनाधिकृत बांधकामाच्या नियंत्रणात आहे का?

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**नमुद केले होते ते सर्वच काम रखडले. फक्त अनाधिकृत बांधकाम असे नाही.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**आता ही जी १०० माणसे तुम्ही घेणार तर आरोग्यावर काही लोक ठेवणार, ट्राफिकवर काही लोक ठेवणार, अनाधिकृत बांधकामावर काही लोक ठेवणार तर हे कोणाच्या नियंत्रणात राहतील.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**मा. आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली राहतील हे सर्व.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**हे कोणाच्या नियंत्रणाखाली जाणार, तेच अनाधिकृत बांधकामाच्या, आरोग्याच्या नियंत्रणाखाली जाणार की ट्राफिकच्या नियंत्रणाखाली जाणार ते सांगा तुम्ही. काम करत नाही म्हणुन तुम्ही मागविता तर ते कोणाच्या नियंत्रणाखाली राहणार. तुमच्या की आयुक्तांच्या नियंत्रणाखाली राहणार.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—**यावर त्याचा तातडीचा साहेब हा वार्ड ऑफिसर आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**वार्ड ऑफिसर अनाधिकृत बांधकामामध्ये सक्षमच नाही.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—**खरे तर आपणाकडे फक्त अनाधिकृत बांधकामे पाहिली जातात इतर महापालिकेत सर्व पाहिले जाते. त्यासाठी त्यास स्टेट्रलिंग करण्यासाठी स्टाफ देणे आवश्यकच आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—**आपली यंत्रणा अपुर्ण पडते आणि हे आल्यानंतर याची यंत्रणा चांगली होईल.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**पास करा, याची एजन्सी कारवाई स्वत: करणार की प्रभाग अधिकारी करणार.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—**त्या एजन्सीने आपणांस फक्त माणसे प्रोव्हाईड करायची आहेत. त्यांच्याकडुन आपणांस काम करुन घ्यायचे आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हा विषय पारीत करावा इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता.

**सदस्य श्री. अरुण आशान:—**एक मिनिट, मा. महापौरजी, आयुक्त साहेब, माझा प्रश्न आहे सर्वांच्या भल्यासाठी आहे. आताच श्री. देहेरकर साहेबांनी सांगितले की, १०० लोकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. खरोखर आवश्यक आहे. प्रभाग अधिकारी असतांना कोण अनाधिकृत बांधकाम करतात त्याची माहिती दया, पाणी पुरवठा विभागात कोण अनाधिकृत नळ जोडणी करतो त्याची माहिती दया, जर पार्किंगच्या जागी अनाधिकृत पार्किग होत असेल तर त्याची माहिती देण्यासाठी माणुस दया, ती गोष्ट खरी आहे परंतु हा जो प्रस्ताव आणला आहे. तो अर्धवट आहे, त्याची सुरुवात सुध्दा समजत नाही, याचा शेवट काय आहे ते सुध्दा समजत नाही. येथे जर आपणांस पास पास करायचेच आहे, गाडी कोठे पार्क करायची तर त्याचे बोर्ड लावलेले नाहीत. नळ कोणाचे घेतले आहे काय आहे ते कोणास माहित नाही, आज सुध्दा शहरात अनाधिकृत बॅनर लावण्यात आलेले आहे. यावर कोणाची कारवाई नाही व हे जे १०० लोक येतील ते कोणाच्या नियंत्रणाखाली काम करणार. किती दंड वसुल केला जाणार त्याची नियमावली नाही. कोण दंड वसुल करणार त्याबाबत काही नाही. प्रभाग अधिकारी सक्षम नाहीत, जर अनाधिकृत बांधकामाबाबत कोणी तक्रार केली तर ते चुकीचे आहे की बरोबर आहे त्याची माहिती कोण देणार. तेव्हा आयुक्त साहेब असतीलच काय? आपण हा जो प्रस्ताव आणला आहे त्याबाबत आपण सविस्तर चर्चा केली पाहिजे. चर्चा न करता प्रस्ताव आणता तर चर्चेसाठी प्रस्ताव का? प्रस्ताव आणला तर चर्चा झाली पाहिजे जर आपण चर्चाच नाही करु देणार तर प्रस्ताव आणला का? आताच महासभेत काही कर्मचारी नियुक्त करण्यास प्रस्ताव आणला, १०० लोकांचा सुध्दा आणणार, हे १०० लोक काम करतील तर त्यावर प्रभाग अधिका—यांचे नियंत्रण राहिल असे तुम्ही म्हणलात, प्रभाग अधिकारी काय काम करतात. आम्ही नविन सदस्य आहोत आम्हांला सांगा प्रभाग अधिकारी काय काम करतील ते.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय:—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सदयस्थितीत आपण जे म्हणतात जर तुमच्याकडे स्टाफ उपलब्ध नसेल तर ते तरी काय करु शकतात. इतर महापालिकेत जर आपण पहाल तर तेथे २५ ते ३० कर्मचा—यांचा स्टाफ असतो. तेथे प्रभाग कार्यालय वेगळेच असते, प्रभाग अधिकारी काहीच करु शकत नाही आणि डी सेंट्रलायझेशन आवश्यक आहे.

**सदस्य श्री. अरुण आशान:—**प्रभाग अधिकारी अनाधिकृत बांधकाम पाहता काय? जागेवर कचरा पडलेला असतो, हे पण पाहणे त्यांचे काम आहे ना.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**बीपीएमसी ॲक्टचा काय नियम आहे ते सांगावे.

**सदस्य श्री. अरुण आशान :—**बरोबर. आम्हांला त्यांचे काम आणि कर्तव्य सांगा.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**श्री. देहेरकर साहेब, अनाधिकृत बांधकामासंदर्भात प्रभाग अधिकारी पाहतात तर तुम्ही सांगा मला प्रभागात चार प्रभाग अधिकारी आहेत. तर अनाधिकृत बांधकाम थांबले काय? आता तुम्ही सांगितले की

चार प्रभाग अधिकारी आहेत ते अनाधिकृत बांधकाम पाहतात. आता शहरातील अनाधिकृत बांधकाम थांबले काय? आम्ही फक्त अनाधिकृत बांधकामविषयीच विचारत आहोत. बाकी कुठले विचारत नाही.

**सदस्य श्री. अरुण आशान :–**तुम्ही निवडून आलेले सदस्य मनोनित नगरसेवकांना बोलु देत नाहीत.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:–**हे असे चालणार नाही, तुम्ही रमीचा खेळ खेळत आहात. जेव्हा आम्ही बोलतो तेव्हा तुम्ही मध्ये बोलतात. तुमच्यानंतर आमचा नंबर होता, तुम्ही मध्येच बोलायला उठलात. हे बरोबर नाही, चुकीचे आहे.

**सदस्य श्री. अरुण आशान :–**मा. महापौरजी, विषय असा आहे की यांची जर नियुक्ती करण्यात आली तर कार्य, दंड कसे वसुल केले जाणार. व कोठे कोठे कसे लोक राहतील. जर वार्डन संदर्भात लोक घेतले तर ते काय करतील. श्री. रामचंदानी साहेब, विषय चांगला आहे. आयुक्त साहेबांनी आणलेला विषय खरोखर चांगला आहे परंतु आयुक्त साहेब, यामध्ये काही त्रुटी आहेत, परत परत समस्या निर्माण होवु शकतात.

**सदस्य श्री. मनोज सयानी :–**आयुक्त महोदय, आपण शहरातील प्रदुषण रोखण्यासाठी हा जो प्रस्ताव आणला आहे, १०० लोक यामध्ये असतील ते पाण्याचे अवैध कनेक्शन, अनाधिकृत बांधकाम, अनाधिकृत पार्किंग, अनाधिकृत बॅनर वगैरे, तसेच ज्या भिंती आहेत तेथे अनाधिकृत पोस्टर वगैरे लावतील या सर्व गोष्टीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जसे गोषवा–यात म्हटले आहे, तर हा जो प्रस्ताव आणला आहे तो एक धोरण ठरु शकतो, जर प्रशासनाने यास योग्य प्रकारे १०० लोकांकडुन हॅण्डल केले तरच. आज सभागृहात पहिल्यांदा हा विषय आला आहे तर यामधील किंतु, परंतु, संशय आहे, श्री. अरुण भाऊ यांचे सुध्दा म्हणणे बरोबर आहे. यात कोणाचे नियंत्रण असणार, नियमावली काय असणार, यावर दंड कसा असेल, जर यात अनाधिकृत बांधकामवर ठेवले तर आपण आणखी भ्रष्टाचारास निमंत्रण देण्यास कारणीभुत ठरेल, कोठे ना कोठे नविन गोष्टींवर किंतु, परंतु, संशय येणारच. यास आपण सकारात्मक विचार करुन या प्रस्तावास मान्यता दिली पाहिजे. जर यावर काही संशोधन आपणांस करायचे असेल, भविष्यात तसे वाटते की बरोबर होत नाही, जे आपले मत होते ते बरोबर होत नाही, आपण यास हॅण्डल नाही करु शकत तर त्यास बदल करण्यासाठी महासभेपुढे संपुर्ण अधिकार आहे. जर आपण अ‍ॅन्थोनी सारखा ठेकेदार, केस्ट्रल सारखा ठेकेदार १५ वर्षासाठी ज्यास ठेका दिला होता, महासभागृहात त्यास जर रद्द करु शकतो, तर ही तर लहान गोष्ट आहे. यामध्ये पुढे संशोधन होवु शकते, किंतु, परंतु होवु शकतो परंतु सकारात्मक याचा विचार करुन आज यास पारीत करा. पुढे चालुन याची नियमावली काय करु शकतो, हे आपणांस ठरवायचे आहे. प्रशासनास आपणांस डायरेक्शन दयायचे आहे, आपणांस असे असे करायचे आहे. आज सकारात्मक होवून पारीत करावे धन्यवाद।

**सदस्य श्री. अरुण आशान:–**श्री. मनोज भाऊ जे म्हणाले ते बरोबर आहे, परंतु मी हेच विचारले होते परंतु श्री. मनोज भाऊ यांनी ऐकले नाही, जर या शहरात हे सर्व आणु इच्छितात तर आज हा प्रस्ताव आणला तर सोसायटी बाहेर ज्या गाडया आहेत, सोसायटीत गाडी ठेवण्यास जागा नाही, जर अशा तक्रारी आल्या तर रोज महापालिकेकडे किती तरी तक्रारी येतील की यांनी दंड लावला आहे. अशावेळी आपण काय करणार, हा किती वर्षासाठीचा प्रस्ताव आहे. कोण काय करत आहे, सुरुवात कोठुन आहे व शेवट कोठे आहे हेच मी विचारु इच्छितो. मी याच्या विरोधात नाही परंतु यात काही समस्या आहे तर त्यास समाधान कसे निघणार. जर समोर गार्डन आहे तेथे भरपुर पार्किंग होते व आपण उदया म्हणणार सर्व पार्किंग हटवा, तेथे शाळा आहे, कॉलेज आहे तर मग आपण काय करणार. पार्किंगबाबत आपण काही विचार केला आहे का, नो पार्किंगचा बोर्ड लावला आहे का, शहरात तर पार्किंगची समस्या आहेच. आपण कशी कारवाई करणार? आपण हे ठरवितांना विचार करत नाही की लोकांचे काय होणार. याची अंमलबजावणी सुरु करणार, उदया प्रक्रिया होणार. १०० लोक नियुक्त करणार, एक नविन टिम तयार होणार ते शहरात चांगल्याप्रकारे काम करणार, परंतु साहेब कोठे तरी नियम पाहिजे. नंतर आम्ही काय आयुक्त साहेबांना पाच पाच मिनिटात फोन करणार का की साहेब आमची गाडी पकडली. तर हे आवश्यक आहे की प्रथम नो पार्किंग बोर्ड लावण्यात यावा. जेथे जेथे नाही तेथे लावण्यात यावा, जेथे फेरीवाला क्षेत्र आहे तेथे तेथे त्याची अंमलबजावणी केली जावी. हे सर्व झाल्यानंतरच आपण कारवाई करा, आधीच कारवाई केली तर कसे होणार. आम्ही कुठलीही गोष्ट करतो तर ती नियमाची करतो. आपण नियमच सांगितले नाही तर कसे चालणार?

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–**माझे मित्र श्री. अरुण आशान यांनी चांगली गोष्ट सांगितली, मी एक उदाहरण देतो की शेतकरी शेती करतो तर तो पावसाची वाट पाहत नाही तसेच जास्त पाऊस पडला तर त्यापेक्षा मी पिकच लावत नाही. मी सोडुन देतो परंतु कर्म करावेच लागतात. जर चांगला विचार महापालिकेत आणला आहे तर त्यावर प्रश्न

चिन्ह लावणे ही एक सिमेतच लावला पाहिजे. जर प्रत्येक वर्षी आपण जर पाहिले तर जर शेतकरी याने पिकच नाही लावले तर पुढील वर्षी तो नक्कीच चांगले बिज लावतो. आज जर बिज लावण्याचे काम प्रशासन करत आहे तर त्यास जर सकारात्मक विचार केला तर चांगलेच होईल. तसे जर आपण पाहिले तर सत्ताधारी पक्षाच्या हातात गाडीचा ॲक्सीलेटर असतो व विरोधीपक्षवालयांच्या हातात ब्रेक असतो. गाडी चालविली तर आपण ब्रेक मारतो. आपण गाडी चालविण्याआधीच ब्रेक लावत आहात तर ते बरोबर नाही.

**सदस्य श्री. अरुण आशान :—**हो बरोबर आहे, परंतु गाडी उतारावर आहे ना म्हणुन ब्रेक लावुन ठेवला आहे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**आपण जेव्हा बोलत होतात ना त्यावेळी मी मध्येच बोलत नव्हतो. मी मराठीत विनंती करतो की तुमच्याकडे तुम्ही विपक्ष म्हणुन तुमच्या हातात ब्रेक आहे, त्या गाडीला चालु दया, जर कधी खड्डा आला, गाडी जर खड्डयात गेली तेव्हा ब्रेक मारा, जर गाडी चालुच झाली नाही आणि ब्रेक मारत आहात हे बरोबर नाही.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**उल्हासनगरच्या रस्त्यात खड्डेच आहे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**आणि मी सर्वांना विनंती करतो, सर्व एकमताने हा ठराव पास करु या व एक महिने दोन महिन्यानंतर आपल्याला वाटले की त्याची काहीतरी चुक आहे तर त्यास दुरुस्त करु म्हणुन मी त्यास समर्थन करतो. त्यामुळे हा ठराव एकमताने पास करु या.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**पास तर करायचाच आहे नाही कोण म्हटले आहे. फक्त त्यांनी सांगितले की पुढे असे असे होवु शकते. जेएनएनयुआरएमचे आपण बीजच टाकले होते त्याचे फळ खाल्ले ना तुम्ही. चुका झालेल्या आहेत, म्हणुन यात चुका होवुन नये त्यासाठी त्या दाखविल्या पाहिजे.

**सदस्य श्री. चंद्रशेखर यादव :—**बीजाला पाणी घातले, झाड आले.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**जेएनएनयुआरएमवाल्यांनी जे पाईप टाकले त्यावेळी ॲक्सीलेटर व क्लच आपल्या हाती होते.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**अनुभव तर आला आहे ना ते अनुभव सांगत आहेत आता, तो व्हायला नको म्हणुन. साहेब यामध्ये त्यांनी सांगितल्या प्रमाणे उपद्रव शोधक व निर्मुलन पथकासाठी यामध्ये एक नंबरचे कामकाज हे एजेन्सीमार्फत केले पाहिजे आणि नंतर इतर संपुर्ण जबाबदारी प्रभाग अधिका—यांची असेल असा प्रकारचा प्रस्ताव करा. श्री. अरुण आशान यांचे एवढेच म्हणणे होते की अधिपत्य कोणाचे असेल, त्याची शंका अशी होती की फक्त आपण १ नंबरमध्ये लिहिलेले आहे की, अनधिकृत बांधकाम / अतिक्रमणाची माहितीसंबंधीत प्रभाग अधिकारी यांना देणे व त्यांचे निर्देशानुसार तात्काळ निर्मुलनाची कार्यवाही करणे. त्यानंरचे जे आहे रस्तावरील/पदपथवरील फेरीवाले याना हटवणे व त्यांचेकडून दंड वसूल करणे म्हणजे हे संपुर्ण अधिकार त्या ठेकेदासरास असेल. असे त्यामध्ये स्पष्ट होते, त्याऐवजी प्रभाग अधिका—यामार्फत करायची, म्हणजे १०० लोकांपैकी प्रत्येक प्रभागात २५ लोक असे चार प्रभागात १०० हे प्रभाग अधिका—या अंतर्गत काम करतील, बरोबर ना. एवढेच होते फक्त. त्याचे नियंत्रण प्रभाग अधिका—यांचे असेल जेणेकरुन त्या ठेकेदाराची ती वैयक्तिक मालमत्ता होणार नाही. म्हणजे त्याचा गैरफायदा लोक घेवु शकणार नाही. अशाप्रकारचे प्रस्तावामध्ये नमुद असले पाहिजे.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**महापौरजी, आयुक्त महोदय, हा चांगला विषय आहे १०० लोकांची नियुक्ती करायचा. ब—याच वर्षापासुन प्रलंबित होते. याबाबत मी आपले धन्यवाद करतो की हे सर्वानुमते पारीत होत आहे, यामध्ये माझी एक सूचना असेल आपल शहरातील जी मोठी अडचण आहे ट्राफिक, पाणी, अनाधिकृत तर मला नाही वाटत की अनाधिकृतसाठी ही लोक दयावीत. अनाधिकृतमध्ये आपण चांगला अंकुश लावला आहे. २५ टक्के लोक ट्रफिकसाठी, २५ टक्के स्वच्छतेसाठी व २५ टक्के पाणी पुरवठयासाठी दिले जावे. गोल मैदान येथिल टाकी भरत असायची आता मला कालच बातमी भेटली की तेथे लोकांनी पंक्चर करणे चालु केले आहे त्यासाठी माझे म्हणणे आहे की पाणी पुरवठयासाठी लोक दिले पाहिजे. तसेच २५ टक्के ट्रफिक व २५ टक्के स्वच्छतेसाठी दयावी. मला वाटते अनाधिकृतसाठी देवु नये आपण आल्यावर चांगला अंकूश लागला आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हा इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**महापालिका सचिव :—**मी ठराव वाचुन दाखविते. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मानधन तत्वावर संस्थेमार्फत उपद्रव शोधक व निर्मुलन पथकासाठी एजेन्सीमार्फत १०० व्यक्तींची नियुक्ती ३ वर्षासाठी

करणेस मान्यता देत आहे. तसेच १०० व्यक्तींचे संपुर्ण पथक आयुक्तांच्या नियंत्रणाखाली असेल आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्या मार्फत हे सर्व पथक काम करतील.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**किती वर्षासाठी ते नमुद केले पाहिजे.

**महापालिका सचिव :—**३ वर्षासाठी म्हणत आहेत साहेब.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—**ठेक्यावर एक वर्ष.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, सर्व सदस्य, हा विषय आपण जाणुनबुजुन येथे आणला आहे. उपद्रव शोधक व निर्मुलन पथक आपणाकडे १०० लोकांची नियुक्ती करण्याचे कारण त्यावर तात्काळ कारवाई होत नाही. तर याचे नियंत्रण कोणाकडे दयायचे, कोठे ठेवायचे काय, तर मला वाटते तो विषय प्रशासनाकडे ठेवला तर ते जास्त योग्य राहील. ज्यावेळी यांची नियुक्ती होईल त्यावेळी काही लोक प्रभाग अधिका—यांकडे दिले जातील. काही सेंट्रलाईज सुध्दा टिम ठेवावी लागेल, तर ते या लोकांवर वाचक ठेवतील. तर हे धक्कातंत्र हे काही करायचे आहे ते कॉम्पीटंट डु दॅट. यांचा ठोक फॉर्मुला आणि नियुक्ती नाही केली जाणार. दर वेळेस त्यांचा अनुभव घेवुन बदल केला जाईल. झाला विषय त्यांच्या गैरप्रकाराचा तर आपण त्यांची डायरेक्ट नियुक्ती करत नाही. आपण एजन्सीमार्फत करत आहोत. त्या कर्मचा—याची एकदा दोनदा चुक झाली तर जी काही दंडात्मक कारवाई आहे व वार्निंग देण्याचे काम आपण करु. त्या माणसाच कामावरुन काढण्याचे काम आपण करु. जर ही लोक जास्त आढळली तर आपण एजन्सीचा ठेका रद्द करु. जशी आपण मोहिम घेतो ती यशस्वी होते. जसे स्वच्छता अभियानबाबत लोकांना शंका होत्या की ॲडव्हरटायझिंग कशा करायच्या काय करायच्या. त्याप्रमाणे कसे करायचे काय करायचे हा एक सिस्टमेटीक प्लान केला त्याप्रमाणे पुर्ण शहरात एक जनजागृती निर्माण केली. तसा हा विषय सर्वात महत्वाचा आहे. हे १०० लोक जेव्हा प्रामाणिकपणे काम करतील तेव्हा नागरीकांच्या ब—याचशा समस्या कमी होतील. बागेत सुध्दा तरुण तरुणी किंवा दारु पिणारे असे उपरोक्त प्रकार तेथे होत असतात. सगळया गोष्टीवर आपण नियंत्रण ठेवु यातील ८० टक्के लोक दिवसरात्र काम करतील. काही लोक रात्रपाळीत काम करतील व २४ तास हे शहर आपल्या नियंत्रणात राहिल आणि गरज पडली तर या लोकांचा चांगला उपयोग होत आणि तरी सुध्दा कमी पडत आहे तर जादा माणसे सुध्दा आपण नेमु. परंतु हा विषय सर्वात महत्वाचा आहे आणि ज्या तक्रारी किंवा डोकेदुखी येत असतात त्यावर निवारण होईल असे याठिकाणी मला विश्वास आहे. आणि हे काम तीन वर्षासाठी दिले जसे थोडयावेळापुर्वी कोणी मुद्दा उपस्थित केला की एक वर्षासाठीच नोकरी आहे तर तो माणुस तेवढया सक्षमतेने काम करणार नाही. तीन वर्षाची आपण हमी दिली तर तो माणुस तेवढा प्रामाणिक मिळेल. त्यासाठी तीन वर्ष आपणांस दयावे लागतील.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**मॅडम यामध्ये निविदा काढतांना कुठलीही अट

**महापालिका सचिव :—**या ठरावामध्ये प्रभाग अधिका—यांना जबाबदारी दिली आहे की आयुक्तांचे मनुष्यबळ व कामाचे नियंत्रण असेल असे लिहु? प्रभाग अधिकारी काढुन टाकु

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**प्रशासनाकडे असले पाहिजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**हे संपुर्ण पथम आयुक्तांच्या नियंत्रणाखाली असेल आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली व नियंत्रणाखाली ते काम करतील.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे आयुक्त महोदयांनी सांगितल्याप्रमाणे आणि श्री. चौधरी साहेबांनी निविदाविषयी जे सांगितले ते टाकुन इतिवृत्ताची वाट न पाहता हा विषय पास. ते टाकायचे आहे का ठरावात?

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**तो आयुक्तांचा अधिकार आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**निविदा टाकल्यावर कोणता ठेकेदार त्यामध्ये येतो...

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**ठेकेदाराकरीता चालु आहे वाटते. हा माझा आरोप आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**एकाच ठेकेदाराला ठेका दयायचा ही कुठली पध्दत आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**ठेकेदार ठरला आहे याचा अर्थ.

**महापालिका सचिव :—**पास...

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**नाही, नाही.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**५० वेळा बोललो आहे पास.

**महापालिका सचिव :—**साहेबांनी सांगितले आहे, निविदेची अट टाकुन.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आयुक्तांना प्राधिकृत करतो.

**महापालिका सचिव :—**आयुक्तांना प्राधिकृत करु परंतु त्यांनी सांगितले आहे की निविदेची अट टाकुन.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**निविदा टाका परंतु अट नको.

**महापालिका सचिव :—**असे कसे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**निविदा असतांना अट नाही अशी कुठलीही निविदा असणार नाही.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**प्रत्येक ठेकेदाराला तीच अट असली पाहिजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**जे काम सोपविणार आहे त्याप्रमाणे अटी व शर्ती.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**ठेकेदाराला महापालिकेने पोसायचे नाही अशी आमची मागणी आहे. आणि मग ठेकेदार काम करत नाही व बोंबा मारायला लागतात.

**महापालिका सचिव :—**निविदेत पारदर्शकता असावी एवढे टाकते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**निविदा काढण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करु या की पात्रतेची जी काही अट आहे ते टाकतील.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**याच्यात एवढे म्हणणे आहे की सदस्यांची भावना कशी आहे, जो शासन निर्णय आहे त्या नियमाप्रमाणेच टाकावे. दुसरी कुठलीही सतर्क अट टाकु नये.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**सदरचा विषय मतदानाला टाका.

**सदस्या श्रीमती ज्योत्स्ना जाधव :—**साहेब, लालचक्की येथे जी पाण्याची टाकी आहे तेथे आपण गार्डन बनवत आहे तर तेथे गर्दीने लोक रात्री जुगार खेळतात, तर मला असे वाटते की तेथे एखादा चौकीदार असावा. तेथे आवश्यकताच आहे कारण तेथे आपण आता गार्डन बनवत आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**गार्डनमध्ये आपण आता माळी, चौकीदार नेमत आहोत. निविदा झालेली आहे तो विषय पुढील वेळेस येईल.

**सदस्या श्रीमती ज्योत्स्ना जाधव :—**धन्यवाद।

**सदस्य श्री. मनोंज सयानी:—**सभागृहाची भावना अशी आहे की निविदेत अट टाकु नये कारण कोणा एका ठेकेदारास सहकार्य करण्यासाठी अट टाकायला नाही पाहिजे, बाकी मोटरसायकल पाहिजे, गाडी पाहिजे, तंदरुस्त पाहिजे ती तर अट आहे ना.

**महापालिका सचिव:—**यामध्ये निविदेतील अटी शर्ती काढुन आयुक्तांना निविदा काढण्यास प्राधिकृत करीत आहे असे टाकते.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**पास, पास, पास...

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**कुठल्याही ठेकेदारनास सहकार्य करण्यासाठी अट नसावी.

**महापालिका सचिव :—**हे ठरावात नाही येणार ते इतिवृत्तात येणार.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**सन्माननिय महापौर महोदया, आपण अग्निशमनमध्ये जे कर्मचारी घेत आहोत ते सुध्दा मजुर संस्थेचे घेतो, मजुर संस्थेच्या बॉयलॉजमध्ये तशी तरतुदच नाही कुशल आणि अकुशल कामगार.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**एका कंपनीला ॲडजेस्ट करण्यासाठी त्याच्या टर्म आणि कंडिशन एवढेच टाकायचे?

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**त्यावर एक सांगतो स्थानिक अग्निशमन कर्मचारी भरण्यासाठी आपण फक्त २५ कामगार मजुर कामगार सोसायटीला देण्यास अधिकार आहे. आपण त्याच्याकडे  २०० कामगार मागायला लागलो आताची परिस्थिती तशीच आहे. २५ कामगार सुध्दा देवु शकत नाही, एक कुशल आणि एक अकुशल २५ कामगार ती संस्था देवु शकते तेथे तर आपा ४०, ४० भरती करतोय, तर असे बेकायदेशीर आहे तसे होता कामा नये.

**महापालिका सचिव :—**श्री. मनोज सयानी यांनी जी अट सांगितली ती टाकुन आयुक्तांना प्राधिकृत करीत आहोत.

**काही सदस्य :—**पास—पास......

**उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ११:—** उपद्रव शोधक व निर्मुलन पथकासाठी एजेन्सीमार्फत १०० व्यक्तींची मानधन तत्वावर नियुक्त करणे.

**प्रस्तावना**

१. नागरीकांच्या आरोग्याचे रक्षणकरणे व त्यासाठी शहर स्वच्छ ठेवणे हे उल्हासनगरमहानगरपालिकाचे महात्त्वाचे कार्य आहे. यासाठी या संदर्भातील विविध कायदे, नियमतसेच शासनाचे वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/परिपत्रक यांचेपालनकरणेअत्यंतआवश्यक आहे. या दृष्टीने महानगरपालिका वाटचाल करत आहे. तथापि, शहर स्वच्छताही केवळ महानगरपालिकेने एकतर्फी कार्यवाही करुन होऊ शकत नाही. यासाठी शहरातील नागरीकांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे. कचरा कचरा कुंडीतच टाकणे किंवा घंटागाडीतच टाकणे, सुका व ओला कचरा वर्गीकरण करणे हे नागरीकांचे कर्तव्यच आहे. तथापि, काही नागरीक हे कोठेही कचरा टाकत असतात, कोठेही थुकत अथवा लघवी अथवा शौचालय करत असतात. यामुळे नागरीकांच्या आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होत असतात. यासाठी संबंधीत नागरीकांना दंडीत करणे अत्यंत आवश्यक आहे.

२. याचप्रमाणे शहरातील बांधकामे ही विविध कायदे, नियम व शासकीय आदेश विचारात घेऊन करणे हे सुनियोजित शहराच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. शहराचा विकास सुनियोजित नसल्यास पाणी, आरोग्य व पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण होऊ शकतात व याचा परिणाम शहरातील सर्वच नागरीकांना भोगावालागतो. यासाठी अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यावरनियंत्रण अत्यंतआवश्यक आहे.

३. रस्ता हा प्रवासी व नागरीक यांचेसाठी आहे. सबब सर्व प्रथम रस्त्याच्या वापर करताना नागरीक व वाहनचालक याना त्रास होत नाही ना हे पाहणे आवश्यक आहे. फेरीवाले हे रस्ता अथवा पदपथ अडवतात. यातून आरोग्य तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या समस्या निर्माण होऊन नागरीकांना त्रास होत असतो. फेरीवाल्यानाअधिनियम/नियमतसेच शासननिर्देशविचारात घेऊन सुनियोजित जागा निश्चित उपलब्ध करुन देणेत येईल, परंतू त्यांनी नागरीकांना त्रास होईल अशा ठिकाणी जागा अडवणे उचित नाही.

४. याचप्रमाणे महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता नळ जोडणी करणेत आले असलेबाबतच्या तक्रारी येत असतात, यामुळे जे नागरीक नियमाप्रमाणे महानगरपालिकेची परवानगी घेऊन नळ जोडणी घेतात, नियमाप्रमाणे देयक अदा करतात त्यांचेवर अन्याय केल्यासारखे होत आहे. सबब, नळ जोडणी संदर्भात सर्व अनधिकृत बाबींवर नियंत्रण आणणे अत्यंत आवश्यक आहे.

५. उपरोक्त नमूद मुद्येविचारात घेता त्या प्रकरणी नागरीकांना त्यांचे कर्तव्याची जाणीव करुन देणेसाठी व आवश्यक त्या ठिकाणी तात्काळ दंडीत करणेसाठी मा. आयुक्त महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात शहरात **उपद्रव शोधक व निर्मुलन पथक निर्माण करणे व सदरपथकातमानधनतत्वावर एखाद्या** एजेन्सी मार्फत मानधनतत्वावर नियुक्ती करणेबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत येतआहे.

**अ.उपद्रव शोधक व निर्मुलनपथकातील(Nuisance Detection and Removal Scrod)नियुक्तकर्मचारी यांचीकर्तव्य/जबाबदारी**

१. अनधिकृत बांधकाम / अतिक्रमणाची माहितीसंबंधीत प्रभाग अधिकारी यांना देणे व त्यांचे निर्देशानुसार तात्काळ निर्मुलनाची कार्यवाही करणे.
२. रस्तावरील/पदपथवरील फेरीवाले याना हटवणे व त्यांचेकडून दंड वसूल करणे.
३. सार्वजनिक ठिकाणी घाणकचरा टाकणाऱ्या अथवा अस्वच्छता पसरविणा—या नागरीकांकडून दंड वसूल करणे
४. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विरुध्द वाहतूक पोलीसांच्या मदतीने कारवाई करणे / वाहतूक पोलीसांच्या मदतीने बेकायदेशिर पार्किंग केलेल्या वाहनांवर कारवाई करणे.
५. शहरातील अनधिकृत नळजोडणी शोधणे व कारवाईकरणे
६. मा. आयुक्त यांचे निर्देशानुसार अन्य सर्व नियमबाहय बाबींवर नियंत्रण ठेवणे व उचित कारवाई करणे.

## ब. उपद्रव शोधक व निर्मुलनपथकासाठी उमेदवारांची शारिरीक व शैक्षणिक पात्रता :—

१. शारिरीक पात्रता
उंची : पुरुष उमेदवारासाठी १७० सेंमी
महिला उमेदवारासाठी १६५ सेंमी
छाती : पुरुष उमेदवारासाठी ७९—८४ सेंमी
२. किमान शैक्षणिक पात्रता
१२ वी पास
३. वयोमर्यादा
किमान १८ वर्षे व कमाल ४० वर्षे
स्वतःची दुचाकी वाहन व स्मार्टफोन असणे आवश्यक
Ex- serviceman, Ex- Policeman यांचेसाठी वयोमर्यादा ४५ वर्षे असेल.

## क. आवश्यक मानधनतत्वावरीलकर्मचारी संख्या :—

पुरुष ८० व महिला २० एकूण १००

## ड. काही महत्वाच्या अटी :—

१. प्रती व्यक्ती मंजूर मानधनातील किमान ८० टक्के रक्कम त्यांचे सर्व अनुज्ञेय लाभासहीत संबंधीत मानधनावरील नियुक्त कर्मचा—यास देणे बंधनकारक असेल. सदर रक्कम रोखीने न देतासंबंधीतकर्मचा—यांच्या बॅक खात्यात वर्ग करणे आवश्यक राहील.
२. नियमानुसार संबंधीत कर्मचा—यांचा विमा काढणेची जबाबदारी ही नियुक्त ठेकेदाराची असेल.
३. शासकीय नियमानुसार भविष्य निर्वाह निधी व इतर आवश्यक निधी भरणेची जबाबदारी संबंधीत नियुक्त ठेकेदार यांची असेल.
४. ठेकेदाराने नियुक्त प्रत्येक कर्मचा—यांचा आधारक्रमांक महानगरपालिकेस देणे बंधनकारक असेल.
५. ठेकेदाराने प्रत्येक कर्मचा—यांचे पोलीस व्हेरिफिकेशन अहवाल देणे बंधनकारक असेल.
६. मानधन तत्वावरील नियुक्त कर्मचा—यांची नियुक्ती महानगरपालिका करत नसल्याने तसेच त्यांचे मानधन नियुक्त ठेकेदारामार्फत होणार असल्याने, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरसामावून घेणेबाबतची कोणतीही मागणी नियुक्त व्यक्तिस करता येणार नाही व तसे बंधपत्र प्रत्येक नियुक्त व्यक्तिस देणे बंधनकारक असेल.
७. एखाद्या नियुक्त व्यक्तिचे काम समाधानकारक नसल्यास, कोणतेही कारण न देता त्यास काढणेचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका यांना असतील.
८. कर्मचारी संख्या कमी अधीककरणेचे पूर्ण अधिकार आयुक्त, महानगरपालिका यांना असतील.

## ई.निधी उपलब्धता :—

१. यावर्षीच्या अंदाजपत्रकात यासाठी स्वतंत्र शिर्षनाही अथवा कोणतीही आर्थिक तरतूद नाही.
२. मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचेसाठी सन २०१७—१८ या आर्थिक वर्षासाठी तरतूद असलेल्या निधीतून संबंधीत खर्च करता येईल, तद्नंतर सन २०१८—१९ च्या अंदाजपत्रकात स्वतंत्र तरतूद करणे आवश्यक.
३. प्रत्येक व्यक्तिस अंदाजित रु. १५,००० प्रमाणे मासिक खर्च रु. १५ लक्ष प्रमाणे साधारण: तीन महिन्यासाठी रु. ४५ लक्ष खर्च सन २०१७—१८ या आर्थिक वर्षात अपेक्षित आहे व संपूर्ण कंत्राटी कालावधीसाठी म्हणजे एक वर्षासाठी अंदाजीत खर्च रु. १,८०,००,००० (एक कोटी ऐंशीलाख) आहे.

तरी मानधन तत्वावर संस्थेमार्फत **उपद्रव शोधक व निर्मुलन पथकामध्ये** १०० व्यक्ती नियुक्त करणे ही बाब धोरणात्मक स्वरुपाची असलेने मा. महासभेच्या मान्यतेसाठी सादर.

**महासभा ठराव क्र: ६८** **दिनांक:— ५/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मानधन तत्वावर संस्थेमार्फत उपद्रव शोधक व निर्मुलन पथकासाठी एजेन्सीमार्फत १०० व्यक्तींची नियुक्ती ३ वर्षासाठी करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१०० व्यक्तींचे संपुर्ण पथक आयुक्तांच्या नियंत्रणाखाली असेल आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्या मार्फत हे सर्व पथक काम करतील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १२ :— प्रस्तावाची सूचना**

ना फेरीवाला क्षेत्र घोषित करणेबाबतचा पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

———————————————————————————————————————

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**शहरामध्ये ब—याच ठिकाणी असे विषय आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, हा जो विषय मी आणला आहे की न्यु टेलिफोन एक्सचेंज जवळील चौक येथे श्री. मनोज सयानी यांनी एक प्लॉट डेव्हलप केलेला आहे. तेथे चारीही बाजुने ट्रफिक होते. तेथे एक गोल मैदान येथे एक रस्ता जातो, एक रस्ता टेलिफोन एक्सचेंजकडे जातो, एक रस्ता हिरा मॅरेज हॉलकडे जातो, दुसरा दुनिचंद कालानी कॉलेज येथे रस्ता जातो. तेथे येण्या जाण्यास फार त्रास होतो व ट्रॅफिकची समस्या असते, मा. आयुक्त महोदय आपण जर पहाल तर हॉकर्समुळे तेथे संपुर्ण एरिया भरलेला असतो व त्यामुळे ट्रॅफिकची समस्या निर्माण होते. तेथे गाडी निघण्यास वेळ जातो व तेथे सारखे हॉर्न वाजत असतात, तर तेथे ध्वनी प्रदुषण व धुराचे प्रदुषण होते. तर मी आपणांस विनंती करतो की त्या तुकडयास १००, १०० मिटर, म्हणजे त्या चौकापासुन हिरामॅरेज हॉलपर्यंत १०० मिटर, गोल मैदान येथे १०० मिटर, न्यु टेलिफोन एक्सचेजकडे १०० मिटर व दुनिचंद कालानी कॉलेज येथे १०० मिटर नो हॉकर्स झोन केले जावे जेणेकरुन तेथे

ट्रफिकची समस्या होणार नाही. तसेच ध्वनी प्रदुषण व धुर प्रदुषण आणि जी ट्रफिकची समस्या आहे त्यापासुन सुटकारा होईल, धन्यवाद।

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, जे नॉन हॉकर्स झोन आहेत तेथे आजपर्यंत काही फलक लावलेले नाहीत. माझ्या प्रभागात नेताजी चौक येथे आताआताच नॉनहॉकर्स झोन म्हणुन स्पष्ट केले आहे तर तेथे फलक लावण्यात यावा.

**सउस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पास.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**अशासकिय प्रस्तावाद्वारे नो हॉकर्स झोन करता येईल का तसे आम्ही प्रत्येकाने महासभेत आणले तर चालेल का? याबाबत कायदेशीर तरतुद काय? आणि मला असे वाटते ट्रॅफिक सर्व विभागाशी संबंधित असली पाहिजे. नगररचनाकार व सार्वजनिक बांधकाम विभाग, अशासकिय प्रस्तावाद्वारे हा नो हॉकर्स झोन जाहिर करता येईल काय? म्हणजे महापौर, उपमहापौरजी हे कायदेशीर नाही त्यास पास करण्यात अर्थ नाही यासाठी बसुन, शहरातील ट्रफिक पोलीसांचे मत घेतले पाहिजे, महासभेत गांभिर्यच नाही, कोणाच्याही मनात येईल प्रस्ताव आणेल, मंजुर करतील व त्याची अंमलबजावणी होणार नाही. असे अशासकिय प्रस्तावाच्या माध्यमातुन नो हॉकर्स झोन नाही आणू प्रस्ताव आणु शकतो का नाही आणु शकत हे चुकीचे आहे. आपली चुक लक्षात आणुन दिली आपण म्हणता तुम्ही केले तर मग करा.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**कितीतरी वेळा अशासकिय प्रस्ताव आणले आहेत त्यामध्ये नो हॉकर्स झोन याच महासभेत झाले आहे. आजपर्यंत नो हॉकर्स झोन अशासकिय प्रस्तावाद्वारेच पास केले आहे हा गंभीर विषय आहे यास इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा. ज्या सदस्यांना वाटते त्यांनी सुध्दा असा प्रस्ताव आणावा. एक, एक, दोन, दोन तासाचा त्रास आहे हॉकर्समुळे तर तो ते प्रस्ताव आणु शकता.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**महापालिकेच्या नियमाप्रमाणे असेल तर काही हरकत नाही त्याचा खुलासा केला तर बरे होईल. नियमाला सोडुन असेल तर त्याचा खुलासा करावा की चुकीचे आहे की बरोबर आहे. बरोबर असेल तर आम्ही पाठींबा देवु.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मा. महापौर, मा. उप—महापौर, सर्व सन्माननिय सदस्य, नो हॉकर्स झोन पी १ व पी २ पार्किंग हे ट्रॅफिक विभागाशी संबंधीत आहे. जर त्यांची अनुमती नसेल तर कमीत कमी त्यांचे मत घेता येते. असे माझे म्हणणे आहे. आम्ही त्यांना सांगणार हे आम्ही करत आहोत, जर त्यास काही हरकत असेल तर सांगा याप्रकारे आपण करु शकतो.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**मा. महापौरजी यामध्ये सर्वात महत्वाचा विषय म्हणजे या शहरात राहतो उल्हास, शहाड व विठ्ठलवाडी असो याठिकाणी उच्च न्यायालयाचे धोरण आहे दिडशे मिटरपर्यंत तर जेथे बोर्ड लागत नाही तेथे नो पार्किंग झोन आहे. तर या तिन्ही स्टेशनचा सुध्दा विचार करावा. हा समावेश करुन पास करावे.

**महापालिका सचिव :—**यामध्ये ठराव वाचुन दाखविते. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे तसेच सभेत झालेल्या चर्चेअंती १. चौक ते कुमार आयलानी यांचे कार्यालय, २. चौक ते साधूवासवानी पुतळया पर्येत, ३. चौक ते कालानी कॉलेज, सी. ब्लॉक रोड, ४. चौक ते टेलिफोन एक्सचेंज चौपडाकोर्ट येथे चारही बाजुने १०० मिटर ना फेरीवाला क्षेत्र घोषित करणेस मान्यता देत आहे. तसेच उल्हास स्टेशन, विठ्ठलवाडी स्टेशन व शहाड स्टेशन हा सुध्दा घोषित करायचा?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**यामध्ये मी दिले त्याप्रमाणे १०० मिटर सर्व बाजुंनी व तिन्ही स्टेशनवर चारही बाजुने १५० मिटर करा.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे ठरावात टाकते. स्टेशनच्या तिन्हीही परिसरात चारही बाजुने १५० मिटर ना फेरीवाला क्षेत्र घोषित करणेस मान्यता देत आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**<u>उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १२:– <u>प्रस्तावाची सूचना</u>**

ना फेरीवाला क्षेत्र घोषित करणेबाबतचा पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर मधील न्यु टेलिफोन एक्सचेंज जवळील चौक, ऐ. वन पानी पुरीवाला चौक व धिरज टॉवर जवळील चौक हे अत्यंत गर्दीचे ठिकाणे आहेत. तेथे दळण–वळण नेहमी जास्त प्रमाणात असते. त्यातच फेरीवाले दाटींवाटींने गर्दी करून उभे असतात. त्यामुळे अपघात होऊन जिवीतहानी होण्याची दाट शक्यता आहे. खालील नमुद केलेल्या चौकात १०० मिटर पर्यंत ना फेरीवाला क्षेत्र घोषित केल्यास दळण वळण होण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही. तसेच अपघात होणार नाहीत.

१. चौक ते कुमार आयलानी यांचे कार्यालय

२. चौक ते साधूवासवानी पुतळया पर्येत

३. चौक ते कालानी कॉलेज, सी. ब्लॉक रोड

४. चौक ते टेलिफोन एक्सचेंज चौपडाकोर्ट

तरी वर नमुद केलेल्या ना फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यात यावे व वर नमुद केलेल्या चौका पासून पुढे १०० मिटर क्षेत्र ना फेरीवाला घोषित करणेसाठी येत्या महासभेमध्ये विषय घेवून याबाबत चर्चा होवून निर्णय घेण्यात यावा.

**<u>महासभा ठराव क्र:</u> ६९** **<u>दिनांकः– ५/३/२०१८</u>**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे तसेच सभेत झालेल्या चर्चेअंती १. चौक ते कुमार आयलानी यांचे कार्यालय, २. चौक ते साधूवासवानी पुतळया पर्येत, ३. चौक ते कालानी कॉलेज, सी. ब्लॉक रोड, ४. चौक ते टेलिफोन एक्सचेंज चौपडाकोर्ट येथे चारही बाजुने १०० मिटर ना फेरीवाला क्षेत्र घोषित करणेस मान्यता देत आहे.

**<u>तसेच</u>**

उल्हास स्टेशन, विठ्ठलवाडी स्टेशन व शहाड स्टेशन येथे चारही बाजुने १५० मिटर ना फेरीवाला क्षेत्र घोषित करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

➡ **विषय क्र. १३ :— प्रस्तावाची सूचना**

महापालिकेच्या आस्थापनेवर सन २००३ पासुन ठोकवेतनावर कार्यरत असणा—या प्रतिक्षा यादीतील कर्मचा—यांना अनुकंपा तत्वावर महापालिका सेवेत कायमस्वरुपी सामावुन घेण्याबाबत केलेल्या महासभा ठरावाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत पालिका सदस्य, श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**आता मला वाटते या विषयावर यापुर्वी सुध्दा चर्चा झाली. उल्हासनगर—३ पासुन तीन वेळा आदेश झाले. प्रशासन का करत नाही? त्याची वस्तुस्थितीसुध्दा समोर ठेवत नाही. ही न करण्याची कारणे काय मला असे वाटते मा. आयुक्त साहेब हा विषय कसा आहे माहित आहे त्या घरातील व्यक्ती गेली आहे आणि त्या घरातील व्यक्तीला सहारा देण्यासाठी करतो. तीन वेळा ठराव होवुन त्याची अंमलबजावणी होत नाही.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त मुख्यालय:—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, पहिली गोष्ट तर अशी आहे की २००३ पासुन भरती झालेली नाही असे नाही. वर्ग—३ चे २००३ पासुन भरती केली ४३ लोक भरली आहे. मागील आदेश २०१६ चा होता त्यात १,२,३,४,५,६ लोक भरली आहे त्यामध्ये आदेश होता ४३ लोक वर्ग—४ व ११ लोक वर्ग—३ चे अशी भरलेली आहे दुसरी गोष्ट अशी की २००५ पुर्वीचे होते. ऑगस्ट २००५ नंतर शासनाने यामध्ये रीस्टीकशन आणले होते एकुण रिक्त पदाच्या ५ टक्के पहिल्यांदा होते, ५ टक्के संवर्गनिहाय होते. लिपिकाचे जर १० पदे रिक्त झाले असतील तर ५ टक्के प्रमाणे एकही बसत नाही. २० असतील तर फक्त १ बसत होते. २० संवर्गनिहाय त्यात वर्ग—३ व वर्ग—४ नव्हते. हे रिस्टीकशन आधीच होते त्यानंतर शासनाचे निदर्शनास आले की एवढी पदे नसतात तर म्हणुन त्यांनी २०१४ ला १० टक्केच्या मर्यादेत तुम्ही पदे भरु शकतात. आता आपल्याकडे जी यादी आली होती त्यामध्ये कास्टनुसार होते. अनुकंपा ही एक नियुक्ती असून त्यात प्रोसिजर फालो केले पाहिजे. जेव्हा प्रस्ताव येतो त्याची छाननी केली पाहिजे. आणि सक्षम प्राधिकारी, मा. आयुक्त हे आपणाकडे नियुक्त प्राधिकारी आहेत, त्यामुळे त्यांची प्रकरणनिहाय मान्यता पाहिजे आणि ज्योवळी त्याचा परिपुर्ण प्रस्ताव येतो व त्यास मा. आयुक्तांची मान्यता मिळते त्यानंतर त्याचे वेटींग लिस्टमध्ये नाव गेले पाहिजे. परंतु मध्यंतरी येथे आल्यानंतर माझ्या अशा निदर्शनास आले की वेटींग लिस्टवगैरे लागली आहे व असे सपोज केले होते की हे सर्व फालो केलेले असणार आहे. ते फालो नाही केले तर उदया कोणी कोर्टात गेले व तक्रार केली तर नक्की अडचणी येवु शकतात. पण त्यावेळी असे लक्षात आले की १२७ जी आपली यादी आहे त्या नस्तीला मा. आयुक्तांची मान्यता नाही म्हणजे प्रकरण निहाय ते तुम्ही छाननी केले पाहिजे, जसे आपण वारसा हक्काची छाननी करतो, मा. आयुक्तांकडे सादर करतो आणि मग त्यास नियुक्ती देत असतो. १२७ मध्ये एकही अशी नस्ती नाही की त्याची छाननी केली आहे आणि सक्षम असल्याची यादी आहे. जी नस्ती नसती तर अडचणी आल्या असत्या कारण नियमबाहय असते. पुर्वी ज्या चुका झाल्या त्या ठिक आहे. आम्ही आता त्यावर चेक लिस्ट केलेली आहे त्यावर त्यांना आता कळविले आहे, त्यांना कागदपत्र सबमिट करायला सांगितले आहे, त्यांना १५ तारखेपर्यंत मुदत दिलेली आहे. आणि आल्यानंतर आम्ही ही वेटींग लिस्ट दिलेली आहे. आणि त्यामध्ये असे झालेले आहे की क्लास ३ व ४ चे संवर्गनिहाय घेतले तर ते एकही पद बसत नाही. जर कधी आपण वर्ग—३ व ४ न घेतले तर वर्ग—३ चे १५ लोक व वर्ग—४ चे १८ लोक बसले परंतु ते देखील स्पष्ट सांगितले तर बेकायदेशीर आहे. आपल्याला संवर्गनिहाय १० टक्के लागतात.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**दोन मिनिटे मी तुम्हांला इंटरप करतो. प्रत्येक गोष्टीला तुम्ही कायदा, कायदा, कायदा म्हणता पण त्यापेक्षा सर्वात चांगली माणुसकी आहे, एखादया कुटुंबावर होणारा अन्याय, त्याचे वय निघुन जाते. आणि मला वाटते संपुर्ण सभागृहामध्ये एकाही व्यक्तीचे मत नाही, तुम्ही स्पष्ट सांगत आहात, कोणत्या गोष्टी होतात कायदयाच्या बाहेरच्या? साधे कामावर येण्यापासुन आम्ही महासभेत येणापासुन किती कायदे आपणस पायदळी तुडवितो? कायदा म्हणजे कसे गरीबालाच कायदा आहे, अनुकंपाविषयी कोण बोलणाराच नाही. काय आहे?

**<u>श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त मुख्यालय:–</u>**एक आहे आपणाकडे कोणत्याच महापालिकेने..........

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**तुम्ही कायदयाच्या बाहेर जावुन असे करा असे आम्ही म्हणत नाही, कायदयानेच वागा परंतु कायदयामध्ये सुध्दा क्षितीश नाही आणि तो भास आम्ही करतो, संपुर्ण ठरावानुसार केले तर आम्हांला वाटत नाही की कायदयाला बाधा येईल.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>**त्यांचे एकच म्हणणे आहे जी कायदेशीर भरती व्हायला पाहिजे होती ती कोणाचीच झाली नाही भले ती अ असे किंवा ब व्यक्ती असेल. किती वर्ष? वारंवार पाठपुरावा केलेला आहे. अगोदर ५ टक्के होते नंतर १० टक्के झाले तर १० टक्यानुसार किती होत आहे? ४३ कि ४५ झाली, वेटींग लिस्ट ११० आहे. आता किती ॲडजेस्ट होते ३८ होते तर ३८ तर घ्या ना, असेच म्हणणे आहे ना. वर्षानुवर्षे आपले रखडले आहे अनुकंपा भरती करण्यासाठी, ते घेण्यासाठी त्याचा पाठपुरवा कधी होत नाही. वास्तविक पाहता असा प्रस्ताव यायलाच नाही पाहिजे. म्हणजे एचओडीला उपआयुक्त किती आले तरी होणार नाही. आज तुम्ही म्हणत आहे याचा आता पाठपुरावा करत आहोत, आतापर्यंत कितीतरी भरती झाली असती म्हणजे परिवार उध्दवस्त होण्यापासुन वाचला असता. माझ्यावर वेळ येईल तेव्हा मी समजेल की परिस्थिती काय आहे. असे प्रत्येकाने समजले पाहिजे. चुकी कोणाकडुन झाली त्यास दंड दयायला पाहिजे होता. म्हणजे मुद्दाम चुकी केली आहे, काही लोक टाळतात, मुद्दाम अडकून ठेवायचे, जे कायदेशीर होणार आहे, किती भरती होतील, ३८ होती किंवा ४० होतील ते तर घ्या.

**<u>श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त मुख्यालय:–</u>**त्याप्रमाणे कारवाई चालु आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**संवर्ग दृतिय श्रेणी, चतुर्थ श्रेणी आम्हांला माहित नाही, पण ते होणार आहे ती काय टाळाटाळ चालली आहे?

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**साहेब, ३०५ च्या बिचारे सफाई कामगारांचे सुध्दा असेच झाले. अर्धे अधिक तर मेले असतील. काही कोर्टात गेले, कुठल्या युनियनवाले गेले म्हणुन ते कोर्टात गेले, म्हणजे हे काय चालले काय? सहोब, आपण माणसे नाही म्हणुन प्रायवेट भरती करायचा विचार करतात, पण ते ३०५ चे प्रकरण सुध्दा अर्धवट राहिले आहे. फायरब्रिगेडची सुध्दा अशीच अवस्था आहे. आम्ही वारंवार तळमळीने सांगतो की आपणाकडे स्टाफ नाही, पाणी पुरवठयाला जा, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जा तेथे स्टाफ नाही, महासभा तुम्हांला मदत करत असतांना प्रत्येक अधिकारी नियमांवर बोट ठेवतो. मला वाटते मागील अधिवेशनामध्ये काही तरी आदेश झाले होते. एखादया स्टाफच्या विरोधात जाणे आम्हां कोणालाही आवडत नाही. कुठल्याही सदस्याला, कुठल्याही स्टाफच्या विरोधात जायला आवडत नाही. आमचा प्रयत्न असा असतो, जसे आम्ही आज दोन चाका आहेत, प्रशासन आणि शासन ही जर व्यवस्थित चालली तरच आम्ही लोकांना न्याय देवु शकतो. आणि आम्ही लोक विनंती करतो ब–याचवेळा. आणि माझी विनंती एवढी आहे जेवढया लवकरात लवकर १५ दिवस, एक महिना किंवा तुम्ही २ महिने आता थोडयावेळापुर्वी सांगितले होते, आयुक्त साहेबांनी लक्ष दिले ना तर मग १५ दिवस सुध्दा लागणार नाही.

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, आता जो मुद्दा चालु आहे जेव्हापासुन मंडळ कमिशन लागु झाले आहे, महानगरपालिकेस कोणतेही पॉवर नाही अटी करण्याशिवाय. अनुकंपाच्या बाबतीत आपण म्हटले जर आज डयुटीवर असतांना कोणी वारले तर त्याच्या घरातील सदस्यास नोकरी देवु शकतो. साहेब त्याचे काही मुदत असते ना. डेप्युटी अकाउंटंट श्री. किशोर रामचंदानी हे २००३ की २००४ मध्ये वारले, त्याच्या मुलीला आपण २०१६–१७ मध्ये भरती केली. १३–१४ वर्षानंतर त्याची मुलगी अनुकंपा तत्वावर भरती झाली. आज कोणाचा कामावर असतांना ॲक्सडंट होतो किंवा मृत्यु होतो व त्याच्या फॅमिलीतील सदस्यास मुलगी असो, मुलगा असो त्यास नोकरी देतो, जसे श्री. सुनिल सुर्वे यांनी म्हटले, परिवारास पोषण करणे मुश्किल होते. अनुकंपाचा मुद्दा कोणी १३, कोणी १२ वर्षापासुन प्रलंबित आहे, यांना आपण १२,१५ वर्षानंतर भरती करणार तर त्यांना काय सर्पोट होणार? त्यासाठी मेहरबानी करुन जसे श्री. सुनिल भाऊ यांनी सांगितले,

काउंसिलच्या हाउसमध्ये प्रत्येक सदस्य आपणांस मदत करणार, अनुकंपा तत्वारीत ३१ केसस आहे ते लवकरात लवकर महासभेपुढे आणावे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**श्री. किशोरजी, हे महासभेत आणले जाण्याची आवश्यकता नाही जेवढे लवकर देता येईल तेवढे लवकर देण्यात यावे.

**<u>सदस्य श्री. किशारे वनवारी :—</u>**कृपया पास करण्यात यावे. आम्ही आयुक्त साहेबांना प्राधिकृत करतो.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**धन्यवाद।

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>**हे लवकरात लवकर करावे.

**<u>श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त मुख्यालय:—</u>**३१ लोकांची जी काही छाननी आम्ही केली त्यापैकी १२७ लोकांचे ३१ लोक परिपुर्णपण बोलता येणार नाही त्यांचे सुध्दा एखाद दोन राहिले आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**साहेब, तुम्ही कायदयात जावु नका, कायदयाच्या आउट वे जा असे आमचे म्हणणे आहे. कायदा काय एक सारखा असतो. कायदा आणि वास्तविकता यामध्ये फरक आहे. आयुक्त साहेबांना विनंती करतो जेवढे बसत असतील, तेवढे घ्या त्यांच्या परिवारांना एवढे दया. तर यातुन काहीतरी काम चांगले झाले असे म्हणु, धन्यवाद।

**<u>महापालिका सचिव :—</u>**यात असे लिहित आहे की, महापालिकेच्या आस्थापनेवर सन २००३ पासुन ठोकवेतनावर कार्यरत असणा—या प्रतिक्षा यादीतील कर्मचा—यांना अनुकंपा तत्वावर महापालिका सेवेत कायमस्वरुपी सामावुन घेण्याबाबत केलेल्या महासभा ठरावाची अंमलबजावणी १ महिन्याचे आत करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १३ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>**

महापालिकेच्या आस्थापनेवर सन २००३ पासुन ठोकवेतनावर कार्यरत असणा—या प्रतिक्षा यादीतील कर्मचा—यांना अनुकंपा तत्वावर महापालिका सेवेत कायमस्वरुपी सामावुन घेण्याबाबत केलेल्या महासभा ठरावाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत पालिका सदस्य, श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेत अनुकंपा तत्वावर नियुक्ती दयावयाच्या कर्मचा—यांना महासभा ठराव क्र.२३६ दि. २४/११/२०१० अन्वये ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर वर्ग क्र.३ व वर्ग क्र. ४ च्या पदावर एकत्रित वेतनावर नियुक्ती दिलेली असून आज पर्यंत या वेतनावर सदर कर्मचारी आपला व आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह व शिक्षणाचे खर्च तुटपुंज्या मिळणा—या ठोकवेतनावर म्हणजे रूपये १०,०००/— गुजराण करीत आहे. या मिळणा—या ठोकवेतनावर अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामध्ये होणारी भाववाढ मध्ये त्यांना त्यातच आपला खर्च

भागवावा लागत असल्याने कठीण परीस्थितीचा सामना करावा लागत आहे. अशा परीस्थितीत ते कायम होण्याची वाट पहात काम करीत आहे.

महाराष्ट्र शासन कं. अनुकंपा २०१४/प्र.क्र.५१/२००४/आठ दि. २२/८/२००५ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी गट क आणि ड मध्ये प्रति वर्षी रिक्त होणा–या ५ पदे भरणाच्या मर्यादेमध्ये वाढ करून प्रतिवर्षी रिक्त होणा–या पदाच्या १०,२५,५० अशा पध्दतीने अनुकंपावरील प्रतिक्षा यादीतील पदे भरण्याबाबत शासनाने निर्देश वेळोवेळी दिलेले आहेत. परंतु महानगरपालिकेतील संबधित विभागाकडून वेळेत कार्यवाही होत नसल्याने या कर्मचा–यांना त्याच्या हक्कापासून दूर रहावे लागत आहे ही वस्तुस्थिती आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण महासभेमध्ये महापालिका सदस्य या विषयावर चर्चा करून या सर्व कर्मचा–यांना महापालिकेच्या सेवेत कायम स्वरूपी तत्वावर घेवून तसा लाभ देण्याबाबत दि. १८/१२/२०१५ ठराव क्र १८ (१) पारीत करून कार्यवाहीच्या सुचना देवूनही संबधित विभाग कार्यवाही करीत नाही. हा महासभेमध्ये सदस्यांनी केलेल्या ठरावाचा अवमान आहे. याबाबत प्रशासन का कार्यवाही करीत नाही की जाणुनबुजून करावयाचे नाही यावरून दिसून येते.

तरी वरील विषयी चर्चा करून निर्णय घेण्यात यावा.

**महासभा ठराव क्र:** ७० **दिनांक:– ५/३/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिकेच्या आस्थापनेवर सन २००३ पासुन ठोकवेतनावर कार्यरत असणा–या प्रतिक्षा यादीतील कर्मचा–यांना अनुकंपा तत्वावर महापालिका सेवेत कायमस्वरुपी सामावुन घेण्याबाबत केलेल्या महासभा ठरावाची अंमलबजावणी १ महिन्याचे आत करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १४ :– प्रस्तावाची सूचना**

महापालिकेच्या अतिआवश्यक विभागात मोडणारे अग्निशमन विभागातील फायरमन व इतर पदावर कार्यरत कंत्राटी कर्मचा–यांना महापालिकेच्या आस्थापनेवर घेणेबाबत पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**साहेब यामध्ये फायर ब्रिगेटचा आपणाकडे स्टाफ कमी आहे. आणि तो ठेकेदारी पध्दतीवर आहे. ती अत्यावश्यक सेवा आहे आपण ठेकेदारावर ठेवुन कसे चालणार, त्यात काही लोक भाजले आहेत, कमीत कमी त्यांची भरती करुन त्यांना कामावर घ्या.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**मा. महापौरजी, याच महासभेत आपण आता आताच याबाबत विषय पारीत केलेला आहे की यांची भरती केली जावी तर मग या प्रस्तावाचा आता प्रश्नच येत नाही ना. याचा खुलासा आयुक्त महोदय करतील तर बरे होईल.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**स्टाफची भरती ही प्रशासनाची जबाबदारी आहे. यात सर्व प्रिमीयमचे तंतोतंत पालन होणे आवश्यक आहे. जर आपण त्यास प्रायोरिटी दिली तर ते नियमात असेल तर देवु शकतो. कॉन्ट्रक्चुअल रिक्रुटमेंट आहे व त्याचा उपयोग सुध्दा कॉन्ट्रक्चुअल आहे. जर आपण त्यांना मॅसेज देणार तर तुम्ही काही वर्षात परमनंट होणार तर सुरुवातीला ज्या लोकांनी काम केले तर ते काय करतील. नियम आपणांस पालन करावे लागतील. श्री. सुर्वे साहेब म्हणत होते ना, कायदा कायदा कायदा तर मी सांगतो की नियम आपणांस १०० टक्के पालन करायचेच आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**कुठेतरी माणुसकी सुध्दा आहे. त्यांनी येथे काम केले तर त्यांना अनुभव सुध्दा आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**ठिक आहे, २००३ चे आपण येथे आता भोगत आहोत, त्यात अदयाप आपण समाधानकारक देवु शकलो नाही. कारवाई अजुन चालु आहे त्याचा विषय तुम्ही आधी सुध्दा काढला इनडायरेक्टली. त्याचेही उत्तर मी दिले. अजुन नविन ओपन कशासाठी करायचे?

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**भरती तर करा. भरती लवकर केली पाहिजे. नियमात बसत असेल तर भरती तर करा ना.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**याबाबत आपण विषय नं. ४ मध्ये म्हटले आहे ना. इतिवृत्ताची वाट न पाहता केले आहे आपण पास.

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>**हा प्रस्ताव आता रद्द करा.

**<u>महापालिका सचिव :–</u>**हा प्रस्ताव अमान्य करायचा काय?

**<u>काही सदस्य :–</u>**अमान्य करा.

**<u>उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १४ :– <u>प्रस्तावाची सूचना</u>**

महापालिकेच्या अतिआवश्यक विभागात मोडणारे अग्निशमन विभागातील फायरमन व इतर पदावर कार्यरत कंत्राटी कर्मचा–यांना महापालिकेच्या आस्थापनेवर घेणेबाबत पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अतिआवश्यक विभाग म्हणून अग्निशमन विभाग मोडत असून २४ तास सेवा देणारे विभाग आहे. असे असतांना या विभागात कर्मचारी अपुरा असल्याने आहे. त्या कर्मचा–यांच्या सेवा पुरविली जात असल्याने त्याच्या कडून जादा कामे करून घेतली जात आहे. महापालिकेने खाजगी अभिकर्त्यामार्फत वरील पदाकरीता कर्मचारी गेल्या अनेक वर्षापासून घेतले आहे. परंतु त्यांना देखिल महापालिकेच्या आस्थापनेवर घेण्याबाबत अनेक वेळा काही नगरसेवकांनी मागणी करूनही कार्यवाही केली जात नाही. काही वेळा या कर्मचा–यांचा अपघात देखिल कार्यरत असतांना झालेला आहे. तसेच अशा कर्मचा–यांना तुटपुंज्या वेतनावर व पगार देखिल वेळेत मिळत नसून देखि ते काम करीत आहेत. महापालिकेतील अग्निशमन विभागातील अनेक पदे हे सेवानिवृत्ती व दिवगंतामुळे रिक्त आहेत. सदर रिक्त पदावर या कर्मचा–यांना घेतल्यास त्यांना न्याय दिले सारखे होईल. या करीता या सर्व कंत्राटी कर्मचा–यांनी आमच्याकडे अशी विनंती केली आहे. तसेच इतर

महापालिकेत अशा कर्मचा–यांना त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांना न्याय दिला आहे. या बाबत वारंवार महापालिकेच्या महासभेत या प्रस्तावाबाबत चर्चा करून कार्यवाहीच्या सुचना प्रशासनास करूनही प्रशासनामार्फत

कार्यवाही केली जात नाही. ही अत्यंत गंभीर बाब असून लोकप्रतिनिधी महासभेत केलेल्या प्रस्तावाबाबत दुर्लख करीत असल्याचे दिसून येते.

वरील कर्मचारी हे अनेक वर्षापासून नियमित काम करीत आहे. त्यांना वरील महापालिकेच्या नियमित पदावर घेतल्यास कार्यालयिन कामकाज सुकर होईल

तरी वरील विषयी चर्चा करून निर्णय घेण्याकरिता येत्या महासभेमध्ये विषय घेण्यात यावा ही विनंती

**महासभा ठराव क्र: ७१** **दिनांक:— ५/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिकेच्या अतिआवश्यक विभागात मोडणारे अग्निशमन विभागातील फायरमन व इतर पदावर कार्यरत कंत्राटी कर्मचा—यांना महापालिकेच्या आस्थापनेवर घेणेबाबत चा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

**⇨ विषय क्र. १५ :— प्रस्तावाची सूचना**

मुलभूत सुविधा योजनेअंतर्गत प्रभाग क्र. १४ मधील विर सावरकर पुतळा ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन मार्गे जिजामाता उदयान या रस्त्याचे रुंदीकरण करणेबाबतचा पालिका सदस्य श्री.सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**माझी सदस्यांना विनंती आहे,फार महत्वाचा विषय आहे आज सुदैवाने टाउन प्लनरपण हजर आहेत. आपण मागील वेळेस हा रस्ता ५ कोटीचा पास केलेला आहे. परंतु डीपीचे इंम्प्लीमेंट न झाल्यामुळे हा थांबला आता डीपीचे अर्धवट इंम्प्लीमेंट झाले, अर्धवट बाकी आहे. तर स्टेशनचा मुळ परिसर आहे तेथुन बाहेर पाडतो आपण, बाकीचा ४० टक्के व बाकीचा बाहेर पडतो तो भाग ६० फुट आहे. आधी सभागृहाला आणि आपणाला विनंती आहे की हा संपुर्ण रस्ता ४० फुट करण्यात यावा. जेणेकरुन तात्पुरती आतापासुन दहा वर्ष कमीत कमी ट्रफिकपासुन सुटका होईल. मी सदस्यांना विनंती करतो प्रस्ताव या प्रकारचा आहे, विर सावरकर पुतळा ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन मार्गे जिजामाता उदयान परिसर एवढा रस्ता ४० फुट मार्किंग देवुन लवकर सुरु करण्यात यावा.

**सदस्या श्रीमती ज्योत्स्ना जाधव :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, श्री. सुर्वे साहेबांच्या प्रस्तावाला माझे समर्थन आहे. कारण स्टेशनवरुन बाहेर पडतांना लोकांना त्या अरुंद रस्त्यावरुन जातांना तोंड दयावे लागते. फार कठिण आहे ते परंतु रेल्वे स्टेशन ते जिजामाता उदयान ते वीर सावरकर मार्ग कित्येक वर्ष जुने असलेले घरे व दुकाने या रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित होणार आहे. तर ती घरे आणि दुकाने पाच दहा वर्षापासुनचे नाहीत तर ब—याच वर्षापासुनची आहेत. त्यामुळे रस्ता रुंदीकरण करत असतांना महापालिकेने त्यांना सुरुवातीलाच जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. व रस्ता रुंदीकरण करण्यात यावे ही नम्र विनंती आहे माझी. महासभेने व आयुक्त साहेबांनी याची दखल घ्यावी.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**प्रशासनातर्फे कोणी मत व्यक्त केले तर ही गोष्ट फायनल होईल.

**श्री. मिलिंद सोनावणे, नगररचनाकार :—**ही १९७४ ची विकास योजना होती त्यामध्ये हा रस्ता ४० फुट होता आताची नविन विकास योजना शासनाने मंजुर केली त्यामध्ये काही भाग ४० तर काही भाग ६० फुट दाखविलेला आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आपल्या ७४ डीपीने हा रस्ता २० फुट आहे आता ६० फुट आहे. नविन डीपी आपण आता रद्द केला आहे. आजच्या तारखेस तो ठराव जोपर्यंत विखंडत होत नाही आणि शासनाकडुन काही माहिती येत नाही तोपर्यंत तांत्रिकदृष्टया आजच्या तारखेस ६० फुट करु नाही शकत परंतु शासन यास विखंडीत करेल तर त्याविरुध्द डीपी रोड ६० फुटाचा येईल. त्यास ६० फुट करण्यासाठी ३०० घरे व दुकाने यामध्ये बाधित होत आहेत, यामध्ये ज्यांचे टायटल आहे किंवा अधिकृत मालमत्ता आहे, यास कंन्सेशन दयावे लागेल व त्याबाबत विचार करावा लागेल. त्यासाठी मला वाटते २० फुटाचा जो रस्ता ठेवु. त्यास कंम्पीटमेंट होणार नाही. शहरातील ट्रफिक वगैरे पाहुन आपणांस हे करावे लागणार.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. आयुक्त महोदय, आपण जी एक गोष्ट आपण सांगितली आहे, त्यात एक करेक्शन करु इच्छितो किंवा माहिती घेवु इच्छितो, भलेही आपण त्या रस्त्यास ४० फुट करत आहात खरी गोष्ट आहे, मा. सदस्य इच्छितात परंतु जी गोष्ट आपण म्हणलात की ६० फुटाचा रस्ता नविन डीपीमध्ये आहे व तो आता रद्द करण्यात आला आहे, त्यामुळे आता आपण ४० करत आहोत अशी गोष्ट नाही, जर त्या रस्त्यात बिल्डींग परमीशनसाठी कोणी प्लान टाकला तर ६० फुटाने करणार की ४० फुटाने करणार आजच्या तारखेस? जर बिल्डींग परवानगीसाठी जर आपणाकडे कोणी प्रस्ताव आणत आहेत तर आपणांस ६० फुटानेच करावे लागणार. ही खरी गोष्ट आहे आपण हा रस्ता ४० फुटाने बनवायचा परंतु आपण भविष्यात तसे पाहणार परंतु आपण जे म्हणालात त्याबाबत मी सांगतो की आपण इतिवृत्तात करेक्शन करावे हा रस्ता जो आहे तो आजच्या डीपीमध्ये ६० फुटाचा आहे आणि कोणीही डेवलोपमेंटसाठी तेथे प्रस्ताव आणतो तर ६० फुटानेच आपणास करावा लागणार.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मी तेच म्हणालो आजच्या तारखेस ६० फुटाचा रस्ता नविन डीपीमध्ये रद्द झालेला आहे जर मंजुरी मिळणार तर त्यापुढे प्रशासन आपला निर्णय घेणार.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**साहेब, या गोष्टीसाठी मी आपणांस धन्यवाद देतो. आपण जे म्हणालात की ६० फुटाच्या रस्त्याने नाही करु शकत तर आपण माहिती घेवुन त्याप्रमाणे आपण तशी भरपाई करुन घेवु. ही गोष्ट जर आयुक्त साहेबांनी कल्याण अंबरनाथ रस्त्याबाबत लक्ष दिले असते तर आज आम्हांला एवढे त्रस्त व्हावे लागले नसते. जो आपण विचार केला तो चांगला केला त्याबाबत आपले लाख लाख धन्यवाद।

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**फक्त त्याच्यामध्ये नमुद एवढेच करा, सरसकट करुन बाकी जो त्याचा उर्वरीत पैसा आहे, तर त्या प्राकलनात ६० फुट धरला आहे ना मग जी काही उर्वरीत रक्कम असेल साईडला करा. एमएसईबीचे पोल आहे, एसपी पोल आहेत, वॉटरचे, ड्रेनेजचे आहे ते त्याच्यामध्ये जास्तीत जास्त वापर करा.

**महापालिका सचिव :—**एकदा ठराव वाचुन दाखविते.

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मुलभूत सुविधा योजनेअंतर्गत प्रभाग क्र. १४ मधील विर सावरकर पुतळा ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन मार्गे जिजामाता उदयान या रस्त्याचे ४० फुट रुंदीकरण करण्यास मान्यता देत आहे.

**श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार :—**हा रस्ता ईपीमध्ये आहे आणि या रस्त्याची रुंदी आता २४ मिटर दाखविलेली आहे, ६० ची.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**७४ च्या डिपीमध्ये सरसकट ४० फुट आहे.

**श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार :—**बरोबर.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मागच्या डीपीमध्ये ६० फुट होता आणि आताच्या डीपीमध्ये अर्धा ४० फुट आहे आणि अर्धा ६० फुट आहे.

**<u>श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार :—</u>**साहेब, ६० फुटचे ईपीमध्ये ८० फुट केले आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**तेथे आता ८० फुट आहे. ८० नाही ६० आहे.

**<u>श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार :—</u>**६० चे ८० फुट केले आहे ईपीमध्ये हा रस्ता.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**नाही, चुकीचे आहे.

**<u>श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार :—</u>**मी एका बाजुने पाहुन आलो आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>**एका साईडने ८० फुट आहे. हेजे बोलत आहात जीजामाता ते स्टेशन, दोन भाग आहेत साहेब. एक वीर सावरकर ते स्टेशन. आणि जीजामाता ते स्टेशन. जीजामाता ते कोयटी पुतळा हा ६० फुट आहे. कोयटी पुतळा ते स्टेशन हा ४० फुटाचा आहे. आता जसे श्रीमती जाधव महोदयांनी सांगितले जेथे कंजेस्टेड एरिया आहे तेथे ट्रफिक जाम होते. ४० फुट प्रस्तावित केलेला आहे आणि रहिवाशी भागामध्ये ६० फुट आहे. हे उलट केलेले आहे. उलट स्टेशन एरिया विभागामध्ये मोठा पाहिजे होता हा येथे अरुंद केलेला आहे. असे प्लॅनिंग आहे.

**<u>श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार :—</u>**८० फुटाची लिंक आहे ती मोठी आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**८० फुट सावरकर पुतळयाजवळ केले आहे.

**<u>श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार :—</u>**तो सुध्दा त्या रस्त्यामध्ये आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे :—</u>**नाही साहेब, हा रस्ता त्यात येत नाही हा ८० फुट, सावरकर मार्गे जो स्टेशन मार्गे जातो ना तो ८० फुटामध्ये येत नाही. हा ६० फुटाचा प्रस्तावित केला आहे. त्यावर निर्णय काही झालेले नाही.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**तो जो ८० फुट तुम्ही सांगत आहात त्याच्या बाजुने, एक्झीस्टींग रोड तसाच ठेवलेला आहे त्याच्यामध्ये लाईनिंग टाकलेली आहे, हा डीपीमध्ये नाही.

**<u>श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार :—</u>**आधीच्या डीपीचा ७४ मधील जो एक्झीस्टींग रोड आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>** डीपीमध्ये ८० फुट दाखविले आहे ना.

**<u>श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार :—</u>**ती लिंक ज्याला कनेक्ट होत नाही.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**साहेब, कनेक्ट होणे वेगळे.

**<u>श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार :—</u>**परंतु आपल्या निविदेत आहे ना ते.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**तुम्हांला दाखवितो जो ८० फुट दाखविला आहे त्याच्या बाजुने दाखविला आहे. तो जो रस्ता ८० फुट दाखविलेला आहे तो बिल्डींगवरुन दाखविलेला आहे. एक्झीस्टींग रस्ता तसाच ठेवला आहे आणि बाजुने ८० फुट दाखविला आहे म्हणुन हरकत घेतली आहे.

**<u>श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार :—</u>**माझा सकाळी विषय झाला, आता ज्यु. इंजिनिअर माजींनला गेले होते, त्यावेळेला त्यांनी आपल्या डीपीमध्ये दाखविलेला आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>**साहेब, आपण प्रत्यक्ष बघु त्याचे दोन पार्ट आहेत. जीजामाता उदयान ते कोयंटी पुतळा ६० फुट, कोयंटी पुतळा ते स्टेशन जेथे ६० फुट आवश्यक होते ४० फुट, जेथे आवश्यकता नाही दोन रस्ते होतात स्टेशनपासुन दोन रस्ते होतात एक ४० फुट आणि एक ६० फुट, बॅंक ऑफ महाराष्ट्रकडे जाणारा रस्ता ८० फुट आहे. आणि इकडे वर येणारा रस्ता ६० फुट आहे म्हणजे दोन्ही तेथुन पुढे ४० फुट होते. जेथे आवश्यकता ८० फुटाची होती तेथे ४० फुट ठेवलेले आहे. आता तुम्ही मागच्या वर्षीची स्टेटमेंट केली की आपण आता डीपीपेक्षा

वाढवु शकत नाही. डीपी पेक्षा कमी करु शकतो म्हणुन सुर्वे साहेबांनी हा प्रस्ताव आणला आहे की, ४० फुटचा ६० करावा एवढेच आहे. राहिलेला जो निधी आहे तो नाकारता येत नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—**आपण ईपीला काही सजेशन दिले का?

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**नाही ईपीला वाढवायचे नाही ना. म्हणजे तुम्ही जसे सांगितले की याची खात्री नाही पण ४० फुट सरसकट आहे. सध्याप्रमाणे करायचा पण भविष्यामध्ये काहीही होईल असे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—**ईपीला स्टेशन आपण ६० फुटच केला ना. आपल्या महासभेतुन प्रस्तावित सुध्दा आहे आणि आता आम्ही येथे सुचविले सुध्दा आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**सरसकट ६० झाले असते काही हरकत नव्हती परंतु पुढे ४०फुट आणि मागे ६० फुट अर्थच नाही त्याला काही.

**महापालिका सचिव :—**एकदा ठराव वाचुन दाखविते.

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मुलभूत सुविधा योजनेअंतर्गत प्रभाग क्र. १४ मधील विर सावरकर पुतळा ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन मार्गे जिजामाता उदयान या रस्त्याचे ४० फुट रुंदीकरण करण्यास मान्यता देत आहे. तसेच उर्वरीत रक्कम सदर रस्त्यावरील एमएसईबीचे पोल, ट्रान्सफोर्मस व इतर, सौंदर्यीकरणासाठी व सुखोभिकरण करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

**सदस्य श्री. किशोर वनवारी :—**सर्वच जागी असेच झाले पाहिजे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १५ :— प्रस्तावाची सूचना**

मुलभूत सुविधा योजनेअंतर्गत प्रभाग क्र. १४ मधील विर सावरकर पुतळा ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन मार्गे जिजामाता उदयान या रस्त्याचे रुंदीकरण करणेबाबतचा पालिका सदस्य श्री.सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरासाठी मुलभूत सुविधा योजने अंतर्गत रस्त्यांचे कामासाठी उपलब्ध झालेल्या निधी मधून रस्ते मंजूर असून सद्यस्थितीत उल्हासनगर शहराचा विकास आराखडा मंजूर आहे. सदर विकास आराखडयानुसार क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेनुसार शहराचा विकास करतांना रस्त्यांचे नियोजीत रूंदीकरण करणे शक्य आहे. सद्यस्थितीत फक्त रस्त्याचे रूंदीकरण करतांना असंख्य घरे व वाणीज्य आस्थापना बाधीत होणार आहे ज्यामुळे नागरीकंचे नुकसान होवू शकते.

सबब उल्हासनगर शहरामध्ये सद्यस्थितीमध्ये रस्त्याची कामे करतांना आवश्यक व शक्य होईल इतके रूंदीकरण करून रस्त्यांची कामे केल्यास शहरातील रस्त्याची स्थिती सुधारेल व वाहतूकीस व नागरीकांना सुस्थितीतील रस्त्याचा लाभ होवू शकतो.

विर सावरकर पुतळा ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन मार्गे जिजामाता उद्यान हा रस्ता मुलभूत सुविधा या योजने अंतर्गत ६० फुटी रस्ता रूंदीकरण मंजूर असून युएमसी/पीडब्लूडी/सीई/२०१७–१८: ०१ दिनांक २६/४/२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आले आहेत. परंतू नवीन विकास आराखडयानुसार उल्हासनगर रेल्वे स्टेशन परिसर हा मायनर मोडीफिकेशन (स्टेशन परिसर डेव्हलपमेंट) सदरामध्ये भविष्यात शासनाकडे बदल करण्यासाठी पाठविण्यात येणार असून स्टेशन बाहेरील परिसरातील रस्ता ४० फुट असून पुढे तोच ६० फुट आहे. त्यामुळे आस्तीत्वातील रस्ता बनवितांना ज्या ठिकाणी रस्ता रूंदीकरणाची गरज आहे त्याच ठिकाणी ४० फुट इतका अरूंद असून पुढील भागात तोच रस्ता ६० फुट असा आहे. आस्तीत्वातील रस्ता जसा आहे तसा बनविल्यास नागरीकांना सोयीचा होणार नसल्याने सदरचा रस्ता पुर्णपणे ४० फुटी बनविण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर रस्त्याचे मंजूर निधीपैकी शिल्लक राहणारा निधी हा रस्त्यामधील जलवाहिन्या, विद्युत पोल व ट्रान्सफॉर्मर हे स्थलांतरीत करण्यासाठी व रस्त्यामधील साकव नव्याने बनविणेसाठी वापरण्यात यावा.

तरी कृपया सदर प्रस्तावाच्या सुचनेवर सभागृहात चर्चा विचार विनीमय होवून निर्णय व्हावा ही विनंती.

**<u>महासभा ठराव क्र:</u> ७२** **<u>दिनांक:– ५/३/२०१८</u>**

सुचकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे
अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मुलभूत सुविधा योजनेअंतर्गत प्रभाग क्र. १४ मधील विर सावरकर पुतळा ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन मार्गे जिजामाता उदयान या रस्त्याचे ४० फुट रुंदीकरण करण्यास मान्यता देत आहे.

**<u>तसेच</u>**

उर्वरीत रक्कम सदर रस्त्यावरील एमएसईबीचे पोल, ट्रान्सफोर्मस व इतर, सौंदर्यीकरणासाठी व सुखोभिकरण करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :–</u>** विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १६ :– <u>प्रस्तावाची सूचना</u>**

उल्हासनगर शहरातील रस्त्यांच्या रुंदीकरणात बाधीत होणारे दुकाने/घरे या विषयावर चर्चा करणेबाबतचा उपमहापौर /पालिका सदस्य श्री.जीवन इदनानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:—</u>**सन्माननिय महोदया, हा प्रस्ताव श्री. जीवन इदनानी यांचा आहे. तसेच पुढच्या महासभेत श्री. जमनादास पुरस्वानी यांचा सुध्दा ५ नंबरच्या विषयावर प्रस्ताव आणला आहे. तर मी म्हणतो ते एकत्र घ्यावे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**दुसरा विषय दुस—या महासभेत आहे तो विषय या महासभेत कसा जोडु शकता आपण? बैठक लागेल त्याची तेव्हा त्याची चर्चा होवु शकते.

**<u>महापालिका सचिव :—</u>**जर त्यांची मर्जी असेल तर विषय आता जोडु शकतो. नाहीतर दुस—या सभेत घेवु शकतो. आपण ठराव दया.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, हा विषययेणा—या भविष्यासाठी आहे. डेव्हलोपमेंट प्लान यामध्ये रस्ता रुंदीकरणात जे बाधित होतील, शॉपिंग व रेसीडंट यासाठी प्रस्ताव आणला जसे आपणांस माहित आहे की यामध्ये आपले पुर्वज येथे आले होते, त्यांना गर्व्हमेंट प्रापर्टीमध्ये ठेवण्यात आले होते. त्यांनी वेळोवेळी आपल्या जीवनशैलीसाठी दुकाने रस्त्याच्या बाजुला बनविले, त्यावेळी ते पक्के बनत गेले. १९६५ मध्ये गर्व्हमेंट आफ इंडियाने या मिलिटरी कॅम्पला, आयुक्त साहेब, हा विषय भविष्यासाठी महत्वाचा आहे. साहेब, १९६५ मध्ये गर्व्हमेंट ऑफ इंडियाने एक ऑर्डर इश्यु केली होती की या मिलिटरी कॅम्पला रेसीडेंसल व कर्मशिअलमध्ये लॅण्ड केले जावे त्यासाठी लॅण्ड सर्व्हे सुध्दा करण्यात आला होता. त्यात यु नंबर सुध्दा देण्यात आले होते जे जे एफेक्टेड होत नव्हते. आणि जे जे एफेक्टेड होत असायचे त्यास अल्टरनेड साईड देण्याची खात्री दिली होती. जसे की कल्याण अंबरनाथ रस्त्याचा मुद्दा एकदम वेगळा आहे. यात असे पाहिले की १०० फुटाचा रस्ता पारीत केला ५५ फुट रस्ता होता. प्रत्येक साईटला २५ फुट रस्ता कटींगसाठी दिला होता तो आम्हांस अमान्य होता, त्यावेळी ब—याच दुकानदारांचे नुकसान झाले, कोणा कोणास वेळ मिळाला नाही आपल्या दुकानास शिप्ट करण्यासाठी,. ८५० दुकाने होते त्यातील २५० दुकाने संपुर्णपणे बाधीत झाले होते. पुढे चालुन असे होवु नये यासाठी आम्हांला काही धोरण ठरवावे लागले. ३१ डिसेंबर २०१५ पर्यंत आपणाकडे जो नविन कायदा आलेला आहे, रेग्युलाईजचा त्या आधी उल्हासनगरसाठी २००५ मध्ये वेगळा नियम आला होता. उल्हासनगरच्या रेग्युलाईज रेटमध्ये. त्यामध्ये सुध्दा आपण कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील बाधीत झालेल्यांसाठी संरक्षण देवु शकत होतो परंतु आपल्या प्रशासनामार्फत त्यांना कोणतीच मदत मिळाली नाही. दुकानदार व घरांसाठी एक नियम आहे की टु प्रोवाईड अकॉमडेशन फॉर डिसहाउस ॲण्ड फॉर पिपल्स इट डयुटी ऑफ गर्व्हमेंट अंडर द महाराष्ट्र म्युनिसिपल ॲक्ट, मी सर्व सदस्यांना सांगतो की, इन द मार्कट एरिया सो बी डिसॉल्व ए बी कंपसेशन एज्युकेटली. सेक्शन १२६ ऑफ द महाराष्ट्र लॅण्ड रिजनल टाउन प्लॅनिंग ॲक्ट प्रोव्हाईड एडीक्युअट कंम्पनशेसन प्रोव्हाईड इन सच मेटर ॲण्ड एफुजन. द शॉक किपर ॲल्सो फॉर एलिकेशन फॉर कॉम्पनशेसन मार्केट व्हॅल्यु अंडर द प्रोव्हिजन ऑफ न्यु लॅण्ड एकव्हिजेशन ॲक्ट इन सेव्हरल केसेस हॉनरेबल सुप्रिम कोर्ट देअर रुल फॉर फेअर कॉम्पनशेसन द उल्हासनगर म्युनिसिपल कॉर्पोरेशन बाय पासृड रेझ्रुलेशन रिझॉल्ड फॉर रिएबिलीटेशन ऑफ इफेक्टेड डेमॉलिशन बट मेटर ऑफ क्रीएट कंन्फर्म दॅट ॲडमिनिस्ट्रेशन विदॉउट टेकिंग एनी टेगिंग इलेक्टेड रिप्रेझेंटॅटीव्ह कॉरपोरेटर रिसंटली सेन्ड रेझ्रुलेशन टु द गर्व्हमेंट ऑफ महाराष्ट्र फोर रिसाईडींग ४५० इवन ऑफ द एमएमसी ॲक्ट. वुई रिक्वेस्ट ऑल पार्टी मेंटर टु पास रेझ्रुलेशन ॲक्शन अगेण्स्ट द ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड रिॲटेड रिॲबिलेशन पॉलिसी ॲण्ड टेंडर फॉर द बाय प्रपोज ऑफ द सबमिटेड हेअर. वुई ऑर शुअर दॅट टु कंपसेशन इफेकटेड शॉपकिपर रेसिडंट इलेक्टेड मेंबर्स ऑफ उल्हासनगर म्युनिसीपल कॉर्पोरेशन जनरल स्ली फॉरव्हर्डेड हेल्पींग ॲण्ड बाय डिवायसेस पॉलिसी ऑफ कंम्पीशेड लास्ट शॉपर बाय किपर ॲण्ड रेसिडंट होनर्स, विल सजेस्ट द रिॲबिलीटी इफेक्टेड शॉप ॲण्ड हाउस होनर ॲज अंडर. द शॉप किपर डु ऑर विलींग द कन्स्ट्रक्ट ऑनर रिमेनी पोर्शन, द शॉप किपर हु फिल्ड दॅट रिमेनिंग एरिया, सफिशन टु कंडक्ट बिजनेस शॉप हु ॲज प्रमिशेश इन द बॅक, द शॉप कंसिप्ट सुटेबल, द हाईट परमिशेश शल बी ५० मिटर एक्झांम्पल ग्राउंड प्लस ४ प्लोअर अप्रोचीग इफ एक्झीटींग हायटेड दॅन ५० मिटर. द शॉप किपर शल नॉट बी लेव्हल फोर एनी कॉक्री पॅनल ॲण्ड लिगल एक्शन अंडर द एमआरटीपी ॲण्ड एमएमसी ॲक्ट, द प्रापर्टी टॅक्स ॲण्ड वॉटर चार्जेस शल बी वेबज ऑनली डयुरिंग द पिरीअड ऑफ डिमॉलिशन रिकंन्स्ट्रक्शन ऑलरेडी फ्रेम फिल्म शेड बी सबक्युअली इअर. अफटर रिकंन्स्ट्रक्शन ऑफ द प्रापर्टी, प्रापर्टी टॅक्स शॅल चार्ज ऑफ द बी बेसिक ऑफ युनीनॉर लोव्हेस्ट ॲवलेबल रेट प्रेसकाईब फोर द इअर ८६—८७ ॲज ए टर्म. टाईप ऑफ कंन्स्ट्रक्शन कन्स्ट्रक्शन ऑफ आरसीसी टु २० परसेंट पर स्केअर फिट टु डिटरमेन द रेटेबल व्हॅल्यु ॲण्ड नॉन रेसिडेंशिअर पॉईंट ३० पर स्केअर फुट. सेम जो आपण टेबल दिला आहे तोच प्रस्तावात टाकला तर बरे होईल. शॉक किपरचे संपुर्ण

दुकान गेले तर त्यांच्यासाठी शॉप किपर गिवन साईड अॅज डिसाईडेड ऑफ द जनरल बॉडी. दे शुल्ड बी गिवन अल्टरनेट अकंम्डेशन स्ट्रक्चर ऑफ ऑनरशिप वे ऑफ रिमेन अॅट नॉर्मल रुपीज १. इफ द अल्टरनेट रिकंम्डेशन से ऑफ नॉट रिकंम्डेंशन शॉप किपर विलींग देन टीडीआर शॅल बी गिवन अज्युमीन द रेड ऑफ द वुई आर पर स्केअर फुट टीडीआर शल गिवन बी रेशिओ शुल्ड ४० फोर एव्हरी वाूज स्केअर फुट दे शल बी कंम्पनशेन ४० स्केअर फुट. द शॉप किपर शॅल बी अलाव टु सेल एनी पार्ट ऑफ सीटी रेसीडेंशिअल अॅण्ड कर्मशिअल परपज टीडीआर, नोटिस अॅण्ड प्रॉपर्टी टॅक्स बील प्रोवाईड ऑक्युपाय फोटोज व्हिडीओ ऐनी रिलॅबल मोड अॅवेलेबल, द एरिया वीच मोर फ्राम द कंसिडर कंम्पनशेन रिकंमडेंट शल बी गिन प्रीप्रेली कॉमर्स इज सेम इज नॉट अेवेलेबल शॉप किपर गिवन फोर स्ट्रक्चर दिस विली बी कमोडेड रेसिडेंशिअल. इफ द एरिया द अल्टरनेट डेकोमोडेशन मोर ओर लेस. द एरिया द डिफरंट शॅल बी रिकव्हर ओर पेड अॅज पर रेडीरेकनर प्राईज फोर प्रिवेलींग इन विच डिमोलेशन टु प्लेस. इफ द युएमसी नॉट इन पोझिशन टु प्रोवाईड अल्टरनेट अकोमोडेशन टीम द मेंन्शन अबोव. द कंम्पनशेशन गिवन इन कॅश ४०,००० पर स्केअर फिट. द सिटीशन हुज प्लॅट रेसिडंट शॉल डिमॉलिश, नंबर वन डिमोलेशन शॅल बी कंम्नशेशन एज पॉलिसी डिसाइडेड इफ द एरिया अकॉमोडेशश्न मोर एरिया सडन बाय द डिफरंट शॅल बी रिकव्हर ओर प्री एज पर द रेडी रेकनर प्रिवीलिंग इन द इअर ऑफ डिमॉलिश. थर्ड इफ द अल्टरनेट रिकंडेशन नॉर अॅट रेसिडेंशिअर विलींग डर्ट एरिया शॅल बी गिवन. फोर्थ एस्विमिंग द रेट ऑफ द टीडीआर पर स्केअर १०००. द टिडीआर शल बी गिवन रेशो ऑफ वन रेशो आय फोर वन स्केअर फुट, दे शॅल बी कंम्पटेटेड विथ १० स्केअर फिट. द रेसिडंट शॅल बी अलाउड युटिलाईड शॅल द टिडीआर इन ऐनी पार्क ऑफ द सिटी ऑफ द रेसिडेंशिअल पार्ट. इफ द युएमसी नॉट टु पोझीझन अल्टनेट प्रोवाईड अकॉमोडेशन टिडीआर एज मेंशन अबोव द कंम्पनशेशन बी गिवन इन कॅश ऑफ द रेट ऑफ १००० पर स्केअर फुट टु प्रोटेक्ट इनटरेस्ट शॉप किपर रेसिडंट अॅण्ड द फॅमिली लिगली एमओई अॅज टेक बिटविन द कमिशनर एज रेफरंन्स टेटयुटुड ऑफ द शॉप किपर असोसिएशन रिजम ऑफ टु मेंबर इच ऑफ स्टॅण्डींग कमिटी. अॅण्ड अशोसिएशन अॅण्ड विटनेस फिल ऑफ म्युनिसिपल सेक्रेटरी, द म्युनिसिपल कॉर्पोरेशन हॅड ऑन प्रिमायसेस इक्कवलन टु २५ परसेंट ऑफ द बिल्ट ऑफ एरिया डेव्हलोपर विल परमीशन वॉज गिवन फोर कंन्स्ट्रक्शन द रिजर्व साईट अंडर द अकॉमोडेशन इन पॉलिसी. सफिशन स्टॉक नॉट एवेलेबल विल कॉर्पोरेशन विथ कंन्सप्ट शॉप किपर मे कंसिडर द प्रपोजल शॉल कंन्स्ट्रक्ट ऑफ प्रपोजल रेसिडंट कॉम्पलेक्श अॅट शुल्ड सुटेबल प्लेस. द टिम शुल्ड बी कंन्सेप्ट मिनिमम टाईम लिमिट. स्पेशन शॅल कंसिटींग ऑफ द फोलोविंग शॅल क्रिअेटेड मॉनिटर द इंम्प्लीमेशन द रिअॅबलीशन दे शॅल रिपोर्ट द कम्युनिकेशन, टु डे प्रोगरेस डायरेक्टली टु द कमीशन. डेप्युटी म्युनिसीपल कमिशनर हॅड ऑफ द सेल सीटी इंजिनिअर मेंबर्स एसिसटंट कमिशनर, जेई इंजिनिअर पीडब्ल्युडी, जेई वॉटर सप्लाय, जेई अंडरग्राउंड ड्रेनेज, जेई इलेक्टेड मेंबर्स, सिनअर आर्किटेक्ट अल्सो मेंबर फोर दिस, अॅसिसटंट कमिशनर फोर द मेंबर ऑफ एमएमआरडीए अॅण्ड ऑदर एजन्सीज. वूई रिक्वेस्ट ऑफ मेंबर अथमेडेंशन मॅटर शुअर साउंड फायनानशिअल फोर्टी ऑफ अवर इफेक्टेड शॉप किपर्स अॅण्ड रेसीडेंट हेल्थ देम रिगेनीग ऑफ लॉ स्टेटस ऑफ अर्लीअर. वुई रिक्वेस्ट मेंबर टु गिव देन सेल्युअर टु प्रोवाईड फोर द स्टॅण्ड टु स्टोअर प्रपोजल, थ्यॅक्यु.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>**कृपया आता सदस्याने जे इंग्लीशमध्ये सांगितले ते हिंदीमध्ये व मराठीमध्ये भाषांतर केले तर बरे होईल.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान :—</u>**मा. महापौरजी, हा जो अशासकिय प्रस्ताव आणला आहे, आयुक्त साहेबांनी थोडयावेळा पुर्वीच सांगितले. डीपीच्याबाबत अदयापपर्यंत निर्णय झालाच नाही. रस्ता रुंदीकरणाबाबत जर कोणी मज्जाव करतो, कारवाई करतो तर त्यावर हरकत घेतली जाते. व येथे जो प्रस्ताव आणतो त्यावर वेगळी कारवाई केली जाते, धोरण एक झाले पाहिजे. १९७४ चा प्लान आणि २०१६ मध्ये आलेला नकाशा जर का नियमावलीच नसेल तर तुम्ही ते धोरण कसे स्विकारु शकता. कोणाला टीडीआर किती दयायचा आहे, बाजारमुल्य काय असणार आहे, काय भाव असणार आहे. ज्यावेळी तुमच्याकडे डीसी रुल्स येतील तेव्हा हे धोरण निश्चित होईल. आजही आपल्याकडे डीसी प्लान आहे. त्याचे नियम नाही, नियम नसतांना त्या डीपी प्लानवर आपण नव्याने नियम करुन पुन्हा ठराव करणे आयुक्त साहेब, ही योग्य बाब नाही. शासनाच्या नियमात जर काही तरतुद व त्रुटया असतील, महासभेत निर्णय घेतल्यावर आपण घेतलेला धोरणात्मक निर्णय मला वाटते कायम असेल. यात माझे मित्र श्री. दिपक सिरवानी यांनी जो प्रस्ताव आणला खरोखर सुंदर आहे परंतु काही ठिकाणी कल्याण अंबरनाथ रस्त्यावर कितीतरी दुकानदार आहेत ते भटकत आहे त्यांच्याबाबत आजपर्यंत कोणताही प्रस्ताव नाही. डीपीबाबत आम्ही ब—याचदा येथे

सांगितले परंतु त्यावर कोणी चर्चा केलीच नाही व ईपी, ईपी करुन त्यास संपृष्टात आणले. आयुक्त साहेबांकडे प्रस्ताव गेला त्यांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविला परंतु काहीच झाले नाही. तर हा प्रस्ताव आणला तर मला असे वाटते उचित नाही झाले. कारण आता आताच श्री. सुनिल सुर्वे यांनी म्हटले आमचा स्टेशन रोडचा सुध्दा प्रस्ताव आहे. स्टेशन पासुन जिजामाता पर्यंत व तेथुन कोयंटेपर्यंत हा रस्ता ४० मिटर आहे, तेथुन ६० मिटर आहे, टीपीने सांगितले, डीपी प्रमाणे हा रस्ता ६० मिटर आहे, नविन डीपीत २४ मिटर आहे तर मग हे धोरण डीपीबद्दल नसेल तर मला असे वाटते माझ्या या प्रश्नाचे उत्तर आयुक्त साहेबांनी दयावे, अशी इच्छा आहे. डीपीबाबत धोरणच निश्चित नाही तर डीपीबद्दल धोरण कसे देणार. त्याबाबत आपण उचित माहिती दयावी. आयुक्त साहेब नियमबध्द आहेत, आता आताच त्यांनी सुर्वेना म्हटले की कायदा, कायदा परंतु कायदाच चालतो. मला या प्रस्तावावर कायदेशीर मत दया, एक रस्त्याला वेगळा कायदा व एक रस्त्याला वेगळा जर धोरण आहे तर शासनानुसार आरआरचा रेट, रेडीरेकनरचा जो व्हेल्यु आहे तो वेगवेगळा आहे. १ नंबर, २ नंबर, ३ नंबर, ४ नंबर येथे वेगवेगळा आहे. व्यापारी सर्व जागेवर आहे. डीपी आल्यानंतर बरेचसे व्यापारी बाधीत होतील, त्यांच्या राहण्याची सोय सर्व काही पहावे लागेल, त्यांच्या मालकी हक्काची जागा बाधीत झाल्यावर आपण त्यांना काय देणार. कारण याची नियमावली व डीसी रुल नाही, त्या आधी आयुक्त साहेब, मला वाटते सर्व सभागृहाला सांगा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**पहिल्यांदा कल्याण अंबरनाथ रस्त्याचे काय झाले आहे, आताची परिस्थिती काय आहे, पुर्नवसन नंतरचा भाग आहे. ब—याच वर्षापासुन आम्ही महासभेत चर्चा केले तेव्हा ऐकले होते की उच्च न्यायालय डीपी मंजुर झाला तर आताची परिस्थीती काय?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**खाजगी मालमत्ता जेव्हा आपण पब्लीक प्रपोजसाठी ताब्यात घेतो शासनाचे काहीतरी कायदे आहेत जसे या प्रस्तावात त्यांनी वाचुन दाखविले, कलम २६ एमआरटीपी ॲक्ट प्रमाणे आपण कॉम्पंनसेशन देण्याची तरतुद आहे. कॉम्पंजेशन हे मॉनिटर किंवा टीडीआर पॉलिसी ९५ नंतर आली तसे टीडीआर स्वरुपात महानगरपालिका त्यापध्दतीने कॉम्पंजेशन घेते. कुठल्याही नियमात त्या लोकांना पर्यायी जागा देणे अभिप्रेत नाही, आपण २०१६ ला जो ठराव केला त्यामध्ये कल्याण अंबरनाथ रस्ता आपण रस्ता वायडिंग केले त्यावेळी पहिला आपला प्रसंग होता की, पब्लीक प्रपोजसाठी प्रायवेट मालमत्ता त्यावेळी आपण ताब्यात घेतली. त्यावेळी आपण धोरण केले तर त्यावेळी जनरल पध्दतीने आपण ठराव जरी वाचला तरी ज्या लोकांचे पुर्णपणे दुकाने किंवा घरे बाधित झालेली आहेत, त्यांना पर्यायी जागा दयावी असा आपण ठराव केला त्यामध्ये आपण कुणाचे घर गेले आहे किंवा दुकान गेले आहे तर त्यास पर्यायी जागा काय दयायची, ज्याच्याकडे सनद आहे त्यास काय दयायचे, ज्याच्याकडे सनद नाही त्यास काय दयायचे. ज्याच्याकडे ५० स्केअर फुटाचे गेले आहे त्यास किती जागा दयायची, ज्याचे ६५ फुट गेले त्यास किती दयायचे, त्यामुळे ओव्हर ऑल धोरण ठरवायचे, आता हा विषय आलेला आहे तो चांगला विषय आहे, तर हे सर्व शासनाच्या मान्यतेने म्हणजे आजमितिस जे धोरण आहे, ते करु महासभेने जरी ठरविले तरी आपणांस त्यास कायदयाचा आधार घ्यावा लागणार आहे. विशेष बाब म्हणुन २००६ साली आपण आपल्या शहरासाठी जो विशेष कायदा केला याबाबतीत आपल्या शहराची ओव्हरऑल परिस्थिती व त्यानंतर आर्थिक परिस्थिती, आणि ओव्हरऑल कंजेशन या सर्व गोष्टी विचारात घेवुन आपणांस पाठवावे लागेल. पुन्हा एकदा सोनेरी आशेचा किरण हा आहे, डीपी जो झाला आहे तो क्लस्टर डेव्हलोपमेंट आणि वाढीव एफएसआयआरने झाला तर या सर्व बाबींची आपणांस काहीच गरज पडणार नाही कारण क्लस्टर डेव्हलोपमेंट मध्ये एकास तीन, एकास चार याप्रमाणे डेव्हलप होईल, रस्ते वाईड जरी झाले तरी दुकानदारास खात्री राहिल ८०. फुट दुकान जरी गेले तरी त्यास १५०० फुटाचा हक्क त्यास मिळेल. त्यामध्ये मोकळी जागा वगैरे सोडुन तरी सुध्दा त्याचा फायदा होईल. त्याठिकाणी प्रायव्हेट लेअरशिटी आणि त्याठिकाणी पुर्ण लोकेशनवाईज त्याठिकाणी डेव्हलपमेंट होईल. आज आपण कल्याण अंबरनाथ रस्त्याबाबत स्टेट्स को प्रमाणे मेंटेन केले आहे. या पंधरा दिवसात एक थोडासा बदल म्हणुन एक सकारात्मक चर्चा सुरु झालेली आहे. एक बैठक झाली त्यामध्ये असे ठरविले की कोर्टाकडुन जी स्थगिती मिळाली त्याच्यामध्ये आपण कंपनशेट करु शकतो का? त्याची छाननी करुन, मग त्याप्रमाणे आपण काम सुरु केलेले आहे. सर्व माहिती योग्य पध्दतीने व अचुक माहिती आपणाकडे उपलब्ध झाली, धोरण निश्चितपणे ठरविता येईल, महासभेपुढे प्रश्न येईल की कशा पध्दतीने कंम्पनसेशन ठेवायचे, जसे मी सांगितले यामध्ये विविधता आहे, सनद आहे, सनद नाही, रहिवाशी आहे, बिगर रहिवाशी आहे, कोणाचे ५० फुट गेले आहे तर कोणाचे ५०० फुट गेले आहे, त्या अस्तित्वात असलेल्या ठिकाणी जी + १ दयायचे की कसे, त्यांनी मागणी केली आहे की जी +४ पंधरा मिटरपर्यंत परवानगी दयायची. हे सर्व विषय आपणांस घ्यावे लागतील कारण काही लोकांनी तेथे जी + ४ व जी+५

अशी बांधकामे सुध्दा केलेली आहेत. सर्व गोष्टींचा विचार करुन आपणांस धोरण प्रस्तावित करावे लागेल. आज सकाळी बैठकीत चर्चा झाली, याचे जे ड्राफटींग आहे, त्याचे जे प्रस्ताव आहे त्याचे सर्व बारकावे सहित सर्व पदाधिका—यांनी मान्य केले की त्यांच्या मार्फत ते प्रस्ताव करतील आणि त्यामध्ये फाईल क्यु करुन नियमात कसे बसविता येईल या पध्दतीने आम्ही अभ्यास करुन तो विषय महासभेपुढे लवकरात लवकर आणु. राहिला विषय कोर्टाचा, कोर्टात जे कल्याण अंबरनाथ रस्त्याची जी स्थगिती आहे ती सुध्दा कंन्सेटंट आम्ही जे तयार करत आहोत त्यास्तरावर ते कोर्ट केसेस विथड्रा होतील. अशी आम्हांला आशा आहे आणि अपेक्षा आहे आणि ते झाल्यानंतर तेथिल काम सुरु करण्यात येईल. मागणी जी केलेली आहे एकास चाळीस किंवा एकास दहा रहिवाशी असेल तर. कर्मर्शिअलला एकास चाळीस तर हे सर्व टीडीआर या शहरामध्ये टीडीआर पॉलिसी यशस्वी होवु शकणार नाही. परंतु आधीच एवढे हाय कंजेशन झालेले आहे टीडीआर क्रियेट होईल म्हणजे आपण वाटु टीडीआर परंतु त्यास घेणारे नसतील तर ते फेल जाईल आणि तो माणुस टीडीआर घ्यायला सुध्दा नकार देईल. त्याचा विकलाच जाणार नाही तर मग तो खरेदी कसा करेल. या सर्व गोष्टी मला वाटते अल्टीमेटली सर्व्या महापालिकेने मिळुन शासनाकडे मोठी मागणी केली, शासनाने सुध्दा सांगितले होते की डीपीच्या ज्या किरकोळ त्रुटया आहेत त्यापेक्षा डीपी सोबत डिसीआर आणि क्लस्टर डेव्हलोपमेंटची पॉलिशी शासनाने जर मान्य केली तर आपल्या सर्व शहराचे विकासाचे प्रश्न एकामध्येच सुटेल. कुठलाही रस्ता विकसित करायचा असेल किंवा कुठली जागा ताब्यात घ्यायची असेल किंवा स्लम एरियाची डेव्हलपमेंट करायची असेल सर्वांना एकच रामबाण उपाय आहे क्लस्टर डेव्हलपमेंट सहित डीसीआर रुल. ती कॉमन असता कामा नये. एमएमआर रिजनसाठी जे शासनाने केले आहेत. एक पेक्षा जास्त एफएसआर, मोकळया जागा किंवा जेथे कमी एफएसआर आहे तेथेच मेंन्शन करेल जेथे आधीच एफएसआर कमी झाले आहे तेथे त्याला ते गणित बसणार नाही म्हणुन आपल्याला उल्हासनगरसाठी काही कंसेशन काही लागतील, काही पार्किंग असतील, फ्रन्ट साईज मार्जिनचे नार्मस असतील सविस्तर रिर्पोट आम्ही गर्व्हमेंटला पाठविलेला आहे. तो मान्य करण्यासाठी आपण सर्वांनी एकजुट होवुन शासनाकडे त्याची मागणी आग्रहाने करणे आवश्यक आहे. कल्याण अंबरनाथचा रोड बाबत मागील वेळेस जी चर्चा झालेली आहे, दोन्ही बाजुने पाउल उचलले जात आहे त्याची माहिती पुढील वेळेस सर्वांना देता येईल.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>**महापौर महोदय, एक आवश्यक गोष्ट आपणासमोर ठेवतो शहरातील जनप्रतिनिधी येथे बसले आहेत, पत्रकार बसले आहेत. उल्हासनगर—५ येथे पोस्ट आफिसचे प्लान खाली करायचे होते, तेथे पोस्ट ऑफिस बनवायचे होती, तेथे जी घरे होते तेथे सनद नव्हती. फक्त त्याचे शिट नंबर होते व यु. नंबर होते. त्या सर्वांना ८८ वॉल, जमिन मालकी हक्क देण्यात आली, जर मालकी हक्क देण्यात येवु शकतो, साईट देवु शकतो, तर कल्याण अंबरनाथ रस्त्यावर कोटी रुपयांचे दुकाने बांधण्यात आलेली होती. त्यांना अल्टरनेट साईड दिल्यानंतर त्यांना हटविण्यात आले पाहिजे होते. संपुर्ण महाराष्ट्रासाठी आदेश आहे, कित्येकदा आपण पाहिले असाल की अन्य ठिकाणी जमिनी घेण्यात आली, त्याचा टीडीआर उल्हासनगरमध्ये आणला, तेथील टीडीआर जमिन हक्क येथील जमिन मालकीसाठी आणण्यांत आला. जर बाहेरच्या जमिनीचा हक्क येथे मिळतो, तर व्यापा—यांना का हक्क देण्यात आला नाही. का नाही त्यांच्या दुकान खाली करण्याआधी हक्क देण्यात आला. तर कृपया माहिती दयावी, कारण आम्ही व्यापारी आहोत, कोणा संस्थेचे सदस्य आहोत. त्यामुळे आम्हांस व्यापा—यांचे दु:ख जास्त लागते. त्यांचा जो हक्क आहे त्यास कसेही करुन, आधी सुध्दा चुक झालेली आहे, त्यात सुधारणा करुन आपण सुध्दा मोठे वयस्कर माणुस म्हणुन बसला आहात, आम्ही आयुक्त महोदयांबरोबर वेळोवेळी लढाई सुध्दा करत असतो. आयुक्त महोदय मी अशी विनंती करतो त्यांच्या सुविधासाठी की ख—या अर्थाने व्यापारी लोकांचा हक्क आहे, आपल्या हाताखाली, वेळेवर त्यांना हक्क दिला जावा. आज कालानी परिवाराची सुन येथे बसली आहे, श्रीमती ज्योती भाभींतर्फे त्यांनी सुध्दा येथे मत मांडले पाहिजे. महापौर व उप—महापौर महोदय हे सुध्दा मुख्यमंत्री महोदयांकडे जातात, आपणांस पुरावा देणार, ८८ वॉल ६ लोकांना मिळाले आहे. आपणांस पुरावा हवा असेल तर मी देणार येथिल उपविभागीय अधिका—यांनी सनद दिली होती. धन्यवाद।

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, सर्व सन्माननिय सदस्य, कल्याण अंबरनाथ रस्त्याबाबत आयुक्त साहेबांचा व सभागृहाचा रोल पॉझिटीव्ह आहे त्याप्रमाणे मला आशा आहे की त्याचा चांगला परिणाम निघेल. आमचे सन्माननिय सदस्य श्री. राजेंद्र चौधरी साहेबांचे मिस अंडरस्टॅण्डिंग आहे ते सुध्दा याच विषयावर झाले होते. श्री. चौधरी साहेब व्यापा—यांशी बोलण्यासाठी गेले होते. ते जर सभागृहातर्फे आयुक्त महोदय व चौधरी यांनी एकत्र बसुन चर्चा करावी, आयुक्त साहेब हे पॉझिटीव्ह आहेत व श्री.

चौधरी साहेब सुध्दा शहरवाशियांसाठी करत होते. जर ते कॉम्प्रोमाईज होईल तर आम्ही आयुक्त साहेबांना विनंती करतो, दोघांनी मोठे मन ठेवुन सोबत चर्चा करुन हे कार्य महापौर व उप–महापौर आपल्या दालनात करतील अशी मी सभागृहातर्फे विनंती करतो.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–**मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, कल्याण अंबरनाथ रस्त्याच्या आधारावर एक ५५ फुट रस्ता होता त्यास आम्ही १०० फुट करायचा निर्णय घेतला त्यावेळी आम्ही शिवसेना पक्षाच्या सत्तेत होतो व उप–महापौर महोदय सुध्दा सत्तेत होते, एकमताने हा निर्णय घेण्यात आला की शहराच्या रस्त्यास मोठे केले जाणार, परंतु त्यास मोठे करत करत आपली दुर्दशा अशी झाली की ना आम्हांस माया मिळाली ना, राम मिळाला.

**सदस्य श्री. अरुण आशान :–**श्री. प्रदिप आपण बरोबर चालत आहात, आता दोघांना जोडा, बरोबर जात आहात.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–**मा. महापौर महोदया, काही शब्दात विनोद निर्माण होत असतो, आस निर्माण होतो, मला आनंद आहे, माझ्या बोलण्याने सभागृहात हास्य निर्माण होते त्याने आपल्या धमण्यांमध्ये रक्त अजुन जोरात वाढणार. त्याने आपण निरोगी राहणार या विषयास गंभीरतेकडे नेवनु, जे आमचे कल्याण अंबरनाथबाबत स्वप्न होते ते संपुर्णपणे चुराचुर झाले, तर हा रस्ता सिमेंट क्रॉक्रिटचा बनुन चांगला चकाचक रस्ता झाला असता. त्यावेळी जे बाधीत झाले होते त्यांना त्यांचा हक्क मिळाला असता तर बाकी शहरवासी आमच्या समोर आले असते. ते म्हणाले असते की हा रस्ता मोठा करा आम्ही २० फुट, २५ फुट देण्यास तयार आहोत. परंतु त्याबद्दल्यात आम्हांस पर्यायी जागा दया. मी कोणावर दोषारोप नाही करत. जी नियती आपल्या उल्हासनगर शहरात भरुन आहे त्याकारणामुळे तो रस्ता अदयाप होवु शकला नाही. मी कित्येकदा म्हटले या शहराचा जो स्वभाव आहे, प्रत्येकाचा जो स्वभाव आहे तो दुर्गम आहे, कारण पश्चिम पाकिस्तानातुन जी लोक येथे आले होते, त्या शहराची सर्व जमिन रिकामी होती, जेथे जेथे लोक वसले तेथे वसले. ६५ वर्षापासुन त्या लोकांचा तेथे ताबा होता. शासनाने तर असे धोरण बनविले की ज्या २००५ च्या झोपडपट्टया आहेत त्यांना मानवीय हक्क मिळाला पाहिजे. एकतर्फे आपण धोरण देतो, प्रधानमंत्री मोदी यांचे स्वप्न आहे की २०२२ पर्यंत प्रत्येकास आपल्या हक्काचे घर मिळाले पाहिजे, परंतु आपण हक्काचे घर देण्याऐवजी ज्यांच्याकडे जे काही होते ते सुध्दा आपण हिरावुन घेतले आहे. भविष्यात कोणताही रस्ता आपण बनविण्याचा विचार करु तर कल्याण अंबरनाथ रस्ता आपल्या लक्षात असणार. प्रथम तर असे धोरण असले पाहिजे की जे विस्थापित झाले आहे त्यांना बसविले जावे. त्यानंतर नविन रस्ता बनविण्यात यावा. कारण की, लोकांसोबत बसुन आम्ही आयुक्त साहेबांना म्हटले होते, दोन माळे बनवुन शकतो, ८० टक्के लोकांनी त्याचा फायदा सुध्दा मिळविला. २० टक्के आर्थिक रुपाने नाही करु शकले, काही कारणामुळे झाले नाही त्यामुळे लोकांना कोर्टात जावे लागले. कोर्टात गेल्यानंतर काय झाले, आम्ही येथे निर्णय घेतला. आम्ही येथे प्रस्ताव पास केला की जेवढे काही येथे विस्थापीत लोक आहेत, या सर्वांना पर्यायी जागा देणार, परंतु या सभागृहात तर नाही झाले परंतु आपल्या महाराष्ट्र विधानपरिषदेचे मंत्री श्री. रणजीत पाटील यांनी म्हटले की, जे विस्थापीत झालेले लोक आहेत त्यांना पर्यायी जागा दिली जाईल परंतु काही कारणास्तव आपणांस काही वाटले, प्रशासनातर्फे दोन दोन संचिका करण्यात आल्या, एक ॲफिडेव्हीट फाईल केले की पर्यायी जागा दिली पाहिजे, दुसरे ॲफिडेव्हीट फाईल केले की पर्यायी जागा नाही देवु शकत. आपण ठराव केला आहे व तो शासनाकडे रद्द करण्यास पाठविला आहे. तर साहेब, हे दुहेरी बाजु न प्रशासनासाठी ना राजकारणासाठी बरोबर आहे. त्यासाठी ज्या जुन्या गोष्टी होत्या त्या गेल्या, त्या गेल्या व आज आपण ज्या सकारात्मक भुमिकेमध्ये आहात यास आपण बनवुन ठेवा व येणा–या ३० दिवसामध्ये पुर्ण कराल अशी आमची आशा आहे व भविष्यामध्ये आणखीन लोक पुढे येतील मोठ मोठे रस्ते बनतील परंतु आपण या सभागृहास शिकवीले, परंतु लोक मानणार नाही की एका बाजुने आम्हांस जागा दया व दुस–या बाजुस तोडा. हा प्रस्ताव ज्यांनी आणला ते धन्यवादास पात्र आहेत. टीडीआर दयायचा की नाही दयायचा, कोणास १० तर कोणास ४० असा दयायचा. येथे तर सर्व काही विकले जाते, टिअरगर्डर व झोपडे विकले जाते. ही जी उल्हासनगरची जमिन आहे त्याची मोठी किंमत आहे साहेब, आपण देवुन टाका. खरेदी करणारे आपोआप येतील, आपणांस माहितच नाही पडणार. तर आज मी धन्यवाद देतो ज्याने हा प्रस्ताव आणला व आयुक्त साहेबांना सुध्दा धन्यवाद देतो त्यांनी सकारात्मक धोरण आणले, त्यासाठी मी प्रफुल्लीत झालो, धन्यवाद।

**सदस्य श्री. प्रमोद टाले:–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आज हा रस्ता रुंदीकरणाचा जो प्रस्ताव आणला आहे त्यात उल्हासनगर शहरात बाधित होणारे दुकाने व घरे यामध्ये एक महत्वाचा रस्ता म्हणजे कल्याण अंबरनाथ रस्ता संपुर्ण शहरामध्ये आज एवढी वस्ती वाढली आहे त्यामुळे लोकांना रस्ते कमी पडायला लागले

त्यामुळे रस्ते वाढलेच पाहिजे, परंतु रस्ता वाढत असतांना जे जे विस्थापीत होत आहेत, घरे, दुकाने असतील जसे श्री. प्रदिप म्हणाले पहिल्यांदा त्यांना घर दया, पर्यायी जागा दया, मग तोडा हे होत असतांना सर्वात महत्वाचा रस्ता कल्याण अंबरनाथ रस्ता त्यात ज्या अमानुषतेने ज्या लोकांना विस्थापीत केले, कदाचित कायदयाच्या कसोटीत तुम्ही बरोबर असाल, ज्यांचे आतोनात नुकसान झाले त्यांना व्यवस्था करुन दिली असती तर आज हा कल्याण अंबरनाथचा रस्ता पुर्ण झाला असता, संपुर्ण शहरामध्ये श्री. प्रदिपजी, जेव्हा जेव्हा रस्ते बनतील, रुंदीकरण करतील तेव्हा तेव्हा विस्थापीतांना जागा दिली पाहिजे अशी आमची मागणी आहे, असे होत असतांना, कल्याण अंबरनाथ रस्त्याबाबत कोणास न्याय मिळाला तर कोणावर अन्याय झाला. कोणाचे चार–चार, पाच–पाच माळे बांधले गेले, काहींचे नसतांनाही तुटले. उदाहरण देतो, शिवाजी चौकात सम्राट हॉटेल, जेथे उल्हासनगरची सुरुवात आहे, आमच्या बालपणाची सुरुवात आहे तेथे, कॉलेजला असतांना तेथे आम्ही २५ पैश्यामध्ये वडापाव खाल्ला, जे एवढया वर्षापासुन आहे ते जर तुटले तर तो ते बनवितो आणि मग परत तोडण्यात येते, जेव्हा तेथे आमचे श्री. चौधरी साहेब तेथे गेले तेव्हा त्यांच्याकडे १० ड वर कारवाई सुध्दा झाली. आयुक्त महोदय, आताच थोडयावेळा पुर्वी तुम्ही म्हणालात की केबी रस्त्याचा जी समस्या झाली आहे तर त्या व्यापा–यांना बसवुन हा केबी रस्ता तुम्ही पुर्णपणे बनविणार असणार तर आमची अशी मागणी आहे की ज्या ज्या लोकांची पर्यायी व्यवस्था अजुनही केलेली नसेल तर त्यां लोकांना पर्यायी व्यवस्था करुन देण्यात यावी व आमचे नगरसेवक श्री. चौधरी यांच्यावर जी १० ड ची कारवाई झाली ती मागे घेण्यात यावी. धन्यवाद।

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**आपले उपमहापौर श्री. जीवन इदनानी हे धन्यवादास पात्र आहे त्यांनी हा कल्याण अंबरनाथ रस्त्याचा प्रस्ताव आणला. पहिले आपण ९९ मध्ये ३३ रस्त्याचा विकास केला त्या विकासात आयुक्त श्री. आर. डी. शिंदे आले व नंतर श्री. चंद्रशेखर आयुक्त आले त्यावेळी सुध्दा आपण रस्ता रुंदीकरण केले त्यावेळी ज्यांची घरे व दुकाने गेली त्यांना त्वरीत पर्यायी जागा दिली. व आम्ही ज्यांचे अर्धे कटींग गेले त्यांना सुध्दा दिले व अशी पॉलिसी केली की १ + ४ बनविले पाहिजे अशी पॉलिसी कित्येक वर्षापासुन केली, लोक बनवायचे व लोकांमध्ये विश्वास होता. लोक स्वत: येत होते की रस्ता रुंदीकरण केला पाहिजे व आम्हांस पर्यायी जागा दिली पाहिजे. उल्हासनगरमध्ये बरेचसे लोक आहेत त्यास मालकी हक्क नाही परंतु ५० वर्षापासुन येथे वसले आहेत. ज्यावेळी यु.नंबरवर सुध्दा प्लान पास व्हायचे. आता विषय येतो कल्याण अंबरनाथ रस्त्याचा तर तेथे सुध्दा फार मोठी कटींग झाली ४० फुटाची कटिंग २२,२२ फुट दोन्ही बाजुने जेव्हा झाली तेव्हा लोकांना विश्वास होता की ३३ रस्त्याच्यावेळी जसे ग्राउंड + ४ बनविण्यास परवानगी दिली, विधानपरिषदेत जशी चर्चा झाली ग्राउंड + २ बनविण्यास मिळाले, तशी आता मिळणार असा लोकांना विश्वास होता परंतु ती पर्यायी जागा देण्यास आपण असमर्थ झालो. मा. आयुक्त महोदय, या रस्त्यावर ब–याचशा लोकांनी विकास केला, जसे आता ब–याच सदस्यांनी सांगितले की काही लोक विकासापासुन वंचित होते, आपले दुकान किंवा घर त्या रस्त्यावर बनवु शकले नाहीत. त्यांना माहित होते की आज आमचे रोड वायडिंगमध्ये घर व दुकाने गेली आहेत, तर आज ना उदया आम्हांस बनविण्यास मिळेल. तर त्यावेळी आपण जेव्हा येथे आलात आपण कागदपत्र पाहिलेत आम्हांला अशी आशा होती की आपण त्यांना एक दोन महिन्यात बनविण्यासाठी दयाल, परंतु दुर्भाग्याने ती दुकाने आपण आल्यानंतर वर्षापासुन तश्याच स्थितीत पडुन आहेत. काही स्लॅब पडुन आहेत, कोणी फुटींग सुध्दा टाकली नाही, कोणी काम सुध्दा सुरु केले नाही. दुकानदार आपल्या विश्वासावर आज सुध्दा उभे आहेत. आम्हांस आयुक्त साहेब म्हणतील आपण ग्राउंड प्लस दोन बनवा तसेच इंदिरा गांधी मार्केटचा सुध्दा सहारा दिला होता तो सुध्दा जवळ जवळ संपृष्टात आला. काही लोक कोर्टात गेले तर त्यातल दोन तीन लोकांना आपण अल्टरनेट साईट दिले. सभागृहाला याबाबत दु:ख झाले कारण आपणाकडुन कोठे ना कोठे चुक झाली आहे असे माझे म्हणणे आहे. सन्माननिय सदस्य हे मी जेव्हापासुन ९७ पासुन निवडून आलो तेव्हापासुन ते सोबती बनुन राहिले आहेत. ना त्यांच्यामध्ये मी जातीविषय किंवा धर्माविषय भेद पाहिला आहे. या शहरातील व्यापारी भलेही तो कोणत्याही जातीचा असो तो दु:खी होतो, पिडीत होतो, कोणत्या ना कोणत्या पक्षाच्या नेत्यास, किवा नगरसेवकास किंवा नेता किंवा राजकीय नेत्यास नक्कीच बोलावितो. अशा वेळी जेव्हा आम्ही कित्येकदा बोललो की ग्राउंड प्लस दोन बनविणार व एक अशी जागा जेथे ५० वर्षापुर्वीपासुन हॉटेल बनविले होते, ते संपुर्ण हॉटेल रस्ता रुंदीकरणात २२ फुट गेले. अशा स्थानी फारच खेदाने म्हणावे लागते की तो व्यापारी असो किवा कोणत्याही जाती धर्माचा असो तो काही शिवसेनाचा नसेल किंवा कोणत्या पक्षाचा त्यावर मोहर नसेल, तो एक व्यापारी आहे जर शिवसेना सदस्य तेथे जातो, तर आयुक्त महोदयांनी एवढी घाई करता कामा नये. ही चुक आपणाकडुन झाली आहे. तर मी म्हणतो आमचे उप–महापौर, सन्माननिय विपक्ष सदस्य यांनी व आम्ही बसुन चर्चा केली पाहिजे. होवु शकते श्री. चौधरी यांच्याकडुन घाई गडबडी झाली असु शकते, राजकिय पक्षाशी जोडलेले पक्ष

आहेत लेकांनी बोलाविल्यावर आपणांस जावे लागते. कोठे ना कोठे आम्हांला जावे लागते. तर आपण एक समजदार आयुक्त आहात, बरेचसे चांगले कार्य आपण या शहरासाठी केले आहे, तर आपण यावर काहीतरी उपाय कराल. शहरात ब—याच ठिकाणी रोड वायडिंग होते तेव्हा कुठे घर देणार, कुठे दुकान देणार, ग्राउंड प्लस दोन देणार की ग्राउंड प्लस एक देणार हे धोरण ठरविले पाहिजे. हे झाल्यानंतर रस्त्यावरील, शहरातील बरेचसे लोक महापालिकेत येतील. व म्हणतील रस्ता रुंदीकरण करा. शहरातील दोन समस्या आहेत जसे एक कच—याची याबाबत मी आपले धन्यवाद देतो त्याबाबत आपण चांगले कार्य केले त्याचे श्रेय मी आपणांस देतो. याचप्रकारे ट्रफिकवर सुध्दा होणार त्यासाठी धोरणस ठरविले पाहिजे. तसेच हा जो प्रस्ताव श्री. इदनानी साहेबांनी दिला आहे त्यास सर्वसंमतीने पारीत करावा. जर शहरास चांगली पॉलिसी बनणार चांगले धोरण ठरविणार तर शहरातील रस्ते बनतील. कितीतरी लोक कल्याण अंबरनाथ रस्त्याबाबत खास करुन वाट पाहत बसले आहेत, ग्राउंड प्लस १ सुध्दा बनविण्याी संधी मिळणार सर्व शहर आपणांस धन्यवाद देईल.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आयुक्त साहेब मी सुध्दा धन्यवाद देतो की हा जो प्रस्ताव आणला आहे, साईपक्ष आरपीआय सर्व या शहराशी निगडीत आहे, श्री. टाले साहेब, कॉग्रेस पक्ष यांनी सुध्दा अगोदर या विषयावर चर्चा केली आहे, तर पुन्हा माझा तोच प्रश्न की अशासकीय प्रस्ताव येवुन पुन्हा तो शासनास पाठवावे लागेल. त्याची अंमलबजावणी लगेच होणार नाही, मला वाटते महापौरांकडे मध्यंतरी बैठक झाली. महापौरांनी बैठक बोलाविली होती त्याठिकाणी शहरातील सर्व आर्किटेक्ट होते. सभागृहनेता आपण होते व वरिष्ठ नगरसेवक रामचंदानी होते त्याठिकाणी एमएमआरपेक्षा उल्हासनगरला डीसी रुल वेगळे असावे. कारण येथे रिफ्युजी कॅम्प आहे, पुनर्वसित झालेल्या लोकांचे पुनर्वसन लवकर होण्यासाठी एक वेगळेम डीसी रुल असले पाहिजे मला वाटते त्यामध्ये प्रस्तावति केले तेही योग्य होईल. याला दुमत कोणाचेही नाही. हा जो प्रस्ताव आलेला आहे अशासकिय प्रस्ताव कारण यापुर्वी आम्ही अनेक अशासकिय प्रस्ताााव पाठविले. शासनाने एकही मान्य केलेले नाही कारण झोपडपट्टीचे १८ फुट किंवा बॅरेकचे १८ फुट केले, असे प्रस्ताव केले. डीपीचे विषय जे मॉडिफिकेशन केले ते गेल्या १० वर्षापासुन असेच पडुन आहेत. डीसी रुल बनवितांना मला वाटते तुम्ही १५ दिवसाची मुदत दिली होती त्यांना. १५ दिवसात एकत्र डिसी रुल मंजुर करा आमचा डीपीला विरोध तोच होता. डीपीला शिवसेनेमार्फत विरोध करणे याचे कारण म्हणजे डीपी आला परंतु त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी डीसी रुल नव्हते. २०१३ ला डीसी रुल मंजुर करतांना जे क्लस्टर डेवलपमेंट असेल, आम्ही बारीक बारीक छोटयातील छोटया व मोठयातील मोठया गोष्टीचा विचार केला होता. नुसतेच कागदावर रेघोटया व रंगरंगोटया मारुन उपयोग नाही म्हणुन आम्ही डीसी रुल रद्द केला होता. तेव्हा लक्षात आले नाही व तेव्हा सांगितले की फेब्रुवारीमध्ये डीसी रुल येणार, काय डीसी रुल येणार हे माहित नाही आम्हांला घाई झाली होती डीसी रुल मंजुर करायचा. आणि मग संपुर्ण शहरामध्ये त्याची बोंबाबोंब झाली, आता सुध्दा कल्याण अंबरनाथ रस्त्यामध्ये बाधित झालेल्या लोकांचाच विचार करुन अशासकिय प्रस्ताव बनवितो तर सर्वांकष प्रस्ताव कधी बनविणार आहोत. शहरात पुर्नवसन करायचे लोकांचे काय करायचे. यामध्ये अगोदर सुध्दा चर्चा झाली लोकांचे पुनर्वसनासाठी चर्चा झाली, त्यांना पर्यायी जागा देण्यासाठी अशासकिय प्रस्ताव झाले, प्रशासनाने प्रस्ताव आणले त्यावर चर्चा झाली. पण निष्पन्न काहीच नाही पुन्हा या प्रस्तावाचे तसेच होणार आहे. हा सेक्युलर अलायन्सने आणला त्यांना क्रेडीटसाठी, श्री. जीवनभाऊ क्रेडीट तर नाही, येथे सेक्युलर अलायन्सला विनंती करण्याची गरज नाही. सभागृहाचे मत तेच आहे. येथे विनंतीची गरज नाही तुम्ही गोषवा—यातुन ते शब्द काढा. सेक्युलर अलायन्सने विनंती केली असे होता कामा नये. मी आधीच सांगितले आम्हांला क्रेडीट नको. आम्हांला विनंतीची गरज नाही.

**उप—महापौरः—**अनुमोदनसाठी आपण सुध्दा सदस्य म्हणुन नाव देवु शकता.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**पहिली गोष्ट अशासकिय प्रस्ताव लवकर होईल किंवा आम्ही शहरासाठी जे डीसी रुल करणार ते लवकर होईल, नाहीतर हा प्रस्ताव पडुन राहिल व नंतर त्यामध्ये आमचे डीसी रुल येतील असे माझे मत आहे. अशासकिय प्रस्ताव जेवढे आम्ही केले तेवढे एकही मंजुर होवुन आलेले नाही. हा पुर्व इतिहास आहे आणि त्यानुसारच आम्ही वाटचाल करतो. त्यामुळे शहराच्या फायदयासाठी जे असेल तर महापौर महोदया ते मुख्य आहे, डीसी रुल एकत्रित त्यामध्ये आपण हे अंतर्भुत करतो तर ते चांगले होईल असे माझे म्हणणे आहे कारण आता एमएमआररुल मंजुर करणार आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**जर हा ठराव होत आहे तर त्यामध्ये सप्लीमेंटरी टाकण्यासाठी सांगु ना.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**त्या ठरावात मुख्य म्हणजे, जे डीसीरुल टाकण्याचे जे चालले आहे ते त्यामध्ये अंतर्भुत करा यास संमती आहे. फक्त बेकायदेशीर होता कामा नये, माझेही तेच मत आहे. फक्त या विषयावर १० ड ची कारवाई झाली होती. संर्घषातुन प्रगती होत नाही व व्यक्ती असा मागे जातो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मा. महापौर व मा. सदस्य, आता धोरण व पॉलिसीवर जी चर्चा केली मी न बोलल्यामुळे आपण दोघे तिघांनी जी चर्चा केली. माझी कुणाशीही जाती दुश्मनी नाही जे झाले ते यांचे प्रसंग होते. जर मी ॲक्शन नाही घेतली असती व फक्त प्रभाग अधिका—यांवर ॲक्शन करु तर मी माझ्या जबाबदारीत पुर्णपणे उतरलो नाही. मी एज अ फ्रेंडली करुन बोलत आहे. कोर्टात तर केस चालु आहे. जेव्हा हा प्रकार झाला तर एकदम चुकीच्या पध्दतीने लिडरशिप घेवुन माझ्या दालनात माझ्या सबर्नोटला शिव्या देवुन हे चुकीचे झाले. व माझ्याबाबत ब—याच गोष्टी झाल्या. मला कोणी प्रोटेक्ट करणारे असो किंवा न असो. जेव्हा मला त्यांनी नोटिस दिली त्यावेळी ते हेअरींगसाठी आले होते. श्री. नाना बागुल साक्षीदार आहेत, बरेचसे साक्षीदार आहेत व तुम्ही सुध्दा साक्षीदार आहेत. मी हे म्हटले होते की जी घटना झाली ती अतिशय गंभीर होती, कायदा यासाठी बनविला आहे की, नगरसेवक आपल्या पदाचा उपयोग करुन प्रशासनाची जी कठोर कारवाई आहे त्याचा उपयोग करुन त्यात अडचण आणता कामा नये. त्यांना नोटिस देणे आवश्यक होते. हे सर्व झाल्यानंतर आपण पाहिले असाल की संपुर्ण एक महिनाभर प्रशासनास इलिगल बांधकामाबाबत बदनाम केले जात होते. त्यात मला वैयक्तिकपणे सामावुन घेवुन वॉट्सअपवर बातम्या येत होत्या की आयुक्त आता पुर्वी सारखे राहिले नाहीत, कोणास मिळाले आहेत. तर हा संदेश देणे आवश्यक होता ईलिगल कंन्स्ट्रक्शनाबाबत प्रशासनाचे थोडे लक्ष चुकले, यात पुर्ण सक्षमता आहे आणि आमची ऑनेस्टी आहे. हे संपुर्ण शहरास जाणणे आवश्यक होते त्यामुळे आम्ही अनाधिकृत बांधकाम तोडले व हा प्रकार घडला, त्यानंतर आपण लिखीत दया की, माझ्याकडुन चुक झाली, पुढे असे होणार नाही याकडे लक्ष देईल. माझ्याकडे बरेचसे लोक आले, हया गोष्टीस वाढवु नका. पालकमंत्री महोदय माझ्याशी बोलले, मी सुध्दा त्यांना सांगितले की, मी भांडण वाढविण्यासाठी येथे आलो नाही, मला कोणाशी व्यक्तीगत मतभेद नाही, परंतु आपण सहा महिन्यापासुन पाहिले असाल, मी फक्त एक प्रकार सांगत आहे, दुसरा प्रकार सांगितला नाही, मला कोणाची सहानुभुती नको, कायदेशीर लढाई आहे. मी सांगितले कायदा कोठे पुर्ण होतो, कोठे अत्याचार होतो, कोठे शिवीगाळ होते, शब्दाने कोणी माझ्यावर अत्याचार करतात. आपण माझ्याकडुन आयुक्त म्हणुन अपेक्षा करतात हे काम करा, ते काम करा, असे झाले आहे की कोणा खेळाडुला मैदानात उतरवा आणि त्यास सांगतात की त्याचा प्रथम क्रमांक आला पाहिजे. त्यास उत्साहित करण्याऐवजी त्याच्याकडुनच अलोचना आपण करतो, त्याच्या विरुध्द घाणेरडे पत्र आपण पाठवितो. कोठे ना कोठे प्रशासनास व आयुक्तांना रिकामे करण्याचा प्रयत्न आहे. आपण कोणास कमकुवत करुन नाही बोलु शकत.

**सदस्य श्री. किशोर वनवारी :—**साहेब, हे सभागृह ते सुध्दा समझोता करुन घेईल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**माझा वैयक्तिकपणे कोणासही बोलत नाही.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**मा. महापौर महोदया, मी बोलतो, स्वच्छ भारत संदर्भात माझ्या प्रभागामध्ये जे पोस्टर छापलेले आहेत, त्याची पुर्व परवानगी घेतलेली नाही, माझ्या मिसेसची पुर्व परवानगी घेतलेली नाही. त्या संदर्भात आयुक्तांवर जातीय गुन्हा दाखल केला असतांना मी माझ्या प्रभागात पोस्टर वाटु शकत नाही म्हणुन मी पोस्टर येथे आणलेले आहे. त्याचा विल्हेवाट तुम्ही लावावा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**तर माझे असे म्हणणे आहे की माझी कोणाची जाती दुश्मनी नाही.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**मा. महापौरजी, विषय क्र. ४ मध्ये जे २६ पासुन कनिष्ठ अभियंता येतात, साहेबांनी स्पष्ट केले ते १६ आहेत तर यासाठी तेथे १६ व एकुण ६९ च्या जागेवर आले पाहिजे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**महोदया, त्याचा ठराव वाचुन दाखविता ना.

**महापालिका सचिव:—**मा. महापौरांची परवानगी असेल तर ठराव वाचुन दाखविते यामध्ये काही भाग प्रस्तावात येईल व काही भाग ठरावात येईल. यात काही अडचणी आहे, मी दोन मिनिटे वाचुन दाखविते. आपण सर्वांना माहित आहे की, साई पक्षाचा भाग वगळला.

यावेळी संपुर्ण ठराव वाचुन दाखविला.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>**१० ड ठरावात कसे येईल? श्री. चौधरी साहेब ते ठरावात कसे येणार?

**<u>सदस्य श्री. अरुण आशान :—</u>**महापौर महोदया, आयुक्त साहेब, तुम्ही डीसी रुल करता तर मग नियमावली बनणार आहे त्याकरीता हा येणारा अशासकिय प्रस्ताव आहे असे म्हणायचे आहे आयुक्त साहेब? जी नियमावली आहे

**<u>महापालिका सचिव :—</u>**नाही, अजुन दुसरा सुध्दा निर्णय तुम्हांला घ्यायचा आहे.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान :—</u>**अशासकिय प्रस्तावाची सूचना अंमलबजावणीसाठी आहे?

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**या प्रस्तावावर प्रशासन पुर्णपणे धोरण बनवुन महासभेपुढे ठेवेल त्यास शासनाची मान्यता लागली तर शासनाकडे पाठवु.

**<u>सदस्य श्री. अरॅुण आशान :—</u>**म्हणजे नव्याने हा प्रस्ताव महासभेपुढे येईल.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापालिका सचिव :—</u>**पास.

**<u>उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १६ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>**

उल्हासनगर शहरातील रस्त्यांच्या रुंदीकरणात बाधीत होणारे दुकाने/घरे या विषयावर चर्चा करणेबाबतचा उपमहापौर /पालिका सदस्य श्री.जीवन इदनानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयांन्वये अशासकिय प्रस्तावाद्ववारे लक्ष वेधु इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दितील रस्त्ये जसे उल्हासनगर—५ येथील शिवमंदिर ते उल्हासनगर—१ कडे येणारा रस्ता, शहाड ते म्हारळगांवकडे जाणारा रस्ता असे अनेक रस्त्यांचे रुंदी करणाचे काम होणार असल्याने त्यामध्ये अनेक दुकाने व घरे बाधीत होत आहे.

त्यामुळे उल्हासनगर शहरातील नागरिकांना फार मोठया प्रमाणात नुकसान सोसावे लागणार आहे. ज्या नागरिकांचे दुकाने व घराचे नुकसान होणार असल्याने, त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रस्तावित.

उल्हासनगर शहर हे पाकीस्तानातून निर्वासीत झालेल्या व्यक्तीची वसाहत आहे, फाळनीनंतर सैनिकांसाठी असलेले कॅम्प पाकिस्तानातून निर्वासीत झालेल्यांना आश्रय देण्यासाठी उघडण्यात आले. आमचे आजोबा—पंजोबांनी या आश्रयस्थानात रस्त्याच्या दोन्ही बाजूस लहान मोठी दुकाने बांधून आपल्या उदरनिर्वाहासाठी छोटे मोठे व्यवसाय सुरु केले दरम्यानच्या काळात व शहर विकसित होत असतांना या आश्रययातील दुकानांनी पक्क्या दुकानांचे स्वरुप धारण केले.

सन—१९६५ मध्ये केंद्र सरकारने या सैनिक छावणीचे शहर वसाहतीत रुपातर करण्याचा निर्णय घेतला व शहर विकास आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु झाली.

केंद्र सरकारने आपल्या दि. ११ मे, १९६५ च्या आदेशाने येथील रहिवाश्यांना खात्री दिली की, शहर विकास आराखडा तयार झाल्यानंतर कोणीही व्यक्ती शहर विकास आराखडयामध्ये बाधीत होणार नाही. ते आपल्या व्यवसायाचे मालक होतील आणि जे कोणी विकास आराखडयातील रस्त्या रुंदीकरणात व आरक्षणात बाधीत होतील त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन दिली जाईल. याच कारणास्तव अतिशय व्यापक प्रमाणात

जमीनीचे सर्वेक्षण करण्याचा आदेश देण्यात आला होता. जमिनीचे सर्वेक्षणात शासकीय जमिनीवर असलेल्या व्यवसायांची यु नंबर अन्वये नोंद घेण्यात आली. आणि जर ते प्रस्तावित विकास आराखडयात बाधीत होत नसतील तर त्यांना मालकी हक्क देण्यात येईल. व जर रस्ता रुंदीकरणात होत असतील तर त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन दिली जाईल.

कल्याण—अंबरनाथ रस्ता रुंदीकरणाच्या प्रकरणात उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाने शासन मंजुरीची वाट न पाहता. या रस्त्यावर १०० फुट रुंदी प्रमाणे सिमांकन (मार्कींग) करुन दि.०४/१२/२०१५ पासून दुकानांचे निष्कासन सुरु केले. ही कार्यवाही अतिशय जुलमी व बेकायदेशीर होती, या रस्ता रुंदीकरणात जवळजवळ ८५० दुकाने बाधीत झाल्याचे अभिलेख्यांवरुन दिसून येते. सद्या अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या दोन्ही बाजुस २५ फुटापर्यंत सिमांकन (मार्कींग) करण्यात आले. त्यामुळे बरीचशी दुकाने तुटल्याने व्यापा—याकडे दुकानाची अतिशय कमी जागा राहिली असून, व्यवसायासाठी ती पुरेशी नाही. जवळजवळ २५० दुकाने पुर्णता निष्कासीत करण्यात आली आहेत. त्यांच्याकडे उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन **(स्त्रोत)** राहिले नाही. तसेच असेही निर्देशनास आले आहे की, यातील बहुतांश व्यापाऱ्यांकडे जमिनीचा मालकी हक्क आहे. जो भारताचे मा.राष्टपती महोदय यांचेकडून सनदेचा स्वरुपात देण्यात आला आहे. त्यानंतरही बऱ्याचश्या व्यापा—यांनी पुढे येवून रस्ता रुंदीकरण करणेकामी आपली दुकाने निष्कासित करण्यासाठी महानगरपालिकेस सहकार्य दिले, परंतु महानगरपालिकेने केलेले चुकीचे सिमांकन (मार्कींग) व या कामासाठीच्या पुर्व नियोजनाच्या अभावामुळे काही दुकानदारांची दुकाने अत्यंत क्रुर व निर्देयपणे निष्कासित करण्यात आली ब—याचश्या प्रकारणात असे दिसून येते की, सिमांकना (मार्कींग) पेक्षा जास्त निष्कासन झाले आहे त्यामुळे कारण नसताना करोडो रुपयाचेनुकसान झाले आहे. काही प्रकरणात लाखो रुपये किंमतीच्या वस्तीची मोडतोड झाली, विध्वंस झाला कारण त्यांना वस्तु बाहेर काढण्यासाठी पुरेशी वेळ दिली नाही. काही प्रकरणात तर वस्तु चोरीस गेल्या, कारण सर्वच व्यापाऱ्यांना आपल्या वस्तुंची हालवा—हलव करुन सुरक्षित ठिकाणी साठवणूक करण्यासाठी जागेची व्यवस्था करता आली नाही. निर्दयी निष्कासनापासून वाचविण्यासाठी दुकानदारांनी लाखो रुपये खर्च करुन न्यायालयाकडून स्थगिती आदेश मिळविला आहे. या खटल्यासाठी फीच्या रुपाने लाखो रुपये खर्च केले. निष्कासनाच्या कार्यवाहीने आमच्या दुकानदारांना फाळणीपूर्व काळात नेवून ठेवले आहे. निरापराधी दुकानदारांनी स्वत:ची दुकाने तोडण्यासाठी केलेल्या सहकार्याचे त्यागाचे सर्वचजण कौतूक करत आहेत. आपण सर्वांनी खात्री केली पाहिजे की, दुकानदारावर व रहिवाश्यांवर जो अन्याय झालेला आहे. त्याची पुन्हा पुनरावृत्ती होता कामा नये.

जे दुकानदार आपल्या सद्वर्तनाने गेल्या ५० वर्षापासून व्यवसाय करत आहेत. त्यांना भाडेकरु व इतर कायदयानुसार सरंक्षण मिळाले आहे. रस्ता रुंदीकरणामध्ये त्यांना ज्या जागा देवू केल्या आहेत त्यांचे बाजार भावानुसार नुकसान भरपाई मिळण्यास ते पात्र ठरले आहेत.

निर्वासित व्यक्ती (नुकसान भरपाई व पुर्नवसन) कायदा—१९५४ जो स्थलांतरीत लोकांच्या पुर्नवसनासाठी तयार करण्यात आला आहे. त्यातील तरतुदीनुसार दुकानदारांना सरंक्षण प्राप्त झाले आहे.

उल्हासनगर शहरामधील अनधिकृत बांधकामे नियमाधिन करण्याचा एक विशेष कायदा महाराष्ट्र शासनाने सन—२००५ मध्ये लागू केला आहे. त्या कायदयाने दुकानदारांना सरंक्षण प्राप्त होत आहे.

३१ डिसेंबर,२०१५ पर्यंत तयार झालेली बांधकामे नियमाधीन करण्याचा दुसरा एक कायदा नुकताच तयार करण्यात आला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार गरिब व बेघर लोकांना निवारा पुरविणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे.

प्रकल्प बाधीत व्यक्ती म्हणून रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेल्या व्यक्तींना नुकसान भरपाई देण्याचे धोरण बृहन्मुंबई महानगरपालिकेने ३५ ते ४० वर्षापासून चालू ठेवले आहे.

ठाणे महानगरपालिकेने सुध्दा पुर्नवसनाबाबतचे असेच धोरण स्विकारले आहे. त्यामुळे आपण हे मान्य केले पाहिजे की, ज्या दुकानदारांच्या दुकानांचे निष्कासन झाले होते. त्यांनी दुकानांचे पुर्नबांधकाम, नुतनीकरण व फर्निचर इत्यादींवर करोडो रुपये खर्च करावे लागते. त्याच बरोबर रस्ता रुंदीकरणाचा काळात किमान २/३ वर्ष त्यांच्या

व्यवसायाचे नुकसान सोचावे लागते. त्यांना आपले घर व इतर मुल्यवान वस्तु गहाण ठेवून विविध ठिकाणाहून लाखो रुपयांचे कर्ज काढावे लागते व व्याजाच्या रुपाने लाखो रुपये वर्षानुवर्ष भरावे लागते. तसेच वस्तु उधारीवर विकल्यामूळे व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आपणा सर्वांना माहित आहेच की, उल्हासनगरच्या बाजार पेठेमधील दुकानांचे भाव प्रति फुटाला ३०,०००/— ते ४०,०००/— रुपये असा आहे. त्यामुळे यथायोग्य भरपाई मिळण्यास ते पात्र आहेत.

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमाचे कलम १२६ मध्ये अशा प्रकारच्या भुसंपादन प्रकरणामध्ये पुरेशा प्रमाणात नुकसान भरपाई देण्याची तरतूद आहे. नवीन भुसंपादन अधिनियमातील तरतूदीनुसार बाजार भावानुसार नुकसान भरपाई मिळण्यास दुकानदार पात्र आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयानेही अशा प्रकारच्या कित्येक दाव्यांमध्ये पुरेशी नुकसान भरपाई देण्याचा निर्णय दिलेला आहे.

निष्कसनामध्ये बाधीत झालेल्यांचे पुनर्वसन करणेबाबत उल्हासनगर महानगरपालिकेने ठराव पारित केला आहे., परंतु महापालिका प्रशासनाने निवडून आलेल्या जनप्रतिनिधींना विश्वासात न घेता तो ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम—४५१ मधील तरतूदीनुसार विखंडीत करण्यासाठी शासनाकडे पाठविला आहे.

तरी रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेल्या दुकानदारांचा खालावलेला आर्थिकस्तर पुन्हा लवकरात लवकर त्यांना प्राप्त करु देण्यासाठी आपण मदत केली पाहिजे व त्यासाठी शिघ्रकृती केली पाहिजे. त्यासाठी प्रयत्नांचा वेग वाढविला पाहिजे. प्रस्तावाला शक्ती प्रदान करण्यासाठी आपल्या मौलिक सुचना कराव्यात व प्रस्ताव मान्य करावा.

**<u>महासभा ठराव क्र:</u> ७३** **<u>दिनांक:— ५/३/२०१८</u>**

सुचकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

श्रीमती दिप्ती दुधानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सभेत झालेल्या चर्चेअंती उल्हासनगर शहरातील रस्त्यांच्या रुंदीकरणात बाधीत होणारे दुकाने/घरे यांचे पुनर्वसन करण्यासाठी बाधीत झालेल्या दुकानदारांना, रहिवाश्यांना महानगरपालिकेत निवडून आलेले जनप्रतिनिधी मदतीचा हात देण्यासाठी, पुर्नवसनाचे योग्य ते धोरण ठरवतील. बाधीत झालेल्या दुकानदार व रहिवाश्यांचे पुर्नवसन करणेसाठी खालीलप्रमाणे मान्यता देत आहे.

**अ) <u>शिल्लक जागेवर जे दुकानदार बांधकाम करु इच्छितात त्यांच्यासाठी:</u>**

१) दुकानदार, ज्यांना असे वाटते की, शिल्लक राहिलेली जागा व्यवसाय करण्यासाठी पुरेशी आहे किंवा दुकानदार ज्यांच्याकडे त्यांच्या दुकानाच्या मागे जागा आहे. त्यांना तेथे बांधकाम करण्यास परवानगी दिली जावी.

२) जर सद्या अस्थित्वात असलेली बांधकामाची उंची १५ मिटर पेक्षा कमी असेल तर कमीत कमी १५ मिटर उंचीपर्यंत बांधकाम करण्यास परवानगी दिली जावी, म्हणजे अंदाजे तळमजला. ४ मजले असे बांधकाम करता येईल.

३) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम व महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियमामधील तरतूदीनुसार दुकानदारांवर कोणत्याही प्रकारची दंड किंवा कायदेशीर कारवाई करण्यात येवू नये.

४) दुकानाचे निष्कासन केल्यापासून पुर्नबांधकामापर्यंतच्या कालावधीचे पाणी बिल व मालमत्ताकर देयक पुर्णपणे माफ करण्यात यावे. जर ते अगोदर अदा केले असेल तर लगतच्या वर्षासाठी समायोजित करण्यात यावे.

५) अंशत: किंवा पूर्ण पुर्नबांधकामानंतर एक समान व अस्तित्वात असलेला कमीत कमी मालमत्ता कर दर आकारला जावा जो सन–१९८६–८७ मध्ये प्रचलित होता. तो खालील प्रमाणे आकारण्यात यावा.

| अ.क्र. | बांधकामाचा प्रकार | निवासी | अनिवासी |
|---|---|---|---|
| | | दर प्रति चौ.फुट प्रती महिना करपात्र मुल्य निर्धारित करण्यासाठी | |
| १ | आरसीसी छत असलेली बांधकाम संरचना | ०.२० | ०.३० |
| २ | टिअरगर्डर छत असलेली बांधकाम संरचना | ०.१२ | ०.१८ |
| ३ | एसीसी छत असलेली बांधकाम संरचना | ०.०९ | ०.१४ |
| ४ | लाकडी छत असलेली बांधकाम संरचना | ०.०७ | ०.११ |
| ५ | मातीचे छत असलेली बांधकाम संरचना | ०.०५ | ०.०८ |
| ६ | मोकळी जागा | ०.००५ | ०.००७५ |

**ब) <u>ज्या दुकानदारांचे पुर्ण दुकान निष्कासित झाले आहे त्यांचेसाठी</u>:**

१) महानगरपालिकेने ठरविल्याप्रमाणे पर्यायी जागा दिली जावी. त्यांना वाणिज्य (मार्केट) वास्तुमध्ये पर्यायी जागा देवून नाममात्र एक रुपया किंमतीप्रमाणे करारनामा करावा.

**किंवा**

जर पर्यायी जागा उपलब्ध नसेल व दुकानदार तयार असेल तर टि.डी.आर.दिला जावा

२) टि.डी.आर.चा दर प्रति चौरस फुटास रुपये १०००/– असे गृहित धरुन टि.डी.आर. १:४० या गुणोत्तराप्रमाणे म्हणजे प्रत्येक एक चौरस फुटामागे ४० चौरस फुट अशी नुकसान भरपाई दिली जावी.

३) शहराच्या कोणात्याही भागात रहिवासी किंवा वाणिज्य वापरासाठी हा टि.डी.आर. वापरण्यास किंवा विक्री करण्यास दुकानदारांना परवानगी दिली जावी.

४) निष्कासन नोटिस किंवा मिळकत कर देयक किंवा मालकाने/भोगवटादाराने पुरविलेले पुरावे, फोटो, व्हीडिओ किंवा इतर विश्वसनिय कागदपत्रांचे आधारे टि.डी.आर.चे क्षेत्र ठरविले जावे.

५) दुकानदारांच्या जागेचे क्षेत्र कि जे उपलब्ध कागद पत्रानुसार जास्त आहे त्याचा नुकसान भरपाईसाठी विचार केला जावा.

६) पर्यायी जागा शक्यतो वाणिज्य वास्तुमध्ये देण्यात यावी. आणि जर ती उपलब्ध नसेल व रहिवाशी वास्तुमध्ये पर्यायी जागा घेण्यास दुकानादाराची इच्छा असेल तर रहिवाशी वास्तुमध्ये पर्यायी जागा देण्यात यावी.

७) पर्यायी जागेचे क्षेत्र दुकानदाराने त्याग केलेल्या जागेच्या क्षेत्रापेक्षा जास्त किंवा कमी असेल तर ज्या वर्षी बांधकाम निष्कासित करण्यात आले त्या वर्षीचे प्रचलित बाजार भाव दरानुसार फरकाची रक्कम वसूल किंवा अदा केली जावी.

८) वर नमूद केल्याप्रमाणेची पर्यायी जागा किंवा टि.डी.आर. महानगरपालिका उपलब्ध करुन देवू शकत नसेल तर रक्कम रुपये ४०,०००/– प्रति चौरस फुट या प्रमाणे नुकसान भरपाई देण्यात यावी.

**क) ज्या रहिवाश्यांची सदनिका/निवासस्थान निष्कासीत केले आहे त्यांचे बाबतीत:**

१) ज्या रहिवासीयांची सदनिका/निवासस्थान निष्कासीत करण्यात आले त्यांना महानगरपालिकेने ठरविलेल्या धोरणानुसार नुकसान भरपाई दिली जावी

२) पर्यायी जागेचे क्षेत्र त्याग केलेल्या सदनिका/निवासस्थानाच्या जागेपेक्षा जास्त किंवा कमी असेल तर ज्या वर्षी बांधकाम निष्कासित करण्यात आले त्या वर्षीचे प्रचलित बाजार भावानुसार फरकाची रक्कम वसूल किंवा अदा केली जावी.

३) पर्यायी जागा उपलब्ध नसेल आणि रहिवाश्यांची इच्छा असेल तर टि.डी.आर.दिला जावा.

४) टि.डी.आर.चा दर प्रति चौरस फुटास रुपये १०००/– असा गृहित धरुन टि.डी.आर. १:१० या गुणोत्तराप्रमाणे म्हणजे प्रत्येक एक चौरस फुटामागे १० चौरस फुट अशी नुकसान भरपाई दिली जावी.

५) शहराच्या कोणत्याही भागात रहिवासी वापरासाठी टि.डी.आर. वापर किंवा विक्री करण्यास दुकानदारांना परवानगी दिली जावी.

६) वर नमुद केल्या प्रमाणेची पर्यायी जागा महानगरपालिका उपलब्ध करुन देवू शकत नसेल तर रक्कम रुपये १०,०००/– प्रति चौ.फुट या प्रमाणे नुकसान भरपाई दिली जावी.

दुकानदार, रहिवासी व त्यांचे कुटूबांचे कायदेशीर हित जपण्यासाठी आयुक्त, दुकानदार/रहिवासी, स्थायी समिती यांचे प्रत्येकी दोन प्रतिनिधी यांच्यामध्ये महापालिका सचिव यांचे साक्षी, सही व शिक्कासह सांमजस्य करार करण्यात यावा. निवास आरंक्षणाचे धोरणानुसार ज्या आरंक्षित भुखंडावर बांधकाम करण्यास महानगरपालिकेने परवानगी दिली आहे. अशा एकूण बांधकामाचे २५ टक्के क्षेत्र जे विकासकाकडून महानगरपालिकेस मिळाली आहे त्यातील पुरेशी जागा/क्षेत्र उपलब्ध नसेल तर महानगरपालिकेने दुकानदारांच्या संमतीने एखादया योग्य ठिकाणी वाणीज्य/रहिवासी कॉम्पलेक्स बांधण्याचा विचार करावा व ते कमीत कमी कालावधीत पूर्ण करावे.

पुर्नवसन कार्यच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी खालील प्रमाणे विशेष कक्ष स्थापन करण्यात यावा. त्यांनी रोजच्या रोज आयुक्तांशी सपंर्क ठेवून दर दिवसाचा प्रगती अहवाल आयुक्तांना थेट सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| १ | उप–आयुक्त | कक्ष प्रमुख |
| २ | शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग | सदस्य |
| ३ | सहा. आयुक्त (मालमत्ता) | सदस्य |
| ४ | कनिष्ठ किंवा उप अभियंता, सा.बां.वि. | सदस्य |
| ५ | कनिष्ठ किंवा उप अभियंता, पा.पु.वि. | सदस्य |
| ६ | कनिष्ठ किंवा उप अभियंता, भुयारी गटार | सदस्य |
| ७ | कनिष्ठ किंवा उप अभियंता, विद्युत | सदस्य |
| ८ | अनुभवी व वरिष्ठ वास्तुविशारद | सदस्य |
| ९ | सहा.आयुक्त | सदस्य आणि संपर्क अधिकारी एमएमआरडीए व इतर संस्था |
| १० | दुकानदार व रहिवाशी संघ यांचे दोन प्रतिनिधी | सदस्य |

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/— १)

२)

अनुमोदकाची सही/—१)

२)

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>**आता या सभेचे दोन विषय राहिले आहेत. परंतु ७.०० वाजले आहेत. ही सभा स्थगित करावी लागेल. तसेच पुढील सभा सुरु करुन स्थगित करावी लागेल. तुमचा प्रस्ताव आला पाहिजे.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>**आजच्या सभेचे तीन विषय राहिले आहे तर ही सभा स्थगित करण्यांत यावी. तसेच दुसरी सभा आज सूचनेवर आहे परंतु वेळ नसल्यामुळे चालवु शकत नाही. तर आता ही सभा संपली आहे की अलॉटमेंट करावे लागेल.

**<u>महापालिका सचिव :—</u>**होय स्थगित केली आहे.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>**तर मग दुस—या सभेस सुध्दा स्थगित कण्यांत यावे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**दुसरी सभा सुरु करुन मग त्यास स्थगित करावे.

**<u>महापालिका सचिव :—</u>**पहिल्या महासभेचे तीन विषय स्थगित झाले आहे. दुसरी महासभा मी सुरु करत आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**सभा अनिश्चित काळासाठी स्थगित करावी.

**<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>**ही सभा अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यांत येत आहे.

---

सूचकाचे नांव :—श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नांव :— श्री. किशोर वनवारी

**<u>स्थगित प्रस्ताव</u>**

दिनांक २०/०१/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित केल्याने सदर सभा दिनांक १७/२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत आयुक्त नसल्याने सदर सभा पुन्हा स्थगित करण्यात आली. सदरची सभा दिनांक ५/३/२०१८ रोजी दुपारी २.३० आयोजित करुन पुन्हा स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ७३ अ** **दिनांक : ५/०३/२०१८**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक ५/०३/२०१८ रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ७.०० वाजता उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. जीवन इदनानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः—०८/०३/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ०८/०३/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

## ८—क

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक २०/१/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा शनिवार दिनांक १७/२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित झाल्याने सदर सभा सोमवार दिनांक ५/३/२०१८ रोजी दुपारी २.३० वाजता पुन्हा स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा गुरुवार दिनांक ८/३/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यांत आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | २६ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी |
| ३ | श्रीमती पुजा सचिन भोईर | २७ | श्रीमती शुभागी मनोहर बेहनवाल |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | २८ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी |
| ५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | २९ | श्री. रवि किशनचंद जग्यासी |
| ६ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ३० | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३१ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ८ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३२ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ९ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३३ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| १० | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ३४ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ११ | श्रीमती सुरेखा अनुमंत आव्हाड | ३५ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १२ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ३६ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १३ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा | ३७ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १४ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ३८ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १५ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ३९ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १६ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४० | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १७ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ४१ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १८ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ४२ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १९ | श्रीमती शुभांगीनी निकम | ४३ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २० | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ४४ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २१ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४५ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २२ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ४६ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २३ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ४७ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २४ | श्री. अजित प्रभूनाथ गुप्ता | ४८ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| २५ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ४९ | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती मिना कुमार आयलानी, २. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ३. श्रीम. आशा नाना बिराडे, ४. श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर, ५. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ६.श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ७. श्री. महेश पहीलराज सुखरामनी, ८. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ९. श्रीमती इंदिरा जमनादास उदासी, १०.श्रीमती कविता लाल पंजाबी, ११. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, १२. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई), १३. श्री. सुमित सागर सोनकांबळे, १४. श्री. रमेश महादेव चव्हाण, १५. श्री. चंद्रशखर केशव यादव, १६.श्री. सुनिल मुकुंद

सुर्वे, १७. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे, १८. श्री. धनंजय बाबुराव बोडारे, १९. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, २०.श्रीमती जयश्री ज्ञानेशवर पाटील , २१. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), २२. श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी, २३. श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे, २४. श्रीमती कविता सुधिर बागुल, २५. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी, २६. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, २७. श्री. विजय चाहु पाटील, २८. श्रीमती कविता सुरेश गायकवाड, २९. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, ३०. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी, ३१. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ३२. श्री. राजेश नानिकराम वदारिया

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
४. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
६. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
७. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता
८. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी
९. डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१०. श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक
११. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
१२. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
१३. श्री. प्रबोधन मवाळे, सहाय्यक आयुक्त
१४. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१५. श्रीमती. छाया डांगळे, प्र. सहाय्यक आयुक्त
१६. श्री. हनुमंत खरात, कनिष्ठ अभियंता
१७. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१८. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक
१९. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२०. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२१. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी
२२. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
२३. श्री. मनोज जाधव, प्र. मुख्य लिपीक
२४. श्री. राजा बुलानी, लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

दुपारी ३.४५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

या वेळी मा. महापौरांच्या स्थानी, उप महापौर, श्री. जीवन इदनानी हे आसनस्थ होते.

या वेळी मा. आयुक्तांच्या स्थानी, अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे या आसनस्थ होत्या.

**महापालिका सचिव :—** ही मिटींग चार वेळा स्थगित झालेली आहे, विषय क्र. १७ वाचुन दाखवितात.

---

**प्रस्तावाची सूचना**

⇨ **विषय क्र. १७ :—** उल्हासनगर शहरातील रस्त्यावर बेवारस उभ्या असलेल्या वाहने या विषयावर चर्चा करण्याबाबत पालिका सदस्या श्रीमती कविता लाल पंजाबी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

---

**सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—** मॅडम, महापौरजी ही मिटींग स्थगित करा, श्री. बोडारे साहेबांचा विषय आहे, तो आलेला नाही.

**पीठासीन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—** हा विषय तर घेता येणार नाही मॅडम उपस्थित नाहीत.

**महापालिका सचिव :—**सदरचा विषयावर प्रस्ताव देणा—या सदस्या उपस्थित नसल्याने संपृष्टात येत आहे.

विषय क्र. १८ वाचुन दाखवितात.

---

**प्रस्तावाची सूचना**

⇨ **विषय क्र. १८ :—** प्रधान मंत्री आवास योजनेची कामे जलद गतीने करणेबाबत पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त मॅडम, प्रधान मंत्री आवास योजनेचा हा जो विषय आला आहे, या विषयामध्ये माझे हे म्हणणे आहे की, प्रधान मंत्री आवास योजना संपुर्ण देशामध्ये लागू झाली आहे आणि आपला उद्देश हा आहे की, सन २०२२ पर्यंत सर्व लोकांना घर मिळाले पाहीजे. परंतु उल्हासनगरची अशी परिस्थिती आहे की, उल्हासनगरमध्ये जी प्रधानमंत्री आवास योजना आहे, ती संपुर्णपणे ठप्प पडली आहे. तरी कृपया करून कोणी अधिकारी याच्या बददल सांगेल का? प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये कुठे कुठे डि.पी.आर. बनले? त्या डि.पी.आर. ची आजची परिस्थिती काय आहे? किती डि.पी.आर. बनले आहेत? का फक्त कागदावरच आपले काम आहे. डि.पी.आर. बनतो, तो तसेच पडून राहता, सरकारतर्फे काय आडचण आहे? उल्हासनगर महानगरपालिकेकडून काय आडचण आहे? कोण कोणते कार्य आपण पुर्ण केले आहे? कुठून प्रधानमंत्री आवास योजना लवकरात लवकर सुरू होत आहे? या सर्व गोष्टीच्या बाबतीत, जे अधिकारी असतील त्यांनी सांगावे.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आताच महापौरांनी स्पष्ट केले होते की, सर्व सर्वजणांनी टाऊन हॉलमध्ये यावे, अधिका—यांना सुध्दा बोलेले होते. आता उत्तर देण्यासाठी कोणीही नाही? यासाठी माझे म्हणणे आहे की, ही मिटींग स्थगित करा.

**सहाय्यक लेखा अधिकारी, श्री. संतोष जाधव:—** मा. महापौर, मा. आयुक्त.....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** माझा विषय खुप गंभीर आहे, नाही तर उद्या पर्यंत स्थगित करा किंवा एक दिड तास चर्चा करा, प्रधानमंत्री आवास योजनेवर.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** उद्यासाठी तीन्ही वेळा फिक्स केले होते, तिन्ही मिटींग स्थगित करून उद्या ठेवा. आम्ही महीलांना पण बोलले आहे आणि महापौरांचे पण आदेश आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** ही महासभा उद्या ५.०० वाजे पर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

**पीठासीन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—** ही मिटींग स्थगित करून उद्या ५.०० वाजता ठेवण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** उद्याच्या मिटींगमध्ये माझा विषय ठेवा.

**पीठासीन अधिकारी, श्री. जीवन इदनानीः—** होय, आपला विषय पेडींग आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानीः—** खुप दिवसा नंतर भुल्लर महाराज यांचे आवाज आज सभागृहामध्ये ऐकायला मिळाले. भुल्लर महाराजांच्या दमदार आवाजाला मान देवून ही मिटींग स्थगित करण्यात येत आहे.

**पीठासीन अधिकारी, श्री. जीवन इदनानीः—**सदरची सभा स्थगित करण्यांत येत आहे.

---

सूचकाचे नांव :—श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नांव :— श्री. किशोर वनवारी

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक २०/०१/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित केल्याने सदर सभा दिनांक १७/२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत आयुक्त नसल्याने सदर सभा पुन्हा स्थगित करण्यात आली. सदरची सभा दिनांक ५/३/२०१८ रोजी दुपारी २.३० आयोजित करुन पुन्हा स्थगित केल्याने दिनांक ८/३/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करुन पुन्हा दिनांक ९/३/२०१८ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ७३ इ** **दिनांक : ८/०३/२०१८**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक ८/०३/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज दिनांक ९/३/२०१८ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ४.०५ वाजता पीठासीन अधिकारी, श्री. जीवन इदनानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांक:— ९/३/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ९/३/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

**८—ड**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक २०/१/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा शनिवार दिनांक १७/२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित झाल्याने सदर सभा सोमवार दिनांक ५/३/२०१८ रोजी दुपारी २.३० वाजता पुन्हा स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा गुरुवार दिनांक ८/३/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित झाल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक ९/३/२०१८ रोजी सांयकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३४ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ३५ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३६ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३७ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ७ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३८ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ८ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ३९ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४० | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| १० | श्रीमती आशा नाना बिराडे | ४१ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ११ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४२ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| १२ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४३ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १३ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४४ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १४ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४५ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १५ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४६ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १६ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४७ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १७ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव साहता | ४८ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १८ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ४९ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १९ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५० | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५१ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २१ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ५२ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५३ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २३ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५४ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २४ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५६ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २६ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५७ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील. |
| २७ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५८ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २८ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ५९ | श्री. विकास परशुराम पाटील. |
| २९ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६० | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३० | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६१ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३१ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६२ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३२ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६३ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३३ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ६४ | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, २. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ३. श्री. महेश पहिलराज सुखरामनी, ४. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ५. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ६.श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ७. श्री. रवी किशनचंद जग्यासी, ८. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई), ९. श्री. चंद्रशेखर केशव यादव, १०.श्रीमती वसुधा धनंजय बोडारे, ११. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, १२. श्रीमती कांचन अमर लुंड, १३. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, १४. श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे, १५. श्रीमती कविता सुधिर बागुल, १६. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी, १७. श्री. विजय चाहु पाटील, १८ श्री. अकाश परशुराम पाटील.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
४. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
५. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
६. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१०. श्री.महेश शितलानी, कनिष्ठ अभियंता
११. श्री. संतोष जाधव, सहाय्यक आयुक्त
१२. श्री. विनायक फासे, सहाय्यक मुख्य लेखापरिक्षक
१२. श्री. बाळू नेटक, प्र. सुरक्षा अधिकारी
१३. श्रीमती छाया डांगे, प्र.सहाय्यक आयुक्त
१४. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१५. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१६. श्री. हनुमंत खरात, कनिष्ठ अभियंता
१७. श्री. दत्तात्र्य जाधव, प्र. सहाय्यक आयुक्त
१८. श्री. बी.एस. पाटील, शाखा अभियंता

१९. श्री. रहेजा, शाखा अभियंता
२०. श्री. ठाकरे, शाखा अभियंता
२१. श्रीम. अलका पवार, प्र.सहाय्यक आयुक्त
२२. श्रीमती. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२३. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२४. श्रीम. शितल बोराडे, अकॉटंट
२५. श्री. एकनाथ पवार, प्र. स्वच्छता निरीक्षक
२६. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरीक्षक
२७. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२८. श्री. अच्युत सासे, मुख्य लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

सायंकाळी ६.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १८ :— प्रस्तावाची सूचना**

प्रधान मंत्री आवास योजनेची कामे जलद गतीने करणेबाबत पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** अनिश्चित कालावधीसाठी स्थगित.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** माझी एक सुचना आहे, याच महासभेमध्ये आपण प्रस्ताव पास केला आहे, नविन कर्मचा—यांच्या भरती बाबत, तर हाच विषय पेडींग आहे, जर आपण इथेच संपवला तर ठराव पास होईल आणि पुढची कारवाई सुरू होईल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** पहीले जो विषय प्रशासना समोर ठेवायचे आहे, मी जर ठेवूच शकत नाही तर सभा चालवण्याचा अर्थच काय राहीला?

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** ही मिटींग अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे.

---

सूचकाचे नांव :—श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नांव :— श्री. किशोर वनवारी

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक २०/०१/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित केल्याने सदर सभा दिनांक १७/२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत आयुक्त नसल्याने सदर सभा पुन्हा स्थगित करण्यात आली. सदरची सभा दिनांक ५/३/२०१८ रोजी दुपारी २.३० आयोजित करुन पुन्हा स्थगित केल्याने दिनांक ८/३/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यांत पुन्हा स्थगित झाली. सदर सभा दिनांक ९/३/२०१८ रोजी सांयकाळी ५.०० वाजता पुन्हा आयोजित करुन स्थगित करण्यास प्रस्तावित.

**<u>महासभा ठराव क्र.</u> ७६ ब** **<u>दिनांक : ९/०३/२०१८</u>**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक ९/०३/२०१८ रोजी सांयकाळी ५.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ७.०० वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः—१४/०३/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १४/०३/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

**१०**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार, दिनांक १४/०३/२०१८ रोजी दुपारी २.३० वाजता घेण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३३ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ३४ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३५ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३६ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ७ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३७ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३८ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ९ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३९ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ११ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४१ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| १२ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४२ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १३ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४३ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १४ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहोता | ४४ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १५ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ४५ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १६ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ४६ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १७ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४७ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४८ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १९ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ४९ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २० | श्रीमती शुभांगीनी निकम | ५० | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २१ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५१ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २२ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५२ | श्री. प्रमोद नामदेव टाले |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५३ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २४ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्रीमती. डिंम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ५५ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २६ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५६ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २७ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ५७ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील. |
| २८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ५८ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २९ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ५९ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३० | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ६० | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३१ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६१ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३२ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | | |

तर

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, २. श्रीमती पंचम उमेश कालानी, ३. श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर, ४. श्री. स्वप्नील मिलींद बागुल, ५. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ६.श्रीमती जया प्रकाश माखिजा, ७. श्री. महेश पहिलराज सुखरामनी, ८. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ९. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, १०. श्री. राजेंद्र शांताराम चौधरी, ११. श्री. सुमित सागर सोनकांबळे, १२. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, १३. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, १४. श्री. धनंजय बाबुराव बोडारे, १५. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, १६. श्रीमती कांचन अमर लुंड, १७. श्री. विजय चाहु पाटील, १८. श्रीमती कविता सुरेश गायकवाड, १९. श्री. आकाश परशुराम पाटील, २०. श्री. विकास परशुराम पाटील, २१. श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त

२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

३. श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)

४. श्री. मिलींद सोनवणे, नगररचनाकार

६. श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक

७. श्री. संतोष जाधव, सहाय्यक मुख्य लेखाधिकारी

८. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक

१०. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता

११.श्री. प्रबोधन मवाळे, सहा. आयुक्त

१२. श्री. बालाजी लोंढे, सहा. आयुक्त

१३. श्री. गणेश शिंपी, प्र.सहा. आयुक्त

१४.श्री. भगवान कुमावत, प्र.सहा. आयुक्त

१५. श्री. नंदलाल सामतानी, प्र. सहाय्यक आयुक्त

१४. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त

१५. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी

१६. श्री. तिजोरे, शाखा अभियंता

१७. श्री. सोनावणे, शाखा अभियंता

१८. श्रीमती. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

१९. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक

२०. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

२१. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी

२२. श्रीम. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक

२३. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी

२४. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

४. श्री. बाळु भांगरे

या वेळी मा. आयुक्तांच्या स्थानी अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे या आसनस्थ होत्या.

दुपारी ३.१३ वाजता वंदे मातरम म्हणून सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिवः—** विषय क्र.१ प्रश्नोत्तराचा तास आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, ....

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** आपण सगळयांनी पहीले माझे म्हणणे ऐकुन घ्यावे, जस्ट मिनीट

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** माझे एक निवेदन आहे, आपण जे नेहमी पास करतो.....

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** जस्ट मिनीट आपण पहीले माझे म्हणणे ऐकुन घ्या, आपण बसून घ्या, त्या दिवशी शेवटच्या मिटींगमध्ये जी घटना झाली ती व्हायला नव्हती पाहीजे. त्या दिवसापासून आज पर्यंत त्या घटनेमुळे मला खुप त्रास झाला. त्यामुळे मी आज दोन तीन गोष्टी सांगते, ज्या सभागृहामध्ये मेंटेन करायच्या आहेत. पहीले जो विषय असतो, त्याच विषयावर पहीले बोलायला पाहीजे. दुसरे म्हणजे पर्सनल अॅटॅक कोणत्याही सदस्यांनी, सदस्यांना आणि कोणत्याही अधिका—यांवर पर्सनल अॅटॅक व्हायला नाही पाहीजे. धिस इज दि सेंकड थिंग, थर्ड आणि लास्ट, जसे की आयुक्तजी परवानगी न घेता, आपल्या बरोबर अधिका—यांना घेऊन गेले, याच्या नंतर या गोष्टी झाल्या नाही पाहीजेत. कंठे मॅडम आपण हा पॉईंट कृपया करून नोंद करून घ्या. आयुक्त साहेबांना सुध्दा मी पर्सनली सांगितले आहे. आपणाला सर्वांना माझी विनंती आहे की, आपण सभागृहाला चालवण्यासाठी तुम्ही मला मदत कराल मला तुमच्याकडून आशा आहे की, सभागृह कसे चालेल? एक शिस्त सभागृहामध्ये असायला पाहीजे. आपण सगळे निवडून आलेले नगरसेवक उल्हासनगर वासियांचे लोकप्रतिनिधी आहेत. जर आपण असे सभागृह चालवले तर आपण बघा आपली इमेज बाहेर कशी जाईल? आपल्याला रिस्पेक्ट मिळेल, लोकांच्या डोळयांमध्ये आपण रिस्पेक्ट पाहू शकतो, तो पण विचार आपण करा. जर आपल्याला रिस्पेक्ट पाहीजे असेल तर आपण सभागृहामध्ये आपले रिस्पेक्ट दाखवा. धिस इज दि लास्ट, फस्ट अॅन्ड लास्ट रिक्वेस्ट अॅन्ड गीव इन यु विषयावर

बोला, परत परत एकाच विषयावर बोलू नका? प्रत्येक सदस्यांना बोलण्याची संधी मिळाली पाहीजे. अशी मी आशा बाळगते, गीव्ह  ॲन्ड टेक रिस्पेक्टने बोलले पाहीजे, दॅट साल.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** मा. महापौरजी, आपण जे सजेशन दिले आहे, ते एकदम बरोबरच आहे. परंतु तुम्ही जो निर्णय घेतात, त्याची अंमलबजावणी होते नाही तर आपण त्याच्यासाठी पुढे काय कराल?

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** त्यासाठी मी आयुक्त साहेब शेवटी जेव्हा माझ्या चेंबरमध्ये आले होते, त्यावेळी मी बोलले होते, खुपच नाराजी दाखवली होती. ते मला सॉरी पण बोलेले आहे, पुढे ते पण मेन्टेन ठेवतील, असे मला आश्वासन दिले आहे.

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** आपण स्वतः लक्ष दया, धन्यवाद.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** अधिका—यांना सुध्दा मी लास्ट टाईम आदेश दिले होते की, जेव्हा महासभा असेल तेव्हा सर्वांनी हजर राहीले पाहीजेत आणि आता जे अधिकारी आले नाहीत, देहेरकरजी आपण मला एक लिस्ट बनवून दया.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** महापौर मॅडम, आपण आज जे सजेशन दिले आहे, त्या सजेशनमध्ये आपण चेतावनी पण दिली आहे. संसदिय परंपरामध्ये केवळ सब्दांची निवड करणे, हे केवळ इथे बसलेल्या लोकांचे नाही, तर वरती बसलेल्या अधिका—यांचे सुध्दा एक दायीत्व आहे. आयुक्त साहेबांनी त्या दिवशी कोणत्या शब्दांचा वापर केला पाखंडी या शब्दाचा वापर केला. संसदिय परंपरामध्ये अशा शब्दांमध्ये बोलणे माझ्या हिशोबाने ठिक नाही. तर केवळ खालचे जे लोक आहेत, तेच करत असतात, परंतु तेथून पण एक शालीनतेची ओळख झाली पाहीजे. इथे संपुर्ण सभागृहाचे अवमान झाला आहे आणि इथे जे सदस्य बसले होते, जर अन्य एखादी व्यक्ती, एका नगरसेवकामुळे त्यांचे मन नाराज झाले आहे. आपण त्यांना कोणत्याही प्रकारे समर्थन करीत नव्हतो. त्याच्या नंतर सुध्दा एका सदस्यामुळे संपुर्ण सभागृहाला दंडीत करणे आणि असे दाखवून देणे की, लोकतंत्रामध्ये निवडून आलेल्या सदस्यांचे जास्त महत्व नाही. प्रशासनाचे महत्व आहे, हा मोठा प्रश्न चिन्ह आहे? तर परंपरामध्ये आपण आज ती पाया टाकला आहे, ती पाया केवळ एका बाजूने व्हायला नाही पाहीजे. मी तुम्हांला चार—पाच उदाहरण देतो की, आपण त्या दिवशी आयुक्तांना सांगितले की जे सर्व अधिकारी आहेत, त्यांनी उपस्थित राहीले पाहीजेत. आज सांगा, प्रभाग क्र.१ चे अधिकारी कुठे आहेत? प्रभाग क्र.२ चे प्रभाग अधिकारी कुठे आहेत? आणि चार नंबरचे श्री. गणेश शिंपी कुठे आहेत? त्याच्या नंतर ॲकॉउंट ऑफिसर पण नाहीत. त्याच्या नंतर स्वतः आयुक्त साहेब पण नाहीत आणि अजून बरेच अधिकारी नाहीत, श्री. विनोद केणे पण नाहीत आणि त्याच्या नंतर भरपूर अनुपस्थित आहेत. मग इथे मा. महापौरांनी जे आदेश दिले आहेत, असे किती तरी आदेश आयुक्त साहेबांना दिले आहे. परंतु हे बघा, महापौर मॅडम, हे फक्त तुमचाच अपमान नाही तर संपुर्ण सभागृहाचा अपमान आहे. जर आपण तिथून एखादया गोष्टीसाठी आदेश देतात आणि प्रशासन पुर्ण करीत नाहीत, तर आपण या गोष्टींवर सुध्दा लक्ष दयायला पाहीजे. आपण तीन—चार वेळा आयुक्तांना आदेश दिले आहेत. परंतु त्या आदेशाचे पालन झाले नाही. महापौर मॅडम आपल्याकडे सत्तेची ताकद आहे, ती आपण हातामध्ये घ्यायला पाहीजे, सुचना दिल्या पाहीजेत. जेव्हा आपण बोलतात, इथे पत्रकार पण आहेत, वरतून बघत असतात, त्याच्या नंतर ते हे पण बघतात की, आपल्या आदेशाची अंमलबजावणी झाली का नाही झाली. जर अंमलबजावणी होत नाही तर त्याच्यावर मोठे प्रश्न चिन्ह निर्माण होते. तर आज माझी विनंती आहे की, आपण एक बॅलन्स करा, संतुलन राखण्याचा प्रयत्न करा. जसे शासन आणि प्रशासन दोन चाक असतात त्या वेगवेगळया असतात, पण गाडी बरोबर चालते. जर असे काम केले तर खुप चांगले होईल.

या  वेळी सदस्य, श्री. राजेश वदारिया यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, पहीले मी आपल्याला खुप, खुप धन्यवाद करतो की, आपण आज सभागृहामध्ये खुप चांगले विचार मांडले आहेत की, सभागृह चांगल्या प्रकारे चालले पाहीजे. कारण सगळया लोकप्रतिनिधीवर आपल्या शहराची नजर असते, आपण काय बोलतो आणि काय बोलत नाही? त्याच प्रमाणे आपले प्रशाकिय अधिकारी आहेत, त्यांच्यावर सुध्दा लक्ष असते. प्रत्येकानी चांगल्या शब्दाचा वापर केला पाहीजे. तसेच एक रहिमदासजी चे दुवे हे आपल्याला सांगायचे आहे, त्यांनी चुकीचे शब्द वापर करणा—यांना काय बोलले आहेत? त्यांनी सांगितले आहे की, “खिरा को मुह काट के मलियत लोन लगाये रहिमन कडवे मुखवंटे चैयत यही सजाएँ” या दोहाचे शाब्दिक अर्थ असा आहे की, खिरा को मुह काट के, खिरा काकडीला बोलतात, काकडी कडू असते, तिच्या तोडाला कापले जाते, खिरा को मुह काट के त्याच्यावर मिठ टाकून चोळले जाते, तर त्याचे कडूपणा निघून

जातो. खिरा को मुह काट के मलियत लोन लगाये रहिमन कडवे मुखवंटे जे कडवे शब्द बोलतात, त्यांना या काकडीप्रमाणे शिक्षा दयायला पाहीजे. परंतु आपण अशी शिक्षा देवू शकत नाही. परंतु एवढा जुना हे दोहा आहे, त्या प्रमाणे शांतपणे घेऊन जर आपण कडवे शब्दाचे वापर करणार नाही, ज्या विषयाला घेऊन आपण इथे उपस्थित आहेत, फक्त त्याच विषयावर बोलू आणि आपले पर्सनल जे मतभेत असतील ते आपल्याला बाहेर ठेवायचे आहे. इथे आपण विषय घेऊन उपस्थित होत असतो. शहराचे कार्य घेऊन उपस्थित राहत असतो, त्या विषयाला आपल्या मनाप्रमाणे घ्यायला नाही पाहीजे. ते सत्ता पक्षाचे असतील किंवा विरोधी पक्षाचे असतील किंवा प्रशासकीय अधिकारी असतील मी सगळयांना निवेदन करतो की, आपल्या महापौरांनी आज ज्या पण गोष्टी सांगितल्या आहेत, आपण सगळे त्याचे पालन करू आणि हे सभागृह खुप चांगल्या प्रकारे चालेल. ज्या पण घटना झाल्या आहेत, आपण त्या विसरून गेले पाहीजेत. त्या गोष्टींचा विचार पण करायला नाही पाहीजे. या सभागृहामध्ये जे पण झाले, मा. आयुक्त तर निघून गेलेत, त्या गोष्टी विसरून गेल्या पाहीजेत आणि परत नविन सुरूवात करून या शहराचे कार्य करायला पाहीजे, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती शितल कदम व श्रीम. वसुधा बोडारे यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:–</u>** मा. महापौरजी, जे महापौरांनी आमच्या समोर विचार ठेवले आहेत, ते महापौरांनी फक्त एकाच पक्षासाठी ठेवले नाहीत. फक्त सदस्यांसाठीच बोलेले नाही, महापौरांनी सदस्यांसाठी पण सांगितले आहे आणि अधिका–यांसाठी पण सांगितले आहे. मर्यादेमध्ये राहीले पाहीजे, मर्यादीत बोलायला पाहीजे आणि महापौरांचे जे सर्व आदेश आहेत, त्यांचे पण पालन व्हायला पाहीजेत. परंतु मी विनंती करतो की, आपले सभागृह भरकटले आहे, म्हणजेच सगळे वेगवेगळे झाले आहेत, त्यांना सगळयांना एकत्र येण्याची गरज आहे. जर कोणी पण आपले पॉवरचे वापर करीत असतील तर सभागृहाचे जे पॉवर आहेत, ते सर्व पक्षाचे लोक आपल्यामध्ये पण ते पॉवर आहे, ते आपल्यामध्ये युनिटी करून जर आपल्या सदस्यांचे शहराची कामे होत नाहीत, जसे आयुक्त साहेब, निघून गेले आणि सर्व अधिका–यांना बरोबर घेऊन गेले हे खुप चुकीचे होते आणि जे आपले सदस्य आहेत, त्यांनी सुध्दा नियमांचे पालन केले पाहीजेत. तर या विषयामध्ये मी सर्वांना विनंती करतो की, सगळयानी एकजुट करून राहीले पाहीजे. ठिक आहे आपल्याला निर्णय घ्यायचे असतील तर मतभेद सोडून एकत्रित चालायला पाहीजे आणि मा. महापौरांनी जे सांगितले आहे, तसे सदस्यांनी पण व्यवस्थित बोलायला पाहीजे आणि सर्व अधिका–यांनी महासभेमध्ये उपस्थित राहीले पाहीजे, हे पण जरूरी आहे, धन्यवाद.

या वेळी सदस्य श्री. भगवान भालेराव व सदस्या, श्रीमती रेखा ठाकुर यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**या** वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:–</u>** महापौर साहेबा, माझी पण एक विनंती आहे की, त्या दिवशी जे घडले, ते घडायला नाही पाहीजे होते.सर्वांना दु:ख झाले, भविष्यात असे घडायला नको, जसे आपण सांगितले की, सर्व लोकप्रतिनिधीनी संयम राखून बोलायला पाहीजे आणि आपण हे पण सांगितले की, जे प्रशासन आहे, ते पण महापौरांचे आदेश आणि लोकप्रतिनिधीनी जे ठराव पास केले आहेत, प्रस्ताव पास केले आहेत, त्याची अंमलबजावणी झाली पाहीजे आणि अजून व्यक्ति राहून गेली आहे, ती म्हणजे जनता, शहरातील जनतेला एक वर्षापासून न्याय मिळत नाही, त्यांना सुविधाच मिळत नाहीत. तरी कृपया आपल्याद्वारे ज्या सुविधा राहील्या आहेत, त्या त्यांना मिळाव्यात असे आदेश तुमच्याकडून झाले होते आणि आयुक्त साहेब, सर्वा समोर बोलेले होते की, १६ लाखांची विकास कामे मी प्रत्येक वार्डमध्ये देईल.त्याची अजून पर्यंत अंमलबजावणी होत नाही, तरी कृपया करून पब्लिकच्या ज्या सुविधा आहेत, जे हक्क आहेत, त्या सुध्दा आपल्याद्वारा वेळेवर मिळाव्यात, याचे पण आदेश कराल तर खुप मेहरबानी होईल आणि शहराबरोबर न्याय होईल, जनते बरोबर न्याय होईल.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:–</u>** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, महापौरांनी आताच जे सांगितले की, सभागृहामध्ये शिस्त राहीली पाहीजे आणि कोणावरही पर्सनल अटॅक झाले नाही पाहीजेत. प्रत्येक सदस्य जो विषय आहे, त्याच विषयावर बोलेले पाहीजेत. जी घडना झाली, त्याची आपण निंदा पण केली आणि सर्व सदस्यांनी निंदा केली, मी सुध्दा निंदा करीत आहे. सभागृहामध्ये जे झाले ते चुकीचे आहे, महापौरजी आम्ही प्रत्येक वेळी आपल्याकडून जेव्हा विषय चाललेला असतो, तेव्हा आम्ही दोन्ही हात वर करून विचारतो की, हे काय चालले आहे? आपण ऐकीकडून आदेश देतात, ते आदेश संपुर्ण सभागृह मानतात आणि एका बाजुने आपण आदेश देतात, त्याची अंमलबजावणी,

जसे माझे मित्र श्री. दिपक सिरवानी यांनी सांगितले की, कोणीही अधिकारी करत नाही. तर या दोन्ही गोष्टी झाल्या पाहीजेत, या दोन्ही गोष्टी दोन्ही बाजूने झाल्या पाहीजेत. मागच्या वेळेस जी घडना झाली, त्या महापौर मॅडम आपण इथे विराजमान होत्या, सभागृहामध्ये आपण उपस्थित होत्या आणि आयुक्तांचे असे उठून निघून जाणे, त्याच बरोबर सर्व अधिका—यांना घेऊन जाणे, ही केवढी मोठी गोष्ट आहे. या घटने विषयी सर्व शहरभर चर्चा झाली की, महापौर, उप महापौर सभागृहामध्ये बसले असतांना आयुक्त साहेब, सर्व अधिका—यांना बरोबर घेऊन बाहेर गेले. सर्व सदस्य सभागृहामध्ये बसतात ते आपल्या समस्यांसाठी, महापौरजी आज इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परिक्षा चालू आहेत. इथे सर्व आमच्या माता, भगिनी बसल्या आहेत. मुलांना शिकवतात, तरी सुध्दा वेळ काढून आज सर्वच इथे आहेत, या सर्व गोष्टी सोडून शहराचे हित बघण्यासाठी महापौर आपण सुध्दा इथे बसलो आहे आणि सर्वांचे म्हणणे ऐकत आहेत. परंतु त्या गोष्टींचा प्रशासनावर काहीच परिणाम झाले नाहीत आणि प्रशासन चालवण्यासाठी आपण बोलत आहेत तर त्यांच्यासाठी काही लेखी आदेश काढा. महापौर तुम्हांला अधिकार आहेत, आपण प्रशासनाला आदेशीत करू शकतात. आपण जे पण सांगितले ते बरोबर आहे. आपण कोणाचीही निंदा करणार नाही, आपण कोणालाही व्यक्तिगत टार्गेट करणार नाही आणि केले पण नाही. हि जी घटना झालेली आहे, ती संपुर्ण महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये व उल्हासनगरच्या इतिहासामध्ये ही पहीली घटना झाली आहे, त्याचा मी निषेध करीत आहे. आज सभागृहामध्ये आयुक्त साहेब, उपस्थित नाहीत, जर त्याच मुद्दयावर बोलायचे म्हणटले तर परत परत तीच गोष्ट परंतु मी आयुक्त साहेब, आपणाला सांगत आहे की, अशा घटना परत परत व्हायला नाही पाहीजेत. यासाठी प्रशासनाने मा. महापौरांच्या आदेशाचे पालन केले पाहीजे. तर आम्हांला बोलावेच लागेल, जर महापौरांचेच सन्मान ठेवत नाही तर आमचे काय ठेवणार? जर शहराच्या प्रथम नागरीक जर त्यांच्या विषयी आयुक्त साहेब विचार करणार नाहीत, तर इथे ८३ सदस्य बसले आहेत, त्यांचे विचार कोण करणार? मा. महापौर मॅडम आम्ही तुमच्याकडूनच न्याय मांगत आहेत. तरी या ज्या गोष्टी आहेत, त्या परत परत झाल्या नाही पाहीजेत. पुढच्या वेळसे व्यवस्थित बोलले जावे, जे विषय असेल, त्याच्यावरच चर्चा केली पाहीजे. खुप विषय आहेत, एक विषय आहे, ही मिटींग संपल्या नंतर मी याच सभागृहामध्ये आपल्या बरोबर चर्चा करेल. त्याचे पण आपण निराकरण करा आणि ही जी घटना झाली आहे, त्याचे मी पक्षाच्या वतीने, शिवसेनेच्या वतीने सांगतो की, सभागृहामध्ये जो अपमान झाला आहे, आयुक्त साहेबांनी जे केले आहे, त्या बद्दल मा. महापौराची माफी मागायला पाहीजे, असे मला वाटते.

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:—** मा. महापौर, मा. उप महापौर, सदर घटनेचा जो प्रकार घडला आहे, मी याचे बाजूचा साक्षीदार आहे. त्याच्या बाजूला आयुक्त आहेत, सन्माननिय महापौर आणि उप महापौर मी तुम्हांला सांगू इच्छितो की, एखादा प्रस्ताव प्रशासनाकडून जर येत असेल, त्या प्रस्तावाच्या संदर्भातला उप आयुक्त लेवलचे अधिकारी असतील किंवा त्यांचे जे प्रमुख असतील त्यांनी स्टेजवर येऊन आम्ही ज्या शंका मांडत असेल त्या मांडणे आणि सांगणे योग्य आहे. परंतु त्या दिवशीच्या प्रस्तावामध्ये आयुक्त आयुक्त साहेब, सारखे चार ते पाच वेळा उठत होते. आपण पिठासिन अधिकारी म्हणून मी आपल्याला सांगतो की, आयुक्त हे या सभागृहाचे सदस्य आहेत.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** आपण मध्ये मध्ये थोडे फार हिंदीमध्ये बोलाल तर मला पण क्लियर समजायला येईल आणि आज पासून आपण मराठीमध्ये पण थोडे थोडे बोलत जा.

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:—** हिंदीमध्ये बोलू का?

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** हिंदीमध्ये थोडे बोलाल तर मला क्लियर समजायला येईल. त्या दिवशी आपण मराठीध्ये बोलेले आणि त्यांनी पण मराठीमध्ये बोलले मला समजण्याच्या आधीच बॉम्ब फुटला होता, अशी चुकी झाली नाही पाहीजे, इथून पुढे तुम्ही लक्षात घ्या.

**सदस्य, श्री.राजेश वानखेडे:—** महापौर मॅडम, सगळयांना पाखंडी म्हणटले आहे, तर आपण हे पण क्लियर करा की, इथे सभागृहामध्ये कोण कोण पाखंडी आहे? त्यांची नावे पण सांगा आणि आयुक्तांना आपण विचारा की, कोण कोण पाखंडी आहे?

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:—** सन्माननिय महापौर, विषय असा होता की, काल सन्माननिय उपायुक्तां बरोबर त्या संदर्भात चर्चा करीत होतो, एखादा प्रस्ताव जर येत असेल आणि आम्हांला त्याच्यावर उत्तर पाहीजे असेल तर आम्ही उपायुक्तांकडे उत्तर मागत होतो. उत्तर मांगत असतांना सन्माननिय आताचे जे आयुक्त असतील, हे आपल्या

महासभेचे नियमाप्रमाणे सदस्य आहेत. फक्त त्यांना मतदान करण्याचा अधिकार नाही. पण ते सदस्य आहेत, आयुक्त हे सदस्य असतात. तर आयुक्त हे सदस्य असतांनी, आयुक्तांनी सदस्य म्हणून त्यांचे मत प्रगट करणे हे केव्हा केले पाहीजे? प्रशासनाने प्रस्ताव आणला आहे आणि अशासकिय प्रस्ताव असेल, तर त्याच्यामध्ये आयुक्त, आपले मत प्रगट करू शकतात किंवा आम्ही चुकीचा ठराव मांडत असेल आणि जर कायदयाने ते चुकीचे असेल, तर प्रशासनाचा अधिकारी या नात्याने त्यांनी सांगितले पाहीजे की, हा ठराव चुकीचा आहे. एवढेच फक्त आयुक्तांचे काम असते. आयुक्त साहेब, त्या दिवशी चार ते पाच वेळा त्या संदर्भात बोलत होते, आम्ही शासनाचा जी. आर. वाचून दाखवत होतो आणि शासनाचा जी.आर. असतांनाही स्वत: आयुक्त शासनाचा जी.आर. ला मान्य करीत नव्हते. म्हणजे महाराष्ट्र सरकार मोठे किंवा महानगरपालिका मोठी हा एक संशोधनाचा विषय आहे. म्हणजे ज्या गोष्टी घडल्या त्यांच्याकडून सुरूवात झाली, त्यांनी ओघाओघाने आमच्यावर ताशेरे ओढले, त्याच्या नंतर मी पर्सनल अटॅक केला. जेव्हा तुम्ही पर्सनल आमच्यावर अटॅक केला, तेव्हा आम्ही एकच सांगत होतो की, तुम्ही कशाला हे करता? संबधित बॉडीने जो प्रस्ताव, त्यांनी प्रशासनाने, उप आयुक्तांनी जो प्रस्ताव आणला आहे, त्यांच्याशी आम्ही चर्चा करत आहे, त्यांच्याशी प्रत्येक शंकेचे निरासन करत आहे, त्यांनी प्रस्ताव आणला आहे, आयुक्त या नात्याने आपण ते ऐकले पाहीजे, आयुक्त या नात्याने ते समजून घेतले पाहीजे. आपल्याला कोणी, आम्ही तुमचे मत विचारलेच नाही, आयुक्तांचे मतच आम्ही विचारले नव्हते. पण आयुक्त वारंवार चार ते पाच वेळा उठले आणि तिथे वाद झाला. ज्या वेळी ॲक्शन होते, त्याची रिॲक्शन ही शंभर टक्के होतेच. कुठलीही गोष्ट ॲक्शन झाल्या नंतर रिॲक्शन होते, म्हणून ती रिॲक्शन झालेली आहे, आयुक्तांनी सभागृहाचा अपमान केला आहे. मी जर सुरूवात केली असती आणि मग झाले असते, त्यांनी केले असते तर मान्य केले असते, त्यांनी सुरूवात केली आमच्यावर अटॅक करण्याची म्हणून आम्ही केली. त्यामुळे ॲक्शनचे रिॲक्शन झाले आणि सभागृह आयुक्त सोडून गेले, त्या बददलच्या त्या निंदनिय प्रकारचा मी निषेध करीत आहे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:–</u>** मा. महापौरजी, आपण जो विषयावर बोलल्या आहेत, ही खुप चांगली गोष्ट आहे, आपण निदर्शनास आणून दिले की, आपण काम संयमाने घेतले पाहीजे, आणि चार वर्षे आपण ही बॉडी चालवणार आहेत. पण आपण जे आश्वासन दिले आहे, खुप चांगले आश्वासन दिले आहे. तर या बाबतीत मी आपल्यानस विचारत आहे की, हे आश्वासन शेवट पर्यंत राहील का नाही? मागच्या वेळेस सर्वानी बोलले होते की, आपण बोलतात तर त्याची कोणतीच अंमलबजावणी होत नाही? तर मला वाटते की, संपुर्ण भारतामध्ये अशा महानगरपालिकेचा तो दिवस म्हणजे काळा दिवस होता आणि हा काळा दिवस संपुर्ण विश्वामध्ये मानला जाईल आणि सांगतो की, संपुर्ण भारतामध्ये ज्या प्रकारे आयुक्त साहेब, चालू मिटींग मधून सभागृहातून बाहेर गेले आणि आपल्या सर्व अधिका–यांना सोबत घेऊन गेले तर मी त्यांचा निषेध करतो की, हा दिवस संपुर्ण महानगरपालिकेमध्ये काळा दिवस म्हणून मानला जाईल आणि प्रश्न राहीला तो शहराच्या विकासाचा, आपण निवडून आलेले नगरसेवक सभागृहामध्ये बोलण्यासाठी येतो, टाईमपास करण्यासाठी कोणी येत नाही. माता, बहीणी सगळेच येतात, आता परीक्षेचा कालावधी आहे, कोणी हॉस्पिटल सोडून येत असतो, तर कोण बिजनेंस सोडून येत असतो, जर शहराच्या हितासाठी इथे यायचे आहे, तर या गोष्टी सोडून येणे स्वभाविकच आहे. कारण राजकारणामध्ये यायचे आहे तर सगळ सोडून यावेच लागते, शहराच्या हितासाठी. परंतु प्रत्येक वेळस असे झाले नाही पाहीजे, खुप वेळा मिटींग स्थगित होते, वेळ कमी पडतो हे आपल्याला पण मान्य आहे. परंतु आयुक्त साहेब, असे सोडून जाणे, पेपरमध्ये वाचले होते, चॅनलवर बघितले होते की सभागृह सोडून नगरसेवक जातात, परंतु हे तर उलट झाले आहे. सभागृहामधून आयुक्त निघून गेले, डिपार्टमेंटचे लोक निघून गेले आणि सभागृह महापौर मॅडम चालवत होत्या. हे मान्य आहे, सभागृह आपला आहे आणि आपल्यालच चालवायचा आहे. आम्ही तर सदस्य आहेत, आपण इथल्या बॉस आहेत, तुमचीच रूलींग चालेल, परंतु आयुक्त साहेबांना असे करायला नाही पाहीजे होते. त्यासाठी तुमच्याकडून सजेशन असेल, शहर हितासाठी पुढे काय सजेशन असेल? धन्यवाद.

**<u>महापालिका सचिव:–</u>** पहीले प्रश्नोत्तरे आहेत, ३.३६ मिनिटे झालेली आहेत, प्रलंबित प्रश्न क्रमांक २ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे.

**<u>महापालिका सचिव :–</u>** प्रश्न क्र. २ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे.

**<u>प्रश्न क्र.२:–</u>** पालिका सेवा मे कार्यरत सफाई कांमगार श्री. राजेंद्र अढांगळे इन्होने शासन और प्रशासन दोनो की दिशाभूल करके सेवा हस्तगत कि है । उनके उपर की गई कारवाई की विस्तृत जानकारी दि जाये।

अ. सफाई कांमगार श्री. राजेंद्र अढांगळे इन्होने बेकायदेशिर तरिको से सेवा प्राप्त की है इस बात के सभी कागद पत्र और पुरावे पालिका प्रशासन के पास उपलब्ध होते हूऐ आज तक उनके उपर निलंबन और फौजदारी गुन्हा दाखल करने की कारवाई नही की गई इसका कारण क्या है?

ब. शासन राजपत्र में नाम बदल कर एक व्यक्ती राज्यसरकार के अलग अलग दो विभाग मे काम कर सकता है ऐसी कानून तजविज पालिका प्रशासन व्दारा की गई हो तो उस बारे में विस्तृत पूरावे के साथ जानकारी दि जाये।

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u>** दया उत्तर.

**<u>प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरे:–</u>** प्रश्न हा राजेश अडांगळे यांचा आहे,

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u>** राजेश अडांगळे याच्या विषयी प्रश्न आहे ना? मग दया उत्तर.

**<u>प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरे:–</u>** मा. महापौर,मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, मा. सन्माननिय सदस्य, राजेश अडांगळे याच्या बाबत जो आपण प्रश्न विचारला होता, त्याच्या संदर्भात आताच रिसेंट जी कारवाई झालेली आहे. त्यासाठी आयुक्त साहेबांनी, एक फ्रेश पत्र डी.सी.पी. साहेबांना दिले आहे आणि त्यांना सांगितले आहे की, तुम्ही आता पर्यंत गुन्हा दाखल केला नाही. तरी यामध्ये गुन्हा दाखल करण्याची कारवाई लवकरात लवकर करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u>** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, हा सन २०१५ पासूनचा विषय आहे, यामध्ये मी खुलासा केला आहे की, ही व्यक्तिी चुकीच्या पध्दतीने नोकरीवर लागले आहेत, चुकीच्या कागदपत्राच्या आधारे नोकरीवर लागले आहेत. प्रशासनाने पत्येक वेळेस त्याला वाचवले आहे. आज अडीच वर्षापासून हा विषय फक्त फाईलींमध्येच फिरत आहे. त्याच्यावर कोणतीही कारवाई करीत नाही, ज्या नावाने नोकरी घेतली आहे, तो दुस–या नावाने महाराष्ट्र शासनाच्या नोकरीवर लागले आहेत आणि त्याने आपले कागदपत्र महापालिकेला सादर पण केले आहेत, वकिलातर्फे नोटीस पण पाठवली आहे की, आपण माझ्या नोकरीच्या जागेवर येऊ नका? आणि जी माझ्या नावाने नोकरी घेतली आहे, त्या नोकरीवर माझा काहीच संबध नाही. त्याच्या नंतरही आज पर्यंत महापालिकेत नियीमत काम करीत आहत व पगार घेत आहेत. तर मला प्रशासनाला विचाराये आहे की, तो नियमित आहे का? आपण जे कागदपत्र चेक केले होते, ते त्याच्या फेवरमध्ये आहेत का?

**<u>प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरे:–</u>** जी चौकशी झाली आहे, त्या चौकशीनुसार सांगितले आहे की, त्यांची चौकशी केली आहे, हा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा आहे. त्याची फौजदारी चौकशी होईल, त्याच्यावर कारवाई होणे आवश्यक आहे. त्या हिशोबाने आयुक्त साहेबांनी एक फ्रेश लेटर बनवले आहे, ते लेटर पण त्यांना दिले आहे आणि याच्या पहीले पण लेटर दिले आहे. तरी सुध्दा अजून काही कारवाई झाली नाही. आता रिसेंटली डी.सी.पी. साहेबांना ९ तारखेला फ्रेश लेटर दिले आहे. त्यानुसार त्याच्यावर कारवाई करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u>** मा. महापौर, पोलिसांकडून मी जेव्हा चौकशी केली, त्यांनी मला सांगितले आहे की, महापालिकेचा कोणी कर्मचारी ॲथोरिटी लेटर घेऊन येतात आणि सांगतात की, त्याच्यावर एफ.आय.आर. दाखल करा. तर आयुक्त साहेब, ते करीत नाही. ते फक्त गुन्हा दाखल करण्यासाठी अर्ज देत आहेत. त्या अर्जावर ते लोक कारवाई करीत नाहीत, ते मला अडीच वर्षा पासून फिरवत आहेत. अडीच वर्षापासून त्याच्यावर कोणतीही कारवाई केली नाही? आणि आता बोलत आहेत, की फौजदारी गुन्हा दाखल केला आहे, तरी सुध्दा त्याला नोकरीवर का

ठेवले आहे? बी.पी.एम.सी. अॅक्टमध्ये आहे का, जर फौजदारी गुन्हा दाखल केला तर त्याला नोकरीवर ठेवू शकतो? मला कायदयामध्ये सांगा, बी.पी.एम.सी. अॅक्टच्या हिशोबाने?

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** बी.पी.एम.सी. अॅक्टच्या हिशोबानेच त्याची जी चौकशी झाली आहे, त्या चौकशीमध्ये तत्कालीन अतिरिक्त आयुक्त होते, त्यांनी जी चौकशी केली आहे, त्या हिशोबानेच गुन्हा दाखल करायचा आहे. त्याच्या नंतर एक व्यक्ति प्राधिकृत.....

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** त्याच्या नंतर आयुक्त साहेबांनी आपल्यावर जबाबदारी दिली होती, त्या चौकशीमध्ये काय झाले? आपण सहा. आयुक्त आहेत, तुम्ही लोकांनी फाईल बघितल्या नंतर काय केले? आणि बी.पी.एम.सी. अॅक्टमध्ये आहे का? ही गोष्ट स्पष्ट झाल्या नंतर नोकरीवर ठेवायचे. मला त्याचा खुलासा दया.

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** त्याची चौकशी आता पण चालू आहे आणि चौकशी पुर्ण झाल्या नंतरच गुन्हा दाखल करू. त्यासाठी व्यक्ति प्राधिकृत केले आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** चौकशी कशी चालू आहे, मग आपण पोलिसांना पत्र दिले आहे की, गुन्हा दाखल करा.

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** आता पोलिसांना जे दिले आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** आता पण सभागृहाला हे लोक मिस गाईड्स करत आहेत.

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** मी पत्र आपल्याला वाचून दाखवतो. त्यामध्ये काय लिहीले आहे?

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** नाही नाही, फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठीच पोलिसांना पत्र दिले आहे ना? अडीच वर्षापासून काय करीत आहेत?

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** मी आपल्याला वाचून दाखवतो, यामध्ये सर्व डिटेल दिलेले आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** मा. महापौरजी, दोन वेळा हियरींग झाली आहे. त्यामध्ये सर्व खुलासा झाल्या नंतरही आज पर्यंत महासभेमध्ये पण त्याला वाचवत आहेत.

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** त्याची कॉपी मी आपल्याला देतो, आपण एक वेळा वाचून घ्या.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** मी जे विचारत आहे, पहीले ते सांगा, नंतर मी करेल.

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** कारवाई करू ना? आमची कारवाई चालूच आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** मी विचारले की, बी.पी.एम.सी अॅक्टनुसार जी फौजदारी कारवाई आपण करीत आहेत, ते स्पष्ट झाले आहे का? यामध्ये फौजदारी केले आहे. त्या हिशोबाने तुम्ही त्याला नोकरीवर ठेवू शकतात का?

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** नाही, नाही तो संभ्रम निर्माण होतो की, हे फौजदारी आहे किंवा नाही, जो पर्यंत त्याची चौकशी पुर्ण होणार नाही, तो पर्यंत आम्ही मान्य करू शकत नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** कोणाची चौकशी?

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** पोलिसांकडून जो पर्यंत रिपोर्ट येत नाहीत, तो पर्यंत आम्ही करू शकत नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** पोलिस बोलत आहेत की, चौकशी तुम्हांला करायची आहे, आम्हांला करायची नाही. त्यांना फक्त फौजदारी गुन्हा दाखल करायचा आहे. चौकशीसाठी एक वर्षापुर्वी पण पत्र दिले आहे, तिथून परत आले आहे की, आम्ही चौकशी करणार नाही तर चौकशी तुम्हांला पुर्ण करून दयायची आहे.

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** त्यांच्याकडून लिखीत असे काहीच आले नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** आपण एक वर्षापुर्वी पत्र दिले होते ना? ते परत आले आहे ना?

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** नाही, नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** आपण फौजदारी दाखल केले आहे ना?

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** पोलिस स्टेशनकडून लिखीत असे काहीच आले नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** ठिक आहे, आपल्या विभागाने जी चौकशी केली आहे, त्याचे जे कागद आहेत, त्या हिशोबाने मला खुलासा दया की, बी.पी.एम.सी. ॲक्टनुसार आपण त्याला नोकरीवर ठेवू शकतो का?

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** हे मी बघून आपल्याला सांगतो.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** कधी बघून सांगणार, आता पर्यंत काय करीत होते?

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** नंतर सांगतो,

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मी परत तीन महीने थांबू. एक तर महासभा चालत नाही, प्रश्न प्रत्येक वेळी पुढे जात आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** हिवरे साहेब, ही सभागृह संपे पर्यंत सांगा. कारण हा विषय खुप दिवसापासून चालला आहे.

**प्र. सहा. आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** ठिक आहे.

**महापालिका सचिव:—** प्रलंबित प्रश्न क्र.१० हा श्री. भगवान भालेराव यांचा आहे.

**प्रश्न क्र.१०:—** उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा दिनांक २०/८/२०१६ रोजी झाली होती. सदर सभेमध्ये नगररचनाकार श्री. कर्पे यांनी चुकीच्या पध्दतीने वाढीव मजल्याचे (सुधारीत) चटईक्षेत्र निर्देशांकाचे उल्लंघन करुन विकासकाच्या आर्थिक हिताचे प्लॅन मंजूर केले आहेत, अशी चर्चा घडवून आणली. त्या चर्चेच्या शेवटी महापौर तथा मा. पीठासीन अधिकारी यांनी उत्तर देतांना मंजूर केलेला प्लॅन नियमानुसार तपासला किंवा नाही. तसेच उच्च नगररचना विभागामार्फत जोपर्यंत श्री. कर्पे साहेब यांनी केलेल्या प्लॅनची छाननी होत नाही तोपर्यंत स्थगिती दयावी असे आदेश दिले असतांना मग त्या प्लॅनची कामे कोणत्या आदेशाने व कोणाच्या देखरेखीखाली सुरु आहेत याचे उत्तर येणा—या महासभेत मिळावे, जेणेकरुन सदनीका विकत घेणा—याची कोणतीही फसवणूक होणार नाही, ही विंती.

**उत्तर:—** मा. महासभेत तत्कालीन मा. महापौर यांनी दिलेल्या निर्देशानुसार मा. उप आयुक्त (नगररचना) यांनी दिनांक ७/९/२०१६ रोजी ३८ बांधकाम प्रकरणी संबधितांना स्थगिती आदेश दिले होते. त्याची प्रत समिती क्र.१ ते ४ यांना बांधकाम बंद ठेवण्यात यावे या करीता कळविण्यात आले आहे. विकासकांनी या विरूध्द मा. न्यायालय, कल्याण येथे दावा दाखल केला असून मा. न्यायालयाने सदरहू प्रकरणी दिनांक ७/९/२०१६ रोजीच्या स्थगिती आदेशावर तात्पुरती स्थगिती दिलेली आहे, अशी एकुण १७ प्रकरणे आहेत.

१) तसेच एकुण २ प्रकरणांत सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

२) एकुण १५ बांधकाम अद्याप सुरू करण्यात आलेली नाहीत.

३) एकुण ४ बांधकामांचे काम पुर्ण झालेले आहे.

**महापालिका सचिव:—** नगररचनाकार श्री. कर्पे यांनी चुकीच्या पध्दतीने वाढीव मजल्याचे (सुधारीत) चटईक्षेत्र निर्देशांकाचे तो प्रश्न आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ३८ प्लॉनच्या संदर्भातला आहे, कुठे आहेत, श्री. सोनावणे साहेब,

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** उत्तर दिलेले आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** उत्तर काय दिलेले आहे? सगळ कोरा आहे.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** वाटप झालेले आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** हे बघा ना? उत्तर कोरे आहे. कर्पे सारखे तुम्ही मला कोरे करून टाकले का?

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** उत्तर दिले आहे, ते मी वाचून दाखवतो, मा. महासभेत तत्कालीन मा. महापौर यांनी दिलेल्या निर्देशानुसार मा. उप आयुक्त (नगररचना) यांनी दिनांक ७/९/२०१६ रोजी ३८ बांधकाम प्रकरणी संबधितांना स्थगिती आदेश दिले होते. त्याची प्रत समिती क्र.१ ते ४ यांना बांधकाम बंद ठेवण्यात यावे या करीता कळविण्यात आले आहे. विकासकांनी या विरूध्द मा. न्यायालय, कल्याण येथे दावा दाखल केला असून मा. न्यायालयाने सदरहू प्रकरणी दिनांक ७/९/२०१६ रोजीच्या स्थगिती आदेशावर तात्पुरती स्थगिती दिलेली आहे, अशी एकुण १७ प्रकरणे आहेत.

१) तसेच एकुण २ प्रकरणांत सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

२) एकुण १५ बांधकाम अद्याप सुरू करण्यात आलेली नाहीत.

३) एकुण ४ बांधकामांचे काम पुर्ण झालेले आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आता ४ तुम्हीच सांगतात, बाकीचे मी बोलत नाही, ही जी चार बांधकामे झालेली आहेत, त्यांच्यावर काय कारवाई केली? जर त्या परवानग्या चुकीच्या आहेत, स्थगिती आहेत, सगळया गोष्टी आहेत, ते आता त्यांनी वाढीव बांधकाम केलेले आहे. त्यांच्यावर आपण काय कारवाई केली?

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** त्यांना सुनावणी दयावी लागणार, कारण आपल्याला जर काही कारवाई करायची असेल, तर त्यांना आपण सुनावणी देवून त्यांचे म्हणणे ऐकुन घेतले पाहीजे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** किती दिवस? म्हणजे हा प्रश्न यायला जवळ जवळ एक वर्ष लागला आहे.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** यावर आयुक्त साहेबांकडे सुनावणीसाठी वेळ....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आयुक्तांना त्याच्यामध्ये इंट्रेस्ट नाही, आयुक्तांना नविन कामासाठी इंट्रेस्ट आहे.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** नाही नाही याच प्रकरणामध्ये....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** जुन्या कामांमध्ये इंट्रेस्ट नाही. नविन कामे जी त्याच्यामध्ये आर्थिक सोर्स येणार आहे, महानगरपालिकेला त्याचा फायदा होणार आहे, त्या कामांमध्ये त्यांना इंट्रेस्ट नाही. शब्दांचा अर्थ का वेगळा घेता तुम्ही? नविन कामे म्हणजे ज्याच्यामध्ये जर महानगरपालिकेला उत्पन्न वाटत असेल, अशा कामांमध्ये त्यांना इंट्रेस्ट नाही.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** नाही आपण आता उपायुक्तांकडे सुनावणी ठेवण्यासाठी मी त्यांच्याशी बोलतो लवकरात लवकर ठेवायला.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मग हा प्रश्न स्थगित ठेवा तुम्ही ते पुर्ण लवकरात लवकर करा आणि तुम्ही त्याच्यावर काय कारवाई करणार आहेत. हा प्रश्न स्थगित ठेवा पुढच्या महासभेला येऊ दया.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** सुनावणी पुर्ण झाल्यावर आदेश पारीत होतील, त्यानुसार कारवाई केली जाईल.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** नाही, नाही सुनावणी, परंतु तुम्ही येऊन दोन महीने झाले आहेत. तुम्ही येऊन किती महीने झाले आहेत?

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** दिड महीना झाला आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** दिड महीना झाला आहे ना? मग दिड महीन्यात आम्ही तुमच्याकडे लेखी पत्र पण दिले आहेत. प्रश्न तर आहेत, पण लेखी पत्र पण दिले आहेत.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** असे आहे की, १००० मिटर पर्यंतच्या बांधकामांना परवानग्यांना मंजूरी देण्याचे अधिकार उपायुक्तांचे आहेत, त्याच्या नंतर आयुक्त साहेबांचे आहेत. तर मला तर त्यांच्याकडे पुट अप करावे लागते, त्यांच्याकडून यस झाले तर मला सुनावणी घेण्यास काहीच प्रॉब्लेम नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मग तो पर्यंत हा प्रश्न एक महीनाभर ठेवायचा का? ठिक आहे, मॅडम हा प्रश्न स्थगित ठेवा.

**महापालिका सचिव:— प्रश्न क्र. १० राखुन ठेवण्यात येत आहे.** आपला पण मिटींग पर्यंत, मा. सदस्य, पहीला जो प्रश्न क्र.२ श्री. भारत राजवानी यांचे पण मिटींग पर्यंत उत्तर मिळेल, ठिक आहे, हा प्रश्न पण राखुन ठेवण्यात येत आहे.

**महापालिका सचिव:—** प्रलंबित प्रश्न क्र. ११ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे.

**?** **प्रश्न क्र. ११:—** उल्हासनगर मनपा के गत कार्यालय में कार्यरत जिन मनपा सदस्योंने पार्टी बदलकर फरवरी, २०१७ का चुनाव लढा, उनकी पक्षांतर को लेकर अपात्रता हो सकती है क्या?

अ. उल्हासनगर मनपा के गत कार्यकाल में कौनकौनसे सदस्योंने फिरसे चुनाव लडा? कौनकौनसे कितने सदस्योंने अपनी गत कार्यकाल की पार्टी बदलकर चुनाव लडा?

ब. इनमेंसे कितने सदस्योंने अपने गत कार्यकाल के पद का इस्तिफा आयुक्त महोदय को सौंपा था और आयुक्त महोदय ने उसपर क्या कारवाई की?

क. इन सदस्यों के अपात्र घोषित करने हेतू मनपा को शिकायते प्राप्त हुई है क्या? उनकपर मनपा प्रशासन ने क्या कारवाई की?

ड. फरवरी और मार्च माह में कितने सदस्यों को नगरसेवक मानधन की राखी दी गई? उनके नाम क्या?

**उत्तर:—** उल्हासनगर महानगरपालिका नियम १९९७ महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजा विषयी नियम ५ ब) अन्वये पुढील प्रकारचा कोणताही प्रश्न विचारता कामा नये.

एक) ज्यात मत व्यक्त करण्याविषयी किंवा तात्विक कायदे विषयक प्रश्नावर निर्णय देण्याविषयी मागणी करण्यात आली असेल किंवा जो गृहत गोष्टींच्या अनुषंगाने असेल असा कोणताही प्रश्न. आपल्या अवलोकनार्थ सादर.

अ. यामध्ये एकुण ३१ सदस्यांनी परत निवडणूक लढविली. सोबत यादी जोडली आहे. तसेच कोणकोणत्या सदस्यांनी पार्टी बदलुन निवडणूक लढविली त्याची यादी सोबत जोडली आहे.

ब. आयुक्त महोदयांकडे राजीनामा दिला जात असतो. परंतु त्याबाबतचा कोणताही अहवाल या कार्यालयास आयुक्त महोदयांकडुन प्राप्त झालेला नाही.

क. श्री. राज असरोंडकर, संस्थापक, कायदयाने वागा यांच्याकडुन मा. आयुक्त महोदयांकडे तक्रार प्राप्त झाली होती. परंतु सदर पत्रात अनेक मुद्दयांपैकी ही एक तक्रार होती. परंतु सदर बाब ही मा. आयुक्तांच्या कार्यकक्षेत येत नाही.

ड. फेब्रुवारी व मार्च महिन्यातील मानधन सर्व सदस्यांना देण्यात आले आहे. त्याची यादी सोबत जोडली आहे

| अ.क्र. | या वर्षी निवडून आलेले मागील वर्षाचे सदस्य | २०१२ नंतर २०१७ मध्ये पक्ष बदलला असेल तर तो पक्ष |
|---|---|---|
| १ | श्रीमती अर्चना गोकुळ करनकाळे | |
| २ | श्रीमती जयश्री पाटील | साई पक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| ३ | श्री. हरेश जग्यासी | |
| ४ | श्रीमती मिनाकौर लबाना | |
| ५ | श्री. जमनादास पुरस्वानी | |
| ६ | श्रीमती आशा बि–हाडे | आरपीआय पक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| ७ | श्रीमती मिना आयलानी | |
| ८ | श्रीमती रेखा ठाकुर | राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षतुन भारतीय जनता पक्ष |
| ९ | श्रीमती जया माखिजा | |
| १० | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| ११ | श्री. राजेश वदारिया | कॉग्रेस पक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| १२ | श्री. राजेश वानखेडे | अपक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| १३ | श्रीमती मिना सोनेजी | कॉग्रेस पक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| १४ | श्री. विजय चाहु पाटील | अपक्षातुन भारतीय जनता पक्ष |
| १५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | |
| १६ | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | |
| १७ | श्रीमती चरणजितसिंहकौर भुल्लर | |
| १८ | श्रीमती पुष्पा बागुल | आरपीआय पक्षातुन शिवसेना पक्ष |
| १९ | श्रीमती राजश्री चौधरी | |
| २० | श्रीमती शुभांगी बेहनवाल | राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षतुना शिवसेना पक्ष |
| २१ | श्री. रमेश चव्हाण | |
| २२ | श्रीमती लिलाबाई आशान | |
| २३ | श्री. सुनिल सुर्वे | अपक्षातुन शिवसेना पक्ष |
| २४ | श्री. धनंजय बोडारे | |
| २५. | श्रीमती वसुधा बोडारे | |

| | | |
|---|---|---|
| २६. | श्री. भगवान भालेराव | |
| २७ | श्रीमती इंदिरा उदासी | साई पक्षातुन अपक्ष |
| २८ | श्री. दिपक सिरवानी | |
| २९ | श्रीमती कांचन लुंड | कॉग्रेस पक्षातुन साई पक्ष |
| ३० | श्रीमती दिप्ती दुधानी | कॉग्रेस पक्षातुन साई पक्ष |
| २१ | श्री. सतरामदास जेसवानी | |

**माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये मानधन दिलेल्या सदस्यांची यादी**

| अ. क्र. | प्रभाग क्र. | पालिका सदस्यांचे नाव |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | १ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर |
| २ | | श्री. राजेश रामसिंग कंडारे |
| ३ | २ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील |
| ४ | | श्री. राम (चार्ली) पारवाणी |
| ५ | ३ | श्रीमती अर्चना गोकूळ करणकाळे |
| ६ | | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड |
| ७ | ४ | श्रीमती मीना कौर अजित सिंग लबाना |
| ८ | | श्री. जमनादास खुबचंद पुरसवाणी |
| ९ | ५ | श्रीमती आशा नाना बिराडे |
| १० | | श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग |
| ११ | ६ | सौ. वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील |
| १२ | | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर |
| १३ | ७ | श्रीमती पुष्पा मिलींद (नाना) बागुल |
| १४ | | डॉ. महेश गजानन गावडे |
| १५ | ८ | श्रीमती अनिता संतोष तरे ——— **(अनर्ह मानधन दिले** |

| | | |
|---|---|---|
| | | **नाही.)** |
| १६ | | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के ——— **(अनर्ह मानधन दिले नाही.)** |
| १७ | ९ | श्री. विजय खंडु सुपाळे |
| १८ | | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी |
| १९ | १० | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल |
| २० | | श्री. नरेंद्र वामन (रवीभाऊ) दवणे |
| २१ | ११ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी |
| २२ | | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २३ | १२ | डॉ. नीना प्रकाश नाथानी |
| २४ | | श्रीमती मीना कुमार आयलानी |
| २५ | १३ | श्रीमती रेखा ए. ठाकुर |
| २६ | | श्री. राजेश नानिकराम वधरिया |
| २७ | १४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी |
| २८ | | श्रीमती जया प्रकाश माखीजा |
| २९ | १५ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा |
| ३० | | श्रीमती ज्योती सुरेश कालानी |
| ३१ | १६ | श्री गणपत गोविंद एडके |
| ३२ | | श्रीमती शशिकला शिवाजी आवारे |
| ३३ | १७ | श्री भगवान शंकर भालेराव |
| ३४ | | श्रीमती लक्ष्मी सुरेद्र सिंग |
| ३५ | १८ | श्रीमती मिनू राजकुमार दासानी |
| ३६ | | श्री उमेश (ओमी) सुरेश कालानी |
| ३७ | १९ | श्रीमती विनिता संजय भटिजा |
| ३८ | | श्री. नरेंद्र ठाकुर (कुमारी) |
| ३९ | २० | श्रीमती आशा प्रभुनाथ गुप्ता |
| ४० | | श्री सुजीतकुमार के. चक्रवर्ती |

| | | |
|---|---|---|
| ४१ | २१ | श्री गोदुमल नारायणदास किशनानी |
| ४२ | | श्रीमती कमला गोदुमल किशनानी |
| ४३ | २२ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी |
| ४४ | | श्री दिपक लछमनदास सिरवानी |
| ४५ | २३ | श्रीमती पंचशीला नाना पवार |
| ४६ | | श्रीमती इसरद सऊद खान |
| ४७ | २४ | श्री राजकुमार जग्यासी |
| ४८ | | श्रीमती सोनिया राजकुमार जग्यासी |
| ४९ | २५ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ५० | | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ५१ | २६ | श्रीमती शकुंतला जग्यासी |
| ५२ | | श्री धनंजय बाबूराव बोडारे |
| ५३ | २७ | श्रीमती जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ५४ | | श्री सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ५५ | २८ | श्रीमती जयश्री गजानन कांबळी **(मयत)( मानधन दिले नाही.)** |
| ५६ | | श्री सुनिल मुकुंद सुर्वे |
| ५७ | २९ | श्रीमती मंदा सागर सोनकांबळे |
| ५८ | | श्री सुरेश मधुकर जाधव |
| ५९ | ३० | ैला पांडुरंग सोनताटे |
| ६० | | श्री विजय रामभाऊ तायडे |
| ६१ | ३१ | श्रीमती अनिता सचिन भानुशाली |
| ६२ | | श्री रमेश महादेव चव्हाण |
| ६३ | ३२ | श्रीमती पिंकी मुरलीधर उदासी **(सदस्यांच्या मागणीनुसार माहे फेब्रुवारीचे मानधन याच महिन्यात देण्यात आले..)** |

| | | |
|---|---|---|
| ६४ | | श्रीमती कांचन अमर लुंड |
| ६५ | ३३ | श्रीमती दिप्ती नवीन दुधानी **((सदस्यांच्या मागणीनुसार माहे फेब्रुवारीचे मानधन याच महिन्यात देण्यात आले..)** |
| ६६ | | श्री सतराम फ. जेसवानी |
| ६७ | ३४ | श्रीमती जया मोहन साधवानी |
| ६८ | | श्रीमती पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी |
| ६९ | ३५ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| ७० | | श्री राजेश देवेंद्र वानखेडे |
| ७१ | ३६ | श्रीमती मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| ७२ | | श्री गुरूनो भिकोमल वलेचा |
| ७३ | ३७ | श्री विजय चाहु पाटील |
| ७४ | | श्रीमती माया हरेश चावला |
| ७५ | ३८ | श्रीमती समिधा आदिनाथ कोरडे |
| ७६ | | श्री जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| ७७ | ३९ | श्रीमती अपेक्षा विकास पाटील |
| ७८ | | श्री प्रधान धर्मा पाटील |
| | नामनिर्देशित सदस्य | श्री. मनोज दिलीप सयानी |
| ८० | | श्री. सन्मुख ग्यानचंद मनवानी |
| ८१ | | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ८२ | | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचदांनी |
| ८३ | | श्री. बी. बी. मोरे |

## माहे मार्च २०१७ मध्ये मानधन दिलेल्या सदस्यांची यादी

| अ. क्र. | प्रभाग क्र. | पालिका सदस्यांचे नाव |
|---|---|---|
| **१** | **२** | **३** |
| १ | १ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर |

| | | |
|---|---|---|
| २ | | श्री. राजेश रामसिंग कंडारे |
| ३ | २ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील |
| ४ | | श्री. राम (चार्ली) पारवाणी |
| ५ | ३ | श्रीमती अर्चना गोकूळ करणकाळे |
| ६ | | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड |
| ७ | ४ | श्रीमती मीना कौर अजित सिंग लबाना |
| ८ | | श्री. जमनादास खुबचंद पुरसवाणी |
| ९ | ५ | श्रीमती आशा नाना बिराडे |
| १० | | श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग |
| ११ | ६ | सौ. वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील |
| १२ | | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर |
| १३ | ७ | श्रीमती पुष्पा मिलींद (नाना) बागुल |
| १४ | | डॉ. महेश गजानन गावडे |
| १५ | ८ | श्रीमती अनिता संतोष तरे **(अनर्ह मानधन दिले नाही.)** |
| १६ | | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के **(अनर्ह मानधन दिले नाही.)** |
| १७ | ९ | श्री. विजय खंडु सुपाळे |
| १८ | | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी |
| १९ | १० | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल |
| २० | | श्री. नरेंद्र वामन (रवीभाऊ) दवणे |
| २१ | ११ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी |
| २२ | | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २३ | १२ | डॉ. नीना प्रकाश नाथानी |
| २४ | | श्रीमती मीना कुमार आयलानी |
| २५ | १३ | श्रीमती रेखा ए. ठाकुर |
| २६ | | श्री. राजेश नानिकराम वधरिया |
| २७ | १४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी |
| २८ | | श्रीमती जया प्रकाश माखीजा |
| २९ | १५ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा |

| | | |
|---|---|---|
| ३० | | श्रीमती ज्योती सुरेश कालानी |
| ३१ | १६ | श्री गणपत गोविंद एडके |
| ३२ | | श्रीमती शशिकला शिवाजी आवारे |
| ३३ | १७ | श्री भगवान शंकर भालेराव |
| ३४ | | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग |
| ३५ | १८ | श्रीमती मिनू राजकुमार दासानी |
| ३६ | | श्री उमेश (ओमी) सुरेश कालानी |
| ३७ | १९ | श्रीमती विनिता संजय भटिजा |
| ३८ | | श्री. नरेंद्र ठाकुर (कुमारी) |
| ३९ | २० | श्रीमती आशा प्रभुनाथ गुप्ता |
| ४० | | श्री सुजीतकुमार के. चक्रवर्ती |
| ४१ | २१ | श्री गोदुमल नारायणदास किशनानी |
| ४२ | | श्रीमती कमला गोदुमल किशनानी |
| ४३ | २२ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी |
| ४४ | | श्री दिपक लछमनदास सिरवानी |
| ४५ | २३ | श्रीमती पंचशीला नाना पवार |
| ४६ | | श्रीमती इसरद सऊद खान |
| ४७ | २४ | श्री राजकुमार जग्यासी |
| ४८ | | श्रीमती सोनिया राजकुमार जग्यासी |
| ४९ | २५ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ५० | | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ५१ | २६ | श्रीमती शकुंतला जग्यासी |
| ५२ | | श्री धनंजय बाबूराव बोडारे |
| ५३ | २७ | श्रीमती जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ५४ | | श्री सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ५५ | २८ | श्रीमती जयश्री गजानन कांबळी **(मयत)( मानधन दिले नाही.)** |
| ५६ | | श्री सुनिल मुकुंद सुर्वे |
| ५७ | २९ | श्रीमती मंदा सागर सोनकांबळे |
| ५८ | | श्री सुरेश मधुकर जाधव |

| | | |
|---|---|---|
| ५९ | ३० | ौला पांडुरंग सोनताटे |
| ६० | | श्री विजय रामभाऊ तायडे |
| ६१ | ३१ | श्रीमती अनिता सचिन भानुशाली |
| ६२ | | श्री रमेश महादेव चव्हाण |
| ६३ | ३२ | श्रीमती पिंकी मुरलीधर उदासी |
| ६४ | | श्रीमती कांचन अमर लुंड |
| ६५ | ३३ | श्रीमती दिप्ती नवीन दुधानी |
| ६६ | | श्री सतराम फ. जेसवानी |
| ६७ | ३४ | श्रीमती जया मोहन साधवानी |
| ६८ | | श्रीमती पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी |
| ६९ | ३५ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| ७० | | श्री राजेश देवेंद्र वानखेडे |
| ७१ | ३६ | श्रीमती मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| ७२ | | श्री गुरूनो भिकोमल वलेचा |
| ७३ | ३७ | श्री विजय चाहु  पाटील |
| ७४ | | श्रीमती माया हरेश चावला |
| ७५ | ३८ | श्रीमती समिधा आदिनाथ कोरडे |
| ७६ | | श्री जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| ७७ | ३९ | श्रीमती अपेक्षा विकास पाटील |
| ७८ | | श्री प्रधान धर्मा पाटील |
| | नामनिर्देशित सदस्य | श्री. मनोज दिलीप सयानी |
| ८० | | श्री. सन्मुख ग्यानचंद मनवानी |
| ८१ | | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ८२ | | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचदांनी |
| ८३ | | श्री. बी. बी. मोरे |

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** ठिक आहे,

**महापालिका सचिव:–** प्रलंबित प्रश्न क्र. १२ हा श्री. सतरामदास जेसवानी यांचा आहे.

इनको मिला हुआ काम किये जाने के लिये सफाई विभाग में कोई अन्य सफाई कामगार भेजा हुआ है क्या

**?**

**प्रश्न क्र. १२:–** सफाई विभाग की ओर से मिले सफाई कामगार कब रिटायर हुए? कब मृत्यु हुए? या कब से गैरहजिर है? इसकी जानकारी महासभा मे दिलाये ताकी उसपर चर्चा हो!

हिरामन राजु आनंदा कब रिटायर हुए!

लक्ष्मीबाई सफाई कामगार की कब मृत्यू हूई?

दिपक लोखंडे कब से गैरहाजिर है!

**उत्तर:–** राजु आनंदा वाघमारे सफाई कामगार दिनांक २९/०४/२०१५ रोजी वैद्यकिय सेवा निवृत्त झाले आहे.

हिरामन राजु आनंदा नावाचा कोणताही सफाई कार्मचारी नाही सदर कर्मचारी यांचे नांव हिरामण कोंडीबा वाळेकर असे असुन हा कर्मचारी दिनांक ३१/०३/२०१५ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाले आहे.

लक्ष्मी राजु लोखंडे सफाई कामगार यांचा दिनांक १८/०२/२०१६ रोजी  मृत्यु झाला आहे.

दिपक बबन लोखंडे सफाई कामगार दिनांक २१/१०/२०१५ रोजी पासुन टि.बी. लिव्ह वर आहे.

या नही?

सदर उक्त कर्मचाऱ्यांच्या जागेवर अन्य कोणतेही कामगार उपलब्ध झालेले नाही. तरी प्रभागातील सफाई कामगारामार्फत प्रभागातील साफ—सफाईचे काम करून घेण्यात येत असते.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** प्रश्न आठवत नाही, जरा लक्षात आणून दया. खुप वेळ झाला आहे, महीने, वर्ष.

**महापालिका सचिवः—** मागच्या मिटींगमध्ये पण यावर अर्धी चर्चा झाली होती, सफाई विभाग की ओर से मिले सफाई कामगार कब रिटायर हुए? कब मृत्यु हुए? या कब से गैरहजिर है? इसकी जानकारी महासभा मे दिलाये ताकी उसपर चर्चा हो! हिरामन राजू आनंदा कब रिटायर हुए! लक्ष्मीबाई सफाई कामगार की कब मृत्यू हूई? दिपक लोखंडे कब से गैरहाजिर है!

इनको मिला हुआ काम किये जाने के लिये सफाई विभाग में कोई अन्य सफाई कामगार भेजा हुआ है

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** आम्ही जो प्रश्न देतो, त्याचे उत्तर दोन महीने तीन माहीने, सहा महीन्यामध्ये दयायला पाहीजे.

**महापालिका सचिवः—** याचे उत्तर दिले आहे आणि आम्ही तुम्हांला प्रत पण दिली आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** थोडे ऐकुन घ्या, यामध्ये सुधारणा पण झाल्या पाहीजेत. जर वर्षानुवर्षे कामगार गैरहजर राहत असतात, आता पण दोन कामगार काही वर्षापासून येत नाहीत. अजय आणि अंकुश ते कुठे फिरत आहेत? नाही तर नगरसवेकांना पण असे प्रशिक्षण दया की, असे शिकवा की, आम्हांला झाडू मारायला येईल. आम्हांला पण एक खाकी ड्रेस शिवून दया.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** मा. महापौरजी, माझी पण सभागृहाला एक विनंती आहे की, आपण जेव्हा पासून महापौर पदाचा चार्ज घेतला आहे. तेव्हापासून एप्रिल पासून तर आज पर्यंत प्रश्नोत्तरे, जे प्रश्न आलेले आहेत, त्यातील फक्त मला वाटते की, दहा ते बारा प्रश्न सभेमध्ये आलेले आहेत. संपुर्ण वर्षामध्ये फक्त दहा प्रश्नाचे उक्कल होत असेल तर आज जवळ पास ६० ते ७० प्रश्न प्रलंबित आहेत. माझी विनंती अशी आहे की, केवळ प्रश्नात्तरासाठी एक विशेष महासभा ठेवण्यात यावी. जेणेकरून या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळू शकतील आणि येणा—या बाकीच्या प्रश्नांना त्याचे उत्तर मिळू शकेल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, मा. आयुक्त महोदया, हा जो प्रश्नोत्तरांचा विषय आहे, यामध्ये असे व्हायला पाहीजे की, आपला जो प्रश्नोत्तरांसाठी अर्ध्या तासाची जी वेळ असते. प्रत्येक सदस्य आपला प्रश्न विचारत असतो, त्याचे उत्तर त्यांना त्वरीत मिळते. त्याच्या उत्तराने जर त्यांचे समाधान होत नसेल तर संबंधित विभागामध्ये जाऊन, संबंधित अधिका—याला भेटून त्याचे काय निर्णय होतो, ते करायला पाहीजे. प्रत्येक प्रश्नाच्या विषयी या महासभेमध्ये चर्चा झाली पाहीजे. जर आपल्याला असे वाटते की, आपल्याला प्रश्नाचे उत्तर मिळाले आणि त्या प्रश्नाचे समाधान झाले नाही. तर संबंधित विभागामध्ये जायला पाहीजे, संबंधित अधिका—याला भेटायला पाहीजे. दोन महीने, तीन महीने विचार करण्याची आवश्यकता काय आहे? यासाठी मी सर्व सदस्यांना निवेदन करतो की, जे पण प्रश्न येोतात, त्याचे उत्तर प्रशासनाकडून आपल्याला मिळाल्या नंतर जर त्या उत्तराने आपले समाधान होत नाही, तेव्हा आपण महासभेमध्ये चर्चा करू शकतो. परंतु जर दोन किंवा तीन महीन्यापेक्षा वेळ जास्त होत असेल तर आपण संबंधित अधिका—याकडे जा आणि त्या प्रश्नाचे उत्तर घ्या. नंतर परत समाधान होत नसेल तर महासभेमध्ये चर्चा करा. त्यासाठी संपुर्ण दिवस सभा घेण्याची आवश्यकता नाही.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** महापौर साहेबा, मला खुप आनंद झाला की, आपले सभागृह नेता, माझा प्रश्न आहे, मला बोलू दया. नगरसेवक लाचारीमुळे प्रश्न टाकतात, लाचारीमुळे, मी आपल्याकडे मागणी करतो की, तुम्ही आपले सभागृह नेता आहेत, श्री. जमनादास पुरस्वानी त्यांनी कृपया करून सर्व नगरसेवकाचे क्लास घेण्यात यावे. आम्हांला शिकवण्यासाठी, आम्हांला समजावण्यासाठी, नियम काय आहे? त्याची माहीती दयाल तर खुप उपकार होतील. भविष्यामध्ये कोणीही नगरसेवक असे प्रश्न करणार नाही आणि त्याची गरज पण पडणार नाही. तर जमनादास पुरस्वानी सभागृह नेता आहेत, त्यांना माझी हात जोडून विनंती आहे की, जसे महाबळेश्वर येथे प्रशिक्षण दिले जाते, गोवा येथे प्रशिक्षण दिले जाते, सभागृह नेताजी आपण माहीती दया, आम्हाला तुमच्याकडून काही शिकायचे आहे, काही समजून घ्यायचे आहे. मला माहीत नाही, मी अशिक्षित व्यक्ती आहे. मी पहीले वेळेस निवडून आलो आहे, तरी कृपया असे जे जुने नगरसेवक आहेत, ज्यांना जास्त माहीती आहे, त्यांनी आमचे क्लास घ्यावे आणि त्याची जर फी पाहीजे असेल तर ती फी पण दयायला आम्ही तयार आहेत. मानधन भत्तेमधून आपली फी पण भरायला

तयार आहे, क्लासेस घेण्यासाठी, बाकी आपण दिशाभुल करीत आहेत, कृपया आपण दिशाभुल करू नका? आम्हांला चांगल्या प्रकारे शिक्षण दयावे, आम्हांला माहीती देण्यात यावी आणि प्रशासनाने असे काम करावे की, आम्हांला प्रश्न टाकायची गरजच लागणार नाही, आम्हांला लक्षवेधी टाकण्याची गरज पडणार नाही. उप महापौर साहेब, आपण तर खुपच अनुभवी आहेत, कृपया प्रशासन चांगल्या प्रकारे चालावे, सर्व नगरसेवकांना ....

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय दादाजी...

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** एक मिनीट, मला बोलू दया, मध्येच थांबवू नका, मी एक वर्षापासून दु:खी आहे, आज सुध्दा आमच्याकडे दोन कर्मचारी कामावर येत नाहीत. एकाचे नाव आहे, अजय अणि दुस—याचे नाव आहे, अंकुश हे फक्त एक वार्डमध्ये आणि एका पॅनलमध्ये चार वार्ड आहेत. चार वार्डमध्ये कमीत कमी आठ कर्मचारी कामावर येत नाहीत. हे काम कोण करेल? नगरसेवक झाडू हातामध्ये घेऊन सफाई करेल? नगरसेवक हातामध्ये फावडा घेऊन काम करेल? हे शक्य नाही. तरी कृपया करून जी सत्यता आहे, त्याच्यावर आपण लक्ष दयावे आणि असे आदेश दया की, भविष्यामध्ये कोणीही नगरसेवकांना प्रश्न टाकण्याची गरज पडणार नाही, लक्षेवधी टाकण्याची गरज पडणार नाही, धन्यवाद.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय दादाजी, आपला मानसन्मान सर्व महासभा करते, तुमच्या प्रश्नाचे उत्तर श्री. देहेरकर साहेब, हे आवश्यक देतील, श्री. देहेरकरजी दादाजीची जी समस्या आहे, ती लवकरात लवकर दुर करण्याचा प्रयत्न करा. दादाजीचा सन्मान महासभेमध्ये सर्वांत जास्त आहे, असे मी तुम्हांला आदेश देते.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्माननिय सदस्य, सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे, श्री. राजू आनंदा कधी सेवानिवृत्त झाले असे विचारले आहे, खरे तर या नावाचे कोणीच सफाई कर्मचारी नाही. त्या कर्मचा—याचे नाव आहे, श्री. राजू आनंदा वाघमारे, ते दिनांक २९/४/२०१५ ला वैद्यकिय कारणास्तव सेवानिवृत्त झाले आहेत.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** आपण चुकीची माहीती देत आहेत, हिरामण आपल्याकडे कामगार म्हणून होते, आणि सेवानिवृत्त झाले आहेत, हे सर्व रेकॉर्डवर आहे. कृपया करून चुकीची माहीती देवू नका? सविस्तर माहीती घेऊन बोला, मी दररोज सकाळी ७.०० वाजता हजेरीच्या वेळेस जात असतो, मला हे सर्व माहीत आहे, धन्यवाद.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:—** आमच्या रेकॉर्डवर श्री. हिरामण कोडींबा वालेकर आहे आणि दुसरा प्रश्न आहे की, श्रीम. लक्ष्मी सफाई कामगाराची मृंत्यु कधी झाले? लक्ष्मी राजू लोखंडे, सफाईकामगार यांचा दिनांक १८/२/२०१६ रोजी मृंत्यु झालेला आहे. श्री. दिपक लोखंडे कधीपासून गैरहजर आहेत? श्री. दिपक बबन लोखंडे, सफाई कामगार दिनांक २९/१०/२०१५ पासून टी.बी. झाल्यामुळे ते अजून पर्यंत सुट्टीवर आहेत.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** मग त्याचे जागेवर काम कोण करेल? माझा विचारण्याचा जो उद्‌देश होता, त्याच्या जागेवर काम कोण करेल साहेब? त्याच्या जागेवर काम करण्यासाठी कोणी तरी दयायला पाहीजे? कारण की साफसफाई प्रत्येक एरियामध्ये होणे गरजेचे आहे. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा प्रश्न टाकला होता? आणि याच्या पासून माझा कोणताही फायदा होणार नव्हता? तरी कृपया करून प्रशासनाने जागे व्हावे. सफाई कामगार सफाई करण्यासाठी दिले आहेत आणि वर्षाभर येणार नाहीत तर नगरसेवकांचे मन दु:खी होते, पब्लिकचे मन दु:खी होते, साफसफाई न झाल्यामुळे? त्यामुळे हात जोडून संपुर्ण प्रशासनाला माझी विनंती आहे की, आपल्या कर्तव्याचे संपुर्ण पालन करा आणि लोकांना तक्रार करण्याची गरज लागणार नाही आणि नगरसेवकांना शिव्या खाव्या लागणार नाही, धन्यवाद.

**महापालिका सचिव:—** प्रश्न क्रमांक १३ हा श्री. सुनिल सुर्वे यांचा आहे, सध्या ते उपस्थित नाहीत, कोणाला जर प्राधिकृत केले असेल तर बोलू शकतात. मग हा प्रश्न आता नोंद केली जाईल.

**प्रश्न क्र. १३:—** खालील ठिकाणी अनाधिकृत बांधकामे झाल्याचे निदर्शनास आले आहे.

१) कुमार मटनवाल्याच्या मागे, सोनार गल्ली जवळ, उल्हासनगर—१ येथे आर.सी.सी. पध्दतीचे अनाधिकृत बांधकाम.

२) ढोलुमल दरबार जवळ, उल्हासनगर–२ येथे आरसीसी पध्दतीचे अनधिकृत बांधकाम, त्यान्वये खालील प्रश्नांची समाधानकारक उत्तरे येणा–या महासभेत मिळावीत ही विनवंती.

३) सोनार गल्ली, उल्हासनगर–२ येथे टीअर गर्डर पध्दतीचे अनधिकृत बांधकाम.

वरील बांधकामाबाबत खालीलप्रमाणे प्रश्न उपस्थित करुन त्यांची समाधानकारक उत्तरे मिळावीत.

१. सदर इमारत बांधकामास महापालिकेने बांधकाम परवानगी दिली आहे का?
२. बांधकाम परवानगी दिली असल्यास बांधकाम परवानगी क्रमांकाची माहिती मिळावी?
३. सदर बांधकामाची पाहणी संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी केली आहे का?
४. सदरचे बांधकाम अनधिकृत असल्यास त्यावर महापालिकेने कोणती कोणती कारवाई केली?
५. अनधिकृत बांधकामावर कारवाई न केल्यास संबंधीत अधिका–यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे अथवा येणार आहे?

**उत्तर :–** १) कुमार मटनवाल्याच्या मागे सोनार गल्ली जवळ उल्हासनगर–१ येथिल बांधकामास नगररचना विभागाकडून परवानगी क्र.उमपा/नरवि/बांप /१०९/१०/६३ दिनांक १४/४/१६ प्राप्त झाले आहे.

तथापी मंजूर बांधकांमा व्यतिरिक्त वाढीव आहे किंवा कसे या बाबतचा अहवाल मिळणेसाठी नगररचना विभागास उमपा/प्रसर/६८/१७ अन्वये पत्र दिण्यात आले आहे.

२) ढोलूराम दरबारा जवळ उल्हासनगर–१ येथिल आर.सी.सी. पध्दतीचे अनाधिकृत बांधकाम दि. ६/५/१७ रोजी निष्काशित करण्यात आले आहे.

३) सोनार गल्ली उल्हासनगर–२ येथिल टीयर गटरचे बांधकामांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

२६४/१/ व ४७८ अन्वये नोटीस बजावण्यात आलेली आहे व निष्कासनाच्या कार्यवाहीसाठी प्रस्तावित आहे.

परिपुर्ण पत्ता नसल्याने संगणकीय अभिलेख पडताळणी करता येत नाही. त्यामुळे सदर ठिकाणच्या बांधकामांना परवानगी दिल्याची तपासणी करता येत नाही.

**महापालिका सचिव:–** प्रश्न क्र. १४ हा पण श्री. सुनिल सुर्वे यांचा आहे, पण याचे उत्तर प्राप्त नाही, त्यामुळे हा पेडींग ठेवण्यात येत आहे. उत्तरच दिले नाही, उत्तर दिल्या नंतर काढून टाकण्यात येते.

प्रश्न क्र. १५ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे.

**प्रश्न क्र. १५:–** ब्लॉक नं.सी–२६, रूम नं. १०० यह जमिन के ऊपर माजी नगररचना समिति सभापती श्रीमती जया साधवानी इन्होने नगररचना विभाग उल्हासनगर महानगरपालिका बांधकाम परवानगी क्रं.१९४/१०/०३ दिनांक १६/१०/२०१० नुसार विकसीत की गई इमारत बांधकाम में किऐ गऐ अतिक्रमण के बारे में जानकारी मिलने हेतू दिनांक २६/०१/२०१६ ओर दिनांक ०९/०२/२०१६ को तत्कालीन पालिका सदस्य श्रीमती पुष्पा राजवानी इन्होने दिऐ हुऐ निवेदन के ऊपर आज तारिख तक क्या कारवाई की गई है। इस बारे में विस्तृत जानकारी दि जाए।

अ) इस इमारत के ऊपर माजी नगररचना सभापती, श्रीमती जया साधवानी इन्होने टॅरेस के ऊपर पत्रे का शेड लगवाया है। ऊसकी परमिशन पालिका प्रशासन से दि गई है या नही।

**उत्तर :–** १) नगररचना विभागाकडून पञ्याच्या शेडला परवानगी देण्यात आलेली नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** त्यावर कारवाई करण्यासाठी सांगा, सर्वच त्यांना वाचवत आहेत, फुल भ्रष्टाचार करीत आहेत.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:–** पत्र्याच्या शेडला परमिशन देण्यात आलेली नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** पत्र्याच्या शेडला त्यांनी परवानगी घेतलेली नाही. तर त्यावर कारवाई करण्यासाठी तुम्ही काय केले? आणि आज तिस—या माळयावर बांधकाम चालू आहे.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** त्याची परमिशन दिली नाही, त्याचे उत्तर प्रभाग समितीचे सहा. आयुक्त देतील.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** त्यांना बोलवा.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** श्री. नंदलाल सामतांनीकडे तो चार्ज आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** सामतांनी आले नाही का? आता त्यांना उत्तर देण्याची वेळ आली, तर ते मिटींग सोडून निघून गेले.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** सामतांनी का आले नाही?

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—** आले होते, परंतु बाहेर गेलेत.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** त्यांना माहीत होते की, प्रश्न आला आहे, तर त्याचे उत्तर दयायला लागेल. त्यामुळे त्यांना सस्पेंड करू शकतो, सामतानीना सस्पेंड करा.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** असेही ते कारवाई करीत नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** महापौर मॅडम, आपण सांगतात की, संयमाने काम करा. आम्ही किती संयम ठेवणार? अधिकारी हजर राहत नाही, शेवटी संयम सुटेल, काय होईल?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** त्यांना माहीत होते की, मला उत्तर दयायचे आहे आणि मला कारवाई करावी लागेल.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** धिस इज टू मच मॅडम, महापौर मॅडम हे खुप चुकीचे आहे. त्यांना त्वरीत सस्पेंड करण्यात यावे. ही माझी मागणी आहे, सामतांनी त्वरीत सस्पेंड करण्यात यावे. सभागृहामध्ये असतांना आणि प्रश्न आला असतांना ते बाहेर निघून गेले. इज अपसेंड व्हिच शुल्ड बी इमिडेटली सस्पेंडेड नाही तर सभागृह असेच चालत राहील.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सामतानीना सस्पेंड करा.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** आणि त्यावर आता अनधिकृत बांधकाम चालू आहे. मी आयुक्तांना कधीच पत्र दिले आहे की, टॅरेसवर बांधकाम चालू आहे, त्यांना सस्पेंड करा. एक तर महासभेचा अपमान करीत आहेत, अशा अधिका—यांना इथे बसण्याचा अधिकार नाही. माझी मागणी आहे की, त्यांना सस्पेंड करा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आताच सामतानी इथे होते.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, इथे बसलेले सर्व अधिकारी, जरा लक्ष देवून ऐका याच्या पहीले पण जी निंदनीय घटना झाली होती. तुम्ही विना परवानगी इथून निघून गेले होते, आता इथे जे पण अधिकारी आहेत, त्यांनी महासभा संपे पर्यंत जर तुम्हांला कुठे जायचे आहे तर परवानगी घेऊन जा, श्री. सामतानी न बोलता निघून गेले, त्यासाठी मी सांगते की, त्यांच्यावर एक ॲक्शन नियमानुसार घेण्यात यावी.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौरजी इंटीमेशन देवून नाही तर त्यांना तुमची परवानगी घेऊन जायचे आहे. विथ युअर प्रमिशन.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** सभागृहाचा अपमान आहे, परंतु माझ्या प्रश्नाचे काय झाले? त्याचे काय करणार?

**महापालिका सचिव:—** हा विषय पण प्रलंबित ठेवण्यात येत आहे, कारण की, उत्तर मिळाले नाही म्हणून. प्रश्नोत्तराचा तास ४.०६ मिनीटानी संपणार आहे.

प्रश्न क्र. १६ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे.

**प्रश्न क्र. १६:—** (१) प्रभाग समिती क्र.४ उल्हासनगर महानगरपालिका के कार्यक्षेत्र में किऐ गऐ अवैध निर्माण के ऊपर कारवाई न किऐ जाने पर दिनांक १६/०९/२०१५ को शुरू किया गया आमरण उपोषण पिदे लेने हेतू प्रभाग समिती कार्यालय से सहा. आयुक्त, श्री. गणेश शिंपी इनोने दिनांक १८/०९/२०१५ को ओर से क्या कारवाई कि गयी है। इसकी जानकारी दि जाए.

अ) आमरण अनशन के वक्त दिऐ गऐ निवेदन में उल्लेखित अवैध निर्माण के ऊपर पालिका प्रशासन के ओर से कितने दिन के अंदर निष्काशन की कारवाई की जाऐगी.

**उत्तर :—** १) श्री. भारत राजवानी यांनी ज्या बांधकामांबाबत तक्रारी केल्या होत्या, त्या ठिकाणी रहिवासी व वाणिज्य वापर सुरू असून बांधकामे जुनी असल्याने त्यांना दस्तऐवज सादर करणेसाठी नोटीसा बजावण्यात आलेल्या होत्या.

अ) सदर बांधकामांबाबत श्री. भारत राजवानी यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने सुनावणी घेवून नियमानुसार कारवाई करणेचे आदेश दिलेले आहेत. याबाबतची सुनावणी अद्याप पूर्ण झाली नसून सुनावणीचा निर्णय होताच नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, यांनी जे उत्तर दिले आहे. त्या विषयी मला अधिका—या बरोबर बोलायचे आहे. गणेशजी यामध्ये मी जो प्रश्न केला होता, त्यामध्ये टायपिंग मिस्टेक झाले होते. परंतु आपण गुगल ॲपचे विधी विभागाकडून ओपनिंग मागवले होते. त्याचे उत्तर दया, त्यामध्ये काय आले आहे?

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** मा. महापौर महोदया, या प्रश्नाच्या बाबतीत सांगतो की, गुगल ॲपचे कोणतेही ओपनिंग मागवले नव्हते.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** आपण जे लोक आयुक्त साहेबांना कॉपीमध्ये लिहून दिले होते, की आम्ही या विषयी विधी विभागाकडून घेत आहे, त्यामध्ये कसा रिपोर्ट दिला आहे?

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** लोक आयुक्त साहेबांकडून जो रिपोर्ट दिला होता, तो लोक आयुक्त साहेबांनी ॲडमिट करून ती केस बंद केली आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** केस बंद केली आहे ना, मी रिपोर्ट विचारत आहे. मी हे विचारत नाही की, तिथे काय झाले?

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** गुगलकडून कोणताही रिपोर्ट मागविला नाही?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** गुगलकडून नाही, आपण विधी विभागाकडून मागवले आहे, त्याच्या विषयी विचारत आहे. केस कशी घेतली जाते आणि हिरे साहेबांनी जे लोकायुक्त साहेबांना दिले आहे. ते रिपोर्ट मला मागवायचे आहेत. त्यामध्ये काय लिहीलेले आहे?

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** विधी विभागाला या विषयी विचारले नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** लोक आयुक्त साहेबांना आपण रिपोर्टमध्ये कसे दिले आहे?

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** लोक आयुक्त कार्यालयात या विषयी जी चर्चा झाली, त्या विषयी काहीच विचारले नाही. हा विषय हायकोर्टमध्ये आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** हायकोर्ट मॅटरमध्ये महापालिकेला कारवाई करण्यासाठी बोलेले आहे. तर आपण काय कारवाई केली?

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** हायकोर्टाच्या आदेशानुसार मा. उप आयुक्त यांच्याकडे हिअरींग चालू आहेत, ज्या ज्या केस चालू झाल्या आहेत , परंतु या केसवर अजून पर्यंत कोणताच निर्णय झाला नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** माझ्या जवळ, लोक आयुक्तांचे रिपोर्ट दया, जे आपण दिले आहे.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** लोक आयुक्तांचे रिपोर्ट आता माझ्याकडे नाहीत, मी आपल्याला नंतर त्याची कॉफी देतो.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** तर मग हा विषय प्रलंबित ठेवा, आपण नंतर बोलू.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** हा जो प्रश्न आहे, तो लोक आयुक्तांशी संबधित नाही. हे जर आपण बघितले तर समजेल.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** लोक आयुक्तांकडे आम्ही गुगलसाठी जी कंप्लेट केली आहे, गुगलच्या विषयी आपण विधी विभागाकडून ......

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** तो हा प्रश्न नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** ठिक आहे, जो पण असेल त्याच्यावर आपण चर्चा करू. त्याच बरोबर नंतर प्रलंबित ठेवू.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** त्याची एक कॉफी मी तुम्हांला देतो.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** हा प्रश्न प्रलंबित ठेवू. नंतर घेऊ. ठिक आहे, क्लियर केला ना?

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** संपुर्ण दिवस त्यांच्या बरोबरच असतात, त्यांनाच जाऊन विचारा.

**महापालिका सचिव:—** सर आपल्याला याचे उत्तर दिलेले आहे, तर प्रलंबित ठेवण्याचे कारण काय आहे?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** रिपोर्ट मागवत आहेत, ते रिपोर्ट बघून करू की, बरोबर आहे किंवा नाही.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** परंतु हा जो प्रश्न आहे, त्यामध्ये लोक आयुक्तांच्या रिपोर्टच्या विषयी काहीच विचारले नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** संपुर्ण त्याच आधारावर आहे.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** नाही असे काहीच नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** त्यामध्ये तसे आले असते तर मी त्याच्यावर चर्चा केली असती.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** पहीले हे सांगा की, प्रश्न काय आहे?

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** हा जो पॅनल नंबर १७ आहे, तिथे अनाधिकृत बांधकामाची कंप्लेंट केली होती, त्या विषयी हा प्रश्न आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** आपण त्याचे उत्तर दिले आहे.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** होय, उत्तर दिले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मग इथे गुगलचा प्रश्न कुठे येतो?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** यामध्ये दिले आहे की, गुगलच्या हिशोबाने आम्ही कंप्लेंट दिली होती. त्यांनी लोक आयुक्तांना लिहून दिले होते की, आम्ही विधी विभागाकडून चौकशी करून कारवाई करू.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** त्यांनी आपल्याला उत्तर दिले आहे की, त्यांनी हे मॅटर बंद केले आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मॅटर कुठे बंद केले आहे?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** त्यांनी तुम्हांला उत्तर दिले आहे, तर मॅटर बंद केले आहे.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** आपला जो १६ नंबरचा प्रश्न आहे, तो हायकोर्टाचे मॅटर आहे आणि १७ नंबरचा जो प्रश्न आहे, तो लोक आयुक्तांशी संबंधित आहे. आता १६ नंबरचा प्रश्न चालू आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** तुमचा १६ नंबरचा प्रश्न चालू आहे, तर यासाठी मी तुम्हांला विचारलेला प्रश्न काय आहे व उत्तर काय आहे?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** १६ नंबरचा आहे तर ठिक आहे ना?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** १७ नंबरचा प्रश्न अजून विचारला नाही.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** मग घाई का करतात तुम्ही?

**महापालिका सचिव:—** मा. सदस्य, आपला १६ नंबरचा प्रश्न चालू आहे आणि तुम्ही जो म्हणत आहेत तो १७ नंबरचा आहे, तो तुम्ही पुढच्या महासभेमध्ये आल्यावर त्यांना विचारू शकतात.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** १७ नंबरचा प्रश्न नाही, तो १६ नंबरचाच आहे.

**महापालिका सचिव:—** त्यांचे म्हणणे आहे की, तो मॅटर लोक आयुक्तांचा त्याच्यामध्ये नाही. मग आपण १७ नंबरचा प्रश्न आल्यावर त्यांच्याकडून पुरक प्रश्न विचारू शकतात.

कृपया प्रश्नोत्तराची वेळ संपली आहे, प्रश्न क्र. १६ नंबर पुर्ण झाला आहे, प्रश्न क्र.१७ नंबरचा प्रश्न आल्यावर मा. सदस्य, हे घेतील. आता माझ्याकडे एक लक्षवेधी सुचना आलेली आहे आणि आयत्या वेळेचा एक विषय आला आहे.

लक्षवेधी सुचना जीचे सुचक आहेत, श्रीम. शुभांगी बेहनवाल.

> विषय :— उल्हासनगर से बहने वाली उल्हास और वालधुनी नदी के लिये स्वच्छता अभियान की शुरूवात की जाये और उक्त अभियान को महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर नदी स्वच्छता अभियान नाम दिया जाये. नदी किनारे बन रहे दोनो ट्रीटमेंट प्लांट्स संयंत्रो को भी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जल स्वच्छता संयंत्र नामकरण किया जाये. हि स्विकारायची की नाही हे मा. महापौरांनी ठरवायचे आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** ही जी लक्षवेधी आहे, ती रिजेक्ट करण्यात येत आहे. लक्षवेधी सुचना सिस्टमेटीक यायला पाहीजे. नामकरण कमिटीमध्ये पहीले गेली पाहीजे. सिस्टमेटीक यायला पाहीजे.

**महापालिका सचिव:—** ही लक्षवेधी मा. पिठासिन अधिकारी यांनी अमान्य केली आहे. आयत्या वेळचा विषय आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** नाही, नाही मॅडम मान्य, अमान्य केली आपण ठिक आहे, याच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव आहे. आपल्याला कदाचित कल्पना नसेल, नाही नाही लक्षवेधीला नाव दया, हे सभागृह ठरवणार त्यांनी जरी नाव दिले असेल, लक्षवधी मान्य अमान्य याचा काय विषय? नामकरणाचा विषय इथे कुठे आला? त्यांनी नामकरण ठरवायचे काय ठरवायचे? स्वच्छता अभियानाचा विषय आहे. स्वच्छता अभियानासाठी आपण करोडो रूपये खर्च केले आहेत. त्यासाठी ती लक्षवेधी स्विकारा नंतर नावाचे काय करायचे आहे ते नंतर ठरवू. लक्षवेधी स्विकारायला काय हरकत आहे?

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** महापौर मॅडम, हा तुमचा अधिकार आहे, तुमच्या अधिकारामध्ये कोणीही सदस्य हस्तक्षेप करू शकत नाही, हे तुमचा अधिकार आहे. जर तुम्ही एकदा सांगितले तर तुमच्या अधिकारात कुठलाही सदस्य हस्तक्षेप करू शकत नाही.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य, बरोबर बोलत आहेत. मी सहमत आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ही १२५ वी जयंती आहे. आपण लोकांच्या भावना बघा. ही लक्षवेधी सुचना महापौर मॅडम, फक्त दोन मिनीट.. आपण सांगितले होते की, सर्वांना बोलण्याची संधी दिली जाईल. विषांत्तर होणार नाही.

महापौरजी बोलून देणार नाहीत तर विषांत्तर कसे होणार? जर बोलूनच देणार नाहीत, तर मा. महापौरजी आम्ही कोणशी बोलणार? महापौर मॅडम, आम्ही सांगू इच्छितोकी आम्ही तुमच्या मताशी सहमत आहेत.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** महापौरांनी निर्णय घेतलेला आहे, त्यावर तुम्ही बोलतात.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपले आदरणीय आहेत ही लक्षवेधी कायदेशिर यायला पाहीजे, माझा सांगण्याचा हेतू हाच होता. सचिव मॅडम विषय वाचा.

**सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:—** मा. महापौरजी, ही लक्षवेधी मीच दिलेली आहे.

**महापालिका सचिव:—** कृपया मा. पिठासिन अधिकारी यांनी पुढचा विषय घ्यायला सांगितलेला आहे, पुढचा विषय आहे, आयत्या वेळेचा विषय प्रशासनाकडून आलेला आहे.

**आयत्यावेळचा विषय:—**

उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता मा. राज्य निवडणूक आयोगाने दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ च्या अधिसुचनेद्वारे प्रसिध्द केलेल्या १३ अनुसचित जातीचे प्रभागातील दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत कामांचे प्रस्ताव मान्य करणे. दलिवस्तींचा प्रस्ताव आहे, माझी प्रशासनाला विनंती आहे की, प्रस्ताव आलेला आहे, परंतु काही वार्डमध्ये आचारसंहिता लागलेली आहे. तर हा विषय घ्यायचा आहे की नाही त्याच्यावर निर्णय घेण्यात यावा. यामध्ये पॅनल क्र. १७ संपुर्ण आहे, त्यामुळे तो घेण्यात येणार नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** आचारसंहिता लागली ती फक्त १७ नंबर पॅनलमध्ये, संपुर्ण शहरामध्ये आचारसंहिता लागलेली नाही, ही एक गोष्ट, दुसरे म्हणजे जेव्हा हा प्रस्ताव पास होईल, तेव्हा पुढे प्रशासनाची कारवाई होईल. हा प्रस्ताव वरती जाईल आणि तिकडून फंड मंजूर होऊन येईल. तर माझ्या हिशोबाने यामध्ये आचारसंहितेचा काहीच रोल नाही. आपण आचारसंहितेचा भंग करीत नाही, त्यामुळे संपुर्ण उल्हासनगरचे कार्य आपण थांबवू शकत नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सन्माननिय श्री. राजेश वदारिया यांनी मुद्दा बरोबर मांडलेला आहे आणि हे आता प्रोसेसरमध्ये त्याचे एस्टिमेंट बनवतील आणि त्याच्या नंतर मग त्याच्यावर टी.आर. कडून सही होईल. त्याच्या नंतर ते डी.पी.डी.सी. ला जातील. डिव्हीजन महाराष्ट्र सरकारला जातील, याला भरपुर लाब प्रोसेसर आहे. त्यामुळे श्री. राजेश वदारियांनी मुद्दा उपस्थित केला आहे, १३ च्या १३ प्रभागांना दलित वस्तीच्या संदर्भातमध्ये १३ च्या १३ प्रभागांना मान्यता देण्यात यावी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** १७ नंबरच्या पॅनलमध्ये करण्याची अडचण काय आहे? १७ नंबर पॅनलचे पण करा, त्यामध्ये काय आहे?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ही प्रोसेसर जेव्हा चालू होईल, तो पर्यंत आचारसंहिता राहणार नाही.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** हा संपुर्ण शहराचा मुद्दा आहे, एकाच पॅनलचा मुद्दा नाही आणि १३ प्रभागांमध्ये जिथे जिथे दलित वस्ती आहे,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ठिक आहे, राजेश वदारिया यांनी सांगितल्या प्रमाणे १ ची मान्यता ठेवून बाकी १२ प्रभागामध्ये करायला काहीच हरकत नाही.

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—** मा. महापौर, उप महापौर, सन्माननिय सभागृह, फक्त एकाच प्रभागामध्ये आचारसंहिता लागू आहे, तर तो प्रभाग वगळून आपण बाकीचे करू शकतो.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** शहरातील संपुर्ण जनतेला मॅसेज जायला पाहीजे, अरूण भाई की, आपण त्यांच्यासाठी काम करण्यासाठी समर्थ आहेत. जो आचारसंहितेचा दंवडी पिटत आहे, ते बाजूला ठेवून प्रोसेस चालू व्हायला पाहीजे.

**महापालिका सचिव:—** आयत्यावेळचा विषयाची प्रत वाटत आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** विषय कधी घेणार?

**महापालिका सचिवः–** आताच सबमिट केले आहे, फक्त आपण होय बोलाल तर वाटण्यात येतील.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः–** ठिक आहे, या विषयाला एजेंडावर घेऊ.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः–** मा. महापौरही, आज आपण विशेष लक्ष दिले....

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः–** एजेंडावर घ्यायला महासभेने मान्यता दिली आहे आणि या विषयावर शेवटी चर्चा होईल.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः–** मा. महापौर, आता आपण थोडया वेळा पुर्वी सांगितले, त्याला आता अर्धा तास झाले आहे. तुम्हांला सुची मिळाली का कोण अधिकारी आले आहेत किंवा आले नाहीत. माझा प्रश्न एकच आहे, दुस–या सदस्यांचा प्रश्न वेगळा होता, मला विषय माहीत नाही, परंतु समजला आहे. मी मॅच फिक्सींग ऐकले होते, बघितले होते. एक इथे हकीकतमध्ये मला बघायला मिळाले, तर एक विषय आला, तर एक अधिकारी बाहेर निघून गेले, विषय संपला तेव्हा नंतर ते अधिकारी परत आतमध्ये आले. तर हा मॅच फिक्सींगचाच एक भाग आहे, हा एक विचार करण्याचा विषय आहे, ते अधिकारी आले आणि त्यांना माहीत झाले की, जेव्हा विषय संपला तेव्हा ते अधिकारी आतमध्ये आले. मला या विषयाची अजून सुध्दा माहीती नाही की, तो विषय काय आहे?

**सदस्य, श्री. भारत राजवानीः–** ते अधिकारी आले आहेत, श्री. सामतांनी. त्यांना बोलवा. मिटींग संपेपर्यंत उत्तर दयायला सांगा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः–** मॅडम, परत विषयांत्तर होत आहे.

**महापालिका सचिवः–** हा आयत्या वेळेचा विषय सामावून घेण्यात आला आहे.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

➪ **विषय क्र. २ः–** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १५/९/२०१७ (त्यात .......

---

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः–** सचिव मॅडम, महापौरानी उत्तर दिलेले नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः–** महापौरजी, इथे विषय एक चालला आहे आणि दुस–या विषयावर चर्चा चालली आहे. पहीले विषय काय चालला आहे आणि बोलत कोणत्या विषयावर आहेत. आपण सांगा की, याच विषयावर बोला.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः–** जो विषय चालला आहे, त्याच विषयावर बोलायला पाहीजे, महापौर मॅडम आपण पहीले सांगितले आहे की, सर्वांनी विषयावरच बोलायला पाहीजे. जर कोणी विषयावर बोलत नसेल तर आपण त्यांच्यावर कंन्ट्रोल करा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः–** मा. महापौरजी हा विषय आपलाच होता, त्या विषयावर मी आपले लक्ष केंद्रित करीत आहे. माझा बाहेरचा विषय नाही, माझा प्रस्तृत केलेला विषय नाही, जो आपणच पहीले अर्ध्या तासापुर्वी विचारला होता. बाझा बाहेरचा विषय नाही आणि सभागृहासाठी आणि सभागृहाच्या सर्व सदस्यांसाठी हा विषय कामाला येईले. माझ्या स्वतःच्या घराच्या कामासाठी नाही.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

➪ **विषय क्र. २ः–** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १५/९/२०१७ (त्यात ९/१०/२०१७, ३१/१०/२०१७, १८/११/२०१७, १८/१२/२०१७ व २०/१/२०१८) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** मागील सभेचे दिनांक १५/९/२०१७ (त्यात ९/१०/२०१७, ३१/१०/२०१७, १८/११/२०१७, १८/१२/२०१७ व २०/१/२०१८) रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. २:–** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १५/९/२०१७ (त्यात ९/१०/२०१७, ३१/१०/२०१७, १८/११/२०१७, १८/१२/२०१७ व २०/१/२०१८) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव: श्री.जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. दिपक सिरवानी

**महासभा ठराव क्र. ७६क** **दिनांक :१४/३/२०१८**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक १५/९/२०१७ (त्यात ९/१०/२०१७, ३१/१०/२०१७, १८/११/२०१७, १८/१२/२०१७ व २०/१/२०१८) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते २२८ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. शंकर लुंड:–** महापौर मॅडम, मागच्या वेळेस ९/१०/२०१७ च्या मिटींगमध्ये आम्ही एक प्रस्ताव पास केला होता, आपण त्याचे इतिवृत्त पास करणार आहेत की आपल्या एका व्यक्तिने, एका ऑफिसरने श्री. बाळू नेटके यांनी जेव्हा आपल्या शहरामध्ये जोरदार पाऊस पडत होता, तेव्हा झाडे पडली होती, तेव्हा चांगले काम केले आहे, तेव्हा त्यांचे स्वागत केले पाहीजे, ते अजून झाले नाही आणि आज इतिवृत्त पास होत आहेत, तरी माझी इच्छा आहे की, त्यांना स्टेजवर बोलावून फुल, श्रीफळ, शाल देवून त्यांचे स्वागत करण्यात यावे. जसे की, आपले अजून ऑफिसर आहेत, त्यांना काम करण्याची इच्छा निर्माण होईल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** महासभा संपण्यापुर्वी पहीले बाहेरून गुलदस्ता मागवून घ्या.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:–** गुलदस्ता मी मागविला आहे, कृपया आपण आदेश दयाल तर....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** मा. महापौरजी, मी संपुण सभागृहाला निवेदन करतो की, ज्या प्रकारे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत संपुर्ण सहर आणि सर्व सभागृहाच्या सदस्यांनी, स्थायी समितीमध्ये पण हा विषय घेतला, स्वच्छ भारत अभियानाचे जे कार्य होते, त्यामुळे उल्हासनगरमध्ये स्वच्छताचे खुप चांगले कार्य झाले आहेत. तर स्वच्छता विभागाचे जे अधिकारी आहेत, त्यांचे पण सत्कार व्हायला पाहीजे, या महासभेमध्ये नाही तर दुस–या महासभेमध्ये त्यांचा पण सत्कार व्हायला पाहीजे. त्यांनी स्वच्छतेसाठी संपुर्ण शहरामध्ये, संपुर्ण वेळ देवून, डबल डयुटी करून चांगले काम केले आहे, म्हणून त्यांचे पण सत्कार झाला पाहीजे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:–** सन्माननिय नेटकेजी, आपण इथे बसले असतील कृपया करून स्टेजवर यावे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:–** चांगले काम करणा–या अधिका–यांना बघा कसा सन्मान मिळतो?

**महापालिका सचिवः—** कृपया सर्व सभागृहाचे गट नेते, सर्व सभापती, सदस्य यांनी स्टेजवर आले तरी चालेल, ज्यांना वर येण्याची इच्छा आहे आणि कृपया पत्रकारांना कोणाला फोटो काढण्याची इच्छा असेल तर ते सभागृहामध्ये येऊ शकतात.

**सदस्या, श्रीम. कविता पंजाबीः—** नेटकेजी मी आपले आभार मानते की, आपण पावसाळयामध्ये माझ्या वार्डमध्ये झाड पडले असतांना ते झाड तोडून शाळेतील मुलांना सुविधा करून दिली, धन्यवाद.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** पुढच्या महासभेमध्ये, ज्या आमच्या कामगारांनी स्वच्छतेचे खुप चांगले कार्य केले आहे, त्यांचे पण सन्मान केले जाईल.

**प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके:—** या ठिकाणी आज उल्हासनगर महानगरपालिका, मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब आणि सर्व मान्यवर सदस्य यांनी श्री. शंकर लुंड साहेबांनी दिलेल्या प्रस्तावावर माझा सत्कार करण्यात आला, बहूमान करण्यात आला त्यामुळे मी सर्वांचा आभारी आहे, धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३ :—** अनधिकृत बांधकाम निष्कासनापोटी येणारा खर्च वसुल करणेकामी शुल्क वसुलीस मान्यता देणे.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** इतिवृत्ताची वाट न पहाता पास..

या वेळी सदस्य, श्री. अशोक छाप्रु हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**महापालिका सचिवः—** दर वैगेरे पास नाही झाला स्थायी समितीने सांगितले की, तुम्ही महासभेपुढे फेर सादर करा. ३ नंबरचा

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** ३ नंबर कसा काय? पास नाही.

**महापालिका सचिव :—** अनधिकृत बांधकाम निष्कासना पोटी येणार खर्च.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** सत्ताधारी प्रस्ताव आणत आहेत आणि सत्ताधारीच पास बोलत आहेत.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** मा. महापौरजी, या विषयावर मी सर्व सभागृहाच्या सदस्याचे लक्ष आकर्षित करीत आहे की, हा जो ठराव स्थायी समितीकडून पास होऊन आला आहे. यामध्ये काय काय बदल होत आहेत, सन २००१ मध्ये जे पण अनधिकृत बांधकामे तुटत होते, त्याचे आपण ६३ प्रत्येक फुटावर दंड आकरणी करीत होते, एका फुटाचे त्यावेळी बांधकाम तोडण्यासाठी ६३ रूपये चार्ज घेत होते. ते आता वाढवून जे पत्र्यांचे घरे आहेत, त्यांचे १०० रूपये प्रत्येक फुटासाठी आणि टीयर गटर करीता २०० रूपये प्रत्येक फुटासाठी आणि आर.सी.सी. बांधकाम तोडण्यासाठी एका फुटाचे ३०० रूपये घेण्यात येतील. त्याच प्रमाणे हातगाडीवर सुध्दा जे आपण दंड वसूली करतो, तो पहीले एक हजार रूपये होते, नंतर दोन हजार केल, आता पाच हजार रूपये करीत आहेत. तर हे सर्व जे दंड वसुलीचे चार्जेस आहेत, जे लोक रस्त्यावर कब्जा करतात, त्यांचे पण चार्ज कमी होते, पहीले ६३ रूपये होते, आता १०० रूपये, २०० रूपये, ३०० रूपये जे फुटपाथावर सामान ठेवतात, त्यांना पण हेच दंड आहे. हातगाडीवाल्यासाठी एक हजारावरून आता पाच हजार रूपये करीत आहेत आणि जो एका फुटाचे अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी दंड ६३ रूपये होते, आता पत्र्यासाठी १०० रूपये, टीयर गटर करीता २०० रूपये, आर.सी. सी. बांधकाम तोडण्यासाठी एका फुटाचे ३०० रूपये तर हे जे चार्जेस भरत आहेत, मला वाटते की, सन २०१८ पर्यंत आज पर्यंत किती अनधिकृत बांधकामे तोडली आहेत? हातगाडयाचे किती दंड घेतले आहेत? ती यादी पहीले दयायला पाहीजे होती, थेट एकदम चार्जेस वाढवत आहेत. त्यामध्ये काय प्रॉब्लेम होते? त्यावेळी जे ६३ रूपये होते, तेव्हा सन २००१ ते सन २०१८ पर्यंत त्यामध्ये काय फरक होता? किती उत्पन्न आले? आणि हे चार्ज वाढवल्या नंतर आपल्याला किती उत्पन्न मिळेल? ते डिटेल यामध्ये लिहीले नाही. फक्त लिहीले आहे की, महाराष्ट्र अधिनियम २६०आणि २६७ अन्वे ६३ रूपये प्रमाणे हे दर वाढविण्यात यावेत. सन २००१ ते २०१८ पर्यंतचे डिटेल दया,

त्यामध्ये उत्पन्न किती मिळाले? आणि हे दर वाढवल्या नंतर महानगरपालिकेचे किती उत्पन्न वाढेल? ते डिटेल इथे दयायला पाहीजेत, ते दिले नाहीत. त्याच बरोबर कोणीही सदस्य, कोणत्याही ऑफिसरला जेव्हा फोन करतात, तर आपल्याला माहीत आहे ना ऑफिसर कसे करतात? नाही सोडणार एक हजार रूपये घेणार. तीन वेळा झाले आहे, दोन वेळा झाले आहे. ही लक्ष देण्यासारखी गोष्ट आहे. तर ज्या ऑफिसरच्या हातामध्ये पॉवर जाते, ते सदस्यांबरोबर कसे बोलतात? हे आपल्याणा माहीत आहे. एखादया हातगाडीसाठी फोन करतात तेव्हा उत्तर कसे मिळते याचा विचार करा. आता त्याच हजार रूपयांचे पाच हजार होणार आहेत. तर हातगाडयासाठी फोन कराल, तर काय उत्तर मिळेल? जर कोणाची जागा तुटत असेल तर चार्ज किती व पैसे किती घेणार? आणि याचे उत्पन्न किती वाढेल? माझ्या हिशोबाने पहीले सभागृहाला याची संपुर्ण माहीती दयायला पाहीजे. सन २००१ ते २०१८ पर्यंत किती उत्पन्न मिळाले? आणि हे दर वाढवल्या नंतर किती उत्पन्न वाढेल? महासभेमध्ये सर्व डिटेल आणावेत आणि हा विषय विचार करण्या सारखा आहे. तरी कृपया करून हे सर्व डिटेल आणल्या नंतरच हा विषय घेऊन यावे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सन्माननिय श्री. किशोर वनवारी यांनी जो प्रस्ताव मांडला तो बरोबर आहे, म्हणून सगळा विचार करा. दुसरी गोष्ट मॅडम, अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये त्यांनी दिले आहे, १००, २०० रूपये आणि ३०० रूपये म्हणजे कुठल्या पध्दतीचा म्हणजे तोडलेला, सामतांनी कसे तोडतात फक्त एक फुट त्याचेच पैसे घेणार किंवा पुर्ण क्षेत्रफळाचे घेणार, ते मला जरा सांगा. हा प्रस्ताव कोणी आणला त्यांनी सांगावे. म्हणजे एक होल पाडला तेवढयाचेच पैसे घेणार फक्त दाखवण्यासाठी तोडले ते पैसे घेणार किंवा संपुर्ण एरियाचे पैसे घेणार. कोण आहेत? प्रस्ताव ज्यांनी आणला आहे, त्यांनी आम्हांला सांगावे. पैसे कसे वसुल करणार?

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** मा. महापौर, महोदया, जेवढे बांधकाम निष्काशित करण्यात येईल, तेवढेच बांधकामाचे दंड वसुल करण्यात येईल.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** किती बांधकाम? आता माझे जर, समजा एखादया माणसाने जर १०० चौरस फुट बांधकाम केले असेल, तर तुम्ही तोडणार आहेत, २ चौरस फुट तर त्याचे किती पैसे वसुल करणार? २ चौरसचे का १०० चौरसचे?

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** जर १०X१० चे बांधकाम असेल तर १०० फुटाचे पैसे वसुल केले जातील.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मग तुम्ही तोडणार फक्त एकच फुट ना? त्याचे काय करणार मग? पुढचे पैसे घेणार तुम्ही, त्याचे काय?

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** तुम्ही त्याचे डिटेल दया, आज पर्यंत १७ वर्षात किती पैसे आलेले आहेत? जर तुम्ही ही वाढ करीत आहेत, त्यामुळे किती इन्कम येणार आहे, त्याचे तपशिल दया.

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** आता पर्यंत तीन लाख रूपये वसुल केलेले आहेत. ते गोषवा—यामध्ये लिहीलेले आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** शिंपी साहेब, तुम्ही मला एक सांगा, उल्हासनगरमध्ये हातगाडीवाला दिवसाला किती रूपये कमावतो तुम्हांला याची कल्पाना आहे का? ज्याच्याकडे हातगाडी आहे, तो दिवसाला किती रूपये कमवू शकतो. २०० रूपये कमवू शकतो, ३००रूपये कमवू शकतो, त्याला २००० रूपये दंड.

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** सन २००१ चा दर आपला ५०० रूपये होते, आता त्याला १६ वर्षे झाली म्हणून त्याच्यामध्ये वाढ केली आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** कुठल्याही परिस्थितीत हा प्रस्ताव व्यवस्थित आणा, महापौर मॅडम, आपण समजा हातगाडीवाला भजी विकत असेल हातगाडीवर काही विकत असेल, त्याला २००० हजार रूपये दंड, तो दिवसाला फक्त २०० रूपये कमवत असतो.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** आपण तीन लाख सांगितले आहेत, आता हे दर वाढवल्यास किती उत्पन्न वाढेल.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आपण एक तर रोजी रोटी पण देत नाही, ठिक आहे, हातगाडयांचे लायसन्स आपण काढून देत आहेत, ठिक जर मिळाले तर त्याला २००० हजार रूपयांचे दंड होईल, हा अन्याय आहे, हा प्रस्ताव चांगल्या प्रकारे यायला पाहीजे आणि जो प्रॅक्टीकल प्रस्ताव व्हायला पाहीजे तो यायला पाहीजे आणि प्रशासनाला हा प्रस्ताव मागे घ्यायला सांगा आणि सर्व गटनेत्यांच्या मिटींगमध्ये बसून चर्चा करून चांगल्या प्रकारे प्रस्ताव यायला पाहीजे.

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:—</u>** मा. महापौर, मा. आयुक्त मॅडम....

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u>** शिंपी सर हे तीन लाख रूपये किती वर्षाचे आहेत?

**<u>प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—</u>** हे मागील तीन वर्षात वसुल केलेले आहेत.

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u>** मागच्या तीन वर्षा पासून फक्त तीनच लाख रूपये वसुल केले आहेत,

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>**सन्माननिय महापौर मॅडम, राजेश वदारियाजी, मॅडम यामध्ये हातगाडी उभी करण्यासाठी हजार रूपये मांगितले आहेत आणि पार्किंगमध्ये फोर व्हिलर गाडी उभी करण्यासाठी एक महीन्यासाठी १५० ते २०० रूपये घेतात, हातगाडी उभी करण्यासाठी महीन्याला ३० हजार रूपये येतात, जमनुजी थांबा जरा मला बोलू दया,

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:—</u>** मा. महापौर मॅडम, जर सगळयांची चर्चा झाली असेल तर मला पण बोलण्याची संधी दया,मी कधी पासून उभी आहे. पहीले पण मी उभी होते, पण जेष्ठ बोलत होते, मला पण वाटते की, मला बोलण्याची संधी मिळावी. आपण हातगाडयांवर दर लावत आहेत, परंतु मागच्या वेळेस एक घटना घडली होती, भाजी विकण्यासाठी जी हातगाडी लावतात, व्हि.टी.सी. ग्राउंड येथे एक हातगाडी तोडली होती, तर याच्यावर थोडा विचार करा आणि जो शांतीनगरचा एरिया आहे, महानगरपालिकेकडे जो येतो, जेवढे पण शोरूम आहेत, ते त्यांच्या गाडया रोडवर उभ्या करतात, फुटपाथवर उभ्या करतात, त्यांच्यावर काही कारवाई होते किंवा नाही. आपण फक्त दलितांनवरच दबाव टाकणार किंवा त्यांच्यासाठी काही करणार आहेत का?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** सन्माननिय महापौर मॅडम, एका हातगाडीला महीन्याला तुम्ही ३० हजार रूपये दंड लावणार आहेत, जर रोडवर उभी करीत असाल तर. दुसरी गोष्ट अशी आहे की, उल्हासनगरच्या शांतीनगर पासून तर सम्राट अशोकनगर पर्यंत, उल्हासनगर शहाड पासून ते कॅम्प नंबर ५ पर्यंत किती ट्रक उभ्या आहेत? किती गाडया उभ्या आहेत? किती मोडलेल्या गाडया उभ्या आहेत? आता पर्यंत त्यांच्यावर काय कारवाई केली? हातगाडयांसाठी काय एवढे विशेष पडले आहे? एवढी मोठी ॲक्शन घेण्याची.

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:—</u>** त्यांना फक्त गरींबांच्या हातगाडयाच दिसतात का? श्रीमंताच्या कार दिसत नाही का?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आपण सत्ता करतो, आपण कुठल्या पध्दतीने चाललो आहे, ट्रक वैगेरे वर्षानुवर्ष उभी आहेत, त्यांच्यावर अजून पर्यंत कुठलीही कारवाई केली नाही. यांनी सांगितले की शोरूमवाल्यांच्या गाडया बाहेर उभ्या असतात. वर्षा न वर्ष त्या गाडया उभ्या आहेत, त्यांच्यावर कारवाई केली नाही. हातगाडीची किंमत मुळ मालकाची किंमत ३५ ते ४० हजार रूपये, ज्यांच्या पन्नास पन्नास लाखाच्या गाडया उभ्या आहेत, त्यांच्यावर कारवाई करायची नाही आणि ३० हजाराच्या गाडीवर ३० हजार रूपये तुम्ही पार्किंगचा टॅक्स घेणार? ही कुठली पध्दत आहे? त्यामुळे हा प्रस्ताव पुर्णपणे चुकीचा आहे. हा प्रस्ताव पुन्हा तुम्ही आणावा आणि चांगल्या पध्दतीने आणावा आपण सत्तेवर बसलो आहे, गरींबाना पण त्याच्या बददल आत्ममियता निर्माण झाली पाहिजे, हे सरकार आमचे आहे, ही महानगरपालिका आमची आहे. अशा पध्दतीने प्रस्ताव आणावा, अशी माझी तुम्हांला विनंती आहे आणि सभागृहाला पण विनंती आहे.

**<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:—</u>** चांगल्या पध्दतीने घेऊन या आणि ज्या प्रकारे मोठ मोठया गाडया, प्रायव्हेट बसेस उभ्या असतात, त्यांच्यावर पण कारवाई करण्यात यावी. आपण गरींबांचेच का नुकसान करायचे? त्यांचा पण आपण विचार केला पाहीजे.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—** मा. महापौर मॅडम, उप महापौर, मा. आयुक्त साहेब, हा हातगाडीचा विषय आहे आणि त्यामध्ये बचत गटाच्या पण भरपूर गाडया असतात, तर आपण लक्षात घेऊन बचत गटांच्या गाडयांसाठी काही तरी धोरण करून त्यांच्यासाठी काही तरी करा. कारण की आज भरपूर बचत गटांच्या गाडया हटवल्या आहेत. तर ते लोक कुठे जाणार? जे बचत गट तयार करतात, त्यांना पैसे देवून चालू करण्यासाठी त्यांना सहकार्य करतात, जर त्यांच्या गाडया हटवल्या तर त्यांना रोजगार कसे मिळणार? तर बचत गटांच्या गाडयांसाठी वेगळे धोरण करा, त्यांना त्यांचे हक्क मिळण्यासाठी, त्यांच्यासाठी वेगळी जागा दयावी, ते खुप गरजेचे आहे, आज पंधरा दिवसा पासून गाडया बंद आहेत, तर ते कुठे जाणार? त्यांच्या बरोबर तीन—चार लेडिज काम करतात, संपुर्ण संसार त्यांच्यावर अवलंबून आहे. तर हे अर्जंटली करायला पाहीजे मॅडम.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मा.महापौरजी, मा. उप महापौरजी, हे जे गाडयांचा विषय सांगत आहेत, पंधरा दिवसापासून बंद आहेत, तो ना हॉकर्स झोन आहे. तिथे माझ्या तक्रारीनुसार ती कारवाई झाली आहे आणि नॉन हॉकर्स झोनमध्ये गाडया लावल्यामुळे त्यांच्यावर कारवाई झाली आहे. जर त्यांची पॉलिसी बनवली जात आहे, की माझे बचत गट चालला पाहीजे. तर मला त्याच्यावर काहीच ऑब्जेक्शन नाही. त्यांच्यासाठी वेगळे काही केले तर चालेल.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** मा. महापौरजी, हे काय होत आहे, काय होत आहे?

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** खरे बोलतात, महापौरजी, काही धोरण महानगरपालिकने पहीलेच केल आहेत की, बचत गटासाठी गाडया देण्यात यावे, बचत गटासाठी, महीलांसाठी आपण गाडया देऊन वडापाव, मिसळ, भज्जी आणि काही वस्तु विक्री करण्यासाठी मा. महापौरजी आपले धोरण आहे. त्या पण गाडया रस्त्यावर आहेत, ना फेरीवाला क्षेत्र पण आहे. काही काही गाडया अशा मध्येच उभ्या आहेत. वाटतात की, शहरामध्ये भरपूर गाडया उभ्या आहेत, त्यांना हटवले पाहीजे. परंतु सर्वात मोठी गोष्ट श्री. भालेराव यांनी सांगितली की, शांतीनगर पासून ते सम्राट अशोकनगर पर्यंत, के.बी. रोडचा मुद्दा एवढा जबरदस्त आहे की, त्यामध्ये किती तरी दुकानदार निर्वासित झाले, परंतु आता तिथे बघ गाडया लाईनमध्ये उभ्या आहेत. जर तेथून पण दंड वसुल केला तर किती तरी दंड वसुल होईल? कोणी सांगू शकते का आज पर्यंत त्यांच्याकडून किती दंड वसुल केला आहे? जर हा प्रस्ताव घेऊन येतात तर त्या प्रस्तावामध्ये सगळया गोष्टी असल्या पाहीजेत. किती वसुल केले ते मी विचारत आहे. तर या ज्या सर्व गोष्टी आहेत, त्या हातगाडयांसाठी खास करून, हातगाडयांवर पण ना फेरीवाला क्षेत्रामध्ये त्यांच्यावर कारवाई झाली पाहीजे, हे उचित आहे. परंतु काही काही जागेंवर, काही क्षेत्रामध्ये महापौरजी एवढे पण कठोर होऊ नका, आज व्यापारी लोक पण तसेच त्रस्त आहेत. बिचा—यांच्या धंदया, पाण्याची वाट लागली आहे. अशा परिस्थित त्यांच्यावर पण कारवाई होत असते, तर ही सरसकट कारवाई होईल. याचे विप्रायस केले जाईल की, दुकानाच्या बाहेर ठेवल्या आहेत, कोणी ढिक लावला आहे, कोणी स्टुलवर रमाल ठेवले आहेत, ती सर्वांवर कारवाई होईल. जर कोणी स्टुलवर रूमाल ठेवले आहेत, त्यांच्यावर जर कारवाई केली तर, रूमालाची किंमत किती असेल? ५० रूपये तर दंड केले तर कारवाई किती मोठी होईल. तर हा असा विषय आहे, तर हा विषय सभागृहामध्ये आणण्याच्या पहीले, मला प्रशासनाने संपुर्ण अभ्यास करून इथे आणला पाहीजे. तर हा जो विषय आहे, मा. महापौरजी त्याच्यावर विचार करण्यात यावा. हे दर लागू करण्या आधी गरीब जनतेला, जे हात मजूरी करणारे गरीब लोक आहेत. तर त्याची पध्दत चांगली असायला पाहीजे. हातगाडीवर माल असते, २००० हजार रूपये, तो माल घेऊन जाण्यामुळे नुकसान पण होते. त्यांचे वेगळे नुकासान होते, तर त्याचे नुकसान कोण भरपाई करून देणार? मा. महापौरजी हा विषय गंभीरतेने घ्येण्यात यावा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौरजी, पहीले मी सभागृहाला काही गोष्टी लक्षात आणून देतो की, पहीलेच जे दर लागू आहेत, जी सिस्टीम लागू आहे, जर काही ठिकाणी टीयर अॅन्ड गटरचे अनधिकृत बांधकाम तोडले जाते, तेव्हा जे पत्रे, ॲंगल, गज निघतात, त्यावेळी महापालिकेचे अधिकारी /कर्मचारी ते सामान परत देत नाहीत. ते बोलतात की, हे काम आम्ही आता ठेकेदाराला दिले आहे. ठेकेदार डेमॉलेशन करील आणि आपले मटरेल घेऊन जाईल. मटरेल आहे २ लाख रूपयाचे महापालिकेला एक रूपया सुध्दा मिळत नाही, नुकसान कनस्ट्रेक्शन करणा—याचे होत आहे आणि सावकार ठेकेदार होतात. ही पध्दत पहीले बंद झाली पाहीजे. दुसरी गोष्टी म्हणजे हातगाडयांची जी संख्या आहे, ते संपुर्ण शहरामध्ये आहे, असे नाही की, त्यामध्ये माझा वार्ड अफेक्टेड आहे किंवा आपला वार्ड अफेक्टेड नाही, सर्वांचे वार्ड अफेक्टेड आहेत. मी आपल्याना उदाहरण देतो की, मी मागच्या टर्ममध्ये

१३ नंबर पॅनलमधून निवडणूक लढलो आहे. तिथे नाना नानी गार्डनमध्ये अनाधिकृत भाजी मंडवी लावत होते, हायकोर्टाच्या आदेशा नंतरही तिथे भाजी मंडवी लावत होते. त्यावेळी मा. श्री. खतगांवकर साहेब, आपले आयुक्त होते. मी त्यांना हायकोर्टाचे आदेश दिले आणि त्यांना सांगितले की, जर ॲक्शन होत नाही, तर ही हायकोर्टाची अवमानना होऊ शकते. त्यासाठी आपण त्यांच्यावर कारवाई करा. त्यांनी कारवाई केली, तेथून हातगाडया उचलल्या, तेव्हा काही लोक माझ्याकडे आले, त्यांनी सांगितले की, साहेब, आम्ही इथला हप्ता देत असतो, आपण यामध्ये इंटरफियर करीत आहात, तर आम्ही फळाच्या गाडीसाठी २०० रूपये आणि भाजीच्या गाडीसाठी १०० रूपये रोजचे देवू. मी सांगितले की, ते मला नाही पाहीजेत आणि कारवाई चालूच ठेवली. संध्याकाळी ६.०० वाजल्यापासून ते रात्री ९.०० वाजे पर्यंत महानगरपालिकेचा डंपर उभा राहत होता आणि कारवाई होत होती. या ज्या गोष्टी सांगितल्या जातात, की हातगाडीवर कमाई नाही. मी आपल्याला एक उदाहरण देतो की, शिरू चौक ते पोलिस स्टेशन पर्यंत चार हातगाडया उभ्या राहत होत्या. त्या हातगाडयां सायंकाळी ७.०० वाजे पासून रात्री १०.०० वाजे पर्यंत उभ्या राहत होत्या. त्याच्यावर चिक, मलाई, रबडी, दुध आणि दुधापासून बनलेल्या वस्तु विकल्या जात होत्या. आज १५ ते २० वर्षापासून त्या गाडया उभ्या करती आहेत. आज या चारही भावानी त्यांचे स्वतःचे दुकान त्याच एरियामध्ये घेतले आहेत आणि हातगाडी बंद करून स्वतःचे दुकाने उघडली आहेत. तर मग हातगाडयांवर एवढी कमाई आहे. त्यांच्यावर जी.एस.टी. नाही, त्यांच्यावर प्रॉपर्टी टॅक्स नाही आणि त्यांच्यावर दुसरे कुठलेच टॅक्स नाहीत. जे आपण वसुल करू शकतो. त्या हातगाडया उभ्या असतात आणि रस्त्यावरून येणा—या पब्लिकला त्याचा त्रास होत असतो आणि ते गरीब असल्यामुळे सर्व लोक एक सहकार्य म्हणून बघत असतात. परंतु आपल्याला हे पण समजायला पाहीजे की, हा पण एक व्यापर आहे आणि अनधिकृत गाडयांमुळे सर्व लोकांना अशांतता दिसून येते. हे जे रेट दिले आहेत, ते रेट खुपच जास्त आहेत. त्याच्यासाठी मि निवेदन करतो की, पत्रा, शेड, विट बांधकामाच्या डेमॉलेशनसाठी ५० रूपये, टीयर गटर लोड बेरींगसाठी १०० रूपये, आर.सी.सी. बांधकामासाठी १५० रूपये असे दर असले पाहीजेत आणि त्याच बरोबर हातगाडयांसाठी एक वर्ड ॲड व्हायला पाहीजे, हातगाडयां बरोबर कॅबिन, माझ्या वार्डमध्ये चार लोकांनी येऊन वेगवेगळे कॅबिन बनवले आहेत, सिगारेट, गुटखा, पानमसाला विक्री करीत आहेत आणि रात्रीच्या वेळी तेथे दारू सुध्दा विकत आहेत. खुप वेळा तक्रार केल्या नंतर त्या कॅबिन तेथून काढण्यात आल्या. २५० रूपये दंड भरून भरून चारीही लोकच्या कॅबिन परत आल्या राजची त्यांची कमाई ५००रूपये, १००० रूपये, २००० रूपये आहे. तर त्यांच्यासाठी २०० ते ३०० रूपये त्यांच्यासाठी वाढवणे मोठी गोष्ट नाही. हातगाडयावर जी वस्तु आहे, ५ नंबरच्या वस्तुवर चार चाकी वाहनावर ५००० रूपये आणि दोन चाकी वाहनावर १००० रूपये आणि हा ठराव पास करायला पाहीजे, धन्यवाद.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—</u>** मा. महापौरजी, जसे हा विषय कल्याण—अंबरनाथ रोडवर, मागच्या दोन वर्षापासून कोणीच धंदा केला नाही. त्या लोकांनी खुप त्रास सहन केला आणि काही लोक आपला बिजनेस शिफ्ट करून निघून गेले. कारचे बाजार तर इथून स्थंलातरीत झाले होते, कोणी ठाणे इथे गेले, कोणी मुंबईला निघून गेले, कोणी मुरबाडला निघून गेले, कोणी नाशिकला निघून गेले. आताच या लोकांनी धंदे चालू केले आहेत आणि त्यांच्यावर पण आर.टी.ओ.चे संपुर्ण निरीक्षण आहे. आर.टी.ओ. च्या संपुर्ण गाडया सतत फिरत आहेत. आता कोणीच शोरूमवाले रस्त्यावर गाडया उभ्या करीत नाहीत, यामध्ये त्यांचा विषयच नाही. रस्त्यावर गाडया का उभ्या करतात? मला वाटते की, मी जेव्हा रस्त्यावरून जात असतो, तेव्हा दुपारच्या वेळी, सायंकाळी आर.टी.ओ. ची पेट्रोलिंगची गाडी फिरत असते, ते दंड वसुल करत असतात, जेव्हा ग्राहक एखादी वस्तु खरेदी करण्यासाठी आपली गाडी उभी करतो आणि त्या वेळी आर.टी.ओ. त्यांच्याकडून ५००० हजार रूपये दंड वसूल करतात, कल्याण—अंबरनाथ रोडसाठी हे ठिक नाही आणि दुसरा विषय म्हणजे डेमॉलेशनचा, जेव्हा महानगरपालिका डेमॉलेशन करतात, ते काम प्रायव्हेट कंपनीकडून का करतात? माहापौरजी, आयुक्त साहेब, हे प्राव्हेट ठेकेदाराकडून करायला नाही पाहीजे. डेमॉलेशन प्रायव्हेट ठेकेदाराकडून व्हायला नाही पाहीजे, ते महापालिकेद्वारेच झाले पाहीजे. उप महापौरजी या विषयी आपण सांगाल का? जमनुजी आपण नंतर बोला. हे काम प्रायव्हेट ठेकेदाराकडून व्हायला नाही पाहीजे, असे माझे निवेदन आहे आणि मला याचे उत्तर पण पाहीजे, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंडः—</u>** मा. महापौरजी, मी डॉ. नाथानी यांच्या मतांशी सहमत आहे की, प्रायव्हेट ठेकेदाराला देण्याची काय गरज आहे, आपल्या जवळ बिट मुकादम आहेत आणि संपुर्ण यंत्रणा महापालिकेकडे आहेत. त्याच्या नंतर आपले बिट मुकादम आहेत, ते काय करतील? त्यांचे काम काय आहे? जर ते लोक तोडत नसतील तर त्यांना तेथून काढून टाका आणि दुस—या कामासाठी लावा. प्रायव्हेट ठेकेदार कोणत्याही अनधिकृत बांधकामांना तोडण्यासाठी

का मागविण्यात येतात? यामध्ये भ्रष्टाचाराची दुर्गंधी येत आहे. जर आपले महापालिकेच लोक आहेत, तर ठेकेदाराकडून आपण तोडत आहेत. कृपया करून यावर लक्ष देण्यात यावे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः–** मा. महापौरजी, आज सभागृहामध्ये जो विषय आला आहे, तो स्थायी समितीपुढे आला होता आणि या विषयाला स्थायी समितीने महासभेपुढ पाठवला आहे. धोरणात्मक निर्णय जे पण होतात, ते याच महासभेमध्ये होत असतात आणि माझे मित्र श्री. राजेश वदारिया यांनी या रेटची जी लिस्ट आहे, त्यामध्ये त्यांनी ज्या सुचना दिल्या आहेत, त्यांनी चांगल्या सुचना दिल्या आहेत. यामध्ये फक्त एक गोष्ट, जे डॉ. नाथानी आणि श्री. शंकर लुंड यांनी जे सांगितले आहे की, प्रायव्हेट ठेकेदाराचा जो विषय आहे, हे झाल्या नंतर प्रायव्हेट ठेकेदाराचा काहीच संबंध राहणार नाही. प्राव्हेट ठेकेदार जे तोडतात आणि सामान घेऊन जातात, त्या सामानाची किंमत या रेटपेक्षा खुपच जास्त असते. त्यामुळे प्रायव्हट ठेकेदार जे सामान घेऊन जातात, तो विषय रद्द करण्यात यावा आणि तसेच याच्या पहीजे सभा होती, त्यामध्ये १०० लोक आपण ठेकेदारातर्फे भरती करणार आहेत, ते शंभर लोक दंड वसुल करतील आणि प्रत्येक पॅनलमध्ये पाच–पाच लोक असा प्रस्ताव आपण ऑल रेडी पास केला आहे आणि टेंडरची प्रक्रिया चालू आहे. हे जे दंड आपण लावणार आहेत, ती संपुर्ण टिम आयुक्तांच्या निर्देशानुसार ती टिमी दंड वसुल करेल. या शहरामध्ये दोन त्रासदायक गोष्टी आहेत, एक साफसफाईची आणि दुसरी ट्रॉफिकची साफसफाईसाठी मा. आयुक्तांचे अभिनंदन, मा. स्थायी समितीमध्ये सर्व पक्षानी केले आहे आणि आज या महासभेमध्ये पण आपण सर्व विचार ठेवले आहेत की, सर्व पदाधिकारी यांना बोलावून त्यांचे सत्कार व्हायला पाहीजे. स्वच्छताचा जो विषय आहे, तो चांगल्या प्रकारे पुढे जात आहे. शहरामध्ये साफसफाई होत आहे आणि अजून पुढे चांगली होईल. ट्रॅफिकची जी समस्या आहे, ती प्रत्येक दिवस खराब होत चालली आहे. कोणी पण कुठे पण गाडया उभ्या करतात? कोणी कुठे पण मोटर सायकल उभी करतात? जर गोल मैदान परिसरामध्ये चारही बाजूनी आपण बघितले की, तिथे एवढया कार उभ्या आहेत, त्या आठवडयातून एक वेळा सुध्दा निघत नाहीत. त्यामुळे दोन समस्या निर्माण होतात, एक ट्रॉफिकची समस्या, दुसरी गंधगीची समस्या निर्माण होते, तिथे साफसफाई पण होत नाही, कचरा काढला जात नाही. हा प्रस्ताव पास झाल्या नंतर या गाडया एकाच जागेवर १०, १० दिवस कोणीच उभ्या करणार नाहीत आणि आपण या प्रस्तावा पारीत करीत आहोत, जसे श्री. राजेशजीने सांगितले त्या हिशोबाने, परंतु हा प्रस्ताव पास झाल्या नंतरच लागू होईल. कल्याण–अंबरनाथ रोडची जी कटींग झाली आहे, किंवा त्याच्या नंतर काही लोकांचे डेमॉलेशन झाले, त्यांना हा प्रस्ताव लागू होणार नाही. आजच्या नंतर जी तोडफोड होईल, त्यांना लागू होईल आणि भविष्यामध्ये महानगरपालिका ज्या रोडची वायडिंग करेल, रोड कटींगचा जो विषय येईल, त्यामध्ये हा दंडात्मक निर्णय लागू होणार नाही. रोड कटींगमध्ये इथे जी पॉलिसी डिसाईड होते की, आपल्याला जी प्लस वन बनवायचे आहे किंवा जी प्लस टू बनवायचे आहे. या महासभेची जी पण पॉलिसी लागू होईल, त्या पॉलिसीच्या हिशोबाने जे बनवतील त्यांना दंड लागू होणार नाही. त्याच्या पेक्षा जास्त कोणी बनवेल त्यांना हा दंड लागू होईल. त्यामुळे या शहराच्या भल्यासाठी, या शहरामध्ये ट्राफिकच्या समस्याच्या समाधानासाठी आणि नियमांचे पालन करण्यासाठी मी सर्व सदस्यांना निवेदन करतो की, ही जी दंडाची रक्कम आहे, राजेशजीने वाचून दाखवली आहे आणि ती कमी केली आहे, यामध्ये आपल्याला अजून काही निवेदन दयायचे असतील रेटच्या बाबतीत तर ते पण आपण मान्य करू आणि या प्रस्तावाला सर्वसंमतीने पास केले जावे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः–** नाही, नाही आमचा या प्रस्तावाला विरोध आहे, सर्वसंमतीने नाही तर प्रस्ताव चांगल्या प्रकारे यायला पाहीजे आणि मॅडमजी एक गोष्ट सांगा, इथे राजेशजीने सांगितले की, ५० स्केअर फुटावर जे लोक झोपडपट्टीमध्ये राहतात त्यांना ५० रूपये करणार. अनधिकृत बांधकामांवर दंड दिले आहे. माझे म्हणणे असे आहे की, ठिक आहे, झोपडपट्टीवाले ५० रूपये भरतील अनधिकृत बांधकाम ज्या एरियामध्ये होते, तिथल्या प्रभाग अधिका–याला किती दंड लागेल. त्या प्रभाग अधिका–याला किती दंड व्हायला पाहीजे. तर २०० रूपये व्हायला पाहीजे, एक स्केअर फुटाच्या मागे? जर हे होत असेल तर २०० रूपये दंड करा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः–** मतदान घ्या.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः–** ठिक आहे, चालेल, आमचे काहीच नाही मतदान घ्या.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः–** महापौरजी, आपल्या सभागृह नेताने सांगितले की, गोल मैदान परिसरमध्ये गाडया उभ्या आहेत, माझ्या माहीती प्रमाणे संपुर्ण शहरामध्ये नाही तर संपुर्ण भारतामध्ये गाडया रस्त्यावर उभ्या असतात. फक्त गोल मैदानमध्येच गाडया उभ्या राहत नाही. असे कोणीच वंचित राहीले नाही, कोणताही शहर वंचित राहीला

नाही. संपुर्ण भारतामध्ये ट्रफिकची समस्या आहे, दिल्ली असेल, कलकत्ता असेल किंवा चेनई असेल, रोडवर गाडया उभ्या असतात. गोल मैदान येथे गाडया, मला पण वाटते की, सफाई व्हायला पाहीजे, जास्त पार्किंग व्हायला नाही पाहीजे. परंतु जे लोक बिल्डींगमध्ये राहतात, त्यांच्याच गाडया रोडवर उभ्या असतात, ते लोक गाडया कुठे उभे करणार? हा खुप मोठा विषय आहे. आपण जर बिल्डींगच्या लोकावर काही फिक्स कराल तर स्टीकर्स, बॅनर लावून हे त्यांच्यासाठीच आहे. बाहेरच्या गाडया यायला नाही पाहीजे, तर मी हा प्रस्ताव पास करून देईल. नाही तर या प्रस्तावाला माझा विरोध आहे. कारण की, गोल मैदान माझे हृदय माझा शहर आहे. तिथे बाहेरच्या गाडया उभ्या राहील्या नाही पाहीजेत. परंतु रहिवासींच्या गाडया उभ्या असायला पाहीजेत, धन्यवाद.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सन्माननिय महापौरजी, माझा विषय...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, या विषयावर खुप चर्चा झालेली आहे, या विषयावर मतदान घेण्यात यावे, या विषयावर भरपुर चर्चा झालेली आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** महापौर, साहेबा सर्व नगरसेवकांना बोलण्याचा हक्क आहे. कृपया हे विसरू नका?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आपण जर गरीब लोकांना उल्हासनगरच्या बाहेर काढत असाल तर खुप चांगले आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** महापौर साहेबा, शहरामध्ये साफसफाई झाली पाहीजे. शहराचे रस्ते रिकामे राहीले पाहीजेत, लोकांना येण्या—जाण्यासाठी त्रास झाला नाही पाहीजे. प्रशासनाने जो प्रस्ताव आणला आहे, त्याला सुध्दा मान देवू, त्याला मान दयायलाच पाहीजे. परंतु यामध्ये ज्या त्रुटी आहेत, काही कमी असेल त्या पण दुर झाल्या पाहीजेत. रस्त्यावर ज्या बेवारस कार उभ्या आहेत, त्या तेथून कधी हालतच नाही, त्या गरज नसतांना सुध्दा रस्त्यावर उभ्या आहेत. ते कार्य कोण करेल? त्यासाठी कोणत्या अधिका—याची निवड करण्यात आली आहे. मा. महापौर साहेबा, प्रस्ताव खुप चांगला आहे, शहराची साफसफाई व्हायला पाहीजे. शहरातील समस्या दुर झाल्या पाहीजेत. परंतु ज्या बेवारस कार उभ्या आहेत, दोन चाकी वाहन, चार चाकी वाहन, त्यांना कोण हटवेल? कृपया करून त्याची पण माहीती दया. वर्षानुवर्ष अशा गाडया उभ्या आहेत. त्यांच्यासाठी वारंवार वार्ड ऑफिसमध्ये जाऊन आम्ही सांगत असतो. तर तेथील बिट मुकादम बोलतात की, त्या कार आम्ही हटवणार नाही. स्कुटर पण आम्ही हटवणार नाही, ते टॅक्स भरतात, तर रस्ता थांबवण्यासाठी टॅक्स भरतात का? अशा गाडयांना कोण हटवणार? याची जबाबदारी कोणावर आहे, कृपया याची माहीती दया. तर संबंधित अधिका—याच्या लक्षात आणून दया आणि आमच्या वार्ड ऑफिसरने सांगितले की, प्रभाग समिती क्र. ४ मध्ये ३ लाख रूपये वसुली आली आहे. ते तीन लाख रूपये किती वर्षात आले आहेत.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** साहेब, संपुर्ण उल्हासनगरचे आहेत.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** संपुर्ण उल्हासनगरचे आहेत का?

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, आज जो विषय आला आहे,

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** राजेश भाई, दादाच्या प्रश्नाचे उत्तर कोण देईल?

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मी महापौरांकडून परवानगी घेतली आहे. बोलण्यासाठी मी आपल्याकडून पण परवानगी घेऊ का?

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** आपण सांगा की, कोण कोणत्या नगरसेवकांनी बोलायला पाहीजे आणि कोण कोणत्या नगरसेवकांनी बोलायला नाही पाहीजे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** या विषयावर मला बोलायचे आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, शांत रहा, मी आपल्याला सांगितले होते की, एक एक करून बोला. आजच आपण नियम तोडत आहेत.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मला कशाची परवा नाही,

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** किशोरजी, पहीले दादाना बोलू दया.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** दादा सतरामदास बोलल्या नंतर किशोरजी आपण नंतर बोला.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** त्यांचे उत्तर तर येऊ दया.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** किशोरजी आपण कृपया बसून घ्या, सतरामदास दादा बोलल्या नंतर आपण बोला, आपण आजच नियम तोडत आहेत, कृपया करून असे करू नका?

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** महानगरपालिकेला जर शहर चालवायचे असेल तर शहर चालवण्यासाठी महानगरपालिकेला उत्तन्न मिळणे पण जरूरी आहे. शहराच्या जनतेला सुविधा देणे खुप जरूरी आहे. त्यासाठी प्रशासनाने जो पस्ताव आणला आहे, तो सर्व लोकप्रतिनिधीच्या आदेशानुसार, त्यांनी सांगितल्या नुसार जर आवश्यक असेल तर त्याला आम्ही आवश्यक मान्यता देवू. परंतु मला माहीती पाहीजे की, आपण जे पत्र दिले आहे, त्या पत्रामध्ये काही लिहीले आहे, ती माहीती मिळण्यासाठी मी आपल्याला विनंती करीत आहेत की, रस्तयावर काही महीने, वर्षानुवर्ष लावारीस गाडया उभ्या आहेत, काही बेवारस स्कुटर उभ्या आहेत, त्यांना हटवण्यासाठी कोणत्या अधिका—याला आम्हांला भेटावे लागेल. अशी माहीती पाहीजे, तरी कृपया ती माहीती देण्यात यावी. तर खुप चांगले होईल. कोणत्या अधिका—यावर जबाबदारी दिली आहे? पहीले कोणत्या अधिका—यावर जबाबदारी आहे, त्या अधिका—याने सांगावे की, माझ्यावर जबाबदारी आहे. तर नगरसेवक त्यांच्याकडे जातील आणि त्याच्या नंतर त्या गाडया हटवल्या जातील किंवा कोणी मुकादम तिथे ठेवलेला आहे का? किंवा मुकादमावर जबाबदारी आहे का? तर आम्ही मुकादमाला सांगू शकतो.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** मा. महापौर महोदया, सदस्य, श्री. जेसवानी साहेबांनी जो प्रश्न विचारला आहे, त्या विषयी मी सांगू इच्छितो की, त्या संदर्भात मा. महापौरांच्या केबिनमध्ये जी मिटींग झाली, त्या मिटींगमध्ये आर.टी.ओ. अधिकारी पण उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, अशी जी वाहने आहेत, जे बेवारसपणे उभ्या आहेत, त्यांची लिस्ट त्यांनी बनवून मागितली आहे. तर आर.टी.ओ. चे अधिकारीआणि महापालिकेचे अधिकारी मिळून त्या गाडया हटवणार आहेत. मी प्रभाग समिती क्र.४ क्षेत्रातील ज्या गाडया आहेत, त्याची लिस्ट बनवली आहे आणि आर.टी.ओ. कडे सादर केली आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** प्रभाग समिती ३ ची लिस्ट बनवली आहे की, नाही कृपया हे सांगा.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. गणेश शिंपी:—** तेथील सहा. आयुक्तांनी बनवली आहे.

**सहाय्यक आयुक्त, श्री. प्रबोधन मवाळे:—** प्रभाग समिती क्र.३ ची लिस्ट बनवली आहे,

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—**पॅनलक्र. १६ ची कंप्लेट मी केली आहे, त्याचे यामध्ये समावेश आहे का? पॅनल क्र. १६ मध्ये भरपूर बेवारस गाडया उभ्या आहेत, त्यांचा या लिस्टमध्ये समावेश आहे की, नाही फक्त हे मला सांगा.

**सहाय्यक आयुक्त, श्री. प्रबोधन मवाळे:—** प्रभाग समिती क्र.३ मधिल सर्व पॅनलचा समावेश आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** या गाडया कधी हटवल्या जातील, या विषयीआपल्याकडे काही माहीती आहे का?

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** साहेब, मी लिस्ट फॉरवर्ड करीत आहे, याच्या पहीले पण मी ट्रॅफिक पोलिसांना पत्र लिहीले होते. आता आयुक्त साहेबांकडून सर्व वार्ड ऑफिसरांची लिस्ट जाणार आहे. तर मग मी अजून एक वेळा ट्राफिक पोलिस डिपार्टमेंटला फॉलो करतो.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** ठिक आहे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, आज हा जो विषय महासभेमध्ये आला आहे, हा कोणत्याही सदस्याचे व्यक्तिगत विषय नाही. महासभेमध्ये स्थायी समितीमधून पास होऊन आला आहे. स्थायी समितीमध्ये पण पास केला नाही. त्यांनी सांगितला आहे की, महासभेमध्ये पाठवू तिथे आपण निर्णय घेऊ. तर प्रत्येक सदस्यांना

माहीती घेण्याची आणि प्रश्न विचारण्याची गरज आहे. लोकशाहीचा गळा आवळण्यासाठी आपण इथे बसलो नाही. मतदान करण्याची गरज असेल तर आम्ही मतदान पण करू, आमच्या जवळ मतदान आहे. ते आम्ही करू, परंतु अगदी शेवटी करू. या विषयावर मला बोलायचे आहे, हे तीन विषय एकत्र जोडले आहेत. हातगाडयांचे रेट वाढवले आहेत, जे अनाधिकृत बांधकामे तुटतील पत्र्यांचे, टीयर गटर, आर.सी.सी. त्यांचा विषय पण यामध्येच आहे. तिसरा विषय असा आहे की, आपण हातगाडयांवर जो एक हतार रूपये घेत होतो, ते आपण आता पाच हजार घेणार आहेत. तर आमचे वरिष्ठ सदस्य, श्री. राजेश वदारिया यांनी शहरासाठी थोडे फार चार्जेस कमी केले आहेत. त्यासाठी मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु मी सभागृहाला अवगत करतो की, जे श्री. राजेश वदारिया सांगत होते की, जेव्हा अनधिकृत बांधकाम तोडले जाते, तेव्हा ठेकेदार संपुर्ण सामान चोरी करून घेऊन जातात. यांनी जे ठेकेदार जॉईंड केले आहेत, जलील, फलील, खलील सगळयांचे नाव घेणार नाही. फक्त एका ठेकेदाराचे नाव सांगितले आहे, जलिल. ते काय करतात? मा. महापौरजी यांचे कर्मचारी तोडत नाहीत तर जिथे बांधकाम तोडायचे आहे, तिथे महापालिकेतर्फे एक ठेकेदार अ‍ॅपॉईंट करतात तेच टीयर गटर तोडतात आणि संपुर्ण सामान चोरी करून घेऊन जातात. पहीले तर ठेकेदार बंद झाला पाहीजे, एक तर कोणाची जागा तुटते? जे शिल्लक राहते, ते पण ठेकेदार चोरी करून घेऊन जातात. सभागृहामध्ये जे विषय आहेत, ते तीन विषय आहेत. हातगाडयांचा विषय आहे, अनधिकृत बांधकामाचा विषय आहे आणि तिसरा जो दुकानदार रस्त्यावर सामान ठेवतात, त्याच्यावर पण दंड आहे. आज संपुर्ण शहरामध्ये हातगाडीवाले तिथे ना फेरीवाला हॉकर्स झोन आहे, तिथे हातगाडया उभ्या राहील्या नाही पाहीजेत. आता तर ओरत आहेत की, हातगाडीवाले इथे उभे राहीले नाही पाहीजेत. हा हॉकर्स नॉन झोन आहे. आज पर्यंत कॅम्प नंबर ५ मध्ये हॉकर्स झोन कुठे बनवले आहेत का? हातगाडीवाले लोक उभे राहू शकतील. तरी कृपया करून मी आपल्याला विनंती करतो की, हा विषय स्थायी समितीने पाठवला आहे, त्यांनी सुध्दा फायनल पास करून पाठवला नाही. लहीले आहे की, जनरल बॉडी विल डिसाईड तर हा ठराव विचार करून पास केले जावे. जर हा विषय आज पास झाला नाही आणि दुस—या महीन्यामध्ये जरी आला, तर त्यामध्ये काहीच बिघडणार नाही कारण की, श्री. गणेश शिंपी साहेब, व्यवस्थित उत्तर देवू शकले नाहीत. आज पर्यंत सन २००१ पासून ते सन २०१८ पर्यंत फक्त तीन लाख रूपये वसुली झाली आहे. तर हे दर वाढविल्या नंतर किती उत्पन्न वाढेल? ते डिटेल त्यांच्याकडे नाहीत आणि आता हे वाढवायचे, आपण महापालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी हजारो शोर्चेस करत असतो. परंतु सदस्यांची कामे एक वर्षा पासून एक रूपयाचे पण झाले नाही. तेव्हा त्यासाठी कधीच मतदान झाले नाही. फक्त विषयासाठी मतदान करून उत्पन्न वाढवून देणे, कोणत्याही सदस्यांचे नगरसेवक निधी दिले आहे का? प्रभाग समिती निधी दिले आहे का? तरी कृपया करून सभागृहाला मिस गाईड करू नका? तरी कृपया करून जे उचित असेल तेच, आज पास होणार नाही, एक महीन्या नंतर पास होईल. तर शहरासाठी विचार करण्या सारखे आहे. आज पास करणार, उद्या त्यांच्याकडे कोणी दुकानदार येईल, किंवा अनधिकृत बांधकाम जर तुटत असेल तर हेच लोक फोन करतील की तोडू नका? हा माझा माणूस आहे. तर यासाठी विचार करून दंड लावा, तर खुप चांगले होईल. बाकी सभागृह जर करीत असेल तर मला त्यावर काहीच ऑब्जेक्शन नाही, मी फक्त शहराच्या हितासाठी बोललो आहे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. अशोक छाप्रु:—** मा. महापौरजी, मा. उप महापौरजी, राजेशजी एक मिनीट सर्वांत पहीले म्हणजे उल्हासनगरमध्ये जेवढे गार्डन आहेत, तिथे लोक वाकिंगसाठी जातात. सकाळी आणि संध्याकाळी वॉकसाठी जातात. ते लोक गाडया बाहेर उभ्या करतात, जर आपण कारवाई कराल आणि त्यांच्यावर दंड लावला तर लोक वाकिंगसाठी जाणारच नाही. त्याच्यासाठी आपण काय कराल? वॉक करण्यासाठी लोक गार्डनमध्ये जातात आणि गाडया बाहेर उभ्या करतात वाक केल्या नंतर जेव्हा बाहेर येतील तर त्यांना दंड लावणार, तेव्हा पायी जातील. परंतु खुप लोक दुरून पण येत असतात, जसे गोल मैदानामध्ये झुलैलाल मंदिरापासून लोक वॉक करण्यासाठी येत असतात, ते गाडया घेऊन येतात, सिनियर सिटीझन येतात आणि सर्वात जास्त उल्हासनगरमध्ये समस्या आहे, ती पार्किंगची? बिल्डींगच्या आतमध्ये पार्किंग नाही. कोणत्याही बिल्डींगमध्ये पार्किंग नाही. आपण जो दंड लावणार आहेत, तो कोणत्या हिशोबाने लावणार आहेत, पहीले त्यांना पार्किंगची सुविधा उपलब्ध करून दया.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** नो पार्किंग, जर पार्किंग नसेल तर नो दंड.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** गोल मैदान इथे एक जागा आहे, तिथे मा. आयुक्त साहेबांनी एक व्हिडीओ पाठवला होता, तर तिथे एक पार्किंग बनली पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौरजी, आमच्या काही सदस्यांनी पार्किंगच्या विषयावर चर्चा केली, तर मी जो गाषवारा वाचला आहे आणि याच्यातून मला जे समजले आहे, ते मी तुम्हांला सांगतो. पहीली गोष्ट म्हणजे नो पार्किंग आणि पार्किंगवाला विषय आहेच नाही. यामध्ये सांगितले आहे की, रस्त्यावर बेवारस वाहने उभी आहेत आणि काही दिवसापासून, काही महीन्यापासून, काही वर्षा पासून उभे आहेत. त्यांना हटवण्यासाठी हा दंड आहे आणि कोणाच्या घराच्या बाहेर? बिल्डींगच्या बाहेर, आतमध्ये घरामध्ये कोणी व्यक्ति राहत असेल आणि त्यांच्या घराच्या बाहेर गाडी उभी केली आहे आणि बिल्डींगमध्ये राहत असेल आणि बिल्डींगच्या बाहेर गाडी उभी केली असेल तर त्यांच्यावर हा दंड लागू होणार नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ठिक आहे, सन्माननिय सदस्यांनी सांगितले की, बिल्डींगमध्ये राहतात आणि बिल्डींगच्या बाहेर गाडी उभी आहे. मी हातगाडी बाहेर ठेवतो आणि त्या एरियामध्ये राहत असेल, त्या बॅरेकमध्ये राहत असेल तर त्याच्यासाठी काय? आताच श्री. राजेश वदारिया यांनी सांगितले की, व्यक्ती घरामध्ये राहतो आणि गाडी बाहेर उभी असते, त्याच्यावर ॲक्शन होणार नाही. मी हातगाडी चालवतो आणि हातगाडी रस्त्यावर उभी करतो आणि मी त्याच बाजूला राहतो, त्यावर काय कारवाई कराल?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, गोषवारा खुपच क्लियर कट लिहीला आहे, जसे राजेशजीने सांगितले, मला वाटते की, सभागृहाचे काही सदस्य, वेगळया रस्त्याने चालले आहेत. गोषवा—यामध्ये जसे सर्व गोष्टी क्लियर कट लिहील्या आहेत, आम्ही त्या हिशोबाने पास करू.

**महापालिका सचिव:—** मा. महापौरांनी मतदान घेण्यासाठी प्रस्ताव टाकायला सांगितला आहे. तरी कृपया मतदानासाठी प्रस्ताव टाकण्यात येत आहे, त्याच्यासाठी मी सन्माननिय सदस्य, श्री. राजेश वदारिया यांनी काही रेटस कोड केले आहेत त्यावर ठराव दिला आहे. पत्र्याचे शेड त्यांनी केले आहे, १०० रूपयाचे, ५० रूपये केले आहेत, टीयर गटर २०० रूपयाचे १०० रूपये सांगितले आहे, आर.सी.सी. बांधकामाचे ३००चे १५० रूपये केले आहेत. तसेच त्यांनी हातगाडी विथ कॅबिनला ॲड करायला सांगितली आहे. त्याचे दोन हजार रूपये सांगितले आहेत, रिकामी गाडी असल्यास १००० रूपये, पद—पथावरती विक्रीसाठी माल ठेवला असल्यास २००० रूपये, रस्त्यावर अनधिकृत बांधकाम साहीत्य खडी, विटा, रेती इत्यादी साहीत्या ठेवलेले असल्यास जे ५००० रूपये आहेत, ते त्यांनी एक हजार सांगितले आहेत. त्याच प्रमाणे शहरात विविध ठिकाणी वाहन मालकाकडून दंडाचे ५००० रूपये सांगितले आहेत, त्याचे त्यांनी ३००० रूपये सांगितले आहेत, ही सुधारणा सांगितली आहे. तरी कृपया सुधारणा ऐकुन घ्या. वाहन मालकाकडून दंडाचे ५००० रूपये आहेत, त्याचे ३००० रूपये सांगितले आहेत. त्या वाहन मालकाकडून ३००० रूपयाचे १००० रूपये हा बदल त्यांनी केला आहे. ठराव आता, जे या ठरावाच्या बाजूने आहेत, त्यांनी कृपया हातवर करावेत.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** एक मिनीट मॅडम, यामध्ये ५ नंबरच्या विषयावर बोलतो, याचे डिसक्रिकशन पॉवर कोणाकडे राहील. याचे डिफाईड कोण करेल. अनाधिकृत गाडया उभ्या आहेत, खुप दिवसा पासून उभ्या आहेत, मला वार्ड ऑफिसरकडून उत्तर ऐकायचे आहे आणि त्याच बरोबर आर.टी.ओ. बरोबर पण कंसल्ट राहायला पाहीजे. ॲन्ड हू विल डिसाईड ॲन्ड अप्टर दॅट यु विल गो फॉर वोटींग ॲन्ड फॉर हॉट एवर.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** डॉक्टर, पहीले नोटीस लागेल ना? हे काय होत आहे?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** गरींबांना हटवण्याचा प्रयत्न चालू आहे.

**महापालिका सचिव:—** मतदानास प्रस्ताव टाकला आहे,

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** महापौरजी, हे गरीबीला हटाव आहे की, गरींबांना हटाव आहे, काहीच समजत नाही. हे मिस अंडर स्टॅडींग आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** महापौरजी आपण आजच सांगितले आहे की, हात वरती करून डेकोरम इथे मेन्टेन होत नाही.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** यांनी वोटीसाठी हे बोलेले आहे, मनोजजी.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** मी सचिवांना वोटींगसाठी बोलेले आहे,

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** मनोजजी हे लोक प्रस्तावाच्या फेवरमध्ये हात वर करीत आहे.

**महापालिका सचिवः—** कृपया मा. महापौरांनी, मतदानास हा प्रस्ताव टाकण्यास सांगितले आहे. यामध्ये असे आहे की, घर, दुकान किंवा इमारत, दुकान नाही, घर आणि इमारतीच्या बाहेर, ज्यांचे वाहन असेल तर त्यांच्यावर दंड आकारायचा नाही. आता कृपया हा प्रस्ताव मतदानास टाकत आहे, ज्यांना हा प्रस्ताव मान्य आहे, सदस्यांनी ही सुधारणा जी सुचविली आहे, ज्यांना हा प्रस्ताव मान्य आहे त्यांनी कृपया हात वर करावे.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** "अच्छे दिन आये रे भैया, अच्छे दिन आये". आपके राज्य में अच्छे दिन आये

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** "जरा पिछे  मुडेके देखो बाहुत अच्छे दिन आये"

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** "गरीबोंको लथाडे अच्छे दिन आये" हातगाडीसाठी २००० हजार "अच्छे दिन आये रे भैया"

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** उद्या पासून महापौरांच्या घरा समोर हातगाडी लावू आणि हजार रूपये भरू आणि जाऊन देणार नाही.

**प्रस्तावाच्या बाजूने २९ मते**

१) श्रीम. मिना कुमार आयलानी

२) श्री. जीवन इदनानी

३) श्री. जमनादास पुरस्वानी

४) डॉ. प्रकाश नाथानी

५) श्री. दिपक सिरवानी

६) श्रीम. कविता पंजाबी

७) श्री. अजित गुप्ता

८) श्री. रवि जग्यासी

९) श्री. अशोक छाप्रु

१०) श्री. किशोर वनवारी

११) श्रीम. इंदिरा उदासी

१२) श्रीम. दिप्ती दुधानी

१३) श्रीम. मिनाकौर लबाना

१४) श्रीम. गीता साधवानी

१५) श्री. शंकर लुंड

१६) श्रीम. ज्योती भटीजा

१७) श्री. हरेश जग्यासी

१८) श्रीम. आशा बिराडे

१९) श्री. राजेश वदारिया

२०) श्रीम. मिना सोनेजी

२१) श्रीम. ज्योती पाटील

२२) श्रीम. सविता तोरणे

२३) श्रीम. पुजा भोईर

२४) श्रीम. शुभागीनी निकम

२५) श्री. रविंद्र बागुल

२६) श्रीम. सुनिता बगाडे

२७) श्रीम. अंजली साळवे

या वेळी श्रीम. डिम्पल ठाकुर या सभागृहा बाहेर गेल्या.

२८) श्री. गजानन शेळके

२९) श्री. भारत राजवानी

**महापालिका सचिवः—** या ठरावाच्या विरोधात कुणी असेल त्यांनी हात वर करावेत, प्रस्तावाच्या विरोधात कुणी हात वर करीत नाहीत, मग याचा अर्थ सर्वानुमते प्रस्ताव आहे का?

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** याचा अर्थ सर्वानुमते झाले.

**प्रस्तावाच्या विरोधात मते**

१) श्री. रमेश चव्हाण

२) श्री. राजेंद्रसिह भुल्लर

३) श्रीम. वसुधा बोडारे

४) श्रीम. ज्योती गायकवाड

५) श्रीम. ज्योती माने

६) श्री. भगवान भालेराव

७) श्री. शेखर यादव

८) श्रीम. संगीता सपकाळे

९) श्रीम. शितल कदम

१०) श्रीम. ज्योत्सना जाधव

११) श्रीम. सुरेखा आव्हाड

१२) श्रीम. अंजना म्हस्के

१३) श्रीम. अपेक्षा भालेराव

१४) श्री. प्रमोद टाले

**महापालिका सचिव:—** ठिक आहे, हा प्रस्ताव बहुमताने पारीत झाला आहे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** "अच्छे दिन आये"

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** "अच्छे दिन आये, अच्छे दिन"

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, फक्त एक शब्द सांगतो, आता कोणही वार्ड ऑफिसर नाही बोलणार नाही, रस्त्यावरील सर्व हातगाडया हटवल्या पाहीजेत.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** सचिव साहेबा, मी पहीलेच हात वर केला होता.

**महापालिका सचिव:—** ठिक आहे, साहेब.

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 👍

---

☑

**विषय क्र. ३ :—** अनधिकृत बांधकाम निष्कासनापोटी येणारा खर्च वसुल करणेकामी शुल्क वसुलीस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामांविरुध्द् कारवाई करणेसाठी प्रभाग समित्या स्थापन करण्यात आलेल्या असून अनधिकृत बांधकामांविरुध्द् कारवाई करणेसाठी सहाय्यक आयुक्त यांची पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. सहा.आयुक्त यांचे अधिनस्त कनिष्ठ अभियंता, मुकादम व मजूर कर्मचा—यांमार्फत अनधिकृत बांधकामांविरुध्द् निष्कासनाची कारवाई करण्यात येत असते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियमातील कलम २६० व २६७ अन्वये अनधिकृत बांधकाम पाडण्याचा खर्च अनधिकृत बांधकाम करणा—या व्यक्तिने देणे आवश्यक आहे. सदरचा खर्च वसूल करणेकामी दिनांक २०/२/२००१ रोजी तत्कालीन आयुक्तांनी प्रति चौ.फुट रु. ६३/— एवढा निष्कासन खर्च वसुल करणेकामी सदरचे आदेश सन २००१ मध्ये पारीत केलेले आहेत. तद्नंतर या आदेशामध्ये कोणतीही सुधारणा झालेली नाही. आतापर्यंत अनधिकृत बांधकाम निष्कासनापोटी सुमारे रु. ३ लक्ष एवढया रकमेची वसुली केलेली आहे.

प्रधान महालेखाकार कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांनी केलेल्या लेखा परिक्षणामध्ये देखिल सदरची बाब नमुद केली असून निष्कासन खर्चापोटी वसुल करावयाच्या रकमेत सुधारणा करणे आवश्यक असल्याचे लेखा परिक्षणात नमुद केले आहे. त्यामुळे सदर आदेशात सुधारणा होणे आवश्यक आहे. यासाठी पुढीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | निष्कासीत केलेल्या बांधकामाचा प्रकार | निष्कासीत करण्यात आलेल्या बांधकामाच्या एकूण क्षेत्रफळाकरिता वसूल करावयाची खर्चाची रक्कम प्रती चौ.फुट प्रमाणे |
|---|---|---|
| १ | १. पत्रा शेड<br>२. वीट बांधकाम<br>३. झोपडी | रु. १००/— |
| २ | १. टीअर गर्डर<br>२. लोड बेअरींग | रु. २००/— |
| ३ | आर.सी.सी बांधकाम | रु. ३००/— |

संबधिताकडून खर्चाची रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४७८ (२) प्रमाणे वसुल करण्यात येईल. तसेच संबधिताने खर्चाच्या रकमेचा भरणा न केल्यास सदरची रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४३९ (२) अन्वये मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे वसुल करण्यात येईल.

त्याचप्रमाणे शहरातील अनधिकृत फेरीवाले, हातगाडीवाले, महापालिकेच्या पदपथावर व रस्त्यावर अनधिकृत व्यवसाय करणारे यांच्याकडून पुढीलप्रमाणे दंडाची रक्कम वसुल करणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) हातगाडीवर माल असल्यास रु. २,०००/— (जुना दर रु. ५००/—)

२) रिकामी हातगाडी असल्यास रु. १,०००/— (जुना दर रु. २५०/—)

३) पदपथावर अथवा रस्त्यावर विक्रीसाठी माल ठेवलेला असल्यास रु. २,०००/—

४) रस्त्यावर अनधिकृतपणे बांधकाम साहित्य उदा०खडी, विटा, रेती, सिमेंट इत्यादी साहित्य ठेवलेले असल्यास रु,५०००/— (जुना दर रु. ६३/— प्रति चौ.फुट)

५) त्याचप्रमाणे शहरात ठिकठिकाणी महापालिकेच्या रस्त्यावर दुचाकी/चारचाकी वाहने बेवारस अवस्थेत उभी करण्यात येतात. सदरची वाहने संबधित मालकांकडून हटविण्यात न आल्याने वाहतुकीस अडथळा होतो तसेच साफसफाईच्या कामात देखिल अडचण येते. यासाठी बेवारस अवस्थेत असलेली वाहने जप्त करुन चारचाकी वाहन मालकाकडून दंडापोटी रु.५०००/— व दुचाकी वाहन मालकाकडून रु. ३,०००/— एवढी रक्कम आकारणी करणेसाठी देखिल प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी वरीलप्रमाणे शुल्क आकारणी करणेस मान्यता मिळणेकामी मा.महासभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र. ७७:** **दिनांकः— १४/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा महासभेत झालेल्या चर्चेअंती शहरातील अनधिकृत बांधकाम निष्कासनापोटी पुढीलप्रमाणे रक्कम वसुल करणेस मान्यता देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | १. पत्रा शेड<br>२. वीट बांधकाम<br>३. झोपडी | रु. ५०/— |
| २ | १. टीअर गर्डर<br>२. लोड बेअरींग | रु. १००/— |
| ३ | आर.सी.सी बांधकाम | रु. १५०/— |

तसेच शहरातील अनधिकृत फेरीवाले, हातगाडीवाले महापालिकेच्या पदपथावर व रस्त्यावर अनधिकृतपणे व्यवसाय करणारे यांच्याकडून पुढीलप्रमाणे दंडाची रक्कम वसुल करणेस मान्यता देत आहे.

१. हातगाडी / कॅबिन माल असल्यास रु. २,०००/—
२. रिकामी हातगाडी / कॅबिन असल्यास रु. १,०००/—
३. पदपथावर अथवा रस्त्यावर विक्रीसाठी माल ठेवलेला असल्यास रु. २,०००/—
४. रस्त्यावर अनधिकृतपणे बांधकाम साहित्य उदा० खडी, विटा, रेती, सिमेंट इत्यादी साहित्य ठेवलेले असल्यास रु, १०००/—
५. त्याचप्रमाणे शहरात ठिकठिकाणी बेवारस अवस्थेत असलेली वाहने जप्त करुन चारचाकी वाहन मालकाकडून दंडापोटी रु. ३,०००/— व दुचाकी वाहन मालकाकडून रु. १,०००/— एवढी रक्कम आकारणी करणे
६. तसेच घर, इमारती यांच्यासमोर रहिवाश्यांचे उभे असलेल्या वाहनावर दंड आकारण्यात येवू नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**बहुमताने**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** महापौर मॅडम, मला पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलायचे आहे. आपल्या शहरासाठी चांगले ठराव करीत आहेत.

**महापालिका सचिव:—** आता पास झाला आहे ना, बहुमताने डिक्लेअर केला आहे.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलत आहे, आपल्या शहराचे मुस्लिम बंधू इथे तीन दिवसा पासून उपोषणाला बसेल आहेत आणि त्यांची कायदेशिर मागणी आहे. त्यांना कब्रस्तान मिळेणे गरजेचे आहे. तर माझी आपल्यांना विनंती आहे की, आपण त्यांना भेटा आणि त्यांना त्यांचे अधिकार मिळायला पाहीजे, त्यांना आज उपोषण सोडवायला सांगावे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** माझा सुध्दा पाठिंबा आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, आपण आणि आयुक्त साहेब आणि सर्व सदस्य पण येतील, महासभा संपल्या नंतर सर्व सदस्य त्याच्याकडे जातील आणि त्यांचा जो प्रॉब्लेम आहे, साल करू.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—** मा. महापौर, मा.आयुक्त साहेब, आणि सर्व सन्माननिय सदस्य, आताच मुस्लिम भाई काल पासून उपोषणाला बसले आहेत, तर त्यांचा विषय खुप गंभीर आहे.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** महापौरजीव उप महापौरजी ते लोक तीन दिवसा पासून कब्रस्तानसाठी उपोषणाला बसेल आहेत. आपण त्यांच्यासाठी काय केले आहे?

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—** मा. महापौर मॅडम, फक्त आपली उल्हासनगर महानगरपालिका अशी आहे की, तिथे मुस्लिम लोकांना कब्रस्तान दिले नाही, असे कुठेही भारतात गांव नसेल की, केवळ महानगरपालिका नसेल. इतक्या वर्षा पासून हा विषय प्रलंबित आहे, आपण अनेकदा त्यांच्यासाठी डिक्लेयर केले आहे, ठराव पास केलेला आहे आणि तो होऊन सुध्दा त्याचे इंम्लीमेंट होत नाही. तर ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे. या बाबत त्वरीत काही तरी निर्णय व्हायला हवा. अशी मी आपणाला विनंती करते आणि सर्वांनाही विनंती करते, धन्यवाद.

**सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाड:—** मा. महापौर मॅडम, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, आपण शहर हिताच्या कामासाठी जे ठराव आणतो ते बहुमताने पास करतो आणि मुस्लिम बांधवांच्या कब्रस्तानासाठी आपण ठराव आणून तो तर संपुर्ण सभागृहाने पास केलेला आहे. तरीही आज पर्यंत त्यांना आपण जागा देवू शकलो नाही. त्याच बरोबर त्यांनी दोन तीन वेळा त्यांनी अक्षर: पार्थिव शरीर सुध्दा महानगरपालिके समोर आणलेले आहेत. जर आपल्या महानगरपालिकेची एवढी बिकट आवस्था आहे की, उल्हासनगर क्षेत्रामध्ये राहणा—या मुस्लिम बांधवांना बाहेरच्या ठिकाणी त्यांचे पार्थिव शरीर घेऊन जावे लागते. जर त्या हद्दीतील लोकांनी जर त्यांना नकार दिला, त्यांच्या जर पार्थिवाची विल्हेवाट लावून दिली नाही किंवा अंतिम संस्कार करून दिला नाही. तर त्या लोकांनी त्या मृत व्यक्तिंचे काय करायचे हा सुध्दा आपण विचार केला पाहीजे आणि ही तर खुपच लांच्छनास्पद गोष्ट आहे. महापौर मॅडम, आपण मुस्लिम बांधवांनसाठी कब्रस्तान देवू शकत नाही, ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. आपण इतर ठराव पास करून किंवा बहुमताने त्या ठरावावरती मतदान घेऊन तुम्ही ते ठराव पास करतात, ते मान्य आहे. ते जर शहर हिताचे असतील तर योग्यच आहे. परंतु आपण हा कब्रस्तानचा ठराव पास करून सुध्दा आज पर्यंत त्या लोकांना का जागा देवू शकलो नाही? याचे पण आपण जरा सविस्तर विश्लेषण करावायचे आहे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुलः—** मा. महापौरजी, आपल्याला जे तीन दिवसा पासून मुस्लिम लोक बाहेर बसलेले_आहेत. त्यांच्यासाठी आपण काय केले आहे? खुप विचार करण्यासारखे आहे की, कब्रस्तानसाठी त्यांना भांडावे लागते, हे चुकीचे आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** बागुलजी, महासभा संपल्या नंतर आपण सगळे मिळून त्यांच्याकडे जाऊ आणि कोणत्या कारणासाठी ते उपोषणाला बसले आहेत, त्या गोष्टी निर्वारण करण्याचा प्रयत्न करू.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुलः—** खुप खुप धन्यवाद, मॅडम.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** महापौर मॅडम, माझा हा विषय नव्हता, माझा पॉईंट ऑफ ऑर्डरवर दुसरा विषय आहे. मॅडम मी आपल्याकडून परवानगी घेतली आहे आणि मी अनुशासनाचे पालन करीत आहे आणि ज्या प्रमाणे आपण सांगितले की, सर्व लोकांनी सभागृहामध्ये अनुशासनाचे पालन केले पाहीजे. तर माझे खुप चांगले मित्र श्री. भगवान भालेराव, त्यांचे नावाच भगवान आहे. परंतु त्यांना आणखी भगवान अजून चांगली बुद्दी दयावी आणि अनुशासनाचे पालन करतील आणि जर मी बोलत आहे, तर कोणीही मध्ये बोलू नका?

**सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—** महापौरांनी परवानगी दिली आहे का?

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** मॅडमनी मला परवानगी दिली आहे, तुम्ही विचारा पाहीजे तर, आपण सर्व इथे अनुशासनाचे पालन केले तर खुप चांगले राहील. नाही तर काय होते.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** भालेरावजी, त्यांना बोलू दया.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** जेव्हा अनुशासनाचे पालन होत नाही, तेव्हा आमचे पण मन होते की, अनुशासन केले नाही पाहीजे. आम्ही पण आवेशमध्ये येऊन चुका करतो, धन्यवाद. तर मॅडम मी पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोललो आहे की, नगरसेवक निधीचे टेंडर झाले होते, स्थायी समितीने त्या प्रस्तावाला पास केले होते, त्यांची फक्त वर्क ऑर्डर होणे बाकी होते. मला माहीत झाले की, आयुक्त महोदयांनी त्या दिवशी सभेमध्ये सांगितले की, या वेळी सदनमध्ये कोणतेच काम होणार नाही? त्यानुसार ज्या वर्क ऑर्डर काढल्या जाणार होत्या, त्या थांबवल्या आहेत का? मला त्याचे उत्तर पाहीजे. जे अधिकारी असतील त्यांनी सांगावे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** आता हातगाडयांना परवानगी दिली आहे, तर होऊन जाईल.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** मा. सदस्य, मा. आयुक्त साहेबांनी काही कालावधीसाठी पेडींग ठेवण्यासाठी सांगितले आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** मा.महापौर मॅडम, इथे शहर अभियंता सांगत आहेत की, त्यांना लेखी आदेश दिले आहेत की, मौखिक.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** मौखिक आदेश दिले आहेत.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** मौखिक आदेश दिले आहेत, जी प्रक्रिया ज्यामध्ये १६, १६ लाख रूपये सर्व नगरसेवकांना प्रभाग समिती निधी व प्रभाग समिती निधी या वर्षाची दिले होते. त्यांचे कार्य आदेश निघायला पाहीजे होते, आयुक्तांच्या मौखिक आदेशामुळे थांबवले आहेत. ते किती दिवसासाठी?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** तसे काही सांगितले नाही.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** अनिश्चित काळासाठी सांगितले आहे का?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** अनिश्चित काळासाठी नाही.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** वेळेचे काहीच सांगितले नाही, म्हणजे अनिश्चित काळासाठी. शहर अभियंताजी ज्याचे काही काळमर्यादा होत नाही, त्याला अनिश्चित काळासाठी म्हणटले जाते.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** त्यांनी फक्त थोडया दिवसासाठीच बोलेले आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** थोडया दिवसाठी म्हणजे, पाच, आठ, पंधरा दिवसासाठी.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** आठ दिवसासाठी सांगितले आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** मॅडम, आता प्रभारी आयुक्त, श्रीम. विजया कंठे उपस्थित आहेत, मी तुम्हांला आग्रह करतो की, आपण प्रशासनाला त्वरीत प्रभावीपणे आदेश दया की, जी प्रक्रिया पुर्ण झाली आहे, त्याचे त्वरीत प्रभावीपणे कामाचे आदेश दयायला पाहीजेत. ते झाले पाहीजेत, मी आपल्याला निवेदन करतो की, असे आपण आदेश दया, धन्यवाद.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौरजी माझे निवेदन आहे की, हा विषय पुर्ण करून दुसरा विषय घ्या.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** मा. महापौरजी, सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी यांनी जो विषय पॉईंट ऑफ ऑर्डरवर उचलला आहे, तो नगरसेवक निधीचा आहे, १६ रूपये नगरसेवक निधी तो आयुक्तांद्वारे काही काळासाठी थांबवला आहे. परंतु एकीकडे संपुर्ण देशामध्ये स्वच्छता भारत अभियान मोहीत एवढी फास्ट चालली आहे की, त्याचे चांगले परिणाम आपल्या शहरामध्ये पण बघायला मिळत आहेत आणि आपले शहर स्वच्छ झाले आहे, असा दावा आयुक्तांद्वारे केले आहे. परंतु मला खुपच दुःखाने सांगावे लागत आहे की, मागच्या महासभेमध्ये जे कांड झाले, बॉम्ब फुटला त्याच्या नंतर आयुक्तांनी तीन शौचालयाचे टेंडर पण झाले आहेत. संपुर्ण प्रक्रिया झाली आहे. एक पंधरा सिटरचा शौचालय, बॅरेक नं. ५०७ मध्ये, एक दहा सिटरचा वडार कॉलनीमध्ये आणि एक सपना गार्डनमध्ये तीन शौचालय ज्यांची टेंडर झाले आहेत, प्रक्रिया झाली आहे. ते सुध्दा आयुक्तांनी थांबवले आहेत. म्हणजे जे अतिवाश्यक कामे आहेत, शौचालय, मुतारी सारखे आणि स्वच्छतेच्या हिशोबाने ते थांबवले आहेत, हे खुपच निंदनीय आहे. त्यांचे वर्क ऑर्डर झाल्या आहेत, एक्सेप्ट लेटर पण तयार झाले आहेत. परंतु सार्वजनिक बांधकामाद्वारे आयुक्त साहेबांनी थांबवले आहते. ते त्वरीत झाल्या पाहीजेत कारण ते अतिआश्यक आहेत. आज असे आहे, की ते शौचालय झाले नसल्यामुळे लोकांना मोकळया जागेवर शौचास जावे लागते. बॅरेक नंबर ५०७ मध्ये, पॅनल नंबर ९ मध्ये आपण जाणार तर लोक मोकळया जागेमध्ये शौचास जाण्यास मजबुर झाले आहेत. कारण की, टाकी टाकी फुल झाली आहे. त्याचे टेंडर निघाले आहे, एक्सेप्ट लेटर पण तयार आहे, परंतु आयुक्त साहेबांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून थांबवले आहे. तरी त्वरीत या तीन्ही शौचालयाचे, बॅरेक नंबर ५०७ मध्ये, पॅनल नंबर ९ आणि वडार कॉलनी यांचे वर्क ऑर्डर काढून काम चालू झाले पाहीजे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** प्रदिपजी, मनोजजी, धन्यवाद.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** मा. महापौरांच्या आदेशान्वये, महापौरांकडून आयुक्तांना आदेश दिले जात आहेत की, लवकरात लवकर जे प्रभाग समितीचे निधी आणि नगरसेवक निधी आणि जे श्री. मनोजजीने सांगितले आहे, शौचालयांच्या विषयी त्यांचे सर्व एक्सेप्ट ऑर्डर दिले जावेत आणि ठेकेदारांकडून गॅरेटी घेऊन त्याची वर्क ऑर्डर देण्यात यावी. हे काम लवकरात लवकर पुर्ण झाले पाहीजेत.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** शहर अभियंता यांनी कृपया लक्ष देण्यात यावे. जे आदेश महापौरांकडून झाले आहेत, कृपया शहर अभियंता यांनी लक्ष दयावे.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :—** श्री. जगन्नाथ काशिनाथ भोसले, मुकादम यांना वैदयकिय प्रतिपुर्ती मिळणे.

---

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—** पास..पास..

**काही सदस्य :—**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ४:—** श्री. जगन्नाथ काशिनाथ भोसले, मुकादम यांना वैदयकिय प्रतिपुर्ती मिळणे.

**<u>प्रस्तावना</u>**

**श्री. जगन्नाथ काशिनाथ भोसले,मुकादम,** यांना वैदयकिय उपचारासाठी आयकॉन हॉस्पिटल, डोंबिवली(पूर्व) येथील खाजगी रुग्णालयात दिनांक २९/९/२०१७ ते दिनांक ५/१०/२०१७ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये १,३४,५९६/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी २३/११/२०१७ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुज्ञेय ठरतो. आयकॉन हॉस्पिटल,डोंबिवली हे शासन मान्यता नाहि. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या अतिदक्षता कक्षच्या खर्चाच्या १०० टक्के औषधी व इतर खर्चाच्या ९० टक्के आणि बाथरूमसह स्वतंत्र कक्षाच्या खर्चाच्या ७५ टक्के असे अनुज्ञेय ठरतात.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) हृदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक हृदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॅस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णालयाकडुन अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, **श्री. जगन्नाथ काशिनाथ भोसले,मुकादम** यांचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार हा अ.क्र १ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,१७,३३७/— रक्कम प्रतिपुर्ती करिता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र:७८</u>** **<u>दिनांक:—१४/३/२०१८</u>**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. जगन्नाथ काशिनाथ भोसले, मुकादम यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,१७,३३७/— इतकी रक्कम वैदयकीय प्रतिपूर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र.५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५:—** महापालिकेच्या सिंधी माध्यमाची शाळा क्र.४ शारदा शिक्षण प्रसारक मंडळास प्रतिमहा रू. ३०,०००/— भाडे आकारणी करून तसेच शाळेसोबत सुधारीत भाडेकरार करून शाळा भाडेतत्वावर चालविण्यासाठी मान्यता देणे.

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** नाही, नाही, मॅडम याच्यामध्ये एक विशेष आहे, आपण पाठिमागे सांगितले होते आणि मागच्या महासभेने सांगिले होते, १ रूपया प्रस्ताव आणायला पाहीजे होता. त्यांनी पुन्हा ३०,०००/— हजाराचाच आणला आहे. तसा ठराव आपल्याकडे झालेला आहे.

**महापालिका सचिव :—** त्या दिवशी एक रूपया प्रस्ताव मा. सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी म्हणाले होते. पण नंतर इतर संस्थे प्रमाणे, शेवटी असे ठरले की, फेर सादर करण्याचे निर्देश दयावे, दर महासभेत ठरतील आणि त्यामुळे तो फेर सादर करण्याचा ठराव पास झाला.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ठिक आहे, आमच्या सभागृह नेत्यानी मागे सांगितले आहे की, एक रूपयाचा प्रस्ताव....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी आज आपण उलहासनगर महानगरपालिकेद्वारा जे शाळेसाठी खर्च करीत आहेत, तर आपण ७२ करोड शासनाचे व महापालिकेचे शाळेसाठी प्रत्येक वर्षाला खर्च करीत आहेत. आपली एक शाळा, बंद पडलेली शाळा ती एक दम तुटलेली आहे. जर एखादा विद्यालय किंवा एखादी संस्था परत जिवंत करीत असेल तर आणि त्यामध्ये कोणाची मुले शिकतात, संपुर्ण झोपडपट्टीतली गरीब मुले, ज्यांच्या जवळ फी भरण्यासाठी पैसे नाहीत. अशी मुले तिथे शिकत आहेत. तर मी निवेदन करतो की आणि अडीच किलो मिटर दुरवरून मुले इथे येत असतात. हजार, बाराशे मुले, जी एकदम गरीब मुले आहेत, पहीले ते सरकारी शाळा होती, ती आपण एक संस्था, शारदा विद्यालय यांना चालवण्यासाठी दिले आहे. तर मी आपल्याला निवेदन करतो की, या शाळेला एक रूपया दराने जो आपण पहीले प्रस्ताव ठेवला होता. त्या प्रमाणे देण्यात यावे आणि अशा ज्या संस्था आहेत, ज्या अशा प्रकारचे कार्य करीत आहेत. त्यांची प्रशंसा करायला पाहीजे, महापालिकेमध्ये त्यांचा सत्कार करायला पाहीजे. जर बाराशे मुलांवर महापालिका प्रत्येक वर्षाला ५० हजार खर्च करीत असेल तर ६ करोडपेक्षा जास्त आपली बचत होते, अशा संस्थांचा इथे सन्मान करायला पाहीजे, त्यांचा सत्कार करायला पाहीजे आणि सर्व सदस्य मिळून हा प्रस्ताव पारित करू.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** पास..पास..

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, अजून वेगवेगळया संस्था, असे बंद पडलेल्या शाळा जर आपण महापालिकेद्वारा बघितले तर सिंधी माध्यमाच्या शाळा इयत्ता १ ली चा मुलगा, इयत्ता २ री चा मुलगा, ७ चा मुलगा वेगवेगळया क्लासचे मुले एकत्र बसून त्यांना फक्त एक शिक्षक शिकवतात. ती मुले काय शिकणार इथे इयत्ता १ मुले आणि इयत्ता ७ वीमध्ये शिकणार मुले एकत्र बसून अभ्यास करतात. त्यांचा काय अभ्यास होईल? मी आपल्याला निवेदन करतो की, शहरामध्ये अनेक संस्था आहेत आणि अशा अनेक बंद पडलेल्या शाळा आहेत, त्यांना फ्रि चार्ज दया. त्यांना चालवण्यासाठी उत्साहीत करा आणि त्यांना खर्च पण करून देण्यात यावा. ज्या दुस—या शाळा, महाविद्यालय आपले दिले आहेत, त्यांचा पण सत्कार करायला पाहीजे जे चालवत आहेत, ते धन्यवादाचे आभारी आहेत. मी त्यांचा अभार प्रदर्शन करतो आणि अजून लोकांना बोलाव आणि या शहराचे गरीब

मुले जास्तीत जास्त अभास करू शकतात, त्यासाठी मी शारदा विद्यालयाचा अभिनंदन करतो आणि सर्व संमतीने हा प्रस्ताव पास करू.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानीः—</u>** मा. महापौरजी, सन्माननिय सभागृह, आज हा प्रस्ताव आलेला आहे, उल्हासनगरच्या शारदा निकेतन विद्यालयाला नाम मात्र भारी तत्वावर शिक्षेचा अधिकार म्हणून महापालिकेची जागा दिली पाहीजे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्या देशाचे बजेट सादर केले आहे. त्यामध्ये सर्व शिक्षा अभियानासाठी २६ लाख करोड रूपये संपुर्ण देशासाठी ठेवले आहेत आणि एक शपथ घेतली आहे की, आपल्या देशाचा, कोणत्याही राज्याचा, कोणत्याही ठिकाणचा आणि कोणत्याही जाती—धर्माचा मुलगा जर या देशामध्ये जन्म घेत असतो, तर त्यांना शिक्षण देण्याचा अधिकार आपल्या देशाने करायचा आहे किंवा सरकारने उचलला पाहीजे. ते केंद्राशासन असेल किंवा राज्य शासन असेल किंवा शहराचा असेल, आपल्या शहरामध्ये अशा भरपुर सामाजिक संस्था आहेत की, महानगरपालिकेला डिमांड करतात की, इथली संस्था बंद पडली आहे, आम्हांला शिकवण्यासाठी देण्यात यावी. शिक्षण, तांत्रिक शिक्षण देण्यासाठी भरपुर सामाजिक संस्था पुढे यायला तयार आहेत. परंतु त्यांच्या जवळ जागा नाही, दुर्देव असे की, जेव्हा या संस्था महानगरपालिकेकडे मागणी करतात, तर त्यांना आजच्या रेडीनेकरच्या हिशोबाने, शासनाने दर लागू केले आहे, उल्हासनगरमध्ये प्रत्येक वॉलच्या मागे ३८०० रूपये, आजच्या रेडीनेकरच्या हिशोबाने त्यांना भाडे दिले जाते की, आपण महीन्याला ३ लाख रूपये भरा, २ लाख रूपये भरा, ४ लाख रूपये भरा, त्यामुळे त्या संस्था पळून जातात. बाकीच्या विषयावर मी बोलणार नाही, तो महानगरपालिकेचा सभागृहाचा अधिकार आहे. खास करून केंद्र सरकार, राज्य सरकार शिक्षणावर लाखो, करोडो रूपये खर्च करीत आहेत. तर महानगरपालिकेला आपल्या शिक्षण क्षेत्रामध्ये, आपल्या शहरामध्ये जेवढे पण गोरगरीब आहेत, खास करून अशा ज्या जागा आहेत, अशा सामाजिक संस्थांना, अशा ट्रस्टला, अशा सेवाभावी संस्थांना जसे ब्रम्हकुमारी अशा भरपुर संस्था आपल्या शहरामध्ये आहेत. अशीच एक शांती प्रकाश संस्था आहे, तर यासाठी आपण पॉझीटीव्ह विचार करून त्या संस्था पण शिक्षण दयायला तयार आहेत, महापालिकच्या ज्या जागा आहेत, त्या भुमाफिया हडप करतात. अशा जागा सामाजिक संस्था किंवा ट्रस्टला देवून नाम मात्र भाडेतत्वावर देवून एक धोरण या शहरामध्ये सर्व शिक्षा अभियानासाठी दयायला पाहीजे.

या वेळी सदस्य, श्री. शंकर लुंड हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** सन्माननिय हा ठराव सर्वानुमते पास होतच आहे, पण ही जी शाळा आहे, १ रूपया मात्र दराने देवून ३० वर्षासाठी देण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u>** मा. महापौरजी, हे फक्त एकच शारदा विद्यालयाचा विषय नाही असे आपण दुस—या संस्थांना पण या ठरावाच्याद्वारा सवलत दयायला पाहीजे. शिक्षण क्षेत्रात जे कार्य करीत आहेत, अजून चांगले कार्य करीत नाहीत. त्यासाठी मला वाटते की, शारदा शिक्षण प्रसारक मंडळ आणि ज्या अशा संस्था आहेत, या वेळी उल्हासनगरमध्ये शाळा, महाविद्यालय महापालिकेच्या बिल्डींमध्ये चालवतात, त्यांना १ रूपया प्रत्येक मिटरसाठी प्रत्येक वर्षाला दर लावून घ्यायला पाहीजे. आणि शिक्षण ७९ जी अन्वये एक नविन शिक्षण जोडले आहे, बी.पी. एम.सी. ॲक्टमध्ये ७९ जी मध्ये महानगरपालिकेला अधिकार आहे की, रेडीनेकरच्या रेटनुसार कमी करून आपण देवू शकतो. या प्रमाणेच प्रस्ताव दयायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>** मा. महापौर मॅडम, उप महपौर, आणि आयुक्त साहेब, इथे जो विषय आला आहे. हा शारदा विद्यालय आहे, जमनुजीने सांगितले की, तिथे गोरगरीब मुले शिकतात. शिक्षण जर विनामुल्य आहे, आशा संस्था फार कमी आहेत. अशा संस्थांना महापालिका सुट देवू शकते. जिथे शिणाचे बाजारीकरण होते, जिथे शिक्षणासाठी जास्त फी घेतली जाते, मुलांकडून जास्त पैसे घेतले जातात, त्यांना आपण सुट दिली तर त्यांना न्याय मिळेल. शारदा विद्यालय गरींबासाठी आहे, मुलांकडून फि घेतली जात नाही आणि एक सर्वसामान्य ठराव टाकण्यात यावा. यामुळे महानगरपालिकेचा काय फायदा होणार आहे? सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत गरीब मुलांना मोफत शिक्षण प्राप्त झाले पाहीजे आणि कमी दरामध्ये प्राप्त झाले पाहीजे. या गोष्टीचे लक्ष महानगरपालिकेने ठेवायला पाहीजे आणि प्रत्येक प्रसंग वेगवेगळा यायला पाहीजे आणि त्यांना वेगवेगळी सुट दयायला पाहीजे.

**<u>महापालिका सचिवः—</u>** मी. ठराव वाचते, ही महासभा शारदा शिक्षण प्रसारक मंडळ प्रती महा नाम मात्र रूपये १ या दराने भाडे आकारणी करून तसेच शाळे सोबत सुधारीत भाडे करार करून शाळा भाडे तत्वावर देण्यासाठी/चालवण्यासाठी मान्यता देत आहे. तसेच ज्या संस्था शैक्षणिक क्षेत्रात अशा रितीचे कार्य करीत आहेत, त्यांना देखील हा ठराव लागू करण्याचे आदेश देत आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** ३० वर्षासाठी.

**<u>महापालिका सचिवः—</u>** ३० वर्षासाठी.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** बी.पी.एम.सी. ॲक्ट, ७९ जी चा पण उल्लेख करा.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>** प्रत्येक वेगळा वेगळा यायला पाहीजे. हे फक्त शारदा विद्यालयासाठी मर्यादित असायला पाहीजे. कुठलाही प्रस्ताव आपण सर्वसामान्य करणार आहेत की, कुठली संस्था पैसे घेऊन करीत असेल तर आपणाला कसे कळेल? आपण ठराव सर्वसामान्य करूच शकत नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** मॅडम, फक्त त्यांचे म्हणणे आहे की, शारदा विद्यालय आणि ३० वर्षासाठी करा. तसा प्रस्ताव तुम्ही नंतर आणा, ज्या ज्या संस्था आहेत, त्यांची कॅपासिटी तपासली जाईल आणि तसा प्रस्ता नंतर आणयला काही हरकत नाही.

**<u>महापालिका सचिवः—</u>** ठिक आहे, मग या प्रमाणे शैक्षणिक क्षेत्रात कार्य करीत असतील, त्यांचे प्रस्ताव मा. महासभेपुढे आणण्यास मान्यता देत आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** पण ही ३० वर्षासाठी याचा उल्लेख करा.

**<u>महापालिका सचिवः—</u>** ३० वर्षासाठी. आता मी पुन्हा एकदा ठराव वाचत आहे, सर्वांनी आताच काय ते मला निश्चितपणे सांगावे, ही महासभा सभेत झालेल्या चर्चेअंती महापालिकेच्या सिंधी माध्यमाची शाळा क्र. ४ शारदा शिक्षण प्रसारक मंडळास प्रती महा नाम मात्र रूपये १ या दराने भाडे आकारणी करून तसेच शाळे सोबत सुधारीत भाडे करार करून शाळा भाडेतत्वावर चालवण्यासाठी, ३० वर्षासाठी चालवण्यासाठी मान्यता देत आहे. तसेच इतर संस्था या शैक्षणिक कार्यात अशा प्रकारे कार्य करीत असतील, तर त्यांचे पस्ताव या दराप्रमाणे मा. महासभेपुढे सादर करण्यास मान्यता देत आहे. ७९ जी. नुसार, पास..

**<u>सदस्या, श्रीम. ज्योती पाटीलः—</u>** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त मॅडम, आज महासभेने प्रस्ताव पारीत करून त्याला जी मान्यता दिलेली आहे, त्या बदल मी महासभेला धन्यवाद देते आणि या ठिकाणी ज्यांनी प्रश्न उपस्थित केला की, या ठिकाणी तेच कार्य म्हणजे शैक्षणिक कार्य व्हायला पाहीजे आणि ते माफतच व्हायला पाहीजे आणि त्याच प्रमाणे होणार याची मी ग्वाही देते, धन्यवाद.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५:—** महापालिकेच्या सिंधी माध्यमाची शाळा क्र.४ शारदा शिक्षण प्रसारक मंडळास प्रतिमहा रू. ३०,०००/— भाडे आकारणी करून तसेच शाळेसोबत सुधारीत भाडेकरार करून शाळा भाडेतत्वावर चालविण्यासाठी मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

मा. महासभा ठराव क्र.२५ दिनांक २१/१/२०१३ नुसार शारदा शिक्षण प्रसारक मंडळाकडून महापालिकेच्या सिंधी माध्यमाच्या शाळा क्र.४ चे दंडासह भाडे वसूल करणे व महापालिका निहीत मालमत्ता ताब्यात घेण्यास मान्यता देण्यात

आली आहे. त्यानुसार दिनांक ९/६/२०१७ रोजी सदर शाळा सिलबंद करून ताब्यात घेण्यात आली होती. शाळेचे सचिव यांनी मा. आयुक्त सो. यांची भेट घेवुन दिनांक १५/६/२०१७ रोजी शाळा सुरू होणार असल्याने शाळा खुली करून देण्यास विनंती केली असता सदर शाळेचे सचिव यांनी दरमहा रू. ३०,०००/– भाडे अदा करण्यास सत्यप्रतिज्ञालेखाद्वारे संमती दर्शवुन एकुण १२ महिन्यांचे रू.३०,०००/– भाडे अदा करण्यास सत्यप्रतिज्ञालेखाद्वारे संमती दर्शवुन एकुण १२ महिन्यांचे रू. ३०,०००/– रक्कमेचे दिनांक ३१/७/२०१८ पर्यंतचे धनादेश महापालिकेकडे सादर केलेले आहेत. तदनंतर शाळा खुली करून दिल्यानंतर पुढील तीन महिन्यांचे रू.३०,०००/– प्रमाणे भाडे भरणा केलेला आहे.

महापालिकेकडून शहीद दुनिचंद कालानी ट्रस्ट यांना उल्हासनगर–१ व उल्हासनगर–५ येथील जागा शाळा व महाविद्यालयाकरीता जागा भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे. तथापि, सदर जागेचे शासनाच्या रेडीरेकनरनुसार सार्व. बांधकाम विभागाकडून भाडेनिश्चिती करून घेण्यात येत आहे तोपर्यंत दरमहा रू. ५०००/– याप्रमाणे भाडे भरणा करण्यात येत आहे. सार्व. बांधकाम विभागाकडून वर्षनिहाय चालू रेडीरेकनरनुसार भाडेनिश्चिती प्राप्त झाल्यानंतर संबंधितांकडून त्यानुसार भाडे वसुल करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ (ड) अन्वये जो मोबदला घेवुन महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पटटयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतरीत करता येईल तो मोबदला, असे अधिमुल्य किंवा भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतुद आहे.

तथापि, शारदा शिक्षण प्रसारक मंडळास दिलेल्या महापालिकेच्या सिंधी माध्यमाच्या शाळेचे चालू रेडीरेकनरनुसार दरमहा रू.२,८०,०००/– इतके भाडे निश्यित करण्यात आले होते. परंतु सदर शाळेची आर्थिक स्थिती पाहता मा. आयुक्त सो. यांना चालू रेडीरेकनरनुसार निश्चित केलेल्या भाडे रक्कमेच्या जवळपास १० टक्के प्रमाणे म्हणजेच रू.३०,०००/– इतके भाडे भरणा करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आणून दिले असता सदर शाळेचे सचिव यांनी त्यांस सत्यप्रतिज्ञालेखाद्वारे लेखी संमती दर्शविली आहे. त्यामुळे सदर शाळेचे सचिव यांनी दिलेल्या लेखी संमतीनुसार यापुर्वी शिक्षण मंडळासमवेत केलेल्या करारातील अट क्र. १ रदद् करून दरमहा रू.३०,०००/– इतके भाडे आकारणी करून शाळेसोबत सुधारीत भाडेकरार करून शाळा भाडेतत्वावर चालविण्यास मान्यता मिळणेबाबत सुधारीत प्रस्ताव मा. महासभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र:७९</u>** **<u>दिनांक:–१४/३/२०१८</u>**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

ही महासभा सभेत झालेल्या चर्चेअंती महापालिकेच्या सिंधी माध्यमाची शाळा क्र. ४ शारदा शिक्षण प्रसारक मंडळास सेक्शन ७९ जी रेडीरेकनर दराने कमी करुन प्रतिमहा रू. १/– नाममात्र भाडे आकारणी करून तसेच शाळेसोबत सुधारीत भाडेकरार करून शाळा भाडेतत्वावर ३० वर्षासाठी चालविण्यासाठी मान्यता देत आहे.

**<u>तसेच</u>**

ज्या संस्था/शाळा शैक्षणिक क्षेत्रात मोफतपणे सेवा देत असतील तर याच दराने प्रस्ताव महासभेपुढे आणण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६:—** दिनांक १ एप्रिल २०१८ पासुन निवृत्त हाणो-या ८ स्थायी समिती सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नेमणुक करणे.

---

कृपया व्हिडीओ ग्राफर यांनी पुढे यावे. शासनाचा नियम आहे की, कोणतीही नेमणूका करतांना व्हिडीओ ग्राफी करणे आवश्यक आहे. त्यानुसार आम्ही त्यांना बोलावले आहे. सर्व संबंधित गटनेत्यांनी मा. महापौरांकडे आपली नावे दयायची आहेत, त्या नंतर वाचन करण्यात येईल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** विषय पहीले वाचा.

**महापालिका सचिव :—** विषय वाचला आहे. मा. पिठासिन अधिकारी यांनी माझ्याकडे नावे दिली आहेत. भारतीय जनता पार्टीतर्फे सभागृह नेत्यानी नावे दिली आहेत, १) श्रीम. मिनाकौर अजितसिंग लबाना, २) श्री. राजेश नानिकराम वदारिया, ३) श्रीम. रेखा ठाकुर. सेक्युरल आलायन्स ऑफ इंडिया आघाडी यांनी दिले आहे, १) श्रीम. दिप्ती दुधानी, २) श्रीम. ज्योती भटीजा, ३) श्री. दिपक सिरवानी. शिवसेनातर्फे नावे आली आहेत, १) श्रीम. अंजना म्हस्के, २) श्री. भगवान भालेराव.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** हा प्रस्ताव सर्वसंमतीने पास करण्यात येत आहे. हा ठराव पास..

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...पास...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—**इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पा.. हा ठराव मा. आयुक्त कोकण भवन येथे पाठवला जावा, कारण की, लवकर लवकर निवडणूक घेण्यात यावी, दिनांक ३१ मार्चच्या नंतर.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मी महानगरपालिकेच्या सभागृह नेत्यांतर्फे सर्व स्थायी समितीचे ८ सदस्य निवडून आले आहेत, मी त्यांचे हार्दिक, हार्दिक अभिनंदन करतो.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ६ :—** दिनांक १ एप्रिल २०१८ पासुन निवृत्त हाणो-या ८ स्थायी समिती सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नेमणुक करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका २०१७ नंतर महापालिकेच्या दि. ५.४.२०१७ रोजीच्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी १६ व्यक्तीची स्थायी समितीचे १६ सदस्य म्हणुन नेमणुक केली होती.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० अन्वये स्थायी समितीमध्ये निवडून आल्यानंतर एका वर्षाने पोट कलम ३ अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील. त्यांच्या नियुक्तीच्या तारखे पुर्वी स्थायी समितीचे सभापती ठरवतील अशा वेळी व रितीने चिठ्ठया टाकुन ठरविण्यांत येते.

त्याअर्थी चिठ्ठया काढण्यासाठी दि. ६.३.२०१८ रोजी सभा बोलविण्यांत आली होती सदर सभेत काढण्यांत आलेल्या चिठठयांअंती स्थायी समिती ठराव क्र. ११७, दिनांक ६.३.१८ अन्वये निवृत्त झालेल्या ८ सदस्यांची नावे खालील प्रमाणे आहेत

| | |
|---|---|
| १ श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | –– भारतीय जनता पार्टी |
| २ श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | –– सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया |
| ३ श्रीमती कांचन अमर लुंड | –– सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया |
| ४ श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | –– शिवसेना |
| ५ श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | –– भारतीय जनता पार्टी |
| ६ श्री. राजेश नानिकराम वदारिया | –– भारतीय जनता पार्टी |
| ७ श्रीमती कविता लाल पंजाबी | –– सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया |
| ८ श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | –– शिवसेना |

वरील रिक्त झालेल्या जागेवर तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात बदल होणार नाही अशारितीने ज्या पक्षाचे सदस्य निवृत्त झाले आहेत त्या त्या पक्षाचे पक्षनिहाय नविन ८ सदस्यांची नेमणुकीसाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:८०** **दिनांक:– १४/३/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिपक सिरवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार खालील आठ सदस्यांचे स्थायी समितीवर नेमणुक करीत आहे.

| | |
|---|---|
| १. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | –– भारतीय जनता पार्टी |
| २. श्री. राजेश नानिकराम वदारिया | –– भारतीय जनता पार्टी |
| ३. श्रीमती रेखा अशोक ठाकुर | –– भारतीय जनता पार्टी |
| ४. श्रीमती दिप्ती नविन दुधानी | –– सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया |
| ५. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | –– सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया |
| ६. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | –– सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया |
| ७. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | –– शिवसेना |
| ८. श्री. भगवान शंकर भालेराव | –– शिवसेना |

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

### विषय क्र. ३:— <u>प्रस्तावाची सूचना</u>

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ महानगरपालिकेच्या ताब्यात घेवून त्या रस्त्याचे विकासकाम सुरु करण्याबाबत पालिका सदस्या श्रीमती मिना सोनेजी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** याच्या पुढे जो विषय आहे, तो पण शारदा विद्यालयाची इतिवृत्ताची वाट न पहाता करायचे आहे.

**<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—</u>** याची सविस्तर माहीती कोण सांगणार आहे? हा एम.एम.आर.डी.ए. कडून रस्ता पास झाला आहे ना?

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u>** मा. महापौरजी, एम.एम.आर.डी.ए. कडून १७ करोडचे फंड पास झाले आहेत, कटकेश्वर महादेव मंदिर पासून ते म्हारळ नाका पर्यंत, तेथून सेंच्युरी कंपनी पर्यंत तर हा जो रोड आहे, त्याचा फंड ऑल रेडी आला आहे आणि हा रोड, नॅशनल हावे २२२ असा आला आहे. तर जो पत्रव्यवहार आहे, तो दिल्लीहून होईल. त्यामुळे आपण जर गोषवारा वाचाल आणि वर्किंग बघाल तर रिक्युवेस्ट आली आहे की, आपण उल्हासनगर महानगरपालिकेकडे घेण्यात यावा. मॅडम याचे जे स्ट्रीट लाईट्स आहेत, पाटोल्स या सर्व गोष्टी महानगरपालिकाच बघते, त्यामुळे मी ही सुचना आणली आहे. ते आपण आपल्याकडे घेण्यात यावे आणि लवकरात लवकर, रोड कटींग आणि लॅन्ड अप देवू शकतो आणि लवकर कामांला सुरूवात होईल.

या वेळी सदस्य, श्री. प्रमोद टाले हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** मा. महापौर मॅडम, उप महापौर, एकुण ५२ करोडचे काम एम.एम.आर.डी.ए. मार्फत उल्हासनगर मध्ये कामे चालू आहेत. त्यामध्ये विनस टॉकिज पासून ओव्हर ब्रिज पर्यंतचे एक काम आणि गायकवाड पाडयाचा एक काम आहे, उल्हासनगर स्टेशनचे एक काम आहे आणि चौथे काम हे आहे. कटकेश्वर व सुभाष टेकडीवाला असे चार कामे आहेत. त्यामध्ये असे आहे की, विनस टॉकिजवाल सुरू झाला होता, तेव्हा १०० फुटाची मार्किंग केली आहे. त्याच्या नंतर महासभेमध्ये ठरवले आणि ८० फुटाच्या मार्किंगने हे काम सुरू झाले आहे. उल्हासनगरमध्ये एक काम सुरू झाले आहे, गायकवाडपाडयाचा पण सुरू होण्याच्या स्थितीमध्ये आहे आणि जो उल्हासनगर स्टेशनचा आहे, त्याची पण मार्किंग होत आहे. यामध्ये जो भुभाग तो उल्हासनगर शहरामधून जात आहे, परंतु आजच्या तारखेला २२२ नंबरचा जो नॅशनल हायवे आहे, त्यांनी महानगरपालिकेला पत्र लिहीले आहे की, एम. एम.आर.डी.ए. ला लिहीले आहे, त्याची कॉपी आयुक्तांना दिली आहे की, हा रस्ता आपण आपल्याकडे घ्या, महापालिका आपल्या ताब्यात घेईल तर त्यामुळे फायदाच होईल. कारण जे अनधिकृत आहे, त्याची कटींग करण्यासाठी आपण जर कोणाला नोटीस दयाल तर आपण कोणाला नोटीस देवू शकत नाही, कारण महानगरपालिकेचा ताबा नाही. त्याला कटींगची मार्किंग देवू शकत नाही, यामुळे आम्ही हे करीत आहे कारण की, कल्याण अंबरनाथ रोड साठी २१ करोड रूपये आले होते, कोर्टामुळे ते काम सुरू होऊ शकले नाही. त्यामुळे माझी महासभेला विनंती आहे की, जेवढा भुभाग जो उल्हासनगर क्षेत्रामध्ये येतो, तो भुभाग महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात येत आहे, असे पत्र एम.एम.आर.डी.ए. लिहीले आहे. त्याची प्रत आयुक्तांना पण दिली आहे आणि जर हा भुभाग घेतला आणि त्याचे टेंडर पण झाले आहे, वर्क ऑर्डर पण झाली आहे. फक्त काम सुरू होणे बाकी आहे, आम्ही विचारले काम का थांबले आहे? तर आयुक्तांनी सांगिले की, मी माझ्यातर्फे पत्र पाठवले आहे. तेव्हा आम्हांला माहीती झाले की, हा विषय महासभेमध्ये आणून महासभेमध्ये निर्णय घेऊ कोणाला दयायचे आहे. त्यामुळे मिना मॅडम यांनी आणला आहे. मी संपुर्ण सभागृहाला सांगतो की, १७ करोड रूपये या रोडसाठी खर्च होणार आहेत, ते परत गेले नाही पाहीजे. आणि शहराचे काम होण्यासाठी त्याला पास केले जावे.

या वेळी सदस्य, श्री. अशोक छाप्रु व सदस्य, श्री. रवि जग्यासी हे सभागृहा बाहेर गेले.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मॅडम मघाशी चुकून राहून गेले होते, शाळेच्या संदर्भातले इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..

**महापालिका सचिव:—** ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्या प्रमाणे राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ महापालिकेच्या ताब्यात घेऊन त्या रस्त्याचे विकास काम सुरू करणेस तसेच याबाबत महापालिकेतर्फे एम.एम.आर.डी.ए. कडे पत्रव्यवहार करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे. इतिवृत्ताची वाट न पहाता.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** महापालिकेने हे आपल्या ताब्यात घ्यावे.

**महापालिका सचिव:—** एम.एम.आर.डी.ए. कडून महापालिकेने ताब्यात घ्यावे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ७ :— प्रस्तावाची सूचना**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ महानगरपालिकेच्या ताब्यात घेवून त्या रस्त्याचे विकासकाम सुरु करण्याबाबत पालिका सदस्या श्रीमती मिना सोनेजी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर—१ येथिल शहाड रेल्वे ब्रिज ते म्हारळगाव पर्यंतचा रस्त्यावर ये—जा करणारी वाहनांची संख्या पाहता त्या ठिकाणी नियमित वाहतूक खोळंबा होत आहे. या करीता सदर रस्त्यांचे विकास करण्याकरीता तसा प्रस्ताव तयार करुन ते काम मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण महामंडळाच्या निधीतून करण्याबाबत मंजूरी मिळाली असून त्या कामाचे आदेश देखील देण्यात आलेले आहे.

सदर रस्ता क्रमांक २२२ हा राष्ट्रीय महामार्ग असून त्या कार्यालयाने हा रस्ता उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतून जात असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेने आपल्या ताब्यात घेण्याबाबत तसे लेखी पत्रान्वये महानगरपालिकेस कळविले आहे.

वरील रस्त्याचे विकासकामे करण्याकरीता हा रस्ता महापालिकेच्या ताब्यात घेणे आवश्यक असून तसा प्रस्ताव महासभेच्या विषय पटलावर घेवून यावर निर्णय झाल्यास ते काम लवकरात लवकर केल्यास त्या ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी दूर होईल.

**महासभा ठराव क्र:८१** **दिनांक:— १४/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्रीम. मिना सोनेजी
अनुमोदकाचे नाव :— श्री. मनोज सयानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ महानगरपालिकेच्या ताब्यात घेवून त्या रस्त्याचे विकासकाम सुरु करणेस मान्यता तसेच याबाबत महापालिकेतर्फे एमएमआरडीएकडे पत्रव्यवहार करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

**आयत्या वेळचा विषय :—**

**विषय क्र. ८ :— उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता मा.राज्य निवडणूक आयोगाने दिनांक 25 नोव्हेंबर,2016 च्या अधिसुचनेद्वारे प्रसिध्द केलेल्या 13 अनुसूचित जातीचे प्रभागातील दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत कामांचे प्रस्ताव मान्य करणे.**

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** प्रस्ताव मांडण्याचा विषय नाही, विषय असा आहे, हे प्रस्ताव दलितवस्तिच्या संदर्भातले आहेत आणि दलितवस्तीतील नगरसेवक जे असतील त्यांनीच या प्रस्तावामध्ये हे केले पाहीजे. इतर नगरसेवक आपसात बसत असतील आणि तो निर्णय घेत असतील, तर ठिक आहे. नाही तर दलित वस्तीचे जे नगरसेवक आहेत, दलित वस्तीच्या जागेवरून निवडून आले आहेत, त्यांना पुर्णपणे अधिकार आहे. तसा जि.आर. पण शासनाचा आहे. पाहीजे तर तुम्ही संबंधित सार्वजनिक बांधकामाचे जे अधिकारी असतील त्यांनी दाखवावा जि. आर. कसा आहे? त्या संबधित ज्या जागेवर जो नगरसेवक निवडून आलेले आहेत, त्या नगरसेवकालाच प्रस्तावामध्ये नावे टाकण्याचा अधिकार आहे. अशी परिस्थिती आहे. ते विषय म्हणजे बाकीच्या ठिकाणी प्राब्लेम नसेल, माझ्या ठिकाणी प्राब्लेम आहे. ही जी तीन नावे टाकलेली आहेत, त्याच्यामध्ये दोन नाव टाकलेली आहेत मी सुचवलेली, त्या दलित वस्तीच्या नगरसेवकानी सुचविलेली आहेत आणि एक नाव चुकीचा आहे. ते रद्द करून जे सुचविलेले नाव असेल, तेवढया लाखाचे काम तिथे टाकण्यात यावे. ही माझी विनंती आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** महापौर मॅडम, प्रत्येक वार्डमध्ये दलित लोक राहत आहेत, प्रत्येक पॅनलमध्ये राहतात. काही ठिकाणी तर असे आहे की, तीन वार्डमध्ये दलित राहत नसतील तर एका वार्डमध्ये खुप दलित राहतात. त्याच्यासाठी तिथे आरक्षण उघडले नाही. याचा अर्थ असा झाला की, जिथे दलित राहत आहेत, तिथे काम करणार नाही का? तिथे सुध्दा काम करायचे आहे.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** शेरीजी मी कंटीन्यु करीत आहे, आपल्या शहरामध्ये घोषित अघोषित असे स्लमस आहेत, दलित वस्ती आहे, तर जो दलित वस्तीचा फंड आहे, तो तिकडे पण फिरावला पाहीजे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मॅडम, जि.आर. प्रमाणे काढा,

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** नियमाची काय गोष्ट आहे, दलित लोक तिथे पण राहतात.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** दलित वस्तीच्या संदर्भामध्ये कोणी इथे येऊन सांगू शकतो का? नाही नाही घोषितचा ठिक आहे, १३ प्रभाग आहेत, जि.आर. काय आहे, तो वाचून दाखवा.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** तुम्ही काय बोलतात इकडे दलित लोक राहत नाही का? म्हणजे ते मर्यादीत नाहीत का?

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** प्रभागाची काय गोष्ट आहे, जिथे दलित लोक राहतात, तिथे काम झाले पाहीजे.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** दलित लोकांची घोषित अघोषित जी वस्ती आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** शंकरभाई जे सांगत आहेत, त्यांच्याकडे लक्ष देण्यात यावे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** जि.आर. पुर्ण वाचून दाखवा, दलित निधी संदर्भातला जो निधी आहे, तो पुर्ण वाचून दाखवा.

**प्र. शहर अभियंता, श्री.महेश सितलानी:—** सर यामध्ये लिहीले आहे की, पहीले १३....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, आपण नंतर सांगा, बाकीच्या लोकांना पहीले बोलू दया. मी थोडे सांगू इच्छितो की, जर गोषवा—यामध्ये आपण वाचणार तर शासन निर्णय क्र. १०२००/१५९२ दिनांक ५/३/२००२ मधील परिच्छेद क्र. ४ अन्वये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातील अनुसुचितजाती तसेच नवबौध्दांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसुचित जातीच्या राखीव प्रभागा शिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसुचितजाती व नवबौध्द यांच्या लोक संख्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमधील कामे हाती घेता येणार आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ५० टक्के ज्या प्रभागामध्ये लोक संख्या आहे, ते सगळे वार्ड दलित, अनुसुचित जातीच्या प्रभागामध्ये आलेले आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** वार्ड लिहीले नाही, आपण वाचन करा. प्रत्येक प्रभागामधील, ज्या वस्तीतील, एका प्रभागामध्ये, एका वार्डमध्ये ज्या वस्तीतील अनुसुचित जाती व नवबौध्द ज्या वस्तीच्या आतमध्ये एक वस्ती आहे, त्या वस्तीमध्ये जर अनुसुचित जातीची लोक संख्या, नवबौध्दांची संखा ५० टक्के पेक्षा जास्त आहे. त्या वस्तीमध्ये माझे दोन क्षेत्र आहेत, एक मुकुंदनगर, एक पोलिस स्टेशन जिथे दलित लोकांची संख्या ५० टक्केपेक्षा जास्त आहे. तिथे सुध्दा हे काम करू शकतो. याचा अर्थ असा होतो.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** भगवानभाई जिथे दलित लोक आहेत, तिथे काम झाले पाहीजे.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** बाकीच्या एरियामध्ये पण काम व्हायला पाहीजेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** जि.आर. वाचा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** विठ्ठलनगरमध्ये पण झाले पाहीजे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** कृपया आपण शांतपणे बसाल तर एक दुस—याला समजून घ्याल.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** भालेराव साहेब सांगतात तसे पहीले दलित वस्तीसाठी करा, त्याच्या नंतर बाकीच्या ठिकाणी जिथे दलित लोक राहतात, तिथे पण करण्यात यावे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** भालेराव साहेब, बाकीचे जे दलित आहेत, त्यांचा पण विकास व्हायला पाहीजे की नाही. चांगले दिवस तर आपले आहेत, मा. आठवले साहेब, चांगल्या दिवसामध्ये बसले आहेत आणि त्यांच्या आशिर्वादाने आपल्या उल्हासनगरचे कामे झाली पाहीजेत.

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते? ते समजले नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** आता कोण काय बोलत आहेत? मला समजायला येत नाही. दुस—यांना काय समजेल? एक एक करून बोलाल तर सगळयांना ऐकायला येईल आणि सगळयांचे काम होईल.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** महापौर मॅडम असे आहे की, याच्यामध्ये स्पष्ट लिहीलेले आहे की, ज्या वस्तीमध्ये जिथे जिथे आपले दलित बांधव राहत असतील ती वस्ती ५००ची असेल, ५००० हजाराची असेल तिथे ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त लोक राहत असतील, त्या लोकांना या विकासाचा अधिकार आहे, असे याच्यामध्ये स्पष्ट लिहीले आहे आणि हे जे तुम्ही बोलतात की, त्याच प्रभागामध्ये गेले पाहीजे. आता प्रभाग क्रमां २ श्री. जमनादास यांचा प्रभाग आहे. मुकुंदनगरमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त दलित लोक आहेत, तिथे देता यायला पाहीजेत. तुम्ही घेतलेले नाही हे चुकीचे आहे.

**सदस्या, श्रीम. ज्योती पाटील:—** मा. महापौर, दलित वस्तीसाठी हा जो निधी आलेला आहे, त्यामध्ये माझा प्रभाग हा महत्वाचा असून माझ्या प्रभागामध्ये ५० ते ६० टक्के दलित लोक असून या यादीमध्ये एकाही कामाचा उल्लेख आलेला नाही. या बददल महासभेमध्ये दखल घेण्यात यावी.

**सदस्या, श्रीम. मिनाक्षी पाटील:—** मा. महापौर, उप महापौर, आणि आयुक्त प्रभाग क्र.७ मधील अशोक जाधव ते संदिप जगताप यांच्या घरापर्यंत तसेच आजूबाजूच्या परिसरातील नालीवर सी.सी. पॅसेजच काम करण्यासाठी प्रस्ताव. ...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** या विषयाला सर्व संमतीने पास करण्यात यावे, इतिवृत्ताची वाट न पहाता.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** पास... पास..

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सन्माननिय महापौर मॅडम, मी विषय विचारलेला आहे, अधिकार कोणाला आहे, दलितांना कार्ड घ्यायचा असेल त्या नगरसेवकांना वाटत असेल आम्ही ए.सी. मध्ये बसतो, तर त्यांना मी दयायला तयार आहे. आमची आडचण नाही, परंतु ते अधिकार कोणाला आहेत, जि.आर. काढा अधिकार ज्या नगरसेवकाला असेल, त्यांनाच अधिकार आहेत.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** मा. महापौरजी, भगवान भालेराव यांच्या प्रभाग क्र.७ मध्ये दलित वस्ती जिथे आहे, तिथल्या नगरसेवकाचे नाव काय आहे? अपेक्षा भगवान भालेराव.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** अपेक्षा भगवान भालेराव.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** या गोष्टीचा पुरावा काय आहे?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सगळयांना माहीत आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** निवडणूक आयुक्त गाईड लाईन निवडणुकीच्या नंतर आपले जे प्रभागवारीज निवडणूका झाल्या आहेत, फक्त अ, ब, क, ड, त्याच वेळी दिलेल्या आहेत. त्याच्या नंतर अ, ड, ब, काहीच मान्य नाही. जे चार नगरसेकव जनतेच्या मतांवर निवडून आले आहेत, ते संपुर्ण प्रभागाचे नगरसेवक आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** नाही, नाही असे काहीच नाही.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** श्री. भगवान भालेराव सांगतात की, मी या वार्डचा नगरसेवक आहे. तर हे चुक आहे. ही त्यांची चुक आहे, ती सुधारायला पाहीजे. कारण अ, ब, क, ड, आता त्यांची काहीच किंमत नाही. चार नगरसेवका निवडून आले आहेत, ते चारही प्रभागाचे तेवढेच नगरसेवक आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सन्माननिय महापौर...

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** मा. महापौरजी, या यादीमध्ये ८ नंबरचा जो काम आहे, पॅनल नंबर ३ अ मध्ये कटकेश्वर महाराज ते आनंद मिथूनगर पर्यंत चार पाण्याच्या लाईन टाकणे, १५ लाख रूपयांचे माझ्या माहीती प्रमाणे हे काम आमदार निधीतून झाले आहे. तरी कृपया हे माझ्या लक्षात आले आहे, अशा प्रकारचे अजून कामे असू शकतात.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर:—** मुथूनगर मधून ही लाईन गेलेली नाही.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** कटकेश्वर मंदिरा पासून मुथूनगर पर्यंत

**सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर:—** मुथूनगर मधून ती लाईन गेलेली नाही. फक्त वाल्मिकीनगर पर्यंतच ती लाईन आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** यामध्ये काय लिहीले आहे, महाराजजी कटकेश्वर महाराज ते आनंद मुथूनगर पर्यंत.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर:—** आनंद मुथूनगर पर्यंत ती लाईन गेलेली नाही.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** वाल्मीनगर पर्यंत गेली आहे, कटकेश्वर मंदिर पर्यंत अर्धे काम झाले आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर:—** अर्धे नाही, तर संपुर्ण लाईन जायला पाहीजे, मुथूनगरला लाईन गेली नाही.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** माझी जी माहीती आहे की, लाईन गेलेली आहे. अशा प्रकारेची कामे असतील तर त्यांची माहीती घेण्यात यावी. असे झाले नाही पाहीजे की, तिथे काम झाले आहे

**सदस्य, श्री. राजेंद्रसिह भुल्लर:—** मुथूनगरसाठी हे काम आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** याची संपुर्ण चौकशी झाली पाहीजे. मा. महापौर, जसे की, आपल्या सार्वजनिक विभागामध्ये ४८ पेक्षा जास्त माझ्या माहीती प्रमाणे दलित वस्ती नोंदणी आहे. तरी कृपया आपले शहर अभियंता येतील आणि सांगतील आणि महापौर मॅडम माझी आपल्याला विनंती आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** भालेरावजी, कृपा करून एक एक बोला.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** महापौर मॅडम, माझे आपल्याला निवेदन आहे की, दलित वस्ती जिथे जिथे आहे, तिथे दलितांचे विकास झाले पाहीजे. दलितांच्या एरियाचा विकास झाले पाहीजे. बाकीच्या ठिकाणाचा श्री. भगवान भालेराव यांनी स्पष्ट करावे की, ते दलितांचे नेता आहेत की, फक्त काही प्रभागाचे नेता आहेत आणि माझे हे निवेदन आहे की, आपले शहर अभियंता सांगतील की, आपल्या दलित वस्तींचा फंड शहरामध्ये कसा वापरला जातो? कृपया करून यामध्ये थोडे...

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** सगळयांचे काम झाले पाहीजे, “सबका साथ, सबका विकास”

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** महापौर साहेबा, या महासभेमध्ये वर्षानुवर्ष नगरसेवक बसलेले आहेत, त्यांना संपुर्ण माहीती आहे. आपले शहर अभियंता पण उभे आहेत.मला वाटते की, सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये किती तरी वर्षा पासून दलित वस्तींची यादी बनवलेली आहे, प्रत्येक वर्षात दलित वस्तींचा फंड येत होता. सर्व दलित वस्तीमध्ये फंड वाटले जात होते. आता अचानक काय होत आहे? आमचे श्री. भगवान भालेराव साहेब, हे संपुर्ण शहराचे आर. पी.आय. चे नेता आहेत. दलित वस्तींचे नेता आहेत, माझी भालेराव साहेबांना विनंती आहे की, कृपया सगळयांना न्याय देण्यात यावा, धन्यवाद.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सन्माननिय सदस्य बोलतात की, ठिक आहे मला कुठलाही विरोध करायचा नव्हता, फक्त माझा विषय समजून घ्या. मला कुठल्या कामाला विरोध करायचा नव्हता, दलित वस्तीमध्ये ५० टक्के लोक आहेत. मी विरोध करतो आहे, अशातला प्रकार नाही. फक्त माझा विषय समजून घ्या, त्या दलित वस्तीमध्ये जे दलित नगरसेवक निवडून आले असतील, त्यांना तो अधिकार आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** हे चुक आहे, प्रत्येक पॅनलमधून कोणी कुठून निवडून आलेत, आम्हांला बोलू दया ते चुकीचे बोलत आहेत,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सरकारचा जि.आर. आहे, तो वाचायला सांगा. मी काय सांगतो, जर हे चुकीचे आहे, तर मला काहीच प्रॉब्लेम नाही. परंतु गव्हर्नमेंटचा जि.आर. आहे, तो वाचायला सांगा.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** महापौर मॅडम, माझी श्री. भालेराव यांना विनंती आहे की,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, भगवान भालेराव जे सांगत आहेत, असे गरजेचे नाही की, दलित वस्तीच्या कामा बाबात नगरसेवकाच सांगेल, जर त्या दलित वस्तीचे नगरसेवक काम सांगत नाहीत, तर महापौर असतील, उप महापौर असतील, सभागृह नेता असतील कोणी पण कामाची सुचना देऊ शकतात.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** शासनाचा जि.आर. आहे, शासनाच्या जि.आर. ला आपण मानत नाहीत का? शासनाचा जि.आर. नसेल तर बोला. त्यांनी सांगावे की शासनाचा जि.आर. नाही. मॅडम माझी विनंती आहे, शासनाचा जि.आर. आहे, वाचण्यासाठी सांगा.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** आपण कृपया करून बसून घ्या, मी श्री. सितलानीला बोलावते. भालेराव आपाण कृपया करून बसून घ्या. शेरीजी आपण बसून घ्या.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, आपण जर १ रूपयामध्ये शाळा पास करतो,

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** गरीबांसाठी, दलितांसाठी शाळेसाठी १ रूपया पास केला.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** प्रदिपजी आपण पण बसून घ्या, राजेशजी आपण बोला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौरजी धन्यवाद, पहीले म्हणजे सर्व नगरसेवकांना ही गोष्ट समजायला पाहीजे की, हा गोषवारा व्यवस्थित वाचा, एकुण लोकसंख्या अनुसुचित जातींची लोकसंख्या हे संपुर्ण प्रभागामध्ये राहणारे, अनुसुचित जातीची संख्या फक्त एका वार्डची नाही किंवा एका वस्तीची नाही, जेव्हा ए.सी. चे वार्ड बनवले गेले, तर जिथे जनता सर्वात जास्त राहते, अशा १३ प्रभागांना ए.सी. असे घोषित केले गेले. त्याच्या नंतर जो ठराव झाला तर त्याची कोणतीही बॉड्री नाही की, कोणता वार्ड ए.सी. कुठून कुठे आहे? ते लोकसख्यांच्या आधारावर निर्धार झाले आहे. बॉड्रीच्या आधारावर नाही. त्याच्या नंतर जो ७ अ ची गोष्ट आहे, त्यामध्ये अनुक्रमांक १४ मध्ये उल्हासनगर—१ प्रभाग ७ येथी श्री. अशोक जाध वते श्री.संदिप जगताप यांच्या घरा पर्यंत तसेच आजूबाजूचा परिसरातील नाली व सी.सी. पॅसेजचे काम करणे बाबात, हे पण रमाबाई आंबेडकरनगर, येथे दलित लोक राहतात. या जागेवर ए.सी. ची जनता राहत आहे. त्यांच्यासाठी हे कार्य करणे खुपच आवश्यक आहे. त्याच बरोबर इथे ५० टक्केपेक्षा जास्त, इथे लिहीले आहे की, जि.आर. नंबर सो ॲन्ड सो मधील विषयक अन्वये ४ अन्वये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातील अनुसुचित जाती तसेच नवबौध्दसाठी आरक्षित असलेले प्रभागामध्ये तेसच अनुसुचित जातीच्या राखीव प्रभागा शिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसुचित जाती व नवबौध्द विशेष घटक यांची लोकसंख्या ५० टक्केपेक्षा जास्त आहे. अशा वस्तीमधील काम हाती घेण्यात येणार आहेत. हाल्फ नॉलेज इज मोस्ट डेजेरस त्यासाठी परिस्थिती लक्षात घेऊन मी याच्यामध्ये ॲड करायचे आहे, २६ नंबरवर सतनाम कॉलनी २० लाख रूपयाचे सि.सि. पॅसेज आणि २५०, हरिजन कारॅलनी २० लाख रूपयाचे सि.सि. पॅसेज व २५०, मुकुंदनगर २० लाख रूपयाचे सि.सि. पॅसेज व २५०, पाईप लाईनच्या जवळील सि.सि. पॅसेज व सि.सि. आणि ड्रेनेज २० लाख रूपयाचे, १२ ड मध्ये फालवर लाईन, सफाई कामगार कॉलनी २० लाख रूपये, आनंदनगरमध्ये २० लाख रूपयाचे सि.सि. पायवाट व नाली यासाठी हे ॲड केले जात आहेत, धन्यवाद.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** तुम्ही अनुशासनाच्या गोष्टी करतात, आता आपल्याला अनुशासन दिसला तुम्हांला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** इतिवृत्ताची वाट न पहाता.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आपण अनुशासनाच्या गोष्टी करतात, आता अनुशासन दिसले का तुम्हांला? आता मला अनुशासन सांगा.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** लिस्टमध्ये आमचे इथले पण नाव नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** पहीले मला एक गोष्ट सांगा, एका विषयावर एक सदस्य किती वेळा बोलू शकतात? परत परत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आपण सुध्दा परत परत बोलत आहेत. त्यांना जि.आर.वाचण्यासाठी सांगा. सन्माननिय महापौर मॅडम मी जि. आर. वाचण्यासाठी सांगितले आहे. जि.आर. वाचण्यासाठी सांगा. आपले अनुशासन ठिक नाही. आपण सांगितले होते की, मी जि.आर. वाचण्यासाठी सांगते. आपले अनुशासन ठिक नाही. आपण जि. आर. वाचण्यासाठी बोला. मतदान घ्या मला काहीच प्रॉब्लेम नाही. जि.आर. वाचण्यासाठी सांगा.

**महापालिका सचिव:—** आता पिठासिन अधिका—यानी प्रस्तावा बाबत बोलायला सांगितले आहे, जर प्रस्ताव मान्य नसेल तर सदस्य मतदानाची मागणी करू शकतात.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** मॅडम, माझा पण रोड या लिस्टमध्ये टाकायचा आहे.

**महापालिका सचिवः—** मॅडम आपण नाव सांगा.

या वेळी सदस्या, श्रीम. अपेक्षा भगवान भालेराव या सभागृहाच्या बाहेर गेल्या.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—** विर तानाजीनगर, जिथे स्लम एरिया आहे, दलितवस्ती आहे, त्यामध्ये कलवर्ट १५ लाखाचे आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** जि.आर. वाचण्यासाठी बोला मला प्रस्तावाची चिंता नाही, महापौर मॅडम मी आपल्याला परत परत सांगत आहेत. महाराष्ट्र शासनाचा जि.आर. आहे, तो वाचण्यासाठी सांगा. हे आपले अनुशासन नाही. आपले अनुशासन चुकीचे आहे. आपण पारदर्शकतेचा व्यवहार करीत नाहीत, आपण गैर कानुनी काम करीत आहेत, मॅडमजी, हे अनुशासन नाही. आपण पहीले जि.आर. वाचण्यासाठी सांगा.

**महापालिका सचिवः—** हा प्रस्ताव मतदानासाठी टाकण्यासाठी मा. महापौरांनी सांगितले आहे.

**सदस्य, श्री. अजित गुप्ताः—** माझ्या प्रभागामध्ये पण स्लम एरिया आहे, त्याला सुध्दा अॅड करण्यात यावे.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** माझ्या प्रभागामध्ये तीन दलित वस्त्या आहेत, त्यांना पण अॅड केले जावे. गौतमनगर आहे, योगेशनगर आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** माझ्या प्रभागामध्ये इंदिरानगर, विठ्ठलनगर, कैलास कॉलनी हे पण घेण्यात यावे.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** पॅनल नंबर ५ मध्ये कालिमाता मंदिर एरियामध्ये पण दलित वस्ती आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** प्रभाग क्र. १६ मध्ये शास्त्री नगर, गौतमनगर, गणेशनगर आणि योगेशनगर पण घेण्यात यावे, तिथे पण २०, २० लाखाचे काम झाली पाहीजेत.

**महापालिका सचिवः—** सदस्यांनी जी नावे सांगितली ती आम्ही टेपमध्ये ऐकुन टाकू आता तुम्ही नावे माझ्या हातामध्ये दिली नाहीत.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** मॅडम, आम्हांला प्रस्ताव तर टाकू दया.

**महापालिका सचिवः—** मी तेच सांगत आहे की, आपण जे जे नावे दिली आहेत, ते आम्ही टेपमध्ये ऐकुन टाकू.

**सदस्य, श्री. अजित गुप्ताः—** मॅडम, गौतमवाडी, मिलिंदनगर आणि भवानीनगर माझ्या प्रभागामध्ये तीन नावे आहेत, ते पण अॅड केले जावे.

**महापालिका सचिवः—** कृपया माझे म्हणणे ऐकुन घ्यावे, मी सांगितले आहे की, ज्या ज्या सदस्यांनी माईकमध्ये बोलून सांगितले आहे, ते आम्ही ऐकुन टाकू आणि १७ नंबर पॅनलसाठी सुरूवातीलाच सांगितले होते की, आचारसंहिता आहे, तो आपण घेऊ शकत नाही. आपण त्याच्यावर निर्णय घ्या.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** ठिक आहे, १७ नंबर वार्ड सोडून दया, बाकीचे तर दया.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** १७ नंबरचे प्रभागाचे काम नंतर करा. तो कट करू नका?

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** प्रभाग १७ नंबर पेंडींग ठेवा. तिथे पण दलित लोक राहतात, तिथे पण विकासाची गरज आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** मा. महापौरजी, ज्या पण सदस्यांनी, जमनादास पुरस्वानी, श्री. शंकर लुंड, ज्योती पाटी....

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** एका सदस्यांला किती वेळा बोलायला दिले जाते. आपला अनुशासन कुठे आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** श्री. किशोर वनवारी...

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** भालेरावजी आपण बसून बोलत आहेत, तर अनुशासनची गोष्ट कसे करीत आहात?

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** मा. महापौरजी, सगळयांना शांत करा आणि श्री. राजेश वदारिया यांना बोलू दया.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** गौतमबुध्दनगर, २० लाख रूपये, महेंद्रनगर २० लाख रूपये, निधी यामध्ये दयायला पाहीजे. त्याच बरोबर श्री. किशोर वनवारी, डॉ. प्रकाश नाथानी, श्रीम. ज्योती पाटील, श्री. शंकर लुंड, श्री. अजित गुप्ता, श्री. दिपक सिरवानी आणि यांचे पण प्रभागातले यामध्ये समाविष्ट करायला पाहीजे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** प्रभाग क्र. १७ मध्ये निवडणूक असल्यामुळे त्याला सोडून बाकीचे समाविष्ट करून सर्व संमतीने पास करा. इतिवृत्ताची वाट न पहाता, सर्व संमतीने पास...पास..

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** झाले पास..पास...

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** गैर कानूनी काम का करतात तुम्ही?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मॅडम याच्यावर खुप चर्चा झालेली आहे. आता याला पास करायला पाहीजे, आपण कृपया करून याच्यावर मतदान घ्या.

**महापालिका सचिव:—** मा. महापौरांनी सदर प्रस्तावावर मतदान घेण्यासाठी सांगितले आहे. जे आता सुचविलेल्या सुधारणासह जे प्रस्तावाच्या बाजूने आहेत, त्यांनी कृपया हात वर करावे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** दलित विरोधी आहेत, आपण चुकीचे काम करीत आहेत.सन्माननिय महापौर मॅडम आपण दलित विरोधी आहेत.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** जि.आर. प्रमाणे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** दलित विरोधी श्री. भगवान भालेराव आहेत, ते बोलतात की, फक्त माझ्या पॅनलमध्ये काम व्हायला पाहीजे. बाकी संपुर्ण शहरामध्ये कोणी दलित काही कामाचे नाहीत. ते सांगतात की, फक्त माझ्याच पॅनलमध्ये दलित आहेत. त्यांना फक्त त्यांचे नाव पाहीजे, फक्त पार्टीमध्ये त्यांना नाव पाहीजे. महापौरांना दलित विरोधी बोलतात.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** महापौरजी जर अशा प्रकारे दलित विरोधी गोष्टी होत असतील तर....

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** महापौरजी, त्यांना श्रीम. शुभागीनी निकमकडून समस्या आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** मतदानाची प्रक्रिया चालू आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** आपली मनमानी चालणार नाही, महापौरांना दलित विरोधी बोलतात. महापौर दलित विरोधी आहे, हे सर्व काम दलितांचेच होत आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** महापौरजी, मतदानाच्या प्रक्रियामध्ये कोणीही बोलणार नाही.

**महापालिका सचिव:—** २४ मतदान झाले आहे.

**प्रस्तावाच्या बाजूने २४ मते**

**१) श्रीम. मिना आयलानी**

**२) श्री. जीवन इदनानी**
**३) श्री. दिपक सिरवानी**
**४) श्री. अजित गुप्ता**
**५) श्रीम. आशा बि—हाडे**
**६) श्री. किशोर वनवारी**
**७) डॉ. प्रकाश नाथानी**
**८) जमनादास पुरस्वानी**
**९) श्री. राजेश वदारिया**
**१०) श्रीम. कविता लाला पंजाबी**
**११) श्रीम. दिप्ती दुधानी**
**१२) श्रीम. ज्योती भटीजा**
**१३) श्रीम. मिनाकौर लबाना**
**१४) श्री. शंकर लुंड**
**१५) श्री. गजानन शेळके**
**१६) श्रीम. मिना सोनेजी**
**१७) श्रीम. इंदिरा उदासी**
**१८) श्री. अशोक छाप्रु**
**१९) रवि जग्यासी**
**२०) श्रीम. ज्योती पाटील**
**२१) श्रीम. सविता तोरण**
**२२) श्रीम. पुजा भोईर**

**२३) श्रीम. शुभागीनी निकम**

**२४) श्री. रविंद्र बागुल**

**सदस्य, श्री. रविंद्र बागुलः—** महापौर मॅडम, मतदानाची प्रक्रिया चालू आहे, पण माहीत होत नाही की, काय चालले आहे.

**महापालिका सचिवः—** आता जे या सुधारण्याच्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत, त्यांनी हात वर करावेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** आमचा अधिकार, या महासभेमध्ये जि.आर. वाचला जात नाही.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** मतदान घ्या, पण जि.आर. का वाचला जात नाही. आपण मतदान करा,

**महापालिका सचिवः—** मी बोलले आहे, पहीलेच बोलले आहे की, जे विरोधात आहेत, जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत, त्यांनी कृपया वर हात करावे.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** दलित विरोधी कोणी नाही, संपुर्ण शहरामध्ये दलितांचा विकास झाला पाहीजे. त्यासाठी आम्ही वचनबध्द आहेत.

**महापालिका सचिवः—** सर्वानुमते हा ठराव पास झाला आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** सर्वानुमते नाही,

**महापालिका सचिवः—** मग कोणीही विरोधात हात वर केले नाहीत, तर हा प्रस्ताव मंजूर झाला आणि जे तटस्थ आहेत, त्यांनी कृपया हात वर करावेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** होय आम्ही तटस्थ आहेत.

**महापालिका सचिवः—** कृपया जे तटस्थ आहेत, त्यांनी हात वर करावे. दोन मते तटस्थ आहेत.

**तटस्थ मते २**

१) श्री. भगवान भालेराव

२) श्रीम. सुरेखा आव्हाड

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** गैर कानुनी आहे म्हणून मी तटस्थ आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** जी.आर. का तुम्ही वाचून दाखवत नाही?

**महापालिका सचिवः—** हे बघा, मा. पिठासिन अधिकारी यांचा हा अधिकार आहे. सभा चालवण्याचे यामध्ये मी काही बोलू शकत नाहीत.

**सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाडः—** कृपया मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, जी.आर. वाचण्याची मागणी केलेली आहे.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—** महापौर मॅडम, आपण पक्षपातीपणा करीत आहेत. आपण आपल्या पक्षाच्या नगरसेवकांना सुट देत आहेत, आपण जी.आर. वाचायला सांगत नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** पक्षपातीपणा करीत आहेत, जी.आर. का वाचून देत नाहीत. प्रशासनाने जो जी.आर. काढला आहे, तो का वाचत नाही?

**महापालिका सचिवः—** हा ठराव मंजूर झाला आहे. तटस्थ फक्त दोन मते झाली आहे आणि हा ठराव मंजूर झाला आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे ☑

---

**आयत्यावेळचा विषय**

**विषय क्र. ८ :— उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता मा.राज्य निवडणूक आयोगाने दिनांक 25 नोव्हेंबर,2016 च्या अधिसुचनेद्वारे प्रसिध्द केलेल्या 13 अनुसूचित जातीचे प्रभागातील दलित वस्ती सुधारणा**

**योजनेअंतर्गत कामांचे प्रस्ताव मान्य करणे.**

प्रस्तावना

शासनाचे नगरविकास विभागाकडील संदर्भिय दिनांक ०५/०३/२००२ च्या शासन निर्णयाद्वारे नागरी क्षेत्रासाठी दलित वस्ती सुधारणा योजनेची प्रभावी अंमलबजावणीकरीता मार्गदर्शक तत्वे विहित केलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन प्रस्ताव तयार करुन मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता सादर केले जातात.

दिनांक ०६/०३/२०१८ रोजी दुपारी १.३० वाजता मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सन २०१७-१८ च्या निधी मागणीकरीता प्रस्तावित कामांची यादी, महासभा ठराव तांत्रिक मान्यता व आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह सादर करणेबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत उल्हासनगर महानगरपालिकेकरीता रुपये ५.०० कोटीचे वितरण करण्याचे निश्चित झाले असून रुपये ५.०० कोटी खर्चाचे मर्यादेतील परिपूर्ण प्रस्ताव प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता तात्काळ सादर करण्याच्या सुचना मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिल्या आहेत.

शासन निर्णय क्र.विघयो-१०२००/१५९२/प्र.क्र.१८९, नवि-०४ दिनांक ०५/०३/२००२ मधील परिच्छेद क्र.४ अन्वये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नवबौध्दांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसुचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमधील कामे हाती घेता येणार आहे.

तसेच परिच्छेद क्र.५ अन्वये शहरातील अनुसूचित जाती व नवबौध्द यांचेसाठी आरक्षित प्रभाग तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द नागरीकांचे प्रमाण जेथे तुलनेत अधिक असेल तेथे प्राधान्याने (उतरत्या क्रमाने) या योजनेअंतर्गतची अनुज्ञेय कामे हाती घेण्यात यावीत असे स्पष्ट नमुद करण्यात आले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक वर्ष २०१७ फेब्रुवारी रोजी पाड पडली. सदर निवडणूकीमध्ये मा.राज्य निवडणूक आयोगाने महापालिका क्षेत्रातील प्रभागांची प्रभाग रचना अंतिम करुन महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दिनांक २५ नोव्हेंबर,२०१६ अन्वये अधिसुचना प्रसिध्द केलेली आहे. सदर अधिसूचनेमध्ये एकूण २० प्रभागांमध्ये खालील १३ प्रभाग “अनुसूचित जाती” प्रवर्गाकरीता राखीव घोषित केलेले आहेत. सदर १३ प्रभागातील एकूण लोकसंख्या व अनुसूचित जातीच्या लोकांची लोकसंख्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | प्रवर्ग | एकूण लोकसंख्या | अनुसुचित जातीची लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | १ | अनुसूचित जाती | २४५९४ | ३२३८ |
| २ | ३ | अनुसूचित जाती | २६५८६ | ५४३१ |
| ३ | ४ | अनुसूचित जाती | २७४७३ | ८५१६ |
| ४ | ७ | अनुसूचित जाती | २८४०२ | ११११९५ |
| ५ | ८ | अनुसूचित जाती | २६८८७ | २९८९ |
| ६ | १० | अनुसूचित जाती | २४१८७ | ५३५४ |
| ७ | १२ | अनुसूचित जाती | २६९३६ | ७२८५ |
| ८ | १३ | अनुसूचित जाती | २६४३४ | ७१०० |
| ९ | १४ | अनुसूचित जाती | २५३३४ | ४४४२ |
| १० | १५ | अनुसूचित जाती | २४४८२ | २८१८ |
| ११ | १७ | अनुसूचित जाती | २५३३८ | ३५४३ |
| १२ | १८ | अनुसूचित जाती | २४०५८ | ९४१३ |
| १३ | २० | अनुसूचित जाती | २१५९३ | ४७०० |

उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्र.६ मध्ये या योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेली सार्वजनिक हिताची कामे नमुद केलेली आहेत. त्यास अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे उक्त अनुसूचित जातीच्या १३ प्रभागांतील सार्वजनिक हिताच्या कामांचे खालील प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | प्रस्तावित कामाचे नाव | प्राकलनिय खर्च रुपये |
|---|---|---|---|
| १ | १(अ) | बॅरेक नं .१४७ ते इंदीरा नगर झोपडपट्टी परिसरामध्ये गटारी, पायवाटा, सीपॅसेच .सी. बनवणे व चेकर्स बसविणे. | ९००००० |
| २ | १(अ) | बॅरेक नं .१४४ ते राजमणी यादव यांच्या आजुबाजुच्या परिसर इंदिरानगर येथे मोठा नाला, | ८००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | गटारी, पायवाटा, सी, सी पॅसेज बनविणे व चेकर्स बसविणे. | |
| ३ | १(अ) | मिनाबाई कांबळे ते जिजाबाई बागुल तसेच गयाबाई निकाळचे यांचे घराच्या आजु बाजुचे परिसर तसेच हर्षवर्धन नगर येथील परिसरात नीवन गटारी, पायवाटा, सीपॅसेज बनविणे .सी . व चेकर्स बसविणे. | ८००००० |
| ४ | १(अ) | दयाबाई भालेराव ते वाघमारे यांचे आजुबाजुचे परिसरात,सम्राट हर्षवर्दन नगर येथे नविन गटारी, पायवाटा, सीपॅसेज बनविणे व .सी. चेकर्स बनविणे. | ८००००० |
| ५ | १(अ) | कैलास सुरवरकर ते मनिषा आहिरे यांचे आजुबाजुचे परिसरात,इंदिरानगर येथे नविन गटारी, पायवाटा, सीपॅसेज बनविणे .सी., चेकर्स बसविणे. | ८००००० |
| ६ | ३(अ) | कटंकेश्वर महाराज ते बॅरेक क्र.२७ पर्यंत नीवन पाण्याची ४ इंच लाईन टाकणे. | १०००००० |
| ७ | ३(अ) | प्रगती क्लासेस ते जनता मित्र मंडळ पर्यंत ४ इंच नविन पाण्याची लाईन टाकणे. | १०००००० |
| ८ | ३(अ) | कटंकेश्वर महाराज ते आनंद मुथ्यूनगर पर्य ४ इंच नविन पाण्याची लाईन टाकणे. | १५००००० |
| ९ | ४(अ) | उल्हासनगर-३ येथील आंबेडकर नगर येथे अंबिका दर्शन ते साई ज्योत अर्पाटमेंट पर्यंत नाली, फुटपाथ व सी.बनविणे.सी. | ९९९९५० |
| १० | ४(अ) | उल्हासनगर -३ येथील पबुद्धनगर येथे रवी तायडे हाऊस जवळ समाज मंदिर बांधणे | ९९७४०० |
| ११ | ४(अ) | उल्हासनगर -३ येथील आंबेडकर नगर येथे पंढरी साळवे घरापासून ते सोना खैरमार यांच्या घरापर्यंत सीनाली व टाईल्स बसविणे .सी. | ९९७२२५ |
| १२ | ४(अ) | उल्हासनगर ३ येथील दर्शन पाडा येथे वाल्वे हाऊस ते नाथा बदाणे यांच्या घरापर्यंत दशरथ बाविस्कर ते एस शाखा रामा सालवे.एस.यांच्या घरापर्यंत ब्राम्हणपाडा ,घोटीकर मिरची कांडप दुकाना कामा दाबडे घराजवळ येथे सी.नाली व चेकर्स बसविणे.सी. | ९९७९२५ |
| १३ | ७(अ) | उल्हासनगर २ मधील रमाबाई आंबेडकर नगर, बुध्दविहार परिसरात नाली बनविणे व चेकर्स लादी बसविणे | ५००००० |
| १४ | ७(अ) | उल्हासनगर-२ प्रभाग ७ येथील अशोक जाधव ते संदिप जगताप यांच्या घरापर्यंत तसेच आजूबाजूचा परिसर येथे नाली व सि.सि.पॅसेजचे काम करणे बाबत. | १८००००० |
| १५ | ७ (अ) | उल्हासनगर २ मधील रमाबाई आंबेडकर नगर येथे समाज मंदिर बांधणे. | १५००००० |
| १६ | १२(अ) | सम्राट अशोकनगर मधील रमाबाई शाळेजवळ सी.सी. नाली बनविणे. | ३४५००० |
| १७ | १२(अ) | सम्राट अशोकनगर मधील महादेव सोनवणे यांच्या घराजवळ सार्वजनिक स्त्री व पुरुष शौचालय बनविणे. | ३५००००० |
| १८ | ८(अ) | सुभाष नगर मधील पंजाबी चौकापासून पं ते एम. एमशोचालय कडे जाणाऱ्या .ए .डी .आर . रस्त्याकडेसिमेंट कॉंक्रीट चा रस्ता बनविणे. | ३८४५००० |
| १९ | १० (अ) | इंदिरा आर्शिवाद नगर, शांती नगर, वाधेला नगर व सावित्रिबाई फुले नगर परिसरात नाला व सीपॅसेज .सी. बनविणे बाबत. | १५००००० |
| २० | १० (अ) | १) भावजीनगर २) बाबासाहेब आंबेडकर नगर ३) पंचशिल नगर या परिसरातील नाला व सी. पॅसेज बनविणे .सी. | १०००००० |
| २१ | १० (अ) | बौध्दनगर श्रीव येथे (बौध्द विहार) .कारभारी अंडागंळे यांचे घराजवळ समाज मंदिर बांधणे . सी.पॅसेज व नाली बांधणे .सी. | १३४५००० |
| २२ | १४ (अ) | सितारामनगर येथे शिवाजी मैदान बाविस्कर यांचे घरामार्गे ते गणपती मंदिरपर्यंत रस्ता एम.२५० ने बनविणे व रस्त्याला लागून फुटपाथ व नालीचे ड्रेनेज चेंबर्स बनविणे. | १५००००० |
| २३ | १४ (अ) | इंदीरानगर येथे समाज मंदीर बनविणे. | १५००००० |
| २४ | १४ (अ) | इंदीरानगर कुमार बच्चन ते प्रकाश थोरात यांचे घरापर्यंत सी.पॅसेज व नाली बांधणे .सी. | ८४५००० |
| २५ | १५ (अ) | वाल्मीक नगर, उल्हासनगर-४ येथील बॅ .क्र.१५०८ दुबे यांचे घर ते राजवनी भगवान हडाले यांचे घरापर्यंतचा रस्ता एम.२५० ने बनविणे व नाली बांधणे. | १०००००० |
| २६ | १५ (अ) | वाल्मीक नगर, उल्हासनगर-४ येथील संपुर्ण परिसरात सी.पॅसेज व नाली बनविणे बाबत.सी. | १०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | १५ (अ) | वाल्मीक नगर, उल्हासनगर-४ येथील नादुरुस्त ६१ सीटचे महिला शौचालय दुरुस्ती करणे किंवा निष्काशित करुन नवीन बांधणे. | १८४५००० |
| २८ | २० (अ) | उल्हासनगर ५ येथील लाल चक्की परिसरातील अंबेडकर नगर मध्ये सीपेव्हमेंट व .सी . .बांधणे नाली | २०००००० |
| २९ | २० (अ) | उल्हासनगर ५ येथील महात्मा फुले नगर मध्ये सी.सी . पेव्हमेंट व नाली बांधणे. | १८४५००० |
| ३० | १८ (ब) | उल्हासनगर ४ येथील कुर्ला कॅम्प परिसरातील साईनाथ नगर मध्ये सीपेव्हमेंट व नाली .सी . बांधणे. | २५००००० |
| ३१ | १८ (ब) | उल्हासनगर-४ येथील सुभाष टेकडी परिसरपेव्हमेंट व . नाली बांधणे. | १३००००० |
| ३२ | १७ (ब) | उल्हासनगर ४ येथील राधेशाम नगर मध्ये सी.सी . पेव्हमेंट रस्ता व नाली बांधणे. | २३४५००० |
| ३३ | १७ (ब) | उल्हासनगर ४ येथील संभाजी चौका जवळील त्रीवेणी नगर मध्ये सीपेव्हमेंट व नाला .सी . .बांधणे | १५००००० |
| ३४ | १३ (अ) | उल्हासनगर ४ येथील सिध्दार्थ नगर मध्ये सी.सी . पेव्हमेंट व नाली बांधणे. | २०००००० |
| ३५ | १३ (अ) | उल्हासनगर ४ येथील रमाबाई नगर, आम्रपाली नगर, साईबाबा नगर, पंचशिल नगर, सिताराम नगर येथे सी.सी . पेव्हमेंट व नाली बांधणे. | १८४५००० |
| | | **एकूण** | **४,९९,५२,५००/-** |

उक्त एकूण ३५ कामांचे रुपये ४,९९,५२,५००/- (अक्षरी रुपये चार कोटी नव्याण्णव लाख बावन्न लाख पाचशे मात्र)प्राकलनिय खर्चाचे प्रस्ताव महासभा ठराव, तांत्रिक मान्यता व आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता शासनाकडे सादर करणेपूर्वी मा.महासभेची मान्यता आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे प्रस्तावित.

**<u>महासभा ठराव क्र: ८२</u>** **<u>दिनांक:— १४/३/२०१८</u>**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया
अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व सदस्यांनी सभेत सुचविल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ करीता मा. राज्य निवडणूक आयोगाने दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ च्या अधिसुचनेद्वारे प्रसिध्द केलेल्या १३ अनुसूचित जातीचे प्रभागातील दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत पॅनल क्र. १७ येथे पोटनिवडणूक आचारसंहिता लागु झाल्याने ते काम प्रलंबित ठेवुन इतर कामाचे प्रस्ताव तसेच सभेत सुचविलेल्या पुढील कामांचा प्रस्तावात समावेश करुन शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस मान्यता देत आहे.

**<u>तसेच</u>**

शासन निर्णय क्र.विघयो-१०२००/१५९२/प्र.क्र.१८९, नवि-०४ दिनांक ०५/०३/२००२ मधील परिच्छेद क्र.४ अन्वये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नवबौध्दांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसुचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमधील कामे हाती घेता येणार आहे. त्यानुसार सदस्यांनी सुचविलेले खालील प्रस्ताव सुध्दा शासनाकडे पाठविणे मान्यता देत आहे.सतनाम कॉलनी सीसी पॅसेज व २५० एम रस्ता, २० लाख रुपये

१. हरीजन कॉलनी सीसी पॅसेज व २५० एम रस्ता २० लाख रुपये
२. मुकुंदनगर सीसी पॅसेज व २५० एम रस्ता २० लाख रुपये
३. पाईपलाईन जवळ सीसी पॅसेज व ड्रेन २० लाख रुपये
४. प्रभाग १२ ड मध्ये फालोवर लाईन येथे स्विपर कॉलनी २० लाख रुपये
५. आनंदनगर सीस पायवाटा व नाली २० लाख रुपये
६. वीर तानाजी नगर येथिल कल्व्हर्ट १५ लाख रुपये
७. प्रभाग क्र. १६ येथे सहयाद्री नगर, गौतम नगर, रमेश नगर, योगेशनगर येथे २० लाखाचे काम
८. पॅनल नं. १९, इंदिरानगर, विठ्ठल नगर, कैलास कॉलनी येथे प्रत्येकी २०—२० लाखाचे काम
९. गौतमवाडी, मिलिंदनगर, भवानी नगर येथिल २० लाखाचे काम
१०. शास्त्रीनगर, गणेश नगर येथिल २० लाखाचे कामकाम
११. पॅनल नं. ५ येथे कालीमाता मंदिर येथिल २० लाखाचे काम
१२. गौतमबुध्द नगर २० लाखाचे काम
१३. महेंद्रनगर २० लाखाचे काम

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**<u>मंजुर</u>**
महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.०० वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२७/३/२०१८

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २७/३/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

**८—इ**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक २०/१/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा शनिवार दिनांक १७/२/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित झाल्याने सदर सभा सोमवार दिनांक ५/३/२०१८ रोजी दुपारी २.३० वाजता पुन्हा स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा गुरुवार दिनांक ८/३/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित झाल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक ९/३/२०१८ रोजी सांयकाळी ५.०० वाजता आयोजित करुन पुन्हा स्थगित झाल्याने सदर सभा मंगळवार दिनांक २७/३/२०१८ रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३४ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ३५ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ५ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३६ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ६ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३७ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ८ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३९ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४० | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४१ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ११ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४२ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १२ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४३ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १३ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४४ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १४ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४५ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १५ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ४६ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १६ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ४७ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १७ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४८ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४९ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १९ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५० | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २० | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५१ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २१ | श्रीमती शुभांगिनी निकम | ५२ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २२ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५३ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २३ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसूळ | ५४ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २४ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५५ | श्रीमती मिनाक्षी रवि पाटील |
| २५ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ५६ | श्री. विजय चाहु पाटील |
| २६ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ५७ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २७ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५८ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २८ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ५९ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २९ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६० | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३० | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६१ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३१ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६२ | अरूण लक्ष्मण आशान |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके | ६३ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३३ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती पंचम उमेश कालानी, २. श्रीमती आशा नाना बिराडे, ३. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ४. श्री. अशोक बच्चुमल छाप्रु ५. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ६. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ७. श्री. भगवान शंकर भालेराव, ८. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ९. श्री. राजेश नानिकराम वदारिया, १०. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ११. श्रीमती दिपा नारायण पंजाबी, १२. श्रीमती पुष्पा नाना बागुल, १३. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, १४. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, १५. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), १६. श्री. प्रमोद नामदेव टाले, १७. श्रीमती कविता सुधिर बागुल, १८. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, १९. श्री. विकास परशुराम पाटील.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. गणेश पाटील, आयुक्त
२. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
५. श्री. दादा पाटील, मुख्य लेखाधिकारी
६. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
८. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
९. डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१०. श्री. एस. के. सेलवन, कार्यकारी अभियंता
११. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
१२. श्री. बालाजी लोंढे, सहाय्यक आयुक्त
१३. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१४. श्री. मनीष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१५. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त
१६. श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता
१७. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
१८. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक
१९. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२०. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२१. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२२. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक
२३. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२४. श्री.दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
२५. श्री. राजा बुलानी, प्र. विधी विभाग प्रमुख
२६. श्रीमती. निलीमा कदम, लेखा पाल, शिक्षण मंडळ
२७. श्रीमती सलोनी निवकर, लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१.श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

सायंकाळी ५.१६ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**<u>सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:–</u>** नाही, मॅडम पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलायचे आहे, पाण्याची खुप समस्या आहे, त्यासाठी काय करायचे आहे? आणि टॅंकर चालू करून जिथे टॅंकर भरण्याचे काम चालू आहे, तेच पाणी जर

टाकीमध्ये सोडले तर प्रत्येक घरामध्ये पाणी पोहचेल. तर ज्या प्रकारे श्री.निंबाळकर साहेबांनी संपुर्ण वर्षभर टॅकर बंद केले होते, त्याच प्रमाणे ही सिस्टीम जशी चालू होती, तशीच राहीली पाहीजे.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** महापौर मॅडम, आयुक्त साहेब, पाण्याच्या विषयावर थोडीशी चर्चा करा. कारण पाणी तीन तीन दिवस येत नाही आणि पाण्याची वेळ निश्चित नाही. कमीत कमी पाणी एक दिवस सोडून एक दिवस तरी दया. कॅम्प नंबर ४ ला आणि कॅम्प नंबर ५ ला आठवडयातून तीनच दिवस पाणी येते.

**प्र. उप आयुक्त, डॉ. युवराज भदाणे:—** मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्या, श्रीमती सोंडे मॅडम, यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे की पाणी फक्त दक्षिण क्षेत्रामध्ये म्हणजे आपले जे दोन क्षेत्र आहेत, उत्तर आणि दक्षिण क्षेत्र त्या पैकी कॅम्प चार आणि पाच साठी दक्षिण क्षेत्र आहे. त्यामध्ये सन्माननिय सदस्य, श्री. सुर्वे साहेबांच्या वार्डमध्ये एकविरा कॉलनी आणि गणपती मंदिर एरिया आहे. या ठिकाणी संपुर्ण एरिया उंचीवर असल्यामुळे तिथे पाणी जात नाही. प्रत्यक्ष आयुक्त महोदयांनी आणि मी पाहणी केली, त्या नंतर विरोधी पक्ष नेता यांच्या प्रभागामधील पाच सहा अपार्टमेंट आहेत, त्या ठिकाणी पाण्याचा गंभीर प्रश्न आहे. त्या ठिकाणी दिवसा, गेल्या आठ ते दहा दिवसा पासून १७ ते १८ जास्तीत जास्त २० टॅकर या प्रभागामध्ये पुरवले जातात. मॅडमचे जे म्हणणे आहे की, त्या ठिकाणी मेन लाईनवर प्रेशरवर फारसा इफेक्ट पडत नाही. या पुढे उन्हाळयाचे दिवस येत आहेत, कदाचित ही जी गरज आहे, ती वाढू शकते. त्या ऐवजी आम्ही टॅकर देण्याच्या प्रयत्नात नाही, त्या भानगडीत पडणार नाहीत. परंतु ज्या ठिकाणी पाण्याची खरोखर कमतरता आहे, त्या ठिकाणी तिथल्या नागरीकांसाठी काही तरी पर्यायी व्यवस्था करण्यात येईल.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** आमच्या प्रभागात, तानाजी नगरमध्ये.....

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** अल्ट्रनेट डे, ज्या दिवशी तुम्ही ४ नंबरमध्ये देतात, त्याच दिवशी दया. ५ नंबरवाल्यांचे पाणी कमी करून तुम्ही ४ नंबरवाल्यांना का देतात.

**प्र. उप आयुक्त, डॉ. युवराज भदाणे:—** ठिक आहे, ही सुधारणा करण्यात येईल.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** महापौर मॅडम, आमच्या इथे ज्या एरियामध्ये पाणी जात नाही, तिथे तुम्ही टॅकर पॉईंट बनवून दया, तानाजीनगरमध्ये, आर.पी.आय. ऑफिस पासून खाली पर्यंत कुठे पाणी जात नाही तिथे पाण्याची लाईन टाकून दया किंवा तिथे टॅकर पॉईंट बनवून दया.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मा. महापौरजी, भदाणे साहेब, पाण्याचा प्रश्न जिथे आता तो उपस्थित केला, त्या ठिकाणी पॅनल क्रमांक १४ मध्ये श्री. सुनिल सुर्वे, श्रीमती लिलाबाई आशान यांचा जो पॅनल आहे, याच्यामध्ये आपणास माहीत आहे की गेल्या १० दिवसापासून, गेल्या शनिवार पासून वॉलचा प्रॉब्लेम झाला आहे, त्यामुळे पाणी तिथे येत नाही आणि त्या ठिकाणी एकदम ड्राय असल्यामुळे ही पाण्याची व्यवस्था टॅकरने केली होती. आम्ही खरे म्हणटले तर पाणी नळानेच मागतो, परंतु अत्यावश्यक सेवा म्हणून ही टॅकरची व्यवस्था आयुक्त साहेब ही चालू राहीली पाहीजे. खरे म्हणजे त्या टॅकरचा उपयोग फक्त पाणी पिण्यासाठी नाही.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** नाही तर तिथे वॉल बनवा ना?

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** प्रशासनाने वॉल का बनवला नाही, पंधरा दिवसा पासून वॉल बनवून मिळत नाही. जर पाण्याचा वॉल बनवून मिळत नसेल तर टॅकर देणे गरजेचे आहे, टॅकर कसे बंद करू शकतात? आयुक्त साहेब, पाणी जर बंद असेल तर तुम्ही टॅकरने पाणी पुरवठा केलाच पाहीजे. टॅकर पुर्णपणे बंद करा ही गोष्ट चालणार नाही.

या वेळी सदस्य, श्री. रमेश चव्हाण यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** आयुक्त साहेब, लवकरात लवकर वॉल बनवा.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** ज्या दिवशी कॅम्प नंबर ५ ला पाणी येईल, त्या दिवशी कॅम्प नंबरला टॅकरने पाणी पुरवठा करा.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** तसे नाही मॅडम, कॅम्प नंबर ४ ला पाणीच नाही, म्हणून टॅंकर चालू केले आहेत. जर वॉल चालू केला तर टॅंकरचा प्रश्नच येणार नाही. भदाणे साहेब, आज जरा सविस्तर माहीती सांगा.

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळेः—** मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, गेल्या २५ दिवसापासून प्रभाग क्रमांक १३ मध्ये पाण्याची एवढी गंभीर समस्या आहे, काल तिथे श्री. भदाणे साहेबांनी व्हिजीट केली होती. अक्षरशः लोकांना प्यायला पाणी नाही आणि तिकडे पाण्याचे जे वितरण होते, जे वॉल मॅन आहेत, जे अधिकारी आहेत, ते वितरण व्यवस्थित करीत नाहीत, त्याच्यामुळे तिथे भरपुर घोळ होतो आणि लोकांना पाण्या पासून एवढे वंचित केले आहे की, आता एप्रिल, मे हे दोन महीने लोक कसे काढतील, हे आम्हांला कळत नाही.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजीः—** ठिक आहे ना? जेव्हा ४ नंबरला पाणी येत नाही, तेव्हा तिकडे टॅंकरने पाणी पुरवठा करा.

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळेः—** मॅडमचे म्हणणे बरोबर आहे, जर तुम्ही टॅंकरने पाणी पुरवठा करीत आहेत, जिथे पाच नंबरला पाणी पुरवठा व्यवस्थित होतो, तर चार नंबरला टॅंकरने पाणी पुरवठा करा.

**सदस्य, श्री. शेखर यादवः—** मा. महापौर मॅडम, मा.आयुक्त साहेब, प्रत्येक पॅनलला टाईम दया, एक वेळेला १६ नंबरला दया, एक वेळेला १४ नंबरला दया, तेव्हा हा प्रश्न सुटेल.

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** नाही, नाही, भदाणे साहेब, पाणी देतांना आमच्या वार्डमध्ये पण दया आणि वार्ड क्रमांक २० मध्ये पण दया. या ठिकाणी मी स्वतः राहतो, साहेब, अर्धा तास पण पाणी येत नाही. मॅडम तीस मिनीट पण पाणी येत नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** सन्माननिय सदस्य, आपण शांत बसा, प्रत्येकाला बोलण्याची संधी दया.

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** आम्ही बसून घेतो, परंतु आम्ही जिथे राहतो, तिथे पाच मिनीट पण पाणी येत नाही, त्यामुळेच आम्ही बोलत आहोत.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** एक एक करून बोला, चार चारजण बोलत आहेत, त्यामुळे काहीच समजत नाही.

**प्र. उप आयुक्त, डॉ. युवराज भदाणेः—** एक मिनीट...

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** इकडे पण बोलतात, तिकडे पण बोलत आहेत, कोणाचे ऐकायचे?

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** जिथे पाणी नाही, तिथे पाणी दया तुम्ही. मी सांगितले की एका संपुर्ण पॅनलमध्ये पाणी येत नाही आणि २० नंबर पॅनलमध्ये मी स्वतः राहतो, तिथे तीस मिनीट पण पाणी येत नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** तर मी काय सांगते की, कृपया करून एक एकाने बोला.

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** आता मी एकटाच बोलत आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** जर दोन्ही बाजूने बोलत आहेत तर मी कोणाचे ऐकु?

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** आता मी एकटाच बोलत आहे, आपण काय करणार आहेत, ते सांगा.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** एक सदस्य, उभा राहीला तर दुस—या सदस्यांने बसले पाहीजे.

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** आता मी एकटाच बोलत आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** मॅडम, चैनानी मॅडम खुप वेळे पासून उभ्या आहेत, पहीले त्यांचे म्हणणे ऐकुन घ्या.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** इकडून एक बोलत आहेत आणि तिकडून एक बोलत आहेत तर कोणा, कोणाचे ऐकणार?

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** अहो साहेब, एक मिनीट थांबा मला बोलायचे आहे. माझ्या घरामध्ये, २० नंबर पॅनलमध्ये २० मिनीट पण पाणी येत नाही, याचे काय करणार आहेत?

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** भदाणे, आपण यांच्या प्रश्नाचे उत्तर दया.

**प्र. उप आयुक्त, डॉ. युवराज भदाणे:—** सन्माननिय सदस्य, श्री. पाटील साहेब, यांनी जो प्रश्न विचारला आहे, मला वाटते की, २० नंबर प्रभागामध्ये अशोक पाटील कॉलनी आणि दुर्गापाडा या विभागामध्ये थोडा प्रॉब्लेम होता, आता परवाच्या दिवशी तिकडे वॉल बसवलेला आहे. अजूनही अशोक पाटील कॉलनीमध्ये १५ ते २० मिनीट पाणी येते, त्या ठिकाणी जास्तीत जास्त एक तास पाणी कसे मिळेल? याची तजविज आठ दिवसाच्या आत करण्यात येईल.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** दुर्गादेवीपाडयात पण पाणी येत नाही, अशोक पाटील कॉलनीमध्ये पण पाणी येत नाही.

**प्र. उप आयुक्त, डॉ. युवराज भदाणे:—** काय झाले, साहेब, ऐकुन घ्या?

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** टॅकर दयायला सांगितले तर आम्हांला टॅकर सुध्दा देत नाहीत, पाटील साहेबांना १० वेळा फोन केला, एक टॅकर मागतो एक दिवसाच्या नंतर कोणीही टॅकर देत नाहीत. नगरसेकांच्या घरी पाणी नाही, बाकीच्या लोकांच्या घरी पण पाणी नाही, आम्ही पाणी पाणी किती करणार? आम्ही किती वेळा सांगणार? आम्ही पाणी पाणी करीत आहेत. नगरसेवक फक्त एक दुस—याशी भांडण्यासाठी आहेत का? प्रशासन काय करते? जर एखादया लाईनला पाणी नसेल तर त्यांना दुसरी लाईन टाकून दया, तुम्हांला नविन लाईन टाकता येत नाही का?

**प्र. उप आयुक्त, डॉ. युवराज भदाणे:—** प्रत्येक प्रभागामध्ये किमान समान पाणी जाईल अशा प्रकारची व्यवस्था पाणी पुरवठा विभागाद्वारे करण्यात येईल. राहीला आता श्री. सोनकांबळे साहेबाच्या वार्डाचा प्रश्न पंचशिलनगरमध्ये मी स्वत: दुपारी १.०० वाजता आज व्हिजीट केली आणि तेथील सन्माननिय सदस्या, श्रीमती जाधव मॅडम देखील उपस्थित होत्या. त्या ठिकाणी एका वॉलच्या ऑपरेशनमध्ये प्रॉब्लेम आहे, त्याची पण व्यवस्था पण करण्यात आलेली आहे आणि शनिवार पासून त्यांच्याही पंचशिलनगर या प्रभागामध्ये किमान एक तास पाणी पुरवठा किंवा ४५ मिनीट पाणी पुरवठा सुरळीत होईल याची खबरदारी घेण्यात येईल.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** आमच्याकडे कधी येणार आहे, तेही सांगा.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेंजी:—** साहेब, माझ्या प्रभागातील टाकी कधी भरणार? टाक्या भरत नाहीत म्हणून आमच्याकडे पाणी सप्लाय होत नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** आयुक्त साहेब, आग कश्मीरला आणि आमचा बंब चालला आहे, कन्याकुमारीला आम्ही फक्त ओरडतो, होत काहीच नाही. खरोखर एवढे दुर्लक्ष आहे. एम.आय.डी.सी. सहकार्य करीत नाहीत आणि आपल्याकडे प्रशासनाची बोंबाबोंब चाललेली आहे. श्री. सेलवन काय करतात, कुठे असतात माहीत नाही? उप आयुक्त आहेत, त्यांना फिडबॅक नाही किंवा करीत नाहीत. ज्युनियर इंजिनियर श्री. वानखेडे कुचकामी आहेत. श्री. रहेजा, श्री. ठाकरे हे कामं करतात पण मर्यादीत इंजिनयर आहेत. शांतीनगरला लाईन तुटली, पाच दिवसापासून दुरूस्त करतांना लाईन तुटली त्यामुळे वसिटा कॉलनी किंवा पंचशिलनगर, धोबीघाटला सुध्दा, विठ्ठलवाडीला अजीबात पाणी नाही. लक्ष दयायला कोणाला वेळ नाही. पाणी येते की नाही हेही त्यांना माहीत नाही. ओटी सेक्शन श्री. अरूण आशान यांनी सांगितले की, जो एक वॉल आहे, बटरफ्लाय वॉल गेल्या २० दिवसापासून तो रिपेरींग अंडर रिपेर आहे. गुरूवारी आणून बसवला आठ दिवस पाणी नव्हते, त्यामुळे टाक्या भरत नाहीत. गुरूवारी आणून बसवला, शुक्रवारी पाणी बंद, शनिवारी पुन्हा तुटले पाणी पुन्हा बंद, आज पर्यंत वॉल बनले नाहीत. आम्ही ७०० करोडचा बजेट या ठिकाणी सादर करतो, आता पुढच्या याच्यामध्ये आणि एक बटरफ्लाय वॉल ही महानगरपालिका गेल्या १५ ते २० दिवसापासून तो बसवू शकत नाही. तुटलेली लाईन रिपेअर करता येत नाही. लाईन तुटली, तुटल्यामुळे लोकांना पाणी मिळत नाही. म्हणजे एक एंड टॅकर वैगेरे सांगतात, चर्चा करतात माझा वार्ड क्रमांक १३, १४, १५ हे वार्ड आणि आणखी श्री. वानखेडयांचा एक वार्ड आहे आणि आता श्री. विजु पाटील बोलतात, त्यांचा सुध्दा जरी पाण्याचा सोर्स असला तरी त्यांचा काही भाग हा उंचीवर आहे. अशा भागामध्ये पाणी पोहचत नाही आणि प्रशासनाला काही पडलेले नाही. माझा सेक्शन ३०, ३१ मध्ये आता सुध्दा पाणी नाही. काल एम.आय.डी.सी. ची लाईट गेली पाणी बंद, आज सकाळ पासून इंजिनियर लोक सांगतात की, प्रेशर नाही. आज जवळ पास पाच ते सहा

दिवस प्रत्येक विभागामध्ये पाणी नाही. नगरसेवकांना फोन येतात, प्रशासन फोन घ्यायला, जसे मी सांगितले श्री. वानखेडे म्हणून इंजिनियर आहेत, त्यांचे लक्ष नाही. एखादा काम करतो, श्री. सेलवन यांना कुठल्या विभागामध्ये पाणी आहे, नाही ते सिटी इंजिनियर आहेत, ते हात वर करून आहेत. त्यामुळे या अगोदरच्या मिटींगमध्ये मी सांगितले की, महानगरपालिके कडून लोकांच्या अपेक्षा असतात, स्वच्छ पाणी, आरोग्याचे रक्षण, चांगले रस्ते आणि लाईट या चार व्यवस्था सोडल्या तर बाकी कसलीही अपेक्षा नाही. या प्राथमिक सुविधा आम्ही पुरवू शकत नाही. त्यामुळे प्रशासनाने तातडीने बसून इंजिनियर लोक आणि आम्ही एक प्रस्ताव पारीत केला आहे. शाखा अभियंता आणि उप अभियंता आणि कनिष्ठ अभियंता घेण्यासाठी, कारण आता आहेत ते इंजिनियर अगदी मेटाकुटीला आले आहेत. नाही तर आम्ही जातो, अशा प्रकारच्या धमक्या देत आहेत. ही वस्तुस्थिती आहे, त्यामुळे याच्यातून तातडीने उपाययोजना करण्यासाठी तुम्ही त्यांना तातडीने बसवा, दुसरे प्रशासन जसे आता उप आयुक्त आहेत, दुसरे एखादे उप आयुक्त तुम्ही नियुक्त करा, पण हा प्रश्न मार्गी लावा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** मा. महापौरजी, पाण्या विषयी या महासभेमध्ये खुप चर्चा झाली आहे. तर आपण चर्चा केली, आपण आश्वासन दिले होते त्याला किती तरी दिवस झाले? परंतु लोकांना पाणी मिळाले नाही. परत परत तोच विषय चर्चेला येत आहे. आज एजेंडावर हा विषय नाही, आणि जर पाण्याच्या विषयावर चर्चा करायची आहे तर संपुर्ण दिवस कमी पडेल. तर ही चर्चा होतच राहील, जर लोकांना आणि नगरसेवकांना पाण्या पासून दिलासा मिळेल. जे पाणी लोकांना पाहीजे, ते पाणी आपण लोकांना देवू शकत नाही, तर महासभा, मिटींग, बजेट वैगेरे हे करून त्याचा फायदा काय? आपल्याला मागच्या महासभेमध्ये आम्ही सांगितले होते की, स्मशानभुमी चौकमध्ये....

**सदस्या, श्रीम. कविता पंजाबीः—** महापौर मॅडम, चौधरी साहेब खरे बोलत आहेत, दोन दिवसापासून पाणी येत नाही, त्याच्या नंतर लाईट बंद होत आहे, तर लोकांना पाणी कसे मिळणार, पाण्याला प्रेशर नाही, पाणी नाही, वार्ड मधले लोक आम्हांला ओरडत आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** महापौर महादया, तुम्हांला इंटरफेयर करायला लागेल मी आजच एम.आय.डी.सी. च्या अधिका—यां बरोबर बोललो आहे. त्यांचे म्हणणे आहे की, फक्त दोन शुक्रवार पालवे वरून पाणी बंद होत होते. जसे श्री. विजु पाटील यांनी सांगितले की, आठवडयातून तीन दिवस कॅम्प ४ नंबरला पाणी येते आणि आठवडयातून तीन दिवस कॅम्प नंबर ५ ला येते. आता दर शुक्रवारी ते पाणी बंद करणार आहेत, असे मला एम.आय.डी.सी. वाल्यांनी सांगितले, असे एरीगेशन डिपार्टमेंटकडून आलेले आहे. तरी आपण मा. गिरीष महाजनशी बोला जे दोन शुक्रवारी बंद होत होते, ते तर रद्द करा, चार शुक्रवार ही दुरची गोष्ट आहे. तर आपण आजच त्यांच्याशी बोलून घ्या की, एरीगेशन डिपार्टमेंट एम.आय.डी.सी. ला टॉर्चर करीत आहे आणि त्यामुळे एम.आय.डी.सी. आम्हांला पाणी देत नाही.

**सदस्या, श्रीम. कविता पंजाबीः—** महापौर मॅडम, असा एक पण दिवस नाही की, आम्हांला फोन येत नाही, रोजच पाण्यासाठी फोन येत आहेत.

**सदस्या, श्रीम. ज्योती चैनानीः—** महापौर मॅडम, माझ्या वार्डमध्ये पाण्याची खुपच समस्या आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** श्री. सेलवन साहेब, पहीले आम्हांला या बददल माहीती देण्यात यावी.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवेः—** महापौर मॅडम, आयुक्त साहेब, पॅनल १८ मध्ये पाण्याची भिषण समस्या निर्माण झाली असून सुभाष टेकडीला आठ, आठ दिवस पाणी मिळत नाही आणि तसे पण एक दिवस पाणी सोडले तर शुक्रवारी पाणी येत नाही. त्यामुळे सलग चार दिवस लोकांना पाणी मिळत नाही आणि पाण्याची वेळच नाही साहेब, रात्री अडीच वाजता पाणी येते, सकाळी सहा वाजता पाणी येते लोकांनी करायचे काय? पुर्ण वेळ पाण्यासाठी जागत राहावे लागते. पाण्याची वेळ फिक्स पाहीजे. कारण कोणत्याही एरियामध्ये पाणी सोडतांना एक तर १५ ते २० मिनीट पाणी सोडले जाते आणि संपुर्ण दिवस लोक पाण्यासाठीच घालवतात. दुसरी गोष्ट म्हणजे साहेब, बोअरवेल सगळया बंद आहेत. हजार वेळा सांगून सुध्दा त्या बोरवेल दुरूस्त होत नाहीत. आता उन्हाळयामध्ये एवढी समस्या आहे तर बोरवेल तरी अल्टरनेट पाहीजेत. ज्या आहेत त्या तरी तुम्ही तातडीने दुरूस्त करा. सेलवन साहेब, सांगा का होत नाही? सगळया बोअरवेल बघून गेले तरी अजून दुरूस्त होत नाहीत. साहेब, अजून दुसरे म्हणजे पाण्याचे लिकेज पंधरा, पंधरा दिवस दुरूस्त होत नाहीत. लिकेजसाठी काही तरी तातडीची यंत्रणा कायम स्वरूपी ठेवा. कारण पंधरा, पंधरा दिवस तिथे पाणी वाया जाते, लिकेज दुरूस्त न केल्यामुळे.

**सदस्या, श्रीम. ज्योत्स्ना जाधवः—** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, जरा आमच्या प्रश्नाकडे सुध्दा आपण लक्ष दयावे. सर आमचा प्रश्न पण ऐकुन घ्या, पाण्याचा विषय निघाला आम्ही वर्षभर पाण्यासाठी अशी एकही महासभा झाली नाही की, आम्ही पाण्याचा विषय काढलेला नाही. एवढया महीन्यामध्ये पाण्याचा हा विषय एवढा गंभीर झालेला आहे. आता जसे बोलेले की, सुभाष टेकडीला पाण्याचा प्रश्न एवढा गंभीर निर्माण झालेला आहे. दर वेळी हा विषय असतो आणि जसे आता श्रीमती साळवे मॅडम बोलल्या की, बोअरवेलचा प्रश्न, तर बोअरवेलसाठी जेव्हा बोलवण्याचा प्रश्न येतो, त्या वेळी अधिका—यांना फोन केल्यावर ते सांगतात...

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** महापौर मॅडम, आठ दिवसामध्ये फक्त तीन दिवस पाणी येते. त्यांना सांगा की, येऊन बघा.

**सदस्या, श्रीम. ज्योत्स्ना जाधवः—** सर बोअरवेलचा जेव्हा प्रश्न येतो....

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** आठवडयातील फक्त तीन दिवस पाणी येते, आमचे फोन सकाळी सहा वाजल्या पासून चालू आसतात, पाहीजे तर आपण चेक करा.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** पाटीलजी आपण जे बोलत आहेत, तेच मी सगळयांसाठी बोलणार आहे, आपण कृपा करून शांतपणे माझे म्हणणे ऐकुन घ्या.

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** आम्ही आठ दिवसामध्ये काय उत्तर देणार? माझ्या घराकडे, तुमच्या घराकडे रोज जात असेल, आमच्या १९ पॅनलमध्ये बघा आणि २० नंबर पॅनलमध्ये पण बघा.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** आता मी जे सांगणार आहे, मी अधिका—यांना देणार आहे, आपण शांतपणे बसाल तर सर्वांची समस्या सुटेल. मला फक्त एकाचीच समस्या सोडवायची नाही.

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** मी शांतच बसलो आहे, दोन तीन वर्षा पासून शांतच बसलो आहे, इथे कोणीही ऐकत नाही? एम. आय.डी.सी. बरोबर शासन आहे, तर पाणी का मिळत नाही. प्रशासनाचे काम आहे, पुढे चालणे, त्यांच्या बरोबर आम्ही सगळेच जाण्यासाठी तयार आहेत. जे पाहीजे ते करण्यासाठी आम्ही तयार आहेत, मग करत का नाही?

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** तुम्हांला माझे म्हणणे ऐकायचे नाही, असे वाटते. सगळयांचे प्रॉब्लेम सोडवण्यासाठी मी बोलणार आहे, परंतु आपण ऐकण्यास तयार नाहीत.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** सर्वांना बोलण्यास संधी दया.

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते समजून येत नव्हते.

**सदस्य, श्री. शेखर यादवः—** सगळयांचे प्रॉब्लेम सॉल्व होणार आहेत.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** कृपया सगळयांनी शांत बसा, मला सर्वाचे प्रॉब्लेम सोडवायचे आहेत आणि जर सोडवायचे नसतील तर मी इथून सोडून जाते. सगळयांचे प्रॉब्लेम सोडवण्यासाठी मी आदेश देणार आहे. जर तुम्हांला बोलायचे असेल तर मी शांत बसते, तुम्हीच बोला.

**सदस्या, श्रीम. ज्योत्स्ना जाधवः—** आम्ही लोक बोलणार तेव्हाच समजेल की, आमचा प्रश्न काय आहे?

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** मी सगळयांचे प्रॉब्लेम सोडवण्यासाठी आदेश देणार आहे, तुम्ही ऐकण्यास तयार नाहीत, तर मी काय करू?

**सदस्य, श्री. शेखर यादवः—** महापौर मॅडम, एका प्रश्नाचे उत्तर दया, जो ५० एम.एल.डी. पाणी, कॅम्प नंबर ४ व कॅम्प नंबर ५ वाल्यांना मिळत होते, त्यातील १० लिटर पाणी कोणाच्या बोलण्या वरून एरिगेशन डिपार्टमेंटच्या म्हणण्यानुसार कमी केले आहे किंवा आयुक्त साहेबांच्या बोलण्यावरून कमी केले आहे, याचे मला उत्तर दया.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** याचे पण उत्तर दया श्री. सेलवन साहेब.

**सदस्य, श्री. शेखर यादव:—** दोन वर्षा पासून आमचे पाणी कमी केले आहे. हे एरिगेशन डिपार्टमेंटच्या बोलण्या वरून कमी केले आहे की, आपल्या महानगरपालिकेच्या बोलण्यावरून कमी केले आहे. त्याचे मला उत्तर पाहीजे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** श्री. भदाणे साहेब, आपण चार्ज घेतला आहे, तर याचे उत्तर दया.

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—** मा. महापौर महोदया, उप महापौर महोदय, मा. आयुक्त साहेब आणि सन्माननिय सदस्य....

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** श्री. सेलवन साहेब, आपण सगळयांचे म्हणणे ऐकुन घ्या, त्याच्या नंतर उत्तर दया. जे मॅडमने सांगितले त्याचे उत्तर दया, त्या कधी पाण्यासाठी ओरडल्या आहेत का? श्री. विजय पाटील हे वर्षभरामध्ये कधी बोलले का? सर्वांना शहरामध्ये समस्या आहेत, त्यामुळे सदस्य बोलत आहेत.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** तुम्ही १० एम.एल.डी. पाणी कमी केले आहे, सभागृहाला विचारले का? महापौरांना विचाले का?

**सदस्य, श्री. शेखर यादव:—** दोन वर्षा पासून पाणी कमी येत आहे. आपण कधी विचारले का?

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** दोन वर्षा पासून नाही, तर तीन वर्षा पासून पाणी कमी येत आहे.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** १० वेळा येऊन विचारले आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** तुम्ही लोक इथे लढण्यासाठी आले आहेत का?

या वेळी काही सदस्य एकत्रित आवाज करीत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते समजून येत नव्हते..

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—** पाण्याच्या संदर्भात....

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** श्री. सेलवन साहेब, हा जो प्रॉब्लेम आहे, हा प्रॉब्लेम सोडवण्यासाठी आपल्याला उत्तर दयावे लागेल.

**सदस्य, श्री. शेखर यादव:—** श्री. सेलवन साहेब, पहीले माझे उत्तर दया. तुम्ही डिपार्टमेंटने पाणी कमी केले आहे, याचे उत्तर दया. १० एम.एल.डी. पाणी कोणी कमी केले आहे?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** सभागृहाचे सर्व सदस्य, एक एक करून जर आपण इथे चर्चा करण्यासाठी आले आहेत, समाधान करण्यासाठी आले आहेत, लढण्यासाठी आलो नाहीत.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मॅडम, माझा नंबर कधी येईल.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** आय वॉन्ट टू जस्ट क्वाईट. तुम्हांला समाधान पाहीजे नाही का? परत फक्त आरडाओरडा पाहीजे. मी सगळयांना एक आदेश देणार आहे, कोणीही ऐकण्यास तयार नाही. मी काय सांगितले होते, सर्वांचे प्रॉब्लेम सोडवण्यासाठी मी आदेश देणार आहे. सेलवनजी स्टेजवर या, त्याच्या नंतर भदाणेजी तुम्ही सुध्दा स्टेजवर या. पाण्याच्या समस्या बाबत तुम्ही काय करणार आहेत? आदेश दया.

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—** मा. महापौर महोदया, आपल्याकडे उल्हासनगरला आपण एम.आय.डी. सी. वर अवलंबून राहीलो आहे. त्यामुळे प्रत्येक वेळा दर शुक्रवारी एम.आय.डी.सी. पाणी बंद करतात. त्याच्या नंतर २४ तासा नंतर आपल्याकडे पाणी येत नाही. श्री. बोडारे साहेबांनी स्वत: मंत्री महोदयाकडे मिटींग लावली होती की, शुक्रवारी पाण्याची जी कपात केली जाते, ती बंद करण्यात यावी. त्यांनी आता पर्यंत बंद केले नाही. आपल्याकडे उल्हासनगरला दोन सोर्स वरून पाणी मिळते. एक शहाड वरून मिळणारे पाणी क्वाटींटी बरोबर देतात. परंतु पालवे वरून येणारे पाणी गेली दिड वर्षा पासून १० ते १५ एम.एल.डी. कमी करून टाकलेले आहे. कारण की, उल्हासनगर शहरामध्ये येणारे पाणी त्यांनी दुसरीकडे वळवले आहे. या लाईनमधून पुणे, ठाणे, मिराभाईदर, नवी मुंबईला या ठिकाणी पाणी दिल्यामुळे आपल्याकडे ते तेवढी क्वाटींटी देवू शकत नाही. त्याच्यासाठी बरेच पाठपुरावे केले, मा. सदस्यांनी पण खुप पाठपुरावे केले आहेत, आता त्यांनी असे म्हणले आहे की, त्या एक्सप्रेस लाईन वरून एक लाईन पालवेला आहे. त्या लाईन वरून जोडणी केल्यामुळे रोज आपल्याला जेवढी क्वांटीटी पाहीजे तेवढे दिले तर

आपण कॅम्प नंबर ४ मध्ये पाणी दररोज देवू शकतो, हा इश्यु आहे आणि टंचाईच्या काळामध्ये जसे की बोडारे साहेबांनी सांगितले माझ्याकडे आता पर्यंत माहीती मिळाली नाही, दर शुक्रवारी बंद करण्याचा. पण ते मी एम.आय. डी.सी. ला विचारले होते, ते फक्त कल्याण बाकी इतर शहरांसाठी सुध्दा दर शुक्रवारी बंद करणार आहेत. उल्हासनगरला पालवे वरून येणारे पाणी दर शुक्रवारी बंद करणार नाहीत. पण शहाड वरून येणारे पाणी दर शुक्रवारी बंद करतात. त्याच्यामुळे कॅम्प नंबर १, २, ३ ला जास्त प्रॉब्लेम निर्माण होतात. पण टंचाई काळात....

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** साहेब, यासाठी तुम्ही पुढाकार घ्या, एरिगेशन आणि एम.आय.डी.सी. या विभागामध्ये आपण आपले पॉलिटीकल पुर्वीचे जे असतील, तर वजन वापरून उल्हासनगरला जे दुजाभाव वापरत आहेत, सावत्र वागणूक देतात. त्या बाबतीत आजच आमचे आमदार, बालाजी किणीकर....

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवनः—** साहेब, मा. आयुक्त साहेब, आजच बोलेले होते, उद्या एम.आय.डी.सी. च्या अधिका—यां बरोबर मिटींग लावा, उद्या त्यांना....

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** उल्हासनगरच्या या प्रॉब्लेम विषयी परवा आम्ही मंत्रालयामध्ये गेलो होतो, आमचे शिवसेनेचे शिष्टमंडळ होते, आम्ही सर्व नगरसेवक पण त्याच वेळेस विधानसभेमध्ये विश्वास प्रस्ताव सभापतींच्या विषयी होता, त्यामुळे आमचे आंदोलन, पण आज आपले आमदार, श्री. बालाजी किणीकर यांनी विधानभवना बाहेर उल्हासनगर विषयी आंदोलन केले. चालू आहे, शिवसेनेचे सर्व नगरसेवक विधानभवानाच्या बाहेर बसलेले आहेत. म्हणजे विधीमंडळामध्ये सुध्दा आमदार उल्हासनगरच्या पाणी प्रश्ना विषयी भांडत आहेत. त्याचा फायदा घेऊन महापौर महोदया, एरिगेशन डिपार्टमेंटकडून पाण्याची जी कपात होत आहे, सोनावणे साहेबांना विचारा, एम.आय.डी.सी. चे नवले किंवा कुंभार आहेत, त्यांनी सांगितले की, एरिगेशन डिपार्टमेंटकून पत्र आले आहे की, दोन शुक्रवारी पाणी कपात करायचे. दोन शुक्रवारी कपात केल्या नंतर त्याचा परिणाम रविवार पर्यंत येतो. आता जी आमची बोंबाबोंब चालली आहे, त्याचे कारण पुर्वीचे सुध्दा म्हणजे एक शुक्रवारी बंद असतांना आमच्या काही उंचीच्या ठिकाणी अजीबात पाणी मिळत नव्हते, म्हणून टॅकरची व्यवस्था केली चला ठिक आहे, फक्त १० १५ टक्के लोकांना, शुक्रवारचा परिणाम झाल्या नंतर म्हणजे दर शुक्रवारी म्हणजे गुरूवार ते रविवार पर्यंत लोकांना पाणी मिळत नव्हते. म्हणजे सोमवार, मंगळवार म्हणजे सोमवारी मिळाले तर गुरूवारी मिळणार किंवा बुधवारी मिळणार त्याच्या नंतर पाणी नाही. म्हणजे तीन दिवसाचे पाणी दोन वेळा मिळणार आठवडयातून त्यामुळे तातडीने महापौर महोदया, एरिगेशन मिनीस्टकडून पाणी साठी जो आम्ही मांगितला आहे किंवा मंजूर आहे, तो मिळत नाही आणि अपु—या पाणी साठयात आम्ही दिवसाआड पाणी बंद करतो, शुक्रवार बंद झाल्या नंतर फक्त दोनच दिवस पाणी मिळणार आहे. आता उन्हाळा जस्ट सुरू झाला आहे. लोक आम्हांला विचारत आहेत, पाऊस धो धो पडला, मग आता कपातीची गरज काय आहे? त्यांना सांगू शकत नाही. जर आता दर शुक्रवारी बंद झाले तर फक्त आठवडयातून दोन दिवस पाणी लोकांना मिळेल आणि ते अपुरे होईल. तर तातडीने याच्यामध्ये काम करण्याची क्षमता जास्तीत जास्त लोकांना कामाला लावा, दोन महीने एप्रिल, मे मग श्री. वानखेडे असतील, श्री. ठाकरे असतील २४ तास या ठिकाणी कसे काम करतील, पाणी समस्या कमी करण्यासाठी अशा प्रकारच्या सुचना आपण दयाव्यात. कोणी पळवाट काढता कामा नये? आहे त्या परिस्थितीला समोर जावून जे आपल्याकडे पाणी आहे, ते वितरण जास्तीत जास्त व्यवस्थित कसे करता येईल, याच्याकडे लक्ष दयावे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** सेलवन साहेब, आपण सांगितले की, शहाडकडून आपल्याला जो पाणी पुरवठा होतो, तो एम.आय.डी.सी. कडून बरोबर होतो, बरोबर होतो का? जे पुर्वी मिळत होते, तेवढच पाणी आता मिळते का? कारण पाण्याची, पाणी टंचाई आजच झालेला हा प्रश्न नाही, हा गंभीर प्रश्न गेल्या अनेक दिवसाचा आहे, त्याची अनेक दिवसापासून या सभागृहामध्ये चर्चा होते. पण त्याचा आऊटपुट काही निघत नाही. म्हणून चर्चा चर्चाच होते, म्हणून तुम्हांला हा प्रश्न आहे. तुम्ही सांगितले की, एम.आय.डी.सी. कडून जे पाणी आपल्याला मिळते, ते पाणी एम.आय.डी.सी. आपल्याला बरोबर देते का? जर पाणी बरोबर देत असेल तेव्हा देत होते, तेव्हा टंचाई नव्हती. जर आता देत असेल तर आता टंचाई का? श्री. शेखर यादव यांनी सांगितले कॅम्प नंबर ४ व कॅम्प नंबर ५ ला पालवे गांवावरून जे पाणी येत होते, ते पाणी ५० एम.एल.डी. मिळत होते. ते ४० एम.एल.डी. कोणाच्या सांगण्या वरून झाले, १० एम.एल.डी. कोणी कमी केले आणि कशासाठी केले, त्याचे उत्तर दया.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** सेलवनजी आपल्याला टेक्नीकल पॉईट सर्व माहीत आहे, पाण्याचे कुठे, कुठे काय आहे? ज्या नगरसेवकांना पाण्याची समस्या आहे, श्री. भदाणेजी स्टेजवर या, श्री. सेलवनजी आपल्या बरोबर

श्री. भदाणे पण असतील, ज्या पण नगरसेवकांना त्रास आहे, त्यांचे नाव लिहा. त्यांना जिथे पण समस्या आहे, ते पण तुम्ही अॅडीशन करा. मला चार दिवसाच्या आत रिपोर्ट दया. पुढच्या मिटींगला मला याचे रिझल्ट दया. जे पण नगरसेवकांना प्रॉब्लेम आहे, त्यांनी उभे राहा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मॅडम असे आहे की, सभागृहातील सगळयांना त्रास आहे. प्रश्न असा आहे की, जो एम.आय.डी.सी. कडून पाणी येत होते, ते कोणाच्या सांगण्यावरून कमी केले आहे? महापालिकेने कमी केले आहे की, एम.आय.डी.सी. ने कमी केले आहे? त्याचे उत्तर देत नाहीत.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** महापौर महोदया, आपण मागच्या मिटींगमध्ये सांगितले होते, तर आज आपल्या जवळ पाणी आहे असे गृहीत धरू का?

**सदस्य, डॉ.प्रकाश नाथानी:—** मा. महापौरजी, मला बोलण्याची संधी कधी मिळेल, मी वाट पहात आहे.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मी पण खुप वेळे पासून उभा आहे.

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—** महापौर मॅडम, आम्ही सर्व नवनिर्वाचित नगरसेवक निवडून आलो आहोत, सभागृहामध्ये चर्चा होते. फक्त चर्चाच होते, साहेब.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** कॅम्प नंबर ५ चे पाणी ५ नंबरलाच दया.

**सदस्या, श्रीमती कविता पंजाबी:—** श्री. भदाणे साहेब, १६ नंबर पॅनलमध्ये दोन दिवस पाणीच येत नाही, त्याच्या नंतर लाईट बंद होते, आम्ही लोक खुप त्रास सहन करावे लागत आहे.

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—** मा. आयुक्त साहेब, आता पर्यंत किती तरी सभा झाल्या आहेत, प्रत्येक सभेमध्ये हा पाण्याचा विषय निघतोच. कारण की, ख—या अर्थाने त्याचा लोकांना त्रास आहे आणि या सभागृहामध्ये फक्त चर्चा होते. याची अंमलबजावणी होत नाही, ही सगळयात मोठी शोकांतीका आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** महापौरांच्या आदेशा नंतर आपण विषय पत्रिका चालू करा. महापौरांनी आदेश दिले आहेत, सर्व नगरसेवकांचे समाधान करण्यासाठी.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १८:— प्रस्तावाची सूचना**

प्रधान मंत्री आवास योजनेची कामे जलद गतीने करणेबाबत पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे

---

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—** महापौर मॅडम, आयुक्त साहेब, मागच्या वेळस मी यांना सांगितले होते की, आमच्या प्रभागामध्ये एकुण १४ बोअरवेल आहेत. त्यातले जवळपास ९० टक्के बोअरवेल बंद आहेत. जर त्यातून पाणी पुरवठा होईल, तर ब—या पैकी पाण्याचा त्रास कमी होईल. पण त्याचीही चर्चा झाली पण अंमलबजावणी झाली नाही, साहेब, एक वर्षे झाले. तर एकदा तुम्ही श्री. भदाणे साहेबांना आदेश दया, श्री. सेलवन साहेबांना आदेश दया, ज्या काही बोअरवेल बंद असतील...

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, पाण्यावर भरपुर चर्चा झाली आहे, आता चार दिवसाठी मी त्यांना आदेश दिले आहेत, चार दिवस वाट बघा, सर्वांचे समाधान होईल. जर झाले नाही तर माझ्याशी संपर्क करा.

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—** ठिक आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** मॅडम आम्ही खुप वेळे पासून उभे आहेत, चर्चा पुर्ण झाली नाही. पाण्याची चर्चा पुर्ण झाली नाही आता पर्यंत.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, विषय पत्रिका....

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** माझा विषय कोणीही ऐकत नाही. पाण्याचा नाही तर का आणला? आणला आहे तर सर्वांचे ऐका महापौरांनी मला बोलण्यास परवानगी दिली आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** महापौरजी आपल्या आदेशा नंतर......

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** महापौरांनी सांगितले बसा, मी बसून घेतले, आता मला महापौरांनी आदेश दिले आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मॅडम, आपण पहीले आदेश दिले आहेत ना, काय केले आहे?

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** एक वर्षापासून एकच गोष्ट ओरडत आहे, चार आयुक्त बदली होऊन गेलेत, चार आयुक्तांची ऐकले, पहीले श्री. निंबाळकर आले, नंतर डॉ. शिंदे आले, नंतर उप आयुक्त येऊन बसतात, नंतर चौथे आयुक्त येतात. परंतु एक पण प्रॉब्लेम सॉल्व होत नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** डॉ. नाथानीजी, थोडे शांतपणे बोला.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** जेव्हा बघितले तेव्हा सभागृह नेता मध्येच बोलतात. आता मी पण मध्येच बोलतो.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** आपण शांतपणे बोला.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** मी संयम ठेवतो, २.३० वाजे पासून मी संयम ठेवला आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** कृपया करून शांत रहा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** धन्यवाद, महापौरजी, विषय एका वर्षाचा इतिहास आपल्याला माहीत आहे. संपुर्ण सभागृहाला माहीत आहे, एकच गोष्ट परत परत सांगत आलो आहे. आज माझ्या चेह—यावरून लोकांना वाटेल की, डॉ. नाथानी एकाच विषयावर बोलत असतात, पाण्याच्या विषयावर जर पाण्याचा विषय नसता, परंतु महापौरजी आपण माझ्या पॅनलमध्ये आहेत, तुमच्याकडे परवाच्या दिवशी मधुसुदन एरियाचा मोर्चा आला होता, म्हणजे पाणी नाही, म्हणून मोर्चा आला होता. ८५ वॉलबाबत प्रत्येक आयुक्तांना सांगितले, ८५ वॉल अजून पर्यंत चालू झाले नाही. त्याचे पण काहीच झाले नाही आणि मी परत परत ओरडत राहीलो. उन्हाळा येईल त्रास होईल. आता एक एकजण ओरडत आहे, मी एक वर्षा पासून भविष्यवाणी करीत आलो आहे. कारण की मला भुतकाळाचा अनुभव आहे. मागच्या वेळेस पाणी आले नव्हते. संपुर्ण महाराष्ट्रामध्ये पाणी नव्हते, संपुर्ण शहरामध्ये पाणी नव्हते. त्यासाठी मी बोलत होतो, परतु माझे कोणीही ऐकत नव्हते. फक्त तात्पुरता केले होते, बोअरवेल, बोअरवेल, बोअरवेल पण सगळया बंद पडल्या आता माझ्या वार्डचे काय होणार? हे सांगा महापौरजी, महापौरजी, मधुसुदन एरियाचे पाणी कधी चालू होईल, एक वर्षे होऊन गेला आहे, काय होईल? हे सांगा, धन्यवाद.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** आपल्या समोरच मी श्री. सेलवन व श्री. भदाणे यांना आदेश दिले आहेत, पाच दिवसाच्या आत मला रिपोर्ट येईल. आपण शांतपणे बसून घ्या.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** धन्यवाद, मॅडम. परंतु पुढची महासभा एक महीन्याच्या नंतर होईल. मग मला आपल्या दालनामध्ये चार दिवसाच्या नंतर विचारावे लागेल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा.महापौरजी, डॉ. नाथानी यांचे समाधान व्हायला पाहीजे, सभा नंतर चालू करा. हे उत्तर आपण तेच दिले आहे, पहीले दिले होते. मग डॉ. साहेबांचा ओरडण्याचा कोणताही उद्देश राहीला नाही. सभागृहामध्ये ते पण तुमच्या पॅनलची समस्या सांगत आहेत. त्यांचे समाधान करून परत सभा चालू करायला पाहीजे. उत्तर तेच आहे, चार दिवसाच्या नंतर मग एवढे का बोलले? तर मी सांगतो की, अधिका—यांनी इथे येऊन डॉ. नाथानीचे प्रॉब्लेम सॉल्व करा.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** धन्यवाद, सभागृह नेताजी, मी सुध्दा खुप वेळेपासून उभा आहे, मी उल्हासनगरच्या पाण्याच्या समस्ये विषय बोलायचे आहे. मागचे आयुक्त, श्री. निंबाळकर साहेबांनी खुप उशिरा, काही महीन्या नंतर सत्य समोर आणले. ते सत्य काय होत? त्या सत्याचे काय झाले? त्यांनी सत्य सांगितले की, एम. आय.डी.सी. कडून आपल्याला बदलापूर येथून जे पाणी मिळते तिथे मिटर बसवले नव्हते. आपल्याला अंदाजे पाणी देण्यात येत होते. आपल्याला हे माहीत नव्हते की, पाणी किती एम.एल.डी. येते? आपल्याला ५० एम.एल.डी. पाणी मिळायला पाहीजे. त्या जागी ३५ एम.एल.डी. पाणी येत होते आणि पैसे आपण ५०एम.एल.डी. चे देत आहोत, हे काय होत आहे. आज काय परिस्थिती आहे? असे का झाले आहे? पाणी का कमी केले आहे? जर पाण्याचे बिल आपण पुर्ण भरत आहोत, तर एम.आय.डी.सी. कडून तेवढे पाणी मिळत का नाही? हे कोण बघेल? माझा आवाज कधी ऐकणार आहेत. आपण कधी सर्व लोकांना पाणी मिळण्यासाठी प्रयत्न करणार आहेत? सेलवन साहेब, सत्य सांगणार नाहीत, जेवढया पाण्यासाठी आपल्याला मान्यता मिळाली आहे, ते उल्हासनगरमध्ये येणार नाही, तर आपली पुर्तता होणार नाही. पाण्याची समस्या कशी पुर्ण होणार? प्रत्येक महासभेमध्ये पाण्यासाठी चर्चा चालू आहे. पहील्या आयुक्त साहेबांनी आपल्या आदेशा नंतर सांगितले होते की, पाणी पुरवठा विभागाचे जेवढे प्रस्ताव असतील त्यांच्यावर मी तात्काळ सही करेल. जे पाण्याचे प्रस्ताव होते, पाण्याची टंचाई कशी दुर होईल. ज्या बोअरवेल बंद पडल्या आहे, तिथे नविन बोअरवेलची गरज आहे. जे प्रस्ताव तयार केले, त्यांना मान्यता मिळाली किंवा नाही. एक एक आयुक्त येतात, फक्त आदेश देतात की, मी देतो. त्या आदेशाची पुर्तता केली का? तरी कृपया त्याची पुर्तता झाली किंवा नाही? श्री. सेलवन साहेबांनी सांगावे. जिथे लिकेज होते, लिकेज बंद करण्यासाठीचे प्रस्ताव पास झालेत किंवा नाही? आम्ही परत परत ओरडत आहोत आणि महापौरांना पण परत परत त्रास दिला आहे, आयुक्त साहेबांना पण परत परत त्रास दिला आहे आणि आम्ही लोक ओरडून ओरडून घरी जाऊन आजारी पडलो आहे. हे आम्ही सहन करणार नाही, तुम्ही प्रशासनाला जे आदेश देतात, जे आयुक्त आदेश देतात, त्याची पुर्तता त्यांनी केली पाहीजे, धन्यवाद.

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—** मा. महापौर महोदया, सध्या उल्हासनगर शहरासाठी आपल्याकडे असलेल्या लोकसंख्यावर आधारीत आपण जास्त पाणी पुरवठा करीत आहोत. म्हणजे आपण प्रत्येक माणसामागे ३५ लिटर प्रमाणे जी लोकसंख्या असलेली सन २०११ मध्ये जनगणनेनुसार ५ लाख, ६ हजार फक्त आपली लोकसंख्या आहे. परंतु शहरामध्ये आपण सन २००७ ला सिटी डेव्हलपमेंट प्लॅान आपण बनवले होते, सन २०११ मध्ये आपल्या शहरामध्ये लोकसंख्या ७ लाख होणार होती, या पध्दतीने आपण बनवले होते. त्या आधारावर पुढचे जे प्लॅानिंग आहे, ७ लाख लोकांसाठी लागणा—या पाण्याचे आपण डिमांड करीत होतो. सरकारच्या जनगणननेनुसार ५ लाख, ६ हजार लोकसंख्या असल्याने आपल्याला जे सध्या लागणारे पाणी ११० एम.एल.डी. नियमा प्रमाणे आहे. पण आता सध्या एम.आय.डी.सी. आपल्याला १५० ते १६० एम.एल.डी. पाणी देतात. म्हणजे ४० एम.एल.डी. जास्ती पाणी देवून सुध्दा नागरीकांचे समाधान होत नाही. याचे कारण असे आहे की, आपल्याकडे असलेले जी सिस्टीम आहे, नविन आणि जुनी सिस्टीम आपण दोन्हीही चालवतो. नविन सिस्टीमने चालवले तर लोकांना जास्त प्रमाणात फायदा झालेला आहे. मा. सोंडे मॅडमनी आम्हांला त्याच्यामध्ये भरपुर सहकार्य केले होते. कॅम्प नंबर ५ आणि कॅम्प नंबर ४ मध्ये असलेल्या जे.एन.यु.आर. च्या योजनामधले आम्हांला कॅम्प नंबर ५ मध्ये काम करण्यासाठी भरपूर सहयोग मिळाला आणि त्या नविन लाईनवरून लोकांना पाणी एवढे चांगले मिळते की, लोक म्हणतात की नविन लाईन चालू करा. पण तसेच कॅम्प नंबर १,२, ३ ला श्री. वदारिया साहेबांनी, त्यांच्या पॅनलमध्ये संपुर्ण चालू करून बघितले. मा. माखिजा साहेब होते, त्यांच्या एरियामध्ये एवढे चांगल्या प्रकारचे पाणी होते. पण दोन्ही लाईन चालू करा म्हणाले तर तेवढे पाणी वाया जाते आणि लोकांना समाधानकारक पाणी मिळत नाही. मा. नाथानी साहेब सारखे म्हणत होते की, ८५ नंबरचा वॅाल सुरू करा. तर साहेबांना माहीती देतो की, ८५ नंबरचा वॅाल आपण तेव्हा चालू करीत होतो, आपण जेव्हा गोल मैदानाची टाकी भरीत नव्हतो, तेव्हा ८५ नंबरच्या वॅालमधून तुम्हांला पाणी पुरवठा गोलमैदान आणि तुमच्या परिसरामध्ये देत होतो साहेब. आता तेच पाणी आपण गोलमैदानाच्या टाकीमध्ये सोडून ते पाणी देण्यात येते. गोलमैदानाच्या टाकीमधून जाणारे जे पाणी आहे, ते लोकांना समाधानकारक आहे. पण शुक्रवारी पाणी बंद झाले तर दोन दिवस पाणी येत नाही, त्यामुळे मोर्चा येतो, ते साहजिकच आहे. परंतु तसे शहरामध्ये पाणी पुरवठा कुठेही बंद आहे, असे कोणीही नगरसेवक सांगू शकत नाही. कमी जास्त प्रमाणात पाणी पुरवठा होत आहे, मान्य आहे.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** सेलवन साहेब, उल्हासनगरची नियमा प्रमाणे सांगितले तेथील लोक, हे औद्योगिक शहर आहे. उल्हासनगरमध्ये देशातून, बाहेरून किती लोक येतात, हे तुम्हांला माहीत आहे का? नियम सांगतात तर त्याच्या बरोबर हेही तुम्ही सांगा.

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—** साहेब, तुमचे उत्तर देतो मी तुम्हांला प्लॅनिंग कुठलेही करतांना या शहरामध्ये येणारे जी लोकसंख्या आहे.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** उल्हासनगरमध्ये बाहेरचे चार लाख लोक आहेत, उल्हासनगर हे औद्योगिक शहर आहे.

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—** उल्हासनगर हे औद्योगिक शहर आहे, याच्यामध्ये बाहेरून येणारे लोक सुध्दा ग्राहय धरले आहेत. जनगणेमध्ये सुध्दा या लोकांना ग्राहय धरले आहे आणि आपल्याकडे येणारे फ्लोटींग पॉप्युलेशन येणारे आणि जाणारे ते मोठया प्रमाणे इथे राहून पाणी पुरवठा वापरत नाहीत. १० ते १५ लिटर पाणी वापरले जाते.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** श्री. सेलवनजी, कृपया मला माहीती दया की, पाण्याचे वितरण कसे करतात?

**महापालिका सचिव:—** मा. महापौरांनी विषय सुरू करायला सांगितला आहे. प्रस्तावाची सुचना आहे.

विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

## ⇨ विषय क्र. १८ :— प्रस्तावाची सूचना

प्रधान मंत्री आवास योजनेची कामे जलद गतीने करणेबाबत पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, हा जो विषय आहे, एकीकडे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी २०२२ पर्यंत सर्वच लोकांना घरे मिळाली पाहिजेत, त्यासाठी ही योजना आली, परंतु प्रधानमंत्री आवास योजनेत अदयापपर्यंत कोणताच लाभ मिळालेला नाही. मी या योजनेत जे अधिकारी जोडले गेले आहेत त्यांना मी निवेदन करतो की जो प्रश्न आहे त्याचे उत्तर सभागृहात मिळावे. मा. महापौरजी, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आम्ही उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये कित्येक झोपडपट्टीत ही योजना लागु करण्यासाठी एका सल्लागाराची नियुक्ती केली आहे. मी अधिका—यांना विचारु इच्छितो की आजपर्यंत उल्हासनगर शहरातील झोपडपट्टीत प्रधानमंत्री आवास योजना किती लागु होवू शकते. त्याचा सर्व्हे करण्यात आला, कन्सल्टंटने किती डीपीआर बनविले, त्या डीपीआरची आजची परिस्थिती काय आहे, त्या सल्लागारास महापालिकेने आजपर्यंत किती पेमेंट दिले आहे. ते पेमेंट दिल्यानंतर, डीपीआर बनल्यानंतर आजपर्यंत त्याची स्थिती काय आहे, उल्हासनगरमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेचे भविष्य काय आहे. काय आपण फक्त कंन्सल्टंट अपॉईंट करणार, डीपीआर बनविणार, डीपीआर बनवुन महापालिकेतस पडुन राहील व त्याची फी कंन्सल्टंटला देणार. एवढे डीपीआर बनविल्यानंतर, त्याची परिस्थिती काय आहे, कोठे कोठे डीपीआर बनले, प्रधानमंत्री आवास योजना चालु झाली का याची सुध्दा माहिती सभागृहास दयावी. तसेच कोठे कोठे भविष्यात डीपीआर बनणार. ही योजना उल्हासनगरमध्ये यशस्वी होईल की अर्धवट राहिल. याची पुर्ण माहिती सभागृहात मिळाली पाहिजे. ही जी योजना आहे तर ती शहरातील गरीब लोकांसाठी ज्यांच्याकडे घरे नाहीत अशी ही चांगली योजना असतांना सुध्दा या योजनेत आपण आजपर्यंत असफल का झाले याचे कारण काय आहे, शासनाकडुन व महापालिकेकडुन काय काय अडथळे आहेत याची पुर्णपणे माहिती सभागृहास दयावी.

यावेळी उप—महापौर हे सभागृहातुन बाहेर गेले. 

**श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक:—**प्रधानमंत्री आवास योजनेसंदर्भात २०१५ मध्ये राज्य शासनाने जीआर काढलेला आहे. त्यानंतर महापालिकेने २० फेब्रुवारी २०१६ साली सल्लागार म्हणुन स्वप्रतिष्ठान म्हणुन नियुक्ती केली आहे. आणि त्यानंतर स्वप्रतिष्टान यांच्याकडुन सर्व उल्हासनगर शहराचा सर्व्हे करण्यात आलेला आहे आणि संपुर्ण सर्व्हे मध्ये एकुण ३६ वार्डमध्ये २७७ झोपडपट्टया केलेल्या आहेत. ५७ हजार ५१२ त्यांनी नोंदी दिलेल्या

आहेत. त्यानंतर त्यांनी २६८ झोपडपट्टयांमध्ये अर्ज भरण्याची कारवाई सुरु केली आणि त्यानंतर त्यांना एकुण ५७ हजार ५१२ पैकी ३० हजार ०८ अर्ज प्राप्त झालेले आहे आणि त्या अर्जापैकी १९ हजार ८६४ अर्ज हे प्रमाणित करण्यात आलेले आहे. आणि त्यापैकी १५ हजार ७०१ अर्ज हे ऑनलाईन सेंट्रल गर्व्हमेंटच्या वेबसाईटवर नोंदी झालेल्या आहेत. ते व्हॅलिड अर्ज झालेले आहेत आणि उर्वरीत व्हल्युऐशन करण्याचे काम चालु आहे. त्यानंतर उल्हासनगर शहरातील जे रहिवासी क्षेत्र आहेत, ते रहिवासी क्षेत्र, शासकिय जमिनी त्याचा आढावा घेवुन सुरुवातीला स्वप्रतिष्ठान यांचेकडुन सुरुवातीला प्रायोजित तत्वावर हे काम हाती घेण्यात आले होते त्यामध्ये मिनाताई ठाकरे नगर व बाळकृष्ण नगर दोन डीपीआर हाती घेण्यात आलेले होते. ते डीपीआर म्हाडाकडे पाठविण्यात आलेले होते. तेथुन त्यावर दोन चार हरकती आलेल्या होत्या. त्यांच्याकडे हरकतीची पुर्तता करण्यात आली. पुर्ण नियंत्रण रेषेच्या नकाशावर जी मार्किंग असते ती आपणाकडे नसल्यामुळे ती पुर्तता करण्यात आली नाही. आम्ही टीपीकडे मागणी केली असता तो नविन डीपीत नसल्याने अदयापपर्यंत पुर्तता करण्यात आलेली नाही. त्याचे रिप्लाय न झाल्यामुळे दोन डीपीआर तसेच प्रलंबित आहेत. पुढे स्वप्रतिष्टान यांच्याकडुन २३ लोकेशन एक प्रायोगिक तत्वावर निवडले होते. ८० ते ९० टक्के लोकांचा त्या झोपडपट्टी भागाचा प्रायोगिक तत्वावर संतोष नगरचा डीपीआर बनवायला घेतला त्या डीपीआरमधुन त्यांनी पीडब्ल्युडीला सादर केलेले आहे. त्याची तपासणी होवुन टीपीमध्ये गेलेले आहे. त्यात त्यांचे काही ऑब्जेक्शन आहे त्याची पुर्तता करण्यासाठी आपण स्वंयप्रतिष्ठान यांना दिलेले आहे. दोन दिवसात त्यांचा रिप्लाय आल्यावर त्याची पुढची कारवाई करण्यात येईल. त्यानंतर रमाबाई आंबेडकर नगर, पाईपलाईन नगर, मुकुंदनगर, भुयारीपाडा, शिवसागर, नाना भाईरचा वार्ड या ९ झोपडपट्टयांच्या भागामध्ये आपण डीपीआर बनविण्याच्या पुर्व तयारीची कामे चालु केलेली आहेत, त्याकरीता जे एसडीओ कार्यालय आहे, प्रशासन कार्यालयाकडुन आपल्याला शासकिय जमिनी जे मालमत्ता पत्रके मिळाले त्यामध्ये एसडीओ कार्यालयाकडुन त्यामध्ये सनद कोणाला दिली असेल का ते खातरजमा करण्याकरीता आपण पत्रव्यवहार केलेला आहे. संबंधीत अधिकारी आपणांस सनद अहवाल देणार होते परंतु त्यांच्याकडे काही दु:खद घटना घडल्यामुळे काही दिले नाही, ते मिळविण्याकरीता आपण पुर्तता करत आहोत. या ८–९ भागामध्ये जर आपल्याला सनद अहवाल मिळाला, तर आपण लवकरच यावर डीपीआरबाबतची कारवाई करणार आहोत. त्यानंतर उल्हासनगर शहर हे १३ चौरस किलोमिटर परिक्षेत्रातील आहे. त्यानंतर शासनाने एक जीआर काढला होता की खाजगी विकासामार्फत ज्या जागा आहेत तेथे प्रधानमंत्री आवास योजना राबविण्याचे शासनाचे धोरण होते. आपण उल्हासनगर महापालिकेतर्फे एक निविदा प्रसिध्द केली होती. मार्चला २१ तारीख लास्ट डेट होती परंतु ३१ मार्चपर्यंत सुध्दा कोणीही निविदा भरली नाही त्यासाठी आपण नविन रिटेंडर करत आहोत. उल्हासनगर शहरात पुरेसी जागा असेल आणि कोणी खाजगी विकासक यामध्ये येत असेल तर याही योजनेअंतर्गत त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घर देण्याचे प्रयोजित आहे. त्यामध्ये कोणाचाही प्रतिसाद नसल्यामुळे त्यामध्ये रीटेंडर आपण एक दोन दिवसात करणार आहोत.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**या स्वंयप्रतिष्ठान यांना आजपर्यंत किती पेमेंट दिला आहे डीपीआर बनविण्यासाठी आणि आता त्यांचे किती पेमेंट बाकी आहे.

**<u>श्री. अशोक जाधव, सहा. लेखा अधिकारी :–</u>**स्वंयप्रतिष्ठान यांनी राजीव आवास योजनेत काम केले होते. त्यानंतर राजीव आवास योजना बंद झाली. त्यानंतर त्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेचे काम दिले आहे. त्यासाठी त्यांना ४०–४४ लाखाचे पेमेंट करण्यात आलेले आहे. त्यानंतर त्यांनी जे दोन डीपीआर बनविले होते ते म्हाडा येथे पाठविले होते. ५० लाखाचे पेमेंट त्यांचे टाकलेले दिलेले आहे, परंतु ते अदयाप त्यांना दिलेले नाही.

**<u>सदस्य श्री. चंद्रशेखर यादव :–</u>**म्हणजे १ कोटीचे पेमेंट आहे.

**<u>श्री. अशोक जाधव, सहा. लेखा अधिकारी :–</u>**पुर्ण दिलेले नाही, प्रलंबित आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**मा. आयुक्त साहेब, आपणासाठीच हा प्रश्न उपस्थित केला आहे. यांनी सांगितले की स्वंयप्रतिष्ठान यांना सल्लागार म्हणुन डीपीआर बनविण्यासाठी नेमले आहे व ४० लाखाचे पेमेंट दिले आहे.५० ते ६० लाखाचे पेमेंट अजुन प्रलंबित आहे. आतापर्यंत कोणतेही प्रधानमंत्री आवास योजना असो व राजीव गांधी आवास योजना असो ते सुरु झालेले नाही. फक्त कागदावरच आहे. प्लान होत आहे व झोपडपट्टयांविषयी चर्चाच

होत आहे. मिनाताई ठाकरे नगर येथे सर्व्हे झालेला आहे व डीपीआर बनुन पडला आहे. राजीव गांधी नगर व बाळकृष्ण नगर येथे डीपीआर बनला आहे व तो अर्धवट पडुन आहे. बाळकृष्ण नगर श्री. बोडारे यांच्या प्रभागातील बनला आहे परंतु अदयाप झालेला नाही. असे कोणतेही काम झालेले नाही. पुर्णपणे दुर्भाग्याची गोष्ट आहे की आपल्या शहरात प्रधानमंत्री आवास योजना असो किंवा राजीव गांधी आवास योजना असो ती शुन्य आहे. आपण ठेकेदारास नियुक्त करतो व त्यांच्याकडुन डीपीआर बनवितो. डीपीआर तसाच पडुन राहतो व आपण पेमेंट करतच असतो. आज जर आपण १० कोटी खर्च केला असता तर आपण प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत स्वत:चे घर खरेदी करुन कधीच दिले असते. कमीत कमी आपण बोललो असतो १० लोकांना की प्रधानमंत्री आवास योजना सोडा तर महानगरपालिकेचे १ कोटी खर्च करुन १० घरे दिली आहेत. आज १ कोटी खर्च करुन सुध्दा डीपीआर पर्यंतच कामाची मर्यादा आहे. आपले काम पुढे वाढलेच नाही. आपण सल्लागार नेमतो, आता आताच आपल्या अधिका—यांनी सांगितले की ९ डिसेंबर २०१५ रोजी कंन्सल्टंट नेमला आहे त्यासाठी सव्वा दोन वर्ष झाले आहेत. सव्वा दोन वर्षात एक सुध्दा काम झाले नाही. जर मी १ कोटी ठेवले असते व झोपडपट्टीचे काम पुर्ण करुन ते उदिष्ट पुर्ण केले असते. परंतु आपले उदिष्ट अपुर्ण असून ते फक्त डिपीआर बनविण्याइतकेच मर्यादीत आहे. मला दु:खाने म्हणावे लागते की आपले पंतप्रधान गरीबांसाठी विचार करतात परंतु आपण त्या योजनेस महापालिकेत डीपीआर बनवुन सोडुन देतो. जर आपण एक डीपीआर बनवुन शासनाकडुन मंजुरी आणली व काम सुरु केले तर मला उम्मिद वाटते की आपण ते काम पुर्ण करणार. आता आताच अधिका—यांनी सांगितले की २६८ झोपडपट्टयांमध्ये सर्व्हे चालु आहे. आयुक्त महोदय या विषयाकडे गंभीरतेने पहा, २०२२ चा आमचा जो उद्देश आहे, २ वर्षापासुन झोपडपट्टयांमध्ये आम्ही जातो, लोकांकडुन फॉर्म भरत आहोत व लोकांची आशा जागृत करीत आहोत की आपण हा जो फॉर्म भरणार त्यासाठी आपणांस मोफत घर मिळणार. लोक मोठया आशेने फॉर्म भरतात त्यात ८० ते ९० टक्के लोकांचे आम्हांला सहकार्य मिळाले आहे. त्यांनी फॉर्म भरले परंतु आपले कामच होत नाही. ही जी प्रधानमंत्री आवास योजनेचे काम आहे तर त्या डीपीआरला शासनाकडे पाठविण्यात यावे व त्या झोपडपट्टीत काम कसे होईल ते पाहिले पाहिजे. मी विश्वासाने सांगत आहे की आपण हे काम हाती घेणार व प्रत्येक आठवडयात अधिकारी व कंन्सल्टंटची बैठक घेवुन जे ८—९ डीपीआर तयार झाले आहेत तर २०१८ मध्ये कमीत कमी काम तर सुरु झाले पाहिजे. मा. महापौरजी मी आपणांस विनंती करतो की ही जी प्रधानमंत्री आवास योजना बंद अवस्थेत पडुन आहे त्या योजनेस गती दयावी व जेवढे काही डीपीआर तयार झाले आहेत, त्याची स्थिती काय आहे ते कसे पुढे गेले पाहिजे व शासनाकडे कसे गेले पाहिजे, याकडे लक्ष दयावे.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आपले सभागृहनेता श्री. जमनादास पुरस्वानी यांनी आणलेला प्रस्ताव, एक महत्वकांशी योजना म्हणुन पंतप्रधान यांनी २०२२ पर्यंत लोकांना हक्काचे घर मिळायला पाहिजे म्हणुन आहे. परंतु दुर्देव असे की आपल्या या शहरात ज्या केंद्रीय योजना असतात किंवा राज्यस्तरीय योजना असतात त्याचा उल्हासनग शहरात काही लाभ होत नाही. बीएसयुपीने आणलेली योजना होती त्याचे डीपीआर सुध्दा तयार करण्यात आले. बीएसयुपीचे डीपीआर तयार करुन ते पैसे सुध्दा दिले. निविदा सुध्दा झाली, वर्कऑर्डर झाली परंतु दुर्देवाने बीएसयुपीचे पैसे येवुन परत गेले कारण आमचे नियोजन जे होते ते चांगले नव्हते. आपणाकडे जी जागा होती त्यात बीएसयुपीचे घर बांधायचे होते ती जागा आमच्या मालकीची नव्हती व पैसे येवुन येथे पडुन राहिले. आणि त्यानंतर त्या पैश्याचे व्याज परत केले तसेच जेएनयुआरएमची जी योजना होती संपुर्ण महाराष्ट्रभरात लोकांनी बसेस घेतले, काय काय घेतले, केवळ एक योजना मिळाली ती पाणी पुरवठयाची त्यात सुध्दा आपण स्वत:च्या पदराचे पैसे टाकुन सव्वा कोटी लावले तरी सुध्दा ती योजना २०१० पासुन आज २०१८ पर्यंत पुर्ण करु शकलेलो नाहीत. आयुक्त महोदय, या शहराचे हे दुर्देव आहे की महाराष्ट्राचे पुर्ण शहर लाभ घेतात परंतु आपली प्रशासकिय ताकद कमी असल्यामुळे आपण आपल्या शहराला फायदा देवु शकत नाही. आणि त्या अनुषंगाने आम्ही सांगतो की हा जो मुद्दा आपल्या सभागृहाने आणला कारण १ कोटी डीपीआरचा खर्च देवुन कारण मागील वेळेस बीएसयुपीचे सर्व डीपीआरचे खर्च भरले परंतु गोरगरीबांना काय भेटले काहीच नाही. परंतु कुठलेच घरे आम्ही बीएसयुपीमध्ये केलेले नाही. एक इमारत बांधली ती श्रमसाफल्यात बांधली परंतु अदयाप आम्हांला बीएसयुपीचे पैसे आलेले नाही. साहेब आता तुम्ही आयएस अधिकारी आहेत, आता आपण हया डीपीआरचे १ कोटी आपण दिलेले आहेत. तुम्ही एक सांगा की आपण लवकरात लवकर कुठल्या कामाची सुरुवात करु शकतो. बाकी कामांमध्ये काय अडचणी आहेत हे तुम्ही आम्हां सभागृहास कळवायचे आहे. असे तुम्हांला कोठे वाटते की एक पंधरा दिवसात किंवा महिन्यात काम सुरु करु शकतो याचे उत्तर दया.

**श्री. अशोक जाधव,सहा. लेखा परिक्षक:—**सन्माननिय सदस्यांना सांगु इच्छितो की आपल्याला जर मार्किंग मिळाली तर मिनाताई ठाकरे नगर येथे जो डीपीआर बनलेला आहे तर आपण म्हाडाला रिप्लाय करुन तो पुर्ण करु शकतो.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**तुमची काय अडचण आहे तुम्हांला काय मिळायला पाहिजे.

**श्री. अशोक जाधव,सहा. लेखा परिक्षक:—**सेंट्रल लाईन.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**तो आपणांस कोण देणार आहे.

**श्री. अशोक जाधव,सहा. लेखा परिक्षक:—**तो टीपीमधुन मिळत नाही, पाणी पुरवठयातुन मिळत नाही.

**सदस्य श्री. प्रदिप रामंचदानी :—**येथे नगररचना विभागाचे कोण आहे का? श्री. सोनावणे साहेब हे काय बोलतात ते आम्हांला समजत नाही, आम्हांला तांत्रिक ज्ञान नाही म्हणुन आम्हांला तुमची गरज आहे, तुम्ही यापुढे.

**श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक:—**सन्माननयि सदस्यांना सांगु इच्छितो की आपल्या प्रभागात ७० ते ८० टक्के लोकांनी झोपडपट्टीत जो अर्ज भरलेला आहे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**आता माझे लक्ष फक्त मिनाताई ठाकरे नगरमध्ये आहे तुम्ही बाकी सोडा, आधी सुरुवात कशी होती, आता नगररचनाकार आले आहेत, त्यांना सांगा की त्यांना कुठली लाईन पाहिजे व ती लाईन कशी मिळणार, आपण याबाबत सांगा जरा.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनवणे:—**आपण याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. याबाबत तीन वर्ष झालेले आहे हा विषय सेक्रेटरी यांनी स्वत:कडे घेतला. खरेतर ही लाईन आपल्या डीपीमध्ये यायला पाहिजे होती परंतु ती आलेली नाही. त्यामुळे स्वत: पत्रव्यवहार करतो असे त्यांनी सांगितले आहे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**साहेब, तुम्ही तीन वर्षापासुन आले आहे, म्हणजे जे मिनाताई ठाकरे नगर आहे तर तेथिल लोकांना न्याय कसा मिळणार आहे. लाईन नाही मिळाली तर काम कसे होणार, लाईन कोठुन आणणार.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनवणे:—**त्यामध्ये डिस्टन्स किती आहे ते उदया, हे ऑफिस ठाण्याला आहे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**साहेब, हे कसे आहे की तांत्रिक मुद्दयात ती लाईन मिळाली नाही, तर हे कसे करायचे हे कोण शोधणार आहे. शेवटी हे बोलतील की तीन वर्षानी तेथे गेलेले आहे. ते डीपीमध्ये आलेले नाही. तर काहीतरी कारण असेल त्याचा लोकांना फायदा मिळणार नाही त्यासाठी काय प्रयत्न केला आहे. आता तुम्ही म्हणता की लाईन मिळाली की काम सुरु करणार व हे म्हणत आहेत की तीन वर्षापासुन लाईन मिळाली नाही तर आता तुम्ही मला सांगा की मला हे मिनाताई ठाकरे नगरमध्ये एक महिन्यात जर काम सुरु करायचे असेल तर आपण जे ठरविले आहे एक महिना, दोन महिना तर त्यासाठी आपणांस काय उपाययोजना करायला पाहिजे. ते तज्ञ लोकांना विचाराना त्याचा आम्ही लोकांना काय फायदा देवु शकतो.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**श्री. प्रदिपजी झाले का बोलुन, मिनाताई ठाकरे नगर आहे तो माझा प्रभाग आहे त्याबाबत मला सुध्दा बोलायचे आहे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**माझी चर्चा झाली आहे परंतु मला उत्तर पाहिजे. मला माहित आहे की मिनाताइ ठाकरे आपल्या प्रभागाचा भाग आहे परंतु मला हे विचारायचे आहे शहरात कोठेतरी सुरु झाले पाहिजे. साहेब सांगा, यात पुढाकार कोण घेणार आहे. मागे मी गेलो होतो चार पाच वर्षापुर्वी श्री. अमिताभ बच्चन यांचा बंगला पाहिला,

मला खुप त्यांच्यासोबत मी बैठकही केली, पैसे वगैरे सर्व काही ठरले परंतु मी घेवु शकलो नाही कारण माझ्याकडे पैसे नव्हते. तशी घटना घडु नये. आपणाकडे सर्व झाले परंतु काही उपयोग नाही. याचे काहीतरी मॅकेनिझम तयार करायला पाहिजे आणि हे झपाटयाने काम झाले पाहिजे अशी आम्ही आपणाकडुन ग्वाही मागतो.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**मा. महापौरजी, पंतप्रधान योजनेबाबत जो स्थगन प्रस्ताव सभागृह नेता यांनी आणला आहे, ख—या अर्थाने हा प्रस्ताव चांगला आहे, या प्रस्तावाच्या माध्यमातुन गरीब लोकांना न्याय मिळेल, त्यांचे हक्काचे घर मिळेल. आमचे मित्र श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले की, मिनाताई ठाकरे नगर येथे हे काम सुरु होणार. ही योजना सुरु होणार तर त्यासाठी काय काय करावे लागणार याचा उत्तर आपले अधिका—याने उत्तर दिले नाही. ही योजना झाली पाहिजे लोकांना त्यांचा हक्क मिळाला पाहिजे, हक्काचे घर मिळाले पाहिजे. हीच आमची अपेक्षा आहे. त्यात त्यांनी चांगले उदाहरण दिले की मी अमिताभ बच्चनचा बंगला पाहिला तो आवडला व त्यांच्यासोबत बैठक सुध्दा केली परंतु पैसे नव्हते. बंगला घ्यायचा होता परंतु पैसे नव्हते. मी तेच सांगतो की बंगला घेण्यासाठी पैसे नव्हते नाही घेतला, पैसे होते तर घेतला, बंगला पाहिला तर बरोबर नव्हता. तर असे होता कामा नये. ही योजना चालु होती ते काम कंपनीला दिले, मी त्या कंपनीचे नाव घेत नाही परंतु त्या कंपनीला काम दिले तर काम सुध्दा बरोबर झाले पाहिजे. लोकांचे झोपडे तुटणार तर त्यांना घर मिळाले पाहिजे. नाहीतर कोणीही ठेकेदार येणार, पैसे मिळणार म्हणुन खड्डा खोदुन ठेवणार व तो निघुन जाणार तर त्यांना घरच मिळणार नाही. तरी अशी गोष्ट होता कामा नये. त्यासाठी जे काही काम करायचे आहे ते प्रशासनास, आयुक्त महोदय आपणांस करायचे आहे. त्यांनी ब—याच गोष्टी सांगितल्या. बीएसयुपी योजनेविषयी सांगितले ती योजना झाली नाही व पैसे असेच निघुन गेले. तसे काम मिनाताई ठाकरे नगर येथे होणार असेल तर आम्हांला ही योजना नको. ती लोक झोपडयात होती तर त्यांना झोपडयातच राहु दया. त्यांचे झोपडे तोडल्यानंतर त्यांना या योजनेचा लाभ मिळाला नाही तर हे चुकीचे होईल. पंतप्रधान यांचे स्वप्न आहे की २०२२ मध्ये त्यांना घरे देणार, जे निवडुन आलेले पंतप्रधान आहे ते २०१९ पर्यंतच आहेत तर मग हे स्वप्नच झाले. असे होता कामा नये अशी आमची भुमिका आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी, श्री. चौधरी साहेबांचे मी उत्तर देत आहे. असे पंतप्रधान आहेत जे १९४६ नंतर आजपर्यंत त्यांनी या योजनेस नाव न देता फक्त प्रधानमंत्री आवास योजना असे नाव दिले आहे. २०२२ मध्ये सुध्दा कोणी प्रधानमंत्री असतील, अन्य कोणतेही प्रधानमंत्री असतील, कोणी इंदिरा गांधी योजना दिली, कोणी राजीव गांधी योजना दिली, हे असे प्रधानमंत्री आहेत त्यांनी फक्त प्रधानमंत्री आवास योजना हे नाव दिले. २०२२ मध्ये कोणी प्रधानमंत्रीच नसेल देशाचा काय राष्ट्रपती शासन होणार. आपले मित्र जे शहराचे अध्यक्ष आहेत ते याप्रकारे बोलत आहेत ते एवढे काबिल आहेत व असे म्हणत आहे की २०२२ मध्ये कोणी प्रधानमंत्री असेल काय, काय या देशात राष्ट्रपती शासन लागणार आहे का हे मला समजत नाही.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**आपण मोदीजींचे नाव घेतले म्हणुन मी बोललो.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**श्री. राजेंद्र चौधरी यांचे म्हणणे आहे की मोदीजींचे म्हणणे आहे की २०२२ पर्यंत सर्वांना हक्काचे घर मिळणार.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**एवढे बोलण्याने मिरची का लागली.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**मा. महापौरजी, माझ्या प्रभागात ४० कोठी, मराठी पाडा, हनुमान कॉटेजचे लोक या प्रधानमंत्री आवास योजनेत सहभागी होण्यास तयार आहेत. त्यांनी आपणांस लिखित निवेदन दिले, श्री. निंबाळकर साहेबांनी त्यांना वेळ देवुन बोलविले होते परंतु कोणत्यातरी कारणास्तव ते भेटले नाही व मग मी श्री. देहेरकर साहेबांशी भेट घेवुन दिली, त्यांचा सर्व्हे सुध्दा झालेला आहे तरी सुध्दा त्यांचा डीपीआर का बनविला जात नाही. प्रथम या गोष्टीचे उत्तर दया, जे लोक सहभागी होण्यास इच्छित आहे तर त्यांच्या येथे डीपीआर का नाही बनला. जेथे ती लोक सर्व्हे करण्यासाठी गेले होते तेथिल लोकांनी विरोध केला होता की येथे डीपीआर नको. आणि जी लोक सहभागी होण्यास तयार आहेत तर त्यांचा डीपीआर का नाही बनवत हे आधी स्पष्ट करावे.

**श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षकः—**सन्माननिय सदस्यांना सांगु इच्छितो की, उल्हासनगरमधील २३८ झोपडपट्टयांचा सर्व्हे केला आहे. आणि एकाच वेळी २३८ झोपडपट्टयांवर योजना करणे, डीपीआर बनविणे शक्य होत नाही. सल्लागारामार्फत झोपडपट्टी भागामध्ये जे रहिवासी क्षेत्र आहे त्याची निवड करुन आणि लोकांना जेथे सहभाग जास्त आहे, स्कीम हलकी असल्याची नोंद आहे त्यानंतर खातरजमा करुन तद्नंतर एसडीओ कार्यालयाकडुन कोणास सनद दिलेली नाही अशांची पडताळणी करुनच आपल्याला पुढील कार्यवाही करता येईल. राज्य शासनाकडुन सहा महिन्यापुर्वी आलेले दोन डीपीआर लवकरात लवकर पाठवा असा पाठपुरावा होता. त्यावेळी दोन डीपीआर पाठविण्यात आले होते. दोन डीपीआर एक संतोष नगरचा आहे ते एसडीओ कार्यालयाकडुन आल्यावर प्रायोजित तत्वावर आपण पाठविणार आहोत. टप्याटप्याने जेथे जेथे होणार तेथे आपण घेणारच आहोत. उल्हासनगरमध्ये हे का घेतले नाही असा भाग नाही, आपण ते घेणार आहोत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**श्री. जाधव साहेब, छोटीशी शंका आहे, २३८ झोपडपट्टया आपण म्हणता या शहरामध्ये एवढया झोपडपट्टया आहेत?

**श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षकः—**होय.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**आम्ही गेल्या ब—याच वर्षापासुन या महापालिकेचे प्रतिनिधी आहोत.


**श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षकः—**मोठया मोठया प्रमाणात त्याची यादी आहे माझ्याकडे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**वाटत नाही, एवढया झोपडपट्टया असतील म्हणुन. दलित वस्त्यांमध्ये काम करतो तेव्हा कधी असा रेकॉर्ड आला नाही. आता अचानक २३८ झोपडपट्टया म्हणजे फार मोठा आकडा आहे तो.

**श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षकः—**सल्लागार मार्फत उपांगन मार्फत सिमांकन केलेल्या आहेत त्या.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**५०—५० झोपडपट्टया आहेत, जसे सपना गार्डनच्या बाजुला आहे तेथे १२ ते ५० घरे असतील ते सुध्दा झोपडपट्टी पकडल्या आहेत. जसे अमन टॉकिज येथे ८—१० घरे आहेत ते सुध्दा घोषित झोपडपट्टी पकडल्या आहेत.

यावेळी सदस्या श्रीमती जयश्री पाटील व श्रीमती अर्चना करनकाळे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.



**सदस्य श्री. अरुण आशान :—**साहेब, मला दोन मिनिटे एक बोलायचे आहे. तुम्ही आता सांगितले की ज्या झोपडपट्टया रहिवास क्षेत्रामध्ये आहे, यानंतर डीपीमध्ये रहिवास क्षेत्रात त्या झोपडपट्टीचा भाग आला असेल तर त्या ग्रीन झोनमधुन आर झोनमध्ये कन्व्हर्ट झालेल्या आहेत. झोपडपट्टया यामध्ये येणार ना.

**श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षकः—**आपण जुना आणि नविन डीपीत रहिवास क्षेत्र कन्फर्म करुनच करु.

**सदस्य श्री. अरुण आशान :—**आणि ज्या ग्रीन झोनमध्ये असतील त्या.

**श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षकः—**फक्त रेसिडेंशीअल झोनकरीताच आहे.

**सदस्य श्री. अरुण आशान :—**मग त्यांना त्या योजनेचा लाभ भेटणार नाही.

**श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षकः—**नाही.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान :—</u>**मग त्याला लागुन जर आर झोन केले असेल तर आर झोनमध्ये संपुर्णपणे त्यांना एकत्रित करणार. जसे भिमकॉलनी, इंदिरा नगर, महात्मा फुले, भिमनगर ही जी झोपडपट्टी आहे त्यातील इंदिरानगर, रहिवास क्षेत्रामध्ये मोडते. भिमकॉलनी व भिमनगर हे हरितक्षेत्रामध्ये मोडते. मग त्या झोपडपट्टयाचा विकास करतांना तुम्ही डीपीआर फक्त इंदिरानगरचा पाठविणार की महात्मा फुलेचा पाठविणार.

**<u>श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षकः—</u>**फक्त रहिवास क्षेत्राचा असेल त्याचा पाठविणार.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान :—</u>**ज्या भागामध्ये रहिवास क्षेत्र आहे त्या भागचा डीपीआर बनणार.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**मा. महापौरजी, आपण जी रहिवासी क्षेत्राची अट सांगत आहात...

**<u>सदस्य श्री. सुनिल सूर्वे:—</u>**मा. महापौरजी, एक गंभीर विषय आहे, आयुक्त साहेब जरा लक्ष दया. मुस्लिम समाजाच्या लोकांनी खाली गेट बंद केले आहे व नगरसेवकांना ते गेटच्या बाहेर जावुन देणार नाहीत, असे त्या लोकांचे चालले आहे. ते गेटवर येवुन बसले आहेत त्यांचे म्हणणे आहे की नगरसेवक लोकांना बाहेर जावु देणार नाही अशी त्यांची भाषा आहे. तर त्यांच्यावर कायदयानुसार कारवाई करा. ही दादागीरी झाली व ती खपवुन घेतली जाणार नाही.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**श्री. सुर्वे यांनी सांगितले तो गंभीर विषय आहे. मुस्लीम लोकांना कब्रस्तान देण्यासाठी आम्ही त्यांच्या सोबत आहोत. संपुर्ण सभागृहासमोर आम्ही दोन वेळा ठराव केला परंतु जर गेट बंद करुन कुणा नगरसेवकास गेटच्या बाहेर जावुन देणार नाही तर ही दादागीरी झाली.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**मागच्यावेळी मी चार तास अडकलो होतो. तेव्हा आम्ही सहन केले.

**<u>सदस्य श्री. राजेंश वदारिया :—</u>**मा. महापौरजी, पहिली गोष्ट हाउसिंग फॉर हॉल २०२२ यामध्ये चार वर्टीकल्स आहेत. आपण फक्त एका वर्टीकल्सवर काम करत आहात. बाकी तीन वर्टिकल्सवर काहीच डेवलोपमेंट नाही. व महापालिकेचे प्रशासन एक कंन्सल्टंटला काम देणार असे समजतात की आमची जबाबदारी आम्ही पुर्ण केली. तर हे चुकीचे आहे. प्रथम तर तीन वर्टीकल्स त्यात काय काय स्कोप आहे. रहिवासी क्षेत्राबाबत आपण जी अट सांगत आहात ती अट नाही आहे. जेथे कर्मशिअल आहे, जेथे ग्रीन झोन आहे त्यास सुध्दा पाहु शकता. त्यात असे सुध्दा लिहिले आहे की जे कर्मशली वायबर प्रोजेक्ट आहे, तो आपणांस प्रथम घ्यायचा आहे. मी आपणांस ज्या विभागाची नावे सांगितली हनीमुन कॉटेल, ४० कोट, हे कर्मशिअल एरिया आहे. जपानी बाजाराचा एकदम मागचा पट्टा आहे. ज्यात जमिनीचे मुल्य जास्त आहे. जमिनीचे मुल्य जास्त असल्याने तेथे तळमजला, पहिला माळा येथे कर्मशिअल बनु शकतो. तेथे एक भागात आपण त्यांना बसवु शकतो, चार एफएसआयने आणि बाकीच्या लोकांना तेथे शिप्ट करुन झोपडपट्टीचे काम होवु शकते. दुसरे वाल्मिकी वसाहत जे ४३६ प्लाटवर बनविले आहे, जवळजवळ साडे सहाशे स्केअरफुटाचा तो प्लाट आहे. त्यात एक एफएसआय डेव्हलोप करुन आपण सफाई कर्मचा—यांना तेथे क्वार्टर्स दिले. तेथे गर्व्हमेंटने आपणांस अडीच एफएसआय अलॉट केले आहे. दिड एफएसआय बाकी आहे. त्यात ग्राउंड प्लस आठची इमारत बनविण्याऐवजी आपण ग्रउंड प्लस चारचीच इमारत बनविली आहे. आपण चार माळे आता सुध्दा बनवु शकतो व त्या चार माळयात जेवढे पण घरे येतील तर आजुबाजुच्या झोपडपट्टीवाल्यांना शिप्ट करुन आपण ती जागा दुसरी सुरु करु शकतो. हे लगेच होवु शकते, ती जागा आमच्या ताब्यात आहे ती जागा आमच्या नावाची आहे, तेथे अर्धे काम पुर्ण झाले तेथे दिड एफएसआय मिळणार आहे. बॅलेंस एफएसआय आहे थेट त्याचा वापर केला पाहिजे. त्यासाठी वाल्मिकी वसाहतीस प्रायोरिटीवर घेवुन जे दिड एफएसआय आहे ते दिले पाहिजे. सोबत एक टिम बनविली पाहिजे जसे डीएमसी प्रोजेक्टच्या तहत ज्यात प्रधानमंत्री आवास योजनेतील अधिकारी, नगररचना विभागातील अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी, पाणी पुरवठा विभागातील अधिकारी यांची टिम बनली पाहिजे. प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करावी. एक टिम बनविली तर एकच विभाग आहे, आपण कसला प्रस्ताव बनविण्यास जात आहात. त्यांचा काही वेगळा प्रस्ताव आहे, वेगळी गोष्ट

आहे ती माहित होत नाही. माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे, एक टिम बनवुन प्रधानमंत्री आवास योजनेस एक गती दिली पाहिजे, धन्यवाद।

**<u>सदस्य श्री. अरुण आशान :—</u>**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, श्री. राजेश भाऊ यांनी जे सांगितले तर खरे म्हटले तर आता परिस्थिती जर पाहिली तर खाली एक व वर एक अशा पध्दतीने एका कुटुंबातील दोन व्यक्ती राहतात. उद्‌देश असा आहे सर्वांचा की झोपडपट्‌टीचे जर पुनर्वसन होणार असेल तर फॅमिली वेगवेगळया झाल्या आहेत परंतु त्यांना काय वेगवेगळया झोपडया मिळतील काय? शिवाय मला व सभागृहाला ही माहिती पाहिजे. जेम स्लम डिक्लेअर आहेत, यांनी छोटया छोटया ५०, २६८ अशा झोपडया घेतल्या आहेत, ते स्लम आहे मग त्यास आर झोन, ग्रीन झोन, आय झोन जे निकष लागणार काय, खरे पंतप्रधान आवास योजनेमध्ये जर करायचे असेल तर शासनाने नेमुन दिलेल्या जीआर प्रमाणे प्रत्येकाला घर मिळणार आहे. त्यामध्ये हा क्रायटेरीया जर का असेल तर बाकीच्या ज्या स्लमस् आहेत तर मला वाटते आयुक्त महोदय, लोकांमध्ये दुरावा, संभ्रम निर्माण होईल. माझ्याकडील प्रभागात दिड हजार झोपडपट्‌टया आहेत, त्यामध्ये ५००—६०० झोपडया हया आर झोनमध्ये आहेत, त्याचा डीआरएचा डिमारकेशन पाहिले तर त्या झोपडयांचा, त्याचे डिमारकेशन संपेल आणि आर झोन व ग्रीन झोन होईल व मग बाजुवाल्या माणसास पंतप्रधान आवास योजनेत जर घर मिळाले, मी एवढया वर्षापासुन बाजुला राहतो मग मला का नाही घर मिळत? हा जो संभ्रम आहे, म्हणुन मी साहेब तुम्हांला विचारतो की, हा जो मुद्‌दा आहे की झोपडपट्‌टी म्हणजे संपुर्ण झोपडपट्‌टी त्यामध्ये आर झोन व ग्रीन झोन हा निकष नसावा. कारण साहेब आपण स्लम न्यु डेव्हलोपमेंट करतो तर ते करतांना जी पंतप्रधान आवास योजना जी लागु करत आहोत, ती शासनाने नेमुन दिलेली आहे. त्या झोपडपट्‌टीमध्ये राहणारा रहिवासी हा नियम त्यामध्ये धरायला पाहिजे असे मला वाटते. आपले शहर १३ किलोमिटरचे असल्याने वाढवयला जागा नाही. नविन डीपी प्लान आला आहे, डीसी रुलची आपण वाट पाहत आहोत. ईपी यायचा बाकी आहे, त्यामध्ये नविन नविन मुद्‌दे येतील. हया काही योजना आहेत जसे मिनाताई ठाकरे नगर, ज्या काही झोपडपट्‌टया आपण करु शकतो. ती सुरुवात कुठुन तरी करावी, १ नंबरपासुन सुरुवात झाली काय आणि ५ नंबरपासुन सुरुवात झाली काय, सुरुवात झाली की लोकांच्या आशा आकांशा उत्पन्न होतील, आपल्याला सुध्दा चांगले घर मिळेल आणि त्या चांगले घर मिळण्याचे अपेक्षेने लोक, हे जे बांधकाम करायचे पेव फुटले ते फुटणार नाही. आणि ते कोठेतरी बंद होईल, त्याचे कोठेतरी मार्किंग होवुन जाईल. आणि जे दोन घर आता अदयावत आहेत तर त्या लोकांना सुध्दा घर मिळाले पाहिजे. कारण वर्षानुवर्षे ते येथेच राहत आहेत, मुददा हाच होता की फक्त आरझोनमध्येच झोपडपट्‌टयांचे पुनर्वसन होणार. आर झोनमध्ये होणार आणि ग्रीन झोनमध्ये होणार की नाही एवढेच फक्त मला सांगावे, एवढीच विनंती.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**मा. महापौरजी मी आता ठराव वाचुन दाखवित आहे त्या ठरावास लवकरात लवकर मान्यता मिळुन काम सुरु केले जावे. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे प्रधान मंत्री आवास योजनेची कामे जलद गतीने करणेकामी स्वतंत्र सशक्त अधिकारी नियुक्त करणे व त्यांच्या सोबत सार्वजनिक बांधकाम विभाग, नगररचना विभाग व पाणी पुरवठा विभागातील स्वतंत्र कर्मचारी वृंद देण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**पास करायला हरकत नाही परंतु यामध्ये ज्या ठेकेदाराला काम मिळेल त्याची रेना अंतर्गत अट असली पाहिजे. रेनाचे रजिस्ट्रेशन असले पाहिजे त्यांच्याकडे.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>**ठिक आहे, ठिक आहे, पास.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पास करा.

**<u>महापालिका सचिव :—</u>**श्री. चौधरी साहेबांनी जे सांगितले आहे ते शासनाच्या नियमाप्रमाणेच निविदा निघतील. तर ठरावात टाकायची मला नाही आवश्यकता वाटत. ठिक आहे, पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. १८ :— प्रस्तावाची सूचना**

प्रधान मंत्री आवास योजनेची कामे जलद गतीने करणेबाबत पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे

**प्रस्तावना**

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांनी सर्वांना घरे मिळावीत यासाठी प्रधान मंत्री आवास योजना चालू केलेली आहे. त्यामध्ये गरीब, गरजु व ज्यांना अजिबात स्वत:चे घर नाही त्यांचेसाठी घरे उपलब करुन देण्याकरीता पंतप्रधान आवास योजना केलेली आहे. परंतु उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत अदयापपर्यंत सदरचे योजनेस गती देण्यात आलेली नाही. आतापर्यंत असे किती अर्ज प्राप्त झालेले आहेत त्यांची यादी देखिल तयार करणेत आलेली नाही. व त्याची माहिती स्थानिक नगरसेवक यांना मिळणे आवश्यक आहे. सदरचे योजनेस गती मिळणेकरीता स्वतंत्र सशक्त अधिकारी यांची नियुक्ती करणेत यावी व त्यांचे सोबत स्वतंत्र कर्मचारी वृंद देण्यात यावा. जेणेकरुन ते केवळ हेच कामे करतील व योजनेस गती मिळेल. सदरच्या कामाचा आढावा प्रत्येक १५ दिवसात करण्यात यावा.

तरी वर नमुद पंतप्रधान आवास योजनेस गती मिळणेकरीता व आतापर्यंत केलेमल्या कामांबाबत काय करण्यात आले यांचा आढावा घेवुन त्याबाबत विचार विनिमय व उत्तम तोडगा काढणेकरीता येत्या महासभेमध्ये विषय घेवुन याबाबत चर्चा होवुन निर्णय घेण्यात यावा.

**महासभा ठराव क्र: ८६** **दिनांक:— २७/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे प्रधान मंत्री आवास योजनेची कामे जलद गतीने करणेकामी स्वतंत्र सशक्त अधिकारी नियुक्त करणे व त्यांच्या सोबत सार्वजनिक बांधकाम विभाग, नगररचना विभाग व पाणी पुरवठा विभागातील स्वतंत्र कर्मचारी वृंद देण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

➡ **विषय क्र. १९ :— प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर शहरातील अवैध अनाधिकृत हुक्कापार्लर व बारवर कारवाई होणेबाबत पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे

———————————————————————————————————————

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आयुक्त साहेब, माझी एक तुम्हांला विनंती आहे, जसे आता बीएसयुपीचे झाले, आयुक्त साहेब बदलले की निर्णय बदलतात. किंवा अंमलबजावणी बदलते. अगोदरच्या योजनेत असे झाले श्री. हिरे साहेब असतांना त्यांनी वेगळे लक्ष दिले आणि एक वेगळे शेत स्थापन झाले. स्वत: येवुन उप—आयुक्त व सर्व अधिका—यांना घेवुन ते बसायचे. त्यामुळे एक कंन्सल्टंट होता त्याला एक चालना मिळाली. स्वंयप्रतिष्टान आणि त्यांनी एक मस्त काम केले, आणि दुसरे आयुक्त आले त्यांनी दुर्लक्ष केले व गेल्या वर्षभरात काहीच काम नाही. जो रस घेतला आहे तो स्वंयप्रतिष्ठान यांनी घेतला आहे त्यामुळे येथपर्यंत डीपीआर आला. त्यानंतर तोही उदासिन झाला व प्रशासनास काही नाही. बाकी सभागृहास बोलुन उपयोग नाही त्याचा. त्याची अंमलबजावणी करायची ते करत होते, म्हणजे राजा बदलला की कायदा बदलतो असे येथे चालले आहे. किंवा जसा राजा तसा कायदा. श्री. हिरे साहेब होते त्यांनी लक्ष दिले होते. या उल्हासनगर शहरात बीएसयुपीची योजना आली, त्याचा निधी आला व एक वसाहत पुर्ण झाली. दुस—या वसाहतीचा निधी परत शासनाकडे पाठवुन दिला. कारण काय आम्हांला समजले नाही. या पंतप्रधान आवास योजनेचे तसेच झाले आहे. तर आपण लक्ष घालुन एक स्वतंत्र सेल निर्माण करावे. तसेच श्री. शिंदे साहेब असतांना या उल्हासनगर शहरातील हुक्का पार्लर आणि बार एक महिन्यात त्यांनी आठ बार तोडले होते. माझ्या प्रभागात एक नाका आहे पवई नाका, तेथे रात्रीच्या वेळेस महिलांना जायला सुध्दा भिती वाटते, बार म्हटले तर तेथे सर्व गुन्हेगार आले आणि एखादे सांस्कृतिक केंद्र उभारले तरी एक ओळख मिळते की हे एक सांस्कृतिक केंद्र आहे व एक सांस्कृतिक शहर आहे. या शहराचे नाव बार शहर असे होता कामा नये म्हणुन यापुर्वी श्री. शिंदे साहेब असतांना बार तोडणार होते व ते तोडले व बाकीचे जे इलिगल आहे ते या शहरातील गुन्हेगारी ॲक्टीव्हीटीस वाढविणारे आहे तर अशा बारवर तात्काळ कारवाई करा लवकरात लवकर. जसे मुंबईला एक मोजेस बार आणि दुसरा कुठला बार होता. अनाधिकृत बारवर जीव गेल्यानंतर प्रशासन हडबळुन उठले आणि मग नंतर तोडक कारवाई झाली. याठिकाणी रोज लोक मरतात व किती कुटुंब उध्दवस्त होत आहे. डांन्सबार संस्कृतीमुळे आणि आज आमच्या शहराला अशाप्रकारे ओळख होता कामा नये की एक बारचे शहर. आपण आला आहात तर मला असे वाटते एक चांगल्या संस्कृतीची पेरणी आपण केली आणि ही विकृती घालवाल, जसे श्री. शिंदे साहेबांनी बारवर कारवाई केली तशी तातडीने कारवाई करा हाच निर्देश या ठरावाच्या माध्यमातुन आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी, मी श्री. बोडारे यांना धन्यवाद देतो की त्यांनी एक चांगला विषय येथे मांडला आहे. जसे श्री. बोडारेजी म्हणाले की थोडयाच वेळेसाठी आमचे पुर्व आयुक्त श्री. सुधाकर शिंदे यांनी जेवढे काही अवैध हुक्का पार्लर होते व बार होते अशा बारवर तातडीने तोडक कारवाई सुरु केली. व संपुर्ण शहरामध्ये याप्रकारचे हुक्का पार्लर चालविणारे, छोटे छोटे मुले, छोटया छोटया मुली, पंधरा व अठरा वर्षाचे मुले व मुली तेथे जावुन हुक्का पार्लवर बसतात, ही या शहराची दु:खद घटना होती. श्री. सुधाकर शिंदे यांना धन्यवाद आम्ही त्यावेळी सुध्दा दिले होते. त्यांनी विना परवानगीने आपली टीम घेवुन त्या हुक्का पार्लर तोडायला सुरुवात केली. एक हातोडा लागल्याने संपुर्ण शहरातील असे हुक्का पार्लर व बार बंद झाले. मी आपणांस विनंती करतो की त्याचप्रकारे आपण मानवतेच्या नात्याने, मानवतेस पाहुन जे अवैध हुक्का पार्लर व बार चालत आहे ज्यात जनमानसची हानी होत आहे, आमचे छोटे छोटे मुले तेथे जावुन बिघडत आहेत, तर हा प्रस्ताव सर्वसंमतीने पारीत करावा आणि आपण सर्वच अशा हुक्का पार्लरवर अवश्य कारवाई करावी, असा आम्ही विश्वास करतो.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**पास करु या. कारवाई केली पाहिजे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**मा. महापौर महोदया, एक गंभीर विषय मी तुम्हांला सांगतो. कॅम्प नं. २ ला किशोर पॅटीसच्या समोर एक फ्रॅन्कीवाला आहे त्याच्यावर एक मायकलचा बार चालतो. ती धोकादायक बिल्डींग डिक्लीअर असतांना तेथे सर्व काही चालु आहे. उदया जर एखादा प्रकार तेथे घडला, आपण धोकादायक बिल्डींग डिक्लीअर

केल्यानंतर तेथे काहीही कारवाई केलेली नाही जसे लाईट तोडणे, पाणी तोडणे आपण त्यास धोकादायक म्हणुन नोटिस दिलेली आहे कृपया आपण लक्ष दया आणि लवकरात लवकर कारवाई करा.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**विरोधी पक्ष नेता यांनी जो प्रस्ताव आणला आहे मला असे वाटते तो प्रस्ताव १५ जानेवारी २०१८ मध्ये आणलेला प्रस्ताव आहे त्या प्रस्तावावर त्यांनी स्पष्टपणे लिहिले आहे की जेव्हा श्री. सुधाकर शिंदे आयुक्त होते त्यांनी बिअरबारवर कारवाई केली होती व ते बार तोडण्यात आले होते आता परत ते बार सुरु झाले आहे तर त्यावर कारवाई झाली पाहिजे. प्रस्ताव येवुन एक महिन्याच्यावर झाला आहे. येथे पथक आहे अनाधिकृत बांधकाम तोडण्यासाठी, उप–आयुक्त, प्रभाग अधिकारी आहेत त्यांचे काम आहे हा प्रस्ताव येण्यापुर्वी कारवाई करायला पाहिजे. त्यावेळच्या आयुक्तांनी नाही केली परंतु प्रभाग अधिकारी आहेत, उप–आयुक्त आहेत तर त्यांनी का नाही केली. त्यांचे काम आहे त्यांनी केले पाहिजे, पुर्वीच्या आयुक्तांनी केले तसे यांचे काम आहे यांनी सुध्दा केले पाहिजे. प्रस्ताव त्यांच्याकडे गेला नाही का, सचिव महोदया तुम्ही त्यांना प्रस्ताव पाठविला नाही का, प्रस्ताव त्यांच्याकडे जातो तर त्यांनी हे केले पाहिजे. त्यांना बोलण्याची गरजच पडली नाही पाहिजेम.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:–**अशा अधिका–यांचा सन्मान केला पाहिजे.

**प्र. उप–आयुक्त, श्री. युवराज भदाणे:–**सन्माननिय महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब व सन्माननिय सदस्य, हा जो प्रस्ताव सन्माननिय सदस्य यांनी आणला आहे की हुक्काबार, डान्सबार व अनाधिकृत रेस्टारंट असतील तर कारवाई करण्याबाबत, मा. उप–आयुक्त श्री. गोलित यांनी दिलेल्या पत्रानुसार आणि श्री. शिंदे साहेबांनी ज्या बारवर डिमॉलिशन केले होते त्या बारवर मी स्वत: जास्त दहा टक्के डिमॉलिशन रात्रीच्या ९ वाजेपर्यंत उभे राहुन केलेले आहे. दुसरी गोष्ट तीन बारवर मा. न्यायालयाचा स्टे आहे आणि दोन बारचे डीसीपीने पत्र दिले त्याप्रमाणे जो प्रस्ताव आहे अचल प्लाझा आणि दुरु आहे ते स्टेवर आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–**जे हुक्का पार्लर व बार आहे.

**प्र. उप–आयुक्त, श्री. युवराज भदाणे:–**हुक्कापार्लर हा विषय आमच्यापर्यंत आलेला नव्हता.

**सदस्य श्री. मनोज सयानी :–**हुक्कापार्लरवर आयुक्त श्री. शिंदे यांनी कारवाई केलेली होती. आता परत हुक्का पार्लर चालु आहे भलेही तो डॉल्फिनक्लबमध्ये असो, अशोक प्लाझा व अन्य ठिकाणी हुक्कापार्लर चालु आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**श्री. शिंदे यांनी कारवाई केली होती, आता पुन्हा हुक्कापार्लर सुरु झालेले आहेत, तोडक कारवाई केली तर चालुच होणार नाही.

**सदस्य श्री. मनोज सयानी :–**उल्हासनगर शहरात सर्वात मोठा हुक्कापार्लर चालु आहे.

**प्र. उप–आयुक्त, श्री. युवराज भदाणे:–**सन्माननिय महापौर,आमच्याकडे उप–आयुक्त, पोलिस...

**सदस्य श्री. मनोज सयानी :–**तुम्ही सांगता डान्सबारवर कारवाई चालु आहे परंतु आता सुध्दा डान्सबार चालु आहेत. धुरु चालु आहे असे कसे चालु आहे.

**प्र. उप–आयुक्त, श्री. युवराज भदाणे:–**हे पहा साहेब, डान्सबार हा विषय वेगळा त्यात अनाधिकृत बांधकामाचा सबंध नाही.

**सदस्य श्री. मनोज सयानी :–**आजपर्यंत जे तोडले ते सर्व नविन बनविले. सभागृहात चुकीचे बोलु नका.

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजामध्ये कोण नेमके काय म्हणत होते हे समजुन येत नव्हते.

**प्र. उप–आयुक्त, श्री. युवराज भदाणे:–**मी स्वत: गेलो होतो साहेब, मी स्वत: तोडले आहे.

**सदस्य श्री. मनोज सयानी :–**महापौर महोदया, महासभा झाल्यावर आपण सोबत चला मी दाखवितो किती चालु आहेत ते.

**प्र. उप–आयुक्त, श्री. युवराज भदाणे:–**उर्वरीत जे काही चालु असतील ते आठ दिवसात सर्व बंद करुन टाकु. अजुन पुन्हा बनविले असतील तर आठ दिवसाच्या आत पुर्ण निष्कासित करु.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**हे सांगायची गरजच काय होती, तुम्ही तोडले सांगितले तर मग हा विषय आलाच कसा. विषय आला आहे म्हणुन काही तर गांर्भिय आहे ना त्यामध्ये. तोडणे आणि तोडण्याचे नाटक यामध्ये फरक आहे. तोडले जेथे डान्स करत होते ते तोडले कारण त्यास परवानगी नव्हती. पण काय उपयोग ते तोडुन ते परत चालु झाले. डान्स चालु नसता तर आलाच नसता हा विषय. ॲपलबार, हन्डरेड बार सर्व काही चालु आहे. हुक्कापार्लरवर व डान्सबारवर कारवाई केली नाही म्हणुन आमची संस्कृती बिघडत आहे. सर्वच्या सर्व डान्सबारवर कारवाई झाली पाहिजे. मुलुंड चेकनाक्यावर वर्षानुवर्षे चालु होते त्या नाक्याचे नाव तेथे बदलण्यात आले होते, तेथे चंद्रशेखर आयुक्त आल्याने सर्व बदलले होते. तशाच प्रकारची कारवाई श्री. शिंदे साहेबांनी केली होती. त्यासाठी हा प्रस्ताव आणला आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**पास, पास, पास.

**महापालिका सचिव :–**मी ठराव वाचुन दाखविते. काही बदल असेल तर सांगा. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरातील अवैध, अनधिकृत बांधकामे व गैरप्रकारे व गैरमार्गाने सुरू असलेल्या बार, डान्सबार पब व हुक्कापार्लरची चौकशी होवून त्वरीत निष्कासनाची कारवाई करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**त्यात एक लाईन टाका की पुर्व आयुक्त श्री. सुधाकर शिंदे यांनी केलेल्या कारवाईप्रमाणे आता पुन्हा निष्कासनाची कारवाई झाली पाहिजे.

**महापालिका सचिव :–**ठिक आहे, टाकते ठरावामध्ये.

**काही सदस्य :–**पास–पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १९ :– प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर शहरातील अवैध अनाधिकृत हुक्कापार्लर व बारवर कारवाई होणेबाबत

पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयानुसार विनंती पुर्वक कळवू इच्छितो की, मुंबई महानगरपालिका हद्दीतील कमला मिल कम्पाउन्ड परिसरातील एनअबाव व मोजेस या बार मधील अवैध हुक्कापार्लर व अनधिकृत बांधकाम व अग्निशमन यंत्रणा कार्यान्वीत नसल्याने आग लागून १४ निष्पाप नागरीकांना आपल्या प्राणास मुकावे लागल्यानंतर मुंबई महानगरपालिका प्रशासनास जाग येवून जवळपास ९१३ अवैध बारचे अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

उल्हासनगर शहराच्या १३ किलोमिटर क्षेत्रात देखील असंख्य बार, डान्सबार, हुक्कापार्लर व पब असून अवैध, अनधिकृत बांधकामे व गैरप्रकार या बार मधून सुरू असल्याने तत्कालीन आयुक्त श्री. शिंदे साहेब यांनी ५ बारवर निष्कासनाची कारवाई केली होती. परंतू कारवाई केल्यानंतर देखील सदरचे बार पुन्हा सुरू झालेले आहेत. मुंबई महानगरपालिका हद्दीत ज्याप्रकारे अग्निकांड होवून निष्पाप नागरीकांचा बळी गेला आहे. त्याच प्रमाणे उल्हासनगर शहरात देखील अनुचित प्रकार, घटना घडून नागरीकांचे बळी जाण्याची वाट महापालिका प्रशासन पहात आहे का?

कृपया उल्हासनगर शहरातील अवैध, अनधिकृत बांधकामे व गैरप्रकारे व गैरमार्गाने सुरू असलेल्या बार, डान्सबार पब व हुक्कापार्लरची चौकशी होवून संबधीतावर त्वरीत निष्कासनाची कारवाई करणेत यावी ही विनंती. अन्यथा भविष्यातील अपघातास महापालिका प्रशासन जबाबदार राहील.

**महासभा ठराव क्र:** ८७ **दिनांकः– २७/३/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती मिना सोनेजी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरातील अवैध, अनधिकृत बांधकामे व गैरप्रकारे व गैरमार्गाने सुरू असलेल्या बार, डान्सबार पब व हुक्कापार्लरची चौकशी होवून त्वरीत निष्कासनाची कारवाई करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

**<u>तसेच</u>**

तत्कालीन आयुक्त श्री. सुधाकर शिंदे यांच्या कालावधीत ज्या ज्या बारवर व हुक्कापार्लवर कारवाई झाली होती ती बांधकामे नव्याने होवुन पुर्वव्रत डान्सबार चालु झालेले असल्याने त्यांच्यावर पुन्हा निष्कासनाची कारवाई करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>**ही सभा संपली आहे.

सांयकाळी ६.५१ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**दिनांक:— १६/४/२०१८**

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १६/४/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १६/०४/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता घेण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३८ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ३९ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ५ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ४० | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ६ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ४१ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४२ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ८ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४३ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ९ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४४ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| १० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४५ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ११ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४६ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १२ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १३ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४८ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १४ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४९ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १५ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ५० | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १६ | श्री. अशोक मच्चुमल छाप्रु | ५१ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १७ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ५२ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १८ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५३ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १९ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५४ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २० | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ५५ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५६ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २२ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५७ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २३ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५८ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २४ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५९ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २५ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसूळ | ६० | श्रीमती कविता सुधिर बागुल |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ६१ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २७ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ६२ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २८ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६३ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| २९ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६४ | श्री. विजय चाहु पाटील |
| ३० | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६५ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३१ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६६ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३२ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६७ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३३ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६८ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३४ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६९ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३५ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ७० | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३६ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ७१ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३७ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके | ७२ | श्रीमती आशा जीवन इननानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती आशा नाना बिराडे, २. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ३. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ४. श्री. महेश पहिलराज सुखरामनी, ५. श्रीमती शुभांगीनी निकम, ६. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ७. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी, ८. श्रीमती शुभागी मनोहर बेहनवाल, ९. श्रीमती कांचन अमर लुड, १०. श्री. शंकर गोविंदराम लुंड, ११. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त

२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

३. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार

४. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता

५. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता

६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी

७. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक

८. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक

९. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक

१०.डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

११. श्री. प्रबोधन मवाळे, सहाय्यक आयुक्त

१२. श्री. बालाजी लोंढे, सहाय्यक आयुक्त

१३.श्री. गणेश शिंपी, प्र.सहाय्यक आयुक्त

१४.श्री. मनिष हिवरे, प्र.सहाय्यक आयुक्त

१५. श्री. नंदलाल सामतानी, प्र.सहाय्यक आयुक्त

१६. श्री. भगवान कुमावत, प्र.सहाय्यक आयुक्त

१७. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी

१८. श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता

१९. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

२०. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक

२१. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक

२२. श्री. विशाखा सावंत,

२३. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक

२४. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक

२५. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

२६.श्रीमती निलिमा कदम, अकॉउंटंड

२७. श्री. अनिल खतुरानी, प्र. कर निरीक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१.श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्रीमती नर्गिस खान, लिपीक
३. श्री. अशोक रामरख्यानी, लिपीक
४. श्री. बाळु भांगरे, लिपीक

सायंकाळी ४.३३ वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

या वेळी मा. आयुक्तांच्या स्थानी डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त या आसनस्थ होत्या.

**महापालिका सचिव:**—विषय क्र.१...

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मा महापौर उप महापौर मागच्या महासभेत माझे दोन मुद्दे बाकी राहीले होते त्यावेळेस महासभा संपली होती तर कृपया माझ्या दोन मुद्दयाचे मला उत्तर देण्यात यावे त्यानंतर महासभा चालवण्यात यावी.

**महापालिका सचिव:—** आता ४.३४ मिनिटे झालेली आहेत प्रश्न उत्तराची सुरूवात झालेले आहे प्रश्न क्र. १ हा भारत राजवाणी यांचाच प्रश्न आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सन्मानिय महापौर मॅडम, उप महापौर आणि आयुक्त साहेब, आता आयुक्त साहेब नाहीत, आयुक्त मॅडम, १४ एप्रिल २०१८ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती, सन्मानिय महापौर मॅडम आपण महापौर मॅडम आणि आता ज्या बसलेल्या आहेत त्या विजया कंठे मॅडम, तसेच भांडार प्रमुख जाधव आणि दादा पाटील यांनी १४ एप्रिल जयंती सदर्भात दरवर्षीपेक्षा चांगली व्यवस्था या वर्षी केली होती. खास करून मी रिपब्लीकन पक्षाचा अध्यक्ष या नात्याने मी आपले खास करून अभिनंदन करतो आणि आभारही मांडतो. चांगली व्येवस्था यावेळेस आम्हाला मिळाली पाण्याची सोय आणि चहाची सोय आणि पुर्ण शहरामध्ये चांगल्या पध्दतीने लाईव्ह कार्यक्रम महानगरपालिकेने सादर केल्या बद्दल मी सर्वांचे आपले खास करून अभिनंदन करीत आहे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** मा. महापौरजी मा. आयुक्त उप महापौर आणि सभागृहाचे सर्व सदस्य आज मी हे बोलू इच्छितो की पुर्ण भारतभर मुलगी वाचवा मुलगी शिकवा असा नारा चालला आहे आणि या मुद्दयाला घेवून आज ही असिफा नावाची आठ वर्षाची मुलगी जिच्यावर निदर्यहीपणे बलत्कार झाला तिला मारले गेले ही छोटी लाडकी मुलगी तिला सभागृहाकडून श्रंध्दाजली दिली जावी.

**महापालिका सचिव:—** सर्वांनी दोन मिनटे मौन पाळून श्रंध्दाजली दयावी.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** पुर्व नगरसेवक किशोर जग्याशी यांची आई यांचे पण निधन झाले आहे त्यांना सुध्दा श्रंध्दाजली दयावी.

**महापालिका सचिव:—** ठिक आहे. सर्वानी दोन मिनटे मौन पाळून श्रंध्दाजली दयावी.

---

सुचकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेश वदारिया

**शोक प्रस्ताव**

कु. असिफा नावाची आठ वर्षाची मुलीचा निर्दयीपणे बल्कार करुन तिला मारले गेले. या मुलीचे निधन झाले आहे.

तसेच माजी नगरसेवक श्री. किशोर जग्यासी यांच्या आई श्रीमती विणा जीवनलाल जग्यासी यांचे सुध्दा निधन झाले आहे.

वर उल्लेख केलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. १** **दिनांक:—१६/४/२०१८**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार कु. असिफा, श्रीमती विणा जीवनलाल जग्यासी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** मा महापौर मॅडम नवनिर्वाचित सदस्या नुकत्याच निवडून आलेल्या राष्ट्रवादी पक्षाकडून सुमन सचदेव यांचे या सभागृहामध्ये आपण स्वागत करूया आणि त्या निवडून आल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन मी आपणास विनंती करतो आपण त्यांचे अभिनंदन करावे, आपण शब्दसुमनांनी तसेच स्टेजवर बुके मागवून स्वागत करून सर्वाची ओळखही होईल. श्रीम.सुमन सचदेव, राष्ट्रवादीच्या नवनिर्वाचीत नगरसेवका यांचे या सभागृहामध्ये स्वागत आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** भारतीय जनता पार्टीकडूनही नवनिर्वाचित सदस्या, सुमन सचदेव यांचे या सभागृहामध्ये अभिनंदन करतो आणि त्यांच्या जिवनात राजकीय दृष्टया खूप प्रगती व्हावी धन्यवांद.

**सदस्या, श्रीमती सुमन सचदेव:—** राष्ट्रवादी पार्टीचे खुप खुप धन्यवाद.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** महापौर मॅडम, मागच्या एका महासभेमध्ये मी एक लक्षवेधी दिली होती, तिच्या उत्तरासाठी निंबाळकर साहेबानी सांगितले होते की पुढच्या महासभेत त्याची आम्ही पुर्ण माहीती देवू पुढच्या वर्षी किती पैसे महानगरपालिकेच्या तिजोरीत जमा झाले होते? ते किती कोठे कोठे खर्च झाले होते? शिल्लक किती आहेत? तर त्यावेळेस त्यांनी सांगितले होते की पुढच्या महासभेत सर्व नगरसेवकांना पुर्ण माहीती देण्यात येईल, कृपया ती माहीती सर्वांना मिळावी धन्यवांद.

**महापालिका सचिव :—** प्रश्नोत्तरे......... प्रश्न क्र.२ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे.

**प्रश्न क्र.२:—** (१)पालिका सेवा मे कार्यरत सफाई कांमगार श्री. राजेंद्र अढांगळे इन्होने शासन और प्रशासन दोनो की दिशाभूल करके सेवा हस्तगत कि है। उनके उपर की गई कारवाई की विस्तृत जानकारी दि जाये।

अ. सफाई कांमगार श्री. राजेंद्र अढांगळे इन्होने बेकायदेशिर तरिको से सेवा प्राप्त की है इस बात के सभी कागद पत्र और पुरावे पालिका प्रशासन के पास उपलब्ध होते हूऐ आज तक उनके उपर निलंबन और फौजदारी गुन्हा दाखल करने की कारवाई नही की गई इसका कारण क्या है?

शासन राजपत्र में नाम बदल कर एक व्यक्ती राज्यसरकार के अलग अलग दो विभाग मे काम कर सकता है ऐसी कानून तजविज पालिका प्रशासन व्दारा की गई हो तो उस बारे में विस्तृत पूरावे के साथ जानकारी दि जाये ।

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** कोण देणार याचे उत्तर? या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने दयायला पाहीजे, जनतेचा नाही, जनतेने उत्तर दिले आहे. मा. महापौर मा. उप महापौर मा. आयुक्त साहेब मला उप आयुक्त किंवा आयुक्त साहेब, यांनी उत्तर दयावे.

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** उप आयुक्त साहेब काही कारणासाठी, मिंटीगसाठी कामानिमीत्त कोकण भवनला गेलेले आहेत.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—** अर्ध्या तासामधले तीन—चार मिनीटे अशीच वाया जात आहेत. प्रश्नोत्तरे फक्त अर्ध्या तासाचेच आहेत.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मा. महापौर, सचिव मॅडम, उप महापौर, आज फार महत्वाचे विषय आहेत आता मॅडम बसल्यात आयुक्त म्हणून तर जे काही आम्ही निर्णय घेवू त्याचे आमलबजावणी बाबत त्यांना अधिकार आहे की नाही नाहीतर मागच्यावेळी सारखे होयाचे परवांनगी नाही कारण विषय महत्वाचे आहेत तर कृपया मॅडमनी सांगावे की अधिकार आहेत म्हणजे तुमच्याकडे अधिकार दिलाय म्हणून.

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—** मा महापौर मॅडम, मा उप महापौर, आणि सर्व सन्मानिय सभागृह आजच्या या महत्वाच्या महासभेसाठी आमचे आयुक्त साहेब कल्याण डोंबीवली महापालिकेचे आयुक्त त्याच्याकडे आपल्या महापालिकेचा अतिरिक्त कार्यभार आहे. त्यांना मंत्री महोदयांकडे आणि आपले जे दुसरे उप आयुक्त यांना कोकणभवन आयुक्त येथे मिंटीगसाठी बोलविले आहे, तर त्यांनी सांगितले आहे की आजची महासभा कोणत्याही परिस्थितीत घ्या आता पुन्हा सर्व सभागृहाला मी हे सांगू इच्छिते की जे निर्णय घेणार आहेत ते आपल्याला घ्यायाचे आहेत आणि त्याची अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे. तर निर्णयाच्या बाबतीत आयुक्तांचा सहभाग तसे पाहीले तर काहीच नाही, आपल्याला फक्त येवढेच सांगायचे आहे की हे बरोबर आहे की चुकीचे आहे. मा. महापौर महोदया, मा.उप महापौर, सन्मानिय सभागृह आता जो प्रश्न क्र. २, सन्माननिय सदस्य, श्री. भारत गंगोत्री यांचा प्रश्न क्र. २ आहे, तो आहे श्री. रमेश भानुदास आंडागळे त्यांच्यावर जी कारवाई झाली नाही आज पर्यंत त्या संदर्भात त्यांचा प्रश्न आहे. आणि त्याच्यासाठी प्रशासनाकडून जी कारवाई आजपर्यंत केली आहे, त्यामध्ये दोने मुद्दे खूप महत्वाचे आहेत. पहिला मुद्दा जी पाटणकर साहेबांची चौकशी पुर्ण झाली होती, तसा गुन्हा दाखल करणेसाठी आम्ही अनेकवेळा २०१७ पासून २०१८ मध्ये त्याचा पाठपुरावा केला आहे आणि आम्ही लेखी पत्र सुदधा पोलिस विभागाला दिले आहे. तरीही त्यांच्यावर आजपर्यंत गुन्हा दाखल केला नाही. दुसरा मुद्दा जर पाटणकर साहेबांची जी चौकशी केली होती आणि त्याचे जे पण रिपोर्ट आहेत, ते जर आमच्या एम.सी.आर. नियमा प्रमाणे, जे आमचे सेवाभरती नियम आहेत, संपुर्ण चौकशी झाली पाहीजे तर थर्डी पार्टी चौकशी आमचे जे चौकशी अधिकारी आहत, त्यांच्याकडून परत चौकशी करावी लागेल. अतापर्यंत एफ.आय.आर. पोलिस विभागाने का दाखला केला नाही? त्यांच्याकडून आम्हाला लेखी स्वरूपात काहीच मिळाले नाही. अनलेस अनटील त्यांच्यावर एफ.आर.आय. दाखल होत नाही, तर आम्हांला त्यांच्या विरोधात एम.सी.आर. नियमा प्रमाणे कारवाई करण्याची कोणतीही तरतुद नाही?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** यामध्ये आयुक्तांनी नविन चौकशी लावली होती त्याचा उल्लेख कुठेच नाही? आयुक्त साहेबांनी स्वत: मनिष हिवरेला चौकशीसाठी बसविले होते, त्या चौकशीचा खुलासा कुठे आहे?

**सहाय्यक आयुक्त, श्री.मनिष हिवरे:—** मला चौकशी करण्या संदर्भात कोणत्याच सुचना दिल्या नव्हत्या,

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** आयुक्त साहेबांनी माझ्या समोर सांगितले होत यांचे सर्व डिटेल काढून आणा, तर आपण त्या डिटेलचे काय केले?

**सहाय्यक आयुक्त, श्री.मनिष हिवरे:—** त्याचे डिटेल काढले आहेत, ते सर्व फाईल मध्ये आहेत.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** त्याच्यामध्ये तुम्हांला काय मिळाले?

**सहाय्यक आयुक्त, श्री.मनिष हिवरे:—** आता पर्यंत तर मला चौकशी करायची नव्हती, त्यामुळे मी काही केले नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** जे आयुक्त साहेबांनी आदेश दिले होते त्याचे काही केले नाही आपण

**सहाय्यक आयुक्त, श्री.मनिष हिवरे:—** यामध्ये चौकशी अधिका—यांनी जे रिपोर्ट दिले आहेत, त्याप्रमाणे मी कारवाई केली आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** हे चुकीचे उत्तर आहे, मला बरोबर उत्तर पाहीजे याच्यात सरळ सरळ चुक दिसत आहे, समोरच्याने जो दुस—या जागेवर नोकरीला आहे, रमेश भानुदास आडांगळे त्याला वकीलाची नोटीस दिल्या नंतर सुध्दा आपण त्याच्यावर कारवाई केलेली नाही. त्याची पत्नी महापालिकेमध्ये पॅनल नं. १६ मध्ये काम करते, श्रीम. वैजंता तुम्ही काय करता याच्यामध्ये?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** बऱ्याच वर्षापासून हा प्रश्न चालेला आहे, नक्की प्रशासनाची भुमिका या बाबत काय आहे? काय तो सदोष आहे, की निर्दोष आहे, काही तरी शेवटच्या निष्कर्षा पर्यंत पोहचले पाहीजे. किती वर्षा पासून हे चालले आहे. हे प्रशासन चालणार आहे का? एक नगरसेवक, जबाबदार माणूस एका कर्मचाऱ्याचा प्रश्न गेल्या एक वर्षापासून विचारत आहे, त्या प्रश्नाचे उत्तर नाही तुमच्याकडे? हे तुम्ही प्रशासन चालवणार आहेत का? नक्की काय? तो जर व्यवस्थित असेल तर तसे उत्तर दया, नाही. त्याचा काही दोष नाही म्हणून, असेल तर त्याच्यावर कारवाई झाली पाहीजे, मुद्दा का वारवांर उपस्थित होतो?

**सहाय्यक आयुक्त, श्री.मनिष हिवरेः—** त्याच्यामध्ये श्री. पाटणकर साहेब होते.....

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** पाटणकर साहेब जावून किती वर्षे झाली? पाटणकर साहेब जावून वर्ष किती झाली नक्की काय होत, त्याच्यामध्ये?

**सहाय्यक आयुक्त, श्री.मनिष हिवरेः—** एक, दिड वर्षे झाले आहे साधारण.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** तोच जर त्याच्यामध्ये काही दोष नसेल तस सांगा सभागृहाला, काही तरी ठोस...

**सहाय्यक आयुक्त, श्री.मनिष हिवरेः—** सर त्याच्यामध्ये असे होते की पाटणकर साहेबांनी जे निर्देश दिले होते त्यामध्ये, त्याच्यामध्ये असे सांगितले होते की सदर जो गुन्हा आहे तो फौजदारी स्वरूपाचा आहे, तर त्याच्यावर तुम्ही फौजदारी गुन्हा दाखल करावा.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** हा मग

**सहाय्यक आयुक्त, श्री.मनिष हिवरेः—** आपण पोलिसांना वारंवार पत्र दिले आहे परंतु पोलिसांनी अजून पर्यंत गून्हा नोंद करून घेतला नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** पोलिस ऐकत नाही का? पोलिसांचे वरिष्ठ नाहीत का? जर एखादा पोलिस त्यामध्ये सहभागी असेल, तर वरच्यांना कळवा. त्याचा तपास करा कुठेतरी हा प्रश्न तडीस लावा नाहीतर तो निर्दोष आहे असे सांगा. हे काय चालेले आहे? वर्षानुवर्ष एक प्रश्न विचारत आहेत, त्या प्रश्नाचे एक कर्मचा—या विषयी तो दोषी असेल तर त्याच्यावर कारवाई झाली पाहीजे, निर्दोष असेल तर तशी कारवाई झाली पाहीजे, का होत नाही? महापौर मॅडम काय आहे? एक कर्मचा—या विषयी एक नगरसेवक वर्षानुवर्ष एक नगरसेवक विचारतो त्याचे उत्तर देवू शकत नाहीत किंवा त्याच्यावर कारवाई होत नाही. असे चालणार आहे का? आणि पुन्हा प्रशासन पाठ थोपटायची आमचे कार्यक्षम प्रशासन आहे, म्हणून. तो निर्दोष असेल तर तसे सांगा या ठिकाणी त्याचा दोष नाही, त्याच्यावर खोटे आरोप आहेत आणि आरोपात थत्य असेल तर त्याच्यावर कारवाई झाली पाहीजे, पोलिस कारवाई करत नसतील तर त्यांच्या वरिष्ठांना कळवा, का होत नाही?

**सदस्य, श्री.भारत राजवानीः—** महापौर मॅडम त्यासाठी मी पत्र दिले आहे तो जर निर्दोष असेल तर माझ्यावरती गुन्हा दाखल करा, त्याच्या नंतर पण ती कारवाई पुढे जात नाही आणि सतत विषय टाळत आहेत आणि प्रशासन आम्हाला फसवत आहे आणि तीन वर्षापासून हा विषय चालला आहे. समोर जो श्री.रमेश भानुदासच्या जागेवर नोकरीला दुसरा व्यक्ति लागला आहे, रमेश भानुदासची पत्नी काम करते पॅनल १६ मध्ये, तीचे रेशनिंग कार्ड वेगळे आहे, सर्व डिटेल मी काढून आणले आहते.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** सन्मानिय सदस्य, आमच्या नगरसेवकांचा प्रश्न एक वर्षापासून पेंडींग राहत आला आहे....

**सदस्य, श्री.भारत राजवानीः—** तीन वर्षापासून मॅडम, तीन वर्षापासून कारवाई चालू आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** ज्यावेळेपासून तुमचा प्रश्न पेंडींग आहे, आपण लवकरात लवकर या प्रश्नाच्या उत्तरासहीत पुढच्या मिंटीगमध्य हजर राहावे.

**सदस्य, श्री.भारत राजवानीः—** कारवाई करून उत्तर दया.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** योग्य ती कारवाई करून आपण त्याचे उत्तर दया.

**<u>महापालिका सचिव:—</u>** हा प्रश्न पुढच्या सभेपर्यंत पेंडीग ठेवत आहे, प्रश्न क्र. १० हा श्री. भगवान भालेराव यांचा आहे.

**?**

**<u>प्रश्न क्र.१०:—</u>** उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा दिनांक २०/८/२०१६ रोजी झाली होती. सदर सभेमध्ये नगररचनाकार श्री. कर्पे यांनी चुकीच्या पध्दतीने वाढीव मजल्याचे (सुधारीत) चटईक्षेत्र निर्देशांकाचे उल्लंघन करुन विकासकाच्या आर्थिक हिताचे प्लॅन मंजूर केले आहेत, अशी चर्चा घडवून आणली. त्या चर्चेच्या शेवटी महापौर तथा मा. पीठासीन अधिकारी यांनी उत्तर देतांना मंजूर केलेला प्लॅन नियमानुसार तपासला किंवा नाही. तसेच उच्च नगररचना विभागामार्फत जोपर्यंत श्री. कर्पे साहेब यांनी केलेल्या प्लॅनची छाननी होत नाही तोपर्यंत स्थगिती दयावी असे आदेश दिले असतांना मग त्या प्लॅनची कामे कोणत्या आदेशाने व कोणाच्या देखरेखीखाली सुरु आहेत याचे उत्तर येणा—या महासभेत मिळावे, जेणेकरुन सदनीका विकत घेणा—याची कोणतीही फसवणूक होणार नाही, ही विंती.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** श्री. कर्पेच्या काळात झालेल्या ३८ प्लॉन बाबत, सोनवणे साहेब, बिल्डरचा फोन आला आहे का? का कर्पेचा फोन आला आहे?

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—</u>** मा.महापौर, उप महापौर, मा. आयुक्त, आणि सभागृह याच्यामध्ये ३८ प्रकरण आहेत, महासभेने त्याला स्टे दिला होता. त्या अनुषंगाने आयुक्तानी कोकण भवनच्या डायरेक्टरांना पत्र पाठविले होते, की एवढया मोठया स्तरावर माझ्या सारख्या समकक्ष अधिका—यांनी चौकशी करणे योग्य नाही. तर त्यांनी जॉइन्ड डायरेक्टराला पत्र लिहिले होते की, चौकशी तुम्ही करा आणि त्याच्यावरची झालेली पहाणी तुम्ही आम्हाला दया. त्याच्यावर त्यांच्याकडून असे उत्तर आले की आमच्याकडे माणसे नाहीत, तुम्ही नगररचना विभागाचा कोणी रिटायर्ड अधिकारी असेल, त्यांना नेमुन तुम्ही ती स्क्रुटनी करा आणि तुम्ही तुमच्या स्तरावर निर्णय घ्या असे त्यांच्याकडून पत्र आले. त्याच्या नंतर मी साहेबांशी बोललो, तर साहेबांनी सांगितले की आपण त्याच्यावरती कारवाई करू.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** कल्याण कोर्टामध्ये आपण एफिडेव्हीट दिले ते आपण काय दिले?

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—</u>** एफिडेव्हीट वैगेरे आपण काही दिले नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** तर मग काय म्हणणे मांडले आहे कल्याण कोर्टात? स्टे संदर्भात आपण काय म्हणणे मांडले आहे? त्यांना स्टे मिळाला तेव्हा आपण काय म्हणणे मांडले आहे?

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—</u>** याच्यामध्ये फक्त झोनिंग काय होते, तेवढेच लिहून दिलेले आहे, बाकीचे स्क्रुटनी....

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** साहेब तुम्ही म्हणता कोकण आयुक्तांकडून पत्र आले, कोकण आयुक्तांकडे माणसे नाहीत, तुम्ही रिटार्यड अधिकारी नेमणार आहेत, या सगळया गोष्टी झाल्या तो पर्यंत या बिल्डींगी पुर्ण तयार झालेल्या आहेत, लोक त्यामध्ये फ्लॅट घेतील, या नंतर तुम्ही अनाधिकृत करणार, ही परिस्थिती काय? नक्की तुम्ही काय केले, तुमच्या विभागाने काय कारवाई केली? त्याची जेव्हा चौकशी होईल, तेव्हा तुम्ही नेमाल, आता सध्या काय? आम्ही प्रश्न दिल्यापासून एवढया दिवसामध्ये काय केले? आठ नऊ महीन्यामध्ये तुमच्या विभागाने, ओसी दिली का त्यांना?

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—</u>** ओसी कोणालाच दिलेली नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>**मग ओसी देण्याच्या तयारीत आहेत का तुम्ही?

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—</u>** नाही

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** मग त्यांच्यावर काय कारवाई करणार आहेत?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** ओसी का देणार नाहीत, तुम्ही त्यांना? ओसी का देणार नाहीत ते बरोबर आहे का चुकीचे आहे तेवढे सांग? तुम्ही फक्त प्रत्येक गोष्ट शासनावर, केंद्र शासनावर, ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे, त्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे त्या विभागाचे तुम्ही प्रमुख आहेत. आगोदरच्या टि.पी. ने केलेले प्लॅन ते बरोबर आहेत की चुकीचे आहेत, चुकीचे असतील तर तसे लिहून दया आणि बरोबर असतील तर त्यांना ओसी दया, तुम्ही ओसी का थांबवून ठेवणार? त्या चुकीच्या आहेत म्हणून, तसे रिमार्क दया, चुकीच्या आहेत का?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः–** अजून माझ्याकडे ओसीसाठी कोणी आलेले नाही?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** तुमचा निष्कर्ष काय आहे?

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः–** तुमचा निष्कर्ष काय? ते विचारतात ते?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः–** जेव्हा माझ्या समोर येणार, मला विचारणार त्याच्या नंतर मी निष्कर्ष देणार .

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः–** आता जी कामे चालू आहेत, ती बरोबर आहेत का?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः–** ते सर्व बघून मी त्याचे उत्तर देईल.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** नाही नाही आता पर्यंत तुम्ही पाहीले नाहीत का? तुमची जबाबदारी नाही का ते कामे बघायची, तुम्ही आतापर्यंत येथे आल्यापासून एकही प्लॅन मंजूर केलेले नाही.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः–** पाच प्लॅन मंजूर केलेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** पाच प्लॉन मंजुर केलेत, किती महीन्यात?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः–** दोन महीन्यात.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** याच्या आगोदर सुध्दा तुमच्याकडे चार्ज होता, या पुर्वीच्या वर्षभरात तुम्ही या ठिकाणी कामकाज काय काय केले आहे? पडताळणी झाली पाहीजे आयुक्त साहेब, प्रत्येक अधिकाऱ्याने केलेले कामकाज काय केले? त्याचे मुल्यमापन झाले पाहीजे आपल्याकडे प्रथाच नाही. त्यामुळे जो काही अधिकारी त्यांच्या मनात येईल तसे चालले आहे. आम्ही काय करतो, काय केले पाहीजे त्याचा अहवाल तुम्ही महासभेत ठेवत जा आणि तुम्ही मागच्या महासभेत सांगितले मला अधिकार नाही, आता तुम्ही उत्तर फिरविलेले आहे आता येथे जी चर्चा होते, ती संपुर्ण चर्चा इतिवृत्तासह, त्याच्या अंमलबजावणीसह पुढच्या महासभेत ठेवावी, नाहीतर म्हणाल आयुक्तांनी काय सांगितले ते माहीत नाही? असे होता कामा नये तुम्ही सांगितले, बेजबाबदार पणाने सांगितले की ओसी मी देणार नाही, का देणार नाही?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः–** जेव्हा जो माझ्याकडे अर्ज करेल, त्याची स्क्रटीनी होईल. त्याच्या नंतर..

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** किती केसेस पेंडीग आहेत? ओसी बाबत..

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः–** मी तेच सांगतो माझ्याकडे आज पर्यंत...

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** ओसी दाबवण्याचे म्हणजे काही तरी करण्यासाठी एक कुरान आहे.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः–** आज पर्यंत माझ्याकडे ओसी मागण्यासाठी कोणी आलेले नाही आणि ज्यांनी, ज्यांनी ओसी मांगितल्या आहेत, त्यांना मी त्रुटी पत्रक दिलेले आहे. माझ्याकडे एकही पेडींग नाही, हे तुम्हांला मी दाखवू शकतो.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** एक गोष्ट लक्षात ठेवा, सगळयासकट, सरसकट चोर नाहीत, जे चांगले आहेत त्यांना न्याय मिळाच पाहीजे. त्यामुळे सगळयांच्याच ओसी थांबवून ठेवणे बरोबर नाही आणि जर ३८ प्लॅनच्या विषयी त्यांनी विचारले असेल, त्याची वस्तुस्थिती पुढच्या महासभेत या ठिकाणी तुम्ही दयायाची. कारण प्रशासनाचे, त्या विभागाचे प्रमुख तुम्ही आहात, आम्ही शासनाला विचारायला जाणार नाहीत, आम्ही तुमच्या विभागाला विचारायला जाणार त्याचे उत्तर ३८ प्लॅन ते बरोबर आहेत की चुकीचे आहेत, याची माहीती तुम्ही या ठिकाणी दयायाची.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** ३८ प्लॅन आहेत त्याच्यामध्ये स्कुटीनी होणार नाही. पुढच्या महासभेत तुम्ही म्हणतात, त्याच्याकडे तेवढा स्टाफ पाहीजे, प्रत्येकाकडे कामे दिलेली आहेत, झिरो पेंडींगशीमध्ये आज एकही.....

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** सोनावणे साहेब, भालेरावानी प्रश्न विचारून आज सात, आठ महीने झाले आहेत, त्याच्या नंतर आजपर्यंत तुम्ही त्या ३८ प्लॅन जे आहेत, त्या प्लॅनचे कुठल्याही प्रकारे व्हेरीफिकेशन केलेले नाही. ते खरोखर चुकीचे आहेत, की बरोबर आहेत हेही तुम्हााला माहीती नाही, कमीत कमी या सात, आठ महीन्यात काहीतरी रिपोर्ट तर दयायाला पाहीजे होता.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** ठिक आहे, पुढच्या महासभेपर्यंत मी काही तरी प्रयत्न करतो.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** भालेराव साहेब, पुढच्या महासभे पर्यंत ते पुर्ण रिपोर्ट देतात.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मा. महापौरजी, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, ३८ प्लॅनच्या संदर्भामध्ये आताच नगररचनाकार यांनी सांगितले, परंतु त्या ३८ प्लॅनच्या सदर्भामध्ये मला वाटते एक दोन महीन्यापुर्वी आयुक्त साहेबांनी हेरिंग घेतल्या होत्या, त्या हेरिंगमध्ये त्यांना परत तारीख देण्यात आली मग त्या हेरिंगनंतर तारीख देण्याच्या मधल्या कालावधीमध्ये, त्या प्लॅनचे काय झाले? त्यांना का तारीख देण्यात आली? का सुनावणी त्यावेळेस त्यांची पुर्ण करण्यात आली नाही?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** दोन महीन्यापुर्वी मी आयुक्त साहेबांकडे हे ठेवलेले आहे, आयुक्त साहेबांनी त्याच्यावर निर्णय घेतला नाही. मी त्यांना सुनावणीसाठी कारण ? हे सर्व बिल्डींग प्लॅन पास झाले आहेत. मला काही अॅक्शन घेण्याच्या आधी, त्यांना सुनावणीची एक संधी देणे भाग होते, मी त्यांना पत्र दिले त्याच्यानंतर त्यांनी माझ्याकडे १५ दिवसाची वेळ मागीतली, १५ दिवसाच्या वेळेमध्ये मी आयुक्त साहेबांनाच विनंती केली तुम्ही तुमच्या याच्यात घ्या. कारण जनरल बॉडीमध्ये हा प्रश्न उपस्थितीत झालाय, ठिक आहे, म्हणाले? मी माझ्या चेंबरमध्ये मी त्याची सुनावणी ठेवतो, त्याची तारीख मला अजुन पर्यंत दिलेली नाही, आजुनही ती नस्ती आयुक्त साहेबांच्या ऑफिसमध्ये आहे.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** महापौर मॅडम, याचा अर्थ असा आहे की लोक प्लॅन पास करून तेथे लोकानां राहण्यासाठी घर दया आणि ते घर विकल्या नंतर सुध्दा तेथे राहणारे लोक महापालिकेत चकरा मारून थकून जातात. त्याच्यावर काहीच निर्णय होणार नाही? बिल्डींग तयार आहे. ३८ प्लॅनच्या संदर्भात निर्णय होणे योग्य ठरत नाही का? आयुक्त साहेबांनी १५ दिवसाची वेळ दिली, त्याच्या नंतर त्याला आज दोन तीन महीने झाले, माणसांचा प्रक्षोभ वाढेल. त्या बिल्डींगला लाईपाणी तुम्ही दिलेली आहे, परंतु ओसी नाही आणि तो प्रश्न प्रलंबीत आहे, मग अशा वेळेस जर त्यांना ओसी देण्याचा मुद्दा आला तर तुम्ही त्यांची हियरींग घेवून त्यांना ओसी कधी देणार? जर ३८ प्लॅनच्या संदर्भात तुम्ही हिअरींग घेतली तर १५ दिवसानंतर त्यांनी किंवा तुम्ही त्यांना कळविले नाही, तर त्या लोकांनी, बिल्डींगमध्ये राहणाऱ्या रहीवाशांचे काय?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** आता आयुक्तांनी त्याच्यावर का निर्णय घेतला नाही तर मी तुम्हाला कसे उत्तर देणार?

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** आयुक्त महोदय सांगा हे काय होत आहे? बरोबर आहे.

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—** मा. महापौर मॅडम, मा. उपमहापौर, सर्व सन्मानिय सभागृह आता जो येथे प्रश्न उपस्थित केलेला आहे, तो नगररचना विभागाशी संबंधीत होता आणि आहे आणि त्यांनी दिलेल्या ३८ बांधकाम परवनंग्या बाबत सर्व सभागृहात चर्चा सुरू होती किंवा आहे. आता सन्मानिय सदस्य, भगवान भालेराव आणि आशान साहेब यांनी हा जो प्रश्न उपस्थित केलाय की तत्कालीन आयुक्तांनी का निर्णय घेतला नाही किंवा आता नगररचानाकारांनी सांगितले की तुम्हांला त्यांची जी संचिका आहे, ती मुळ संचिका सर्व तत्कालीन आयुक्तांकडे आहे, त्यामुळे दोन्ही प्रश्नांचे उत्तर सोनावणे साहेब, देवू शकत नाहीत आणि मी इथे देवू शकत नाही.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** सभागृहामध्ये जर प्रश्नाचे उत्तरच मिळत नसेल, तर महापौर तो प्रश्न देवून काय फायदा? सांगा. सभागृह कसे चालणार? एक प्रश्न तीन, तीन वर्ष थांबला आहे, त्याचे कोणी उत्तर देण्यास तयार नाही. जर महासभेमध्ये एखादा प्रश्न येतो तर त्याचे उत्तर महासभेतील सर्व सदस्यांना मिळणे आवश्यक आहे. जर

नगररचनाकार येथे आहेत, आयुक्त साहेब येथे आहेत, तर उत्तर कधी मिळणार? त्या नस्तीवर सही आजुन का झाली नाही? मा. विरोधी पक्षनेत्यांनी आता सांगितले, ओसी का देता येत नाही? काय आडचण आहे? त्याचे कारण काय आहे? याचा निर्णय होणे उचित वाटत नाही का ही गोष्ट चुकीची आहे, महापौर मॅडम प्रत्येक गोष्टीला नियम आहे, आयुक्त साहेब, प्रत्येक वेळेस टाळाटाळ करून चालणार नाही.

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:—** महत्वाचा विषय असा आहे, ३८ प्लॅनचा विषय आहेच आहे, पण ते कर्पे गायब आहेत, त्या ३८ प्लॅनमुळे त्याच काय? हा विषय मोठा गंभीर आहे.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** मी माहीती घेवून पुढच्या महासभेपर्यंत मी देण्याची व्यवस्था करतो.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** तुम्ही त्याच्यावर कारवाई काय कराल? पुढच्या महासभे पर्यंत देत असाल उत्तर? उत्तर नाही, कारवाईचे उत्तर दयावे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** महापौर महोदया, हा विषय फार भावनिक आहे, जोखमीचा विषय आहे. आपले विभाग अधिकारी कानावर हात ठेवणार, त्यामध्ये नुकसान होईल मग पुन्हा ८५५ होऊन जाईल, हे आता नगररचना विभागाचे काम आहे, त्याची पडताळणी करा. एका कर्पेनी किंवा नगररचनाकारांनी पास केले म्हणजे संपले असे काय नाही? त्याला वाचवण्याचा प्रयत्न करू नका? जे असेल ते तुम्ही नागरीकांसाठी काम करतात तर मग जे बरोबर असतील त्यांना ओसी दया नसतील, तर त्यावर रिमार्क मारा आणि आता पासूनच ते तोडायला लागा,चुकीचे असतील ते आता पासूनच तोडायला लागा, नाहीतर सर्वस्वी जबाबदारी तुमची असेल त्याच्यामध्ये तुम्ही गोवले जाल आणि आयुक्त म्हणून तुम्ही सुध्दा शहरातील नागरीकांचे नुकसान झाले तर जबाबदार नाही? त्याला तुम्ही जबाबदार आहेत, या पुढे ३८ प्लॅनचा मुद्दा आम्ही वारवांर उचलुन सुध्दा जर त्याच्यावर कारवाई झाली नाही आणि दोन वर्षानी जर सांगितले की, या बेकादेशीर आहेत या इमारतीत राहणाऱ्या नागरीकांनी घरे खाली करा, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी ही नगररचनाकाराची असेल आणि आयुक्ताची असेल हे लक्षात ठेवा. त्यामुळे पुढच्या महासभेमध्ये एका महीन्याच्या आतमध्ये तुम्हांला जर त्यासाठी कर्मचारी लागले तर घ्या, त्याला मान्यता पाहीजेत असेल तर आम्ही देतो आणि ते व्हेरीफाय करून ३८ आणि त्यावेळेस जे झालेले प्लॅन आहेत, ते सर्वच्या सर्व कायदेशीर असतील तर त्याची पुर्तता तर करा बेकादेशीर असतील तर आता पासून कारवाई करा. स्टे वगैरे काही नाही, हे सगळे नाटक आहे. राहायला गेल्यानंतर लोकांचे नुकसान नको आहे. याची सर्व जबाबदारी तुमची असेल. आतापासुनच कामाला लागा उडाउडविची उत्तरे नको आहेत. ३८ बिल्डींगचे प्लॅनचे पहीले मॅटर महापौर मॅडम, या महासभेने त्याला स्टे दिला आहे त्याच काम राजरोसपणे चालू आहे आणि आपले विभाग काही करू शकत नाही. ओसी दयायाची असेल तर ओसी देवून टाका त्यांना? म्हणजे लोक घ्यायाला मोकळे ओसी, आम्ही देणार नाही आणि काम चालू आहे ही काय पध्दत झाली? म्हणजे बेकादेशीर आहे हेही मान्य करतो आणि त्याला कायदेशीर मान्यताही देयाची नाही.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** मी बेकादेशीर आणि कायदेशीर असे काहीही म्हटले नाही, हिअरींग घेतल्या शिवाय ते होणार नाही आणि आयुक्त साहेबांकडे ती फाईल दोन महीने पेंडींग आहे, आता आयुक्त साहेबांना मी काय सांगायचे?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** आयुक्त साहेब महासभेपेक्षा मोठे नाहीत, ते महासभेत येवू दया कोणताही आयुक्त महासभेपेक्षा मोठा नाही, आयुक्तांना सुध्दा महासभेचे उत्तर दयायाचे आहे. पुढच्या महासभेत आयुक्तांनी सुध्दा उत्तर दयायाचे आहे.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** याच्यामध्ये प्रशासनिक आहे.

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:—** अहो, सोनावणे साहेब, विषय गंभीर होता, आयुक्ताकडे पण आयुक्तांनी लक्ष दयायाला पाहीजेत होते.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मी या संदर्भात एक उप प्रश्न विचारू इच्छितो मा महापौर मॅडम, आयुक्त साहेब, काय आहे की ३८ प्लॅन बाबत मला वाटत की आयुक्तांनी स्टे दिला होता, तरीही काम आता किती पुर्ण झाले आहे आणि किती चालू आहे हा पण एक गंभीर विषय आहे. जर प्रशासनाने त्याला जर स्टे दिला असेल आणि काम चालू असेल तर तुम्ही कारवाई काय केली?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** हेअरींग झालेच नाहीत, ते आलेले नाहीत म्हणून मी आयुक्त साहेबांकडे सबमिशन ठेवले.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** नाही मग त्या वेळेस प्रभाग अधिकारीनी ज्यांच्या ज्यांच्या क्षेत्रात होत त्या प्रभाग अधिकाऱ्यांनी त्याच्यावर काय कारवाई केली? कारण हा कसा लिगल प्रश्न आहे, इनलिगलचा तर बोलण्यात अर्थच नाही. कारण काय आहे आता बघा कमीत कमी या ३८ प्लॅनमध्ये एक गोष्ट तुम्ही लक्षात घ्या आज पाण्याची जेवढी समस्या आपल्याकडे आहे, तर मला वाटत रेन हारवेस्टींग प्रत्येकाला बंधनकारक आहे, तेवढे तरी तपासा महीना पडलाय.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** मी आयुक्तांशी या संदर्भात बोलतो.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** अहो कुठल्या आयुक्तांशी बोलणार तुम्ही? अहो ते येणार मेच्या ७ तारखेला ते बसलेत कल्याणला कशाला बोलायला लावता आम्हाला, आमची फक्त विनंती येवढी आहे की, तुम्ही नगररचना विभागाचे जे प्रभाग अधिकारी आहेत, त्यांना पाठवा काय परिस्थिती आहे? त्यांनी रेन हारवेस्टींगसाठी केले आहे का? जे जे...

**सदस्या, श्रीमती मिना सोनेंजी:—** रेन वॅाटर हारवेस्टींगसाठी कुठला स्पेशल ऑफीसर आहे आपल्याकडे? असे काही प्रोव्हीजन आहे का त्याच्यासाठी एक नेमू शकतो आपण.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** नेमू शकतो

**सदस्या, श्रीमती मिना सोनेंजी:—** तर का नाही नेमु शकत आपण? जो सोशल रिस्पॉसीबिलिटी आहे, छोटे छोटे पर्यावरणाच्या निमित्तांने कोण पुर्ण करणार आहेत, साहेब.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** त्याच्यामध्ये आपण अटी टाकतो, कायदे करायला पाहीजे, त्याच्या प्लॅनिंगमध्ये करायला पाहीजे.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेंजी:—** पण कोण बघणार ते जाऊन?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** ते आम्हीच बघतो.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेंजी:—** तुम्ही गेले आज पर्यंत तुम्ही मला हे सांगू शकता की रेन वॅाटर हारवेस्टींग कशी होते आणि काय आहे? यु नो दॅट यु हॅव दि नॉलेज ऑफ दॅट, तुम्ही जाऊन बघता ना? यु आर टॅलिंग मी जाऊन बघतो, मग तुम्ही काय बघता?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** अजुन पर्यत जो मोठा प्रोजेक्ट आहे, तो अजुन आलेला नाही पण जेव्हा आता ज्यांना प्लॅन पास केलेले आहे त्यांनी त्याचे प्रोव्हिजन ठेवण्याची कार्यवाही सुरू केली आहे, जेव्हा कॉर्पोरेशनला येतील.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेंजी:—** तुम्हाला माहीत आहे की त्याची प्रोसेस कशी आहे? म्हणजे तो बिल्डींगवाला करतो, तो बरोबर करतो की नाही करतो, हाऊ यु नो दॅट सर क्लीयर गोष्ट आहे, तुम्हाला माहीत आहे की रेन वॅाटर हारवेस्टींग काय आहे?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** जे पावसाचे पाणी आहे, जे वाहून जाते ते अडवायचे.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेंजी:—** कुठे अडवायचे ते?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** त्याला तुम्ही विहीर खोदल्यावर किंवा बोर टाकायची आहे आणि त्याच्यामध्ये ते पाणी साठवायचे आहे आणि त्याला परत रिसायकलिंग करायचे.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेंजी:—** पण ती प्रोसेस होते का?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** मी तुम्हांला तेच सांगतो की, जेव्हा...

**सदस्या, श्रीमती मिना सोनेंजी:—** कधी सांगणार सर, मला कधी पर्यंत रिपोर्ट देणार सर रेन वॅाटर हारवेस्टींग.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** पुढच्या वेळेला जेवढे जेवढे प्रोजेक्ट पुर्ण झाले आहेत, त्याचे पुढच्या महासभेमध्ये रिपोर्ट देतो.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौरजी, उप महापौर, आयुक्त मॅडम, प्लॅनचा जो विषय आहे, तो खूप गंभीर विषय आहे. त्याच बरोबर अजुन एक गंभीर विषय आहे शहराच्या बाबतीत की, उल्हासनगर महापालिका नगरचनाविभागामध्ये आता सहा. नगररचनाकार आहेत, संपुर्ण स्टाफ आहे, परंतु जे काम व्हायला पाहीजे ते होत नाही. त्याचे कारण हे आहे आपल्या शहराचे जे आर्कीटॅक आहेत, त्याचे लायसन्स रिन्यु करण्याचे प्रॉब्लेम खुप आहे. आपल्या महापालिकेचे अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करतात आणि त्याच्यामधून आपल्याला जास्त उत्पन्न मिळणार आहे. आपण जो बजेट पास केला, त्याच्यामध्ये १० करोड रूपये बिल्डींग परवाना येणार आहे. असे त्यामध्ये उल्लेख होता. पण असे जर असले तर एकही आर्कीटॅक उल्हासनगरमध्ये राहणार नाही आणि प्लॉन पास होणार नाही. तो आर्कीटॅक प्लॅन टाकणार नाही तर प्लॅन कुठुन पास होणार? जर आर्कीटॅक आहे, त्यांचे लायसन्स रिन्व्हू करणेसाठी महापालिका प्रशासनाने त्वरीत कारवाई केली पाहीजे, ती कारवाई होत नाही. त्याला जबाबदार महापालिका प्रशासन आहे असा माझा आरोप आहे. रेग्युलायजेशन तर सोडाच त्याची वाट लावलीय त्या विभागाने, पुर्ण महापालिकेच्या प्रशासनाने वाट लावली आहे परंतु जे आरर्किटेक आहेत त्यांचे लायसन्स लवकरात लवकर कसे रिनीव्हल होतील त्यासाठी मा. महापौर मॅडम यांनी प्रयत्न करावे अशी माझी आपेक्षा आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** महापौर साहेबा, बराच वेळ मी उभा आहे, येथे एक पत्र मिळाले होते आज मिटींग आहे, महानगरपालिकेच्या महासभेमध्ये, ही महानगरपालिका आहे. या महानगरपालिकेमध्ये सचिव पण बसलेल्या आहेत. आताच कोणत्या तरी अधिका—याने सांगितले की, आयुक्त साहेबांकडे सर्व संचिका पडलेल्या आहेत. ३८ जे प्रस्ताव आहेत, त्यांच्या संचिका आयुक्त साहेबांकडे पडलेल्या आहेत. आयुक्त साहेबांनी निर्णय घेतला नाही, तर कृपया सचिवांनी सांगावे कोणत्याही अधिकाऱ्याला कोणताही प्रस्ताव किती दिवसात पुर्ण करून महापालिकेच्या प्रशासनास पाठविले पाहीजे. कृपया सचिव मॅडम याचे उत्तर दया की, आयुक्त, टिपी, उप आयुक्त जेवढे पण संबंधित अधिकारी आहेत, नियमाप्रमाणे त्यांनी किती दिवसाच्या आत प्रस्तावावर निर्णय घेतला पाहीजे आणि आमचा जो नगररचना विभाग आहे, जे पण त्यांच्याकडे प्लॉन पास करण्यासाठी त्यांच्याकडे जातात ४२ येतात, ४२ पॉईंट आहेत, त्याला कोणी पुर्ण करीत नाही. या शहरामध्ये कॅम्पा कोला झाले नाही पाहीजे. अन्य जागेवर कंम्पाकोला बिल्डींग झाली होती. उल्हासनगरमध्ये कंम्पाकोला होऊ देवू नका लोकांना बेघर होवू देवू नका, तरी नियमानुसार आपले कर्तव्य वेळेवर पुर्ण करा. ही महासभा आहे आणि ही महानगरपालिका आहे, नगरपालिका नाही. ग्रामपंचायत नाही, आम्ही सर्व नगरसेवक १० हजार प्रत्येक महीन्याचे मानधन घेत आहेत. लोकांचे अडचणी दुर करणे आपले काम आहे. नियमाप्रमाणे चालणे आपले काम आहे, आपले कर्तव्य आहे. जर अधिकारी आपले कर्तव्य वेळेत पुर्ण करीत नसतील तर आम्ही कधी सहन करणार नाही. त्यासाठी जे आंदोलन करावे लागेल ते करू, कृपया या गोष्टीकडे लक्ष दयावे आणि सचिव मॅडम यांचे उत्तर दया, संपुर्ण महासभेला ही माहीती पाहीजे की, कोणी किती दिवसाच्या आत अधिकाऱ्यांनी कोणतीही फाईल किती दिवस आपल्याकडे ठेवायची आहे आणि किती दिवसाच्या आत परत पाठवावी, कृपया सचिव साहेब उत्तर दया नाहीतर मी जमीनीवर बसतो धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी हे स्टेज जवळ मोकळया जागेत खाली बसले.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** महापौर महोदया, एक प्रश्न होता त्याच्यावर ही चर्चा चालू आहे. मला वाटते टाऊन प्लॅनिंग या विषयावर एक विशेष महासभा बोलविली पाहीजे. याच्यामध्ये रेग्युलाजेशनचा मुद्दा पण काय झाले या महासभेला माहीत नाही, लोकांना माहीत नाही. एक मिनिट दादा काय झाले? मी बोलत आहे. या महापालिकेमध्ये कुठलेही प्लॅन पास होत नाहीत. कॉमन डी.सी.रूल प्लॅन मंजुर करतानाच आम्ही मुद्दा उपस्थित केला होता की डि. सी. रूल नाहीत प्लॅन पास करून उपयोग काय? अजून डी.सी. रूलचे काय झाले? कॉमन डी.सी. रूल चालू होणार, कधी येतील, महापौर महोदया, या उल्हासनगरसाठी स्पेशल डि.सी. रूल येणार आहेत. जे मायनर मॉडीफिकेशनचे प्रस्ताव पाठविले त्याचे काय झाले? हे सर्व विषय आहेत, ते यायला पाहीजेत. आमचे जे आरर्किटेकचे लायसन्स आहेत किती वर्षापासून पेंडिग विषय आहे? देणार आहेत की नाही हेच प्रशासन बोलत नाही देणार नसतील तर तसे लिहून दया नाही देणार पेंडिग ठेवण्याचे कारण काय आहे? तर टाऊन प्लॅनिंगचे जे विषय आहेत आयुक्त महोदय, हे संपुर्ण विषय याची गंभीरतेने दखल घ्या की डि.सी. रूलचे काय झाले आहे? मागे आयुक्त साहेबांनी आपल्या चेंबर मध्ये मिटींग घेतली होती, त्यानंतर काय झाले माहीती नाही? आमचे डि.सी. रूल

कधी बनणार? लोकांना आम्ही फायदा, सुविधा कधी देणार? डि.सी.डिपार्टमेंट आहेत, आपण बसलो आहेत, महासभा घेतात, स्थायी समितीची सभा घेतात, आपले डी.सी. रूल नाहीत आणि अजुन पर्यंत फायनल नाही, कधी फायनल होणार? झाले आहे की, नाही. जोपर्यंत डि.सी. रूलस नाहीत आरकिटेक लोकांनी लायसन्स रिनीव्हलसाठी अर्ज केले होते त्याचे काय झाले? त्यानंतर डि.सी. रूलसचे काय झाले? काहीच कळत नाही. आम्ही लोकांना सांगायचे की, डि.सी. रूल्स कधी येतील? यांनी सांगितले होते फेब्रुवारीमध्ये येणार आहेत सी.डी.आर. कॉमन डि.सी. रूल्स.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** दुसरा सन २०१५ मध्ये जे सरकारने लोकांच्या सुविधांसाठी जो जी.आर. काढलेला आहे, त्यामध्ये महापौर मॅडम, फक्त एक महीन्याची मुदत दिलेली आहे, रेग्युलेजेशन करणेसाठी.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** महापौरजी, माझी एक विनंती अशी आहे की, ३८ प्लॅनसाठी यांनी जे सांगितले आहे की आयुक्तांकडे फाईल पेडिंग आहेत. महापौर मॅडम आपण त्यांना आदेश दया की कमीत कमी पुढच्या मिटिंगमध्ये त्यांच्याकडून काय रिपोर्ट आहेत, आयुक्तांकडून आले नाही, परंतु यांच्याकडून तर रिर्पोट आला पाहीजे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** हे त्याचे उत्तर देणार आहेत, कृपया आपण शांतपणे ऐका.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः—** हिअरींगच्या तारखा घेण्यासाठी आयुक्तांनी सांगितले मी हेरिंग घेतो त्या हेरिंग माझ्या चेंबरमध्ये ठेवा आणि त्याच तारखा आणि वेळ मिळण्यासाठी मी साहेबांकडे सर्व फायली ठेवलेल्या होत्या. आजुन पर्यंत मला तारीख मिळालेली नाही, आयुक्तांकडून पहीली गोष्ट, दुसरी गोष्ट महापौरांच्या चेंबरमध्ये जी मिटिंग झाली ते नोटींग मी दुसऱ्या दिवशी निंबाळकर साहेबांकडे ठेवले होते, त्याच्यावर आज पर्यंत त्यांनी निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे आयुक्तांनी का निर्णय घेतलेला नाही याचे उत्तर मी नाही देवू शकणार?

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** साहेब तुमचा अहवाल तुमच्याकडे तयार आहे, आयुक्तांनी का पेंडिग ठेवला? का नाही ठेवला तो त्यांचा भाग आहे. परंतु कमीत कमी तुमचा अहवाल तुमच्या स्तरावरचा अहवाल तर येथे देवू शकता.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः—** महापौर मॅडमकडे जे जे घडले..

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** आयुक्तांनी काय निर्णय घ्यायाचा, नाही घ्यायाचा तो त्यांचा भाग आहे.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः—** मी तुम्हाला तेच सांगतो ना आयुक्तांनी महापौर साहेबाच्या दालनामध्ये जी बैठक झाली त्याच्यामध्ये ठरले की, एवढी फी घ्यायची एवढे दरवर्षी जे त्यांचे रिन्युवेशन चार्जेस आहेत, एक लाख डिपॉझीट घ्यायाचे पंचवीस हजार रूपये त्यांची वर्षाची फी आहे, ती घ्यायाची.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** ३८ प्लॅनच्या बददल बोलतो मी.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः—** मी तुम्हाला तेच सांगितले.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** मग सभागृहात येवू दया.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः—** मी त्यांना हिअरींग दिली, तारीख दिली त्या वेळेला ते कोणी आले नाही. त्यांनी पुढची तारीख मांगितली १५ तारखे नंतर, १५ दिवसाची मुदत मांगितली हे असे ऐकणार नाहीत म्हणून मी आयुक्त साहेबांना सांगितले. याची हिअरींग तुम्ही तुमच्या चेंबरमध्ये ठेवा आणि तिथे आपण निर्णय घेऊ. त्याच्यावरही दोन महीने झाले ती फाईल अजुनही आयुक्तांच्या तारखेसाठी फक्त पडलेली आहे.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** यांचा अहवाल नंतरच्या मिटींगमध्ये येऊ दया.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः—** दुसरा प्रश्न डी.सी. रूलचा तुम्ही विचारला डी.सी. रूल सेंशन करण्याचे अधिकार महानगरपालिकडे नाही, ते शासनाकडे आहेत. जेव्हा शासन करेल ते करेल आता असे वाटते की जुन महीन्या नंतरच हे सेंशन होतील.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** आपण एक कमिटी बनवली होती, आणि त्या कमिटीच्या माध्यमातून उल्हासनगरसाठी स्पेशल...

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणेः—** काही कुठे केलेले नाही?

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** बनवले नाही. तेच आपण काही तयार केले का? लोकसंख्या जास्त, एरिया कमी म्हणून आम्हांला स्पेशन, एम.एम.आर.ए. म्हणजे आम्हांला याच्यामध्ये पाहीजे. अशी आपली चर्चा झाली होती, ते पाठवले का?

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—</u>** त्या वेळेला राज्य मंत्री साहेबांकडे, मिटींग झाली तेव्हा मा. सभासद प्रदिपजी होते, त्यांनी तो विषय राज्य मंत्र्याकडे उपस्थित केला की, बाकीच्या सात महानगरपालिका आहेत, युनिफॉम डी.सी. रूलमध्ये त्या सामाविष्ट आहेत. त्यांच्या पेक्षा उल्हासनगर महानगरपालिकेची जी काही हद्द आहे, ती इतरांच्या १० टक्के पण नाही. त्यामुळे उल्हासनगरसाठी वेगळे डी.सी. रूल आणले पाहीजेत. त्याच्यामध्ये आम्ही पाच सहा त्यांना उदाहरणे पण दिली, ते त्यांनी मान्यही केले आणि त्यांनी उप सचिव यु.डी. यांना आदेश दिले की तुम्ही याच्यात लक्ष घालून यांच्यासाठी ती प्रोव्हिजन ठेवा. आपण इथे आल्या नंतर असे ठरवले की, हे आपण शासनाला पाठवू आणि महापौरांच्या चेंबरमध्ये जे काही सांगितले इथे कोणीही अर्किटेक नाही ते पत्र करून त्यांनी आणून माझ्याकडे दिले नाही.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** सोनवणे साहेब, मला तेच सांगायचे आहे, ते देणार नाहीत, पण आपण पाठपुरावा केला पाहीजे. आपल्याकडून पाठवले पाहीजे, होईल नाही होणार पण आपण तरी तयारीत रहा.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—</u>** मी प्रत्येकाला सांगत आहे, आता त्याच्या....

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** मला सांगायचे की, आपली तयारी असू दया, प्रामाणिकपणे आपल्या या शहराला काय पाहीजे? शहराची वस्तुस्थिती, शहराला असलेले निकष, शहराची आवश्यकता हे शासनाला कळवणे तुमचे काम आहे. त्याच्यामध्ये काही अडचणी असतील तर आम्हांला तुम्ही सांगा.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—</u>** शासन त्याच्यावर, त्याची कारवाई सुरू आहे, ते नाही म्हणत नाही, पण शासनाकडून ते आपल्याकडे येत नाही, त्यांनी काय इन्कुल्ड केले आणि नाही केले? अधिकार शासनाचे आहेत.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** त्यांना पाठवणे हे आपले काम आहे.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—</u>** तिसरा प्रश्न हेच डी.सी. रूल येत नाही, म्हणून कोणी अर्किटेक , बिल्डर समोर येत नाही. कारण याच्यात जेवढे आदेश दिलेले आहेत, त्याच्यामध्ये पर्सनल असे झाले की, नविन डी.सी. रूल उद्या येईल त्यासाठी आपल्या समोरच चर्चा झाली की, त्याच्या नंतर चोरी करण्याची आवश्यकता वाटणार नाही.

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी हे सभागृहा बाहेर गेले.

**<u>सदस्य, श्री. महेश सुखरामनी:—</u>** मा. महापौर, मा. आयुक्त, आपल्याला याचे काही अंदाज आहे का प्रशासनाकडून कधी येईल?

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—</u>** मी विचारले जो सेशन आहे, त्याच्या नंतर होऊ शकते.

**<u>सदस्य, श्री. महेश सुखरामनी:—</u>** एपीने नामंजुर केलेत ना? डी.सी. रूलचे काय?

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** विरोधी पक्षाच्या वतीने मी तुम्हांला कळवतो की, शासनाला तुम्ही तातडीने कळवा नाही तर या उल्हासनगरमध्ये डी.सी. रूल नाहीत. त्यामुळे लोकांचे नुकसान होईल आणि संपुर्ण सि.डी. आर. कॉमन डी.सी. रूल बनवायला सुध्दा शासनाला एवढा वेळ लागतो आणि आम्ही त्यांच्या विरोधात निदर्शने करू. अशा सुचना, असे पत्र तुम्ही शासनाला दया. शासन एक डी.सी. रूल बनवू शकत नाही. असे शासन लोकांना काय न्याय देणार आहे. डी. पी. प्लॅन मंजुर करतो पण डी.सी. रूल नाहीत. हे नविन शासन आहे. त्यावेळी डी.पी.प्लॅन मंजुर करतांना सुध्दा हीच भुमिका होती. नाही तर उल्हासनगमध्ये आंदोलन सुरू होईल शासनाला एक्सपोज करण्यासाठी.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** नाही, नाही पण डी.पी. तर रद्द केले आहे ना? डी.पी. चा रददचा प्रस्ताव केला आहे. डी.सी. रूलचे काय आहे? डी.पी. तर आपला रद्द झाला आहे. आपला डी.सी. रूल तर आता चालू आहे ना?

**सदस्य, श्री. महेश सुखरामनी:—** आपले शहर १३ किलो मिटरचे आहे, शहराची जी लोकसंख्या आहे, ती खुपच जास्त आहे तर आपल्याला वेगळा वॅट मिळायला पाहीजे आणि मिलींदजीने तिथे जे केले आहे, तरी माझी महापौरांना विनंती आहे की, पत्र व्यवहार करून लवकरात लवकर हा प्रॉब्लेम सोडवण्यात यावा.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** सभागृहाला मी सांगू इच्छितो की, उद्या कर्वे साहेबांकडे ४.३० वाजता कब्रस्तानची मिटींग ठेवली आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, मी फक्त एक प्रश्न यांना विचारतो ...

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, ते तुम्हांला उत्तर देत आहेत, कृपया करून तुम्ही मध्येच बोलू नका?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** उद्या ४.३० वाजता प्रिन्सीपल सेक्रेटरी युडी—१ त्यांनी एक मिटींग ठेवली आहे, कब्रस्तानसाठी आणि ५.०० वाजता महापौर मॅडम आपल्याला बोलावले आहे की, उल्हासनगर शहरामध्ये जे पण पेडींग इश्यु आहे आपल्याकडे त्याच्यावर चर्चा होईल.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** कोण आमंत्रित आहे? तिथे आम्ही सगळे नगरसेवक अपेक्षीत तर नाही ना सर.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** नाही, नाही, फक्त मला फोन आला आहे आणि आयुक्त साहेबांना फोन आला आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** अलाऊन्स करीत आहेत,तर आम्ही पण तुमच्या बरोबर येऊ शकतो का?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** ५.०० वाजता महापौरां बरोबर उल्हासनगरच्या शहरा विषयी चर्चा ठेवली आहे आणि जे दोन महीन्या पासून पेडींग आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, जेवढे पण मुद्दे उपस्थित झाले आहेत, आत पर्यत ऑर्कीटेकचे लायसन्स रिन्यु होत होते. हे पहीले वेळेस का झाले आहे की, उल्हासनगरमध्ये एक पण इंजिनियर नाही, ज्याचे लायसन्स व्हॅलीड आहे. आज कोणी पण व्यक्ती डेव्हलेपमेंट प्लॉनच्या नियमानुसार ७४ चा किंवा नविन असेल किंवा जुना असेल त्या नियमानुसार जर प्लॉन पुटअप करायचे असेल तर त्यासाठी इंजिनियर तर पाहीजे. तर आज निंबाळकर साहेब, जो आपला कायदा कानून चालवत होते. निंबाळकर ॲक्ट लागत होते, आता ते इथून गेले आहेत. तर ज्या इंजिनियरचे लायसन्स पेडींग आहेत, ते आपण नविन आयुक्तां समोर का ठेवत नाही?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** त्यांच्या टेबलवरच पडलेले आहे,

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** तर हे जास्तीत जास्त, लवकरात लवकर ऑर्कीटेकचे लायसन्स पास करून दया त्यामुळे महापालिकेला करोडो रूपये मिळतील आणि दुसरा आत कल्याण डोबिंवली महानगरपालिकेमध्ये सन २०१५ पर्यंत जागेचे रेग्युलायजेशन चालू आहे. तिथे तो मुद्दा पुर्ण झाला आणि कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या महासभेमध्ये पास करून दिड महीना वाढवला आहे.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** हा विषय आणलेलाच नाही.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** इथे कधी लागू होईल?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** हे कालच पुर्ण झाले आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या महासभेमध्ये वाढवला आहे. काल जो मुद्दा पुर्ण झाला रेग्युलाजेशनचा कल्याण डोबिंवली महानगरपालिकेमध्ये दिड महीना वाढवण्यात आले. जर इथे पण काल मुद्दा पुर्ण झाला आहे तर रेग्युलायजेशनचा मुद्दा इथे पण महासभेमध्ये घेऊन या आपल्याला जास्त दिवस पास करायला पाहीजे. कारण की, शहरवासी याचा जास्तीत जास्त फायदा घेतील आणि महापालिकेला पण उत्पन्न

मिळेल. तर कृपया करून इंजिनियरच मजबुर करतात. जर आपण इंजिनियर यांचे लायसन्स रिन्यु करून दिले तर प्रत्येक माणूस प्लॉन बरोबरच बनवेल. जर इंजिनियरच नाहीत तर कोणी पण प्लॉन कसे सादर करणार? ते इनलिगल करतील. तर कृपा करून श्री. सतरामदासजीची जी मागणी आहे ना त्यासाठी पण कनेक्टेड बोलतो, सतरामदास यांची मागणी आहे की, एवढया फाईल पेडींग का आहेत? आता चार दिवस पहीले, पाच दिवस पहीले कल्याण डोबिंवलीचे नविन आयुक्त, ज्यांना अतिरिक्त पदभार होता तुम्हांला काय बोलून गेले की, मी कोणतीही फाईल थांबवणार नाही. कोणीही ऑफिसर कोणतीही फाईल घेऊन या नाही तर मी पाच तारखेला येईल किंवा तिकडे पण घेऊन या मी सर्व फाईल क्लीयर करेल. तर फाईल घेऊन जाणे हे अधिका—यांचे काम आहे. त्यांनी महापौरांच्या कार्यालयामध्ये आश्वासन दिले की, मी कोणतीही फाईल थांबवणार नाही. तर त्या सर्व फाईली पाठवून दया.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनवणे:—** आता पर्यंत मी सर्व फाईली पाठवून दिल्या आहेत, माझ्याकडे एक पण फाईल पेडींग नाही. त्याचे उत्तर कोणी दयायला पाहीजे संबंधित व्यक्तिने दयायला पाहीजे की ही चुक झाली आहे, तर ती मी सुधारून देत आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** फक्त श्री. सतरामदास तुमच्याशी संबधित नाही, जेवढे पण डिपार्टमेंट आहेत, सार्वजनिक बांधकाम विभाग असेल, नगररचना विभाग असेल जेवढया पण फाईल पेडींग आहेत, ते त्यासाठीच बसले आहेत. एक मुद्दा असतो, सरकारचे आदेश आहे, जर एक नगरसेवक जर प्रश्न विचारत असतो लिखीतमध्ये तर अधिका—याने २४ तासात उत्तर दयायला पाहीजे. श्री. सदरामदास दादा पत्र पण देत होते, जर नगरसेवकाने एखादा प्रश्न विचारला असेल तर ४८ तासामध्ये उत्तर दयायला पाहीजे. इथे ४८ महीने होऊन जातात तरी उत्तर मिळत नाही. तरी कृपया करून इंजिनियरचे लायसन्स रिन्यु झाले नाहीत, तर त्याच्यावर लक्ष दया.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्मानिय सदस्य, प्रश्नोत्तराचा तास संपत आलेला आहे, मनीषजी दादांच्या प्रश्नाचे उत्तर दया

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** महापौर मॅडम, इंजिनियर रिलेटेट पाहीजे, माझा जो विषय आहे इंजिनियरचे रिन्युअल आहे ना? त्यांचे लायसन्स रिन्यु का झाले नाही? आणि का पेडींग आहेत? भरपूर लोकांवर केसेस चालल्या आहेत, काही लोकांची चौकशी चाललेली आहे आणि काही लोकांचे रिजेक्ट का झाले आहे? त्याची चांगल्या प्रकारे चौकशी करण्यात यावी. असे रिन्युअल करायला नाही पाहीजे. सो हाऊ दि पिपल्स ऑफ रिजेक्टेड अदर पिपल्स त्यांचे रिन्यु का झाले नाही? सम थिंग दिस इज ऑफ देअर दॅट इज नॉट देअर तर आपण रिन्यु करण्याच्या अगोदरच तुम्ही चांगली चौकशी करा मी तुम्हांला आवाहन करतो. असे नाही की कोणाच्या अनन फानन दबावामध्ये येऊन करू नका, असे नाही की, तुमच्या गळयात पडेल. खुप इंजिनियर आहेत की, त्यांच्या केसेस सुरू आहेत, याच महापालिकेमध्ये प्लॉनचे झोलझाल केले आहेत, कोणाचे कमिशन आडकले आहेत आणि काही लोकांची चौकशी सुरू आहे. तर मी आपल्याना सांगू इच्छितो की, हे करण्याच्या पहीले दहा वेळा विचार करा, धन्यवाद.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्मानिय सोनवणेजी ऑर्कीटेकचे जे पण लायसन्स पेडींग पडले आहेत, तरी कृपया आपण जे लिगल आहेत, ते आठ दिवसाच्या आत त्यांना देण्यात यावेत. मनीषजी आपण दादा सतरामदास यांच्या प्रश्नाचे उत्तर दया.

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** आपला महानगरपालिकेचा सिटीजन चार्टड नागरीकांची सनद दोन वर्षा पुर्वीच प्रसिध्द झालेली आहे आणि त्याच्यामध्ये कुठल्या विभागाने टपाल किती दिवसात काढायचे आहेत, नगरसेवकाचे टपाल किती दिवसात काढायचे आहेत, प्रश्नांची उत्तरे किती दिवसात दयायचे आहेत, प्लॉन किती दिवसात पास करायचे आहेत. हे सगळ त्याच्यामध्ये दिलेले आहे. त्याची प्रत मी दादाना नंतर देतो.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, आपले दादा सतरामदास सर्वात वरिष्ठ नगरसेवक आहेत आणि आज ते जमिनीवर बसलेले आहेत आणि त्यांच्या प्रश्नाचे उत्तर फिरवून फिरून देत आहेत. मला इथे उत्तर देण्यात यावे की, नगरसेवक कामासाठी पत्र लिहीतात त्याचे उत्तर दिले जाते का? कोणत्याही कामासाठी, सन १९९७ मध्ये जेव्हा प्रथम नगरसेवक बनलो होतो, जेव्हा आम्ही पत्र लिहीत होतो, तेव्हा संबंधित अधिकारी आमच्या बरोबर चर्चा करीत होते आणि त्या पत्राचे लिखीतमध्ये, कॅप्टन शुल त्यावेळचे आयुक्त होते, ते आम्हांला उत्तर देत होते की, आपले पत्र मिळाले आहे आणि संबंधित विभागामध्ये पाठवले आहे. संबंधित विभागाचे अधिकारी तुम्हांला भेटतील आणि तुमचे जे पण काम आहे ते करेल. परंतु आज अशी परिस्थिती आहे की, एक वरिष्ठ नगरसेवक येऊन

जमीनीवर बसतात आणि इथे आपले अधिकारी उत्तर देतात की, कामाचे सर्व नियम बनले आहेत आणि नियमानुसार कामे होतात. महापौरजी मी आपल्याला निवेदन करतो की, आपण आज आपल्या आयुक्त महोदया इथे बसलेल्या आहेत, त्यांना आदेश करा जे पण नगरसेवक पत्र देतात ते त्या विभागाचे जे अधिकारी आहेत, त्यांनी संपर्क करायला पाहीजे आणि त्या पत्राचे संपुर्ण विवरण वाचून त्यांचे काम करून ते पत्र फाईल करायला पाहीजे आणि त्या नगरसेवकाला उत्तर दयायला पाहीजे की आपण जे पत्र लिहीले होते, त्याचे काम झाले आहे. आज असे झाले आहे की, जर कोणी नगरसेवक पत्र लिहीतात तर ते पत्र कच—याच्या डब्यात टाकले जाते. मा. महापौरजी, यासाठी मी आपल्याला निवेदन करतो की,  नगरसेवकांच्या पत्र घेऊन त्यांचे जे कार्य आहे, त्याची कारवाई पुर्ण झाली पाहीजे आणि त्याचे उत्तर पण मिळायला पाहीजे आणि मा. महापौरजी आपण प्रत्येक आठवडयाला किंवा पंधरा दिवसामध्ये डिपार्टमेंट कडून पत्र मागवा की, कोणकोणत्या नगरसेवकांनी पत्र दिले आहेत, त्यांची काय मागणी आहे? मोठमोठया मागण्या आहेत, जे रोडची कामे आहेत, जे निधी आहेत, ते मोठे होऊ शकत नाही. परंतु जे छोटे छोटे कार्य आहेत, साफसफाई, पाण्याचे लिकेज, लाईटची समस्या असे जे छोटे छोटे प्रॉब्लेम आहेत, त्यासाठी संबंधित अधिकारी नगरसेकांशी चर्चा करीत नाहीत. मा. महापौरजी मी आपल्याला निवेदन करतो की, आपण दादा सतरामदास यांना जमीनीवरून उठायला सांगा, आपले वरिष्ठ बसलेले आहेत, आणि संबंधित अधिका—यांना आदेश करा की प्रत्येक नगरसेवकांच्या पत्राचे उत्तर मिळायला पाहीजे.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानीः—** मा. महापौरांच्या आदेशानुसार मी आयुक्त महोदय आणि संबंधित विभागाचे विभाग प्रमुख त्यांना मी महापौरांचे आदेश देतो की, जे पण सिटीजन चार्टेडच्या आत जेवढया वेळेमध्ये जे पण काम समाप्त करायचे आहेत ते सिटीजन चार्टड स्ट्रीकली फॉलो करण्यात यावे आणि जे पण काम सिटीजन चार्टडच्या आतमध्ये एक दिवस, दोन दिवस, चार दिवसाच्या आतमध्ये करायचे आहेत, ती कामे पुर्ण करण्यात यावी आणि प्रत्येक नगरसेवकांकडून जे पत्रव्यवहार होतात, त्यांना कमीत कमी उत्तर दिले जावेत की, त्यांचे काम कुठ पर्यंत पोहचले आहे, कोणत्या स्थितीत आहे आणि कोणत्या स्टेजवर आहे. हे मा. महापौरांनी स्ट्रीकली आदेश दिले आहेत, त्याचे पालन करण्यात यावे आणि त्याच बरोबर मी दादा सतरामदास यांना विनंती करतो की, कृपया आपण जमीनीवरून उठावे आणि आपल्या स्थानी आसनस्थ व्हावे. त्यांचा जो विषय आहे, त्याची नोंद केली आहे आणि त्याचे फॉलो करण्यात येईल आणि मा. सभागृह नेत्यांनी जे सांगितले आहे, ते वेळेवर महापौरांच्या कार्यालयामध्ये मिटींग लावली जाईल की हे फॉलो होत आहे की होत नाही?

या वेळी सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी हे स्टेज जवळून उठून आपल्या स्थानी आसनस्थ झाले.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** आम्हांला जनतेसाठी काम करायचे आहे, त्यामुळे पब्लिकसाठी आवाज उठवणे गरजेचे होत, आपण अधिका—यांना आदेश  दिले म्हणून धन्यवाद.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानीः—** धन्यवाद दादाजी, धन्यवाद. त्याच बरोबर मा. महापौरांच्या आदेशान्वये नवनिर्वाचित सदस्य, श्रीमती सुमन सचदेव यांना स्टेजवर त्यांचा सत्कार करण्यासाठी बोलवण्यात येत आहे.

**महापालिका सचिवः—** कृपया ज्यांना मंचावर यायचे आहे, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता सर्व गटनेते व सदस्य ज्यांना यायचे आहे, ते मंचावर येऊ शकतात. पत्रकार कक्षातून जर कोणाला यायचे असेल तर मा. महापौरांनी आदेश दिले आहेत, येऊ शकतात.

या वेळी नवनिर्वाचित सदस्या, श्रीमती सुमन सचदेव यांचा सत्कार करण्यात आला.

**महापालिका सचिवः—** आठ लक्षवेधी आल्या आहेत, सभागृहा समोर पहीली लक्षवेधी आहे, सुचकाचे नाव आहे, श्री. शंकर लुंड, अनुमोदक आहेत, श्री. मनोज सयानी

विषयः— उल्हसनगर शहरातील प्रभाग १६ मध्ये पाणी टंचाई बाबत.

लक्षवेधी क्र. २ सुचकाचे नाव आहे, श्रीमती पंचम कालानी,

विषयः— Regarding huge loss of municipal revenue and the general public deprived of facility of bore-wells in their lovalities inspite of installation of hundreds of bore-wells/ hand-pumps in the year 2016 in whole Ulhasnagar.

Request for immediate action for repairing / restoration of all the bore- wells and punish the concerned municipal staff and contractor for their nrgligence.

तिसरी लक्षवेधी आहे, श्री. महेश सुखरामनी यांची

विषयः— उल्हासनगर महापालिका हद्दीत असलेल्या उघडयावर मटन, चिकन, मच्छि विक्री करणा—या दुकान बंद करून कारवाई करण्याबाबत केलेल्या ठरावावर अंमलबजावणी होत नसल्याबाबत.

लक्षवेधी क्र. ४ सुचकाचे नाव आहे, श्रीमती मिना सोनेजी, अनुमोदकाचे नाव आहे, श्री. प्रदिप रामचंदानी

विषयः— उल्हासनगर—५ येथे असलेल्या डंपिंग ग्राउंडमुळे लोकांना रोगराईचा सामना करावा लागतो, तेसच त्यांच्या आरोग्यास नुकसान होत आहे. त्या करीता सदरील डंपिंग ग्राउंड इतरत्र हलवण्यात यावे किंवा त्या डंपिंग ग्राउंडवर वैद्यानिक प्रक्रिया करून कचरा नष्ट करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे महासभेत चर्चा करणे.

लक्षवेधी क्र. ५ सुचकाचे नाव आहे, श्री. प्रदिप रामचंदानी, अनुमोदकाचे नाव आहे, श्रीमती मिना सोनेजी

विषयः सिंधू भवनाच्या इमारतीचे काम सध्या सुरू झालेले आहे, सदरचे काम देतांना महापालिकेने अशी अट टाकलेली होती की, सदरचे काम मॉर्डन मशिनने काम करायचे आहे. परंतु ठेकेदार सदरचे काम करीत असतांना मॉर्डन मशनरी न वापरता सर्व साधारण काम करीत आहे, त्यामुळे कामाच्या गुणवत्तेत फरक पडत आहे. त्यासाठी वास्तुविशारदही लक्ष नाही. त्यामुळे कामाचे महासभेत या बाबत चर्चा होणे गरजेचे आहे.

लक्षवेधी सुचना क्र. ६ सुचकाचे नाव, श्री. मनोज सयानी, अनुमोदकाचे नाव, श्री. प्रदिप रामचंदानी

विषयः— उल्हासनगर महानगरपालिके तर्फे वास्तुविशारद यांना परवाने मिळत नाही, त्यामुळे महानगरपालिकेचा महसुल वेळेवर मिळत नाही व अवैध निर्माण पण वाटत आहेत. उल्हासनगर महापालिकेच्या महसुलात वाढ होण्या करीता, तसेच अवैध निर्माण करत्यावर अंकुश लावणे करीता वास्तुविशारद यांना परवाने देणे बाबत महासभेत चर्चा होणे आवश्यक आहे.

लक्षवेधी सुचना क्र. ७ सुचकाचे नाव आहे, श्री. सुनिल सुर्वे, अनुमोदकाचे नाव आहे, श्री. चंद्रशेखर यादव

विषयः— मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार मागील वर्षाचे विरोधी पक्षनेता, सभागृह नेता, गटनेता, प्रभाग समिती सभापती निधीची कामे होणेबाबतची लक्षवेधी सूचना.

लक्षवेधी सुचना क्र. ८ सुचकाचे नाव आहे, श्री. शेखर यादव, अनुमोदकाचे नाव आहे, श्री. सुनिल सुर्वे
विषयः— हिराघाट उल्हासनगर—३ येथील अनाधिकृत ट्रक व टेम्पो स्टॅंड हलवणे तसेच शिवमंदिर परिसराचे सुशोभिकरण करणे तसेच जवळच असलेले नदी स्वच्छ करण्या बाबतची लक्षवेधी सुचना आहे. या पैकी मा. महापौरांनी दोन लक्षवधी स्विकारल्या आहेत.
लक्षवेधी सुचना क्र. ४ श्रीमती मिना सोनेजी यांची आहे, उल्हासनगर—५ येथे असलेल्या डंपिंग ग्राउंडमुळे लोकांना रोगराईचा सामना करावा लागता व लक्षवेधी सुचना क्र. ७ ही सुनिल सुर्वे यांची आहे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार या बाबतची सुचना आहे. या दोन्ही मा. महापौरांनी स्विकारल्या आहेत. कृपया जी पहीली आहे, त्याच्यावर चर्चा सुरू करा.

**महापालिका सचिवः—** लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत, श्री. शंकर लुंड व अनुमोदक आहेत, श्री. मनोज सयानी

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजीः—** मा. महापौर, उप महापौरजी, आयुक्त साहेब,.....

**सदस्या, श्रीमती पंचम कालानीः—** मॅडम, ही घोषण का केली? पाण्याची एवढी भिषण टंचाई आहे, ही लक्षवेधी का घेतली नाही? कारण उष्णतेचे दिवस आले आहेत, सिटी ऑफ वॉटर आहे, तर बोरवेलचा विषय खुप महत्वाचा आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** बोरवेलचा ऑल रेडी श्री. सेलवन यांना सुचना दिल्या आहेत.

**सदस्या, श्रीमती पंचम कालानी:—** पण मॅडम, आम्हांला कोणालाच माहीत नाही. या बाबतीत आम्हांला माहीती समजून घ्यायची आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** आपण माझ्या चेंबरमध्ये या, सेलवन तुम्हांला सर्व माहीती देतील. कुठे कुठे बोरवेल बंद आहेत? कुठे चालू आहेत? ऑल रेडी दोन मिटींगमध्ये हा विषय झाला आहे.

**सदस्या, श्रीमती ज्योत्सना जाधव:—** मॅडमजी मी मागच्या महासभेत हाच प्रश्न विचारला होता, परंतु आपण_मला माझी तक्रार पुर्ण करू दिली नाही. कारण की, बोरवेलचा एवढा प्रॉब्लेम झाला आहे की, काही ठिकाणी बोरवेल बंद आहेत, काही ठिकाणी मशिन बंद आहेत आणि बनवणारा सोमनाथ, काही अधिकारी सांगतात की, सोमनाथ सुट्टीवर गेले आहेत. त्यांच्या घरी कोणी तरी आजारी आहे आणि सोमनाथला फोन केले तर सोमनाथ सांगतात की, महानगरपालिकेने मला ठेकाच दिला नाही. या विषयी आम्ही नगरसेवक काय करू शकतो? मी श्री. भदाणे साहेबांना हे विचारायचे आहे.

**सदस्या, श्रीमती पंचम कालानी:—** मॅडम सेलवनजीनां इथे येऊन उत्तर दया, फक्त मलाच माहीती करून घ्यायचे नाही तर सगळयांनाच माहीती पाहीजे.

**सदस्या, श्रीमती ज्योत्सना जाधव:—** मी पहीले हे भदाणे साहेबांना विचारायचे आहे.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मा. महापौरजी, हा मुद्दा एवढा ज्वलनशील आहे की, मागच्या सन २०१६ मध्ये शहरामध्ये वाईट परिस्थिती निर्माण झाली होती. भुजलमुळे शहरामध्ये खुप बोरवेल बनवल्या होत्या आणि या बोरवेल मला नाही वाटत की, कोणत्याही देशामध्ये, विदेशामध्ये एवढया बोरवेल बनवल्या असतील, एवढया उल्हासनगरमध्ये बनवल्या आहेत. एवढया बोरवेल बनवायला नव्हत्या पाहीजेत आणि खोल पण टाकायला नव्हत्या पाहीजेत. परंतु त्याची चौकशी पण झाली नाही, यामध्ये मोठा घोटाळा पण झाला असेल आणि मला वाटते हा घोटाळा दाबला जात आहे आणि हा विषय आजचा नाही, पंधरा दिवसामध्ये हा मुद्दा परत येऊ शकतो. तेव्हा एक महीना झाला असेल आणि आमच्याकडे तो विषय पण येणार नाही आणि सेलवन काय करतील? हे महापौरांना माहीत आहे आणि संपुर्ण सभागृहाला, संपुर्ण उल्हासनगरला माहीत आहे की, सेलवन कोण आहे? आज कोणी तरी विषय मांडला होता की, सेलवनला हटवण्यात यावे. तो पण विषय येणार आहे आणि त्याच अधिका—याला आपण विचारणार. पाण्याचा एवढा गंभीर विषय आहे, श्रीमती पंचम कालानी यांनी आणला आहे, मी त्यांना सॅलुट करायला वाटते की, त्यांनी योग्य वेळेस विषय आणला आहे. उष्णतेचे दिवस आहेत.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** कृपया तीन लक्षवेधी पण घेऊ शकतो, आवश्यकता नाही की, दोनच लक्षवेधी घेण्यात यावी.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** कृपया आपण शांत बसा.

**सदस्या, श्रीमती ज्योत्सना जाधव:—** मॅडम, पहीले आमच्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौरजी, कमीत कमी दोन ......

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** आपण पहीले माझे म्हणणे ऐकुन घ्या, हा विषय मी माझ्या ऑफिसमध्ये पाणी पुरवठा विभागा बरोबर तीन मिटींगमध्ये घेतला आहे. पहीले लक्षवेधी होऊ दया, नंतर माझ्या चेंबरमध्ये येऊन...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** नाही, नाही माझे असे म्हणणे आहे की, आपण तीन लक्षवेधी स्विकारा करा, तिसरी ही लक्षवेधी स्विकार करा. हा जो मुद्दा आहे, तो खुप महत्वाचा आहे. प्रत्येकाच्या वार्डामध्ये बोरींग बंद पडल्या आहेत. सर्वांना पाण्याची समस्या आहे, पाण्याची कपात चालू आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** नियमानुसार फक्त दोनच लक्षवेधी घेतल्या जातात.

**सदस्या, श्रीमती पंचम कालानी:—** मॅडम, जो पर्यंत उत्तर मिळणार नाही, तो पर्यंत मी बसणार नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मॅडम, मी आपल्याला निवेदन करतो की, आपण ज्या दोन लक्षवेधी स्विकारल्या आहेत, त्यांच्यावर चर्चा करण्यात यावी. नंतर जेव्हा विषय चालू होतील तेव्हा पॉईंट ऑफ ऑर्डरवर पाण्याच्या विषयावर तुमच्या चेंबरमध्ये किंवा इथे बैठक घेऊन त्यावर चर्चा करू, पहीले लक्षवेधी चालू करा.

**सदस्या, श्रीमती ज्योत्सना जाधव:—** या विषयावर फक्त चर्चाच कराल का?

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सभागृह नेता यांनी सांगितल्या प्रमाणे मी त्यांच्या मताशी सहमत आहे. पहीले दोन लक्षवेधीवर चर्चा करा, नंतर तुम्ही पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलू शकतात.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मा. महापौर मॅडम, आठ लक्षवेधी सुचना आल्या आहेत, तीन घेतल्यात आठही घेऊन टाका विषय संपून जाईल. सभा चालू दया, ७.०० वाजे पर्यंत. नियमानुसार फक्त दोनच लक्षवेधी घेऊ शकतो, आपण पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलू शकतात. तर ज्यांचे प्रॉब्लेम असतील ते सॉल होऊन जाईल. आता लक्षवेधी घ्या.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मॅडम जेव्हा पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलेले जाते, तेव्हा सर्व विषय बाजुला ठेवून पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलतात.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** विषय पत्रिका जेव्हा सुरू होईल, तेव्हा पॉईंट ऑफ ऑर्डरवर चर्चा होते. महापौरांनी पहीले लक्षवेधीचा स्विकार केलेला आहे, पहीले लक्षवेधीवर चर्चा करा.

**सदस्या, श्रीमती पंचम कालानी:—** मॅडम, आम्ही पण जास्त वेळ उभे आहेत, ज्यांचा प्रॉब्लेम आहे, आम्ही सर्व खालू बसून घेऊ. सेलवन सरांना सांगा की, आपण पहीले उत्तर दया.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** पंचमजी तुम्ही समजल्या नाहीत, पहीले लक्षवेधी घ्या.

**सदस्या, श्रीमती पंचम कालानी:—** मला समजले आहे, मॅडम.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** जस्ट लिसन टू मी पहीले दोन लक्षवेधी चर्चा होऊ दया, नंतर पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोला सगळयांचा विषय होऊन जाईल.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** पॉईंट ऑफ ऑर्डर पहीले होते,इट इज नॉट नेशेसरी पॉईंट ऑफ ऑर्डर कधी पण होऊ शकते?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** असे कुठेच लिहीले नाही की, पॉईंट ऑफ ऑर्डर लक्षवेधीच्या नंतर होईल? पॉईंट ऑफ ऑर्डर कधी पण होऊ शकते.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** पहीले दोन लक्षवेधी होऊ दया.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मी सांगतो की, लक्षवेधी होईल किंवा नाही होणार ठिक आहे, तुम्ही पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलायला सांगत आहेत तर आम्ही पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलत आहोत.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** एजेंडा नंतर तुम्ही बोलू शकतात, ऑल रेडी जे मंजुर केलेले आहेत, पहीले त्याच्यावर बोला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** महापौर, बोलत आहेत की,दोन लक्षवेधीच्या नंतर पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोला तर आपण शांत रहा, होऊन जाईल.

**सदस्या, श्रीमती पंचम कालानी:—** मा. महापौर मॅडम, उप महापौर .....

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** शहरामध्ये अर्ध्यापेक्षा जास्त बोरवेल बंद आहेत, त्यांच्यावर पण लक्ष देण्यात यावे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** माझे म्हणणे आहे की, शहरामध्ये अर्ध्यापेक्षा जास्त बोरवेल बंद पडल्या आहेत. मी पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलत आहे, मॅडम, आजही शहरामध्ये जास्त बोरवेल बंद आहेत. मी परवाच्या दिवसाची घटना तुम्हांला सांगतो. परवा एम. आय.डी.सी. ची पाईप लाईन तुटली संपुर्ण शहरामध्ये कॅम्प नंबर १, २, ३ मध्ये

पाण्याचा एक थेंब पण आला नाही. आता सकाळी लाईटचा प्रॉब्लेम होता, आता ४.३० वाजता लाईट आली. या परिस्थित जर उपयोगी पडेल, तर बोरवेल उपयोगी पडतील आणि जर बारवेलची व्यवस्था ठिक नाही तर लोक पाण्यासाठी कुठे जातील. तुम्ही आमचा सगळयांचा आवाज धाबू शकतात.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** कोण तुमचा आवाज दाबु शकतो?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** आम्हांला बोलू दया.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** तुमचा कोण आवाज दाबू शकतो? तुम्ही समजण्यात चुकी करत आहेत, मी सांगितले की, दोन लक्षवेधी होऊ दया, त्याच्या नंतर तुम्ही बोलू शकतात.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मी पहील्या पासूनच बोलत आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** तर मग पहीले माझे ऐका.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरांनी आदेश दिले आहेत की, दोन लक्षवेधी झाल्या नंतर पॉईंट ऑफ ऑर्डरवर चर्चा होईल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** पॉईंट ऑफ ऑडर कधी होऊ शकते? सभागृह नेताजी बोलत आहेत. तर सचिव मॅडमनी क्लीयर करावे की, पॉईंट ऑफ ऑर्डर कधी होऊ शकते? पॉईंट ऑफ ऑर्डर कधी होते हे स्पष्ट झाले पाहीजे. माझे म्हणणे आहे, की, ज्या वेळी कोणी सदस्य, पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलत आहेत, तेव्हा लक्षवेधी असेल किंवा प्रश्नोत्तरे असतील, कोणताही विषय असेल तो बाजूला होतो.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** असा कोणताही नियम नाही, जो पर्यंत महापौर आदेश देत नाहीत, तो पर्यंत पॉईंट ऑफ ऑर्डरवर चर्चा होत नाही. हे सभागृह महापौरांच्या अधिकारात येते, पिठासिन अधिकारी बोलायला देतील किंवा नाही, हे महापौरांचे अधिकार आहेत. आपण पॉईंट ऑफ ऑर्डरवर विषय उचलला आहे. तर त्याला आवश्य मान्यता मिळेल. परंतु जेव्हा महापौर महोदया बोलतील असे नाही की, मी उठून उभा राहील आणि सगळे विषय सोडून देवू पॉईंट ऑफ ऑर्डरवर मला तीन तास बोलायचे आहे. महापौर महोदयांनी पहीले लक्षवेधी स्किारली आहे, त्यावर चर्चा होईल, नंतर पॉईंट ऑफ ऑर्डरवर चर्चा होईल.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** मा. महापौर मॅडम....

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** हे स्पष्ट व्हायला पाहीजे, सचिव मॅडमला सांगा की, लिगल पॉईंट स्पष्ट करा की, पॉईंट ऑफ ऑर्डर काय आहे? पॉईंट ऑफ ऑर्डरवर कधी बोलू शकतो?

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मला तर माहीती पाहीजे, मी पहील्या वेळेस आलो आहे.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** मला सुध्दा माहीती नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** तुम्ही नंतर शिकून घ्या.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** कुठे शिकेल? कल्याण —अंबरनाथमध्ये जाणार नाही. कल्याण—अंबरनाथ महापालिकेत जाणार नाही, याच महापालिकेत मला शिकायचे आहे.

**महापालिका सचिव:—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेबा, सन्माननिय सभागृह इथे हरकतीच्या मुद्दया बाबत असे लिहीले आहे की, पिठासिन अधिका—यास शक्यतो हरकतीचे व कार्यरिती बाबतचे सर्व मुद्दे संक्षिप्तपणे काढण्यात येतील. परंतु महापालिकेच्या नंतर कोणत्याही सभेत त्या निर्णया विरूध्द महापालिकेकडे अपिल करता येईल. असे अपिल, अशा निर्णयावर आक्षेप घेणारा मुळ प्रस्ताव ठरेल व अशा प्रस्तावाची नियम १जे तरतुद घेण्यास/करण्यात येईल. यामध्ये महापौर मॅडमच तुम्हाला उत्तर देतील हरकतीच्या मुद्दयावर कारण तो त्यांचा अधिकार आहे. यामध्ये तुम्ही जसे म्हणतात की, आधी किंवा नाही याबाबत नियमात काहीच लिहीलेले नाही. ते आता महासभेने ठरवायचे आहे, महापौरांनी ठरवायचे आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** पॉईंट ऑफ ऑर्डरच्या विषयी काय लिहीले आहे? हरकतीचा मुद्दा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मी सभागृहाला सांगू इच्छितो की, महासभेच्या आतमध्ये संपुर्ण अधिकार पिठासिन अधिकारी यांचा आहे. कोणाला बोलून दयायचे आहे किंवा नाही, बसवाचे आहे हे अधिकार महापौरांचे आहेत. लक्षवेधी स्किार करण्याचे अधिकार महापौरांचे आहेत आणि फक्त दोन लक्षवेधी स्विकार करू शकतात. लक्षवेधी पुर्ण झाल्या नंतर महापौरांना वाटले तर पॉईंट ऑफ ऑर्डरवर चर्चा करायला बोलू शकतात.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मा. महापौरजी, जमनुजी, आम्ही महापौरांना यासाठी बोललो की, हृदय परिवर्तन करू शकल्या असत्या, हृदय परिवर्तन करण्यासाठी बोलले आहे की, दोन लक्षवेधी होत्या त्या घेण्यात याव्यात. बोरवेलसाठी हृदय परिवर्तन करण्यासाठी बोलत होतो. होऊ शकते की, हृदय परिवर्तन होईल आणि मॅडम आमचा जो ज्वलनशिल मुद्दा आहे, तो उचलू शकतात. यासाठी आम्ही परत परत बोलत आहेत. बाकी आम्ही काही टाईमपास करण्यासाठी बोलत नाहीत आणि आज पासून वार्डमध्ये त्रास होऊ शकतो आणि सर्वांच्या वार्डामध्ये त्रास होऊ शकतो. तर कृपया करून हा विषय घेतला जावा.

**सदस्य, श्री. महेश सुखरामनी:—** माझे एकच म्हणणे आहे की, अशासकीय प्रस्ताव पाण्याच्याच मुद्दयावर सेलवन यांना दिला आहे. तर या विषयावर सर्वांनी चर्चा करायला पाहीजे आणि त्याचे उत्तर ते देतील. सन्माननिय सदस्यांना निवेदन आहे की, लक्षवेधीवर चर्चा करा, धन्यवाद.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** मा. महापौर मॅडम, उप महापौरजी, आयुक्त साहेब....

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—** मा. उप महापौर, मी या ठिकाणी फक्त दोन शब्द बोलू इच्छितो की, संपुर्ण शहराला .. ...

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, आता लक्षवेधीवर चर्चा चालेल.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

विषय:— उल्हासनगर—५ येथे असलेल्या डंपिंग ग्राउंडमुळे लोकांना रोगराईचा सामना करावा लागतो, तेसच त्यांच्या आरोग्यास नुकसान होत आहे. त्या करीता सदरील डंपिंग ग्राउंड इतरत्र हलवण्यात यावे किंवा त्या डंपिंग ग्राउंडवर वैद्यानिक प्रक्रिया करून कचरा नष्ट करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे महासभेत चर्चा करणे.

सुचकाचे नांव:— श्रीमती मिना सोनेजी

अनुमोदकाचे नाव:— श्री. प्रदिप रामचंदानी

उल्हासनगर—५ येथे असलेले डंम्पींग ग्राउंडमुळे लोकांना रोगराईस सामना करावा लागतो. तसेच त्यांचे आरोग्यास नुकसान होत आहे. त्या करीता सदरील डंम्पीग ग्राउंड ईतरत्र हलविणेत यावे किंवा त्या डंम्पीग ग्राउंडवर वैद्यानिक प्रक्रीया करून कचरा नष्ट करणे अंत्यंत आवश्यक आहे. त्या परिसरातील लोकांचे आरोग्य वाचविणे अंत्यत गरजेचे आहे. त्यामुळे महासभेत चर्चा होणे आवश्यक आहे.

---

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** मा. महापौर मॅडम, उप महापौरजी, आयुक्त मॅडम, ही खुपच गंभीर समस्या आहे, खास करून उल्हासनगरच्या कॅम्प नंबर ५ वाल्यासाठी आहे. महापौर मॅडम मागच्या वेळेस जेव्हा श्री. सुधाकर शिंदे आयुक्त होते, साहेबांनी तिथे व्हिजीट केले होते आणि तिथे खरोखर गंभीर समस्या होती. महापौर मॅडम हा डंपिंग ग्राउंड लवकरात लवकर कॅम्प नंबर ५ येथून हलवले पाहीजे आणि यासाठी आम्ही एक वर्ष वाट बघितली आहे आणि भरपूर वेळा पत्रव्यवहार पण केलेला आहे. आता माहीती मिळाली आहे की, शासनाकडून आपल्याला डंपिंग ग्राउंडसाठी एक प्लॅाट मिळाला आहे. त्यासाठी पण आम्हांला माहीती दयायला पाहीजे की, आरोग्य विभागाने सांगायला पाहीजे की, हा प्लॅाट कुठे मिळालेला आहे? कॅम्प नंबर ५ चे रहीवासी या प्रॉब्लेममुळे खुप त्रस्त आहेत.

इथे वारंवार धुर निघत असतो, दुर्गंधी येते, तरी या गंभीर विषयावर चर्चा होणे खुप गरजेचे आहे आणि डंपिंग ग्राउंड इथून हलवणे खुपच गरजेचे आहे. डंपिंग ग्राउंडची जी समस्या आहे, तेथील प्रत्येक रहीवासी यामुळे पिडीत आहे. यासाठी हा गंभीर विषय यावर चर्चा होणे खुप गरजेचे आहे. शासनाकडून आपल्याला डंपिंग ग्राउंडसाठी एक प्लॉट मिळाला आहे, त्याची पण आम्हांला माहीती पाहीजे. जर तो प्लॉट आपल्याला मिळाला असेल तर येथील डंपिंग ग्राउंड लवकरात लवकर हलवण्यात यावे. हा आमचा मेन विषय आहे आणि जो पर्यंत प्लॉट सिफ्टींग होत नाही, तो पर्यंत सेग्रीगेशनवर लक्ष दयावे. कारण की, सेग्रीगेशनमुळे ग्रीन वेस्ट आहे, त्याला कंट्रोल केल्यामुळे तेथील दुर्गंधी आणि माशा व मच्छर कमी होतील. हे तुम्ही लक्षात ठेवा, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** महापौर मॅडम, उप महापौर, सचिव मॅडम आणि प्रभारी आयुक्त, मॅडम कॅम्प नंबर ५ मधले हे डंपिंग ग्राउंड खेमानीवरून इथे आणले आहे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** थोडे हिंदीमध्ये बोलाल तर सगळयांना समजेल, तसे तुम्ही हिंदी चांगली बोलता.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** अहो मला काय बोलायचे? कसे बोलायचे? मॅडम भाषावर कुठेले प्रतिबंध आहे का? मी कुठली भाषा बोलायची? सदस्यांनी याच्यावर आक्षेप घ्यायचे नाही. मॅडम माझे असे म्हणणे आहे की.....

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>** हा विषय एवढा चांगला आहे की, दुसरे लोक मराठी समजत नाही, त्यांना आपण हिंदीमध्ये सांगाल तर....

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** मला याचा अभिमान वाटतो की, मी महाराष्ट्रात राहून मराठी बोलतो आणि आपल्यालाही मराठी शिकले पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—</u>** प्रदिप रामचंदानी तुमचे अभिनंदन आपण मराठी आहात. भारत राजवानी आपण पण मराठी शिका, शिका आणि शिका प्रत्येक वेळेला हिंदी बोला काय लावले आहे?

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** आपल्याला महाराष्ट्रात राहून कमीत कमी मराठी बोलायला येत नाही. तर ऐकायला आणि समजायला तरी यायला पाहीजे.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** प्रदिपजी, आपण मध्ये मध्ये हिंदी बोला सर्व खुश होतील.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** म्हणजे विषय कसा आहे? की, मिना मॅडम यांनी जे आपल्या ५ नंबरमध्ये डंपिंग ग्राउंड आहे, तिथे लोकांना खरोखर खुपच त्रास होत आहे. आमचे दादा सतरामदास व कॅम्प नंबर ५ चे नेते हया डंपिंग ग्राउंडमुळे त्यांना खुपच त्रास होत आहे. म्हणून एक तर तेथून डंपिंग ग्राउंड हलवायला पाहीजे किंवा तिथे वैज्ञानिक प्रक्रिया करून त्या कच—याची विल्हेवाट लावली पाहीजे. अशी माझी ही लक्षवेधी मॅडमने आणलेली आहे, त्यांना मी पुर्ण पाठिंबा देतो आणि माझ्या मित्रांना जेव्हा मी मराठीमध्ये बोलतो, तेव्हा हिंदीमध्येच बोलतो जसे की आज गरज आहे.

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—</u>** मराठीमध्ये बोला चालेल, चालेल तुमचे अभिनंदन आहे,

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** मॅडम, सन्माननिय सदस्यांना सांगा की....

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** पहीले टीप्पणी करीत होते, बोला चालेल मराठीमध्ये आता थकले का?

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** मॅडम, सन्माननिय सदस्यांना सांगा की, जेव्हा बोलण्यासाठी त्यांची वेळ येते, तर मध्येच टीप्पणी करणे ठिक नाही आणि आपल्या पक्षाच्या लोकांनी प्रति टीका करणे, टीप्पणी करणे ठिक नाही. माझ्या सन्माननिय मित्रांना हात जोडून विंनती करतो की, कृपया असे करू नका? माझे असे म्हणणे आहे की, आज संपुर्ण महाराष्ट्रामध्ये काय पण संपुर्ण देशामध्ये कचरा डंपिंग करणेचा विषय राहीला नाही. एखादया वस्तुचे डंपिंग करायचे नाही आणि कच—या पासून कसे वेध बनवायचे आहे, वेस्ट टून वेध आधारावर आपला पुढे जायला पाहीजे आणि आपला ३१ करोडचा डी.पी.आर. मंजूर केलेला आहे, स्वच्छ भारत अभियानसाठी त्यासाठी आपण प्रक्रिया करून कच—यावर डंपिंग ग्राउंडवर बंद करण्याची प्रक्रिया सुरू केली पाहीजे. महापौर मॅडम आपण यावर विशेष लक्ष देण्यात यावे आणि हे डंपिंग ग्राउंड त्वरीत बंद करण्यात यावे आणि कच—याची विल्हेवाट लावण्यासाठी तिथे प्रक्रिया सुरू करण्यात यावी, असे माझे म्हणणे आहे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** मा. महापौरजी, मा. उप महापौरजी आणि आयुक्त साहेब,.....

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** कॅम्प नंबर ५ चा डंपिंग ग्राउंडचा जो मुद्दा आहे, हे डंपिंग ग्राउंड दिड वर्षापासून हिरे साहेबांनी एक आठवडयासाठी चालू केले होते. त्यांना विनंती केली की, इथे आजूबाजूला संपुर्ण वस्ती आहे, हजारो लोक राहतात. तेव्हा त्यांनी सर्वांची विनंती मानून डंपिंग ग्राउंड बंद केले. फक्त एक आठवडाभर हिरे साहेबांनी चालू केले होते. त्याच्या नंतर निंबाळकर साहेब आले, त्यांनी परवानगी न घेता, महासभेमध्ये पास न करता आणि सरकारची परवानगी न घेता थेट डंपिंग ग्राउंड चालू केले आणि हा मुद्दा एक वर्षात तीन ते चार वेळा महासभेमध्ये आला आहे. महासभेने याला कधीच अनुमती दिली नाही की, तिथे डंपिंग ग्राउंड सुरू ठेवण्यात यावा आणि सन २०१३ पासून महाराष्ट्र शासनाचे असे खुप जी.आर. आहेत की, नविन डंपिंग ग्राउंड कुठेच झाले नाही पाहीजे. आता सर्व ठिकाणी सेग्रीगेशन होत आहेत. परंतु कुठे तरी डंपिंग ग्राउंड चालू आहेत, ते पण महाराष्ट्र शासनाचे आदेश आहेत की, सर्व डंपिंग ग्राउंड बंद करण्यात यावेत. इथे दिड वर्षापासून डंपिंग ग्राउंड चालू केला आहे, तिथे २४ तास दुर्गंधी येते आणि २४ तासात आपोआप आग लागते संपुर्ण ५ नंबरचे शहरवासी खुप त्रस्त आहेत. मी आज आपल्याला सांगू इच्छितो की, सरकारची कोणतीही परवानगी नाही किंवा महासभेची परवानगी नाही. अनाधिकृत डंपिंग ग्राउंड चालू केले आहे, आम्ही ५ नंबरवाले लोक महासभेमध्ये प्रत्येक वेळी विनंती करीत आहेत की बंद करा. जर कोणी कोर्टामध्ये गेले किंवा महाराष्ट्र शासनाकडे कोणी अपीलसाठी गेले तर ही केस आयुक्त साहेब व महानगरपालिकेवर होईल. त्यासाठी जबाबदार आयुक्त साहेब असतील. तरी कृपया करून हा डंपिंग ग्राउंड त्वरीत बंद करण्यात यावे आणि पब्लिकला जो प्रॉब्लेम आहे, तो सोडवण्यात यावा, धन्यवाद.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** मा. महापौरजी, मा. उप महापौरजी, मा. आयुक्त मॅडम, आजची लक्षवेधी मिना सोंडे मॅडमनी आणली आहे, ती खरोखरच चांगली आहे की, डंपिंग ग्राउंडचा हा विषय हया संपुर्ण शहरामध्ये अतिशय भयानक झालेला आहे. मा. महापौरजी, मी आपल्यांना विचारू इच्छितो की, हा जो डंपिंग ग्राउंड आहे, तो अनाधिकृत आहे की, अधिकृत आहे. कृपया नगररचनाकार विभागाचे जर कोणी असतील तर मला सांगण्यात यावे की हे डंपिंग ग्राउंड आहे, तो अधिकृत आहे की, अनाधिकृत आहे. महासभा चालू असतांना येथून अधिकारी निघून जातात. महापौर मॅडम आपण किती वेळा सांगितले आहे की अधिका—यांनी इथे उपस्थित राहणे गरजेचे आहे. परंतु अशा गंभीर विषयावर कोणीही अधिकारी उत्तर दयायला उपस्थित नाहीत. म्हणजे ही खेदजनक बाब आहे की, महासभा चालू असतांना महापौर इथे उपस्थित आहेत, आयुक्त उपस्थित आहेत आणि अधिकारी इथे अनुपस्थित आहेत. कुठल्याही सदस्यांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर तात्काळ देता येत नाही, ही खुप खेदजनक बाब आहे.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—** जेव्हा लक्षवेधी घेतात तेव्हा संबधित अधिकारी नसतील तर त्यांच्या जागेवर दुसरे कोणी तरी अधिकारी असायला पाहीजेत.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** गंभीर विषयावर चर्चा होत आहे आणि अधिकारी उपस्थित नाहीत.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—** कोणत्याही विषयावर कोणीही गंभीर नाहीत.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** आम्ही कशाला इथे बसायचे मा. महापौरजी, काय आहे का नाही अधिकारी वैगेरे काही प्रकार आहे की, नाही.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—** आम्ही महासभा घेऊन काय फायदा आहे, मा. महापौर?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवारः—** मा. महापौरजी, सर्व उपस्थित सदस्य, डंपिंगच्या संदर्भात जो खुलासा विचारलेला आहे. त्या बाबत थोडक्यात माहीती सांगतो की, डंपिंग ग्राउंड गेल्या दिड वर्षापासून मा. तत्कालीन आयुक्त, हिरे साहेब, यांच्या मार्फत डंपिंग ग्राउंड, जुना खडी मशिन येथील जो डंपिंग ग्राउंड आहे, तो चालू करण्यासाठी प्रयत्न केले होते. कारण पुर्वीचा जो म्हारळगांव इथे डंपिंगची जी जागा होती, ती पुर्णपणे भरलेली असल्यामुळे पर्यायी जागा म्हणून खडी मशिन ५ नंबर येथे टाकण्यासाठी प्रयत्न केले होते.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** साहेब, ते सगळयांना माहीती आहे की, हे डंपिंग ग्राउंड अधिकृत आहे की अनाधिकृत आहे, तेवढे फक्त सांगा.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवारः—</u>** सदरची जागा, महापालिकेच्या कार्यक्षेत्रात कुठेही उपलब्ध नसल्यामुळे निंबाळकर साहेब, यांनी शासनाला पाठपुरावा केला आहे. तथापी तात्पुरत्या स्वरूपात खडी मशिन येथे कचरा टाकण्यात आला.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** महापौरजी आपण मला सांगा की, डंपिंग ग्राउंड अधिकृत आहे की, अनाधिकृत, विषय माझा हा आहे की, आज तिथे डंपिंग होत आहे तर आज तिथे रिझंवेशन डंपिंग ग्राउंडचा आहे किंवा ती जागा रिकामी आहे, म्हणून तिथे डंपिंग होत आहे.

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—</u>** सर आपली उल्हासनगर महानगरपालिकेत पोस्टींग काय आहे? हे सांगाल का जरा?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवारः—</u>** मी प्रभारी मुख्य स्वच्छता निरीक्षक आहे.

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—</u>** ठिक आहे, तुम्हांला याचे उत्तर माहीत नाही सर?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवारः—</u>** डंपिंग ग्राउंडची जागा अधिकृत आहे किंवा अनाधिकृत आहे, या बाबतची माहीती नगररचनाकार विभाग सांगू शकेल. पण सध्या स्थितीत महापालिकेचा कचरा जागा नसल्यामुळे त्या ठिकाणी टाकण्यात येत आहे.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** महापौरजी यांचा अर्थ असा आहे की, जिथे रिकामी जागा आहे, तिथे कचरा टाकू शकतो. म्हणजे जिथे आपल्याला खाली जागा मिळेल तिथे आपण आपला कचरा डंप करणार आणि आपण सांगणार की, डंपिंग चालू झाले आहे. ही न्याय पालिका व्यवस्था कोणत्या आधारावर चालत आहे. काही कायदे कानून आहेत की नाही? या विषयी काय उत्तर मिळत आहेत? डंपिंग ग्राउंड अधिकृत आहे का अनाधिकृत आहे, याचे उत्तर मिळत नाही. एक वर्ष, दिड वर्ष तिथे जाऊन एक आयुक्त सांगतात की, इथे कचरा डंपिंग करा. परंतु ते अधिकृत आहे किंवा नाही आणि त्याच्यावर आपण लक्षवेधी घेतली आहे. त्याच्यावर प्रक्रिया करा पण ती जागा कोणाची आहे? महापौरजी आपण आदेश दया, नगररचना विभागाला सांगा की, याचे मला उत्तर दया. या महासभेमध्ये महापौरजी या प्रश्नांचे उत्तर मिळत नाही. महापौरांनी लक्षवेधी स्विकारून लक्षवेधीवर चर्चा चालू आहे आणि या चर्चामध्ये उत्तर देण्यासाठी कोणी अधिकारी उपस्थित नाहीत, ही कशी महासभा आहे. आम्ही नगरसेवक निवडून आलो आहोत, आमच्या सारखे नवनिर्वाचित सदस्य, व जे स्विकृत आहेत, ते शहराच्या हितासाठी बोलत आहेत आणि शहराच्या हितासाठी उत्तर देण्यासाठी अधिकारी उपस्थित नाहीत.

या वेळी सदस्य, श्री. महेश सुखरामनी हे सभागृहा बाहेर गेले.

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—</u>** पवार साहेब, तुम्हाला हे माहीत आहे का आपल्यासाठी दुसरा डंपिंग ग्राउंड सरकारकडून मंजुर झाला आहे?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवारः—</u>** गेल्या दिड वर्षा पासून मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रशासनाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे. उसाटणे या ठिकाणी ३२ एकर जागेची मागणी केलेली आहे. त्यासाठी प्रयत्न चालू आहेत. अजून त्यांच्याकडून आपल्याकडे हस्तांतरीत झालेले नाही.

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—</u>** आपल्या हिशोबाने हस्तांतरीत व्हायला अजून किती वेळ लागेल?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवारः—</u>** या बाबत मा. जिल्हाधिकारी यांच्याकडूनच आपल्याला.....

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—</u>** याचा पाठपुरावा कोण आयुक्त साहेबच करीत आहेत का?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवारः—</u>** स्वतः, व्यक्तीशः मा. आयुक्त साहेब, हे पाठपुरावा करीत आहेत आणि ती मिळण्यासाठी शासनाकडून....

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टालेः—</u>** मा. पवार साहेब, महाराष्ट्र शासनाने मागच्या एक दोन महीन्यापुर्वी मा. मुख्यामंत्र्याचे एक स्टेटमेंट होते. नगरपालिका आणि महानगरपालिका यांच्यामध्ये डंपिंगला कुठलीही जागा दिली जाणार नाही, हे स्टेटमेंट होते. तर तो जी.आर. अस्थितत्वात आहे की, नाही. हे सत्य आहे की चुकीचे आहे.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** जर कायदेशिर, कायदयात असेल तरच उद्या पासून गाडया येऊ दया, नाही तर बंद करा. आपल्या उल्हासनगरची शान असलेल्या स्वामी शांतीप्रकाश आश्रम संध्याकाळच्या वेळी तिथे तुम्ही येऊन प्रत्यक्ष बघा. एक माणूस आश्रमच्या आजूबाजूला उभे राहू शकत नाही. कारण संध्याकाळची वेळ आहे आणि हवा पश्चिमेकडून पुर्वेला येते आणि शांती प्रकाश तिथेच आहे. त्याच्यामुळे तात्काळ जर कायदेशिर नसेल तर उद्या तिथल्या गाडया बंद करा.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** माझा प्रश्न असा आहे, नगररचनाकार साहेब, की, जे डंपिंग ग्राउंड आहे, ते अधिकृत आहे की अनाधिकृत महापौरजी जर डंपिंग ग्राउंड अनाधिकृत आहे, तर त्याच्यावर प्रक्रिया कशी?

या वेळी सदस्य, श्री. महेश सुखरामनी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** महानगरपालिकेला रोज ५० हजार रूपये दंड झाले पाहीजे.

या वेळी सदस्य, श्री. दिपक सिरवानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** आशान साहेबांनी सरळ प्रश्न विचारला आहे.

**नगररचनाकार, श्री.मिलिंद सोनावणे:—** दिले ना उत्तर.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** मग पुढे काय?

**नगररचनाकार, श्री.मिलिंद सोनावणे:—** आता जो डि.पी. सेंशन झालेला आहे, त्याच्यामध्ये डंपिंग ग्राउंडसाठी आरक्षणच ठेवेलेले नाही.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** महापौरजी, डंपिंग ग्राउंड अनाधिकृत आहे. तिथे शांती प्रकाश आश्रम आहे, स्कुल आहे, पाण्याची टाकी आहे, एक किलो मिटरवर शिवमंदिर आहे. हे अनाधिकृत डंपिंग ग्राउंड बंद करण्यासाठी शिवसेनेने आवाज उठवला होता आणि सांगितले होते की, बंद करा इथे डंपिंग ग्राउंड झाला नाही पाहीजे. मोर्चा निघाला होता, परंतु तत्कालिन आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, आधी जिथे डंपिंग ग्राउंड होते, तिथेच चालू ठेवणार. तर मा. महापौरजी जर डंपिंग ग्राउंड तिथे नाही तर प्रक्रिया कशी होणार? तिकडचे डंपिंग ग्राउंड बंद झाले पाहीजे. भावनांची आदर, कदर करा. तिथे रोजच सायंकाळी शहरातील लोक, झुलेलाल मंदिरात येत असतात. जसे श्री. विजय पाटील यांनी सांगितले की, पुर्वेकडून पश्चिमेकडे वारा जोरात वाहते तर दुर्गंधी येत असून लोकांना त्याचा त्रास होतो. महापौरजी गंभीर विषय आहे, हे डंपिंग ग्राउंडच अनाधिकृत आहे, जर डंपिंग ग्राउंडच अनाधिकृत आहे तर त्याच्यावर प्रक्रिया कशी? ही जी लक्षवेधी मिना सोंडे मॅडमनी आणली आहे, ती खरोखर चांगली आहे. परंतु माझे म्हणणे असे आहे की, हे डंपिंग ग्राउंड लवकरच बंद झाले पाहीजे.

या वेळी सदस्य, श्री. किशोर वनवारी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त मॅडम, मिना मॅडमनी ही जी डंपिंग ग्राउंडची लक्षवेधी आणली आहे, कचरा डंपिंगच्या बाबतीत डंपिंग ग्राउंडचा जो विषय आहे, तो फार गंभीर आहे. कॅम्प नंबर ५ ही संताची भुमी आहे, मंदिरे आहेत, दरबार आहेत, शांती प्रकाश आश्रम आहे आणि त्यामुळे तिथल्या लोकांना त्रास होत आहे. या लक्षवेधीच्या माध्यमातून शासनाचे डायरेक्शन असल्यामुळे, शासन आपल्याला डायरेक्शन देते की, डंपिंग स्टेशन बंद करा, ते डंपिंग स्टेशन बंद करता येत नाही. स्वच्छ भारत अभियान सुरू असतांना, स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून आपण ओला कचरा, सुका कचरा वेगळा करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो ओला कचरा जर वेगळा झाला तर त्याच्यावर प्रक्रिया करण्यासाठी आपण काय उपाययोजना केली का? ज्या उपाययोजना करायला पाहीजे होत्या, त्या अजून पर्यंत आपण केल्या नाहीत. वारंवार नगरसेवक सांगून सुध्दा कंपोस्टींग करण्यासाठी कंपोस्ट स्टेशन बनवायचे होते, ते अजून पर्यंत आपल्या प्रशासनाने बनवले नाहीत. लोकांना सांगायचे की, ओला कचरा, सुका कचरा वेगळा दया. स्वच्छ भारत अभियान सुरू आहे, स्वच्छ भारत अभियानामध्ये तुम्ही सहभागी व्हा. शहराला स्वच्छ करू या, पण महापालिकेला जे प्रयत्न करायला पाहीजेत, ते केले जात नाहीत,

जाणूनबुजून केले जात नाहीत. एका बाजूला डंपिंगवर कचरा डंपिंग करून तिथल्या लोकांना त्रास दयायचा आणि दुसरीकडे ओला कचरा, सुका कचरा वेगळा करून देण्यासाठी लोकं तयार आहेत. त्या लोकांसाठी प्रक्रिया करण्यासाठी कुठलेही कंपोस्टींग बनवायचे नाही, ही भुमिका या महापालिकेच्या प्रशासनाची आहे. म्हणून जे काही प्रश्न उद्‌भवलेले आहेत, या आडमुठपणाच्या धोरणामुळे प्रशासनाच्या हे प्रश्न उद्‌भवलेले आहेत. यावर कठोर निर्णय आपण घेतला पाहीजे. जर ओला कचरा सगळया वार्डामधून गोळा होत असेल, त्या ओल्या कच—यावर प्रक्रिया करायची असेल तर त्याच्यासाठी कंपोस्टस्टेशन बांधण्यासाठी आपल्याकडे जागा आहेत, त्याच्या एस्टिमेट बनवल्या, एस्टिमेट बनवयल्या तर कामे का होत नाहीत. वारंवार सांगितल्या नंतरही या महानगरपालिकेत काम होत नाही. अतिशय दुदैवाची बाब आहे, धन्यवाद.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मा. महापौरजी या विषयामध्ये मी सोंडे मॅडमला धन्यवाद देतो की, एवढा मोठा मुद्‌दा होता, परंतु कोणाचे लक्ष गेले नाही. मी सांगू इच्छितो की, जुना डि.पी. प्लॅनमध्ये पण डंपिंग ग्राउंड नाही आणि नविन डि.पी.मध्ये पण डंपिंग ग्राउंड नाही. मागच्या ६५ वर्षा पासून आपला उल्हासनगर निर्वासित कॅम्प होता, त्याच्यात कोणी बोलेले बघितले नाही, अचानक सहा महीने किंवा वर्षात जर कोणी आयुक्त येतात आणि बोलतात की, इथे कचरा टाकण्यास सुरूवात करा. परंतु वस्तुस्थिती पण बघितली जाते की, कुठे कचरा टाकतात, तिथे कोणी लक्ष दिले आहे का? नगररचनाकार साहेब, मी तुम्हांला पण सांगतो की आणि विभागाला पण सांगतो की, जिथे टाकला जातो, तो शहरापासून दुर असतो. शहरवासियांमध्ये नाही आणि कोणाच्या घराच्या जवळ नाही आणि कोणत्याही रेसिडेन्शिल झोनमध्ये नाही. मी तुम्हांल,ा मला आता जी माहीती मिळाली आहे, मला पण माहीती नव्हते, जे मी सांगत आहे. रेसिडेन्शिल झोनमध्ये तुम्ही डंपिंग ग्राउंड बनवत आहेत. म्हणजे मोठया आजारपणाला तुम्ही निमंत्रण देत आहेत. दि ग्रेट फुल ऑफ दि कॉर्पोरेशन म्हणजे आजार वाढवत आहेत, मी असे म्हणून इच्छितो आणि तुम्हांला सांगू इच्छित आहे की, ५ नंबरमध्ये जो डंपिंग ग्राउंड बनवला गेला आहे, त्याचे डायमिटर कसे आहे मी सांगतो. मला वाटते की, आरोग्य विभागाला माहिती असेल आणि तुम्हांला हे माहिती आहे की नाही, हे मला माहिती नाही. वेरी गुड थॅंक्यु युआर नॉट गिव्हन परमिशन इटस वेरी गुड ॲन्सर ॲप्सुलुट सर्वांनी ऐकायला पाहीजे की, साहेबांनी काय सांगितले? गिव्ह ऐस नॉट गिव्हन एनी परमिशन.

**नगररचनाकार, श्री.मिलिंद सोनावणे:—** मी कोणतेच परमिशन डंपिंग ग्राउंडसाठी दिले नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** धन्यवाद, पुढे मला बोलू दया, आता हा डंपिंग ग्राउंड बनवले आहे, एरिया काय आहे? ५० मिटरवर एक शांती प्रकाश आश्रम आहे. तिथे लाखो लोक जातात, श्रध्दाळू जातात, मुंबईमधून येतात, विदेशातून येतात, उल्हासनगर मधून येतात, त्याचे डायमेंट आहे, २०० मिटर बाजूला एक रेसीडेन्सी एरिया आहे, गायकवाडपाडा त्याचे आहे १०० मिटर आणि राईटमध्ये अजून एक रेसीडेन्सी एरिया आहे, १०० मिटरवर आणि बाजूला आहे वाटर टॅंक आणि त्याच्या जवळ एक पटेलनगर आहे. तसे पाहायला गेले तर टोटली रेसीडेन्सी एरियामध्ये तिथे डंपिंग ग्राउंड क्रिऐट केले आहे. आय डोंन्ट क्लेम यु इट इज क्रिऐटेड बाय सम वन अनऑफिशली तर माझी विनंती नाही, मी असे बोलतो की, संपुर्ण सभागृहाची विनंती आहे की, ते डंपिंग ग्राउंड त्वरीत हटवायला पाहीजे. जर महामारी पसरते, कॅम्प नंबर ५ येथील डंपिंग एरियामध्ये दि इट इज 100 % लायबेलिटी कॉर्पोरेशन विल बी लायबल फॉर धिस दॅन आणि मी दाव्यानिशी सांगतो की, ही महामारी कधी पण पसरू शकते. यु नेव्हर नो पाऊस पण पडू शकतो आणि पाऊसामध्ये महामारी पसरू शकते. देवाच्या कृपेने सहा महीन्या पासून काहीच झाले नाही. परंतु कधी पण होऊ शकते? त्यामध्ये डेंग्यु, लिपरसी, टयुबोंक्युरसेस असे खुप आजार आहेत, जे डंपिंग ग्राउंडमुळे होतात आणि खास करून अस्थामाची, जसे सांगितले की, कधी कधी रात्रीच्या जळत पण असतो, धुर निघत असतो. तर असे नाही झाले पाहीजे की, अस्थमाचे रूग्ण वाढतील. तर माझी विनंती आहे की, कृपया करून रेसीडेन्सी एरियामधून डंपिंग ग्राउंड लवकरात लवकर हटवण्यात यावे आणि भविष्यामध्ये त्याचे प्रोव्हिजन उल्हासनगरच्या बाहेर केले होते, ती जमिन खरेदी केली आहे किंवा नाही केली, ते पण आपण चांगल्या प्रकारे बघून आणि लेवकरात लवकर कराल तर शहराचा खुप फायदा होईल, धन्यवाद.

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी हे सभागृहाबाहेर गेले.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** महापौरजी, कच—याच्या मुद्‌दयावर आपण ब्रॅन्ड ॲबेसेडर निवडले होते, काली साई ते तिथलेच आहेत. वसनशाह दरबार माझ्या माहीती प्रमाणे २०० मिटर किंवा ३०० मिटरमध्ये डॉक्टरांनी मोजले

आहे, २०० मिटरमध्ये आहे. जर ब्रॅन्ड ॲबेसेडरच्या बाजूलाच कचरा आहे तर ब्रॅन्ड ॲबेसेडरला कसे वाटेल? या शहराचे, महापौरजी गंभीर नाहीत. या महासभेमध्ये आपण न्याय दया की ज्या शहराचे ॲबेसेडर तिथे २०० मिटरच्या जवळ राहतात, तिथे कच–याचे डंपिंग ग्राउंड ते पण अनाधिकृत, कधी बंद होईल? महापौरजी आपण आदेश दया उद्या पासून तो डंपिंग ग्राउंड बंद झाला पाहीजे.

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:–** मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त मॅडम, सचिव मॅडम, सन्माननिय सदन, आज सभागृहाचे लक्ष केंद्रीत करण्यासाठी आपल्या उत्कृष्ट नगरसेविका श्रीम. सोंडे मॅडम यांनी लक्षवेधी आणली आहे. ही एक आपल्या शहराची गंभीर समस्या आहे. यासाठी संपुर्ण सभागृहाचे एक मत आहे की, कॅम्प नंबर ५ मध्ये खडी मशिन येथे दोन वर्षा पासून जो डंपिंग ग्राउंड चालू केले आहे. तेथील रहीवासी रोज संघर्ष करीत आहेत, दादा सतरामदास जेसवानी यांनी भरपूर संघर्ष केला आहे आणि काही शिवसेनेच्या नगरसेवकांनी पण संघर्ष केला आहे. म्हणजे काहीना काही तरी तिथे त्रास आहे, तेथील धुरा पासून, तेथील दुर्गंधीमुळे, परंतु अजून एक बाजू आहे, ती मी सांगू इच्छितो की, हा डंपिंग ग्राउंड श्री. अरूण आशान यांनी सांगितले की, हा अनाधिकृत आहे किंवा अधिकृत आहे आपल्याकडे जी जमिन आहे, ती अधिकृत आहे की, अनाधिकृत हा एक विषय आहे. कारण की, एवढी मोठी गोष्ट शहरामध्ये होत आहे तर त्याचे टायटल काय आहे? सर्व गोष्टी बघायला पाहीजे होत्या. परंतु जेव्हा हा डंपिंग ग्राउंड तिथे शिप्ट झाले तर तेव्हा त्याच्या मागे एक खुप मोठे कारण आहे. मी आपल्याला सांगतो की, सन २००६ मध्ये जो डंपिंग ग्राउंड म्हारळ, खेमाणी इथे १५ वर्षा पासून चालू होते, त्याची मर्यादा सन २००६ मध्ये संपून गेली होती. एक मोठा डोंगर तिथे तयार झाला होते, ज्या डंपिंग ग्राउंडची मर्यादा सन २००६ मध्ये संपते आणि सन २०१७ पर्यंत ते चालू होते, म्हणजे ११ वर्षे आपण तिथे अनाधिकृतपण कचरा डंपिंग केला आहे आणि त्याचे कारण सभागृहामध्ये सांगायला गेलो तर पुर्ण एक दिवस लागेल. त्या अनाधिकृत ११ वर्षापासून टाकत होतो, त्याचे कारण फक्त उल्हासनगर–१, २, ३ पर्यंत त्याचे वास, त्याचा त्रास आणि त्यापासून निघणा–या धुरामुळे जवळ जवळ ३ लाख लोक त्रस्त होते. मी लक्ष वेधीच्या माध्यमातून पहील्या सत्तेमध्ये मी या कच–याच्या बाबतीत मुद्दा आणला होता, त्यावेळी श्री. मनोहर हिरे हे आपले आयुक्त होते, त्यांनी सांगितले होते की, डंपिंग ग्राउंडची जी मर्यादा संपलेली आहे आणि त्यामुळे आपल्या जवळ जागा उपलब्ध नाही, आम्ही जागेसाठी विचार करीत आहेत, सरकारकडे पण आम्ही मागणी केली आहे. परंतु कुठे ना कुठे जागा न मिळाल्यामुळे इथे अनाधिकृतपण कचरा टाकत आहेत. महापौरजी मी त्या वेळी ही माहीती घेण्यासारखी गोष्ट आहे, मी त्यावेळी खेमानी परिसरातील किंवा कॅम्प नंबर २ मध्ये जेवढे डॉक्टर आहेत, उल्हासगनर –३ फॉलवर लाईन पर्यंत, फर्निचर मार्केट पर्यंत जेवढे पण डॉक्टर आहेत, एक थोडी माहीती मी डॉक्टरांकडून घेतली होती की, डंपिंग ग्राउंडची दुर्गंती विशेषत: पावसाळयाच्या दिवसामध्ये आणि उन्हाळयामध्ये जो धुर निघत असतो, त्या धुराचे परिणाम नेहरू चौका पर्यंत, फॉलवर लाईन पर्यंत आणि सिरूचौक पर्यंत त्याचे परिणाम होत होते. तर मी डॉक्टरांचे म्हणणे ऐकले आणि त्यांच्याकडून रिपोर्ट घेतले तेव्हा हैरान झालो की, हा विषारी धुर आहे. तो माणसांचे जे फेफडे आहेत ते नॉर्मल राहत नाही, जो कोणी धुम्रपान करीत नाहीत, तर ते ४०, ५० वर्षा नंतर कमजोर होतात. परंतु जर डंपिंग ग्राउंडच्या ४ किलो मिटरमध्ये कोणी राहत असेल? आणि जर हा धुर आठ दिवसापासून जर जास्त चालत असेल आणि जर तिथे आपण एक तरूण ज्याचे वय १८ किंवा २५ वर्षाचे पकडले तर त्या तरूणाचे फेफडे खराब होऊ शकतात. दुसरे म्हणजे शरीराला खाज लागणेचा त्रास, लोकांना खाज लागणे हे बघायला मिळाले होते. त्याच्या नंतर दमा, खोकला, अस्थमा असे भरपूर जीव घेणारे आजार स्थानिक डॉक्टारांनी सांगितले की, या डंपिंग ग्राउंडच्यामुळे होत आहेत. डॉक्टर साहेबांनी सांगितले की, आम्ही महामारीच्या दिशेने जात आहेत, त्यावेळी आपण महामारीने जात होतो. त्या क्षेत्रातील तीन लाख लोक, कॅम्प नं.१, २, ३ चे महामारीच्या दिशेने जात आहेत. त्याच्या नंतर तिथे काळया कच–याचा एक मोठा डोंगर तयार झाला होता, येणा–या दिवसात ते कधी पण पडू शकत होते. असे झाले होते की, या शहरामध्ये एवढया वर्षापासून हिंदु मुस्लिम लोक भाऊ म्हणून एकत्र राहत आहेत, त्यावेळी डंपिंग ग्राउंडचा एक मोठा तुकडा मजिदवर पडला होता. भालेराव साहेब, तुमच्या प्रभागातले आहे, मला माहीती आहे, तुमचा प्रभाग आहे. तिथे तत्कालीन लोकप्रतिनिधी आणि पोलिस विभागाने मिळून कंट्रोल केले होते. मजिदवर पडणे म्हणजे कोणाच्या धर्माच्या भावने बरोबर खेळणे आणि तिथी भिंत पण बांधली नव्हती, तिथे रमाबाई टेकडी, हनुमाननगर जो एक पोर्शन आहे, जो ऑर्डनन्स फॅक्टरीच्या भितीला लागून आहे, प्रत्येक दिवस तिथे कच–याचे ढीग पडत होते. त्यांचे वजन टनामध्ये असायचे.

तिथे दोन लोक दाबले गेले होते, त्याच्यात एक छोटी मुलगी होती आणि देवाच्या कृपेने काही झाले नाही. परंतु प्रत्येक दिवस या गोष्टीचा सामना तिथल्या लोकांना करावे लागत होते आणि आजार, महामारी, त्रास आणि दुर्गंधी या गोष्टी वेगळया होत्या. तर ११ वर्षापासून आपण तो डंपिंग ग्राउंड चालवला होता आणि आता कॅम्प नंबर ५ मध्ये निंबाळकर साहेबानी डंपिंग ग्राउंड चालू केला आहे. परंतु निंबाळकर साहेबांचा हा निर्णय कॅम्प नंबर ५ च्या नगरसेवकांना आवडला नसेल. परंतु कुठे ना कुठे तिथे एक ज्वलनशिल निर्णय होता, मुद्दा होता, त्यापासून शहरामध्ये त्रास होत होता, महामारी पसरली होती, दुर्गंधीमुळे संपुर्ण कॅम्प नंबर १, २, ३ ला खुप त्रास झाला होता. त्यावेळी त्या समस्याचे निवारण केले गेले, जो खडी मशिनचे क्षेत्र आहे, तिथे त्यांनी कचरा टाकणे चालू केले आणि आज तिथे पण तोच त्रास चालू झाला आहे. तेच धुर, दुर्गधी यासाठी तेथील नगरसेवक, दादा सतरामदास, पाटील साहेब, एच.ओ.डी. ग्रुपवर प्रत्येक दिवस पाठवत असतात. निंबाळकर साहेब होते, त्यावेळी त्यांनी या धुराला थांबवण्यासाठी एक लेडीज त्या धुराला आणि दुर्गंधीला कन्ट्रोल करतात, त्यांना नॉमिनल चार्ज देवून त्यांना अपॉईंटमेंट केले होते. तिथे लाखो रूपये खर्च करून तिथे माती, पाणी आणि केमिकल टाकून धुरावर कन्ट्रोल केले होते. परंतु आता परत उपाय करण्यासाठी लक्षवेधी टाकली होती, तिथे सेग्रीगेशन केले जावे, धुराला थांबविण्यात यावे, असे काही पर्याय काढायला पाहीजे. तर हे होऊ शकत नाही, महापौरजी तर हे काही कालावधीसाठी सोलुशन आहे, त्यामुळे आपण या गोष्टी थांबवू शकतो, संपवू शकत नाही. तर माझे म्हणणे आहे की, हा डंपिंग ग्राउंड, जसे डॉक्टर साहेबांनी सांगितले की, हा रहिवासी क्षेत्र आहे आणि त्याच्या बाजुला दरबार आहेत, खुप मंदिरे आहेत, खुप धार्मिक स्थळे आहेत, तर त्यांना कुठे ना कुठे त्रास होत आहे, ते आपण त्याला अमान्य करू शकत नाही आणि आम्ही प्रभागामध्ये बघत पण आहोत आणि अनुभव पण घेत आहोत. कारण की, लोकप्रतिनिधी फक्त दाखवण्यासाठी आहेत, एखादया मुद्दयाला एक वेळा, दोन वेळा उचलला, तो मुद्दा परत परत उचलणे हे राजनिति होऊ शकत नाही. तर काही ना काही तिथे त्रास आहे? जेव्हा निंबाळकर साहेब होते, तेव्हा त्यांनी सरकारकडे पाठपुरावा करून आपल्या उसाटणे गांवामध्ये डंपिंग ग्राउंडसाठी ३२ एकर जमिनीसाठी पाठपुरावा केला होता. ती फाईल कलेक्टर डिपार्टमेंटकडून पास होऊन रिव्हेन्यु डिपार्टमेंटकडे पडून आहे. तर आपले शहर १३ किलो मिटरचे, छोटे शहर आहे, आपल्याकडे जागा लिमिटेड आहे. आपण पहीलेच त्रासलेलो आहे की, दुस—या मुलभुत सुविधा देवू शकत नाही. महापौर मॅडम डंपिंग ग्राउंडचा आपल्याच शहराचा विषय नाही तर मुंबईमध्ये पण डंपिंग ग्राउंडचा इश्यु आहे, ठाण्यामध्ये सुध्दा डंपिंग ग्राउंडचा इश्यु आहे, कल्याण, डोंबिवलीमध्ये पण डंपिंग ग्राउंडचा इश्यु आहे. जर हा इश्यु एक जनरल झाला आहे. आपल्यासारखी महानगरपालिका आपले कार्य स्वत: करते, स्वत:वर अवलंबून आहे. तर याचे सोलूशन असे आहे की, आज खडी मशिन येथे जे डंपिंग ग्राउंड चालू आहे, ते अनाधिकृतपणे आहे. असे आहे की, पहीले एका जागेवर भरपूर समस्या निर्माण झाली होती, नंतर दुस—या जागेवर आणण्यात आले आणि आता दुस—या जागेवर समस्या निर्माण झाली आहे. ती समस्या पुढे अजून वाढू शकते. तर त्यासाठी आपल्याला काही तरी पर्याय सोधायला पाहीजे. तर मी संपुर्ण सभागृहाला ते भारतीय जनता पार्टीचे असतील, शिवसेनेचे असतील, बाकीच्या पक्षाचे नगरसेवक असतील आपण सर्वांनी मिळून जो निंबाळकर साहेबांनी ३२ एकर जमिनीचा विषय पेंडींग पडला आहे, कलेक्टर साहेबांकडून पास झाला आहे, बाकीचे पाठपुरावे झाले आहेत, आपल्याला काही पैसे दयायचे आहेत. परंतु कुठे ना कुठे मा. महापौरजी, उप महापौरजी, मी आपल्याला निवेदन करतो की, या विषयाला गंभीरतेने घेऊन एक कमिटी बनविण्यात यावी आणि ३२ एकरसाठी पाठपुरावा करण्यात यावा. लवकरात लवकर शहराच्या बाहेर एवढी मोठी जमिन आपल्या महानगरपालिकेला मिळेल आणि आपण तिथे सेग्रिगेशन, कच—याचे विल्हेवाट आणि आधुनिक ज्या प्रक्रिया आहेत, त्या आपण करू शकतो. परंतु जो पर्यंत खडी मशिन येथे डंपिंग होत राहील आणि इथे लोकांना त्रास होत राहील. आता तर गर्मी अजून वाढणार आहे. तर धुरापासून जो त्रास आहे, तो निर्माण होणे चालू आहे आणि दुर्गंधीमुळे त्रास व्हायला सुरूवात झाली आहे. जो पर्यंत आपण हा पाठपुरावा एक महीन्याच्या आत, दोन महीने करणार आहेत, तो पर्यंत पर्यायी व्यवस्था करण्यात यावी किंवा सेग्रिगेशन करण्यात यावे. आपल्याकडे ठेकेदार आहे, ते घरा घरातून कचरा उचलतात, कचरा कुंडयामधून कचरा उचलतात त्या ठेकेदाराच्या माध्यमातून आणि आपला सफाई विभाग मिळून डंपिंग ग्राउंडचे सपाटीकरण करणे, त्या कच—याचा काही भागाचे विल्हेवाट लावून, सेग्रीगेशन करून कमीत कमी डंपिंग ग्राउंड पर्यंत पोहचून आणि जो कचरा डंपिंग ग्राउंडवर पोहचत आहे, तिथे जसे की, रागीनी मॅडमने धुर कमी केला होता आणि तिथल्या दुर्गंधीला संपवून टाकले होते. तर तिथे काही ना काही तात्पुरती व्यवस्था करण्यात यावी आणि आपले लक्ष त्या ३२ एकर जमिनीवर दयायला पाहीजे, त्याच्यासाठी आपण एक कमिटी बनवून सर्वांनी सत्ताधारी असतील, विरोधी पक्ष असतील सर्वांनी मिळून ३२ एकर जमिनीसाठी पाठपुरावा करण्यात यावा आणि लवकरात लवकर ती जमिन

अधिग्रहन करण्यात यावी म्हणजे आपल्या महानगरपालिकेला स्वत:चा डंपिंग ग्राउंड मिळेल आणि आपला प्रकल्प चालू करेल, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाड, सदस्या, श्रीमती ज्योत्सना जाधव हया सभागृहाच्या बाहेर गेल्या.

**सदस्य, श्री. महेश सुखरामनी:–** महापौर मॅडम, उप महापौर साहेब, आयुक्त मॅडम, उद्या आपली मंत्रालयामध्ये मिटींग आहे, आपले नगररचनाकार श्री. मिलिंद सोनावणेजीने सांगितले होते आणि आपल्या उल्हासनगरचा हा जो विषय आहे, तो संबंधित पाठपुरावा आणि काय विषय आहे? आणि कसा ठेवायचा आहे? आणि कोणला फोन करायचा आहे? जो पण विषय असेल, तर मी महापौर, उप महापौर व संबंधित अधिका–यांना सांगतो की, उद्या मंत्रालयामध्ये मिटींग आहे तर त्याचा अधार घेण्यात यावा, धन्यवाद.

**सदस्य, श्री. अरूण आशान:–** महापौरजी, कच–याच्या बाबतीत डंपिंग ग्राउंडचा जो विषय आहे, या विषयावर सभागृहाच्या भरपूर सदस्यांनी सांगितले की, कच–यामुळे काय समस्या उद्‌भवू शकते? तर माझी विनंती आहे की, समस्या वाढण्याच्या पहीले ते थांबवण्यात यावे. बसमध्ये प्रवास करा, पण प्रवासाचे आनंद घ्या. अनाधिकृत डंपिंग ग्राउंडवर चर्चा चालू आहे, या महासभेमध्ये जर एखादया विषयावर चर्चा होत असेल तर त्याचे निर्वारण पण झाले पाहीजे, अंमलबजावणी झाली पाहीजे. महापौरजी माझी ही विंनती आहे की, जर हे चुकीचे आहे, तर ते थांबवण्यात यावे. जर सेग्रिगेशन करायचे आहे तर, आज आपल्या शहरामध्ये सेग्रिकेशन करण्यासाठी ओला कचरा व सुका कचरा वेगळा होत आहे का? मला कोणी सांगेल का वेगवेगळा होत आहे का? जर होत नसेल तर आपल्याकडे सेग्रिगेशन करण्यासाठी आपल्याकडे काय रिक्युपमेंट आहे? आपण काय करू शकतो? मुद्दा, विषय खुपच चांगला आहे. डंपिंग ग्राउंडसाठी आपल्या शहराचाच विषय नाही तर संपुर्ण हिंदुस्तानचा विषय आहे. परंतु हा जो विषय चालला आहे, या विषयाची सुरूवातच अनाधिकृत आहे. जर जागाच आपली नाही तर सेग्रिगेशन कसे? तिथे मशिन कशी लावणार? आमची मागणी आहे की, डंपिंग ग्राउंडवरच कचरा टाकायला पाहीजे. जर दहा दिवसासाठी, पंधरा दिवसासाठी आपण कचरा तिथे टाकला तर त्याचा अर्थ असा नाही की, कायमस्वरूपी डंपिंग ग्राउंड झाला. कॅम्प नंबर ४, ५ चे लोक त्रस्त आहेत. सकाळच्या वेळी झुलेलाल मंदिर, चालिया मंदिरामध्ये लोक येतात तर त्रस्त होतात, महापौरजी आपण लक्ष दया. आमवस्याच्या दिवशी दरबारामध्ये हजारो लोक येत असतात. परंतु दुर्गंधीमुळे त्रस्त होतात, ही दुर्गंधी हा महानगरपालिकेचा विषय आहे. हे आपल्या सदस्यांचा अपमान आहे की आपण सेग्रिगेशन व्यवस्थित करीत नाहीत आणि डंपिंग पण अनाधिकृत करीत आहोत. तर माझी सभागृहाला विनंती आहे की, हा डंपिंग ग्राउंड बंद करण्यात यावा.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:–** आशान साहेब, अजून जरा ऐका महापौर साहेब पहीले मी हात जोडून माफी मागून लोकांच्या समस्या तुमच्या समोर मांडणार आहे. सर्व लोकप्रतिनिधींना पण माझी हात जोडून विनंती आहे की, आपल्याला पब्लिकने त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी महानगरपालिकेच्या महासभेमध्ये पाठवले आहे. दिड वर्षापासून कॅम्प नंबर ५ ची जनता कच–यामुळे त्रस्त आहेत. दिड वर्षा नंतर ज्या नगरसेवकांनी आज आवाज उडवला आहे, त्यांना मी धन्यवाद देतो, कॅम्प नंबर ५ च्या नगरसेवकांनी आज आवाज उठवला आहे, त्यांना एक वेळा नाही तर करोडो वेळा मी धन्यवाद देतो आणि ४ नंबरच्या नगरसेवकांना पण धन्यवाद देतो. परंतु कृपया जो मी तुम्हांला सांगणार आहे, ही खडी मशिन ५० वर्षापुर्वी चालू केली होती. त्या खडी मशिन मधून जे दगड उडत होते. त्या खडी मशिनला मा. जिल्हाधिकारी यांनी परवानगी दिली होती. खडी मशिन चालवल्यामुळे तिथल्या लोकांना त्रास झाला. तिथल्या लोकांनी आवाज उठवला, त्यावेळी तिथले नगरसेवक, श्री. नारायणदास वनवारी होते, श्री. किशोर वनवारी यांचे वडील, त्यांच्या एका आवाजामुळे तिथले लोक बरोबर असल्यामुळे संपुण खडी मशिन जी कायदयानुसार चालू होती, ती बंद करण्यात आली. त्यावेळच्या नगरसेवकामध्ये आणि लोकांच्या आवाजामध्ये एवढी ताकत होती की, त्या वेळच्या सरकारने ही खडी मिशन बंद करण्यात आली. महापौर मॅडम, उप महापौर मॅडम बोलत होते, त्यामुळे मी थांबलो. तर कृपया पहीले पहीले मी महापौर, उप महापौर व आयुक्त साहेबांना विनंती करतो की, डंपिंग ग्राउंड जवळ या जमिनीच्या खाली दोन पाण्याच्या टाक्या आहेत, तिथे पाणी जमा करून मोटरच्या सहाहयाने वरच्या टाकीमध्ये पाणी सोडले जाते आणि या डंपिंग ग्राउंडवर फक्त कचराच येत नाही, आशानजी जरा ऐका या डंपिंग ग्राउंडवर फक्त कचराच येत नाही, तर रोज मृंत्यु झालेली १०० जनावरे येत असतात. डुक्कर, कुत्रे,

मांजरे आणि अन्य जनावरे, ती जनावरे तिथे जमा झाल्यामुळे आपण सांगा, त्यांच्या पासून किती किडे, माकोडे उत्पन्न होतील आणि ते उडत उडत पाण्याच्या टाकी पर्यंत पोहचणार नाहीत का? आणि जर पाण्याच्या टाकी पर्यंत ते किडे जातील तर आमची तबीयत चांगली राहणार का? आमच्या मुलांची तबीयत चांगली राहणार का? आम्ही लोक तिथे ६० ते ६५ वर्षापासून तिथे राहत आहेत आणि आता आम्हांला तिथे राहणे मुश्किल झाले आहे. जेव्हा निंबाळकर साहेब होते, मी किती तरी वेळा महासभेमध्ये पण आवाज उठवला आणि काही वेळा लोकशाही दिनाच्या दिवशी त्यांच्या ऑफिस समोर खाली बसलो आहे, तेव्हा त्यांच्या लक्षात ही गोष्ट आली आणि त्यांनी सांगितले की, मी दहा, पंधरा दिवसामध्ये सरकारकडे जी प्रलंबित फाईल आहे, ती जमीन आपल्याला मिळू शकते, त्यासाठी आपण सर्व लोकप्रतिनिधी यांना बरोबर घेऊन त्या जमिनीचे आदेश घेऊन येऊ. आपण बघा औरंगाबादमध्ये डंपिंगमुळे किती समस्या निर्माण झाली होती? तुम्हांला वाटते की, या शहराची जनता पण रस्त्यावर यायला पाहीजे? किंवा नगरसेवक कच—याच्या ट्रक समोर उभ राहावे? अशांतता निर्माण झाली पाहीजे का? मी पब्लिकचा एक xxx आहे. xxx काम आहे ओरडणे कारण की, त्यांनी आम्हांला निवडून पाठवले आहे. कोणी ऐकेल किंवा नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय दादाजी, आपण असे शब्द वापरू नका? तुमचे म्हणणे मी ऐकत आहे. तरी कृपया आपण असे शब्द वापरू नका?

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** आमच्या मुलांचे जीव धोक्यात आहे. मी पहीलेच आपली माफी मांगितली आहे, तरी कृपया माझे मन जळत आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** फक्त असे शब्द वापरू नका?

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** मला गद्दार बोलेले गेले.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** आपण शांत बसा.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** की सतरामदास गद्दार आहे, होय गद्दार आहे, पब्लिकचा इमानदार आहे. पब्लिकने निवडून पाठवले आहे, मी पब्लिकचा इमानदार आहे, कोणी मला गद्दार बोलेले तरी मला त्याची परवा नाही. तरी कृपया आमच्या लोकांची आणि मुलांचे जीवन गेले नाही पाहीजे. त्यासाठी माझी हात जोडून विनंती आहे की, मला कुठलेही पद नाही पाहिजे? आणि मला गद्दार बोलणा—या, मी आताच राजीनामा देतो. सतरामला कोणी गद्दार बोलतात, पब्लिकसाठी गद्दार.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** दादा आपण कृपया शांत रहा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** महापौर मॅडम, उप महापौर नाहीत, आयुक्त साहेब, मी आपले लक्ष वेधीतो की, हा जो कच—याचा मुद्दा आहे, मला दु:खाने सांगावेसे वाटते की, जेव्हा पासून निंबाळकर साहेबांची बदली झाली आहे, आता आपण संपुर्ण शहरामध्ये बघा, कच—याचे ढीग जमा झाले आहेत आणि साफसफाईसाठी जो एक टेम्पो बनला होता, त्याला ब्रेक लागला आहे. महापौर मॅडम जर याचा अर्थ असा आहे की, जर कोणी अधिकारी त्याच्यासाठी सर्व लोक काही तरी बोलतात. परंतु साफसफाईमध्ये आज त्याचे शुन्य काम झाले आहे, तुम्ही आमन टॉकिज ते संपुर्ण शहरामध्ये बघा कच—याचे मोठमोठे ढींग पडलेले आहेत. जर इथे श्री. केणे, श्री. पवार बसलेले असतील तर त्यांनी महासभेला सांगावे की, अशी परिस्थिती का निर्माण झाली आहे? संपुर्ण शहरामध्ये कच—याचे मोठमोठे ढीग का पडलेले आहेत? त्याचे कारण काय आहे? आम्हांला त्याचे उत्तर देण्यात यावे. पवार साहेब, आपण सांगा असे का होत आहे?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवार:—** मा. महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्ना बाबत मी सांगू इच्छितो की, शहरामध्ये गेल्या दोन दिवसापासून सुट्टी असल्यामुळे आपले सफाई कामगार बहुताश कमी प्रमाणात आलेले होते. त्यामुळे साफसफाईवर जो परिणाम झाला तो थोडाफार दिसून आला. तरी पण संपुर्ण शहरातील जो कचरा आहे, तो कोणार्क इन्फॉस्ट्रक्चर त्यांच्याकडून आज पुर्णपणे उचलून घेतला आहे. आजही संपुर्ण शहरामध्ये झिरो गार्बेज आहे. कुठेही कचरा नाही असे मी ठामपणे सांगू शकतो.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** एक मिनीट, मला तुम्ही आधी हे सांगा की, कोणार्क कंपनीचे तुम्ही सुपरवायजर आहेत की, मुकादम आहेत की महानगरपालिकेचे अधिकारी आहेत, तुम्ही एवढी त्यांची बाजू मांडत आहेत, झिरो गार्बेज आहे. कधी दाखवता, तुम्ही आता दाखवता की, झिरो गार्बेज. दोन दिवस जर आपले कर्मचारी

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवार:–** दोन दिवसाचा जो कचरा होता....

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** दोन दिवस जर आपले कर्मचारी कामावर आले नाहीत तर खत्यावर कचरा कमी दिसतो. हे माझे त्यांच्यावर आरोप आहेत कामगार कामावर आले होते आणि कचरा खत्यावर आला होता. परंतु कोणार्क कंपनीने कचरा उचलला नाही, असे माझे म्हणणे आहे आणि आजही कचराकुंडया फुल आहेत.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवार:–** सकाळी झाडलोटचा कचरा जास्त प्रमाणत आला होता, आता तो पुर्णपणे कन्ट्रोलमध्ये आहे आणि कमीत कमी तो कचरा कमी झालेला आहे आणि संध्याकाळी उशिरा पर्यंत तो पण कचरा आजच्या आज उचलून घेणार आहोत.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** आमच्या इथे धान्याच्या गोदामा जवळ सतत कचरा असतो, तो दोन, दोन दिवसा नंतर उचलतात. कोणार्क कंपनी कुठें उचलतात कचरा?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवार:–** कुठे आहे, साहेब?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** धान्याच्या गोदामा जवळ.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवार:–** धान्याच्या गोदाम येथील चार ठिकाणच्या कुंडया बंद केल्या आहेत, तिथे आता चार कुंडया ठेवल्या आहेत आणि आजूबाजूचा कचरा दुपारी २.०० वाजे पर्यंत येत असतो, परंतु ३.०० वाजेच्या नंतर तिथला कचरा झिरो गार्बेज दिसून येतो.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** जर दुस–या जागेवर बंद केले आहे, तर इथे जास्त असायला पाहीजे. दुस–या जागेवर जी वेळ होती, त्या पेक्षा इथला कचारा जास्त उचलायला पाहीजे होता. तिथे अर्धा दिवस का लागतो?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवार:–** आता आम्ही निर्णय घेतला आहे की, ३४ छोटे मोठे गार्डन आणि शौचालयाची जागा आहे, तिथे कंपोस्टींग करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला प्रस्ताव दिला आहे आणि त्याच्या नंतर ८० टन ओला कचरा कमी होईल आणि प्रत्येक प्रभागामधून जो अतिरिक्त कचरा येत आहे तो कमी होईल.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** आमच्या क्षेत्रामध्ये कचरा घेण्यासाठी घंटागाडी येत नाही, त्याचे काय?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवार:–** घंटागाडीसाठी आता आपला डी.पी.आर. प्लॉन पास झाला आहे, त्याच्यामध्ये आम्ही बरेच काही सुधारण केल्या आहेत, वैज्ञानिक प्रक्रियाच्या हिशोबाने आम्ही प्रत्येक प्रभागामध्ये कंपोस्टींग करण्यासाठी प्रस्ताव बनवलेला आहे परंतु आता आयुक्त साहेब रजेवर गेलेले आहेत, त्यामुळे आयुक्त साहेबां बरोबर आमचे चर्चा झाली नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** बोलणे झाले नाही किंवा चर्चा झाली नाही, तो पर्यंत लोकांना त्रास होत राहील का?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवार:–** दहा ते पंधरा दिवस आधी डी.पी.आर. प्लॉन उल्हासनगरचा पास झाला आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** धान्याच्या गोडाऊन जवळचा कच–याचा निपटारा करा.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवार:–** सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पस्ताव पाठवलेला आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** तिथे पण कचराकुंडी हटवून दया, कारण की तिथे ब–याच बिल्डींग असून लोक राहत आहेत.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवार:–</u>** कंपोस्टींगसाठी आम्ही प्रस्ताव दिलेला आहे, लवकरात लवकर होईल.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>** मा. महापौर मॅडम, आता या विषयावर खुपच चर्चा झाली आहे, बाकीचे विषय बाजुला ठेवून कब्रस्तानचा मुद्दा ज्वलनशिल असून तुम्ही तो विषय घेतला तर बरे होईल. कारण वेळ खुपच कमी आहे आणि मागच्या काही दिवसापासून कब्रस्तानसाठी उपोषणाला बसले आहेत आणि जी दुसरी लक्षवेधी आहे, ती आपण प्रलंबित ठेवून थेट या विषयावर येऊन त्या विषयावर चर्चा करू. मी आपल्या प्रखानगीने बोलत आहे. तरी या विषयावर चर्चा करून त्याला पास करायचे आहे आणि जो पण निर्णय घ्यायाचा आहे, ते खुप गरजेचे आहे. तरी कृपया या विषयावर चर्चा करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** मा महापौरजी अजून पहीली लक्षवेधी संपलेली नाही, जसे मनाला वाटेल तसे बोलत आहेत. काही तरी आम्ही काही तरी करणार आहेत, आमच्या लक्षवेधीचा विषय मंजूर झाला आहे. त्याच्या अगोदर बाहेरचा पुढचा विषय घ्यायचा आहे, आता त्या मॅडम बोलायला उठल्या आहेत, निदान कमीत कमी एका महीलेचा तर रिसपेक्ट करायला शिका.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** प्रदिप रामचंदानीजी, एक तर मतदानाचा अधिकार नाही, पगार किती बोलतो किती?

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:–</u>** ज्यांनी विषय आणला आहे, त्याच लक्षवेधीवर चर्चा करणार नाहीत तर लक्षवेधी का आणतात?

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:–</u>** मा. महापौर मॅडम, मा. उप महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, आज हा डंपिंग ग्राउंडचा जो विषय आहे, तो खरोखरच आपण विचार करून सुध्दा आपल्याला त्रासदायक ठरतो. आपण बघतो की, आपल्या आजुबाजुच्या परिसरात कचराकुंडी असली तरी त्याचा किती प्रचंड त्रास होतो? तर डंपिंग ग्राउंडच्या बाजुला जे लोक राहतात त्यांना त्रास किती होतो त्याची सविस्तर चर्चा झाली आहे. परंतु माझे म्हणणे असे आहे की, तुम्ही त्याच्या मुळा पर्यंत का जात नाही. आता स्वच्छ सर्वेक्षाणा अंतर्गत आपण सेग्रिगेशन करीत आहोत, ओला कचरा, सुका कचरा. मा. महापौर मॅडम, आणि मध्ये आपण सिंधुदुर्ग, कोकणातील अधिका–यानाही बोलावले होते.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** महापौरजी, एक सदस्या बोलत आहेत आणि मध्येच बोलतात काय आहे? जमनुजींना माझी विनंती आहे की, त्यांना बोलू दया.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u>** डंपिंग ग्राउंड बंद झाले पाहीजे.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:–</u>** मा. महापौर मॅडम माझे हेच म्हणणे आहे की....

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** भारतजी, यांचे म्हणणे तर ऐकुण घ्या.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:–</u>** आपण या गोष्टीच्या मुळाशी का जात नाहीत. आपल्या वार्डातला कचरा वार्डातच संपेल अशी व्यवस्था का करीत नाहीत? म्हणजे कचरा डंपिंग ग्राउंडवर जाणारच नाही. ओला कचरा सुका कच–यासाठी आपण ज्या बिटस केले आहेत, त्याच्याकडे आपण जास्त लक्ष दयायला पाहीजे. डंपिंग ग्राउंडवर मुळातच कचरा जाणारच नाही, या गोष्टीकडे लक्ष दयावे, धन्यवाद.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u>** आता आपण आपले जे बंधू एक महीन्यापासून उपोषणाला बसले आहेत, मानवतेच्या आधारावर आता आपण कब्रस्तानचा विषय घेऊ.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** मा. महापौरजी, आपला आदेश आहे ठिक आहे, परंतु हा विषय पुर्ण झाला नाही. हे बघा आपले अधिकार आहेत, एक तर कोरम पुर्ण नाही, आपण मोजून बघा कोरम पुर्ण नाही. सेग्रिगेशनची चर्चा चालली होती...

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u>** हे बघा, कच–यावर भरपूर चर्चा झाली आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** महापौरजी, याच्यावर निर्णय काय झाला? या लक्षवेधीवर निर्णय काय झाला?_लक्षवेधीवर निर्णय व्हायला पाहीजे होता. माझा सेग्रिगेशनचा विषय होता.

**<u>सदस्य, श्री. महेश सुखरामनी:—</u>** मा. महापौरजी, मी श्री. सुनिल सुर्वे यांच्या गोष्टीशी सहमत आहे. श्रीमती मिना सोंडेजी यांनी हा विषय ठेवला होता, तुम्ही काही तरी उत्तर दयायला पाहीजे की, पुढे काय होईल? आणि हे बरोबर आहे. कब्रस्तानचा मुद्दा आवश्यक घ्या.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** या विषयासाठी उद्या मी मंत्रालयामध्ये जात आहे, तर डंपिंग ग्राउंडची जी पण फाईल आहे, मी तिथे नगररचनाकार यांच्या बरोबर घेऊन जाईल. उद्या त्याचे पण सोलुशन काढले जाईल आता बाहेर जे उपोषणाला बसले आहेत, त्यांना आपण मानवतेच्या अधारावर कब्रस्तानचा मुद्दा पहीले घेऊ.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** मा. सचिव मॅडम मला फक्त कायदा सांगा, असे होते का? माझी दुसरी लक्षवेधी मान्य झाली आहे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** ही काय तुमची डबल, डबल राजनिती?

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** आपण कायदा सांगा मॅडम.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** आता तुम्ही सांगता महापौरजी तुमचे आदेश “सर ऑखो पर” आणि आता तुम्ही सांगता की कायदा आहे का?

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** तुम्ही माझी लक्षवेधी बाजुला का करतात? माझी लक्षवेधी पण महत्वाची आहे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** कब्रस्तानचा संवेदनशिल मुद्दा आहे. महापौरजी संपुर्ण सभागृहातर्फे मागणी करीत आहेत.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** मला फक्त सचिव मॅडम कायदा सांगा, महापौरांचे अधिकार आहेत. याचा अर्थ असा नाही की, आमचा विषय सोडून महापौर आदेश देतील.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** बाकी मुद्दे एवढे आवश्यक नाहीत, जसा कब्रस्तानचा विषय ज्वलनशिल आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** शेवटची १० मिनिटे राहीली आहेत.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** कब्रस्तानवर राजनिती करू नका, संपुर्ण महाराष्ट्र बघत आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** एवढे दिवस काय चालले होते?

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते समजून आले नाही.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** लक्षवेधीला तुम्ही बाजुला ठेवून विषय घेऊ शकता का? कायदयाने सांगा.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** तुम्ही राजकारण करू नका?

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** तुम्ही कायदयाने सांगा.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** मा. महापौर मॅडम, मला पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलू दया. मी आताच शिकलो आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** सचिवम मॅडम, तुम्ही मला नियमात सांगा की, लक्षवेधी बाजुला ठेवून दुसरा विषय घेऊ शकता का? नियम सांगा.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** विषय क्र. ६ घेण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** युनानीमसचा विषय नाही. विषय हा आहे की, कायदा काय म्हणतो ते बघा?

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** सुर्वेजी कृपया तुम्ही बसून घ्या. मानवतेच्या आधारावर कब्रस्तानचा मुदयाशिवाय दुसरा कोणताही मुद्दा चालणार नाही.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** तुम्ही कायदा सांगा, आम्ही बसून घेतो.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** पिठासिन अधिकारी सर्वौसर्व त्यांच्या आदेशाने महासभा होणार.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** पिठासिन अधिकारीचे आदेशाने विषय क्र. ६ वाचा.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** लक्षवेधीवर चर्चा झाल्या नंतर निर्णय होणे उचित आहे. विषय नंतर पण घेऊ शकता.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** सचिव मॅडम, कायदा सांगा. मी उभे राहतो.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** कायदा सांगा, कायदा काय म्हणतो.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** तुम्ही सर्व खाली बसून घ्या, नंतर ते कायदा वाचणार.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** सचिव मॅडम, तुम्ही कायदा सांगा.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** तुम्ही खाली बसा.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** विषय क्र. ६ घ्या.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** गप्परे तु कोण आदेश करणारा?

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** महापौरांनी आदेश केले आहेत, मी नाही.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** नियम सांगा.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** महापौर सर्वेसर्वा आहेत, त्यांनी आदेश दिले आहेत.

**<u>महापालिका सचिव:—</u>** तुमच्या लक्षवेधीला स्थगीती दिली आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** मला नियम सांगा, मी ऐकतो.

**<u>महापालिका सचिव:—</u>** मा. महापौरांनी मला विषय वाचायला सांगितला आहे, तुमची लक्षवेधी पुढच्या सभेत घेण्यास सांगितले आहे आणि लक्षवेधीला स्थगिती दिली आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** महापौरांनी काय सांगितले मी ऐकले, नियम सांगा.

**<u>महापालिका सचिव:—</u>** तुमची लक्षवेधी स्थगीत दिली आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** मला नियम सांगा.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** सुर्वेजी तुम्ही कृपया बसून घ्या,

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** सुधारीत मंजूर विकास आराखडयातील आरक्षण क्र. २४३—परिवहन सेवेचे फेरबदल करुन कब्रस्थान या आरक्षण क्र. २४४ मध्ये समाविष्ट करणेसाठी शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणे.

---

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** पास.. पास...

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** कुठल्या कायदयानुसार.

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारिया:—</u>** इतिवृताची वाट न पहाता, हा विषय सरकारकडे पाठवायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** पुढे विषय क्र. ७ घ्या.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** गंभीर विषय आहे, चर्चा झाली पाहीजे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** सदरच्या विषयावर मतदान घ्या.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** महापौर मॅडम, हा गंभीर विषय आहे, कायदयाच्या दृष्टीने चर्चा झाली पाहीजे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सचिव मतदान घ्या, सुरू करा.

**महापालिका सचिव:—** मतदानाची मागणी झाली आहे, मा. पिठासिन अधिकारी यांनी मतदान घ्यायला सांगितले आहे. कृपया या प्रस्तावाच्या बाजूने जे आहेत, त्यांनी हात वर करावेत.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** महापौरजी, आमचा विरोध नाही.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** चर्चा करा, त्यांना फसवू नका?

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** महापौर मॅडम, गंभीर विषय आहे, लक्षात घ्या, त्यावर चर्चा करा. या विषयावर जर काही झाले तर जबाबदारी तुमची असेल. कायदेशिर बाब असेल ती करा, उद्या जर उल्हासनगरमध्ये काही झाले तर संपुर्ण महाराष्ट्र पेटू शकतो. फक्त दादागिरीमध्ये कुठलाही विषय करू नका, मी तुम्हांला सांगतो कायदयात जे आहे तेच करा. या विषयावर चर्चा करा, विषय गंभीर आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** कायदेशिर असेल तर करा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मॅडम आम्ही मतदान करायला तयार आहोत. हे तुम्ही राजकारण करीत आहेत, राजकारण करू नका.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** आम्ही कब्रस्थानाच्या विरोधात नाहीत, आमचे म्हणणे काय आहे, ते ऐकुन घ्या, आमचा विरोध नाही.

**महापालिका सचिव:—** प्रस्तावाच्या बाजून २६ मते, जे प्रस्तावाच्या विरोधात आहेत, त्यांनी आपले हात वर करावे.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** आमचा कोणाचाही विरोध नाही मॅडम, आम्हांला बोलू दया.

**काही सदस्य:—** पास.. पास...

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** राजकारण करण्यापेक्षा तुम्ही चर्चा करा, कारण की, मुद्दा गंभीर आहे.

**सदस्य, श्री.अरूण आशान:—** प्रस्तावाला विरोध नाही, प्रस्तावावर एक मत आहे, आम्हांला बोलू दया.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** कोणाचाही विरोध नाही, पास...पास..मॅडम, विषय क्रमांक ६ पास... विषय क्र.७ वाचा मॅडम. इतिवृत्ताची वाट न पहता करा.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** कोणाच्या स्वार्थासाठी करीत आहेत, तुम्ही.

**महापालिका सचिव:—** जे तटस्थ आहेत, त्यांनी आपले हात वर करावे. तटस्थ मते नाहीत आणि विरोधात कोणी मतदान केले नाही, मग हा प्रस्ताव मंजूर झाला.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे👈

---

☑ **विषय क्र. ६:—** सुधारीत मंजूर विकास आराखडयातील आरक्षण क्र. २४३—परिवहन सेवेचे फेरबदल करुन कब्रस्थान या आरक्षण क्र. २४४ मध्ये समाविष्ट करणेसाठी शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेचा सुधारीत विकास आराखडा दि. २१.०४.२०१७ रोजी मंजूर झालेला आहे. सन १९७४ साली मंजूर विकास आराखडयामधील आरक्षण क्र. ५० (कैलाश कॉलनी) हे

स्मशानभूमीसाठी राखीव असलेल्या जागेवर ३ आरक्षणे सुधारीत मंजूर विकास आराखडयामध्ये मंजूर करण्यात आलेली असुन त्यात (१) आरक्षण क्र. २४३—परिवहन सेवा, (२) आरक्षण क्र. २४४ मुस्लिम कब्रस्थान आणि (३) आरक्षण क्र. २४५ स्मशानभूमी यासाठी आरक्षित ठेवलेले आहेत मुस्लिम कब्रस्थानसाठी आरक्षित असलेले आरक्षण क्र. २४४ या भुखंडाचे क्षेत्र कमी असल्याने त्यालगत असलेले परिवहन सेवेकरीता आरक्षीत भुखंड आरक्षण क्र. २४३ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये किरकोळ फेरबदलाद्वारे वगळून सदरचे आरक्षण मुस्लिम कब्रस्थान या आरक्षणामध्ये (आरक्षण क्र. २४४) समाविष्ट करणेबाबत मा. महापौर श्रीम. मीना कुमार आयलानी यांनी संदर्भिय पत्रानुसार कळविले आहे.

तरी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आरक्षण क्र. २४३—परिवहन सेवा यासाठी आरक्षित असलेला भुखंड मुस्लिम कब्रस्थान आरक्षण क्र. २४४ मध्ये समाविष्ट करणेसाठी शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेकरीता मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** — २ **<u>दिनांक:—१६/४/२०१८</u>**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. मिना सोनेजी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सुधाारीत मंजूर विकास आराखडयातील आरक्षण क्र. २४३—परिवहन सेवा यासाठी आरक्षित असलेला भुखंड मुस्लिम कब्रस्थान आरक्षण क्र. २४४ मध्ये समाविष्ट करुन तसेच पुर्नप्रसिध्द विकास योजनेतील Ep-1मध्ये M-3 5000 चौ. मी. स्मशानभूमी ऐवजी दफनभूमी हे आरक्षण ठेवण्यासाठी. शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :—** प्लॉट क्र.७५२ भाग, शीट नं.७१, उल्हासनगर—५ येथील आरक्षण क्र. २४४ चे अंदाजे २४०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड कब्रस्तानकरीता देणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**<u>म्हापालिका सचिव:—</u>** याबाबत सदस्य, श्री. विजय पाटील यांनी पत्र दिले आहे.

**<u>सदस्य, श्री. विजय पाटील:—</u>** तुम्ही हिंदू, मुस्लिममध्ये गैरसमज निर्माण करतात तुम्ही, चर्चा करा, नियमात जे काही तसे करा. मुस्लिम बांधवांसाठी जे काही होत असेल ते नियमात धरून करा. त्यांना फसवणू करू नका? जी वस्तुस्थिती आहे, ते नियमात करा. कायदेशिर नसेल तर त्यांची फसवणूक करू नका.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** मुस्लिम बांधवांची फसवणूक चाललेली आहे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** आम्ही सर्व उल्हासनगरवासिय आहेत, आम्ही सर्व भाऊ आहोत. एवढया वर्षा नंतर मुस्लिम बांधवांची मागणी पुर्ण झाली.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** विरोध असेल तर मतदान करा.

**सदस्य, श्री.अरूण आशान:—** मनोज जी आपण धोका देत आहेत.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** मतदान घ्या.

**सदस्य, श्री.अरूण आशान:—** तुम्ही मुस्लिम बांधवांना फसवत आहेत.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** महापौर मॅडम तुम्ही फसवणूक करीत आहेत, हिंदुची आणि मुस्लिमांची पण.

या वेळी काही सदस्य एकत्रीत बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

**सदस्य, श्री.अरूण आशान:—** महापौर मॅडम जरा ऐकुन घ्या,

**काही सदस्य:—** पास...पास...

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ७:—** प्लॉट क्र.७५२ भाग, शीट नं.७१, उल्हासनगर—५ येथील आरक्षण क्र. २४४ चे अंदाजे २४०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड कब्रस्तानकरीता देणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

तत्कालीन प्रशासक, उल्हासनगर शहर वसाहत, उल्हासनगर यांनी त्यांचेकडील दिनांक १२/३/१९८७ रोजीच्या ताबेपावतीद्वारे उल्हासनगर शहर विकास आराखडयानुसार आरक्षण क्र.५० भाग, शीट नं. ७०,७१,उल्हासनगर—५ येथील २१३४७ चौ.वार क्षेत्रफळाच्या जागेचा ताबा तत्कालीन नगरपरिषद, उल्हासनगर यांचेकडे देण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. तथापि, महापालिकेच्या वाहन विभागाने परिवहन सेवेसाठी महापालिकेने नियुक्त केलेल्या मे. केस्टल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचेशी करारनामा करून सदरहु जागा बसडेपोकरीता उपलब्ध करून दिली होती. मा. महासभा ठराव क्र.२२, दिनांक ४/७/२०१४ अन्वये सदर संस्थेसोबत केलेला करारनामा रदद् करण्याचा ठराव पारीत करण्यात आला आहे. त्यानुसार मे. केस्टल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचेशी केलेला करारनामा रदद् करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत सदरहु जागा महापालिकेच्या ताब्यात असुन मोकळी आहे.

महापालिकेच्या नगररचना विभागाचे दिनांक ८/२/२०१८ च्या पत्रान्वये नव्याने मंजूर केलेल्या विकास आराखडयानुसार प्लॉट क्र.७५२ भाग, शीट नं.७१, उल्हासनगर—५ येथील आरक्षण क्र.२४४ हा अंदाजे २४०० चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड कब्रस्तानसाठी आरक्षित केला असल्याचे कळविले आहे.

शासनाने मंजुरी दिलेला सुधारीत विकास आराखडा महासभेपुढे ठेवला असता मा. महासभा ठराव क्र.५७ दिनांक ३/१/२०१८ अमान्य करण्यात आला आहे. तथापि, १. अहले सुन्नत मुस्लिम जमात ट्रस्ट २. अध्यक्ष, इब्राहिम अन्सारी उल्हासनगर सिटी मायनॉरीटी सेल व इतर संस्थांनी उल्हासनगर शहरातील मुस्लिम समाजाकरीता कब्रस्तानसाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत वारंवार महापालिकेकडे मागणी केली असुन सदर मागणी मान्य होणेकरीता मुस्लिम समाजाकडून महापालिकेकडे आंदोलन, मोर्चे तसेच काही प्रसंगी मृत व्यक्तींचे मृतदेह महापालिकेच्या मुख्यालयासमोर आणण्यात येऊन कायदा व सुव्यवस्थेसारखा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. तरी हि बाब विचारात घेवुन प्लॉट क्र.७५२ भाग, शीट नं.७१, उल्हासनगर—५ येथील आरक्षण क्र.२४४ चे अंदाजे २४०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड कब्रस्तानकरीता उपरोक्त मागणी केलेल्या दोन संस्थांपैकी एका संस्थेस ताब्यात देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:—३** **दिनांक:—१६/४/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. मिना सोनेजी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे प्लॉट क्र. ७५२ भाग, शीट नं.७१, उल्हासनगर—५ येथील आरक्षण क्र. २४४ चे अंदाजे २४०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड कब्रस्तानकरीता देणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** महापौर मॅडम आपण सर्वांना फसवत आहेत.

**सदस्य, श्री.अरूण आशान:—** राजकारण करीत आहेत.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** महापौर मॅडम, कोणाच्या तरी हितासाठी आपण फसवणूक करीत आहेत.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** कृपा करून बसून घ्या.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, कृपया शांतपणे बसा.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** मा. महापौरांच्या आदेशाने विषय क्र.६ आणि विषय क्र. ७ सर्व संमतीने पास झाले आहेत आणि ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

सुचकाचे नावः— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नावः— श्री. राजेश वदारिया

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक १६/४/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरू केलेली सभा अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:— ३ अ** **दिनांक १६/०४/२०१८**

हि महासभा वरील प्रस्ताव विचार घेता दिनांक १६/०४/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधी पर्यत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही:—

अनुमोदकाची सही:—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासन अधिकारी

सर्वसाधारण ाmहासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ७.०० वाजता महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी अनिश्चित कालावधी पर्यंत सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांक: २/५/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२/५/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

## १—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १६/४/२०१८ रोजी सायकाळी ४.००वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा स्थगित झाल्याने सदरची सभा बुधवार दिनांक २/५/२०१८ रोजी सांयकाळी ५.००_वाजता आयोजित करून सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

१. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३१ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ४ | श्रीमती पूजा सचिन भोईर | ३२ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ५ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३३ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| ६ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३४ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३५ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ८ | श्रीमती पंचम ओमेश कालानी | ३६ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३८ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ११ | श्रीमती सुरेखा आव्हाड | ३९ | श्रीमती वसुधा बोडारे |
| १२ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ४० | श्रीमती शीतल कदम |
| १३ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ४१ | श्रीमती मिताली चान्पूर |
| १४ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४२ | श्रीमती लीलाबाई आशान |
| १५ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४३ | श्रीमती अंजली साळवे |
| १६ | श्रीमती शुभांगीनी निकम | ४४ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १७ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ४५ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| १८ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ४६ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १९ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ४७ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २० | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ४८ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २१ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ४९ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २२ | श्रीमती राजश्री चौधरी | ५० | कु. कविता सुरेश गायकवाड |
| २३ | श्रीमती इंदिरा उदासी | ५१. | श्रीमती दिप्ती दुधानी |
| २४ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५२ | श्रीमती ज्योती माने |
| २५ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ५३ | श्री. विजय चाहु पाटील |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | श्री. सुमित सागर सोनकांबळे | **५४** | श्रीमती मिनाक्षी पाटील |
| २७ | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ५५ | श्री. रमेश चव्हाण |
| २८ | श्रीमती चरणचितकौर भुल्लर | ५६ | श्रीम. डिम्पल ठाकुर |
| २९ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ५७ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३० | श्रीमती त्योती चैनानी | ५८ | श्रामती आशा इदनानी |

**तर,**

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१) श्रीम. आशा विराडे २) श्री. स्वप्नील बागुल ३) श्रीम. अंजना म्हस्के ४) श्री. कलवंतसिंह सोहता ५) श्री. अशोक छाप्रु ६)श्रीम. सरोजनी टेकचंदानी ७) श्री. महेश सुखरामनी ८) श्रीम. अपेक्षा भालेराव ९) श्री. भगवान भालेराव १०) श्रीम.ज्योती प्रशांत पाटील ११) श्रीम. चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग १२) श्रीम. पुष्पा बागुल १३)श्रीम. शुभांगी बेहनवाल १४) श्री. दिपक सिरवानी १५) श्रीम. संगीता सपकाळे १६) श्रीम. कांचन लुंड १७) श्रीम. सुनिता बगाडे १८)श्रीम. सुमन सचदेव १९) श्री. भारत राजवानी २०)श्री. आकाश पाटील २१) श्री. विकास पाटील २२) श्री. मनोज सयानी २३)श्री. सुरेंद्र सावंत २४)श्री. अरूण आशान २५) श्रीम. मिनाकौर लबाना २६)

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

११.श्री. दादा पाटील, मुख्य लेखाधिकारी

१२.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

१३.श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता

१४.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी

१५.श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता

१६.श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक

७. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
८. श्री. वानखेड, लेखा परिक्षक

९. श्री. संतोष जाधव, सहा. लेखा अधिकारी

१०.श्री. प्रबोधन मवाळे, सहाय्यक आयुक्त

११. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त

१२. श्री. मनीष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त

१३. श्री. नंदलाल सामतांनी, प्र. सहाय्यक आयुक्त

१४. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त

१५.श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता

१६.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी

१७. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता

१८. श्री. डी.एस. पाटील, शाखा अभियंता

१९. श्री. तिजोरे, शाखा अभियंता

२०. श्री. वानखेडे, शाखा अभियंता

२१. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

२२.श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी

२३.श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक

२४. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

२५. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक

२६. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक

२७. श्री.दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१.श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

४. श्री. बाळु भांगरे

सयंकाळी ६.४८ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव:—** दुसरी मिटींग घेण्यासाठी आदेश झाले आहेत, मागच्या वेळी डंपिंग ग्राउंडची लक्षवेधी झाली होती. त्यामध्ये फक्त निवेदन राहीले होते. डंपिंग ग्राउंड इतरत्र हालवणे बाबत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** प्रशासनातर्फे कोण उत्तर देणार हे तर पहीले स्पष्ट करा.

**महापालिका सचिव:—** पहीले कंठे मॅडम होत्या, त्या उत्तर देवू शकल्या नाहीत. तर आता आपण बघा. त्याच्या नंतर दुसरी लक्षवेधी श्री. सुनिल सुर्वे यांची आहे. १०२ नुसार विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता वैगेरे त्यावेळी मा. महापौरांनी लक्षवेधीवर काही तरी निवेदन दिले होते, आयुक्त साहेबांनी नव्हते दिले. मा. महापौरांनी दिले होते.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** पहीली लक्षवेधी डंपिंग ग्राउंड विषयी होती, तर त्याचे इथे केणे व पवार साहेब उपस्थित आहेत, त्याच्याकडून स्पष्टीकरण तर मांगा.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त, मा. सभागृह नेता, सन्माननिय सदस्य, आज आपल्या संपुर्ण शहरात साधारणत: ४१० मेट्रीक टन कचरा निर्मिती होत आहे. मागच्या वर्षात सर्व वाहनांच्या कच—याचे वनज करण्यात आले होते आणि सात दिवसाचा एव्हरेज हा ४१० आलेला आहे. वजन काटयावर ज्या प्रमाणे वजन करतात.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** फक्त डंपिंग ग्राउंडचे सांगा तुम्ही, कसे करणार आहेत.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** दैनंदिन निर्माण होणारा कचरा हा २ ऑक्टोंबर २०१७ पासून खडी मशिन गायकवाडपाडा उल्हासनगर—५, इथे निरगत करण्यात येत आहे. आपल्याकडे सध्या प्रोसेसिंगसाठी कोणतीही सुविधा नाही किंवा आपल्या कच—याचे वर्गीकरण सुध्दा होत नाही. त्यामुळे पुर्ण जो मिक्स कचरा आहे, तो आपण सध्या डंपिंग ग्राउंडला निरगत करीत आहोत. काही प्रमाणात आपण कचरा जो वर्गीकरण करतो, तो ५ नंबरच्या भाजी मार्केट येथे खत निमिर्तीसाठी त्याचा वापर करतो. खत निर्मिती करीत आहेत, त्याच्या नंतर व्हि.टी.सी. ग्राउंडला आणि...

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** ही खत निर्मिती महानगरपालिका करते का? हा जो प्राजेक्ट आहे तो?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** प्रोजेक्ट जरी तुम्ही तो राबवत असला, तिथे तो कचरा जातो तो महापालिका कार्यक्षेत्रातलाच जात आहे आणि त्याच्यावर नियंत्रणही महापालिकेचे स्वच्छता निरीक्षक यांच्या मार्फत ठेवला जातो.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** रोजचा ग्रीन कचरा किती जातो ते सांगा.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** दोन टन.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** दोन टन जातो, बाकीचे ४१० मध्ये तुमच्या प्रमाणे ग्रीन वेस्ट किती असणार?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** ग्रीन वेस्ट १६० मेट्रीक टन.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** ठिक आहे, १६० त्याच्यातून २ टन जाते. बाकिचे कसे करणार साहेब, किती वर्ष अजून लागणार?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** त्या बाबत कार्यवाही सुरू आहे. काही ठिकाणी पिठ उभारण्याचे तसेच....

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** ती मी माहीती दिली होती की, ते पिठ बरोबर नाही.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** आता डि.पी.आर. च पास झालेला आहे, डि.पी.आर. दिलेल्या सुचनानुसार.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** कारण त्या बॉक्समध्ये आपण सिमेंटचा वापर केलेला आहे, त्याच्यात ते गांडूळ मरून जातात किंवा कुठलाही तुम्ही क्लचर टाकला तर प्रयोग बरोबर होत नाही, तर ते काम होत नाही. इट इज नॉट सक्सेसफुल.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** त्यासाठी आम्ही आता प्रायोगिक तत्वावर सुरू करीत आहोत, बोट क्लब इथे आणि त्यासाठी एक तज्ञ व्यक्तिची नेमणूक करण्यात येत आहे आणि सदरची फाइल मा. आयुक्तांकडे आहे.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** तिकडे किती टन जाणार आहे? किती टनाचा बनवणार?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** तो सध्या आम्ही दोन टनाचाच करण्याचा विचार आहे, त्याच्या नंतर ते सक्सेस झाल्या नंतर बाकीचे हे....

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** साहेब, याच्यासाठी आम्हांला किती वर्षे थांबायला लागेल? प्रत्येक दिवसाचा जो १६० मेट्रीक टन येतो, ग्रीन वेस्ट.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** शासनाने....

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** आणि नुसते चार किंवा पाच, सहा, दहा मेट्रीक टन तुम्ही त्याच्यात सेग्रीकेशन करतात बाकीचे कसे होणार? किती दिवस थांबायला लागेल.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** शासनाने दिलेल्या गाईड्स लाईननुसार या पुढे घरोघरी कचरा गोळा करण्या पुर्वी तो वर्गीकरण...

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** किती दिवस?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** मे महीन्याची शासनाने डेड लाईन दिलेली आहे, वर्गीकरणासाठी.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** मे कुठला वर्षे?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** आताचा चालू.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** चालू वर्षे, आठवण ठेवा.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** त्यासाठी प्रशासनाने काही पावले उचललेली आहेत आणि गुणवत पाटील अजून त्यांची नेमणूक झालेली नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** बाकीच्याही सदस्यांनी आपल्याला ग्रीन वेस्ट करण्यासाठी, कंपोस्ट करण्यासाठी आपण...

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** दिलेले आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** सुजाव देलेला आहे, पण ते काही करीत नाहीत.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** ३२ ठिकाणे आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मे, २०१८ मध्ये सुरू होईल, आमचे सदस्य मागून बोलतात, अजून किती पावले हळूहळू चालणार? अशी परिस्थिती जर केली तर....

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** केणे सर, हेच मी तुम्हांला प्रश्न विचारल पण तुम्ही जे आता बोट क्लब बनवता, पाच नंबरला चालू आहे. अजून तुम्ही दहा बनवणार त्याच्यात तुम्ही दोन दोन टन करणार ते २० मेट्रीक टन होणार बाकीचे तुम्ही कसे करणार? त्या पेक्षा आपल्याला उसाटणेला जागा उपलब्ध केलेली आहे, ते किती दिवसात किती दिवसात तुम्ही हे करू शकतात? कारण की तो डंपिंग ग्राउंड आम्हाला नकोच आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** नाही, नाही मॅडम तो विषय आहे ना, तो शासनाचा विषय आहे, यांच्या हातात काही नाही आणि हे काही करू शकत नाही. आपल्याला ओला कचरा गोळा करण्यासाठी हे तर आपण करीत आहेत.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** नाही, म्हारळची जी जुनी खदान होती, ती आम्ही क्लीयर करून दयायला तयार आहेत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—** प्रोसेस सुरू झाली ज्या मशिनरी तुम्ही भाडयांनी दाखविल्या आहेत, ते तुम्ही विकत ध्या.

**सदस्या श्रीम. मिना सोनेजी:—** तुम्ही घरोघरी का नाही दिले ?सर्वांना विल्हेवाट करण्यासाठी.तुम्ही दोन कच—याचे डब्बे देणे पेक्षा तुम्ही एक स्कीट दयाल तर तिकडे विल्हेवाटच राहणार नाही ग्रीनवेस्टचा.

**श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक):—** शासनाने दिलेले निर्देशनुसार सर्वाना दोन डस्टबिन ठेवायच्या आहेत.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी— क**धी देणार तुम्ही अजून

**श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक):—** तो प्रस्ताव तयार आहे.तो प्रलंबित आहे लवकरात लवकर मा. आयुक्त साहेबांच्या आल्यावर ठेवतो

**सदस्या. श्रीम. मिना सोनेजी** — मला लवकरात लवकर नको डेडलाईन सांगा.

**विनोद श्री केणे मुख्य स्वछता निरिक्षक):—** आयुक्त साहेब आल्यावर लवकरात लवकर करतो ७ तारखेला येतील बहुतेक.

**सदस्य श्री राजेंद्र चौधरी** — मी मगाशी विचारले त्याप्रमाणे आता बसलेले आयुक्त निर्णय घेउ शकत नाही का

जे कल्याण डोंबविलीचे आयुक्त आहेत त्यांनी जर निर्णय नाही घेतला तर पूर्ण महिना थांबणार का कोणतेही आपले काम होणार नाही जे पण आहे एमएसइबीचे असो पाउस आहे आता त्यासाठी तुम्ही निर्णय घ्या.असे आदेश दिले पाहिजेत यांना.

**सदस्या श्रीम. मिना सोनेजी:—** मा. महापौर मॅडम डम्पिंग ग्राउडचा बरच प्रोबलेम्स आहे आमचे पूर्ण पाच नं. कॅम्प आणि चार नं.कॅम्पमध्ये लोकांची तबियत बिगडत आहे तर तिकडचे काचरा उचलया पाहिजेत आणि तिथे पण सेग्रिगेशन करू शकतात. त्यासाठी तुम्ही त्यांना आदेश दया की लवकरात लवकर या महिनात काम सुरू केले पाहिजेत.

**सदस्य श्री राजेश वदारिया:—** मा महापौर जी डंपिंग ग्राउडचे विषयावर जसा की चौधरी साहेबांनी सागितल्या आहे की आपल्या हातात नाही आहे परंतु त्या प्रक्रिया थामली नाही पाहिजे आणि शासनाचे आदेशाचे पालन राजनितिक स्तरावर तुम्हाला आणि प्रशासनाच्या स्तरावर आयुक्तांना केली पाहिजे. कचरा जो पर्यत कमी होत नाही तो पर्यंत किती मोठया डंपिंग ग्राउड घेणार जेवढा मशिनरी लावणार पण त्याच्या रिजल्ट काही मिळणार नाही. इथे नही तर मारळ गॉवचे डंपिग पण पूर्ण होईल तर पाच नं. चे खादानमध्ये कचरा जमा होणारच होणार कचरेला कमी करायची आहे तर एकच मार्ग आहे सेग्रिगेशन,आणि सेग्रिगेशन एक्टफॉर २००६ च्या नियमामध्ये आणि २०१६ च्या नियमामध्ये दोन्ही नियमामध्ये हा स्पष्ट लिहिलेला आहे की जो व्यक्ति कचरा जनरेट करतात, घर आहे किंवा दुकान आहे, लगनाचे हॉल आहे किंवा कोणत्या ही कारखाना आहे जे कच—याच्या निर्मिती करतात त्यांना ही कच—यांचे सेग्रिगेशन केली पाहिजे. जोपर्यत सेग्रिगेशन कम्पलसरी होत नाही तो पर्यत पुढे काही होणार नाही. आजपर्यत कोणत्या ही अशी मशिनरी नाही आहे की कच—याला वेग वेगळा

करू शकेल, याच्यासाठी जसा की मुंबई महानगरपालिकाने ज्या सोसायटी १०० किलो पेक्षाजस्त कचरा निर्मिती करीत आहे, दुाकन आहे, हॉटेल आहे, लगनाचे हॉल आहे त्याच्यासाठी तुम्ही आदि काम्पलसरी करा, जोपर्यत हा कम्पलसरी होणार नाही तर बाकीचे जे एक्सेसाईज तुम्ही करणार आहे त्याच्यांनी काही होणार नाहे.

**सदस्य श्री धनंजय बोडारे:—** महापौर महोदया. मला असा वाटत आहे की ज्या गतीने आपण चालो आहे त्या गतीने डंपिग ग्राउडची अवस्था दिवसा दिवस वाढत जाणार, आपणस लवकर करावा. डी.पी.आर व्यवस्थित असावा नाहीतरी पाणी पुरवठा योजना होता कामा नाही, त्यामुळे तुम्ही किती बीस तयार करणार, ओला कचरा किती जनरेट होते आणि सुखा कचरा किती जनरेट होते, रोजचा कचरा किती आहे १०४, ११० त्यामध्ये ग्रीन वेस्ट किती आहे.

**विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक ( आरोग्य विभाग ):—** नाही १६०

**सदस्य, श्री धनंजय बोडारे: —** १६० साठी तुम्हाला किती बीटस लागणार आहे? हेचा अभ्यास केला आहे का?

**विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक ( आरोग्य विभाग ):—** होय.

**सदस्य, श्री धनंजय बोडारे: —** दोन टन फक्त कॅम्प नं. एक ठिकाणी झाला तर १६०बीटस साठी किती लागतिल या साठी जागा कुठे आहे? या डी.पी.आर मध्ये असते, नाही आयुक्त नाही तर तो परंत थामू नये हा प्रकार नको होईला तुम्ही सुद्या आपली नियंत्रण राबवा. आता जास्त जास्ती आता व्ही. टी सी ला किती? जसा पाच नं. ला दोन टन तसा व्ही. अी.सी ला किती? नगरसेवकांनी सागितला आहे की आम्ही आपल्या प्रस्ताव तुम्हाला दिली आहे मला वाटत आठ महिना पूर्वी पासून... .

**विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक ( आरोग्य विभाग ):—** हो, ३२ ठिकाणी दिलेला आहे.

**सदस्य, श्री धनंजय बोडारे: —** तर ३२ मध्ये करा ना.ती करायला काय हरकत आहे आपलेल्या

**विनोद केणे, प्र.स्वच्छता निरिक्षक ( आरोग्य विभाग ):—** तत्कालीन मा.आयुक्त साहेबांनी निर्देश दिले होते की त्याच्यासाठी तदनीय मानसाची नियुक्ती करा, आणि त्यामुळे त्या नियुक्ती राहिला होता. आता गुणवंत पाटील त्याची नियुक्तीसाठी घेतलेला आहे.

**सदस्य श्री धनंजय बोडारे: —** म्हणूनस पाउल उचली म्हणजे कशी पाउल उचली? आपल्या जागावर पाउल राहिली,

**विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक ( आरोग्य विभाग ):—** हो साहेब.

**सदस्य, श्री धनंजय बोडारे: —** म्हणजे ५ किलो मीटर १० किलो मीटर जागावरज. जरा जोरत पडा, पाउल उचली म्हणजे

उचली म्हणजे काय केली? पाच नं. मध्ये मिना सोनडे मॅडमनी त्यांचे प्रयत्यानी केल. प्रशासनाने काय केल? व्ही. टी.सीने एक केल.पाउल उचली म्हणजे काय? लवकरात लवकर करा? ज्यानी करून पूढर्ची भविष्याची समस्या आपलेल्या परत उदभवणार नाही.

**सदस्य, श्री राजेश वदारिया: —** प्रत्येक.मार्केटमध्ये......

**उप महापौर, श्री.जीवन इदनानी: —** सात वाजले आहे मा महापौरांचे आदेशान्वे हा सभा अनिश्चित कालीनसाठी स्थगित करण्यात येत आहे.यांची सुचना तुम्हाला परत दिली जाईल.

**सदस्य, श्री सुनिल सुर्वे :—** माझी तुमच्याकडून विनंती आहे की येणारी महा सभा आयुक्त साहेबाचे आले नंतर ठेवा.मा. महापौर जी गणेश जी पाटील आयुक्त साहेब आले नंतर येणारी महासभा ७ तारिखला ठेवावी

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** ही सभा अनिश्चितकाळा पर्यत स्थगित करण्यात येत आहे.मी सभा संपल्याचे जाहिर करीत आहे.

---

☑

सुचकाचे नाव:— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव:— श्री. राजेश वदारिया

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक १६/४/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरू केलेली सभा स्थगित केल्याने दिनांक २/५/२०१८ रोजी सांयकाळी ५.०० वाजता अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:— ६अ** **दिनांक २/०५/२०१८**

हि महासभा वरील प्रस्ताव विचार घेता दिनांक २/०५/२०१८ रोजी सांयकाळी ५.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधी पर्यत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुवकाची सही:—

अनुमोदकाची सही:—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासन अधिकारी
सर्वसाधारण ामहासभा
उल्हासनगर महानगरपालिका

. **महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ७.००वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी अनिश्चित कालावधी पर्यंत सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः—२८/५/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २८/५/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

## १—ब

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार, दिनांक १६/०४/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता घेण्यात आली. सदर सभा स्थगित झाल्याने सदरची सभा *बुधवार दिनांक २/५/२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजता* आयोजित करुन पुन्हा स्थगित केल्याने सदर सभा ***सोमवार दिनांक २८/५/२०१८ रोजी दुपारी ३.३० वाजता*** आयोजित करण्यांत आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | २० | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | २१ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | २२ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | २३ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ७ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | २४ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ८ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | २५ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ९ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | २६ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १० | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | २७ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ११ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा | २८ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १२ | श्री. अशोक बच्च्युमल छाप्रु | २९ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १३ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ३० | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १४ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ३१ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ३२ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| १६ | श्री. भगवान शंकर भालेराव | ३३ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| १७ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ३४ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| १८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ३५ | श्री. विकास परशुराम पाटील |
| १९ | श्री. रवी किशनचंद ज्यासी | ३६ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती पुजा सचिन भोईर, २. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड, ४. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ५. श्रीमती पंचम उमेश कालानी, ६.श्रीमती आशा नाना बिराडें, ७. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ८. श्रीमती गिता लालचंद साधनानी, ९. डॉ. प्रकाश नाथानी, १०. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ११. श्रीमती जया प्रकाश माखिजा, १२. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, १३. श्रीमती शुभांगीनी निकम, १४. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, १५. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, १६. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, १७. श्री. राजेश नानिकराम वदारिया, १८. श्रीमती दिपा नारायण पंजाबी, १९. श्री.अजित प्रभुनाथ गुप्ता, २०. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, २१. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, २२. श्री. राजेंद्र शांताराम चौधरी, २३. श्रीमती इंदिरा जमनादास उदासी, २४. श्रीमती कविता लाल पंजाबी, २५. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे), २६. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, २७. श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव, २८. श्री. रमेश महादेव चव्हाण, २९. श्री. चंद्रशेखर केशव यादव, ३०. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, ३१. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान, ३२. श्री. धनंजय बाबुराव बोडारे, ३३. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, ३४. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, ३५. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, ३६. श्रीमती सुमन राजेश सचदेव, ३७. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), ३८. श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी, ३९. श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे, ४०. श्रीमती कविता सुधिर बागुल, ४१. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, ४२. श्री. विजय चाहु पाटील, ४३. श्री. आकाश परशुराम पाटील, ४४. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी, ४५. श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत, ४६. श्री. अरूण लक्ष्मण आशान, ४७. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. गणेश पाटील, आयुक्त

२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

४. श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)

५. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी

६. श्री.एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता

७. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक

८. श्री. वानखेड, लेखा परिक्षक

९. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक

१०. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त

११. श्री. नंदलाल सामतांनी, प्र. सहाय्यक आयुक्त

१२. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

१३. श्री. तिजोरे, शाखा अभियंता

१४. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी

१५. श्री. बाळू नेटक, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी

१६. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

१७. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक

१८. श्री. बाजीराव जाधव, सुरक्षा रक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी

दुपारी ३.५३ वाजता वंदेमातृरम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिवः—** सभा सुरू होण्या पुर्वी कोकण पदवीधर मतदार संघाची आचारसंहिता लागू झाली आहे, असे निवडणूक विभाग सांगत आहे, धोरणात्मक निर्णय व्यतिरिक्त विषय घेऊन तरी याबाबत निवडणूक विभाग खुलासा करण्यास सांगत आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानीः—** मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब, आज महासभा आहे, हे अधिका—यांना पहीलेच माहीती होते, आज ही महासभा स्थगित होणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे एक पण अधिकारी नाहीत, प्रभाग अधिकारी पण कोणीच नाहीत. किती वेळा वार्निंग दिल्या नंतर सुध्दा अधिकारी अनुपस्थित आहेत.

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** मा. महापौर, मा. आयुक्त, सन्माननिय सभागृह पदवीधर मतदार संघाची आचारसंहिता जाहीर झालेली आहे आणि त्याचा प्रोग्राम आपल्याकडे आलेला आहे. मी प्रोग्राम वाचून दाखवतो, इश्यु ऑफ नॉमिनेशन दिनांक ३१ मे, २०१८ लास्ट डेट ऑफ मेकिंग नॉमिनेशन दिनांक ७ जुन, २०१८ स्क्रुटीनी ऑफ नॉमिनेशन दिनांक ८ जुन २०१८, विथ ड्रॉ ऑफ कॅन्डीडेट ११ जुन २०१८, डेट ऑफ पोल २५ जुन, २०१८ सकाळी ८.०० ते सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत आणि काउंटींग ऑफ वोटर्स २८ जुन २०१८.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** आचार संहिता कधी पर्यंत लागली आहे?

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** दिनांक २ जुलै, २०१८ पर्यंत दिलेली आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** २ जुलै?

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** होय.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मी आपल्याला निवेदन करतो की, ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात यावी.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** महापौर मॅडम विषय गंभीर आहे, उल्हासनगरच्या शहरामध्ये गेली १५ ते २० दिवसापासून उल्हासनगर शहरामध्ये महानगरपालिकेचे फाईल प्रकरण गाजत आहे आणि त्याच्यामध्ये आपले विद्यमान सदस्य त्यांचे नाव आले, त्यांच्यावर एफ.आय.आर. दाखल झाले आणि ते आज पर्यंत कारागृहात आहेत. माझा संशय आहे, ॲट्रॉसिटी संदर्भातल्या दोन फाईली आणि इतर विधी विभागाच्या फाईली आणि लेखा विभागाच्या फाईली या संबंधित खात्याच्या अधिकारी नसतांनाही जनसंपर्क अधिकारी रजेवर गेले, मला वाटते की, आयुक्त साहेबांची परवानगी घेतली आहे की नाही, मला माहीत नाही. डिपार्टमेंटली कुठलीही परवानगी नाही? मागच्या आयुक्तांची परवानगी घेतले आता सध्या असलेले आयुक्त साहेब, त्यांची परवानगी घेणे बंधनकारक आहे. असे असतांनी सुध्दा ती परवानगी न घेता, जनसंपर्क अधिकारी हे रजेवर निघून गेलेले आहेत आणि असे असतांनाही त्यांनी त्यांचे चेंबर कुठल्या नियमा प्रमाणे त्यांनी बंद केले होते. स्वतःची चाई घेऊन निघून गेलेत. शासकिय मालमत्ता आहे, प्रशासनाची, आपल्या महानगरपालिकेची मालमत्ता आहे आणि कुठलाही अधिकारी परवानगी न घेता ते कसे बंद करू शकतात? या संदर्भातले माझा लेखी अर्ज मी आयुक्त साहेबांना दिला आहे. आयुक्त साहेबांचे त्याच्यासाठी मी आभार मानतो की, त्यांनी ताबोडतोब माझ्या अर्जाची दखल घेऊन ते कार्यालय सिल करायला लावले. पण माझी आयुक्त साहेबांना आणि महापौर मॅडम आपल्याला विनंती आहे की, त्या कार्यालयावर माझा पुर्ण दाट संशय आहे. त्या ऑफिसमध्ये पुर्णपणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या अनेक फाईली या चोरी करून नेऊन ठेवल्या आहेत. अशी माझा पुर्ण दाट संशय आहे, म्हणून त्या फाईलींना ओपन करण्यासाठी आपण आदेश दयावेत, आयुक्त साहेब, आपण स्वतः महापौर मॅडम आपण जातीने तिथे येऊन ते कार्यालय ओपन करण्यासाठी आपण आदेश दयावेत, हि विनंती.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय आयुक्तजी, आता सन्माननिय भालेराव यांनी जे पण काही सांगितले त्यावर आपण तुमच्या नियमानुसार ॲक्शन घ्या आणि लवकरात लवकर हा विषय सोडवण्यात यावा आणि ही महासभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे.

---

☑

सुचकाचे नावः— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नावः— श्री. राजेश वदारिया

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक १६/४/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरू केलेली सभा स्थगित केल्याने दिनांक २/५/२०१८ रोजी सांयकाळी ५.०० वाजता सभा आयोजित करुन पुन्हा स्थगित झाल्याने सदर सभा दिनांक २८/५/२०१८ रोजीची सभा दुपारी ३.३० वाजेची सभा अचार संहीता असल्यामुळे अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:— ६ब** **दिनांक २८/०५/२०१८**

हि महासभा वरील प्रस्ताव विचार घेता दिनांक २८/०५/२०१८ रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अचार संहीता असल्यामुळे अनिश्चित कालावधी पर्यत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुवकाची सही:—

अनुमोदकाची सही:—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ३.५९ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी अनिश्चित कालावधी पर्यंत सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— ०४/७/२०१८**

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ०४/७/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१—क

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार, दिनांक १६/०४/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर सभा स्थगित झाल्याने सदरची सभा बुधवार, दिनांक ०२/५/२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करून पुन्हा स्थगित केल्याने सदर सभा सोमवार, दिनांक २८/५/२०१८ राजी दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यात आली व पुन्हा स्थगित केल्याने सदर सभा बुधवार दिनांक ०४/७/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३७ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३८ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३९ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ७ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४० | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४१ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ९ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४२ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४३ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ११ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४४ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १२ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४५ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १३ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४६ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १४ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४७ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १५ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ४८ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १६ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४९ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १७ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५० | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १८ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५१ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १९ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५२ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २० | श्रीमती शुभांगिनी निकम | ५३ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| २१ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५४ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २२ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसूळ | ५५ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २३ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५६ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५७ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २५ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५८ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २६ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ५९ | श्री. राजेश देवेंद्र  वानखेडे |
| २७ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६० | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २८ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६१ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २९ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६२ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३० | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६३ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३१ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ६४ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३२ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६५ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३३ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६६ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६७ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३५ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या  अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती पुजा सचिन भोईर, २. श्रीमती पंचम उमेश कालानी, ३. श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड, ४. श्री. अशोक मच्चुमल छाप्रु, ५. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ६. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ७. श्री. महेश पहिलराज सुखरामनी, ८. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ९. श्रीमती इंदिरा जमनादास उदासी, १०. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, ११. श्री. रमेश महादेव चव्हाण, १२. श्री. चंद्रशेखर केशव यादव, १३. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, १४. श्री. विजय चाहु पाटील, १५. श्री. आकाश परशुराम पाटील, १६. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१७.श्री. गणेश पाटील, आयुक्त

१८.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

१९.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी

२०.श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता

२१.श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता

२२.श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक

७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय अधिकारी
२४.डॉ. युवराज डी. भदाणे, जनसंपर्क अधिकारी

२५.श्री. संतोष जाधव, सहा. लेखा अधिकारी

२६.श्री. वानखेडे, लेखा परिक्षक

२७.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त

२८. श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त

२९. श्री. नंदलाल सामतांनी, प्र. सहाय्यक आयुक्त

३०. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त

३१.श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता

३२.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी

३३. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

३४. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी

३५. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

३६. श्रीम. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक

३७. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी

३८.श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

३९.श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक

४०. श्रीमती, निलीमा कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ

४१. श्री. मनोज जाधव, लिपीक

४२. श्री. सतीश राठोड, लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक

२. श्रीमती नर्गिस खान, लिपीक

२. श्री. बाळु भांगरे, लिपीक

दुपारी ३.५० वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

**<u>महापालिका सचिवः—</u>** ही सभा, दिनांक १६/४/२०१८, दिनांक ०२/५/२०१८, दिनांक २८/५/२०१८, दिनांक ४/७/२०१८ ची स्थगित सभा आहे.

**<u>सदस्या, श्रीमती सविता तोरणेः—</u>** मा.महापौरजी, मा. उप महापौरजी, मा. आयुक्त साहेब, गेल्या दोन वर्षापासून वडोल गावाच्या पुला बदल, ज्या दिवसापासून मी या संदर्भात प्रवेश केला आहे, तेव्हापासून मी या पुला बददल सतत पाठपुरावा करीत आहे, तरी सुध्दा याच्याकडे कोणाचेच लक्ष नाही. तरी तुम्ही आम्हांला असे आश्वासन दिले होते की, १५ जुनला पुल तयार होईल, पण १५ जुनला पुल तयार झालेला नाही. ३० तारखेला पुल तयार होईल, पण ३० तारखेला पण पुल तयार झाला नाही, जर ३० तारखे पर्यंत पुल तयार झाला नाही तर ठेकेदारावर कारवाई करू. परंतु अजून पर्यंत ठेकेदारावर कारवाई झाली का? याचे उत्तर आम्हांला हवे आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** त्याचा ठेकेदार कोण आहे?

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टालेः—</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सभागृहातले सर्व सन्माननिय सदस्य, आज तसे पाहीले तर संपुर्ण या शहरामध्ये आयुक्तांकडे आम्ही सर्व लोक फार अपेक्षेने बघत आहेत. पण गेल्या मागील वर्षाचा आमचा अनुभव हा खुप म्हणजे सदस्यांसाठी पण वाईट होता आणि जनतेसाठी पण वाईट होता. आज या संपुर्ण शहराची परिस्थिती अशी आहे की, वडोल गांवचा पुल घ्या किंवा के.बी. रोडमध्ये काल, परवा मृत झालेला व्यक्ति घ्या किंवा आज गेल्या तीन दिवसापासून आमचे सन्माननिय जेष्ठ श्री. दिलीप मालवणकर हे उपोषणाला बसले आहेत, मग या संपुर्ण शहरामध्ये एवढी वाईट आवस्था झालेली आहे की, पब्लिक अक्षरशः हैराण झालेली आहे आणि हे सर्व करीत असतांना आम्ही आयुक्तांकडे अपेक्षेने बघत आहोत की आयुक्त आम्हांला योग्य काहीतरी निर्णय देतील, योग्य मार्ग काढतील. वडोल गांवचा जो मुददा आहे, वडोल गांवच्या मुद्दयामध्ये माझ्याकडे महानगरपालिकेचे एक पत्र आहे. त्यामध्ये अगदी स्पष्टपणे लिहीलेले आहे. वास्तविक पहाता सदर पुलाचे काम दिनांक १५/६/२०१८ पर्यंत पुर्ण करणे करीता प्रशासनास मोठया प्रमाणावर संबंधित एजेंन्सीकडे पाठपुरावा करीत आहे. सदर पुलाच्या कामा करीता एजेंन्सीला दिनांक ३०/६/२०१८ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. परंतु सदर

मुदतीत संबंधित एजेंन्सीने काम पुर्ण न केल्यास निविदा अटी शर्तीनुसार कारवाई करण्यास प्रस्तावीत करण्यात येईल. अजुनही काम पुर्ण नाही, कधी होईल काय अंदाज नाही? संपुर्ण वडोल गांव आपल्या या प्रशासनाने वेठीस धरला आहे आणि याच्यातून जर मार्ग काढायचा असेल, तर त्या संदर्भात तुम्ही त्या ठेकेदारावर काय कारवाई केली? याचेही उत्तर मिळायला पाहीजे. जर कारवाई केली नसेल, तर का केली नाही? त्याचेही उत्तर मिळायला पाहीजे आणि हे काम करीत असतांना ठरावीक मुदतीत काम झाले पाहीजे, अशी आमची अपेक्षा आहे. आम्ही आयुक्तांकडे वडोल गावच्या सर्व लोकांना, म्हणजे खुप मोठया अपेक्षा आहेत आणि हे जर काम होत नसेल, तर कदाचित आम्हांला निराशा पदरी पडेल, असे काय होणार नाही? महापौरांनी पण याचे उत्तर दिले पाहीजे आणि दुसरी गोष्ट हे करीत असतांना गेले तीन दिवस झाले, आमचे श्री. दिलीप मालवणकर उपोषणाला बसले आहेत. काल महापौर....

या वेळी सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे व सदस्या श्रीमती सुमन सचदेव यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**या** वेळी सदस्य, श्री. दिपक सिरवानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्या, श्रीमती सविता तोरणे:—</u>** एक मिनीट टाले साहेब....

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u>** माझे बोलणे पुर्ण होऊ दया, महापौर महोदयांनी काल तिथे येऊन प्रत्यक्ष बघितले, प्रत्यक्ष भेट दिली. मी महापौर महोदयांना विनंती करेल की, आपले जेष्ठ पत्रकार आहेत, श्री. दिलीप मालवणकर यांचे उपोषण जर सुटले नाही, ते सोडवण्याची जबाबदारी या संपुर्ण शहरामध्ये एक जेष्ठ संपादक किंवा पत्रकार उपोषणाला बसत असेल, ठराविक महानगरपालिकेच्याच मागण्यांसाठी आणि जर तुम्ही त्यांना प्रति उत्तर देत नसेल, प्रतिसाद देत नसेल तर ही आम्हांला शरमेची गोष्ट आहे. महापौर महोदया आपण यामध्ये जातीने लक्ष टाकावे अशी माझी विंनती आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** मा.महापौरजी, जो तोरणे मॅडने विषय इथे उपस्थित केला आहे, आज आपण किती तरी वर्षापासून या वडोल गांवचा विषय ऐकत आलो आहे? आमची प्रशासनाकडून हीच अपेक्षा आहे की, लवकरात लवकर जे थांबलेले काम आहे, तो पुर्ण करण्यात यावा आणि काम १०० टक्के पुर्ण होत नाही, तो पर्यंत पावसाळयामध्ये काही अपघात होणार नाही, कोणाचे जीव जाणार नाही, त्यासाठी प्रयत्न करून लोकांना तेथे तात्पुरतें येण्या—जाण्यासाठी प्रबंध करणे खुप आवश्यक आहे. काही लोक आपले जीव मुठीत धरून तो नाला क्रॉस करण्याचा प्रयत्न करतात, हा त्यांचा नाईलाज आहे. किती वर्षापासून पुल बनला नाही? त्यामुळे त्यांचा हा नाईलाज आहे की, त्यांना अशा प्रकारे जावे लागते. महानगरपालिकेने त्यांच्यासाठी बसची व्यवस्था केली आहे. परंतु संपुर्ण गावासाठी फक्त दोनच बस अपु—या पडतात आणि काही लोकांना अर्जेंट उल्हासनगर स्टेशन किंवा आजुबाजूच्या एरियामध्ये पोहचायचे आहे, तर हा शॉर्टकट रस्ता असल्यामुळे ते लोक आपला जीव धोक्यात टाकुन याचा उपयोग करतात. तर माझे प्रशासनाला निवेदन आहे, आयुक्त साहेबांना निवेदन आहे की, आम्हांला कमीत कमी एक क्रॉंक्रिट प्लॉन दया, हा पुल जो आहे, तो कधी पर्यंत पुर्ण होईल? आणि तात्पुरती उपाययोजना काय करणार आहेत? आणि ते काय करणार आहेत? धन्यवाद.

**<u>सदस्या, श्रीमती शुभांगी निकम:—</u>** मा.महापौर आणि आयुक्त साहेब, तोरणे मॅडमने उठवलेला मुद्दा एकदम बरोबर आहे. असे किती दिवस चालणार आहे? की, आपण हे फक्त ऐकणार आहे. आपण महानगरपालिका गरीबांना मारण्याचे काम करतो, आपण एक साधा पुलही बनवु शकत नाही आणि याच ठिकाणी जर एखादी बिल्डींग बनली तर तिच्या बाजुला लगेच सी.सी. पॅसेजचा रोड तयार होतो. पण आपण फक्त गरींबांचे गळे दाबणार आहेत का? याचे उत्तर सगळयांनी दया. गरीबांना मारण्याचा प्रयत्न आपण महानगरपालिका करते आणि या पुलाचे जे ठेकेदार आहेत, त्यांच्यावर आता पर्यंत काही कारवाई केली आहे का?

**<u>सदस्या, श्रीमती सविता तोरणे:—</u>** साहेब, तुम्ही ३० तारीख दिली होती, ३० तारखे नंतर तुम्ही म्हणटला की, आम्ही कारवाई करू, तुम्ही कारवाई केली का? आम्हांला याचे उत्तर दया. आज उत्तर मिळाल्या शिवाय मी खाली बसणार नाही. मिराचा पुल तुटलेला आहे, तो तुम्ही बनवणारच आहात, मग वडोल गावच्या पुलासाठी तुम्ही का असे करतात? इथे नागरीक राहत नाही का? तिकडचे गोरगरीबांची मुले शाळेत येतात, एवढी मोठी तिथे शाळा आहे,

हजारो विद्यार्थी शाळेत येतात. पहीलेच तीन बळी गेले आहेत, आता माझा बळी देवू का? बळी दिल्या नंतरच कळणार आहे का तिथल्या लोकांची काय परिस्थिती आहे? ते लोक आम्हांला विचारतात नगरसेवक म्हणून आम्हांला निवडून दिले आहे, तर मग आम्ही त्यांचा मुद्दा मांडणार नाही का? आणि त्या लोकांना पण ऐकायचे आहे.

**सदस्य, श्री. गजानन शेळके:—** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, वडोल गावाच्या परिस्थिती तिथे एक शिडी ठेवलेली आहे, त्याच्यावरून शाळेतील विद्यार्थी खाली उतरतात आणि पावसाळयाचे दिवस असल्यामुळे तिथे एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. त्या करीता ती शिडी ताबोडतोब हटविण्यात यावी आणि तिथे आपल्या महानगरपालिकेतर्फे किंवा ठेकेदारातर्फे तिथे दोन वाचमन किंवा सुरक्षारक्षक ठेवायला पाहीजेत. रात्री बेरात्री येणारी पुलावरून जे लोक असतात त्यांना पाण्याचा अंदाज नसतो, ती लोक पाण्यातून वाहून जाण्याची शक्यता आहे, एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. तेव्हा महानगरपालिकेवर किंवा ठेकेदारावर आणि स्थानिक नगरसेवकांवर लोकांचा रोष निर्माण होतो. त्याच्या करीता तात्पुरती साहेब पायवाट किंवा जाण्यायेण्यासाठी उपलब्ध करून देवा, हीच विनंती.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे:—** पायवाट न करता.....

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौरजी, उप महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, आजच्या या महासभेमध्ये वडोल गांवचा पुल, हा पुल गेल्या दोन वर्षा पुर्वी धोकादायक झाला, कोसळला आणि त्या नंतर त्याच्या कामाची निविदा मागवली आणि लवकरात लवकर त्याचे काम कसे होईल? यासाठी सर्वांनी प्रयत्न केले. परंतु वडोल गावाच्या पुलाच्या बाबतीमध्ये खरोखर कुठे तरी राजकारण होते? हे काम हयांनी केले तर त्याला श्रेय मिळेल, त्यांनी केले तर त्यांना श्रेय मिळेल. या कुठल्या तरी दोन्ही पक्षाच्या नगरसेवकांनी किंवा पदाधिका—यांच्या राजकारणामुळे त्या पुलाचे काम बरोबर होत नाही, असे माझे आरोप आहे. लवकरात लवकर त्या पुलाचे काम झाले पाहीजे ही महापालिकेची जबाबदारी आहे आणि आयुक्तांची जबाबदारी आहे. ते आयुक्त जबाबदारी पार पाडीत असतांना कुठे राजकीय दबाव येतो का? हा एक महत्वाचा विषय इथे निर्माण होतो. आपण आयुक्त साहेबांनी ताबोडतोब त्या पुलाचे काम कसे होईल? आणि तिथल्या लोकांना चांगल्या पध्दतीने जाता आणि येता कसे येईल? त्या पुलाचा वापर करता येईल किंवा आता यांनी जसा प्रश्न उपस्थित केला शिडी, बरोबर शिडी वरून जर कोणी गेले तर अपघात होण्याची शक्यता आहे आणि अपघात झाल्या नंतर नागरीकांचा रोष सरळ महापालिका, आयुक्त नगरसेवक महापौर यांच्यावर येतो आणि अशा वेळेला आपली जबाबदारी आहे. जे प्रमुख पदाधिकारी इथे बसलेले आहेत, महापौर असतील, उप महापौर असतील, सभागृह नेता आहेत, यांनी मध्यस्थी करून त्या पुलाचे काम लवकर कसे होईल? त्यासाठी प्रयत्न केले पाहीजेत आणि ते लवकरात लवकर झाले पाहीजे अशी आमची मागणी आहे.

**या** वेळी सदस्य, श्री. राजेश वानखेडे यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे:—** आयुक्त साहेब, आपण याचे उत्तर दयावे, आम्ही जेव्हा तीन वेळा उपोषणाला बसलो होतो, त्या वेळेला आमदार श्रीमती ज्योती कालानी आल्या होत्या. त्यांच्या समवेत तुमच्या बैठकीमध्ये आम्हांला आश्वासन दिले की, ३० तारखे पर्यंत ठेकेदार हा काम पुर्ण करेल आणि नाही केले तर आम्ही त्याच्यावर कठोर कारवाई करू. मग तुम्ही का कारवाई केली नाही आम्हांला खोटे आश्वासन देत आहेत का? आम्ही पब्लिकला काय सांगायचे? जनतेला काय उत्तर दयायचे? आम्हांलाच तुम्ही उत्तर दया आणि जो पर्यंत उत्तर देणार नाहीत, तो पर्यंत आम्ही बसणार नाहीत आणि महासभा पण होऊ देणार नाहीत.

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे:—** मा. महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त साहेब, वडोल गावचा प्रश्न हा दिवसेंदिवस अत्यंत गंभीर बनत चाललेला आहे. आता सगळयांच्या प्रतिक्रिया ऐकलेल्या आहेत, त्यामुळे जास्त बोलणे आणखी वेळ घेतल्या सारखे होईल. पण मला एकच सांगायचे आहे की, स्थानिक नगरसेवक त्या वार्डाचा प्रश्न नसून पुर्ण शहराचाच आहे. कारण सगळीकडेच काही तरी कुठे ना कुठे प्रॉब्लेम असतात. आता वडोल गावचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कारण की, गावचा संपर्क तुटलेला आहे. रोजच्या रोज शाळेत जाणा—या मुलांना म्हणा किंवा कामावर जाणा—या लोकांना कसे जाणार? आणि आणखी दुर्घटना घडण्याची आपण वाट बघत आहोत का? जर ३० तारीख डेड लाईन दिली होती तर त्यांच्यावर कारवाई का होत नाही? कृपया याच्याकडे गंभीरतेने बघून आजच्या आज हा प्रश्न सोडवा, अशी मी विनंती करते, धन्यवाद.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब, मा. महापौरजी जसे की, सर्वांचे लक्ष वडोल गांवच्या पुलावर आहे. आयुक्त साहेब, आपण स्वत: व्हिजीट केले होते, तेव्हा आपण बघितले होते की, पुलाचे काम कोणत्या स्थितीमध्ये आहे. तेव्हा मी आपल्याला येण्यासाठी मेसेज केला होता. पाण्याची परिस्थिती कशी आहे, हे आपण बघण्यासाठी आले होते. तेव्हा तुम्हांला वाटत होते की, हा ब्रिज पंधरा दिवसामध्ये पुर्ण होईल किंवा ३० तारखे पर्यंत हा पुल व्हायला पाहीजे होता. श्री. सितलानीजी यांना पण बोलावू इच्छितो मला त्यांना काही शब्द विचारायचे आहेत?कन्सलटंटचे काय म्हणणे आहे आणि त्यांचे काय म्हणणे आहे, किती वेळ लागेल? ३० जुन पर्यंत त्यांनी लिहून दिले होते की, आम्ही पुल पुर्ण करू. ते संभव होते की नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब, वडोल गांव एक फार मोठा इश्यु आहे. कोणाचा व्यक्तिगत नाही, माझा नाही आणि दुस—याचे पण नाही. हे कनेक्ट उल्हासनगर आणि अंबरनाथला आहे आणि आजच्या तारखेमध्ये मी बघत आहे, शिडी आहे. शिडीने काही लोक येत जात आहेत. जर शिडीमुळे काही दुर्घटना झाली तर आपण काय सांगणार? धिस इज इलिगल इट वाज नॉट फुट बाय दि कॉर्पोरेशन आपण कोणाच्या तरी हाती त्या रस्त्याचे काम दिले आहे आणि जर काही झाले तर तुम्ही जबाबदारी घेणार नाहीत. पब्लिक रोज त्याचा वापर करीत आहेत, तर माझे हे म्हणणे आहे की, तिथे पोलिस संरक्षण किंवा महापालिकेने काही तरी संरक्षण ठेवले पाहीजे, फ्री क्रॉस ठेवले पाहीजे. वार लेवलमध्ये अंधारात पुल पडला आहे, तर तो पुल बनवण्यासाठी दोन वर्षे लागतील का? तो पण बनेल आणि मिलिटरी बनवेल एलफिलस्टन्सचे पुल पडले होते, ते पण मिलिटरीने बनवले होते. काय बनू शकत नाही? काय होऊ शकत नाही. जर करायचे असेल तर सर्व काही होऊ शकते? परंतु मी टेक्नीकल कारण विचारणार आहे. मी टेक्नीकल इंजिनियरला विचारणार आहे. आता पावसाळयाचे दिवस आहेत, जर आनन फानन बनवायला घेतले तर परत पुल कोसळू शकतो. तर परत ठेकेदाराला जेलमध्ये जायला लागेल. मला टेक्नीकल हे पण विचारायचे आहे की, इट इज वायबल टू वर्क इन धिस मानसून सिजन मला बोलाण्याची संधी दिली आहे, मला बोलू दया, नंतर हसा. इट इज वायबल टू वर्क इन मानसून? रेन मानसून वॉटर? हे टाकणार तर परत तसेच होऊन जाईल. तर मग परत ठेकेदारावर इलिगेशन होणार का? हे स्पस्टीकरण मला सितलानी यांच्याकडून पाहीजे आणि टाईमबार पाहीजे आता एक्सटेंशन खुप झाले. पब्लिक खुप त्रस्त झाले आहेत. अपघात झाला तर त्याला जबाबदार कोण? धिस इज इलिगल बाथवेज गोईंग ऑन ऐवरी बडी इट इज रिस्पॉसिंबिलिटी कॉर्पोरेशन ॲन्ड सिटीजन ॲन्ड हॉट आय वॉन ॲनसर प्लीज गिव्ह मी ॲनसर सितलानीजी, धन्यवाद.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** कृपया सितलानीला बोलावा.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे:—** सितलानी उत्तर देणार नाहीत, आयुक्त साहेब, उत्तर देतील, आम्हांला आयुक्तांना विचारायचे आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** सितलानी आपण मागच्या महीन्यात ३ तारखेला आयुक्तां बरोबर वडोल गावचा पुल पाहणी करण्यासाठी आले होते. त्यावेळी तुम्ही सांगितले होते की, पंधरा दिवसामध्ये पुल तयार करू. हे तुमचे शब्द होते.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** मी सांगितले होते की, लवकरात लवकर पुलाचे काम पुर्ण करून जसे की, पब्लिकला त्रास होणार नाही, असे प्रयत्न करू.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** हा जो स्पॅन आहे, हा किती मिटरचा भरलेला आहे?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** २० मिटरचा आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** हे तुम्हांला पंधरा दिवसाचा वाटत होते का? पंधरा दिवसात होणार.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** आम्ही प्रयत्न करीत होतो,

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** प्रयत्न आणि वेळ.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** ठेकेदाराने सांगितले होते की, ३० जुन पर्यंत त्याचे टाईम लिमिट आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** त्यावेळी तुम्ही पंधरा तारीख सांगितली होती.

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—</u>** ते पंधरा आम्ही जनरली सांगितले होते, परंतु ३० जून पर्यंत त्यांचा टाईम लिमिट होते. आता २५ जुनला आमची मिटींग कन्सलटंट, आयुक्त साहेब आणि ठेकेदारा बरोबर पावसामुळे आणि टेक्नीकल मॉपच्या कारणाने काम थोडे फार हळू चालेले होते आणि कन्सलटंटने सांगितले की १० दिवसात त्याचा स्ट्रेस आम्ही पुर्ण करू आणि पब्लिकला येण्या जाण्यासाठी ते काम पुर्ण करू.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—</u>** तुम्हांला माहीती नव्हते की, पावसाळयाचे दिवस आहेत._जुलैच्या पावसाच्या पहीलेच सांगितले होते की, मानसून सिजन आहे. ३० जुनची तारीख तुम्ही दिली होती की, आयुक्त साहेबानी सांगितली होते.

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—</u>** ३० जुनची वेळ महानगरपालिकेच्या वर्क ऑर्डरमध्ये दिले आहे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—</u>** तुम्ही प्रॉमिस केले होते की, ३० जुन पर्यंत काम पुर्ण होईल. त्याच्या नंतर ठेकेदारावर कारवाई होईल. त्याच्या नंतर आपण पर्यायी रस्ता काढण्यासाठी विचार केला होता, त्याचे काय झाले ते सांगणार का?

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—</u>** आता तिथे स्ट्रेस ब्रिजचा काम चालू आहे, त्याला काही टेक्नीकल आणि पावसामुळे आणि तेथील पब्लिकमुळे थोडे फार ढिले झाले आहे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—</u>** पब्लिकचे काय होत? कारण काय होते?

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—</u>** तेथील लोकांना कायम स्वरूपी पुल पाहीजे होता, परंतु आमही अॅट प्रेझेंट पावसामुळे शक्य नाही, त्यामुळे तिथे स्ट्रेस ब्रिज बनवत आहे. जसे की, लोकांना त्रास होणार नाही आणि दहा पंधरा दिवसामध्ये ते काम पुर्ण होईल.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—</u>** त्याला दहा पंधरा दिवस लागतील स्ट्रेस ब्रिजला पाच, सहा दिवस झाले आहेत का काम सुरू करून.

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—</u>** काम सुरू आहे, सहा, सात दिवसात पुर्ण होईल.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—</u>** लवकरात लवकर पुर्ण करा.

**<u>सदस्या, श्रीमती सविता तोरणे</u>**ः— सितलानीजी, मोसम आपल्यावर मेहरबान आहे, तेव्हा १५ जूनला पण पाऊस पडला नाही, आणि त्याच्या नंतरही पाऊस पडला नाही. तेव्हा काम होऊ शकत होते पण तुम्ही लोकांनी ते केले नाही. ठेकेदारावर तुम्ही काय कारवाई केली, याचे उत्तर दया.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—</u>** तिथे प्रॉब्लेम असे होते की, पावसामुळे किंवा काही कारणामुळे काम पुर्ण झाले नाही, परंतु काम चालू आहे आणि आठ दहा दिवसात हे काम पुर्ण होईल. जसे की पब्लिकला काही त्रास होणार नाही.

**<u>सदस्या, श्रीमती सविता तोरणे</u>**ः— लोकांना सध्या पुरता पुल नको आहे, आपण याच्या पहीलेच पुर्ण करायला पाहीजे होता, परंतु आपण केले नाही.

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—</u>** आता स्ट्रेस ब्रिज होईल, त्याच्या नंतर आम्ही काम पुर्ण करू. कन्सलंटंटच्या सांगण्यानुसार करू.

**<u>सदस्या, श्रीमती सविता तोरणे</u>**ः— कन्सलटंटच्या सांगण्यानुसार देणार का?

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—</u>** कन्सलटंट जे आहेत, आपल्या ब्रिजचे जे कन्सलटंट आहेत, नाकवा सर त्यांच्या हिशोबाने आम्ही काम चालू करीत आहेत.

**<u>सदस्या, श्रीमती सविता तोरणे</u>**ः— परंतु हे कामच पुर्ण झाले नाही तर ठेकेदार तुम्ही का ठेवला आहे?_दुस—याकडून काम करू शकत नाही का? दुस—याला काम दया.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** मॅडम दुस—याला काम देणेसाठी आपल्याला एक महीना वेळ जाईल. टेंडर मागवणे, प्रक्रिया करणे. ...

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे**ः— ठिक आहे, आता मौसमच्या हिशोबाने होणार पण नाही, परंतु आपण त्यांच्याकडून तो ठेका परत घ्या, दुस—याला ते काम दया. जनतेला त्यांच्याकडून उत्तर पाहीजे, ते महीलांची डायरेक्ट औकात काढतात.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** दहा, पंधरा दिवसात ब्रिजचे काम पुर्ण होईल आणि त्या वेळेत झाले नाही तर आम्ही दुस—या ठेकेदाराची नियुक्ती करू.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे**ः— कधी पर्यंत करणार?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** दहा दिवसाची वेळ दिली आहे, त्यांना स्ट्रिजचा ब्रिज पुर्ण करण्यासाठी.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे**ः— आयुक्त साहेब, आम्हांला याचे उत्तर दया.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** सितलानी साहेब, जर दुसरा ठेकेदार येईल, तर ते अजून वेळ घेणार.

**शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** प्रोसेस पुर्ण करायला वेळ तर लागेलच सर.

**सदस्य, श्री.भगवान भालेरावः—** मग आता नगरसेवकांना जे पाहीजे, पब्लिकला तात्पुरते आता येण्या—जाण्यासाठी चालू करा आणि हा इश्यु संपवून टाका?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** मी तेच बोलत आहे, आठ दिवसाच्या आत तयार होऊन जाईल.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** जसे पाऊस कमी होईल, तेव्हा लवकरात लवकर पुलाचे काम पुर्ण करा.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** स्ट्रिज ब्रिजच्या वेळीजर कोणी हरकत घेत असेल, आम्ही आढावा दिला आहे, उद्या तुम्ही आयुक्त साहेबांनी आदेश दिले आहे, त्यांच्यावर कडक कारवाई करा. जो पर्यंत ठेकेदार पुलाचे काम पुर्ण करीत नाही, तो पर्यंत आम्हाला पर्यायी रस्ता दयायचा आहे. कमीत कमी येण्या—जाण्यासाठी. हे तुम्ही लक्षात ठेवा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** सितलानीजी आपण टेक्नीकल मॉब बोलले, आपण मॉप शब्द वापरला.

**प्र.शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** मॉब म्हणजे माझा सांगण्याचा उद्‌देश स्थानीक लोक थोडे फार बोलत आहेत, बाकी काहीच त्रास नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** आता ॲज ऑन टुडे आहे का काही?

**प्र.शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** नाही, नाही,

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** सभागृहाला व्यवस्थित सांगा.

**प्र.शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** नाही, नाही काहीच त्रास नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** काम चालू आहे.

**प्र.शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** होय, काम चालू आहे.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** काम चालू आहे, मॉबचा प्रॉब्लेम नाही, कोणत्याही नगरसेवकाचे प्रॉब्लेम नाही आणि तिथल्या स्थानिक लोकांचा पण प्रॉब्लेम नाही.

**प्र.शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** स्थानिक लोकांचा प्रॉब्लेम नाही,

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** काही राजनिती आहे का यामध्ये?

**प्र.शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** काहीच राजनिती नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** तुम्ही स्टेजवरून बोलत आहात, सभागृह ऐकत आहे.

**प्र.शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** काम चालू आहे, काहीच राजनिती नाही, ठेकेदाराचे संपुर्ण सहकार्य आहे,

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** किती दिवसात?

**प्र.शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** आठ, दहा दिवसात स्ट्रिज ब्रिज पुर्ण होऊन जाईल.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** धन्यवाद, डेड लाईन दहा दिवस. मा. महापौर एक न्युज चांगली आहे, आपल्या माजी महापौर, श्रीमती लिलाताई आशान यांचा नातू श्री. कृणाल अरूण आशान, अरूण आशानचा मुलगा एन.सि.टी. शाळेमधून पहीला आलेला आहे आणि दहावीमध्ये ९६.६० टक्के मार्क मिळवले आहेत, तर मी त्याचे अभिनंदन करतो, माताजी तुमचे पण अभिनंदन, माताजीनी पण चांगल्या मुलाला जन्म दिला आणि अरूण आशान यांनी पण चांगल्या मुलाला जन्म दिला.

**सदस्या, श्रीमती वसुधा बोडारे**:— मा. महापौर, उप महापौर, सचिव मॅडम, या आनंदाच्या क्षणा बरोबरच मला थोडेसे आनंदाचे क्षण मला शेअर करायचे आहे. जे स्वच्छता अभियान महापालिकेने चालवले आहे, त्यात जास्तीत जास्त महीलांचीच बाजी आहे. दहा नंबर पॅनलमध्ये श्रीम. चौधरी मॅडम, बेहनवाल मॅडम, अठरा नंबर पॅनलमध्ये सोंडे मॅडम आणि एकोणीस नंबर पॅनलमध्ये साळवे मॅडम, म्हणजेच महीलाच स्वच्छता करू शकतात. तुम्ही महानगरपालिका कधी त्यांचा सत्कार कराल तेव्हा कराल, पण आमच्या सगळया टिमतर्फे इथे सगळया महीलांचा सत्कार करू शकतो. त्याच बरोबर जी प्रभाग समिती पण जिंकली आहे, त्यात आमच्या माने मॅडम आहेत. म्हणजे बघा महीला झिंदाबाद. सगळया महीलांनी पुढे यावे आम्ही त्यांचा सत्कार फक्त दोनच मिनीटात करतो आणि नंतर पुढे आपण सभा चालवू या.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे**:— आयुक्त सर, आम्हांला याचे उत्तर हवे, तुम्ही उत्तर दिल्याशिवाय आम्ही बसणार नाही. तुम्ही ३० तारखे नंतर काय कारवाई केली, याचे उत्तर दया. पत्रकार लोक बघत आहेत, जनतेला पण माहीती पडले पाहीजे. तुम्ही तिथे भेटायला पण आले नाहीत, आम्हांला तुमच्याकडून उत्तर हवे आहे.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** सन्माननिय महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, महापौर मॅडम प्लीज आपण राजीव गांधीनगर इथे परवाच्या दिवशी पुलाचे काम केले होते. म्हणजे थोडयाच दिवसापुर्वी त्या पुलाचे कामाचा दर्जा चांगला नसल्यामुळे तो जरा डॅमेज झालेला आहे. तरी आपण एकदा येऊन परत बघून जावे. आयुक्त साहेब आपण सुध्दा, राजीव गांधीनगरच्या एकदम कॉर्नरला सरळ, तिथे एक ब्रिज आहे, तो ब्रिज एकदम पडायला आलेला आहे. त्याचा रोड एकदम खचलेला आहे, तिथे लक्ष घालून बघून जावे. आयुक्त साहेब प्लीज तेवढे येऊन बघून जावे. महापौर मॅडम तुम्ही बघितले आहे आणि तुम्ही तो ब्रिज बनवायला सांगितले होते. बनवला पण तो बरोबर बनवला नाही.

**महापौर मॅडम तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, कृपया शांत बसून बागुलजी जे बोलत आहेत, ते लक्षपुर्वक ऐका.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** महापौर मॅडम, आपण राजीव गांधीनगर इथे ब्रिज बनवला आहे, तर खुप उपकार झालेत, परंतु ज्यांनी काम केले आहे, ते काम चांगले झाले नाही. तो ब्रिज पुन्हा डॅमेज झाला आहे आणि तो कधी पण कोसळू शकतो. आपण एक व्हिजीट दया, तेथून लाखो लोक येत—जात असतात, शाळेतील खुप मुले जातात. जाण्या—येण्याचा मेन रस्ता तोच आहे आणि दुसरा रस्ता आहेच नाही.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे**:— आयुक्त साहेब, तुम्ही उत्तर देणार आहे की नाही?

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** मॅडम, आपण प्लीज एक वेळा भेट दया.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे**:— दुसरा प्रश्न होऊन देणार नाही, जो पर्यंत मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. जर तुम्ही ३० तारखे पर्यंत पुर्ण करणार आहेत, त्या नंतर तुम्ही काय कारवाई केली? तुमच्या सहीला महत्व नाही का? तुम्ही आमदार मॅडम समोर लिहून दिलेले आहे, आम्हांला पत्रकारां समोर सांगितलेले आहे. सचिव मॅडम पुढील विषय मांडू नका?

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सचिव मॅडम पुढचा विषय घ्या.

**महापालिका सचिव:—** लक्षवेधी सुचना क्र. २. ...

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे**:— आयुक्त सर, जो पर्यंत उत्तर मिळत नाही, आम्ही खाली बसणार नाही.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** आताच महीलासाठी एवढी चर्चा झाली, महीलांचा सत्कार करण्यात आला. एक महिला परत परत सभागृहामध्ये, आयुक्त साहेब, तुमच्याकडून उत्तराची अपेक्षा आहे, आपण त्या महीलांना उत्तर देवू शकत नाही. हे काय होत आहे, महापौरजी. त्यांना उत्तर दयायला पाहीजे, आयुक्त साहेब तुम्ही त्या महीलांचा सत्कार करीत आहेत आणि एका महीलेला त्या वेळोवेळी तुम्हांला बोलत आहेत की, आयुक्त साहेब, उत्तर दया, उत्तर दया. आपण केलेल्या कामाची चुक झाकण्यासाठी तरी त्यांना उत्तर दया की हा पुल कधी होईल.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** सन्माननिय महापौर मॅडम, सन्माननिय सदस्य, ...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** आयुक्त साहेब, या सभागृहाची प्रथा आहे की, जेव्हा पण आयुक्त, किंवा सदस्य, जेव्हा बोलतात तर उभे राहून बोलतात.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** सन्माननिय महापौर मॅडम, सन्माननिय सदस्य, वडोल ब्रिजच्या संदर्भामध्ये मी त्या ठिकाणी ब—याच वेळा भेट दिलेली आहे आणि ब्रिजचे काम जे आहे, त्याचे एक टेंडर प्रमाणे वर्क ऑर्डर जी दिलेली होती. त्याच्या प्रमाणे त्याची ३० पर्यंत मुदत होती. वर्क ऑर्डरमध्ये जी मुदत दिलेली आहे, त्या मुदतीला आपण व्हॅलीड मुदत मांगतो, त्याच्यामुळे आपला नेहमीच प्रयत्न हा असतो, त्या मुदती पर्यंत ठेकेदाराने काम केले पाहीजे आणि म्हणून आम्ही वेळोवेळी ठेकेदाराला ज्या वेळी बोललो, ज्या वेळी त्याला आम्ही पत्र देणारे, त्याला असे सांगणार नाही की, तु नंतर काम कर. त्याला आम्ही हेच सांगणार की, तु ३० जुन पर्यंत काम कर. ३० जुन पर्यंत काम करायला त्याला आपण वारंवार लेखी आणि तोंडी सुचना दिल्या होत्या. या पुलाच्या कामामध्ये शेवटच्या टप्यामध्ये एक स्पॅन बाकी राहीलेला आहे आणि तो स्पॅन पुर्ण करण्यासाठी ठेकेदाराला आपण सातत्याने पाठपुरावा करतो. परंतु पावसाळा सुरू झाल्यामुळे आणि ठेकेदाराच्या त्याच्या काही आडचणीमुळे ते काम पुर्ण करू शकला नाही आणि आपण त्याला सातत्याने पाठपुरावा करूनही त्याला काम जेव्हा पुर्ण होत नाही, हे जेव्हा लक्षात आले. त्या नंतर आम्ही २५ तारखेला त्याची एक बैठक घेतली होती आता सितलानी यांनी त्याचा उल्लेख केला, त्या बैठकीमध्ये त्या प्रोजेक्टचे जे कंन्सलटंट आहेत, त्या कन्सलटंटने सांगितले की आपल्याला आता या प्रेडमध्ये काम करणे शक्य नाही. पाऊस अॅट रॅमन्डली येतो, आपण ब्रिजचा जर स्लॅब कास्ट केला आणि उदया जर जास्त पाऊस झाला तो स्लॅब वाहून गेला तर परत या पुला बददल अनेक शंका कुशंका निर्माण होतील, त्यामुळे या पावसाच्या काळामध्ये तो शेवटचा स्टॅब करणे शक्य नाही आणि लोकांसाठी सुविधा व्हावी या दृष्टीकोणातून त्यांनी असे प्रपोजल दिले होते की, या ठिकाणी आपण शेवटचा जो स्लॅब आहे. त्याच्या ऐवजी तात्पुरता स्ट्रिल जनरल टाकून त्या ठिकाणी आपण ब्रिज बनवू. त्याला आम्ही सहमती दर्शविली ठेकेदाराला सांगितले की, येत्या दहा, पंधरा दिवसामध्ये हा ब्रिज तुम्ही अॅट लिस्ट लोकांना वॉकेबल जेणेकरून आपण आज बघतो की, तेथील लोक धोका पत्कारून नदी पार करण्याचा प्रयत्न करत आहेत. लोकांना वॉकेबल ब्रिज तयार करून देण्यासाठी त्याला आम्ही सुचित केले होते, त्याची जी सुचना होती ती मान्य केलेली होती. ही सुचना ज्या वेळेला मान्य केली होती, त्यावेळेला काम सुरू झाले होते, त्या वेळेला काही लोकांनी त्या गांवामध्ये अडथळा आणला पोलिस स्टेशनला त्या बददल तक्रारही दिली आहे. आम्हीही पोलिस स्टेशनला पत्र दिले आहे की, ठेकेदाराला काम करू दया. माझी आपल्या सर्व लोकांना आणि तिथले जे सदस्य आहेत आपण आपल्याला विनंती राहील की, आपण या पुलाचे जे काम आहे, ते होऊ दया. आज पुढच्या आठ, दहा दिवसामध्ये जर काम सतत चालू ठेवले तर दहा दिवसामध्ये चालत जाण्या योग्य जो पुल आहे, तो तयार होईल. शाळेतील मुलांची, सर्व लोकांची चालत जाण्याची व्यवस्था होईल. तुमचा दुसरा जो प्रश्न आहे की, ३० तारखी पर्यंत काम पुर्ण केले नाही, आम्हांला लेखी दिलेले आहे. आम्ही तुम्हांला लेखी दिलेले आहे, हे आम्हांला मान्य आहे. आम्ही तुम्हांला लेखी देणार, ठेकेदाराला लेखी देणार आम्ही त्याला जी मुदत आहे, ती मुदतच देणार ना? ३० तारखी पर्यंतची जी वर्क ऑर्डरमध्ये त्याला मुदत दिली होती, त्या मुदतीचाच आम्ही उल्लेख करणार. आता ठेकेदारावर कारवाई काय करायची आणि त्याच्यावर कारवाई करावी असा तुमचा प्रश्न आहे. मला आपल्याला सांगावेसे वाटते की, ठेकेदारावर कारवाई करावी अशी तुमची मागणी आहे, त्या मागणीवर जरूर आम्ही विचार करू, ठेकेदाराला नोटीस देवू त्याच्या संदर्भात त्याचा जो खुलासा असेल तो खुलासा आम्ही प्राप्त करून घेऊ आणि त्याची जी प्रक्रिया आहे ती आम्ही सुरू करू. परंतु पुलाच्या कामाध्ये आता कृपया करून त्या ठिकाणी आडथळे येणार नाहीत, आपण स्थानिक नगरसेवक असल्यामुळे आपण

एवढे बघावे सहकार्य करावे आणि पुढच्या १० दिवसामध्ये पुलाचे काम पुर्ण होऊ शकते जर आपले सर्वांचे सहकार्य असेल तर

या वेळी सदस्य, श्री. अजीत गुप्ता यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे**:— आमचे सर्वांचे सहकार्य आहे जर सहकार्य नसते तर आम्ही उपोषणाला बसलो नसतो इथपर्यंत लढत आलो नसतो सर आम्ही बघत आलेलो आहे ती झळ आम्ही सहन करतो आमचीपण मुले त्या शाळेमध्ये शिकत आहेत तीन मुले गेलेली आहेत तिथे असे किती बळी घ्यायचे सांगा सर

**सदस्य, श्री. रविंद बागुल:—** आयुक्त साहेब उपकार करून कृपया राजीव गांधी नगर तेथेही एक ब्रीज पडण्याच्या स्थितीत आहे आपल्याला विनंती करून सांगतो की आपण एकदा भेट दयावी. राजीव गांधीनगर तेथे महापौर मॅडम स्वत: येवून काम करून गेलेले आहे तरीपण ते काम झालेले नाही तरी आपण येवून बघावे आयुक्त साहेब उद्या जर काही घटना झाली तर मग तुम्ही सांगू नका आयुक्त साहेब कृपया. महापौर मॅडम कृपया आपण एक वेळा येवून बघा आपण जो पुल बनविला होता तो पुन्हा खराब झालेला आहे.

या वेळी सदस्य, श्री. शंकर लुंड यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** आपल्या परिसरात एक दिवस येवून आता जो ब्रीज मी बनवून दिला तो परत त्याला प्रॉबेलम झाला आहे एक दोन दिवसात परत मी पहाणी करून मी आपल्याला फोन करून बोलवण्यात येईल.

**सदस्य, श्री. रविंद बागुल:—** मॅडम एक वेळा येवून बघा मॅडम मला बोलावा तेथील नागरीक घाबरली आहे बिचारी ते लोक म्हणतात आम्ही पुलावरून जावू की नको लहान लहान मुल शाळेत जातात ते घाबरतात बिचारे.

या वेळी उप महापौर हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** एक दोन दिवसात येते तुम्हाला फोन करून बोलवते.

**सदस्य, श्री. रविंद बागुल:—** ठिक आहे.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे**:— आयुक्त साहेब तुम्हाला पत्र दिले होते ते खोटे होते का सर आणि जी कारवाई करणार होते ती का? केली नाही का ते ठेकेदार तुम्हाला पाहीजेत?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** कारवाईची एक प्रक्रिया असते, त्या अगोदर त्याला नोटीस दयावी लागते, कारवाईची प्रक्रीया आहे त्याला नोटीस दयावी लागते ती नोटीस त्याला आम्ही देवू आता ३० तारीख उलटून आज ४ तरीख आहे मला हे समजत नाही की तुम्हाला पुलाच्या कामामध्ये इंटरेस्ट आहे की ठेकेदाराच्या कारवाईमध्ये इंटरेस्ट आहे.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे**:— आम्हांला पुलाच्या कामध्येच इंटरेस्ट आहे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** पुलाचे काम आम्ही पुर्ण करतो.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे**:— तुम्हांला तोच ठेकेदार हवा आहे का?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** पुलाचे काम आम्ही पुर्ण करतो, आणि ठेकेदारावरही कारवाईसाठी आम्ही नोटीस देतो हे मी सांगितले तुम्हांला, जी प्रक्रिया आहेत ती प्रक्रीया पुर्ण करावी लागेल. आपल्याला पुलाचे काम सुध्दा पुर्ण करून घ्यावे लागणार आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, जेव्हा आयुक्त साहेब बोलत आहेत, पहिले त्यांचे ऐकूण घ्या, नंतर तुम्हांला जो प्रश्न विचारायचा आहे, ते विचारा.

**सदस्या, श्रीमती सविता तोरणे**:— ठिक आहे, उत्तर दया सर.

**<u>सदस्य, श्री.सतरामदास जेसवानी:—</u>** महापौर साहेबा, मी बोलू इच्छितो की आमच्या उल्हासनगर महानगरपालिकामध्ये, महासभेमध्ये आम्ही तीन चार वर्षा पासून ही चर्चा बघतली आहे सुरूवातीला इथे उप महापौर होत्या, नाना पवार यांच्या परिवारातील तेव्हा पासून या पुलासाठी चर्चा चालू आहे, उप महापौर, श्रीमती पंचशिला पवार यानीच या पुलासाठी मागणी केली होती. त्यावेळी आपले आयुक्त, श्री. हिरे साहेब होते, त्यांनी सुध्दा व्हिजीट केली होती, त्याच्या नंतर श्री. निंबाळकर साहेब आले, त्यांनीही व्हिजीट केली आणि त्याच्या नंतर श्री. शिंदे साहेब आलेत, त्यांनी सुध्दा व्हिजीट केली होती आणि आता तुम्ही आमचे चौथे आयुक्त साहेब आहेत, परंतु या पुलाचे काम पुर्ण झाले नाही. हा एक चिंतेचा विषय आहे. हा फक्त एका पुलाचा विषय नाही. संपुर्ण शहरामध्ये जेवढे पण कलवर्ट आहेत, नाले आहेत, पुल आहेत या सर्वांची माहीती घ्यायला पाहीजे. दुर्घटना झाल्या नंतर आपल्याला जाग येईल का? जेव्हा दुर्घटना होईल आणि लोक मरतील तेव्हा आपल्याला जाग येईल का? आताच बघा, एक पुल सांगितले होते, तो चेक केला होता, तो पुल कोसळला. कृपया वेळेवर जागे व्हा, लोक आपल्याला बघत आहेत, महापौरांकडे बघत आहेत, उप महापौरांकडे बघत आहेत, नगरसेवकांकडे बघत आहेत आणि प्रशासनाकडे सुध्दा बघत आहेत. संपुर्ण शहरामध्ये बदनामी होत आहे. तरी कृपया बदनामी झाली नाही पाहीजे आणि वेळेवर प्रत्येक काम झाले पाहीजे. कोणाचे नुकसान झाले नाही पाहीजे. तरी कृपया या गोष्टींवर लक्ष राहायला पाहीजे आपण महानगरपालिकेमध्ये बसलेलो आहोत, ग्रामपंचायतमध्ये बसलो नाही. नियमानुसार काम झाले पाहीजे, शहर अभियंता यांनी चांगले लक्षात घेतले पाहीजे आणि कनिष्ठ अभियंता यांनी कृपया लक्ष दयावेत जे पण कामे होत आहेत, कोणीही कुठेच जात नाहीत. आमचे एक सिटी इंजिनियर आले होते, श्री. मुकेश आयलानी, त्यावेळी त्यांना शहर अभियंता पदभार दिले होते. प्रत्येक गोष्टींची चेकिंग होत होती. शहर अभियंता वेळेवर जात येत होते, वेळेवर उप अभियंता जात येत होते, वेळेवर कनिष्ठ अभियंता जात येत होते, आणि मुकादम पण वेळेवर येत होते आणि तिथे एक भेट वही होती, त्या भेट वहीमध्ये सर्व लोक नोंद करून येत होते. अमुक तारखेला, अमुक वेळेवर आम्ही तिथे व्हिजीट केली, असे काम होत आहे? आयुक्त साहेब, आम्हांला तुमच्याकडून खुप आशा आहेत की, जे पहीले झाले आहे, आता परत चुका झाल्या नाही पाहीजेत, आणि कोणाचेही नुकसान झाले नाही पाहीजे आणि शहरामध्ये महापालिकेची बदनामी झाली नाही पाहीजे, कृपया या गोष्टीची नोंद घेण्यात यावी, धन्यवाद.

या वेळी उप महापौर, यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>महापालिका सचिव:—</u>** लक्षवेधी वाचली होती, पुन्हा एकदा वाचते, मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२ नुसार मागील वर्षाचे विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, गट नेता, प्रभाग समिती, सभापती निधींची कामे होण्या बाबतची श्री. सुनिल सुर्वे यांची लक्षवेधी आहे.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.....................

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक २</u>

विषय:— मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार मागील वर्षाचे विरोधी पक्षनेता, सभागृह नेता, गटनेता, प्रभाग समिती, सभापती निधीची कामे होण्या बाबत.

सुचकाचे नांव:— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव:— श्री. चंद्रशेखर यादव

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१६—२०१७ च्या आर्थिक वर्षातील तरतुदीनुसार सदर निधी स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेता, सभागृह नेता, सर्व गट नेते, प्रभाग समिती सभापती व स्थायी समिती सदस्य निधी यांना पुर्णपणे वापरण्या करीता विशेष निधी तसेच नगरसेवक निधी मंजूर करण्यात आला होता. परंतु महापालिकेन सदर निधी काही सदस्यांना / पदाधिका—यांना दिला असून काही सदस्य/पदाधिका—यांना एक ही रूपया निधी वितरीत केला नव्हता. मागील सार्वत्रिक निवडणुकीत पुन्हा निवडून आलेल्या सदस्य /पदाधिका—यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ अन्वये कुठल्याही अर्थसंकल्पात तरतुद केल्यानंतर सदरचा निधी हा पुढील २ वर्षा पर्यंत वापरता येत असल्याने सदर

निधीतून प्रलंबीत असलेली विकास कामे करण्यासाठी व मान्यता मिळणेसाठी कृपया सदर लक्षवेधी सुचनेवर सभागृहात चर्चा, विचार विनीमय होवून २०१६–२०१७ च्या आर्थिक वर्षातील उर्वरीत निधी वापरण्यास मंजुरी मिळावी, ही नम्र विनंती.

---

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी, उप आयुक्त साहेब, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, आणि संपुर्ण सभागृह विषय तसा साधा आहे, गंभीर आहे. कारण की, मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रमाणे कलम १०२ प्रमाणे मागच्या दोन वर्षाचे जे काही राहीलेले आमची कामे आहेत किंवा महानगरपालिकेच्या ज्या काही रायबेलिटीज आहेत, त्या या वर्षात आपण घेवू शकतो. या प्रमाणे आम्ही स्थायी समितीला ठराव पास केलेला आहे. मा. आयुक्त साहेब, मला माहीती आहे, तुमचे उत्तर काय असणार? पैसे नाहीत, परिस्थिती खराब आहे. त्याला जबाबदार पण प्रशासन आहे. मी अशी बरीचशी उदाहरणे तुम्हांला देतो की, जे तुम्ही सहज करू शकतात, परंतु ते प्रशासनाकडून होत नाही. उदाहणार्थ, तुम्ही उत्तर देतांना थोडेसे नोंद करून घ्या की आम्ही कुठल्या मार्गानि उत्पन्न हा दुदैव असे आहे की, आमच्या सारखा कमी शिकलेला नगरसेवक आहे, सदस्य आहे, त्याला सांगावे लागते की, महानगरपालिकेच्या हुशार अधिका—यांनी काय काम करावे? जे डिग्री घेऊन बसलेत त्यांना सांगावे लागते ही दुदैवाची बाब आहे. सर्व प्रथम तुम्ही अनाधिकृत बांधकाम याबातच्या ब—याचशा तक्रारी तुमच्या पर्यंत येतात, तक्रारी लेखी येतात, तोंडी येतात, व्हॉटस अपद्वारे येतात, टीवट्रद्वारे येतात, ब—याच ठिकाणी येतात, ई—मेलद्वारे पण त्या तक्रारींचे पुढे काय होते? हा विषय वेगळा परंतु झालेले बांधकाम जागेवर असतांना त्या जागेची मोजमापनी करून त्यांना टॅक्स लावणे हे तर काम तुम्हांला जमू शकते ना? त्या विभागामध्ये टॅक्स विभाग आहे ना? आत केबी रोडला एवढी बांधकामे तुटली त्याच्या दुप्पट झाली मला काय खोलात जायचे नाही, कोणाची तक्रार करायची नाही? परंतु मी या अनुषंगाने तुम्हांला सांगतो की, तिथे तुम्ही गेल्या दोन वर्षात जी बांधकामे झालीत त्यांना टॅक्स लावला तर किती करोड रूपये आपल्याला वसुल होतील? आणि आता तिथे काय झाले? नाव होते सोम्या, ज्याचे तुटले तो त्याच जागी सोम्यानेच बांधले आहे, पण गोम्याचे नाव टाकून टॅक्स पावती बनवल्या असतील. शेवटी सोम्याचा जो अगोदरचा जो काय आहे? आपल्या महापालिकेला देय, असलेली रक्कम ती प्रॉफिट करण्या करीता आमच्या स्थायी समितीला येते की सदर व्यक्ती आढळून येत नाही, सदर प्रॉपर्टी आढळून येत नाही. या प्रकारची साडे आठ हजार प्रकरणे आपल्याकडे पडली आहेत. तब्बल ९० कोटींची थक्क बाकी जी आम्ही दर वर्षी आपल्या बजेटमध्ये करतो. या वर्षाच्या पण बजेटमध्ये ती धरलेली आहे. या अशा छोटया छोटया गोष्टी आपण सहज करू शकतात. आपल्याकडे मुळामध्ये ज्या ज्या पोस्टींगवर ज्या ज्या व्यक्तींना घेतले आहे, उदाहरणार्थ आयुक्त म्हणून आपण आहात. पण ते आयुक्त म्हणून ते कामच करीत नाहीत. मी उदाहरण देतो, क्लेम नाही करीत. एक बाजार निरीक्षक आहे, समजा एखादा जनावरे पकडणारा आहे, एक टॅक्स कलेक्शन म्हणून ज्या पध्दतीने त्याला घेतला आहे, त्या पदाचा तो कामच करीत नाही. इथे आज प्रकार काय माहीती आहे का? कुठली पोस्टींग चांगली आहे? त्या करीता फक्त कसे तरी कोणाला तरी मॅनेज करायचे? आणि त्या पदावर जाऊन बसायचे तुम्ही एल.बी.टी. मध्ये बघितले आहे, त्यांच्यावर कारवाई झाल्यात, तेच अधिकारी टॅक्समध्ये पण आहेत. तुम्ही अकॉउंटला पाहीले असेल तीच स्थिती आहे, सार्वजनिक बांधकामाला पाहीलेत तिच स्थिती आहे. ज्या ज्या ठिकाणी, ज्या ज्या पध्दतीने, त्या त्या पध्दतीने व्यक्ती जातो, काम काय? म्हणजे आपल्याकडे मराठीत म्हण आहे, तर कुंपणच शेत खायाला लागले तर त्या शेतक—याला किंवा इथल्या नागरीकांना काय सुविधा देणार आणि काय उत्पन्न देणार तुम्ही? काय रिझल्ट देणार? मागचे आय.ए.एस. निंबाळकर साहेब होते, मला अपेक्षा होती की, खुप काही होतील? कृपया सदस्यांनी जरा ऐकले तर बरे होईल. जर माझे काही चुकले असेल तर त्याचे करेक्शन पण करा. हया ज्या काही निंबाळकर साहेबांच्या वेळेस आम्हांला आशा होत्या, हे कामे होतील, ते कामे होतील, त्यांनी सुरूवात पण चांगली केली होती, कचरा सुध्दा चांगल्या प्रकारे या शहरातून गायब झाला होता. शौचालय क्लीयर झाली होती, पुन्हा तीच स्थिती. त्यामुळे आपण जो खर्च करतो, ज्या ज्या गोष्टींवर आणि ही जी परिस्थिती खराब होते, याला कारण आमचे निधी न मिळण्या मागे, आम्हांल तीन वर्षे झाले वार्डामध्ये मागच्या वेळेस सव्वा लाख रूपये जे आपण आल्या नंतर मिळाले. अगोदर टेंडर झालेले जमनुजी प्लीज डीस्टॉप करू नका...

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, थोडा डिसीप्लेन ठेवा म्हणजे सुर्वेजीना डिस्टॉप होणार नाही.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मी सुरूवातीलाच विनंती केली की, सदस्यांनी जरा गंभीरपणे ऐकावे ज्यांच्या डयुटी आहे, मालमत्ता एवढया पडलेल्या आहेत. त्या मालमत्ता बंद आहेत, त्या निदान भाडयाने देता येतील, आज आपल्याकडे भाजी मार्केट आहेत, भाजी मार्केटमध्ये रोडवर गाडया लावण्यासाठी जे पार्किंग आहे, ब—याच ठिकाणी उल्हासनगरमध्ये प्राव्हेट पार्किंग आहे. त्यांच्याकडून काही चार्जेस तरी घ्या. आपल्याकडे महानगरपालिका आहे, इथे आपला स्वतंत्र कक्ष पाहीजे होता, पाणी पुरवठयाचे कनेक्शन पास करण्याचा किंवा मी कालच सी.एफ.सी. ला तुमच्या बरोबर चर्चा केली. कल्याणला ते सी.एफ.सी. ला दिलेला आहे. सात दिवसांनी त्या माणसाने त्याचा अर्ज आणि कागदपत्रे जोडली, की त्याला सात दिवसात परमिशन पैसे भरून मिळतात. आज हजारो इनलिगल कनेक्शन आहेत. उद्या त्याना पण, नागरीकांना टेंशन आहे की जर तोडायला आले तर आम्ही कागदपत्रे काय दाखवू? आम्ही थेट दिलेले आहेत. टॅक्स पावती पाहून, त्या रेग्युलायजेशन करून जो काही इनकम सोर्स आहे, आज एल.बी.टी. चा विभाग बंद आहे, एल.बी.टी. बंद आहे, त्याच्यावर कोणाचे लक्ष नाही. आज ए.व्ही.टी.व्ही. नसल्यामुळे आज आपला रेग्युलायजेशनचा विषय तसाच राहीलेला आहे. त्या २२ हजार फाईली आपल्याकडे तशाच पडलेल्या आहेत. त्यात इनकम सोर्स, जर प्रशासनाने आणि प्रशासन प्रमुख यांनी विचार केला, इनकम सोर्स करायचा तर आपल्याकडे बरेचसे त्याचे सोर्स आहेत. मी तुम्हांला त्या अनुषंगाने सांगतो की, मागच्या वेळेचे टेंडर झाले होते, ते टेंडर झाल्या नंतर फक्त वर्क ऑर्डर देण्याचे बाकी होते. म्हणून काही त्या वेळच्या नगरसेवकांनी, नंतर आलेल्या नगरसेवकांनी काही ठेकेदारांना धरून कामे केलीत आणि मला आता परवाच समजले की, ते मागचे सर्व टेंडर आपण रद्द केलेत. निदान ते महासभेपुढे आणले पाहीजे होते, पावरचा उपयोग व्हावा, पण पावरचा उपयोग या संबंधीत महानगरपालिकेची बॉडी आहे, हा छोटा निर्णय नाही, आपण सर्वच टेंडर रद्द केले, हा छोटा निर्णय नाही. आम्हांला विश्वासात घेतले असते तर आम्ही त्याच्या बददल परिस्थिती सांगितली असती तर आम्ही पण त्याला विरोध केला नसता, पण हया जर अशा पध्दतीने काम होत असेल, तर मग मी महापौरांना विनंती करतो की, या पध्दतीने महासभेमध्ये चार—चार, सहा—सहा महीन्यानी आमचे विषय येतात. आम्ही शहरामध्ये नगरसेवक म्हणून निवडून आल्या नंतर लोकांच्या अपेक्षा आमच्याकडून माफक असतात. आम्हांला पाणी मिळावे, स्वच्छता मिळावी, चांगले रस्ते मिळावे, ते देखिल देण्यास आम्ही असमर्थ ठरलो आहे. आता वडोल गावची चर्चा, ऊआपोह भरपुर झाला, ब—याच गोष्टी झाल्या तर मी इथे पाहीले आहे की, लक्ष त्याच गोष्टीकडे दिले जाते की, ज्या पॉझिटीव्ह नाही, निगेटीव्ह ज्या गोष्टी आहेत, त्याकडे प्रशासनाचे लक्ष आहे. एखादा तक्रार करतो, आहो ते तक्रारदार पहा ना, रोजचेच तक्रारदार आहेत. पण ही फॅक्ट आहे. आपण आपल्या नागरीकांकडून, ज्यांच्या जीवावर टॅक्स घेतो. आज मला सांगा साहेब, इंजिनियर लाख, लाख रूपये घेतात, पहील्या वर्गातला, दुस—या वर्गातला, तिस—या वर्गातला त्या प्रमाणे एक एक पगार घेतात. हया महानगरपालिकेमध्ये आपण पगार घेतो तर त्याला काही तरी आपली बांधीलकी तर असावी. काय? काय चालले काय? जो तो फक्त या पध्दतीनेच करीत असेल तर काय आम्ही शहराला काय देणार आहोत? मा. महापौरजी, उप महापौरजी, आपला सव्वा वर्षाचा कालावधी झालेला आहे. आपण शहराला काय दिले? सव्वा वर्ष पुर्ण झाले आहेत, साहेब, बाकी आहेत, म्हणून आम्ही असेच जगायचे का? आज मी सर्व नगरसेवकांना विंनती करतो की, काही तरी ठोस काही तरी पॉझिटीव्ह विचार करा. आज प्रत्येक माणूस म्हणजो हा नको मला हा मला त्रास देतो, हेच चालू आहे. सफाई कामगार आहेत, त्यांचे प्रश्न आहेत, काही लोक आता सुशिक्षित येत आहेत, १२ वी, १५ वी झालेले वडीलांच्या जागेवर मग आल्यावर ते हातात झाडू धरत नाही. असे किती लोक आहेत, काल मी त्याच्यावर तुमच्याकडे चर्चा केली आणि हा विषय काढला ते सफाई कामगार कमी पडतात. ज्याला त्याला टेबल आणि खुर्चीच पाहीजे आणि फिरायला गाडी पाहीजे. याचा सर्व आढावा घेऊन मी सगळया सदस्यांना विनंती करतो या लक्षवेधी मार्फत की, हे आमचे मागचे निधी आहेत, ते कृपया हे आमचे खरोखरच अधिकार आहेत आणि अधिकाराचे हनन होते आणि हे फक्त मला असे वाटते की, मला आता बोलायला अजिबात वाईट वाटत नाही की आयुक्तांना आपले जसे अधिकार कळतात, अधिका—यांना जसे आपले अधिकार कळतात आणि आमच्या नगरसेवकांना आपले अधिकार का कळत नाही? मला हा प्रश्न पडला आहे. मला तर असे वाटते की, खरोखरच आमच्या अधिकाराचा हे हनन आहे. मी वारंवार बोलतो की, आमच्या विभागामध्ये कामे होत नाहीत. आपण आल्या नंतर सुरूवात झाली आमच्या आशा....

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** सुर्वे साहेब, पॉईंट ऑफ ऑर्डरवर मला पण बोलायचे आहे. आपण सांगत आहेत की, नगरसेवक आपले अधिकार का मागत नाहीत. अधिकार मागून मागून थकले, ओरडून, ओरडून थकले, आंदोलन करून थकले अजून काय करणार? भिंतीवर आपले डोके आपटून घेणार का?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** सतरामजी त्याच्या नंतर पण दुसरा मार्ग आहे,

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** आमचे वरिष्ठ करण्यासाठी तयार नाहीत, कृपया नगरसेवकांना दोष देवू नका?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मी दोष देत नाही.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** नगरसेवक त्यांचे हक्क मागत आहेत, तुम्ही न्यायालयात पण गेले होते, तुम्ही न्यायालयातून आदेश आणले होते, ऐकणारे ऐकत नाहीत, एक वेळा आपण लक्ष दया, मी तीन माकडे आणून दिली होती, आता परत शासनाला रबराचे कान दयायला लागतील, त्यामुळे त्यांना ऐकायला येईल.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** सतरामजी मी हेच सांगत आहेत.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** मी तुमच्या बरोबर आहे, मी प्रत्येक आंदोलनामध्ये बरोबर आहे आणि प्रत्येक नगरसेवकाच्या बरोबर आहे. आम्ही लोकांसाठी काम करीत आहेत.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मी यासाठी सर्व नगरसेवकांना विंनती करतो की, आपण महासभा वैगेरे का चालवतो, सर्व बंद करून टाका. आता विधानसभा येते, विधान परिषद येत आहे, तर लोक समजतील की, उल्हासनगरमध्ये पण त्रास आहे. आपल्याकडून छोटे छोटे कामे होत नाहीत, आयुक्त साहेबांनी, मी उदाहरण देतो की, श्री. गणेश शिंपी आता एक आठवडा झाला आहे, आमच्याकडे आले आहेत, तेव्हा पासून रोड क्लीयर झाले आहेत. अधिकारी करू शकतात, त्यांची मानसिकता असली पाहीजे आणि आपण त्यांना सपोर्ट दिला पाहीजे. मी आपल्याला उत्पन्नाचे सोर्स सांगतो की, टॅक्स विभाग, सरकार आपल्याला कधी पर्यंत भिक देणार. याची गॅरंटी नाही, आज १२ ते १४ कोटी काही येत आहेत, जर आज आपले जकात बंद झाले नसते तर आज आपले दोनशे, अडीसचे कोटी तेथून आले असते. तर माझे या लक्षवेधीच्या माध्यमातून सभागृहाला निवेदन आहे की, जर हे काम आपल्याला करायचे आहे तर आपण पण प्रशासनाला सहाय्य करायचे आहे. प्रशासनाचे प्रस्ताव आपल्या काही नगरसेवकांनी थांबवले आहेत. हा प्रस्ताव परत पारीत करण्यात यावा, त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढेल, आज दुकाने अधिनियम आपल्याला मिळायला पाहीजे, महापालिका आहे, त्याच्या बाबत कोणीच बोलत नाही. खाद्य पदार्थ विक्री वैगेरे याच्यावर कोणी बोलत नाही? हे आपल्याला मिळाले पाहीजे महापालिकेच्या अधिकारात असते. ते राज्य सरकारने आपल्या अधिकारामध्ये ठेवले आहे. त्याचे उत्पन्न आपल्याला मिळाले पाहीजे. त्या करीता प्रयत्न व्हावे आणि टॅक्स बाबत मी तुम्हांला फार गंभीर मुद्दा दिलेला आहे. तुमच्याकडे तक्रारीच्या संपुर्ण प्रत आहेत, गेल्या दहा वर्षातल्या रोजच्या आलेल्या तक्रारी आहेत. त्या तक्रारीच्या जागेवर ज्याच्यावर कारवाई झालेली आहे किंवा नाही झालेली आहे. स्ट्रक्चर उभे राहीले आहे, त्या तारखेपासून त्याला टॅक्स लावा. मग तो कोणीही असेल, मी स्वत: का असेना? त्याच्यामध्ये ते लाव व महापालिकेचे उत्पन्न वाढवा. मी या लक्षवेधीद्वारे एवढेच विनंती करतो, धन्यवाद, जय हिंद जय महाराष्ट्र.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, आपले मा. सदस्य, श्री. सुनिल सुर्वे साहेब, जे पण सांगितले आहे, ते खुप चांगले सांगितले आहे. त्यानी उत्पन्न वाढविण्यासाठी सांगितले, महापालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी आम्ही कोणी पण सदस्य प्रशानाच्या आड येत नाहीत आणि सर्व नगरसेवक सहाय्य करतात. सुनिल सुर्वे साहेबांनी सांगितले की, सव्वा वर्षामध्ये आपण काय दिले? त्याच्यावर खुलासा करू इच्छितो की, हे काम तीन वर्षा पासून आडकून पडले आहे, फक्त सव्वा वर्षा पासून नाही. मी त्यावेळी बॉडीमध्ये नव्हतो, परंतु जे जुने नगरसेवक होते, हे काम हिरे साहेब होते, तेव्हा पासून राहीले आहेत, जे कामे हिरे साहेबांनी पास केले होते, ते निंबाळकर साहेबांनी थांबवून ठेवले आहेत आणि निंबाळकर साहेबांनी कोणाचेही प्रभाग समिती निधी दिले नाहीत. परंतु मी आयुक्त साहेबाना धन्यवाद देतो की, त्यांनी आल्या नंतर कमीत कमी १६ लाख रूपये नगरसेवकांचे रीलीज केले आहेत, त्यामुळे त्यांना मी धन्यवाद देतो. सुर्वे साहेबांनी सांगितले की, जी पण जुने कामे रद्द केले आहेत. स्थायी समितीमध्ये जे पास झाले होते, त्यासाठी सर्व लोकांना विश्वासात घ्यायला पाहीजे होते आणि महासभेपुढे यायला पाहीजे होते. यांनी सांगितले होते ठिक आहे. परंतु त्याच्यामध्ये टेक्नीकल प्रॉब्लेम पण होते, त्यामध्ये जी.एस.टी. लावले नव्हते. त्याच कारणाने आपण करोडो रूपये जे ४० करोड रूपये होते, ६० करोड रूपये होतें, ८० करोड होते, जे पण असतील ते आपण कॅन्सल केले, ते कॅन्सल झाले. परंतु आमची आपल्याला विनंती आहे की, नगरसेवक निधी, प्रभाग समिती निधी आणि जसे की, कलवर्ट पडलेला आहे, असे जी महत्वाची कामे आहेत आणि कलवर्टमुळे पुर येतो, नाल्यांमुळे पुर येतो आणि जे अतिआवश्यक काम आहे. या वर्षी आम्ही आशा बाळगतो की, सर्व सदस्यांचे जे पण शहरहिताची

कामे आहेत, ते कामे आपण कराल. दलित वस्तीची जी कामे असतील व दुर्बल घटकांची कामे असतील, आपण कृपया करून जे सरकारकडून रिझर्व्ह फंड येत असतात ते न थांबवता आणि महानरगपालिकेकडून पण जे नगरसेवक निधी आहेत, प्रभाग समिती निधी आहेत, ते पण कामे करा. परंतु आयुक्त साहेब एक विनंती आहे, आपण डेली एक गोष्ट सांगत असतात की, नगरसेवक निधीसाठी हे कागद पण जोडा, आज हे पण सही करतील, आज पासून प्रभाग अधिकारी पण सही करतील, हे आपण वाढवत चाललेले आहेत, त्यामुळे खुप डिफीकल्ट होत चाललेले आहे. तरी कृपया करून जे पण नगरसेवक निधी आहेत, जसे पहीले होत होते, आता इंजिनियर प्रस्ताव बनवतात, आपण सांगितले आहे की, असे प्रस्ताव बनवा. तर इंजिनियर सांगतात की, कागद बनवण्यासाठी दोन तीन महीने लागतील आणि आपण सांगतात की, प्रभाग अधिकारी सही करतील, हे परफॉर्म नविन बनवा. तर त्याच्यासाठी वेळ खुप जास्त लागतो आणि जे कर्मचारी वर्ग आहे, महानगरपालिकेमध्ये तो आपल्याला माहीत आहे, ४० टक्के, ५० टक्के, ६० टक्के स्टाफ सेवानिवृत्त झाले आहेत, त्यामुळे स्टाफ खुपच कमी आहे आणि त्यांच्याकडून काम करून घ्यायचे आहे. तर त्यासाठी अजून डिफीकल्टी न करता सरळ काम करून आपण शहरहितासाठी काम कराल आणि शहरहितासाठी रिझल्ट दया, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती कविता पंजाबी व सदस्या श्रीमती ज्योती चैनानी बाहेर गेल्या.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** साहेब, तुम्ही उत्तर तर देणारच आहेत, तुम्ही प्रशासनाची बाजू मांडणार आहेत आणि परत परत तेच होणार आहे, हे सर्वांना अपेक्षित आहे. सुर्वे साहेबांनी लक्षवेधी मांडलेली आहे, लक्षवेधी हे तातडीचे विषय असतात आणि प्रशासनाचे लक्षवेधण्यासाठी लक्षवेधी असते. दिनांक १६/४ म्हणजे आज ४/७/२०१८ जवळपास अडीच महीने झालेले आहेत. तुम्ही उठायच्या अगोदर प्रशासनाने याच्यावर म्हणजे सुरूवातीलाच सांगितलेले आहे की, कंनस्ट्रकटीव्ह असले पाहीजे. कंनस्ट्रकटीव्ह होणे आणि डिस्ट्रकटीव्ह हे दोन प्रकार आहेत. काही लोकांना फक्त डिस्ट्रकटीव्ह सुचते विध्वंसक आणि ज्यांना डिस्ट्रकटीव्ह सुचते त्यांना कंनस्ट्रकटीव्ह विधायक सुचतच नाही आणि काही लोकांना फक्त विधायक सुचते त्यांच्या डोक्यात विध्वसंक कधी येतच नाही. तर या दृष्टीने गेल्या अडीच वर्षामध्ये या प्रशासनाने यांच्या लक्षवेधीवर कधी ना कधी येणारच आहे. तर प्रशासनाची भुमिका काय आहे? अगोदरच त्यांनी सांगितले आहे, नाही तर महासभा घेऊन उपयोग काय? प्रशासनाची भुमिका कंनस्ट्रकटीव्ह असेल तर त्यांना लोक व लोकप्रतिनिधी पहातीलआणि या सभागृहामध्ये चाललेले विषय, याचे रिझल्ट बाहेर गेले तर लोक सुध्दा इकडे चांगल्या पध्दतीने बघतील. मग सभागृहाचे पावित्र्य, लोक प्रतिनिधीचे सन्मान, प्रशासनाचे सन्मान हे लोक करतील आणि तो सन्मान झाला तर लोकांना शिस्त लागेल नाही तर आम्ही शिस्तीचे फक्त बडगा वापरायचा तो वापरून देणार नाही. पाणी कुठून मुरते आणि कुठून सुटते हे बघितले पाहीजे. जर उल्हासनगरमध्ये अडीच वर्षामध्ये आम्ही लोकांना काहीच देवू शकलो नाही. लोकांची लोकप्रतिनिधी विषयी आणि प्रशासना विषयी मानसिकता काय असणार आहे आणि ते कशा प्रकारच्या प्रतिक्रिया करतील. गेल्या अडीच वर्षामध्ये प्रशासनाने सांगितले की पैसे नाहीत. मग ते आणण्यासाठी जसे श्री. किशोर वनवारी यांनी सांगितले की, कुठल्याही लोकप्रतिनिधींनी, कुठल्याही सदस्यांनी विरोध केला नाही किंवा नकार दिला नाही. उलट प्रशासनाने जी भुमिका मांडलेली आहे, त्याला मंजुरी दिलेली आहे. एक कंनस्ट्रकटीव्ह, विधायक त्याच्यामुळे आता काय झाले? डिस्ट्रकटीव्ह लोक जास्त झालेले आहेत. कारण प्रशासनाच्या या भुमिकेमुळे कामे होत नाहीत. मग "रिकामे खोबडे सैतानाची बस्ती" रिकामी डोकी जर काम असते तर लोकांना विध्वसंक विचारच आला नसता. मी विध्वसंक आणि विधायक का म्हणतो गेल्या अडीच महीन्यामध्ये या प्रशासनाने, या दृष्टीने, या लक्षवेधीवर विचार केला आहे का? लोकांची कामे झाली पाहीजेत. आमच्याकडे पैसे नाहीत म्हणून लोकांची कामेच करायची नाही. मग खड्डे कितीही पडले तरी चालतील, लाईट मिळाली नाही तरी चालेल. शौचालयाची दुरूस्ती झाली नाही, तर लोकांना घाणीमध्ये जाऊ दया. एका बाजूला आम्ही स्वच्छ भारत अभियान राबवायचे, स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबवायचे, स्वच्छ उल्हासनगर अभियानचा नारा दयायचा आणि लोकांना शौचालयात जायला सुध्दा जागा नाही, ते दुर्गंधीयुक्त आहे, ही आमची भुमिका आहे का? मग अशा मानसिकतेमध्ये लोक विधायक विचार करतील का? ते टॅक्स भरतील का? मी नंतर बोलेल परंतु या विषयी मला एकच सांगायचे होते की, गेल्या अडीच वर्षा पासून लक्षवेधी पेंडीग आहे. महासभेच्या पटलावर तीन वेळा आलेली आहे, तीन वेळा ही स्थगित झालेली आहे. त्यामुळे प्रशासन किंवा आयुक्त म्हणून आपण कुठल्या तरी मानसिकतेमध्ये यायला पाहीजे की, या लक्षवेदीला उत्तर काय दयायचे आहे? म्हणून तुम्ही उत्तर दयायच्या अगोदर मी उठलो की, विधायक दृष्टीकोणातून तुम्ही म्हणजे ऐंगल तसा आम्ही विचार करणार नाही आणि नाकर्तेचा

वार शनिवार काहीच करायचे नाही, त्याला प्रश्नच नाही. जर करायचे असेल तर काय केले? त्याला मार्ग काय? निधी नाही म्हणून चालणार नाही, बजेट आहे, तुम्हीच आणलेला बजेट आहे, त्यामध्ये पुढे दहा टक्के इकडे तिकडे असेल. पण शंभर टक्के प्रशासनाने नाकारलेला निधी आहे, ही कुठली पध्दत आहे. कुठे कैची मारायची? कुठे लोकांची कामे झाली पाहीजेत? या दृष्टीने आपण विचार काय केलेला आहे? ती भुमिका त्याच्या नंतर रिपोर्ट.

या वेळी सदस्या, सदस्या, श्रीमती कविता पंजाबी व सदस्या, श्रीमती ज्योती चैनानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** सन्माननिय महापौर आणि सन्माननिय सर्व सदस्य, या लक्षवेधीच्या अनुषंगाने मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, आपले बजेट जे आहे, ते एका वर्षासाठी बजेट असते. वर्ष संपल्या नंतर बजेट क्लोज होणार. त्यातील जी काही कामे चालू झालेली असतील, सुरू झालेली कामे ती आपल्या पुढच्या वर्षाची लायबिटी म्हणून पुढच्या वर्षी बजेटमध्ये येऊ शकतील. परंतु मागच्या बजेटमध्ये काही कामे आपण हेरमार केली होती, त्याच्यावर कुठलीही प्रक्रिया झालेली नाही? वर्क ऑर्डर पण दिल्या नाहीत. ती कामे आपल्याला १०२ अंतर्गत जशीच्या तशी पुढे आणता येणार नाहीत. याचे कारण असे आहे की, आपले बजेट एका वर्षा पुरते आपण करतो, हा काही शासनाचा निधी आलेला नाही, शासनाचा जो काही निधी आपल्याकडे येतो, तो निधी आपल्याला दोन वर्ष वापर करण्यासाठी शासन आपल्याला मुभा देते आणि तो निधी आपल्याकडे आलेला आहे आणि तो निधी आपल्याला या वर्षी न वापरता पुढच्या वर्षीच वापरता येईल. परंतु आपल्या बजेटमध्ये एकदा वर्ष संपल्या नंतर आपण त्या वर्षी झालेला खर्च शिल्लक राहीलेल्या बॅलेन्ससह पुढच्या वर्षी ओपनिंग बॅलेन्ससह आपण बजेट तयार केलेला आहे. त्यामुळे आपल्याला बजेटमध्ये जुन्या प्रोव्हिजन केलेल्या होत्या, त्यामुळे आपण त्या जशाच्या तशा जर आपण कॅरी फॉवर्ड केल्या तर या वर्षीचे जे साडे नऊ कोटीचे किंवा ९३० कोटीचे जे बजेट आहे, त्या आणखी पुढे ९५०, ९७०, १०००, दिड हजार असे मोठे होईल. वस्तुस्थिती अशी आहे की, आपल्याकडे वार्षीक फंड जो जमा होतो, तो साधारणत: तीनशे कोटी किंवा साडे तीनशे कोटी फंड जमा होतो. बजेट जर ९०० कोटींचा असेल तर प्रत्येक वर्षी आपल्याला ६०० कोटींचा, कधी मागच्या वर्षीचा साडे सहाशे कोटी होते, तर त्या वर्षी ३०० कोटींचे जे बजेट आहे, ते तसेच राहीलेले आहे. त्यामुळे आपल्याला या लक्षवेधीमध्ये जे सुचित केलेले आहे. तो बजेट जशाच तसा पुढे घ्या, तसेच आपल्याला निधी सुध्दा पुढे घेता येणार नाही. कारण आपण या वर्षी पण निधी दिलेला आहे. या वर्षीच्या बजेटमध्ये आपण सदस्यांसाठी निधी ठेवलेला आहे. या वर्षीचा निधी, परत पुढच्या वर्षीचा निधी हा पैसा येणार कुठून? कारण आपण किती तरी बजेट ६०० कोटीचे केले, ८०० कोटींचे केले, ९०० कोटींचे केले तरी बजेट आपला साधारणत: साडे तीनशे कोटी पेक्षा जास्त होत नाही. हा गेल्या दोन—तीन वर्षाचा तसा आपला अनुभव आहे, तो विचारात घेतल्या नंतर आपल्याला अजून अशा पध्दतीचे लायबिलिटी वाढवून फक्त कागदावरचीच लायबिलिटी वाढेल. प्रत्यक्षात आपल्याला पुर्तता करता येणार नाही. आजच्या घडीला आपली ७० कोटी रूपयांची लायबिलिटी आहे, त्याच्यामुळे अशा पध्दतीने आपल्याला कॅरी फॉरवर्ड करता येणार नाही, ते नियमाच्या सुसंगत होणार नाही, असे मी या ठिकाणी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. दुसरा जो मुद्दा होता, एक सकारात्मक कामाच्या संदर्भामध्ये.....

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** तुम्ही सांगितले की, पुढच्या वर्षी आपण वापरू शकत नाही. तर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये १०२ हा तुम्ही सांगितले की, शासनाचा इथे महानगरपालिका किंवा नगरपालिका यांच्याशी निगडीत असलेला आहे. संपुर्ण अर्थसंकल्प आणि अनुदान किंवा त्याचा कोणताही भाग ज्या वर्षासाठी अनुदान अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करण्यात आले असेल त्या वर्षाच्या अखेरीस खर्च न होता, तसेच राहीले असेल व ते पुढील दोन वर्षाच्या किंवा कोणत्याही अर्थसंकल्पात नमुद केलेले असेल.....

या वेळी मा. महापौर सभागृहा बाहेर गेल्या व त्यांच्या जागी उप महापौर, श्री. जीवन इदनानी आसनस्थ झाले.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** बरोबर आहे, जर तसेच राहीले असेल, ते अनुदान तसेच राहीलेले नाही आपला जो कॉमन कॉरपसमध्ये तो फंड जमा झाला तो ओपनिंग बॅलेन्स धरला असेल. तो ओपनिंग बॅलेन्स धरला आणि नंतर आपले या वर्षात किती ओपनिंग बॅलेन्स जमा होईल? त्याचा क्रिएटीव्ह अंदाज आणि तो अंदाज धरल्या नंतर टोटल

उत्पन्न एवढे आणि खर्च एवढे त्याचे बजेट आपण या वर्षी तयार केले आहे. त्यामुळे तो पैसा जो एडमार्क केलेला आहे, समजा आपण एखादया प्रोजेक्टला १० कोटी रूपये केले आणि १० कोटी रूपये आपण पुढच्या वर्षीच्या ओपनिंग बॅलेन्समध्ये सुध्दा ठेवलेले असतील तर आपल्याला ते करता येईल. नाही तर ते करता येणार नाही. सकारात्मक बाबतीत आपण सांगितले होते की, सकारात्मक याचा विचार करायला पाहीजे. प्रशासनाच्या वतीने आपला विचार सकारात्मकच आहे. मी आपल्या सगळयांना आश्वस्त करू इच्छितो की, आम्ही सकारात्मक पध्दतीनेच काम करीत आहोत आणि सकारात्मक पध्दतीने काम करीत असल्यामुळेच आपण आता चांगल्या पध्दतीने कामाला सुरूवात केलेली आहे. त्याच्यामुळे मला असे वाटत नाही की, कोणी या ठिकाणी नकारात्मक भुमिकेतून काम करते, तुम्ही सकारात्मक असाल, आम्ही पण सकारात्मक आहोत, एवढेच फक्त मला सांगायचे होते. टॅक्सच्या संदर्भामध्ये जशी आपण मागच्या वर्षी मोहीम घेतली होती, तशी आपण परत मोहीम घेऊ.....

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** साहेब अनाधिकृत बांधकाम जी झाली दंडात्मक वैगेरे कारवाई आहे, आज परत स्केअर फुटाचा एरिया आहे, तुम्ही लक्षात घ्या.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये तुम्ही जो मुद्दा मांडला आहे, त्याच्यावर टॅक्स लावा. आपण मागच्या वर्षी आताच मला आठवले की, एका एलएक्युचे मी आता उत्तर पाठवले त्याच्यामध्ये आम्ही जवळ जवळ मागच्या वर्षी अशा किती प्रॉपर्टी शोधून काढल्या होत्या? ४३०० प्रॉपर्टी शोधून काढल्या

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** साहेब, त्या ज्या प्रॉपर्टी आल्या आहेत, तर त्या लोकांनी अर्ज केले आहेत. अहो साहेब, इथे एवढा मोठा घोटाळा आहे ना एक माणूस घरात राहणार नाही, सगळेच जेलमध्ये जातील एवढा मोठा टॅक्स घोटाळा आहे. आम्ही जेव्हा पोटतिडकीने सांगतो ना आम्हांला दहा वेळा सांगावे लागते की, या प्रॉपर्टीचे ॲसेसमेंट का केले नाही म्हणून...

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** याच्या व्यतिरिक्त....

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** साहेब, इमारत बनते आपण परमिशन देतो, त्याचे कंपलिशन येत नाही, तुम्हांला सांगायच्या ज्या गोष्टी आहेत, आपले पाणी पुरवठा विभागाचे त्यांना कनेक्शन पास करून देतात. सी.सी. आल्या शिवाय त्याला टॅक्स लागलेला नाही. अशा कितीक इमारती.....

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** अशा प्रॉपर्टी असलेल्या त्यांचा शोधू घेऊ, एक मोहीम सुरू करू.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** साहेब, पाणी पुरवठा विभागाचे कनेक्शन कसे पास करतात? कपलिशन नसताना.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, टॅक्ससाठी जो रेग्युलायजेशन सिस्टम आले आहे, त्यामध्ये भरपूर लोकांचे एरिया वाढला आहे. त्यासाठी मी तीन वर्षा पासून पाठपुरावा करीत आहे. त्याच्यावर आज पर्यंत कोणतीच कारवाई झाली नाही. त्यामध्ये कमीत कमी ६ हजार प्रॉपर्टी अशा आहेत की, त्या पासून आपल्या करोडो रूपये उत्पन्न येऊ शकते. मी प्रत्येक महासभेमध्ये सांगितले परंतु त्यावर काहीच कारवाई झाली नाही. यासाठी मागच्या वेळेस मिटींग पण झाली होती, मा. महापौरांकडे पण मिटींग झाली होती आणि अधिका—यांना बोलावून आदेश दिले होते, त्याच्या नंतरही काहीच कारवाई झाली नाही. साहेब, कमीत कमी ६ हजार प्रॉपर्टी आहेत. आपल्याला कोणाकडे जाण्याची पण गरज नाही, त्यांनी स्वत: ॲफीडेव्हीट देवून एरिया दिला आहे, आर्किटेकर प्लान दिला आहे की माझी एरिया आज एवढी आहे. साहेब, त्यांनी ॲफीडेव्हीट दिले आहे, आर्किटेकर प्लान पण दिला आहे की, आज रेग्युलायजेशनमध्ये आमचा एरिया एवढा आहे, त्यांनी सन २००६ मध्ये दिले आहे. आत पर्यंत त्यांच्यावर कोणतीच कारवाई केली नाही? आपल्याला ॲसेसमेंट करण्यासाठी कुठे पण जायची गरज नाही. त्यांनी स्वत: ॲफीडव्हीट बरोबर दिले आहे. त्याच्या नंतरही आज पर्यंत कोणीही चौकशी केली नाही. उत्तर दया.

**<u>श्री. संतोष जाधव (शहर उप आयुक्त):—</u>** सन्माननिय महापौर, सन्माननिय आयुक्त, आणि सन्माननिय सदस्य, सन्माननिय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा हा त्यांच्या म्हणण्या प्रामणे सन २००६ पासूनच्या प्रॉपर्टीचे मला कल्पना नाही. मी त्याचे रिव्यु घेतो आणि ज्या प्रॉपर्टी असतील त्याच्यामध्ये.....

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** साहेब, तुमच्या लक्षात आले का त्यांनी काय सांगितले ते? आपल्याकडे रेडीमेड प्लॅट उपलब्ध आहेत, अनाधिकृत बांधकाम नियमाधिन करण्यासाठी आदेश निघाला, त्याच्यामध्ये भरपूर लोकांनी जे फॉर्म भरलेले आहेत, संपुर्ण आपल्याकडे कॉप्युटरराईज आहे आणि त्यानुसार जर टॅक्स लावला तर आपला टॅक्स बरेच वाढणार आहे. अशा ६ हजार प्रॉपर्टीज आहेत, ते आता पर्यंत का केले नाही? लक्षात आले का तुमच्या? त्यांनी ॲफीडेव्हीट करून दिले आहे की, आमचा एरिया एवढा आहे? तुमच्या रेकॉर्डला माझा एरिया समजा ४०० स्केअर फुट एवढा असेल पण तिथे खरोखर ॲफीडेव्हीट केले आहे की, माझा एरिया ४ हजार आहे. असे जरी केले तरी तुमचा घरबसल्या, इथे बसल्या बसल्या तुमचे उत्पन्न वाढू शकते, हा विचारच करीत नाहीत. म्हणून म्हणटले कंन्सट्रकटीव्ह काही तरी क्रियेटीव्ह असले पाहीजे ना? क्रियटीव्ह नाही पण आहे तेही आम्ही विसरतो. एक नगरसेवकांनी वारंवार पत्र दिले आहे, तरीही आपले प्रशासन काम करीत नाही आणि सांगायचे तात्पर्य काय? उत्पन्न वाढीसाठी आम्ही तुम्हांला प्रस्ताव देत आहे, तुम्ही करायचे नाही, उत्पन्न वाढवायचे नाही, आणि मग फक्त खर्च करता येणार नाही. ही जी आमची नकार घंटा आहे ना....

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** फक्त सगळयांचे पगार झाले पाहीजेत व्यवस्थीत, बोनस पाहीजेत, भत्ता नाही मिळाला, गाडी भत्ता मिळाला नाही, हे नाही मिळाले त्या करीता दुनियादारी चालू आहे, मग उत्पन्नाकडे कोण बघणार? हा माझा प्रश्न आहे. आज किरकोळ गोष्टी आम्ही सांगितल्या आहेत, ६ हजार प्रॉपर्टी सन २००६ ला लोकांनी दिलेल्या आहेत. प्लॉन सहीत लोकांनी ॲफीडेव्हीट करून दिले आहेत की माझी प्रॉपर्टी एवढी एवढी आहे. त्या फाईल तुमच्याकडे असतांना तुम्हांला त्यांच्यावर कर आकारणी करता येत नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** ६ हजार नाहीत १ लाख ४१ हजार फॉर्म आपल्याकडे आले आहेत, १ लाख ४१ फॉर्म तुम्ही रेग्युलायजेशन करू शकत नाही त्याला सरकार दळभर्दी आहे, दळभर्दीच म्हणावे लागेल. मी वारंवार सांगतो की, सरकारवरचा लोकांचा विश्वास उडालेला आहे. एखादा अधिकारी निर्णय घेतो, त्याला लेबल देतात सरकारी नियम. मग तो लोकांच्या हिताचा आहे की, कोणाच्या हिताचा आहे, तो डी.पी. वरून आपल्याला सर्वांना माहीत आहे. पण आपल्याकडे असलेला डाटा आपण वापरू शकत नाही आणि एक नगरसेवक साडे तीन वर्षा पासून सांगत आहे, तरी तुमचे लक्ष नाही. १ लाख, ४१ हजार जवळ जवळ ६ हजार प्रॉपर्टी, मेजर प्रॉपर्टी आहेत, त्यांनी रेग्युलायजेशनसाठी फॉर्म सबमिट केले आहेत. ते तुमच्याकडे आहेत, तो स्वतः सांगतो की, माझा एरिया एवढा आहे. त्या नुसार प्रत्येक्ष न जाता जर इथे बसून केले, तरी तुमचे आज उत्पन्न जवळ जवळ दुप्पटीने वाढणार आहे. तरी तुम्हांला ते करायला वेळ पण नाही. प्रत्येक आयुक्तांनी सांगायचे की आमच्याकडे उत्पन्न नाही, पैसे नाहीत.

या वेळी मा. महापौरांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला आणि आसनस्थ झाल्या.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** डिफीकल्ट असणार सगळ.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** साहेब माझी विनंती राहील, हे मला वाटते एक महीन्यात व्हायला पाहीजे तीफाईल तुमच्या जवळच आहे, जाग्यावर बसून कोणाला तरी जबाबदारी दया, त्यांनी नाही केले ना त्याला आणि त्यांच्या सोबत जे असतील त्यांना कारणे दाखवा नोटीस किंवा जे तुमच्या कायदयात बसते ते त्यांच्यावर कारवाई करा. याला म्हणतात कन्सट्रकटीव्ह असे काही तरी केल्या शिवाय इथे काहीच होणार नाही. तुम्ही टेंडर काढायला सांगतात तीन दिवसात आणि अधिकारी सांगतात की टेंडर काढतो. आज सहावा आणि सातवा दिवस आहे, अजून टेंडरचा पत्ता नाही आणि येऊन तुम्हांला बोलत पण नाही की, त्याच्यात ही अडचण आली आहे, डी.एस.आर. रेटची नंतर काल तुम्ही बोलेले, त्यांनी सांगितले की, डी.एस.आर. रेटचा प्रॉब्लेम आहे. तर हे सांगा की, तुमच्या आदेशा नंतर सुध्दा जर काही काम होत नसेल, तर मग त्या अधिका—यांना तुमच्या हाताखाली ठेवता कशाला? जो पर्यंत त्यांच्यावर कारवाई होत नाही, तुम्ही दोन—चार जणांवर कारवाई केली ना तरच तुम्हांला काम दिसणार आहे. माझी या सभागृहाच्या पुढे तुम्हांला विनंती आहे.

या वेळी सदस्या, श्रीमती अंजली साळवे व सदस्या, श्रीमती कविता बागुल या सभागृहाच्या बाहेर गेल्या.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौरजी, प्रत्येक वर्षी ही महानगरपालिका आपले बजेट बनवते या बजेटमध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग आणि अन्य काही कामांसाठी निधी उपलब्ध केला जातो. प्रशासनाचे प्रत्येक वेळी हेच म्हणणे असते की, जेवढे उत्पन्न आपण सांगितले आहे, तेवढे उत्पन्न येत नाही. तर या वर्षी बजेटमध्ये आपण तरतुद केली आहे की, जेवढे उत्पन्न आपल्याकडे येईल तेवढयाच टक्केचा निधी आपण रिलीज करणार. जसे की आयुक्त साहेबांनी सांगितले की, बजेट जो असतो तो एक वर्षासाठी असतो. तर माझे पण म्हणणे हेच आहे की आपण टॅक्स वसुलीसाठी जोर दया, आम्ही तुम्हांला कधीच थांबवले नाही. सुनिल सुर्वे आणि अन्य सदस्यांनी भरपूर आयडीया दिल्या आहेत आणि प्रत्येक वेळी देत आले आहेत. आयुक्त साहेबांना येऊन चार महीने झाले आणि एक महीना प्रशिक्षणासाठी पण गेले आहेत. परंतु बाकीचे अधिकारी तर तेच आहेत, कोणी नविन अधिकारी आहेच नाहीत. टॅक्समध्ये उप आयुक्त वैगेरे सोडून बाकीचे अधिकारी तेच तर आहेत, नविन कोणीच नाहीत. उप आयुक्त, श्री. दादा पाटील सेवानिवृत्त झाले, त्यांच्या जागेवर दुसरे अधिकारी, श्री. संतोष जाधव यांना दिले आहे, ती वेगळी गोष्ट आहे. परंतु ग्राउंड लेवलवर काम करणारा अधिकारी तेच आहेत, तर वसुली का येत नाही? या विषयावर पहीले पण माझी तुमच्या बरोबर चर्चा झालेली आहे की, कशा प्रकारे लेटीगेशन वाढले आहे, कशा प्रकारे खोटे बिल काढले जात आहेत आणि कशा प्रकारे पाठ थोपटून घेण्यासाठी एक आकडा दाखवला जात आहे की, एवढया किंमतीचे बिल दाखवले आहेत, एवढे बिले वाढवले आहेत आणि एवढी बिले दिले आहेत. खरोखरची अशी पोझिशन आहेच नाही, तो एक चुकीचा विषय आहे. दुसरे शहरामध्ये जे अतिआवश्यक काम आहे, मी एक उदाहरण देतो, माझ्या वार्डमध्ये एका एरियामध्ये घाण पाणी येत आहे, काही दिवसापासून, काही महीन्यापासून निंबाळकर साहेब होते, त्यांनी फेब्रुवारी २०१७ मध्ये तिथे पाहणी केली होती. पहाणी केल्या नंतर पाणी पुरवठा विभागाला सांगितले होते की, पाईपचा एक तुकडा बदली करा. कारण की, घाण पाणी त्याच्यामध्ये जात आहे. हा जो पाईप आहे, तो चाळीस वर्षा पुर्वीचा जूना आहे. त्या कलवर्टचा पाईप बदली करण्यासाठी आयुक्त साहेबांचे आदेश झाल्या नंतर एस्टिमेट बनवले, एस्टिमेट अतिरिक्त आयुक्ता पर्यंत पोहचले त्यांची सही झाल्या नंतर एका दिवसातच ते एस्टिमेट हरवून गेले. परत परत पत्र दिल्या नंतर, परत परत सांगितल्या नंतरही आज पर्यंत हेच उत्तर येते की, एस्टिमेट हरवले आहे. जर हे एस्टिमेट हरवले आहे तर दुसरे एस्टिमेट बनवा, याचे काहीच उत्तर नाही. जे अतिआवश्यक काम आहे, जिथे घाण पाणी जात आहे, जिथे पाण्याचे लिकेज आहे, जिथे पाण्याचे नुकसान होत आहे, ते अतिआवश्यक काम आहे. जसे की, शौचालय आहेत, आयुक्त साहेबांनी पहीले संपुर्ण सर्व्हे केले की, एम.एम.आर.डी.ए. च्या वेळी शौचालय बनले आहेत का? ते आपण मेनटेन करू. परंतु ज्या संस्था आहेत, त्यांना आपण एम.एम.आर.डी.ए. चे शौचालय दिले आहेत, ते प्रॉपर मेंनटेन करीत नाहीत. तर माझे म्हणणे असे आहे की, ते शौचाललय दुस—या संस्थेला दया की जसे ते पे ॲन्ड युज मध्ये आहेत, नाही तर आपण पे ॲन्ड युज वाल्यांना दया किंवा मेंटेनन्ससाठी दुस—याला दया, कमीत कमी शौचालयाचे मेंटेनन्स तर झाले पाहीजे. तो टेंडर अजुन पर्यंत फायनल झाला नाही. आता महापौर, उप महापौर, स्थायी समिती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता आणि स्थायी समिती सदस्य, महापौरांकडे मिटींग झाली होती, तेव्हा आपण सांगितले होते ठिक आहे, २५ टक्के निधी जो आहे, तो रिलीज करतो आणि नंतर माहीत पडले की, वार्ड ऑफिसर यांच्याकडून फाईल सही होऊन येईल आणि ती फाईल परत पब्लिक हेल्थ डिपार्टमेंटकडून येईल. तर यामध्ये बराच वेळ निघून जाणार आहे. नगरसेवक निधीचा पहील्या सव्वा वर्षामध्ये फक्त १६ लाखाची वर्क ऑर्डर मिळाली, पहील्या वर्षामध्ये महापौर, उप महापौर, स्थायी समिती सभापती कोणचेही निधी एक रूपया पण मिळाला नाही. आपल्याकडे काही तरी उत्पन्न आले असेल, ४० टक्के, ३५ टक्के, ३० टक्के, १०० टक्के तर शुन्य आले नसेल तर आमचे पण म्हणणे आहे की, जेवढे पण टक्के आपल्याला उत्पन्न येते, तेवढे टक्के आमचा निधी रिलीज झाले पाहीजे. मधल्या कालावधीमध्ये अभय योजना राबवली त्यामधून सुध्दा भरपूर पैसे आले आणि जेव्हा श्री. खतगांवकर साहेबांनी चार्ज घेतला होता, त्यावेळी आम्हांला प्रत्येक नगरसेवकां जवळ बुकलेट पाठवले होते की, ३०० करोड रूपयांची थकबाकी आहे. आता आता आपण सांगितले की, ७० करोड रूपयांची थकबाकी आहे. थकबाकी आणि कामे होत राहतील आणि उत्पन्न आले तर एक सर्कल आहे, एक चेन आहे, ते चालतच राहील. जर आपण ७० लाख रूपये बघून कामे थांबवली तर जनता त्रस्त होईल. आता पाऊस चालू झाले आहे, डॉल फिन क्लब येथे खड्डे पडायला सुरूवात झाली आहे. काल पासून व्हॉटस ॲपवर ही गोष्ट येत आहे. मागच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये मी हे सांगितले होते की, तिथे खड्डे का पडत आहेत, रोडच्या बाजुला जो ड्रेन आहे, तो चोकअप आहे. त्याचे पाणी रोडवर येत आहे, त्यामुळे खड्डे पडत आहेत. कोणीही त्याच्याकडे लक्ष दिले नाही. आरोग्य विभागाचे अधिकारी तिथे होते, शहर अभियंता पण तिथे हजर होते. तर या रोडची दुर्दशा झाली नसती. परत रोडसाठी डबल खर्च करा, तो रोड पावसाळयामध्येच

खराब होऊन जाईल. माझा सांगण्याचा अर्थ असा आहे की, एक प्रॉपर युटीलाईजेशन पाहीजे की कशा प्रकारे नगरसेवकांना निधी मिळेल आणि तो पण या शहरामध्येच खर्च होणार आहे. काही वार्डामध्ये आमदार निधी उपलब्ध केला आहे. तर पहीले जिल्हाधिकारी यांच्याकडून महानगरपालिकेला पत्र येते की, तुमचे आम्हांला एस्टिमेट पाठवा, एस्टिमेट येथून त्यांच्याकडे जातात, त्या पैशाची मंजुरी मिळते त्याच्या नंतर इथे वर्क ऑर्डरची प्रोसेसर चालू होते. काही लोकांनी आमदारचे निधी आणले आहेत, त्यांच्या फाईल अजून सही झाल्या नाहीत. आमदार, खासदारांचे जो निधी आहे, त्या फाईलवर त्वरीत सही झाली पाहीजे आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवायला पाहीजेत. हा निधी आम्हांला लवकरात लवकर उपलब्ध झाला पाहीजे. तर मी आपल्याकडून आशा करतो की, जे आपण कमिटमेंट केली आहे, मा. महापौर, उप महापौर, स्थायी समिती सभापती निधी, सभागृह नेता निधी, विरोधी पक्ष नेता यांचा २५ टक्के निधी आणि नगरसेवक व प्रभाग समितीचे ५० टक्के निधी तर आता तुम्ही आदेश दयाल तर फाईल बनवणे, टेंडर काढणे आणि वर्क ऑर्डर देण्यासाठी चार ते सहा महीन्याचा कालावधी लागतो. तर आज वर्क ऑर्डर होणार नाहीत, आज जुलै महीना चालू आहे. याची वर्क ऑर्डर देई पर्यंत दिवाळी येईल आणि काम पुर्ण व्हायला मार्च २०१९ येईल. त्यासाठी हे वर्क ऑर्डर देण्यासाठी लवकरात लवकर प्रोसेस चालू करा. सेक्शन १०२ बाबत आपण सांगितले, तर ही इंटरप्रिटेशनची गोष्ट आहे की तुम्ही तुमच्या हिशोबाने इंटरप्रिटेशन करीत आहेत आणि आम्ही आमच्या हिशोबाने इंटरप्रिटेशन करीत आहेत, मी तुम्हांला एक उदाहरण देतो की, प्रशासनाला वाटते की मला या ॲक्ट मध्येच काम करायचे आहे. तर त्यावेळी स्थायी समितीमध्ये एक प्रपोजल येतो, जी.पी.एस., जी.पी.आर.एस. ची तुम्हांला मॉनिटरी करायची आहे. तर या प्रस्तावामध्ये हे लिहीले आहे की, सेक्शन १०२ मध्ये मागच्या वर्षी आम्ही एवढे बजेट ठेवले होते आणि खर्च केला नाही आणि या वर्षी एवढी तरतुद आहे. दोन्ही मिळून फंड पास करून दया, आम्ही फंड पास करून दिला आहे. आपल्याकडे रेकॉर्ड उपलब्ध आहे, तर ज्या प्रकारे प्रशासना पाहीजे तसे सेक्शन १०२ चा उपयोग आम्ही ज्या प्रकारे श्री. बोडारे साहेब, आणि आम्ही सांगत आहेत, ते करा. जर नाही होत, त्या वेळी प्रशासनाला वाटते की, अशा प्रकारे होते, अशा प्रकारे करायचे आहे. पहीले याचा खुलासा करा, तुम्ही मंजूर केला आहे, स्थायी समितीच्या रेकॉर्डवर आहे आणि स्थायी समितीचे सदस्य पण इथे उपस्थित आहेत. जरी तुम्हांला माहीत नसेल पण आपले अधिकारी तेच आहेत ना? आपण याच सेक्शनमध्ये पास केला आहे, याच सेक्शन बददल बोलत आहे. आज सुप्रिम कोर्टाची एक जजमेंट आले आहे, जो दिल्ली गव्हर्नर वर्सेस एलजी, लेप्टनंट गव्हर्नर तर इंटरपिटेशनची गोष्ट आहे. हा कलम १०२ चा कोर्टच निर्णय घेऊ शकते की, १०२ चे इंटरपिटेशन काय आहे?

या वेळी सदस्या, श्रीमती अंजली साळवे व सदस्या, श्रीमती कविता बागुल यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

या वेळी सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** माझी एक विनंती आहे की, १०२ ची तुमची जी धारणा आहे, ती न करता आमच्या प्रतीने करावे. काय आहे? साहेब सांगतो की, अधिका—यांची मानसिकता, निंबाळकर साहेब, जेव्हा आयुक्त होते, त्यांनी एक विषय स्थायी समितीमध्ये विषय आणला होता, भाव वाढीचा प्रस्ताव होता. राजेशजी निंबाळकर साहेबांनी भाववाढीचा प्रस्ताव, दर वाढीचा होता. तो जर तुम्ही केला तर मी सगळयाच्या सगळा, म्हणजे त्याच्यामुळे किती वाढणार होते? काही तरी २५ टक्के वाढणार होते. तर त्यामुळे निधी किती देणार होते? सगळा देणार होते. म्हणजे महापौर निधी, उप महापौर निधी, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, गट नेता, उत्पन्न होते २५ कोटी आणि निधी उपलब्ध करून देणार होते १०० कोटी हे मी उदाहरण देत आहे. आता ते केले नाही, कारण या लोकांना परवडणारे नव्हते. शासनाने जो निर्णय घेतला आहे, पुढचा आमचा प्रस्ताव येणार आहे, ६०० स्केअर फुटाच्या वरच्या आणि १००० स्केअर फुटाच्या वरच्या यांना टॅक्स माफीचा? तो जर घेतला असता तर आम्हांला १०० टक्के मिळाले असते. पण नगरसेवक निधी सुध्दा आहे, तो मंजुर केला म्हणून काहीच नाही, ही जी धारणा आहे, ही चुकीची आहे. मग तुमची बांधिलकी कशासाठी आहे. तुम्ही सांगितले माझेच एक मत माझेच झाले पाहीजे का? अशा प्रकारची भावना आहे का? त्यांची भावना तशी झाली. मी पब्लिक सर्वंट आहे, लोकांनी सांगितले की महासभेने सांगितले आहे म्हणून मला ऐकायचे आहे. आता या ठिकाणी नुसतेच मी पुन्हा एकदा सांगतो की, नुसती चर्चा, महापौर महोदया, फक्त चर्चाच होऊन काहीच फायदा नाही. तुम्ही सांगितले की आम्ही कंन्स्ट्रटीव्ह आहे. मग

ते कृतीतून आले पाहीजे, मी काय बोलतो त्या पेक्षा मी काय करतो? हे महत्वाचे आहे. मी विचार मोठ मोठे दिले, त्यामुळे मी मोठा होणार नाही माझी कृती काय आहे? नाही तर वांझोटे विचार देणारे भरपुर आहेत, हे करा, ते करा आपली चर्चा नेहमी होते. वांझोटे विचाराला काही किमंत नाही. खरोखरच अंमलबजावणी झाली तरच त्या विचाराचा फायदा आहे, नाही तर विचार देतात. त्यामुळे मी काय बोलतो? त्या पेक्षा मी काय करतो, हे महत्वाचे आहे. तुम्हीच सांगितले आहे, आम्ही कंन्स्ट्रटीव्ह, विधायक विचार करून सांगितले की नगरसेवक हे स्वत:साठी काही करीत नाहीत, नगरसेवक लोकांसाठी त्यामुळे आता परवाही चर्चा झाली तुम्ही सांगितले की, जे अर्जंट असेल ते नक्कीच तुमच्या समोर आले पाहीजे. तशा अधिका—यांना सुचना दया, मग ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे असतील, पाणी पुरवठा विभागाचे असतील, आरोग्य विभागाचे असतील, लाईट डिपार्टमेंटचे असतील या पब्लिक सेवा झाल्या. आमच्याकडे ट्रान्सपोर्ट नाही, या चार डिपार्टमेंटच्या लोकांनी तातडीचे जे काम असेल ते लगेच आणले पाहीजे. बाकी राहीलेत ते नगररचनाकार, नगररचनाकार पुर्णपणे ठप्प आहे, अजीबात काही काम होत नाही, मला वाटते एक दोन वर्षामध्ये फक्त एक प्लॅन पास झाले असेल किंवा रिवाईज झाले असेल. गेल्या दिड वर्षामध्ये, एकच फक्त मला वाटते की, रिजेंन्सीचा झाला असेल मला वाटते, त्याच्या पलिकडे काही नाही. मग संपुर्ण डिपार्टमेंट हे एका प्लॅनसाठी आहे का? मग त्याचा वापर आपण दुस—या ठिकाणी केला पाहीजे. इतर प्लॅन येऊन पडलेले आहेत, मग ते प्लॅन का पास होत नाहीत? हे पाहीले पाहीजे. म्हणजे उत्पन्न वाढत नाही, म्हणून खर्च करायचा नाही, हे लोक गटारामध्ये अगदी किडयांसारखे वळवळले तरी चालतील. पण आमच्याकडे पैसे नाही, असे म्हणून चालणार नाही, कसे काय वाढवायचे हे तुम्ही आणि आम्ही विचारणे, तुमच्याकडे जर कनफॉर्म असतील तर ते आमच्या समोर आणा. पण आमच्याकडे खर्चायला पैसे नाहीत, म्हणून लोकांना घाणीमध्ये राहून दयायचे ही धारणा बरोबर नाही आणि आराजकता बोलतो ते याच्यातून निर्माण होते, मग त्या आराजकतेकडे आम्ही जायचे का? की लोकांना चांगल्या वातावरणामध्ये राहून चांगला विचार करालयला लावायचे, चांगल्या वातावरणामध्ये असेल तर चांगले विचार होतील. स्मशानामध्ये राहणारा माणूस प्रेत जाळतो त्यांचे चांगले विचार असतील असे विचारच करू शकत नाही. मग लोकांना चांगला विचार करण्यासाठी चांगले वातावरण हे तुमची आणि आमची जबाबदारी आहे. तर मला वाटते इथून पुढे नकरात्मक विचार बाजुला टाकू या सकारात्मक विचार घेऊन या शहराचे चांगल्यात, चांगले कसे होईल? आणि वाईटाचा प्रचार लगेच होतो आणि त्या वाईटाचा प्रचार लेगेच होतो, त्यामुळे लोकांची मनोवृत्ती वाईटच होत चाललेली आहे. तेव्हा आपण चांगल्याचा प्रचार करू या, चांगले करू या, त्याचा शुभ मुहुर्त आज पासून करूया. आज जे या ठिकाणी श्री. राजेश वदारिया यांनी सांगितले की, या पध्दतीने २५ टक्के ठिक आहे, कामाला सुरूवात करू या. आशा प्रकारचा कंन्स्ट्रक्टीव्ह, कंन्स्ट्रक्टीव्ह विचार घेऊनच आपण चालू या. आमची काही साथ लागेल ते आवश्य सांगा, पण लोकांची कामे करू या, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** उत्पन्न जर जास्त झाले, तर तो आपल्यालाच परत खर्च करायचा आहे. कारण आपण डिसेंबरमध्ये परत याचा रिन्यु करणार आहे. डिसेंबरमध्ये परत जास्त पैसे झाले तर मागची लायबिटी एकडे ओढूनताडून आणण्या पेक्षा जर पैसे तयार झालेतर ते आपण परत नव्या पध्दतीने वापरू कारण आपले बजेट फार मोठा आहे. होऊन होऊ किती जमा होतील ५० कोटी......

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** साहेब, एक दम बरोबर पण त्या अधिका—यांना पळवा ना?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** पळवू, पळवू.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** पळवा त्यांना बघा काय होत नाही ते?

**सदस्य, श्री. डॉ. प्रकाश नाथानी:—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, १९९७ पासून महानगरपालिका बनली आहे. आपण रेग्युलर चाललो आहे. हे मागच्या दोन, तीन वर्षा पासून सन २०१६, सन २०१७, २०१८ तीन वर्षात महापालिकेत रिव्हेन्यु आले आहे. महापालिकेमध्ये रिव्हेन्यु न येण्याचे पण एक कारण होते, तो म्हणजे लोक टॅक्स भरत नव्हते. नगरसेवकांना कामाला लावले होते की, कृपया करून घरा घरात जा आणि सगळयांना मोटीवेट करा. आम्हांला शहराचा विकास पाहीजे होता, आम्ही विकासासाठी लोकांचे दरवाजे वाजवले. ९० करोड रूपये आम्ही कलेक्शन केले, सर्व सदस्यानी मदत केली. त्या ९० करोडमधून कोणत्याही नगरसेवकांना ९०० रूपये पण मिळाले

नाही. ९०० रूपये स्वत:साठी नाही तर विकासासाठी. कमेटमेंट केले होते की, त्या पैशाला हात लावणार नाही. त्या पैशातून ५० टक्के नगरसेवकांना देणार आणि विकासासाठी देणार. कोणाच्या घरासासाठी नाही. आम्हांला एक रूपया पण मिळाला नाही, हे काय आहे? आमच्यावर अन्याय नाही तर काय आहे? आम्ही जिंकून आलो आहोत, आम्ही आता काय करणार? आणि आता राहीले सन २०१७ चा आम्ही खैरातचे पैसे मांगत आहेत का? आम्ही स्वत:साठी मांगत आहेत का? जर आम्ही परत जनतेकडे जाणार तर जनता काय बोलते माहीत आहे का? मी तुम्हांला सांगातो की, जनता काय बोलतात? आपण मागच्या वेळेस आले होते, आता या वेळेस परत टॅक्स मागण्यासाठी येऊ नका? आता जेव्हा दहा वर्षा नंतर अभय योजना येईल, तेव्हा या. आता आम्हांला विकास पण नको आणि पैसे पण मांगू नका, आता सांगा कशा प्रकारे कलेक्शन होईल. दे आर वेटींग फॉर अभय योजना अगेन दि वेट फॉर टेन इअर मोर अभय योजना वेल कम टील बी अप्टर ऑप्टरवर्डस ही पध्दत आहे का साहेब? जेव्हा कोणी आयुक्त आपल्या खुर्चीवर बसून आदेश देतात, जबाबदार आय.एस.आय. अधिकारी देतात की, मला कलेक्शन करून दया, मला साथ दया. आम्ही साथ दिली नाही का? सभागृहातून कोणी सांगावे की, आपण साथ दिली होती की नाही? दिली होती. मी खोटे बोलत नाही, आम्ही तर महापौरांच्या कार्यालयाच्या बाहेर तंबू उभा केला होता, सेक्शन मध्ये कॅम्प लावले होते. हे मेडीकल कॅम्प नव्हते तर कलेक्शनसाठी कॅम्प होते. आपण ऐकले असेल की, कोणत्याही शहरामध्ये असे कॅम्प लावत नाहीत. हे नगरसेवक करीत आहेत, याच्या पेक्षा जास्त काय करणार? ९० लाख, ९० करोड याचे पण आम्ही हक्कदार नाहीत का? ९० दिवसात वाटून टाकले आणि आम्हांला काहीच मिळाले नाही. आता काय होईल, खैरातमध्ये आपल्याला तर धन्यवाद. मी तर बोललो की असा हसरा चेहरा दिड वर्षा नंतर आला, जेव्हा आपण वेल कम केले तेव्हा मी खुप आनंदी झालो. खरोखर मी तुम्हांला सलाम करतो. परंतु सर आता तुम्ही जे सांगितले की, देतो सर देतो आणि देणे याच्यामध्ये फरक असतो. या वेळेस मी आपल्याला सांगतो की, आपण नियमानुसार दयायचे आहे, आपण डिसेंबरची देवू नका, आज आम्हांला दया, डिसेंबरमध्ये बाकी दया, आता आर्धे दया, नंतर अर्धे डिसेंबरमध्ये दया. कारण की, आम्ही सन २०१९ मध्ये प्रत्येक वर्षी ओरडत राहणार. साहेब, आम्हांला जनतेच्या जायला लागते, नाही तर तुम्ही या, प्रत्येक घरोघरी जा टॅक्स पावती प्रत्येकाच्या घरी आली आहे. नो बडी इंटरेस्टेड टू पे देअर इंटरेस्टेड टू पे टू इंटरेस्ट भरणार माझ्या घराचे समजा ५० हजार आहेत, मी इंन्स्ट्रेस भरणार. बघेल गरज पडेल तर अभय योजनेत भरेल, तर होऊन जाईल. सर यासाठी मी विनंती करतो, हात जोडून विनंती करतो कृपया करून या आठवडयात ५० टक्के दया, ५० टक्के डिसेंबरमध्ये दया, धन्यवाद.

**महापालिका सचिव:–** मा. पिठासिन अधिकारी यांच्या आदेशान्वे आपल्याकडे नव्याने श्री. चव्हाण साहेब आले आहेत, त्यांची ओळख करून घेऊ.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** मा. महापौरजी, मा.आयुक्त साहेब यांचे बोलणे पुर्ण होऊ दया.

**सदस्या, श्रीमती शुभांगी बेहनवाल:–** मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, आता आपले स्वच्छ सर्व्हेक्षण आपले झालेले आहे, त्यामुळे निकाल सुध्दा लागलेला आहे आणि ते पारितोषिक आपल्याला कधी मिळणार आहे, असे नाही की, आपल्याला जो निधी एवढे दोन वर्षे निघाला आहे. तर पारितोषिक उशिरा मिळाल्या नंतर आपण लोकांसमोर काय बोलणार? प्रश्न करणार आणि उत्तरही काय देणार त्यांना? कारण तो याच वर्षी मिळाला तर आपण विकास कार्य करू शकतो.

**मुख्य लेखा अधिकारी, श्री. विकास चव्हाण:–** नमस्कार, सन्माननिय महापौर मॅडम, उप महापौर, आदरणीय आयुक्त, सर्व सन्माननिय सदस्य, मी या पुर्वी सन २०१०–२०१३ मध्ये कार्य केले होते, त्या नंतर भिवंडी महानगरपालिका आणि मंत्रालयामध्ये काम करून परत आपण दिलेल्या सहकार्यामुळे परत इथे काम करण्यासाठी आलेलो आहे. तरी सगळयांकडून सहकार्याची आवश्यकता आहे, माझे काम सर्वांना परिचीतच आहे, धन्यवाद.

**महापालिका सचिव:–** विषय क्रमांक २ मागील.......

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–** सर्व नगरसेवकाचे निधी, महापौर, उपहापौर, सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता, स्थायी समिति सभापती यांचे निधी, स्थायी समिति सदस्यांचे निधी, सभापतीयांचे निधी, प्रभाग समिति सभापतीयांचे निधी मिळाला पाहिजे. मी तुम्हाला विनंती करित आहे की तुम्ही सभागृहाला अश्वासन दया की लवकरात कवकर २५ टक्के निधी तुम्ही देणार आणि ज्यांचे निधी ५० लाख आहे त्यांचे पत्र येणारसाठी उशिर लागतात त्यांचे अंदाजपत्रक बनलेले आहे. कोणी ५ लाखासाठी पत्र देत आहे कोणी २ लाखासाठी पत्र देत आहे पण जसे जसे पत्र येणार त्यांचे प्राकलन तयार करण्यात यावे आणि त्यांची निधी कट करून काम सुरू झाली पाहिजे. जसे की महापौर, उपमहापौर

यांचे पत्र आले आणि दुसरे पदाधिका–यांचे पत्र नाही आले तर त्यांच्यामुळे सर्वांची निधी थांबवायचे नाही . मी तुम्हाला विनंती करते की तुम्ही सभागृहाला अश्वासन दया आणि आपल्या अधिका–यांना पण सांगा की ज्यांचे पत्र येत आहे २५ टक्के प्रमाणे या ५० टक्के प्रमाणे जे तुम्ही देणार आहते त्यांचे बजटमधून निधी कट होवून त्यांची नविदा काढण्यात यावी, त्याचे काम सुरू झाली पाहिजे दुस–यांसाठी थांबवायचे नाही. धन्यवाद.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:–** सन्माननीय महापौर आणि आयुक्त साहेब सुर्वे साहेबांनी जे काही मुददा इथे उपस्थित केले आहे मालमत्ता कर संदर्भासाठी मला आपल्याला विनंती करायची आहे की कर संदर्भात अमरडाय कंपनी आणि आय. डी. आय कंपनी आणि सेन्चुरी कंपनी मला वाटते की जे फाईल प्रकरणामध्ये दोन तीन फाईल मिळाल्या जवळ जवळ ११ कोटी अमरडाय आणि आय.डी.आय कंपनीचे आणि ७ कोटी सेंन्चुरी कंपनीचे कर थकबाकी येणार आहे त्या फाईलीचे आधारावर माहिती पडतो, मला वाटतो की त्या संदर्भात तुम्ही काय केले आहे? आपल्याला निधी मिळाला का? त्या फाईलीच्या संदर्भात अमरडाय, आय.डी.आय. या दोन्ही कंपनी आणि सेंच्युरी च्या संदर्भात मला वाटते लोक न्यायालयाकडे आपले काहीतरी प्रकरण होते. पण या दोन कंपन्याचे मला वाटते अठरा ते एकोणीस लाख आपल्याला कर या दोन्ही कंपन्यांकडून मिळु शकतात. त्या संदर्भात आपल्याकडून काही प्रक्रिया झाली आहे का? कारण जेव्हा तुम्ही इथे पैसे घ्याल तेव्हा दोन कंपन्यांचे पैसे मिळतील. म्हणजे अशी परिस्थिती आहे. तर त्या संदर्भात काही उपाययोजना केले का? कारण तो कर गरजेचे आहेत. कारण या वर्षाचा टॅक्स अजून वाढेल. मला वाटते की दोन वर्षाचा कर २०१५–१६ आणि २०१६–१७ चा आहे. आणि २०१७–१८ अजूनही वाढ होईल. या संदर्भात काहीतर निर्णय घ्यावा. आणि लवकरात लवकर वसुली करण्याचा प्रयत्न करावा.

**महापौर, तथा पिठासीन अधिकारी:–** सन्माननीय सदस्य मी मा.आयुक्त साहेबांना आदेश करते की, जेवढे नगरसेवक निधी थांमवला आहे लवकरात लवकर पास करावे. आणि जेवढे आम्ही पाच पदाधिकारी आहे, महापौर, उपमहापौर, स्थायी समिती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता सर्वांचे निधी पास करण्यात यावे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:–** मी महापौरांना विनंती करतो की, आयुक्त साहेबांना निधी पास करण्याच्या संदर्भात ज्या सुचना दिल्या आयुक्त साहेब निर्णय घेतील. आणि आयुक्त साहेबांना माझी एक दुसरी विनंती आहे ६४ लाखाच्या ४ प्रभागात एकत्र निविदा काढू नये. कारण परिस्थिती अशी आहे की, तुम्ही एक एक नगरसेवक जसे असेल तसे छोटे ठेकेदार पुढे आले तर कामे लवकर होतात. कारण छोटे ठेकेदार कामे लवकर करतात. आणि कामाची गुणवत्ता चांगली असते. आणि कामे लवकर करतात. मोठया ठेकेदारांना आपण कामे दिली तर लवकर कामे होत नाहीत. आणि मग नंतर ही आम्हांला ओरडण्याची परिस्थिती वेळ येते आमच्यावर. त्यामुळे तुम्ही छोटया ठेकेदारांना कामे दिली भले ही तुम्ही निविदा पध्दत न काढता ई–निविदा पध्दतीने काढा आणि प्रत्येक छोटया लोकांना जे निधी आहेत वैयक्तिक एक एक ठेकेदारांना निधी दयावा अशी माझी विनंती आहे.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:–** साहेब तुम्ही या विषयावर आपले मत दयावे की, असे होणार यांनी आपले मत मांडले आहे. तुम्ही बोला की असे होणार. कारण असे आहे की, हे जे शब्द आहेत ते फक्त इतिवृत्त मध्ये राहतात.

**महापालिका सचिव:–** विषय क्र.२ वाचून दाखवितात.

**विषय:–** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १४/३/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

**काही सदस्य:–** पास पास

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे–

---

विषय क्र. २ :– मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १४/३/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव : श्री.किशोर वनवारी

**हासभा ठराव क्र.:– ०६** **दिनांक : ४/७/२०१८**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक १४/३/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ७४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** विषय क्र.३ वाचून दाखवितात.

————————————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ३. उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्रीमती मनिषा विनोद लव्हाडे यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

————————————————————————————————————————————

**सदस्य:—** पास पास, विषय क्रमांक ३ ते पाच एकत्र घेण्यात यावे.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्रीमती मनिषा विनोद लव्हाडे यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार श्रीम. केसरबाई राम गायकवाड, सेवा निवृत्त सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांची विवाहित मुलगी श्रीम. मनिषा विनोद लव्हाडे, यांनी प्रस्ताव सादर केला आहे. त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण १ ली पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये खालिलप्रमाणे नमुद आहे.

''लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी''. लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्रीम. मनिषा विनोद लव्हाडे, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने, उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** ०७ **दिनांक:— ४/७/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्रीमती मनिषा विनोद लव्हाडे यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिवः—** विषय क्र.४ वाचून दाखवितात.

---

**➪विषय क्र. ४** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. कृष्णा मधुकर तुजारे यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

---

**सदस्यः—** पास पास

**महापौर तथा पीठासीन अधिकारीः—**:::सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४:—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. कृष्णा मधुकर तुजारे यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार श्रीम. लाली मधुकर तुजारे, सेवा निवृत्त सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांचा मुलगा श्री. कृष्णा मधुकर तुजारे, यांनी प्रस्ताव सादर केला आहे. त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण २ री पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे. अ) इयत्ता ४ थी पास ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे.

लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भसल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्री. कृष्णा मधुकर तुजारे, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्रः ०८** **दिनांकः—४/७/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. कृष्णा मधुकर तुजारे यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

**महापालिका सचिव:—** विषय क्र.५ वाचून दाखवितात.

---

➪**विषय क्र.५** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. दिपु गुलाब बेहनवाल यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

---

**सदस्य:—** पास पास

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५:—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. दिपु गुलाब बेहनवाल यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार कै. लता गुलाब बेहनवाल, दिवंगत सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांचा मुलगा श्री. दिपू गुलाब बेहनवाल, यांनी अर्ज सादर केला आहे. त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण २ री पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे. अ) इयत्ता ४ थी पास ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये खालिलप्रमाणे नमुद आहे.

''लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी''.

लाड कमिटीचा मुळ उद्‌देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे. तरी, श्री. दिपु गुलाब बेहनवाल, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने, उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: ०९** **दिनांक:—४/७/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांच्या पदावर नेमणूकीसाठी श्री. दिपु गुलाब बेहनवाल यांची शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव:—</u>** विषय क्र.८ वाचून दाखवितात.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>** आम्हा लोकांना अट शिथील करण्याची गोष्ट आलेली आहे नियमानुसार गोष्ट आलेली असेल तर महासभेत आणण्याची गरज काय? अट शिथील करायची आहे ना?भगवान भालेराव सांगतात नियमानुसार तर कॉन्ट्रावरसी होईल ना?

————————————————————————————————————————

⇨ **<u>विषय क्र.८</u>** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ क नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावुन ''प्रशमित संरचना'' म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८ (१) अन्वये केलेले नियम प्रसिध्द करणे.

————————————————————————————————————————

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** विषयाला स्थगिती दयाची नाही तर उत्तर कोण देणार? काय आहे हया विषयाला काही अर्थ आहे का? तरी नागरिकांकडून दि. १४.०३.२०१८ ते दि. १३.०४.२०१८ या कालावधीत अर्ज मागविणेचे जाहिर प्रकटन प्रसिध्द करण्यात यावी सदर बाब महासभेच्या निर्देशनास आणून दयावी. हे कधीचे आहे १३/४/२०१८ ही मुदत आहे आणि महासभेत समोर कधी आलेले आहे १६/४/२०१८ ला चर्चा होते ४/७/२०१८ ला महापौरांकडे आलेत ९/३/२०१८ला आणि १६/४/२०१८ रोजीच्या पटलावर आला आणि मागीतले कधी १४/३/२०१८ ते १३/४/२०१८ ला आणि महासभेत पटलावर कधी आला १६/४/२०१८ ला १३/४/२०१८ ला मुदत संपली आहे आणि १६/४/२०१८ चा सुचना आहे आता ठिक आहे तुम्ही सांगता आहे निर्णय घ्या मला असे वाटतय निर्णय झाला असेल आणि नुसती येथे चर्चा करायची.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** हयाच्यामध्ये विषय असा आहे की,३१/१२/२०१५ पर्यंतची जी बांधकामे आहेत नियमाधिन करण्यासाठी लोकांनी अर्ज करायची मुदत होती ती त्या मुददतीमध्ये अर्ज काही आले नाही काही सन्मानिय सदस्य मला भेटलेले आणि सांगितले आहे की श्री. भारत गांगोत्री त्यांनीपण सांगितले आहे की ही मुदत थोडी वाढवून दया ही मुदत आम्ही सहा महिन्यापर्यंत वाढवून दिलेली आहे. त्याचे जाहीर सुचना आपण काढलेली आहे आणि महासभेपुढे हा विषय अशासाठी आणला आहे की या विषयी आपल्याला माहीती पाहीजे आणि आपण लोकांना सांगावे की ज्यांचे अनाधिकृत बांधकाम आहे ३१डिसेंबर २०१८ पर्यंत नियमाधिन करण्याची संधी मिळालेली आहे त्यांनी वेळेमध्ये अर्ज करावे हे अर्ज फक्त सहा महीन्यात स्वीकारणार आहेत ही जी मुदत आहे मला असे वाटते १३ फेब्रुवारी २०१९ किंवा १८ फेब्रुवारी २०१९ अशी ठेवलेली आहे

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** १३ फेब्रुवारी २०१९ ते १८ फेब्रुवारी २०१९ पर्यंत

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** त्याची तारीख मला नक्की माहीती नाही आहे परंतु त्याची मुदत आम्ही सहा महिन्यापर्यंत वाढवून दिली आहे. फक्त तुम्हच्या सर्वांच्या माहीतीसाठी आग्रहाने सांगतो की अनाधिकृत बांधकामे आहेत ती नियमाभूत करा लोकांना हा सुचना दयावा आपण नियमाधिन करावे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** संबधीत जीआर सर्व सदस्यांना मिळाला तर बरा होईल. मुदत वाढीचा.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील :—</u>** ठिक आहे.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>** मा. महापौर जी, आर्कीटेक्ट लोकांची लायसन्स रिन्युव्ह केले तर बरे होईल. लायसन्स रिन्युव्ह करत नाहीत म्हणून कोणी येत नाही ना?

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** माझा पण हाच पॉईट आहे जर लायसन्स रिन्युव्ह करत नाही तर लोक कुठे जाणार मा., आयुक्त साहेब येथे जे तुम्ही सांगितले आहे की मुदतवाढ दिली आहे आणि सहा महिन्याचा वेळ मिळालेली आहे अर्ज देण्याची वेळ आहे सर्व प्रक्रिया पुर्ण समाप्त करायची आहे का?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—** अर्ज भरण्याचा कालावधी आहे

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** याच्यामध्ये अशी सुचना दिली आहे की त्याचा प्रसार झाला पाहीजे महानगरपालिकेतर्फे कारण २०१५ पर्यंत अधिनियम प्रमाणे रेग्यूलाइज करायचे आहे आम्हाला याच्यामध्ये लोकांचा त्रास समाप्त होणार आणि मोठयाप्रमाणात कर महानगरपालिकेला मिळण्याची शक्यता आहे  कारण की हे डायरेक्ट महानगरपालिकेतर्फे होणार. यामध्ये तेच आर्कीटेक्ट येतात ज्यांच्याकडे लायसन्स आहेत त्यांचे लायसन्स नगररचना विभागाकडून रिन्युव्ह होत नाहीत त्याच्यामध्ये मध्येच गैरसमज,झाला होता, राजकारण झाले होते पदवीधर निवडणूकीमध्ये पण आडचण आली होती आणि आम्ही तुमच्याशी मुलाखात पण केली होती पण आतापर्यंत ते प्रकरण जसे की तस आहे या ज्या मोहीम फायदा लोकांना दयायची आहे आणि याच्यात रिव्हेन्यु आम्हाला जनरेट करायची आहे जर फायदा घ्यायाची आहे तर आगोदर आर्कीटेक्ट .लायसन्स रिन्युव्ह करायची आहेत. त्याच्यामध्ये कुठपर्यंत प्रगती झाली नगररचनाकार तर्फे येथे ना नगररचनाकार उपस्थितीत आहे ना त्यांच्यातर्फे जेई उपस्थितीत आहे की आम्हाला सांगणार शहराच्या बाहेरचेपण परवांनगी नाही आहे का? नाही नाही आम्ही करू शकत नाही का?आम्हाला उल्हासनगर शहराचे आर्कीटेक्ट पाहीजेत तुम्हाला लक्ष देण्याची गरज आहे कारण की पहीला स्टेप हाच आहे आर्कीटेक्टचे लायसन्स असेल तर प्लॅन बनणार तर इथे अर्ज करणार परंतु इथे आपल्याकडे आर्कीटेक्ट नाही आणि मिस्त्री नाही जर आपण घर बनवणार तर आपल्याला मिस्त्री पाहीजेत परंतु इथे आपल्याकडे मिस्त्रि नाहीत आपण स्वत: घर बनवणार नाही आपल्याकडे नकाशा नाहीत की कुठे काय आहेत तर आपल्याला आदी आर्कीटेक्टचा लायसन्स रिन्युव्ह केली पाहीजेत जर आपल्याला सकारात्मक भुमिका करायची आहेत लोकांना फायदा दयायाची आहे आणि महानगरपालिकेंना रिन्युव्ह मिळाला पाहीजे तर आपल्याला लवकारत लवकर लायसन्स रिन्युव्ह केला पाहीजे. ज्याप्रमाणे आपण मालमत्ता कर भरण्यासाठी,पिशवी बंदीसाठी प्रचार प्रसार करतात तसेही हयाच्यासाठी पण प्रचार प्रसार केली पाहीजेत. कारण की शहरासाठी हा मुद्दा महत्वपुर्ण आहे आणि लोकनंसाठी पण कारण की आमचे शहर अनाधिकृत बांधकामासाठी प्रसिध्द आहे तर २०१५ पर्यत शासनाने आपल्याला संधी दिली आहे तर लोकांना त्याचा संपुर्ण फायदा मिळाली पाहीजे आणि त्यामुळे महानगरपालिकेचा पण फायदा होणार रिव्हेन्यु वाढणार आणि आम्ही शहराचे काम करू शकणार जसे की आपण सांगतो की आमच्याकडे आर्थिक स्थिती चांगली नाही आपल्याकडे फंड नाही  याच्यामुळे आपण ते काम करू शकणार नाही आणि निधी पण देवू शकणार. धन्यवाद.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आयुक्त साहेब याच्यामध्ये एक विषय आहे जसे की तुम्ही गोषवारामध्ये कोणाला अर्ज दयायचे आहे प्रभाग समितीमध्ये दयायचे की महानगरपालिकेच्या नगररचना विभागात दयायची आहे याचीपण सविस्तर माहीती मिळाली किंवा सुचना पेपरात दिली तर लोक त्याच्याप्रमाणे नागरीक येवून पेपर जाहीरात देवून किंवा तशी पदधतीने रिक्षा फिरवून आणि पॅमप्लेट काढून किंवा नगरसेवकांना त्यावेळेला घेवून केले तर जवळ जवळ मला असे वाटते शहरामध्ये  ७० टक्के ते ७५ टक्के अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भातला तो शहर आहे त्यामुळे लोंकाना मोठया प्रमाणात फायदा मिळू शकतो.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**याच्यामध्ये सक्षम प्राधिकृत अधिकारी कोण आहे**?** कारण आम्ही २००६ मध्ये ऑडीनन्स काढला तुमच्या ऑर्डीनन्समध्ये पुर्ण उल्हासनगर शहर तुमच्या डोळयासमोर होते. झोपडपट्टी ते इमारत हे अनाधिकृत कुठल्या आहेत प्लॅन पास केल्यानंतर ज्यांचे अनाधिकृत बांधकाम झाले त्याबाबतीत आहे की सपुर्ण जेव्हा आम्ही आध्यादेश आदेश पारित केला त्या संपुर्ण उल्हासनगर शहराची धारणा होती झोपडपट्टीं मधील लोकांची सुध्दा, आणि जे सुध्दा रस्त्यात बाधित होत नाही ते सुध्दा येथे रेग्यूलाइजेशन्स होणार एक लाख एकेचाळीस हजार लोंकानी इथे फॉर्म भरला तेव्हा प्रशासनाने कुठल्या झोपट्टयांचे काय धोरण आहे, इमारतीच्या बाबतीत काय धोरण आहे ते अजिबात कळविले नाही ८५५ बिल्डींगचा जेव्हा मुद्दा झाला आणि त्यावेळी डेजिंगनेटेड सक्षम प्राधिकरण एक स्थानिक कलेक्टर ठेवले होते. आणि आम्ही वारंवांर शासनाला लक्षात आणून दिल की इथल्या कमिशनरला इथल्या वेदना माहीत असतात इथल्या समस्यांची जाणीव असते इथे वस्तुस्थिती कायदेची जाणीव असते कलेक्टरला या उल्हासनगरच्या कुठल्या बाहेरच्या आले त्यांना देणघेणे नसत आलेल ढकलायचे पुढे त्यामुळे आध्यादेश पारित होऊन काही फायदा झाला नाही एखादी चुकीची केस झाली तर संपुर्ण उल्हासनगर चुकीचे आहे अशा प्रकारची धारणा कलेक्टरनी केली एक कलेक्टर गेले आणि दुसरे आलेत आणि एकदा मानसिकता झाली की एकशे एक टक्के केस चुकीचे आहेत म्हणजे मी लगेच आवरतो त्यामुळे या केसमध्ये तुम्ही जे सांगितले आहे सक्षम प्राधिकरण हा मी एक करतो आपण नंतर चर्चा करू टाऊन प्लानर पाहीजे त्याला प्रशमन आकार म्हणजे काय?प्रशमिक संरचना म्हणजे काय?काही कुणालाच माहीती नाही वास्तवीक प्रशासनाने महापौर, उपमहापौर,गटनेते किंवा जे जे यातील जाणकार लोक आहेत त्यांची एक बैठक घेवून यावर चर्चा करायला पाहीजे चर्चा करून या उल्हासनगरला जास्तीत जास्त

काय येथील लोकसंख्या येथील ट्रक्चर शासनाने काढलेला आध्यादेश त्याचा जास्तीत जास्त फायदा या शहराची बिघाड न होता चांगलेच चांगले कसे करता येतील विकास कसा करता येईल अशा पदधतीने पावले उचलायची तुम्ही घेतल चांगली गोष्ट आहे. सक्षम प्राधिकारण कोण असणार आहे या ठिकाणी सगळेच ट्रक्चर आहेत की कोणते ट्रक्चर आहेत का ठराविकच आहेत ही चर्चा होणे गरजेचे आहे मी झोपडपट्टीचा प्रतिनिधीत्व करतो म्हणजे बिल्डींगचे प्रतिनिधीत्व करतो तर त्या ठिकाणी प्रत्येक नागरीक आम्हाला विचारणार आहेत झोपडपट्टीचे नागरीक सुध्दा १९७० पासून आहेत बॅरेकमधील त्यापुर्वीपासून आहेत.म्हणजे हे नक्की कोणासाठी आहे.जी पक्की घर त्याबाबतीत काय त्यामध्ये दोन प्रश्न मग आपण पुढचे पाहू झोपडपट्टीचे झोपडपट्टी राहीली नाही त्याचे बांधकामे झाली आहेत जे विट पत्रा किंवा पक्की घरे आहेत अशा घरांच्या बाबतीत काय नियम लावणार स्ट्रक्चर टॅबीलीटी आहे ना याच्यामध्ये जे वीट,सिमेंट आणि पत्र्याचे घर आहे त्याला स्टॅबीलीटी असणार आहे का?ते स्टॅबीलीटी देणार ट्रक्चरल अनसेट बिल्डींग म्हणजे त्याला स्ट्रक्चर स्टॅबीलीटी पाहीजे आता इथे एक नाखवा म्हणून कन्सलंटट आहे त्यांना पाहीजे असेल ते स्टॅबीलीटी देतात बाकी दुसरे म्हणून बरचसे फेल झालेत स्ट्रक्चर स्टॅबीलीटी ध्यायची कोणाकडून? कारण पहीली जी कंन्डीशन आहे ना सी नंबर सदर नियमामध्ये खालील अनाधिकृत बाबी समाविष्ट करण्यात येणार नाही पहील्याच याच्यामध्ये सी.सी मध्ये बफर झोन बफर झोन काय आहे. ते याच्यामध्ये स्पष्ट नमुद केले बफर झोन काय ते आम्हाला समजवून सांगा त्याच्यानंतर स्ट्रक्चरर अनसेट बिल्डींग म्हणजे सगळे स्टॅबीलीटी सर्टीफिकेट मागणार ती सोडून बाकी सगळे होणार का?याच्यावर चर्चा झाली पाहीजे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ते ३८ प्लॅन बाजूला ठेवा याच्यापासून ३८ प्लॅनपासून बिचारे कर्पे साहेब गायब झाले आहेत ते ३८प्लॅन सोडून बाकीचे करा.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** याच्यामध्ये आलेत का?

**सदस्य, श्री. राजेश वधेरिया:—** मा. महापौरजी...........

**महापालिका सचिव:—** निदर्शनासाठी विषय आलेला आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधेरिया:—** बघा निदर्शनासाठी आलेला आहे आम्ही लोक याच्यावरती प्रस्ताव पास करू शकतो ना?

**महापालिका सचिव:—** म्हणजे यामध्ये निदर्शनाची नोंद घेत आहे असा ठराव येणार.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ती मुदतवाढ ३१ डिसेंबर.

**महापालिका सचिव:—** ठिक आहे यामध्ये साहेबांनी यामध्ये सांगितले की निदेर्शनाची नोंद घेण्यात यावी माहीतीची नोंद घेण्यात यावी असा ठराव होईल यामध्ये. देहरकर साहेबांनी सांगितले ना वाढवणार आहे या ठरावात येणार नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** जी.आर.ची कॉपी पाठवून दया सगळयांना

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. मा. महापौरजी याची जी तारीख आहे अर्ज भरण्याची तारीख १३/६/२०१८ त्याला ३१/१२/२०१८ वाढविण्यात यावी.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—** मार्च २०१९ पर्यंत आहे ती मार्च २०१९ पर्यंत तयार आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधेरिया:—** तुम्ही दिनांक सांगा ना साहेब फेब्रुवारी २०१९ हा हा ठिक आहे.पास पास

**काही सदस्य:—** पास पास

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ८:—** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ क नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावुन ''प्रशमित संरचना'' म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम (१) अन्वये केलेले नियम प्रसिध्द करणे.

**प्रस्तावना**

शासनामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ क नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून ''प्रशमित संरचना'' म्हणून घोषित करणेबाबतची अधिसूचना दि. ०७.१०.१७ रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे. सदर अधिसूचनेमध्ये नमुद केल्यानुसार अधिसुचना प्रसिध्द झाल्यापासून नियोजन

प्राधिकरणाने सदरची सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन अनधिकृत बांधकामधारकाकडून मुदतीत अर्ज मागवणेबाबत नमुद केले आहे. सदर अधिसुचनेमध्ये खालीलप्रमाणे बाबी नमुद करण्यात आलेली आहे.

१. सदर नियम हे डींतींजतं ज्वूद च्संददपदह ;ब्वउचवनदकमक ैजतनबजनतमेद्ध त्नसमे २०१७ असे संबोधित करण्यात यावे.
२. सदर नियम हे महानगरपालिकेच्या हद्द्‌ीमधील दि. ३१.१२.१५ पूर्वी केलेल्या अनधिकृत विकासाकरीता लागू होईल.
३. सदर नियम तात्काळ नियमात येईल.
४. सदर नियमामध्ये खालीलप्रमाणे अनधिकृत विकासाच्या समावेश करण्यात येणार नाही.
    a. ना विकास क्षेत्रामधील किंवा ब्त्र्ण्.प् क्षेत्रामधील, डंदहतवअमेए वन विभागामधील अनधिकृत विकास.
    b. ठनर्मित ‘वदमे मधील अनधिकृत विकास
    c. ैजतनबजनतंससल नदेंमि इनपसकपदह
    d. रहिवास क्षेत्र, वाणिज्य क्षेत्र व औद्योगिक क्षेत्र व्यतिरिक्त क्षेत्रामधील बांधकाम
    e. विकास योजनेमधील अनुज्ञेय वापराव्यतिरिक्त वापराकरीता रहिवास क्षेत्र वगळता

१. खालील नमुद अनधिकृत विकास क्षमापीत इमारत म्हणून घोषित करता येईल जर ते खालील बाबींची पूर्तता करत असल्यास
    a. वर्ग २ खालील जमिनीवरील अनधिकृत बांधकाम जर त्याकरीता सक्षम प्राधिकरणाच्या ना हरकत दाखला सादर केल्यास.
    b. प्लेग्राऊंड, गार्डन व नकाशामधील मोकळया जागा व्यतिरिक्त राखीव भूखंडावर जर सदर आरक्षण नियमानुसार कार्यवाही करुन स्थलांतरीत किंवा रदद् करण्यात आले असल्यास व त्याकरीता येणारा खर्च मालक/भोगवटादार भरण्यास तयार असल्यास.
    c. रस्ता, रेल्वे, मेट्रोकरीता राखीव भूखंडावर जर सदर आरक्षण नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करुन स्थलांतरीत केल्यास
    d. बांधीव राखीव भूखंडावर जर ।बबवउउवकंजपवद त्मेमतअंजपवद च्या तरतुदी पूर्ण होत असल्यास.
    e. स्ंदक न्मे ‘वदम नियमानुसार बदल करुन घेतल्यास व त्याकरीता येणारा खर्च मालक / भोगवटादार भरण्यास तयार असल्यास.
    f. शासकिय जमिनीवर किंवा नियोजन प्राधिकरणाच्या जमिनीवर जर त्याकरीता संबंधित प्राधिकरणाच्या ना हरकत दाखला किंवा भाडेतत्वावर दयावयाचा दाखला सादर केल्यास.
    g. ैचमबपंस ैबीमउम वित तमींइपसपजंजपवद वत तमेमजजसमउमदज व ि ंदल चतवरमबज ंिमिबजमक चमतेवद मधील जमीन नियोजन प्राधिकरणाचा अधिकारान्वये.
२. रहिवास क्षेत्र, वाणिज्य क्षेत्र व औद्योगिक क्षेत्रामध्ये नियमानुसार अनुज्ञेय बांधकाम ज्यांना मंजूरी न घेता उभारण्यात आले असल्यास त्यांना क्षमापीत शुल्क आकारुन ब्वउचवनदकमक ैजतनबजनतमे म्हणून संबोधता येईल.
३. रहिवास क्षेत्र, वाणिज्य क्षेत्र व औद्योगिक क्षेत्रामधील बांधकामे ब्वउचवनदकमक ैजतनबजनतमे म्हणून संबोधता येईल जर खालील बाबींची पूर्तता करत असल्यास.
    ंण् भूनिर्देशांक
    इण् इमारतीची उंची
    बण् मोकळया जागा
    कण् ब्वअमतंहम
    मण् रस्त्याची रुंदी
    ण्नि इतर बाबी उदा. पार्किंग, जिन्याची रुंदी, ड्रेनेज, पाणीपुरवठा, वृक्ष,
    अग्निशमन विभागाकडील ना हरकत दाखला, ैजतनबजनतंस ैजंइपसपजल मजबण्

वरील बाबीची पूर्तता करणाऱ्या इमारतीकरीता खालीलप्रमाणे शुल्कांची आकारणी करुन ब्वउचवनदकमक ैजतनबजनतमे म्हणून संबोधता येईल.

१. विकास शुल्क –
    जमिनीवर ०.५ टक्के ग जमिनीचे क्षेत्र ग जमिनीचे दरसूचीनुसार दर
    बांधकामावर (रहिवास वापराकरीता) – २ टक्के ग बांधकामाचे क्षेत्र ग जमिनीचे दरसूचीनुसार दर
    बांधकामावर (वाणिज्य वापराकरीता) – ४ टक्के ग बांधकामाचे क्षेत्र ग जमिनीचे दरसूचीनुसार दर
२. प्दतिंजतनबजनतम बींतहम – विकास शुल्क इतके
३. ब्वउचवनदकपदह बींतहम – २ टक्के विकास शुल्क इतके

शासनाच्या दि. ०७.१०.२०१७ रोजीच्या अधिसुचनेमध्ये नमुद केल्यानुसार, अधिसुचना प्रसिध्द झाल्यापासुन याबाबतचा तपशिल व अर्जाचा नमुना वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन जनतेकडून विहीत नमुन्यामध्ये अर्ज मागवावयाचे आहेत. परंतू उल्हासनगर महानगरपालिकेत नगररचना विभागात ''नगररचनाकार'' व ''सहाय्यक संचालक, नगररचना'' ही पदे रिक्त असल्याने सदर बाबतीत विलंब झाला आहे. तरी नागरिकांकडून दि. १४.०३.२०१८ ते दि. १३.०४.२०१८ या कालावधीत अर्ज मागविणेचे जाहिर प्रकटन प्रसिध्द करण्यात येत असुन सदरची बाब मा. महासभेच्या निदर्शनास आणणेकरीता सविनय सादर.

**महासभा ठराव क्र:१०** **दिनांक:—४/७/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ क नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावुन ''प्रशमित संरचना'' म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८ (१) अन्वये केलेले नियम प्रसिध्द करण्याचा प्रस्तावाची नोंद घेण्यात येत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** ठिक आहे. विषय क्र. ९ विशेष समित्यांची रचना करणे कृपया सर्व सभागृह नेता गटनेता यांनी आपआपल्या सदस्यांची नावे देयाची आहेत विशेष समित्यांची रचना करणे. मा. महापौर यांच्याकडे नाव सुपुर्द करायची आहेत. जे पण नावे आहेत १३ विशेष समित्यांची रचना होत आहे १३ पैकी चार विशेष समित्यांची कार्यक्षेत्र निश्चित करायचे आहे सध्या फक्त समिती स्थापन होत आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** महापौर महोदया १३ विशेष समित्या आपण मागच्या वर्षी घोषीत केल्या होत्या त्यापैकी किती_विशेष समित्यांना राज्यशासनाची मान्यता आहे याचा पण खुलासा झाला पाहीजे.

**महापालिका सचिव:—** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब सर्व सन्मानिय सभागृह महापालिकेच्या अधिनियम ३० अन्वये महासभा महापालिकेला कितीही समित्या स्थापन करण्याचा अधिकार आहे. आणि आपल्या नियमावलीमध्ये आपण जी यानंतर नियमावली प्रसिध्द केली त्यामध्ये फक्त आठच समित्या होत्या त्यानंतर तुम्ही महसूल समितीची रचना केली आणि त्यानंतर तुम्ही पुन्हा चार समित्यांची रचना केली पण ठराव शासनाकडे गेलाय आता परत नव्याने विषय आलाय की १३ समित्या रचना हे महासभेने ठरवायचे आह.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** अहो दालन उपलब्ध आहेत का एवढी दालन उपलब्ध आहेत का?

**महापालिका सचिव:—** महासभेने निर्णय घ्यावा.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** विषय असा आहे की, आपण शासनाकडे मंजुरीला पाठविलेले आहे मा. महापौरजी सचिव मॅडम शासनाची मंजुरीची आवश्यकता नाही आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:— अनाऊसमेंट करा, नावाची घोषणा करा.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** सचिव मॅडम आपण जे सांगितले की शासनाकडे मंजूरीला गेलेले आहे शासनाच्या मंजूरीची आवश्यकता नाही आहे.

**महापालिका सचिव:—** मागे जेव्हा अशासकीय प्रस्ताव आला होता चार समित्या रचनांचा तो ठराव तात्कालीन आयुक्तांनी यांनी विखंडीतसाठी पाठविला आहे शासनाकडून त्यावर अद्याप काही उत्तर नाही सेक्शन ३० मध्ये असे आहे की महासभा त्यांच्या अधिकारात समित्या नेमु शकते कमी करू शकते.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** आता जरी आपण निर्णय घेतला हा आयुक्त पण विखंडीत करायला शासनाकडे पाठवणार ना?

**महापालिका सचिव:—** जो काही निर्णय घ्यायचा आहे तो प्रशासन निर्णय घेईल.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** कशासाठी आपली बदनामी करून घ्यायची

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मला तरी वाटते आपली आर्थिक स्थिती चांगली नाही महानगरपालिकेची काय आयुक्त साहेब आणि तीन चार कमिटया वाढवून काय उद्देश आहे?

**सदस्य, श्री. मनोज सयानी**:— सध्या त्या नावांची घोषणा करा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :—**मला वाटते आपली आर्थिक स्थिती चांगली नाही.त्यामुळे आम्ही चार समित्यांची सदस्यांची नावे देत नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** भगवान भालेरावजी काळ बदली होऊ शकते. शांततेनी बसावे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** गेल्या वर्षभरामध्ये अजिबात काम झालेले नाही त्यामुळे आमचा याला विरोध आहे ज्या ९ कमिटया ज्या वर्षा नु वर्ष आहेत त्याच राहूदया बाकी चार कमिटयांची आवश्यकता नाही तुमच्या ॲडजेसमेंटसाठी जे चालय ना त्यामुळे उल्हासनगरवासीयांचे नुकसान होते. अगोदरच्या आयुक्तांनी जी भुमिका घेतली प्रशासनाची ती भुमिका असली पाहीजे

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—** मा. महापौरजी त्यामुळे चार कमिटयांवर विरोधी पक्ष आपले सदस्य पाठवीणार नाहीत

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** उल्हासनगर महानगरपालिकेचे नुकसान करायचे नाही

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** महानगरपालिकेची आर्थिक स्थिती गंभीर असल्याने आम्ही आमचे सदस्य चार कमिटीवर पाठविणार नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी मा. आयुक्त साहेब जेव्हा उल्हासनगर महानगरपालिका गठीत झाली तर येथे विशेष समित्या होत्या आमचे विरोधी पक्ष नेते बसलेत येथे त्यांच्या बरोबर आम्ही बसलो होतो त्यांनी ऐक सुंदर कमिटी ज्याची खूप गरज होती शहराची रेव्युनु वाढवायची महसूल समितीची स्थापना केली आणि आम्ही लोकांनी या उल्हासनगर महानगरपालिकेच्या आत ज्या ज्या विभागात काही काम होत नाही त्यासाठी विरोधी पक्ष वेळो वेळी बोलतो स्कुल बोर्ड शासनाने स्कुल बोर्डची समिती बंद केली आज तेथे काही नियंत्रण नाही आम्ही प्राथमिक शिक्षण समितीची स्थापना केली आहे कारण आमचा सदस्य स्कुल बोर्डवर नियत्रण ठेवणार आणि जी आमची मूले शिक्षण घेत आहेत गरीब घरातील मुल आहेत ते चांगल्या प्रकारे शिक्षण घेतील आमच्या बरीच मालमत्ता बरीच प्रॉपटर्या त्यांच्यावर मोठ मोठे बिल्डर कब्जा करीत होते तेथे अनाधिकृत बांधकाम तयार होत होते आणि उल्हासनगरचे नांव अनाधिकृत बांधकामाच्या लिस्टमध्ये पहील्या क्रमांकावर होते आम्ही त्या मालमत्तेचे संरक्षण करणेसाठी मालमत्ता कमिटीची स्थापना केली आहे. भांडार नियंत्रण विभाग जो आहे आज बरेच सर्व वस्तुवर विरोधी प़क्षाकडून अनेक वेळा आवाज उठवला जात आहे काय काय वस्तु आहेत कोणकोणत्या वस्तु येतात भांडार विभागात त्याचे काही कळत नाही माल येतो सडतो लोकांना मिळत नाही,शिलाई मशिन येतात महीलासाठी,खुर्च्या येतात पण त्याचे बरोबर वाटप होत नाही. जेव्हा आम्ही सत्तेवर होतो घरगुती महीलासांठी हॉस्पीटलमध्ये देणेसाठी एक स्कीम मागीतली होती त्यांना खाण्यासाठी डायफ्रुट पण ते पुर्णपणे सडून गेले.बऱ्याच वेळा अनेक संस्था वालधुनी नदी पर्यावरण विषयी आवाज उठवत आहेत आज उल्हासनगरची हालत पर्यावरण बाबत खुप दयनिय आहे यासाठी आम्ही पर्यावरण बाबत समिती बनविली आहे शहराचे पर्यावरण प्लॅस्टीक बंदी बरेच सारे पर्यावरण बाबत दुषपरिणाम होत आहे. आमचा एखादा चेअरमन बनणार तर या शहराच्या पर्यावरणाचे जे आम्हाला पर्यावरणाचे रिपोर्ट ३१ जुलै पर्यंत मिळाली पाहीजे अनेक वेळा आम्ही त्या रिपोर्ट पासून वंचित होतो तर ही अत्यांत चांगली कमिटी बनली आहेत मी विरोधी पक्षाला निवेदन करतो की तुम्ही सुध्दा आपले सदस्य त्यासाठी दयावे सर्व मिळून आमचा उद्देश असा नाही की आम्ही आमचा चेरअमन बसवून काम करणार तुम्ही सुध्दा सदस्य दयावे आणि आपण जर चेरअमन मागणार ते पण तुम्हाला देण्यास तयार आहे हे आमच्यासाठी नाही आहे मी आव्हान करतो की या चार

कमिटीमधून कोणतीही कमिटी आपल्याला पाहीजेत असेल तर आपण सदस्य बना किंवा चेरअमण बना मा. महापौरजी नावांची घोषणा करा.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** कोणाला तरी स्पाईनचा त्रास होता एका डॉक्टरकडे गेले होते तो स्पाईनचा डॉक्टर बोलला की तुम्हाला शोल्डरचा त्रास आहे. शोल्डर स्पेशालिस्ट आहे शोल्डरवाल्यांकडे गेल्यावर त्यांनी सांगितले की तुम्हाला मानेचा त्रास आहे. मानेचा डॉक्टर म्हणाला मनक्याचे वेगवेगळे प्रकार असतात त्या प्रकारची चिरफाड इथले सत्ताधारी पक्ष करीत आहेत. स्पाईनचा वेगळा,शोल्डरचा वेगळा, मणकेचा वेगळा इथली जी नस आहे तीचा वेगळा पण ईथे जे डॉक्टर आहेत असा डॉक्टर नाही की पुर्ण शोध घेणार अशा संकटात पेशंटची तब्बेत बिघडत चालली आहे उल्हासनगरचे अशा प्रकारे वेगवेगळया डॉक्टरकडे जाऊन पेशंट मरत आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** आपल्याकडे एम एस,एम डी डॉक्टर आहेत ते पुर्ण उपचार करणार आमच्या बोडारे साहेबांना चांगले ज्ञान आहे सुपर टेकनीकलचे नॉलेज आहे मी आज खुप आनंदी आहे. प्रत्येक गोष्टीसाठी सुपर टेकनॉलजी आली आहे आपल्याला नॉलेज आहे मी धन्यवाद करीत आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** पेशंटची परिस्थिती खराब होत आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** साहेब असे नाही आहे हिंदुजा,लिलावती एवढी मोठ मोठी हॉस्पीटल आहेत नाही साहेब महापालिका बोलली नाही आपले मन बोलले आपण विशलेषण केले की स्पाईनचे काम स्पाईन करणार

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा.महापौरजी सभागृह नेत्यांनी आताच सांगितले की आमचे विरोधी पक्ष महसुलसाठी ओरडत असतात, भांडार कक्षासाठी ओरडतात,प्रॉपर्टी जेथे आहे ती हडप करतात विरोधी पक्ष ओरडत आहे हा आवाज फक्त जमनुजीला जात आहे त्याच्या कानावरच जात आहे त्यालाच ऐकायला जात आहे विरोधी पक्ष ओरडत आहे हे उलट होत आहे ज्याला ऐकायला जात नाही त्यालाच ऐकायला जात आहे.

**सदस्य ,श्री. जमनादास पुरस्वानी:—** सभागृह नेता म्हणजे पुर्ण सभागृहाचा नेता आम्ही पुर्ण पॉवर यांना दिली आहे.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—** जेव्हा आम्ही सत्तेवर होतो तेव्हा आम्ही एक समिती वाढविली महसूल समिती परंतु त्यावेळेस आम्ही काम केले परंतु आता तुमचे नियंत्रण आहे का? कोणी तरी सांगा की नऊ समित्या प्रत्येक महीन्याला मिटींग घेतात का? एवढया नऊ समित्या ठेवल्यात दर महीन्याला मिटींग ठेवतात का त्यांच्या मग कोणाचा होल्ड आहे त्यांच्यावर वर्षभरात काय काम केले त्यांनी ते सांगा मला वृक्ष प्राधिकरण एकादया झाडाची फांदी कापायला वर्ष लागते तरी पुढचे वर्ष येईल तरी ते कापले जात नाही या ज्या आपल्या समित्या आहेत आम्हाला मान्य आहेत करा पण त्याच्यावर नियंत्रण ठेवा काहीतरी त्याच्यातुन काम दाखवा समित्या नुसत्या चेयरमनसाठी बसवू नका त्याच्यातुन काहीतरी आऊटपुट निघु दे आम्हाला कळूदे मिंटींग झाल्या एक महीला बालकल्याण सोडले तर कोणतीही समिती मिंटींग घेत नाही. पाणी पुरवठयाचे प्रश्न असतील ते डायरेक्ट आयुक्तांकडे जातात का? पाणी पुरवठा समितीकडे होत नाही प्रश्न सुटत असतील तर समित्या ठेवा मी प्रत्येक वेळेस सांगते प्रभाग समितीत पण मिटिंग होत नाही येथेपण होत नाही.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** घोषणा करा नावांची.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सन्मानिय आमचे सभागृह नेत्यांनी समित्यांच्या सदर्भात विषय काढला म्हणून माझी एक आयुक्त साहेबांना विनंती आहे.आताच आपण जो निर्देशना विषयी ठराव आणला ८५५ बिल्डींगच्या संदर्भात अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भात मला वाटते अनाधिकृत बांधकामाबाबत एक समिती जर केली आणि चेयरमन आमले सभागृह नेता जर झाले तर मला सर्वात जास्त आनंद होईल

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** प्रपोजल दया तुम्ही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** आयुक्त साहेब निर्णय तुमचा आहे. या निर्णयाची जर चुकीच्या पदधतीने अंमलबजावणी झाली तर आम्ही आमचा १०० टक्के निधी विरोधी पक्ष नेता यांच्या केबीनमध्ये बसून आम्ही मागणार आहेत.

**महापालिका सचिव:—** कुपया माझ्यापुढे नावे दिलेली आहेत मा. पिठासीन आधिकारी यांनी सभागृह नेता श्री. जमनादास पुरस्वाणी यांच्याकडून नावे आलेली आहे सार्वजनिक बांधकाम समिती श्रीम. जया प्रकाश माखिजा,

येथे सदस्य, जोरजोरात बोलत असतांना....

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** सदस्यजी माझे नांव ऐकुदया माझे नांव कुठे आहेत ते मला बघायचे आहे.

**महापालिका सचिवः—** सार्वजनिक बांधकाम समिती श्रीम. जया प्रकाश माखिजा,श्री. राजेश वानखेडे,श्रीम. रेखा ठाकूर,श्री. हरेश जग्याशी, स्वप्नील बागूल, श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहता, श्रीमती ज्योती गायकवाड,श्रीमती कविता एल.पंजाबी,श्रीमती सुनिता बगाडे,नियोजन व विकास समिती,श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी श्री. किशोर वनवारी,श्रीमती पंचम कालानी,श्रीमती दिपा पंजाबी, श्री. चंद्रशेखर यादव, श्री. प्रमोद टाले, श्री. आकाश पाटील,श्री. दिपक (टोनी) एल. सिरवानी,श्रीमती सुमन राजेश सचदेव,पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती, डॉ. प्रकाश नाथानी, श्री. जमनादास पुरस्वानी,श्रीम.सरोजिनीमुरलीधरटेकचंदानी

श्री. रवि जग्यासी, श्रीमती लिलाबाई आशान,श्री. सुमीतसागर सोनकांबळे,श्री. सुनिल सुर्वे,श्री. अजित गुप्ता,श्री. भारत राजवानी (गंगोत्री),आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती,श्रीमती जया प्रकाश माखिजा,डॉ. प्रकाश नाथानी,श्रीमती पंचम ओमी कालानी,श्रीमती दिपा नारायण पंजाबी,श्रीमती शुभांगी बेहनवाल,श्रीमती शितल कदम,श्री. रमेश चव्हाण,श्रीमती उदासी इंदिरा

श्रीमती सुमन राजेश सचदेव,माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती,श्री. हरेश जग्यासी,श्रीमती ज्योती प्रशांत पाटील

श्रीमती सविता तोरणे (रगडे),श्री. रवि जग्यासी,श्री. विकास परशुराम पाटील,श्रीमती शितल चंद्रकांत कदम,श्रीमती मिताली राजेश चान्पूर,श्री. गजानन शेळके,श्रीमती सुनिता बगाडे,गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती श्री. रविंद्र दशरथ बागुलश्री, राजेश वानखेडे, श्री. राजेश वदारिया, श्रीमती डिम्पल ठाकुर, श्रीमती लिलाबाई आशान, श्रीमती सुरेखा आव्हाड ,श्री. भगवान भालेराव ,श्री. गजानन शेळके ,श्री. प्रमोद टाले,_महिला व बालकल्याण समिती, श्रीमती अर्चना करनकाळे, श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती, श्रीमती शुभांगिनी निकम, श्रीमती वसुधा बोडारे, श्रीमती राजश्री चौधरी,श्रीमती संगिता सपकाळे,श्रीमती इंदिरा उदासी, श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, महसूल समिती श्रीमती ज्योती प्रशांत पाटील,श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी, श्रीमती लक्ष्मी सिंग, श्रीमती जयश्री पाटील, श्री. राजेंन्द्र चौधरी, श्री.राजेंद्रसिंह भुल्लर, श्रीमती पुष्पा बागुल, श्रीमती दिप्ती दुधानी, श्रीमती अंजली साळवे, मालमत्ता देखभाल व दुरुस्ती समिती श्रीमती अर्चना करनकाळे, श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, श्रीमती कविता गायकवाड,श्रीमती आशा नाना बिराडे,श्रीमती कांचन लुंड,भांडार नियंत्रण समिती_समिती श्री. अशोक बच्चुमल छापरु,श्रीमती गिता लालचंद साधनानी,,श्रीमती शुभांगिनी निकम,श्रीमती कविता सुरेश गायकवाड

श्रीमती दिप्ती दुधानी, पर्यावरण उपाययोजना व नियंत्रण समिती, श्रीमती मिनाक्षी रवि पाटील,श्री. रविन्द्र दशरथ बागुल,श्रीमती रेखा ठाकुर,श्रीमती सविता तोरणे (रगडे),श्रीमती ज्योती चैनानी, प्राथमिक शिक्षण समिती,श्री. जमनादास पुरस्वानी,श्री. अशोक बच्चुमल छापरु,श्री. राजेश वदारिया,श्रीमती डिम्पल ठाकुर,श्री. शंकर लुंड, समितीची रचना झाली आहे

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** ९ समितीसाठी आमची मंजूरी आहे दुसरेला तुम्ही मतदान ध्या.

**महापालिका सचिवः—** ९ समिती सर्वाना मान्य आहे?

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** मला एक विचारायचे आहे की एका सदस्यांना किती समितीमध्ये घेवू शकतो.

**महापालिका सचिवः—** एक सदस्य दोन समितीमध्ये येवू शकतात.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**ः— मला असे वाटते की श्री. जमनुजीचे नाव तीन समितीमध्ये आहे.

**महापालिका सचिवः—** नाही नाही दोन समितीवर आहे. हा ठराव पण बहुमताने पारित होणार आहे कारण की ९ समिती तुम्हाला मान्य नाही आणि हयांना ९ समिती मान्य आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—** चुकीचे बोलत अहात.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मी जे म्हणत आहे तुम्ही ऐकुन ध्या तुम्ही जे म्हणतात चुकीचे आहे ज्यावेळी समितीची रचना झाली होती त्या १३ समितीची रचना सर्वसंमतीने पारित झाली होती, आज फक्त सदस्याचे नाव दयाची आहे ज्यांना सदस्याचे नाव दयाचे आहे ते नाव देणार ज्यांना नाही दयाचे ते नाव देऊ नये आपले मनावर आहे राष्ट्रवादी कॉग्रेसचे फक्त चार सदस्य आहे हे आपले नाव फक्त ८ समितीमध्ये देऊ शकता तर ९ समिती कशी होणार? ९ समिती नाही होणार हया समिती सर्वसंमतीने बनवलेली आहे आणि हेचामध्ये सदस्यासाठी मतदान होणार नाही, ज्यांना नाव दयाचे आहे ते नाव दयावे ज्यांना नाव दयाचे नाही ते नाव देऊ नये. यामध्ये मतदान होत नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** सभागृहनेता जी या वर्षाचे ठराव आहे. यामध्ये १३ पाहिजे की ९ पाहिजे आम्हाला ९ पाहिजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मी सागू इच्छित आहे तुम्हाला विरोधी पक्ष नेताजी १३ समितीचा ठराव आधी झाला आहे आजचे सभेमध्ये फक्त सदस्यांचे नाव दयाचे आहे राष्ट्रवादी कॉग्रेसचे सदस्याचे किती समितीमध्ये सदस्य आहे मला सांगा तुम्ही. ९ समितीमध्ये सदस्य जाऊ शकत नाही ८ सदस्य आहे तर ८ समितीमध्ये ही जाणार ९ समितीमध्ये नाही जाणार ९ समिती होवू शकत नाही तर का तुम्ही ८ समिती बनविणार?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** ८ समिती बनणार तर ८ समिती बनवा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** नाही ८ समिती कशी बनणार बनणार नाही ज्यावेळी १३ समिती झाली होती तेव्हा सर्वसंमतीने झाली होती. आणि सर्वसंमतीने ठराव पारित झाला होता.मतदान कोणत्या गोष्टीवर होणार? सदस्यांचे नाव दयाचे नाही तर देऊ नये पण मतदान करण्याची आवश्यकता काय आहे?. तुम्हाला ८समितीमध्ये सदस्यांचे नाव दयाचे आहे तर दया, किवा ९ समितीमध्ये दयाचे आहे तरी दया पण मतदान करण्याची आवश्यकता नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** आम्हाला मतदान करायचे आहे मतदान ध्या.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** ,मा. सभागृहा नेता, मा. विरोधी पक्ष नेता कृपया सर्व बसुन ध्या. या स्पष्ट आहे की इथे काही नविन प्रस्ताव आला नाही आहे इथे फक्त सदस्यांचे नाव देणार आहेत. समित्या आधी झाल्या आहेत. तुम्हाला ज्या समितीमध्ये सदस्यांचे नाव दयाचे आहे, तुम्ही त्या समितीमध्ये नाव देऊ शकता कारण की इथे फक्त सदस्यांचे नाव दयायचे आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** तुम्ही नियमाप्रमाणे चालवत आहे की काय? इथे प्रत्येक सदस्यांना आपल्या मत मांडणेचा अधिकार आहे. आम्ही १३ समितीया बनून खर्च वाढवणार नाही आधी पण आम्ही विरोध केला आहे आता पण विरोध करत आहोत.आम्ही खर्च वाढवणार नाही आधीच महानगरपालिकेकडे दालन नाही खर्चासाठी आम्ही वर्षानु वर्ष वाट पाहू की नगरसेवक निधीचा आणि स्थायी समिती खडडे भरत नाही आणि आम्ही इथे समित्या वाढवणार त्यास आमचा विरोध आहे.तुम्हाला चुकीने समित्या बनवायचे आहे तर बनून ध्या. परत कोर्टात आव्हान होणार.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** मा. विरोधी पक्ष नेता त्यांचे जे आहे त्यांनी आपले मत मांडले आहे त्यांना आणि अजून कोणाला पण त्यांना जेवढे सदस्यांचे नाव दयाचे आहे किंवा दिलेले आहे ज्या ज्या सदस्यांचे नाव दिले आहे इथे रचना झाली आहे तुम्ही पुढे चला.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** सचिव मॅडम आपले नियम काय आह?, नियम काय म्हणता ते सांगा ना.या प्रस्तावाचे बाबतीत काय केले पाहिजे? ते सांगा ना

**महापालिका सचिव:—** हे जे समितीची रचना आधीच झाली आहे आज फक्त सदस्याचे नाव दयायची आहे. मी रचनेचा ठराव मागवला आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** त्या ठरावात विरोध नव्हता का?

**महापालिका सचिव:—** मी ठराव मागवला आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा सचिव मॅडम जेव्हा १३ समितीयाचे रचना झाली होती तेव्हा ठराव सर्वसंमतीने झाला होता.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** १३ समितीसाठी विरोध होता ९ समिती सर्वसंमतीने होती.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** ठिक आहे हा विषय संपला आहे पुर्ढचा विषय ध्या.

**महापालिका सचिव:—** जेव्हा हा ठराव पास झाला होता तेव्हा १३ समितीसाठी विरोध होता आणि ९ समितीसाठी सर्वसंमती होती परंतु तेव्हा तो ठराव बहुमताने पास झाला होता.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** आमचा विरोध आहे.

**महापालिका सचिव:—** ४ समितीवर फक्त विरोध आहे ना?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ध्या न आमचा विरोध.सन्माननीय सभागृहनेताने जो ठराव मांडला आहे सर्वानुमते झाला होता तो विषय महासभेत कामकाजातून काढून टाका.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** हे सवय झाली आहे खोट बोलनेची वर पासून खाल पर्यंत रेटून बोलयचे बहुमताने तर बहुमताने मला सांगायचे की मतदान घ्या.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी मला याचे सांगा की १३ समित्यांचा इथे जेव्हा विषय आला होता तेव्हा किती मतदान झाले होते बहुमत बोला तर, मतदान झाली नव्हते, सगावे, सगावे मतदान झाले नाही.

**महापालिका सचिव:—** कृपया मला बोलू दया. आज फक्त सदस्यांचे नाव दयाचे आहे. तुम्ही विरोध केला आहे आधीच तुम्हाला फक्त सदस्यांचे नाव दयायचे आहे त्यामुळे मतदानाचे प्रश्न येत नाही. ज्यावेळी हा ठराव आला अशासकीय तेव्हा तुम्ही आधीच ठराव पास केला बहुमताने तुमचा हा विरोध दशर्वला केला आहे आता फक्त सदस्य दयायचे आहे तर विरोध करणेचा प्रश्नच येत नाही साहेब.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** विरोध किती लोकांचा? त्या वाजूना किती लोक हेच तो कळायला पाहिजेत न बहुमत यानी कितीचा बहुमत? आकरा पाहिजेत ना बहुमताला.

**महापालिका सचिव:—** नाही नाही नाही होणार इतिवृत्ताला तुमचा विरोध होईल.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** सभागृह नेता तुम्ही जबाबदार आहेत तुम्ही खोटे सागू नका सभागृहाला. तुम्ही जबाबदार व्यक्ति आहात खोटे सागू नये.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी सभागृहामध्ये मी सागू इच्छित आहे की तुम्ही त्यावेळेचे मतदान सागावे मतदान झाली नव्हते या सभागृहामध्ये आपले मर्जीने बहुमत लिहिलेला चालत नाही.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** आधीच तर तुम्ही सागितले आहे की ठराव झाला नव्हता. आता ठराव बहुमताने झाला आहे तुमचा मना प्रमाणे काही बोलणार तर चालणार का?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** मा. महापौरजी मतदान घेणेत हरकत काय आहे?

**सदस्य श्री.मनोज सयानी:—** मा. महापौर जी बहुमताने जर पास झाला तर लोकतंत्रना पण बहुमतला ताकद आहे बहुमत झाला की तो पास झाला लोकतंत्रमध्ये बहुमत ही सर्व आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** पूर्ण राज्यात बहुमत चालत आहे.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:—** होय, ठीक आहे जिथे सर्व राज्यात बहुमत आहे तो उल्हासनगरमध्ये पण बहुमत चालणार आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** उल्हासनगरमध्ये पण बहुमत चालत आहे,

**सदस्य श्री.मनोज सयानी:—** जर लोकतंत्रामध्ये बहुमतला ताकद आहे तर ठीक आहे बहुमताने तो पास झाला तुम्हाला सर्व सदस्याचे नाव नाही दयाचे तर सर्वाचे नाव देऊ नये. तुम्ही विरोध करा.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** तुम्हांला मतदान नाही.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:—** ठीक आहे मला मतदान नाही तर तुम्ही माझा अधिकार हिसकावून शकत नाही. कोणता ही असा नियम नाही की मला बोलू देणार नाही. मला माहिती आहे की मला मतदान करणेचा अधिकार नाही पण बोलनेचा जर तो अधिकार आहे मी बोलू शकतो बोलणेचा अधिकार जो आहे तो कोणी हिसकावू शकत नाही. चौधरी साहेब मी बोलू शकतो

लोकतंत्रामध्ये बहुमतला अधिकार आहे हा ठराव बहुमताने पारित झाला आहे. जर विरोधी पक्ष नेता यांचा विरोध आहे आणि अजून कोणाला विरोध आहे तर तुम्ही १३ समितीमध्ये सदस्यांचे नाव देऊ नये. जर तुम्हाला विरोध करायचे आहे तर सर्वामध्ये नाव देऊ नये. जी गोष्ट बहुमताने झाली आहे त्या गोष्टीत चर्चा कशाला?

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** सुझाव देणेची गरज नाही तुम्हाला आम्ही स्वत: बघणार की आम्हांला काय करायचे आहे?

**सदस्य, श्री.मनोज सयानी:—** तुम्ही माझा बोलणेचा अधिकार हिसकावू शकत नाही. हा अधिकार मला संविधांनातर्फे मिळालेला आहे. मला बोलणेचा अधिकार आहे तुम्ही जेव्हा बोलतात तेव्हा मी हे म्हणत नाही की तुम्ही आम्हाला सुझाव देत आहेत. लोकतंत्राला बहुमत सर्वसर्वा आहे अहुमतला अधिकार आहे बहुमताने पास झाला आहे तो ठराव.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** आयुक्त साहेबांना विचारून ध्या की स्विकृत सदस्यांना किती बोलणेचा अधिकार आहे

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**:— मागच्या वर्षी काय पण झाल परंतु या वर्षी विषय आला तर चर्चा होतात बहुमत, एकमत जर एकमत झाला तर मतदरान होत नाही परंतु जर सभागुहात एकाचे एक आणि दुस—यांचे दुसरे मत आहे तर मतदान झाली पाहिजे की एकाला किती मत आणि दुसरेला किती मत, हेचासाठी मतदान झाली पाहिजे. नाही तर तुमचा हया चुकीचा होणार विरोध होणार तर किती विरोधात आणि किती वाजूने आहे हे जर होत नाही तर,

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—** मा. सचिव मॅडम आजच्या विषय काय आहे? विषय क्रमांक ९ परत वाचून दाखवा. सचिव मॅडम विषय क्र. ९ काय आहे आजचा?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**:— कुठला विषय आहे आज पूर्ण झाला पाहिजे. या विषयवर आमचा मतदान घेतला पाहिजे. मतदान ध्याची नाही तुम्ही सांगा मा. महापौर महोदया, मतदान ध्याची नाही का?

**महापालिका सचिव:—** एक मिनट कृपया मला बोलू दया....

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**:— मतदान घेणार नाही तर तुम्ही स्पष्ट सांगा आम्ही विरोध करतो की आम्हाला ९ समिति पाहिजे जर तुम्हाला मतदान घ्याचे नाही तर सांगा तुम्ही. मी मतदानाची मागणी करतो की, मी मतदानाची मागणी करतो आहे या ठिकाणी मतदान झाली नाही तर आम्ही सर्व मागणी करतो.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:—** जर मतदान होणार तर कोणत्या गोष्टीवर चर्चा करणार.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान</u>**:— जमनु जी जर तुम्ही आदीच म्हणतात की ठराव झाला आहे आणि त्या ठराव बहुमताने आहे तर आता ठराव करण्यात काय होत आहे?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** ठराव झाला आहे.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान</u>**:— एक मिनट तुम्ही सागत आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** ठराव झाला आहे.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान</u>**:— तिथे पण आमचा विरोध होत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** विरोध नव्हता.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान</u>**:— तुम्ही म्हणाला आहे. तुम्ही आता पण चुकीचा म्हणत आहेत त्यावेळी होता तर हयावेळी का नाही? महापौर जी हे काय आहे?

**<u>उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—</u>** मा. महापौरजीच्या आदेशानी पुढचा विषय घ्या.

**<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:—</u>** मला नियम दाखवा की स्विकृत सदस्य बालू शकत नाही, स्विकृत सदस्य जास्त बोलू शकत नाही नियम सांगा.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>**:— मतदान घ्या, मा. महापौरजी मतदान घ्या.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** मतदान घेता येणार नाही.

**<u>सदस्य,श्री.मनोज सयानी:—</u>** नियम दाखवा की स्विकृत सदस्य बालू शकत नाही.

**<u>सदस्य, श्री.डॉ प्रकाश नाथानी:—</u>** माझे अरूण भाऊसाठी काय होत आहे? त्यांना बोलण्यास बंदी लावतात मी सभागृहात येणार नाही.

**<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:—</u>** माझ्यामुळे तुम्ही त्यांच्या आवाजाला दाबू शकत नाही. लोकतंत्रामध्ये बहुमत सर्वेसर्वा आहे जर त्यावेळी बहुमतने १३ समितीची रचना झाली आहे. आणि सागितल्या आहे की बहुमताचे आधारवर १३ समित्यांची रचना होणार.

**<u>महापालिका सचिव:—</u>** या ठरावात फक्त मंजुर लिहीले आहे,. कारण की बहुमताने ठराव पारित झाला आहे. आणि समित्या आधीच बहुमताने पास झाल्या आता फक्त नावे दयायची आहेत.

**<u>काही सदस्य</u>**:— पास, पास

**<u>सदस्य ,श्री. धनंजय बोडारे</u>**:— विरोधी पक्ष विरोध दाखवतात तुम्ही विरोधी पक्षच्या विरोध मते मोजून घ्या. उल्हासनगर शहरामध्ये १३ समित्या असता कामा नये. म्हणजे तुम्ही बहुमताने ठराव पारित करित आहते पण बहुमत सिध्द करू शकत नाही.

**<u>काही सदस्य</u>**:— पास, पास

**<u>उपमहापौर, श्री. जीवन इदनानी:—</u>** चला पुर्ढचा विषय ध्या मॅडम.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मॅडम इतिवृत्तची वाट न पाहता,

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र ९:—** विशेष समित्यांची रचना करणे.

**<u>प्रस्तावना</u>**

सन—२०१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७८ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले होते. त्यापैकी एक भारतीय जनता पक्षाचे सदस्य अनर्ह झाल्याने आता ७७ सदस्यांमधुन महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये विशेष समित्यांची नेमणुक करता येईल व महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजाचे नियम ४ अन्वये खालील आठ समित्यांची नेमणुक करता येईल.

१. सार्वजनिक बांधकाम समिती

२. नियोजन व विकास समिती

३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

५. माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

८. महिला व बालकल्याण समिती

प्रत्येक समितीत ९ सदस्यांची नियुक्ती करता येईल.

तसेच महासभा ठराव क्र. १३, दिनांक १८/७/१७ रोजी १) मालमत्ता देखभाल व दुरुस्ती समिती, २) भांडार नियंत्रण समिती, ३) पर्यावरण उपाययोजना व नियंत्रण समिती, ४) प्राथमिक शिक्षण समिती या ४ समित्यांची रचना करण्याविषयी ठराव पारीत झालेला होता. मा. महापौरांचे जा. क्र. उमपा/मका/६२५/१८, दिनांक ५/४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये या ०४ समित्यांची रचना करण्याचा विषय समावेश करण्यास सांगितले आहे. महापालिकेच्या महसूल समिती मिळुन ९ समित्यांबरोबर अधिक ४ याप्रमाणे १३ समित्यांची विशेष समितीवर ९ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| **पक्षाचे नाव** | **पक्षनिहाय मुळ संख्या** | **संख्याबळामध्ये वाढ किंवा कपातीचे प्रमाण** | **तयार केलेल्या पक्ष/आघाडी/फ्रंटचे नाव** | **आघाडी किंवा फ्रंट झाल्यावर प्रमाणशीर प्रतिनिधित्वासाठी संख्याबळ** |
|---|---|---|---|---|
| भाजपा | ३२ | — १ | — | ३१ |
| शिवसेना | २५ | — | — | २५ |
| सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया (साई पक्ष) | ११ | + १ | — | १२ |
| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | ४ | — | — | ४ |
| आर.पी.आय(ए) | २ | + १ | — | ३ |
| पीपल रिपब्लीकन पार्टी | १ | — १ | — | ० |
| भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १ | ० | — | १ |
| भारीप बहुजन महासंघ | १ | — | — | १ |
| राष्ट्रीय समाज पार्टी | १ | — १ | — | ० |
| **एकूण** | **७८** | | | **७७** |

| **भाजपा** | **शिवसेना** | **सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट** | **राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी** | **आरपीआय (ए)** | **पीपल रिपब्लीकन पार्टी** | **भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस** | **भारीप बहुजन महासंघ** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१ | २५ | १२ | ४ | २ + १ | ० | १ | १ |

| | |
|---|---|
| 77 | = **8.55** |
| 09 | |

प्रत्येक विशेष समितीवर एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण— ८.६६ असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | भाजपा | ३१ —— X ०९ ७७ | = ३.६२ | (५) | आर.पी.आय(ए) | ३ —— X ०९ ७७ | = ०.३५ |
| (२) | शिवसेना | २५ —— X ०९ ७७ | = २.९२ | (६) | भारतीय राष्ट्रीय कॅाग्रेस | ०१ —— X ०९ ७७ | = ०.११ |
| (३) | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया (साई पक्ष) | १२ —— X ०९ ७७ | = १.४० | (७) | भारीप बहुजन महासंघ | ०१ —— X ०९ ७७ | = ०.११ |
| (४) | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी | ४ —— X ०९ ७७ | = ०.४५ | | | | |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय प्रत्येक समितीवर खालील नेमणूका करण्यात येतील.

| भाजपा | शिवसेना | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | एकूण |
|---|---|---|---|
| ३ | २ | १ | ०६ |

यानंतर रिक्त राहणा—या तीन जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल.

त्यामुळे खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ खालील प्रमाणे आहे.

(१) भा.ज.पा. .६२ (२) शिवसेना .९२

(३) सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट .४० (४) रा.का.पा. ०.४६

(५) आरपीआय (ए) ०.३५ (६) भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस ०.११

(७) भारीप बहुजन महासंघ ०.११

वरील परिस्थिती पहाता प्रत्येक विशेष समितीवर शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे व त्यामुळे तीन पक्षांच्या प्रत्येकी एक—एक सदस्याची नेमणूक करता येईल. तरी प्रत्येक गटाचे विशेष समितीत प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| भाजपा | शिवसेना | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | राष्ट्रवादी कॉगेस | आरपीआय | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस | भारीप बहुजन महासंघ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ३ | १ | १ | ० | ० | ० | ०९ |

**महासभा ठराव क्र: ११** **दिनांक:—४/७/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार प्रत्येक १३ विशेष समितीवर नऊ पालिका सदस्यांचा समावेश असलेल्या खालील १३ विषय समित्यांची नेमणुक करीत आहे.

**१. सार्वजनिक बांधकाम समिती**

१. श्रीमती जया प्रकाश माखिजा
२. श्री. राजेश वानखेडे
३. श्रीमती रेखा ठाकूर
४. श्री. हरेश जग्यासी
५. श्री. स्वप्नील बागूल
६. श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहता
७. श्रीमती ज्योती गायकवाड
८. श्रीमती कविता एल. पंजाबी
९. श्रीमती सुनिता बगाडे

**२. नियोजन व विकास समिती**

१. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी
२. श्री. किशोर वनवारी
३. श्रीमती पंचम कालानी
४. श्रीमती दिपा पंजाबी
५. श्री. चंद्रशेखर यादव
६. श्री. प्रमोद टाले
७. श्री. आकाश पाटील
८. श्री. दिपक (टोनी) एल. सिरवानी
९. श्रीमती सुमन राजेश सचदेव

**३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती**

१. डॉ. प्रकाश नाथानी
२. श्री. जमनादास पुरस्वानी
३. श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी
४. श्री. रवि जग्यासी
५. श्रीमती लिलाबाई आशान
६. श्री. सुमीतसागर सोनकांबळे
७. श्री. सुनिल सुर्वे

८. श्री. अजित गुप्ता

९. श्री. भारत राजवानी (गंगोत्री)

## ४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

१. श्रीमती जया प्रकाश माखिजा

२. डॉ. प्रकाश नाथानी

३. श्रीमती पंचम ओमी कालानी

४. श्रीमती दिपा नारायण पंजाबी

५. श्रीमती शुभांगी बेहनवाल

६. श्रीमती शितल कदम

७. श्री. रमेश चव्हाण

८. श्रीमती उदासी इंदिरा

९. श्रीमती सुमन राजेश सचदेव

## ५. माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

१. श्री. हरेश जग्यासी

२. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील

३. श्रीमती सविता तोरणे (रगडे)

४. श्री. रवि जग्यासी

५. श्री. विकास परशुराम पाटील

६. श्रीमती शितल चंद्रकांत कदम

७. श्रीमती मिताली राजेश चान्पूर

८. श्री. गजानन शेळके

९. श्रीमती सुनिता बगाडे

## ६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

१. श्री. रविंद्र दशरथ बागुल

२. श्री. राजेश वानखेडे

३. श्री. राजेश वदारिया

४. श्रीमती डिम्पल ठाकुर

५. श्रीमती लिलाबाई आशान

६. श्रीमती सुरेखा आव्हाड

७. श्री. भगवान भालेराव

८. श्री. गजानन शेळके

९. श्री. प्रमोद टाले

## ७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

१. श्रीमती गिता लालचंद साधनानी

२. श्री. किशोर नारायणदास वनवारी

३. श्रीमती लक्ष्मी सुरेंन्द्र सिंह

४. श्रीमती जयश्री पाटील

५. श्री. चंद्रशेखर यादव

६. श्रीमती चरणजीकौर राजेंद्रसिंह भुल्लर

७. श्रीमती संगिता नितीन सपकाळे

८. श्री. अजित गुप्ता

९. श्रीमती कविता सुधीर बागुल

**८. महिला व बालकल्याण समिती**

१. श्रीमती अर्चना करनकाळे

२. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील

३. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती

४. श्रीमती शुभांगिनी निकम

५. श्रीमती वसुधा बोडारे

६. श्रीमती राजश्री चौधरी

७. श्रीमती संगिता सपकाळे

८. श्रीमती इंदिरा उदासी

९. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव

**९.महसूल समिती**

१. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील

२. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी

३. श्रीमती लक्ष्मी सिंग

४. श्रीमती जयश्री पाटील

५. श्री. राजेंन्द्र चौधरी

६. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

७. श्रीमती पुष्पा बागुल

८. श्रीमती दिप्ती दुधानी

९. श्रीमती अंजली साळवे

**१० मालमत्ता देखभाल व दुरुस्ती समिती**

१. श्रीमती अर्चना करनकाळे

२. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना

३. श्रीमती कविता गायकवाड

४. श्रीमती आशा नाना बिराडे

५. श्रीमती कांचन लुंड

**११ भांडार नियंत्रण समिती समिती**

१. श्री. अशोक बच्चुमल छापरु

२. श्रीमती गिता लालचंद साधनानी

३. श्रीमती शुभांगिनी निकम

४. श्रीमती कविता सुरेश गायकवाड

५. श्रीमती दिप्ती दुधानी

**१२ पर्यावरण उपाययोजना व नियंत्रण समिती,**

१. श्रीमती मिनाक्षी रवि पाटील

२. श्री. रविन्द्र दशरथ बागुल

३. श्रीमती रेखा ठाकुर

४. श्रीमती सविता तोरणे (रगडे)

५. श्रीमती ज्योती चैनानी

**१३ प्राथमिक शिक्षण समिती**

१. श्री. जमनादास पुरस्वानी

२. श्री. अशोक बच्चुमल छापरु

३. श्री. राजेश वदारिया

४. श्रीमती डिम्पल ठाकुर

५. श्री. शंकर लुंड

**तसेच**

१) मालमत्ता देखभाल व दुरुस्ती समिती, २) भांडार नियंत्रण समिती, ३) पर्यावरण उपाययोजना व नियंत्रण समिती, ४) प्राथमिक शिक्षण समिती या ४ समित्यांचे कार्यक्षेत्र निश्चित करुन महासभेपुढे आणण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**मंजूर**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** पॉईट ऑफ ऑडर मॅडम, हया अनुशंगाने एक सांगतो मॅडम,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** पुढचा विषय घ्या, मा. महापौर जी,वेळ असा होत आहे. पुर्ढचा विषय ध्या.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** एक गंभीर विषय तुम्हाला सांगतो आहे पॉईट ऑफ ऑर्डर गंभीर विषय सांगतो आहे. तुम्ही लक्ष दया. मा. सचिव मॅडम,

**महापालिका सचिवः—** कृपया मला मा. पिठासीन अधिकारीयांनी सांगितल्या आहे, मला त्यांच्या आदेशचा पालन करायचे आहे. प्रस्तावाची सुचना...

**विषय क्र. १०:— प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवरील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता श्री. कलई सेलवन यांची मुळ विभागात बदली करणेबाबतचा पालिका सदस्य श्री. महेश सुखरामानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** पॉईट ऑफ ऑर्डरचा विचार तरी करा.या विषयासी संबंधित आहे. लक्षात घ्या. या सभागृहाने एक गोष्ट लक्षात ठेवा मा. महापौर जी एक अजून अपंग कल्याणकारी समिती बनवली पाहिजे. शाननाचा तीन टक्केचा शासन निर्णय आहे आपल्यावर गुन्हा दाखल होईल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी सुर्वे साहेबांनी जे नाव दिले आहे, अपंग कल्याणकारी योजना समिति बनवली पाहिजे. सुनिल सुर्वे जी तुम्ही पुढच्या महासभेमध्ये हा प्रस्ताव घेऊन या.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** गरजेचा आहे अपंग कल्याणकारी समिती बनवण्यासाठी आपल्याला शासनाने शासन निर्णय काढला आहे. तीन टक्के त्यावर आपल्याला खर्च करायचे आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** मा. महापौरजी श्री. महेश सुखरामानीजी सभागुहात उपस्थित नाही आहेत म्हणून त्यांची प्रस्तावाची सुचना रदद करण्यात यावी.

त्यावेळी काही सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय म्हणत होते समजून आले नाही.

**महापौर तथा पिठासन अधिकारी:—** कृपया शांतता ठेवा आणि एक एक करून बोला.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** अपंग कल्याणकारी समितीचे सभापती श्री. सुनिल सुर्वे यांना पाहिजे. मा. महापौरजी सुर्वे साहेबाचे सुझाव चांगल्या आहे त्यांने पण समितीसाठी प्रस्ताव दिले पाहिजे. त्यांना सभापती पद देणार आहेत.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** थोडक्यात ऐकूण घ्या, माझा पॉईट ऑफ ऑर्डरवर बोलत आहे मी, शासनाचे शासन निर्णय आहे तीन टक्केचा जर आपण आपल्या बजटचे तीन टक्के वापरे नाही तर आपल्यावर गुन्हे दाखल होणार, असा शासनाने निर्णय दिला आहे. यांची कृपया नोंद ध्यावी.

**महापालिका सचिव:—** हा जो शेवटचा विषय आहे त्यामधले सुचक आणि अनुमोदक दोन्ही ही सभागृहात उपस्थित नसल्याने हा प्रस्ताव संपुष्टात येत आहे. कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** एक मिनिट मा. महापौर मॅडम, तिथे दिलीप मालवणकर उपोषणाला बसले आहे.

**महापालिका सचिव:—** माफ करा, आयुक्त साहेब काही बोलणार आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :—** मा. मॅडम दोन मिनिट बसु दया यांना मालवणकरांचे संदर्भात आपण काय खुलासा दिला आहे, मालवणकर उपोषणाला बसले आहे त्या संदर्भात आपण जो खुलासा दिला आहे मनोज जी दोन मिनिट बसा...

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** शिवसेनाचे माजी नगरसेवक आणि वरिष्ठ पत्रकार आणि शहराचे बुध्दिजिवी दिलीप मालवणकर जी मागचे तीन दिवसा पासून उपोषणाला स्मशानभुमीच्या बाहेर बसले आहे त्यांची जी मागणी आहे की श्री.युवराज भदाणे, जनसंर्पक अधिकारी यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. त्यांचे जी मागणी आहे की लेखा अधिकारी श्री. दादा पाटील यांनी जाता जाता तडकाफडकीमध्ये करोड रूपयाचे बिल ठेकेदाराकडून पैसे घेऊन त्यांचे बिल पास करण्याचे प्रयत्न केले आणि काही पास करून केले आहे आणि फुटबॉल क्रिडा महोत्सव झाले होते त्या महोत्सवमध्ये किती भ्रस्टाचार झाला त्यांचे अतिरिक्त अॅट्रासिटी अंतर्गत त आमचे पुर्वीचे आयुक्त, श्री निबाळकरजीने १३ लाख रूपये अॅडव्हकेटचे फी पास करण्यात आली आहे आणि तो पास झालेला ठराव आयुक्तांनी ४५१ मध्ये प्रशासनाकडून रदद करण्यासाठी पाठविले पाहिजे होते आणि त्यांची जी मागणी आहे त्यांचेवर कार्यवाही केली पाहिजे, आणि त्या वरिष्ठ नागरिक, वरिष्ठ पत्रकार असून तुम्हाला निर्णय घेतली पाहिजे. आणि तुम्ही त्यांना सहानुभूती दाखविली पाहिजे. कारण की त्यांची नजर हया महासभेत आहे की या महासभेमध्ये त्यांचे उपोषणावर काय निर्णय घेणार आहेत. त्यामुळे तुमच्या तर्फे काही तरी आदेश दिले पाहिजे आणि त्यांचे उपोषण सुटले पाहिजे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सांवत :—** मा. महापौर जी, दिलीप मालवणकर हे शिवसेनाचे माजी नगरसेवक होते त्यानंतर राष्ट्रवादी पक्षामध्ये प्रवेश करून त्यांनी राष्ट्रवादी पक्षेतर्फे निवडणुक लढविले होते त्यामुळे शिवसेनाचे माजी नगरसेवक म्हण्णू शकत नाही आणि त्यानंतर शिवसेनात प्रवेश दिल्याची बातमी माझ्याकडे अधिकृत नाही. इथे दिलीप मालवणकर शिवसेनाचे माजी नगरसेवक आहे गृहित धरू नये, धन्यवाद.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** मा. महापौर महोदया, आदेश देण्या अगोदर मी एक विषय सांगतो या नंतर प्रत्येक दिवशी तुमच्या महापालिकाचे समोर जेष्ठ असतील, श्रेष्ठ असतील, कनिष्ठ असतील, अनिष्ठ असतील, अरिष्ठ असतील उपोषण करत बसतील प्रत्येक उपोषणानाची दखल त्या पध्दतीने घेतला पाहिजे ज्या पध्दतीने आता सांगतात. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, काळ सोकावता कामा नये. कोण एक उपोषणाला बसला म्हणून त्यांचा विचार काय? राष्ट्रगीताची घोषणा झाली नंतर शुध्दा चर्चा होते किती इंटरेस्ट तुमचा? राष्ट्रगीताची गोष्ट आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** नाही नाही फक्त राष्ट्रगीताची घोषणा झाली, पण सुरू झाले नव्हते.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** कोणत्या व्यक्तिला महत्व नाही, तुम्ही प्रत्येक उपोषणाचे तुम्ही अशी दखल घेणार का? या ठिकाणी सांगा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** मा. महापौरजी विरोधी पक्षनेताचे म्हणणे हेच आहे की प्रत्येक उपोषणासाठी तुम्हांला अशा पध्दतीने दखल घेतली पाहिजे, ठीक आहे.

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:—** मा. महापौरजी उपोषणाची दखल घेतली पाहिजे, विषय एवढा गंभीर आहे उपोषणाची दखल घेतलीच पाहिजेत.ण्ध्

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** महापौर मॅडमने आता पर्यंत सुचना दिली नाही, सचिव मॅडम.

**महाापौर तथा पिठासन अधिकारी:—** सन्माननीय सदस्य कृपया शांततेने खाली बसावे.

**सदस्य श्री.भगवान भालेराव:—** मा. महापौर मॅडम, विषय गंभीर असून उपोषणाची दखल घेतली पाहिजे.

**महाापौर तथा पिठासन अधिकारी:—** राष्ट्रगीताची घोषणा यांनी केली होती, पण सुरू झाले नव्हते. आमचे भाऊ दिलीप मालवणकर यांच्यासाठी जी गोष्ट सदस्यांनी सांगितले आहे तो चार दिवसा पासून तिथे बसले आहेत मी सन्माननीय साहेबांनी सांगते की तुम्ही तिथे जाऊन ते काय म्हणणत आह? तुम्ही त्यांचे म्हणणे काय आहे? लक्षपुर्वक ऐकुन घ्या, चार दिवसा पासून बसले आहेत हृदयविकार रोग असून मानवतेच्या दृष्टीकोणातून तिथे जाऊन आम्हाला अश्वासन देणे आवश्यक आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** धन्यवाद.

**महापालिका सचिव :—** कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

ि जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ६.१९ वाजता महापौर, श्रीम. मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**दिनांकः— ०२/५/२०१८**

## <u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ०२/५/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

**२**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक ०२/०५/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता घेण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३७ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ३८ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ५ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३९ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ६ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ४० | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४१ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ८ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४२ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ९ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४३ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४४ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ११ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४५ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १२ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४६ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १३ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १४ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४८ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १५ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४९ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १६ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ५० | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १७ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ५१ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १८ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ५२ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १९ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५३ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २० | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५४ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५५ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| २२ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५६ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २३ | श्रीमती शुभांगिनी निकम | ५७ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५८ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २५ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसूळ | ५९ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २६ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ६० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २७ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ६१ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २८ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६२ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २९ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६३ | श्री. विजय चाहु पाटील |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६४ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३१ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६५ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३२ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६६ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३३ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६७ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३४ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६८ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३५ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६९ | अरूण लक्ष्मण आशान |
| ३६ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ७० | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती आशा नाना बिराडे, २. श्री. अशोक बच्चुमल छाप्रु, ३. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ४. श्री. भगवान शंकर भालेराव, ५. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ६. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ७. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, ८. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, ९. श्रीमती कांचन अमर लुंड, १०. श्री. भारत रामचंद्र राजवानी, ११. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, १२. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

२३.श्री. दादा पाटील, मुख्य लेखाधिकारी
२४.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
२५.श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
२६.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
२७.श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता
२८.श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
७. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
४३.श्री. वानखेड, लेखा परिक्षक
४४.श्री. संतोष जाधव, सहा. लेखा अधिकारी
४५.श्री. प्रबोधन मवाळे, सहाय्यक आयुक्त
४६. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
४७. श्री. मनीष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
४८. श्री. नंदलाल सामतांनी, प्र. सहाय्यक आयुक्त
४९. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त
५०.श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता
५१.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
५२. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
५३. श्री. डी.एस. पाटील, शाखा अभियंता
५४. श्री. तिजोरे, शाखा अभियंता
५५. श्री. वानखेडे, शाखा अभियंता
५६. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
५७.श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
५८.श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक
२४. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२५. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२६. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक
२७. श्री.दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१.श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

सायंकाळी ४.३३ वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

या वेळी मा. आयुक्तांच्या स्थानी श्री. दादा पाटील, मुख्य लेखाधिकारी हे आसनस्थ होते.

**महापालिका सचिवः—** पहीला विषय आहे....

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** मा. महापौरजी, मी फक्त एक मिनीट बोलतो, आपले लेखाधिकारी, श्री. दादा पाटील, एक दिड महीन्यामध्ये सेवानिवृत्त होणार आहेत. तर त्याच्या पहीलेही निरोप आला की, त्यांना आयुक्तांच्या स्थानी बसवण्यात यावे. त्यासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** मा. महापौरजी, या सभागृहाचे सर्व सदस्य, काल १ मे, महाराष्ट्र दिन संपुर्ण महाराष्ट्रामध्ये संपन्न करण्यात आला. परंतु उल्हासनगरमध्ये महानगरपालिकेतर्फे हा समारंभ करण्यात आला, तर प्रोटोकॉलच्या हिशोबाने मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्तजी आणि सर्व वरिष्ठ अधिकारी/पदाधिकारी उपस्थित राहायला पाहीजे होते. परंतु ही ही खुप दुःखाची गोष्ट आहे की, सभागृहाच्या काही सदस्यांना त्या कार्यक्रमाची निमंत्रण पत्रीका दिली नाही. दुसरे म्हणजे महापौर, उप महापौर या कार्यक्रमाला उपस्थित नव्हते. महाराष्ट्र दिनाचा सरासर अपमान केला आहे. उल्हासनगरचा संपुर्ण महाराष्ट्रामध्ये एक वेगळा मॅसेज दिला आहे. मी आपणास सांगतो की, याचे पण स्पष्टीकरण व्हायला पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** मा. महापौरजी, मा. उप महापौरजी, सभागृहाचे सर्व सदस्य, कालचा जो महाराष्ट्र दिवस आणि कामगार दिवस, या महाराष्ट्रामध्ये, महाराष्ट्र राज्याच्या वतीने जे काही महाराष्ट्राचे शासकिय कार्यालय आहेत, महानगरपालिका आहेत, तहसिदार कार्यालय आहेत, प्रांत कार्यालय आहेत, तिथे ध्वजारोहन करून हा कार्यक्रम साजरा केला जातो. उल्हासनगर महानगरपालिकेत काय पध्दत आहे? ती आम्हांला सांगितली तर बरे होईल. आपण इथे करतो, कुठल्या पध्दतीने करतो? किती वाजता करतो? कसे करतो? त्या कार्यक्रमाचे अरेंजमेंट कोणता डिपार्टमेंट करतो? आणि ते करत असतांना कोणाकोणाला निमंत्रण दिले जाते आणि ते निमंत्रण आणि ते निमंत्रण तुम्हांला दिले असेल तर तुम्ही बाहेर कुठे जाणार असाल आणि जर निमंत्रण दिले आहे, महापौर इथे उपस्थित नसतील तर उप महापौरांना सांगणे त्यांची जबाबदारी आहे की, असा कार्यक्रम आहे, आपण त्या कार्यक्रमासाठी उपस्थित रहा, मी इथे नाही, या कार्यक्रमाला मी येऊ शकत नाही. तर आपण उपस्थित रहा. जर असे होत नसेल तर महाराष्ट्र दिवसाचा अपमान करण्याचा अधिकार तुम्हांला दिला कोणी? तुम्ही अपमान करणारे कोण आहेत? महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी खुप हुतात्मे झाले आहेत. त्या लोकांनी बलीदान दिले आहे. १०७ हुतात्म्यांनी बलिदान दिल्या नंतर या महाराष्ट्राचे महाराष्ट्र राज्य बनले आणि अशा वेळी आपण जर ..... आयुक्त साहेब, एक महीना प्रशिक्षणासाठी गेले आहेत आणि त्यांचा चार्ज महाराष्ट्र शासनाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्तांना दिला आहे. त्या आयुक्तांची जबाबदारी आहे, ते आयुक्त या महानगरपालिकेचे कामकाज करण्यासाठी तयार नाहीत. तर हा शासनाचा अपमान आयुक्त करीत आहेत. जर त्यांना काम करायचे नाही, तर त्यांनी शासनाला सांगायला पाहीजे की हे काम मी करू शकत नाही, ही जबाबदारी घेऊ शकत नाही. इकडची जबाबदारी झुगारून मी हे काम करणार नाही, तुमचे आयुक्त येतील तेव्हा ते काम करतील. तर सरासर या शहरामध्ये राहणारे जे लोक आहेत, त्यांचा अपमान आहे आणि त्यांना महानगरपालिकेकडून जे सुविधा पाहीजेत त्याचा अपमान आहे. या आयुक्तांना कोणाचे अपमान करण्याचा अधिकार नाही? आजच्या महासभेमध्ये आयुक्त कुठे तरी गेले असतील, पण त्यांना येणे गरजेचे आहे, तर महासभा आटेंन्ड केली तर कोणता फरक पडणार आहे? असे मला वाटत नाही. परंतु आपल्या इथे आपण महापौर म्हणून सत्तेमध्ये बसल्या आहेत, तर आपले काम आहे की, आपण आयुक्तांना सांगायला पाहीजे की, साहेब, आपण महासभेमसाठी उपस्थित रहा. इथल्या लोकांची कामे करा, जर आपण काम करणार नसतील तर आपण शासनाला बोला की, मी काम करणार नाही. मला या महानगरपालिकेचा एक महीन्याचा चार्ज दिला आहे, तो मी सांभाळू शकत नाही, असे त्यांनी शासनाला सांगायला पाहीजे. परंतु शासनाने दिलेली जबाबदारी जर सांभाळू शकत नाहीत, तर हा शासनाचा अपमान आहे, मा. मुख्यमंत्री यांचा अपमान आहे. हा अपमान करण्याचा अधिकार कोणालाही नाही? महाराष्ट्र दिनाचा जो अपमान झाला आहे. तो अशा प्रकारेच झाला आहे, असे मला वाटते. इथे जे प्रभारी आहेत, ते या कार्यक्रमाचे आयोजन करतात, मला वाटते की, मुख्यालयाने कार्यक्रमाचे आयोजन करायला पाहीजे. महाराष्ट्रामध्ये जे पण तहसिलदार कार्यालय आहेत, प्रांत कार्यालय आहेत, ते निमंत्रण कार्ड छापतात आणि ते कार्यक्रमाचे आयोजन करतात, आम्हांला निमंत्रण पाठवतात आणि ही महानगरपालिका जो ७०० करोडचे बजेट आहे, एक महीना पहीले आम्ही बजेट पास केले आहे आणि महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमाचे ते निमंत्रण पत्रिका छापत नसतील, कार्यक्रमाचे आयोजन करत नसतील आणि धुमधडाक्यात कार्यक्रम करीत नसतील तर ही शरमेची गोष्ट आहे. तर यावर आपण सगळयांनी मिळून लक्ष दयायला पाहीजे आणि आपल्याकडून जर चुकी झाली आहे, त्यासाठी महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी जे हुतात्मे झाले आहेत, त्यांची माफी आपण मागायला पाहीजे, अशी माझी मागणी आहे. मी सर्व

विरोधी पक्षाच्या वतीने, जी आमच्याकडून सुध्दा चुकी झाली, कार्यक्रमासाठी विरोधी पक्ष नेता नव्हते, त्यांच्या वतीने मी ज्या हुतात्मे झाले, त्यांच्यामुळे आपल्याला महाराष्ट्र राज्य मिळाले त्यांना मी अभिवादन करतो आणि महाराष्ट्राची जनता आणि उल्हासनगरच्या जनतेची मी माफी मांगतो, परंतु आपण पण मान्य केले पाहीजे, अशी माझी मागणी आहे.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—** मा. महापौर, मा. उप महापौर आणि मा.आयुक्त, सर्व प्रथम कालच्या महाराष्ट्र दिनाच्या, माझ्या शिवसेना पक्षातर्फे जाहीर निषेध करतो. कारण कालच्या कार्यक्रमात, झेंडावंदनाच्या कार्यक्रमात महापौर, उप महापौर आणि बरेचसे आयुक्त लेवलचे मुख्याधिकारी त्या ठिकाणी उपस्थित नव्हते. त्या सर्वांचा मी निषेध करतो आणि या ठिकाणी मी अशी मागणी करातो की, काल जे कर्मचारी गैरहजर होते, महानगरपालिकेचे कर्मचारी झेंडावंदनाच्या कार्यक्रमास अनुपस्थित होते. त्यांच्यावर कायदेशिर कारवाई करावी, अशी देखील मी मागणी करतो, त्याच प्रमाणे एवढा महत्वाचा मुद्दा असा आहे की, सकाळी ७.०० वाजता आपण झेंडावंदन केले, ७.०० वाजता झेंडावंदन करणे हा कुठल्या जी.आर.मध्ये बसते किंवा महाराष्ट्र शासनाने असा कुठला जी.आर. पाठवला होता की, सकाळी ७.०० वाजता झेंडावंदन उरकून घ्या म्हणून असा कही जी.आर. पाठवला होता का? आयुक्त साहेब, तुम्ही आताच्या आता या सभेमध्ये आम्हांला उत्तर दया. असा काही जी.आर. होता का? सकाळीच ७.०० वाजता झेंडावंदन करायला पाहीजे म्हणून. त्याच प्रमाणे मी संपुर्ण जाहीर आपल्याला विनंती करतो की, कालच्या झेंडावंदनाच्या कार्यक्रमात महापौर आणि उप महापौर गैरहजर असल्या कारणाने त्यांनी आजच्या सभेमध्ये आपली जाहीर माफी मांगावी आणि हुतात्म्यांना अभिवादन करावे. जर ते जाहीर माफी मांगत नसतील, महापौर आणि उप महापौर मी काय बोलतो ते माझ्याकडे लक्ष दया? काल आपण झेंडावंदनाला गैरहजर राहीलात त्या बददल आपण जाहीर माफी मागावी अशी मी आपल्याकडे मागणी करतो. जर आपण जाहीर माफी मांगत नसाल, तर आजच्या सभेमध्ये इथे बसण्याचा आपल्याला काहीही अधिकार नाही. असे मी म्हणतो. आता हा कालच्या झेंडावंदनाचा मुद्दा झाला. दुसरा मुद्दा असा होता की, २६ जानेवारी, २०१८ मध्ये आपण ब—याच नगरसेवकांना निमंत्रण पाठवले नव्हते. त्या वेळेस पण हा प्रश्न विचारला होता की, २६ जानेवारीचे निमंत्रण पत्रिका का मिळाल्या नाहीत किंवा आपल्याकडून वाटायला विलंब झाला ठिक आहे, २६ जानेवारी झाल्या नंतर कालचा झेंडावंदनाचा कार्यक्रमाचे सुध्दा तसेच झाल. आणखी एक महत्वाचा मुद्दा आहे. २० एप्रिलला जिल्हा नियोजन समितीच्या निवडणूकीचे अर्ज भरायचे होते, फॉर्म भरायचा होता, त्याची नोटीफिकेशन आपल्याकडे आली होती. आयुक्त साहेब, मी तुम्हांला विचारतो तुम्ही सांगा, मी काय म्हणत आहे ते? जिल्हा नियोजन समितीच्या निवडणूकीची नोटीफिकेशन आपल्याकडे आली होती आणि २० एप्रिल, २०१८ रोजी त्या जिल्हा नियोजन समितीचा अर्ज भरण्याची शेवटची तारीख होती, दुपारी ३.०० वाजे पर्यंत शेवटची तारीख होती आणि माझ्या माहीती प्रमाणे कुठल्याही नगरसेवकाला जिल्हा नियोजन समितीचे नोटीफिकेशन पोहचलेले नाही. असे का झाले आणि गुपचुप गुपचुप ते फार्म भरले गेले. असे मला वाटते. परंतु असे जर असेल तर हे प्रशासन चालवते कोण? कुठले अधिकारी काम करतात, माझ्याकडचे जर नोटीफिकेशन तुम्ही जर बघितले, परंतु नोटीफिकेशन मला अप्रत्यक्ष मला मिळाले, ते २० तारखेच्या नंतर दुपारी ३.०० वाजण्याच्या नंतर मिळाले. त्या नोटीफिकेशनवर श्रीम.कंठे मॅडमची सही होती. कंठे मॅडम आता असतील तर त्यांनी सांगावे की, आपण जर अशा नोटीफिकेशवर अशी सही करतात. मग ती वेळेवर का पोहचवत नाही. २० तारखेला दुपारी ३.०० वाजता मला नोटीस मिळते आणि दुपारी ३.०० वाजता फार्म भरण्याची वेळ संपलेली असते. हा कुठला प्रकार आहे? जर उद्या मला त्या निवडणूकीला उभे राहायचे असते, तर मी माझ्या पक्षाला फार्म भरण्याची कधी वेळ मिळणार? आणि तो अर्ज कसा भरणार? हा विषय वेगळा आहे.परंतु सर्वात महत्वाचा मुद्दा हा आहे की, आपण कालचा जो प्रकार केलात, आमच्या १०७ हुतात्म्यांचा अपमान केलेला आहे, महापौर महोदया, उप महापौर महाशय तुम्हांला सुध्दा सांगतो की, तुम्ही सुध्दा आमच्या १०७ हुतात्म्यांचा अपमान करून, आमच्या हुतात्म्यांनी जो महाराष्ट्र निर्माण केला आहे. त्यांचा तुम्ही काल अपमान केला, झेंडावंदनाला आपण दोघेजण गैरहजर राहीलात त्या बददल आपण सभा सुरू होण्यापुर्वी जाहीर माफी मांगावी, अशी आपणास नम्र विनंती करतो. जर जाहीर माफी मांगत नसाल तर मी माझ्या पक्षाच्या वतीने सांगतो की, आजची सभा चालवण्याचा आपल्याला काहीही अधिकार नाही आणि त्यांच्यावर कारवाई होई पर्यंत आजची सभा चालवू देणार नाही, अशी आपल्याला विनंती करतो, धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** सचिव मॅडम, असे कार्यक्रम करतांना एक तर कुठल्या पध्दतीने ते करायचे असतात आणि त्याचा प्रोटाकॉल काय असतो? आणि त्याच्यामध्ये जर तो प्रोटोकॉल पाळला गेला नाही, तर काय कारवाई करू शकतो?

**महापालिका सचिवः—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सभागृह, टाले साहेबांनी जो प्रश्न विचारला आहे, तो खरा तर जनसंपर्क अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे आणि आता ते उपस्थित नाहीत, त्यांचे लिपीक आहेत, पण त्यांना पण एवढी माहीती नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** आणि कोणीही कोणाचा अपमान करायचा आणि हजर राहयचे नाही आणि नंतर सांगायचे की, माहीती नाही, असे आहे का? हा गंभीर विषय आहे, महाराष्ट्राच्या अस्मितेचा विषय आहे. गंभीर विषय आहे आणि या गंभीर विषयाची जर मस्करी करणार असाल तर ते चुकीचे आहे.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—** आयुक्त साहेब, आजच्या मिटींगला आयुक्त नाहीत, आज एक अकाऊंट ऑफिसर मिटींग चालवणार आहेत का? हे काय चालले आहे? हे काय होत आहे?

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** काल मी उपस्थित राहू शकले नाही, याचे मला दु:ख आहे. मला महत्वाच्या कामासाठी, माझी नात आहे, तीला १०३ डिग्री ताप होता आणि माझ्या मुलीला पण हाय फिवर होता, मी जात नव्हते, परंतु मुलीच्या सासूला पण पॅरेलायसिसचा अॅटॅक आला आहे, ते आता हिंदुजा हॉस्पिटलमध्ये अॅडमीट आहेत. तर त्यासाठी मला रात्रीच अर्जंट जायला लागले. कालच्या १ मेंच्या कार्यक्रमाला मी येऊ शकले नाही, त्यामुळे मला खुप दु:ख आहे आणि भदाणे साहेब, उपस्थित होते.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** महापौर येऊ शकल्या नाहीत, तर उप महापौर येऊ शकले असते, उप महापौर पण नाहीत, महापौर पण नाहीत आणि आयुक्त साहेब पण नाहीत.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** तसे तर मी सर्व कार्यक्रमांना उपस्थित असते, परंतु काल माझी खुप सिरीयसली केस होती, म्हणून मला येता आले नाही, जेव्हा सकाळी ६.४५ ला मला फोन आला तेव्हा मी कारण सांगितले की, मी येऊ शकत नाही, मी मुंबईला आहे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** महापौर नाहीत, उप महापौर तर होते.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** नाही, नाही कार्यक्रम किती वाजता होणार होता, ७.०० वाजता, ९.०० वाजता शासनाचा जी.आर. काय आहे?

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** ७.०० वाजता होता.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** ७.०० वाजता करणे गरजेचे आहे की, ९.०० वाजता करायला पाहीजे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** ९.०० वाजता, जर जी.आर.असेल तर दाखवा, आयुक्त साहेब, तुम्ही दाखवा सकाळी ७.०० वाजता झेंडावंदन करणे असा जी.आर. आहे का?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** आम्हांला पत्र पण मिळाले नाही, आमचे हेच म्हणणे आहे, आपण सभागृह नेता आहेत, तुम्हांला निमंत्रण येते, आम्ही सदस्य आहेत, आम्हांला पण निमंत्रण आले पाहीजे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** महापौर मॅडम तुमची वैयक्तिक अडचण होती, पण आम्हांला निमंत्रण का पाठवले नाही. नगरसेवकांना निमंत्रण का गेले नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** मी जनसंपर्क अधिका—यांना विचारून खुलासा करेल. आज ते हायकोर्टामध्ये आहेत, उद्या आल्या नंतर मी या गोष्टीचा खुलासा करेल.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** महापौर मॅडम, उप महापौर, विरोधी पक्षाकडून मागणी होती की, महापौरांनी माफी मांगायला पाहीजे. महापौरांनी आपली व्यक्तिगत गोष्ट सांगितली त्यांना तिथे जाणे खुप गरजेचे होते, त्यामुळे त्या येऊ शकल्या नाहीत. त्या नंतर त्यांनी दु:ख व्यक्त केले, माझ्या हिशोबाने हा विषय इथेच संपवला पाहीजे आणि जर प्रशासनाने काही गडबड गेली असेल आणि प्रशासनाने केल नाही, त्यासाठी जनसंपर्क अधिकारी आता नाहीत. तरी हा मुद्दा इथेच संपावून जेव्हा ते उपस्थित राहतील तेव्हा हा मुद्दा आवश्यक घेतला जाईल. कारण की हे खुप गरजेचे आहे. मॅडम जेव्हा महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. त्यासाठी १०७ लोकांचे बलिदान झाले आहे. ही गोष्ट आपण नाकारू शकत नाही. खुप मुश्किलपणे मुंबई बरोबर महाराष्ट्र मिळाला आहे. त्यासाठी महाराष्ट्रीयन लोकांनी ज्या प्रकारे आंदोलन केले होते. तर आज मुंबई बरोबर आज महाराष्ट्र आहे तर १०७ हुतात्म्ये आज शहीद झाले आहत, तर त्यांच्यामुळे आहे. तर मी विनंती करतो की, आज जनसंपर्क अधिकारी नाहीत, जनसंपर्क अधिका—यांनी उत्तर दयायला पाहीजे की, कार्यक्रमाचे नियोजन व्यवस्थित केले नाही आणि हा जो विषय तो येणा—या मिटींगमध्ये आपण जनसंपर्क अधिका—यांना विचारू आणि जसे की, श्री. सुरेंद्र सांवत यांनी सांगितले की, जिल्हा नियोजन समितीचे पत्र २० तारखेला मिळाले. हे कोण करते, कसे करतात या गोष्टी लक्षात ठेवून सभा पुढे चालवायला पाहीजे.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** मा. महापौर मॅडम, यासाठी एक सजेशन देते की, आज आपण ई—गव्हर्नरमध्ये संपुर्ण पणे आलो आहोत. तर सर्व नगरसेवकांचे ई मेल अॅड्रेस घेण्यात यावेत आणि याच्या नंतर जे पण निमंत्रण असेल किंवा काही पत्र असतील ते जर आम्हांला ई मेलद्वारे पाठवले तर सर्वांना त्याच वेळेस मिळती आणि कोणालाही प्रॉब्लेम होणार नाही. लेप टॉप आपण घेऊ शकतो किंवा आपण मोबाईलवर घेऊ शकतो. हा पॉईंट

कृपया करून नोट करण्यात यावा आणि महासभेचा अजेंडा आणि जे पण प्रशिक्षण पत्र असतील ते सचिव मॅडम ई मेलद्वारे पाठवतील, धन्यवाद.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** लॅपटॉप बजेटमध्ये प्रोव्हीजन ठेवले आहे, ८२ नगरसेवक आहेत, त्यांना लॅपटॉप देण्यात यावेत कारण ई गव्हर्नर प्रमाणे चालू शकतो आणि हा जो उशिर होत आहे, तो होणार नाही.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—** लॅपटॉप देतांना अजून एक गोष्ट लक्षात ठेवण्यात यावी. सर्व नगरसेवकांना बेसिक ट्रेनिंग होणे गरजेचे आहे. काही असे नगरसेवक असतील किंवा नसतील पण माझ्या नजरेमध्ये काही आहेत. तर सर्वांना इंटरनेट कसे चेक करणार, ई मेल कसे पाठववायचे या बाबतीत नागरीक सुविधा केंद्राकडून एक ट्रेनिंग व्हायला पाहीजे, धन्यवाद मॅडम.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मा. महापौरजी, जसे की, आमच्या प्रदिपभाई यांनी सांगितले की, जिल्हा नियोजन समितीचे पत्र काहीना मिळाले नाही, मला मिळाले पण २० तारखेला सायंकाळी ४.०० वाजता मिळाले होते आणि मी फार्म भरणेसाठी इच्छिुक होतो आणि मला तिकडून फार्म भरण्यासाठी आदेश पण आले होते. मला फॉर्म २० तारखेला मिळाला होता, पण तोच फार्म १५ किंवा १६ तारखेला मिळायला पाहीजे होता. १६ तारखेला पण आला नाही आणि १७ तारखेला पण आला नाही. मला वाचण्यासाठी वेळच मिळाली नाही. जेव्हा वेळ संपत आली, ३.०० वाजेची वेळ होती, पण पत्र मला ४.०० वाजता मिळाले. तर मी फॉर्म कसा भरू शकतो. प्रदिपजीनी सांगितले की याची चांगल्या प्रकारे चौकशी व्हायला पाहीजे. चौकशी कशी होईल, मॅडम आता परत पाच वर्षानी येईल. पाच वर्षानी मी सभागृहामध्ये राहील किंवा नाही हे मला माहीत नाही. तर मी हे कसे सहन करू? की ही गोष्ट एवढी चांगली आहे आणि एवढी सिंपल आहे, मला नाही वाटत की, एवढी सिंपल गोष्ट आहे. हा विषय खुप कठीण आणि गंभी विषय आहे. या विषयाला सिरीयसली घ्यायला पाहीजे होते. मला वाटते की, या बाबतीत काय निर्णय व्हायला पाहीजे? मला फॉर्म भरायचा होता, त्याचे काय होईल? पाच वर्षानंतर काय होईल? माझा टर्मही बाकी चार वर्षे राहीली आहेत, तर मी नियोजन समितीमध्ये कसे जाणार? २० तारखेला सायंकाळी ४.०० वाजता फॉर्म मिळाला, ३.०० वाजेची वेळ संपून गेली. तर ४.०० वाजता फॉर्म घेऊन मी काय करणार? याचे मला ऑफिसली उत्तर दया. मला असे नाही पाहीजे की, इथेच हा विषय संपला आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सचिव मॅडम, प्रकाशजीना ऑफिशली...

**महापालिका सचिव:—** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सभागृह, जिल्हा नियोजन समितीचे फॉर्म हे या वेळी अतिरिक्त आयुक्त, कंठे मॅडमकडून वाटले गेले, आमच्या विभागाकडून वाटले गेले नाहीत. जे खरे आहे, ते बोलावे लागेल साहेब, तो आमच्याकडून वाटले गेले नाहीत तर मी त्याचे उत्तर कसे देणार? जी सत्य परिस्थिती आहे, ती मी सांगितली. माझ्याकडे आल्यावर वेळेवर सर्वच मी वाटते. परंतु यावेळी आमच्याकडे आले नव्हते, खरे तर आमच्याकडे यायला पाहीजे होते. पण आमच्याकडे न येता, या वेळी शासनाने उप आयुक्त, निवडणूक शाखा यांच्याकडे दिल आणि मी त्या वेळी मॅडमला त्या वेळी आठवून करून दिली की, तुम्ही हे वेळेवर वाटा अर्जेंट आहेत म्हणून आणि त्यांनी तसे पत्र पण काढले होते, परंतु उशिर का झाला याचे उत्तर मी देवू शकत नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मॅडम धन्यवाद, आपण जी माहीती दिली, परंतु जो अधिकारी नाही, जनसंपर्क अधिकारी नाहीत तर १ मे चे पत्र मिळाले नाही. ते जेव्हा येतील तेव्हा माहीती होईल आणि आता जिल्हा नियोजन समितीसाठी सुध्दा कंठे मॅडम नाहीत, तर त्यांना कधी विचारणार. तर आता मला सांगा ना त्याचे उत्तर काय असेल? पाच वर्षा नंतर काय होईल? आपण तर उत्तर दिले की, कंठे मॅडम नाहीत. हे उत्तर झाले का? ज्यांच्यावर जबाबदारी होती, ते लोक येत नाहीत. तर मग आम्हांला का बोलवतात? आम्ही कोणाकडून उत्तरे मागवू, भिंतीकडून? भिंतीकडून कसे उत्तर मागणार? मॅडम सांगा ना हे काय आहे?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** आपण कोणाला विचारत आहेत?

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** भिंतींना? जेव्हा बघितले तेव्हा अधिकारी नाहीत, ज्याचा विषय आहे, ते अधिकारी उपस्थित राहत नाही. मागच्या एक वर्षापासून हेच चालले आहे. ज्या सदस्यांचा विषय असतो, त्याचे उत्तर मिळत नाही. नंतरच्या मिटींगमध्ये हा विषय नंतरच्या मिटींगचा नाही, हा पाच वर्षाचा विषय आहे. मला नियोजन समितीमध्ये जायचे होते, पण जाऊ शकत नाही, असे का? नंतरच्या मिटींगमध्ये काय विषय घेऊ? आणि का घेऊ? उद्या तर त्याचे विथ ड्रॉ आहे, मी त्याचा फार्म भरू शकतो का? याचे उत्तर दया, कोणीही उत्तर देत नाहीत? भिंतीच आवाज ऐकत आहेत, शांतता पसरली आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** साहेब, तुम्हांला माहीत आहे की, तिथे जी पण फाईल जाते, त्या फाईलवर जो पर्यंत काही वजन पडत नाही, तो पर्यंत ती फाईल तेथून हालत नाही, असा त्या डिपार्टमेंटचा रेकॉर्ड आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** वजन म्हणजे काय?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** म्हणजे त्यांनी स्वतः तिकडे जायला लागते.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** सुर्वे साहेब, वजन म्हणजे काय आहे, त्याची व्याख्या करा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** वजन म्हणजे तेच ना, जो माणूस तिथे जात नाही. तो वजनी माणूस जात नाही, तिथे भेटत नाही. तो पर्यंत कुठलीच फाईल हालत नाही, असा इतिहास आहे, गेल्या तीन वर्षाचा इतिहास आहे आणि हे आता निवडणूकीचे पत्र दिले नाही, निवडणूक आयोगाने, माझी सगळयांना विनंती आहे की, ही तक्रार निवडणूक आयोगाला केली पाहीजे आणि निवडणूक आयोगाने त्यावर कारवाई केली पाहीजे. कारण फाईल तिथे गेल्या नंतर काय माहीती? ती फाईल तेथून हालतच नाही. कुठला अधिकारी सांगेल का तिथे फाईल गेल्यावर का थांबते? कंठे मॅडमचा विषयच मोठा आहे, तिकडे गेल्यावर फाईल का हालत नाही. काही काही अधिकारी असे आहेत की, खरचं त्यांना मानले पाहीजे. गेंडयाची कातडी असे म्हणणे कमी पडेल, त्यामुळे सदरचा विषय सगळयांच्या म्हणणे प्रमाणे प्रलंबित ठेवा. त्यांना येऊन खुलासा करू दया, कारण की ही गंभीर बाब आहे, निवडणूकीच बाब आहे आणि मला वाटते की, निवडणूकीचे बिएलओनी काम नाही केले तर सस्पेंड करतात. तर हा एवढा मोठा इश्यु आहे आणि आम्हांला, आजच्या सभागृहाच्या सदस्यांना महत्वाची माहीती अशी आहे की, प्रत्येकाला ओळखपत्र मिळाले आहे, एस.इ.ओ. आता स्टॅप मिळाला नाही. हे ओळखपत्र मिळून बरा किंवा पंधरा दिवस झालेत. आता त्यांच्या हाताखाली कोण काम करते, हे मला माहीती नाही, अजून कोण ॲडीशनल आहेत, मला माहीती नाही. तर मला मनीषराव हा तरी खुलासा सांगा, तुम्ही आयकार्ड दिले आणि त्याच्या बरोबर स्टॅप आणि शिक्का कधी देणार? बोलायला लाज वाटते. खरंच लाज वाटते की, काय काम करतात आणि कसला पगार घेतात?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** कंठे मॅडम कुठे गेल्या आहेत?

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** मा. महापौर, मा.उप महापौर, मा. आयुक्त, एस.इ.ओ. च्या कार्ड संदर्भात आता दोन दिवसापुर्वी सहसिलदार कार्यालयाकडे तुमचे एस.ई.ओ. चे आयकार्ड आलेले आहेत.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** आयकार्ड येऊन पंधरा दिवस झालेत, तुम्हीच वाटलेत आम्ही येऊन घेतले नाहीत. हे तुम्ही लक्षात घ्या. तुम्ही आम्हांला एस.इ.ओ. म्हणून आयकार्ड दिले आहेत. आता आयकार्ड गळयात टाकून फिरायचे का?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** आयकार्ड आम्हांला मिळाले आहेत.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** याच सभागृहामध्ये दिले होते, मनीषजी, याच सभागृहामध्ये बेंचवर दिले होते.

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** स्टॅप दुस—या दिवशी देवू असे सांगितले होते.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुलः—** साहेब, कार्ड आम्हांला मिळाले आहेत, स्टॅप मिळाले नाहीत.

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** स्टॅम्पच्या संदर्भातच बोलत आहे, स्टॅम्प आलेले आहेत.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** कुठे तुमच्या घरात, कुठे आलेले आहेत?

**सदस्या, श्रीम. मिना सोनेंजीः—** आता चार दिवस तर सरकारी सुट्टया होत्या, मग दोन दिवसापुर्वी कसे काय आले?

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** त्यांचे पत्र आले आहे, दोन दिवसापुर्वीच.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** पत्र काय आले आहे?

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** ते आमच्याकडे आले आहेत, उपलब्ध करून घ्या, म्हणून.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** वराती मागून घोडे, आपल्याकडे म्हण आहे ना?

**सदस्या, श्रीम. मिना सोनेंजीः—** ते पत्र कधी देणार आहेत?

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** तहसिलदार कार्यालयात आहे. त्यांच्याकडून आम्ही घेणार आहेत.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** कधी?

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** आज किंवा उद्या सकाळी.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** आम्हांला कधी मिळणार?

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेंजी:—</u>** आज किती वर्ष झालेत, दोन मिनीटात पोहचणार का तुम्ही?

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:—</u>** वर्षे झाले, वर्षे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** आज सगळे सदस्य हजर आहेत, आले असतील तर बोलावून घ्या आणि वाटून टाका?

**<u>प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरे:—</u>** ठिक आहे, ठिक आहे.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:—</u>** १४ महीने झालेत.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** बराच वेळ चर्चा चालू आहे, या सभागृहातील चित्र बघितल्या नंतर, या उल्हासनगरचे भवितव्य कसे आहे? ते सर्व पब्लिक बघते. कोणीही सिरीयस नाहीत, तुम्ही सिरीयस नाहीत, उप महापौर सिरीयस नाहीत आणि संपुर्ण सभागृह सिरीयस नाही. ही वस्तुस्थिती आहे आणि त्याचा फायदा प्रशासनाने घेतला आहे, आज काय आहे? आपण इथे चर्चा करीत आहेत, त्याच्यातून काही निष्पण होणार आहे, काही फायदा होणार आहे का? नाही. प्रत्येक नेत्याला आत्मपरिक्षणाची गरज आहे. आपण काय करीत आहेत? आणि काय करणार आहेत? उल्हासनगर कुठे होते, कुठे जाणार आहेत? ना दिशा आहे ना दशा आहे. प्रत्येक गोष्टीवर कोणीच सिरीयस नाही? फक्त उल्हासनगर महानगरपालिका चालत आहे. पाणी देत आहेत, वॉलमेनमुळे ऑफिसर काम करीत नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाची परिस्थिती, ज्या विषयावर मागच्या वेळेस चर्चा झाली होती, ३८ प्लॉनवर त्या वेळी नगररचनाकार विभागाचे एकही अधिकारी नव्हते. आता महासभा का चालवत नाही? फक्त टाईमपास करीत आहेत. फार्मुलिटी पुर्ण करीत आहेत, बाकी काहीच नाही. चर्चा करणार आणि काहीच नाही. आपण काय देणार आहेत उल्हासनगरला? एक आयुक्त नाहीत, उप आयुक्त नाहीत, अतिरिक्त आयुक्त नाहीत. आपण फक्त पगार देत आहेत, महीना भरतात पगार घेतात, निघून जातात. काय करीत आहेत? उल्हासनगरच्या जनतेला महासभेच्या माध्यमातून, महानगरपालिकेच्या माध्यमातून काय देत आहेत? आपण कधी विचार केला आहे का? कोणीच केले नाही? प्रत्येक जण आपल्या स्वार्थासाठी बोलतात, स्वार्थ साधला जातो विषय संपला जातो, अधिकारी पण तसेच झाले आहेत. एक पण अधिकारी कामाचे नाहीत, जवळपास फक्त दिवस काढत आहेत. त्यांना काहीच नाही, त्यांचे टाईमपास होत आहे, पगार मिळत आहे. फरक एवढाच आहे की, त्यांना टाईमपासचा पगार मिळत आहे, टाईपासमुळे मजा पण चालत आहे. भोगत आहे, या शहराची जनता. आपण यांच्यावर कधी विचार करणार? सिरीयस कधी होणार? डॉ. प्रकाश नाथानी यांनी सांगितले की, आमचे पाच वर्षे, पाच वर्षे काय दहा वर्ष असेच जातील. आम्ही का इथे येत आहेत? महासभा का बोलवत आहेत आम्ही? चर्चेतून काही निष्पन्न होते किंवा नाही होत? काहीच होत नाही? फक्त महासभा लावली आम्ही चर्चा करती आहेत, इथे बोलत आहेत आणि निघून जाणे. ऑफिसर कोणीच सिरीयस नाहीत. एक पण डिपार्टमेंट मला सांगा की, कोणी व्यवस्थित काम करीत नाहीत? सार्वजनिक बांधकाम विभाग काहीच व्यवस्थित नाही. टेंडर झाले आहेत, मागच्या दोन वर्षाचे ते पण झाले नाहीत आणि जे झाले आहेत, वर्क ऑर्डर दिले आहेत, काम झाले आहे किंवा नाही हे माहीत नाही. परंतु जो काम चालू आहे, त्याची क्वालिटी काय आहे? कधी सिंधू भवनची चर्चा होते? कधी ब्रिजची चर्चा होते? कधी शाळेची चर्चा होते? हे काय चालू आहे? देशात व्हॉटस अपवर, सोशल मिडियावर पब्लिक इंट्रेस घेत आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागा काय करीत आहे? नगररचनाकार विभागाची आवस्था काय आहे? पाणी पुरवठा विभगाची काय आवस्था आहे? आज आम्ही लोकप्रतिनिधी एम.आय.डी.सी., एरिगेशन डिपार्टमेंटकडे जाऊन पाणी वाढवून घेतले आहे, नाही तर आमची आवस्था काय राहीली असती? आपला डिपार्टमेंट काय करीत आहे? पगार घेत आहेत. पाणी पुरवठा विभाग फक्त वॉलमेन चालवत आहेत, मी एकदम खात्रीने सांगतो. सॅनिस्टेशन डिपार्टमेंटची योजना काय आहे? डंपिंग ग्राउंड जर बंद झाले तर आपल्याकडे आज काय आहे? कोणी विचार करायला तयार नाही? सचिम मॅडमनी उत्तर देवून टाकले, ते कंठे मॅडमकडे होते. कंठे मॅडम बोलतात की, सचिव मॅडमकडे, आम्ही हेच विचार करणार का? कलेक्ट टू कॉप्रोरेशन ॲडमिनीस्ट्रेशनचा अर्थ काय आहे? आम्ही प्रत्येक गोष्ट विचारणार का? जसे की त्यांचे उत्तर असते हे आमच्या डिपार्टमेंटचे काम नाही. जर कोणी माहीती अधिकारमध्ये माहीती मांगतात तर हे लिहून पाठवतात की, हे आमच्या डिपार्टमेंटच्या संबंधित नाही, संबंधित कोणत्या डिपार्टमेंटशी आहे? संपुर्ण टीमवर्क कधी होणार यांची? काय चालले आहे इथे किती ऑफिसर आहेत? आम्ही इथे महासभा चालवून आपण मला खात्री दया. इथे जे निर्णय होतील, जे पण होतील त्याची अंमलबजावणी झाली पाहीजे. हा पहीला मुद्दा मी विरोधी पक्ष नेता आपल्याला विचारत आहे. जर होत नाहीत तर महासभा चालवू नका? सरकारला लिहून पाठवा की, महासभा चालवून आम्ही उल्हासनगरच्या जनतेला काहीच देत नाही? ना पाणी देत नाही आणि साफसफाई देत नाही, प्रोजेक्ट नाही, काय देत आहेत आपण? खेमानी नाल्याचा डाव्हर्सचा प्रोजेक्ट आहे, दिड वर्षापुर्वी पुर्ण करायला पाहीजे होता किंवा सहा महीन्यापुर्वी पुर्ण करायला पाहीजे होता, नाहीतर पेनाल्टी लागेल असे सांगितले होते, काय झाले त्याचे? वडोल गावाचा पुल काय? आपण काय देत आहेत? कधी तरी प्रश्न स्वत:लाच विचारायला पाहीजे, कोणीच विचारत नाही? पहीले सर्वच नगरसेवकांनी सांगितले सिरीयसली काय आहे? पाच अधिकारी येतात, कर्मचारी येतात, निमंत्रण कोणाला जाते, कोणाला नाही हे कोणाचे काम आहे? आपले नियंत्रण नाही आणि फक्त त्यांना चालवायला येते बस, काय करती आहेत? ॲडमिनीस्ट्रेशनचा डिपार्टमेंट काहीच नाही, कोण बसले आहेत? कोण बसले आहेत? कोण

कसले काम करीत आहे, आपण विचारच करती नाही. श्री. राज असरोंडकर यांनी एक गोष्ट सांगितली होती तेव्हा, एक राज्य होते, त्या राज्यामध्ये एक निविदा काढली होती की, चांगले घोडे घेऊन या. प्रधानजी यांनी निविदा मागवल्या, एक व्यापारी घेऊन आले, त्यांनी सांगितले घोडे आहेत, प्रधानजी बोलले की नाही गाढव आहे, ते सांगत होते की, नाही घोडेच आहेत. ते कोर्टात गेले, कोर्टामध्ये केस दहा वर्षे चालली, पंधरा वर्षे चालली आणि कोर्टानी मान्य केले की नाही हे घोडे नाहीत, हे गाढवच आहेत. त्यामुळेच ते राज्य दहा वर्षे मागे आले, त्यासाठी जबाबदार कोण आहे? गाढवांवर मोहर लावून घोडे म्हणून ठेकेदाराने विकले. नुकसान त्या राज्याचे झाले. कारण की, प्रत्येक युध्दात हारत होते, तशीच परिस्थिती उल्हासनगर महानगरपालिकेची झाली आहे. इथे घोडे सांगून गाढव विकत आहेत आणि आपण चालवत आहेत. भोगत आहे, या शहराची जनता, तर आज आत्मपरिक्षण करण्याचा, विचार करण्याचा सर्वांनी अधिका—यांनी पण जबाबदारीने, मी मागच्या वेळेस सांगितले होते. प्रत्येकाचे मुल्यमापन झाले पाहीजे, कोण अधिकारी किती काम करीत आहे? जर चांगले काम करीत आहेत, तर त्यांना शाबासकी मिळाली पाहीजे आणि चुकीचे काम करीत असेल तर त्यांना इथून हाकलून दयायला पाहीजे. काही तरी, काहीच होत नाही? इथे फक्त हासी मज्जाक चालू आहे, ४.०० वाजता येणार ७.०० वाजे पर्यंत सभा चालवणार पुर्ण झाली तर झाली नाही तर सोडून देणार. जो विषय आपल्याला पाहीजे तो पहीले घेणार आणि पहीला विषय मागे सोडून देणार. इथे फक्त इंट्रेस चालला आहे, ना सोशन इंट्रेस आहे आणि नाही सिटी इंट्रेस फक्त आपला इंट्रेस आहे, पार्टी इंटस्रे, पर्सनल इंट्रेस फक्त याच्यावरच चालेले आहे. त्यासाठीच आपण इथे येत आहे का? काही तरी सुधारणा करा. संपुर्ण प्रशासनाला माझी विनंती आहे, मी आता सांगितल्या प्रमाणे आम्ही फुकट टाईमपास करतात तुम्ही टाईमपास करण्याचा पगार घेतात, तेव्हा कृपया उल्हासनगरच्या जनतेला काही तरी न्याय दया. जरा सदसतविवेक बुध्दी आपली वापरा मला काम करायचे आहे, त्याचा पगार मिळतो. त्या उल्हासनगरची जनता टॅक्स भरतात, आम्हांला पगार मिळतो, त्या पगाराचा मोबदला म्हणून आम्हांला काही तरी दयायचे आहे. प्रत्येकाने सगळेच बेजबाबदार, आम्ही उल्हासनगरला कुठे घेऊन जाणार आहोत? माझी विंनती आहे की, या पुढे तुम्ही प्रत्येकाने सिरीयस व्हा, जर इथे चुकीचे काम केले तर त्याला दंड मिळाला पाहीजे, या महासभेपुढे येऊ दया. जे असेल ते पारदर्शक असले पाहीजे, जे असेल ते शहराच्या हितासाठी असले पाहीजे आणि तशीच चर्चा या ठिकाणी होऊ दया. संपुर्ण सभागृहाला माझी विनंती आहे की, हासी मज्जाक बस करा. एक वर्षे झाला काहीच कामे नाहीत, शहराला आम्ही काहीच दिले नाही. याच्या नंतर तरी काही तरी देण्याचे संकल्प तर करा. पॉलिटीकल काही झाले आपण माफी मागितली ही गोष्ट नाही. परंतु आपण या पुढे काय देणार आहेत? हा विचार करायचा आहे. मी सर्वांना सत्ता पक्ष असेल, विरोधी पक्ष असेल आपण विचार करायला पाहीजे की, आपण काय देणार आहेत? आणि देणार आहेत की, नाही. नाही तर मी विरोधी पक्षाच्या वतीने बोलतो की, आपल्याला जसे चालवायचे आहे, तसे चालवा आम्ही महासभेमध्ये येणार नाहीत. जर अशा प्रकारे फक्त चर्चा होत असेल तर?

या वेळी सदस्य, श्री. सुनिल सुर्वे व सदस्य, श्री. दिपक सिरवानी हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>** महापौर मॅडम, श्री. बोडारे साहेबांनी एक गोष्ट चांगली सांगितली आहे, आपण किती तरी वेळा सर्व अधिका—यांना महासभेमध्ये उपस्थित राहायला सांगितले आहे. जर महापौरांच्या आदेशा नंतर सुध्दा भरपूर अधिकारी अनुपस्थित राहतात. त्यासाठी भरपूर कारणे असू शकतात, कोर्टामध्ये गेले होते, इकडे गेले होते, तिकडे गेले होते. परंतु इथे आपल्याला कठोर व्हायला पाहीजे. संपुर्ण सभागृह आपल्या बरोबर आहे. कारण की, विरोधी पक्ष नेता यांची तीव्र भावना आहे, तर सत्ता पक्षाचे पण कापरे भरते. फक्त यासाठी की, प्रशासनाचे अधिकारी उपस्थित नाहीत. उत्तर कोण देणार? आज परिस्थिती अशी आहे की, आयुक्त साहेब, सुट्टीवर आहेत, उप आयुक्त पण नाहीत, अतिरिक्त आयुक्त नाहीत, आज श्री. दादा पाटील, बसले आहेत, ते सुध्दा रेल्वेच्या अशा स्टेशनवर आहेत, त्यांनी सामान बांधून ठेवले आहे, ते कधी पण उतरून जाणार आहेत. कंठे मॅडमचे सुध्दा असेच आहे, त्यांनी सुध्दा सर्व सामान बांधून ठेवले आहे, त्या पण नंतरच्या स्टेशनवर कधी पण उतरून जातील. तर मॅडम इथे सांगितले की खुप गंभीरतेचा विषय आहे. आज किती अधिकारी आले आहेत? एक नंबरचे प्रभाग अधिकारी आले आहेत, नाही आले, का आले नाहीत? त्यांना निलंबित करा आणि त्यांना कारण विचारा. जेवढे पण अधिकारी महासभा सात दिवसाच्या नंतर होते, सर्वांना बोलायला पाहीजे. जर कोणी अधिकारी अनुपस्थित राहीले तर त्यांनी पहीले महापौरांना भेटून जावे. जर त्याचे कारण खरे असेल तर ते सुट्टीवर राहतील नाही तर ही महासभा त्यांना निलंबित करण्याचा प्रस्ताव ठेवील. असे आपण आज जाहीर करा. कमीत कमी जो अक्रोश आहे, नगरसेवक एक महीन्यामध्ये फक्त एक वेळा इथे मिळतात, समस्यांसाठी इथे बोलत असतात, त्याचे उत्तर देण्यासाठी अधिकारी नसतात आणि प्रश्न प्रलंबित ठेवायला लागतो आणि त्या अधिका—यांना पण माहीत आहे की, जर प्रश्न प्रलंबित राहीला तर दुस—या महीन्यामध्ये नविन प्रश्न निर्माण होतात. तर आता मी आपल्याला विनंती करतो की, आपण एक रूलींग दया की, याच्या नंतर कोणी पण अधिकारी महासभेमध्ये जर अनुपस्थित राहले तर त्यांनी सात दिवसाच्या आत मा. महापौरांना भेटून आणि जर ते खोट कारण सांगून अनुपस्थित राहीले तर त्यांना निलंबित करण्यात येईल, असे आपण आदेश दया.

या वेळी सदस्य, श्री. सुनिल सुर्वे व सदस्य, श्री. दिपक सिरवानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** महापौर साहेबा, माझी छोटीशी विनंती आहे. मी जास्त न बोलता आपल्याला विनंती करतो की, शहराच्या जनतेला माहीती पाहीजे की, उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये जेवढे पण लोकप्रतिनिधी आम्ही निवडून पाठविले आहेत, ते काय करीत आहेत? त्यांची माहीती देण्यासाठी प्रत्येक महासभेचे लाईव्ह लोकल चॅनलवर दाखवण्यासाठी आदेश दया की, इथील जनतेला माहीती होईल की, आमचे लोकप्रतिनिधी काय करीत आहेत? कृपया माझी ही विनंती मान्य करा, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती रेखा ठाकुर यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मा. महापौरजी, श्री.प्रदिप रामचंदानी यांनी जसे चांगले सांगितले की, आपण आदेश दया आणि आपण मागच्या महीन्यामध्ये तीन चार मिटींगमध्ये आपण आदेश दिले आहेत आणि आपण आदेश दिले आहेत आणि आपण सांगितले होते की, मी अधिका—यांची उपस्थिती घेईल. मला नाही वाटत की, आज पर्यंत त्याची अंमलबजावणी झाले आहे. आता पण बोलणार पण तर त्याचे पालन पुढे होईल किंवा नाही होणार. तर मला वाटते की, आपण आदेश आयुक्तांना दया आणि आयुक्त साहेब, उत्तर देतील की, पुढच्या महासभेमध्ये जे अधिकारी येणार नाहीत, त्यांना थेट निलंबित करा. हे आदेश आजच आपण दया. आपण सभागृहाच्या महापौर आहेत, आपला अधिकार आहे. परंतु आपण आदेश आयुक्तांना दया आणि आयुक्तांना उत्तर दयायला सांगा. आपण प्रत्येक वेळी आदेश देतात आणि त्याचे पालन होत नाही. आता पण कठोर बना, प्रत्येक सदस्यांची भावना हीच आहे. आम्हांला उत्तर पाहीजे, पहीले आयुक्त होते, ते प्रत्येक सोमवारी मिटींग लावत होते, प्रत्येक प्रभाग अधिकारी येत होते आणि ज्या सदस्यांना समस्या होती त्याचे निवारण प्रत्येक सोमवारी होत होते. आता एक महीना वाट बघावी लागते आणि एक महीन्या नंतर काय उत्तर मिळाले? जसे की, प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले आता प्रभाग समिती क्र. १ चे वॉर्ड ऑफिसर आले नाहीत. महापौर मॅडी प्रभाग समिती क्र.१ मध्ये माझा वार्ड येतो, त्यांच्या बाबतीत निषेध आहे, मला आज बोलू दया. परंतु ते आज आले नाहीत, तर मी कोणाला उत्तर विचारू? तर त्यासाठी स्ट्रिक वार्निंग दया, त्यांना कारणे दाखवा नोटीस दया आणि आयुक्त साहेबांना बोलवा, धन्यवाद.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** प्रभास समिती क्र. १ चे प्रभाग अधिकारी आले आहेत, अनाधिकृत बांधकाम तोडत आहेत आणि मला सांगून गेले आहेत. आता मी आयुक्तांच्या स्थानी श्री. दादा पाटील आहेत, त्यांना मी आदेश देते की, जे पण अधिकारी आले नाहीत, त्यांची एक यादी बनवून आणि लवकरात लवकर जे पण अधिकारी असतील मी त्यांची एक मिटींग बोलावते आणि त्यांना शेवटची एक संधी देवून त्यांना कारण विचारेल की, महासभेसाठी का आले नाहीत, पहीले सांगून जाणे खुप गरजेचे आहे. मागच्या मिटींगमध्ये मी आदेश दिले होते, जे अधिकारी आले नव्हते, त्यांचे मला कारण सांगा, तर त्यांनी मला लिखीत पाठवून कारण सांगितले होते. ते पण माझ्या ऑफिसमध्ये आहेत.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—** माझे म्हणणे असे आहे की, काल झेंडावंदन करण्यासाठी फक्त पाच अधिकारी उपस्थित होते आणि आता एवढे अधिकारी गैरहजर आहेत, तर त्यांच्यावर काय कारवाई होणार? ते सांगा आधी.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** सावंत साहेब, हा विषय संपला आहे, तुमच्या म्हणण्या प्रमाणे महापौरांनी खेद प्रगट केला, जनसंपर्क अधिकारी नाहीत, म्हणून तो प्रश्न प्रलंबित ठेवला आहे.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—** अधिका—यांवर कारवाई काय होणार?

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** हा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे, तो पर्यंत जनसंपर्क अधिकारी येत नाहीत, त्या प्रश्नांचे उत्तर ते देणार आहेत.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—** बाकीचे अधिकारी पण नव्हते, फक्त पाच लोकांनी झेंडावंदन केले. कालच्या झेंडावंदनाला फक्त पाच ते सहा लोक उपस्थित होते.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, तुमचा जो प्रश्न होता, त्याचे उत्तर मी दिले आहे, आता आपण कृपया शांत बसा आणि चालू दया.

**महापालिका सचिव:—** प्रश्नोत्तरे आहेत, सायंकाळचे ५.१२ मिनीटे झाली आहेत, प्रलंबित प्रश्न क्र. २ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे. पण ते उपस्थित नसल्याने...

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** सचिव मॅडम, ही मिटींग पहीले व्हायला पाहीजे की, फ्रेश मिटींग पहीले व्हायला पाहीजे. आपण याच्यामध्ये पहीली मागची जी मिटींग राहीली होती, ती अगोदर घ्यायला पाहीजे होती आणि नंतर जी रेग्युलर मिटींग घ्यायला पाहीजे, असे माझे मत आहे, तुमचा कायदा काय सांगतो ते सांगा?

**<u>महापालिका सचिव:—</u>** मा. महापौर मॅडम, उप महापौर साहेब, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सभागृह, मिटींग कधी घ्यायची, कधी आधी हे ठरवणे मा. महापौरांचे अधिकार आहेत आणि आधी स्थगित सभा, या सभेचे कामकाज प्रथम परंपरेनुसार चालते. स्थगित सभेबाबत यामध्ये काहीही नियम नाही. यामध्ये असा नियम आहे की, जिथे नियम नसतील तिथे मा. पिठासिन अधिकारी यांनी निर्णय घ्यायचा आहे आणि मा. पिठासिन अधिकारी यांनी निर्णय घेतला आहे. मी त्यांना या वेळी बोलेले होते की, अशी सभा, त्या म्हणाल्या ही अशी सभा लावा. त्यामुळे त्यांच्या आदेशान्वये हा अजेंडा निघाला आहे. आता प्रलंबित प्रश्न श्री. राजवानी यांचा असल्याने ते उपस्थित नसल्याने त्या प्रश्नांची नोंद करण्यात येत आहे. याचे उत्तर प्राप्त नाही, परंतु डिपार्टमेंट त्यांना देणार आहे. प्रश्न क्रमांक १० हा श्री. भगवान भालेराव यांचा आहे. ते पण नाहीत, त्यामुळे त्याची कार्यवृत्तात नोंद करण्यात येत आहे. प्रलंबित प्रश्न क्र. १४ हा श्री. सुनिल सुर्वे यांचा आहे, ते पण नाहीत, त्याची पण नोंद करण्यात येत आहे. प्रश्न क्र. १७ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे, ते पण नाहीत, त्याची नोंद करण्यात येत आहे. प्रश्न क्र. १८ हा देखील श्री. भारत राजवानी यांचा आहें, त्याचीही नोंद करण्यात येत आहे. प्रश्न क्र. १९ हा भारत राजवानी यांचा आहे, अनुपस्थित असल्यामुळे त्याची कार्यवृत्तात नोंद करण्यात येत आहे. प्रश्न क्र. २० हा श्रीमती पुजाकौर लबाना यांचा आहे, त्या आता नाहीत, म्हणून वगळण्यात येत आहे. प्रश्न क्र. २१ हा देखील श्रीमती पुजाकौर लबाना यांचाच आहे, तो देखील वगळण्यात येत आहे. प्रश्न क्र. २२ हा श्रीमती सुनिता बगाडे यांचा आहे, पण या प्रश्नाचे उत्तर अजून आमच्या विभागामध्ये प्राप्त झाले नाही.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** प्रश्न कधी विचारला आहे? कोणत्या डिपार्टमेंटचा आहे?

**<u>सदस्या, श्रीम. सुनिता बगाडे:—</u>** मग पुढच्या महासभेत घ्यायचा आहे का?

**<u>महापालिका सचिव:—</u>** हा प्रश्न क्रमांक आहे २२ नंबरचा हा दिनांक ५/६/२०१७ ला विचारला आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** अजुनही उत्तर उपलब्ध झाले नाही.

**<u>महापालिका सचिव:—</u>** आणि यामध्ये महापालिकेमध्ये किती अधिकारी/कर्मचारी कागदपत्राचे बनाव करून बेकायदेशिर सेवा प्राप्त झाली आहे, अशी काही महीती विचारली आहे आणि सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** प्रश्न काय आहे?

प्रश्नोत्तरे.........

**<u>महापालिका सचिव :—</u>** प्रश्न क्र. २२ हा श्रीमती सुनिता बगाडे यांचा आहे.

**?** **<u>प्रश्न क्र.२२:—</u>** माहे जून २०१७ च्या सर्वसाधारण महासभेच्या कामकाजा मध्ये खालील प्रश्नांचा समावेश करून सविस्तर उत्तर मिळणेस विनंती आहे.

**१)** महानगर पालिकेच्या मंजूर अस्थापना सूचीवर बेकायदेशिर पणे कार्यरत असणा—या कर्मचारी/अधिकारी यांच्या नियुक्ती बाबत व त्यांचे वर केलेल्या कार्यवाही बाबत सविस्तर माहिती दयावी.

**अ)** महानगर पालिकेमध्ये किती कर्मचारी/अधिकारी यांनी कागदपत्राचा बनाव करून पालिकेत बेकायदेशिर पणे सेवा प्राप्त केंली आहे. त्यामध्ये पदसमूह वर्ग वर्ग —१, वर्ग—२, वर्ग—३ आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांची सविस्तर यादी उपलब्ध करून दयावी.

**ब)** मंजूर अस्थापणा सूची नूसार पात्र उमेदवार बनण्यासाठी सादर केलेले कागद पत्रे बनावट असल्याचे सिध्द झाल्या नंतर अशा उमेदवारांना सेवा प्राप्त केल्या नंतर केल्या जाणा—या कार्यवाही बाबतचे धोरण काय आहे ? त्यांचे वर कोणत्या कायदया नूसार कार्यवाही केली जाते.?

**क)** बेकायदेशिर पणे सेवा प्राप्त कामगार/कर्मचारी/अधिकारी पैकी सिध्द झालेले कामगार/कर्मचारी/ अधिकारी या पैकी किती उमेदवारांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आणि त्या संदर्भात किती कामगार/कर्मचारी/अधिकारी यांनी मा. न्यायालयात दाद मागितली आहे. विदयमान स्थिती मध्ये त्या दाव्यांची स्थिती काय आहे?या बाबत सविस्तर माहिती दयावी.

**उत्तर :—** प्राप्त नाही.

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडे:—** या प्रश्नाचे उत्तर कधी पर्यंत मिळेल? एक वर्ष झाले आता. याच महीन्यामध्ये विचारला होता.

या वेळी सदस्य, श्री. मिलिंद बागुल यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरे:—** मॅडम, दोन दिवसात तुम्हांला प्रोव्हाईड करतो.

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडे:—** दोन दिवसात नक्की मिळेल.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** जे दोन दिवसात मिळणार होते, त्याला एक वर्ष का लागला?

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडे:—** मला वाटते, याच महीन्यात एक वर्ष झाले आहे, सन २०१७ चा हा प्रश्न आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** दोन दिवसात देणार ना एवढी खात्री आहे, तर त्याला एक वर्ष का लागले? पुन्हा परत तेच आले.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरे:—** खरे तर असे आहे की, त्यावेळेला ....

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** निश्चित सांगा किती दिवस लागतील? दोन दिवसात देणार आहेत, मग वर्ष का लागले.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरे:—** दोन तीन दिवसात मी त्यांना प्रोव्हाईड करून देतो.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** महापौर महोदया, या पुढे महासभा एक ठराव पारीत करेल, जर माहीती अधिकारा खाली प्रश्न विचारला आणि त्याचे उत्तर वेळत दिले नाही, तर त्याला दंड असतो. या महासभेमध्ये प्रश्नाचे व्यवस्थित उत्तर नाही दिले तर त्याचा दंड या ठिकाणी लागू करा.

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडे:—** उत्तर मिळत नाही तर काय फायदा प्रश्न विचारून एक एक वर्ष लागतो, प्रश्नाचे उत्तरे दयायला. ही काय महानगरपालिका आहे का? याला काही अर्थ आहे का?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** पुढच्या महासभेमध्ये सविस्तर लेट होण्याचे कारण आणि त्याचे उत्तर असे दया.

**महापालिका सचिव :—** प्रश्न क्रमांक २३ हा श्रीमती सुनिता बगाडे यांचा आहे.

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडे:—** प्रश्न वाचून सांगा.

? **प्रश्न क्र.२३:—** जून २०१७ च्या सर्वसाधारण महासभेच्या कामकाजा मध्ये खालील प्रश्नांचा समावेश करून सविस्तर उत्तर मिळणेस विनंती आहे.

**१)** महानगर पालिका प्रशासकिय कार्यालयातील आवक/जावक नोंद वहया तयार करणे व सुस्थितीत ठेवण्या बाबतच्या कार्यवाही संदर्भातील झालेल्या धोरणात्मक निर्णया बाबत सविस्तर माहिती उपलब्ध करून दयावी.

**अ)** आवक/जावक नोंद वही मध्ये टपाल नोंदणी संदर्भात दयावयाच्या क्रमांका बाबत शासनाने कोणते धोरण निश्चित केले आहे.? शासनाने निश्चित केलेल्या धोरणा नूसार सदरचे काम केले जाते की त्या साठी पालिका प्रशासनाने स्वतंत्र धोरण निश्चित केले आहे. त्या बाबत सविस्तर माहिती दयावी

**ब)** आवक/जावक नोंद वही मध्ये दिल्या जाणा—या मुळ क्रमांकाला अ,ब,क असे क्रमांक देण्याची कायदेंशिर तरतूद करण्यात आली आहे काय? त्या बाबतचा उल्लेख असणा—या कायदेशिर तरतूदी बाबतसविस्तर माहिती दयावी.

**क)** अधिकार क्षेत्र निश्चित केल्या नंतर अधिकार क्षेत्रा बाहेरिल टपाल स्विकारणे आणि त्याची नोंद करून घेणे हे अधिकार कोणत्या कायदयान्वये प्रदान करण्यात आले आहे. अशा नोंदणीकृत टपालाचा गैरवापर न्यायालयीन प्रक्रिये मध्ये घेणा—या अर्जदारावर पालिका प्रशासना कडून काय कार्यवाही केली जाते? कार्यवाहीचे स्वरूप व कायदेशिर तरतूदी बाबत माहिती उपलब्ध करून दयावी.

**उत्तरः—** अ) आवक जावक नोंद वही क्रमांक हा अनु. क्रमांक प्रमाणे देण्यात येतो त्या करिता वेगळे असे धोरन निश्चित केलेली नाही.

ब) अ,ब,क असे क्रमांक देण्याची कायदयात कोणतीही तरतुद नाही.

क) अधिकार श्रेत्रीबाहेरील टपाल स्विकारणे बांधणकारक नाही त्यामुळे अधिकाराचा प्रश्न उदभवत नाही.

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडेः—** याचे उत्तर काय दिले आहे? आवक जावक नोंद वही क्रमांक हा अनु. क्रमांक प्रमाणे देण्यात येतो त्या करिता वेगळे असे धोरन निश्चित केलेले नाही. तर हे धोरण कधी निश्चित करण्यात येतील. याचे उत्तर दयायला कोणी आहे का?

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** याचे पण उत्तर दोन दिवसात देतो.

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडेः—** दोन दिवसात, हा प्रश्न सन २०१७ चा आहे. या प्रश्नाला पण पुर्ण एक वर्ष झाला आहे.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** या बाबतीत वेगळे असे धोरण काहीच नाही. आपण अनुक्रमांक प्रमाणेच देतो.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** त्याचे धोरण निश्चित व्हायला पाहीजे.

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडेः—** प्रश्न मी कधी दिला आहे, हे बघा दिनांक ५/६/२०१७ आता बरोबर एक वर्ष झाले आहे, मग अजून धोरणच निश्चित झालेले नाही, मग प्रश्न विचारून माझा काय फायदा आहे का?

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** बगाडे मॅडमने जो प्रश्न विचारला आहे. त्या प्रश्नाच्या संदर्भात येणा—या सर्व कारवाई ज्या ज्या करणार आहेत तुम्ही तसे स्पष्ट धोरण असले पाहीजे. नाही तर व्यवस्थित काम होणार नाही.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** सर त्याच्या बरोबर वेगळे काही धोरण असेल तर तपासून सादर करतो.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** तुम्ही ज्या पध्दतीने तयार करतात किंवा कारवाई करतात, कुठल्या पध्दतीने करतता, ते उत्तर तुम्ही दिले पाहीजे होते.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** त्याच्यामध्ये आपण रजिस्टरनुसारच नोंद करतो, अनुक्रमांकानुसार आपण त्याच्यामध्ये आवक जावक बारनिशीची नोंद वही म्हणून त्याला नाव देतो आणि त्याच्य नुसारच आपण त्याच्यात एंट्री करतो.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** त्या पध्दतीने तुमचे उत्तर आले नाही.

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** त्याच्यामध्ये शासन निर्णयानुसार जर काही असेल तर तपासून पहातो.

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडेः—** त्याच्यामध्ये ब आहे, अ,ब,क असे क्रमांक देण्याची कायदयात कोणतीही तरतुद नाही. म्हणजे तरतुद का केली नाही?

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** त्यांचे म्हणणे आहे की, तुम्ही अ,ब,क असे नंबर जे रजिस्टरमध्ये देतात, त्याची तरतुद का केलेली नाही. त्याची वेगळी अशी काही तरतुद नाही.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** नियमाप्रमाणे तुम्ही नेमके काय काय करतात?

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडेः—** तिसरा 'क' आहे, तो पण तसाच आहे, अधिकार श्रेत्रीबाहेरील टपाल स्विकारणे बाबत बांधणकारक नाही त्यामुळे अधिकाराचा प्रश्न उद्‌भवत नाही. या माझ्या प्रश्नाचे संपुर्ण अहवाल पुढच्या महासभेमध्ये पाहीजे.

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. मनीष हिवरेः—** परस्पर उत्तर दिले तर चालेल का मॅडम?

**महापालिका सचिवः—** हा प्रश्न पेडींग नाही, ते परस्पर उत्तर देणार आहेत. प्रश्न क्र. २४ हा श्रीमती सुनिता बगाडे यांचा आहे.

**प्रश्न क्र.२४:—** माहे जून २०१७ च्या सर्वसाधारण महासभेच्या कामकाजा मध्ये खालील प्रश्नांचा समावेश करून सविस्तर उत्तर मिळणेस विनंती आहे.

**१)** सैनिकी बॅरेक साठी शासना कडून तयार करण्यात आलेले सरकारी शौच्छालय व स्नानगृह पालिका प्रशासना कडे मा. प्रशासक उल्हासनगर यांनी हस्तांतरीत केल्या बाबत च्या कार्यवाही संदर्भात माहिती उपलब्ध करून दयावी.

**अ)** उल्हासनगर कॅम्प नं. १ ते कॅम्प ५ मध्ये सरकारी छावणी साठी एकूण किती सरकारी शैच्छालय व स्नानगृहे तयार करण्यात आली होती? सदरची शौच्छालय व स्नानगृहे पालिका प्रशासना कडे हस्तांतरीत करण्या बाबत कधी आदेशित करण्यात आले आहे.

**ब)** विदयमान स्थिती मध्ये किती सरकारी शौच्छालय अस्तित्वात आहे. आणि किती सरकारी शौच्छाल — यावर अतिक्रमण करण्यात आले आहे.?

**क)** मा. प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत यांचे कार्यालया कडून सरकारी शौच्छालय व स्नानगृहे हस्तांतरणा बाबतची कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास त्या ठिकाणी करण्यात आलेल्या अतिक्रमणा साठी जबाबदार कोण आहे

**उत्तर :—** १) शासनाकडून पालिका प्रशासनाकडे शौचालय व स्नानगृह हस्तांतरीत केल्याबाबतच्या कार्यवाही संदर्भातील माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाने सन २०१७ साली सार्वजनिक शौचालये मालमत्ता विभागात त्यावेळेस आस्तित्वात असलेल्या शौचालयांच्या यादीसह हस्तांतरीत केली आहेत. त्याचा तपशिल या कार्यालयाकडे उपलब्ध आहे.

अ) सदरहु माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही.

ब) सार्वजनिक आरोग्य विभागाने या विभागाकडे सादर केलेलया अहवालानुसार एकूण ३७८ सार्व शौचालये. आहेत. तथापी १४ सरकारी शौचालयाच्या जागी अतिक्रमण झाले असून ते हटविण्यासाठी संबंधित प्रभाग अधिकारी यांना आदेशित करण्यात आले आहे.

क) मा. प्रशासक, उल्हासनगर शहर वसाहत यांचे कार्यालयाकडून सरकारी शौचालय व सरकारी स्नानगृहे हस्तांतरणाबाबतची कार्यवाही पूर्ण झाली नाही तरीसुध्दा सदर ठिकाणी सरकारी शौचालय असल्याबाबतची माहिती प्राप्त झाल्यास व सदर ठिकाणी अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आणून दिल्यास सदर ठिकाणचे अतिक्रमण काढून टाकण्याची जबाबदारी महापालिकेची राहिल.

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडे:—** मा. आयुक्त साहेब, मी प्रश्न विचारला होता, सैनिकी बॅरेक साठी शासना कडून तयार करण्यात आलेले सरकारी शौच्छालय व स्नानगृह पालिका प्रशासना कडे मा. प्रशासक उल्हासनगर यांनी हस्तांतरीत केल्या बाबत च्या कार्यवाही संदर्भात माहिती उपलब्ध करून दयावी. तुम्ही उत्तर काय दिले आहे. शासनाकडून पालिका प्रशासनाकडे शौचालय व स्नानगृह हस्तांतरीत केल्याबाबतच्या कार्यवाही संदर्भातील माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. ही माहीती कार्यालयाकडे उपलब्ध नाही का?

 या वेळी मा. उप महापौर, श्री. जीवन इदनानी हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी, मला वाटते सन्माननिय सदस्या उभ्या आहेत आणि या प्रश्नावर उत्तर दयायला कोणी नाही, तर ते बरोबर नाही.

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडे:—** उत्तर देणा—या अधिका—याचे याच्यात नावच नाही.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** प्रलंबित ठेवण्या पेक्षा काय काय प्रलंबित ठेवायचा हा विषय आहे ना? सार्वजनिक बांधकाम विभाग आहे की, सार्वजनिक आरोग्य विभाग आहे, कोण आहे? सार्वजनिक बांधकाम विभागाचे पण हजर आहेत आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे पण हजर आहेत.

**महापालिका सचिव:—** मालमत्ता विभागाचा प्रश्न आहे, उप आयुक्त, मालमत्ता विभागाने उत्तर दिले आहे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** मालमत्तेकडे याची कुठल्याही प्रकारची नोंद नाही, उल्हासनगर शहरामध्ये. यांनी जो संबधित प्रश्न विचारला आहे. शौचालय आणि स्नानगृहाच्या संदर्भात आपल्या मालमत्ता विभागामध्ये कुठलीही नोंद नाही का? मालमत्ता व्यवस्थापक असतील ना?

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडे:—** मॅडम, हा प्रश्न पुढच्या महासभेत घेणार आहेत का?

**<u>महापालिका सचिवः—</u>** हा २४ नंबरचा प्रश्न राखून ठेवण्यात येत आहे, कारण संबंधित अधिकारी नाहीत. प्रश्न क्रमांक २५ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे. प्रश्नोत्तराच्या तासासाठी अजून अर्धा तास आहे, ५.१२ मिनीटांनी मिटींग सुरू झाली आहे, ५.४२ मिनीटांनी होईल.

या वेळी मा. उप महापौर, श्री. जीवन इदनानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>प्रश्न क्र.२५ः—</u> १)** उल्हासनगर महानगरपालिकेत मालकी हक्काचे घर मिळणे संदर्भात श्रमसाफल्य योजने अंतर्गत योजना कधी कार्यान्वीत झाली? सदर योजनेत शासनाने किती निधी दिला? सदर निधि कुठे व कसा वापरला.

**२)** मालकी हक्काची घर योजना पुर्ण करणेस किती निधि खर्च केला? कामगार संघटनाने सदर कामासाठी निष्कृष्ठ बांधकामाची तक्रार केली आहे काय?

**<u>उत्तरः—</u>** १) सदर मुद्दा सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित आहे. त्यामुळे या विभागाची माहिती निरंक समजण्यात यावी.

२) निरंक.

**<u>महापालिका सचिवः—</u>** प्रश्न क्र.२६ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे. तो पण सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित आहे.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टालेः—</u>** प्रश्न कळू दया मला.

**<u>प्रश्न क्र.२६ ः—</u> १)** उल्हासनगर महानगरपालिकेत बि. एस. यु.पी. योजना कधी कार्यान्वीत झाली? सदर योजनेत शासनाने किती निधी उपलब्ध करून दिला? सदर योजनेचा अंतर्गत किती विभागाचा समावेश केला गेला आहे? किती विभागातील सर्वे करण्यात आला आहे?

**अ)** सदर योजने अंतर्गत सर्व्हे करण्यात आला?

**ब)** या योजने अंतर्गत तात्पूरता निवारा केंद्र बनविले होतेकाय? असल्यास कुठे आहे? सदर निवा—यासाठी किती खर्च केला आहे?

**क)** सदर योजने अंतर्गत आलेल्या निधिचा कसा वापर केल गेला?

**<u>उत्तर ः—</u>** १) सदर मुद्दा सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित आहे. त्यामुळे या विभागाची माहिती निरंक समजण्यात यावी.

अ) निरंक.

ब) निरंक.

क) निरंक

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळेवर उत्तर दिलेले आहे.

**<u>महापालिका सचिव ः—</u>** प्रश्न क्र.२७ हा श्री. सुनिल सुर्वे यांचा आहे, परंतु उत्तर प्राप्त नाही.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** पुढच्या मिटींगमध्ये घ्या मग, प्रश्नाचे उत्तर नाही ना?

**<u>महापालिका सचिवः—</u>** ठिक आहे, प्रश्न क्र. २८ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे, ते नसल्यामुळे कार्यवृत्तात यांची नोंद करण्यात येत आहे. प्रश्न क्र. २९ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे, ते नसल्याने कार्यवृत्तात नोंद करण्यात येत आहे. प्रश्न ३० हा श्री. भारत राजवानी यांचा आहे, ते उपस्थित नसल्याने कार्यवृत्तात नोंद करण्यात येत आहे. प्रश्न क्र. ३१ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे. परंतु उत्तर अजून प्राप्त नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** प्रश्न वाचून दाखवा कुठल्या विभागाचा आहे.

**प्रश्न क्र.३१ :—** प्रश्न १) अनाधिकृत नळजोडण्या ताबडतोब काढुन कायदेशिर कारवाई करणेबाबत दिनांक २९/५/२०१७ रोजी आयुक्त/कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांच्याकडे पत्रव्यवहार (कोणार्क रेसिडन्सी) केला होता. आज तारखेपर्यंत आपण काय कारवाई केली याचा लेखी खुलासा करावा.

प्रश्न २) कोणार्क रेसीडन्सीच्या अनधिकृत नळजोडण्या असल्यास आपण काय कायदेशीर कारवाई केली? खुलासा सादर करावा.

**उत्तर:—** उत्तर प्राप्त नाही.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** उल्हासनगरमध्ये, त्याचे उत्तर का प्राप्त नाही.

**महापालिका सचिव:—** संबंधित विभागाने पाणी पुरवठा विभाग....

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** संबंधित विभागाला माझे ते पत्र मिळाले आहे का? संबंधित विभागालाच माहीती नाही की, प्रश्न कुठला आहे?

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—** मा. महापौर महोदया, याचे उत्तर मी तुम्हांला दोन दिवसाध्ये देतो मॅडम.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** किती तारखेचा प्रश्न आहे, हा?

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—** आमच्याकडे आला असेल.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** तुमच्याकडे कदाचीत तो पोहचलाच नसेल. कधी पर्यंत उत्तर मिळेल.

**महापालिका सचिव:—** मा. सदस्य, सचिव कार्यालयात प्रश्न दिल्या नंतर आम्ही लगेच संबंधित विभागाला देतो, आमच्याकडे काही प्रलंबित राहत नाही.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** त्यांच्या पर्यंत पोहचले नाही का? खालून वर पर्यंत पाहचला नाही.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** सन्माननिय महापौर, उप महापौर, सेलवन साहेबांना हे पण सांगा, राजीव गांधीनगर त्या ठिकाणी एवढे लिकेज आहेत, एवढे पाणी गळते तरी कोण बघत नाही? मी किती वेळा तक्रार केली तरी कोण बोलत नाही? काही वाटत नाही, उल्हासनगर आहे की नाही, महानगरपालिका आहे की, नाही. सेलवन साहेब, कृपया करून समोर या.

**महापालिका सचिव:—** कृपया हा प्रश्नोत्तराचा तास आहे, यामध्ये कोणी पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलू नये.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** बोलू दया मॅडम, कसे काय बोलू नका?

**महापालिका सचिव:—** प्रश्नोत्तरां नंतर पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलू शकतात.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** बोलू नका कसे बोलता तुम्ही, बोलू दया.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** एक मिनीट, त्यांच्या पोझिशन लक्षात घेऊन, तब्येत चांगली नसल्याने लक्षात घेऊन सेलवनजी इकडे या, त्यांना उत्तर दया.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** सेलवन साहेब, बोला.

**उप महापौर:—** त्यांच्या भावनांची कदर करा.

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—** मा. महापौर महोदया, उप महापौर महोदय, आयुक्त साहेब आणि सन्माननिय सदस्य, पाणी पुरवठयाच्या संदर्भात मागच्या वर्षाच्या बजेटमध्ये जे काही अंदाजपत्रक तयार केले होते, त्या बजेटची तरतुद आमच्याकडे पुर्ण नसल्यामुळे बरेच एस्टिमेंट आमच्याकडे पेडिंग आहेत. तुमच्या राजीव गांधीनगरचा जो दुरूस्तीसाठी २ लाखाचे एस्टिमेट बनवलेले आहे.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** साहेब, पण राजीव गांधीनगरमध्ये लिकेज आहेत का नाही? मला महापौरांना एवढेच सांगायचे आहे की, प्लीज महापौर मॅडम तुम्ही एकदा येऊन बघून जा. लिकेज आहेत की, नाही. आपण बोलतात पाणी नाही, पाणी नाही, लिकेज किती आहेत, एवढे लिकेज आहेत की....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, सभागृहाचे सर्व सदस्य, सेलवन साहेब,जे बोलत आहेत की, लिकेजचे एस्टीमेट मला आश्चर्याने सांगावेसे वाटते की, स्थायी समितीच्या सभेमध्ये हा निर्णय घेतला होता की, चार प्रभाग समितीमध्ये, चार गाडया चालवणार आहेत, महीन्यासाठी आणि जिथे जिथे लिकेज असतील तिथले लिकेज त्वरीत बंद करण्यात येतील. त्यासाठी एस्टिमेटची आवश्यकता नाही. लिकेजचे जे पण काम आहे, तिथे आम्ही वेगवेगळया ठेकेदारांना चार एस्टिमेट दिले होते. पाईप घेऊन येणार आणि लिकेजची गाडी असेल, प्लंबर असतील, लेबर असतील आणि त्वरीत २४ तासाच्या आत जे पण लिकेज असतील ते बंद करण्यात येतील आणि आपण आम्हांला ठेकेदारांची नावे पण सांगितली होती की आम्ही चार प्रभाग समितीमध्ये चार ठेकेदार नियुक्त केले आहेत. त्यांच्या जवळ एक गाडी असेल, त्या गाडीमध्ये वेल्डींगची मशिन असेल, वेल्डर असेल, प्लंबर असेल आणि लेबर पण असतील. तरी सुध्दा आमचे सदस्य, श्री. रवी बागुल यांचे काम का झाले नाही? एस्टिमेटचे कारण कुठून आले?

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** किती वेळा बोलणार? किती लोक येऊन आम्हांला परत परत तक्रार करीत आहत, आमच्या तोंडावर थुंकतात.

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—** ठिक आहे, माझे ऐकुन घ्या.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** मी आता काय बोलू तुम्हांला, आपण कृपया करून बोला की, राजीव गांधीननगरचा, बालकृष्णनगरचा लिकेज बनवा. खुप पाणी गळत आहे, महापौरजी आपण एक वेळा येऊन बघा. लोक काय काय बोलतात?

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** मी आपल्या समोरच सेलवनजी यांना ऑर्डर देते, आपली जी समस्या आहे, ती एक दिड महीन्यापासून पेडिंग आहे. यांना २४ तासामध्ये रिझल्ट देण्याचा मी आदेश देत आहे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** मॅडम, माझा प्रश्न प्रलंबित ठेवा, त्याचे उत्तर मिळे पर्यंत.

**सदस्या, श्रीम. कविता बागुल:—** मा. महापौर मॅडम आणि उप महापौर, प्रभाग क्र. १८ मध्ये सुध्दा पाण्याचे लिकेज भरपूर आहेत आणि डी.एस. पाटील यांना सांगून सुध्दा ते लिकेज बंद करीत नाहीत आणि त्याच्याकडे लक्ष पण देत नाहीत.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** प्रश्नोत्तराचा तास पुर्ण होऊ दया, तुमचे समाधान करण्यात येईल.

**महापालिका सचिव:—** प्रश्न क्रमांक ३१ श्री. टाले साहेबांचा हा पण राखून ठेवण्यात येत आहे, प्रश्न क्र. ३२ हा श्रीमती पुजाकौर लबाना यांचा आहे, आता त्या नाहीत. प्रश्न क्र. ३३ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** सचिव मॅडम हा जो मी प्रश्न विचारला आहे, हा नगररचनाकार विभगाशी संबंधित आहे. नगररचना विभागाचे जर कोणी असेल.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** नगररचनाकार एक महीन्याच्या सुट्टीवर गले आहेत, तर तुमचा जो प्रॉब्लेम आहे, ते एक महीन्या नंतर आल्या नंतर बघतील.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** या प्रश्नाचे त्यांनी जे उत्तर दिले आहे, त्याच्या विषयी जे आक्षेप आहेत.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** आता ते आहेच नाहीत तर पेडींगमध्ये ठेवू.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** ठिक आहे, प्रलंबित ठेवा.

**महापालिका सचिव:—** हा प्रश्न प्रलंबित ठेवण्यात येत आहे, प्रश्न क्र. ३४ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** हा पण नगररचनाकार विभागाशी संबंधित आहे, दोघेही पेडींग ठेवा.

**महापालिका सचिव:—** प्रश्न क्र. ३५ हा श्री. सुनिल सुर्वे यांचा आहे.

**?** **प्रश्न क्र. ३५ :—** स्थानिक संस्था कर नोंदणी क्रमांक, व्यापा—यांचे नांव, पत्ता यांचा तपशील असणारी यादी सोबत जोडली आहे. या यादीत दर्शविलेल्या काही व्यापा—यांनी अद्याप स्थानिक संस्था कर नोंदणी क्रमांक न

घेता व्यापार सुरू ठेवला असल्याचे समजते. तरी याबाबत खालील प्रश्न येणा–या महासभेत उपस्थित करून त्यांची उत्तरे मिळावीत.

१) सदर यादीत दर्शविलेल्या व्यापा–यांकडून दि.१ जुलै, २०१२ ते ३१ जुलै, २०१५ पर्यंत या कालावधीत कच्चे व पक्के (कच्चे–गुलाबी रंगाचे चलन व पक्के–पिवळया रंगाचे चलन) चलनाद्वारे स्था.सं.कराचा भरणा करण्यात आलेला आहे का? याची सविस्तर माहिती मिळावी.

२) सदर यादीत दर्शविलेल्या व्यापा–यांकडून दि. १ जुलै, २०१२ रोजी स्था.सं.कर लागू झाला. स्था.सं.कर लागू झाल्यापासून तेदि. ३१ जुलै, २०१५ पर्यंत किती स्था.सं.कर वसुल करण्यात आला आहे का? याची सविस्तर माहिती मिळावी.

३) सदर यादीत दर्शविलेल्या व्यापा–यांकडून सन २०१२–१३, सन २०१३–१४, सन २०१४–१५, सन २०१५–१६ या कालावधीत किती रिटन फाईल आल्या आहेत? याची सविस्तर माहिती मिळावी.

४) सदर यादीत दर्शविलेल्या स्था.सं.कर भरणा केलेल्या किती व्यापा–यांचे चेक बाऊन्स झाले आहेत व चेंक बाऊन्स झाल्याप्रकरणी त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे किंवा करण्यात येणार आहे? याची सविस्तर माहिती मिळावी.

| SR. NO. | LBT NUMBER | DEALER NAME | ADDRESS |
|---|---|---|---|
| 1. | U8/W55/C5/175/2012-13 | Kumar Textiles | Bk. No. 2047 Rt.No.01/Null, Near Old Post Office, Ulhasnagar, Maharashtra, 421 005. |
| 2. | U8/W54/C5/318/2012-13 | P.G. Textiles | Shop No.110/Null Mat Mandir Chowk, Opp. Kachhamal Sweets, Ulhasnagar, Maharashtra 421 005. |
| 3. | U8/W54/C5/259/2012-13 | Navnath Steel Traders | Bk.No.1811, Shop No.07/Null,Sec.38, Opp. Palika Sindhi, School No.15,Ulhasnagar, Maharashtra – 421 005 |
| 4. | U8/W54/C5/003/2012-13 | Gopichand Building Material | Shop No.09, Bk.No.1808, Fish Market, Ulhasnagar, Maharashtra – 421 003. |
| 5. | 3/19/2/2039 | Shanti Traders, | Ulhasnagar – 421 002 |
| 6. | 4/27/3/2270 | Deepak Jagshnani, | Ulhasnagar – 421 004 |
| 7. | 3/19/2/2391 | Maniah Enterprise, | Ulhasnagar – 421 002 |
| 8. | 4/27/3/1257 | Mahalaxmi Plastic, | Ulhasnagar – 421 003 |
| 9. | 3/19/2/2082 | Hari Om Plastic, | Ulhasnagar – 421 002 |
| 10. | 3/2/19/492 | Asian Plastic, | Ulhasnagar – 421 002 |
| 11. | 4/27/3/485 | Mahaveer Steel, | Ulhasnagar – 421 003 |
| 12. | 4/28/3/0180<br>4/28/3/0181 | Premchand Sons, | Ulhasnagar – 421 003 |
| 13. | 4/20/3/2346 | Mahalaxmi Enterprises, | Ulhasnagar – 421 003 |
| 14. | 2/12/2/31 | Mahakali Enterprises | Ulhasnagar – 421 002 |

| | | | |
|---|---|---|---|
| 15. | 2/11/2/446 (Satnarayan) | Sonakshi Steel, Ulhasnagar | Ulhasnagar – |
| 16. | 4/28/3/179 | Sai Shardha | Ulhasnagar – |
| 17. | 3/29/2/2122 | Hari Das Enterprises | Ulhasnagar – |
| 18. | 4/27/3/2599 | Mahaveer Traders | Ulhasnagar – |
| 19. | U/4/W27/C3/485/2012-13 | Satyanarain Steel Traders | Null, Opp. Gu Singh School, Maharashtra |
| 20. | U/4/W27/C2/731/2012-13 | Premsons | Shop No.1128 Furniture Baz Ulhasnagar, M 421 002 |
| 21. | U4/W29/C3/0179/2012-13 | Sai Shradha Steel | Bk. No. 789/N Road, Ulhasna Maharashtra |
| 22. | U4/W27/C3/272/2012-13 | Sant Kripa Traders | Shop No.3/Nu Complex, Nev Ulhasnagar - Bazar Road, U Maharashtra |
| 23. | U4/W28/C3/688/2012-13 | Shakti Plywood | /Null Maya H Road, Furnitu Ulhasnagar, M 421 003. |
| 24. | U4/W28/C3/333/2012-13 | Sunil Laminates | Shop No. 2/N Sagar Apt., Ul Maharashtra |
| 25. | U4/W29/C3/1903/12012-13 | Satnam Moble Accessories | Shop No.805/ Ulhasnagar, M 421 003. |
| 26. | U2/W11/C2/084/2012-13 | Mehrumal Tolaram and Co. | Shop No. 1, Bl No.4913/Null Lajwanti Bhavan, Aman Talkies Road, Ulhasnagar, Maharashtra – 421 002 |
| 27. | U2/W12/C1/030/2012-13 | K. M. Association | Shop No. 494/Null, Village Sapgaon, Ulhasnagar 421001 |
| 28. | U2/W11/C2/267/2012-13 | Prakash Saree Depo. | Shop No. 5/Null, Sneha Apt., Near Hira Marriage Hall, Ulhasnagar, Maharashtra – 421 002. |
| 29. | U2/W11/C2/366/2012-13 | Lalwani Sarees | Shop No.02, Gr. Floor, Sai Laxmi Apt., New Link Road, Goal Maidan, Bank Of Baroda, Ulhasnagar, Maharashtra – 421 002 |
| 30. | U2/W12/C2/820/2012-13 | Rani Sarees | Shop No.6/Null Prakash Shopping Centre, Near Kalyan Tempo Stand, Ulhasnagar, Maharashtra 421 002. |
| 31. | U2/W12/C2/609/2012-13 | Rahul Shoes | Block A-53, Room No.314, Opp. Bank Of Baroda, Ulhasnagar, Maharashtra 421 002. |
| 32. | U2/W12/C2/451/2012-13 | Rajgiri Collection | Shop No.2, Ground Floor, Amir Apt, Gol Maidan Road, Next To Peter England Showroom, Ulhasnagar, Maharashtra – 421 002 |
| 33. | U3/W22/C2/438/2012-13 | India Sarees | Shop No.05/Null Shanker Complex, Opp. Minerva |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | Photo Center, Nehru Chowk, Ulhasnagar, Maharashtra 421 002 |
| | | | |
| 34. | U3/W22/C2/1750/2012-13 | Dwarkadas Shamkumar | Shop No.321, 322, Ground Floor, Pooja Complex, Near Gold Maidan, Ulhasnagar, Maharashtra – 421 002. |
| 35. | U3/W22/C2/153/2012-13 | Pinky Textiles | Shop No.04/Null Pinky Textiles, Near Avtar Gali, Ulhasnagar, Maharashtra 421 002 |
| 36. | U3/W22/C2/212/2012-13 | Gandhi Textiles | Shop No.471, Room No.05, Wing-A, Gandhi Textiles, Near Govind Pales, Kishin Gali, Ulhasnagar, Maharashtra – 421 002. |
| 37. | 8/53/5/033 | Mahadev Steel | Ulhasnagar – 421 005 |
| 38. | 4/29/3/26 | Sonu Traders | Ulhasnagar – 421 003 |
| 39. | 3/22/2/1304 | Shree Balaji Garment | Ulhasnagar – 421 002 |
| 40. | 3/22/2/1506 | Nittin Shirts | Ulhasnagar – 421 002 |
| 41. | 2/16/01/941 | Kailash Enterprise | Ulhasnagar – 421 001 |
| 42. | 3/19/2/2309 | Roshan Sales | Ulhasnagar – 421 002 |
| 43. | U3/W22/C2/1815/2012-13 | Nitin Dresses | Shop No.37, Null Elco Market, Manish Market, Ulhasnagar, Maharashtra- 421 002. |
| 44. | 8/51/05/107 | Sevakram Sunderdas | Ulhasnagar – 421 005 |
| 45. | 8/54/05/167 | Paridhan Textiles (Gown Bazar) | Ulhasnagar – 421 005 |
| 46. | 8/51/05/144 | Maya Garments | Ulhasnagar – 421 005 |

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—**मा. महापौरजी, उप महापौरजी, पहीले उत्तर दयायला कोण येणार आहे. याचे उत्तर मला मिळाले आहे, ऐकण्यासारखे उत्तर आहे.

**उत्तर :—** उक्त प्रश्नाबाबत खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

मुद्दा क्र १ ते ४ बाबत कळविण्यात येते कि सदरील बाब ही वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हता व व्यापाऱ्यांच्या आर्थिक व्यवहाराबाबत आहे व सदरील माहीती स्थानिक संस्था कर अधिनियम २०१० चे नियम ५२ (१) आणि महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १५२ (म) अन्वये गोपनिय स्वरुपाची असल्याने देता येत नाही.

मला वाटते की, आपली पण स्थानिक संस्थाच आहे, ना? उल्हासनगर महानगरपालिका स्थानिक संस्थाच आहे ना? जसे तुम्ही अधिकारी म्हणून तुम्हांला ही माहीती आहे, तसे आम्ही या स्थानिक संस्थेचे ट्रस्टी म्हणून आहोत. आम्ही जी माहीती मागवली आहे, ती न देण्या मागचे प्रयोजनच आहे, तुम्ही हा जो कायदा सांगत आहेत, हा कायदा कोणाला लागू होतो? याचे पहीले कारणे मिमाशा विचार करा. आम्ही तुम्हांला किरकोळ शब्द विचारला आहे, याच्यामध्ये एक गोष्ट तुम्हांला आवर्जुन वाटते की कोणी चेक दिलेत आणि जे बाऊन्स झाले आहेत. हा देखील विषय तुम्ही त्याच्यातच मांडला आपल्याला आलेला पैसा आणि तो चेक बाऊन्स झालेला आहे. या बाबत देखील तुम्ही माहीती दिलेली नाही. ठिक आहे, बाकीच्या गोष्टी तुम्ही व्यापा—यांची विश्वासार्हता वैगेरे चांगले मोठे शब्द

वापरले आहेत. पण मला सांगा, या आपल्या महानगरपालिकेला उत्पन्नाचे जे स्तोत्र आहे आणि जर तिथे कोणी चोरी करीत असेल? आणि तुम्ही जर हा आधार घेतात, हा माहीती अधिकार नाही, हा प्रश्न आहे, लक्षात घ्या, ही पहीली गोष्ट. हा माहीती अधिकार लावलेला नाही. हा आम्हांला जो राज्य सरकाने दिलेला अधिनियम आहे, अधिनियमाच्या तरतुदीनुसार हा प्रश्न विचारला गेला आहे. मला वाटते अधिनिमाच्या तरतुदी बघा आणि माहीती अधिकार बघा. या दोघांमध्ये तफावत आहे. जर एखादी माहीती संसदेमध्ये जर प्रश्नाद्वारे किंवा लक्षवेधीद्वारे मांडल्या नंतर ती माहीती उपलब्ध करून देणे तुमचे काम आहे. ती माहीती आम्ही माहीती अधिकारामध्ये मागितली नाही. हा आम्हांला जो विशेष दर्जा बहाल झालेला आहे, त्या विशेष दर्जाच्या अनुषंगाने ही माहीती मागितली गेली आहे. तुम्ही याचे चुकीचे करू नका, नको त्या गोष्टी मी माहीती अधिकार मागितला असता, तुम्ही उत्तर दिले असते तर मला मान्य झाले असते. मी माहीती अधिकार लावलेला नाही, हा आम्हांला सरकारने दलेला म्हणजे डॉ. बाबासाहेबांनी जे आम्हांला संविधान दिले आहे, त्या संविधानाच्या अधिकाराखाली हे नगरसेवक पद आहे आणि त्या संविधानाचा म्हणजे आपल्याकडे चो–या करणा–यांची माहीती आम्ही मांगतो, ती तुम्ही म्हणतात ते, चांगला जो विषय असा होता. वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हता व्यापा–यांच्या आर्थिक व्यवहारा बाबत. मला सांगा असे मी काय विचारले आहे त्यांना? विचारले काय आहे? त्यांनी एल.बी.टी. भरला का नाही? किती भरला आहे? मी त्याच्यामध्ये नावे दिली आहेत, सखोल माहीती दिली आहे. चेक बाऊन्स झाला की नाही, असे विचारले आहे. मी काय माहीती घेऊन त्यांना ब्लॅकमेल करणार नाही. मी फक्त एवढे करता कलेले आहे की, आपल्या महापालिकेचे उत्पन्न जर कुठे चोरी होत असेल? तर ते का वसुल करण्यात येत नाही? हे विचारलेले आहे. तुम्ही त्याची माहीती अधिकाराची माहीती आम्हांला सांगितलेली आहे. हा माहीती अधिकार नाही, हा प्रश्न आहे. तरी कृपया करून याची व्यवस्थित माहीती काढा. तुम्हांला वाटल्यास पुढच्या महासभेत दया, काही घाई नाही. उत्तर दयायला आलेत ना ते आता सांगतील, आम्ही जे तुम्हांला लिहून दिले आहे ना, ते बरोबर आहे.

या वेळी सदस्य, श्री. प्रमोद टाले हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**उप आयुक्त, (स्था.सं.कर), श्री. विनायक फासे:–** सन्माननिय महापौर, सन्माननियउप महापौर, सन्माननिय आयुक्त आणि सर्व सन्माननिय सभागृह हा प्रश्न श्री. सुर्वे साहेबांनी दिनांक २/७/२०१७ ला विचारलेला आहे. मला याची कल्पना नव्हती. कारण साधारणत: ऑक्टोंबरच्या दरम्यान या पदाचा कार्यभार माझ्याकडे आला. पण आपण जे प्रश्न विचारले आहेत, १ ते ४ या प्रश्नांची जी पण माहीती स्थानिक संस्था कर विभागामध्ये उपलब्ध असेल, त्याची मी तुम्हांला जास्तीत जास्त माहीती देण्याचे मी वचन देतो.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–** ठिक आहे, पुढच्या मिटींगला मला माहीती दया, पुढच्या मिटींगच्या अगोदर माहीती दया, म्हणजे सविस्तर चर्चा करता येईल. काय आहे? हा विषय महापालिकेच्या आर्थिक व्यवहारा संबंधी आहे आणि महापालिकेचा फायदा व्हावा, कर बुडवणा–यांना शासन व्हावे, हया दृष्टीकोणाने हा विचारलेला प्रश्न आहे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** मा. महापौरजी, सुर्वेजींच्या प्रश्ना बरोबरच एल.बी.टी. चे काही प्रश्न प्रलंबित आहेत. एल.बी.टी. बंद होऊन खुप दिवस झाले आहेत, आपल्या जवळ एल.बी.टी. चे किती व्यापारी होते? त्यांच्या जवळ आपले किती पैसे पेडींग होते? त्यामध्ये भरपूर दुकानदार असे होते की, त्यांच्याकडून फक्त त्यांनी एल.बी.टी. नंबर घेतला होता. ५०० रूपये किंवा १००० रूपये महीन्याला भरत होते आणि काही दुकानदार असे पण होते की, त्यांनी चुकीने एल.बी.टी. नंबर घेतला पण ते लोकल पर्चेस थोडे फार करीत होते, अशा छोटे छोटे दुकांनदारांच्या फाईल आज पर्यंत प्रलंबित आहेत. त्यांच्यावर एक तलवार लटकली आहे की कधी पण एल.बी.टी. च्या विषयी आम्हांला बोलावले जाईल आणि आमचे छाननी करतील. तर मी आपल्या अधिका–यांना निवेदन करतो की, या प्रश्नांच्या उत्तरा बरोबर हा पण खुलासा करा की, आपण प्रत्येक दिवशी किती फाईलींचा निपटारा करतात? आपल्या जवळ एल.बी.टी. चे रजिस्टर नंबर किती आहेत? आणि त्या पैकी आपण किती फाईल आज पर्यंत बंद केल्या आहेत? किती दिवसापासून एल.बी.टी. च्या या पदावर आपण आहेत? तुमचे कर्तव्य आहे की, प्रत्येक दिवशी ५० फाईलींचा निपटारा झाला पाहीजे. त्या पैकी किती दुकानदारांना आपण दिलासा दिला आहे? किती लोकांकडून आपण किती कलेक्शन केले आहे? एल.बी.टी. लागण्याच्या पहीले, उल्हासनगर महानगरपालिकेला हजार करोड रूपयांचे नुकसान झाले आहे. हे नुकसान भरून काढण्यासाठी आपले आयुक्त परत परत म्हणत होते की, जो पर्यंत एल.बी.टी. राहील, आज वसुली झाली नाही तरी, हा जकाती प्रमाणे टॅक्स नाही. इंन्ट्री टॅक्स, माल जेव्हा शहरामध्ये इंन्ट्री होतो, त्यावेळी इन्ट्री टॅक्स वसुल करण्यात यावा. हा असा टॅक्स आहे की, तो कधी पण वसुल केला जाऊ शकतो? तर अशा प्रकारचे प्रलंबित केस आहेत, त्या आपण किती पुर्ण केल्या आहेत? तुम्ही किती एल.बी.टी. कलेक्शन आपण प्रत्येक महीन्याला देत आहेत? जुन्या फाईल्स किती बंद केल्या आहेत? याची सर्व माहीती तुम्ही कमीत कमी महापौरांना, उप महापौरांना, सभागृह नेता कार्यालयामध्ये, विरोधी पक्ष नेता, स्थायी समिती सभापती यांना दयायला पाहीजे. प्रत्येक महीन्याला ५०फाईल्स बंद केल्या आहेत, ५० लोकांना दिलासा मिळाला आहे, ५० लोकांकडून आम्ही २ करोड, ४ करोड वसुल केले आहेत. अशा प्रकारचे कार्य उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये शुन्य झाले आहे. जेव्हा जकात होते, तेव्हा डेली जकातीचे कलेक्शन सर्व कार्यालयामध्ये येत होते. परंतु आज आपल्याकडे जकात

नाही आणि एल.बी.टी. पण नाही. परतु आपली थकबाकी लोकांकडे आहे. जर कोणाकडे थकबाकी नाही, तर त्यांना आपण फाईल क्लीयर करून दयायची आहे, निपटारा करायचा आहे. तो निपटारा आपण किती करीत आहेत? याची माहीती आम्हांला दयायला पाहीजे, धन्यवाद.

**या** वेळी सदस्य, श्री. प्रमोद टाले यांनी सभागृहामध्ये पुन्हा प्रवेश केला.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** महापौरजी, हा खुप चांगला विषय होता, जसे जमनादास यांनी चांगल्या प्रकारे सांगितला. शहरामध्ये खुप व्यापारी आहेत, खुप त्रस्त आहेत, कारण त्या वेळेस एल.बी.टी. नंबर घेणे खुप गरजेचे होते.

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** महापौर मॅडम, उल्हासनगरमध्ये प्लास्टीकमध्ये नाश्ता दिला जातो.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेंजीः—** आपण बंद करीत आहोत आणि महापालिकेमध्येच याचा वापर होत आहे.

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** हे काय आहे?

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** महापौरजी, जमनादास यांचा एल.बी.टी. विषयी जो विषय होता.

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** महापौर मॅडम, आपण यावर कारवाई करा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** अहो तुम्हांला माहीती नाही की, सरकारचा कुठलाच आदेश इथे चालत नाही, अधिका—याला जो पाहीजे तोच आदेश इथे होतो.

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** आपण पण सर्वांनी बघा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** त्यांना जे करायचे असते, ते बरोबर करतात.

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** प्लास्टिकच्या पिशव्या आपणच बंद केल्या आहेत ना? तर मग आता आपण त्यामध्येच नाश्ता खात आहेत. त्याच्यावर कारवाई करण्यात यावी. नाही तर उल्हासनगरमध्ये या पुढे कोणावरही कारवाई झाली नाही पाहीजे.

या वेळी सदस्य, श्री. रविंद्र बागुल हे सभागृहातून बाहेर गेले.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** आपण महापालिकेचे सदस्य, त्यांना नोटीस पाठविण्यात येईल.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** मा. महापौरजी, एल.बी.टी. चा विषय श्री.जमनादास यांनी काढला, प्रत्येक उद्योगपती, प्रत्येक गरीब, प्रत्येक व्यापार करणारा व्यक्ति कोणी जबरदस्ती, कोणी व्यापार करण्याच्या दुष्टीने एल.बी.टी. नंबर घेतला, काही लोक असे होते की, त्यांना मजबुर होऊन फार्म भरायला लागला. एक वेळा एक विषय आला होता, एल.बी.टी. नंबर घेण्यासाठी उल्हासनगरच्या डॉक्टरांचा, उल्हासनगर मेडीकल एसोशियनची मिटींग घेण्यात आली होती, तेव्हा श्री. प्रकाश कुकरेजा हे सचिव होते आणि त्यांनी एक मिटींग घेतली होती की, सर्वांनी आपला एल.बी. टी. नंबर घ्या. कोण बिजणेस काय करतात, त्यासाठी एल.बी.टी. भरा. तेव्हा सर्वांनी त्यांचे म्हणणे ऐकले आणि उल्हासनगर एसोशियनचे २५० सदस्य होते. त्यांनी आपला एल.बी.टी. नंबर घेतला आणि त्यांनी लोकल बिजनेस केला बाहेरचा कोणताही बिजनेस केला नाही. त्यांचे पर्चेस स्थानिक होते आणि त्यांना अंडर टेकिंग मिळाले होते. जर आपले अभाउट टू लेस बिजनेस जर येत असेल तर यु आर टू कंसिडर इन दि एल.बी.टी., बट इट वाज नॉट बी ऑन दि बी ऑन दि २ लाख दॅन बी कंसिडर ऑफ एल.बी.टी. तर सर्वच जवळ जवळ ८५ टक्के ते ९५ टक्के आज पर्यंत मी त्या लोकांबरोबर मिटींग ठेवली होती. तर कोणीही २ लाखापेक्षा बिजनेस केला नाही? आणि त्यांनी जो पण बिजनेस केला आहे, तो लोकल बिजनेस आहे आणि त्यांनी मला मिटींगमध्ये बोलवले होते आणि सांगितले नंबर घेऊन सुध्दा आम्ही फसलो आहे. त्यांनी सांगितले की, आम्हांला नोटीस यायला सुरूवात झाली आहे. तरी याचे निर्वारण काय होईल? मग प्रत्येक डॉक्टरांना आपला दवाखाना बंद करायला लागेल, एक तर त्यांनी एल.बी.टी. नंतर घेतला आहे आणि बिजनेस काहीच केले नाही. त्यांना पत्र आले की, दोन हजार, पंधारा, सोळा, सतरा, आठरा आपण काय केले? सर्वांनी आपले खाते नबंर घेऊन महानगरपालिकेमध्ये यावे. हे काय आहे, मॅडम, नोकरीसाठी अंडर टेकिंग केले होते. जर आम्ही २ लाखापेक्षा जास्त जातील तर हॉलेंट्री घेणार आहेत. जर कोणत्याही डॉक्टरांनी २ लाखापेक्षा जास्त दिले आहेत, तर ते भरू शकतात किंवा त्यांनी भरले असतील आणि आम्ही श्री. प्रकाश कुकरेजा यांच्या बरोबर बोलणी सुध्दा केली होती आणि त्याच वेळी आम्ही सायंकाळी सर्व डॉक्टरांना रिजेन्सी हॉटेलमध्ये बोलावले होते. मी श्री. प्रकाश कुकरेजा यांना धन्यवाद देतो की, त्यांनी आम्हांला सहकार्य केले होते. त्यांनी अ ग्रुपमध्ये रजिस्ट्रेशन केले होते, इथील सर्व स्टाफ घेऊन आम्ही रजिस्ट्रेशन केले होते की, पुढे आम्हांला

त्रास होणार नाही, आणि एल.बी. टी. भरणार होतो. आम्ही एल.बी.टी. भरले, ज्यांचे काहीच नाही तर त्यांना नोटीस का पाठवली जाते? आपण या विषयाला इथेच बंद करा, ज्यांचे काहीच पर्चेस नाही. जर आपल्याला असे वाटत असेल की, त्यांच्या जवळ पर्चेस आहे, तर त्यांना आपण नोटीस दया. ज्यांनी काहीच पर्चेस केले नाही, त्यांना का त्रास देत आहेत, त्याचा खुलासा आपल्याकडून पाहीजे साहेब.

या वेळी सदस्य, श्री. रविंद्र बागुल यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**उप आयुक्त, (स्था.सं.कर), श्री. विनायक फासे:—** सन्माननिय सदस्यांना मी माहीती देवू इच्छितो की, एल.बी.टी. मध्ये रजिस्ट्रेशन केले तर अॅसेसमेंट करणे तुम्हांला अनिवार्य आहे. तुम्ही बिजनेस करा अथवा नाही करा, नोटीसा त्यांनाच जातात की, ज्यांचे रजिस्ट्रेशन आहे. त्यांनी खरेदी केले की नाही, हे जेव्हा त्यांचे बॅलेनसीट स्टेडींग आणि प्रॉफिट लॉस अॅकाउंट पर्चेस रजिस्ट्रेशन जेव्हा ते आपल्याला देतील, त्या वेळेस आपल्याला लक्षात येते त्यांना एल. बी.टी. किती लागतो आणि किती नाही? त्यांनी जर रजिस्ट्रेशन केले नसते तर त्यांना नोटीस गेली नसती. रजिस्ट्रेशन ज्यांनी ज्यांनी केले आहे, त्या सर्वांना नोटीसा जातात. मेडीकल असोशियन बाबत एक सांगतो, कायदयामध्ये नंतर किती दुरूस्ती झाली? ज्यांना एक्सपोर्ट म्हणले जाते एल.बी.टी. च्या कायदयात की उल्हासनगरमध्ये माल आणला आणि तो उल्हासनगरमध्ये न विकता तो उल्हासनगरच्या बाहेर विकला तर त्यांना एक्सपोर्ट म्हणटले जाते आणि मेडीकलवाल्यांना त्या कॅटॅगिरीमध्ये घेतलेले आहे. त्यांचे अपिल पण सुरू आहे. ते अपील मा. आयुक्त साहेबांच्या स्तरावर आता प्रलंबित आहे. नविन आयुक्त साहेबांना सुध्दा तो विषय बोललेलो आहे. आपण स्टेडी करून आल्यावर या मेडीकल असोशियन वाल्यांबरोबर एक बैठक घ्यावी लागेल आणि अपिल निकालात काढावे लागेल.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** धिस इज नॉट अ पर्चेस ऑफ मेडीसिन, धिस इज अ वुई आर नॉट एक्सपोर्टेड दि अॅनी मेडीसिन, वुई आर पर्चेस मेडिसिन फ्रॉम एल.बी.टी. ओनर, एल.बी.टी. बिजनेस मॅन ऑल रेडी दोज हु हॅव हॅवींग एल.बी.टी. नंबरर्स लाईक इफ आय हॅव पर्चेस रन माय हॉस्पिटल, मेडिसिन हॅज बीन पर्चेस बाय दि लोकल वेंडर.

**उप आयुक्त, (स्था.सं.कर), श्री. विनायक फासे:—** मी पण तेच म्हणतो, की रजिस्ट्रेशन केले नंतर ते रिटर्न जे भरतात, तर त्यांनी अॅसेसमेंट करून घेतल्यावर नंतर या सर्व गोष्टी क्लीयर होतील.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मी आता तसे पत्र देवू का? सद्या मी काहीही पर्चेस केले नाही, पण माझी एक चुकी झाली की, मी एल.बी.टी. नंबर घेतला, मी पत्र देवू शकतो का? मी काहीही पर्चेस केले नाही. जर केली पण असेल तर १ लाखाच्या आतमध्ये असेल कदाचित, प्रश्न विचारतो तर मी पत्र आय हॅव नॉट डन एनी बिजनेस सिन्स लास्ट सन २०१५, २०१६ ते सन २०१७ इट कॅन बी वायबल दॅट फाईल विल बी क्लोज.

**उप आयुक्त, (स्था.सं.कर), श्री. विनायक फासे:—** अशी केस असेल तर मला सांगा सर,

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** इट इज ऑल डॉक्टर आर सेम रनिंग बिकॉज ऑल डॉक्टर आर नॉट पर्चेस मेडीसिन फ्रॉम आऊट साईड दे आर पर्चेस जनरल ऑनली दे आर जनरल प्रॅक्टीशनर सो ८५%, जनरल प्रॅक्टीशनर अॅन्ड ५०% हॉस्पिटल ओनर्स, हॉस्पिटल वनर्स ऑल सो जनरल पर्चेस नॉट फ्रॉम आऊट साईड.

**उप आयुक्त, (स्था.सं.कर), श्री. विनायक फासे:—** सर हा विषया बाबत आपण प्रत्यक्ष भेटू एखादा फॉर एक सॅपल घेऊ आणि मग चर्चा करू.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** ठिक आहे, धन्यवाद.

**महापालिका सचिव:—** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे, लक्षवेधी आल्या आहेत, लक्षवेधी सुचना क्र. १ आहे, सुचकाचे नाव श्री. सुमित सागर सोनकांबळे, अनुमोदकाचे नाव श्री. सुनिल सुर्वे विषय:— प्रभाग क्र. १३ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुर्णाकृती पुतळा बसवणे बाबतची आहे. लक्षवेधी क्र. २ श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे, श्रीमती कविता बागुल यांची आहे, उल्हासनगर महापालिका हद्दीतील वालधूनी नदीच्या साफसफाई व स्वच्छते बाबतची लक्षवेधी सुचना आहे. लक्षवेधी सुचना क्र.३ सुचकाचे नाव आहे, श्री. प्रदिप रामचंदानी व अनुमोदक आहेत, श्री.मनोज सयानी, विषय: उल्हासनगर—५ येथील प्लॉट क्र. ७५२ सिट क्र. ७१ आरक्षण २४४ चौ.मी. क्षेत्रफळ असलेला भुखंड कब्रस्तान करीता आरक्षित केल्याने त्यामध्ये बाधित होणा—या सात बांधकामधारकांना पर्यायी जागा देण्याबाबत. लक्षेवेधी सुचना क्र. ४ सुचकाचे नाव श्री. जमनादास पुरस्वानी, अनुमोदकाचे नाव श्री. राजेश वदारिया भुयारी गटार साफ करण्यासाठी मोठे जेटींग मशिन ठेकेदार पध्दतीने देण्यात आले होते. सदरील एस.एल.सि.एम. मशिन जेटींग मशिन कुठेही काम करत असतांना आढळून येत नसल्याने त्याबाबतची लक्षवेधी सुचना आहे. लक्षवेधी सुचना क्र. ५ सुचकाचे नाव आहे, श्री. सतरामदास जेसवानी व अनुमोदकाचे नाव आहे, श्री. राजेश वदारिया विषय: उल्हासनगर महापालिकेच्या आखतारीतील मृत जनावरे

कच—याच्या खत्यात टाकण्यात येतात. सदरील जनावरे जाळण्या करीता मशिन खरेदी करणे बाबत. लक्षवेधी सुचना क्र. ६ सुचकाचे नाव आहे, श्री. सुनिल सुर्वे व अनुमोदकाचे नाव आहे, श्री. चंद्रशेखर यादव, नगररचना विभागातील उप सचिव दर्जाचे पद निर्देशित अधिकारी सहाय्यक नगररचनाकार, आरेखक इत्यादी रिक्त पदे तातडीने भरणे बाबत. या पैकी मा. महापौरांनी दोन लक्षवेधी स्विकारल्या आहेत. एक आहे, सुचक आहेत, श्री. जमनादास पुरस्वानी आणि अनुमोदक आहेत, श्री. राजेश वदारिया, भुयारी गटार साफ करण्यासाठी मोठे जेटींग मशिन ठेकेदार पध्दतीने देण्यात आलेली होती. दुसरी आहे, सुचक आहेत, श्री. सतरामदास जेसवानी व अनुमोदक आहेत, श्री. राजेश वदारिया उल्हासनगर महापालिकेच्या आखतारीतील मृत जनावरे कच—याच्या खत्यात टाकणे बाबत. पहीली लक्षवेधी सुचना आहे, श्री.जमनादास पुरस्वानी यांची.

**महापालिका सचिवः—**लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत, श्री. जमनादास पुरस्वानी व अनुमोदक आहेत, श्री. राजेश वदारिया

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सुचकाचे नाव :— श्री. जमनु पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

**विषय :—** भुयारी गटार साफ करणेसाठी मोठे जेटींग मशिन ठेकेदार पध्दतीने देण्यात आले होते. सदरील एस.एल.सी.एम. मशिन (जेटिंग मशिन) कोठेही काम करत असतांना आढळुन येत नसल्याबाबतची लक्षवेधी सूचना

भुयारी गटार साफ करणेसाठी मोठे जटीग मशिन ठेकेदार पध्दतीने देण्यात आलेले होते. उल्हासनगर शहरातील अंडरग्राउंड भुयारी गटारे साफ करणे करीता मोठी जेटींग ठेकेदार पध्दतीने दिलेली आहे. त्या करिता महानगरपालिका मे ॲकार्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. नवि मुंबई यांना रू.६४,८०,००० यांना भुयारी गटाराची कामे करणे करीता अदा करत आहेत. परंतु सदरील एस.एल.सि.एम. मशिन (जेटीग मशिन) कोठेही काम करत असताना आढळून येत नाही. सदरील जेटींग मशिन कोणत्या अधिकारी यांचेकडे आहे हे देखिल समजत नाही.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, मा. उप महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सभागृहातील सर्व सदस्य, आजच्या या लक्षवेधीद्वारा....

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** कुठल्या दोन स्विकारल्या आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** एक सतरामदास जेसवानी यांची, आजच्या या लक्षवेधीद्वारा मी आपले लक्ष केंद्रीत करतो की, उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे अंडरग्राउंड ड्रेनेज खुपच खराब स्थितीमध्ये आहे. आपल्याकडे, उल्हासनगर महानगरपालिकेकडे अशी जेटींग मशिन आहेत, वेगवेगळया प्रभाग समितींमध्ये त्या अंडरग्राउंड ड्रेनेज साफ करण्याचे काम करतात. त्याच्या नंतरही समस्यांचे समाधान न झाल्यामुळे आपण एक मोठी जेटींग मशिन तीचे भाडे प्रत्येक दिवसाला जवळ जवळ ६५ हजार रूपयां पेक्षा जास्त आहे. ६४ लाख ८० हजार रूपयांमध्ये ही आपण भाडेतत्वावर तीन महीन्यासाठी घेतली आहे. उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये अंडरग्राउंड ड्रेनेज साफ करण्यासाठी ६४ लाख ८०हजार रूपये ही कंपनी मे. ॲकार्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. नवि मुंबई या कंपनीला आपण हे काम दिले आहे आणि उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे त्या कंपनीला वर्क ऑर्डर पण दिली आहे आणि या मशिनचे काम सुरू झाले आहे. सभागृहामध्ये उपस्थित सर्व नगरसेवक याची माहीती ठेवली असेल किंवा काही नगरसेवकांना माहीती नसेल. परंतु आज उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा विभाग अंडरग्राउंड डिपार्टमेंटची ही स्थिती आहे की, जर कोणी नगरसेवक किंवा मी स्वत: सभागृह नेता या नात्याने जेव्हा आम्ही अंडरग्राउंड ड्रेनेजची तक्रार करतो की, अंडरग्राउंड ड्रेनेज खुपच खराब स्थितीमध्ये आहेत. तिथे माती भरली आहे आणि तिथे साफसफाई करण्यासाठी गाडीची आवश्यकता आहे. तेव्हा संबंधित विभागाकडून ठेकेदाराचा मोबाईल नंबर दिला जातो की, हा

ठेकेदाराचा नंबर आहे, या नंबरवर आपण संपर्क करा. मला समजून येत नाही की, आज ४.०० वाजता सभागृह सुरू झाले आहे आणि आपली महानगरपालिका कोणत्या दिशेने जात आहे. आज आपण या स्थितीमध्ये आलो आहेत की, आपले नगरसेवक आपले सन्माननिय सदस्य, कोणत्याही अधिका—याला कंम्पलेट न देता थेट ठेकेदाराशी संपर्क करा. का या महानगरपालिकेमध्ये कोणीही असे अधिकारी निश्चित नाही का? जो एवढा महाग ठेका ६४ लाख ८० हजार रूपयांचा ठेका आपण तीन महीन्यासाठी दिला आहे. या गाडीवाल्याला गाडी चालवून अंडरग्राउंड ड्रेनेजची सफाई करायची आहे. जर गाडी एकाच जागेवर उभी राहील आणि तिच्यावर कोणाचेही नियंत्रण राहणार नाही. तरी सुध्दा आपल्याला पैसे दयायचे आहेत. आपले पैसे लागू झाले आहेत आणि गाडी एवढी मोठी आहे की, त्या गाडीच्या मागे जर आपल्या डिपार्टमेंटचा कोणीही अधिकारी नसेल तर मला वाटते की, १३ कि. मिटरच्या या छोटयाशा शहरामध्ये ती गाडी काहीच काम करू शकत नाही. कारण की, ही गाडी एवढी मोठी आहे की, तिची वेळ निश्चित करण्यासाठी आपल्याला त्या एरियामध्ये जायचे आहे. त्या एरियामध्ये रोड किती मोठा आहे? त्या एरियामध्ये ही गाडी जाऊन साफसफाई करू शकते का? किंवा करू शकत नाही किंवा ट्राफिकमध्ये अडकून जाईल. या सर्व गोष्टींवर लक्ष ठेवण्यासाठी आपल्या अधिका—याचे काम आहे. ही गाडी रात्री काम करेल आणि ही गाडी सकाळी १०.०० वाजण्याच्या पहीले ६.०० वाजल्या पासून १०.०० वाजे पर्यंत काम करेल. कारण की, मोठमोठया रोडवर ही मशिन कधी पण काम करू शकते. परंतु या शहरामध्ये असे पण रोड आहेत, ३० फुटाचे, २५ फुटाचे इथे ही गाडी रात्री १२.०० वाजल्या पासून काम करू शकते किंवा सकाळी ६.०० वाजल्या पासून १०.०० वाजे पर्यंत काम करू शकते. परंतु आज एवढया दिवसा पासून हे काम चालू आहे. परंतु कोणीही आपला इंजिनियर, संबंधित डिपार्टमेंटचे अधिकारी त्या गाडी बरोबर नाहीत आणि त्याची रिपोर्टींग पण नाही. कोणाच्याही कार्यालयामध्ये, मा. महापौरजी आपल्या कार्यालयामध्ये या गाडीचा रिपोर्ट येतो का? ही गाडी रोज कुठे कुठे, किती तास चालते? मा. उप महापौरजी माझा प्रश्न तुम्हांला आहे की, या गाडीचा रिपोर्ट आपल्या कार्यालयामध्ये येते का? ही गाडी या दिवशी, या तारखेला कोणकोणत्या ठिकाणी किती तास चालली? मी आयुक्तांना विचारतो की, त्यांना तर माहीती नसेलच. परंतु आयुक्त नाहीत तर माझा प्रश्न उप आयुक्त आणि पाणी पुरवठा विभागाला पण हाच असता की, आपल्याला माहीती आहे का ही गाडी कुठे चालते? आपण फक्त ठेका देतो, महानगरपालिकेचे काम फक्त ठेका देणे आणि वर्क ऑर्डर देण्या पुरतेच आहे. मला खुप दु:खाने या सभागृहामध्ये सांगावेसे वाटते की, आपल्या अधिका—यांची, आपल्या प्रशासनाची ठेकेदारावर कोणतीच पकड राहीली नाही? एवढा मोठा ठेका दिल्या नंतर गाडी चालली किंवा नाही चालली ड्रेनेजच्या किती तक्रारी सोडवण्यात आल्या? आणि ड्रेनेजच्या किती तक्रारी बाकी आहेत? गाडी कुठे कुठे जाते? संपर्ण प्रोग्राम एक आठवडयाचा बनला पाहीजे आणि तसे प्रोग्राम बनवून ठेकेदाराला आपल्या अधिका—यांनी दयायला पाहीजे आणि आपले महापौर, उप महापौर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता आणि स्थायी समितीचे जे कार्यालय आहेत. तिथे हे प्रोग्राम व्हायला पाहीजे. आपल्या संबधित, पाणी पुरवठा विभागाचे जे अधिकारी आहेत, त्यांच्या कार्यालयांमध्ये हे प्रोग्राम असायला पाहीजे. त्याच्या नंतर जसे ही गाडी काम करीत आहे, नगरसेवक जर संबंधित विभागाला फोन करतात, जिथे चार गाडया ऑल रेडी चालू आहेत, त्यांना पण आमच्याकडे पाठवत नाहीत. ठेकेदाराकडे एक गाडी आहे, परंतु ज्या चार गाडया नियमित चालत होत्या त्या कुठे गेल्या? त्या गाडयांचे ठिकाण कुठे आहे? आपल्या अंडरग्राउंड डिपार्टमेंटचे कार्य शुन्य झाले आहे. आपल्याकडे बॅरेकमध्ये जे अंडरग्राउंड प्रॉपर्टी ड्रेनेज कनेक्शन होते, ते ड्रेनेज कनेक्शन लेबर होते. मा. महापौरजी खुप दु:खाने मला सांगावेसे वाटते की, चार महीन्या पासून ते लेबर कामावर आले नाहीत. आपल्याला माहीत आहे का? मा. उप महापौरजी आपण याची माहीती ठेवतात का? चार महीन्यापासून ठेकेदार लेबर सप्लाय करीत नाही. आज आपण कोणत्या दिशेने जात आहेत? आज पाऊस सुरू होणार आहे, अंडरग्राउंड ड्रेनेजचे जे प्रॉपर्टी कनेक्शन आहेत, बॅरेक आहेत, झोपडपट्टया आहेत, जिथे गरीब वार्ड आहेत, गरीब वस्त्या आहेत तिथे आपल्याला लेबर लागतात. जे बॅरेकच्या मागे जाऊन अंडरग्राउंड ड्रेनेजची सफाई करतात. चार महीन्या पासून एक पण लेबर नाही. ही गाडी आहे, मोठमोठया रोडसाठी आहे. तर या गाडीचा काहीच ठिकाणा नाही. कोणते इंजिनियर आहेत, मला सांगा, मी सभागृह नेता आहे, या सभागृहाला सांभाळत आहे. मला माहीती नाही की, आज अंडरग्राउंड डिपार्टमेंटचा कोणते अधिकारी, कोणते इंजिनियर या गाडयांची देखरेख करीत आहेत. आज मी जेव्हा कंम्पलेट केली, तेव्हा मला ठेकेदाराचा नंबर दिला गेला. हा ठेकेदाराचा नंबर आहे, आपण त्याच्या बरोबर बोला. आता नगरसेवक थेट ठेकेदाराशी संबंध ठेवणार का? कशा प्रकारचे कार्य चालले आहे, मा. महापौरजी मी आपल्याला निवेदन करतो की, आपण अधिका—यांना सभागृहामध्ये स्टेजवर बोलावावे आणि या गोष्टीचा खुलासा करण्यात यावा की, ही गाडी किती दिवसा पासून चालू केली आहे? आज पर्यंत कुठेकुठे काम केले आहे? ड्रेनेज लाईनचे कनेक्शन किती साफ केले आहेत? आणि आपल्या चार गाडया कुठे कुठे चालतात? कोण इंजिनियर आहेत की, त्यांच्या देखरेखीखाली हे काम चालते. लेबर चार महीन्या पासून येत नाहीत, त्यांचा ठेका कोणी घेतले आहे? आणि ठेकेदार लेबर सप्लाय का करीत नाही? अशा ठेकेदारांना ब्लॅक लिस्टमध्ये का टाकत नाही? मा. महापौरजी संबंधित अधिका—यांना सांगा की, सभागृहामध्ये येऊन याचा खुलासा करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** मा. महापौर महोदया, आता खरोखर डोक्यात मारून घेण्याची वेळ आली आहे, मला वाटते आता डोके आपटावे तर लोकांचे काय होत असेल? सभागृह नेता एवढे हतबल झालेले आहेत की, पहीली

गोष्ट हा लक्षवेधीचा विषय आहे का? ठेकेदार व्यवस्थित काम करत नसतील तर महापौर दालन, उप महापौर दालन आहे, सभागृह नेता दालन आहे, अधिकारी काम करीत नसतील तर त्यासाठी दालने आहेत. विषय हा लक्षवेधीचा होऊ शकत नाही, तरी तुम्ही ती स्विकारली कारण ती सत्ता पक्षाची आहे म्हणून सत्ता पक्षाच्या वरिष्ठ नगरसेवकांनी दिल्या नंतर मग काय राज्याच्या मनात जे आले वाटेल ते करणार? म्हणजे जे चुकीचे असेल ती त्यांनी स्विकार केली आणि चांगल्या लक्षवेधी त्यांनी मागे ठेवल्या मला वाटते श्री. सतरामदास जेसवानी जे करतात ते बरोबर आहे नेहमीच त्यांनी इथेच येऊन बसले पाहीजे. कारण प्रशासन कामच करू शकणार नाही. नियंत्रण काय ठेवायचे? कोणी ठेवायचे? ते कळत नाही. नियंत्रण कोणी ठेवायचे? प्रशासनावर नियंत्रण कसे ठेवायचे? सभागृह नेता जर एवढे हतबल असतील तर बाकीच्याचे काय? कन्ट्रोल कोण ठेवणार? आता पर्यंत या विषयावर सभागृह नेत्याकडे किंवा महापौर दालनात चर्चा व्हायला पाहीजे होते. तिथे अधिका—यांना बोलावायला पाहीजे होते की, अशा प्रकारे ठेकेदार करीत आहे, त्याच्यावर काय केलेले आहे. हा विषय जर सुध्दा महासभेचा असेल, तर या पेक्षा दुदैव कोणतेच नाही? खरोखरच मला वाटते की, प्रत्येक सदस्यांला वाटत असेल की डोकं आपटावे. सत्ता पक्ष आहे ना? सत्ता पक्ष काय? आणि विरोधी पक्ष काय? उप महापौरांनी सुध्दा मान हलवली की, मलाही माहीत नाही, मलाही फोन येत नाहीत. या पेक्षा दुसरे काय अजून? उप महापौर, महापौर लक्षवेधी असली पाहिजे ती लक्षवेधी होवू शकत नाही दालन, त्यासाठी आहे आपल्या दालनाचे वापर करा, दालनाचे वापर तातडीने होईल तेव्हा फक्त आपल्या डब्बे घेऊन जेवण करणे पेक्षा इतर चांगल्या ते चांगला त्या अधिका—यांना वठणीवर आणण्यासाठी जे अधिकारी कामचूकारपणा करीत असतील त्यासाठी दालन आहे त्या दालनाचे वापर करणार कधी? हेच जर कळले नाही. तर सत्ता पक्ष काय? विरोधी पक्ष काय? असे मिनाताई बोलत होत्या विरोधाकडून बोलनेची गरजच नाही, खरोखर आता अशा परिस्थितीमध्ये बोलायचे काय? बोलून उपयोग नाही.

**<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानीः—</u>** मा. महापौर जी या महासभेमध्ये माझे मित्र माझे सोबत १९९७ पासून आहे पण लक्षवेधीचा अर्थ समजले नाही की लक्षवेधीचा अर्थ असा असते की या शहराच्या जे नुकसान होत आहे आणि ज्या ठेकेदारा पध्दती नुसार ६५ हजाराचे रोजच्या नुकसान होत आहे त्याचे लक्ष या महासभेमध्ये लक्ष वेधण्यासाठी..

**<u>सदस्य श्री धनंजय बोडारेः—</u>** त्यांच्यासाठी दालन पण आहे आणि ऑफिस पण आहे, ऑफिस कशासाठी आहे? सभेमध्ये या विषयावर चर्चा करणार तर ऑफिसमध्ये चर्चा काय होते?

**<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानीः—</u>** सत्ता पक्ष आणि विरोधी पक्षाचे जिथे काम चुकीचे होणार तिथे आपण सत्ताधारी समजणार नाही, आमचे कर्तव्य आहे.

**<u>सदस्य श्री धनंजय बोडारेः—</u>** बरोबर कुठे होत आहे? सर्वाचे सर्व चुकीचे होत आहे, डाळीमध्ये काळे नाही संर्पूण डाळ ही काळी आहे.

**<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानीः —</u>** लोकांचे करांचे एक—एक पाईच्या हिशोब देणार सभागृहाचे कर्तव्य आहे.

**<u>सदस्य श्री धनंजय बोडारेः—</u>** एक गोष्ट खरी असेल तर सांगा. सर्व गोष्ट ही चुकीचे आहे.एक तरी नगरसेवकाचे एक वर्षाचे कार्यकाळमध्ये संतुष्ट आहे का? मला सांगा.

**<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानीः—</u>** माझ्याकडे अशी अशी शिवसेनाची लक्षवेधी ठेवली आहे की समोरच्या कोणी टीयर गडरचा घर बनवत आहे आणि कोणी लक्षवेधी टाकली की तो टीयर गडरचा घर का बनवतात? अशी लक्षवेधीची माझ्याकडे भांडार आहे आणि आज तुम्ही काय सांगतात, ६५ हजार रोजचे शहराचे वाया जात आहे. आणि तुम्हाला असा वाटते की हा लक्षवेधी नाही आहे. आर्श्चयची गोष्ट आहे.महापौर जी.

**<u>सदस्य श्री धनंजय बोडारेः—</u>** कोणी केले? ६५ हजार कोणी दिले? का दिले?तेव्हा माहिती झाली नाही का? ६५ हजार कोणी दिले? लक्षवेधीच्या अर्थ आम्हाला सागता आहे.

**<u>महापौर तथा पिठासीन अधिकारीः—</u>** तुम्ही लोक आपसात समजून ध्या.

**<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानीः—</u>** दुस—या महासभामध्ये पाच वर्षाची अशी अशी लक्षवेधी दाखवणार की ज्याला काही अर्थ नही.

**<u>सदस्य श्री धनंजय बोडारेः—</u>** सभागृह नेता आहे तर काय? असेच सोडून देणार का? सभा चालवता येत नाही तर खुर्ची सोडून दया.

**<u>सदस्य श्री सुनिल सुर्वेः—</u>** मा. महापौर जो सरळ प्रश्न आहे की जेव्हा विरोधी पक्ष नेता बोलत आहे तर सभागृह नेता सम्मान देऊ शकत नाही तर काय अर्थ.

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते समजून येत नव्हते.

**<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानीः —</u>** मी शंभर लक्षवेधीच्या अर्थ दाखवणार ,मला कोणाला शिकवणेची गरज नाही,की कोणती लक्षवेधी घ्याची आहे कोणती घ्याची नाही.

**सदस्य श्री सुनिल सुर्वे:—** विरोधी पक्ष नेता हेच बोलत होते पण तुम्ही मध्ये बोलतात या तुम्हाला शोभा देत नाही. तुम्हाला नंतर बोलायचे होते.

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी:** — माझ्या लक्षवेधीवर टिका टिप्पणी करण्याची गरज नाही की कोणती लक्षवेधी खरी आहे तुम्हाला बोलायचे आहे तर बोला.

**सदस्य श्री धनंजय बोडारे:—** आमची लक्षवेधी ,लक्षवेधी नाही का?

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी:—** विरोधी पक्ष नेताला जे बोलायचे आहे ते बोलू दया, पण माझी लक्षवेधी ,लक्षवेधीचे लायक नाही आहे असे बोलू शकत नाही. नाहीतर या सभागृहामध्ये शंभर अशा लक्षवेधी पाच वर्षामध्ये कोणती, कोणती घेतली आहे मी त्याची प्रत दाखवू शकतो.

**सदस्य श्री धनंजय बोडारे:—** घेऊन या, घेऊन या, आव्हान करतो.

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी:—** आव्हान करतो की मी दाखवू शकतो. की एक पण लक्षवेधी कामाची नव्हती.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** हया लक्षवेधी पेक्षा जास्त महत्वपूर्ण लक्षवेधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती.

**सदस्य, श्री.जमनादास सदस्य श्री पुरस्वानी:—** आज शहरामध्ये अन्डर ग्राऊड ड्रेनिजची गाडी शहरामध्ये चालू आहे कुठे चालू आहे कोणत्या अधिका—याचे देख रेख मध्ये चालू आहे हा लक्षवेधी नाही आहे का? मी दिली आहे ही लक्षवेधी

**सदस्य श्री धनंजय बोडारे: —** ६४ हजार, ६४ लाख कोणी दिले आहे?

**सदस्य, श्री.जमनादास सदस्य श्री पुरस्वानी:—** तुम्ही दिले आहे, तुम्ही स्थायी समितीमध्ये तुम्ही पास करून दिले आहे.

**सदस्य श्री धनंजय बोडारे: —** स्थायी समिती सभापती कोण आहे

**सदस्य, श्री.जमनादास सदस्य श्री पुरस्वानी:—** सभापती कोणी असू दया ,तुम्ही पण स्थायी समितीचे सदस्य आहे. ती स्थायी समितीची जबाबदारी आहे.

**सदस्य श्री धनंजय बोडारे:—** तुम्ही कन्ट्रोल करू शकत नाही, सुपरविजन करू शकत नाही , नियंत्रण ठेऊ शकत नाही

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी:—** कन्ट्रोल करू शकत नाही त्यासाठी तर लक्षवेधीच्या माध्यमातून अण्णले आहे.

**सदस्य श्री धनंजय बोडारे:—** असे कसे चालणार मा. महापौर जी सभागृहानेताकडून या अपेक्षा आहे तर विरोधी पक्ष नेता तर्फे पण हेच चालणार आम्ही पण आपली मनमानी करणार. आणि विरोधी पक्षनेता आपच चालणार.

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी:—** काय चालणार हे शिकवायची गरज नाही. विरोधी पक्षनेता तर्फे विरोध व्हायला पाहिजे.जर विरोधी पक्ष नेता विरोध करत नाही आणि आम्ही विरोध करणार आमच्या शहराचे जे पण कर भरणार आहे त्यांचे एक एक पैशाच्या बचतीसाठी जर कोणताही प्रस्ताव येणार ज्यामध्ये शहराच्या पैसा वाया जाणार तर आम्ही त्याच्यावर लक्ष नक्की देणार.

**सदस्य श्री धनंजय बोडारे:—** नाटक करायची गरज नाही. हे मगरीचे आश्रू दाखवायचे नाही, सर्व लुटुन खात आहोत एक वर्षापासून काही झाले नाही.

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होत समजून येत नव्हते.

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी:—** माझ्या लक्षवेधीवर मला बोलायचे आहे....

**सदस्य श्री धनंजय बोडारे: —** त्यासाठी दालन आहे, हे ऐकण्यासाठी आम्ही आलेलो नाही.

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी:—** दालन तर सर्व कामासाठी आहे.

**सदस्य श्री धनंजय बोडारे:—** कोणाला ब्लॅकमेल करण्यासाठी नाही आहे.

**सदस्य श्री सुनिल सुर्वे:—** मा. महापौर जे प्रोटोकॉल तोडला आहे तुम्ही त्यांना सांगा ना, ते लोक बोलणार तर आम्ही चुप बसणार का?

**उप महापौर, श्री.जीवन इदनानी:—** सुर्वेजी तुम्ही बसा, मा.बोडारे जी, मा.पुरस्वानीजी तुम्ही दोघे या सदनचे सिनियर आणि जाणकार सदस्य आहात आणि आम्ही सर्व एकत्रित मिळून काम केले आहेत.तर कृपया तुम्ही दोघे मिळून प्रत्येक गोष्टीचे समाधान करा माझी विनंती आहे तुम्हा दोघांना.

**सदस्य श्री धनंजय बोडारे:—** जसे आहे तसे चालणार.

**उप महापौर, श्री.जीवन इदनानी:—** आम्हाला अपेक्षा आहे तुमच्याकडून पण आणि जमनु जी कडून पण.

**<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानी:—</u>** मा. महापौर जी माझ्या लक्षवेधी वर सन्माननीय अधिका—यानी सागावे उत्तर दयावे.

**<u>सदस्य श्री सतरामदास जेसवानी:—</u>** मा. महापौर जी या लक्षवेधीवर दुसरे सदस्यांना पण बोलू दया.

**<u>सदस्य श्री धनंजय बोडारे:—</u>** तुम्हाला पण बोलायचे आहे की जेट मशिन काय वस्तु आहे?

**<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** मोठी गोष्ट आहे.

**<u>उप महापौर, श्री.जीवन इदनानी:—</u>** नाथानी जी कृपया एक एक करून सर्वांना बोलू देणार,कृपया.

**<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** मला बोलू देणार ना, मला बोलायचे आहे मला बोलू दया. जेट मशिनचा खूपच गंभीर मुददा आहे.

**<u>उप महापौर, श्री.जीवन इदनानी:—</u>** हे देणार ना. बसून घ्या तुम्हाला पण बोलू देणार. दादा सतरामजी तुम्ही बोला. फक्त दोन मिनट, सर्वांनी फक्त दोन—दोन मिनिटाचे आपले मत मांडावे.

**<u>सदस्य श्री सतरामदास जेसवानी:—</u>** फक्त एक मिनिट बोलणार. की सर्व सदस्यांना हात जोडून माझी विनंती आहे, मा. महापौरजी, उप—महापौरजी हा विषय वारंवार आला आहे आणि मी पण लक्षवेधीच्या माध्यमातून कितीदा दिले आहे, वारंबार पत्र पण दिले आहे, नाइलाज आहे हया गोष्टीला, की लक्षवेधीचे माध्यमातून महासभेमध्ये आणली जाते आणि कोणताही मार्ग नाही हया महासभा चालवण्यासाठी महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सभागृहनेते, विरोधी पक्षनेते धनंजय बोडारेजी, दोन्ही नगरसेवक आपले जागृत आहे आम्ही सर्व लोकांच्या हितासाठी आलो आहे. शहरांची परिस्थिती खूपच गंभीर आहे. अन्डर ग्राऊड ड्रेनेज लाईनसाठी दैंनदिन माझा फोन येत असतो आणि ज्या चार गाडया आहे त्या बरोबर काम करत नाही जर चुकीमुळे गाडी आली पण तर हजार ते दोन हजार तीन हजार रूपये आण्णतात जिथे सफाई करतात तिकडून मोफतमध्ये काम करत नाही ५०, ५०,वेळा बोलून पण कृपया माझी हात जोडून विनंती आहे की हया विभागात सुधार आणली पाहिजे. त्यासाठी आम्ही सर्व मिळून प्रयत्न करू, धन्यवाद.

**<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** मा. महापौर जी. ज्या ६४ करोडचा, माफ करा ६४ करोड नाही ६४ लाखचे जो विषय पास झाला आहे तो विषय महासभेत पास झाला नाही, स्थायी समिती मध्ये पास झाला, आणि स्थायी समितीचे १६ सदस्यांना माहिती आहे ज्या काही पास होतात त्या सर्व स्थायी समितीमध्ये पास होतात इथे तर पास होत नाही, आम्हाला काही माहिती नसतात. सर्वात महत्वाच्या विषय आहे. मी ईमानदारीने विचारणार आणि सर्व सदनला विचारणार की आजच्या आगोदर एक महिना झाला गाडीना येऊन किती सदस्यांना खरच माहिती आहे की गाडी आण्णली आहे आणि गाडी चालत आहे मनापासून बोला आणी सत्य बोला, ज्यांना माहिती आहे ज्यांना माहिती नाही आहे पण सत्य बोला. किती लोकांना माहिती आहे. किती लोकांना माहिती नाही ते विचारत आहे मी,

त्यावेळी काही सदस्य माहिती आहे, माहिती आहे एकत्रित बोलत होते.

.**<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** तुम्हाला माहिती आहे, किती लोकांना माहिती आहे ते जाणून इच्छुक आहे मी.

**<u>सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>** आम्हाला माहिती नाही आहे.

**<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** जमनुजी लक्षवेधी, आम्ही सर्वांना आणि संबंधित विभागाचे लक्ष वेधण्यासाठी आणली होती की शहरासाठी आणि सदस्यासाठी काय वस्तु आहे गाडी? नुकसान होत आहे की नाही ते मला आज माहिती पडले. मला माहिती होते व्हॉटस्अप चालवते, व्हॉटस्अप शहर चालवते, मिडीया चालवते पण नगरसेवकांनी तुम्हाला पत्र दिले पाहिजे की ६४ लाख खर्च केले आणि गाडी आणली आहे तुमच्या एरियामध्ये काही आहे का? म्हाणजे जेव्हा आपल्याला माहिती पडणार तेव्हा तीन महिन्याच्या कालावधी पूर्ण होईल. महानगरपालिकाकडून आणि स्थायी समितीकडून कुठल्या आदेश येणार आहे, म्हणणे तेव्हा आम्ही चम्पल आणि बूट घालूण झोपूण राहणार. मला बोलू दया

**<u>उप महापौर, श्री.जीवन इदनानी:—</u>** नाथानी जी मिनाजीनां पण बोलायचा आहे त्यांना बोलू दया, आणि दुस—याना पण दोन दोन मिनट बोलू. दया.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** मला बोलू दया, माझा दोन मिनट झाला का? नाही झाला मला बोलू दया. सर त्यांना बोलू दया त्यांना बोलायचा आहे माझे प्रश्नाचा उत्तर मल मिळाला नाही त्यांनी मला सुचना दिली नाही ,माझा प्रभागात महापौरांनी काम करून घेतली आहे आर्धा काम झाली आहे आणि आर्धा काम राहिली आहे तुम्ही सागितली असते तर मी तिथे गाडी येऊन उभे राहिले असतो. तुमचा काम आहे सर्वांना सुचना दयाचे. सर्वांना आज माहिती झाली न.

**<u>महापौर, तथा पिठासीन अधिकारी:—</u>** नाथानी जी तुम्ही प्रश्न विचारा सर्व प्रश्नाचा उत्तर एकाच वेळी सेलवन जी देणार.

**<u>सदस्या श्रीम. मिना सोनेजी:—</u>**मा. महापौर जी, उप महापौर जी, आयुक्त साहेब, ऍक्वड कंपनीमधून ज्या मशिन आली आहे लहान मशिन आपल्याकडून सद्या असतात परंतु त्यातून वर काम होत होता आणि हया मशिन जेव्हा आला सखोल काम झाला. मी चार वर्षापासून निवडुण आली आहे आणि १६ वर्षानंतर आमचे सर्व ड्रेनिज चालू झाली आहे. तर हया मशिनचे रिजल्ट चांगली मिळाली आहे. जर अशी मशिन महानगरपालिका घेऊ शकते तर माझ्या एक सल्ला आहे की अशी एक मशिन घेतली पाहिजे. दुस—या सल्ला अशी आहे की जसा की आम्ही शहरामध्ये आणि आपल्या पॅनलमध्ये काम करत आहोत तर त्याचे ओवर हैड लाईटचे ज्या वायर आहे त्यामुळे पण हया मशिन रोडवर जाऊ शकत नाही कुठेतरी लाईटची वायर वरतून लटकत आहे तर जिथे त्या प्रकार माहॉल आहे तिथे सेलवन साहेबां विनंती केली आहे आणि कॉन्ट्रक्टरकडून पण बोलना झाली आहे की तिथे दिन आणि रात दोन्ही वेळी चालविण्यासाठी तयार आहे आणि त्यांच्याकडून एवढे कामगार आहे की जिथे बाजाराचे ठिकाणी आणि जिथे जास्त गर्दीच्या ट्रॅफिकचे ठिकाण आहे तिथे रात्रीमध्ये हया मशिन चालविले पाहिजे ही विनंती. धन्यवाद.

**<u>उप महापौर, श्री.जीवन इदनानी:—</u>** अंजली साळवे मॅडम, तुम्ही बोला.

**<u>सदस्या श्रीम.अंजली साळवे:—</u>** मा. महापौरजी, उपमहापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. मॅडम मशीन आलेली आहे आम्हाला अजिबात माहिती नाही. आणि ड्रेनिज चे तक्रारी एवढया असतात की, तक्रारीचे निवारण करायला आठ आठ पंधरा पंधरा दिवस जातात. दहा वेळा तक्रार दयावी लागते आणि काही ठिकाणी झोपडपटटी एरिया आहे. तिथे नुसती एक गाडी येवुन भागत नाही. दोन दोन तीन तीन पाईपच्या गाडया लागतात. मग ही गाडी असताना तुम्ही माहिती का देत नाही? साफ का नाही करत दिवस रात्र तिथे रस्त्यावर पाणी वाहत राहते. सेलवन साहेब याचे उत्तर दया मला. का या गाडीचे सांगत नाही.

**<u>उप महापौर, श्री.जीवन इदनानी:—</u>** प्रदिप रामचंदानी जी. तुम्ही बोला.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** महापौर मॅडम, उपमहापौर जी, आयुक्त साहेब, एक चांगले काम महानगरपालिकेने जे केलेले आहे ज्यांना श्रेय गेले पाहिजे ज्याचे नियोजन प्रशासन करत नाही त्यासाठी आम्ही अपयशाचे पात्र होत आहोत. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष ज्यांचे काम आहे निति बनविणे जिथे चांगले काम होत असते तिथे आमचे काम आहे तिथे आम्ही निती बनवितो. आमची निती अशी होती जेव्हा आम्ही मशिनचे चलचित्रीकरण बघितले होते तेव्हा आम्ही आश्चर्यचकित झालो होतो. की इतके मोठे मोठे दगड त्या मशीनने खेचुन एका टॅंकर मध्ये भरून घेतात. वर्षानुवर्षे जमा झालेला ड्रेनिज खोलून देतात. अशी कमालीची मशीन आहे. त्याचे श्रेय आम्हाला मिळाले पाहिजे. जे श्रेय मिळत नाही ही प्रशासनाची विफलता आहे. आणि आमचे विपक्षचे जे नेता आहेत ते आमच्यावर बोट दाखवितात. ज्यावर प्रशासनाचे नियंत्रण असले पाहिजे त्या नियंत्रणामध्ये आम्हाला अजूनही मजबुती दाखविली पाहिजे. आणि इथे हा मुद्दा नाही की, आम्ही आणले की तुम्ही आणले. विपक्षचे लोक म्हणणार की हा मुद्दा तुम्ही आणला होता सर. आम्ही काम सोबत मिळुन करतो. आणि स्थायी समितीमध्ये हा प्रस्ताव एकमताने पारित झाला होता. याचा अर्थ असा की चांगल्या कामामध्ये तुमची पण सहमती होती. का छोटया छोटया गोष्टींमध्ये अहमचा मुद्दा बनविला जावा.काम खूपच चांगले आहे. महापौर मॅडम याचे नियोजन झाले पाहिजे. चांगल्या रीतीने जर चांगल्या रीतीने काम होणार तर या एक कमालीची मशिन आहे मी स्वत: ती मशिन बगितले आहे. मी कॉन्ट्रक्टरनां मिळूण काय करायचे आहे तो काय करत आहे? जर तीन महिन्यात त्या मशिन चागल्या रीतीने प्रत्येक प्रभागात काम केली तर ७०प्रतिशत मोठे मोठे रोडचे लहान लहान गल्ली मी म्हणत नाही ड्रेनिजची समस्याचे निवारण होईल.

**<u>उप महापौर, श्री.जीवन इदनानी:—</u>** कविता पंजाबी मॅडम, तुम्ही बोला.

**<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:—</u>** मा महापौर, उपमहापौर ,

**<u>उप महापौर, श्री.जीवन इदनानी:—</u>** एक मिनट बागुल जी पहिले कविता मॅडमला बोलू दया नंतर बोला.

**<u>सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—</u>** यानी ज्या गोष्ट सागितली आहे ते सत्य आहे माझा म्हणणे असे आहे की सर्व नगरसेवकाना माहिती झाली पाहिजे की मशिन कुठे कुठे लागली आहे. माझ्या प्रभागमध्ये झोपडपटटी एरिया आहे तिथे तर माहिती पाहिजे की अशी मशिन आली आहे आणि काम सुरू आहे का असे? असे का एका नगरसेवक वेगळर व्यवहार .आणि दुसरे नगरसेवक वेगळा व्यवहार असे का होते?

**<u>सदस्या, श्रीम.कविता लाल पंजाबी:—</u>** शहराची ड्रेनिज सिस्टम खुपच खराब आहे आणि सर्व घाण पाणी रोडवर वाहत आहे, त्यामुळे खुप त्रास होत आहे, तर मी आपल्याला निवेदन करते की, तुम्ही याच्यासाठी वेळ निश्चित करा आणि ही जी मशिन आपल्या शहरासाठी आलेली आहे, मी तुमचाकडून अपेक्षा करते की लवकरात लवकर सुधारणा होईल. आम्हांला मशिन मिळेल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौरजी, उप महापौरजी, सभागृहाचे सर्व सदस्य, या मशिन बाबतची लक्षवेधीवर चर्चा आमच्या विरोधी पक्ष नेता यांचे म्हणणे असे होते की, हा लक्षवेधीचा विषय नाही. जे अधिकारी काम करीत नाहीत, त्यांना तुम्ही आपल्या दालनामध्ये बोलावून समजावू शकतात आणि चांगल्या प्रकारे काम करून घेऊ शकतात. राहीली गोष्ट मशिनची, तर ती मशिन चांगले काम करते. कारण की मी या मशिनचा डेमो ऑगस्ट महीन्यामध्ये आमच्या इथे बघितले होते. खुप वर्षा पासून कमला अपार्टमेंटमधून सरस्वतीनगरकडे जाणारे अंडरग्राउंड ड्रेनेज बाहेर रोडवरून वाहत होते, ज्या दिवशी हा विषय स्थायी समितीमध्ये पास झाला, त्या दिवसापासून आठ दिवसांनंतर वर्क ऑर्डर दिल्या नंतर मी ती मशिन माझ्या वार्डामध्ये मागवून रात्रीच्या वेळी चालवली आणि चांगले काम त्यांनी केले. ज्या काही वर्षा पासून भरलेले चेंबर २० ते २५ फुट आतमध्ये माती, दगड, घाण बाहेर काढण्यात आले. खालचा स्तर दाखवण्यात आला, आज ते पाणी अंडरग्राउंड चांगल्या प्रकारे वाहत आहे. जर २५ वर्षाची आपली जुनी जी पध्दत, ती पध्दत चालू ठेवायची आहे तर या मशिनचा उपयोग आपल्याला चांगल्या प्रकारे करायचा आहे आणि करून घ्या. आपल्या प्रभागामध्ये पण चालवा कारण की, मी आपल्या प्रभागामध्ये डेमो बघितला आहे. पण मशिनची जी यंत्रणा आहे, आज महासभेच्या माध्यमातून लोकांना आणि सर्व नगरसेवकांना माहीती दिली पाहीजे. ज्यांना माहीती नाही, ते पण ही मशिन आपल्या वार्डामध्ये लावू शकतात. त्यासाठी सर्वांना माहीती देण्यात यावी.

**उप महापौर, श्री.जीवन इदनानी:—** श्री. सुरेंद्र सावंत तुम्हीच बोला.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—** मला पण हेच बोलायचे होते.

**सदस्य श्री. सुरेंद्र सावंत:—** माझा विषय हा आहे की, स्थायी समितीमध्ये हा विषय मंजूर झाला ६४ लाख रूपये स्थायी समितीमध्ये मंजूर झाले असतील आणि त्या नंतर कामाला सुरूवात झाली. पण या ठिकाणी उपस्थित असलेले ८२ नगरसेवक त्या पैकी फक्त १० सदस्यांना या मशिन बदल माहितीच आहे आणि ती मशिन मला वाटते की, त्यांच्याच वार्डामध्ये फिरत असावी. बाकीच्या नगरसेवकांना या मशिनच्या बाबत काही माहितीच नाही. ती मशिन काळी आहे की गोरी ही पण आम्हांला कल्पना नाही. तर स्थायी समितीमध्ये ६५ लाख मंजूर झाले असतील तर महासभेमध्ये आपण बसलो आहे, महासभेमध्ये आपण हा ठराव रद्द करू शकतो. असे नाही की, स्थायी समितीमध्ये मंजूर झाले तर आपण काम चालू ठेवले पाहीजे, जर ती मशिन काम करीत नसेल, ठेकेदार वेळेवर काम करीत नसेल, मुद्दा हा आहे की, ठेकेदार वेळेवर काम करीत नाही,तर तो ठराव महासभेमध्ये नामंजूर करू शकतो. आपण तसा ठराव करावा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौरजी, मी श्री. जमनादास पुरस्वानी यांना धन्यवाद देतो की, त्यांनी हा विषय लक्षवेधीच्या माध्यमातून आणला आहे. काही नगरसेवकांना माहीती नव्हती, अधिकारी झोपले होते, झोपलेल्या अधिका—यांना जागे केले आहे आणि नगरसेवकांना माहीती दिली आहे. याच्या नंतर ज्यांच्या वार्डमध्ये ही जेटींग मशिन पोहचेल, तर तिथे काम होईल. जसे श्री. राजेंद्र चौधरी यांनी सांगितले, एक जुना खुप मोठा प्रॉब्लेम होता, खुप दिवसापासून होता, तो प्रॉब्लेम सॉल झाला आहे, आता श्री. सेलवनजी त्याचे उत्तर देतील.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** साहेब, मी बोलायचे बाकी आहे, आपण असे काय करीत आहेत?

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** आपण कृपया बसा.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—** त्यांना बोलू दया.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** महापौरजी, हे काय आहे? यांनीच सांगितले की थांबा, आम्हांला पण काही विचारायचे आहे ना?

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** बोला, बोला.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी, उप महापौरजी, सचिव मॅडम, आयुक्त साहेब, सर्व प्रथम तर मी पहीले मनापासून तुमचा निषेध करतो. कारण की तुम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुर्णाकृती पुतळयासाठी जो विषय मांडला होता, तो आपण नाकारलात त्या बददल मी आपला मनपुर्वक निषेध करतो आणि या विषया बदल बाकीचे सर्व बोलले, मला काही बोलायचे नाही. मला फक्त निषेध व्यक्त करायचा होता की तुम्ही राजकारण करत असतांना संविधान महामानवाचा तुम्ही त्यांचा पण विचार केला नाही की हा विषय कुठला आहे? आणि जो तुम्ही कॅबिनमध्ये बोलावून करू शकला असता, तो विषय तुम्ही लक्षवेधी घेऊन आलात, आणि जो विषय महत्वाचा होता, तो तुम्ही बाजूला ठेवला, खरोखरच मी बोलू शकत नाही, समजू शकत नाही एवढया माझ्या भावना तीव्र आहेत.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** सेलवन साहेब, सर्व सदस्यांच्या प्रश्नांचे उत्तरे दया, त्यांचे समाधान करा.

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के.सेलवन:—** मा. महापौर महोदया, उप महापौर महोदय, आयुक्त साहेब आणि सन्माननिय सदस्य, सुपर सक्सशन मशिनच्या संदर्भात आज जी लक्षवेधी आणली आहे. त्या स्किमच्या संदर्भात आणि सुपर सक्शन मशिनच्या संदर्भाची माहीती आपल्याला देण्यात इच्छिुक आहे. उल्हासनगरमध्ये मलनि:सारण योजना अंडरग्राउंड ड्रेनेजच्या ज्या आहेत, त्या सन १९८६ मध्ये झाले होते, त्या योजना महाराष्ट्र वॉटर सप्लाय

बोर्डाकडून राबवून मग नंतर आपल्याकडे ताब्यात देण्यात आले होते. त्याच्या नंतर आपली दैनंदिन देखभाल महापालिकेच्या मार्फत करीत होतो. परंतु सन २००५ मध्ये झालेल्या पुरामध्ये ज्या अंडरग्राउंड ड्रेनेज पाईप लाईन, नाल्यामधून जाणा—या नविन पाईप लाईन स्ट्रिटमेंट प्लॉन, पंपिग स्टेशन या सगळया नादुरूस्त झालेल्या होत्या. पण पुर्णपणे या ज्या यंत्रणा आहेत, ज्या मलशुध्दीकरण केंद्राची प्रक्रिया कुठल्याही प्रकारे होत नव्हते? परंतु शहरामध्ये असलेल्या मलप्रक्रिया कलेक्ट करणा—या ज्या पाईप लाईन आहेत, अंडरग्राउंड ड्रेनेज लाईन, चेंबरर्स आहेत, याच्यामध्ये प्रत्येक बॅरेज आणि गटाराचे पाणी जोडल्यामुळे ते ठिकठिकाणी चोकअप होऊन ओव्हर फ्लो होत होते. त्या करीता महापालिके मार्फत चार एस.एल.सि.एम. मशिन, या मशिनद्वारे ज्या ठिकाणी चोकअप होत होते, त्या ठिकाणी तातडीने जाऊन ते चोकअप तात्पुरता काढत होतो आणि त्याच्यामध्ये जे बॅरेज आहेत, बॅरेजच्या छोटया छोटया चेंबरमध्ये जे असलेले चोकअप आहे, ते मॅन्युअली काढण्यासाठी माणसे लावली होती. परंतु आपण मॅन्युअली बॅरेजमधून साफ करतांना, आता शासनाने जो नविन जि.आर. काढलेला आहे. म्हणजे जे मॅन्युअल आहे, ते हाताने काढू नये, अशा पध्दतीचा जो जि.आर. आहे. त्याच्यामुळे सुधारणा करतांना मागच्या वेळेस आयुक्त साहेबांनी याच्यामध्ये काय सुधारणा करावी लागेल? कशा प्रकारे करावे लागेल? या पध्दतीने करण्या करीता मा. महापौरांच्या दालनात एक बैठक घेण्यात आली होती. तेव्हा असा निर्णय झालेला होता की, त्यासाठी कल्याण डोंबिवलीच्या महापालिकेने एक नविन मशिन लावले होते, त्याच्यामध्ये मोठया प्रमाणात चोकअप असलेले जी माती आहे, दगड आहे, हे काढण्यासाठी त्यांनी मशिन लावले होते आणि यशस्वी झालेले होते. त्या आधारावर उल्हासनगर महानगरपालिकेने पण ते मशिन लावण्यासाठी निर्णय झाल्या नंतर त्या प्रमाणे आपल्याकडे टेंडर काढले होते, टेंडर काढल्या नंतर, त्या प्रामणे त्यांना वर्क ऑर्डर देण्यात आलेली होती. परंतु ती मशिन प्रत्येक गल्ली, बोळामध्ये जाणारी मशिन नाही. त्या आंडरग्राउंड ड्रेनेजमध्ये ज्या मोठया पाईप लाईन आहेत. त्या पुर्णपणे एक किलो मिटर, दोन किलो मिटर पर्यंत बंद आहेत. त्या बंद ठिकाणी साफ करण्या करीता एका चेंबरमधून पुर्ण काढल्या नंतर ती पाईप लाईन सुरू होत होती. अशा प्रकारची ही मशिन आहे, त्या करीता ज्या ठिकाणी वर्षानुवर्ष जे बंद पडलेले चेंबरर्स आहेत, त्या ठिकाणी काढून त्या लाईन सुरू केलेल्या आहेत. असे उदाहरण म्हणजे श्री. चौधरी साहेबांच्या वार्डमध्ये ब—याच म्हणजे १० वर्षा पासून निघत नव्हते, ते चेंबर दुरूस्त केलेले आहे, सोंडे मॅडमच्या वार्डमध्ये केलेले आहे.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** सेलवन साहेब, प्लीज....

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** सेलवनजी, तुम्ही सर्वांना सांगा की, मशिन कशी मिळेल? कसे करणार क्रमानुसार?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** आपण पध्दत सांगा, एका नगरसेवकाकडून तक्रार आहे, ते कोणत्या नंबरवर फोन करणार?

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** त्यांना समाधानी उत्तर दया.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** तुमचे नियोजन सांगा, इंजिनियर कोण आहेत, कोणाच्या मार्गदर्शनाखाली मशिन चालते?

**सदस्य, श्री. महेश सुखरामनी:—** हे तुमच्या अधिकारात राहीले पाहीजे, ठेकेदारांकडून बोलेले नाही पाहीजे, तुमचा अधिकारी जबाबदार असला पाहीजे. त्याचे सुपरवाईजरी इथल्या प्रशासनाने केले पाहीजे. माझे हेच म्हणणे आहे की, इथला नंबर आणि अधिका—याचे नाव, वेळ आणि तारीख सर्वांना माहीती पाहीजे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** सेलवन साहेब, एक मिनीट बोलतो, सर्व सदस्यांना याची माहीती नाही आणि मला सुध्दा माहीती नाही. माहीती दयायला पाहीजे होती, फोन नंबर दयायला पाहीजे होता आणि सर्वच सदस्यांच्या तक्रारी नोंद केल्या पाहीजेत. पॉलिसी डिसिजन असून उत्तर तरी दया तुम्ही?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** प्रत्येक गोष्टीवर आपण लक्ष दयावे, पॉलिसी डिसिजन असून....

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** सर रात्र आणि दिवस दोन्ही वेळ चालू असली पाहीजे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** मी एक पध्दत सांगतो, लक्षवेधीचा विषय आहे किंवा नाही, जे ठेकेदार आहेत, त्यांच्याशी नगरसेवकांना बोलावे लागणार नाही. त्याच्यासाठी प्रशासनाने निश्चित केले पाहीजे की, प्रभाग क्रमांक १ मध्ये कधी, २ मध्ये कधी, ३ मध्ये कधी आणि ४ मध्ये कधी? राहील आणि कोणत्या दिवशी कोणत्या प्रभागामध्ये राहील? जर या आठवडयात या प्रभागामध्ये असली तर दुस—या आठवडयात दुस—या प्रभागामध्ये असली पाहीजे. अशा प्रकारची पॉलिसी, यामध्ये एक गाभा आहे, त्याच्यावर सर्व नियंत्रण प्रशासनाचे असले पाहीजे. स्थायी समिती किंवा महासभा जे पण निर्णय घेते, त्याची अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे, ते होत नाही. त्याच्यामुळे सर्व अस्तव्यस्त झाले आहे, त्याच्यामुळे दशा आणि दिशा बदलत आहे.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** मा. महापौरांच्या आदेशान्वये...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, एक मिनीट, मी सभागृहामध्ये विरोधी पक्ष नेता यांना सांगू इच्छितो की, लक्षवेधी कोणती घेतली पाहीजे आणि कोणती घेतली नाही पाहीजे. लक्षवेधी स्विकारण्याचा अधिकार मा. महापौरांचा आहे. कोणत्याही गोष्टीवर लक्ष केंद्रीत करणेस ते व्यवस्थित होत नाही. त्यामुळे संपुर्ण शहराच्या पैशाची नुकसान होत आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** विषयांत्तर होत आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** माझ्या लक्षवेधीचे उत्तर अजून पुर्ण झाले नाही, जर तुम्ही असे कराल तर लक्षवेधी चालली पाहीजे. तुम्ही सांगा कोणते इंजिनियर या गाडीला कन्ट्रोल करीत आहे. कोणत्या इंजिनियरच्या मार्गदर्शनाखाली गाडी चालत आहे. आज पर्यंत कुठे—कुठे गाडी चालली आहे? किती तास गाडीने काम केले आहे? तुम्ही काय सांगत आहेत? आधी सांगा. आज लक्षवेधी आणण्याचे कारण हेच होते की, मी जेव्हा आज आपल्या कार्यालयामध्ये फोन केला, तेव्हा मला ठेकेदाराचा फोन नंबर दिला गेल की, तुम्ही ठेकेदारां बरोबर बोला. अशा प्रकारे महानगरपालिकेचे कार्यभार चालणार का? आम्ही बोलतो की, पाटोल भरणार आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** असे कोण बोलेल? त्यांनी बोलेले का?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** तुमच्या कार्यालयातून.अंडरग्राउंड ड्रेनेजचा...

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** सभागृह नेत्यांनी कसे बोलेले पाहीजे?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मी सांगतो ना? मी सांगतो कोण बोलले?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** सांगा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मुकादम, श्री. रमेश मुकादम ज्याच्या अंडरमध्ये कार्य चालू आहे, त्याने सभागृह कार्यालयामध्ये येऊन बोलले की, मला सुध्दा माहीत नाही की, गाडी कुठे चालते, हा ठेकेदाराचा_मोबाईल नंबर आहे. उद्या जर पाटोल भरायचे असले तर सार्वजनिक बांधकाम विभागाचे सांगणार की, ठेकेदाराला बोला. तर अशा प्रकारचे काम चालणार नाही. तरी आपण सर्व सदस्यांना याची माहीती लिखीत पाठवा की, कोणते इंजिनियर याची देखभाल करेल? तक्रार कुठे दयायची आहे? आणि कोणाच्या वार्डमध्ये कधी गाडी जाईल? ही संपुर्ण माहीती २४ तासाच्या आतमध्ये, मा. महापौरजी आपण आदेश दया. उद्या पर्यंत ही संपुर्ण माहीती सर्व सदस्यांना मिळाली पाहीजे.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** मा. महापौरांच्या आदेशाने सेलवनजी, मी आपल्याला सुचित करतो की, सन्माननिय सदस्य, त्यांचे जे पण प्रश्न असतील ते तुम्ही समजले आहेत. गाडीची प्रशंसा झाली आहे, आता कामाची प्रशंसा होणे बाकी आहे. काम कोणत्या पध्दतीने होणार? त्यासाठी मा. महापोरांनी आदेश दिले आहेत. मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता आणि पाणी पुरवठा विभागाचे जे सभापती असतील तीन चार सदस्यां बरोबर बसून आपण उद्याच्या उद्या संपुर्ण प्रोग्राम बनवा आणि सदस्यांना लिखीतपण सुचित करण्यात यावे. नियोजन कसे असेल? आणि समस्या कशा सोडवल्या जातील? तक्रारीची पध्दत कशी असेल? आणि ते कोणते इंजिनियर अटेन्ड करणार आहे? किंवा उप अभियंता करणार आहेत, या सर्व गोष्टी नोंद करा आणि उशिर झाला नाही पाहीजे, दुसरी लक्षवेधी घ्या.

**महापालिका सचिव:—** लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत, श्री. सतरामदास जेसवानी व अनुमोदक आहेत, श्री. राजेश वदारिया

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

**विषय :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या अखत्यारितील मृत्य जनावरे कच—याच्या खत्त्यात टाकण्यात येतात सदरील जनावरे जाळणेकरीता मशिन खरेदी करणेबाबतची लक्षवेधी सूचना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अखत्यारित जी जनावरे जसे की, कुत्रा, गाय इत्यादी जनावरे मृत्य पावतात. त्यांना कच—यात टाकण्यात येते व सदरील कचरा हा कच—याच्या खत्यात टाकण्यात येतो. उल्हासनगर—५ येथील

कच—याचे खत्यात टाकण्यात सेतो. त्या बरोबर जी मृत्य जनावरे देखिल टाकण्यात येतात ती जनावरे सडून त्यातुन दुर्गंध सर्वत्र पसरून त्यातुन शहरात रागराई वाढत आहे व साथीचे आजार पसरत आहेत. त्या करिता सदरील जनावरे जाळणे करीता मशिन खरेदी करणे अंत्यंत आवश्यक तथा गरजेचे आहे.

---

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u>** महापौर साहेबा, मी आपल्याला धन्यवाद देतो की, माझी लक्षवेधी स्विकारली आहे. कॅम्प नंबर ४ आणि कॅम्प नंबर ५ मध्ये ही खुपच मोठी समस्या आहे. डंपिंग ग्राउंडवर जी मृत जनावरे फेकली जातात, पहीले तर कोणीच मान्य करायला तयार नव्हते. डंपिंग्राउंडवर दररोज मृत जनावरे फेकली जातात. कोणीच मान्य करायला तयार नव्हते? जर मृत जनावरे तिथे टाकत नाहीत, तर कुठे टाकली जातात. हे आपण सांगा. कोणी हे पण सांगायला तयार नव्हते? कमीत कमी १०० जनावरे संपुर्ण उल्हासनगरचे खत्यामधून उचलून, प्रत्येक वार्डामधून उचलून उल्हासनगरच्या कॅम्प नंबर ५ च्या डंपिंगग्राउंडवर कच—या बरोबर टाकले जातात. त्याचा आपण विचार करू शकतो. आरोग्य विभागाचे डॉक्टर साहेब आहेत, ते सांगू शकतात की, जर १०० मृत जनावरे एकाच जागेवर टाकले तर सडलेल्या जनावरांमुळे किती किडे उत्पन्न होतील? त्याच्या पासून आजार पसरू शकतात. तर मी जास्त न बोलता आपल्याला विनंती करतो की, शहरामध्ये आजार पसरायला नको, त्यासाठी जे मृत जनावरे आहेत, त्यांना जाळून काम पुर्ण करण्यात यावे आणि आजार पसणार नाहीत. तरी ही मशिन खरेदी करण्यासाठी उशिर करू नका, जसे की मृत व्यक्तिला इलेक्ट्रॉनिक मशिनद्वारे काही स्मशानभुमीमध्ये जाळले जाते. अशाच प्रकारे मृत जनावरांना पण त्यांचा अग्नि संस्कार करून, जाळून त्यांची विल्हेवाट लावण्यात यावी व शहरामध्ये आजार पसरणार नाहीत, त्याची काळजी घेण्यात यावी, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीम. कविता पंजाबी व सदस्या, श्रीमती सरोजिनी टेकचंदानी या सभागृहाच्या बाहेर गेल्या.

**<u>प्र.मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** मा. महापौर, मा. उप महापौर, मा.आयुक्त साहेब, मा. सभागृह, शहरात ब—याच वेळा जनावरांचा मृतु होत असतो. ज्या वेळेस तशा तक्रारी येत असतात, त्या वेळी त्या जनावरांना आरोग्य विभागाकडून, कारण आपल्याकडे कोणतीही सुविधा नसल्याने खरे तर मुंबई महापालिकेकडे, ठाणे महापालिकेकडे इन्सीनेशन मशिन आहे, ज्याच्यात जनावरांना जाळले जाते आणि ती मशिन कल्याणमध्ये होती. तेव्हा मागील काही वर्षापासून वैद्यकिय आरोग्य विभागाकडून अशी घटना घडल्यास किंवा एखादा कुत्रा मेला किंवा गाय मेली तर ती ट्रान्सपोटेशन करून तीचे कल्याणमध्ये इन्सीनेशन करायचे डॉ. रिझवानी साहेब, यांच्या मार्फत कारवाई होत असते. तथापी आपल्याकडे तशी सुविधा नाही आणि कल्याणमध्ये पण नाही. मात्र अशा तक्रारी प्राप्त झाल्यास मागील दोन महीन्यापुर्वीच सुर्वे साहेब आता नाहीत मला वाटते. महापालिका सदस्य श्री. सुर्वे साहेब, यांनी गाय मेल्या बाबतची तक्रार केली होती. मग अशी तक्रार प्राप्त झाल्या नंतर आम्ही सदरचे जे मृत जनावर असते, त्याला आम्ही कुठे तरी जिथे मोकळी जागा असते, तिथे जमीनीखाली पुरत असतो. तरी याबाबत जर इन्सीनेशन मशिन घ्यायची असल्यास ती वैद्यकिय विभागामार्फत कारवाई व्हावी अशी विनंती आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** मा. महापौरजी, माझी आपणास विनंती आहे की, आपण पब्लिक हेल्थ डिपार्टमेंट आणि वैद्यकिय विभागाला आदेश देण्यात दयावेत की, ते लवकरात लवकर मशिन खरेदी करून कार्यान्वीत करण्यात यावी, धन्यवाद.

**<u>उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—</u>** चला विषय क्रमांक २ घ्या.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे:—</u>** मा. महापौर मॅडम, माझी लक्षवेधी का घेतली नाही?

**<u>उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—</u>** कृपया मॅडम, खाली बसा, कृपया मॅडम, बसा.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे:—</u>** मा. महापौर मॅडम, आपण सांगितले होते, तुम्ही स्पष्टीकरण देणार होत्या, वालधुनीच्या....

**<u>उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—</u>** मॅडम, तुम्ही जरा थांबा, प्रत्यक प्रश्नाचे उत्तर देणार आहोत आणि तुम्हांला पण समाधानकारक उत्तर देणार आहोत. कृपया रितसर सभा चालू दया, तुमचे पण समाधान होईल. हे मी आदेश देत आहे.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** मॅडम, एक मिनीट, मला लक्षवेधीवर बोलायचे आहे, लक्षवेधी अजून पुर्ण झाली नाही. तुम्ही इन्सीनेशन मशिन कसे खरेदी कराल.

**<u>उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—</u>** लक्षवेधी पुर्ण झाली आहे, विषय क्र.२ सुरू झाला आहे.

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २:—** उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील आर. ओ.बी. मध्ये गेलेल्या जागा यु. नं. ०३ (भा) शिट नं. ६, उल्हासनगर—३, क्षेत्रफळ—९७२.३८ चौ.मी. या बाधित जागेच्या बदल्यात पर्यायी जागा मिळणे.

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...पास..

**महापालिका सचिव :—** ठराव दया, तुमच्याकडे असेल तर.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्या प्रमाणे उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील आर. ओ.बी. मध्ये गेलेल्या जागा यु. नं. ०३ (भा) शिट नं. ६, उल्हासनगर—३, क्षेत्रफळ—९७२.३८ चौ.मी. या बाधित जागेच्या बदल्यात पर्यायी जागा देण्यास मान्यता देत आहे, इतिवृत्ताची वाट न पहाता पास...

**महापालिका सचिव :—** दोन नंबर विषय सुरू झाला, ज्यांना बोलायचे आहे, त्यांनी बोला.

**सदस्या, श्रीमती ज्योत्सना जाधव :—** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील आर. ओ.बी. मध्ये गेलेल्या जागा यु. नं. ०३ (भा) शिट नं. ६, उल्हासनगर—३, क्षेत्रफळ—९७२.३८ चौ.मी. या बाधित जागेच्या बदल्यात पर्यायी जागा मिळण्या बाबत उल्हासनगर महानगरपालिकेच्या तर्फे महासभेमध्ये मंजूरीसाठी हा विषय ठेवलेला आहे. या संदर्भात उल्हासनगर महानगरपालिके तर्फे उल्हासनगर स्टेशनलगत रोड ओव्हर ब्रिजचे काम सन २०००२ साली हाती घेण्यात आले होते. त्यावेळी या कामामध्ये वरील संपुर्ण जागा बाधित झालेली होती. त्याच प्रमाणे उल्हासनगर रेल्वे स्टेशनच्या या लगतचा रोड ओव्हर ब्रिजच्या कामामध्ये पाच सहा घरांना नोटीस बजावून ती घरे बाधित केलेली आहेत. त्या घरांना अजून पर्यंत कोणतीही जागा महानगरपालिकेने दिलेली नाही. तेव्हा या विषयास धरून आजची महासभा जो काही निर्णय घेत असेल. त्या निर्णयामध्ये रेल्वे स्टेशनच्या लगतची जी पाच सहा घरे बाधित झालेली आहेत. त्यांना पण न्याय मिळावा अशी मी या सभागृहाला विनंती करीत आहे, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती कविता पंजाबी व सदस्या, श्रीमती सरोजिनी टेकचंदानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** कोर्टाच्या आदेशानुसार आपण त्यांना देतो ना?

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** मा. महापौरजी, हा जो विषय आलेला आहे, पर्यायी जागा देण्याच्या संदर्भात जाधव मॅडमनी पण तो मुद्दा मांडला या सर्वांना पर्यायी जागा मिळाल्या पाहीजेत आणि त्याच बरोबर कैलास कॉलनी येथे कब्रस्तानसाठी जो मुद्दा आहे, त्याच्यामध्ये सात लोक बाधित झालेले आहेत. ते सातही लोक जवळ पास पंधरा वर्षा पासून तिथे राहत आहेत. सन २००५ च्या अगोदर तिथे राहत आहेत. त्यांना कुठलीही नोटीस वेळेवर न देता? त्यांची घरे उध्वस्त केलेले आहेत. माझी विनंती आहे की, आर. ओ.बी. च्या बाधित लोकांना जसे देत आहेत, त्याच प्रमाणे कब्रस्तानच्या याच्यात सात लोक बाधित झाले आहेत, त्यांनाही ती पर्यायी जागा मिळावी.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** चला पास...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौरजी, जो पण विषय यांनी सांगितला आहे, तो नंतरच्या महासभेमध्ये यायला पाहीजे, असे आपण आदेश दया, हे आता जो विषय आहे तोच पास करा.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** ठिक आहे, विषय क्र.२ पास....

**महापालिका सचिव:—** ही महासभा वरील प्रस्तावनेत बाधित जाग्याच्या बदल्यात पर्यायी जागा देण्यास मान्यता देत आहे, इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. २ :–** उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील आर. ओ.बी. मध्ये गेलेल्या जागा यु. नं. ०३ (भा) शिट नं. ६,
, उल्हासनगर–३, क्षेत्रफळ–९७२.३८ चौ.मी. या बाधित जागेच्या बदल्यात पर्यायी जागा मिळणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयी संदर्भिय याचिका अनुषंगाने सादर करण्यात येते की, युनं–०३ (भा), शिट नं. ६, उल्हासनगर–३, क्षेत्रफळ–९७२.३८ चौ.मी. ही जागा श्री. संगीतराव बारकु व श्री. जमना लॉरेन्स यांना दिनांक २८/६/१९९० रोजी शासनाचे महसूल विभाग असलेले प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत यांचेमार्फत देण्यात आलेली होती.

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे उल्हासनगर रेल्वे स्टेशन लगत Road Over Bridge (R.O.B.) चे काम वर्ष २००२ साली हाती घेण्यात आले होते. त्यावेळी या कामामध्ये वरील जागा संपूर्ण बाधीत झालेली होती व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम अंतर्गत जमीन हस्तांतरणाची कार्यवाही न होता पुर्ण भूखंड बाधीत होवून आर.ओ.बी. चे काम सुरु करण्यात आले. त्याबदल्यात कोणताही मोबादला अथवा पर्यायी जागा जमीन मालकास आजपर्यंत देण्यात आलेली नाही. या विरुध्द जागेच्या मालकांनी न्यायालयात याचिका क्र. ३१८०/२००८ व अवमान याचिका १४९/२००९ उल्हासनगर महानगरपालिका विरुध्द याचिका दाखल केली. त्यामध्ये तत्कालीन मा. आयुक्त यांनी उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे प्रतिज्ञापत्र सादर करतांना असे म्हटले आहे की, महानगरपालिकेतर्फे प्लॉट नं. १७० (भा), शिट नं. ३२, उल्हासनगर–३ क्षेत्रफळ ८३० चौ.मि. मोकळी जागा नियमानुसार देण्यासाठी महासभेची मंजूरी घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

या प्रकरणी आजपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नसून पुन्हा याचिका कर्त्यांनी वर्ष २०१२ मध्ये याचिका क्र. ६६२८/१२ दाखल केलेली आहे.

तरी याचिका (६६२८/१२) या याचिकेवर सुनावणी करीता मा. उच्च न्यायालयात कार्यवाही सुरु असून यामध्ये न्यायालयाने असे विचारणा केली आहे की, ''महानगरपालिका पर्यायी जागा देण्यासाठी कोणती कार्यवाही करणार आहे''.

यामध्ये तत्कालीन आयुक्त यांनी यापूर्वी न्यायालयात सादर केलेले प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद केलेले होते की प्लॉट नं. १७० (भा) शिट नं. ३२, उल्हासनगर–३ क्षेत्रफळ ८३० चौ.मी. खुली जागा मा. महासभेची मान्यता घेवून नियमानुसार जागा देण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

प्लॉट नं. १७० (भा) शिट नं. ३२, उलळासनगर–३ क्षेत्रफळ ८३० चौ.मी. खुली जागा सध्या मालमत्ता विभाग उल्हासनगर महानगरपालिका यांचे ताब्यात असून सदर जागा श्री. संगीतराव बारकू व जमनाबाई लॉरेन्स यांना नियमानुसार देण्यापूर्वी मा. महासभेची पूर्व मंजुरी घेवुन तद्नंतर सदर जागा मालमत्ता विभागामार्फत देण्याची कार्यवाही करणे योग्य होईल.

सबब वरीलप्रमाणे सदर विषय मा. महासभेपूढे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** ४ **दिनांक:– २/५/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील आर. ओ.बी. मध्ये गेलेल्या जागा यु. नं. ०३ (भा) शिट नं. ६, उल्हासनगर–३, क्षेत्रफळ–९७२.३८ चौ.मी. या बाधित जागेच्या बदल्यात पर्यायी जागा देण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ ......

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** एक मिनीट, एक मिनीट मॅडम, पावने सात वाजले आहेत, आणि आपल्याला दुसरी मिटींग सुध्दा सुरू करायचे आहे.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————

**विषय क्र. ३ :—** परिवहन समितीवर पालिका सदस्य किंवा बाहेरुन सदस्य घेणेसाठी धोरण ठरविणेबाबत विचार विनिमय करणे

————————————————————————————————————

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** हा विषय वगळण्यात यावा.

**महापालिका सचिव:—** हा विषय डिफर.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे

————————————————————————————————————

**विषय क्र.:— विषय क्र. ३ :—** परिवहन समितीवर पालिका सदस्य किंवा बाहेरुन सदस्य घेणेसाठी धोरण ठरविणेबाबत विचार विनिमय करणे

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेने दिनांक १३.७.२००७ चा ठराव क्र. ३५ व्दारे उल्हासनगर शहरांत बससेवा सुरु करण्याचे ठरविलेले होते. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५ मधील तरतुदीनुसार परिवहन उपक्रम चालविण्याच्या प्रयोजनासाठी १२ सदस्यांची एक परिवहन समिती स्थापन केली पाहिजे अशी तरतुद आहे. अणि त्यामध्ये एक स्थायी समिती सदस्य हे पदसिध्द सदस्य म्हणुन असतात. आणि महापालिकेने नेमणुक केलेल्या परिवहन समितीच्या सदस्यापैकी निम्मे सदस्य प्रत्येक दुस—या वर्षी अधिनियमातील तरतुदी नुसार निर्दिष्ट केल्या प्रमाणे निवृत्त होतील. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन—२००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर महासभा ठराव क्र. ४०, दिनांक २३/८/२००७ अन्वये परिवहन समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. व वेळोवेळी ६ सदस्य निवृत्त होवुन ६ नविन सदस्यांची नेमणूक करण्यांत आली असून प्रत्येक वर्षी नविन सभापतींची नेमणूक करण्यांत आली आहे.

तसेच सन २०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीच्यावेळी परिवहन समिती विसर्जित करुन नव्याने महासभा ठराव क्र २१ दिनांक १९/५/२०१२ अन्वये पुर्नरचना करण्यात आली. त्यावेळी देखील सेक्शन ३१ अ प्रमाणे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन सदस्यांची नेमणुक करण्यात आली.

तथापि माझ्या असे निदर्शनास आले आहे की, मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील क्र. कडोंमपा १००९/३९२/नवि—२८, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा दिनांक २१ नोव्हेंबर, २००९ चे पत्रानुसार व मा. उच्च न्यायालयाची याचिका क्र. ५१७५/२००७ प्रकरणी दिनांक २५/७/२००७ रोजीचे आदेशानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे १९४९ मधील कलम २५ मधील तरतुदीकडे लक्ष वेधण्यात येत आहे, त्यानुसार चौकशी केली असता उपरोक्त न्यायनिर्णय आणि अधिनियमातील तरतुदीनुसार पालिका सदस्यांमधून परिवहन समितीवर काही सदस्य नियुक्त/नेमणूक करावयाचे असतील तरच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ (अ) मधील तरतूद लागू होतील. तथापि, महानगरपालिकेने रिक्त पदांवरील नियुक्तीसाठी पालिका सदस्य म्हणून निवडून न आलेल्या व्यक्तींमधुन नियुक्ती करावयाचे ठरविल्यास कलम ३१ (अ) च्या तरतूदी लागू होणार नाहीत असे कळविले आहे. यापुर्वी उल्हासनगर महानगरपालिकेचे ३१ (अ) प्रमाणे नियुक्ती केली पण बाहेरुन सदस्य नेमण्यात आले जे कायदयाच्या तरतुदीशी विसंगत आहे.

सदर संदर्भात मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील क्र. कडोंमपा १००९/३९२/नवि—२८, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा दिनांक २१ नोव्हेंबर, २००९ चे पत्र व मा. उच्च न्यायालयाची याचिका क्र. ५१७५/२००७ प्रकरणी तसेच ऑल इंडिया लोकल सेल्फचे कायदेशीर मत आपल्या अवलोकनार्थ देत आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समितीवरील निम्मे ६ (सहा) सदस्य माहे एप्रिल, २०१८ ला निवृत्त होणार असल्याने निवृत्त झालेल्या सदस्यांच्या जागी रिक्त असलेल्या जागेवर नव्याने नेमणूकीसाठी प्रशासनाने नेमकी कोणती पध्दत अवलंबावी पालिका सदस्यांमधुन नेमणुक करावी कि बाहेरील व्यक्तींमधुन नेमणुक करावी हे ठरविणे आवश्यक आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता परिवहन समितीवर ६ सदस्य नियुक्तीसाठी ३१ अ ची तरतुद लागू करावी कि २५(२) नुसार सदस्य भरावे याबाबत धोरण ठरविणे आवश्यक आहे.

तसेच २५(२) मधील तरतुदीनुसार परिवहन समितीवर सदस्य घेतांना कल्याण डोंबिवली महापालिकेने गुप्त मतदान पध्दती अवलंबली आहे त्यानुसार करावे किंवा कसे याबाबत विचार विनिमय होवून धोरणात्मक निर्णयासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र: ४ अ** **दिनांकः— २/५/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे परिवहन समितीवर पालिका सदस्य किंवा बाहेरुन सदस्य घेणेसाठी धोरण ठरविणेबाबत विचार विनिमय करणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ४ :— प्रस्तावाची सूचना**

शहर हित व विकासाचे प्रकरणे हाताळण्यासाठी १. विधी अधिकारी, २ सादरकर्ता अधिकारी, ३ चौकशी अधिकारी यांची उल्हासनगर महानगरपालिकेत तातडीने नियुक्ती करणेबाबत पालिका सदस्य श्री. महेश सुखरामानी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

---

**महापालिका सचिवः—** सदस्य नसल्यामुळे हा प्रस्ताव कार्यसुचीवरून वगळयात येत आहे, अनुमोदक कोणी दुसरे आहेत का? कोणी नाही, हा प्रस्ताव कार्यसुचीवरून वगळण्यात येत आहे.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव वगळण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४ :— प्रस्तावाची सूचना**

शहर हित व विकासाचे प्रकरणे हाताळण्यासाठी १. विधी अधिकारी, २ सादरकर्ता अधिकारी, ३ चौकशी अधिकारी यांची उल्हासनगर महानगरपालिकेत तातडीने नियुक्ती करणेबाबत पालिका सदस्य श्री. महेश सुखरामानी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध विभागामार्फत काढण्यात येणारे निविदा व इतर शहर हित व विकासाचे प्रकरणे हाताळण्यासाठी विधी अधिकारी, चौकशी अधिकारी आणि सादरकर्ता अधिकारी नसल्याने सदर प्रकरणाचे निपटारा वेळेत होत नाही व वेळकाढुपणा होत आहे. याबाबत यापूर्वीच्या महासभा ठराव क्र. ३५, दिनांक ९/७/२०१५ मध्ये सदर पदाबाबत ठराव पारीत केला असून अदयापर्यंत या ठरावावर कार्यवाही झालेली नाही तसेच अव्यवस्थितपणे चालत असलेला कारभार विविधी विषयाबाबत प्रलंबित प्रकरणेबाबत तिन प्रमुख पदे म्हणजे विधी अधिकारी, सादरकर्ता अधिकारी आणि चौकशी अधिकारी नियुक्ती केली जात नसल्याने बरीच प्रकरणे

महापालिकेत प्रलंबित आहेत. याबाबत पत्रकार तथा समाजसेवक श्री. प्रकाश तलरेजा यांनी देखील मागील दोन वर्षापासून तशी मागणी केली असता अदयापपर्यंत कार्यवाही केली जात नाही. यावरुन प्रशासन कार्यवाहीस उदासिन आहे असे दिसून येते.

तरी महोदयांना विनंती की वरील प्रकरणाचे निपटारा होणेकरीता महापालिकेस विधी अधिकारी, सादरकर्ता अधिकारी, चौकशी अधिकारी नियुक्ती करण्याबाबत येत्या महासभेत प्रस्ताव घ्यावा व त्यावर विचार होवून निर्णय व्हावा ही विनंती करतो.

**महासभा ठराव क्र:४ ब** **दिनांक:— २/५/२०१८**

सुचकाचे नाव :— श्रीम. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. मिना सोनेजी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शहर हित व विकासाचे प्रकरणे हाताळण्यासाठी १. विधी अधिकारी, २ सादरकर्तौ अधिकारी, ३ चौकशी अधिकारी यांची उल्हासनगर महानगरपालिकेत तातडीने नियुक्ती करणेचा प्रस्ताव मांडणारे सदस्य उपस्थित नसल्याने सदर प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :— प्रस्तावाची सूचना**

श्री. गोविंद गोपाळा पिंपरकर, तारतंत्री या कर्तव्य दक्षक कर्मचा—यास विशेष बाब म्हणून दोन आगावू वेतनवाढी देणेबाबत पालिका सदस्य श्री. दिपक सिरवानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** पास...पास...

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५ :— प्रस्तावाची सूचना**

श्री. गोविंद गोपाळा पिंपरकर, तारतंत्री या कर्तव्य दक्षक कर्मचा—यास विशेष बाब म्हणून दोन आगावू वेतनवाढी देणेबाबत पालिका सदस्य श्री. दिपक सिरवानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

श्री. गोविंद गोपाळा पिंपरकर, तारतंत्री यांनी सन १९९० ते २००३ पर्यंत विदयुत विभागात विदयुत मदतनीस म्हणून काम चांगल्या प्रकारे करीत होते. त्यानंतर त्यांना वायरमन हे पद देण्यात आले आहे. तेव्हापासून विदयुत विभागात विदयुत विभाग प्रमुखांची सर्व कामे अत्यंत उत्कृष्टरित्या पार पाडीत आहे. तसेच त्यांच्या चांगल्या

कामामुळे महानगरपालिकेचे विदयुत विजेच्या देयकांचे लाखो रुपये वाचले आहे. यापुर्वी महानगरपालिकेस चांगल्या कामांमुळेच विदयुत विभागास आयएसओ पुरस्कार प्राप्त झालेला होता. तरी श्री. गोविंद गोपाळा पिंपरकर, तारतंत्री हे सेवानिवृत्तीच्या उंबरठयावर आलेले आहे. त्यांना कामाबाबत प्रोत्साहनपर दोन वेतनवाढीचा लाभ देणे अत्यंत आवश्यक आहे. सदर लाभ देण्याबाबतचा विषय येत्या महासभेत चर्चा करणेसाठी अशासकिय प्रस्ताव ठेवण्यात येवून चर्चा होवून निर्णय घेण्यात यावा.

**महासभा ठराव क्र: ५** **दिनांक:— २/५/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. गजानन शेळके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. गोविंद गोपाळा पिंपरकर, तारतंत्री या कर्तव्य दक्षक कर्मचा—यास विशेष बाब म्हणून दोन आगावू वेतनवाढी देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—प्रस्तावाची सूचना**

मुस्लीम समाजकरीता कैलास कॉलनी, सिध्दार्थनगर येथिल भुखंड क्र. २४४ कब्रस्तान करीता आरक्षित असुन सदरच्या भुखंडातील बाधीत झालेल्या ७ झोपडीधारकांना पुर्नवसनाकरीता पर्यायी जागा मिळणेबाबत.

---

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—** पास...पास...

**महापालिका सचिव:—** मा. सभागृह यात जो ठराव होणार आहे भुखंड क्र. ४४ वर त्यात फक्त सात झोपडीधारकांना पुर्नवसन करण्या करीता पर्यायी जागा देण्या करीता प्रशासनास निर्देश देत आहे. असा एवढाच ठराव होईल.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** नाही, नाही पण ती जागा कुठे देणार आहेत? हे कसे होणार आहे?

**महापालिका सचिव:—** ते धोरण प्रशासन ठरवेल.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** मग ठराव पास करून तरी उपयोग काय आहे? माझी लक्षवेधी होती, मला सांगितले गेले की, तुमची लक्षवेधी कारण हा ठराव आहे, म्हणून हे ठराव घेत नाही, तुम्ही त्यांना देणार आहेत मग....

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी**:— रामचंदानीजी, आपण हा प्रश्न आयुक्त साहेब आणि महापौरां बरोबर बसून सॉल करू शकतात.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** नाही, तसे नाही. सात लोकां विषयी तुम्ही काहीही विचारत नाही, असे मला वाटते. पण त्यांनी सांगितले पाहीजे ना? प्रशासनाने आपल्याला सांगितले पाहीजे की ती जागा नेमके कुठे देणार आहेत आणि आपल्या महानगरपालिकेची मोकळी जागा आहे कुठे? तिथे तुम्ही देवू शकतात.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी**:— हे सजेशन तुम्ही आयुक्त साहेबांकडे दया आणि मॅडम बरोबर तुम्ही चर्चा करा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** माझा प्रस्ताव आहे...

**सदस्या, श्रीमती अंजली साळवे:—** आता पावसाळयाचे दिवस आले आहेत आणि त्यांची घरे तुम्ही निष्कासित करण्यात येणार आहेत आणि आता पावसाळयाचे आधी त्यांना देणे गरजेचे आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** नाही मग देणार तरी कुठे?

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**☑विषय क्र. ६ :— प्रस्तावाची सूचना**

मुस्लीम समाजकरीता कैलास कॉलनी, सिध्दार्थनगर येथिल भुखंड क्र. २४४ कब्रस्तान करीता आरक्षित असुन सदरच्या भुखंडातील बाधीत झालेल्या ७ झोपडीधारकांना पुर्नवसनाकरीता पर्यायी जागा मिळणेबाबत पालिका सदस्या श्रीमती अंजली साळवे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयानुसार विनंती पूर्वक कळवू ईच्छिते की, उल्हासनगर शहरातील मुस्लिम बांधवांन करीता कब्रस्तान हा मुद्दा ज्वलंत मुद्दा असुन ब—या वर्षापासुन तो प्रलंबीत होता. त्याअनुषंगाने आरक्षण भुखंड क्र. ५८, म्हारळगाव हि जागा दफन भुमी करीता प्रस्तावीत होती. परंतु सदर जागा न्यायालयीन प्रविष्ट असल्यामुळे आणि मुस्लिम समाजाला तातडीने कब्रस्तान करीता जागा उपलब्ध करून देण्याकरीता मागील महासभेत सर्व महापालिका सदस्यांनी व पदाधिकारी यांनी सर्व संमतीने सिध्दार्थ नगर, कैलास कॉलनी येथील भुखंड क्र. २४४ (क्षेत्रफळ २४०० चौ.मी.) देण्यात आला. तसेच भुखंड क्र. २४३ चे आरक्षण वगळून सदरची जागा देखील कब्रस्तान करीता देण्याचा प्रस्ताव सर्वसंमतीने शासनाकडे पाठविण्यात आला. त्यासंदर्भात अंमलबजावणी म्हणुन मागील आठवडयात महानगरपालिके तर्फे सात झोपडी धारकांना नोटीस बजावून त्याची घरे निष्कसीत करण्यात आली तसेच तेथील डी.पी. रस्त्यात बाधीत होणा—या घर धारकांना मार्किंग करण्यात आलेली आहे व १३ दुकानधारक आहे त्यांची दुकाने कब्रस्तान आरक्षात येत नसतांना त्यांना नोटीस बजावण्यात आलेल्या आहे व सदरचे प्रकरण हे न्यायालयीन प्रविष्ट आहे.

महोदय माझा विषय इतकाच आहे की, उल्हासनगर शहरात जे खुले भुखंड आहे उदा. भुखंड क्र. ४८ तसेच शासनाने सुचविलेले गायकवाड पाडा येथील भुखंड हे खुले भुखंड आहे. तरी देखील सदरचे दोन्ही भुखंड वगळुन ज्या भुखंडवर लोकांची वस्ती आहे अशा भुखंड क्र २४४ येथील रहिवाशांचे घरे निष्कसीत करून सदरच्या रहिवाशांना बेघर करण्यात येत आहे. ज्याप्रकारे कैलास कॉलनी, सिध्दार्थ नगर येथे रस्त्यात बाधित झालेल्या दुकानधारकांना आपल्याच महापालिकेने महासभेत ठराव मंजुर करून महापालिकेच्या ताब्यात असलेल्या अतिरिक्त भुखंडामध्ये बाधित झालेल्या दुकानदारांना दुकानाकरीता पर्यायी जागा देण्यात आले. त्याचप्रकारे आरक्षण भुखंड क्र २४४ येथील बाधित झालेल्या झोपडी धारकांना पर्यायी जागा देण्यात येउन त्यांच्यासोबत देखील न्याय करण्यात यावा. तरी या विषयांवर प्रस्ताव सुचना खालील प्रमाणे.

सुचना क्र.१) :— भुखंड क्र. २४४ मधील बाधित झालेल्या सात झोपडी धारकांना प्रत्येकी ३०० चौ.फुटाचे पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात यावी.

सुचना क्र.२) :— सिध्दार्थ नगर, कैलास कॉलनी येथील रस्त्यात १३ दुकान धारकांना महापालिका मार्फत बजावण्यात आलेली नोटीसमागे घेण्यात यावी. तसेच सदरचे

प्रकरण न्यायालयात प्रलंबीत असल्यामुळे सदरची
केस मागे घेण्यात यावी.

सुचना क्र.३) :— नविन विकास आराखडयात आरक्षण भुखंड क्र.२४४ मध्ये एमआरटीपी अंतर्गत सेक्शन ३१(१) नुसार नविन ३० फुट डी.पी.रोड प्रस्थापीत करण्यात आला आहे. तरी सदरचा रस्ता नविन विकास आरखडा मधुन वगळयात यावा.

तरी महापालिकेच्या सर्व सदस्यांना व पदाधिकारांना कळकळीनी सांगू ईच्छिते की, श्रीमंताना वेगळा न्याय व गोरगरीबांना वेगळा न्याय असा गैरसमज जनतेच्या मनात येउ नये. तरी सर्व बाधित झालेल्या झोपडी धारकांना व दुकानधारकांना पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात येउन एकमताने सदरचा प्रस्तावाला मंजुरी देणेकामी सदरची प्रस्तावाची सुचना.

**<u>महासभा ठराव क्र: ६</u>** **<u>दिनांकः— २/५/२०१८</u>**

सुचकाचे नाव :— श्रीम. अंजली साळवे

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. कविता बागुल

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मुस्लीम समाजकरीता कैलास कॉलनी, सिध्दार्थनगर येथिल भुखंड क्र. २४४ कब्रस्तान करीता आरक्षित असुन सदरच्या भुखंडातील बाधीत झालेल्या ७ झोपडीधारकांना पुर्नवसनाकरीता पर्यायी जागा देण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ६.४८ वाजता महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**दिनांकः— २०/७/२०१८**

**<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/७/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>**

३

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०/०७/२०१८ रोजी दुपारी ३. ०० वाजता घेण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३९ | श्रीमती ज्योती प्रकाश भठीजा |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ४० | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ४१ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४२ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ७ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४३ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ८ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४४ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४५ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४६ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ११ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४७ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १२ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४८ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १३ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४९ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १४ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ५० | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १५ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ५१ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १६ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ५२ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १७ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ५३ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १८ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५४ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १९ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५५ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| २० | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५६ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २१ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५७ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २२ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५८ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| २३ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५९ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ६० | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २५ | श्री. भगवान शंकर भालेराव | ६१ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २६ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ६२ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २७ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ६३ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २८ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ६४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २९ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ६५ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६६ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| ३१ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६७ | श्री. विजय चाहु पाटील |
| ३२ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६८ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३३ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६९ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३४ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ७० | श्री.विकास परशुराम पाटील |
| ३५ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ७१ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३६ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ७२ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३७ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ७३ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३८ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके | ७४ | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती आशा नाना बिराडे, २. श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर, ३. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ४. श्रीमती छाया सुजित चक्रवरती उर्फ अडसुळ, ५. श्रीमती कविता लाल पंजाबी, ६. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे), ७. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी, ८. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.
२९. श्री. गणेश पाटील, आयुक्त
३०. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३१. श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
३२. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी
३३. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
३४. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता
३५. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
३६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
३७. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
३८. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
३९. श्री. संतोष जाधव, उप लेखाधिकारी
४०. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
४१. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१४. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त
१५. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१६.श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
१७.श्री. नंदलाल सामतानी, प्र. सहाय्यक आयुक्त
१८. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१९. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
२०. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२१. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२२. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक
२३. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
२४. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षारक्षक
२५. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२६. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक
२७. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक
२८. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
२९. श्रीमती निलिमा कदम, लेखापाल (शिक्षण मंडळ)

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१.  श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्रीमती नर्गिस खान, लिपीक
३.  श्री. बाळु भांगरे, लिपीक

सायंकाळी ३.३० वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** सुरेंद्र सावंत यांच्याकडून शोक प्रस्ताव आला आहे, कुलकर्णी मॅडम तुम्हांला वाचून दाखवतील.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** मा. महापौरजी कॅम्प नंबर ५ मध्ये मुरलीवाला येथे जो अपघात झाला, एका महीलाचा मुंत्यु झाला तिला पण श्रध्दांजली देण्यात यावी.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** सन्माननिय महापौर मॅडम, साधूवासवानीचे ट्रस्टचे प्रमुख आणि जे. पी. वासवानी_यांचे पुणे इथे निधन झालेले आहे, भारत देशामध्ये शांततेचे प्रतीक समजले जाणारे जे.पी. वासवानी यांच्या संदर्भामध्ये पण सभागृहामध्ये श्रध्दांजली देण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** मा. महापौरजी, माजी नगरसेवक धुरू खत्री यांचा पण मुंत्यु झालेला आहे, त्यांना सुध्दा सभागृहामध्ये श्रध्दांजली देण्यात यावी, धन्यवाद.

**सदस्य, श्री. मनोज सयानीः—** मा. महापौरजी, दिनांक १२ जुलै, २०१८ ला सिंधी समाजाचेच नाही तर संपुर्ण देशाचे चाहते आणि ज्यांनी अध्यात्मिक कायम मानव सेवा केली असे आमचे साधूवासवानी मिशनचे दादा, जे.पी. वासवानी ज्यांचे संपुर्ण नाव जेसन पहीलाजराय वासवानी होते. त्यांचे जन्म त्यावेळी हिन्दुस्तानमध्ये हैदराबाद सिंधमध्ये दिनांक २ ऑगस्ट, १९१८ मध्ये झाला होता आणि त्यांचा मुत्यु जेव्हा झाला तेव्हा फक्त २० दिवस त्यांना १०० वर्षे पुर्ण करायला बाकी होते. २० दिवस पहीले एका आजाराने पुण्याच्या रूबी क्लिनिक हॉस्पीटलमध्ये त्यांचा मुत्य झाला, फक्त सिंधी समाजाचे नाही तर संपुर्ण देशामध्ये जेवढे इतर समाजाचे लोक आहेत, ते दादाजी त्यांच्या नावाने ओळखत होते आणि त्यांनी निश्चय केला होतो की, मानव सेवाही माधव सेवा आहे. देवाला सेवा खुप प्यारी आहे, त्यांनी फक्त माणसांसाठी कार्य केले आहे, हॉस्पिटलद्वारे, साधूवासवानी मिशनद्वारा कार्य आणि पशूसाठी पण मनात प्रेम, आदर, आत्मसन्मान होता, त्यासाठी त्यांनी त्यांचे गुरू दादा टी.एल. साधू वासवानी यांचा जन्म दिवस २५ नोव्हेंबर निकलेस डे, संपुर्ण विश्वामध्ये निकलेस डे मानला जातो. “पशु का आहार हम न करे, और वैष्णू जीवन इतिहार करे” खुप काही उपलब्धीयॉ त्यांना मिळाल्या आणि यु.एन. मध्ये पण सन्मानित करण्यात आल, युनायटेड नॅशनमध्ये पण शिकागो,ऑक्सफर्ड युनिवरसिटी असे खुप पुरस्कार दादा जेसन पहीलाजराय वासवानी यांना मिळाले. या सर्व गोष्टी त्यांच्या जीवन कार्यामध्ये झाल्या. भारत सरकारकडून पण त्यांना सन्मानित केले गेले आणि आपल्या देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजीनी पण त्यांच्या शताब्दी वर्ष चालू होते, तिथे जाऊन त्यांनी शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या दु:खद निधन झाल्यामुळे संपुर्ण देशात शोक संदेश दिला गेला. फक्त मोदीजीच नाही तर संपुर्ण जगाचे जेवढे पण अध्यात्मिक गरू होते, दलाई लामा असे किंवा आपले राधास्वामीचे बाबाजी असतील तसेच मा. राष्ट्रपती, रामनाथ कोविंदजी त्यांनी शोक प्रस्ताव दिला आहे, मला वाटते की, आपल्या उल्हासनगरमधून सुध्दा त्यांच्या

शांतीसाठी, त्यांच्या आत्म्यासाठी त्यांचे जे जीवन होते, लोकांसाठी सर्मपित होते. त्यांच्याकडून आपण शिकले पाहीजे, प्रेरणा घेतली पाहीजे आणि आपण सुध्दा जीवनात काही तरी शिकले पाहीजे. तरी दोन मिनिटे बाकी लोकांसाठी श्रध्दांजली आहे, मुरलीवालाची श्रध्दांजली आहे, धुरूखत्री यांची पण श्रध्दांजली आहे, आमचे माजी नगरसेवक यांची पण श्रध्दांजली आहे आणि दादा वासवानीसाठी मी सभागृहाला विनंती करतो की, ऑल रेडी उल्हासनगरमध्ये गोल मैदान येथे साधूवासवानी उद्यान म्हणटले जाते. तिथे एक जागा बघून दादा जे.पी. वासवानीचे स्मारक बनवले जावे. जसे की त्यांचे सेवा, त्यांनी केलेले कार्य येणा—या पिढीला मिळतील, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. सुनिल सुर्वे, श्री. अरूण आशान, श्री.प्रमोद टाले यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>** महापौर मॅडम, दादा जेसन वासवानींचा मृत्यु झाला आहे, ते देशात समाजासाठी शांतीप्रीय मानले जायचे, एक अशी व्यक्ती संपुर्ण विश्वाला शांतीचा संदेश देत आली आहे. आणि त्यांच्या प्रवचनाने संपुर्ण विश्व प्रभावित होते आणि असे पण नव्हते की, जे केवळ प्रवचनाद्वारे लोकांची मने जिंकत होते, परंतु आपल्या कर्म योगाने जी मानव सेवा केली आहे, ती खुपच अदभुत आहे. जसे त्यांनी काही प्रकारे मुलींसाठी “बेटी बचाव, बेटी पढाव” हे आपण आता येणा—या दिवसामध्ये ऐकले आहे, परंतु त्यांनी मुलींसाठी ४० वर्षापुर्वी महीलांसाठी समान दर्जा आणि मुलींसाठी विशेष रूपाने प्रेम दिले जावे, असा संदेश त्यांनी दिला. ते एक युग पुरूष आहेत, त्यांनी जे काम केले, जसे की आधी सांगितले आहे की, प्रत्येक जीवावर प्रेम करायला पाहीजे, त्या प्राण्यामध्ये जीव आहे, त्यांच्यावर प्रेम करायला पाहीजे. असे संत आणि सौभाग्याने माझ्या समाजाचे संत आहेत, ते केवळ एका समाजासाठी कार्य करीत नव्हते, संपुर्ण समाजामध्ये एक व्यक्ति मात्र, प्राणीमात्रांना ते देव मानत आले. ते आज आपल्यामध्ये राहीले नाहीत, परंतु त्यांची जी प्रेरणा आहे त्यासाठी एका वर्षामध्ये २५ नोव्हेंबरला निकलेस डे म्हणजे त्या दिवशी आपण मांसाहार करणार नाही. परंतु आज आपण या सभागृहामध्ये जेवढे पण सदस्य उपस्थित आहेत, सत्ता पक्षाचे असतील, विरोधी पक्षाचे असतील, अधिकारी वर्ग असेल त्यांनी जर आज ठरवले की, मी जीवनभर, आयुष्यभर २५ नोव्हेंबरला मांसाहार ग्रहण करणार नाही. तर त्यांच्या प्रती खरोखरची श्रध्दांजली असेल. मी शोकसभेद्वारे एक प्रस्ताव देतो की, आपण अशा व्यक्तीसाठी आपले आदर, आपली संवेदना, श्रध्दांजली अर्पीत करीत आहे आणि आपल्या देशामध्ये अशा व्यक्तीची कमी सतावत राहील. त्याच बरोबर मुरलीवाला कॉम्पलेसमध्ये चाळीस वर्षाच्या महीलेचा दुर्घटनेत त्यांचा मृत्य झाला, त्यांच्या परिवारा बरोबर आपण त्यांच्या दु:खात सामिल आहोत, त्याच बरोबर माजी नगरसेवक सन १९८६ मध्ये वार्ड २१ मधून निवडून आले होते, श्री. धुरूकुमारखत्री यांचा पण मागच्या आठवडयात मृत्यु झाला आहे, त्यांना पण भारतीय जनता पार्टी, समस्त सभागृहतर्फे मी त्यांना श्रध्दांजली अर्पीत करतो आणि सर्वांना निवेदन करतो यांच्यासाठी दोन मिनीटे उभे राहून त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

या वेळी सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी, सदस्य, श्री. धनंजय बोडारे यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** दादा जे.पी. वासवानी, साधूवासवानी मिशनचे प्रमुख लगबग आपण कोणाला पण शंभर वर्ष जगण्यासाठी शुभेच्छा देत असतो, त्यांनी लोकांचे जे आशिर्वाद घेतले ते कामाच्या माध्यमातून घेतले जेव्हा मनुष्य काम करतो तेव्हा तो समाजाच्या बाहेर जातो. तो कोणत्या समाजाचा आहे, हे स्वत: विसरून जातात आणि लोक पण विसरून जातात की, या समाजाचा आहे. कारण की, तो समाजप्रिय होऊन जातो, यासाठी ते कोणत्या एका समाजाचे नव्हते, संपुर्ण समाजाचे होते, ते भारतीय योग होते. त्यांनी संपुर्ण आयुष्यामध्ये चांगली कामे केली आणि शेवट पर्यंत म्हणजे त्यांचा जन्म २ ऑगस्ट, १९१८ मध्ये झाला आहे आणि १२ जुलैला त्यांचा मृत्यु झाला आहे. म्हणजे लगबग २० दिवस कमी ते शंभर वर्ष व्हायला बाकी होते. मी त्यांना सलाम करतो आणि शिवसेना पार्टीतर्फे, संपुर्ण शहरातर्फे आणि सभागृहातर्फे मी त्यांना श्रध्दांजली अर्पित करतो आणि त्यांच्याकडून एक प्रेरणा घेतली पाहीजे की समाजासाठी आपले कॉन्ट्रीब्युशन जेवढे होऊ शकेल तेवढे समाजासाठी जास्त काम केले पाहीजे हीच त्यांना खरी श्रध्दांजली राहील, मी त्यांना माझ्याकडून श्रध्दांजली अर्पित करीत आहे.

या वेळी सदस्य, श्री. शेखर यादव, सदस्या, श्रीमती दिपा ठाकुरे यांना सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>महापालिका सचिव:—</u>** इथे मा. महापौरांच्या आदेशान्वे मा. सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत यांनी देखील शोक प्रस्ताव दिला आहे, तो वाचून दाखवत आहे. दिनांक २०/७/२०१८ रोजीच्या महासभेमध्ये थोर मानवतावादी, प्रेम, करूणा, क्षमा आणि सेवा या मुल्यांवर संपुर्ण संपुर्ण मानव जातीला शांततेचा संदेश देणा—या दादा जे.पी. वासवानी यांच्या निधनाने आधुनिक काळातील एक अध्यात्मिक गुरू काळाच्या पडदयाआड गेला आहे, त्या बाबात शोक प्रस्ताव ठवणे आवश्यक आहे. गुरू साधू टी.एल. वासवानी यांच्या पाऊलावर पाऊल टाकत त्यांनी जगाला मानवतावादीचे धडे दिले, प्रेम व त्यागाची शिकवण दिली आणि सेवेचे महत्व पटवून दिले दादा वासवानी थोर मानवतावादी होते, परंतु त्यांनी केवळ मानवतावादीच नव्हे तर पशु पक्षींवर व सजिव सृष्ट्रीवर प्रेम केले. जसे मानवाला जगण्याचा हक्क असतो, तसे प्राण्यानांही जगण्याचा हक्क असतो, असे सांगत दादाजींनी सर्व प्राणीमात्रांवर आदर व्यक्त केला. केवळ प्रवचनामध्येच न राहता, त्यांनी आपल्या मिशनद्वारे सेवाभाव प्रत्यक्ष आणला त्यामुळे शिक्षणापासून आरोग्य सेवे पर्यंत अनेक कामांना संस्थापक रूप दिले. द्वेष, विखार आणि लालसा यामध्येही मानवाच्या त्रासाची, नासाची, विजयाची त्यामुळे त्याच्या पासून दुर राहण्याचा संदेश त्यांनी दिला. युध्दांनी प्रश्न सुटणार नाही, तर मानवतेची मुल्य जोपासा, जगात शांतता शांतता नांदेल अशी शिकवण देणा—या दादा सारखे गुरूची आज आवश्यकता आहे, ते आज आपल्यात नाहीत, ही अत्यंत शोकांकिका आहे. आज त्यांना आपण भावपुर्ण श्रध्दांजली ठेवून त्यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी इश्वर चरणी प्रार्थना करू या. कृपया दोन मिनीटे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** ठराव कुठे आहे?

**<u>महापालिका सचिव:—</u>** ठरावात येणार नाही, तुमचे म्हणणे इतिवृत्तात येईल. नंतर ठराव डिपार्टमेंटकडून येईल.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडेः—** महापौर मॅडम, मुरलीवाला कॉम्पलेक्समध्ये पण स्लॅब कोसळून एका महीलेचे निधन झाले आहे, त्यांचे पण घ्या.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** आज सभागृहामध्ये सर्व सदस्यांनी दादा जेसन पी. वासवानी यांना श्रध्दांजली दिली आहे. त्यांचे जीवन जर बघितले तर त्यांचे पुस्तकाद्वारे लिहीलेले लेख त्यांचा मुख्य उद्देश संपुर्ण जीवनामध्ये, शंभर वर्षामध्ये पाच गोष्टींना महत्व दिले. या पाच गोष्टींमध्ये सर्वात पहीले होती ती सेवा त्यांनी सांगितले की, तुम्ही काहीही करा. परंतु जो पर्यंत तुमच्या जीवनामध्ये सेवा नाही, तो पर्यंत तुमचे जीवन व्यर्थ आहे. अशा काही प्रकारच्या सेवा विद्यार्थ्यासाठी, आजारपणासाठी, गरींबांसाठी, मुलांसाठी, महीलांसाठी त्यांच्याकडूल हजारो सेवा संपुर्ण देशभर चालत होत्या. दुसरे होते, स्मरण, सेवा बरोबर देवाचे स्मरण पण केले पाहीजे. कारण की, अशी चांगली बुध्दी मिळेल की, आपण सेवेचे कार्य करू शकतो. तिसरा त्यांचा उददेश होता, सादगी आपण नेहमी बघणार की जे.पी. वासवानी दादा सादगीमध्ये राहत होते. कोणतीही वेषभुशा, गाडया, मोटर नाही. एकदम सादसीमध्ये, साधे जीवन सेवा सिमरण सादगी समदर्शी, चौथे त्यांचे होते समदर्शी प्रत्येकाला “जात, पात पुछे ना कोई हरी को बजे सो हरी को हुई” कोणत्याही जातीकडे त्यांचे विशेष लक्ष नव्हते. जे मानव आहे, ज्यामध्ये जीव आहे, ते पशु—पक्षी सगळयांना एक समान आणि मिकलेस डे संपुर्ण विश्वामध्ये मानत होते आणि संपुर्ण देशामध्ये मानत होते. आपले पंतप्रधान, आपले राष्ट्रपती, उप प्रधानमंत्री अशा अशा मोठ मोठया नेत्यांनी त्यांच्याकडे जाऊन जे शताब्दी वर्ष साजरा करीत होते, त्यामध्ये सामिल झाले आणि पाचवा समदर्शी नंतर सत्संग अनेक प्रकारच्या लघुकथा सांगून राम नामाचे जप करून लोकांना सत्संग ऐकवून चांगल्या मार्गाने घेऊन जात होते, लोकांचे मन प्रसन्न करीत होते, असे आमचे दादा जे.पी. वासवानी यांना संपुर्ण सभागृहाकडून, भारतीय जनता पार्टीकडून, सर्व पक्षातर्फे इथे श्रध्दांजली देवू आणि जसे की श्री. मनोज सयानी यांनी सांगितले, साधुवासवानी उद्यान आपल्याकडे आहे, एका उद्यानामध्ये दादा वासवानी यांचे नाव देवून ते उद्यान शुशोभिकरण करू आणि त्यांची सेवा, कार्य लोकांना अवगत करू कारण लोक त्यांचे नाव ऐकुन तिथे येतील आणि पुढे मानव सेवा करीत राहतील.

**महापालिका सचिवः—** कृपया सर्वांनी दोन मिनीटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित करावी.

---

सुचकाचे नाव :— श्री. सुरेंद्र सावंत

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

**शोक प्रस्ताव**

थोर मानवतावादी, प्रेम, करुणा, क्षमा आणि सेवा या मुल्यांवर संपुर्ण मानवजातीला शांततेचा संदेश देणा—या दादा जे.पी. वासवानी यांच्या निधनाने आधुनिक काळातील एक थोर आदयात्मिक गुरु काळाच्या पडदा आड गेला आहे.

गुरु साधु टी.एल. वासवानी यांच्या पावलावर पाउल टाकत त्यांनी जगाला मानवतावादाचे धडे दिले. प्रेम व त्यागाची शिकवण दिली आणि सेवेचे महत्व पटवून दिले. दादा वासवानी थोर मानवतावादी होते. परंतु त्यांनी केवळ मानवावरच नव्हे तर पशुपक्षी व सजिव सृष्टीवर प्रेम केले जसे मानवाला जगण्याचा हक्क असतो तसा प्राण्यांनाही हक्क असतो असे सांगत दादांनी सर्व प्राणीमात्रावर आदर व्यक्त केला. केवळ प्रवचनातच न राहता त्यांनी आपल्या मशिनद्वारे सेवाभाव प्रत्यक्षात आणला त्यामुळे शिक्षणापासुन आरोग्य सेवेपर्यंत अनेक कामांना संस्थात्मकरुप दिले. द्वेष, विखार आणि लालसा या मध्येही मानवाच्या —हासाची बिजे आहेत. त्यामुळे त्यांच्यापासुन दुर राहण्याचा संदेश त्यांनी दिला. युध्दाने प्रश्न सुटणार नाहीत तर मानवतेची मुल्ये जोपासण्यापासुन जगात शांतता नांदेल अशी

शिकवण देणा—या दादांसारख्या गुरुची आज आवश्यकता आहे. ते आज आपल्यात नाहीत ही अत्यंत शौकांतिका आहे. त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली देवुन त्यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी इश्वर चरणी प्रार्थना.

त्यांच्या कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ११ अ** **दिनांकः— २०/७/२०१८**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार दादा जे.पी. वासवानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सुचकाचे नाव :— श्रीमती सुनिता बगाडे

अनुमोदकाचे नाव :— श्री. मनोज सयानी

**शोक प्रस्ताव**

मुरलीवाला कॉम्पलेक्स येथे स्लॅब कोसळुन एका महिलेचा दुर्देवी मुत्यु झाला आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ११ ब** **दिनांकः— २०/७/२०१८**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मुरलीवाला कॉम्पलेक्स येथिल स्लॅब कोसळल्यामुळे मुत्युमुखी झालेल्या महिला यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिवः—** प्रश्नोत्तरे आहेत, प्रश्न क्रमांक २२ मागे थोडा अर्धवट राहीला होता, त्या अर्धवट प्रश्न अगोदर व्हाईल आणि प्रश्न क्रमांक २४ पासून सुरूवात होईल.

प्रश्न क्र. २२ हा श्रीम. सुनिता बगाडे यांचा आहे.

**?** **प्रश्न क्र. २२:—** माहे जून २०१७ च्या सर्वसाधारण महासभेच्या कामकाजा मध्ये खालील प्रश्नांचा समावेश करून सविस्तर उत्तर मिळणेस विनंती आहे.

**१)** महानगर पालिकेच्या मंजूर अस्थापना सूचीवर बेकायदेशिर पणे कार्यरत असणा—या कर्मचारी/अधिकारी यांच्या नियुक्ती बाबत व त्यांचे वर केलेल्या कार्यवाही बाबत सविस्तर माहिती दयावी.

**अ)** महानगर पालिकेमध्ये किती कर्मचारी/अधिकारी यांनी कागदपत्राचा बनाव करून पालिकेत बेकायदेशिर पणे सेवा प्राप्त केंली आहे. त्यामध्ये पदसमूह वर्ग वर्ग —१, वर्ग—२, वर्ग—३ आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांची सविस्तर यादी उपलब्ध करून दयावी.

**ब)** मंजूर अस्थापणा सूची नूसार पात्र उमेदवार बनण्यासाठी सादर केलेले कागद पत्रे बनावट असल्याचे सिध्द झाल्या नंतर अशा उमेदवारांना सेवा प्राप्त केल्या नंतर केल्या जाणा—या कार्यवाही बाबतचे धोरण काय आहे ? त्यांचे वर कोणत्या कायदया नूसार कार्यवाही केली जाते.?

**क)** बेकायदेशिर पणे सेवा प्राप्त कामगार/कर्मचारी/अधिकारी पैकी सिध्द झालेले कामगार/कर्मचारी/ अधिकारी या पैकी किती उमेदवारांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आणि त्या संदर्भात किती कामगार/कर्मचारी/अधिकारी यांनी मा. न्यायालयात दाद मागितली आहे. विदयमान स्थिती मध्ये त्या दाव्यांची स्थिती काय आहे?या बाबत सविस्तर माहिती दयावी.

**उत्तर :—** खालील प्रमाणे माहीती देण्यात येत आहे.

अ) वर्ग—१ निरंक, वर्ग—२ निरंक, वर्ग—३ निरंक, वर्ग— ४ निरंक श्रीम. सरिता अरविंद बडगुजर टांक सफाई कामगार.

ब) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल नुसार कार्यावाही केली जाते.

क) बेकायदेशिरपणे सेवा प्राप्त झालेले कर्मचारी

१) श्रीम. सरिता अरविंद गडगुजर टांक यांनी खोटे कागदपत्र सादर करून नोकरी मिळविल्याने त्यांच्यावर सन २०१६ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

२) श्री. राजेंद्र भानुदास अडांगळे स.का. हे अदयाप पर्यंत दोषी असल्याचे सिध्द झालेले नाही. परंतु प्राथमिक चौकशी अहवालानुसार त्यांचेवर सन २०१८ मध्ये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून पोलिस विभागामार्फत चौकशी सुरू आहे.

या वेळी सदस्य, श्री. धनंजय बोडारे हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** सचिव मॅडम एक मिनीट, महापौर मॅडम, मला एका महत्वाच्या मुददयासाठी तुमच्याकडून परवानगी पाहीजे मागच्या दिड वर्षापासून नविन नगरसेवक निवडून आले आहेत, नगरसेविका निवडून आल्या आहेत, तीन चार वर्षा पासून आपल्या फंडासाठी भटकावे लागत आहे. आम्ही तुमच्याकडे पण विनंती केली आहे, उप महापौर आहेत, सभागृह नेता आहेत, आयुक्त साहेब आज आहेत, मागचे जे आयुक्त होते, त्यांना पण विनंती केली होती. मॅडम या वर्षीचा जो फंड आहे, तो एप्रिल पर्यंत आम्हांला मिळायला पाहीजे होता.

या वेळी सदस्या, श्रीमती पंचम कालानी व सदस्या, श्रीमती ज्योती पाटील यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** मा. महापौरजी, हा प्रश्नोत्तराचा तास चालू आहे की, चर्चेचा विषय आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** मॅडम मी परवानगी घेतली आहे. तर मला तुमच्याकडून हे उत्तर पाहीजे महापौर मॅडम...

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय टोनी सिरवानी पहीले प्रश्नोत्तर होऊ दया, नंतर तुम्हांला परवानगी दिली जाईल. तुमचा पण प्रॉब्लेम आहे, खुपच महत्वाचा आहे, मी तुमच्या बरोबर आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** धन्यवाद मॅडम, धन्यवाद.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडेः—** मा. महापौर महोदया, उप महापौर, मा. आयुक्त साहेब, सचिव आणि सभागृह माझा प्रश्न आहे, महानगरपालिकेमध्ये किती कर्मचारी /अधिकारी यांनी कागदपत्रांचा बनाव करून पालिकेत बेकायदेशिरपणे सेवा प्राप्त केली आहे. त्यामध्ये पद समुहामध्ये वर्ग—१ व वर्ग—२, वर्ग—३ चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांची सविस्तर यादी उपलब्ध करून दयावी. उत्तर दिले आहे, वर्ग—१ निरंक, वर्ग—२ निरंक, वर्ग—३ निरंक, वर्ग— ४ निरंक श्रीम. सरिता अरविंद बडगुजर टांक सफाई कामगार आणि उत्तर देणा—या अधिका—याचे नाव काय आहे. याच्यामध्ये मंजुर अस्थापना सुचीनुसार पात्र उमेदवार भरण्यासाठी सादर केलेली कागदपत्र बनावट असल्याचे सिध्द झाल्या नंतर अशा उमेदवारांना सेवा प्राप्त केल्या नंतर केल्या जाणा—या कारवाई बाबत धोरण काय आहे? त्यांचे वर कोणत्या कायदया नूसार कार्यवाही केली जाते.? बेकायदेशिर पणे सेवा प्राप्त कामगार/कर्मचारी/अधिकारी पैकी सिध्द झालेले कामगार/कर्मचारी/ अधिकारी या पैकी किती उमेदवारांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आणि त्या संदर्भात किती कामगार/कर्मचारी/अधिकारी यांनी मा. न्यायालयात दाद मागितली आहे. विदयमान स्थिती मध्ये त्या दाव्यांची स्थिती काय आहे? या बाबत सविस्तर माहिती दयावी. तुम्ही उत्तर काय दिले आहे? महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल नुसार कार्यावाही केली जाते. बेकायदेशिर रित्या सेवा प्राप्त केलेले कर्मचारी श्रीम. सरिता अरविंद बडगुजर टांक यांनी खोटे कागदपत्र सादर करून नोकरी मिळविल्याने त्यांच्यावर सन २०१६ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे आणि त्याचे दुसरे एक श्री. राजेंद्र भानुदास अडांगळे हे अदयापपर्यंत दोषी असल्याचे सिध्द झालेले नाही. परंतु प्राथमिक चौकशी अहवालानुसार त्यांच्यावर सन २०१८ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पोलिस विभागामार्फत चौकशी सुरू आहे. सर हे उत्तर बरोबर आहे का? या उत्तरात तुम्ही काय दिले आहे? श्रीम. सरिता अरविंद बडगुजर टांक यांनी खोटे कागदपत्र सादर करून नोकरी मिळल्यावर त्यांच्यावर सन २०१६ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे आणि त्यांना बडतर्फ केले आहे. ही कारवाई किती दिवसापुर्वी करण्यात आलेली आहे? त्या बाबत खुलासा करावा. आता माझ्या प्रश्नाला एक वर्ष झालेला आहे. दिनांक ५/६/२०१७ मध्ये हा प्रश्न दिलेला आहे. जी कारवाई मुददा क्रमांक २ मध्ये आहे. त्यामध्ये राजेंद्र भानुदास अडांगळे, सफाई कामगार यांच्या विरोधात का करण्यात आलेली नाही. बरोबर आहे का सर?

**या** वेळी सदस्य, श्री. रवि जग्यासी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला आणि सदस्य, श्री. धनंजय बोडारे यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, आपण उत्तर दया ना किती दिवसात बोगस कागदपत्रांवर कारवाई केली आहे? सरिता यांच्यावर त्याचा खुलासा करा.

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** सरिता अरविंद बडगुजर टांक यांची कागदपत्र माझ्याकडे नाहीत,

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडेः—** सर प्रश्न देवून एक वर्ष झाला आहे, तुमच्याकडे खुलासा नाही,

या वेळी सदस्य, श्री. भगवान भालेराव हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**या** वेळी सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी यांनी सभागृहामध्ये पगवेश केला.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** एक वर्ष झाले आहे.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडेः—** सन २०१६ मध्ये झालेला आहे आणि तुम्ही उत्तर देतात २०१८ ला म्हणजे दोन वर्ष झाली आहेत, प्रश्न देवून एक वर्ष झाले आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** एक एक वर्ष प्रश्न प्रलंबित ठेवतात आणि स्टेजवर आले आहेत तर तुम्हांला माहीत नाही का काय काय कारवाई केली आहे?

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** त्यांच्यावर दोन वर्षापुर्वी कारवाई झाली आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** किती वेळा त्यांच्यावर कारवाई केली, फौजदारी गुन्हा दाखल केला? जेव्हा महानगरपालिकेला माहीती झाले की, त्यांचे बोगस कागद आहेत.

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** त्यांची संचिका मी आता इथे आणलेली नाही, त्याचे रिपोर्ट मी तुम्हांला थोडया वेळात देतो.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** तुम्हांला माहीती आहे की, प्रश्न महासभेमध्ये येणार आहे तर तुम्ही सोबत आणायला पाहीजे होता.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** राजारामवर आज पर्यंत कारवाई का केली नाही?

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे सर.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** यांच्यावर बोगस कागदपत्र असल्यामुळे कशी कारवाई केली आहे? तर राजारामला आता पर्यंत का काढले नाही.

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** सर उत्तरामध्ये लिहीले आहे, श्री. राजाराम अढांगळे सफाई कामगार हे अध्याप पर्यंत दोषी असल्याचे सिध्द झालेले नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** कोणत्या बेसवर तुम्ही मानतात की, तो दोषी नाही?

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** परंतु प्राथमिक चौकशी अहवालानुसार त्यांच्यावर सन २०१८ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** माझ्याकडे दोन्हीचे नौकरीचे कागद आहेत.

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** होय कागद तर असतीलच.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** तरी तुम्ही कसे बोलतात की, ते सिध्द होऊ शकत नाही.

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** सर त्या वेळेला चौकशी अहवालामध्ये चौकशी अधिका—यांनी जो अहवाल दिलेला आहे, त्याच्यानुसारच आपण कारवाई केलेली आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मग त्यांच्यावर तुम्ही एफ.आय. आर. दाखल का केला?

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** त्यांनी चौकशी अहवालामध्ये तसे नमुद केले होते की, हे पोलिस स्वरूपाचे दिसून येते, तर यांच्यावर गुन्हा दाखल करून याची चौकशी व्हावी.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** तुम्हांला दिसत नव्हते की, हे बोगस कागद आहेत, आज रमेश अडांगळेची पत्नी १६ नंबर पॅनलमध्ये सफाई कर्मचारी आहे. त्यांची जी फॅमेली टीम आहे, त्यामध्ये दिसते की, आज पण श्री. रमेश अडांगळे त्यांची मुले वेगळे आहेत, राजेश भानुदासची पत्नी वेगळी आहे. सर्व कागद असतांना सुध्दा आज पर्यंत तुम्ही त्यांना सांभाळत आहेत.

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** सर आता पोलिस विभागामार्फत चौकशी तर चालू आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** तीन वर्षापासून चौकशी चालू आहे का?

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** नाही आता सन २०१८ मध्ये गुन्हा दाखल केला आहे सर.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** नाही, नाही राजा अडांगळेची कंम्पलेट कधी केली आहे?

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** सन २०१६ मध्ये कंम्पलेट केलेली आहे, आता सन २०१८ म्हणजे कंम्पलेट करून दोन वर्ष पुर्ण झाले आहेत.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** कंम्पलेट सन २०१५ ची असेल.

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** सन २०१५ चीच आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** पावने तीन वर्ष व्हायला आले आहेत.

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर:—** सन्माननिय सदस्य, या दोन प्रकरणामध्ये मी माहीती घेतलेली आहे, त्यामध्ये माहीती अशी आहे की, याच्या पहीले जी केस यांनी रेफर केली आहे, त्यामध्ये त्यांनी जे कागद दिले होते, त्यामध्ये त्यांनी सांगितले की, वारसा हक्कामध्ये मी त्यांची मुलगी आहे. परंतु ती मुलगी नव्हती हे पेपरमध्ये क्लीयर दाखवले होते. त्यामुळे त्यांना बडतर्फ केले. या केसमध्ये जो अडांगळेची केस आहे, त्यामध्ये एका नावाचे दोन व्यक्ती दाखवत आहेत. त्यांच्यावर जेव्हा प्राथमिक चौकशी झाली होती, त्यानुसार आम्ही गुन्हा दाखल केला आहे आणि दुसरा जो आहे, ससपेन्शन जो आहे, तो आयुक्त साहेबांनी आजच सांगितले आहे की, त्यांना आजच सस्पेंड करा, ती पण ऑर्डर आज निघेल. परंतु त्यामध्ये जो पर्यंत आयडंटीफाय होत नाही, तो पर्यंत त्यांच्यावर कोणतीही कारवाई होऊ शकत नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** आयडेंटीफासाठी त्यांच्या दोन्ही परिवाराचे रेशनिंग कार्ड वेगवेगळे दिलेले आहे._ वेगवेगळे निवडणूक कार्ड दिले आहेत. त्यांची दोन्ही फॅमिली वेगवेगळी आहे, आज पण ते महापालिकेचा, या पेक्षा तुम्हांला जास्त पुरावा काय पाहीजे?

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर:—** यामध्ये दोन व्यक्तीचा समावेश आहे, त्यांची चौकशी पुर्ण झाल्या नंतर चौकशी मध्ये डिक्लीयर झाल्या नंतर त्यांना त्वरीत बडतर्फ केले जाईल.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** नाही रमेश भानुदास आडांगळेनी वकीलाकडून नोटीस पण पाठवली आहे की, माझ्या नावाने जर चुकीचा माणूस काम करीत असेल तर त्याला मी जबाबदार नाही. त्याच्या पेक्षा अजून तुम्हांला किती पुरावे पाहीजेत.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** परंतु गुन्हा, जो पर्यंत त्यांच्यावर कोर्टामध्ये क्लीयर होत नाही, कोर्ट डिक्लीयर करीत नाहीत की त्यांना धिस इज फ्रॉड आम्ही त्यांना बडतर्फ करू शकत नाही, आम्ही फक्त निलंबित करू शकतो.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** जो पर्यंत कोर्ट डिक्लीयर करणार नाही, तो पर्यंत तो निलंबित राहतील.

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर:—** होय, तो पर्यंत निलंबित ठेवू.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** ठिक आहे.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** म्हणजे शासनाच्या राजपत्रात नाव बदल करून एक व्यक्ती शासनाच्या वेगवेगळया विभागामध्ये काम करीत आहे आणि त्या बाबतीत सर्व कायदेशिर पुरावे शासनाकडे गेलेले आहेत. तरी सुध्दा निलंबन केले जात नाही. तर ही किती खेदाची गोष्ट आहे, मॅडम. त्या व्यक्तीचे निलंबन होऊ शकत नाही का, सर्व कागदपत्रे पुरावे असतांना सुध्दा.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** जरा एक मिनिट उप आयुक्त साहेबंना बोलवता का? यांची ऑर्डर महासभा संपण्यापुर्वी इथे आली पाहीजे की, निलंबित केले आहे, पेडींग राहीले नाही पाहीजे.

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर:—** आजच्या तारखेनुसार काढली जाईल.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** महासभा चालू आहे, आपण इथेच मागवून घ्या. आम्हांला पण माहीती झाले पाहीजे ना की, निलंबित केले आहे.

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर:—** आम्ही करणार आहेत, आजच्या तारखेमध्येच करू हे मी महासभेला आश्वासन देतो.

**महापालिका सचिव:—** प्रश्न क्र. २४ हा पण श्रीम. सुनिता बगाडे यांचा आहे.

**प्रश्न क्र.२४ :— १)** सैनिकी बॅरेक साठी शासना कडून तयार करण्यात आलेले सरकारी शौच्छालय व स्नानगृह पालिका प्रशासना कडे मा. प्रशासक उल्हासनगर यांनी हस्तांतरीत करून दयावी.

**अ)** उल्हासनगर कॅम्प नं. १ ते कॅम्प ५ मध्ये सरकारी छावणी साठी एकूण किती सरकारी शौच्छालय व स्नानगृहे तयार करण्यात आली होती? सदरची शौच्छालय व स्नानगृहे पालिका प्रशासना कडे हस्तांतरीत करण्या बाबत कधी आदेशित करण्यात आले आहे.

**ब)** विदयमान स्थिती मध्ये किती सरकारी शौच्छालय अस्तित्वात आहे. आणि किती सरकारी शौच्छाल यावर अतिक्रमण करण्यात आले आहे

**क)** मा. प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत यांचे कार्यालया कडून सरकारी शौच्छालय व स्नानगृहे हस्तांतरणा बाबतची कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास त्या ठिकाणी करण्यात आलेल्या अतिक्रमणा साठी जबाबदार कोण आहे?

**उत्तर :—** १) शासनाकडून पालिका प्रशासनाकडे शौचालय व स्नानगृह हस्तांतरीत केल्याबाबतच्या

कार्यवाही संदर्भातील माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही.तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाने सन २०१७ साली सार्वजनिक शौचालये मालमत्ता विभागात त्यावेळेस आस्तित्वात असलेल्या शौचालयांच्या यादीसह हस्तांतरीत केली आहेत. त्याचा तपशिल या कार्यालयाकडे उपलब्ध आहे.

अ) सदरहु माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही.

ब) सार्वजनिक आरोग्य विभागाने या विभागाकडे सादर केलेलया अहवालानुसार एकूण ३७८ सार्वजनिक शौचालये. आहेत. तथापी १४ सरकारी शौचालयाच्या जागी अतिक्रमण झाले असून ते हटविण्यासाठी संबंधित प्रभाग अधिकारी यांना आदेशित करण्यात आले आहे.

क) मा. प्रशासक, उल्हासनगर शहर वसाहत यांचे कार्यालयाकडून सरकारी शौचालय व सरकारी स्नानगृहे हस्तांतरणाबाबतची कार्यवाही पूर्ण झाली नाही तरीसुध्दा सदर ठिकाणी सरकारी शौचालय असल्याबाबतची माहिती प्राप्त झाल्यास व सदर ठिकाणी अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आणून दिल्यास सदर ठिकाणचे अतिक्रमण काढून टाकण्याची जबाबदारी महापालिकेची राहिल.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव, माझा प्रश्न असा आहे, सैनिकी बॅरेक साठी शासना कडून तयार करण्यात आलेले सरकारी शौच्छालय व स्नानगृह पालिका प्रशासना कडे मा. प्रशासक उल्हासनगर यांनी हस्तांतरीत करून दयावी. त्यामध्ये (अ) आहे. उल्हासनगर कॅम्प नं. १ ते कॅम्प ५ मध्ये सरकारी छावणी साठी एकूण किती सरकारी शौच्छालय व स्नानगृहे तयार करण्यात आली होती? सदरची शौच्छालय व स्नानगृहे पालिका प्रशासना कडे हस्तांतरीत करण्या बाबत कधी आदेशित करण्यात आले आहे. याच्यात उत्तर देणा—यांचे नाही नाही. उत्तर आहे, शासनाकडून पालिका प्रशासनाकडे शौचालय व स्नानगृह हस्तांतरीत केल्याबाबतच्या कार्यवाही संदर्भातील माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. बघा हा पण प्रश्न कधीचा आहे, दिनांक ६/६/२०१७ याची सुध्दा कार्यालयाकडे माहीती उपलब्ध नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, साहेब कोणी ऐकण्यासाठी तयार नाहीत, कोण ऐकत आहे?

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** माझ्या प्रश्नाचे उत्तर कोण देणार आहे?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** उत्तर कोण देणार? सिरीयसली घेत नाहीत.

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** मा. महापौर, उप महापौर, मा. आयुक्त साहेब, आणि सर्व सन्माननिय सदस्य, मा. सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे यांच्या प्रश्नांचे उत्तर पहीलेच दिले आहे, श्री. लेंगेरेकर साहेब, उप आयुक्त, मालमत्ता होते, त्यांच्या सहीने उत्तर दिलेले आहे.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** तुम्ही इथे काय सांगितले आहे की, कार्यवाही संदर्भातील माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. तथापी सार्वजनिक आरोग्य विभागाने सन २०१७ साली सार्वजनिक शौचालय मालमत्ता विभागात त्या वेळेस अस्तित्वात असलेल्या शौचालयांची यादीसह हस्तांतरीत केली आहेत. त्याचा तपशिल या कार्यालयाकडे उपलब्ध आहे. परंतु या कार्यालयाकडे ही माहीती उपलब्ध नाही शौचालय आणि स्नानगृहाची आणि खाली सांगितले की, याचा तपशिल दिलेला आहे.

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** मॅडम, मी तुम्हांला सांगू इच्छिते की, तुम्ही जो प्रश्न केला आहे, शासनाकडून तयार करण्यात आलेले शौचालय आणि स्नानगृह प्रशासक उल्हासनगर यांनी हस्तांतरीत केल्या बाबतची कार्यवाही. तर प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत यांनी तत्कालीन विविध प्रॉपटर्या आपल्याकडे हस्तांतरीत केल्या होत्या. पण त्याच्यामध्ये शौचालय व स्नानगृह आपल्याकडे हस्तांतरीत केले नव्हते. त्यामुळे तो तपशिल आपल्याकडे नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, यामध्ये जो उल्हासनगरमध्ये बॅरेकचे साईटस आहेत, शौचालय होते, जे मिलेटरी शासनाने बनवले होते, ते आज पर्यंत महापालिकेने आपल्या ताब्यात घेतले नाहीत का?

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** नाही, नाही, हॅन्ड ओवर केले नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मग त्याची जबाबदारी कोण सांभाळत आहेत?

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** सर ते मला माहीती नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** तर त्याच्यावर महापालिकेने काही वेळा कारवाई करून काही हजेरीशेड काही हॉल बनवले आहेत, ते कसे केले आहे? जर तुमच्या हातामध्ये नव्हते तर.

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** सर आपल्याला सार्वजनिक आरोग्य विभागाकडून याची यादी आपल्याला प्राप्त झालेली आहे, सध्या स्थितीत जे कार्यरत आपल्याकडे

शौचालय आहेत. त्यावर आपल्याकडे मागणी होते की, हे शौचालय मोडकळीस आले आहेत, तरी त्या ठिकाणी तुम्ही हजेरी शेड बांधा किंवा काय काय? त्याच्या नुसार आपण पुढची कारवाई करतो. पण उल्हासनगर शहर वसाहत, तत्कालीन प्रशासक यांनी कोणतीही यादी आपल्याकडे दिलेली, माझ्याकडे आढळून आलेली नाही, आमच्या विभागामध्ये.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** हे खरे आहे, का तुमच्याकडे नाही?

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** नाही सर.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** मग ही माहीती कोणाकडून मिळेल?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** तर मग ही माहीती कुठून मिळेल?

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** सर आपल्याकडे प्रशासक, उल्हासनगर शहर प्रांत अधिकारी यांच्याकडून माहीती मिळेल.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** प्रांत अधिकारी यांच्याकडून तुम्ही माहीती घ्या,

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** तपास चालू आहे, तुम्हांला माहीती मिळाली की, पाच वर्षा नंतर तुम्हांला दिली जाईल टेंशन कशाला घेतात?

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** मग ही माहीती, घ्यायची तर कोणाकडून घ्यायाची? कुठून घ्यायची?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** म्हणजे दुस—या वेळेस निवडून आल्या नंतर मिळेल का?

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, या पुर्वीच्या मिलेट्रीच्या ज्या बॅरेक होत्या, त्यांच्या बाजुचे जे शौचालय होते, त्याची यादी आपल्या मालमत्ता विभागाकडे बिलकुल नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मालमत्तेची यादी आहे, माझ्याकडे उपलब्ध आहे.

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** सर ती सार्वजनिक आरोग्य विभागाकडून आपल्याकडे आलेली आहे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** परंतु ही सर्व यादी तुमच्या सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये आहे आणि ही सर्व शौचालय आजच्या घडीला त्याच्या बाजुला असलेल्या बॅरेक, प्लॉटस तिथे ज्या डेव्हलेपमेंट झाल्या, त्या डेव्हलेपमेंटमध्ये सर्व ॲक्युपाईड झालेल्या आहेत, हे सर्व शौचालय, ब्लॉकला लागून असलेले शौचालय हे त्या कन्सलंट बिल्डरने ॲक्वयर केलेल्या आहेत. काही शौचालय समाज मंदिरे झालेली आहेत आणि काही शौचालय स्वतःच्या प्रॉपटर्या झालेल्या आहेत, असा हा एकंदरीत प्रकार आहे. परंतु आजच्या घडीला पुर्वी ते किती टॉयलेट होते? किती शौचालय होते? आणि आता किती उपलब्ध आहेत? याची तरी यादी पुन्हा सर्वे करून आपल्याला मिळाली पाहीजे. ती यादी जर मिळाली तर याच्या विषयी पुढे आपल्याला काही तरी करता येईल. येणा—या पुढच्या महासभे पर्यंत किंवा तुमच्या वेळनुसार ते सर्व्हे करून ती यादी तरी मागवा.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** त्याच्यातला (अ) आहे, उल्हासनगर कॅम्प १ ते ५ मध्ये सरकारी छावणीसाठी एकुण किती सरकारी शौचालय व स्नानगृह तयार करण्यात आली होती? सदरचे शौचालय व स्नानगृहे महापालिका प्रशासनाकडे हस्तांतरीत करण्या बाबत कधी आदेशित करण्यात आले आहे?

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** नाही मॅडम, मी पहील्या प्रश्नाचे म्हणटले ना, त्याच प्रमाणे उत्तर आहे. अशी शौचालय हस्तांतरीत केल्याची माहीती माझ्याकडे नाही, मालमत्ता विभागाकडे.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** ठिक आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** याचे नंतरच्या महासभेमध्ये किती आहे, कुठे काय काय आहे? आपण कितींची देखभाल करीत आहोत? आज पण आपले सफाई कर्मचारी साफसफाई करण्यासाठी जात आहेत. संपुर्ण माहीती महासभेमध्ये घेऊन या.

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** तशी माहीती माझ्याकडे आहे, ३७८ शौचालय आपल्याकडे आहेत.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** तर मग त्याची डिटेल तुम्ही दिलेली नाही.

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—** सर माझ्याकडे यादी आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** आम्हांला दिली नाही ना.

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—** सरआता देते मी.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** अहो, साहेब गरज तुम्हांला आहे, तुम्ही स्वतः जाऊन यादी घ्या, ते कशाला तुम्हांला यादी देणार. इथे कामाची पध्दत आहे, मी तुम्हांला सांगतो की, आता ते जे सांगत आहेत ना, मालमत्ता विभाग वेगळा आहे, तो अमेरीकेत आहे, इंग्लंड सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे डिटेल आहेत. परंतु मालमत्ता विभाग सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मागवतील आणि सार्वजनिक बांधाकम विभागाकडे पण डिटेल आहेत. हे तीन डिपार्टमेंट तीन देश आहेत, तुम्ही समजत नाहीत.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** लाईटचे बिल, पाणी पुरवठयाच्या ऑफिसमध्ये भरायला गेले.

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—** मॅडम मी तुम्हांला यादी उपलब्ध करून देते.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** तुम्ही डिटेल दया, सर्वांना माहीती व्हायला पाहीजे.

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—** ठिक आहे, सर्वांना देते.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—** मा. महापौर आपल्याला उत्तर मिळाले, परंतु प्रशासनाकडे सार्वजनिक शौचालयाची साधी यादी उपलब्ध नाही.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडेः—** पुढच्या महासभेमध्ये घ्या हा प्रश्न.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—** एक मिनिट, एक वर्षा पुर्वी आपण या सभागृहात सार्वजनिक शौचालय साफसफाई करण्यासाठी कॉन्ट्रॅक बेसिकवर देण्यासाठी आपण जवळ जवळ ६ कोटी रूपये मंजुर केलेले आहेत. मग आपण सार्वजनिक शौचालय साफसफाई करतो मग ते ६ कोटी रूपये कोणाला देतो? मग सार्वजनिक शौचालयाची यादी हवीच ना. आपण रंगरंगोटी करतो, त्याची दुरूस्ती करतो, हे आपण करतो, महानगरपालिका करते ना, मग ती यादी आपल्याकडे हवी. आपण स्पष्ट सांगणार आमच्याकडे यादी नाही, हे चुकीचे आहे. हे प्रशासनासाठी योग्य नाही असे मला वाटते. तर आपल्याकडे ती यादी असायलाच पाहीजे आणि पुढच्या सभेत तुमच्याकडून यादी सादर व्हायला पाहीजे. जर आपण ६ कोटी रूपये मंजूर केले आहेत, साफसफाई आणि देखभाल करण्यासाठी, त्यांच्या दुरूस्तीसाठी आपण मंजूर केलेले आहेत. तर ती यादी आपल्याकडे असायला पाहीजे, नसेल असे उत्तर चालणार नाही. यादी नसेल तर तो ठेका रद्द करा. ते ६ कोटी रूपये आपण साफसफाईसाठी, देखभाल दुरूस्तीसाठी दिलेले आहेत ना, तो ठेका रदद करा. तुमच्या यादी प्रमाणे ठेकेदार साफसफाई करणार आहे, मग ते टॉयलेट गेले कुठे? ६ कोटी रूपये कोण घेते, ठेकेदार कोण आहे तो? २२ कोटी वरून सहा कोटी झाले, त्याच्यावर कारवाई करा. तो ठेकेदार कोण आहे? त्याला बोलवा इथे. २४ कोटी...

या वेळी सदस्य, श्री.मिलींद बागुल यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुलः—** शांत रहा, त्यांना बोलू दया, जरा ऐकू दया, काय बोलतात ते? दोन मिनीट शांत रहा.

**प्र.मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—** सन्माननिय सदस्यांना मी सांगू इच्छिते की, आपण जो ठेका म्हणतात, तो ठेका सार्वजनिक आरोग्य विभागाकडून काढले गेले आहे, मालमत्ता विभागाकडून नाही.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—** पण तुमच्याकडे, मालमत्ता विभागाकडे लिस्ट पाहीजे ना, असे कसे काय बोलतात?

**प्र.मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—** आमच्याकडे ती यादी आहे सर. मॅडमनी जेव्हा प्रश्न विचारला तेव्हा मी उत्तरात म्हणटले आहे की, ती यादी आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे आणि ती यादी मी त्यांना दाखवण्यासाठी सोबत आणली सुध्दा आहे.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—** मी सांगतो, भारत राजवानी यांनी पण सांगितले की, ब—याच शौचालयांवर अतिक्रमण झाले आहे, माझ्या घराच्यामागे सुध्दा अतिक्रमाण झालेले आहे. मी ज्या

एरियामध्ये राहतो, माझे स्वत:चे घरामध्ये एक बाथरूम आहे, तुमच्या माहीतीसाठी सांगतो, आता मगाशी विषय काढला ते बाथरूम माझ्या मालकिचे आहे, माझ्याकडे त्याची सनद आहे आणि त्याच्या पाठीमागे जो संडास आहे, त्याच्यावर अतिक्रमण झाले आहे. आपण चौकशी करा, त्याच्यावर कारवाई करू शकतात. पण तुम्हांला चौकशी करायचीच नाही आणि कारवाई सुध्दा करायची नाही. “तेरी भी चुप,मेरी भी चुप” अशा प्रकारचे इश्यु चालू आहे या ठिकाणी, मी सांगतो माझ्या घराच्या मागच्या शौचालयाची चौकशी करा बॅरेक नंबर, बॉथरूम १३३८ त्याच्या पाठीमागे सार्वजनिक संडास होते. त्याचे अतिक्रमण झाले आहे, अशा प्रकारची यादी आपल्याकडे असली पाहीजे आणि यादी नाही असे सांगू शकत नाही. त्या मालमत्तेची यादी तुमच्याकडे पाहीजे, जर तुमच्याकडे ती यादी नसेल, तर मी तुम्हांला सांगतो आताच्या आता जे २४ कोटी रूपये ठेकेदाराला दिलेले आहेत, तो ठराव रद्द करा, आपण रदद करू शकतो.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, माझ्या पॅनलमध्ये बॅरेक नंबर १५५८ मध्ये एक शौचालये होते, ते तोडून महापालिकेचा एक कर्मचारी यांनी तोडून तिथे रूम बनवले आहे. लास्ट टाईम मी जेव्हा कंम्पलेट केली, तेव्हा श्री. गणेश शिंपी आणि देहेरकर साहेब आले आणि त्यांनी सिल केले. असे उल्हासनगरमध्ये भरपूर शौचालय तोडून कब्जा केलेले आहेत, त्यांची मालकी महापालिकेची आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** श्री. गणेश शिंपीचे सत्कार करा, गणेश शिंपीचा सत्कार करायला पाहीजे ना.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** होय, बुके मागवून घेतो.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** मांगवून घ्या.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** महापालिकेचे जेवढे पण शासकिय भुखंड आहेत, ते सर्व ताब्यात घेतले पाहीजे आणि त्यांच्यावर जेवढे अतिक्रमण झाले आहे, ते पण काढले पाहीजे. यासाठी कोण उत्तर देणार आहे?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, हा विषयच असा आहे, मला तर वाटते मोदी साहेबांनी स्वच्छ भारत अभियान आता चालू केले आहे. पण आमच्या उल्हासनगरमध्ये माझ्या आठवणीनुसार सन १९७८—७९ पासूनच स्वच्छ भारत अभियान चालू आहे. शौचालय काढून टाकायची घरे बांधायची, बिल्डींगी बांधायच्या, त्यामुळे स्वच्छ भारत अभियानाचा हा विषय हा खरच उल्हासनगरला लागू होतो आणि मोदी साहेबांना उल्हासनगरमध्ये येऊन गेल्या नंतर कळले की स्वच्छ भारत अभियान कशा पध्दतीने करतात आणि त्याच पध्दतीने स्वच्छ भारत अभियानाचा काम चालू आहे, धन्यवाद.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** मा. महापौरजी, म्हणजे सार्वजनिक वापराचे भुखंड व सरकारी मिळकती मा. प्रशासक यांनी पालिका प्रशासनास हस्तांतरीत केले आहेत. सैनिक बॅरेक मधील सार्वजनिक शौचालय हस्तांतरीत करून घेतलेले आहेत व त्यावर अतिक्रमणे झाली नसतील मुददा क्र. ब मध्ये लिहीले आहे, तुम्ही सार्वजनिक आरोग्य विभागाचे एकुण ३७८ सार्वजनिक शौचालय आहेत, त्या पैकी १४ सार्वजनिक शौचालयावर अतिक्रमणे झाली आहेत. हे सुध्दा तुम्ही दिले आहे की, १४ जाग्यांवर अतिक्रमणे झाले आहेत. तर मा. महापौरजी १४ सार्वजनिक शौचालयावर अतिक्रमणे झालेली आहेत, याची प्रभाग समिती निहाय यादी प्रशानाकडे आहे का?

**प्र.मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** होय, आहे माझ्याकडे यादी आणि ती कारवाई पण तत्कालीन आयुक्त, शिंदे साहेबांनी आदेश काढले होते, प्रभाग अधिका—यांना सदर शौचालयांचे अतिक्रमण हटविण्यात यावे म्हणून.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** ठिक आहे, तर १४ पैकी किती हटवले?

**प्र.मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** प्रभाग अधिका—यांकडून अहवाल माझ्या विभागाकडे प्राप्त झालेला नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** तर अहवाल मागवून पुढच्या महासभे समोर ठेवा, आणिसाहेब आमच्या इथे जो सिल केला आहे, तो तसाच का ठेवला आहे, त्याचा उपयोग व्हायला पाहीजे, तो आज पर्यंत सिल का ठेवला आहे, त्याचा जरा खुलासा करा.

**सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे:—** १४ पैकी किती हटवण्यात आले आहेत?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** बॅरेक नंबर १८५५ मध्ये वार्ड ऑफिसर श्री. गणेश शिंपी यांनी सिल केला होता, तो अजून पर्यंत सिल केलेला आहे आणि त्यामध्ये त्याचे सामान तसेच पडलेले आहे. तर ते रिकामे करून कमीत कमी आपल्या उपयोगात तर आणले पाहीजे. त्याला हजेरी शेड बनवा किंवा काय? आपले लेबर लोक इकडे तिकडे भटकत असतात.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** आता जो शौचालयाच्या संदर्भामध्ये जो विषय सुरू झालेला आहे, या उल्हासनगरमधले जे बॅरेकमधले शौचालय होते, त्या बॅरकमधले शौचालय फॉर्मली आपल्याकडे, म्हणजे महापालिकेकडे किंवा त्या वेळच्या नगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्याचे कागदपत्र आपल्याकडे नाहीत, तसे काही झालेले दिसत नाही. उल्हासनगरमधल्या अशा अनेक रिझर्व्हेवेशन प्रॉपर्टी किंवा सरकारी प्रॉपर्टी ज्या आहेत, त्या आपल्याकडे हस्तांतरीत करायच्या अजून बाकी आहेत. शौचालयाची बाब पण तशीच आहे. त्याच्यामुळे प्रश्नाच्या पहील्या भागामध्ये त्यांनी जे सांगितले होते की, आमच्याकडे तशी माहीती उपलब्ध नाही, म्हणजे हस्तांतरीत ऑफिशली झाले आहेत किंवा नाहीत, याच्या बददल कुठल्याही ताबा पावत्या उपलब्ध नाहीत. परंतु स्थानिक नागरीक या शौचालयांचा वापर करीत असल्यामुळे आणि स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार या शौचालयांची दुरूस्ती, रिपेयर याच्या संदर्भातल्या तक्रारी येत असल्यामुळे त्या वेळच्या नगरपालिके पासून या सगळया शौचालयांची दुरूस्ती, देखभाल, नुतनीकरण वैगेरे हे सगळे महापालिकेकडून केले जाते. महापालिकेने शौचालयांचा सर्व्हे केलेला आहे, आपल्या ताब्यामध्ये मेन्टेन्समध्ये किती आहेत? असे ३७८ शौचालय उपलब्ध आहेत, त्यांची यादी त्यांच्याकडे उपलब्ध आहे, ती यादी आपल्याला पाहीजे तेव्हा उपलब्ध करून देता येईल. यादी आपल्याकडे आहे, सध्या मेंटेनन्स किती शौचालय आहेत त्याची? आता राहीला प्रश्न शौचालयाच्या जागेवर अतिक्रमणे होण्याच्या ज्या तक्रारी आहेत, त्या तक्रारींची आपण वेळोवेळी दखल घेतो, जे शौचालय सिल करून ठेवले आहे, त्याच्या संदर्भात पुढे काय करायचे तो निर्णय आम्ही लवकरात लवकर घेऊ. आम्ही त्याची माहीती मागवतो, परंतु जी परिस्थिती शौचालयाची आहे, तीच महानगरपालिकेच्या इतरही प्रॉपर्टीची आहे. महानगरपालिकेचे ग्राऊंड, गार्डन, मैदाने यांची आहेत. जुना रेकॉर्ड जर आपण बघितले तर जवळ जवळ १७८, १७९ प्रॉपर्टी ज्या आहेत, त्या तत्कालीन सर्व्हेअर आणि आपले जुनियर इंजिनियर यांनी ताब्यात घेतल्या बददलचे आपल्याकडे एक पोच पावती आहे. १७८, १७९ ज्या प्रॉपर्टी आहेत, त्या महापालिकेला हस्तांतरीत केल्या आहेत. पण परंतु महापालिकेचे त्याला नाव लावायला पाहीजे, ती प्रक्रिया आता पर्यंत पुर्ण झालेली नाही. परंतु ज्या ज्या वेळेला नविन काम करण्याचा ज्या वेळेस प्रश्न येतो, उदाहरणार्थ मध्यतंरीच्या काळामध्ये बोट क्लब, व्हि.टी.सी. ग्राउंड किंवा इंदिरा गांधी मार्केटच्या संदर्भातील जो विकासाचा आपण जो मुददा उपस्थित केला होता, तेव्हा प्रत्येक वेळेला हा मुददा उपस्थिती झाला की, ही प्रॉपर्टी महानगरपालिकेची आहे का? महानगरपालिकेचे प्रॉपर्टीला नाव लागले आहे की, नाही. म्हणून ते प्रकल्प जे आहेत ते पुढे गेलेले नाहीत. म्हणून आता आम्ही काय केले आहे की, प्रांत अधिकारी यांच्या बरोबर मिटींग घेऊन त्यांना आम्ही सांगितले की, हया ज्या प्रॉपर्टी आहेत, त्यांचा परत एकदा रीसर्व्हे करून आमच्या ताब्यामध्ये या प्रॉपर्टी दया, त्यांचा रेकॉर्ड जो आहे, तो आमच्या नावावर करून दया. शौचालयाचे सुध्दा आपल्याला तसे ड्राईव्ह घेता येईल, शोचालयाची त्यांना एक लिस्ट प्रॉव्हाईड करू आणि त्यांना सांगू हे सगळे जे शौचालय आहेत, त्या जागा तुम्ही आमच्याकडे हस्तांतरीत करा. परंतु शौचालय नागरीक वापरत असतांना त्यांचे मेंटनन्स वैगेरे लोक प्रतिनिधी आपल्याकडे येत असतात, सांगत असतात त्या पध्दतीने महापालिका त्याचे मेन्टेन करते. त्याच्यामुळे ही परिस्थिती अशी निर्माण होते की, नाव आपले नाही, जागा आपली नाही. आपण जर असे म्हणटले की, आपल्या नावावर नाही, मग पुढच्या वेळेस आपण लोकांना कसे म्हणणार की, यांनी अनाधिकृत कब्जा केला? हे सगळे प्रश्न त्या ठिकाणी आहेत. त्यामुळे जो पर्यंत याचे रेकॉर्ड तयार होत नाही, तो पर्यंत याच्यावर फायनल असे क्लीयरकट सोलूशन निघणार नाही. ज्या प्रॉपटर्या सध्या आपल्या पजेशनमध्ये आहेत, त्या आपण पजेशन जे आहे, ते असेच कन्टीन्यु ठेवतो. आपल्याला जर त्या शौचालयाची गरज नसेल तर त्याचा अल्ट्र नेटीव्ह उपयोग इतर कामासाठी हजेरी शेड म्हणा किंवा समाज मंदिर म्हणा किंवा इतर कुठल्याही कामासाठी आपण त्याचा वापर करतो.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मा. आयुक्त साहेब, त्या शौचालयावर कर्मचा—याने लाईट, मिटर घेतली आहे, टॅक्स पावती पण बनवली आहे. मालकी बघून सार्वजनिक बांधकाम विभागाने हजेरी शेड लिहून दिले आहे की, हजेरी शेडचे एस्टीमेट पास करून बनवले आहे. तर त्याचे पुढच्या महासभेमध्ये विषय ठेवा आणि लाईट व मिटर या सर्व गोष्टी हटवल्या पाहीजेत, टॅक्स पावती कॅन्सल झाली पाहीजे. बाकी जे पण यांनी मागितले आहे, ते पुढच्या महासभेमध्ये सर्व यायला पाहीजे.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—** मा. महापौर, मा. आयुक्त, आपण आता माहीती दिली ती सार्वजनिक शौचालय महापालिकेचे काही तरी तुम्ही ३५० असा आकडा सांगितले आहे, ३७८ आकडा

सांगितला आहे. मी तुम्हांला एक आणखी महत्वाची माहीती सांगतो आणि मी सन १९८६ साली महानगरपालिकेत सभासद होतो, त्यावेळी या नगरपालिकेकडे संपुर्ण शहरात ६ हजार संडास होते, आकडा लक्षात घ्या. नाही नाही सिट नाही, ६ हजार संडास होते प्रत्येक बॅरेकच्या मागे एक संडास आणि ते संडास दोन प्रकारचे होते, मिलेटरीचे संडास आणि त्या नंतर आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर काही बांधलेले संडास, असे एकुण ६ हजार संडास होते माझी या सभागृहाला विनंती आहे की, असे जर संडास हडप झाले असतील, त्या जागा हडप झाल्या असतील तर कारवाई कोणावर करणार? आता ज्या प्रभागात जे प्रभाग अधिकारी आहेत, त्याच्याकडे चौकशी करा. अमुक ठिकाणी संडास कुठे आहे? अमुक ठिकाणी बाथरूम कुठे आहे? आणि जर हडप झाले असेल तर त्या प्रभाग अधिका—यावर कारवाई झाली पाहीजे. संबंधित नगरसेवकाची पण चौकशी व्हायला पाहीजे, ही माझी एक नम्र विनंती आपल्याकडे आहे. ६ हजार उल्हासनगर शहरामध्ये होते आणि आता ३७८ आम्हांला सांगतात, ही दुदैवाची बाब आहे. मला फार वाईट वाटते, या बाबतीत. या नगरपालिकेला, १९६५ साली नगरपालिका स्थापन झाली आणि सन १९६५ नंतर अजून पर्यंत जवळ जवळ ५०, ६० वर्ष नंतर सुध्दा या नगरपालिकेने सार्वजनिक संडास प्रांत अधिका—यांकडूल हस्तांतरीत केलेले नाहीत, आपले प्रशासन काय करीत आहेत? आयुक्त साहेब, आपण या गोष्टीवर लक्ष दया. अजूनही आपल्याकडे संडास ताब्यात नसतील. असेच प्रकार इतर भुमीवर सुध्दा आहेत. या उल्हासनगर शहरामध्ये १ ते ५ कॅम्पामध्ये जवळ जवळ चार स्मशानभुमी आहेत, नगरपालिकेच्या कालावधीची एकही स्मशानभुमी नाही, हे शहराचे दुदैव आहे, याकडे सुध्दा आपण लक्ष दयायला पाहीजे. त्याच प्रमाणे आता नगरपालिकेमध्ये आता पर्यंत लक्षवेधी टाकलेली आहे. या नगरपालिकेकडे हॉस्पीटल सुध्दा आपल्या ताब्यात नाहीत. आयुक्त साहेब आपण या गोष्टींवर लक्ष दया. सार्वजनिक शौचालयाची गोष्ट तीच आहे आणि हॉस्पिटल आपल्या ताब्यात नाहीत. जेणेकरून आपल्या प्रत्येक गरीब व्यक्तीवर, एक तर सरकारी हॉस्पीटलच्या भरवशावर रहावे लागते किंवा प्राथमिक हॉस्पीटलवर व खाजगी हॉस्पीटलवर अवलंबून राहावे लागते. तर आपल्या महापालिकेचे एक चांगले सुसज्ज हॉस्पिटल व्हावे, त्याचा सुध्दा आपल्याला विचार करायला पाहीजे. महाशय आपण विषय भलतीकडेच नेतो, मला कल्पना आहे, मी विषय भलतीकडेच नेत आहेत, परंतु चौधरी साहेबांनी तो विषय मांडला. माझ्या माहीती प्रमाणे नगरपालिकेकडे ६ हजार संडास होते, फक्त ३७८ बांधलेले आहेत, बाकीचे गायब झालेले आहेत. त्यासाठी प्रभाग अधिका—यांवर कारवाई व्हायला पाहीजे आणि संबंधित नगरसेवकाची चौकशी व्हायला पाहीजे, अशी माझी नम्र विनंती आहे, धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** मा.महापौरजी, उप महापौर, आयुक्त साहेब, मी फक्त सभागृहाला विनंती करतो की, आपण सांगितले की ३७८ जे शौचालय वाचले आहेत, जे शौचालय रिकामे आहेत, त्यांचा वापर होत नाही, तिथे एक कंपाउड वॉल किंवा समाज मंदिर प्रस्तावीत करू शकतो. तर माझी सभागृहाच्या माध्यमातून आयुक्त साहेबांना विनंती आहे की, जे पण नगरसेवक जे शौचालय तुटलेले आहेत, तिथे ग्रॅविंग लॅन्ड, ग्रॅविग झाले नाही पाहीजे किंवा कोणी हडप करणार नाहीत, त्यासाठी असे प्रस्ताव आयुक्त साहेब पास करतील की, तिथे कंपाउंड वॉल टाकण्यात यावे, महापालिकेचे बोर्ड लावण्यात यावे आणि जर नगरसेवकांना तिथे समाज मंदिर बनवायचे असेल तर समाज मंदिराचे प्रस्ताव आयुक्त साहेबांना देण्यात यावे आणि ते मान्य करण्यात यावे आणि जो २४ करोडचा टेंडर स्थायी समितीने पास केले आहे, स्थायी समितीचे जे मेंबर आहेत, त्यांना हे माहीती नाही आणि लॅटरीन बिलकुल बरोबर नाही, २४ करोडचा टेंडर कॅन्सल करून त्याच्या बदल्यात संडास व बाथरूम जे वाचले आहेत, त्यांना बनवण्यात यावेत आणि जे तुटले आहेत, तिथे समाज मंदिर बनवण्यात यावेत आणि कंपाउंड टाकण्यात यावे, धन्यवाद.

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडेः—** मा. सचिव मॅडम, या प्रश्नाचे उत्तर मला पुढच्या महासभेमध्ये सविस्तर माहीती आणि यादीसह देण्यात यावे.

**महापालिका सचिवः—** ठिक आहे, हा प्रश्न प्रलंबित ठेवण्यात येत आहे, पश्नोत्तराचा तास संपला आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** आयुक्त साहेब, प्रश्नोत्तराचा तास संपला आहे, पण जे उत्तर आले की, आमच्याकडे माहीती नाही, हे प्रशासनाच्या दृष्टीने चुकीचे आहे. पहीली गोष्ट मालमत्ता विभाग, मगाशी सुर्वे साहेबांनी सांगितले की, आरोग्य विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा एकत्रित मिळून, प्लॉट आपल्याकडे आहे. उल्हासनगरमध्ये साधारणतः दोन हजारांच्यावर बॅरेक्स आहेत. म्हणजे माझ्या वार्डमध्ये, माझा वार्ड शेवटची जिथे शेवटची बॉन्ड्री आहे, तिथे १६२५ लास्ट, तिथून पुढे पाच नंबर येते म्हणजे दोन ते अडीच हजारांच्यामध्ये असणार आहेत आणि ब्लॉक, म्हणजे प्रत्येक बॅरेकच्या बाजुला एक शुलभ शौचालय होतेच. मग साधारणतः अडीच हजाराच्या आसपास शौचालय पकडले, ६ हजार म्हणजे त्यांची एक चुकी असेल आपण एक अंदाज लावा.

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—</u>** मी सांगतो, मला खात्री आहे की, ६ हजार शौचालय होते, सिट नाही संडास.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** त्यातले मला सांगायचे आहे की, आपल्याकडे माहीती उपलब्ध नाही ही बाब, मग त्यातले स्थायी समितीमध्ये प्रस्ताव आले. डीमॉलिश करून काही ठिकाणी गार्डन बनवले, काही ठिकाणी समाज मंदिर उभारण्यात आले, काही ठिकाणी शौचालय होते, ते एम.एम. आर.डी.ए. चे शौचालय झाले आणि मग किती शौचालय अतिक्रमण झाले याची माहीती आपल्याकडे पाहीजे? ती माहीती आहे आपल्याकडे फक्त ती गोळा करणे आवश्यक होते. बगाडे मॅडमचा प्रश्न जर त्या संबंधित असेल तर अगोदर प्रशासनाने संपुर्ण या तीन्ही विभागाने, एकटया मालमत्ताने नाही, मालमत्ताकडे जी माहीती असेल ती मालमत्ता देईल. पण एकत्रित महापालिका म्हणून इथे कार्यरत झाली पाहीजे. एखादा प्रश्न असुदया पण सरळ महासभेमध्ये डाटा नाही, माहीती नाही, हे उत्तर बरोबर नाही, त्यामुळे याची काळजी पुढे घ्या आणि जे भरत गंगोत्री यांनी इथे सांगितले जे शौचालय आपले आहे, ते कोणी अतिक्रमणे केले होते, आता ते ताब्यात घेतले आहे, आता ते सार्वजनिक वापरासाठी लवकर करा विषय संपला.

**<u>महापालिका सचिव:—</u>** एक लक्षवेधी आलेली आहे....

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—</u>** माझी छोटीशी सुचना आहे, अर्धा मिनीट, फक्त एक सेंकद समाज मंदिर जे आहेत, उल्हासनगरमध्ये ते समाज मंदिर ब—याच चाव्या त्या नगरसेवकांकडे असतात. जे नगरसेवक सध्या अस्त्विात नाहीत, माजी नगरसेवक झालेत, त्यांच्याकडे समाज मंदिराच्या चाव्या असतात. मला वाटते त्यासाठी एक नियमावली तयार करा. समाज मंदिराची एक नियमावली तयार करा व त्या चाव्या कुणाकडे असतील, माझ्या प्रभागामध्ये माजी नगरसेवक यांच्याकडे समाज मंदिराची चावी अजून सुध्दा आहे. एक नियमावली तयार करा, धन्यवाद.

**<u>महापालिका सचिव:—</u>** कृपया प्रश्नोंत्तराचा तास संपला आहे, लक्षवेधी आल्या आहेत, लक्षवेधी स्विकारल्या नंतर ....

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** मॅडमजी, महापौरांनी सांगितले आहे की, प्रश्नोत्तराचा तास संपल्या नंतर मला परवानगी दिली होती.

**<u>महापालिका सचिव:—</u>** फक्त दोन लक्षवेधी स्विकाराच्या आहेत, त्यां नंतर बोला.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** ठिक आहे.

**<u>महापालिका सचिव:—</u>** ७ लक्षवेधी आल्या आहेत, पहीली लक्षवेधी आहे, सुचकाचे नाव श्री. सुमित सोनकांबळे अनुमोदकाचे श्री. सुनिल सुर्वे प्रभाग १३ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्नाकृती पुतळा बसवण्याचा लक्षवेधी सुचना, दुसरी लक्षवेधी सुचना आहे, सुचकाचे नाव आहे, श्री. सुनिल सुर्वे आणि अनुमोदकाचे नाव, श्री. सुरेंद्र सावंत प्रभाग क्र. १३ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा व शिवाजी चौक उल्हासनगर —३ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्नाकृती पुतळा बसवण्याची लक्षवेधी सुचना आहे. लक्षवेधी सुचना क्र. ३ सुचकाचे नाव आहे, श्रीमती ज्योती माने अनुमोदकाचे नाव आहे, श्री. सुमित सोनकांबळे शहरातील हॉटेल्स, फास्ट—फुड सेंटर, चायनिज सेंटर, चहाची टपरी इत्यादी ठिकाणी अग्नि सुरक्षा यंत्रणा बसवणे बाबत. चौथी सुचना आहे, सुचकाचे नाव, श्री. सतरामदास जेसवानी वर्ष २०१७ च्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या निवडणूकीमध्ये नविन, जुने नगरसेवकांनी शहराच्या हितासाठी नगरसेकांनी काही प्रस्ताव आणले, मान्यता मिळाली, महापौरांनी आदेश दिले, महासभेमध्ये मान्याता मिळाली जास्त प्रस्तावांवर फक्त प्रशासनाकडून अंमलबजावणी न केल्यामुळे जनता, नगरसेवक त्रस्त झाले आहेत, या बाबतची लक्षवेधी सुचना आहे. लक्षवेधी सुचना क्र. ५ सुचकाचे नाव आहे, श्रीमती कविता बागुल आणि अनुमोदक आहेत, श्रीम. अंजली साळवे, तत्कालीन नगररचनाकार, श्री. संजु नारायण करपे हे रजेवर गेलेले असतांना त्यांच्या नावावर बनावट केलेल्या स्वाक्षरीचे तज्ञाकडून तपासणी होणे बाबत. सहावी लक्षवेधी सुचना आहे, सुचकाचे नाव आहे, श्री. मनोज सयानी, अनुमोदकाचे नाव आहे, श्री. प्रदिप रामचंदानी उल्हासनगर महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागात अधिका—याच्या कामाच्या दिरंगाईमुळे लोकप्रतिनिधींच्या कामात विलंब होत आहे, या बाबतची लक्षवेधी सुचना. लक्षवेधी सुचना क्र. ७ आहे, सुचकाचे नाव श्री. सुनिल सुर्वे, अनुमोदकाचे नाव आहे, श्री. किशोर वनवारी शहरातील रस्ता रूंदी करणात बाधित होणा—या बांधकाम धारकांकरीता बांधकामाचे धोरण निश्चित करण्याबाबत लक्षवेधी सुचना. आठवी आहे, श्री. राजेंद्र चौधरी व अनुमोदक आहेत, श्रीमती सुरेखा आव्हाड, ही नागरी आरोग्य केंद्राची बाबतची लक्षवेधी सुचना आहे. मा. महापौरांनी या पैकी दोन लक्षवेधी सुचना स्विकारल्या आहेत, पहीली लक्षवेधी आहे, श्री. मनोज सयानी व श्री. प्रदिप रामचंदानी दुसरी लक्षवेधी श्री. राजेंद्र चौधरी यांची स्विकारली आहे.

**<u>सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—</u>** मा. महापौर, उप महापौर, सर्वात पहीले मी या सभागृहाचा निषेध करतो की, एवढे मोठे महापुरूष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्यांनी भारताची राज्य घटना लिहीली. दोन वेळा त्यांच्या लक्षवधी या फेटाळण्यात आल्या याचे कारण मला या महासभेत कळायाला पाहीजे. या सभागृहामध्ये जेवढे नगरसेवक बसलेले आहेत, ते परमपुज्य डॉ. बाबासाहेबांची देणगी आहे, हे सर्व प्रथम ही गोष्ट आहे. एवढया मोठया महापुरूषांनी घटना लिहीली आहे, त्या महापुरूषाचा विषय जर या महासभेत होत नसेल याचा मी निषेध करतो, जो पर्यंत हा विषय या महासभेत होत नाही....

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** महापौरजी मोठे दुदैव आहे, एवढे वाईट वाटते की...

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** सन्माननिय सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा पुतळा खुपच महत्वपुर्ण आहे, तुम्ही हा विषय ठरावाच्या माध्यमातून आणा, आम्ही ते पास करू.

**<u>सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—</u>** पण असे का करू शकत नाहीत? तुम्ही दोन वेळा लक्षवेधी...

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मा. महापौरांनी जे सांगितले की, हा विषय प्रस्तावाच्या माध्यमातून आणा, आम्ही ठराव आम्ही करू, लक्षवेधी नाही, हा विषय अशासकीय प्रस्तावाच्या माध्यमातून घेऊन या.

**<u>सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—</u>** ठिक आहे, पुढच्या महासभेमध्ये मी प्रस्ताव आणतो,

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** मा. महापौरजी, दुसरी एक लक्षवेधी तशीच जरूरी मी आणली होती, आपण स्विकारली नाही ठिक आहे, परंतु त्या विषयावर चर्चा होणे गरजेचे आहे. मा. महापौरजी, आयुक्त साहेब, काय आहे? आपण जो रस्ता रूंदीकरण करीत आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** रस्ता रूंदीकरणाचा ऑल रेडी ठराव झालेला आहे, कल्याण—अंबरनाथ रोडचा तो सगळयांना लागू होत आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** लागू झाला आहे, परंतु त्याच्या नंतरही अधिकारी लोक काम करून देत नाहीत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** करून देतील ना का नाही?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** छत्रपती शिवाजी महाराजाच्या संदर्भात बाडारे साहेबांनी ठराव मांडला होता,

**<u>सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—</u>** तो पण सुर्वे साहेबांनीच मांडला होता, साहेब मी आणि सुर्वे साहेबांनी मिळून परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज...

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** महापौरजी, मी तुम्हांला मगाशी, मला वाटते की, ते कर्तव्यदक्ष अधिकारी श्री. गवारी ते समोर जर आले तर साहेब ते दादागिरी करतात, नोटीस देतात काय आहे?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** मा. महापौरजी, लक्षवेधी स्विकार केली नाही, तर कोणती चर्चा चालू आहे, कोणत्या नियमानुसार चर्चा केली जात आहे, माझी महासभेला विनंती आहे की....

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** राजेशची इज्जत वेगळी गोष्ट आहे, तुम्हीच मध्येच बोलतात, आम्ही लोक मध्येच बोलत नाहीत. मी साहेबांना जाऊन सांगितले आहे, आजूबाजूची सर्व दुकाने बंद आहेत आणि आपल्या शहराच्या माजी महापौर सन २०१० मध्ये, कर्तव्यदक्ष अधिका—याला जरा समोर तर बोलवा. दोन मिनीट बोलवा ना किती कर्तव्यदक्ष आहे, समोर तर बोलवा. मला त्यांना बघायचे आहे, दर्शन दुर्लभ झाले आहे, प्रभाग अधिकारी झाल्या नंतर खुपच जास्त दुर्लभ झाले आहेत. मा. गवारी साहेब, सांगा जरा हे आजूबाजूवाले जी बांधकामे चालू आहेत, ते तुमचे बाप लागतात का? अनपार्लमेंटली भाषा वापरत आहेत. डिमांड काय आहे? समोर तर सांगा त्यांची डिमांड काय आहे? किती पैसे पाहीजेत, काय पाहीजे? जरा समोरासमोर मागणी तर करा. बोलवा त्यांना बाजूबाजूने आंधळे आहेत, आपण बघा महापौरजी.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य, श्री. सुनिल सुर्वेजीनी जो विषय उपस्थित केला आहे, याच महासभेमध्ये मी मा. आयुक्तांना धन्यवाद देतो की, ते आल्या नंतर जो कल्याण अंबरनाथ रोडचे काम थांबले होते, त्यांनी लगबग पुर्ण केली आहे आणि आज सुर्वेजी यांनी जो विषय उपस्थित केला आहे, ही गोष्ट खुप दु:खद आहे. रोड कटींगचा एकाचे काम चालू आहे आणि दुस—याचे थांबवले आहे, तिस—याचे चालू आहे, चौथ्याचे थांबवले आहे, हे खुपच निंदनिय आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** साहेब, तिथेच ज्यांचे कटींग झाले नाही, त्याचे काम चालू आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** या महासभेमध्ये अशा अधिका—याची घोर निंदा करतो की, अशा प्रकारचा अधिकारी....

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** नाही, नाही कारवाई करा साहेब, हे चुक आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** जर रोड कटींमध्ये सर्वांची कामे चालू आहेत....

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** मी खाली बसणार आहे, जो पर्यंत, मी त्या गोष्टीला मान्यच करणार नाही. आहो दुस—यांना करून देतात आणि तीस—याला करून देत नाहीत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** रोड वायडिंगमध्ये याच महासभेमध्ये काही वेळा ठराव झाले आहेत. रोड वायडींगमध्ये ज्याचे दुकान, घर जाईल ते रिपेयर करू शकतात, बांधू शकतात. त्यासाठी मा. महापौरजी आपण हा विषय गंभीरतने घ्या, मा. आयुक्तजी, आपली चांगल्या प्रकारे जी कार्य चालली आहेत, तुम्ही सर्व प्रभाग अधिका—यांना बोलावून एक वेळा वारनिंग दया, जी कामे अनाधिकृतपणे चालली आहत, ती बंद झाली पाहीजेत. परंतु जे रोड वायडिंगमध्ये आपल्याला सहयोग करीत आहेत, शहराला बनवण्यासाठी सहयोग करीत आहेत, त्या लोकांची जी कामे थांबली आहेत, ती कामे थांबायला नाही पाहीजेत, धन्यवाद महापौरजी लक्षवेधी सुरू करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** आता गवारी आलेत तर विचारा त्यांना, असे का शोधून शोधून का त्यांना त्रास होत आहे. रोड वायडींगला गेले आहेत ते माहीत आहे, आजूबाजूला बांधकामे झालेली आहेत, म्हणजे मनात येईल त्यांचे चालू ठेवायचे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** उत्तर दया, कर्तव्यनिष्ठ अधिकारी, कर्तव्यदक्ष अधिकारी जरा या, आम्हांला सांगा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** कार्य सुरू करा.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** जमनुजी मी महापौरांकडून आदेश घेतले आहे, धन्यवाद महापौरजी आपण माझी विनंती स्विकार केली. आपले ७८ नगरसेवक व पाच स्विकृत नगरसेवक तुमचे आभारी आहेत की, तुम्ही आमची विनंती स्विकारली. मागच्या दिड वर्षापासून आम्हांला काहीच फंड मिळाले नाही, माझा विषय त्या बाबतीतच आहे. निंबाळकर साहेबांनी १६, १६ लाखाचे आणि ६४ लाखाचा बपर टेंडर काढला होता. आज दु:खाने सांगावे लागते की, ७८ नगरसेवकां पैकी एक पण नगरसेवक असे सांगेल की, माझा ६४ लाख रूपयांचे काम पुर्ण झाले आहे. आमचे जे छोटे छोटे टेंडर काढत होते, २ लाखाचे, ३ लाखाचे प्रत्येक नगरसेवक आपल्या पध्दतीने काम करीत होते. मा. महापौरजी प्रभाग समिती निधी, नगरसेवक निधी आमचे हक्क आहे. सन २००७ ते सन २०१२ पर्यंत प्रभाग समिती निधी आम्हांला ५ लाख मिळत होते. नगरसेवक निधी आम्हांला २ लाख मिळत होते, त्यामध्ये सुध्दा आमचे काम होत होते. कारण की, जनरल फंड आमचा रिझर्व्ह ठेवला जात होता. रोडचे फंड होत होते, सगळे होत होत, आता काहीच असे होत नाही. फक्त मनमानीचे फंड २४ करोडचे लॅट्रीनचे फंड, ६ करोड डब्याचे फंड, १७ करोड ग्राडनचे, १२ करोड जी.एस. चे आम्ही विरोध करीत नाही. परंतु आमचे जे हक्क आहे, १० लाख, १५ लाख, २० लाख प्रत्येक वर्षाचे मिळायला पाहीजे. आम्हांला वंचीत का ठेवले जात आहे? दोन दिवस पहीले आयुक्त साहेबांनी काही ऑर्डर काढल्या आहेत की, प्रभाग समिती निधी या वर्षाचा देणार नाही किंवा काही उशिरा देईल. तर महापौरजी असे काही असेल आयुक्त साहेबांनी ऑर्डर काढल्या आहेत, त्या त्वरीत कॅन्सल करण्यात यावी. कारण की, प्रभाग समिती निधी मस्तह झाल्या पाहीजेत. प्रत्येक प्रभाग समितीला, प्रभाग समिती, सभापतींचे हक्क आहे. आम्ही नेहमी इक्वली डिस्ट्रीबुशन केले आहे. हे प्रभाग समिती, सभापतींचा फंड असतो, २ लाख, ३ लाखाच्या जागी आज आयुक्त साहेबांनी आर्डर काढल्या आहेत की, १० लाखाचा एकच टेंडर काढणार. मागचे आपण बघितले आहे की, ६४ लाखाचे कोणतेच काम झाले नाही. मी दाव्यानिशी बोलत आहे, एवढे नगरसेवक बसले आहेत, कोणीही नगरसेवकांनी बोलावे की, आपले ६४ लाखाचे काम पुर्ण झाले आहे. माझ्या वार्डामध्ये चार ठिकाणी काम पास झाले होते, एका जागेवरचे काम पुर्ण झाले आहे, तीन ठिकाणचे काम पेडींग आहे. एप्रिलचे काम, न झाल्यामुळे फेब्रुवरीमध्ये वर्क ऑर्डर दिल्या गेल्या. एप्रिलमध्ये काम चालू झाले आज जुलै महीना आहे, अजून काम पुर्ण झाले नाही. यासाठी सर्व संमितीने विनंती करतो की, जे डी.डी. आर. चे छोटे छोटे टेंडर आहेत, फक्त आपल्याच महानगरपालिकेत डी.डी.आर. तुम्ही देत नाहीत. वसई, विरार, ठाणे, भिवंडी या सर्व ठिकाणी डी.डी.आर. चे चालू आहे. महापौर मॅडम, तुम्हींला विनंती करतो की, आयुक्त साहेबांना तुम्ही, आयुक्त साहेब तुम्ही रिक्वेस्ट करा की, छोटे छोटे टेंडर काढा आमचे छोटे छोटे ठेकेदार वाचतील, धन्यवाद.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** महापौर साहेबा, तुम्हांला धन्यवाद देतो की, जे टोनी सिरवानी यांनी सांगितले, सत्य सांगितले. कारण की, आपण जे अंदाज पत्रक बनवतो, अंदाज पत्रिकेला मान्यता काय आहे? जर अंदाज पत्रिकेला मान्यता नसेल तर या वर्षी जी अंदाज पत्रिका बनवली आहे, ती जाळून टाका. ती ठेवण्याची काहीच गरज नाही. अंदाज पत्रिका जेव्हा बनवतात, तेव्हा आम्ही टाळया वाजवतो की, या वर्षीची जी अंदाज पत्रिका आपण बनवली आहे, ती खुप चांगली बनवली आहे. लोकांना आपण खुप सुविधा देवू जर वर्षे न वर्षे निघून गेल्या नंतर, पाच वर्षे निघून गेल्या नंतर आम्ही काय करणार? तीन वर्षा पासून आम्हांला नगरसेवक फंड, प्रभाग समिती फंड मिळाला नाही. आम्ही लोक काय शिव्या खाण्यासाठी इथे येत असतो का? आम्ही शिव्या खाणार नाही, आम्ही शिव्या का खाऊ? हे लोकांचे पैसे आहेत, लोकांचे पैसे चांगल्या कामासाठी वापरायचे आहेत. महापौरांनी, स्थायी समितीने, सर्व नगरसेवकांनी हे केले पाहीजे. कृपया मी जी विनंती करीत आहे, ती सत्यता सांगत आहे. मी टोनी साईना धन्यवाद देतो, असे प्रत्येक नगरसेवकाने ओरडायला पाहीजे. हे पब्लिकच्या हक्काची गोष्ट आहे, नगरसेवकाच्या हक्काची गोष्ट आहे. इथे कोणाची मनमानी चालणार नाही? का मनमानी चालली आहे. आपण निवडणूका घेतल्या आहेत, शासनाने निवडणूका घेतल्या आहेत, लोकप्रनिधी जनतेने निवडून पाठवले आहेत. चने देवून लोक निवडून आले नाहीत, कृपया नियमाचे पालन झाले पाहीजे, नियमानुसार कारभार झाला पाहीजे, बिगर नियमानुसार कारभार चालला नाही पाहीजे, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती जयश्री पाटील या सभागृहातून बाहेर गेल्या.

**सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाड:—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, आता निधीचा विषय आला म्हणूनच एक दिड वर्षामध्ये जे नविन नगरसेवक आलेले आहेत, मॅडम त्यांचे तर काहीच काम झालेले नाहीच. दुसरी गोष्ट पाण्यासाठी एक वर्ष भर तक्रार करून सुध्दा, वारंवार याची महासभेमध्ये मागणी करून सुध्दा कुठल्याही पाण्याच्या लाईनचे काम झालेले नाही किंवा रिपेरींगचे काम झालेले नाही. जनरल निधीमधून जे रिपेरींगसाठी आम्ही मागणी केली होती, ते पण झालेले नाही. पण नगरसेवक निधी ५ लाख रूपये पाण्यासाठी मागच्या वर्षे दिला, दुदैवाची गोष्ट म्हणजे अशी आहे की, त्या निधीतून सुध्दा काम होत नाही. वेळोवेळी पाणी पुरवठा विभागाला जाऊन सुध्दा त्या फाईल तिथून पुढे जातच नाहीत. कधी पण गेलो तरी त्याच टेबलवर आहेत, एक वर्ष झाले तरी त्या फाईल तिथेच आहेत, त्याचे कारण काय आहे? याचे उत्तर मला या सभेमध्ये हवाय. गेल्या एक वर्षभर पाण्याचा विषय मी प्रत्येक महासभेमध्ये मांडला आहे. आता रिपेरींगचे सुध्दा साधे काम आज पर्यंत झाले नाही.

या वेळी सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी या सभागृहातून बाहेर गेल्या.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, नगरसेविकाने जो मुददा मांडला आहे, त्या विषयावर जर नगरसेवक निधीचे काम जर होणार नसेल, वर्षेभर तर दुदैवाची गोष्ट अहे, नगसेविकांनी आपला निधी दिला वार्डामध्ये काम करण्यासाठी ते काम जाणूनबुजून पाणी पुरवठा विभाग करीत नाही. त्याचे कारण काय? त्यांची काय वैयक्तीक दुश्मनी आहे काय आहे? नाही त्याचे उत्तर मिळायला पाहीजे ना. त्यांनी निधी दिला होता, ५ लाखाचे काम का केले नाही? आज त्यांच्या वार्डामध्ये काम झाले नाही. पाण्याचा त्रास आहे, आयुक्त साहेब तिथे गेले होते, व्हिजीट दिली, बघितले तिथे लोकांना पाणी मिळत नाही, लोक त्यांच्या घरी मोर्चा घेऊन जातात. अशा वेळेला एका महीला नगरसेविकेचे काम न करणे ही चुकीची बाब आहे, तुम्ही प्रशासनाला विचारा. तुमच्याकडे निधी दिला म्हणजे एस्टिमेट मंजूर होतात, ते मंजुर झाल्यावर आयुक्त साहेबांच्या मंजुरीसाठी किंवा अजून कुठे ती पाठवायला पाहीजे होते, अजून का पाठवले जात नाही?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** लक्षवेधी वेगळी आहे, परंतु हा विषय तुमच्याही लक्षात असेल कमीत कमी त्या मॅडम, म्हस्के मॅडम, आमचे बिटूजी आमचे तिथले सगळे नगरसेवक स्वप्नील बागुल चारच्या चार नगरसेवक त्यांच्या विभागामध्ये पाण्याची समस्या सोडवण्यासाठी काय कले पाहीजे, त्यासाठी आपण चर्चा केली. सेलवन आहेत पण करायचे काय शेवटी अजूनही सुटत नाही. किती वेळा अगदी घसा त्यांचा कोरडा पडला आहे? ही प्रशासनाची जबाबदारी नाही का? सेलवन काय नक्की काय? तुम्हांला फंड नव्हता फंड दिला, फंड नव्हता म्हणून एस्टिमेट बनवता येत नव्हते, आता काम का होत नाही? किती ओरडायचे?

**सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाड:—** महापालिकेकडे पैसा नाही, पण जनरल फंडातून पाणी पुरवठयाची कामे झालीच नाहीत का? आणि जर काम झाली तर मग आमच्या प्रभागामध्ये ती कामे का होत नाही.

**सदस्या, श्रीम. कांचन लुंड:—** मा. महापौरजी, उप महापौर, आयुक्त साहेब, खुप दु:खाने सांगावे लागते की, दिड वर्ष व्हायला आले आहे, आम्हांला कोणताही फंड मिळत नाही. पाण्याच्या समस्या सुटत नाहीत, आणि एक नगरसेविकेची फाईल तयार करण्यास आणि टेंडर करण्याची प्रक्रिया करण्यास आणि पोहचण्यास कमीत कमी एक वर्ष लागतो आणि आम्हांला कोणताही फंड मिळत नाही. मेहनत करायला लागते आणि आज पण माझ्या प्रभागामध्ये एक रोड आहे, विषय आहे, स्थायी समितीमधून मान्यता मिळाली आहे, आज पर्यंत त्या रोडचे काम थांबले आहे. काम थांबण्याचे कारण म्हणजे आयुक्तांची चेंज होत असते. त्यांची बदली होते आणि नविन आयुक्त फाईलवर लक्ष देत नाहीत. जर स्थायी समितीमधून मान्यता दिल्या नंतरही फाईल तशाच ठेवल्या जातील तर आपल्या शहराचा विकास कशा प्रकारे होणार आहे? कारण की, प्रत्येक वेळी आयुक्त सतत बदली होत आहेत आणि आम्ही किती मेहनत करीत आहेत?

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** महापौर साहेबा, आयुक्त साहेब, आपल्या सभागृहामध्ये भरपूर लोक नविन निवडून आले आहेत, काही लोक पहील्या वेळेस निवडून आले आहेत. परंतु आज मला वाटते काही नगरसेवक रोज येत असतात, एस्टिमेट बनवण्यासाठी, कधी टेंडर होत नाही, काही होत नाही, जसे की, सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये आज आम्ही शिपाया सारखी कामे करीत आहोत. आमचे असे हाल झाले आहेत, शेवटी नगरसेवकांचे महत्व काय? आज आम्हांला आमच्या प्रभागामध्ये काम करण्यासाठी निधी मिळत नाही. त्यासाठी आम्ही आज आयुक्त साहेबांच्या समोर महासभेमध्ये बोलत आहेत. मी तर स्पष्ट बोलतो की, या महीन्यामध्ये नगरसेवक निधी आणि प्रभाग समिती निधी मिळत नाही तर नंतरच्या महीन्यामध्ये महापौर साहेबा, तुम्ही महासभा ठेवणार आहेत, मी तर बहिष्कार टाकणार आहे. कारण की, काहीच काम होत नाही, आम्ही हे पण खर्च करत आहेत, नास्टा खात आहेत, पाणी पित आहेत, महासभेचा खर्च तर पब्लिकचे पैशाने, पब्लिकचा पैसा खाऊन आपण इथे बेशरमी सारखे बसले आहोत की, आपण एवढे बेशरम आहोत की, आपल्या प्रभागासाठी काहीच करू शकत नाही. मी स्वत:तर्फे माझ्या पक्षातर्फे बोलत आहे की आम्ही या जनरल बॉडीवर बहिष्कार करतो की, एक वर्षा पर्यंत आम्हांला फंड मिळाला नाही. शेवटी काय आहे? याचे उत्तर कोण देणार? महापौर महोदया, आपण याचे उत्तर आयुक्त साहेबांना विचारा आम्हांला फंड कधी मिळणार? आम्हांला एक तारीख दिली जावी. म्हणजे आम्ही वार्डमध्ये जाऊन बोलू शकतो की, आपले काम आज होईल, उद्या होईल.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, मी आयुक्तांना सांगते त्यांनी आपले विचार मांडावे.

या वेळी सदस्य श्री. सतरामदास जेसवानी **यांनी** पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** यासाठी सर्वांना, ७८ नगरसेवकांना आयुक्त साहेब, संबोधित करतील आणि एक कृपया करून हात जोडून विनंती आहे, रोज एक तारखे पासून आम्हांला रोज इथे येऊन बसायला लागते. एस्टिमेट बनवा, हे बनवा.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** शेरीजी मी सन्माननिय आयुक्तांना सांगते की, आपले विचार व्यक्त करा.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** धन्यवाद, मॅडम.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** विचार नाही, आम्हांला पॉझिटीव्ह रिझल्ट पाहीजे मॅडम, सॉरी मी डिसटर्ब करतो.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** विचार नाही पाहीजेत नाही तर साई पक्ष संपुर्ण बहिष्कार टाकणार आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** तुम्ही किती तरी वेळा आदेश दिलेले आहेत? त्या आदेशाचे पालन होत नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** कृपा करून आयुक्तांचे ऐकुन घ्या.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** महापौरजीजर आदेशाचे पालन होत नसेल तर आपण कृपया करून इथे येऊन आमच्या बरोबर बसा? का मिळाले नाही, तुम्ही आमच्या महापौर आहेत, तुम्ही शहराच्या महापौर आहेत.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** कृपया करून पहीले आयुक्तांचे ऐकुन घ्या.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** ठिक आहे, जरूर ऐकु.

**सदस्य, श्री.किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, माझी फक्त एक विनंती आहे, हा जो बजेट बनवला आहे....

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** नंतरची महासभा होणार नाही, पाणी मिळणार नाही तर पुढच्या महासभेवार बहीष्कार टाकू. तर आज उत्तर मिळाले पाहीजे. महापौरजी हे काय होत आहे, तुमच्या राज्यामध्ये कोणी नगरसेवक महासभेवर बहिष्कार टाकण्यास बोलत आहेत. महापौरजी हा गंभीरतेचा विषय आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** मी सांगितले की, समाधान होण्यासाठी एक तारीख दिली पाहीजे, नाही तर मी बहिष्कार टाकतो.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** यासाठी हा विषय गंभीरतेने घ्या.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** तुम्ही कृपया करून बसून घ्या, शांत बसा.

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—** मॅडम दुदैवाची गोष्ट अशी आहे की, या महासभेमध्ये फक्त चर्चा होते, त्याच्यावर अंमलबजावणी होत नाही, अंमलबजावणी शुन्य आहे, शुन्य.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—** मा. महापौर, या ठिकाणी मला...

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सावंतजी, तुम्ही बसा पहीले आयुक्तांचे ऐकुन घ्या, बसून घ्या.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** चांगले ऐकण्यासाठी साहेब, दोन तीन वर्ष असे कान तरसलेत, चांगले ऐकण्यासाठी बराच वेळ झाला आहे, तीन वर्षे झालेत, चांगले जरा तीन वर्षा पासून कधी ऐकले नाही, आज तरी ऐकु दया आपल्याकडून.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** बोलतो, बोलतो.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** धन्यवाद, धन्यवाद.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** सन्माननिय महापौर...

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** साहेब, एक मिनीट जसा तुमचा चेहरा आहे, जसे तुमचा हसरा चेहरा आहे, तसेच आम्हांला सर्वांना हसवा प्लीज आणि एक चांगली बातमी दया.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** कृपा करून शांत बसा.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** सन्माननिय महापौर, सन्माननिय सर्व सदस्य, मागच्या वेळेस पण मी बोललो होतो आणि आता पण मी तेस सांगत आहे की, नगरसवेक निधी १० लाखाचे एस्टिमेट बनवण्यासाठी मी सांगितले आहे आणि भरपूर नगरसेवकांचे एस्टिमेट तयार पण झाले आहे, त्यांना मान्यता पण दिली आहे. जे जे नगरसेवक ज्या प्रकारे काम बोलत आहेत, त्या प्रमाणे एस्टिमेट बनवण्याचे काम चालू आहे आणि सेंशन घ्यायचे पण काम चालू आहे. भरपूर लोकांचे १०, १० लाखांचे कोटा संपला पण आहे. ज्यांनी अजून पर्यंत काम दिले नाही, त्यांची कामे मागे राहीली आहेत. जे पण समितीचे सदस्य आहेत, स्थायी समिती सदस्य, प्रभाग समिती सदस्य, त्यांच्यासाठी मी १५ लाखाचे एस्टिमेट बनवण्यासाठी बोललो होतो, त्यामध्ये सुध्दा ज्यांनी प्रस्ताव दिले आहेत, त्यांचे एस्टिमेट बनवण्याचे काम चालू आहेत. तुम्हांला सगळयांना विनंती आहे की, तुम्हांला जे लिमीट दिले आहे, त्यानुसार प्रस्ताव दया, आम्ही लवकर प्रोसेस करून तुम्हांल देवू.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** सर तुम्ही, प्रभाग समिती सदस्यांना १५ लाखाचे निधी आता तुम्ही बोलले.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** प्रभाग समिती सभापती....

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** तुम्ही सभापती बोलेले मी सदस्य ऐकले.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, मी आयुक्त साहेबांना सांगतो की, महानगरपालिकेचा जो बजेट आहे, इथे सांगितले जाते की, इथली आर्थिक स्थिती खराब आहे. परिस्थिती चांगली नाही. इथे डिफेसिट बजेट आहे. ६०० करोडचे होते, ९०० करोडचे केले. हे सर्व प्रश्नाचे उत्तर ऐकले आहेत. महाराष्ट्र सरकार पण करोडो अरबो मागे चालेले आहे. परंतु मा. मुख्यमंत्री काम करण्यासाठी मागे हटले नाहीत. भारत सरकारची जे सरकार आहे, मा. मोदी साहेबांचे सरकार पण अरबो, खरबो, करोडो, पदमो रूपये मागे आहे, परंतु तरी सुध्दा त्यांचे काम थांबत नाही आणि आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर साहेबांना पण हेच सांगितले होते, तुम्हांला पण सांगितले की, तुम्ही तुमच्यावर कर्ज घेत

नाहीत, तुम्हीची कधी पण बदली होऊन जाईल. देवाला प्रार्थना आहे की, तुम्ही १०० वर्षे इथेच रहा. आम्हांला काहीच प्रॉब्लेम नाही. बदली झाल्या नंतर तुम्ही घरून पैसे भरणार नाहीत, तुम्हांला तुमच्या घरी, पुण्याला कोणी बोलायला येणार नाही की, साहेब तुम्ही सही केली होती, तुम्हीच पैसे दया. पैशाचे कर्ज महापालिकेवरच राहील आणि जसे तुम्ही म्हणतात की, बजेटची जशी पोझिशन राहील तसे करू. तर तुम्ही असे करू शकतात ना, समजा रूपये आमचे होते, त्यामधून बजेट खुप कमी येईल. तुम्ही बारा अणा देणार, आठांना देणार.परंतु तुम्ही महापौर, उप महापौर, सर्व पदाधिका—यांचे पहीले दिड, दिड करोडचे फंड बनवा, सर्वांनी एस्टिमेट बनवले नंतर तुम्ही त्याच दिड करोडचे २५ लाख केले. परंतु असे व्हायला नाही पाहीजे. पहीले तुम्ही आमच्या बरोबर मान्य केले होते की, नगरसेवक निधी, प्रभाग समिती निधी तुम्हांला २१ लाख रूपये देवू. परंत तुम्ही.....

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** नाही, नाही हे बघा आता जे तुम्ही बोलत आहेत, त्याचे कारण हे आहे की, बजेटचा जो पैसा आहे, तो वेळेत येत नाही. त्यामुळे आपण फेजमारनमध्ये खर्च करीत आहेत, हा तुम्हांला दिलेला पहीला पैसा आहे, याच्या नंतर अजून देवू.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** साहेब, पहील्या टप्यामध्ये २१ लाख दया, बाकी डिसेंबरमध्ये दया, नंतर दया.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** पहील्या टप्यामध्ये आम्हांला जे दयायचे होते, ते दिले त्याचे परिपत्रक पण काढले आहे आणि त्याच्या नंतर होईल आता आणि महापालिकेला लोन घेण्यासाठी भरपूर कन्सलटंट आहेत. जे स्टेट गव्हर्नमेंट आणि सेंटर गव्हर्नमेंटला नाहीत. आपण असे बोलू शकत नाही की, सेंटर गव्हर्नमेंट लोन घेतात, आपण पण घेऊ. कारण की आपल्याकडे तसे सोर्सेस नाही लोन घेण्यासाठी आणि आपल्याला कोणी लोन पण देणार नाही. त्यामुळे आपण त्यांच्या बरोबर कंम्पायर नाही करू शकत, जो आपला बजेट आहे, त्याला बोलतात फायनानशियल स्टुडंडस.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** साहेब, ठेकेदाराला पण बोलतात, तुम्ही ठेकेदारांना बोलतात की, तुमचे काम करा, पेमेंट जेव्हा होईल, तेव्हा देवू.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** नाही, नाही असे नाही.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** तुम्ही ठेकेदारांना बोलतात तेव्हा काम करण्यासाठी शहरामध्ये....

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** ठेकेदार करेल ना, प्रत्येक नगरसेवक करून घेईल.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** जेव्हा पोझिशन पेमेंटची असेल, तुम्ही असे करणार का?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** फिलाल ७०, ८० करोडची जास्त लायबिलीटी आहे, ती लायबिलीटी आपण जास्त वाढवू शकत नाही, काम करू परंतु जसे हळू हळू फंड पोझिशन जसे येईल, तसे काम पण वाढेल.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** सर, जी अभय योजना लावली होती, तेव्हा ९० करोड रूपये श्री. राजेंद्र निंबाळकर साहेबांना अभय योजनेमध्ये दिले होते. त्यांनी अलाऊन्स केले होते की, जो नगरसेवक मला मदत करेल मी तेवढे काम करेल. आमचा पॅनल क्रमांक १९ पहीला आला ३ करोड रूपये वसुल झाले, त्यांनी ३ रूपयाचे पण काम केले नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** वनवारी साहेब, निंबाळकर साहेब जाऊन आता एक वर्ष झाले आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** त्याच्या नंतर सुध्दा काम केले नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** श्री. राजेंद्र निंबाळकर आता गेले, सोडून दया.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** पहीला टप्पा कधी पुर्ण होणार?

**सदस्य, डॉ.प्रकाश नाथानी:—** फंड मिळणार नाही तर सभा चालू देणार नाही, आम्हांला फक्त लक्षवेधी नाही पाहीजे, आम्हांला फंड पाहीजे. आम्ही जिंकुन आलो आहे, ही काय चष्टा चाललेली आहे. आम्ही मागणी करीत आहेत, आम्ही का भिकारी आहेत.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** कृपयया शांततेने बोला.

या वेळी सदस्य, श्री. सुनिल सुर्वे व सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी हे स्टेज जवळ खाली बसले.

**सदस्य, डॉ.प्रकाश नाथानी:—** मला जो पर्यंत फंड मिळत नाही, मी इथेच मरून जाईल.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** तीन वर्षाचा रेकॉर्ड काढा आम्हांला काय फंड मिळाला आहे.

**सदस्य, डॉ.प्रकाश नाथानी:—** आम्ही फक्त चर्चाच करायला येतो का? वार्डमध्ये जाऊन लोकांना काय सांगू. पावसाळयात वार्डमध्ये पाणी नाही, भरपूर वार्डामध्ये पाण्याचा त्रास आहे. पावसाळयामध्ये त्रास मग उन्हाळयामध्ये काय होईल? पाऊस एवढा पडत आहे की, भगवान तरसत आहे, भगवान आमच्यावर बरसत आहे, एवढा बरसत आहे की, लोक डब्बे भरून आंघोळ करीत आहेत. नळाला पाणी का येत नाही, ठिक आहे, चला हे पण जाऊ दया, वेळेवर हे पण बघू जे पिडीत नगरसेवक आहेत. परंतु फंड किती वेळा मागणार? कुठ पर्यंत प्रत्यक मिटींगमध्ये हे बोलेल, ते बोलले फक्त लक्षवेधी आणणार, हे आणणार, बोलणार, चर्चा करणार शेवटी फंड कधी देणार? मी बसतो.

**सदस्य, श्री.अरूण आशान:—** डॉक्टर हे काय होत आहे?

**सदस्य, विजय पाटील:—** डॉक्टर साहेब, आम्ही तुमच्या बरोबर आहेत.

**सदस्य, डॉ.प्रकाश नाथानी:—** मी शहरासाठी लढत आहे.

**सदस्य, श्री.अरूण आशान:—** डॉक्टर सर्वांसाठी, डॉक्टर तुम्ही एकटे नाहीत, मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब....

**सदस्य, डॉ.प्रकाश नाथानी:—** तुम्ही लोक थट्टा करीत आहेत.

**सदस्य, श्री.अरूण आशान:—** नाही, नाही ही थट्टा नाही,

**सदस्य, डॉ.प्रकाश नाथानी:—**सभागृहाची थट्टा करू नका, सरळ चला, जनतेने निवडून पाठविले आहे.

**सदस्य, श्री.शेखर यादव:—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, ही परिस्थिती खरोखरच सगळीकडे आहे. पॅनलमध्ये पाणी पुरवठयाचे अधिकारी, आयुक्त साहेब, पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी एक वर्षापासून कामे करीत आहेत, पण तिकडे अजून पर्यंत पाणी पोहचले नाही. एक एक वर्षा पासून लिकेजचे कामे चालू आहेत, लिकेज बंद होत नाहीत. एक वर्षा पासून त्याच्या मागे लागलो आहे.

**सदस्य, श्री.टोनी सिरवानी:—** महापौर मॅडम आम्ही तीन वर्षा पासून हेच ऐकत आलो आहे, फंड नाही, फंड नाही. तीन करोडचे एल.बी.टी. चे येत आहेत, ते कुठे जात आहेत? ५५ करोड टॅक्स येत आहे, ते कुठे जात आहे? वार्डामध्ये काय उत्तर देणार? ते लोक टॅक्स कशासाठी भरतात, फक्त पगार चालवण्यासाठी.

**सदस्य, श्री.राजेश वानखेडे:—** आयुक्त साहेब, बोरवेलचे कामे बंद आहेत, त्या ठेकेदाराला पमेंट मिळत नाही, तो ॲडव्हान्समध्ये किती कामे करणार? त्यांचे बजेटमध्ये काहीच ठेवलेले नाही.

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:—** मा.महापौर मॅडम हा विषय कुठे आहे? आणि हा विषय चालला आहे कुठे? सन्माननिय सदस्य, ज्यांची लक्षवेधी आहे, त्यांना तर बालू दया.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** भगवानजी लक्षवेधी आहे ठिक आहे, आताचे काय?

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते? ते समजून आले नाही.

**सदस्य, श्री.अरूण आशान:—** बरोबर आहे, भालेरावजी तुम्ही दोन मिनीट थांबा.

**सदस्य, श्री.शेखर यादव:—** दोन दोन वर्ष तुम्ही लोकांना पाणी पुरवत नाही.

**सदस्य, श्री.अरूण आशान:—** महापौरजी, आयुक्त साहेब, माझा एक प्रश्न आहे.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी:—** लोकांनी निवडून पाठवले आहे ना.

**सदस्य, श्री.शेखर यादव:—** दोन वर्षा पासून पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी काम करीत आहेत, परंतु लोकां पर्यंत पाणी पोहचत नाही.

**सदस्य, श्री.अरूण आशान:—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आपण म्हणता की पैसे नाहीत, मान्य आहे, आपण जर का कोणी या शहरामध्ये वेळेवर टॅक्स भरला नाही, तर त्या माणसाकडून तुम्ही दोन टक्के शास्ती आकारतात, मग तो कशा करीता. २४ टक्के मग त्या माणसाकडून तुम्ही पुर्ण

पैसे घेतात. दंडासकट मग त्यांना सुविधा का देत नाहीत? मग महानगरपालिकेला दंड घेण्याचा अधिकार नाही. कशा बददल, तुम्ही लोकांना सुविधा देण्यास असमर्थ आहेत. गेल्या दिड वर्षाच्या काळामध्ये सत्ताधारी पक्ष बोंबलत आहेत, हे पहील्यांदा झाले आहे, त्यांची पण कामे होत नाहीत. आम्ही तर विरोधातच आहोत, महापालिकेमध्ये हा असा आकांडतांडव की पुढची महासभा होऊ नये म्हणून सत्ताधारी बोलतात, असे असतांना तुम्ही या सभागृहाची गरीमा ठेवत नाही आणि सांगतात की पैसे नाहीत, ही गोष्ट आम्हांला मान्य नाही. वनवारी साहेब बोलले आरबो, खरबो रूपये जर का त्यांच्याकडे पेडींग असतील, तर अशा महासभेमध्ये तुम्ही महानगरपालिकेमध्ये ५०, ५० लाखाची, २, २ लाखाची कामे होत नाहीत आणि मग महासभेमध्ये पुढचे विषय घेऊन करायचे कशा करीता? आम्हांला लोकांनी इथे पाठवले आहे, जनतेची कामे होण्या करीता, आज गेले कित्येक दिवस सत्ताधारी पक्ष पण बोलत आहेत. एक, एक नगरसेवक बोलत आहेत की, आम्हांला निधी दया, आम्हांला फंड दया, आपण दर वेळेस वाचून दाखवतात आणि सांगतात. मग तुम्ही ती शास्ती घेता तरी कशाला? ती शास्ती माफ करा. कोणी पण भरला नाही, म्हणून तुम्ही सांगू नका टॅक्स तुम्ही जबर दस्तीने आम्ही लोकांकडून वसुल करून या महापालिकेला दिला आहे की कामे होतील म्हणून पण गेल्या दिड वर्षामध्ये एक पण कामे झालेली नाहीत. आयुक्त साहेब, महापौर मॅडम हे काय होत आहे?

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, आयुक्तांकडून विश्लेषण ऐका.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** महापौर मॅडम, तुम्हांला विनंती आहे, तुम्ही आयुक्तांना विनंती करा की, या वर्षीचा आमचा जो फंड आहे, तो आम्हांला रिलीज करा आणि डी.डी. आर. पध्दतीने, आम्हांला या महानगरपालिकेच्या अधिका—यांवर भरोसा नाही, सहा सहा महीने लावतात टेंडरसाठी, मागच्या वर्षीचा टेंडर फेब्रुवारीमध्ये पास झाला आहे. आमच्या वार्डामध्ये कशी कामे होतील?

**सदस्य, श्री.राजेश वानखेडे:—** महापौरजी, आयुक्त साहेब, जर आपल्या महापालिकेकडे फंड नसेल, पुर्ण महापालिकेमध्ये फंड नसेल तर आपण लोकांची कामे करू शकत नाहीत. तर आयुक्तां पासून महापौरां पासून सगळया कर्मचा—यानी, सगळया नगरसेवकांनी राजीनामे दयावेत आणि ही महापालिका बरखास्त करावी.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** राजेश वानखेडे यांचे म्हणणे बरोबर आहे. सुरूवात इकडन करावी.

**सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाड:—** मा. महापौर मॅडम....

**सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—** आमदारकी आली आहे, आमदारकी.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी मला समजायला येत नाही की, जर सभागृहाचे कामकाज या प्रकारे चालले तर या शहराला आपण काय देवू शकतो.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** जमनुजी, अधिकारी लोक काम काय करीत आहेत? त्यांच्यासाठी तुम्ही का बोलत नाही.

**सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी:—** पहीले मला बोलू दया,

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** पावसाळयामध्ये कोणाकडेही पाणी नाही, त्यासाठी तुम्ही बोलत नाहीत.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** जमनुजी ही हकीकत आहे की, नगरसेवक बोलत आहेत, बोरवेल दुरूस्त होत नाहीत, त्यासाठी नगरसेवक बोलत आहेत. ते चुकीचे काय बोलत आहेत?

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी:—** बोरवेलच्या ठेकेदाराला बोलवा.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** तुम्ही शांत बसाल तर आयुक्त सांगतील.

**सदस्य, श्री.शंकर लुंड:—** इथे विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षाची गोष्ट नाही, जनरल गोष्ट आहे.

**सदस्य, श्री.सुरेंद्र सावंत:—** मा. महापौरजी, बोरवेल रिपेयर करा, रिपेरींग झालेल्या बोरवेलचे बिल अदा करायचे आहेत. बोरवेल रिपेरींगचे एक, दिड लाखाचे बिल असेल ते पण होत नाही.

**सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाड:—** मा. महापौर मॅडम, या सभागृहामध्ये कामकाज होत नाही, ते आपले दु:ख व्यक्त करीत आहेत. त्यांचे तुम्ही ऐकुण घ्या.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** तुम्हांला प्रश्नाचे उत्तर पाहीजे ना,

**सदस्य, श्री.अरूण आशानः—** माझ्या प्रश्नाचे उत्तर पण प्रश्न तर होऊ दया,

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** मग ऐकुण घ्या,

**सदस्य, श्री.राजेश वानखेडेः—** महापौर मॅडम, सदस्यांचे आवाज बंद करणार की, आयुक्तांकडून काम करून घेणार?

**सदस्य, श्री.अरूण आशानः—** एक वर्ष झाले, अजून काम चालू झाली नाहीत.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** आयुक्तांचे म्हणणे ऐकुण घ्या.

**सदस्य, श्री.राजेश वानखेडेः—** महापौर मॅडम, तुम्ही आम्हांला गप्प करणार की, त्यांच्याकडून शहराचे काम करून घेणार?

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** शहराची कामे पण करू, प्रथम आयुक्तांचे म्हणणे ऐकुण घ्या.

**सदस्य, श्री.शंकर लुंडः—** आयुक्त साहेब, पहीले एका प्रश्नाचे उत्तर दया, आपण पहीला टप्पा चालू केला आहे, त्याला चार महीने झाले आहेत, दुसरा टप्पा कधी सुरू होणार? पहील्या टप्याला चार महीने झाले आहेत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—** सन्माननिय महापौर, आणि सर्व सन्माननिय सदस्य,.....

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** कृपया तुम्ही बसून घ्या, सावंतजी बसून घ्या.

**सदस्य, श्री.सुरेंद्र सावंतः—** आजही बोरवेल रिपेरींगचे पेमेंट दिले जात नाहीत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—** नगरसेवक निधीच्या संदर्भामध्ये दिनांक ३/७/२०१८ रोजी आम्ही एक पत्र तयार केले आहे, पत्रामध्ये मी वाचून दाखवतो, महापौर, उप महापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता यांचे प्रत्येकी २५ लक्ष, स्थायी समिती सदस्य, प्रभाग समिती सदस्य, विशेष समिती सदस्य, विशेष समिती सभापती, गट नेता यांचे प्रत्येकी १५ लक्ष रूपयाचे मर्यादित आणि सन्माननिय सदस्य यांचे ६ लक्ष मर्यादीमध्ये कामे जे आहेत, ते मंजूर करण्या संदर्भात कारवाई करण्यात यावी. असे पत्र आम्ही ऑल रेडी आधी काढले आहे. मी तुम्हांला तेच सांगतो की, आपल्या पैकी काही सदस्यांचे हे लिमीट त्यांनी संपावले सुध्दा आहे. ते आता इथे बोलत नाहीत, ज्या सदस्यांनी त्यांचे मंजूर करून घेतले ते बोलत नाहीत, फक्त ज्यांचे राहीलेले आहेत, ते बोलतात तुम्ही आमच्याकडे प्रस्ताव दया. तुम्ही प्रस्ताव दया, आम्ही करू.

**सदस्य, श्री.किशोर वनवारीः—** साहेब, तुम्ही जे पहीले सांगितले...

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरीः—** शहरामध्ये पाण्याची समस्या आहे, आम्ही त्यांच्या मताशी सहमत आहेत, परंतु शहरामध्ये पाण्याच्या समस्या आहेत. बोरवेल बोरवेल रिपेरींग होत नाहीत.....

**सदस्य, श्री.विजय पाटीलः—** तीन वर्ष नंतर दिले आहे, तीन वर्षा नंतर २१ लाखाचे आपण पास करीत आहेत, पण तीन वर्षा नंतर.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानीः—** १५ लाख रूपये प्रत्येक सदस्यासाठी बोलेले ना, आयुक्त साहेब,

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—** १५ लाख रूपये प्रत्येक समिती सदस्य.....

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** सगळयांची पत्र वाचायला लावा.

**सदस्य, श्री.शंकर लुंडः—** सितलानीना बोलवा, कोणाकोणाला फंड दिले आहे? अर्धे लोक कोण आहेत, ज्यांना फंड मिळाले आहे. सितलानी कृपया सांगा, कोणते अर्धे लोक आहेत, ज्यांना फंड मिळाले आहे. तुम्ही कृपया इथे सांगा. कोणते अर्धे लोक आहेत, ज्यांना फंड दिले आहे आणि बाकीच्या लोकांना दिले नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** सन्माननिय सदस्य...

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** मा. महापौर, उप महापौर, मा. आयुक्त, मा. सदस्य,.... .

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** सन्माननिय सदस्य, आता तुम्ही शांत बसा सितलानीजी या संदर्भात तुम्हांला सांगतील.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** मा. आयुक्त साहेब, सन्माननिय महापौर मॅडम, एक मिनीट....

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** कृपया शांत बसा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** पाण्याचे काम होत नाही, पाच—पाच लाख रूपये निधी दिल्यावर सुध्दा आणि एक वर्षा नंतर सुध्दा तर नगरसविका बोलणार नाही तर काय करणार? त्यांना बोलण्यास आपण थांबवता हे चुकीचे आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** इंजिनियरला बोलवा ना कोणकोणाचे पत्र आले आहेत, ते आपल्याला कळेल.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** नगरसेवक निधीच्या संदर्भात चर्चा झाल्या नंतर या विषयावर चर्चा करू.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आयुक्त साहेब, एक लक्षात घ्या.

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—** पाण्याचे कोणतेच काम होत नाही.

**सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाड:—** माझा जो विषय आहे, आपण समजून घ्या, विषय असा आहे की, मागच्या वर्षी पाण्यासाठी मी.....

**प्र.शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** जवळ जवळ सर्व नगरसेवकांचे पत्र आले आहेत.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** पहीले या विषयावर बोलू.

**सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाड:—** नाही, पहीले माझे म्हणणे ऐकुन घ्या, मेन मुद्दा आहे.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मा. महापौरजी, प्लीज यांचे पहीले ऐकुन घ्या. दोन मिनिट.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** बोला, बोला.

**सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाड:—** मागच्या वर्षी तत्कालीन आयुक्तांनी सांगितले होते की....

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** जरा ऐका.

**सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाड:—** आपला नगरसेवक निधी जो आहे, तो पाण्यासाठी दया, मी नगरसेवक निधी पाण्यासाठी दिला आहे. पाण्याचा मुद्दा एवढा गंभीर आहे की, लोकांना पाणी नाही आणि जनरल फंडामधून रिपेरींगचे पण काम होत नाही. आता आयुक्त साहेबांनी सांगितले की, जो मागच्या वर्षीचा फंड आहे,

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** बोलू दया त्यांना त्या सांगतात.

**सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाड:—** महापौर मॅडम पहीले माझे ऐकुन घ्या, नंतर सेलवन साहेब बोलतील. मी मागच्या वर्षी पण....

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—** मागच्या वर्षाच्या बजेटमध्ये नगरसेवक निधीची तरतुद केली होती, नगरसेवक निधीचे कोणालाच काम करायला दिले नाही, म्हणून ते काम झाले नाही सर. आता या वर्षीच्या बजेटमध्ये त्यांच्या नगरसेवक निधीची तरतुद नविन वर्षाचा....

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मागच्या वर्षाचा निधी तुमच्या चुकीमुळे गेला.

**सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाड:—** सेलवन साहेब, तुम्ही जनरल फंडाचे पण काम करीत नाहीत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** त्या एरियामध्ये पाणी मिळायला पाहीजे ही तुमची जबाबदारी नाही का? प्रत्येक वेळी या बजेटमध्ये तुमची जबाबदारी नाही का? खड्डयात गेले तुमचे बजेट लोकांना पाणी महत्वाचे आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आता जनरल फंडातून तुम्ही एक्स्ट्रा पाच लाख रूपये दया. जनरल फंडातुन त्यांना पाच लाख रूपये तुम्ही काढून दया.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** बजेट, बजेट मागच्या वर्षापासून त्यांचे बजेट चालले आहे. आयुक्त साहेब, पाणी देण्याची जबाबदारी तुमची नाही का? बजेट केला, आम्हांला माहीत नाही बजेट लोकांना पाणी दयायची जबाबदारी तुमची नाही का? मागच्या वर्षापासून चालू हे आहे. निंबाळकर आले निंबाळकर गेले तरी ते चालूच कधी संपणार?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** सेलवन साहेब, ऑफिसमध्ये वेळेवर भेटत पण नाहीत.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** मागच्या वेळेस तीन महासभेमध्ये हा विषय झाला, त्या विभागातील पाण्याची समस्या सोडवणे तुमची जाबाबदारी आहे, असे तुम्ही इथे सांगितले होते. बजेट आम्हांला माहीत नाही, सर्वसामान्यांना काय माहीती? आम्ही पैसे भरतो.

**<u>सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाड:—</u>** सेलवन साहेब, मी रिपेरींगसाठी एक वर्षा पासून महासभेमध्ये बोलेले आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** चारही नगरसेवक, आव्हाड मॅडम, तुम्हांला स्वत: जवळ जवळ दहा वेळा भेटल्या असतील. अंकुश म्हस्के वैतागून गेले चार वर्षा पासून तेच चालू आहे.

**<u>सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाड:—</u>** वनवारी साहेब, एका महासभेमध्ये बोलेले की, यांचे पहीले काम करा, पण ते का झाले नाही?

**<u>सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाड:—</u>** कलवंतसिंग सोहता, स्वप्नील बागुल यांनी किती दिवस भेटायचे? काय चालले आहे? आणि मग आम्ही महासभेमध्ये बोलून त्याचा उपयोग काय? त्याचा रिझल्ट काय?

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** आबा साधारण, साधारण रिपेरींगची कामे सुध्दा हे लोक करीत नाहीत, तरी सुध्दा म्हणतात की, नगरसेवक निधी दया. कुठलीही करीत नाहीत, अशी यांची उत्तरे आहेत.

**<u>सदस्या, श्रीमती राजश्री चौधरी:—</u>** मा. महापौरजी गेल्या तीन दिवसा पासून आमच्या प्रभागामध्ये पाणी नाही. त्याचे नियोजन काय करता? आम्हांला टॅकर मिळाला नाही, नागरीक तीन दिवसा पासून रस्त्यावर बसून आहेत. तीन दिवस झाले सेलवन साहेबांना फोन करून आज होईल, उद्या होईल अगोदर सांगता येत नाही का? एक तर तुमच्याकडे टॅकरची सुविधा नाही. कुठून पाणी देणार तीन दिवस आमच्या प्रभागामध्ये पाणी नव्हते. गेल्या वेळेस पण आमच्या प्रभागामध्ये पाणी मिळाले नाही. कुठलेच नियोजन महानगरपालिकेचे नाही. पाणी येते, तेव्हा लाईट जाते, तीन दिवसापासून पाणी नव्हते, काल रात्री साडे नऊ, पावणे दहाला पाणी आले. त्याच्या नंतर लगेच लाईट गेली. आम्ही लोकांना पाणी कसे पुरवायचे हे आम्हांला सांगा? बोरींग पण चालू नाहीत, आम्ही चार वेळा फोन करणार तेव्हा तेव्हा सेलवन साहेब पाठवणार.

**<u>सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाड:—</u>** महापौर मॅडम, मला दु:ख तर या गोष्टीचे आहे की, नगरसेवक फंड मिळून सुध्दा माझ्या वार्डामध्ये अजून लाईन टाकली नाही. त्यामुळे पाण्यासाठी काय करावे?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** मी काय बोलतो सेलवन साहेब, तुमच्या चुकीमुळे त्यांना त्यांचा पाच लाख नगरसेवक निधी मिळाला नाही, तुमच्या चुकीमुळे, आता जनरल निधी मधून त्यांना पाच लाख रूपये देण्याची व्यवस्था करा आणि त्यांची पाईप लाईन करून दया. बाकी तुम्ही कबुल करा विषय संपला.

**<u>कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—</u>** मागच्या वर्षी निधी मंजूर झालेला नाही साहेब.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** ते तुम्ही तुमच्या जनरल निधी मधून करून देण्याची व्यवस्था करा.

**<u>कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—</u>** या वर्षाच्या नगरसेवक निधी मधून करून देतो.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** नगरसेवक निधी मधून नाही, जनरल निधी मधून. तुम्ही चुकी केलेली आहे, जनरल निधी मधून दया.

**<u>कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—</u>** जनरल निधी मधून आयुक्त साहेब, बोलतील त्या प्रमाणे करेल.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** ठिक आहे.

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, हे समजून आले नाही.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** त्या विभागामध्ये विना बजेटचे पाणी पोहचवणे हे तुमचे काम आहे, पाणी पुरवठा विभाग आहे ना?

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u>** त्यांना जनरल निधी मधून करून दया,

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** त्या त्या नगरसेवकांच्या जनरल निधी मधून काम करून दया, असे बोला.

**<u>कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—</u>** आयोध्यानगरचे पुर्ण पाणी प्रश्न सॉल केला आहे,

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** पाणी प्रश्न सॉल केला असता तर त्या एवढया वेळ उभ्या राहून विषय उपस्थित केला नसता.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** एक महीन्या पासून एक नगरसेविका परत परत बोलत आहेत, आयुक्तांनी सांगितल्या नंतरही काम होत नाही, हे काय होत आहे? आपण सांगा ना, किती दिवस हा विषय चालेल, आपण हे काम का करीत नाहीत? यामध्ये काय राजनिती आहे, ते पहीले सांगा.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>** साहेब, बोगस एस्टिमेट बनवतात, परंतु जेन्युयन एस्टिमेट बनवत नाही.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड—</u>** साहेब, किती बोरवेल चालू आहेत, यांना विचारा, बोरवेल किती चालू आहेत?

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** एक मिनीट सन्माननिय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्यांच्या वार्डाचे जे काम आहे, मी स्वत: जाऊन बघितले आहे, सेलवन ते जे काम आहे, त्यांचे लवकरात लवकर करून दया. एस्टिमेट वैगेरे जे पण काही असेल.

**<u>सदस्य, श्री. शेखर यादव:—</u>** साहेब, तेच नाही, बाकीच्यांचा पण पाण्याचा विषय आहे, आयुक्त साहेब, जिथे जिथे पाण्याचा विषय आहे, सर्वांचा बोला. एक वर्षापासून माझ्या इथे गजानन कॉलनी एक दिड वर्षा पासून पाणी पोहचले का विचारा त्यांना?

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** साहेब, बोरवेल आणि टॅकरचे काय आहे?

**<u>सदस्य, श्री. शेखर यादव:—</u>** आम्ही त्यांच्याकडे येतो आणि फॉलो करतो, त्यांना विचारा तिथ पर्यंत पाणी पोहचले का?

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** साहेब, टॅकर आणि बोरवेल आता ज्यांच्याकडू पाणी नाही त्यांना टॅकरने तातडीने पाणी दयायचे आहे.

**<u>सदस्य, श्री. शेखर यादव:—</u>** सर्व बोरवेल बंद आहेत, साहेब.

**<u>सदस्य, श्रीम. सुरेखा आव्हाड:—</u>** धन्यवाद, तुम्ही माझ्या प्रश्नाकडे लक्ष दिल्या बदल आणि माझी सेलवन साहेबांना विनंती सभागृहा समोर कमीत कमी त्यांनी कामा करीता लक्ष दयावे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** सर पर्यायी व्यवस्था टॅकर ठेवा जर कोणाला प्रॉब्लेम झाले तर टॅकरची व्यवस्था ठेवा. जिथे प्रॉब्लेम होत असेल, तिथे टॅकर देण्यात यावे.

**<u>सदस्य, श्रीम. कविता बागुल:—</u>** मा. महापौर आणि आयुक्त साहेब, प्रभाग १८ मध्ये गेल्या एक वर्षा पासून_काही काम करीत नाहीत आणि एक वर्षा पासून कलवर्टसाठी फाईल दिली आहे, कलवर्टसाठी निधी पास होत नाही. त्या कलवर्टमध्ये आता पर्यंत किती लोक पडले असतील.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** साहेब, बोरवेल रिपेरींगसाठी शेखर यादवांनी तुम्हांला वारंवार सांगितले आहे, अरूण आशान यांनी पण सांगितले आहे. साहेब, बोरवेलचे तुम्ही डी.एस.आर. रेट क्लीयर करायला सांगितले आहेत ना? ते अजून झाले नाहीत, त्या गोष्टीला एक महीन्यापेक्षा जास्त दिवस झाले आहेत. असे का होते? म्हणजे एक तर तुम्ही सांगतात ते वेगळे आहे आणि ते का करीत नाहीत? ते वेगळे आहे.

**<u>सदस्य, श्रीम. कविता बागुल:—</u>** सेलवन साहेब, तुम्ही माझ्या प्रश्नाचे उत्तर दया पहीले.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** त्यामुळे त्या फाईल तुमच्याकडे येतच नाहीत, जो पर्यंत डी.एस.आर. रेट क्लीयर होत नाही. कसे काय होणार? काय प्रॉब्लेम आहे? तुमचा प्रयत्न आहे.

**<u>सदस्य, श्री. शेखर यादव:—</u>** महापौर मॅडम, बोरवेलचे काय झाले?

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** सन्माननिय सदस्य, आता एक एकाचे उत्तर सेलवन देतील आपण कृपया करून शांत बसा. पहीले एकाचे उत्तर देतील नंतर दुस—याचे उत्तर देतील.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** महापौर मॅडम, माझा जो विषय होता, त्याच्यावर चर्चा झालीच नाही.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** हे बरोबर आहे, त्याच्यावर चर्चा झाली पाहीजे. दिपक सिरवानी यांनी जो प्रश्न विचारला होता, त्याच्यावर चर्चा झाली पाहीजे.

**सदस्य, श्री. महेश सुखरामनीः—** महापौर मॅडम, एक क्लीयर करायला पाहीजे, ते टी.डी.आर. तर्फे झाले पाहीजे.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** महापौरजी आपण सांगितले होते की, प्रस्ताव करून नंतर चर्चा व्हायला पाहीजे, तर चर्चा झाली पाहीजे.

**सदस्य, श्री. महेश सुखरामनीः—** टी.डी.आर. तर्फे झाले पाहीजे, कारण की, एका प्रभागामध्ये ६० लाखाचा टेंडर ठेकेदार कनफॉम करीत नाही, चार नगरसेवक, चार वार्ड, एक प्रभाग करून आपण टेंडर काढीत आहेत, त्यामध्ये कोणतेच काम व्यवस्थित होत नाही. प्रत्येक जण खेचत आहेत आणि चार लोक वेगवेगळे असल्यामुळे चार लोक काम करतील आणि प्रत्येक नगरसेवक सेटीसफाईड होईल. प्रत्येक नगरसेवकांचे वेगवेगळे टेंडर काढा. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण असे बायफरेकेशन करून टेंडर काढा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, मा. आयुक्तांनी हा जो कार्यालयीन आदेश काढला आहे. ३ जुलैला काढला आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** आयुक्त साहेब, ३, ३ लाखाच्या संदर्भात सांगा, यांचे लोकांचे काय म्हणणे आहे, तीन तीन लाखाचे टेंडर काढा, नगरसेवक काय, एखादी गल्ली असते, तुम्ही दहा लाखाचे काढले मग त्यामुळे इतर महानगरपालिके प्रमाणे जसे वसई विरारला चालू आहे तसे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—** टेंडर काढण्याची पुर्वीची जी पध्दत होती, ते पुर्ण पॅनलचे एकत्रित टेंडर काढले जायचे आणि त्या पॅनलमध्ये सगळी कामे एका पाठोपाठ सुरू व्हायची त्यामुळे ब—याच वेळा लोकांचा रोष व्हायचा की माझे काम कधी होईल, तुझे काम कधी होईल. त्याच्यामुळे या वेळेला टेंडर न काढणे आणि तीन तीन लाखाचे काम करणे याच्यामध्ये फार फरक आहे. तीन तीन लाखामध्ये काय व्हायचे की, चांगले काम होत नाही, असा एक जनरल अनुभव आहे, तीन तीन लाखामध्ये त्याच्यामुळे ई— टेंडर, मागच्या वेळेला जो निर्णय होता की, ई—टेंडर कम्पलसरी करायचे, ई—टेंडर कंम्पलसरी केलेले आहे. फक्त एका नगरसेवकाचे एक टेंडर निघेल, १० लाख रूपयाचे एक टेंडर निघेल. म्हणजे त्यांचा ठेकेदार स्वतंत्रपणे राहील आणि प्रत्येकाचे ई—टेंडरींग पण होईल. एका नगरसेवकाचे, म्हणून माझी सर्वांना विंनती राहील की, तुम्ही तुमचे १० लाखाची जी कामे करायची आहेत, ते लगेच देवून टाका म्हणजे आम्हांला लगेच त्याचे टेंडर काढता येतील.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** आयुक्त साहेब, प्रभाग समितीची पण?

**सदस्य, श्रीम. कविता बागुलः—** मा. आयुक्त साहेब, गेल्या एक वर्षा पासून....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, मा. आयुक्तांनी जे परिपत्रक काढले आहे, सभागृहाच्या सदस्यांना थोडे डाउट आहे, मी ते परिपत्रक क्लीयर करून सांगतो, मा. आयुक्तांनी क्लीयर लिहीले आहे की, नगरसेवक निधी १० लाख रूपये आणि प्रभाग समिती निधी १५ लाख रूपये, प्रत्येक सदस्यासाठी यामध्ये क्लिीयर लिहीले आहे. तर प्रत्येक नगरसेवकांनी आपले पत्र देवून आपले एस्टिमेट प्रत्येक नगरसेवकांचे वेगवेगळे टेंडर आयुक्तांनी सांगितले आहे. सभागृहातील सर्व सदस्यातर्फे मा. आयुक्तांना धन्यवाद देतो. त्याप्रमाणे १६ लाखाचे, ६४ लाखाचे जे जुने टेंडर झाले आहेत, त्यामध्ये पण ब—याच नगरसेवकांचे काम सुरू झाले नाहीत. त्यावर आपण लक्ष देवून ज्या नगरसेवकांचे काम सुरू झाले नाहीत, त्यांची कामे सुरू झाले पाहीजेत आणि टेंडर काढण्याची जी प्रक्रिया आहे, ती लवकरात लवकर सुरू करण्यात यावी. आता लक्षवेधी सुचना सुरू करा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** बाकी पदाधिका—यांचे पण दीड दीड करोड.

**सदस्य, श्रीम. कविता बागुलः—** सेलवन साहेबांनी, माझ्या प्रश्नाचे अजून उत्तर दिले नाही.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** सभागृह नेताजी, स्विकृत सदस्यांचे जे साडे बावीस लाख रूपये जे ठेवले होते, ते पण बोला प्लीज.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** ७८ नगरसेवक तुम्ही ४ लोक असे डिव्हाईड करा, तेवढा टाईम तुम्ही घेत जा, लक्षवेधी कुठे आहे?

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, सन्माननिय सदन आज या लक्षवेधीच्या माध्यमातून माझी लक्षवेधी स्विकारली आहे. त्यासाठी धन्यवाद. ही लक्षवेधी आणण्याचा उद्देश हा आहे की, जे नगरसेवक मागच्या तीन वर्षापासून नगरसेवक निधीसाठी अशी कोणतीही महासभा झाली नाही की, अशी कोणतीही स्थायी समितीची सभा नाही की, अशी कोणतीही विभाग प्रमुखांची मिटींग नाही, किंवा महापौरांकडे, उप महापौरांकडे, सभागृह नेत्याकडे, विरोधी पक्ष नेताकडे किंवा स्थायी समिती सभापतींकडे ज्या पण मिटींगमध्ये चर्चा झाली असेल तर पहीले विषयावर चर्चा झाली आहे की, नगरसेवक निधीचे काय? खुप दु:खाने सांगावसे वाटते की, जेव्हा निंबाळकर साहेब, आले होते,...

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** दुस—यांना बोलू दया. मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, महापौरजी आपण सांगितले होते की, आपण राजीव गांधीनगरमध्ये येऊन सेलवन साहेबांना ते काम दाखवणार होत्या, सेलवन साहेबांनी येऊन बघितले का? त्यांना विचारा आणि सांगा. सेलवन साहेब, आहेत कुठे तुम्ही? तुम्हांला महासभेमध्ये सांगितले होते, आपण राजीव गांधीनगरमध्ये आले होते का? सेलवन साहेब, आपण प्लीज माईकवर या, नाही तर मी इथे माईक तोडून टाकीन खुप शांतता घेतली आहे, मा. महापौरजी, सेलवन साहेब, तिथे आले नाहीत. राजीव गांधीनगरमध्ये पाईप लिकेज आहे. महापौर मॅडम आपण सांगा निधी देणार नाही.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मा. महापौरजी, आपण यांची तीव्रता ऐका हे जे बोलत आहेत, एक तर ते पेशंट आहेत, त्यांना जो त्रास आहे, ते परत परत आपल्याला विचारत आहेत, जरा ऐका ते ऐकत नाहीत. आपण आदेश देतात, आपल्या आदेशाचे पालन होत नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, सभागृहामध्ये आताच सन्माननिय सदस्य, श्री. रवि बागुलजी, ते पहीलेच आजारी आहेत. त्यांच्या वार्डावर विशेष लक्ष देवून आपण आदेश करा की, त्यांचे जे पण काम लवकरात लवकर पुर्ण केले जावे. सभागृहामध्ये जे बोलू शकत नाहीत, उठू शकत नाहीत, त्यांना एवढे ओरडावे लागते, हे सभागृहामध्ये ठिक नाही. मी आपल्याला निवेदन करतो की, आपण श्री. रवि बागुलजी यांना आपल्या कार्यालयामध्ये बोलवा आणि पाणी पुरवठा विभागाचे श्री. सेलवनजी यांना पण बोलावून त्यांचे काम लवकरात लवकर पुर्ण करा.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** मॅडम राजीव गांधीनगरमध्ये एक वेळा प्लीज.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय आयुक्तजी, आमचे सदस्य, श्री. रवि बागुल यांना जी समस्या आहे, आपण सेलवनजींना ऑर्डर दया, त्यांची समस्या सोडवण्यात यावी.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** मॅडम, मागच्या वेळस पण ऑर्डर दिली होती, सेलवन साहेब आले नाहीत, सेलवन साहेब, दोन मिनीट स्टेजवर या माझ्या समोर.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी, साहेब, ते काय सांगतात की, माझ्या वार्डामध्ये लिकेज आहे, ते बनले पाहीजे, लिकेज बंद करा.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** ते आजारी आहेत, म्हणून ते जास्त बोलू शकत नाहीत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** लिकेज मोठा आहे का?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** लिकेज बंद करा, असे म्हणून सांगत आहेत ते.

या वेळी सदस्या, श्रीमती वसुधा बोडारे व सदस्या, श्रीमती शितल कदम या सभागृहाच्या बाहेर गेल्या.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** लिकेजच्या बाबत, आता लिकेजचे काम करण्यासाठी आपण सर्व प्रभाग अधिकारी यांना आपण ॲडव्हॉन्स दिलेला आहे. प्रभाग अधिकारी, तुमचे प्रभाग क्रमांक एक आहे ना? सामतांनी हे लिकेज उद्याच्या उद्या ताबोडतोब बंद करून टाका तुम्ही.

**सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—** सामतांनी कुठे आहेत, सामतांनी आहेत कुठे? सामतांनी साहेबांना विचारा ते येतील का? साहेब, कोणी येत नाही?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** सामतांनी उद्याच्या उद्या ते लिकेज तुम्ही बंद करून टाका?

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** ही लक्षवेधी आणण्याचा उद्देश आहे की, जो नगरसेवक निधीसाठी परत परत प्रत्येक महासभेमध्ये बोलावे लागत आहे, ते निंबाळकर साहेबांच्या कालावधीमध्ये दुर्भाग्यने मिळाले नाहीत. परंतु आपण आले आशा पल्लवीत झाल्या आणि नगरसेवक निधी मिळेल आणि आपण आल्या बरोबर जुना निधी पहीले १६ लाख रूपयाचे नगरसेवक निधी पेडींग होते, ते

आम्हांला इश्यु केले आणि कुठे ना कुठे सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये टेंडर पास करणे आणि पुढील प्रक्रिया पाठपुरावा करण्यासाठी जेवढे पण नगरसेवक आहेत, ८२ आणि पाच नगरसेवक सार्वजनिक बांधकाम विभागाला आम्ही वारंवार नगरसेवक निधीचे काय झाले? आणि काय होत आहे? कसे होत आहे? प्रोसेस काय आहे? दहा वेळा सांगितल्या नंतरही सार्वजनिक बांधकाम विभागाने तिथे दिरंगाईची जी पध्दत बनवली आहे, त्यामुळे लेट होऊन जातात, त्याचा फायदा, गैरफायदा ठेकेदार घेतात. ठेकेदाराला वेळेवर एक्शेपशन मिळत नाही, वर्क ऑर्डर मिळत नाही आणि वर्क ऑर्डर मिळते एम.डी. भरल्या नंतरही त्यांना वर्क ऑर्डर घेत नाहीत. वर्क ऑर्डर घेत नाहीत तर नगरसेवकाचे काम होत नाही. आता आपण जे १० लाखाचे निधी पहीले दिले आहे आणि आज जे जाहीर झाले आहे, १५ लाखाचे अजून निधी आहे तर अशी काही वेळ नाही की, नगरसेवक प्रभाग समिती ऑफिस आणि सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये जातात आणि प्रोसेस पास करण्यासाठी बोलतात पण त्यांचे नेहमीचेच स्टाफ कमी आहे आणि कामाचे लोड असे कारण सांगून नगरसेवक निधी थांबवतात आणि काम वेळेवर होत नाही, त्याचा फायदा वारंवार तेच ठेकेदार ई—टेंडरींग पध्दतीचा दुरुपयोग करून ठेका घेतात, कमी दराने घेतात आणि नगरसेवकाचे काम होत नाही. त्याचा आक्रोश आज भर सभेमध्ये प्रत्येक सदस्यांकडून आपल्याला ऐकायला मिळाले. ही लक्षवेधी आणण्याचा उद्‌देश हाच आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये जी दिरंगाई चालली आहे, संथ गतीने काम चालले आहे, त्या कामाला कुठे तरी गती देण्याची आवश्यकता आहे. जर आम्ही तुमच्याकडे येतो, तेव्हा आपण सांगतात की, ही प्रोसेस माझ्या डिपार्टमेंटची आहे. तर तुम्ही का येतात? जर नगरसेवक आपली फाईल घेऊन चार वेळा, सहा वेळा टेबलवर घेऊन गेला नाही तर अॅसेसमेंट करून घेतले नाही, सही करून घेतले नाही तर नगरसेवक निधीचे काहीच काम होणार नाही, एक रूपयाचे काम होणार नाही. आज सार्वजनिक बांधकाम विभाग १५ दिवस झाले पुर्णपणे कमकुवत झाले आहे. वारंवार शहर अभियंता, कनिष्ठ अभियंता, उप अभियंता नेहमी हेच सांगत असतात की, आमच्या जवळ स्टाफ नाही, स्टाफ कमी आहे. ठिक आहे, त्यांच्या जवळ स्टाफ कमी आहे, तर ती त्यांची जबाबदारी आहे. त्यांच्याकडे काम आहे का? फक्त नगरसेवक निधी, आमदार, खासदार निधीचे एस्टिमेट बनवणे, त्याची प्रोसेस करणे दुसरे कुठलेच काम नाही. हे माहीती पण आहे, तरी सर्व नगरसेवकांना वारंवार यावे लागते. आज या लक्षवेधीच्या माध्यमातून हे सांगायचे आहे की, एक दम कमकुवत डिपार्टमेट सार्वजनिक बांधकाम विभाग संपुर्ण महानगरपालिकेमध्ये कामाच्या बाबतीत गती देण्यासाठी लक्ष केंद्रित करावे लागेल. आपण हेड ऑफ डिपार्टमेंट आहेत, आपण महानगरपालिकेचे प्रमुख आहेत, जर तिथे काम झाले नाही, तिथे त्रास असेल तर आम्ही तुमच्याकडेच येणार, आम्ही का ओरडत असतो? आमच्याकडून का अपशब्द निघत असतात? नगरसेवक कायदा हातात घेण्याचे का बोलत असतात? शिवीगाळ पण करतात, त्याचे कारण काय आहे? याचे कारण एकच आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये वेळेवर काम होत नाही. आमचे फंड आमचे अधिकार आहेत, त्याचे काम होत नाही, जनतेची कामे आम्ही करू शकत नाही आणि जनता आम्हांला शिव्या देतात आणि तोच आक्रोश काढण्यासाठी आम्ही महासभेमध्ये डिपार्टमेंटला आम्ही शिव्या देत असतो. तर आजची लक्षवेधी आणण्याचा माझा उद्‌देश हाच होता की, आपल्याला या डिपार्टमेंटला गती दयायची आहे आणि इथे जो स्टाफ कमी आहे, तो पुर्ण करण्यात यावा, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती वसुधा बोडारे व सदस्या, श्रीमती शितल कदम यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** महापौर मॅडम, या लक्षवेधीचा अनुमोदक मी होतो, आता सुरू होते आहे, महापौर मॅडम मागच्या वेळेस श्री. गुलाबराव पाटील त्यांचे सोशल मिडीयावर, ते शिवसेनेचे खुप चांगले वक्ता आहेत. आमच्या सत्ता पक्षाचे शिवसनेचे आमदार आणि मंत्री पण आहेत. ते विधान सभेमध्ये बोलत होते की, ई— टेंडर अशी प्रक्रिया आहे की, संपुर्ण देशामधून कोणी पण टेंडर भरतात आणि माझ्या निधीचे जे २ करोड निधी आहे, श्री. गुलाबराव पाटील यांचे त्यामध्ये मला नविन लोकांडून काम करून घेण्यासाठी अडचण निर्माण होते. मी श्री. गुलाबराव पाटील यांना भेटण्यासाठी जाईन आणि त्यांना सांगेल की, आपण चिंता करू नका, उल्हासनगरमध्ये या, इथे तुम्हांला सगळया आयडीया मिळतील की, कशा प्रकारे आपण आपल्या ठेकेदारांकडून कामे करून घेऊ शकतात? त्याचे एक कारण सांगतो सर, बिलो का होते बिल लास्ट क्वांटीटी तो टेंडर जेव्हा आपण उघडणार तेव्हा तो सरळ दिसायला पाहीजे. मी एक साधारण उदाहरण देतो की, जर मी एखादया मॉलमध्ये गेलो, एक छत्री बघितली तीची किंमत १०० रूपये होती, ती मला महाग वाटली त्यामुळे मी घेतली नाही. आपल्या इथे दर दिसतच नाही, मी टेंडर उघडले तर दर दिसतच नाही. जो पर्यंत मी १० हजार टेंडर फी भरणार नाही, भरल्या नंतर रेट दिसतील. संपुर्ण देशामध्ये बघितले तर टेंडरचे रेट दिसणारच नाहीत, रेट तेव्हा दिसतील, जेव्हा टेंडर फी भरणार तेव्हा आपल्याला शेडयुल पण दिसेल आणि या वस्तुचा हा रेट आहे, तेव्हाच आपल्याला समजेल. मग

बिचारा बोलेल की, जाऊ दया, शेडयुल पण दिसत नाही जास्त लोकांनी भरले असेल. दुसरी गोष्ट म्हणजे कंडीशन लावा, कंडीशन कसे लावतात, उदाहरणार्थ सर डांबराचे काम आहे, खड्डा भरण्यासाठी बेसमेंट प्लॉन असायला पाहीजे. बाकीच्या महानगरपालिकांमध्ये कुठे पण नाही? तो पण ३० किलो मिटरच्या आत असायला पाहीजे. मी बघितले ३० किलो मिटरच्या आतमध्ये एकुण दोन बेसमेंट प्लॉन आहेत. ते दोन लोक भरतात आणि तिसरा ड्रम मिस प्लॉनवाला भरवतात, लाड होता मागच्या वेळेस त्याने भरले होते, त्याचे काम सगळयात चांगले आहे. ज्यांनी पण १३ टक्के बिलो भरले होते, त्यांनी खुप चांगले काम केले. कारण की, त्याच्या जवळ बेसमेंट प्लांट नव्हते त्याचे काम रद्द करण्यात आला. डिस क्वालिफाईड ही मागच्या वर्षीची गोष्ट आहे आणि याच्या नंतर दुसरी पध्दत काढलेली आहे की, ५ (२) (२) मध्ये घ्यायचे आहे. उशिरा पर्यंत एस्टिमेट बनवायची नाही, शहर अभियंता यांनी पावसाळा आल्या नंतर जेव्हा लोक ओरडयला लागतील, गणपती उत्सव आले, चालिया साहेब उत्सव आला साहेब करा, करा, बिचारे आयुक्त काय करतील? ठिक आहे मी करतो ५ (२) (२) मध्ये हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे काम आहे. याच्या मागे भ्रष्टाचार आहे आणि तिसरा शेवटचा मुद्दा खुप चांगला आहे. डिस क्वालिफाईड एक ठेकेदार खुप वेळेपासून आपल्याकडे काम करीत आहे, रेग्युलर ठेकेदार आहे, त्याचे टेंडर डिस क्वालिफाईड का करीत आहेत? कारण त्याची पॅन कार्डची प्रत जोडलेली नाही, ता रेग्युलर आपल्याकडे काम करीत आहे, त्यांनी पॅन कार्डची प्रत जोडलेली नाही आणि टेंडरमध्ये क्लीयर लिहीले आहे की, एखादा डॉक्युमेंट कमी असेल तर आपण बोलावू शकतात. सरळ डिस क्वालीफाईड. कारण की, माझ्या मनासारखा ठेकेदार आलेला नाही. सर हे डांबरीकरणाचे काम मागच्या तीन वर्षा पासून जय भारत कंस्ट्रक्शन कंपनीला मिळत आहे. गुलाब रावजी आपण माझा आवाज ऐकत असाल तर उल्हासनगरमध्ये या. उल्हासनगरमध्ये या किंवा मी आपल्याकडे येतो, माझ्याकडे खुप आयडीया आहेत. एक दुसरी गोष्ट सांगतो सर, एक टेंडर काढण्यात आला, त्यामध्ये एक कंडीशन टाकण्यात आली की, संस्थे जवळ स्वत:चे वोकेशनल प्रमाणपत्र असायला पाहीजे. संस्था एन.जी.ओ. असायला पाहीजे, संस्थे जवळ तीन वर्षाचे ऑडीट असायला पाहीजे आणि संस्थे जवळ कामाचे अनुभव असायला पाहीजे, असे लिहीले होते. वोकेशनल प्रमाण पत्र होते ते, पण वोकेशनल प्रमाण पत्र लागत नाही. संपुर्ण महाराष्ट्रामध्ये बघितले तर सार्वजनिक बांधकाम विभागाला वोकेशनल प्रमाण पत्र लागत नाही. परंतु नंतर माहीती झाले की, एन.जी.ओ. ची अट काढण्यात आली. पहील्या वेळेस टेंडर भरला त्या टेंडरमध्ये त्याच्या जवळ रजिस्टर प्रमाण पत्र नव्हते, अनुभव नव्हता, तो टेंडर नंबर पहीला होता, १४८८, १४९९, १४९०, १४९१ फेब्रुवारी, २०१८ मध्ये झाला होता. चार ते पाच गार्डनची कामे होती. परत त्याच कंपनीला देण्यात आला, त्यायचे आहे तर कोणती पध्दत वापरली जाईल, बाकीचा संपुर्ण टेंडर तसाच राहीला फक्त एक लाईन जोडली गेली जॉईंट वेंचर विल बी आलाऊड संयुक्त उधमी आपल्याला अलाऊ केले आहे, असे त्यामध्ये चेंज केले. त्यासाठी काही पण ब्रि कॉन्सी नाही. एन.जी.ओ. ने एखादया ठेकेदारा बरोबर जॉईंट वेंचर केले असे होणार आहे. असे काही ठेकेदारांनी शहर अभियंता यांना पत्र दिले, त्यांना फेवर करण्यासाठी करीत आहेत, ते पत्र रेकॉर्डवर आहे. तरी सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाने परत त्या कंडीशन काढून टाकल्या आणि दुस—या वेळी का कॅन्सल केले कारण की त्यांनी प्री बिट मिटींग घेतली नाही. तिसरा कॉल केला, आता पण तीच कंडीशन आणि सरकारद्वारे एक सुचना जारी केली आहे, सुचनेमध्ये असे लिहीले आहे की, १७ करोडच्या टेंडरला एक महीना, दुस—या कालावधीसाठी २१ दिवस, तिस—या कालावधीसाठी १५ दिवस इथे वेळ दिली गेली तीन, तीन, तीन दिवस खुपच महत्वाचे आहे. सर माझा म्हणण्याचा अर्थ असा आहे की, नाला सफाईचे जेव्हा काम येते, तेव्हा एकच ठेकेदार आहे, शुभम कंन्सस्ट्रक्शन कंपनी १५ वर्षा पासून करीत आहे आणि सी.एफ.सी. चे जे काम आहे, ते २० वर्षा पासून एकच ठेकेदार, अमर ज्योत कंन्सस्ट्रक्शन करीत आहे. आपल्या इथे ई—टेंडरचा काहीच फरक पडत नाही. जे.पी. कॉमप्युटर काही दिवसा पासून २० वर्षा पासून खरेदी—विक्री तेच करीत आहेत आणि आपल्या ज्या सहा, सात कॅबिन आहेत, त्या श्री. सोनू खटवानी करीत आहेत. त्यांना इथले सोहन ऑथरीटी एजंट बनवले आहे. तरी गुलाब रावजी आपण आमच्या इथे या आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शिका की, कशा प्रकारे माझ्या समोर देहेरकर साहेब बसले आहेत, मी त्यांना सांगितले होते, मी त्यांना तक्रार केली होती. तुम्हांला पण माहीत असेल की तुम्ही शहर अभियंता यांना बोलावले होते आणि मी सांगितले होते की, जर कोणी कोर्टामध्ये गेले, ज्या प्रकारे अनियमितता आहे, तर आपल्याकडे शेवटी येतात. आपल्याकडे कोणी तरी ठेकेदार आले होते की आमचे काम का रद्द केले आहेत? तुम्ही असे उत्तर दिले की, मला माहीत नाही, मला अधिका—यांचे कामाची गरज नाही, यासाठी मी केले आणि मागची कामे कॅन्सल झाले. ते काही ठेकेदारांनी केले होते, त्याच्या मागे जी कहानी आहे, ती वेगळी आहे. ते शहर अभियंता यांनी का कॅन्सल केले? त्याचे जर प्रमाण आले तर कशा प्रकारे यामध्ये बेईमानी झाली आहे? बाद करणे प्रमाण नाही होत मी आपल्या क्रेडीबिलिटीवर प्रश्न चिन्ह लावायचे नाही. परंतु सर तुम्ही प्रामाणिक पणे काम करीत आहेत, ते दिसत आहे. जे टेंडर अजून पर्यंत पास होत नाही, या सर्व गोष्टीवर लगाम लावला पाहीजे. शेडयुल होतात तर बिलो बिल होते, ते ओपन

टेंडरमध्ये दिसायला पाहीजे. जो पण ठेकेदार बघेल आणि मला रेट परवडतील तर काम करायला पाहीजे. १० हजार फी भरेल, ५ हजार फी भरेल नंतर त्यांला बिलो का दिसेल? हा खुप मोठा गुन्हा आहे. धिस इज दि क्राईम पार्ट ऑफ पी.डब्ल्यु डी. डिपार्टमेंट. सर दुसरे टेंडरच्या ज्या कंडीशन असतात, त्याचे नाव बनले आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे वर्क ऑफ शेडयुल घेतात, त्या नावाच्या आत बसतील तेवढयाच टाकण्यात याव्यात कमीत कमी स्पर्धा होईल आणि चांगले लोक येतील. सर आपण सांगा तुम्ही बेसमेंट प्लांटची कंडीशन ठेवली होती, रोडच्या डांबरीकरणासाठी, जय भारत कन्स्ट्रक्शनसाठी डॉलफिन पासून ते साई बाबा मंदिर पर्यंत संपुर्ण रोड चकाचक बनवला होता. आज तिथे स्विमिंग पुलासारखा तलाव बनला आहे. साहेब, बेसमेंट प्लॉट ची काय गरज आहे? जो लाडने बनवला होता, १३ टक्के बिलो करण्याच्या नंतर त्यांनी जे काम केले त्यामुळे दोन तीन वर्ष निघून गेले. सर आपण कुठे आहे, आपण शहरा विषयी थोडी तरी इमानदारी ठेवायला पाहीजे आणि ढिले होण्याचे कारण पण हे आहे की, माझ्या पसंतीचा ठेकेदार आला नाही कशा तरी प्रकारे रीकॉल करा. ग्रीन स्पेसचे काम तीन वेळा रीकॉल झाले होते आणि दलित वस्तीचे काम दिले होते, ते बाकी लोकांचे जाणूनबुजून डिस क्वालिफाईड करण्यात आले आणि बाकीचे जे मनपसंत आहेत, त्यांना ऑर्डर देण्यात आली. सर या गोष्टींवर आपण लक्ष दयाल आणि कमीत कमी जे करतात, जे भरतात त्यांच्यावर लक्ष राहील, नाही तर सर प्रत्येक गोष्टीवर, आता रमेश चव्हाण बोलत होते की, ओरडून ओरडून बसून घेतील, काहीच होणार नाही? परंतु एक दिवस असा येईल की, लोक न्यायालयामध्ये जातील आणि त्याच्या नंतर आपल्या शहराचे नाव खराब होईल. सर त्याच्या पहीले जर आपण त्यांच्यावर कारवाई कराल, आयुक्त मॅडम मी जे सांगत आहे, ते प्रमाणिकपणे सांगत आहे आणि जे पण मी सांगत आहे, ते जर खोटे असेल तर मी राजकारणातून संन्यास घेईल, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती सुमन सचदेव व सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे, सदस्या मिनाकौर लबाना व सदस्या, श्रीमती जया माखिजा या सभागृहाच्या बाहेर गेल्या.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u>** मा. महापौर मी तुम्हांला आणि आयुक्त साहेबांना धन्यवाद देतो की, जे त्यांनी आज एक पत्र वाचून दाखवले की, १० लाख रूपये नगरसेवक फंड, १५ लाख रूपये प्रभाग समिती फंड देण्यासाठी आदेश काढला आहे. दुसरे त्यांनी सांगितले की, जो ६४ लाखाचा एकत्रित फंड काढत होतो, त्यामध्ये सुध्दा बदल केला आहे आणि १०, १० लाख किंवा १५, १५ लाखाचे जो टेंडर आहे आणि जे त्यांना योग्य वाटले किंवा जो तुम्ही त्यांना आदेश कराल, ते करतील त्यासाठी पण मी त्यांना धन्यवाद देतो. अजून एक चांगली गोष्ट मी सांगणार आहे, शहरामध्ये काही असे ठेकेदार आहेत की, ते ठेकेदार खुपच बिलो भरतात आणि बिलो भरल्यामुळे त्यांना परवडतच नाही. आज एवढी महागाई झाली आहे की, कोणतीही वस्तु सरकारी नियमानुसार, सरकारी भावाने कोणाला काम करण्यासाठी परवडणारच नाही. जर तो ठेकेदार जर १५, २० बिलो भरतात तर काम काय करणार? जर त्याला काम परवडणारच नाही, तर तो काम करणारच नाही. तर नगरसेवक त्या वार्डमध्ये काम घेतले आहे तर ते त्रस्त होतात. तरी कृपया या गोष्टीवर सुध्दा लक्ष दया. सर्व आपल्या महानगरपालिकेचे दोन पैसे, पाच पैसे वाचवण्यासाठी अशा ठेकेदाराला आपण काम देणार तर ते काम करणार नाही आणि नगरसेवक आणि महानगरपालिकेचे काम बदनाम होईल अशी माझी विनंती आहे की, ते लक्षात घ्यावे आणि जे अधिकारी चार, चार महीने टेंडर उघडत नाहीत, त्याच्यावर पण लक्ष दया. जसे आमच्या मनोज भाई यांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभाग काही दिवसापुर्वी हेच बोलत आहे की, प्रभाग समितीसाठी आयुक्त साहेबांनी नाही म्हणून सांगितले आहे, जर चार तारखेला आदेश निघाला आहे, तर त्यांनी नाही म्हणून कधी सांगितले? तरी कृपया ते पण दिशाभुल करीत आहेत, जे अनोळखी अधिकारी आहेत, त्यांच्यावर नियंत्रण ठेवा, त्यांना समज दया, त्यांचे मन परिवर्तन करा की, त्यांनी कसे काम करायला पाहीजे? तरी कृपया माझी विनंती स्विकार करून त्याच्यावर आदेश कराल तर बरे होईल, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीमती सुमन सचदेव व सदस्या, श्रीमती सुनिता बगाडे यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** मा. महापौरजी, आज श्री. मनोज लासी यांनी इथे जी लक्षवेधी प्रस्तुत केली आहे, सार्वजनिक बांधकाम विभाग जो काम प्रॉपर करीत नाही आणि लोकप्रतिनिधींना, नगरसेवकांना, जनतेला उत्तर दयावे लागते आणि उत्तर देणे खुप कठीण जाते. सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये पहीले आठ जुनियर इंजिनियर काम करीत होते, आठ प्रभाग होते, आठ झोन होते

आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी चार उप अभियंता होते आणि त्यांच्यावर एक इंजिनियर होते, नगरपालिकेच्या वेळी हे सर्व होते. आज परिस्थिती अशी आहे की, आपल्याकडे प्रभारी, शहर अभियंता आहेत आणि त्यांच्या बरोबर चार किंवा पाच इंजिनियर आहेत. त्यांना जेवढे पण काम, प्रोजेक्ट चालू आहेत, ते सांभाळू शकत नाहीत. त्यामुळे मजबुरीने मोठया प्रोजेक्टसाठी आपण कन्सल्ट नेमण्यात येतो. याचा पण खुप मोठा खर्च आहे. १५ सप्टेंबरच्या जनरल बॉडीमध्ये प्रशासनाकडून एक प्रस्ताव आला होता, त्यामध्ये जनरल बॉडीमध्ये ६१ भरती करण्यासाठी परवानगी मागिंतली होती. याच्या पहीले जुनमध्ये श्रीम. पंचम कालानी आणि मी एक स्पेशल जनरल बॉडी बोलवली होती. यामध्ये अग्निशमन विभागामध्ये लोक खुप कमी आहेत आणि त्या लोकांना ठेकेदारी पध्दतीने काम करून घेतले जात आहे आणि त्याच बरोबर सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, लाईट डिपार्टमेंटमध्ये पण इंजिनियर नाहीत, त्यासाठी सुध्दा आम्ही मागणी केली होती. तर त्यावेळी प्रभारी आयुक्त यांनी आपल्या समोरच सांगितले होते की, आयुक्तांसमोर या गोष्टी ठेवल्या जातील. त्यांनी संपुर्ण अवलोकन दिले होते की, आपल्याकडे वर्ग—४ मध्ये २५ टक्के कर्मचारी कमी आहेत, वर्ग—३ मध्ये ३५ टक्के कमी आहेत आणि वर्ग—१ व वर्ग—२ मध्ये पण स्टाफ कमी आहे. या सर्व गोष्टी बघितल्या नंतर महासभेने त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये, पाणी पुरवठा विभागामध्ये व लाईट डिपार्टमेंटमध्ये इंजिनियर, जसे कनिष्ठ अभियंता व उप अभयंता थेट भरती करण्यासाठी मंजुरी दिली होती. तर मला माहीती पाहीजे की, थेट मंजुरी ५ मार्चला मिळाली आहे. तर ५ मार्चला मंजुरी मिळाल्या नंतर आज जुलै पुर्ण झाला आहे. तर आज पर्यंत ती भरती झाली आहे का? आणि जर झाली नाही तर का झाली नाही? जो दिरंगाईचा आरोप आहे, त्याचे कारण एकच आहे, जरा त्याचा मला खुलासा दया. मा. महापौरजी आपण आयुक्तांना निर्देश दयाल का?

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** सन्माननिय आयुक्तजी, कृपया आमचे नगरसेवक यांना खुलासा दया.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** जी ६१ पदे महासभेने भरण्यासाठी मंजूरी दिली होती, त्याचा प्रस्ताव जो आहे, तो सरकारकडे गेला आहे. मधल्या काळामध्ये आम्ही आणि महापौर मॅडम मा. मुख्यमंत्र्याकडे एक मिटींग पण घेतली होती, त्या मिटींगमध्ये आम्ही मुद्दा उपस्थित केला होता की, आम्हांला अजून सरकारकडून मंजुरी मिळाली नाही. आपला जो एस्टाब्लीश एक्सपेंडीचर आहे, ३५ टक्के पेक्षा जास्त आहे आणि त्यामुळे ज्या महानगरपालिकेचे एस्टॅबलिसमेंट एक्सपेंडीचर ३५ टक्के पेक्षा जास्त आहे, त्यांना सरकारच्या परवानगी विना पोस्ट भरू शकत नाही आणि त्यासाठी ते परमिशन सरकारकडे पेडींग आहे. ते परमिशन जेव्हा मिळेल तेव्हा ही पद भरले जातील, अजून पर्यंत परमिशन मिळाले नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** मा. महापौरजी, मी आपल्यांना आणि उप महापौर यांना निवेदन करतो की, महाराष्ट्र शासनाकडे तुम्ही पाठपुरावा करा की, ही पदे भरण्यासाठी आपल्याला लवकरात लवकर मंजुरी मिळावी.

**<u>महापालिका सचिव:—</u>** लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत, श्री. राजेंद्र चौधरी व अनुमोदक आहेत, श्रीम. सुरेखा आव्हाड.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक २</u>

**विषय:—** महापालिका क्षेत्रामध्ये परिसरातील गरीब गरजू नागरीकांसाठी महापालिकेचे स्वत:चे रूग्णालय नसल्यामुळे शहरातील नागरीकांना आरोग्य सेवा वेळेवर व ताबडतोब देणे शक्य होत नाही.

सुचकाचे नांव:— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव:— श्रीम. सुरेखा आव्हाड

महानगरपालिकेमध्ये क्षेत्रामध्ये परीसरातील गरीब गरजू नागरीक मोठया प्रमाणात राहत असून त्यांच्या उपचारासाठी महापालिकेचे स्वत:चे रूग्णालय नसून, लहान लहान नागरी आरोग्य केंद्र उभारलेले आहेत. परंतु महापालिकेने उभारलेले नागरी आरोग्य केंद्राची संख्या कमी असल्याने शहरातील नागरीकांना आरोग्य सेवा वेळेवर व ताबडतोब देणे शक्य होत नाही, शहरातील नागरीकांचे

आरोग्याची निगा महापालिकेतील आरोग्य विभाग राखून शकत नसल्याने आरोग्य विभागाबाबत शंका निर्माण होत असल्याच्या तक्रारी वर्तमान पत्रात देखील प्रसिध्द झाल्या आहेत.

---

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** मा. महापौरजी, आजची ही लक्षवेधी सुचना आपल्या शहरामध्ये महापालिकेचे स्वत:चे रूग्णालय नसल्यामुळे आणि आपली जी आरोग्य सेवा आहे, ती कशा पध्दतीने काम करते? त्या विषयावर ही लक्षवेधी आहे. आपली जी आरोग्य सेवा सध्या काम करीत आहे, त्या सेवेमध्ये माजून चार ते पाच छोटे छोटे रूग्णालय असतील आणि त्या रूग्णालयामध्ये गोरगरीब जनता उल्हासनगरमध्ये राहणारी औषधोपचार घेत असते. अशा आरोग्य सेवेला सुधारण्यासाठी महापालिका म्हणून, महापालिकेचे महापौर म्हणून आपण काही तरी प्रयत्न करावेत. ही अरोग्य सेवा दिली जाते, ती लोकांना पुरेशी नाही. रोज हजारो नागरीक या शहरामधल्या रूग्णालयामध्ये जाऊन, आजारी असल्यामुळे रूग्णाल्यात उपचार घेत असतात. शासनाकडे मागच्या वेळला अनेक हेल्थ ऑफिसर इथे पदोन्नतीने आले होते. त्यांनी अनेक नव्या, नव्या स्किम या शहरामध्ये आणल्या होत्या. मला आठवते डॉ. लांजेरवाल या शहरामध्ये आरोग्य अधिकारी होते. त्यांनी या शहरामध्ये डिस्पेंसरी बनवण्यासाठी, हेल्थ पोस्ट बनवण्यासाठी निधी आणला होता आणि त्या निधीच्या आधारे आज ज्या काही हेल्थ पोस्ट बनल्या आहेत. त्या हेल्थ पोस्टच्या माध्यमातून आपले काम चालू आहे. डॉ. लांजिरवालची ही गोष्ट सन १९९७ ते १९९८ ची असेल, असे मला वाटते. मधल्या काळामध्ये असे कुठले प्रयत्न झालेले नाहीत? डॉ. खरात होते, त्या वेळेला काही तरी थोडे प्रयत्न झाले. पण या शहरामध्ये राहणारी जी काही गोरगरीब जनता आहे, त्यांच्या आरोग्याची निगा राखणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. असे असतांना महापालिका आरोग्या विभागाकडे दुर्लक्ष करते, खास करून या प्रशासनाचे प्रमुख म्हणून आयुक्तांनी या विषयाकडे गाभिर्याने बघितले पाहीजे, म्हणून ही लक्षवेधी आहे. या लक्षवेधीच्या माध्यमातून आपण मागच्या काही वर्तमान पत्रामध्ये, मी लोकमतमध्ये वाचले की, जेव्हा तुमची मुलाखत घेतली तेव्हा आपण त्यांना सांगितले की, ही योजना सुधारण्यासाठी, आरोग्य योजना सुधारण्यासाठी आम्ही प्रयत्न करतो, काही डॉक्टर, नर्स या भरल्या जातील आणि त्यांच्या माध्यमातून या सुविधा नागरीकांना दिल्या जाईल. माझी आपल्याला लक्षवेधीच्या माध्यमातून विनंती आहे की, आपण ते लवकरात लवकर करावे, ज्या काही नर्स, डॉक्टर भरण्याची प्रक्रिया करायची आहे, ती लवकरात लवकर करावी आणि जर या महापालिकेला आरोग्य केंद्र चालवण्यासाठी शासनाकडून काही निधी मिळत असेल किंवा हेल्थ ऑफिसर अजून जर चांगला अधिकारी पाहीजे असेल, त्यासाठी पण आपण प्रयत्न करावेत आणि शहरात जे नागरीक राहतात, त्यांच्या आरोग्याची निगा राखण्याची जबाबदारी व्यवस्थितरित्या महापालिकेने पार पाडावी, अशी या लक्षवेधीच्या माध्यमातून आपल्याला सुचना करतो, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. राजेश वानखेडे हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवेः—</u>** मा. महापौर मॅडम, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, ही लक्षवेधी खरच खुप जरूरी आहे, कारण मी गेल्या पाच वर्षा पासून मागणी करीत आहे. इतक्या मोठया लोकसंख्येच्या शहरात आपण कुठल्याच प्रकारच्या आरोग्य सेवा पुरेपुर देत नाहीत आणि जे काही आरोग्य केंद्र आहेत, त्यांच्यावर पुर्ण वेळ डॉक्टर ठेवण्यासाठी मी गेल्या कित्येकदा मागणी केलेली आहे. पण पाच, सहा डॉक्टर पुर्ण वेळ आरोग्य केंद्राला का उपलब्ध का होत नाहीत. म्हणजे आपण एवढे सुध्दा करू शकत नाहीत का? सहा डॉक्टरांना नेमू शकतो. अल्टरनेट फक्त दोन तीनदाच डॉक्टर उपलब्ध असतात, ते पण रोज नसतात. तर या विषयावर आरोग्य अधिका—यांना विचारून नाही तर आपण सांगा सर. तिथे पुर्ण वेळ डॉक्टर उपलब्ध असायलाच पाहीजे.

**<u>सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाडः—</u>** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आरोग्य केंद्रांचा विषय आहे, तर आरोग्य केंद्र अशी असावीत की, तिथे गेल्या नंतर माणसाला आरोग्याची हमी असावी. त्या आरोग्य केंद्राच्या परिसरामध्ये कधी कधी एवढी अस्वच्छता असते की, तिथे गेल्या नंतर लोकांना वाटते की, आमचे आरोग्य बिघडते की, काय? आता गरीब जनतेला त्याच्या शिवाय पर्याय नाही, तर तुम्ही त्याच्यावर लक्ष दयावे आणि माझ्या अनुभवा प्रमाणे दहा, बारा वर्षापुर्वी अशी परिस्थिती होती की, मलेरिया डॉक्टर हे घरोघरी जायचे, लोकांच्या आरोग्याची चौकशी करायचे ती तर व्यवस्था आता आपल्याकडे नाहीच आहे. म्हणजे आपण उन्नतीकडे जात आहोत की अधोगतीकडे जात आहोत, हाच महापालिकेचा मोठा गहण प्रश्न आहे. दहा, पंधरा वर्षापुर्वीची जी परिस्थिती होती, त्याच्या पेक्षा आता बिकट परिस्थिती आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये आणि प्रत्येक विभागाचे,

कुठल्याही डिपार्टमेंटमध्ये सध्या अशी परिस्थिती नाही की ते तत्परतेने कुठले काम करीत आहेत? महापौर मॅडम, तुम्ही याकडे लक्ष दयावे, अशी माझी विनंती आहे.

या वेळी सदस्य, श्री. राजेश वानखेडे यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, हे मेडिकल डिपार्टमेंटच्या हिशोबाने बोलत आहेत, बरोबर आहे. उल्हासनगरमध्ये जे हेल्थ सेंटर आहेत, उल्हासनगर महानगरपालिकेचे पण एक हॉस्पिटल असायला पाहीजे, ते पण नाही. एक सेंट्रल हॉस्पिटल आहे, त्याला दर्जा दिला आहे सिव्हिल हॉस्पिटलचा, सिव्हिल हॉस्पिटल फक्त पोस्टमेन्टचा जॉब करते, या पेंशंटला सायनला घेऊन जा, या पेशंटला कळव्याला घेऊन जा, या पेशंटला के.एम. ला घेऊन जा तिथे पण डॉक्टर कमी आहे. विषय तर खुप गंभीर आहे, या विषयावर बोलायला गेले तर दोन दिवस नाही तर तीन दिवस लागतील. पण मी शॉर्टमध्ये बोलेल आमचे कर्तव्य आहे, आम्ही डॉक्टर प्रॉव्हाईट करेल, जेवढे पण आपल्याकडे महापालिकेचे छोटे डिसपेंसरी आहेत, तिथे डॉक्टर नाहीत, तिथे औषधे नाहीत. मी एक उदाहरण देतो तुम्हांला मी तुम्हांला एक पत्र पण लिहीले आहे, रिमांईडर पण दिले आहे. आज शहरामध्ये मोकाट जनावरे, कुत्रे पण आहेत, सगळयांच्या वार्डामध्ये कुत्रे आहेत, डॉग बाईट्स किती झाले आहेत? कुत्रा चावल्या नंतर त्यांचे इंजेक्शन उपलब्ध नाहीत, त्याच्या नंतर डॉक्टर उपलब्ध नाहीत. प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये बघा किती गर्दी आहे, बिल किती भरत आहेत? गरीब लोक कुठे जाणार? यासाठी माझे सर्वात पहीले डॉग बाईट्ससाठी आहे, डॉग बाईट्ससाठी मी आपल्याला पत्र दिले आहे. यासाठी आपण माझ्या बरोबर बोलले पण होते, त्याच्या नंतर मी डॉ. राजा रिझवानी यांच्या बरोबर पण बोललो होतो. त्याचे पण काहीच इमप्लीमेटेशन झाले नाही. म्हणजे डॉक्टर असून सुध्दा इमप्लीमेटेशन होत नाही. तर दुस—या डॉक्टरांकडून काय होत असेल. आज एवढय डिसपेंसरी आहेत, तिथे डॉक्टर आहेत का? तिथे औषधे आहेत का? तिथे स्टाफ आहे का? मेडिकल, पेरामेडीकल सर्व असायला पाहीजे. मेडिकल, पेरामेडीकल म्हणजे पॅरामेडिकल बोलणार तर त्यांना लो भाषेमध्ये सिस्टर, मॅटरन व कंपाउडर बोलतात, नाही आहे, तिथे छोटे मोठे आजार पसरले आहेत. म्हणजे रॅबिजमुळे पेशंट मरून जाईल,त्याच्या नंतर आपण कुत्र्यांना उचलणार का? इथे फक्त चर्चा होते, मी टेंडर केले आहे, टेंडरची प्रक्रिया थांबली आहे, कशामुळे थांबली आहे? तो पर्यंत आम्ही पेशंटला काय सांगणार? मी स्वत: माझ्या वार्डामध्ये तुम्हांला सांगितले, कुत्र्यांचे फोटो सुध्दा पाठवले होते, लोकांना पाठवले आणि विशेष बाब म्हणजे ही आहे की, एका पोस्टमनला कुत्रा चावला, पोस्टमॅनने पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन पत्र दिले आणि सांगितले की या एरियाचे पत्र मी वाटणार नाही. हे बरोबर आहे, पोस्ट ऑफिस कॅम्प नंबर १ ची गोष्ट आहे. त्या पोस्ट ऑफिसचे माझ्याकडे वॉईस रेकॉर्डींग पण आहे. सर मी सुध्दा लिखीत पत्र दिले आहे की आय नॉट वर्क इन दॅट एरिया बीकॉस ऑफ दि डॉग म्हणजे काय चालले आहे सर? मेडीकल नाही, पॅरामेडिकल नाही, शेवटी काय होईल? कुत्र्यांचे काय करणार? मला ते पण उत्तर पाहीजे, ते पहीले दया, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. राजेश वदारिया हे सभागृहा बाहेर गेले.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** मा. महापौरजी, मा. आयुक्त, राजेंद्र चौधरींनी जी लक्षवेधी आणलेली आहे, खरे तर या उल्हासनगर शहरामध्ये उल्हासनगर स्थापन झाल्या पासून आज पर्यंत आपण महानगरपालिकतर्फे एकही हॉस्पिटल देवू शकलो नाही. डॉ. लांजिरवाल असतांना त्यांनी फंड आणून फक्त दोन ते तीन हेल्थ पोस्ट दिलेल्या आहेत. त्या वेळेस असा निर्णय झालेला होता, मला चांगले आठवते मी त्या वेळेस होतो. प्रत्येक वार्डामध्ये किंवा प्रत्येक पॅनलमध्ये एक हेल्थ पोस्ट आपण निर्माण करू शकलो असतो. परंतु त्यावर आज पर्यंत कुठलीच कारवाई झाली नाही? आज ज्या हेल्थ पोस्ट आहेत, त्याची जर परिस्थिती बघितली तर आरोग्य विभागामधले सफाई कर्मचारी तिथे जात नाहीत. डॉक्टर हा नंतरचा विषय झाला, हे हेल्थ पोस्ट म्हणजे घाणीचे साम्राज्य झालेले आहे, ही परिस्थिती आताच्या घडीला आहे आणि या महानगरपालिकेची, महानगरपालिकेच्या आयुक्तांची, सर्व सन्माननिय सदस्यांची एक इच्छाशिक्ती असली पाहीजे की, या उल्हासनगरमध्ये महानगरपालिकेचे एक सुसज्ज हॉस्पिटल तुमच्या या कारकिर्दीत कसे बनवता येइल? त्याची जर प्रक्रिया आपण सुरू केली. आयुक्त साहेब, आता तुम्ही आले आहेत, तुमच्याकडून आमच्या अपेक्षा जास्त आहेत. एक सुसज्य हॉस्पिटल तयार करण्यासाठी ज्या ज्या निधीची आवश्यकता लागेल, त्या त्या निधींना जर सर्व सन्माननिय सदस्यांनी जर पाठींबा दिला, मदत केली तर मला वाटते एक सुसज्ज हॉस्पिटल तयार व्हायला काहीच हरकत नाही. परवाच लोकमतला एक बातमी आलेली आहे, पालिकेच्या आरोग्य केंद्राची पुर्नरबांधणी डॉक्टर, नर्स ६० पदे भरणार ही तुमचीच बातमी आहे. आता माझे म्हणणे असे आहे की, हेल्थ पोस्ट सध्या मोजक्याच एक दोन मला वाटते सम्राट अशोकनगरमध्ये आहे, एक आमच्या प्रभागामध्ये आहे, एक तुमच्याकडे आहे. या हेल्थ पोस्टचीच

आवस्था अगदी वाईट आहे. माझे म्हणणे असे आहे की, येणा—या कालावधीमध्ये तुम्ही प्रत्येक वार्डामध्ये किंवा प्रत्येक पॅनलमध्ये एक हेल्थ पोस्ट जरी तयार करू शकलात तर बरासचा आरोग्याचा प्रश्न सुटू शकतो आणि त्याच बरोबर एक संपुर्ण महानगरपालिकेचे सुसज्ज असे हॉस्पिटल जर आपण तयार केले तर मला वाटते सेंट्रल हॉस्पिटल जिथे संपुर्ण जिल्हातील लोक तिथे अगदी कुत्र्या सारखे, मांजरा सारखे तिथे जातात, त्यांच्यावर उपचार होत नाही आणि या उल्हासगनरवर, या सेंट्रल हॉस्पिटलवर संपुर्ण जिल्हयाचा लोड येतो, त्याच्यामुळे आपल्या उल्हासनगरच्या मतदारांना किंवा नागरीकांना तिथे सुविधा मिळत नाहीत, त्यांना मुंबई सारख्या ठिकाणी जावे लागते. ही अवस्था जर बदलावायची असेल, तर मला वाटते सर्व सदस्यांची इच्छा शक्ती आणि आयुक्तांनी इच्छाशक्ती तयार करावी, जेणेकरून हा प्रश्न सुटू शकेल, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. राजेश वदारिया यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** महापौर साहेबा, आयुक्त साहेब, पॅनल नंबर १७ मध्ये एक उदासी म्हणून गार्डन आहे, तिथे एक आरोग्य केंद्र सुरू केले होते, ते बंद कसे झाले? का उल्हासनगरमध्ये साथीचे रोग कमी झाले, ते केंद्र गेले कुठे? तिथले डॉक्टर कुठे गेले? तेथील औषधे कुठे गेली, तेथील सामान कुठे गेले? आता तर कॅम्प नंबर ५ मध्ये खुप आजार आले आहेत. डंपिंग ग्राउंड, तरी कृपया या लक्षवेधी नंतर डंपिंग ग्राउंडचा मुद्दा घ्या, खुप भारी मुद्दा आहे, लोकांना मरण्याची वेळ आली आहे.तरी कृपया या गोष्टीवर लक्ष देण्यात यावा आणि तेथील आरोग्य केंद्र कुठे गेले आहे? कोणाच्या बोलण्या वरून बंद झाले? त्यावर पण लक्ष देण्यात यावे.

**सदस्य, श्री. शेखर यादव:—** महापौर मॅडम, आयुक्त साहेब, एक महत्वाचा विषय आहे, डॉक्टर साहेब, माझा एक विषय महत्वाचा आहे.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** आरोग्याचाच विषय आहे, आरोग्या बदलच बोलत आहे, डंपिंग ग्राउंडचा मुद्दा हा

**महापौर मॅडम तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य, विषय न बदलता, बोला, ट्रॅक बदलू नका

**सदस्य, श्री. शेखर यादव:—** आयुक्त साहेब, या विषयावरच मी बोलत आहे, परवा माझ्याकडे एक महीला आली होती, ती आठव्या महीन्याच्या वेळी हॉस्पिटलला गेली होती, त्यांना भरती करून घेतले नाही. कारण ती महीला सासुरवाडी येथून माहेरी आलेली होती, त्यांच्याकडे काही तरी प्रुफ मांगितले त्यांना भरती करून घेतले नाही. तर ती महीला मी शाखा प्रमुख असल्यामुळे माझ्याकडे आलेली त्यांना अंगणवाडीमध्ये पाठवले त्या अंगणवाडीच्या शिक्षीकेने सांगितले की, आमच्याकडे असे काही पॉवर नाही की मी पत्र लिहून किंवा लेटर पॅड नाही. हा एक विषय माझ्या लक्षात आला म्हणून तुमच्या लक्षात आणून देतो, असा काही विषय असेल तर जरा बघा, धन्यवाद.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मला कुत्र्यां विषयी तुमचे उत्तर जरूर पाहीजे, हा गंभीर विषय आहे, कारण की इयत्ता १० वीचा मुलगा रॅबीजमुळे मुंत्यु झाला आहे, त्याला ९६ टक्के गुण मिळाले होते, तो पुण्याचा विद्यार्थी होता. तर मला पुणेसारखी पुनवृत्ती उल्हासनगरमध्ये नको आहे, तरी मला डॉग बाबत तुमच्याकडून दोन शब्द ऐकायचे आहेत की काय झाले पाहीजे, तर ९६ टक्के मार्क मिळालेला विद्यार्थी मरण पावला म्हणजे उल्हासनगरमध्ये पण असे व्हायला पाहीजे का? मला डॉग बाईट बाबत उत्तर पाहीजे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** आयुक्त साहेब, लक्षवेधी आहे, या शहरामध्ये नागरी आरोग्य केंद्र किती आहेत? संख्या किती आहे, किती कमी पडतात? शहराशी निगडीत मला वाटते या वेळी प्रशासनाकडून एक निवेदन असले पाहीजे. या शहराचे आरोग्य कसे आहे? राजेंद्र चौधरी यांनी लक्षवेधी आणण्या मागचे कारण हे आहे की या शहराचे आरोग्य अबाधित राहीले पाहीजे. लोकांना सुविधा मिळाल्या पाहीजेत बाकी सुविधा आम्ही देत नाहीत. आमच्या आव्हाड मॅडम ओरडून थकल्या पाणी मिळत नाही, अंकुश म्हस्के पण ओरडून थकले पाणी मिळत नाही, रस्त्यांची हालत खराब झालेली आहे, एन.जी.ओ. ओरडत आहेत, तर या उल्हासनगरच्या आरोग्य संदर्भात आपण निवेदन करावे, त्याच्या नंतर आम्ही या ठिकाणी बोलू. उल्हासनगरचे आरोग्य राखण्यासाठी तुमच्याकडे नागरी आरोग्य केंद्र व्यवस्थीत आहेत का? पुर्वी होते, मला वाटते सहा होती, डॉ. लांजिरवाल असतांना त्यांनी स्थापन केली होती. एक व्हि.टी.सी. च्या बाजुला होता, आज त्याची परिस्थिती काय आहे? ते तुमच्याकडून निवेदन होऊ दया, मग आम्ही प्रश्न विचारू. तुम्हांला खात्री असली पाहीजे की, आम्ही या शहराला काय देतो? अर्लट आहे का? शहरामध्ये दोन मुख्य सरकारी हॉस्पिटल आहेत, पण त्यांची अवस्था बिकट आहे. आताच सांगितले, शेखर यादव यांनी सांगितले,

डॉक्टर यांनी सांगितले नाथानी ते डॉक्टरच आहेत, साळवे मॅडम, त्या सुध्दा डॉक्टरच आहेत, जाणकार आहेत. महापालिका आरोग्याच्या दृष्टीने काय उपाययोजना करणार आहे? किंवा केलेल्या आहेत की शहराचे आरोग्य अबादित ठेवण्याचे जबाबदारी आमचीच आहे, महापालिकेची आहे. कल्याण महानगरपालिका त्यांचे हॉस्पिटल आहे, अंबरनाथ नगरपालिकेचा छाया हॉस्पिटल आहे, उल्हासनगर महानगरपालिकेला हॉस्पिटल नाहीत, म्हणून आरोग्य केंद्राची स्थापना केली आज त्यांची अवस्था काय आहे? कृपया या ठिकाणी निवेदन करावे.

**सदस्या, श्रीम. सुनिता बगाडे:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, उल्हासनगर—४ मध्ये जे सेंट्रल हॉस्पिटल आहे, ते आपल्या हद्दीत येते का? तर त्यामध्ये कुठलीही सुविधा नाही. शासनाचे असल्यामुळे माझ्या वार्डातील एक महीला गेल्या होत्या, तिथे डॉक्टर पण उपलब्ध नाहीत....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सभागृहातील सर्व सदस्यांनी चार नंबरच्या दवाखान्याच्या बाबतीत सांगितले आहे, तर मी डॉक्टरांना निवेदन करतो की, आपल्या डिसपेंसरी आहेत, आपले दवाखाने आहेत, ४ नंबरचे कुठे कुठे आहेत? किती डॉक्टर तिथे असतात, ते डॉक्टर किती वाजता डयुटीवर येतात, ही संपुर्ण माहीती सभागृहाला सांगा.

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, उप महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्य, आज श्री. चौधरी साहेबांनी जी लक्षवेधी आणली आहे, हेल्थ सेंटरच्या बाबतीत मी तुम्हांला त्या बाबतीत सांगू इच्छितो की, महानगरपालिकेचे स्वत:चे हॉस्पिटल नाही, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्राने आपल्याला ६ सेंटर सन २००१ मध्ये हॅन्डवर्क केले होते. त्याचे एक लोकेशन आहे, साधुबेला, दुसरा लोकेशन नेहरू चौक, तिसरा लोकेशन आम्ही आता जे श्री. प्रमोद टाले यांनी सांगितले की, डॉ.लांजिरवाल होते त्यावेळी यु.एन.एस. टीमने सम्राट अशोकनगरमध्ये आम्ही बनवले होते, चौथा आपल्या महानगरपालिकेच्या मागे कौशल्यानगर इथे, पाचवा व्हि.टी.सी. ग्राउंडच्या बाजुला आणि सहावा भाजी मार्केटमध्ये. हे आपले ६ ही सेंटर फिक्स आहेत, दोन नंबरचा डंपिंग ग्राउंडचा मिस्टर बेहेनवाल प्रभाग समितीचे सभापती होते, त्यांनी तिथे बनवले आहे, परंतु तिथे त्यांची कंडीशन खराब झाली होती, त्याच्या बदल्यात आम्ही तो हेल्थ सेंटर जकात नाका येथे बनवला. या सहाही सेंटरवर आमच्या सर्व सुविधा चालू आहेत, मुलांसाठी लसीकरण, गरोदर माताचे एंट्री, टी.बी. क्युरसेस, लेपरसी क्युरसेस, मलेरीयाचे काम, या सर्व गोष्टी आमच्या सेंटरवर चालू आहेत, हे मी मान्य करतो की स्टाफ कमी आहे, आम्ही दोन वेळा जाहीरात काढली परंतु आम्हाला प्रतिसाद चांगला मिळाला नाही. आता साहेबांनी आल्या नंतर प्रक्रिया सुरू केली, बिंदु नामावली, वैगेरे बनवून आता आम्ही जाहीरात दिलेली आहे आणि ३१ तारीख त्याची शेवटची आहे, त्याच्या नंतर आम्ही सर्व सेंटर फंक्शन करू.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** डॉक्टर साहेब, एक मिनीट आताच थोडया दिवसापुर्वी एक दिड वर्षा पासून डंपिंग ग्राउंड बनवले आहे, तिथे सेंटर नाही, रेसीडेन्सी एरिया बाजूला, डंपिंग ग्राउंड बनवले आहे, डंपिंग ग्राउंडच्या बाजुला जे लोक आजारी पडत आहेत, ते कुठे जाणार? जे सहा सेंटर आहेत, त्या पैकी ५ नंबरमध्ये एक पण नाही.

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** मी तेच सांगत आहे, शेरीजी.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** का नाही, तिथे बनवायला पाहीजे ना?

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** त्याच्या नंतर सन २०१३ मध्ये व २०१४ मध्ये जेव्हा बालाजी खतगांवकर साहेब होते, महाराष्ट्र सरकारने आम्हांला बोलावले होते, तिथे या गोष्टीची चर्चा झाली की, उल्हासनगरमध्ये एक हॉस्पिटल दयायचे आहे, तर आपण एक प्रस्ताव दया. जेव्हा प्रस्तावाची चर्चा झाली तेव्हा सांगण्यात आले की, जमीन आपली राहील कन्स्ट्रक्शनसाठी आम्ही पैसे देवू आणि पहील्या वर्षासाठी आम्ही एक करोड रूपये देवू आणि बाकीचा खर्च तुमचाच राहील. तर बालाजी खतगांवकर साहेबांनी सांगितले की, ही रिस्क आपल्याला घ्यायची नाही. आपण त्यांच्याकडून अजून चार सेंटर घेऊ आपल्याकडे ऑल रेडी सेंट्रल हॉस्पिटल आणि मॅटेरीटी फंक्शन आहे. तर चार नवे सेंट्रर कन्स्ट्रेक्शन केले आहेत, एक कमला नेहरूनगरमध्ये, वरती धोबी घाटामध्ये, दुसरा जकात नाक्यावर जवळ, तिसरा तिथे सर्टीफाईड स्कुल आहे तिथे आणि चौथा गायकवाड पाडयामध्ये असे चार सेंटर आपले फंक्शन झाले आहेत, फक्त स्टाफची कमी आहे आणि जसे आम्हांला स्टाफ मिळेल तसे आम्ही सहाही दिवस कंटिन्यु ठेवणार आहेत. औषधांचा काहीच प्रॉब्लेम नाही, सर्व औषधे आम्ही गव्हर्नमेंटकडून आणि लोकल लेवलवर विकत घेत असतो.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** आपण कोण कोणत्या पोस्ट काढल्या आहेत?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, आपण आताच एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले होते की, श्री. राजेश वदारिया यांची चर्चा चालू होती की, कर्मचा—यांची भरती करण्यासाठी ३५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. त्यासाठी सरकारची मान्यता लागेल आणि आता यासाठी सरकारची मान्यता लागणार नाही का?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** हे ठेकेदार पध्दतीने आहेत, नॅशनल अर्बन हेल्थ मिशन (एन.एच. एम.) या प्रोजेक्टमध्ये उल्हासनगरसाठी जो पण पी.आय.पी. प्रोजेक्ट इंप्लुमेटेशन प्लॉन सेंटर गर्व्हनरने मंजुर केला आहे, त्यामध्ये ज्या पोस्ट आहेत, त्यामध्ये एक पिडॉटरी डॉक्टर आहे, बालरोग तज्ञ डॉक्टर आहे, गायनाक्लॉजीस्ट आहे, स्त्री रोग तज्ञ, एक जनरल फिजीशन आहे आणि अजून तीन डॉक्टर फुल टाईम मेडीकल ऑफिसर आहेत, ते एम.बी.बी.एस. आहेत. तर अशा पोस्टसाठी आम्ही ३१ तारखेला मुलाखत ठेवल्या आहेत, डॉक्टर साहेब, आपल्याला डॉक्टर मिळत नाहीत, म्हणून मुलाखती ठेवल्या आहेत की, लवकर जॉईंड करून घेण्यात येईल.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** धिस इज ग्रेट टू चांगल्या प्रकारे ठेवले आहे. मी चुकीचे बोललो आहे, करेक्शन करण्यासाठी मी नंतर बोलतो.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** त्याच्या नंतर आपण पॅरामेडीस विषयी बोलेले होते, पॅरामेडीससाठी स्टाफ पाहीजे, तर पेरामेडीससाठी आम्ही स्टाफ नर्स, ए.एन.एम., फार्मासिस्ट, लॅब असिस्टंट, लॅब टेक्नीशियन अशा एकुण ४६ पोस्ट काढल्या आहेत आणि डॉक्टरांच्या तीन स्पेशालिस्ट आहेत, त्याच्या नंतर मेडिकल ऑफिसर फुल टाईम तीन पोस्ट काढल्या आहेत, मेडिकल ऑफिसर पार्ट टाईप ६ पोस्ट काढल्या आहेत. ए.एन.एम २७, स्टाफ नर्स १०, लॅब टेक्नीशियन ५, फार्मासिस्ट ४ अशा प्रकारे आम्ही पोस्ट काढल्या आहेत. यांच्या नंतर क्षयरोगसाठी, म्हणजे टी.बी.साठी जे स्पेशल कॅम्प चालले आहेत, त्यासाठी पण आम्ही क्षयरोगाचे मेडिकल ऑफिसरची स्पेशल जाहीरात काढली आहे. एक एस.टी.एस टेक्नीशियन आहे, लॅब टेक्नीशियन, लेखापाल, कोऑर्डिनेटर अशा ज्या पोस्ट आहेत, त्यांच्यासाठी ३० आणि ३१ तारखेला मुलाखत आहेत, जी लोक मिळत नाहीत, म्हणजे डॉक्टर आणि ज्या नर्ससेस वैगेरे आहेत, त्यांना आम्ही ३० तारखे पर्यंत ॲपलिकेशन करण्यासाठी वेळ दिली आहे, त्याच्या नंतर त्यांची मुलाखत ठेवली जाईल, तर या पोस्ट भरल्या जातील आणि आता आपल्याकडे जे १० सेंटर आहेत, ते चालू आहेत. एका जागेवरचा सेंटर बंद आहे, पण तो दुस—या जागेवर चालू आहे. १० सेंटर चालू आहेत, जर या सेंटरला स्टाफ मिळेल तर हे सेंटर खुप चांगल्या प्रकारे चालतील आणि दुसरी गोष्ट म्हणजे महानगरपालिकेचा स्वत:चा दवाखाना, त्यासाठी आपल्याला जागेचा प्रॉब्लेम आहे, जागा आपण शोधत आहेत, एक दोन जागा शोधल्या आहे, जिथे पोलिस क्वार्टर आहेत, तिथेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे क्वॉटर्स आहेत, डायबालिटी कंडीशनमध्ये आहेत, त्या जागे विषयी आम्ही विचार करीत आहेत की, ती जागा आपण पी.एम.वाय. मध्ये घर बनवण्यासाठी वापर करू. परंतु तुमचे बोलणे ऐकुन असे वाटले की, जर ती जागा आपल्याला मिळेल, ती जागा २ एकर आहे, तिथे आपण हॉस्पिटल बनवू शकतो. त्या जागे विषयी आपण परत हॉस्पिटलचा प्रस्ताव कशा प्रकारे बनवू शकतो, त्याच्यावर आम्ही विचार करू आणि लवकरात लवकर त्या विषयी काही तरी सोलूशन काढू. परंतु उल्हासनगरमध्ये जागेचा खुप प्रॉब्लेम आहे, जर जागा मिळाली तर आपण हॉस्पिटल बनवू शकतो, त्यामध्ये काहीच प्रॉब्लेम नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** आयुक्त साहेब, धन्यवाद, आपण डॉक्टर भरती करण्यासाठी जी मोहीम काढली आहे, त्यासाठी तुमचे धन्यवाद, तुम्ही पॉझिटीव्ह नेचरचे आहेत, त्याच्या नंतर आपण नगरसेवक फंड पण दिले, खुपच चांगले केले आहे, त्याच्या नंतर तुम्ही टेंडर पण केले त्यासाठी पण धन्यवाद देतो, डॉक्टरांची भरती करण्यासाठी टेंडर केले आहे आणि मुलाखत घेण्यासाठी जाहीरात पण दिली आहे, त्यामुळे मी तुम्हांला धन्यवाद. आता जे ६ सेंटर काम करीत आहेत, तिथे क्वालिफाईड डॉक्टर किती आहेत?

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** एक आपल्या महानगरपालिकेचा आर.सी.सी. एच. चा आणि दोन स्टेटचे आहेत, असे तीन.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** सहा जागेवर फक्त तीनजण काम करीत आहेत, नॉन मेडिकल काम करीत आहेत. आपण सांगत आहेत की, सहा सेंटर चांगल्या प्रकारे चालत आहेत, आपण काय सांगितले सहा सेंटर साधुबेला, नेहरू चौक, महागनरपालिकेच्या बाजुला, व्हि.टी.सी. ग्राउंड येथे, भाजी मार्केट आणि अजून एक सांगितला आहे आपण, आपण सभागृहाला मिस गाईड केले आहे. आयुक्त साहेब ऐका, सर्व सेंटर चांगले चालले आहेत आणि तिथे प्रशिक्षित डॉक्टर आहेत ॲन्ड यु निड मिनिमम एम.बी.बी.एस. डॉक्टर, देअर इज मिनिमम एम.बी.बी.एस. डॉक्टर आर दॅट, ऑल सिक्स प्रेझेंट, ॲज ऑफ टूडे,

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** फक्त तीनच....

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** व्हॉट आर यु सेड ऑल सिक्स ऑर रनिंग....

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** ऑल सिक्स हेल्थ पोस्ट ऑफ रनिंग बेसिक फंक्शन .....

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** व्हॉट इज दॅट विदाउड डॉक्टर, कार इज रनिंग विदाउट गिअर?

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** वुई आर गिव्हिंग इमिनायझेशन वुई आर रजिस्टर गरोदर माता, वुई आर गिव्हिंग मलेरिया ट्रीटमेंट, वुई आर गिव्हिंग टी.बी. ट्रीटमेंट, दे आर फंक्शनिंग

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** टी.बी. ट्रीटमेंट इज गिव्हिंग बाय क्वालिफाईड डॉक्टर.

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** इट इज रिचिस्टर बाय अवर सेंटर हॉस्पिटल दॅन गोईंग डिस्टीब्युटर ....

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** दॅट इज डिस्ट्रीबूशन? डिस्ट्रीबूशन डिफरन्टली अर्जंट डिफेंडींग एक पेशंट कम टू यु अॅटयुवर सेंटर यु आर डॉयगॉन युवर फी टू दि सेंटर व्हॉट आर ट्रीटमंट नॉट अ सेंट्रल हॉस्पिटल, सेंटर नॉट अवर हॉस्पिटल दॅट इज मला उत्तर दया.

**सदस्या, श्रीम. ज्योती माने:—** रिझवानी साहेब, सहा महीन्यापासून, दोन वर्षा नंतर लहान मुलांना जे ड्रॉप्स देतात, ते सहा महीन्यापासून चार नंबरच्या हॉस्पिटलमध्ये मिळत नाही.

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** काय मॅडम?

**सदस्या, श्रीम. ज्योती माने:—** व्हिटा मिन ड्रॉप्स मिळतात, छोटया मुलांसाठी.

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** विटामीन ड्रॉप्स मॅडम गर्व्हनमेंटकडून येत असतात.

**सदस्या, श्रीम. ज्योती माने:—** आपण सांगितले होते की, एक महीन्यापुर्वी आले आहे, अजून पर्यंत मिळाले नाही.

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** मॅडमजी विटामीन ड्रॉप्स हे स्टेट गर्व्हनमेंटकडून येत होते, ते आता बंद झाले आहेत, एक महीन्यापुर्वी जेव्हा आपण फोन केला होता, तेव्हा मी आपल्या हेल्थ सेंटरला लोकल पर्चेस करण्याचा अधिकार दिला आहे, आता पण लोकल पर्चेस करून विटामीन देत आहेत, आता सुध्दा सेंटरवर उपलब्ध आहेत. लोकल पर्चेस करून हेल्थ सेंटर देत आहे, गर्व्हरनमेंटकडून अजून पर्यंत आले नाहीत, व्हिटामिन अ.

**सदस्या, श्रीम. ज्योती माने:—** छोटे छोटे हेल्थ आहेत, तिथे पाठवा सर.

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** तेच लोकल मार्केटमधून सप्लाय केले आहेत आणि आता सर्व सेंटरवर व्हिटामिन अ उपलब्ध आहेत. आता पण सदस्यांना पाहीजे तर मी आताच पुरवठा करू शकतो

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** राजाजी आपण माझे उत्तर दिले नाही, सहा सेंटरवर सहा डॉक्टर आणि आपण सांगितले की, तीन डॉक्टर आहेत. असे नाही की, तीन डॉक्टर आहेत, बाकीचे कमी आहेत.

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** हे तर आयुक्त साहेबांनी....

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** तुम्ही सांगितले, संपुर्ण सभागृहाला सांगितले की, सहाही सेंटर चांगले चालले आहेत. भाजी मार्केटमध्ये कोण चालवते, कोणत्या एरियामध्ये कोण चालवत आहे, डॉक्टरांची नावे सांगा.

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** कुठें?

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** भाजीमार्केटमध्ये, साधूबेलामध्ये कोण कोण काम करीत आहेत आणि कोण कुठे कुठे काम करीत आहेत? प्लीज कुठे डॉक्टर आहेत? आणि कुठे डॉक्टर नाहीत?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** संबंधित डॉक्टरांची लिस्ट देवून टाका?

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** जर पेशंटला महापालिकेतर्फे डॉक्टरांकडून ट्रीटमेंट पाहीजे असेल तर मी जिथे डॉक्टर असतील तिथेच पेशंटला पाठवेल आणि जिथे डॉक्टर नाहीत, तिथे पाठवणार नाही. तर प्लीज लेट मी नो.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ठिक आहे, ठिक आहे, डॉक्टर साहेब, डॉ. भदाणेंना तिकडे पाठवून देवू.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** साहेब, सांगा, कोण कोणत्या सेंटरवर डॉक्टर आहेत?

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** दोन नंबर सेंटरवर डॉ. धर्मा आहेत, तीन नंबर सेक्टर येथे श्रीम. अनिता सपकाळे आहेत, चार नंबर सेक्टरमध्ये डॉ. रतन माला होत्या, त्या पोस्ट ग्रॅज्युवेशनसाठी शेवटच्या महीन्यामध्ये गेल्या आहेत, त्या स्टेटच्या आहेत, आता परवा डॉ. गवई गर्व्हनमेंट हॉस्पिटलमधून आम्हांला डेप्युटेशनवर दिले आहेत, ते व्हि. टी.सी. येथे बसतात.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सन्माननिय महापौर मॅडम, आयुक्त साहेब, आरोग्याच्या संदर्भामध्ये मी, डॉ. साहेब, तुम्ही तिथेच उभे रहा. विषय उपस्थित करतो, आरोग्याच्या संदर्भात आपल्या सगळया भरती प्रक्रिया, दवाखाने हे सगळे झाले. पण या शहरामध्ये आपल्या जनतेच्या आरोग्यासी अजून एक विषय निगडीत आहे. ते म्हणजे बोगस डॉक्टर, या डॉक्टरांनी सांगावे की, आज पर्यंत किती बोगस डॉक्टरांवर कारवाई केली आणि शहरामध्ये बोगस डॉक्टर किती आहेत? ही तर आपली जबाबदारी आहे, बोगस आहे की नाही, बोगस तपासण्याची? माझी डॉक्टर साहेबांना विनंती आहे की, शहरामध्ये बोगस डॉक्टर किती आहेत? आणि किती बोगस डॉक्टरांवर कारवाई केली आणि त्यांच्यावर किती एफ.आर. आय. दाखल केले आहेत? त्याच्यामध्ये अदयाप पर्यंत बोगस डॉक्टरां पर्यंत पोहचले नाहीत का? का त्याच्यामध्ये काही आर्थिक व्यवहार झालेला आहे का? या सगळया गोष्टी तुम्ही सभागृहाला सांगावे. उल्हासनगरच्या नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असलेला विषय आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** पॅनल नंबर १७ चा आरोग्य केंद्र कधी बंद झाले? का बंद झाले? त्याची चावी का मिळत नाही? कृपया त्याची माहीती दयावी. पॅनल क्रमांक १७ आरोग्य केंद चालू होते, ते बंद कसे झाले, त्याची माहीती दयावी.

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** दादा सतरामदासजी १७ पॅनल आपण उदासी गार्डनमध्ये बोलले होते, तो आमच्या एस्टाब्लीशमेंट नव्हते, त्याचे गर्व्हनमेंटच्या कोणत्याही रेकॉर्डवर नव्हता, सभापती मॅडमने उघडले होते, ते बंद झाले.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** चालू केले होते, महानगरपालिकेची मालमत्ता आहे, तिथे तुम्ही चालू केले होते, तुम्हीच उद्‌घाटन केले होते, हे काय आहे? डॉक्टर साहेब, जरा लक्ष दया. महानगरपालिकेची मालमत्ता आहे, तुमचेच डॉक्टर तिथे बसले होते.

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** मिस्टर भालेराव यांनी बोगस डॉक्टरांच्या विषयी प्रश्न केला आहे, त्याचे उत्तर मी सांगतो की, मी मागच्या वेळेस तपासणी केली होती, आम्ही जे डॉक्युमेंट वेरीफिकेशन केल्या नंतर कॉन्सील ऑफ इंडियाने, त्यांचे जे रजिस्ट्रेशन आहेत, त्यामध्ये सहा डॉक्टरांचे बोगस डॉक्युमेंट निघाले आणि तीन डॉक्टरांवर आम्ही मागच्या वर्षी, चार महीने पहीले पोलिस एफ.आर.आय. केले आहे आणि १५ डॉक्टरांचे....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** संपुर्ण शहरामध्ये १५ डॉक्टर...

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** ज्यांचे डॉक्युमेंट आम्हांला मिळाले ते वेरीफिकेशन केल्या नंतरच एफ.आर.आय. दाखल केले जाते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** परंतु ज्यांचे मिळाले नाहीत, त्यांच्यावर आता पर्यंत कारवाई केली का?

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** आता परत जर स्टाफ अल्या नंतर....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** एक एक एरियामध्ये, आपण कोणताही एरिया घ्या, पाहीजे तर माझा एरिया घ्या, आझादनगर माझ्या एरियामध्ये कमीत कमी २० ते ५० डॉक्टर असतील. तर तुम्ही कसे सांगतात की, एकाच एरियामध्ये पकडले आहेत.

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** आम्ही जेव्हा डॉक्युमेंट महाराष्ट्रा ऑफ कॉन्सीलकडून वेरीफिकेशन होऊन आले आहेत......

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मी काय सांगतो की, ज्यांचे डॉक्युमेंट तुमच्याकडे नाहीत, त्यांचा दवाखाना तुम्ही सिल का करीत नाहीत?

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** आम्ही सर्व्हे करून घेतो, नो इश्यु.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सिल का करीत नाहीत? ज्यांचे डॉक्युमेंट तुमच्याकडे आले नाहीत, त्यांचे हॉस्पिटल सिल का करीत नाहीत?

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** यासाठी परत सर्व्हे करावे लागेल, आम्ही सुरू करू आमच्या सर्व हेल्थ पोस्ट साईजकडून आणि जेव्हा एक तारखेला आमचे स्टाफ भरती होईल तेव्हापासून आम्ही परत सर्व्हे सुरू करू, हेल्थ पोस्ट वाईज.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** तुमच्याकडे लिस्ट नाही का?

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** का नाही? तुमचे एन.एम. काम करीत आहेत, सर्व्हे करीत आहेत, तर तुम्हांला माहीत नाही का?

**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—** भालेराव साहेब, आमच्याकडे लिस्ट ही आहे की जे मेडिकल कौन्सीलकडे, महाराष्ट्र कौन्सीकडे रजिस्टर आहेत, आयुर्वेदीक असोसिाएशनचे आणि होमोपॅथी असोसिएशनचे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आयुक्त साहेब, विषय असा आहे, एका एरियामध्ये, माझा एरिया आझादनगरमध्ये जवळ जवळ १० ते १२ डॉक्टर आहेत. ज्यांचे प्रमाणपत्र नाहीत, बोगस आहेत. हे म्हणतात संपुर्ण शहरामध्ये १५ डॉक्टर आहेत. पुर्ण शहराचा जर विचार केला तर ४०० ते ५०० डॉक्टर बोगस निघू शकतात आणि अशा परिस्थितीमध्ये हे असे सांगतात की, आम्ही डॉक्युमेंट चेक केले नाहीत. तुमच्याकडे सर्व्हे नाही का? तुमच्याकडे दुकानाचे लायसन्स घ्यायला येत नाहीत का? नाही, नाही हा विषय एवढा निगडीत आहे आणि त्याच्यामुळे काय होते साहेब, माहीत आहे का? यांच्याकडे लोक येतात आणि नंतर ते दगावतात, ब—याच केसेस अशा होतात की ते दगावतात आणि नंतर त्यांचे सर्टीफिकेट पण मिळत नाही आणि हे सांगतात की आमच्याकडे नोंदणी नाही. जेव्हा साथ येते, लेप्टोची, महामारीची साथ येत असेल, वेगवेगळया साथी येत असतील हे सांगतात की आमच्याकडे रेकॉर्डप्रमाणे उपलब्ध नाही. म्हणजे या ज्या गोष्टी आहेत, काही रूग्ण तिथे तात्पुरत्या स्वरूपात उपचार मिळतात. काही थोडेसे नॉलेज असते ते घेऊन निघून जातात आणि बरे होतात. पण यांच्या संदर्भात यांनी ते सर्व केले पाहीजे, हे हॉस्पिटलचे रिन्युवेशन करण्यासाठी बरोबर जातात. मग तिथे का नाही, डिसपेंसरी चेक करीत. त्या डिसपेंसरी यांनी सगळया चेक करायला पाहीजे, त्यांचे सर्टीफिकेट आहेत की, नाही. हा मुंबईचा आहे का? नाही तर असायची कुठली तरी सिंगापूरची, डॉक्टरची डिग्री त्या माणसाशी काहीच संबंध नाही. गेल्या तीन वर्षा पासून तीनच लोक आहेत, त्यांच्यावर कारवाई वाढत नाही. साहेब सभागृहात आणण्याचा मुद्दा असा आहे की, याच्यामध्ये मोठया प्रमाणामध्ये डॉक्टरांचे आर्थिक संबंध आहेत. हे डॉक्टर आर्थिक संबंध महापालिकेत आहेत आणि त्यामुळे त्यांची चेकिंग होत नाही. म्हणून माझा आरोप स्पष्ट आहे, त्यांच्यावर कारवाई झाली पाहीजे आणि यांना सर्व्हे करण्यासाठी वेळ दिला पाहीजे. कारण आता अशी परिस्थिती आहे, कुठलेही दवाखाने १००, २०० ओपिडीच्याखाली नसतात आणि असे जर बोगस डॉक्टरांमुळे पेशंट जर दगावले तर महानगरपालिकेचा निष्काळजीपणा सिध्द होतो. यांनी सर्व्हे केला पाहीजे आणि एक दोन महीन्यामध्ये सभागृहाला अहवाल दिला पाहीजे, एक महीन्याच्या आत अहवाल सादर केला पाहीजे.

**महापालिका सचिव:—** मा. महापौरांनी दिलेल्या सुचने प्रमाणे स्वच्छता अभियानंअंतर्गत काही प्रभागाना पारितोषीक मिळाले आहे, त्या बाबतीत स्वच्छता निरीक्षक व जनसंपर्क अधिकारी श्री. विनोद केणे सांगतील आणि त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** प्रथम डंपिंग ग्राउंडचा मुददा घ्या, नाही तर म्हणणार की, वेळ झाली ७.०० वाजले हा मुददा महत्वाचा आहे, शहरा बददल आहे. आम्ही जीवंत राहू तर सन्मान करू, जर पब्लिक जीवंतच राहणार नाही तर सन्मान काय होणार?

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** पाच मिनिटांमध्ये संपून जाईल.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** कृपया मला बोलू दया,

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** दहा मिनीटामध्ये हा विषय संपून जोईल, फक्त १० मिनीट.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** केणेजी धन्यवाद, तुम्ही पुर्ण कराल, नाही तर हा मुददा अपुर्ण राहून जाईल.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** हा मुददा १० मिनीटा नंतर पण होऊ शकतो.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** आरोग्याचा प्रश्न आहे, लोकांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** महापौर मॅडम, डंपिंग ग्राउंडचा विषय प्रथम घ्या. आरोग्याचा विषय आहे, महापौर मॅडम मला बोलू दया,

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** डंपिंग ग्राउंडचा मुददा सुटायला पाहीजे, नाही तर रस्त्यावर उतरू.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** आम्ही आयुक्त साहेबांचे लक्ष वेधू इच्छितो, डंपिंग ग्राउंडच्या मददयावर आम्हांला १० मिनीटे बोलू दया.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** डंपिंग ग्राउंडचा मुददा प्रथम घ्या.

**सदस्य, श्री.भारत राजवानी:—** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, पहीले डंपिंग ग्राउंडचा मुददा घ्या. कारण की, तिथे भयंकर परिस्थिती निर्माण झालेली आहे.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** महापौर, मॅडम आम्हांला बोलू दया.

या वेळी सदस्य, श्री. समरामदास जेसवानी, श्री. अरूण आशान, श्री. सुनिल सुर्वे, श्री. विकास पाटील, श्री. किशोर वनवारी, श्री. राजेश वानखेडे, श्री. रमेश चव्हाण, श्री. शंकर लुंड, श्रीम. दिप्ती दुधानी, श्रीमती कांचन लुंड, श्री. गजानन शेळके, श्री. दिपक सिरवानी, श्री. महेश सुखरामनी, श्री. अजित गुप्ता, श्री. शेखर यादव, श्री. सुमित सोनकांबळे, श्रीमती सविता तोरणे, श्रीमती सुमन सचदेव, श्रीमती सुनिता बगाडे, श्रीमती कविता बागुल, श्रीमती अंजली साळवे, श्रीमती शुभांगी बहेनवाल, श्रीमती सुरेखा आव्हाड, श्रीमती ज्योत्सना जाधव, श्री. राजेंद्र चौधरी, श्री. धनंजय बोडार, वसुधा बोडारे, श्रीमती सितल कदम, श्री. प्रमोद टाले. हे मंचासमोर खाली बसले.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** महापौर मॅडम, एवढे सदस्य खाली बसले आहेत, तुम्ही प्रथम डंपिंग ग्राउंडचा मुददा घ्या, हा स्वागत समारंभ नंतर घ्या.

**सदस्य, श्री.भारत राजवानी:—** महापौर, मॅडम तुम्हांला विनंती आहे, स्वागत समारंभ नंतर घ्या, डंपिंग ग्राउंडचा मुददा प्रथम घ्या, कारण की, तिथे लोकांच्या जीवनाचा प्रश्न आहे.

**सदस्य, श्री.धनंजय बोडारे:—** महापौर मॅडम, आयुक्त साहेब, या विषयावर चर्चा संबंधित नगरसेवक समोर खाली बसले आहेत, त्यांच्या भावना आहेत, आरोग्याशी निगडीत आहे, ठिक आहे. ते अबाधित राहण्यासाठी काय? त्यांच्या भावनाची कदर तर केली पाहीजे. महापौर महोदया, एवढे सर्व सदस्य, त्यांच्या भावना इथे व्यक्त करतात, विरोधी पक्ष आणि सत्ता पक्ष या दोघांची भुमिका काय असणार आहे?

**सदस्य, श्री.भारत राजवानी:—** प्रथम डंपिग ग्राउंडचा मुददा घ्या, महापौर मॅडम,

**सदस्या, श्रीम.अंजली साळवे:—** महापौर मॅडम, प्रथम डंपिंग ग्राउंडचा मुददा घ्या.

**सदस्य, श्री.भारत राजवानी:—** डंपिंग ग्राउंडचा विषय पहीले घ्या, नाही तर संपुर्ण सभागृह खाली बसेल.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** बंद करा, बंद करा, डंपिंग ग्राउंड बंद करा.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य.....

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** डंपिंग ग्राउंड हलवणार का नाही? एवढे तरी सांगा. त्याचे परिणाम.... महानगरपालिका जर चुकीचे काम करीत असेल, महापौर मॅडम...

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय सदस्य.....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** डंपिंग ग्राउंड मग करायचा कुठे? व्हि.टी.सी. ग्राउंड, सी. ब्लॉक.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—** महापौर मॅडम, या विषयावर सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** डंपिंग ग्राउंड कायदेशिर आहे का? महापौर मॅडम, आयुक्त साहेब, हा डंपिंग ग्राउंड कायदेशिर आहे का? आपण सांगावे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** तुम्ही महापौरांचा आवाज दाबत आहेत, मी सांगते की, डंपिंग ग्राउंडचा मुददा घ्या, तुम्ही ऐकतच नाहीत. महापौरांचे आदेश तुम्ही दाबत आहेत.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** महापौर मॅडम, आयुक्त साहेब, डंपिंग ग्राउंड कायदेशिर आहे का फक्त एवढेच सांगावे. कायदेशिर असेल तर चर्चा करा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** मा. महापौरजी, संपुर्ण सभागृहाची भावना बघून अशा गंभीर विषयावर चर्चा करणे आवश्यक आहे. सर्व सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपापल्या जागेवर बसून घ्यावे, ही संपुर्ण सभागृहाची भावना आहे. हे फक्त कॅम्प नंबर ५ च्या लोकांना त्रास नाही तर संपुर्ण शहराचे नगरसेवक कारण हा त्रास संपुर्ण २० वर्षे कॅम्प नंबर १, २, ३ वाल्यांना होता. २ नंबर ओटीमध्ये जेव्हा डंपिंग ग्राउंड होते, त्यावेळी आम्ही सुध्दा होतो, तर चर्चा होणे आवश्यक आहे. संपुर्ण सभागृहाची भावना बघून या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** एकंदरीत विषय असा आहे की, डंपिंग ग्राउंडच्याच मुददयावर बोलू पणज्यांनी स्वच्छता अभियानमध्ये भाग घेतला आहे, त्यांचा सत्कार तर होऊ दया.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** स्वच्छता अभियान बददल नंतर बोलू प्रथम या विषयावर बोला.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** हे बघा, डंपिंग ग्राउंडच्या विषयावर चर्चा होईल,

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** सत्कार समारंभ हा नंतर होऊ शकतो, १० मिनीट, १५ मिनीटां नंतर सत्कार समारंभ नंतर होऊ शकतो.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** डंपिंग ग्राउंडचा मुददा घ्यायचा आहे ना मग शांत बसा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** अजून इतिवृत्त कायम झाले नाहीत, तर काही सदस्यांनी मागणी आहे व मी पण या मुददयाशी सहमत आहे की, डंपिंग ग्राउंडचा मुददा संपुर्ण शहरासाठी खुप मोठा आहे. तर मी तुमच्याकडून नियम माहीती करून घ्यायचे आहे, की सभा चालवण्यासाठी....

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** बसून टाईमपास करू नका. हा माणूस खोटा आहे, कोणार्क कंपनील ठेका आहे, म्हणून हा माणूस बोलत आहे.

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, हे समजून आले नाही.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** कायदा विचारतात, महापौर मॅडम....

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** महापौर मॅडम, सभागृहाला कुठे घेऊन जात आहेत. चर्चा व्हायला पाहीजे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरांनी चर्चा करण्यासाठी अनुमती दिली आहे, त्याच्या नंतर...

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** सभागृह नेता, तुम्ही शेवटी बोला ना.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी सभागृहाचे मत बघून पहीले इतिवृत्त कायम करा आणि इतिवृत्त कायम केल्या नंतर डंपिंग ग्राउंडचा विषय घ्या.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २०/१/२०१८ (त्यात १७/२/२०१८, ५/३/२०१८, ८/३/२०१८, ९/३/२०१८, २७/३/२०१८), दिनांक १७/२/२०१८ (त्यात ५/३/२०१८, ८/३/२०१८, ९/३/२०१८, २७/३/२०१८), आणि विशेष महासभा २०/२/२०१८ (त्यात ८/३/२०१८, ९/३/२०१८, २७/३/२०१८), दिनांक २७/३/२०१८ (त्यात ३१/३/२०१८), व सर्वसाधारण महासभा दिनांक २/५/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** पास..पास...

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—**मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २०/१/२०१८ (त्यात १७/२/२०१८, ५/३/२०१८, ८/३/२०१८, ९/३/२०१८, २७/३/२०१८), दिनांक १७/२/२०१८ (त्यात ५/३/२०१८, ८/३/२०१८, ९/३/२०१८, २७/३/२०१८), आणि विशेष महासभा २०/२/२०१८ (त्यात ८/३/२०१८, ९/३/२०१८, २७/३/२०१८), दिनांक २७/३/२०१८ (त्यात ३१/३/२०१८), व सर्वसाधारण महासभा दिनांक २/५/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. सुनिल सुर्वे

**महासभा ठराव क्र. ११ क** **दिनांक : २०/७/२०१८**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या सर्वसाधारण महासभेचे दिनांक २०/१/२०१८ (त्यात १७/२/२०१८, ५/३/२०१८, ८/३/२०१८, ९/३/२०१८, २७/३/२०१८) रोजीच्या पृष्ठ क्र. १ ते १२३ पर्यंतचे, दिनांक १७/२/२०१८ (त्यात ५/३/२०१८, ८/३/२०१८, ९/३/२०१८, २७/३/२०१८) रोजीच्या पृष्ठ क्र. १ ते ६३ पर्यंतचे, आणि विशेष महासभेचे दिनांक २०/२/२०१८ (त्यात ८/३/२०१८, ९/३/२०१८, २७/३/२०१८) रोजीच्या पृष्ठ क्र. १ ते ४८ पर्यंतचे, दिनांक २७/३/२०१८ (त्यात ३१/३/२०१८) रोजीच्या पृष्ठ क्र. १ ते ४० पर्यंतचे, व सर्वसाधारण महासभा दिनांक २/५/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४१ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** माझी एक दुरूस्ती आहे की, जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले होते, शौचालयांची सफाई ठेवण्यासाठी आरोग्य विभागाला बजेट हेड दयावे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, दिनांक ३१/३/२०१८ च्या महासभेचे जे इतिवृत्त आहे, त्याचे पान क्रमांक २१ वर लिहीले आहे की, सार्वजनिक शौचालयाच्या देखरेखीसाठी प्रत्येक वर्षी ५ कोटी रूपये खर्च येईल. त्यासाठी तरतुद नसल्याने त्यासाठी ५ कोटी रूपये तरतुद करणे. तर मला यामध्ये करेक्शन करायचे आहे, जो शब्द मी बोललो होतो, प्रत्येक वर्षी सार्वजनिक शौचालयासाठी देखरेख दुरूस्ती खर्च त्याचे लेखाशिर्ष वेगळा असायला पाहीजे आणि ठरावामध्ये पण या गोष्टीचा उल्लेख व्हायला पाहीजे की, ५ करोड रूपये प्रत्येक वर्षी शौचालयासाठी खर्च झाले पाहीजेत. हे ठरावामध्ये पण यायला पाहीजे, त्याचे लेखाशिर्ष वेगळा

असला पाहीजे. तर त्यामध्ये करेक्शन करा, यामध्ये फक्त लिहीले आहे. त्याचे लेखाशिर्ष वेगळा आहे.

**महापालिका सचिवः—** हा ठराव लेखा विभागाने बनवला आहे, तुम्ही जसे सांगितले आहे, तसाच बनवला आहे. त्यांना ही सुचना दयायला लागेल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** त्यामध्ये करेक्शन करा, लेखाशिर्ष वेगळा असायला पाहीजे.

**महापालिका सचिवः—** यानुसार सर्वांना करेक्शन मान्य आहे का? ठिक आहे पास...

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** ठिक आहे, त्याच्यामध्ये दुसरा एक विषय आहे, दिनांक २/५/२०१८ ला एक ठराव झालेला आहे, उल्हासनगरच्या सिटी सर्व्हे ३२ मधला, त्या सभेला मी उपस्थित नव्हतो. पण तुम्ही आता इतिवृत्त आणला आहे, म्हणून मी त्या संदर्भात बोलत आहे. त्या जागेच्या संदर्भामध्ये तुम्ही ठराव पारीत केलेला आहे. माझी संपुर्ण सभागृहाला विनंती आहे, आपण चुकीचा ठराव माझ्या निदर्शनास आला आहे, तुमच्या पण निदर्शनास आणू इच्छितो, ती सदरची जागा महाराष्ट्र शासनाची आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या ताब्यातील नाही. सिट नंबर ३२ ८३० मिटरचा जागा तुम्ही ते ठरावाद्वारे अल्टरनेट साईट दिली आहे, त्या अल्टरनेट साईटचा मी एक विषय नमुद करू इच्छितो की ती जागा महाराष्ट्र सरकारची आहे, ती जागा महानगरपालिकेची नाही. तसे कागदपत्र महानगरपालिकेला प्राप्त झाले आहेत, तसा पत्रव्यवहार मा. प्रांतअधिकारी यांनी मा. आयुक्तांना दिलेले आहे. सदरची जागा ही आमची आहे, महानगरपालिकेची नाही, तरी तुम्ही ही जागा अल्टरनेट साईट हायकोर्टामध्ये कशी देवू शकता? या संदर्भातला पत्रव्यवहार आयुक्त साहेबांना केलेला आहे. दुसरी गोष्टी ती जागा अल्टरनेट साईटमध्ये गेलेली नाही. या अशा अनेक अडचणी आहेत, म्हणून माझी सभागृहाच्या सर्व सदस्यांना एक विनंती आहे, आपली जागा नसतांना आपण कोणाला देवू नये. म्हणून मला वाटते या संदर्भातला इतिवृत्ता मधला या ठरावा संदर्भात संशोधन व्हावे अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**महापालिका सचिवः—** ठरावामध्ये बदल होणार नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, इतिवृत्त कायम व्हावे असे बोललो आहे, जर यामध्ये काही चुकी असेल, दुरूस्ती असेल तर करू शकतो, ठरावामध्ये बदल करू शकत नाही.

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**महापालिका सचिवः—** विषय क्र. २१ मा. महापौरांनी आदेश दिल्या नंतर वाचून दाखवत आहे.

---

⇨ **विषय क्र. २१ :— प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर—५ येथिल नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याने त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपातील सुरु केलेल्या डंपिंग ग्राउंड इतरत्र हलविणेबाबत येत्या महासभेमध्ये चर्चा होवुन निर्णय होणेबाबतचा पालिका सदस्य श्री. विजय पाटील व श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य, श्री. विजय पाटीलः—** मॅडम या विषयाच्या वेळी सभागृहामध्ये ५ नंबरचा डंपिंग ग्राउंडचा विषय घेऊन या.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** मा. महापौरजी, मी संपुर्ण सभागृहाचे आभार मानतो, उप महापौरांच पण, आयुक्त साहेबांचे आणि सर्वांचे आभार मानतो, ज्यांनी पहीले हा विषय घेतला आहे. जो डंपिंग ग्राउंड आहे, मी पॅनल क्र. चार मधून निवडून आलो आहे, पॅनल नंबर १९ मधून नाही. हे पॅनल नंबर २० मध्ये आहे. परंतु ५ नंबरच्या संपुर्ण एरियालामध्ये संपुर्ण धुर येतो, खुप दुर्गंधी येते, तिथे मेलेले जनावर फेकले जातात. हे डंपिंग ग्राउंड कसे चालू झाले? ते मी सांगतो, सव्वा वर्षे पहीले श्री. हिरे साहेबांनी डंपिंग ग्राउंड चालू केले होते. तर त्याच्या नंतर सर्व सदस्यांनी जेव्हा हा मुददा उपस्थित केला, तर त्यांनी सांगितले की, एक आठवडया नंतर बंद होईल, ते त्यांनी दोनच दिवसात बंद केले. त्याच्या नंतर श्री. राजेंद्र निंबाळकर साहेब आले, त्यांनी परत चालू केले. त्यांनी आश्वासन दिले होते की, एक महीन्याच्या आतमध्ये बंद होईल. आज सव्वा वर्षा पासून चालू आहे आणि मी चांगल्या प्रकारे सांगू इच्छितो की, जसे श्री. भगवान भालेरावजी यांनी सांगितले की ही जमीन आमची नाही, ही प्रांत ऑफिसची आहे. तरी पण ५ नंबरमध्ये जो डंपिंग ग्राउंड चालू केले

आहे, तो रिर्झव्हेशनमध्ये ग्रीन झोन आहे. म्हाडाचे क्वार्टस बनवण्यासाठी महानगरपालिकेचे रिर्झव्हेशन होते. प्लॉट नाही आहे, त्याच्यावर आठ महीन्यापुर्वी ४० लाख रूपयांचे काम पास झाले, त्याच्या नंतर ते काम झाले नाही, त्याच्या नंतर देहेरकर साहेबांनी त्या ठेकेदाराला नोटीस दिली की एक रूपयाचे पण काम झाले नाही. तर तुम्हीला पैसे कसे देणार? देहेरकर साहेबांनी नोटीस दिल्या नंतर काही महीन्याच्या नंतर त्याचे पेमेंट रिलीज झाले. आता आठ महीन्या नंतर परत तिथे ३५ लाख रूपयाचे काम पास झाले आहे. तो आपल्या मालकी हक्काचे प्लॉट नाही आणि काल एनजीओने संपुर्ण प्रभाराम मंदिरामध्ये डंपिंग ग्राउंडसाठी सहीसाठी अभियान ठेवले होत, तेव्हा १७०० लोकांनी सहया केल्या आणि काही एनजीओने जे आज इनवर्ड केले आहे. मी सुध्दा बाय हॅन्ड कॉपी देतो, प्रदुषण डिपार्टमेंटला पुणे, कल्याण महानगरपालिकेकडून सर्व माहीती घेतली आहे, त्याचे सेट मी तुम्हांला देतो, श्री. केणे यांनी सार्वजनिक आरोग्या विभागातर्फे लिहून दिले आहे की, हे डंपिंग ग्राउंड आयुक्त साहेबांच्या तोंडी सांगितल्या प्रमाणे चालू केले आहे. म्हणजे महासभेने पण अनुमती दिली नाही, महाराष्ट्र शासनाने पण अनुमती दिली नाही. कोणतीही अनुमती नसतांना सव्वा वर्षा पासून अनधिकृत डंपिंग ग्राउंड चालू आहे. त्याच्या नंतर मा. मुख्यमंत्यानी दिड, दोन महीन्या पुर्वी ताज हॉटेलमध्ये मिटींग घेतली होती, नार्को कंपनी बरोबर करार केला की, अंबरनाथचा, बदलापुरचा, उल्हासनगरचा कचरा अंबरनाथमध्ये फेकले जाईल. मा. मुख्यामंत्र्यानी असे करारनामा लिहीले आहे. व्हॉटसअपवर दिले आहे. तर हे जे डंपिंग ग्राउंड ५ नंबरमध्ये चालू केले आहे. तिथे हजारो, लाखो रेसीडेन्स, घरे आहेत, दुकाने आहेत. तर ५ नंबरमध्ये खुप मोठा इश्यु झाला आहे आणि प्लॉट पण मोठा आहे, त्या प्लॉटवर डेली ३५० टन कचरा येत असतो. तो एवढया प्रमाणात येतो की, आता तो प्लॉट पण पुर्ण भरणार आहे. तर लोकांना डेंग्यु, माझी वहीनी मोना वनवारी नगरसेविका त्यांच्या मुलांला डबल टाईफाइड झाला आहे, कोणाला डेंग्यु, कोणाला मलेरिया, ताप भरपुर लोकांना आजार येत आहेत. अस्थमा श्वास घेण्यासाठी तिथे त्रास होत आहे. तर या सर्व गोष्टी लक्षात घेऊन तिथे मेलेले जनावर पण फेकले जातात. संपुण उल्हासनगरमध्ये जनावरे मरतात ते तिथे टाकले जातात. तर मी आपल्याला विंनती करतो की, आम्ही हे म्हणत नाही की, इथला डंपिंग ग्राउंड दुसरीकडे हलवा, कारण की, सन २००७, २०१३ पासून हायकोर्टाचा आणि महाराष्ट्र सरकारचा जि. आर. काढला आहे की, कोणतेही नविन डंपिंग ग्राउंड आपल्याला बनवायचा नाही. सन २०१३ पासून हायकोर्टाचे पण आदेश आहेत, महाराष्ट्र सरकारने पण मा. मुख्यमंत्यानी आदेश काढला आहे की, सन २०१३ पासून कोणतेही नविन डंपिंग ग्राउंड बनणार नाही. तरी मी आपल्याला जेवढे पण एनजीओ आहेत, कल्याण, पुणे, मुंबई प्रदुषण विभागाकडून जेवढे प्रमाणपत्र घेतले आहेत आणि हे सिध्द झाले आहे की, महानगरपालिकेच्या सभेमध्ये पण खुप वेळा हा विषय आला आहे. तर प्रत्येक महासभेमध्ये हे रिजेक्ट पण झाले आहे, कधी पण डंपिंग ग्राउंड पास झाला नाही. तर पहीले जो खर्च झाला किंवा आता जो खर्च करणार आहेत, प्रांत ऑफिसचा प्लॉट आहे, जसे की मी एक उदाहरण देतो की, कोणार्क कंपनीला हिराघाट येथे जो बोट क्लब आहे, करीता आयुक्त, श्री. सुधाकर शिंदे साहेबांनी एक नोटीस दिली होती की ४ करोड, ७६ लाख रूपये भरा की तुम्ही लोक कोणार्क कंपनीच्या गाडया बोट क्लब येथे उभ्या करतात. ते लोक कोर्टामध्ये गेले आणि स्टे घेऊन आले. त्या स्टेमध्ये पण हे उदाहरण दिले गेले की, जो बोट क्लब आहे, तो महानगरपालिकेचा प्लॉट नाही. टायटल क्लीयर नाही, त्यामुळे महापालिका त्याचे भाडे घेऊ शकत नाही. ते प्रांत ऑफिसच्या अंडरमध्ये येते. तर हा पण प्लॉट जिथे डंपिंग ग्राउंड चालू आहे, तो पण प्रांत ऑफिसच्या अंडरमध्ये येतो आणि ग्रीन झोन आहे. त्याला कोणतीही अनुमती नाही आणि सर्व काही कागदावर लिहीले आहे की, त्या डंपिंग ग्राउंडला कोणतीही परवानगी नाही. हे सर्व विचार करून करा, जबाबदारी तुमची आहे, धन्यवाद.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा डंपिंग ग्राउंडचा विषय पहीले पण लक्षवेधीच्या माध्यमातून आलेला आहे. परंतु सिरीयसली घेतले नाही, आता पण मला वाटते की, सिरीयस घेतले नाही तर मृत्यू होऊ शकते. यासाठी मी हा विषय घ्यायचा आहे. डंपिंग ग्राउंड कधी शहराच्या मध्यभागी असतो का? डंपिंग ग्राउंडच्या बाजूला स्वामी शांती प्रकाश आश्रम तिथे सिनीयर सिटीजन राहतात. त्यांचे वय ७० वर्षाच्या जास्त आहे. ७० वर्षाच्या जास्त म्हणजे त्यांचे इम्युनीटी पॉवर खुप कमी असते, ते कमजोर होतात आणि सहन करू शकत नाहीत. तो वृध्दाश्रम आहे, तिथे घरातून निघालेले लोक आहेत, ज्यांचे कोणीच नाही, असे लोक तिथे राहतात. तिथे थोडासा पण त्रास झाला तर वृध्दाश्रमामध्ये धुर जाईल आणि अस्थमा होऊ शकतो आणि लोकांचा मृत्यु होऊ शकतो. तर आपण मृत्यु होई पर्यंत वाट बघणार का? आणि दुसरी गोष्ट म्हणजे जेव्हा सन १९४६ मध्ये उल्हासनगर बनले तेव्हा पासून कधीच इथे डंपिंग ग्राउंड बनले नाही. अचानक कोणी येते आणि कचरा फेकायला चालू करतात. स्वच्छ भारताची मोहिम चालली आहे आणि घराघरातून कचरा बाहेर काढला जात आहे. सर्वत्र कचरा फेकला जात आहे आणि एका जागेवर डंपिंग ग्राउंडवर येत आहे. हे काय चालले आहे, साहेब असे होते का? डंपिंग ग्राउंड व्हायला नाही पाहीजे. तिथे बाजूला माझ्याकडे एक लिस्ट आहे, तिथे शांती प्रकाश आश्रम आहे, साई वसनशहा दरबार आहे, दरबारामध्ये लाखो लोक येत असतात, चालिया साहेब आहे, लाखो लोक, करोडो,

हजारा, चालिया साहेबांकडे नवस मागण्यासाठी ४० दिवसासाठी तिथे शेकडो लोक येणार आहेत, फक्त उल्हासनगरचेच लोक नाहीत तर संपुर्ण भारतातून आणि बाहेरच्या देशातून चालियासाठी लोक येत असतात आणि प्राचिन काळाचे शिव मंदिर आहे, पाण्याची टाकी आहे आणि आकाश कॉलनी पण आहे आणि एक कॉलेज पण आहे. म्हणजे शॉर्ट सांगण्याचे कारण म्हणजे संपुर्ण रेसीडेन्सी एरियामध्ये इट इज दि वायबल टू पुट डंपिंग ग्राउंड आज पण माझ्या बिल्डींगच्या बाहेर पण कचराकुंडी ठेवायला वाटत नाही. आज मी व्हॉटस ॲपवर एक फोटो पण बघितला आहे, शेवटच्या वेळी मला फोटो दिसत होते, या शहरामध्ये राहायचे नाही आणि स्वत: आत्महत्या करायला पाहीजे. अशा प्रकारची परिस्थिती, आज माझ्या शहराचा एक भाग आहे, फक्त माझा प्रभाग नाही तर माझे शहर आहे. जर शहर अशा प्रकारे राहील तर मला वाटते की, ज्या प्रकारे सर्वसंमतीने, जे सर्व नगरसेवकांनी बोलेले आहे, हा खुप गंभीर विषय आहे. तरी कृपया करून आजच, त्वरीत तुम्ही करतात रेफीडेन्सीयल फोर्सवाला काम, तुम्ही त्वरीत करतात आणि मला वाटते की या विषयावर पण तुम्ही त्वरीत कारवाई करणार आणि मी आशा बाळगतो की, त्वरीत कारवाई करून आजच जेवढे होईल तेवढे करा आणि हा डंपिंग ग्राउंड इथून स्थलांतरीत करा, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:–</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, डंपिंग ग्राउंडचा विषय खरोखर खुप गंभीर आहे. इथे दाखवण्यासाठी कोणी पण खाली येऊन बसत नाही. आपण डंपिंगच्या विषयी या शहरामध्ये काय काय आहे? हिंदू संस्कृती इथे हळूहळू संपत चालली आहे. पुरातन काळातील तिकडे एक मंदिर आहे, आज महात्मा फुले नगरमध्ये, सावित्रीबाई फुले नावाने एक शाळा आहे, तिथे ७०० मुले शिक्षण घेत आहेत. त्या मुलांचे भवितव्य मुले उद्याची देणगी आहे. उद्या आपले भविष्य आहे, आपला देश चालवतील त्यांचे भविष्य आपण आज मिटवत आहोत. या शहरामध्ये तुम्ही डंपिंग ग्राउंड असे आणून ठेवले आहे साहेब की, एका बाजूला, एका ठिकाणी आपण म्हणायचे, एका बाजूला महापौर मॅडम आपण म्हणायचो की, अनाधिकृत काहीच झाले नाही पाहीजे, अधिकृत व्हायला पाहीजे. स्वत: महानगरपालिकाही अनाधिकृत काम करीत आहे, तर लोकांकडून काय अपेक्षा ठेवणार? माहीतीच्या अधिकारामध्ये घेतले आहे. ही जागा जी आहे, ती डंपिंगसाठी नाही, त्याची मालकी हक्क नाही. तर मालकी हक्क नसतांना सुध्दा त्याच्यावर महानगरपालिका अतिक्रमण कशी करू शकते? कालच्या दिवसाचे सांगतो, महापौर आम्ही तिथे होतो, तिथे सहयांची मोहीम होती. पॅनल क्रमांक २० मध्ये आम्ही गेलो होतो, तिथे एकाच दिवसात तीन लोक दम्यामुळे मृत्यु झाले आहेत. एकाच दिवसात, हे काय होत आहे? सांगा तुम्ही की, एवढया भयंकर स्थितीमध्ये आज आपले शहर जात आहे. आयुक्त साहेब, संपुर्ण सभागृहामध्ये, हा कोणाच्या वार्डाचा एकाचा विषय नाही, आज कॅम्प नंबर १ मधला माणूस सुध्दा ओरडत आहे, कॅम्प नंबर ५ मधला माणूस सुध्दा ओरडत आहे की डंपिंग ग्राउंड अशा ठिकाणी आणले आहे की तिथे सिंधी समाजाचा दैवत झुलैलालचे मंदिराला पुरातन खात्याची मान्यता मिळालेली आहे. त्या मंदिराच्या ५०० मिटर जवळ बाहेर बघितले की, त्या धुराचा सगळे लोड त्या मंदिराकडे येतो. १ किलो मिटरच्या परिसरामध्ये पुरातन काळातील शिव मंदिर आहे, जे पांडवकालीन आहे, तिथे लाखो लोक तिकडे दर्शनाला येतात. त्या संपुर्ण एरियाची परिस्थिती साहेब, अशी आहे की, त्या डंपिंगमध्ये पाऊस पडल्या नंतर तिथे पाणी येते, ते पाणी पुर्ण नालीमधून संपुर्ण त्या वार्डामध्ये तिकडून शहरामध्ये पास होते आणि साहेब आपण तिथे उभे राहू शकत नाही, आपण तिकडचा वास घेऊ शकत नाही, त्या ठिकाणी लोक राहतात. आयुक्त साहेब, कुठल्या तरी अधिका—यांनी सांगायचे की ते आम्ही बंद करतो. दिनांक ७ जुलै, २०१७ ला मा. आमचे जिल्हा प्रमुख, श्री. गोपाळ लांडगे साहेबांच्या नेतृत्वाखाली श्री. बोडारे साहेब, चौधरी साहेबांच्या सोबत आम्ही या डंपिंग ग्राउंडला अल्टीमेट दिले होते की, आपण हे डंपिंग ग्राउंड बंद करा. त्या वेळी आश्वासन दिले होते की, आम्ही हे डंपिंग ग्राउंड बंद करू. महासभेमध्ये चर्चा होते, महासभेमध्ये बोलले जाते, महासभा झाल्या नंतर, त्याच्या नंतर काहीच चर्चा होत नाही. म्हणून हा प्रक्षोभ होतो. महापौरजी आपण सांगा, तुम्ही न्याय देवता आहात, एका जागेवर तुम्ही लोकांना चांगले राहण्याची सल्ला देतात, आरोग्य सेवेच्या माध्यमातून आणि एका जागेवर लोक मरत आहेत, हा कसला न्याय आहे? आयुक्त साहेब, हे कसे आहे? आपण या विषयाला गांभीर्याने घेतले नाही आणि हा विषय इथेच जर ठेवला तर मला वाटते या विषयावर अशी माणसे मरत राहतील आणि फक्त महानगरपालिकेच्या यादीमध्ये, मृत्युच्या नोंदी वाढत जातील. याला कारणीभूत कोण आहे? प्रशासन, कारण प्रशासनाच्या तोंडी आदेशानी डंपिंग ग्राउंड चालू झाले. आज आपण कोणालाही चांगले आरोग्य देवू शकत नाही. आयुक्त साहेब, आपण मगाशी सांगितले की, निधी अभावी आपण काम करू शकत नाही. लोकांकडून टक्केवारी घेऊन व्याजाने त्यांच्याकडून पैसे वसुल करतो, पण त्यांना आपण आरोग्य देवू शकत नाही. आयुक्त साहेब या डंगिंगमुळे किती, किती त्रास आहे? हे तुम्ही सर्व सभागृहाला विचारा, प्रत्येक माणूस सांगेल.

**<u>सदस्य, श्री. विजय पाटील:–</u>** याची जबाबदारी कोणाची आहे, आकाश आणि विकासची.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** आकाश आणि विकास म्हणण्या पेक्षा, मी सांगेल की, या उल्हासनगरमध्ये आयुक्त साहेब जनता त्रस्त आहे आणि प्रशासन मस्त आहे. प्रत्येक गोष्टीला लोक इथे बोलत आहेत, पाणी असो, कचरा असो, डंपिंग असेल, रोड असेल, नाली असेल, खड्डे असतील पण प्रशासन मात्र एकदम मस्त आहे. जनता आम्हांला सकाळी भांडावून सोडते, महापौरजी सकाळी आम्हांला जनता बसून देत नाही. एवढे कामे आहेत, पण आम्ही एकच विषय घेऊन यायचा आयुक्त साहेब, तुम्हांला सांगायचे आणि प्रशासन मात्र त्याच्यावर काहीच करीत नाही. आज डंपिंगच्या विषयामध्ये आयुक्त साहेब, निर्णय घेतलाच पाहीजे. त्याचे कारण असे आहे की, प्रशासनाकडून आताच श्री. किशोर वनवारी यांनी सांगितले एवढे सगळे पेपर आहेत, महानगरपालिका कुठल्याही बांधकामांना किंवा कुठल्याही कामासाठी परवानग्या मागत, स्वतः महानगरपालिकेकडे प्रदुषण मंडळाची एन ओसी नाही, ही बाब किती गंभीर आहे? की महापालिका महाराष्ट्र शासनाचे नियम पाळत नाही का? महानगरपालिकेला महाराष्ट्र शासनाचे नियम लागू होत नाहीत का? मगाशी माझे मित्र श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले की, ई—टेंडरींगमध्ये आमचे मा. मंत्री, श्री. गुलाबराव पाटील यांनी सांगितले की ही भ्रष्ट महानगरपालिका आहे. या भ्रष्ट महानगरपालिकेचे वावाडे स्वतः सत्ताधारी पक्षच सांगत आहे, या सभागृहात तर अजून किती लोकांकडून काय काय ऐकायचे आहे? या डंपिंग ग्राउंड बददल आयुक्त साहेब, तुम्ही निर्णय घ्यावा आणि तो निर्णय आजच घ्यावा. कारण जे तुम्ही तोंडी आश्वासन देवून आयुक्त साहेब, तुम्ही म्हणजे तत्कालीन आयुक्त होते, त्यांच्या तोंडी आश्वासनामुळे, तोंडी आदेश या महानगरपालिकेला लागू होतो का? सगळयात दुःखाची गोष्ट म्हणजे अजून सर्व सभागृहाने ऐकावे मी सांगतो की, खुप दुःखाची गोष्ट आहे महापौरजी तुम्ही सुध्दा हैरान होऊन जाल की, डंपिंग ग्राउंडला वॉल कंपाऊंड करण्यासाठी ४० लाख रूपये दिले गेले आणि आता तिथे गाडया रिकाम्या करण्यासाठी कट्टा बनवायचा आहे, तिथे गाडया येवून उभ्या राहतील त्यासाठी माझ्या माहीती प्रमाणे ३५ लाख रूपये दिले आहेत.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** पहीले ४० लाख रूपये कुठे खर्च केले ते विचारा?

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** म्हणजे पहीले दयायचे आणि सांगायचे आयुक्त साहेब, हे चुकीचे आहे की चुकीच्या कामाचा पायंडा आयुक्त साहेब, तुमच्या कारकिर्दीत असला नाही पाहीजे. तुम्ही झालेली चुक सुधारा आणि ठराव करा. आज सांगा सभागृहाला की हे डंपिंग ग्राउंड मी आता बंद करतो, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंडः—</u>** ठराव रद्द झाला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** एका प्रश्नाचे उत्तर आयुक्त साहेब, त्याच्यामध्ये दयावे आता जरा आमच्या वनवारी साहेबांनी सांगितले की, ४० लाखाचे अगोदर काही तरी काम झाले आणि आता पुन्हा ते ४० लाखाचे काम परत पाठवले होते, देहेरकर साहेबांनी, ४० लाखाचे काम खरोखर झाले आहे की, बिल काढले गेले किंवा नंतर ३४ लाखाचे पुन्हा आले आहे, याचा पण खुलासा व्हावा आणि सभागृहाची भावना आपल्या लक्षात आलीच असेल. तर अनाधिकृत मघाशी मी जे बोललो ते बरोबर आहे असे मला वाटते. प्रशासनाने अनाधिकृत केल्याचे चालते, बांधकामाच्या बाबतीत तुम्हांला सांगितले. आता याच्या पुढे आमच्या पण पॅनलला, साहेब आमच्या पॅनलमध्ये पण एक रस्ता जातो, तो रस्ता पण कटींग होणार आहे. तो रस्ता कटींग झाल्यावर हीच स्थिती राहणार आहे का? हे धोरण, मागणी धोरण महासभेने ठरवले होते, तेच चालले आहे. जे मागणी धोरण या ठिकाणी ठरवले, रोड कटींगच्या बाबतीत किंवा याच्या बाबतीत तर अधिकारी पाहीजे तसे अनाधिकृत करू शकतात का?

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—</u>** कृपया आदेश करा, शहरा बरोबर न्याय करा.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** मा. महापौरजी आपले पहीले जे आयुक्त होते, त्यांनी डंपिंग ग्राउंडसाठी जिल्हाधिकारी यांना पत्र पाठवले आहे. त्याच्या विषयी आताच्या आयुक्तांना माहीती आहे का नाही. हा एक मुद्दा आहे. जर त्या वेळी त्यांनी पत्र व्यवहार केला आहे, तर त्याच्या नंतर त्याचे पुढे काय झाले आज पर्यंत? ही जागा आहे, कोसगांव अंबरनाथ, कोसगांव, खुंटवली अंबरनाथ इथे जिल्हाधिकारी यांचे जागेची मागणी केली आहे. तिथे वन विभागाची जागा आहे, सर्व्हे नंबर २१ आणि २२ ही अंबरनाथची जागा आहे आणि ही जागा दगड खणीची जागा आहे. या जागेची मागणी केली होती, तर या जागेचे पुढे काय झाले? आज आपण हा डंपिंग ग्राउंड बंद करण्याचा विषय घेतला आणि दुसरीकडे कुठे हलवायचा असेल तर आपल्याकडे पर्यायी जागा असली पाहीजे? त्यासाठी आपण काय प्रयत्न केले?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—</u>** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त, मा. सन्माननिय सदस्य, उल्हासनगर महानगरपालिका शहरा अंतर्गत एकुण दैनंदिन ३६०मेट्रीक टन कचरा

निर्माण होत असतो आणि सदरचा कचरा ३ ऑक्टोंबर, २०१६ पासून आपण गायकवाडपाडा येथील खदानीत टाकत असतो (निर्गत करीत असतो) उल्हासनगर महापालिकेत कुठेही घनकचरा व्यवस्थापनासाठी किमान लागणारी ५ एकर जागा उपलब्ध नाही. त्यामुळे वारंवार घनकच—यावर प्रक्रिया करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने कोणताही प्रकल्प हाती घेण्यास अडचण निर्माण होत आहे. जागा उपलब्ध नसल्याने थोडीसी पार्श्वभुमी सांगतो, सन १९९६ पासून म्हारळगावात आपण कचरा निर्गत करीत होतो. त्याच्या नंतर सन २०१६ पासून आपण खड्डी मशिन उल्हासनगर—५, गायकवाडपाडा येथे दैनंदिन घनकचरा निर्गत करीत आहोत. सन २००९ साली एम.एम.आर.डी.ए. ने सर्व प्रथम कॉमन लॅन्डफिल साईडसाठी प्रस्ताव मागितलेले होते, एम.एम.आर.डी.ए. रिझनमधून, सदरचे प्रस्ताव आपण वारंवार महासभेत मांडले होते. मात्र टीपींचा चार्जेस आणि जागे अभावी किंवा इतर कारणास्तव महासभेने मान्यता दिली नव्हती. टीपींग चार्जेस तेव्हा ८०० रूपये प्रति टन होते. परंतु सन २०१४ साली मा. महासभेने ठराव केला आणि प्रती टन एम.एम.आर.डी.ए. कडे तळोजा येथील कॉमन लॅन्डफिल साईडमध्ये कचरा पाठवण्यासाठी प्रती टन २०० रूपये म्हणून आपण मान्यता दिली होती. तथापी एम.एम.आर.डी.ए. कडून तिथे पुढे काहीही कारवाई झाली नसल्याने सदरचा प्रोजेक्ट आता जवळ पास नाहीच आहे, तो रेंगाळलेला आहे. त्या नंतर महासभेने सुचना केल्यानुसार एक समिती स्थापन केली होती आणि त्या समितीमध्ये मा. महापौर, मा. उप महापौर, आणि काही महापालिका सदस्य होते. आपण महापालिका क्षेत्रात जागा नसल्याने आपण खाजगी जागा विकत घेऊन तिथे आपण प्रकल्प करू शकतो का? त्या अनुषंगाने प्रशासनाने जाहिराती प्रसिध्द करून काही जागा देयकार आणि त्यांच्या किमंती मागवल्या होत्या. सात, आठ प्रस्ताव आले होते, त्यातील तालुका कल्याण मुरबाड रोड येथील केरळी गावातील एक जागा, सात एकरची जागा होती, ती सर्वांना आपल्या सोईची वाटत होती आणि १३ ते १४ किलो मिटरच्या अंतरावर ती होती. त्यामुळे महापौर व कमिटीने त्यावेळेस सांगितले होते की, ठिक आहे, ही जागा आपण घेऊ शकतो, पुढील कारवाई करावी. त्या अनुषंगाने प्रथम तिथे स्थानिक प्राधिकरणाकडून आपल्याला मान्याता घ्यायची असते, ठराव घ्यायचा असता आणि तिथे केरळी ही एक ग्राम पंचायत असल्यामुळे सदरचा विषय ग्राम पंचायतीमध्ये आणला होता. त्यांना तिथे आपण काय करणार आहोत? याची माहीती मिळावी म्हणून त्यांनी विनंती केली होती आणि त्या अनुषंगाने काही आपल्याकडे ज्या कंपनी होत्या, ज्या कच—यावर प्रक्रिया करून त्याच्या पासून विजनिर्मिती किंवा गॅस निर्मिती करू शकेल त्यांना घेऊन आम्ही ग्राम पंचायत इथे त्यांना प्रोजेक्टद्वारे सांगण्याचा प्रयत्न केला की हा प्रोजेक्ट कसा असेल? तथापी तेथील नागरीकांनी, तेथील सदस्यांनी आमच्या प्रोजेक्टची आणि स्क्रिनची तोडफोड करून उल्हासनगर महानगरपालिकेचा कचरा आमच्या गावात का आणता? असा प्रश्न विचारून सदरच्या ग्राम पंचायतीने कोणताही ठराव करून दिला नाही. तदनंतर वारंवार सगळीकडे जागेचा प्रश्न भेडसावत असल्यामुळे जिल्हाधिकारी व शासन स्तरावर वारंवार जागा मागणी केलेली आहे. त्यात नंतर आता मागील वर्षात सन २०१७ साली तत्कालीन आयुक्त, अंबरनाथचे तहसिलदार व आरोग्य विभागाचे अधिकारी/कर्मचारी, तालुका अंबरनाथ उसाटणे गांव इथे जागा पाहणी केल्या नंतर सदरची जागा ही घनकचरा व्यवस्थापनासाठी ठिक असल्याचे दिसून आले आणि त्या प्रमाणे तहसिलदारांनी सुध्दा त्याला मान्यता दिली. सदरची जागा ही टोटल १०० एकरची असून त्यातली आपण ३० एकरची जागा मागणी केली होती, सदरच्या जाग्याचा ७/१२ हा एम.एम.आर.डी.ए. च्याच नावाने असल्याने आणि सदरची जागा ही घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठीच राखीव असल्याने ती सहज उपलब्ध होईल, असे तत्कालीन तेव्हाचे तहसिलदार यांनी मा. आयुक्तां सोबतच्या झालेल्या बैठकित सांगितले होते. त्या अनुषंगाने त्यांनी तशी रिकंमंडेशन दिले होते आणि आपणाकडूनही ठाणे जिल्हाधिकारी आणि शासनाकडेही त्याचा पाठपुरावा सुरू आहे. तथापी अद्याप ती जागा आपल्याला मिळालेली नाही, तर ही आहे पार्श्वभुमी तदंनंतर आता एक उल्लेख केल्यानुसार वनवारी साहेबांनी क्यु वेस्ट टू एनर्जी राज्य शासनाकडून एक प्रोजेक्ट होत आहे आणि तो क्लस्ट्रर प्रोजेक्ट राज्य शासनाने त्यांच्याशी करार केला आहे. मात्र उल्हासनगर, अंबरनाथ व बदलापूर यांचा एक क्लस्ट्रर प्रोजेक्ट करायचा आहे, तथापी तो राज्य शासनाच्या स्तरावर प्रलंबित आहे. महापालिकेकडे त्याची अद्यावत माहीती नाही. याच अनुषंगाने मा. आयुक्त यांनी आपल्याकडे जागेचा प्रश्न उद्भवत असल्याने कालच दिनांक १९/७/२०१८ रोजी एक ॲस्पारीटी एक कंपनी आहे, त्यांच्या सोबत आमची बैठक झाली त्यांनी ठाणे महानगरपालिके सोबत करार केलेला आहे आणि ठाणे महानगरपालिकेने ४० एकर जागा कल्याण—शिळ फाटा रोड जर माहीती असेल, कोकण रत्न हॉटेल आहे आणि कोकण किंग आहे, त्याच्या मागच्या साईडला एक ४० एकरची जागा आहे आणि तिथे कच—या पासून गॅस निर्मिती व विज निर्मितीचा प्रकल्प राबवणार आहेत आणि त्यांनी मा. आयुक्त साहेबांकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. तर त्या संदर्भात आता बोलणे चालू आहे आणि त्या अनुषंगाने मा. आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार मी त्यांच्या सोबत मंगळवारी ती साईड व्हिजीट करून त्या बाबत काय धोरणात्मक निर्णय घ्यायचा असल्यास सदरचा प्रस्ताव प्रशासनातर्फे महासभेपुढे मांडला जाईल.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** मा. आयुक्त, मा. महापौर मॅडम....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब....

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** महासभेमध्ये एवढया गंभीरतेने विषय चालला आहे...

**महापालिका सचिवः—** साहेब एक मिनीट सात वाजून गेले आहेत, जर सर्वांची परवानगी असेल तर सभा चालू ठेवू शकतो, आदर वाईज सभेची वेळ संपली आहे.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** चालू दया, चालू दया.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** नाही तर आदेश करा, महापौर साहेबा, कृपया आदेश करा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** ठराव करून नंतर सभा स्थगित करा, इतिवृत्ताची वाट न पहाता ठराव करा.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** या विषयी काय?

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब,.....

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** महापौरजी तुम्ही पत्र दया, नाही तर पेडींग ठेवा जेव्हा दुस—या वेळी चर्चा करू तेव्हा विषय घेऊ, आता पेडींग ठेवा.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** दुस—या मिटींगमध्ये हा मुद्दा कंटीन्यु व्हायला पाहीजे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** महापौरजी आमचे निवेदन आहे की, लवकरात लवकर विशेष महासभा लावा.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** नाही तर उद्या ठेवा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** डंपिंग ग्राउंडसाठी विशेष महासभा लावा.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** महापौर साहेबा, तुम्ही निर्णय घ्या, नाही तर लवकरात लवकर विशेष महासभा लावा.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** अडांगळेची निलंबित ऑर्डर आली नाही, तारीख संपली आहे.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** विषय पेंडींग ठेवून पुढच्या महासभेत याच्या बददल चर्चा व्हावी.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** सन्माननिय सदस्य....

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** चर्चा कशाला दादा, अजून चर्चा कशाला?

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** सन्माननिय सदस्य, डंपिंग ग्राउंडचा विषय आता पेंडींग ठेवण्यात येत आहे आणि ही मिटींग अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे. आता सत्कार करण्यात येईल.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** मॅडम, तारीख सांगा, थोडी लवकरची तारीख घ्या, सोमवारी ठेवा, मंगळवारी ठेवा.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** अडांगळेची निलंबित ऑर्डर आली नाही, तारीख संपली आहे. त्यांनी सांगितले होते की, आजच्याच तारेखेमध्ये त्याला निलंबित करू.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, आजची सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात यावी, जनगण मन चालू करा, राष्ट्र गिता नंतर सत्कार काय करायचे आहे?

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** केणेची तुम्ही सांगा, काय सांगणार होते?

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** सत्कार करा, सत्कार करा. सत्कार करण्यासाठी महासभा सुरू करा.

**सदस्य, श्री. मनोज सयानीः—** केणे साहेब, मिटींग स्थगित झाली आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** सत्कार करा, सत्कार.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u>** महासभा चालू करा, सत्कार करा, त्यासाठी कोणताही नियम नाही.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** ही मिटींग स्थगित करण्यात येत आहे, आता सत्कार करण्याचा कार्यक्रम होईल.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u>** त्यासाठी कोणताही नियम नाही, सत्कार झाला पाहीजे.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचना नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत व महापालिके मार्फत स्वच्छ उल्हासनर सन २०१८ स्पर्धा आयोजित केली होती. सदर स्पर्धे अंतर्गत एकुण २० पॅनल पैकी तीन क्रमांक जे स्वच्छ म्हणून घोषित करण्यात येणार होते, ज्या शासनाने गाईड लाईन्स दिल्या होत्या, त्या अनुषंगाने एकुण १२ निकष होते, त्या १२ निकषांच्या अंतर्गत एक त्रेस्त समितीकडून माहे जानेवारी, २०१८ ते फेब्रुवारी, २०१८ पर्यंत स्पर्धा आयोजित केली होती. सदर त्रेस्त समितीने दिलेल्या निकालानुसार मी या पुर्वीच क्रमांक घोषित केलेले आहेत. त्या अनुषंगाने सर्व संबंधित प्रभागाचे, पॅनलचे नगरसेवक यांचे मी इथे प्रशिक्षणा मार्फत धन्यवाद आणि अभिनंदन व सत्कार करीत आहोत. मा. महापौर, यांच्या हस्ते त्रेस्त समितीने दिलेल्या गुणांकानुसार प्रथम पारितोषीक पॅनल क्रमांक १० यांना देण्यासाठी घोषित करण्यात येत आहे. मा. महापौर व मा. आयुक्त साहेब,..

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** गुण किती?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** यांना विनंती करतो की, त्यांनी त्यांचा सत्कार करावा, पॅनल क्रमांक १० चे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** पण गुण किती मिळाले?

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** महापौरजी, एक मिनीट....

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** गुणाचे तपशिल नंतर देतो, प्रेसवाले आतमध्ये यायचे असेल तर कृपया फोटोसाठी आतमध्ये येऊ शकतात, सभागृह नेता व विरोधी पक्ष कृपया नेता स्टेजवर यावे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** मा. महापौरजी, माझा आरोप आहे की, यामध्ये अस्वच्छ प्रभागाला स्वच्छता प्रभाग म्हणून क्रमांक दिले जात आहे, पुरस्कार दिला जाणार आहे. जे समितीचे सदस्य होते, ज्या एरियामध्ये ते राहतात, ज्या प्रभागामध्ये राहतात, त्या प्रभागांना पहीला आणि दुसरा क्रमांक दिला आहे. आमच्या प्रभागामध्ये ग्रीन प्रोजेक्ट असून सुध्दा फक्त संपुर्ण उल्हासनगरमध्ये दोन प्रोजेक्ट आहेत. एक मिना सोनेंजी यांनी त्यांच्या वार्डामध्ये केला आहे आणि एक माझ्या प्रभागामध्ये आहे. दोन प्रोजेक्ट असतांना त्या प्रभागांना त्यामध्ये मोजले घेतले नाही आणि न्युज पेपरमध्ये सुध्दा ही बातमी आली आहे की, जो अस्वच्छ आहे, तो क्लीयर नाही, जो साफ नाही, त्यामध्ये सुध्दा यांनी केले आहे, त्यामध्ये प्रभाग १९ चे फोटो ग्राफ लोकमतमध्ये आले होते, १० आणि १८ चे ही परिस्थिती असतांना सुध्दा पण मला वाटते की, ही समिती परत बनवण्यात यावी आणि परत याचा निवाडा करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** राजेशजी तपास चालू आहे, रिझल्ट मिळेल.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:—</u>** राजेशजी ही जतन चांगली नाही.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** त्रयस्थ समितीने दिलेल्या गुणांकानुसार हे पारितोषीक घोषित करण्यात आले आहेत. पॅनल क्रमांक १० चे सन्माननिय नगरसेवक, श्रीमती पुष्पा नाना बागुल, श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, श्री. राजेंद्र शांताराम चौधरी कृपया यांनी व्यास पिठावर यावे. सदर पॅनलचे सर्व नागरीक, सर्व नगरसेवक, सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे अभिनंदन त्यांना विनंती करतो की, सर्व पॅनल क्रमांक १० चे अधिकारी/कर्मचारी व प्रभाग अधिकारी यांनी सुध्दा स्टेजवर यायचे आहे. पॅनल क्रमांक १० चे स्वच्छता निरीक्षक, उपस्थित स्वच्छता निरीक्षक, मा. महापौर पुष्पगुच्छ देवून व प्रमाणपत्र देवून सत्कार करीत आहेत.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** गुण पण सांगा ना, किती गुण मिळाले ते पण सांगा?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** गुणाचा तक्ता आपल्याला नंतर दिला जाईल.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** अहो, तुम्ही प्रथम पारितोषीक घोषीत करता, गुण किती मिळाले ते आम्हांला कळत नाही, म्हणजे आम्हांला किती गुण मिळाले ते कळतील ना.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** सर्वांचे अभिनंदन, सर्व नगरसेवकांना प्रमाणपत्र मा. आयुक्त साहेब, कृपया...द्वितीय क्रमांक पॅनल क्रमांक १८ च्या सन्माननिय नगरसेविका श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे, श्री. प्रमोद नामदेव टाले, श्रीम. कविता सुधीर बागुल, श्री. राजेश देवेंद्र वानखेडे कृपया त्यांनी व्यासपिठावर यावेत. पॅनल क्रमांच्या १८ च्या सर्व सन्माननिय नगरसेवक, अधिकारी/कर्मचारी यांनी सर्वांनी मेहनत घेतल्यामुळे त्यांना सदरचा क्रमांक पटकवता आला आहे, सर्वांचे अभिनंदन, पॅनलचे सर्व उपस्थित प्रभाग अधिकारी व स्वच्छता निरीक्षक उपस्थित असल्यास त्यांनी व्यास पिठावर यावे, मा. महापौर व मा. आयुक्त साहेब यांना विनंती आहे की, त्यांना प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार करण्यात यावा. मा. विरोधी पक्ष नेता, मा. सभागृह नेता यांनाही विनंती करण्यात येत आहे की, कृपया त्यांनी त्यांचा सत्कार करण्यात यावा. सर्वांनी सदर अभियानात मेहनत घेतल्याने त्यांना द्वितीय क्रमांक मिळाल्या बददल सर्वांचे अभिनंदन तसेच तृतीय क्रमांक पॅनल क्रमांक १९ यांना मिळाले असून सदर पॅनलचे नगरसेवक, श्री. किशोर नारायणदास वनवारी, श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी, श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, श्री. विजू चाहु पाटील संबंधितांनी व्यास पिठावर यावे. सर्वांचे अभिनंदन, पॅनल क्रमांक १९ चे सर्व अधिकारी/कर्मचारी, सर्व नागरीक तसेच सहाय्यक आयुक्त यांनी कृपया व्यास पिठावर यावे, सभागृह नेता यांनी कृपया त्यांचा सत्कार करण्यात यावा. तसेच महानगरपालिकेतर्फे एकुण चार प्रभाग समिती पैकी एक प्रभाग समिती निवडण्यात आली असून प्रभाग समिती क्रमांक ४ यांनी क्रमांक पटकावला असून तत्कालीन सभापती व आताचे सभापती कृपया सर्व नगरसेवकांच्या सहीत...

**<u>सदस्या, श्रीमती वसुधा बोडारे:—</u>** आताच्या सभापतींचे आज वाढ दिवस आहे, त्यामुळे आम्ही सर्व वर येत आहेत, त्यांचा वाढ दिवस साजरा करायला.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** सर्व नगरसेवक व तत्कालीन सहाय्यक आयुक्त व सद्याचे सहाय्यक आयुक्त यांनी कृपया व्यास पिठावर यायचे आहे. प्रभाग समिती क्रमांक ४ ला स्वच्छ प्रभाग समिती म्हणून महापालिके मार्फत घोषीत करण्यात येत आहे. प्रभाग समितीचे सर्व नगरसेवक येऊ शकतात. सन्माननिय नगरसेविका, श्रीमती ज्योती माने यांचा आज वाढ दिवस आहे, त्यामुळे सर्व सन्माननिय सदस्य/नगरसेवक यांच्या तर्फे मॅडमला वाढ दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. मा. आयुक्त साहेबांना विनंती करतो की, त्यांना प्रमाणपत्र देण्यात यावे. सर्वांना धन्यवाद, सर्वांचे आभार स्वच्छ भारत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियानामध्ये सर्वांनी सहभाग झाल्या बददल सन्माननिय गंगोत्री साहेब व माने मॅडम यांचे अभिनंदन, धन्यवाद, सदरचा कार्यक्रम संपल्याचे जाहीर करीत आहे.

**<u>महापालिका सचिव:—</u>** सर्वांनी मंचावरून खाली यावे, राष्ट्रगीत सुरूवात करणार आहोत.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** कृपया सर्व सदस्यांनी खाली या,

**<u>महापालिका सचिव:—</u>** राष्ट्रगीत स्टेजवरून खाली आल्यावर म्हणण्यात येईल.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** सर्व महीला सदस्यांना विंनती आहे की, त्यांनी खाली यावे, राष्ट्रगीत सुरू होणार आहे.

**<u>महापालिका सचिव:—</u>** कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे,

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** फोटो काढणे नंतर करा.

**<u>महापालिका सचिव:—</u>**कृपया सर्वांनी जागेवर उभे रहावे, राष्ट्रगीताची सुरूवात करण्यात येत आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** अहो मॅडम बक्षिसाची रक्कम कधी मिळणार आहे.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>**सदरची सभा अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

---

सूचकाचे नांव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नांव :— श्री. राजेश वदारिया

**<u>स्थगित प्रस्ताव</u>**

दिनांक २०/०७/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ११ ड** **दिनांक : २०/०७/२०१८**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २०/०७/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ७.१४ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा स्थगीत केल्याचे जाहीर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— १६/८/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १६/८/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

**३—अ**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/०७/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करण्यात आल्याने सदर सभा गुरूवार, दिनांक १६/८/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर
२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | २८ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | २९ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ५ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३० | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ६ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३१ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३२ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| ८ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३३ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३४ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १० | श्री. अशोक मच्चुमल छाप्रु | ३५ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| ११ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ३६ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १२ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ३७ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १३ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ३८ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| १४ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ३९ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| १५ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४० | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १६ | श्री. राजेश नानिकराम वदारिय | ४१ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १७ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ४२ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १८ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ४३ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| १९ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ४४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २० | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ४५ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २१ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ४६ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २२ | श्री. रवि किशनचंद जग्यासी | ४७ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २३ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ४८ | श्री.विकास परशुराम पाटील |
| २४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ४९ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २५ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ५० | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके | ५१ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २७ | श्री. सुमित सागर सोनकांबळे | ५२ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |

तर

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे, २. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्रीमती पंचम उमेश कालानी, ४. श्रीमती आशा नाना बिराडे, ५. श्री. स्वप्नील मिलिंद बागुल, ६. श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड, ७. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ८. श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहता, ९. श्रीम. गीता लालचंद साधनानी, १०. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ११. श्रीमती जया प्रकाश माखिजा, १२. श्रीमती शुभांगीनी निकम, १३. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १४. श्रीमती छाया सुजित चक्रवरती उर्फ अडसुळ, १५. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, १६. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, १७. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), १८. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, १९. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, २०. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई), २१. श्री. रमेश महादेव चव्हाण, २२. श्री. चंद्रशेखर केशव यादव, २३. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, २४. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान, २५. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, २६. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, २७. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, २८. श्री. विजय चाहु पाटील, २९. श्री. आकाश परशुराम पाटील, ३०. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.
१.श्री. गणेश पाटील, आयुक्त
१. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
२. श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
३. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी
४. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
५. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता

६. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
८. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
१०. श्री. संतोष जाधव, उप लेखाधिकारी
११. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
१२. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१३. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त
१४. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१५. श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
१६. श्री. नंदलाल सामतांनी, प्र. सहाय्यक आयुक्त
१७. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१८. श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता
१९. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२०. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२१. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक
२२. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षारक्षक
२३. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२४. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक
२५. श्रीमती निलिमा कदम, लेखापाल (शिक्षण मंडळ)

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती नर्गिस खान, लिपीक
२.श्री. बाळु भांगरे, लिपीक

दुपारी ४.२९ वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिवः—** ही दिनांक २०/७/२०१८ रोजीची स्थगीत सभा आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मा. महापौर महोदया, केरळ राज्यामध्ये महाप्रलय आल्याने पुरग्रस्तामध्ये तेथिल बरेच लोक मृत्युमुखी पडले आहेत. त्यांना सभागृहाच्यावतीने श्रध्दांजली देण्यात यावी. व ही सभा २० तारखेला १२ वाजता ठेवण्यात यावी.

**महापालिका सचिव :—**दोन मिनटे मौन धारण करावे.

---

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

**शोक प्रस्ताव**

केरळ राज्यामध्ये महाप्रलय आल्याने पुरग्रस्तामध्ये बरीच लोक मृत्युमुखी पडले आहेत.

मृत्युमुखी पडलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ११ ड (१)** **दिनांकः— १६/८/२०१८**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार केरळ राज्यात पुरग्रस्तात मृत्यूमुखी पडलेल्या लोकांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** मा. महापौरजी, आजची जी सभा आहे, जे विरोधी पक्ष नेता यांनी सांगितले आहे, आम्ही सुध्दा सर्व त्या गोष्टीशी सहमत आहेत आणि २० तारखेला जी रेग्युलर महासभा ४.०० वाजता आहे, त्या पहीले ही सभा दुपारी १२.०० वाजता ठेवण्यात यावी. सोमवारी कन्टीन्युव करू. २० तारखेला १२.०० वाजता आणि ४.०० वाजता रेग्युलर आणि ही सभा स्थगित करण्यात यावी.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे,

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** आमचे काही सदस्य सांगत आहेत की, २० तारखेला २.०० वाजता ठेवण्यात यावी.

**महापालिका सचिवः—** मा. पिठासिन अधिकारी यांनी जाहीर केले आहे की, पुढील आदेश मिळे पर्यंत ही मिटींग स्थगित ठेवण्यात येईल.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** ही महासभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगीत करण्यात येत आहे.

---

सूचकाचे नांव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव :—श्री. राजेश वदारिया

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक २०/०७/२०१८ रोजी स्थगित केलेली सभा दिनांक १६/८/२०१८ रोजी सांयकाळी ४. ०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ११ इ** **दिनांक : १६/०८/२०१८**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १६/०८/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ४.४१ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— ४/९/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ४/९/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

**३—ब**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/०७/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करण्यात आल्याने सदर सभा गुरूवार, दिनांक १६/८/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. परंतु सदर सभा पुन्हा स्थगित झाल्याने मंगळवार दिनांक ४/९/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३७ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३९ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४० | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ७ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४१ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ८ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४२ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ९ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४३ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४४ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ११ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४५ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १२ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४६ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १३ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १४ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४८ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १५ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ४९ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १६ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ५० | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १७ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५१ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५२ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १९ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ५३ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| २० | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५४ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २१ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५५ | श्रीमती सुमन राजेश सच्चदेव |
| २२ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५६ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २३ | श्रीमती शुभांगिनी निकम | ५७ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५८ | श्रीमती अंजली चंद्रकात साळवे |
| २५ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५९ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २६ | श्रीमती छाया सुजित चक्रवरती उर्फ अडसूळ | ६० | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २७ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ६१ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २८ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ६२ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २९ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ६३ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| ३० | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६४ | श्री. विजय चाहु पाटील |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६५ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३२ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६६ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३३ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६७ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३४ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६८ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३५ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६९ | श्री. अरूण लक्ष्मणदास आशान |
| ३६ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ७० | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी, २. श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर, ३. श्री. अशोक बच्च्युमल छाप्रु, ४. श्री. राजेश नानिकराम वदारिया, ५. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, ६. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे), ७. श्रीमती ज्योती शामराव माने, ८. श्रीमती शीतल चंद्रकांत कदम, ९. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, १०. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, ११. श्री. आकाश परशुराम पाटील, १२. श्री. विकास परशुराम पाटील.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. गणेश पाटील, आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
५. श्री. एस. के. सेलवन, कार्यकारी अभियंता
६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
७. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
८.श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
९.श्री. संतोष जाधव, उप लेखाधिकारी
१०.श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
११.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१२. श्री. मनीष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१३. श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
१४. श्री. नंदलाल सामतानी, प्र. सहाय्यक आयुक्त
१५. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
१६. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
१७. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१८.श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक
१९. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२०. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२१. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
२२. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२३. श्रीमती निलिमा कदम, लेखापाल (शिक्षण मंडळ)
२४ श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२१.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२२. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक
२३.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२४. श्री.दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
२५. श्री. राजा बुलानी, प्र. विधी विभाग प्रमुख
२६. श्रीमती. निलीमा कदम, लेखा पाल, शिक्षण मंडळ

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. बाळु भांगरे

दुपारी ३.३० वाजता वंदेमातृरम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिवः—** ही दिनांक ४/९/२०१८ रोजीची, दिनांक २०/७/२०१८ रोजीची व दिनांक १६/८/२०१८ रोजीची स्थगीत सभा आहे. मागच्या वेळी डंपींग ग्राउंडचा विषय पेडींग होता, त्या पासून सुरूवात होईल. विषय क्रमांक २१ आधी घेण्यात आला होता, त्या पासून सुरूवात होईल.

**सदस्य, श्री. मनोज सयानीः—** मा. महापौर जी, उप महापौर जी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम सन्मानीय सदन, महापौर मॅडम मी पॉईंट ऑफ ऑर्डर मध्ये एका विषवार आपल्याशी चर्चा करून इच्छितो त्याकरीता मला आपली परवानगी हवी आहे. आयुक्त साहेब फोनवर आहेत वाटत त्यांच्याकरीता हा विषय आहे. मा. आयुक्त साहेब आज सद्यस्थितीत उल्हासनगर शहरात असा एकही रस्ता नाही की त्यात खड्डे नाहीत आज हा विषय सत्ताधारी किंवा विरोधीपक्षाचा नाही. चौधरी साहेब आज हा विषय उल्हासनगरच्या जनतेचा आहे. तो गेल्या तीन महिने पासून रस्त्यावर खड्डे आहेत. शेखर भाऊ एक मिनीट आज या साईटला भल्याभल्यासाठी लाजिरवानी गोष्ट आहे की, आम्ही सत्तेत असुन देखिल घोडयाला बांधलेल्या नाळे प्रमाणे मागे चाललेलो आहे कोणी डावीकडे करीत आहेत, तर कोणी उजवीकडे करीत आहेत ही अतीशय लाजीरवानी गोष्ट आहे. आयुक्त साहेब उल्हासनगर शहरातील एक रस्ता असा सांगा की आपण अस सांगाकी उल्हासनगर मध्ये जिथे खड्डे नाहीत. आपल रोजच येणे जाणे उल्हासनगर पासुन ते सेंचुरी कंपनी पर्यंत किंवा मुंबईला जाण्याकरीता एकातरी रस्त्याने जात असाल जेकी नशीबाने नगर उद्यानाने सिमेंट क्रांक्रीटचा रस्ता बनविण्यात आलेला आहे की उल्हासनगर ते शहाड पर्यंत जेव्हा जाल तिथ पर्यंत जो आरामात केलेला प्रवास पण तेथुन पुढे शहाड ब्रिज खाली संपूर्ण आराम निघुन जात असेल. आज उल्हासनगर मध्ये एकही असा रस्ता नाही असे किती रस्त्यांचे नावे घेवु ५ नंबर पासुन सुरूवात करू कैलाश कॉलनी, कुर्ला कॅम्प, चालीया मंदिर, प्रभाराम चौक, रेशन ऑफीस, नेताजी चौक, प्रभात टॉकीज, व्हिनस टॉकीज, ४ नंबर मेन बाजार, बोट क्लब, हिराघाट, उल्हास स्टेशन, शहाड ब्रिज, अमन टॉकीज रोड, सपना गार्डन रोड, खेमाणी, धोबीघाट, एवढयात की किती रस्त्यांची नावे घेऊ ज्याच्यात खड्डे नाहीत. आज अशी स्थिती आहे की सामन्य जनता उल्हासनगर मधील दररोज या रस्त्यांवरून जात आहे आणि त्यांची स्थिती अशी आहे की, त्यांच्या पाठीचे दुखणे कंबरचे दुखणे किंवा गुढग्यांचे दुखणे एकंदरीत पाईल्स च्या रूग्नांना देखिल तकलीफ होत आहे. त्यामुळे मी आज हा क्विक रिलीफ स्प्रे घेवुन आलो आहे आयुक्त साहेब तुम्हांला देण्यासाठी हे माझ्याकडुन नाही आहे हे सदन यांच्या कडुन देखिल नाही हे संपूर्ण उल्हासनगरच्या जनतेकडुन आहे की, या वेदना शहरातील नागरीक सहन करीता आणि आम्हा सर्वांचे शिव्यांमार्फत दुखणे देत आहेत शहरातील नागरीक त्यांना आम्ही तोंड दाखवाच्या लायक नाही आहोत जर आपणास त्या खड्डयामधुन जाण्यास तकलीफ होत नसेल कोणत्या प्रकारची तर हे क्विक रिलीफ स्प्रे और ये आयोडेक्स आपल्या करीता आणलेले आहे ज्याला आपण लावावे कमीत कमी या वस्तु चा आपण अनुभव घ्या की शहराची काय परिस्थिती आहे आज.

**सदस्य, श्री. शेखर यादवः—** आयुक्त साहेब, १४ करोडचे काम पास केले कुठे गेले? हा खर्च कशावर झाला कुठे झाला? याची चौकशी लावा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** "आयोडेक्स मलीये काम पे चलीये" आयोडेक्स मलीये काम पे चलीये या आमच्या शहराला हा शब्द लागु होतो "आयोडेक्स मलीये और काम पे चलीये" आणि परत रिलीफ.....

**सदस्य, श्री.मनोज सयानीः—** तुमचे अधिकारी बोलतात की, ठेकेदार आमचे ऐकत नाहीत. आम्ही काय करणार?

**सदस्य, श्री. शेखर यादवः—** १४ करोडचे काय झाले? उपमहापौरजी विचारा १४ करोडचे काय झाले? दोन महीन्यामध्ये १४ करोड कुठे गेले? दोन महीने पण झाले नाहीत. आणि ५० लाख अजुन आपण पास केले आहे हे ५० खड्डे देखिल भरणार नाहीत यात चौकशी लावा. हे काय जे आयोडेक्स वाटा, स्प्रे वाटा लोकांना आपण ज्यांच्याकडून घेतलेले आहेत.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** मा. महापौर जी श्री. शेखर यादव यांचा प्रश्न मनोज लासी यांनी केलेला प्रश्न. ....

**सदस्य, श्री. मनोज सयानीः—** आज हे प्रशासन ठेकदाराला वाचवण्याच्या भुमिकेत आहे. माझे हे स्पष्ट आरोप आहे की झा.पी. ॲण्ड कंपनी अजुन जय भारत कंन्ट्रशन कंपनी ज्यांना आपल्या शहराती रस्ते पाटोल करून रिसरफेसिंग करण्याचे काम दिले होते जुन मध्ये त्यांचे काम जुलै मध्ये संपन्न झाले त्याकामाला ६ महिन्याची मुदत होती जे ८ डिसेंबरला ते काम पुर्ण होणार आहे. त्याकरीता ठेकेदार वाट पाहत आहे की ८ डिसेंबर ची तारीख निघुन जावी आणि १४ कोटीचे काम ज्याची लायबिलिटीचा वेळ निघुन जाई आणि १४ कोटी घेवुन जावे या दोन्ही कंपनी मध्ये झा.पी. एण्ड.कंपनी आणि जय भारत कंन्ट्रशन कंपनीला देण्यात आला आहे. यामध्ये संपुर्णपणे प्रशासन झा.पी. एण्ड. कंपनी आणि जय भारत कंपनी बरोबर मिळाले आहे. ८ तारखेला हे काम, लायबिलिटी संपत आहे आणि त्या ८ डिसेंबरची वाट बघण्यात येत आहे. पाऊस होता तर आम्ही आपले म्हणणे ऐकली की डांबरच काम नाही होवु शकत. आम्ही त्या ठिकाणी माती टाकुन गेले १५ दिवसांपासून कल्याण मध्ये डांबर टाकण्याचे काम सुरू झालेले आहे.

**<u>सदस्य, श्री. शेखर यादवः—</u>** माझे दोन ठिकाणी रोडचे काम व्हायचे आहे त्या करीता मी २ ठिकाणाचे पत्र देवुन ही माझे कामे झालेले नाही मग १४ करोड रूपये वापरले कुठे यांनी १४ करोड रूपये गेले कुठे दाखवा सांगा चौकशी लावा यांच्यावर?

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानीः—</u>** आज व्यापा—यांची अशी हालत झाली आहे की व्यापारी लोग डब्बे घेवुन नेहरू चौकवर उभे आहे उल्हासनगर नगर रिलीफ फंड खड्डे भरण्याकरीता भिक मागत आहे आणि ती भिक आम्हाला घरी येवुन देत आहेत की तुमचे खिसे आणि खड्डे भरून घ्या आज व्यापारी स्वत:हा सिमेंट एस.सी. मागवुन आपआपले खड्डे भरून घेत आहेत. जसे आम्हाला चालिया करीता जायला मेन रस्ता मिळतो काल जमनुजी आणि मी व्हि.टी.सी.च्या रस्त्याने गेलो मुलभुत सुविधाच्या रस्त्यांची हालत बघा व्हि.टी.सी. वरून जो चा रस्ता जातो तो बघा त्याच ठेकेदाराने नेहरू चौक ते फारवर लाईन चा रस्ता ऐवन बनवला आहे आणि व्हि.टी. वाला रस्ता उखडलेला आहे. हे काय आज आम्ही इथे चर्चा करून बहाणा शोधत आहोत. आम्हाला बहाणा हवा आहे पब्लीकमध्ये बोलायला की आम्ही बोललो आम्ही आपल्यासाठी ओरडलो गणपती १३ तारखेला येणार आहते, आम्ही लोकांना बोलतो की छोटे गणपती आणा तुमचे १० फुटावरील गणपती तुटतील खड्डयाच्या रस्त्यावर मुर्ती नाही येवु शकणार कुठुन येईल फारवर लाईनचा रस्ता खराब, शहाड चा रस्ता खराब, शांती नगरचा रोड खराब, श्रीराम चा रोड खराब, कैलाश कॉलनी चा रोड खराब, गणपती बप्पा येणार कुठून? आमचा चालीया संपत आलेला आहे एक वेळा ४ आणि ५ नंबरचे जेवढे पण नगरसेवक येथे बसलेले आम्ही दररोज चालीया मंदिरात जातो पहिले दुखापती मुळे कंबर दुखते, नंतर डंपींग ग्राऊडच्या घाण वासामुळे नाक सडत आहे आमची आज आम्हाला बहाणा दया की आम्ही मुकी बहिरी पब्लिक यांना सांगण्यासाठी आम्ही तर या विषयावर आवाज उठवला होता मी तर ओरडलो मी तर केल आज आम्ही बहाणा घुडण्याकरीता आलो आहेत आम्ही के आम्हाला बहाणा दया...

**<u>सदस्य, श्री. शेखर यादवः—</u>** १४ करोडचे काय झाले?

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानीः—</u>** आयुक्त साहेब आपल्या कडुन भरपुर अपेक्षा आहेत, आम्हाला आपला हस्ता हुआ नुराणी चेह—याकडुन आम्हाला भरपुर अपेक्षा आहेत साहेब त्या अपेक्षा कुठेना कुठे काही ठेकेदार काही अधिकारी आपल्याला चुकीची माहिती देवुन आपली दिक्षा भुल करत आहे, हे त्याना उल्लू सिधा करण्यासाठी आपल्याला खोटयानाटया गोष्ट सांगत आहेत. आज आपले शहरातील नागरीकक्

**<u>सदस्य, श्री. शेखर यादवः—</u>** आयुक्त साहेब शहरातील लोकांना आम्ही उत्तर देताना आम्हाला उत्तर देता येत नाही आणि लोक आमच्या विषयी काय काय बोलता येत नगरसेवकांन विषयी नाही ते शब्द आम्हाला वापरत आहे.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानीः—</u>** आज तुम्ही उत्तर दया की, तुम्ही यासाठी काय करणार? कशा प्रकारे करणार?_कशा प्रकारे आम्हांला या खड्डया पासून रिलीफ मिळेल? पुढचे काम कधी चालू होणार ठेकेदाराकडून कधी लायबिलिटीचे काम घेणार? आयुक्त साहेब, हे उत्तर आज तुम्हांला दयावे लागेल. नाही तर नंतर विषय इथे चालणार नाही.

या वेळी सदस्य, श्री. भगवान भालेराव यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. शेखर यादवः—</u>** आयुक्त साहेब, सन २००७ मध्ये पहीले चांगले रस्ते सुधारणा झाली होती, आपल्या रस्त्यांची चांगली परिस्थिती होती. कल्याण, अंबरनाथला गेलो तर आज अंबरनाथला पण चांगले रस्ते बनलेले आहेत, कल्याणचे रस्ते चांगले बनलेले आहेत. सन २००७ मध्ये आपली परिस्थीती त्यांच्या पेक्षा चांगली होती. आज आपली परिस्थिती काय झाली आहे आणि दोन महीन्यामध्ये १४ करोडचे सत्यानाश केला आहे, पब्लिकच्या पैशाची आणि परत ५० लाख रूपये खर्च करणार? गणपती जाण्या पुर्वीच खड्डे पडतील. रस्त्यावर एक हजार खड्डे असतील.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानीः—</u>** आताच्या स्थायी समिती च्या सदस्यांनी आता सांगितले की, तेथे ६१ रस्त्याचा विषय घेण्यात आलेला होता तेव्हा अधिकारी बोलले होते की नाही साहेब आपण जो खड्डा बोलत ना तो खड्डा नाही झालेला त्याच्या बाजुला खड्डा झालेला आहे. ठेकेदाराने जो खड्डा भरलेला आहे ना तो खड्डा झालेला नाही. त्या खड्डाचे नाव अमर होते हा नाही अमर आपल्या जागेवर आहे. हा ॲन्थनी झाला आहे आणि अकबर होणार आहे. ही कोणती परिभाषा आहे. झा.पी.ॲण्ड कंपनी आणि जय भारत कन्ट्रक्शन यांनी भरलेला खड्डा होता त्या जागी खड्डा नाही पडलेला का? आम्ही डॉल्फीन पासुन ते शांती नगर पर्यंत ४० लाखचे वेगळे इन्टीमेंट बनवले होते पुर्ण रिसरफेसिंग चा नविन रोड बनविण्याकरीता तेथे अधिकारी बोलतो साहेब भारत वाले केसुने जे काम केले होते ना तेथे खड्डा झाला नाही त्याच्या बाजुवाला खड्डा झाला आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब आज जे सभागृहाची स्थिती दिसत आहे, स्थायी समिती मध्ये देखिल पाटोल विषयावर चर्चा करण्यात आलेली होती. मा. आयुक्त साहेब २० वर्षापूर्वी जर महापालिकेचा इतिहास बघितला तर ते २०१७—१८ चे जे पाटोल झाले १४ करोडचे पाटोल चे काम यापूर्वी केव्हाच झालेले नाही. १४ करोड पाटोल चे काम होवुन देखिल अजुन एक बाब आहे की सर्व पाटोलचे काम दिवाळी नंतर झालेले आहेत. सर्व पाटोलचे काम हे दिवाळीनंतरच झालेले आहे. जसे आपण पावसाळयात करतो नंतर बोलतो पावसामुळे निघुन गेले मटेरियल पण पहिल्याच पावसात संपूर्ण उल्हासनगर मध्ये खड्डेच खड्डे झालेले आहे. आणि डिफेक्ट लायबिलीटीचा जो वेळ आहे ६ महिन्यांचा, अजुन तो सुध्दा संपलेला नाही. पण

मोठया प्रमाणात दुखात बोलावे लागत आहे की जेव्हा आम्ही विषय मांडला त्यावेळे अधिकारी उत्तर देत आहेत की, जो खड्डा भरलेला होता तो अजुन पडलेला नाही, तो रोड चांगल्या प्रमाणात बनवलेला आहे. मला ही बाब समजत नाही आहे की आम्ही जे खड्डयासाठी एस्टिमेट बनवले होते तर आम्ही तेथे माप मोजणी लिहुन ठेवली होती का? की सिरूमल चौक पर्यंत काशामल हलवाई पासून ते ३ फुट उजवी कडे आणि ४ फुट डावीकडे एक खड्डा आहे असे लिहण्यात आले होत का? आम्ही लिहीले होते की शिरू चौक पासुन ते नेहरू चौक पर्यंत जेवढे पण खड्डे आहे ते सर्व भरण्यात येतील. तर यांची हमी कोण घेणार मग डिफेक्ट लायबलिटी वेळेचा उपयोग काय राहतो. त्यात ठेवलाच नाही पाहिजे आम्ही खड्डा भरला या भाषाला परिभाषीत कोण करणार? की कोणता खड्डा भरण्यात आलेला आहे आणि कोणता खड्डा भरला गेला नाही. मी तेथे आज संपूर्ण सभागृहात बोलत आहे की, जेवढे पण १४ करोडचे कामे करण्यात आलेले आहे, त्यात खुप मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. आज संपूर्ण स्थायी समितीच्या १६ सदस्यांनी तुम्हांला प्राधिकृत केले आहे. आयुक्त यांना आम्ही प्राधिकृत केले आहे की लवकरात लवकर जेथे गणपती विर्सजन करीता रस्ते जात आहेत तेथे लगेच काम झाले पाहीजे आणि ज्या ठेकेदारांना जुने कामाचे आदेश आहेत, त्यांचा कडुन आपण जेवढे काम करून घेवु शकतो त्यांच्या कडुन ते काम अर्थातच करून घ्यावे, कारण आमचे शहराचे हे जे पैसे आहेत त्याच नुकसान नाही झाल पाहिजे. मग आमचा अधिकारी आहे त्यांनी असे नाही बोलले पाहिजे की, जे खड्डे भरलेले आहे ते खड्डे बरोबर आहे. कारण त्याची परिभाषा, त्याची व्याख्या आणि त्याचे माप आपल्या अधिका—यांकडे नाही. आपणास निवेदन करतो की संपूर्ण सभागृहात हे जे खड्डयांचे काम आहे ते लवकरात लवकर सुरू करावे जे जुने ठेकेदार आहेत ज्यांना कामाचे आदेश आहेत त्यांच्याकडुन ते काम करून घेणे, धन्यवाद..

या वेळी सदस्य, श्री.शंकर लुंड यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. शेखर यादवः—</u>** आयुक्त साहेब, सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, जो पर्यंत हा खड्डयाचा विषय होत नाही, तो पर्यंत याच्यावर बहिष्कार टाका, मिटींग होऊन देवू नका.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** सन्मानिय महापौर मॅडम, उप महापौर आणि आयुक्त साहेब सभागृह नेत्यांनी १४ करोड खड्डे अशी काय जी संकल्पना मांडली आहे, तर मला वाटते कि १४ कोटी रूपये हे खडडयातच गेलेले दिसतात. स्थायी समितीने आताच आम्ही आयुक्तांना संदर्भात सांगितले की परत ५० लाखाचा खड्डे बुजवण्या संदर्भातला स्थायी समितीने ५ (२) (२) मध्ये आणला, साहेब मला असे वाटते की एकंदरीत गेली मागिल सन २०१२—२०१३, २०१४ ला मी स्थायी समितीमध्ये मी दोन वर्ष होतो सन २०१२—२०१३ पासून सातत्याने मी सन २०१२ पासून नगरसेवक आहे. मला वाटते ४ कोटीच्या वरती खड्डयाचे संदर्भातली कुठली तरतुद झालेली नाही. प्रत्यक प्रभागाला १, १ कोटी असे ४ प्रभागला एकूण ४ कोटीच्या वरती कोणतेही एस्टमेट झालेले नाहीत. मागच्या वर्षी १४ कोटी रूपये अचानक कसे काय वाढले? काही कळले नाही. मागच्या वर्षाची संकल्पना आपण जर केली तर मला वाटत मागच्या आजच्या या वर्षाच्या तुलनेत मागच्या वर्षी पाऊस पण कमी पडलेला होता. पावसाची सरासरी या वर्षा पेक्षा मागच्या वर्षी कमी पडलेली होती तरी खड्डयांची टक्केवारी १४ कोटी पर्यंत खड्डे भरण्याचे मान्य झाले. मला वाटत ऐकंदरीत सभागृहातील सगळी भावना लक्षात घेता खड्डे आता ही भरपुर पडलेले आहेत. हे सगळे ५० लाखामध्ये काही होणार नाहीत, हे तुम्ही सभागृहात जरी सांगितले असेल आम्ही रस्ते करायला लावु हे मला ऐकंदरीत वाटत की याच्या मध्ये मोठयाप्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे आणि त्या संबंधी त्या १४ कोटीचा ५ (२) (२) मध्ये मधील सगळे अधिकार त्यावेळी संबंधित आयुक्तांना होते आणि त्या आयुक्तांनी ते १४ कोटी मंजुर केले आहेत. संबंधित अभियंता, आयुक्त आणि ठेकेदारावर ॲण्टी करप्शन ब्युरो. मार्फत आपण येथुन चौकशी करायला पाहीजे, की १४ कोटी गेले कुठे? या तिन्ही यंत्रणांना तुम्ही जो पर्यंत धारेवर धरत नाही तो पर्यंत आयुक्त साहेब या कुठल्याही गोष्टीचा सारांश निघणार नाही. नाही तर या १४ कोटी रूपयांचे संदर्भात आपण जनतेला काय उत्तर देणार आहात? माझी सभागृहाला विनंती आहे की, संबंधित त्यावेळेचे तत्कालीन आयुक्त आणि ते एस्टीमेट करणारे अभियंता आणि आताचे एजन्सीने जे १४ कोटींचे काम केले आहे, त्या एजन्सीचे आताचे पेमेंट स्थगित ठेवले पाहिजे आणि त्या एजन्सीला या पुढे ते काम जो पर्यंत पुर्ण होत नाही, तो पर्यंत दुसरे काम एजन्सीला देण्यात येवु नये. अशा पध्दतीची आपण जो पर्यंत कारवाई करणार नाही, तो पर्यंत हा भ्रष्टाचार थांबणार नाही म्हणुन आमचा या खड्डे भरण्याचा बाबतीत जाहिर निषेध आहे मी ऐवढीच विनंती आपल्याला महापौर मॅडम करतो.

या वेळी सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी व सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी व सदस्या, श्रीमती राजश्री चौधरी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** मा. आयुक्त साहेब, मा. महापौरजी आताच जे सर्व सदस्यांनी सांगितले, मला फक्त थोडीशी माहिती पाहिजे होती. माझा थोडासा अभ्यास कमी आहे, आताच आमच्या भालेराव साहेबांनी जे सांगितले की ५० लाखाचे अजून काही आणले आहे का? पण पहीले जे १४ कोटी दिले असतांना ८ डिसेंबर पर्यंत त्यांना जर मुदत आहे. त्यांनी ते सरफेसिंग क्लीयर करावे त्या बद्दल मला आपण सभागृहाला संबोधित केले तर फार बरे होईल, काय नेमक आहे? काय खरे आहे आणि काय खोटे आहे? यांच्यावर जास्त चर्चा होणार नाही विषय संपेल मला वाटते की, आण त्याबाबत निवेदन करावे अशी मी महापौर यांना विनंती करतो १४ कोटी आणि त्या वेळस झालेले ज्या ठेकेदाराला दिलेले दिलेले काम त्यांनी केलेले आहे आणि त्यांना मेंटेन्स, मेंन्टेनस करायच होते त्या बाबत जर खुलासा झाला तर बरे होईल, धन्यवाद!

**सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाडः—** मा. महापौर मा. उपमहापौर आणि मा. आयुक्त साहेब, हा जो खड्डयांचा विषय आहे. तो रस्त्यापासुन सुरूवात होते, आपण ऐखादा रोड बनवला तर त्याचे जे लाईफ आहे, ते किती वर्षा पर्यंत असले पाहीज? हे आपण पहिले ठरवा आणि त्या ठेकेदाराला नंतर हि सुचना दया, असे त्यांच्या कडुन लेखी स्वरूपात घ्या. आपण रस्ता बनविल्या नंतर १ वर्षा मध्येच त्या रस्त्यावर खड्डे पडतात त्यासंदर्भात १ फोटो मी आयुक्त साहेबांना व्हॉट्स ॲपद्वारे मी पाठवला होता. त्याचा मला काही रिप्लाय मिळालेला नाही.

**सदस्य, श्री. मनोज सयानीः—** आठ तारखे पर्यंत वाट बघणार का? सात तारखेला काम चालू करणार, गणपती येत आहेत, चालिया समाप्ती होत आहे.

**सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाडः—** आपण एखादा काम करतो आणि करोडो रूपये तिथे खर्च केल्या नंतर एक वर्षामध्ये जर त्या रस्त्यावर खड्डे पडत असतील तर आपण त्या ठेकेदाराला का सुट देतो? नेमकी महापालिका आपली लोकहिताच काम करते की ठेकेदारास हिताच काम करते हा मला मोठा प्रश्न पडलेला आहे? खड्डे भरलेले आहेत पण त्याच्या बाजुला नविन पडलेले आहेत. नविन रस्त्यावरती, जिथे आपण एक वर्षामध्ये काम कलेले आहे, त्या नविन बनवलेले रस्त्यांतवरती सुध्दा आज खड्डे पडलेले आहेत. मग आपण त्या ठेकेदारास का सोडतो? आपण कमीत कमी एखादा रस्ता बनवल्या नंतर त्या रस्त्याची लाईफ किती आहे? त्या ठेकेदाराने आपल्यास सांगितले पाहीजे आणि ८ करोड चे १४ करोड रूपयांवर खर्च जातो तरी देखिल खड्डे तेवढेच आहेत. पहिले ८ करोड ठरले होते नंतर १४ करोड झाजे आणि छोटे मोठे प्रभागातील कामे आहेत, शहरामधील कामे आहेत, त्या सुविधा आपण लोकांना देवु शकत नाही.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब आणि मा. उपमहापौर, साहेब सिरीयस घ्या, शहराचा विषय आहे. तुम्ही त्या मागच्या ठेकेदारासाठी आम्ही चार दिवस पहीले तुम्हांला भेटलो होतो, तुम्हाला हाच विषय काढलेला ना, आमचे शिष्ट मंडळ आलेले पाण्याच्या मोर्चा संदर्भात आम्ही विचारले होते त्याकडुन काम करून घेण्यास ८ डिसेंबर पर्यंत वेळ आहे तुम्ही काय बोलेले होते काम करणार नक्की करणार कधी करणार ढिल का सोडता साहेब? आता ही अशी परिस्थीती आहे की, लोकांचे त्या ठिकाणी ॲक्सीडेंट झालेले आहेत. आमच्या प्रभागात दुर्गा नगर म्हणुन आहे तेथे काल ॲक्सीडेंट होवुन फ्रॅक्चर झालेला आहे. म्हणजे खड्डयात पडुन आता कसली वाट बघत आहेत? आणि ठेकेदाराला का पाठीशी घालत आहेत? कारण काय आहे? आज का काम सुरू नाही काल का काम सुरू नव्हते? परवा का नव्हते? त्याची आपण ८ तारखे पर्यंत का वाट पाहात आहोत डिसेंबर पर्यंत, गणपती ४ दिवसांवर आलेले आहेत तो ४ दिवसात ऐवढे कव्हर करेल का? तुम्ही ठेकेदारास आदेश दिले पाहिजेत, चुकीचे नाही, त्यांनी करणे भाग आहे. त्याला मग  आपण का सोडतो? त्याच्या पाठिमागे आहे कोण? का त्याचे बिल काढण्याची वाट बघतोय आपण? म्हणजे ८ तारीख झाल्यानंतर तो अपला मोकळा झाला, तो जावुन अकांऊट मध्ये फे—या मारत बसेल माझ दया बिल मग त्याच्यात सगळेच दोषी आहेत. साहेब त्याच्यामध्ये आज जर आपण काम केले नाही अता जर आपले गणपती येतील उदया मुर्तीला जर तडा गेला किंवा विटंबना झाली तर त्याला जबाबदार कोण आहे आम्ही जबाबदार राहणार नाही, आम्ही आताच सांगतो, हि सगळी जबाबदारी आपली आहे. आम्ही मुर्ती इथे आणू समजा एक जरी गणपती मुर्तीला तडा गेला तर मुर्ती इथे महापालिकेच्या गेट समोर आणुन ठेवु त्या संदर्भात कायदा व सुव्यवस्थेची संपूर्ण जबाबदारी तुमची आहे हे लक्षात ठेवा.

या वेळी उप महापौर श्री. जीवन इदनानी हे सभागृहातून बाहेर गेले.

**सदस्य, श्री. शेखर यादवः—** मा. आयुक्त साहेब, मा. महापौर मॅडम साहेब आपण दररोज पेपरात वाचतो नविन नविन टेक्नॉलॉजी आलेली आहे आणि आम्ही उल्हासनगर शहरात बघतो आहे इथे सिमेंट लावून मोठ मोठे दगड खडयात टाकत आहेत हा टिकणार आहे का? ऐवढी काही भारी टेक्नॉलिजी आलेली आहे तिचा वापर करण्याचा सोडुन हे काय आणले आहे, कुठले काय आहे, ते कळतच नाही. काहीच कळत नाही ऐवडया मोठया मोठया खडी त्याला कपची बोलतात.

या वेळी सदस्या, श्रीमती कविता गायकवाड यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** चार नंबर खड्डा, जी टायर पंक्चर करते.

**सदस्य, श्री. शेखर यादवः—** तुम्ही आणली का ही टेक्नॉलॉजी? कुठून आनली ही टेकनॉलजी?

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** जी चार नंबर खड्डा टाकतात, ती सांगतो.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम आणि सन्माननिय सदस्य, आज हा विषय चालला आहे, प्रत्येक वर्षी ४—४ करोड रूपयांमध्ये पुर्ण उल्हासनगर चे खड्डे भरले जात होते. त्यावेळेस महापालिकेची आर्थिक परिस्थीती खराब असल्यामुळे निंबाळकर साहेब हे शहरातील छोटे छोटे काम करीत नव्हते. त्या ४ करोड पासून १४ करोड पर्यंत आणण्यात आले. आयुक्त साहेब बोलत

आहेत, ते फ्री झाले की बोलतो, आयुक्त साहेब महापालिकेची आर्थिक परिस्थीती लक्षात घेता निंबाळकर साहेब छोटे छोटे काम करीत नव्हते. जेथे ४० वर्षा पर्यंत ४, ४ करोड रूपयांमध्ये संपुर्ण उल्हासनगरचे खड्डे भरले जात होते, ते ४ कोटी वरून १४ कोटी झाले आणि स्थायी समिती मध्ये ५ (२) (२) मध्ये पास झाले. ठेकेदारस ठेके देण्यात आले आणि हे पण मी मानतो की, माझ्या मते उल्हासनगरमध्ये १ ते ५ नंबर पर्यंत असा एक पण रस्ता नाही की त्याचे खड्डे पुर्ण पणे भरलेले नाही, बिलकुल संपुर्ण भरले गले. परंतु त्यांची गॅरंटी ८ डिसेंबर पर्यंत देण्यात आली आहे हे मला माहीत नाही, ८ डिसेंबर या तारखेला माझा वाढदिवस आहे हे लक्षात घेता परंतु त्याची गॅरंटी ८ डिसेंबर पर्यंत देण्यात आलेली आहे. सन्माननिय सदस्य, श्री. मनोज लासी जे बोलले होते की इन जनरल उल्हासनगर सदर्भात साहेब एक विनंती आहे की, आपण हिराघाटच्या रस्त्याच उदाहरण घ्या, हिराघाट इथे एका बाजुस सिमेंट ब्लाक चा रस्ता बनविण्यात आलेला होता व एका बाजूस ठेकदाराचा पैसा पुर्ण झाला होता, ठेका पुर्ण झाला होता, एका बाजूस डांबर आहे. एका बाजुला सिमेंट ब्लॉक चा रस्ता नविन रस्ता आहे व दुस—या बाजुस डांबरी जुना रस्ता आहे. नविन रस्त्यावर एकही खड्डा नाही व दुस—या बाजुस डांबराचा रस्ता आहे, तो संपुर्ण खड्डेच खड्डे आहेत. तर याचा अर्थ असा आहे की, उल्हासनगरमध्ये, आपण पुर्ण उल्हासनगरमध्ये चार—चार रस्ते घ्या ८ घ्या १० घ्या किंवा एकदाच संपुर्ण १ ते ५ पर्यंत सर्व जर सिमेंट ब्लॉक बनत असतील तर ३० ते ४० वर्षा पर्यंत रोडकडे बघण्याची गरज नाही आणि आज जो आपण वर्षासाठी १४ करोड रूपये खर्च करणार आहेत. त्यामध्ये सर्व ३, ३, ४, ४, ५, ५ ८, ८ रोड जर सिमेंट क्रॉर्केटचे जर बनत असतील तर ३०, ३०, ४०, ४० वर्षा पर्यंत हे रोड बघण्याची गरज पडणार नाही. त्यासाठी डांबरच्या रोडपेक्षा सिमेंटच्या रोडवर जास्त लक्ष दिले तर ते खुप चांगले तो रोड ३०, ४० वर्षा पर्यंत चालतो. आज हा जो रोडचा ठेका दिला आहे, त्यामध्ये आपल्याला संपुर्ण १४ करोडचे खड्डे भरायचे आहेत. त्यांची ८ डिसेंबर पर्यत मुदत आहे, नाही तर त्या ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यात यावे व हे काम पुर्ण नाही केल तर त्यांचे पेमेंट थांबविण्यात यावे. नाही तर जेवढे खड्डे त्यांनी भरलेले होते ते लगेच गणपती येण्यापूर्वी चालीया संपन्न होण्यापूर्वी किंवा दिवाळी च्या आधी सर्व त्याच रक्कमेतुन करून घ्यायला पाहीजे. आणि निंबाळकर साहेब यांनी शब्द दिला होता की रस्त्याचे कामाचा कालावधी ६ महिना, १२ महिण्याकरीता रस्त्यांची गॅरंटी देतो त्या दरम्यान रस्ता खराब झाला की त्यांच्या कडुन त्याच रक्कमेतुन काम करून घेण्यात येईल. तर आपले काम आहे की आपण ठेकेदरांकडुन सदर चे काम पुर्ण करून घ्यावे व अधिकारी यांना मार्गदर्शन करावे नाही तर ठेकेदार म्हणतात आम्ही कपची आणि फाउंडर टाकले आहे ना आम्ही डांबर नाही टाकणार तर आपण त्यांना नोटीस देवुन काम संपूर्ण करून घ्यावयाचे आहे कृपया करून, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. रमेश चव्हाण हे सभागृहा बाहेर गेले.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u>** मा. महापौरजी, बोलायचे आहे का?.....

**<u>सदस्य, श्री. शेखर यादव:—</u>** मा. महापौरजी मा. आयुक्त साहेब, मला वाटते निंबाळकर साहेब गेले त्यांनी आम्हाला नगरसवेक निधी मागच्या वर्षी काय दिले १६—१६ लाख रूपये तर ते ही कामाची जे अभियंते असतील त्यांच्याकडुन ठेकेदारांनी कामे पुर्ण व्यवस्थित केले की नाही, केले हे जे लोकेशन दिलेले आहे, त्यांच्या बद्दल मला शंका आहे. जी कामे आहेत, मला वाटते एक नाली बनवली की १६ लाख पुर्ण केलेले आहे. काही थोडासा कुठला भाग केलेला आहे. तो पुर्ण झालेला आहे असे काही आणि ते बघायला देखिल कोणी आलेल नाही. मला सांगा माझ्या वार्डात मी जे लोकेशन दिलेले आहेत तिथे कामासाठी निधी वापरलेला आहे तिथे त्यांनी येवुन चेक केले का? त्यांना विचारा कोण असतील जेई आपल्या प्रभाग क्र. १४ मधील कपिल आणि शेवकानी होते कोण असेल त्यांना उत्तर देण्यासाठी बोलवावे. आता पर्यंत ते काम किती झालेले आहे किंवा काय झालेले आहे? कोणीही बघायला आलेले नाही? काम कसे झालेले आहे किंवा कुठ पर्यंत झालेले आहे. यासदर्भात देखिल यांची चौकशी लावा.

**या** वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे:—</u>** मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब आज जो खड्डयाचा विषय चालु आहे. मला वाटते संपुर्ण उल्हासनगरमध्ये १ ते ५ मध्ये असा एक ही रोड नसेल की तो खड्डया शिवाय आहे आणि ४ करोडचा करोडचा ठेका जर १४ कोटी पर्यंत जातो आणि दरवर्षी पेक्षा यावर्षी १ काय ३,पट ४, पट, ५ पट जास्त खड्डे बघायला मिळतात उल्हासनगर मध्ये आणि त्यामुळे एक्सीडेंटचे प्रमाण वाढलेले आहे, लोकांचे दुखणे वाढलेले आहेत. याला जबाबदार कोण आहे? जो कॉन्ट्रक्टर काम करतो त्याला आपण अंतिम मुदत दिलेली असते. इतके दिवस खड्डे व्यवस्थीत राहीले पाहिजे किंवा त्यांनी पुर्ण करून दयावे. आता जी परिस्थीती आहे, तर त्याला जेव्हा १४ करोड दिले आहेत, त्यांच्याकडुन हे कामे परत करून घ्या, ना आणि तात्काळ करून घ्या खुप वाईट परिस्थीती आहे खड्डयांची पुर्ण शहरामध्ये.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u>** मा. आयुक्तजी, महापौर, उप महापौर, संपुर्ण महाराष्ट्रामध्ये खड्डयांची समस्या आहे, मुंबई महानगरपालिकेमध्ये हायकोर्टाने जो आदेश दिला की, ताबडतोब खड्डे भरले गेले पाहिजेत

आणि त्याचे इमप्लीमेंट मुंबई महानगरपालिकेमध्ये झाले आज गेल्या १५ ते २० वर्षा पासुन पाटोलची जे जे काम निघतात मला चांगले आठवते की, पाटोल पुर्वी एक ५, २५ लाखंच असायचे ते आज पर्यंत जवळपास १४ कोटी पर्यंत आलेले आहे. या १३ किलो मीटर क्षेत्रामध्ये पाटोल्स किती आहेत किंवा रोड किती म्हणजे चहा पेक्षा किटली गरम, जे १४ कोटी मध्ये रस्ते व्हायला पाहीजे होते, ते १४ कोटीचे आपण पाटोल्स भरत आहे आणि ऐवढे करून ही परिस्थीती जर बघितली मुंबई मध्ये मागच्यावर्षी जेव्हा खडयाचा प्रश्न आला होता. तेव्हा मला चांगले आठवते की, एका गायीकने क्लिप बनवली होती, सोनु तुझा माझ्यावर भरोसा नाय काय, नाय काय, नाय काय उल्हासनगर मध्ये दिसतायत खड्डे खर हाय काय? हाय काय अशी आज ही परिस्थीती आहे आणि हे १४ करोड रूपये या उल्हासनगरचा एका वर्षाचा मागच्या जर कालावधीत आपण नजर टाकली तर त्याच जर त्याचा आऊटपुट नसेल मिळत तर तुम्हाला याच्या पुढे आयुक्त महोदय यांच्या पुढे रस्त्ये कशा पध्दतीने बनवायला पाहिजे, रस्त्याची पाटोलची कामे कुठल्या पध्दतीने व्हायला पाहिजे याचे एक शास्त्रयुक्त एक विचारधारा तयार झाली पाहिजे आणि कमीत कमी एखादा रस्ता जर बनवला, तर त्याची कमीत कमी दोन पाच वर्षे तरी गॅरंटी असायला हवी ति न होता, हे नुसतच उल्हासनगर मध्ये कुठलेही मटरेल कुठेही टाकायचे किती ही प्रमाणात टाकायचे आणि त्यांचे परिणाम आणि दुष्परीणाम हे आपल्याला भोगावे लागतात. माझे म्हणणे आहे आयुक्तांना याच्या पुढची जेवढी काही कामे करणार असाल रस्त्याची असतील किंवा अजुन कुठली ही असतील तर त्याला शास्त्रोयुक्त आधार असला पाहिजे त्याच्यावर तुमच्या स्टाफचे नियंत्रण असले पाहिजे. एखादा कुठला रोड बनवतांना त्याचामध्ये नेमके कुठले मटेरिअल तुम्ही वापरणार आहेत किंवा काय वापरणार आहेत त्याची लॅब टेस्टींग देखिल झाली पाहिजे हे जर झाल तरच त्या कॉन्ट्रक्टरवर थोडे फार नियंत्रण येईल, अन्यथा सोनु तुझा माझ्यावर भरोसा नाही काय, नाय काय असेच चालणार आणि आम्ही खडयातच राहणार, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u>** महापौर साहेबा, आयुक्त साहेब, मी आपल्या समोर विनंती करतो की, प्रथम मी सर्व नगरसेवकांची माफी मागतो की, माझाकडुन जर काही चुकीचे बोलण्यात आले तर मला माफ करावे. आयुक्त साहेब मी आपल्या समोर रागात या गोष्टी बोलणार आहे की, रस्त्यावरील सारखे पडणारे खड्डे यांच्या मुळे आम्हाला नागरीकांचे बोलणे ऐकावे लागत आहे. जेव्हा हा टेंडर पास झाला होता, ज्यावेळेस हा रस्त्याचा प्रस्ताव आला होता तेव्हा तुम्ही नव्हते, तुमच्या पहीलेच हा प्रस्ताव आला होता, हा प्रस्ताव स्थायी समिती मार्फत पास करण्यात आलेला होता तत्कालीन आयुक्त साहेब यांनी आम्हा लोकांना जे सांगण्यात आले होते ते आम्ही तुमच्या समक्ष मांडत आहोत. त्यांनी हे सांगितले होते की, हे १४ करोड रूपये रस्त्याचे खड्डे भरण्यासाठी टेंडर देण्यात येत आहे, तर हे काम तीन वर्षा पर्यंत टिकून राहील. कदाचीत असे सांगण्यात आले होते की आयुक्तांन मार्फत जे खड्डे भरण्यात येतील ते ३ वर्षापर्यंत ठेकेदार आपला बांधलेला राहील. सर्व नगरसेवक आपणास देखिल माहीती असेल हे निंबाळकर साहेबांनी सांगितल होते की, त्यामुळे १४ करोड रूपये खड्डे भरण्याचे टेंडर पास करण्यात आल. तर महापौर साहेबा, उप महापौर, आयुक्त साहेब जे काय तुम्ही बोलत आहेत, आम्ही नगरसेवकांना जनते येथे पाठविलेले आहे. जेवढी अधिका—यांची जबाबदारी आहे, तेवढीच जबाबदारी आपली पण आहे. कारण आम्हाला पुन्हा नागरीकांकडे जायचे आहे. तेव्हा लोक विचारतील की आपण महासभेत गेले होते, आपल्या समोर जे चुकीचे काम झाले होते, तेव्हा तुम्ही काय केल? तुम्ही त्यावर का बोलला नाहीत. तर कृपया करून पडताळणी करावी आणि येथे असलेल्या कोणत्याही नगरसेवकांस विचारावे की उल्हासनगर मध्ये एक रोड असा सांगावा की जेथे डांबरी रोड आहे तेथे खड्डे भरलेले गेले असुन ते सद्यस्थितीत अजुनही व्यवस्थित आहे. तर शहर अभियंता यांनी असा रोड सांगावा. जेव्हा डांबरीकरणाचे काम होत होते तेव्हा कोणीही शहर अभियंता निथे नव्हते? उप अभियंता, कनिष्ठ अभियंता पण तिथे नव्हते. तर काम कसे बरोबर होईल? जर अधिकारीच नव्हते तर मालाची तपासणी कोण करणार? जेव्हा आपण घरात एक लिटर दुध घेतो त्याच्या मध्ये १० वेळा बोट टाकुन बघतो त्यात पाणी तर मिसळलेल नाही. हे कोण बघणार? जे काम तुमच्या पहीले झालेले आहे, जे चुकीचे झाले आहे हे दिसत आहे, आम्ही तुम्हांला दोष देणार नाही. आम्ही अधिकारी यांना जरूर दोष देतो. जे महापालिकेमार्फत पगार घेतात आणि एकाही दिवसाचा पगार नाही सोडत त्यावेळेस जे चुकीचे काम झाले आहे, तर त्यांना दंड ठोकविण्यात यावा आणि हे जे ठेकेदार आहेत, त्यांना परत परत काम दिले जाते, जर त्यांच्यामध्ये काही कमी आहे तर कृपया पुढे लक्ष देवून अशा ठेकेदारांची यादी बनवा आणि जे चांगले ठेकेदार आहेत, जे चांगले काम करीत आहेत. जसे निंबाळकर साहेब बोलले होते. निंबाळकर साहेब यांच्या मार्फत जे टेंडर खोलण्यात आले होते त्याची कॉपी आपण काढावी त्यांच्या मधील अटी व शर्ती ज्या आहेत. मनोजजी मी सर्व नगरसेकांना विनंती करतो की, तर कृपया सगळयांनी जागृत झाले पाहीजे, हीच वेळ आहे. जे ते आपल्या मागण्या करत आहेत की ठेक्यामध्ये ज्या अटी व शर्ती हव्या आहेत त्याची मागणी थांबता कामा नये. आम्ही प्रशासना सोबत नाही आहोत, आम्ही पब्लिक सोबत आहोत जेव्हा चांगले काम होईल तेव्हाच आम्ही प्रशासना सोबत राहू, धन्यवाद!

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>** मी पहिलेच आजची पॉईंट ऑफ ऑर्डर सुरू करण्याच्या पहीलेच बोलले होते की, आपला हसरा चेहरा आम्हांला खुश करतो, प्रसन्न करतो. कारण पूर्वी आयुक्त होते ते कधी हसत नव्हते. परंतु तुम्ही हसतात तर आम्हांला चांगले वाटते. परंतु कुठे ना कुठे आम्हांला त्रास होत आहे साहेब, जगजित सिंग चा एक गजल आहे, “तुम इतना जो मुस्करा रहे हो, क्या गम है इसे छिपा रहे हो” तर याचे शब्द बदली करतो मी “तुम इतना जो मुस्करा रहे हो लगता है हमारे गम छिपा रहे हो तुमच

हसण बघुन चागंल वाट पण फिल आम्हाला त्रास होतो. मी तर एक स्विकृत नगरसेवक आहे. मला त्रास कमी आहे ज्या ज्या क्षेत्रातील इथे निवडुन आलेले लोक आहेत त्यांनपा किती त्रास होत असेल. जे आपल्या आपल्या प्रभागात कार्यालय उघडून बसलेले प्रभागात फिरतात किंवा काही कार्यक्रमात जातात तेथे नागरीकांच्या शिव्या गाळया खाव्या लागतात साहेब येथे सर्व उपस्थितीत नगरसेवक आपल्या कडुन गॅरंटी वॉरंटी मागत आहे की, गणपती येण्यापुर्वी शहरातील रिसरफेसिंग खड्डे संपूर्ण भरून घेतले जावे काही कारणास्तव ठेकेदार रस्त्याचे काम करण्यास टाळाटाळी करत असेल तर त्यांचे धनादेश थाबंविण्यात यावे त्यावर कारवाई करण्यात यावी अशा प्रकारची आशा आम्ही करत आहोत. या सभागृहाच्या माध्यमातुन या गोष्टी लक्ष ठेवावे आणि १३ तारखेला गणपती उत्सव सुरू होणार आहे आणि १७ तारखेला चालीया समाप्ती होणार आहे. तर याच्या पहिले खड्डे भरण्याचे रिसरफेसिंगच काम करण्याच्या पहिले एक ३ ते ५ नगरसेवकांची एक टिम बनवुन अधिकारी यांच्या सोबत बसुन १३ तारखेच्या पहिले गणेश उत्सव सुरू होण्यापुर्वी काम पुर्ण झाल पाहिजे. अशी आमची सर्वाची आपल्याकडुन अपेक्षा आहे. आमला तोंडुन हे ऐकायचे आहे, बाकी सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी आश्वासन, त्यांचे बोलणे आम्ही दररोज त्यांच्याकडे जातो आम्ही शितलानी साहेबांकडे दररोज जातो. सितलांनी सिंधी भाषेमध्ये बोलतात. आम्हांला तुमच्या कडुन आश्वासन पाहीजे, म्हणजे एक आदेश पाहीजे म्हणजे की, १३ तारखेपूर्वी शहरातील जेवढे पण खड्डे आहेत ते संपुर्ण डांबर टाकुन भरले पाहिजेत. हे जे माती टाकुन चुना भट्टीवाले काम करतात तसे नाही, डांबर टाकुन हवेत, कारण डांबरचे काम आधिच सुरू झालेल आहे, प्रत्येक जागेवर चालु झालेल आहे. नागरीकांना आता उल्लु नाही बनवु शकत की डांबरचे काम नाही करून शकत. कारण की कल्याण मध्ये चालु झाल आहे शहाड मध्ये चालु झाल आहे, अंबरनाथला देखिल चालु झालेल आहे. त्यामुळे आपण शहराला जास्त उल्लु बनवू शकत नाही. आम्हांला आपल्या मार्फत असा ठोस आदेश पाहीजे की, जेणे करून बाहेर गेल्यावर आम्हांला जनतेला सांगता आले पाहिजे आणि तेथे असलेला प्रेस वाले जे नागरीक त्यांना देखिल वाटले पाहिजे की आयुक्त यांनी आदेश दिलेले आहेत की १३ तारखेपूर्वी सर्व खड्डे भरण्यात येतील आणि ते पण डांबराद्वारे भरण्यात येतील.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—</u>** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मा. उप महापौर, पाटोल्स असा विषय आहे की, संपुर्ण उल्हासनगरमध्ये पाटोल्सचा विषय झाला आहे. आयुक्त साहेब, पाटोल्सच्या विषयामध्ये पाटोल असा विषय आहे, घरोघरी ऐकले जाते, प्रत्येक पेपरमध्ये, मिडीयामध्ये कोणाशी ही बोला तर शहरामध्ये नावाने संपुर्ण दुर्गंधी येते, हे शहर नाही, तर फक्त खडडेच खडडे आहेत. पहीले जे आयुक्त होते, ते कधीच हसत नव्हते. परंतु तुम्ही हसतात, हसरा चेहरा, धन्यवाद. त्यांनी सांगितले होते, एक डायलॉग मारला होता, "मेरे पास आमदानी आठनी खर्चा रूपया" खर्चा रूपया त्यांनी असे केले की, सत्यानाश केला. त्यांनी काय केले मी रोड बनवेल पण माझ्या हिशोबाने बनवेल, तुम्ही बसा शहराचे रोड बनतील. परंतु ठेकेदारावर अंकुश लागेल, त्यांचे पेमेंट होणार नाही. एक वर्षा पर्यंत ठेकेदाराची पेमेंट होणार नाही, आयुक्त साहेब, एक वर्ष तर सोडा पण सहा महीने झाले नाहीत, त्या खड्डयांची हालत तर बघा काय झाले? ते आयुक्त साहेब निघून गेले, सर तुम्ही तर त्या वेळेस नव्हते. तुम्ही इतिवृत्त बघू शकतात, अधिका—यांना विचारू शकतात. आयुक्त साहेब या महासभेमध्ये काय बोलेले होते? त्याचे काय झाले? आता प्रत्येक नगरसेवक बोलत आहेत की, भ्रष्टाचार झाला आहे. तर मनोज सयानी बोलतात की, एक कमिटी बनवण्यात यावी. मी तर सांगतो की, अशी कमिटी बनवा की, भ्रष्टाचार खोदून काढण्यात यावे. कुठे भ्रष्टाचार झाला त्यासाठी कमिटी बनवायला पाहीजे. त्यांच्यावर पोलिस केस केली पाहीजे. एक उदाहरण सर बनवून जा, इतिहास साक्षिदार असेल. नाही तर हे शहर, या शहरामध्ये खड्डयांमुळे एक दातांची डॉक्टर एक मुलगी तिचा मृत्य झाला. खेमानी परिसरामध्ये आज याच खेमानी परिसरामध्ये आता पण रोड जशाच्या तसे आहे, खड्डे जशाच्या तसेच आहेत, म्हणजे परत कोणाचे तरी मृत्यु झाले पाहीजे असे तुम्हांला वाटते का? याचा अर्थ काय आहे? आयुक्त साहेब, इथे काय होत आहे? पाटोल्स कधी भरले जातील? माझे म्हणण्याचा अर्थ असा आहे सर, पाटोल भरले जावेत आणि तुमच्या उपस्थितीत भरले जावेत आणि ठेकेदाराला दंड लावण्यात यावे, भ्रष्टाचारी पकडला जावा.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** मा. महापौर जी, मा. आयुक्त साहेब खड्डयांच्या विषयावर महापौरजी कोणती ना कोणती महासभा चालु होते की, असा विषय येतो की त्याला लाबंवला जाते त्यावर निर्णय काय होत नाही? खड्डयाच्या विषयावर ऐवढे लोक ऐवढया खोलवर संपुर्ण शहराचा विषय या सभागृहात घेत आहेत आणि आयुक्त साहेब तुम्ही त्यांच्यावर स्मिथ हस्से करता अजब वाटते ठाणे जिल्हयाचे पालकमंत्री रात्री तीनतीन चार चार वाजे लोकांचा सर्व्हे करून रस्त्यांचा सर्व्हे करून रत्यावर उभे राहून खड्डे बुजवत आहेत. ठाण्याचे आयुक्त त्यांच्या बरोबर जावुन त्याचा सर्व्हे करून तेथे खड्डे बुजवत आहेत. आणि आयुक्त साहेब आपण उल्हासनगर मध्ये अजून या खड्डयाच्या विषयी आपण गांभीर्य नाही आपल्याला भ्रष्टाचाराचे आरोप खुद्द सत्ताधारी पक्ष देत आहे आणि आम्ही का विचार करावा. हे काय होत आहे? महापौर जी हे काय होत आहे? महापौर मॅडम मी दोन शब्द बोलतो "बिक रहा है पाणी पवन ना बिक जाये बिक गई है धरती गगन ना बिक जाए, चांद पर भी बिकने लगी है जमिन डर है की सुरज की रोशनी ना बिक जाए, हर जगह दिखने लगी है स्वार्थ निथी कई धर्म ना बिक जाए" साहेब हे धर्म विकणार हा हिंदु सण आता चालु होणार आहे. गणपतीचा उत्सव आज चालु होणार आहे, या उत्सवामध्ये विरजन घालण्याच काम हि महापालिका करत आहे. पोट तिडकीने बोलत आहे संपूर्ण सभागृह पोट तडकीने बोलत आहे मा. आयुक्त साहेब या १४ करोडच्या रस्त्याच झाल काय? किती रस्त्याचे खड्डे बुजवले गेले आपल्याकडे काय माहिती आहे? रेकॉर्डीग आहे व्हिडीओ शुटिंग आहे. किती बिले टाकली

गेली त्याचा काय अंदाज आहे? हे १४ करोडचे रस्ते मा. तत्कालीन आयुक्त यांनी दिले ते शहराच्या हिताकरीता की शहरामध्ये लोकांना चांगले रस्ते, चांगली सुविधा मिळावी. परंतु आज दही हंडी सारखा सन गेला उल्हासनगर मध्ये चालीया सारखा सण गेला पण उल्हासनगर मध्ये खड्डयामुळे सर्व लोक त्रस्त आहेत. आयुक्त साहेब या खड्डयामुळे लोकांचे प्राण गेले, आपण पेपरा मध्ये वाचत आहात की, खड्डयामुळे काय दयनिय अवस्था आहे असा असतांना आयुक्त साहेब आपण गांर्भिय घेत नाहीत याचे खुप दु:ख वाटत. १४ रोडच काम एकाच वेळेस महासभे मध्ये आयुक्तांनी सांगितल होते. १ वर्षा मध्ये तुम्हाला एक असा रस्ता दिसणार नाही खड्डा पडेल तिथे भरण्यात येईल. किती खड्डे भरले? हे म्हणतात की तो खड्डा बुजवला गेला तुमच्याकडे काय पुरावा आहे की तो खड्डा बुजवला गेला. आयुक्त साहेब या सगळया बाता कहाण्या आहेत, आम्ही बोलतो कारण शहरात लोक आम्हाला बोलतात. आम्ही रस्त्यावरून येत असतांना लोक आमच्याकडे बघुन हस्तात की हा नगरसेवक चालला आहे त्याला हा खड्डा नाही दिसत, या खड्डयांची तुम्ही चौकशी कधी करणार हे खड्डे कधी भरणार त्याच्या अगोदर हा ठेकेदार पैसे घेवुन त्याचे बिल घेवुन निघुन जाणार आयुक्त साहेब गांर्भिय आहे की, आज या उल्हासनगर शहराच नाव ऐवढे खराब होत चाललेले आहे की आपण एक सुविधा त्यांना आपण देवु शकत नाही. पाण्याचा विषय संपुर्ण पावसाळयामध्ये पाणी टंचाई सणा मध्ये रस्त्यावर खड्डे आयुक्त साहेब हे किती दिवस चालेल? आपण स्वत: उतरले पाहिजे रस्तावर आपण रात्री बे रात्री दिवसा फिरले पाहिजे, आपण शहराचा जायजा घेतला पाहिजे की किती खड्डे आहेत? नगरसेवक आरोप करतात ते खर आहे की खोट आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u>** आज नगरसेवकांवर आरोप होत आहेत की व्हाट्सअपला की नगरसेवक सगळे चोर आहेत. व्हाट्सअप टाकणा—या सगळया नगरसेवकांचे नाव प्रक्षेपित करायला हवेत आणि सर्वांवर केसेस करायला पाहिजेत.

**<u>सदस्य, श्री. महेश सुखरामानी:—</u>** व्यापरी लोक सर्वजण स्वत: खड्डे भरत असतील तर आमची हालत काय आहे? आम्ही सत्तेत असुन काय फायदा आहे? आम्हाला किती शिवीगाळ एकावे लागत आहे? नागरीकांचे आपण बाहेर जावुन बघा समजेल तुम्हाला.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** महानगरपालिका प्रशासन खड्डे भरायचे काम करत नाही पण पोलिस विभागाकडुन खड्डे भरायचे काम चालले आहे, शरमेची बाब आहे की, जे काम महापालिकेला करायचे आहे ते दुसरे प्रशासन आपल्याला दाखवत आहे. पब्लिक तेथे खड्डयावर माती आणुन टाकत आहे. आणि रस्ते बनत आहे. तरी पण पालिका प्रशासन ढिम्म आणि शांत बसुन राहीलेली आहे. काही उपयोग नाही मोठ—मोठे आश्वासन दिले गोष्टी केल्या एक गोष्ट पुर्ण केलेली नाही. सणा मागुन सण गेला चालीया सारखा एवढा पवित्र सण या उल्हासनगर मध्ये सिध्दी लोकांच्या, हिंदी लोकांच्या भावना आज त्या लोकांना खड्डया मधुन प्रवास करायला लागत आहे का? पैसे देवुन सुद्धा का? का नाही प्रशासन काम करत आहे? याला जबाबदार आयुक्त साहेब तुम्ही आहात, कारण तुमचा अंकुश नाही ये या प्रशासनावर तुम्ही त्यांच्यावर चाबुक ओढा पैसे दिल्यानंतर काम झाले पाहीजे. पण ते काम होत नाही. आयुक्त साहेब तुम्ही हसता आम्हाला बर वाटते, तुम्ही दु:ख लपवु शकता आम्ही नाही लपवु शकत. कारण आम्ही लोकांन मध्ये राहतो. आम्ही या शहरामध्ये राहतो आम्ही या शहरामध्ये वावरतो. आज महापौर, उपमहापौर सगळे नेता, सभागृह नेता, हे सर्व लोक या शहरामध्ये फिरतात २ नंबर ते ५ नंबर ते लोक उत्सवासाठी, कार्यक्रमासाठी, लोकांच्या सुख—दु:खामध्ये जातात. त्या लोकांना पण हेच बघायला लागते, आज लोक रिलीफ फंड कसे जमा करतात? कसे खड्डे बुजवण्यासाठी पैसे जमा करत आहेत? आयुक्त साहेब हे काय आहे? शरमेची गोष्ट आहे की, लोक त्यांचा स्वत:च्या खिशातला पैसा टाकुन एक बॉक्स बनवला आहे त्याच्या मध्ये रिलीफ फंड बुजवण्यासाठी टाकत आहेत आणि १४ करोड रूपये घेतलेला माणूस शांत पणे झोपलेला आहे. महापौर जी हे काय होत आहे?

**<u>सदस्य, श्री. शेखर यादव:—</u>** सत्ताधारी पक्षाचे सभागृह नेता, जे बोलतात याला जबाबदार कोण? सभागृह नेता मला बनवा मी जबाबदारी घेतो.

या वेळी सदस्य, श्री. शंकर लुंड व सदस्य, श्री. राजेश वानखेडे हे सभागृहा बाहेर गेले.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** आयुक्त साहेब, मला उत्तर तुमच्याकडुन पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. शेखर यादव:—</u>** कसा भ्रष्टाचार होतो आणि कसे रस्त्याचे काम चांगले होत नाही, मी बघतो.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** या १४ करोडच उत्तर तुमच्या कडुन पाहिजे कि किती खड्डे बुजवले? किती रोड झाले किती? किती बिले निघाली? किती बिलांचे तुमच्याकडे नमुने आहेत? किती खड्डयाचे तुमच्याकडे फोटो आहेत? हे मला तुमच्याकडुन उत्तर मला साहेब पाहिजे. संपूर्ण सभागृहाला उत्तर पाहिजे. आयुक्त साहेब आत तुमच्याकडून उत्तर मागतो आहेत आज...

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** महापौर मॅडम, आयुक्तजी, संपुर्ण सभागृह, शहर अभियंता साहेब आपण आजच्या स्थायी समिती मध्ये उत्तर दिलेले आहे की, जे खड्डे पडलेले आहेत ते नविन खड्डे पडलेले

आहेत व ठेकेदार यांनी जे खड्डे भरलेले होते तेथे खड्डे पडलेले नाहीत अशा प्रकारे आपण स्थायी समिति येथे सांगितले आहे, हे खरे आहे का?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** मी सांगितले की, काही ठिकाणी खड्डें झाले नाहीत आणि काही जुने....

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** नविन आणि जुने असे कसे बोलू शकतात ते पहीले सांगा.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** हे चुकीचे आहे, मी सांगतो की, जे खड्डे भरले होते, तेच उखडलेले आहेत.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** मला तुम्ही सांगा की, तुम्ही जे सांगत आहेत, काही खड्डे नविन पडलेले आहेत आणि काही खड्डे जुने आहेत. याचे तुमच्याकडे मोजमाप करण्यासाठी काय पध्दत आहे. आपण मोजणी केलेली आहे का? नविन खड्डयांची? आणि जुन्या खडयांची ते कसे आपण सांगु शकतात?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** मा. आयुक्त साहेब आणि मा. उप महापौर, महापौर व मा. सदस्य आपल्याला काही सागू इच्छितो की, नोव्हेंबर २०१७ मध्ये ५ कोटी ६४ लाखचे काम मंजुर करण्यात आलेले होते. त्या मध्ये ६१ रोड आम्ही पाटोल करीता घेतलेले होते. पण काम करतेवेळी पाटोल सोबत त्यावेळीस पेचवल आणि त्यांची लांबी थोडी जास्त घेण्यात आलेली होती. त्यावेळी आम्हा काही रक्कम कमी पडलेली होती. त्यामुळे आम्ही सादर २५ जानेवारी २०१८ रोजी स्थायी समिती मध्ये पाठविले होते की आमच्याकडे फंड कमी पडत आहे तर आम्हा काही रस्ते भरण्याकरीता आम्हा काही रक्कम हवी आहे. तर ६ कोटी ३१ लाख स्थायी समितीने आम्हाला मंजुर करून दिले आणि २ कोटी वेगळे मंजुर करून दिले मग आम्ही ६१ रस्त्यांचे काम केले आहे. साधारण आम्ही ७१ किंवा ७२ रस्त्यांचे काम केलेले आहे त्याची माझ्याकडे प्रभाग निहाय यादी आहे आणि त्यासदर्भातील करण्यात आलेली मोजमापणी देखिल आमच्या विभागत आहे. जर यात ६ महिने डिफेड लॅबिलिटी टाईम मध्ये जर आहे तर आम्ही ठेकेदार यांच्याकडुन ते काम संपुर्ण करून घेवु.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** शहर अभियंता साहेब आपण जी संपूर्ण माहिती दिली ते मी ऐकले तर त्याची ऑर्डर नोव्हेंबर २०१७ झाली होती आणि दुसरा ऑर्डर जे वर्क ऑर्डर आहे ते दिनांक १०/४/२०१८ मध्ये झाले होते.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** ऑर्डर दि. १०/४/२०१८ रोजी झाली होती.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** दिनांक १० एप्रिल २०१८ ला झाली होती, त्यांनी काम चालु केले त्यांनी जे पहिले काम पुर्ण केले होते ते होते नोव्हेंबर २०१७ वाल काम होत त्यांची १०० टक्के काम पुर्ण केले. तेव्हा त्यांचे डिफेट लायबिलीटी काळामध्ये पुर्ण केले. त्यावेळी त्यात खड्डे झाले किंवा नाही यांची आम्हाला माहिती नाही. त्यानंतर जो दुसरा आदेश दिला गेला तो १०/४/२०१८ रोजी दिला पण जरूर त्यांनी ते काम ३१ में पर्यंत पुर्ण केलेले असेल कारण में नंतर तर काय काम करण्यात आलेले नाही तरी समजा की १५ जुन पर्यंत केले असेल ते पुर्ण काम केलेले होते का जेवढे काम होते तेवढ संपल होत का? आपण प्रमाणित करता का १०० टक्के काम झाले म्हणुन मला सांगा की १०/४/२०१८ रोजी ६ करोड ३१ लाख जे आदेश दिलेले होते आणि २ करोड आजुन दिलेले होते. त्याची १०० टक्के जे क्वॉटीटी होती संपली का?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** अजून त्यांचे पेमेंट दिलेले नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** ते प्रश्न विचारत आहेत, ते तुम्ही सांगा.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** त्याची १०० क्वॉटीटी पुर्ण झाले आहे का? काम पुर्ण झाले का?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** प्रमाणीत म्हणजे त्यांचे बिल बनवणे...

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** तुम्हांला या विषयी काय माहीती आहे?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** याचे मोजमाप चालू आहे आणि आणि थर्ड पार्टी ऑडीट होईल त्याकरीता पत्र देण्यात आलेले आहे आणि अजुन त्यांचे अंतिम बिल बनविलेले नाहीत.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** आयुक्त साहेब मी आपल्यास हे विचारू इच्छितो की, माझा प्रश्न एकदम सरळ आहे की, मी विचारत आहे त्यांचे जे प्रमाण संपले आहे किंवा त्यात काही बाकी आहे त्याच उत्तर भेटत आहे की मला माहिती नाही कारण अजुन त्याचे मोजमाप झालेल नाही.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** साहेब, त्याचे क्वांटीटी संपली आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** म्हणजे ६ करोड ३१ लाख आणि २ करोड याचे पुर्ण प्रमाण संपले आहे.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** नाही, नाही ६ करोड ३१ लाख आणि ५ कोटी ६४ लाख रूपये.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** आणि २ करोड जे जास्त काम आहे.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** ते काम चालु आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** अजुन ते चालुच झाले नाही.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** नाही चालु आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** किती टक्के काम झाले आहे, त्या रक्कमेतुन.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** ते चौकशी करून मी आपणास कळवेल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. आयुक्त साहेब आताच हे काय बोलले की, ६ करोड ३१ लाख रूपये चे क्वांटीटी संपलेली आहे. दुसरीकडे बोलत आहे की बिल अजुन बनविण्यात आलेले नाही. तर आपणास कसे कळाले कि क्वांटीटी संपली आहे, आपण नोटा मोजता की माप करतात.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** मोज मापच चालू आहे,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** नाही, नाही ६ करोड ३१ लाखाचे बिल बनविण्यात आलेले आहेत का?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** सर माझ्याकडे लिस्ट आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** जर बिल बनविण्यात आलेले नाहीत, तर मग क्वानटिटी कशी संपली? तुम्हांला कसे माहीती होईल?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** बिल बनवण्याचे चालू आहे, पेमेंट झाले नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** चालू आहे तर क्वांटीटी कशी संपली?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** पेमेंट झाले नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** पेमेंट चा संबंध काय आहे? प्रदिपचा प्रश्न असा होता ६ करोड ३१ लाख रूपयेची क्वानटिटी संपली आहे की नाही आपण काय बोलत आहात बिल अजुन नाही बनविले म्हणजे आपल्याला माहित नाही. आपण असा बोला ६ करोड ३१ लाख रूपयचे काम किती झाले हे मला माहिती नाही. जर बिल बनवले नसेल तर आणि बिल बनविले असतील तर बोला आपण उत्तर घुमवुन फिरून देवु नका.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** शितलानीजी आपण जे बोललात कमीत कमी ६१ रोड आहेत, आपले शहर १३ किलो मिटरचे आहे. ६१ रोड कुठे आहेत आणि कोणते कोणते आहेत? याची यादी आहे आपल्याकडे मला वाटते की, उल्हासनगर मध्ये सिमेंटचे रोड आहेच नाहीत.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** नाही साहेब आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** आहे तर ते किती आहे.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** संपूर्ण मी लांबी सांगू का आपणास १२९ किलो मीटर लांबी आहे. त्यात ६९ किलोमीटर सी.सी. रोड आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** किती रोड आहेत? किलो मिटर नाही, किती रोड आहेत? जसे हे ६१ सांगितले तसे ते किती आहेत?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** अंदाज तर मला माहीती नाही सर.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** हे माहीती होते, हे काम करायच होते म्हणुन माहित होते.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** पाटोल्सचे एस्टिमेट बनवले होते म्हणुन माहिती आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** कोणते कोणते रोड आहेत त्याची यादी दया.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** शहर अभियंता सर ६ करोड ३१ लाखाचे काम पुर्ण झाले आपण हे बोललात संपूर्ण झाले शंभर टक्के झाले का? यात पण शंका आहे का?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** नाही काम तर संपूर्ण झाले आहे पण त्यात खड्डे आहेत त्याला दुरूस्ती करणे बाकी आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** तो माझा प्रश्न नाही. ६ करोड ३१ लाखांचे काम पूर्ण झाले हे आपल उत्तर आहे. त्यातमध्ये ६१ रोडची टोटल घेतली होती. त्या ६१ रोडवरील संपूर्ण खड्डे भरले गेलत का? ऐका माझ खड्डे झाले हे नाही विचारत ज्यावेळेस भरण्यात आले होते खड्डे संपूर्ण ६१ रस्त्यावरील भरण्यात आलेले होते. किती भरण्यात आले होते?

**.प्र.शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** ज्या वेळेस आम्ही एस्टिमेट बनवले होते, ६१ रोडचे ते बनले होते, ते एस्टिमेट बनवले होते जानेवारी, २०१८ मध्ये जेवढे खड्डे होते ते खड्डे भरण्यात आलेले आहेत.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** म्हणजे आम्ही पहिले २०१७ नोव्हेंबर मध्ये जे ५ करोडचे ऑर्डर दिले होते त्यांचे माप नक्कीच घेण्यात आलेले असेल आपण नोव्हेंबरचे माप समजा ऑगस्ट मध्ये किंवा में मध्ये घेतले असेल त्यावेळेस काय परिस्थिती अशी होती की, ज्यात ५ करोड ६४ लाख आपल्याकडे पैसे कमी पडले त्यात खड्डे नाही भरू शकलो. त्यामुळे ६ करोड ३१ लाख दिले. ५ करोड नंतर तेच ६१ रस्ते होते का त्याव्यतीरिक्त पण होते होते का?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** ५ करोड ६४ लाखचे एस्टिमेट होते त्यानंतर परत आपण ६ करोड वाढवुन दिले.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** त्याच ६१ रस्त्यांकरीता.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** होय त्याच ६१ रस्त्यांकरीता.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** आपल्या ५ करोड नंतर ६ करोड ३१ लाख झाले त्यांनतर सर्व जे ६१ रोड आहेत ज्यांची यादी आहे त्यांचे संपूर्ण काम करण्यात आले का?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—** त्या ६१ रोडा शिवाय आम्ही १०, १२ रोड अजुन जास्त पणे केले आहेत. ज्याची यादी माझ्याकडे आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** आपण ६१ रोड नंतर अजुन १०, १२ रोड केले म्हणजे संपूर्ण ६१ आणि १२ म्हणजे तुम्ही एकुण ७३ रोड केले आहेत.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानीः—**अंदाज आहे माझ्याकडे यादी आहे सर....

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**नाही आपण ७३ रोड बनविले. ७३ रोड मध्ये ६ करोड ३१ लाख रूपये संपूर्ण संपले.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**प्रदिपजी या विषयावर मी सन्मानीय आयुक्त साहेब यांच्याशी बोलेल. या विषयावर भरपूर चर्चा झाली.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः—** माझ झाल मला १ मिनिट दया मी हा विषय संपवतो.

**सदस्य श्री. धनंजय बोडारेः—**महोदया आयुक्त साहेब मी तळमळीने आणि कळकळीने विचारतो आम्ही ऐवढी चर्चा करत आहेत. याचा काय उपयोग होणार आहे का? नाही तर मनोज लासी त्यांनी तळमळीने बोलायचे आणि बी.पी. वाढवायची अरूण आशान त्यांचा आवाज बघितला तुम्ही बगितला कातर झाला होता याच कारण काय? पण प्रशासनाकडुन त्याच प्रतिउत्तर येत नाही मी मागील महासभेत देखिल सांगितले होते की तळमळ असली पाहिजे कळकळ असली पाहिजे शहरावर प्रेम असल पाहिजे बस म्हणुन बसायच म्हणुन बसायच आम्ही बोलतोय त्याचा उपयोग होणार आहे का नाही हे तुम्हीच सांगा नाही होईल बाबा तर चर्चा नाही तर यायच मिटींग करायची नगरसेवकांनी ओरडायच याला मराठीत बोलतात बोंबलायच आता ऐवढच बाकी आहे म्हणजे होळीला शिमग्याला ओरडतात तसेच बाकी आहे. ऐवढे बोंबलुन काय परिणाम होणार आहे का प्रशासन हालणार आहे का? १४ कोटीचे रस्ते कसे झाले मी तुम्हाला सांगतो तुम्हाला माहित नसेल ५ कोटी ६१ लाखाचे आधी प्राकलन आले. त्याच्या मध्ये पुर्ण रोड झाले नाहीत. बरेचसे रोड सोडले गेले. प्रशासनाला विचारले प्रशासन मी आयुक्त किंवा शहर अभियंता कोण आहे ते मी इथे विचारणार नाही. प्रशासनाला विचारले हे का राहीले. ते म्हणले काही लोकांनी पुर्ण रोड केले पाटोल न करता पुर्ण लेनची लेन टाकुन घेतली म्हणुन ते रोडस बाकी राहीले. ५ कोटी मग तुम्हाला किती लागणार आहेत. ५ कोटीं ऐवजी स्थायी समितीला अपेक्षा होती किंवा कुठल्याही सामान्य नागरीकांना असे वाटेल कि ५० लाख रूपये वर वाढतील. आयुक्तांनी सार्वजनिक बांधकाम विभागानी त्यावर प्रस्ताव आणला की त्यावर प्रस्ताव मागीतला त्यावर स्थायी समिती मध्ये प्रस्ताव ठेवण्यात आला. ६ कोटी ६१ लाख वाढीव व २ कोटी नविन रोड बनवायचे असतील तर म्हणजे प्रदिप रामचंदाणी यांनी जो विषय मी तुम्हाला सांगतो याच्यावर आम्ही तळमळीने बोलतोय काही तरी करून दाखवा. नाही तर प्रशासन आम्ही पाण्यासाठी बोंबलतोय १५ दिवसापर्यंत काही झाले नव्हते. ज्या दिवशी मोर्चा काढण्यास सांगितला त्या दिवशी मोटर लागली. दुस—या दिवशी पाणी चालु झाले. तसे ५ कोटी ६१ लाखाचे पुर्ण रोड का झाले नाहीत तर म्हणतात पाटोल्स राहीले बाजुला लोकांनी रोड बनवुन घेतला चला ठिक आहेत शहरातले रोड आहेत. नागरीकांना सुविधा होईल म्हणुन स्थायी समितीने

प्रशासनाला विचारले किती लागतील? प्रशासनाने सांगितले ६ कोटी ६१ लाख असे सांगितले त्याच्यावर २ कोटी म्हणजे अजब नाही पहिले प्राकलन ५ कोटी ६१ लाखाच दुसर प्राकलन त्याला पुरवली म्हणुन ८ कोटी झाले. त्याच उत्तर काय दिल. याच्या आगोदर कधी लायबिलीटी पिरीयड काढुन दिला यांना लायबिलीटी पिरीयड दिला आहे म्हणुन प्राकलनाची किंमत वाढलेली आहे बरोबर का? आणि म्हणुन हे प्रशासनानी समर्थन केलेल आहे. स्थायी समिती सदस्य यांनी येथे प्रश्न उपस्थितीत केलेला आहे ऐवढ कसे शक्य आहे. सुरूवातीच मुळ प्राकलन ५ करोड ६१ लाख आणि त्याच्यावर किती टक्क्याची वाढ होते. प्रशासनानी स्थायी समितीस उत्तर दिले आहे की लायबिलीटी पिरीयड मध्ये त्याला त्याची दुरूस्ती करायची आहे पुढच्या वर्षा पर्यंत आणि म्हणुन ५ कोटी ६१ लाखाचे हे ८ कोटी वाढीव झालेले आहे आणि २ कोटी नविन रोडचे बरोबर आता मनोज सयानी यांनी पोटतिडकीने सांगितले की लोक विचारत आहेत आम्हाला खडयामधुन आम्ही चालायच किती दिवस काही वाट बघायची लायबिलीटी पिरीयड पुढच्या मार्च पर्यंत तुमच ठराव चालणार आहे का परत प्रशासनाने स्थायी समिती मध्ये विषय आणले २५,२५ लाखाचे २ प्राकलन गणपती पुर्वी म्हणजे काय लोकांना उत्तर काय दयायची राजेश वानखेडे यांनी सांगितल की नगरसेवकांना लोक सरसकट बोलतात की चोर आहेत अर्थ तोच होतोय जे काम प्रशासनानी केल पाहिजे काही न करता आम्ही फक्त चर्चा करायची स्थायी समिती मध्ये कोणी सांगितलेले प्रस्ताव प्रत्येक वेळी सांगितले काही तरी कल्पकता असली पाहिजे. आयुक्त यांनी यांचा हुद्दा वापरून या शहरासाठी मला काही तरी केल पाहिजे. शहर अभियंता यांनी प्रत्येकानी आपली जबाबदारी घेतली पाहिजे. मी मगाशी स्थायी समिती मध्ये सुध्दा उदाहरण दिलेल की, केरळ मध्ये १०० वर्षामध्ये कधी पाऊस पडला नव्हता ऐवढा पाऊस पडला तिथे तरी पण आमचे खासदार बरोबर मदतनिधी साठी लोक गेली त्या ट्रीवेंडर मध्ये खड्डे कुठे आहे ते लोक शोधत होती. अभिजित म्हणुन पी.ए. आहे आणि दुसरा आहे तो बोलतो आम्ही खड्डेवाले रस्ते शोधतोय १ रस्ता सापडला आपल्या सारखा १ रस्ता सापडला ते ही आम्ही नंतर विचारल तर तिथ मेट्रोचा ब्रिज होणार आहे म्हणुन सोडले आहे. ऐवढा पाऊस असतांना तिथ अजिबात खड्डे नाहीत परवा मी शेगावला गेलो होतो तिथ सुध्दा ऐवढा पाऊस झालेला आहे तिथ खड्डे नाही फक्त उल्हासनगर मध्ये काय का खड्डे पडत आहेत. क्वालिटी कन्ट्रोल नाही. १ रस्ता केलेला आहे मनोज सयानी यांनी सांगतले आहे की वाकोर रेड्डी ते मानेरे पर्यंतचा नविन रस्ता केलेला त्यांची चाळण झालेली आहे तेथुन जावुन तो रस्ता ३ वर्ष मेंटेंन करायचा आहे म्हणुन त्याला टेंडर जास्त आगाऊनी दिलेले म्हणजे आम्ही ओरडायचे तुम्हाला त्याचा खास परिणाम होणार आहे का तर आम्ही बोलतो नाही तर आम्ही चाललो बाहेर काय महासभा चालुन उपयोग नाही शेवटी आम्ही बोलतो करतो त्यात निष्पन्न काय महापौर मॅडम खाली बसुन चालणार नाही आपण शहराला काय देत आहोत जर अस प्रशासन असेल तर शहरास काही देवु शकणार नाही निधी आहे किंवा निधी नाही निधी असेल तरी असाच जाईल नाही तर काय प्रश्नच नाही. खड्डे मध्ये रहा पाणी भेटले तर भेटले साफसफई होईल किंवा नाही लाईट नाही आज एकाने फोन केला होता मला बोल्ला की शहर राम भरोसे चालत आहे. राम भरोसे चालत आहे कोणी नाही वाटर सप्लाय वालमननी जर वाल फिरवला तर पाणी भेटणार नाही तर पाणी बंद होईल कोणाचेही कोणावर नियंत्रण नाही. ठेकेदार प्रस्ताव बनवतात जे दिल त्याचावर कंट्रोल नाही कंट्रोल असत तर हे झालच नसत आज ही चर्चा नसती झाली. कॉन्ट्रॅक्टर म्हणुन आयुक्त यांनी फरमान देणे गरजेचे होते की शहराची हालत बघून ठेकेदारास १४ करोडचा जो ठेका देण्यात आलेला आहे किंवा जे नविन रोड बनविण्यात आलेले आहे. मनोज लासी यांनी सांगितले की १ नंबर मध्ये जो रस्ता बनवलेला तो चांगला आहे तो रस्ता याच ठेकेदारा मार्फत बनविण्यात आलेला आहे. आमचा जर श्रीराम टॉकीज वाला रस्ता चांगला होवुन शकतो तर हा रोड खराब का आहे का विचारणा करावयाची होती ते विचारले नाही. हे विचारण्याचा अधिकार कोणाला आहे. असे चालेल का? स्थायी समिती येईल जाईल महासभा येईल महापौर येतील जातील जो पर्यंत प्रशासन नाही सुधारणार तो पर्यंत शहराचा कोणी काही चांगले करणार नाही. नाही तर आम्ही येणार ओरडणार काही नाही. त्यांना माहित आहे येतील २ तास ओरडतील निघुन जातील. उपमहापौर महोदय आपण पण मी पुन्हा पुन्हा बोलत आहे. सेन्सीटीव बना हे शहर आपले आहे. आयुक्त साहेब आहेत किंवा नाही जो पर्यंत ते आहे जसे १ वर्ष किंवा २ वर्ष आहे. महापौर जो पर्यंत आहे तो पर्यंत या शहरासाठी काही तरी पण काही नाही होत. आज मनोज लासी यांनी हा मुद्दा उपस्थितीत नसता केला तर चर्चा झालीच नस्ती लोक खड्डयात रहात असते ते रेलीफ स्प्रे घेवुन आले त्याकरीता रिलीफ स्प्रे स्वत:साठी घेवुन नाही आले या शहरातील सामान्य नागरीकाची भावना त्यांनी सागितली. त्यांना वाटल असत तर महापौर जी आपल्या का नाही उपमहापौर आपल्याला का नाही आयुक्त यांना का नाही का इथे ओरडावे लागते आहे त्यांचा गळा सुकला आहे. प्रत्येकाला असे वाटले पाहिजे की माझ्या शहरा सोबत खेळ खेळला जात आहे. सुरूवातीला आयुक्त साहेब तुम्ही त्या चर्चाला उत्तर दयाना मी हे अस केल तुमचाकडुन अशी अपेक्षा होती की मी चौकशी केली त्याठेकेदारावर कार्यवाही केली येथुन पुढे असे होणार नाही ही अपेक्षा तुमच्याकडुन आहे पण हे होत नाही चर्चा चांलेली आहे आपल तुमच चांलेल नाही काय उत्तर नाही काय नाही त्या ठेकेदारावर कारवाई होवुन जरा बसन हे तुमच काम होत प्रशासनाच काम होत हे होत नाही त्यामुळे ही चर्चा आहे. कृपया येथुन पुढे तरी कमीत कमी जे सांगितले कि प्रशासन सांगतय तस आम्ही वागतोय ५ करोडचे ६१ लाख आणि ९ करोडचे १४ करोड झाले आयुक्त कोण होते ते गेले त्याच्या नंतर अंकुश ठेवणे हे प्रशासनाच काम होत. टाउन प्लानिंग काय चालले ते माहित नाही पाणी पुरवठा मध्ये काय चालले माहित नाही. पी.डब्ल्यू.डी. मध्ये काय चालले माहित नाही. हे काय खरोखरच राम भरोसे चल रहा है तर आम्ही ते राम भरोसे हिंदु हॉटेल बनवायच आहे. जर केरळ मध्ये येवढा पाऊस पडुन त्या डांबराच्या रस्त्यावर खड्डे पडत नाहीत.

आमच्या इथे का पडतात नविन रस्ते पण उल्हासनगर मध्ये १ नविन रस्ता चांगला नविन रस्ता का म्हणजे हा काय क्वालिटी मग त्याच्यावर अंकुश कोणी ठेवायचा आहे. आम्ही नाही करू शकत आमचे नगरसेवक शेख यादव यांनी सांगितल की, मला बनवा मी करतो ही त्यांची भावना आहे ती प्रत्येकामध्ये तुमच्या मध्ये का भावना नाही हे होता कामा नये जर ते उद्देशाने अगदी उल्हासाने बोलत आहे माझ्याकडे दया म्हणजे मी करू शकतो मला नायक पिक्चर आठवतो अनिल कपुरचा विचारला तर प्रश्न वेगळा जर विचार शक्ती असेल तर सर्व काही करू शकतो इथ विचार शक्तीचा अभाव आहे, बस जे चालु ते चालु आहे बस पाटया टाकायच काम चालु आहे, हे थांबवा कुठे तरी सभागृह नेता त्यांनी जे बोलले आमचे देखील काम आहे खाली प्रशासना देखिल टाकुन जमणार नाही त्यासाठी स्थायी समिती मध्ये हा ठराव ठेवण्यात आला पाहिजे त्या मुळे मी स्थायी समिती मध्ये सुचवीले होते की जे काम चालु आहे त्यांची पाहणी करण्यासाठी आपण जावु या ज्यांना पण येवु वाटेल त्यांना सोबत याव. एक तर शहरात काही काम नाही जे काम झाल आहे ते फक्त पाटोल्सच झाल आहे त्यात देखिल पाटोल्सचा कामाची ही हालत आहे. सत्तेचे समीकरण किंवा नाही पण जे शहराला देण आवश्यक आहे आपण ते देवुन शकत नाहीत, सत्ता कोणाची आहे याच्याशी काही मतलब नाही आपण शहरास काय देत आहोत. याच्या पुढे आपण सत्ता मध्ये बसाल तर काम उत्तम प्रकारे करा याकरीता आम्ही आपल्या सोबत आहोत आणि चुकीच्या मार्गाने चाललात तर याच्यापुढे आयुक्त साहेब त्यादिवशी आम्ही सांगितल होत पाण्याचा प्रश्न होता १४, १५ दिवसापासून हे प्रशासन ऐवढ मोठ आम्ही काय ७०० करोडच काय ९०० करोडच बजेट मंजुर करतो आणी काय प्रशासन सांगत ५०० करोड पण १८ दिवसामध्ये १ मोटर तिथ बसवु शकत नाही हे दुर्दैव आहे, जी योजना २०१४ मध्ये कार्यवाही झाली त्याची मोटर २०१७ मध्ये खराब होते. त्याठिकाणी दुसरी मोटर आणली जाते आणि खराब होते १ का वर्षा मध्ये हे काय आहे. १ मोटर नाही म्हणुन ४ नंबरच्या नागरीकांना लाल चक्की पासुन ते ओ.टी. पर्यंतच्या लोकांना १५ दिवस पाणी मिळु शकत नाही. १५ दिवसांतुन १ ते २ दिवस पाणी मिळाल ज्या एरियाला पाणी मिळाल ते सोडुन बाकी २ दिवस पाणी मिळाल आहे काय उत्तर देयची आम्ही लोकांना म्हणुन त्या दिवशी सांगितल होत की, हे अधिकारी सांगतात की मोटर खराब आहे झाले उत्तर हे जावुन तुम्ही नागरीकांना सांगा की मोटर खराब आहे, म्हणजे मराठी भाषेमध्ये लोक जोडयांनी मारल्या शिवाय राहणार नाहीत हे अस प्रशासन चालणार आहे का? येथुन पुढे तरी नाही तर आम्ही बोलुन सोडुन देवु महासभेला येवुन हजेरी लावायची महापौर महोदया डोळयावर पट्टी बांधायची तोंडावर पट्टी बांधायची गांधीजींचे ३ माकड बुरा मत देखो ही मत और सुनोही मत सुना अशा प्रकारे चालणार नाही. एक विधानास्तव राहील पाहीजे जे कळकळी बोलत आहेत झाल पाहिजे एक कंन्सीस्टीव निगेटीव नाही. महानगरपालिका स्थानीक स्वराज्य संस्था आयुक्त आणि लोक प्रतिनिधी यांनी एकत्र येवुन काम केल पाहिजे. तुम्ही नागरीकांसाठी आहात आम्ही देखिल नागरीकांसाठी आहोत. आम्ही स्थायी समिती मध्ये तुम्ही आणलेले प्रस्ताव ते पारित करायचे नाकारायचे तुम्ही ही तुमची मनमानी चालली आहे हे चालणार नाही. महासभा स्थायी समिती मध्ये या मध्ये विचारमंथन होईल. त्या मध्ये जे नवमी निघेल त्याचा वापर शहर हिता करीता होईला पाहिजे तो होत नाही. आम्ही एकटेपणाने चालले नाही पाहिजे आम्ही अगोदरच्या निंबाळकर साहेबांना देखिल हेच सांगितल आहे. पण हया तळमळीने करा अगोदरच्या ते रिॲक्टच होती. ते पटकन रिॲक्ट होते. आयुक्त महोदय आता जे वाटत आहे ना शहरात फिरल्यानंतर की प्रत्येक गल्लोगल्ली खड्डे आणि खड्डेच त्यानंतर ठिक आहे पडले असतील तो कोण दोषी असेल पण महापालिका प्रशासन म्हणुन काम काही तरी केल पाहिजे, त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. महापौर महोदया, आपण सुध्दा आज आदेशित करावे या विषयावर कारवाई करीता बाकी आमचे काही नाही.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>**गॅरंटी वॉरंटी पाहिजे आयुक्त साहेब गणपती येण्यापुर्वी गणपती बप्पा मोरया होयाला पाहिजे. गणेश पाटील आपल नाव आहे तर आपण आपल्या नावाकरीता जे गणपती बप्पा येणार आहे. त्याच्याकरीता आपण आदेश काढावेत.

**<u>सदस्य श्री. अरुण आशानः—</u>**साहेबांच्या नावापासुन श्री गणेशा...

**<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानीः—</u>**आयुक्त साहेब बोलण्यापूर्वी कॉन्ट्रक्टर च्या विषयावर रोड संदर्भात आदेश संदर्भात तसेच कामा संदर्भात आणि पाटोल्स भरण्यासंबंधात संपुर्ण पणे विश्लेषण करून सांगण्यात यावे.

**<u>मा. आयुक्त श्री. गणेश पाटीलः—</u>**सन्मानीय महापौर सर्व सन्मानिय सदस्य गेल्या १ तासा पासुन आपण पाटोल्स संदर्भात चर्चा करतोय सदस्यांच्या तिव्र भावना बघितल्यानंतर खरोखर हा विषय अतिशय गंभीर तेने घेतला पाहिजे आणि आम्ही तो घेतलेला आहे आणि तो कसा घेतलेला आहे तो आम्ही संपुर्ण पणे सांगतो. मागच्या वर्षी आता मला समजले की ५ ते ६ कोटी असे १४ करोड रूपयाचे पाटोल्सचे कॉन्ट्रॅक्ट स्थायी समितीच्या मंजुरीने त्यावेळेस दिलेले होते. मला वाटत की तर आता आपले सन्मानिय सदस्य बोडारे साहेबांनी सांगितले की स्थायी समितीच्या विचार मंथनातुन नवनित बाहेर निघन हे विचार मंथनातुनच बाहेर निघालेले असेल त्यावेळेला आणि हे १४ कोटीच कान्ट्रॅक्ट हे आपण दिलेल होत. त्यांच्या मध्ये खड्डयांची लायबिलीटी कालावधी...

**<u>सदस्य श्री. भगवान भालेरावः—</u>**साहेब तुम्ही ५ (२) (२) स्थायी समितीने जरी बोलले तरी करण्याची जबाबदारी तुमची आहे...

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**स्थायी समिती मध्ये प्रशासनाने प्रस्ताव आणला ५ (२) (२) चा तेव्हा स्थायी समितीने शहरातले रस्ते चांगले व्हावे म्हणुन दिलेला आहे....

**सदस्य श्री. अरुण आशान:—**साहेब समुद्र मंथन तुमच्याकडुन झाल होत....

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**मी प्रशासन म्हणटलय... आयुक्त साहेब, स्थायी मध्ये जेव्हा शंका विचारली होती ऐवढ कसे काय आयुक्त साहेबांनी सांगितले अस अस आहे. त्याला मेंटेन करायच आहे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—**बरोबर आहे शेवटी स्थायी समितीला ते पटल होत, आणि त्याच्या १४ कोटीच्या पाटोल्सचे काम जे आहेत ते शहरामध्ये केले आहेत. हे का कोठे केले आहे कसे केले आहे हे प्रत्येक नगरसेवकानी बघितले आहे. कारण प्रत्येक नगरसवेकानी त्याच्या त्याच्या प्रभागात हे काम केलय काम करत असतांना पाटोल्स काम करायच तिथे पुर्ण तहा पट्टे मारले गेलेत आणि हे पट्टे मारत असतांना स्थानिक लोक प्रतिनिधीच्या आधिनावस्त ते पट्टे मारले गेले त्याच्यामुळे कामाची कॉस्ट वाढलेली आहे आणि वाढलेल्या कॉस्टला सुध्दा मंजुरी दिलेले आहे. त्याच्या बद्दल काय वाद नाही. ज्या आर्थी हे पट्टे मारण्याच काम २ टप्पात झाल पहिल्या टप्पाच काम ते व्यस्थीत झाल त्यानंतर दुस—या ट्प्याला हि मंजुरी दिलेली आहे बरोबर आहे ही मंजुरी दिली कामाचा प्रोग्रेस पाहुन दिली हि काय लगेच १४ कोटींना मंजुरी दिलेली आहे अस नाहीये, त्याच्यामुळे आता जे शितलानी यांनी सांगितले जे काम कुठ झालेल आहे याचे सगळे मोजमाप हे त्यांच्याकडे आहेत मला वाटत जर ते कोणालाही पाहिजे हवे असतील तर मोजमाप बघण्याकरीता ते उपलब्ध करून देवु शकतात ते करून देतिल पण हे काम ज्यावेळेला झाली त्यावेळेस व्यवस्थीत झालेली असतील कारण हा विषय आता पर्यंत आलेला नव्हता आता तो विषय पावसाळयानंतर आलेला आहे. आता पावसाळयामध्ये कोकण मध्ये बघितल आपण तर बजेट प्रचंड प्रमाणात आहे. दोन दिवसापुर्वी मी ठाणे जिल्हामधल्या सगळया तालुकातल्या रस्त्याची पावसाची आकडेवारी बघत होतो. ती आकडेवारी बगितल्यानंतर माझ्या लक्षात अस आली की ठाणे जिल्हयामध्ये सर्वात जास्त जर पाऊस कुठे झाला असेल तर तो उल्हासनगर मध्ये झालेला आहे. एक ३ ,४ दिवसामध्ये २६०० मि.मि. पाऊस उल्हासनगरमध्ये झाला होता. आणि या सर्व तालुकांपेक्षा जास्त पाऊस हा उल्हासनगर मध्ये झालेला आहे आणि या पावसाच्या काळामध्ये खड्डे पडायची जी काय कारण आहेत काही लोक त्याच्यावरती कारण सांगतिल की ज्या खड्डयावरती डांबराच्या खड्डयावरचा पाण्याचा निचरा व्यवस्थित होतो त्या रोडवरती खड्डे कमी पडतात. रस्त्यावर पडणारा जो पाऊस आहे. त्याचा निचरा कशा पद्धतीने होतो याच्यात खड्डयाच लाईफ अवलंबुन असत. ज्या साईटचे गटर ब—याच दिवसांपासुन उघडलेले नसतील तर रोडच काम होत तर गटरच काम होत नाही. असे बरेचशे कारण याला कारणी भुत असता, काय असेल ते आपण नंतर शोधत बसु परंतु या १४ कोटीच्या खड्डयाच्या विषयाच्या बाबती मध्ये हे जे १४ कोटीचे पाटोल्स जे झालेले आहेत. याच्या मध्ये ज्या ठिकाणी रिपेरींगच काम झालेल आहे त्याठिकाणी जर परत खड्डे पडले असतील तर लायबिलिटी मध्ये काम करण्याची जबाबदारी निश्चित पणे ज्यांनी ते काम केलेल आहे त्यांची आहे आणि त्यांच्याकडुन ज्या ज्या ठिकाणी काम केलेल आहे त्या त्या ठिकाणी त्यांच्याकडुन काम करून घेण्याची जबाबदारी प्रशासनाकडुन काम सुरू करून घेण्याची प्रक्रिया आम्ही सुरू केलेली आहे आणि त्यांच्याकडुन आपण ते काम करून घेवु. याच्या व्यतिरीक्त ज्या रोडवरती आपण या पुर्वी काम केलेल नाही. त्याच्यामध्ये जे नविन खड्डे पडलेले आहेत ते नविन खड्डे पावसाळयामध्ये फक्त आपल्याला खडी टाकुन बुजवता येतात आणि ते बुजवण्याच देखिल काम आपण पाऊस चालु झाल्यानंतर काही वेळेने ते सुरू केलेल होत. परंतू ते काम करत असतांना सुध्दा ब—याच लोकांच्या तक्रारी आल्या की अरे इथे फक्त कपची टाकली जातेय कारण पावसाळयात आपण डांबर टाकु शकत नाही. म्हणुन कपची आणि बारीक खडी टाकुन खड्डे बुजवायच काम आपण केलेल होत. आता दुसरा टप्पा जो आहे तो गणपती पुर्वीचा टप्पा या टप्पामध्ये जो काही पाऊस कमी झालेला आहे. म्हणजे कमी कमी होत चाललेला आहे तर आपल्याला वेळ मिळतोय रस्ते कोरडे होत आहेत. आणि कोरडे झालेल्या रस्त्यांवरती आपण डांबराने काम करू शकतो. आणि गणपती पुर्वी आपल्याला हे काम पुर्ण करावच लागणार आहे, म्हणुन ५० लाख रूपयेचा जो प्रस्ताव आहे मी आजच स्थायी समिती समोर ठेवला स्थायी समितीने आम्हाला आज मान्यता दिलेली आहे की याच्यात कोणी तरी चांगला कॉन्ट्रक्टर शोधा आणि हे खड्डयाच काम करा तर गणपती पुर्वी हे जे खड्डे आहेत भरले जातील जे खड्डे मागच्या कॉन्ट्रॅक्टमध्ये कवर झालेले नव्हेत रस्ते त्याचे खड्डे आपण या कॉन्ट्रॅक्ट मध्ये बुजवणार आहोत आणि मागच्या कॉन्ट्रॅट मध्ये जे काम झालेली आहेत त्याच्यामध्ये जर पर खड्डे पडलेले असेल तर त्याच ठेकेदारामार्फत ते काम करण्याची कारवाई आम्ही ते करून घेवु आणि या वेळेला गणपती मध्ये रस्त्यांवर कमीत कमी खड्डे राहतील. गणतपीच आगमन आणि विर्सजन याच्यामध्ये कमीत कमी त्रास हा उत्सव साजरा करतांना होईल या दृष्टीकोनातुन आपण यावर निश्चित पणे कारवाई करू १४ कोटी बद्दल जर कोणाला वाटत असेलतर काही घोटाळा झालेला आहे तर त्याची चौकशी करायची सुध्दा प्रशासनाची तयारी आहे. आपण जर म्हणत असाल तर तुम्हाला ही जोडीला घेवु आणि निश्चित पणे चौकशी करू आम्ही त्याची परंतु चौकशी एक टाईम फ्रेम मध्ये झाली पाहिजे त्याला एक फ्रेम वर्क ठरवुन देवु आणी त्याच्या तुमचा देखिल सहभाग करून एक समिती बनु आपण आणि त्या समिती मार्फत चौकशी करण्याची आमची तयारी आहे. धन्यवाद!

**<u>सदस्य श्री. रविंद्र बागुलः—</u>**आयुक्त साहेब आणि महापौर, उपमहापौर साहेब शहाड येथे स्टेशनच्या समोर कमिशनर साहेब शहाड येथे स्टेशनच्या समोर तिथ का खड्डे ऐवढे महापौर, उपमहापौर साहेब थोड इकडे लक्षदया शहाड स्टेशन एरिया समोर का खड्डे ऐवढे सारख्या गाडया पडतात तिथ सारखा लोकांना त्रास होतो. एक बाई पडली त्या दिवशी...

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—</u>**मा. महापौरजी आयुक्त साहेबांनी बरेच चांगले निवेदन केले या शहराचा जो मा. महापौर जी या शहराचा जो महत्वाचा प्रश्न जशी चर्चा केली ना मी पॉईंट ऑफ ऑर्डर तुम्हाला विनंती करतो कब्रिस्तानाचा विषय हा पण जरासे आपण एक निवेदन केले तर बरे होईल. मा. आयुक्त साहेब कसे आहे की, आपण आज त्या साईट नंतर २४५ वर जवळ जवळ ३०० घर आहेत ती बाधित करायची का?...

**<u>सदस्य श्री. मनोज सयानीः—</u>**मा. महापौर जी आयुक्त साहेब आपण बोलले हे जे १४ कोटीचे जे काम दिलेल आहे. स्थायी समिती मार्फत त्याच्यात जर घोटाळा झाला आहे किंवा नाही यांची चौकशी करण्यात येईल. तो पर्यत त्याच्यावर नजर ठेवण्यात येईल आणि जे कामे झालेले आहेत ६१ रस्त्याचे किंवा शहर अभियंता जे बोलले ७२ रोडांचे जे कामे झालेले आहेत त्यात खड्डे भरलेले आहेत किंवा नाही तर पुर्ण सभागृहाच्या माध्यमचे महापौर, उपमहापौर यांच्या मार्फत संपुर्ण पक्षाच्या एका कमिटीच येथे नाव घेत आहोत. ज्यांची संमती असेल त्यांनी जे हे १४ कोटीचे काम झाले आहे. ६१ किंवा ७२ रस्तांचे खड्डे भरण्यात आलेल आहे किंवा नाही ते कामे झालेले आहेत किवां नाही याकरीता सभागृह नेता जमनु पुरसवानीजी, विरोधी पक्ष नेता धनंजय बोडारेजी, भरत गंगोत्री, राजेश वधारिया, टोनी सिरवानी, मनोज लास्सी यांच्या सोबत शहर अभियंता आणि आयुक्त साहेब या कमिटी मध्ये हे सातजण येणारा एक टाईम फ्रेम करून केस संदर्भा सर्व प्रकाचे शहानिशा करून ज्या रस्त्याचे कामकाज झालेले आहे तपासणी करून सांगतील कि खड्डे पडलेले आहेत किंवा नाही ही कमिटी टाईम फ्रेम बनवुन पी.डब्ल्यु. च्या माध्यमातुन या ७२ रस्त्यावर जे लायबिलीटी कालावधीत त्यावर खड्डे पडले आहे किवा नाही काही तोडफोड झालेली आहे गणपती पुर्वी त्यांची दुरूस्ती करणे त्या रस्त्यांना चालण्याच्या लायक करण्याच्या संदर्भात आयुक्त साहेब देखील असतील तिथ...

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारीः—</u>**जो पर्यंत ही कमिटी रिर्पोट नाही करत फाईनल रिर्पोट तोपर्यत आयुक्त यांना सांगण्यात येईल की यांचे दयक थाबविण्यात यावे.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>**कमीत कमी आपण एवढ बोललात खड्डे भरण्याची सुरूवात करण्यात यावी हा आमचा मुद्दा आहे...

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**शिक्षा वगैरे होत राहिल परंतु लोकांना खड्डे मुक्त रस्ते दया.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>**लवकरात लवकर काम झाले पाहिजेत. बाकी सिस्टम होत राहिल व कामे होत राहतील.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे :—</u>**मा. महापौर जी आयुक्त साहेब मॅडम मी विषय काढला आहे पॉईंट ऑफ ऑर्डर विचारला त्यांनी ते बोलले २ मिनिट थांबा म्हणुन थांबलो मला वाटत साहेब शहरातला हा सुध्दा एक ज्वलनशिल मुद्दा आहे किवा मला अस वाटत की, मी मिटींग मध्ये सुध्दा बोललो आपण त्या ठिकाणी गेलो होतो तेव्हा देखिल मी हेच बोललो या मुद्दाचा विचार करून प्रशासनाला सर्व नगरसेवकांनी मदत केली याच्यातुन पर्याय काढला पाहिजे कारण की स्पष्ट आहे. जर आपण आज के. बी. रोडच्या लोकांना कल्याण अंबरनाथच्या लोकांना जर तुटलेल्या दुकानांना आपण जागा देवु शकत नाही तर आपल्याकड जर जागा उपलब्ध नाही. हि २५० ते ३०० घर आपण काडली रस्त्यावर आणली किंवा तेथे कब्रिस्तान केल तर तिथे म्हणजे एकदम सोपी गोष्ट आहे की जिवंत मानसांचा विचार न करता जे मेलेले आहे त्यांचा विचार करतो असा अर्थ होईल आता माझी सभागृहाला विनंती आहे या विषयावर चर्चा करून व्यवस्थित आयुक्तांनी नियोजन कराव काय करता येईल याच्यामध्ये आणि सभागृहाची काय मदत लागेल. मग मी माझी सभागृह नेताची आपल्याला सर्वांना विनंती आहे. या विषयावर मार्ग काढण्यात यावा काय होत आहे मला तर अस वाटंय की, मी पक्षाचे मत नाही माझे खाजगी मत सांगतो की, त्यांना न मिळाव अशा दृष्टीकोनाने सर्वांच चाललय त्यामुळे जागा अशी हे करतात की लोकांना हटवाच कि मग देता येत नाही. आम्ही कस करणार लोकांना हटवायच नाही. जे ओपन प्लॉट आहेत ज्या ओपन जागा आहेत. तिथे देण्याला जर आम्ही विरोध करतोय तर आम्ही त्यांना दयायच कुठे किंवा नाही दयाचतर तसा ठराव करा. पाटवा सरकारला नाही दयाच त्यांना परंतु उध्या या विषयावर लॉईन ऑर्डरची शक्यता आहे. या शहराचा एक नागरीक असल्यामुळे मला अस वाटत की, फार मोठा प्रॉबलम हा होवु शकतो. माझी कृपया विंनती आहे यांच्या आपल्या प्रशासनाचा काय उद्देश आहे काय करणार आहे प्रशासन ते कृपया त्यांनी सांगाव.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>**मा. महापौर जी मी आपणास निवेदन करतो की, ३ वाजल्या पासुन

बैठकीस सुरूवात झालेली आहे ५ वाजत आलेले आहे आजुन विषयांची सुरूवातच करण्यात आलेली नाही. तसे आहे तर एक तर विषयाची सुरूवात करण्यात यावी किंवा बैठक रद्द करण्यात यावी.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानीः—**मा. महापौर जी उपमहापौर जी आयुक्त साहेब पॉइन्ट ऑफ ऑर्डर हा जो विषय होता सुर्वे यांचा अगदी बरोबर आहे शहराच्या हिताकरीता आहे. मा. महापौरजी आम्हा सर्वांना विश्वासात घेवुन संपुर्ण सभागृह सांगण्यात यावे. जो हा विषय आहे जर कोर्टात असेल तर आपण कोर्टात काय देणार आहात हे संपुर्ण सभागृहाला सांगणे गरजेचे आहे. असे न व्हावे की एक पण बैठक न घेता दोन महिन्याचा गॅप पडावा ज्याने वेळेच्या बंधनात राहुन कोर्टात काही पण दयावे लागेल असे काहीही देण्यापुर्वी सभागृहास सांगावे माझे आपल्याला हे निवेदन आहे आणि नगररचनाकार यांना देखिल निवेदन आहे. महापौजी आपणास एक सांगण्यात येत आहे की आपण जे पण कराल ते शहराला किंवा आम्हाला सांगावे लागेल अन्यथा पुढे चालुन लॅाईन ऑर्डरची समस्या होवु शकते कृपया मेहरबानी करून कोर्टात जे काही वकालतनामा देण्यात येईल हे आम्हाला दयावे. धन्यवाद!

**महापालिका सचिवः—**म. महापौरांनी विषय घ्यायचे सांगितले आहे, मी यापुर्वीच विषय वाचला आहे. आपण यावर चर्चा करावी.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**या नगरसेवकाचे ऐकुन घ्या ते बिचारे दहा वेळा बोलत आहेत. ते कधीपासुन उभे आहेत. ते आजारी आहेत. शासनाकडुन असा आदेश आहे की ज्याची तब्येत बरोबर नाही त्याचे आधी ऐकुन घ्यायचे असते. यांचे आधी ऐकुन घ्या.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**बोला तुम्ही.

**सदस्य श्री. रविंद्र बागुलः—**आयुक्त साहेब, महापौर आणि उपमहापौर साहेब राजिव गांधी नगर च आपण काय केल सेलवन साहेबांना आपण पाठवल होत. त्या जागेवरती सेलवन साहेबांनी काय केल ती काम अजुन चालु का नाही केली. का XXXX बनवल आम्हा लोकांना आम्ही लोकांना जनतेला काय निरोप दयायचा. आम्ही जनतेला काय निरोप देऊ काय सांगू के आता आयुक्त काम करतील किती दिवस झाले तुम्ही बोला किंवा नाही बोला नाही बोला आम्ही सांगतो आयुक्त बोलतात काम नाही होणार माझी तबीयत चांगली नाही तरी सुध्दा मी बोलत आहे साहेब मेहरबानी करून आपण राजीव गांधी नगरच काय केल मला सांगा आज सेलवन साहेब येवुन गेले खाली चॉकलेट देऊन गेले की आयुक्त साहेब आम्हाला फंड देत नाही. कॅटबरी देवुन जातात. हे सेलवन साहेब यांनी ते सर्व साहेबांचे बिट्टु आहेत.सर्व जन बोलता कि आयुक्त साहेब बोलतात फंड नाही आमच्याकडे

**महापौर तथा पीठासीन अधिकारीः—**बागुल जी तुम्ही जरा हे ऐका

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठाः—**मा. महापौर महोदय, उपहापौर महोदय, आयुक्त साहेब आणि उपायुक्त साहेब व सन्मानिय सदस्य राजीव गांधी नगर परिसरामध्ये आयुक्त साहेबांनी पाहणी करून पाणी पुरवठा साठी पाठवल होत. आम्ही प्रत्येक सब डिव्हीजनचा प्रत्येक इंनजिनियर प्रत्येक गल्ली मध्ये तुमच्या सोबत फिरून सर्व बघितला त्याच्यात तुमच्या गल्ली मध्ये पुर्ण परिसर जे.एन.यु.आर. मध्ये कवरप मध्ये येत नसल्याने त्यामुळे आपल्या म्हणन्याप्रमाणे प्रत्येक ठिकाणी लाईन टाकणे शक्य होत नाही. म्हणुन आयुक्त साहेबांनी सांगितल की मेन लाईन टाकुन त्याठिकाणी मग प्रत्येकाला कनेक्शन घेण्यासाठी प्रस्ताव बनविण्यास सांगितला त्यानंतर आम्ही प्रस्ताव बनवुन सादरीकरण केले आहे. मंजुर झाल्या बरोबर काम सुरू करण्यात येणार आहे. टेंडर काढुन.........

**सदस्य श्री. रविंद्र बागुलः—**किती दिवस लागणार आहेत आजुन सेलवन साहेब किती दिवस लागतील किंवा किती वर्ष लागतील हे सांगा

**सदस्य श्री. राजेश वदारियाः—**आपण एक कालावधी सांगा प्रस्ताव ठेवुन इस्टीमेंट बनवण्याकरीता किती कालावधी लागेल ते सांगा साधारण या कामाकरीता किती वेळ हवाय ते सांगावे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुलः—**आयुक्त बोलतात त्यांच्यावर आणि सेलवन बोलतात आयुक्तांवर समतानी साहेब कुठे आहे. समतानी साहेबांन सोबत टिकतच नाही.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठाः—**सांगितल्या प्रमाणे प्रस्ताव बनवुन तयार केलेला आहे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुलः—**प्रस्ताव केलाय ते फक्त चॉकलेट आहे. सेलवन साहेब हे चॉकलेट आहे कॅटबरी चॉकलेट आहे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः—**किती लाखाचा प्रस्ताव आहे.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—**एकूण १२ लाखाचा प्रस्ताव आहे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—**१२ लाखाचा प्रस्ताव आहे अर्जंट आहे गेल्या ६ महिन्यापासुन ते बोलत आहेत त्याला अर्जंट करावयाच असल्यास किती दिवसांचा कालावधी लागेल.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—**साधारण ३ महिन्याचा कालावधीत पुर्ण करतो.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—**सुरू कधी करणार.. काम कधी चालु करणार ते सांगा

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—**१५ दिवसांत काम सुरू करणार का? प्रोसेस करून

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—**निविदा प्रक्रिये साठी २० दिवस लागतील.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**ठिक आहे १ महिना दिला १ महिन्याच्या आत काम सुरू करण्यात आले पाहिजे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—** किती लाखाचे असे प्राकलन आहे. आयुक्त साहेब ५ (२) (२) वर दया करून कशाला एवढे दिवस लावत आहेत. माझी तबियत ठिक नाही साहेब तरी सुध्दा मी तुम्हाला बोलतो आहे साहेब मला पब्लिक बोलतेय..

**उप—महापौर:—**रविजीचा प्रॉब्लेम चा निस्तारा होवु दया अगोदर.. मा. महापौर च्या आदेशान्वये जो काही रविजींचा प्रॉब्लेम आहे महापौर साहेबांचा सेलवन यांना असा आदेश आहे की १ महिन्याच्या आत रविजी यांच्या समस्याचा निस्तरा करावे. हा महापौर साहेबांचा आदेश आहे सेवलन जी लिहुन घ्यावे. त्याकरीता शॉट नोटीस काढण्याची आवश्यकता असेल तर काढुन घेण्यात यावी.

**सदस्य श्री.रविंद्र बागुल:—**उपमहापौर जी तरी पण नाही झाल तर काय करायच

**उप—महापौर:—**त्याकरीता सभागृह सक्षम आहे. याच्याकडे भरपुर क्षमता आहे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—**पॉवर मी साहेब मी भरपुर क्षमता बघितली आहे माझे केस सुध्दा पांढरे झाले आहे.
**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**रवि जी आपण बसुन घ्या तुमची समस्या सोडविण्यात येईल आता.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:—**मा. महापौर साहेबा उपमहापौर जी मा. आयुक्त साहेब गेल्या कित्येक वर्षा पासुन आपण कब्रिस्तानचा उल्हासनगर महानगरपालिकेत नेहमीच हा प्रश्न प्रलंबित ठेवतो आणि त्यासाठी अनेक आंदोलन ही झाले मोर्चे आले तरी देखिल हा प्रश्न प्रलंबितच आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**विषय चालु आहे डंपिग ग्राऊंडचा तर त्याच्यावर बोलले पाहिजे. आपण वेगवेगळया विषयावर बोलत राहिलो तर ही सभा ७ दिवस अजुन चालु ठेवावी लागेल

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**असे आहे की, महापौर जी जेव्हा बोलल्या आहेत तेव्हा आपले सदस्य बोलले तेव्हा आपण काहीच नाही बोलले त्यांचा पण मुद्दा ठेवु दया.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—**विषय वाढलेला आहे त्याच्यावर बोलण्यात यावे.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:—**मा. महापौर साहेबा या महासभेने भुखंड क्रमांक २४४ त्यांना देणे बाबत सर्व संमतीने ठराव केला होता आपण तसेच भुखंड क्रमांक २४३ याच्या आरक्षणा वरून हा भुखंड देखिल कब्रिस्तानासाठी देण्यात यावा यासाठी देखील ठराव केला. परंतू त्या पूर्वी जो भुखंड क्र. ३५८ होता सदर ठिकाणी २ मृतदेहाचे दफन देखिल करण्यात आले होते. पण हा भुखंड महानगरपालिकेच्या ताब्यात असुन त्यास संरक्षण बांधलेली असतांना सुध्दा फक्त विशिष्ट भुमाफी यांच्यासाठी शासनाच्या अधिका—यांनी विकास आराखडयात सदर कब्रिस्तानाच्या जागी रहिवाशी क्षेत्राचे आरक्षण टाकले गेले. महापालिकेच्या निष्क्रीयेमुळे किंवा चुकीच्या धोरणामुळे भुखंड क्रमांक २४४ न्यायालयीन प्रक्रियेत निकाली न लागल्यामुळे महानगरपालिकेला फटकारून तातडीने कोणती जागा देण्यात येईल अशी विचारणा केली होती तेव्हा महानगरपालिकेने एका बाजुस भुखंड क्र. ५० आणि ५१ हे खाली असतांना त्यांचे हमीपत्र न देता भुखंड क्रमांक २४५ देण्याचे प्रमाण पत्र दिले याच वरील विषयामुळे १५० कुटुंबाचा जिवन मरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे व त्यांच्यावर रस्त्यावर रहायच पाळी आली आहे. माझा स्पष्ट आरोप असा आहे की, काही भुमाफी यांना पाठीशी घल्यासाठीच चुकीच्या पद्धतीने खुले भुखंड सोडुन ज्या ठिकाणी सर्व सामान्य गोर गरीब राहतात अशा लोकांना बेघर करण्याचा डाव आपणाद्वारे रचला जात आहे. ऐका बाजुला आपण कल्याण अंबरनाथ रस्त्यात बाधित झालेल्या फक्त २२ व्यापा—यांसाठी उच्च

न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांचे गेल्या ३ वर्षा पासून रस्त्याचे काम रखडले असतांना त्यांचे पुर्नवसन न झाल्याने अस असतांना सुध्दा सिध्दार्थ नगर येथील ३०० कुटुंब राहत असलेल्या जागेवर आपण त्यांच्याकरीता पुर्णवसनाची व्यवस्था न करता त्या ठिकाणी कब्रिस्तानाकरीता जागा उपलब्ध कशी काय करू शकतो आणि प्रतिज्ञा पत्र महानरपालिकाच करते ही केवळ जनतेची दिशाभुल आहे यामुळे समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणुन ३०० कुटुंबांचा प्रश्न असल्याने व मुस्लीम समाजाचा तातडीने कब्रिस्ताने देण्याचा प्रश्न असल्याने आपण त्या दिवशी पाहणी केली कोणी तरी यावर तातडीने निर्णय घ्यावा. हि विंनती आहे. धन्यवाद आणि आज १५० घरापैकी काही लोकांनी उच्च न्यायालयात गेले होते त्यांना स्टे सुध्दा मिळालेला आहे त्यामुळे याचा हा प्रश्न आपण तातडीने निकाली लावावा अस मला वाटत धन्यवाद!

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**मा. महापौर जी हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**मा. महापौर जी जो डंपिगचा विषय आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**तेच बोलत आहे एक विषय सोडुन दुसरा विषय चालला आहे राजेश जी मला वाटत की आपल्याला हा विषय आणायचा नाही का? आपल्याला कब्रिस्तान देवु देयचे नाही का? याचा अर्थ साफ आहे.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>**सुर्वे जी हा विषय वाढलेला आहे. नंतर त्याला बघुया तो पर्यत विषय पलटा

**<u>सदस्य श्री. सुनिल सुवे:— </u>**निवेदन दिले, मनोज भाई उभे होते. म्हणजे तुम्हाला असे वाटतच नाही की, कब्रस्थान चे काम व्हावे. सर्वात महत्वाचा विषय काय आहे, तिकडच्या ३०० घरांना खाली करण्याची नोटीस दिली आहे.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>**सुर्वे जी आपण चुकीचे आरोप करीत आहात. आमचा म्हणण्याचा विषय वेगळा आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**आधी आयुक्त साहेबांचे निवेदन होऊ दया, मग यावर बोला.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>**आपण असे नका वक्तृत्व करु. हे एक चांगले काम आहे

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**हो, पण ४ विषय सोडून हा विषय घेण्याची गरज काय आहे?

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>**४ विषयाच्या नंतर कब्रस्थान च्या विषयावर बोलण्यात यावे

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**हो, पण आता ५ वाजले आहेत आणि त्यात तुम्ही आणखी दुसरे विषय काढता, आयुक्त साहेबांनी आश्वासन दिल्यावर पुढचे निर्णय घेता येईल. महापौर जी आपण विचार करा नाहीतर कोणतीही कामे होणार नाही, आणि त्या कामासाठी नगररचनाकार आहेत ना? साहेब डंपिंग ग्राऊंड चा विषय कुठेही जाणार नाही, कोणार्क कंपनी कडून काहीही होत नाही, काही विषय आम्हाला बोलायला लावू नका, व्यापारी बनून राहु नका, माणुस बनून रहा, मला बोलायला लावू नका. आज ३०० घरांना उठविण्याचा विषय होतोय

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**बोलता आम्हाला पण येतो, तुम्हा तुमच्या जागा पाहून मी बोला

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**मी महापौर महोदयांना सांगतो आणि माझ्या विषयावरच बोलतोय

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**मा. महापौर जी डंपिंग ग्राऊंड या शहरचा गेल्या अनेक वर्षापासूनचा ज्वलंत विषय आहे

यावेळी काही सदस्य आपापसात बोलत होते.

**<u>सदस्य श्री. सुनिल सर्वे:—</u>**मा. महापौर जी, मा. उपमहापौर जी, जर हा विषय आपल्याकडून सुटत नसेल तर आम्हाला सांगा, आम्ही प्रश्न सोडवतो. डंपिंग ग्राऊंड व कब्रस्थानाचा विषय ज्वलंत आहे. मा. महापौर जी आयुक्त साहेब आलेले आहेत सर्व सदस्यांना नम्रतेची विनंती करतो, मी कब्रस्थानाचा मुद्दा आपल्या समोर मांडला, मला फक्त ऐवढेच बोलायचे आहे. जे जिवंत लोक आहेत आणि आपण त्यांच्या घरासाठी २५०—३०० नोटीस वाटल्या आहेत, उद्या काय होईल मला भिती काय वाटते तुम्ही जो आता वेळ घालवला आहे, उच्च न्यायालयाने सांगितले आहे की १० आठवडयाच्या आत निर्णय द्या आणि त्या गोष्टीला ३ ते ४ आठवडे झालेले आहेत उद्या हा वेळ घालवून उशीर व्हायला नको म्हणून हा मुद्दा सर्वासमोर...

**<u>सदस्या श्रीम. मीना सोनेजी :—</u>**मा. महापौर महोदया,..........................

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**मा. मीनाजी ताई आणि सर्व सदस्य ऐका, मुद्दा गंभीर आहे. २५०—३००

घरांचा विषय आहे आणि तो माझ्या वार्डातील नाही तर शहरातील विषय आहे. गेले १९९५ ला आम्ही पहिल्यांदा निवडून आलो तेव्हापासूनचा हा कब्रस्थानचा मुद्दा आहे. माझी आपणांस विनंती आहे साहेब की, निर्णयासाठी फक्त १० आठवडयाचा कालावधी आहे. तुम्ही उच्च न्यायालयाला सांगितले की, १० आठवडयात भूखंड रिकामा करतो पण त्या ठिकाणी २५०—३०० घरे आहेत, त्यांना आपण पर्यायी जागा देवू शकतो का हा विषय आहे. आज के.बी. रोडचे काम थांबलेला आहे एम.एम. आर.डी.ए. येथे आपण केलेल्या प्रयत्नामुळे काहीतरी निर्णय होणार आहे. परंतू, त्यांना ज्या जागा आपल्याकडून मिळणार आहेत त्या जागा आपल्याकडे उपलब्ध नाहीत. तुम्ही त्यामध्ये काहीतरी खरा पर्याय काढला पाहिजे की जेणेकरुन जे मोकळे प्लॉट आहेत, जे उल्हासनगर मध्ये प्लॉट आहेत किंवा सरळ सांगावे की प्लॉट नाहीत मग त्यांना उठवायच तर त्या पध्दतीने उठवा, मग सम्राट अशोक नगर आहे, ज्या चार दिशा दिलेल्या आहेत, ५८ नंबर तर गेलाच. मग शेवटचा आठवडा राहीला तर तुम्ही म्हणाल आता पोलीस आणि जे.सी.बी. बोलवा तोडून टाका घर आणि लोकांना बाहेर काढा माझी पूर्ण सभागृहाला विनंती आहे, जिवंत माणसाचा विचार करा. राजकारण सर्व राहू द्या बाजूला, कोणीही श्रेय घेऊ दया. कब्रस्थान मिळणार आहे ते दया त्यांना नाहीतर स्पष्ट करा की, कब्रस्थान मिळणार नाही ते. माझी हिच विनंती आहे की, मा. आयुक्तांच्या निवेदनावर विचार करावा, आणि त्यावर कोणाला काही वाटले तर त्यांनी सभागृहात चर्चा करावी, धन्यवाद.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**सन्माननिय आयुक्त महोदय आणि सन्माननिय सभागृह...

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—**विषय खूप डोक्यावरुन जात आहेत, मा. महापौर आणि सन्माननिय सभागृह आता जो सन्माननिय सदस्य यांनी विषय मांडला आहे त्यांचा संदर्भामध्ये मी निवेदन करावे अशी त्याची फार इच्छा होती म्हणून आता मी निवेदन करतोय. मुळात आपण सर्वांना माहित आहे मी मुस्लिम कब्रस्थानासाठी जागा अद्यापपर्यंत दिलेली नाही. जी जागा आपण देतो त्या जागेत दरवेळी काहीतरी अडचण निर्माण होते. २४४ ची जागा आपण कब्रस्थानासाठी तयार केली, नंतर लक्षात आले की त्या ठिकाणी मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश आहेत. आपण ते उठविण्याचा प्रयत्न करत आहोत. मा. उच्च न्यायालयातही आपण स्थगिती आदेशाच्या विरोधात गेलो पण दोन्ही ठिकाणी अजून केस चालूच आहे, आपल्याला रिलीफ मिळालेला नाही. २४३ चा जो ठराव आपण लागू केला तेथे २४४ ला लागून २४३ चा ठराव झाल्यानंतर आपण नोटीस प्रसिध्द केले. २ सप्टेंबर पर्यंत हरकती मागविण्यात आल्या होत्या त्यांनतर तो कालावधी संपला, आणि आता ज्या हरकती मागविल्या आहेत त्याची सुनावणी आता १० तारखेला ठेवलेली आहे. १० तारखेला सुनावणी होईल आणि त्याचा अहवाल राज्यशासनाला पाठवला जाईल. मधल्या काळामध्ये शासनाने जे आपणाला इतर सर्वे नं. दिलेले होते.

या गोष्टी आम्ही सर्व उच्च न्यायालयाला सांगितल्या. मधल्या काळामध्ये उच्च न्यायालयाने सांगितले की, तुम्हाल जे इतर दोन तीन सर्वे नं. दिलेले आहेत त्याच्यामध्ये ५०, ५१ आपली सद्याची जी स्मशानभुमी आहे, १ नंबर म्हारळ गांवमध्ये ५०, ५१ तिथे एक जॉईंट रिझर्वेशन आहे. १४ हजार स्कवे.मीटरची जागा आहे आणि त्या १४ हजार मध्ये ७ हजार कब्रस्तानकडे व ७ हजार स्मशानभुमीकडे अशा पध्दतीच आरक्षण प्लॅनमध्ये आहे. त्याची मोजणी झालेली नव्हती. एक भुखंड होता तो आयडीया कंपनीचा होता. तो डिस्पुटमध्ये आहे. त्या कंपनीची जमीन सरकार जमा झालेली आहे. त्याची केस चालू आहे. आणि तीसरा जो भुखंड होता तो २४५, याची मोजणी झालेली नव्हती. त्याची मोजणी झालेली नसतांना ८ दिवसांमध्ये आम्हाला त्याचे ॲफिडेव्हीट दाखल करायच होत. याच्यामध्ये त्यातल्या त्यात २४५ हा भुखंड असू शकेल कारण ४४ ला लागून ४५ आहे. त्याठिकाणी छोटासा रस्ता देखील आहे. अप्रोच रोड. बाजुला क्रिश्चन स्मशानभुमी आहे. त्याच्या बाजुला हिन्दू स्मशानभुमी सुध्दा आहे. अशी वस्तुस्थिती पाहिल्यानंतर मेजर जे आहे ते रस्त्याच्या ४४ ला लागून येईल. जो मोकळा भुखंड आहे त्याला लागून येईल. आणि २४५ मधला थोडा भाग इकडे येत असेल तरी तो थोडा भाग राहील. तो आपल्याला सोडून दिला तरी चालू शकेल, असा विचार करून २४५ हे सलग क्षेत्र असल्यामुळे तिथे आम्ही देवू असं आम्ही कोर्टाला ॲफिडेव्हिट करून दिलं. कारण वेळ कमी होता. त्यावेळेला आम्ही त्याची मोजणी करून घेतली. मोजणी केल्यानंतर त्याच क्षेत्र जे आहे ते फार मोठ निघाल. अगदी वालधुनी नदीच्या कोप—यापर्यंत त्याच क्षेत्र होतं. आणि त्या क्षेत्रामध्ये भरपूर प्रमाणात घरं आहेत. सद्या त्याठिकाणी लोक वस्ती करून राहत आहेत. आम्ही त्याच कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट करून दिल्यानंतर कोर्टाचा आदेश झाल्यावर त्याची मोजणी केली. लोकांना आम्ही याबाबत नोटीसा दिलेल्या आहेत. त्या नोटीस विरूध्द अनेक लोकप्रतिनिधींनी मोर्चे घेवून लोकांची निवेदन आमच्याकडे आली. काही लोकांनी कोर्टामध्ये जाण्याची तयारी देखील सुरू केलेली आहे. आणि ही निवेदन आमच्याकडे आल्यानंतर पर्याय काय करता येईल यासाठी आम्ही सर्व गटनेत्यांची एक मिटींग महापौरांकडे आयोजीत केलेली होती. आणि ती मिटींग आयोजीत केल्यानंतर ५०, ५१ मधील जी १ नंबर मधील स्मशानभुमी आहे त्याची देखील आम्ही मधल्या काळामध्ये मोजणी करून घेतली. त्याची मोजणी केली असता १४ हजार क्वेंटिटी क्षेत्र सर्व महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याचे कळले. परंतु त्याचा वापर जो आहे तो सद्या हिन्दू स्मशानभुमी म्हणून होत आहे. त्या क्षेत्राची पाहणी केल्यानंतर असं लक्षात आलं की, तेथे एक बाजू आहे जी अजूनही खुली आहे. बाकी एका बाजुला स्मशानभुमीचा वापर होतो. हॉल बांधलेला आहे. खाली लहान मुलांची स्मशानभुमी आहे. परंतु जी डावी बाजू आहे त्या डाव्या बाजूच ब—यापैकी क्षेत्र मोकळ आहे. त्या क्षेत्राची आम्ही सर्व सदस्याबरोबर जावून त्या दिवशी पाहणी केली. श्री.सुर्वेजी होते श्री.जमनुजी होते, मा.महापौर मॅडम आल्या होत्या. ती पाहणी केल्यानंतर मोकळ क्षेत्र आपल्याला देता येवू शकत का, भल ते थोड ७ हजार पेक्षा कमी जरी असेल तरी, हा पर्याय आपण

तपासून बघत आहोत. मला वाटतं की श्री.सुर्वेजींचा रोख याच्यावरतीच आहे की, जी मोकळी जागा आहे ती आपण दिली पाहिजे. रिझर्वेशनमध्ये क्षेत्र आहे. त्याच्यामुळे आपल्याला त्या दृष्टीकोणातून विचार करणे गरजेच होणार आहे. लोकांची निवेदन आणि सद्या आपल्याकडे प्राप्त परिस्थिती पाहता ती मोकळी जागा जर आपण देवू शकलो तर हा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकतो. म्हणून आपण सर्वांच्या समवेत पाहणी केली होती. अशी वस्तुस्थिती याबाबत आहे. आता पुढच्या काळामध्ये याच्यामध्ये कशा पध्दतीन निर्णय होईल.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे :—</u>** या दोनच साईट सांगितल्या अजून दोन साईट कुठल्या आहेत त्या आपण विचारा.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>**एक सम्राट अशोक नगरची साईट आहे. ती आधीच झोपडपट्टीने सगळी भरलेली आहे. त्यामुळे ते होवू शकत नाही. आयडीया कंपनीची जी साईट आहे ती शासनजमा झालेली आहे. कंपनीचा आणि शासनाचा वाद चालू आहे. तरी आम्ही शासनाला विनंती करतोय की ती पण आम्हाला द्या म्हणून. तर आता यामध्ये आपल्या ताब्यात असलेली जागा आणि मोकळी असलेली जागा ही जर बघीतली तर आजच्या दृष्टीकोनातून ५०, ५१ ची जागा जी आहे ती मोकळी आहे. आपल्या ताब्यामध्येपण आहे. त्याच्यामध्येजर विचार करायचा झाला तर आपण विचार करू शकतो. याबाबतीमध्ये अजूनही आम्ही सर्वांशी चर्चा करत आहोत. श्री. महेश सुकरामनी देखील त्या दिवशी आमच्याबरोबर होते.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे :—</u>** आयुक्त साहेब मी क्षमा मागु इच्छितो.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** एक मिनीट मी माझे बोलणे संपवत आहे. ही वस्तूस्थिती आहे व ती सर्व सभागृहाच्या निदर्शनास या निवेदनाद्वारे मी आणून देतो.

**<u>सदस्य श्री. श्री. सुनिल सुर्वे :—</u>** माझी विनंती एकच असेल की जी २४५ मध्ये राहणारी लोक आहेत त्याच्यापेक्षा या दोन भुखंडात देता आल आणि आयडीआयांचा देता आल तर फारच उत्तम आहे. त्यादृष्टीने खरा प्रयत्न केला तर कोणाचाच विरोध राहणार नाही.

**<u>सदस्य महेश सुखरामानी :—</u>**५०, ५१ मध्ये आधीपासूनच ज्या जागी लहान मुलांचे दफण केले जाते ते आम्ही लहानपणापासून पाहत आहोत. आणि ती जागा आपण त्या संस्थेला ९९ वर्षासाठी भाडेतत्वावर दिली आहे. आणि त्या ठिकाणी दरवर्षी मोठा कार्यक्रम होतो. सिंधी समाजाच्या महिला देखील तेथे येतात. आणि दोन वेळा त्या स्मशानभुमीत धार्मिक कार्यक्रम होतात. हे शक्य नाही याला आमचा विरोध आहे. माझा विरोध आहे.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:—</u>** आपल्याला कोणी माहिती दिली असेल. माझे परिवारात देखील सन २०१४ मध्ये एक लहान मुलाची मयत झाली होती. तो साडेआठ वर्षाचा होता व त्याला तेथेच दफन केले होते. तेथे आधीच सिंधी, हिन्दू, इतर समाजाचे, म्हारळ गांवचे, उल्हासनगरचे अनेक लहान मुलांचे दफन करण्यात आलेले आहे. आपल्याला ज्यांनी माहिती दिली आहे ती चुकीची दिली आहे. हिन्दू रितीरिवाजाप्रमाणे येथे अंत्यविधी करण्यात येतो. तेथे जर आपण मुस्लिम समाजासाठी दफन भूमी दिली तर तेथे दोन समाजामध्ये तेढ निर्माण होवू शकतो. आपले काही वाचविण्याच्या प्रयत्नात येथे हिन्दू मुस्लिमांमध्ये भांडणे लावायची सुरूवात होत आहे. या प्रकरणाकडे आपल्याला अत्यंत बारकाईने व गांभिर्याने पाहिले पाहिजे.

**<u>सदस्य श्री. महेश सुखरामानी:—</u>** मा. आयुक्त साहेब एकाच जागेवर हे शक्य नाही. कायद्यानुसार देखील लागू नाही. येथे आधीच लहान मुलांचे दफन करण्यात आलेले आहे. आपण त्यांना हा भुखंड कसा काय देवू शकतो. तेथे सीडी बनविण्यात आलेली आहे. सर्व सन्मानिय सदस्यांस मी ती गोष्ट निदर्शनास आणली आहे. आमचा विरोध आहे.

**<u>सदस्य श्री. शंकर लुंड :—</u>** मा. महापौरजी, मा.आयुक्त साहेब मी श्री. सुखरामनी यांचे सोबत आहे. माझी अजून एक विनंती आहे. आमच्या सुनिलजींना कब्रस्तानचा व आम्हाला डंम्पीग ग्राउन्डचा विषय पाहिजे. मला वाटत डंम्पींग ग्राउन्ड महापालिकेचे स्वत:चे आहे. तर डंम्पींग ग्राउन्ड तेथून हटवून तेथे कब्रस्तानासाठी जागा देण्यात यावी ही माझी सूचना आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**मा. महापौरजी डंम्पींग ग्राउन्डचा जो मुद्दा आहे तो या शहराचा ३०/३५ वर्षापासून एक ज्वलंत मुद्दा आहे. म्हारळ गांवाजवळ जे पूर्वी डंम्पींग ग्राउन्ड होते. सचिव मॅडम पहिल्यांदा विषय वाचून दाखवा.

**<u>महापालिका सचिव:—</u>** मागेच विषय वाचला होता. आणि त्याची चर्चा प्रलंबीत आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** श्री. राजेशजी माझे हेच सांगणे होते की माझे बोलणे झाल्यानंतर आपण बोलावे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>** मला मा. महापौरांनी बोलण्यासाठी आदेश दिले आहेत यामुळे मी बोलत आहे. तर उल्हासनगर—५ मध्ये जे डंम्पींग ग्राउन्ड आपण वापरत आहोत. त्यापूर्वी सन १९९६ मध्ये आपण म्हारळगांव जवळ कचरा डंम्पींग करत होतो. त्यावेळी श्री.शुल साहेब आयुक्त होते. त्यांनी तेथे डंम्पींग चालू केली होती. कोणतीही तांत्रीक पध्दत न वापरता येथे कचरा फेकण्यात येतो. आजच आयुक्त

साहेबांनी स्थायी समितीमध्ये एक विषय मांडला होता की, त्या डंम्पींग ग्राउन्डवर अशा प्रकारे एक योजना करावी की तेथील कच—याची दुर्गंधी इतरत्र पसरणार नाही. हा एक तात्पुरता उपाय आहे. याचा कायमस्वरूपी उपाय शोधावाच लागेल. कोणाही नगरसेवकांना हे आवडणार नाही की त्यांचे प्रभागात अथवा प्रभागाच्या आजुबाजुला डंम्पींग ग्राउन्ड असावे. दोन नंबरला जेंव्हा डंम्पींग ग्राउन्ड होते तेंव्हा तेथील आजुबाजुचे सर्व नगरसेवक हा मुद्दा सतत सभेमध्ये मांडत असत की आमच्या प्रभागात डंम्पींग ग्राउन्ड आहे. ऑक्टोंबर महिन्यात व एप्रिल, मे मध्ये कधी गर्मी वाढते तेंव्हा डंम्पींग ग्राउन्डला आग लागते. आणि धुरामुळे जे प्रदुषण होते. त्यामुळे आजुबाजुच्या नागरिकांना फारच त्रास होतो. आम्ही वर्तमानपत्रात देखील वाचले आहे की, नेदरलॅन्डची एक कंपनी येणार आहे. सेम साहेबांनी त्यांच्याबरोबर करार केला आहे की अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर मिळून एक प्रोसेस युनिट लागेल व तेथे हा सर्व कचरा जाईल. त्या आधी आम्ही ऐकले होते की, तलोजा इंडस्ट्रियल एरियाच्या बाजुला आम्हाला एक प्लॉट दिला जात आहे. काही दिवसांपूर्वी श्री. देहरेकर साहेबांकडे बसलो असता त्यांनी सांगीतले की, शिळ रोड वर देखील आम्हाला प्लॉटबाबत एक ऑफर आलेली आहे. तर मी मा.आयुक्त सांहेबांना हे निवेदन करतो की, खरी परिस्थिती काय आहे. आपल्या पुढे होणा—या योजना कोणत्या आहेत. हे डंम्पींग ग्राउन्ड कधी पर्यंत स्थलांतरीत होईल. आणि कोणत्याप्रकारे स्थलांतरीत होईल. याबाबत जरा सांगावे.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—</u>** सन्माननिय महापौर, सन्माननिय सदस्य डंम्पींग ग्राउन्डचा जो विषय आहे. आमच्या शहराचा जो कचरा आहे, शहराचे जे आकारमान आहे त्याच्याशी तुलना केली तर खूप मोठा आहे. जवळजवळ ३५० टन कचरा दर दिवशी आपण जमा करतो. आपण सतत हा मुद्दा उठवित आहोत डंम्पींग ग्राउन्डबाबत, परंतु आम्ही हे विसरलो आहोत की, हा कचरा देखील आमचा आहे. आपण व आपले नागरिकच हा कचरा तयार करत आहोत. त्याबाबत कोणीच काही बोलत नाही. जर आपण हा कचरा कुठे बाहेर जागा घेवून बाहेर फेकू तर तेथे देखील गावचे लोक आहेत. त्यांना देखील तकलीफ होणारच आहे. ते देखील येवू देणार नाहीत. कुठल्याही गावात जा कोणीही डंम्पींग ग्राउन्डसाठी परवानगी देत नाही. तर आम्ही फक्त कचरा करणार व कचरा फेकण्याची जबाबदारी तुमची आहे तुम्ही पाहून घ्या असे म्हणणार, परंतु असे चालणार नाही. यापुढे आपल्याला याबाबत फारच बारकाईने विचार करावा लागेल की, आपल्या शहरातील कचरा कमी कसा केला जाईल. कच—यावर प्रक्रिया करून तो वेगळा कसा जाईल. या विषयी आम्हाला सर्वांना विचार करावा लागेल. आपल्या सर्वांना मिळून हे काम करावे लागेल. आणि जो काही कचरा आपण निर्माण करतो तो वेगळा करून त्याचे खत बनवून तो वापरात आणण्याची जोपर्यंत आपण सवय अंगिकारत नाही, तोपर्यंत कच—याची समस्या सुटणार नाही. कचरा समस्येवर उपाय योजना करण्याचे आपण बोललात. उपाय योजना दोन/तीन आहेत. त्यामध्ये नेदरलॅन्डची एक कंपनी आहे त्यांनी शासनास एक ऑफर दिली होती की, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर हा जो परिसर आहे. तेथील एम.एम.आर.डी.ए. च्या जमीनीवर एक प्लॅन्ट बनविला जाईल. त्याचे एम.ए.यु. तयार झाले आहे. परंतु हा प्लॅन्ट पूर्ण होण्यास किती वेळ लागेल हे सांगता येणार नाही. कमीत कमी दोन वर्ष तरी लागतील. आता एम.ए.यु. बनला आहे. प्लॅन्ट येवून काम चालू होणेस एक दिड वर्ष लागेल. यामुळे आपल्याकडे हा एक दिर्घ मुदतीचा पर्याय आहे. दुसरा एक पर्याय असा आहे की, ठाणे महानगरपालिकेने डायघरमध्ये 'वेस्ट टू एनर्जी' जो प्लॅन बनविला आहे,तेथे आम्हाला येथील कचरा पाठविता येईल की नाही, त्यांना देखील कच—याची आवश्यकता होती. त्यांनी याबाबत तयारी दर्शविल्यास कचरा जमा करणेचे जे काही शुल्क असेल ते आम्ही भरण्यास तयार आहोत. त्यांचा प्रस्ताव देखील आम्ही मागितला आहे. परंतु त्यांनी देखील अद्यापपर्यंत प्रस्ताव दिलेला नाही. परंतु आम्ही केलेल्या चर्चेअंती त्यांचे असे म्हणणे आहे की, डिसेंबर २०१८ पर्यंत त्यांचा प्लान जो आहे तो तयार होईल. डिसेंबर २०१८ पर्यंत ते वेस्ट टू एनर्जी करू शकले नाहीत तर आर.एफ.डी. करण्याची त्यांची योजना आहे. जो काही कचरा येईल त्याचे ते ब्रिकेट्स बनवून ठेवतील व दोन तीन महिन्यात त्यांचा प्लॅन्ट चालू झाल्यास ते ब्रिकेटस वापरणे चालू करतील. म्हणजेच आता कोणत्याही परिस्थितीत डिसेंबर २०१८ पर्यंत हा कचरा बाहेर जाणेची कोणतीच शक्यता नाही. तर डिसेंबर २०१८ पर्यंत हा कचरा बाहेर जावू शकत नाही. आणि आमच्याकडे त्याची कोणतीही पर्यायी व्यवस्था नाही. तर जोपर्यंत आपण कचरा विलगीकरण करून आपल्या प्रभागातील जमा होणारा कचरा प्रत्येक प्रभागत विलगीकरण करून त्याचे खतामध्ये रूपांतर करणे चालू करू तर ही समस्या ५०/६० टक्के कमी होईल. कारण एकदा कचरा विलगीकरण झाले तर जो काही उपयुक्त कचरा आहे तो लोक भंगारात घेवून विकतील आणि जो काही खत निर्मितीयोग्य अंश आहे त्याचे खत बनेल व ते खत आपण शेतीसाठी व इतर उपयोगात आणू शकतो. त्यासाठी आपल्याला एक मोहिम घेणे जरूरी आहे. आता स्वच्छ सर्वेक्षणाचे काम यावर्षी देखील चालू होत आहे. तीन तारखेपासून हे काम चालू झालेले आहे. पहिल्या हप्त्यात हाऊसकिपींगची कामे आहेत. जसे की गुगल मॅपवर शौचालय दाखवणे याप्रकारची हाऊसकिपींगची कामे आपण करत आहोत. परंतु आता आपल्याला प्रत्येक प्रभागात जावे लागेल व तेथे कचरा विलगीकरण, खतनिर्मीती मोठया प्रमाणात आपल्याला करावी लागेल. तोपर्यत डंम्पींग ग्राउन्डची जी दुर्गंधी येत आहे त्याबाबत काय केले जावू शकते याबाबत देशील विचार केला. आमच्या ज्या नगरसेविका आहेत श्रीमती सोंडे मॅडम त्यांनी आम्हाला प्रस्ताव दिलेला असून, त्या प्रस्तावान्वये बायोचिप्स टाकून फवारणी केली तर त्या फवारणीमुळे दुर्गंधी कमी होते. तेथे तयार होणारे माशा व इतर किटक हे देखील जवळजवळ सर्व कमी होतात. अशाप्रकारचा उपक्रम औरंगाबादमध्ये व इगतपुरीमध्ये झालेला असून त्याचा चांगला परिणाम दिसून येतो. त्या एजंन्सीला आम्ही येथे बोलाविले होते. एजंन्सीसोबत चर्चा देखील झाली. आजच आम्ही स्थायी समितीमध्ये हा प्रस्ताव ठेवला होता. स्थायी समितीत देखील मला मान्यता दिली आहे. उद्या आम्ही त्यांना कार्यादेश देवून काम सुरू करू. त्यांचे असे सांगणे आहे की, १० दिवसांत ते डंम्पींग ग्राउन्डची सर्व दुर्गंधी दूर करतील. ८/१० दिवसांत हे काम होईल व १० दिवसानंतर यामध्ये खूप

सुधारणा होईल अशी अपेक्षा आहे. आता सद्या तेथील रहिवाशांना जो मच्छर, माशा, दुर्गंधी यांचा त्रास होत आहे तो नष्ट होईल. अशी आम्हाला आशा आहे पाहू या आता पुढे काय होते ते. उद्यापासून काम चालू होईल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** मा.महापौरजी, आयुक्त साहेब डंम्पींग स्टेशन २०१८ पर्यंत येथेच राहील ते हटविण्यात येणार नाही असे आपण आता सांगितले. त्याबरोबरच आपण सांगितले की, प्रभाग निहाय कचरा विलगीकरण आपल्याला करावे लागेल. असे करण्यासाठी महापालिकेचे प्रशासन देखील त्यासाठी जबाबदार आहे. जवळजळ दोन वर्ष झाली यापुर्वीचे जे आयुक्त होते त्यांनी हे काम हाती घेतले होते. दोन वर्षापासून आम्ही ओरडून ओरडून थकलो, परंतु आमच्या प्रभागात आतापर्यंत कचरा विलगीकरणासाठी प्लॅन्ट तयार करण्यात आलेला नाहीत्याचे कारण काय? आपण सांगीतले की प्रभाग निहाय कचरा विलगीकरण करावे लागेल. याची जबाबदारी देखील महापालिका प्रशासनाची आहे. त्यांनी ते काम लवकर केले पाहिजे. ते का होत नाही. त्याची निविदा काढणेसाठी चार—चार महिने एक एक वर्ष निविदा काढणेसाठी जात असेल तर ही चुकीची गोष्ट आहे. यासाठी तीन तीन वेळा निविदा काढावी लागत असेल तर हा कुठला न्याय आहे. लवकरात लवकर कच—याचे विलगीकरण कसे करता येईल. मी एक छोटेसे उदाहरण देतो की, मध्य प्रदेशातील एक ग्रामपंचायत असून त्याचे सरपंच श्री. जैन याचा व्हिडीओ व्हाट्सअपवर व्हायरल झालेला आहे. त्यांनी तेथे कचरा विलगीकरण करून खतनिर्मीती कशा पध्दतीने केली आहे याबाबतचा व्हिडीओ आपण पहा. जर ग्रामपंचायत करू शकते तर महापालिका का करू शकत नाही?

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** मा.महापौरजी, मा.आयुक्त साहेब आता जे आपण डंम्पींग ग्राउन्डबाबत सांगीतले की ते डिसेंबर पर्यंत पूर्ण होवू शकत नाही. त्यादिवशी आमचे सन्माननीय सदस्य श्री. सतरामजी जेसवानी प्रभारात मंदिर येथे आंदोलनासाठी बसले होते. तेथे आपचे श्री. संतोष देहरेकर साहेब व श्री. केणीजी गेले होते. त्यांनी आश्वासन दिले की सप्टेंबर, ऑक्टोंबर पर्यंत तेथील डंम्पींग ग्राउन्ड बंद करण्यात येईल. त्यांनंतर आपण मला सांगीतले की दोन/तीन महिने इकडे—तीकडे होईल पण ते होईल. आता आपण सांगीतले की, डिसेंबर पर्यंत ते होवू शकत नाही. ५ नंबरमध्ये हे डंम्पींग ग्राउन्ड चालू आहे. आपण सांगीतले की, सर्व जन तक्रार करतात पण पर्याय कोणी सांगत नाही. मी आपल्याला हे सांगू इच्छितो की, महाराष्ट्र शासनाचा व उच्च न्यायालयाचा आदेश आहे की, २०१३ नंतर कोणतेही नवीन डंम्पींग ग्राउन्ड कुठेच बनविण्यात येणार नाही. या डंम्पींग ग्राउन्डला दिड वर्ष झाली. हे अनधिकृत डंम्पींग ग्राउन्ड आहे. महाराष्ट्र शासनाचा व उच्च न्यायालयाचा जो आदेश आहे हे त्याच्या विरूध्द आहे. कुठे २० वर्षापासून डंम्पींग ग्राउन्ड चालू होते. कुठे ३० वर्षापासून डंम्पींग ग्राउन्ड चालू होते. तो वेगळा विषय आहे. परंतु हे डंम्पींग ग्राउन्ड महाराष्ट्र शासन व उच्च न्यायालयाच्या विरूध्द चालू आहे. जर कोणीही नागरीक अथवा एन.जी.ओ. न्यायालयात गेले व सांगीतले की याला दिड वर्ष झालेत चालू होवून व याला ना महासभेची मान्यता आहे ना महाराष्ट्र शासनाची मान्यता आहे. कोणतीही मान्यता नसतांना फक्त श्री. निंबाळकर साहेबांच्या तोंडी सांगण्यावरून ते चालू करण्यात आले असे आपण उत्तर देता. तर हे अनधिकृत डंम्पींग ग्राउन्ड आहे ते आपण लक्षात असूद्या. आणि दुसरे आपण मला सांगीतले की, प्रत्येक प्रभागात स्वतः कचरा विलगीकरणासाठी दोन/दोन लाख रुपये नगरसेवकांना दिले जातात व ते ५ (२) (२) मध्ये दिले तरी आपण ते देणार. आणि आता सफाई अभियान देखील चालू झाले आहे. जसे आमचे सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांनी सांगीतले की, निविदा काढणेसाठी एक/एक दोन/दोन वर्ष न लागावीत. कचरा विलगीकरणासाठी प्रत्येक प्रभागतील नगरसेवकांना आपण सांगीतल्याप्रमाणे दोन/दोन लाख रुपये देण्यात यावेत. आज आमचे बंधू श्री. जमनू पुरस्वानीजी यांनी १०० युरीनल मंजुर केले होते. ते देखील सफाई अभियानात येते. त्यांनी आपला निधी यासाठी दिला आहे.जेणेकरून कोणत्याही नागरिकाची युरीनल अभावी गैरसोय होणार नाही. प्रत्येक प्रभागात एक जागा युरीनलसाठी सर्व नगरसेवकांना मिळावी. त्या युरीनलची संचिका देखील आपल्याकडे प्रलंबीत आहे. श्री. निंबाळकर साहेबांनी स्वच्छता अभियानात जे शौचालय मंजुर केले त्यांची देखील निविदा काढलेली नाही. त्यांनी सांगीतले होते की, कोणी उघडयावर शौच करू नये म्हणून ज्या नगरसेवकांनी जेथे शौचालयाची मागणी केली ती त्यांनी मंजूर केली आहे. परंतु ते काम देखील अद्याप झालेले नाही. हे डंम्पींग ग्राउन्ड अनधिकृत आहे ते बंद करावे लागेल. कचरा विलगीकरण प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागात दोन जागी व्हावे. आणि आपण जे आता कार्यादेश दिले आहेत डंम्पींग ग्राउन्डवर फवारणी करण्याचे ज्यामुळे दुर्गंधी होणार नाही,किटक होणार नाही,त्याचबरोबर धुर देखील होणार नाही याची खबरदारी घ्यावी. येथे नेहमी डंम्पींग ग्राउन्डला अचानक आपोआप आग लागून संपूर्ण ५ नंबरमध्ये धूर पसरतो. आपण ५ नंबरमध्ये एक वेळा आवश्य या. तुम्ही येथे आले हाते त्यावेळी येथील दुर्गंधीमुळे एक मिनिट देखील तुम्ही राहू शकला नाहीत. आम्ही ५ नंबरवाले २४ तास सतत येथे राहतो तर आमची काय हालत असेल. तरी मेहबानी करून हे प्रकरण गांभिर्याने घ्यावे. धन्यवाद !

**सदस्या श्रीमती मीना सोनेजीः—** मा.महापौरजी, मा.आयुक्त साहेब आम्ही जो बायोसेनिटायझर वापरत आहोत. डॉ. बवालकर आय.आय.टी. चे प्रोफेसर त्यांनी चे संशोधन केले आहे त्यामध्ये बायोसेनिटायझरची जी चिप आहे. ती पाण्यात मिळाल्यानंतर जेथेजेथे ही पसरते तेथे नायट्रोजनची मात्रा कमी होते व ऑक्सिजनची मात्रा वाढते. आपल्या सर्वांना माहिती असेल की दुर्गंधी व आग लागणे असे प्रकार जेथे नायट्रोजन व मिथिन गॅस निर्माण होतात तेथे घडत असतात. यामुळे येथे ऑक्सिज तयार होणे आवश्यक आहे. जेथे नायट्रोजन तयार होतो तेथे कृमी, किटक तयार होतात. तर आम्ही जो हा बायोसेनिटायझरची फवारणी करणेचा प्रकल्प बनवत आहोत तेथे १५ दिवसानंतर नगरसेवकांनी पाहणी करून आम्हाला कमेंट

द्यावी. दुसरी गोष्ट मी आपणांस सागते, ज्याप्रमाणे आपण वेंगुर्ला व इतर शहराची आपल्या शहराशी तुलना करतो. आपले शहर आशिया खंडात प्रसिध्द आहे. आमचा जो कचरा आहे तो आम्ही इतरांशी तुलना करू शकत नाही. वेंगुर्ला गावात १५ हजार लोक आहेत. येथे एका प्रभागात १५ हजार लोक आहेत. जसे श्री. चौधरी साहेबांनी सांगीतले की, प्रत्येक प्रभागात एक प्लिथ असणे आवश्यक आहे. मी आपणांस एक सूचना अजून देवू इच्छिते की, शहरातील मिलिटरी टॉयलेट्स आहेत तेथे हे प्लिथ बनविल्यास त्याचा लवकर परिणाम दिसून येईल. त्यामुळे या शौचालयांवर अतिक्रमण देखील होणार नाही. आणि तीसरा उपाय असा की,उच्च न्यायालयाने तीन दिवसांपूर्वी खूप महत्वाचा आदेश दिलेला आहे की, जोपर्यंत आपण कचरा विलगीकरण करत नाही, जोपर्यंत आपण डंम्पींग ग्राउन्डची समस्या निकालात काढत नाही, तोपर्यंतकोणतेही नविन बांधकाम शहरामध्ये करता येणार नाही. तर हे जरूरी आहे की, जेथे कचरा निर्माण होतो तेथेच तो नष्ट करावा. मी आपणांस विनंती करते की, बचत गटाच्या महिला आहेत त्यांचेबरोबर कॅम्प तयार करून एक/एक इमारतीमध्ये, सोसायटीमध्ये जावून याचा प्रसार करण्यात यावा. शहरामध्ये सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट व रेन वॉटर हार्वेस्टिंग यांसारखे जे पर्यावरण संरक्षकबाबी आहेत त्याबाबत मी आपणांस नेहमीच सहकार्य करील. धन्यवाद !

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u>** माझी एक सूचना आहे. प्रत्येक प्रभागात कचरा विलगीकरण प्रक्रिया झाली पाहिजे. प्रत्येक प्रभागातील कचरा हा प्रभागातच नष्ट होवून त्याचे खतात रूपांतर झाले पाहिजे. माझी दुसरी सूचना अशी आहे की, मागच्या स्वच्छ भारत अभियानात उल्हासनगरमध्ये २ व ३ वार्ड एक श्री. राजेंद्र चौधरींचा व एक माझा पॅनल होता. त्यांचा एक नंबर माझा दोन नंबर व तीन नंबर या तीन पॅनलला प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळालेला आहे. त्यांना ८० लाख, ५० लाख व ३० लाख असं बक्षिस दिलेल आहे. मला वाटत माझ्या प्रभागामध्ये जागा उपलब्ध आहे आणि जिथे हा पैसा जर त्या कचरा विलगीकरण प्रक्रियेसाठी वापरला तर माझ्या प्रभागामधील पूर्ण कचरा तिथल्या तिथे नष्ट करता येईल.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—</u>** मा.महापौरजी, मा.उपमहापौरजी, मा.आयुक्त साहेब,सर्व प्रथम महासभेत बसलेल्या सर्व नगरसेवकांना मी धन्यवाद देतो. डंम्पींग ग्राउन्ड अशी गोष्ट आहे की, जी सर्व जण समजू शकतात. सर्वाचे नातेवाईक, मित्र या शहरात राहतात. शहरातील लोकांची एक दुस—यांशी चर्चा होत असते. एक दुस—यांच्या तक्रारी, अडचणी सांगण्यात येतात. मी मा.आयुक्त साहेबांना धन्यवाद देतो की, आयुक्त साहेब आताच आलेले आहेत व त्यांना ही गोष्ट बरोबर समजली. दोन वर्षापासून आम्ही हे सहन करत आहोत. आमच्या श्रीमती मिनाताईंनी हे सांगीतले की, औरंगाबादमध्ये कशा प्रकारे डंम्पींग ग्राउन्डच्या समस्येने जनआंदोलन झाले होते. बसेस जाळण्यात आल्या होत्या. डंम्पींग ग्राउन्ड ही फार मोठी समस्या आहे. दोन वर्ष ही समस्या सहन करणे म्हणजे साधी गोष्ट नाही. ठीक आहे जोपर्यंत आपल्याला आजुबाजुला जी जमीन मिळेल तोपर्यंत आम्ही थोडे सहन करू, काही महिने आम्ही अजून सहन करू. परंतु तेथे जी जनावरे येत आहेत ती जनावरे रोखण्यात यावीत. तसेच लोकांना काही त्रास होणार नाही त्यासाठी अजून प्रयत्न करावा. परंतु सतत ५ नंबरमध्ये असा त्रास होईल हे आम्ही सहन करणार नाही. जसे मागील महासभेत सर्व लोक खाली बसले होते. याबाबत तीव्र नाराजी असून ती नाराजगी कायम ठेवावी. आम्ही नागरिकांचा हा त्रास विसरू शकत नाही. श्रीमती मीनाताईने देखील सांगीतले की, उच्च न्यायालयाने आदेश दिला आहे की, कच—याची समस्या समाप्त होत नाही तोपर्यंत नविन इमारतींना परवानगी देण्यात येवू नये. कच—याची समस्या निवारण्यात हलगर्जीपणा केल्याबद्दल काही राज्यांना दंड आकारण्यात आला आहे. आपल्या महापालिकेला देखील १०० करोड रुपयांचा दंड आकारण्यात आला होता. त्यासाठी आपल्याला शासनास कितीवेळा हात जोडावे लागलेअसतील, किती वेळा न्यायालयात जावे लागले असेल. कृपया हा विषय खूप मोठा आहे. लोकांच्या आरोग्याचा विषय आहे. मी मा. आयुक्तांना हात जोडून विनंती करतो की, त्यांनी या शहराचा विचार करावा. मा. महापौर, आयुक्त कृपया नागरिकांच्या आरोग्याशी खेळू नका. त्यांच्यासाठी आपण काय करू शकतो याचा लवकरात—लवकर निर्णय घ्यावा. अन्यथा येथील लोक कोणाला माफ करणार नाहीत. तसेच हे अवैध डंम्पींग ग्राउन्ड आहे, जसे श्री. किशोरजींनी सांगीतले. शासनाचा व न्यायालयाचा आदेश आहे. जर शासन व न्यायालयाचा अवमान होत असेल तर कोणीही न्यायालयात जाईल याचा देखील विचार करावा. धन्यवाद !

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>** मा.महापौरजी, मा.आयुक्त साहेब कचरा विलगीकरणाबाबत आपण जे सांगीतले ते काम आज उल्हासनगर शहरात शुन्य आहे. माझी अशी सूचना आहे की, जो कोणी कचरा निर्माण करतात, ज्यांचा कचरा शंभर किलो किंवा त्यापेक्षा जास्त आहे त्यांना सर्वप्रथम या प्रक्रियेत सामिल करणे आवश्यक आहे. जे लग्नाचे हॉल आहेत, हॉटेल आहेत, रेस्टॉरंट आहेत, मोठया कॉलनी मोठया इमारती आहेत, सोसायटी आहेत, अपार्टमेंट आहेत, ज्यांचा कचरा शंभर किलो निघतो त्यांना कचरा विलगीकरणाचे सांगण्यात यावे. अन्यथा त्यांना सांगण्यात यावे की, आम्ही तुमचा कचरा उचलणार नाही. जर मुंबई महापालिकेचा ३० टक्के कचरा यामुळे कमी होवू शकतो तर आपला देखील होवू शकतो. आज आपण जर ठाणे महापालिकेशी संलग्न झालात किंवा नेदरलॅन्ड कंपनीशी संलग्न झालात तर ते आपल्याकडे टिपीन फी घेतील. टिपीन फी वजनाच्या हिशोबाने असेल. आज जो ४०० टन कचरा आहे. त्या ४०० टन प्रमाणे टिपीन फी लागेल. आतापासून आपण प्रयत्न करू की, आपला कचरा कमी व्हावा तर पुढे जावून त्या पैशाची देखील बचत होईल. आपण खूप चांगल्या प्रकारे जनजागृती केली आहे. सर्वेक्षण २०१८ मध्ये केले व त्यापुर्वीही केले. आता कृती करण्याची वेळ आहे. १०० किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण करणारे जर कचरा विलगीकरण करत नसतील तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी. तेंव्हा आपण आपले ध्येय गाठू शकतो अन्यथा नाही.

**<u>महापालिका सचिव:—</u>** याचा ठरावा द्यावा लागेल. प्रस्तावाची सूचना होती. साधाच ठराव बनविला आहे. तात्पुरत्या स्वरूपात सुरू केलेले डंम्पींग ग्राउन्ड इतरत्र हलविणेबाबत प्रशासनास निर्देश देत आहे.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २१ :—<u>प्रस्तावाची सूचना</u>**

उल्हासनगर—५ येथिल नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याने त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपातील सुरु केलेल्या डंपिंग ग्राउंड इतरत्र हलविणेबाबत येत्या महासभेमध्ये चर्चा होवुन निर्णय होणेबाबतचा पालिका सदस्य श्री. विजय पाटील व श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर—५ येथे तात्पुरता स्वरुपामध्ये खडी मशीन, आकाश कॉलनीमध्ये काही दिवसाकरीता डंपिंग ग्राउंड सुरु केलेम होते परंतु त्या डंपिंग ग्राउंडवर मोठया प्रमाणात मेलेली जनावरे व इतर कचरा जमा होत असल्याने तो परिसर दुर्गंधी युक्त परिसर झाला असून त्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. विशेषत: लहान मुले वयोवृध्द नागरीक यांना आजाराचा सामना करावा लागत आहे. सध्या पावसाळयात याचा मोठा परिणाम होत आहे.

सदर डंपिंग ग्राउंड स्थलांतरीत करण्याबाबत येत्या महासभेत चर्चा होवून निर्णय व्हावा या करीता अशासकिय प्रस्तावाद्वारे सुचना मांडत आहे.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** १२ **<u>दिनांक:— ४/९/२०१८</u>**

सुचकाचे नाव :— श्री. विजय पाटील

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर—५ येथिल नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याने त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपातील सुरु केलेल्या डंपिंग ग्राउंड इतरत्र हलविणेबाबत प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव:—</u>**विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ३:—** श्री. श्याम व्ही शर्मा, लिपिक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

———————————————————————————————————

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** पास, पास, इतिवृत्ताची वाट न पाहता. नियमानुसार देण्यात यावे.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ३ :—** श्री. श्याम व्ही शर्मा, लिपिक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

श्री. श्याम व्ही शर्मा, लिपिक, यांना त्यांच्या पत्नीच्या वैदयकिय उपचारासाठी आशा कॅन्सर हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, ठाणे, येथील खाजगी रुग्णालयात दिनांक ११/८/२०१६ ते दिनांक १५/८/२०१६ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये १,८५,११९/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी १८/१/२०१७ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. परंतु आशा कॅन्सर हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, ठाणे, हे शासन मान्य रुग्णालय नाही. यास उपरोक्त नियमानुसार मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ९० टक्के एवढा खर्च अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणे शिवाय १) ह्रदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक ह्रदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, श्री. श्याम व्ही शर्मा, लिपिक यांच्या पत्नीचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार भाग २ मध्ये ५ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,५५,८६८/— इतका मिळणेकरीता मा. आयुक्त सो। यांच्या मान्यतेने मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणेत येत आहे.

**महासभा ठराव क्र: १३** **दिनांकः— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. श्याम व्ही शर्मा, लिपिक यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,५५,८६८/— इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :—** श्री. अनंत धोंडीबा आपके, पंपचालक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ४:—** श्री. अनंत धोंडीबा आपके, पंपचालक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत

**प्रस्तावना**

श्री. अनंत धोंडीबा आपके, पंपचालक, यांना वैदयकिय उपचारासाठी ज्युपीटर हॉस्पिटल, ठाणे(प.) येथील खाजगी रुग्णालयात दिनांक ०५/१०/२०१७ ते दिनांक २४/१०/२०१७ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये १,९४,९१८/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी २४/०६/२०१६ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुज्ञेय ठरतो. ज्युपीटर हॉस्पिटल, डोंबिवली हे शासन मान्यता नाही. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या अतिदक्षता कक्षच्या खर्चाच्या १०० टक्के औषधी व इतर खर्चाच्या ९० टक्के आणि बाथरूमसह स्वतंत्र कक्षाच्या खर्चाच्या ७५ टक्के असे अनुज्ञेय ठरतात.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) हृदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक हृदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॅस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णालयाकडुन अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, श्री. अनंत धोंडीबा आपके, पंपचालक यांचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार हा अ.क्र १ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,५७,०८८/— रक्कम प्रतिपुर्ती करिता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: १४** **दिनांक:— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. अनंत धोंडीबा आपके, पंपचालक यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,५७,०८८/— इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५ :—**श्री. कुमार एच. जग्यासी, क. अभियंता, यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

———————————————————————————————————————

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५:—** श्री. कुमार एच. जग्यासी, क. अभियंता, यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

श्री. कुमार एच. जग्यासी, क. अभियंता, यांना त्यांच्या आईच्या वैदयकिय उपचारासाठी कौशल्या हॉस्पिटल ठाणे, येथील खाजगी रुग्णालयात दिनांक ३१/१२/२०१७ ते दिनांक १५/१२/२०१८ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये २,७४,३२९/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी २९/१/२०१८ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. परंतु कौशल्या हॉस्पिटल ठाणे, हे शासन मान्य रुग्णालय नाही. यास उपरोक्त नियमानुसार मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ९० टक्के एवढा खर्च अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणे शिवाय १) हृदयविकारावरील उपचार (२) उपमार्गसाचक हृदयशस्त्रक्रिया (३) अॅन्जियोप्लॅस्टी (४) मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, श्री. कुमार एच. जग्यासी, क. अभियंता, यांच्या आईचा आजार आकस्मिक आजारापैकी परिशिष्ट १ अनु. क्र. १ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. २,४३,०५८/— इतका मिळणेकरीता मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. मा. आयुक्त सोा यांच्या मान्यतेने मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणेत येत आहे.

**महासभा ठराव क्र: १५** **दिनांक:— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :—श्री. प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. कुमार एच. जग्यासी, क. अभियंता, यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये २,४३,०५८/— इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

**विषय क्र. ६ :—** श्री. गणेश आत्माराम शिंदे, लिपिक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

———————————————————————————————————————————

**काही सदस्य :—**पास—पास......
**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६:—** श्री. गणेश आत्माराम शिंदे, लिपिक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

श्री. गणेश आत्माराम शिंदे, लिपिक, यांना त्यांच्या आईच्या वैदयकिय उपचारासाठी आयुष हॉस्पिटल कल्याण, येथील खाजगी रुग्णालयात दिनांक २६/८/२०१६ ते दिनांक ८/९/२०१६ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये २,१४,२६८/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी ४/१/२०१७ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. परंतु आयुष हॉस्पिटल कल्याण, हे शासन मान्य रुग्णालय नाही. यास उपरोक्त नियमानुसार मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ९० टक्के एवढा खर्च अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणे शिवाय १) ह्दयविकारावरील उपचार (२) उपमार्गसाचक ह्दयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४) मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, श्री. गणेश आत्माराम शिंदे, लिपिक यांच्या आईचा आजार आकस्मिक आजारापैकी परिश्ष्टि १ अनु. क्र. २ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,८०,८६३/— इतका मिळणेकरीता मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणेत येत आहे.

**महासभा ठराव क्र: १६** **दिनांक:— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. गणेश आत्माराम शिंदे, लिपिक यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,८०,८६३/— इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

➡ **विषय क्र. ७ :—** श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री, यांना वैद्यकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र. ७:—** श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री, यांना वैद्यकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री, विद्युत विभाग यांना त्यांच्या आईच्या वैद्यकीय उपचारासाठी टाटा स्मारक केंद्र हॉस्पीटल, कल्याण येथे दिनांक ३१/१०/१७ ते ३१/३/१८ पर्यंत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रुपये १,९७,०४५/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय परतावा बिल जोडले आहते. त्यानुषंगाने त्यांनी दिनांक १६/४/२०१८ रोजीच्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री, यांच्या आईचा आजार सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. एमएजी—२००५/९/प्र.क्र. १/आरोग्य —३ दिनांक १९ मार्च, २००५ च्या सहपत्रातील परिशिष्ट अ मध्ये गंभीर आजार— भाग २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे गंभीर आजारापैकी अनुक्रमांक ५ वर मोडतो. तसेच, आकस्मिक परिस्थितीत शासकीय रुग्णालयात औषधोपचार केला असे मा. टाटा स्मारक केंद्र, मुंबई यांनी दिनांक १८/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

शासन निर्णयानुसार श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री, यांना एकुण खर्चाच्या १०० टक्के इतकी वैयक्तिक खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय आहे. त्यानुषंगाने त्यांना झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम रुपये १,९७,०४५/— इतकी असून महाराष्ट्र नागरी सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ मधील नियम ५ टिप—२ नुसार १०० टक्के प्रतिपुर्ती देय आहे.

दिनांक १६/३/२०१६ रोजीच्या टिपणीनुसार रुपये १,००,०००/— पर्यंतची वैद्यकीय प्रतिपुर्तीचे प्रस्ताव मा. आयुक्त सो., यांचे स्तरावर व शासन निर्णय क्र. २०१२/प्र.क्र.३३३/११/राकावि—२ दिनांक १६/११/२०११ अन्वये ०१ लाखापर्यंतचे प्रस्ताव मा. महासभेच्या मंजूरीने पाठविणेचे आदेश देण्यात आलेले आहेत.

श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री, यांना शासन निर्णयानुसार रुपये १,९७,०४५/— इतकी वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्तीची रक्कम मा. महासभेच्या माहितीसाठी व मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्रः १७** **दिनांकः— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री, यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,९७,०४५/— इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्रीम. तनुजा दिपक परमार यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

———————————————————————————————————————————

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ८:—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्रीम. तनुजा दिपक परमार यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार श्रीम. कांता ठकरसी परमार, सेवा निवृत्त सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांची सुन श्रीम. तनुजा दिपक परमार, यांनी अर्ज सादर केला आहे. त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण ३ री पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये खालिलप्रमाणे नमुद आहे.

''लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी''.

लाड कमिटीचा मुळ उद्‌देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्रीम. तनुजा दिपक परमार, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने, उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** १८ **दिनांक:— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार पदाच्या नेमणुकीसाठी श्रीम. तनुजा दिपक परमार यांची शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ९ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्रीमती लता भारत निरभवणे यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

———————————————————————————————————————————————

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ९:—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्रीमती लता भारत निरभवणे यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार श्रीम. आवडाबाई केशव कदम, सेवा निवृत्त सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांची विवाहित मुलगी श्रीम. लता भारत निरभवने, यांनी अर्ज सादर केला आहे. त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण ३ री पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये खालिलप्रमाणे नमुद आहे.

''लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी''.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्रीम. लता भारत निरभवने, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने, उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: १९** **दिनांक:— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार पदाच्या नेमणूकीसाठी श्रीमती लता भारत निरभवणे यांची शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १० :—** विदयुत विभागात जमा झालेल्या निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्याकरीता मागविलेल्या निविदेस मंजुरी देणे.

———————————————————————————————————————————

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. १०:—** विदयुत विभागात जमा झालेल्या निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्याकरीता मागविलेल्या निविदेस मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

विद्युत विभागामार्फत निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणे करीता २ लिफाफा पध्दतीने ठेकेदार/मक्तेदार यांचेकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अंदाजीत निरुपयोगी साहित्यांची रक्कम | रु. ८९,५२३/— |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १) दै पुण्यनगरी २) दै. उल्हास विकास<br>३) Daily free press Journal |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १६/०५/२०१८ ते २२/०५/२०१८ पर्यंत |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०६/०६/२०१८ ते १८/०६/२०१८ पर्यंत |
| ५ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ६ |
| ६ | वेळेवर प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

सदर प्रक्रियेमध्ये रजिस्टर/कुरिअरने प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २०/०६/२०१८ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त सो. यांच्या अध्येक्षते खाली मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी , उप—अभियंता ( वि. ) यांच्या उपस्थितीत निविदेचा लिफाफा क्र. १ उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | में. लीयाकत गुलाब पिंजारी (उल्हासनगर), | में. जामा स्टील कार्पोरेशन (कुर्ला), | मे.अबदुल्लाह खान स्क्रॅप ट्रेडर्स . (उल्हासनगर), |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | EMD ( Earnest money deposit ) | होय | होय | होय |

सदर निरुपयोगी साहित्याची विल्हेवाट लावण्याकरिता आलेल्या निविदांची विद्युत अभियांत्रिकी विभागामध्ये उप – अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी छाननी केली असता १) में. लीयाकत गुलाब पिंजारी, उल्हासनगर २) में.जामा स्टील कार्पोरेशन, कुर्ला ३) मे.अबदुल्लाह खान स्क्रॅप ट्रेडर्स , उल्हासनगर यांच्या निविदा अटी शर्तीनुसार पात्र ठरल्याने निविदाकारांचा मा. अतिरिक्त आयुक्त सो. यांचे अध्यक्षतेखाली मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखाअधिकारी, उप– अभियंता विद्युत यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. लिफाफा क्र.२ उघडण्यात आला त्याचा तुलनात्मक तक्ता खलील प्रमाणे आहे.

| COMPERATIVE STATEMENT | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Description of Un-serviceable Articles | Unit | Appx Qty. | Expected cost Per Unit in Rs | M/s. Lyakat Gulab Pinjari Traders. Per Unit in Rs | M/s. Zama Steel Corporation Traders. Per Unit in Rs | M/s. Abdullah khan Scrap Traders. Per Unit in Rs | Amount of Highest Rate Qty. in Rs. |
| 1 | All Types of 40 Watt Tube Lights (Scrap) | Nos | 526 | 5.10 | 5.25 | 5.20 | 5.50 | 2893.00 |
| 2 | All Types of Sodium Bulb of Various Wattages (Scrap) | Nos | 782 | 6.50 | 6.70 | 6.60 | 6.80 | 5317.60 |
| 3 | All Types of Igniters (Scrap) | Nos | 1829 | 4.20 | 4.30 | 4.30 | 4.50 | 8230.50 |
| 4 | All Types Of Copper Chokes (Scrap) | Kgs. | 400 | 65.10 | 67.40 | 68.10 | 69.00 | 27600.00 |
| 5 | All Types Of HG/M.S/ G.I /Matalic /Pole etc. (Scrap) | Kgs. | 300 | 21.00 | 21.50 | 22.00 | 22.50 | 6750.00 |
| 6 | All Types of Kit-Kat Base (Scrap) | Nos | 150 | 35.10 | 36.50 | 36.20 | 37.00 | 5550.00 |
| 7 | All Types of Flou.Tube Fitting/M.V.Fittings/S.V.Fittings. (Scrap) | Nos | 30 | 150.00 | 157.50 | 155.00 | 158.00 | 4740.00 |
| 8 | All Types of PVC arm/unarm cable & wire (Aluminums.) (Scrap) | Kgs. | 200 | 32.10 | 32.50 | 32.50 | 33.10 | 6620.00 |
| 9 | All Types of Telephone Instrument (Scrap) | Nos | 19 | 70.00 | 73.10 | 71.00 | 75.00 | 1425.00 |
| 10 | All Types of Ceiling Fans & Stand fans (Scrap) | Nos | 10 | 140.00 | 145.50 | 145.00 | 147.00 | 1470.00 |
| 11 | All Types of Tube starter / Bell / Holder / Ceiling Rose / MCB etc. (Scrap) | Kgs. | 8 | 90.10 | 92.10 | 95.00 | 97.00 | 776.00 |
| 12 | All Types of A/C Out door Units Split (Scrap) | Nos | 3 | 5080.00 | 5200.00 | 5100.00 | 5300.00 | 15900.00 |
| 13 | All Types of Indoor Unit of Split A/C (Scrap) | Nos | 2 | 1700.00 | 1750.00 | 1800.00 | 1850.00 | 3700.00 |
| 14 | All Types of Window A/C (Scrap) 1.5 Tons | Nos | 1 | 3460.00 | 3550.00 | 3500.00 | 3600.00 | 3600.00 |

सदर दराचा तुलनात्मक तक्ता नुसार मे. अबदुल्लाह खान स्क्रॅप ट्रेडर्स (उल्हासनगर), आयटम क्रं. १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३ व १४ मध्ये सर्वात जास्त व अपेक्षीत दरापेक्षा ही सर्वात जास्त आहे म्हणून आयटम क्रं.१,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३ व १४ हे विल्हेवाट करण्यांची मान्यता मिळावी.

वरील बाबी लक्षात घेता (१) ज्या ॲटम मध्ये ज्याचे दर जास्त आहे ते ॲटम त्यांना उपलब्ध परिमाण व ३१ मार्च २०१९ पर्यत जमा झालेल्या परिमाणाची विल्हेवाट करणेस मान्यता मिळावी. (२) जर सर्वाधिक दराच्या निविदाधारकांनी साहित्यें घेण्यास नकार दिला तर त्याची E.M.D फोरफिट करून दुसऱ्या कुठल्याही एजन्सीला अपेक्षित दरानुसार साहित्याची विल्हेवाट करण्यासाठी आयुक्ताना प्राधिकृत करणे.

**महासभा ठराव क्र:** २० **दिनांक:–** ४/९/२०१८

सुचकाचे नाव :– श्री. प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे विदयुत विभागात जमा झालेल्या निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्याकरीता मागविलेल्या निविदेस मंजुरी देवुन एजन्सीला अपेक्षित दरानुसार साहित्याची विल्हेवाट करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ११ :—** महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ यांची शहाड पाणी पुरवठा योजना उल्हासनगर महापालिकेस हस्तांतरण होणेस व शासनास प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास...... इतिवृत्ताची वाट न पाहता.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ११ :—** महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ यांची शहाड पाणी पुरवठा योजना उल्हासनगर महापालिकेस हस्तांतरण होणेस व शासनास प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महापालिकेची स्वत: जलस्त्रोत घेऊन पाणी पुरवठा करण्याची योजना नसल्यामुळे, सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ शहाड येथुन कॅम्प क्रमांक १, २, ३ व काही ४ नंबर मधील काही भागात तसेच पाले येथुन कॅम्प क्रमांक ४, ५ या भागाकरीता पाणी पुरवठा केला जातो. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळमार्फत मंजुर करण्यात आलेला पाणी पुरवठयाचा कोटा व प्रत्यक्षात शहाड जलशुध्दीकरण केंद्रातुन प्राप्त होणार पाणी पुरवठा हा अपुरा होत आहे. उल्हासनगर शहरातील वाढती लोकसंख्या पाहता विविध भागात तीव्र पाणी टंचाई महापालिकेला जाणवत आहे. तसेच उल्हासनगर महापालिकेला पाणी पुरवठयाच्या बिलापोटी मोठी रक्कम महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडे भरणा करावी लागत असल्याने, त्याचा विपरीत परिणाम शहरातील विकास कामे करण्यावर होत आहे.

उल्हासनगर महापालिका शेजारील इतर महापालिकांची स्वत:ची जलस्त्रोत घेऊन पाणी पुरवठा करण्याची येजना आहे. उदा. मुंबई महापालिकेचे पिसे गांव येथे स्वत: धरण आहे. सध्या एम.जे.पी. या संस्थेने बनविलेले मोरबे धरण हे शासनामार्फत नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतरण केले आहे. मुंबई महापालिकेने त्यांच्या स्वत:च्या मालकीचे मोहने येथे असलेले पाणी उपसा केंद्र (पंपिग स्टेशन) व इतर यंत्र सामुग्री कल्याण—डोंबिवली महापालिकेकडे हस्तांतरीत केले आहे. पाटबंधारे खात्याच्या अखत्यारीत असलेले चिखलोली धरणसुध्दा शासनामार्फत अंबरनाथ नगर परिषदेस हस्तांतरण करण्यात आलेले आहे. अंबरनाथ—बदलापुर या शहराच्या पाणी पुरवठा योजनेकरीता आयुध निर्माण संस्थेच्या मालकीचे बॅरेज धरणावर असलेले पाणी उपसा केंद्र व जलशुध्दीकरण केंद्र हे त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास हस्तांतरीत केले आहे. वरील बाबींचा विचार करता भविष्यातील पाणी समस्या व प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने उल्हासनगर महापालिकेकडे सुध्दा स्वत:चे जलस्त्रोत घेऊन पाणी पुरवठा योजना असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ यांची शहाड पाणी पुरवठा योजना ही ५२ वर्षापुर्वी कार्यान्वित करण्यात आली असुन, सदर योजनेव्दारे पुर्वी कल्याण—डोंबिवली महापलिका व लगतची गावे यांना पाणी पुरवठा

करण्यात येत असे. परंतु गेल्या ८–९ वर्षापासुन फक्त उल्हासनगर महापालिकेस शहाड पाणी पुरवठा योजनेतुन पाणी पुरवठा केला जातो. ठाणे महापालिका मिरा–भाईंदर महानगरपालिका, भिवंडी महापालिका यांस स्टेम मार्फत प्रति १००० लिटरला रु.४/– या दराने पाणी पुरवठा करण्यात येतो. उल्हासनगर महापालिका शहाड पाणी पुरवठा योजनेच्या ५ कि.मी.अंतरावर असुन सुध्दा महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ शहाड यांचेमार्फत उल्हासनगर महानगरपालिकेस प्रति १००० लिटरला रु. ८/– या दराने पाणी पुरवठा केला जातो. या योजनेचा दर हा इतर योजनेच्या मानाने फार जास्त आहे. प्रत्यक्षात महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून ३.०० ते ४.०० रु. /प्रति १००० लिटरला खर्च होत आहे. परंतु त्यांचेमार्फत भांडवली खर्चासाठी ४.०० रुपये अतिरीक्त दर आकारणी करीत असल्यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेस १००० लिटर पाण्यासाठी रुपये ८.०० आकारणी केली जाते. ही आकारणी जास्त असल्यामुळे महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून प्राप्त होणारी पाणीपट्टी देयकांचे आकारणी बाबत गेल्या १५ वर्षापासुन मतभेद सुरु आहेत.

उल्हासनगर शहरातील वाढती लोकसंख्या, तीव्र पाणी टंचाई तसेच उल्हासनगर महानगरपालिकेला पाणी पुरवठयाच्या बिलापोटी खर्च करावी लागणारी मोठी रक्कम याचा विचार करता उल्हासनगर महानगरपालिकेची स्वत:च्या मालकीची पाणी पुरवठा योजना असणे आवश्यक आहे. या करीता आजमितीस महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने सदर योजनेचा घसारा वजावट करुन असलेल्या स्थितीत व किंमतीस सदर योजना उल्हासनगर महानगरपालिकेस हस्तांतरण केल्यास त्यासाठी करावा लागणार खर्च कमी होऊन त्याचा उपयोग शहरातील विकास कामे करुन शहराची प्रगती करण्यासाठी होईल. तरी महानगरपालिकेस रु. ३.०० ते ४.०० प्रति १००० लिटर एवढया दराने ''ना नफा ना तोटा'' या तत्वावर पाणी पुरवठा करावा अथवा सदरचे शहाड जलशुध्दीकरण केंद्रास जवळपास ५२ वर्ष झाले असुन, त्याप्रमाणे त्याची रक्कम शासनास भरुन उल्हासनगर महानगरपालिकेस सदरचे जलशुध्दीकरण केंद्र हस्तांतरीत करावे.

तरी वरील प्रमाणे प्रस्तावास मान्यता मिळवुन सदरचा प्रस्ताव शासनास सादर करणेकरीता मा.महासभेच्या मान्यतेकरीता सादर करणेत येत आहे.

मान्यतेसाठी सादर.

**महासभा ठराव क्र: २१** **दिनांक:– ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ यांची शहाड पाणी पुरवठा योजना उल्हासनगर महापालिकेस हस्तांतरण करणेस मान्यता व शासनास प्रस्ताव सादर करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १२ :–** प्रभाग क्रमांक १८ तक्षशिला शाळेच्या गेट ते महापालिकेचे हजेरी शेड पर्यंतचा रस्ता ना फेरीवाला क्षेत्र घोषित करणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. १२:—** प्रभाग क्रमांक १८ तक्षशिला शाळेच्या गेट ते महापालिकेचे हजेरी शेड पर्यंतचा रस्ता ना फेरीवाला क्षेत्र घोषित करणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी संदर्भिय महासभा ठरावाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

मा.महापालिका सदस्या श्रीमती कविता बागुल यांनी प्रभाग क्रमांक १८ मधील तक्षशिला शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारापासून ते महापालिकेचे हजेरी शेड पर्यंतचा रस्ता ''ना फेरीवाला क्षेत्र'' म्हणून घोषित करणेकामी मा.महासभेसमोर अशासकीय प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावावर मा.महासभेने प्रभाग अधिका—यांनी पाहणी करुन अहवाल सादर करणेकामी ठराव मंजूर केलेला आहे.

सदर ठिकाणी स्थळपाहणी केली असता तक्षशिला शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर शाळा सुटण्याच्या व भरण्याच्यावेळी मोठया प्रमाणावर शालेय विद्यार्थ्यांची गर्दी असते. तसेच तक्षशिला विद्यालय ही एक नामांकीत शैक्षणिक संस्था असल्याने या परिसरात मोठया प्रमाणावर विद्यार्थ्यांची वर्दळ असते. सद्यस्थितीत या रस्त्यावर चार ते पाच फेरीवाले हातगाडीवर व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक ६५२/२०१७ मध्ये शैक्षणिक संस्थेपासून १०० मीटरच्या अंतरावर ना फेरीवाला क्षेत्र घोषित करता येऊ शकेल असे आदेश दिलेले आहेत.

तरी उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता तक्षशिल शाळेचे मुख्य प्रवेशद्वार ते हजेरी शेड पर्यंत ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषित करणेकामी मा.महासभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** २२ **दिनांक:— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे प्रभाग क्रमांक १८ तक्षशिला शाळेच्या गेट ते महापालिकेचे हजेरी शेड पर्यंतचा रस्ता ना फेरीवाला क्षेत्र घोषित करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १३ :—** दिव्यांग कल्याणकारी योजनेच्या स्वरुपास मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे :—** एक मिनिट मॅडम, ही जी योजना आणली आहे त्याबाबत प्रशासनातर्फे आम्हाला कोण सांगेल त्यांना जरा बोलवावे ही विनंती.

**श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक:—** सन्माननिय महापौर मॅडम, उपमहापौर साहेब, आयुक्त साहेब आणि सर्व सन्माननिय सदस्य, अपंग कल्याणकारी योजना समिती याद्वारे आपण या योजना तयार केलेल्या आहेत. आपल्याला जो गोषवारा दिलेला आहे त्याच्याबरोबर एक २८ ऑक्टोबर, २०१५ चा जी.

आर. जोडलेला आहे. त्या जी.आर. च्या मार्गदर्शनानुसार आम्ही या सगळया योजना तयार केलेल्या आहेत.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :—** कृपया योजना सांगा, आपण काय देणार आहोत, काय करणार आहोत?

**श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक:—** एक/एक योजना वाचतोय. पहिली योजना आहे. शिक्षण प्रोत्साहन भत्ता त्यामध्ये १ ली पासून १२ वी पर्यंत व त्यानंतर एफ.वाय., एस.वाय., टी.वाय., आय.टी. आय., डिप्लोमा, इंजिनिअर व समकक्ष, डिग्री इंजिनिअर समकक्ष, बी.बी.ए. व एम.बी.ए. असे कोर्सेस दिव्यांग बंधू घेत असतील दिव्यांग विद्यार्थी घेत असतील त्यांना प्रोत्साहन भत्ता समोर नमुद केलेली रक्कम त्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल. पहिलीला १५००, दुसरीला १५००, तीसरीला २००० ही वार्षीक रक्कमआहे. अशा २० आहेत, सर्वांची रक्कमवाचून दाखवू का?

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—** आपण कोणती स्किम वाचत आहात?

**श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक:—** शालेय शिक्षण प्रशिक्षण प्रोत्साहन भत्ता वर्गानुसार म्हणजे इयत्तानुसार व कोर्सनुसार दिला जाईल. म्हणजे दिव्यांग विद्यार्थ्याला शिक्षण प्रशिक्षणसाठी साधारणत: किती खर्च येईल तेवढी रक्कम त्यांच्या खात्यात जमा होईल. या व्यतिरिक्त जर कोणता कोर्स असेल तर मा. आयुक्त साहेबांच्या मंजुरीने अर्जदाराला विशेष लाभ देण्यात येईल.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :—** साहेब वर्षाला १,५०० रु. म्हणजे महिन्याला शंभर ते सव्वाशे रुपये असं आहे ना?

**श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक:—** होय.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :—** मग त्याच्यामध्ये काय आहे. फी तरी तो भरू शकेल का? तो फी भरेल की काय करू शकेल? एखादा खरोखरच अपंग म्हणजे त्याची परिस्थिती बिकट असेल व आपण शंभर, सव्वाशे, दिडशे रुपये त्याला महिन्याला देत असणार. तुम्ही म्हणता की, वार्षीक १५०० रुपये तर महिना सव्वाशे रुपये झाले. सव्वाशे रुपयांमध्ये तो त्याची फी तरी भरू शकेल का?

**श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक:—** शालेय शिक्षण तर आता मोफतच आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** यांचा शिक्षणाचा विषय बरोबर आहे. त्याचबरोबर त्यांच्या उदरनिवारणासाठी त्यांना जे काही उद्योगधंदे करायचे आहेत. त्यासाठी काय योजना आहेत त्या सांगा?

**श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक:—** नाही या प्रकारात तशा कोणत्याही योजना सद्या नाहीत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** कसं आहे माहिती आहे का, आपल्या महानगरपालिकेतून ३ टक्के निधी त्यांच्यासाठी खर्च झाला पाहिजे हा नियम आहे. त्या नियमानुसार आपल्याकडे कुठलच काम चालत नाही. त्याचबरोबर त्या निधीमधून त्यांना महिन्याला मानधन दिलं पाहिजे. इतर महानगरपालिका ते देत आहेत. ठाणे महापालिका देते, कल्याण महापालिका देते, पनवेल महापालिका देते. तर उल्हासनगर महापालिकेने देखील त्यांना मानधन दिलं पाहिजे.

**श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक:—** पुढे तशी एक योजना आहे, पेंशन योजना.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे :—** साहेब ती वेगळी योजना आहे. याच्या मागे आहे ती. ही शिक्षणासाठी आहे. त्यानंतर प्रशिक्षणासाठी आहे. अशा सर्व आहेत.

**सदस्य श्री. अरुण आशान:—** मा.महापौरजी, मा.आयुक्त साहेब मला वाटत दिव्यांग योजनेचा आपण जो खुलासा करता आहात, सन १९९७ ते २०११ मागच सांगतो जरा. आपल्या महानगरपालिकेला ३ टक्के निधी खर्च करायचा आहे. तर आतापर्यंत आपण किती टक्के निधी त्यांच्यासाठी खर्च केला? महापालिकेत दिव्यांगासाठी एक लिफ्ट लावण्याच काम होत ते लिफ्ट लावण्याच काम आपण केलेल आहे. जसं श्री. चौधरी साहेब व श्री.राजेशजी बोलले तो पुढचा विषय आहे. मी त्याबद्दल बोलणार आहे. तर या काही ज्या योजना आहेत, या शहरामध्ये दिव्यांगांसाठी ज्या योजना आहेत या योजनेबद्दल मी आपणांस विचारतो की, आपली महानगरपालिका इतर महापालिकेप्रमाणे हा तीन टकक्के राखीव निधी ठेवते का? आणि ठेवत असेल तर आतापर्यंत किती दिव्यांगांना याचा लाभ झाला?

**श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक:—** गेल्यावर्षी जे अर्ज आले त्यापैकी महापालिकेने ज्या योजना महासभेत मंजुर केलेल्या होत्या त्या योजनेत जेवढे पात्र झाले तेवढयांना आपण या योजनेचा लाभ गेल्या वर्षी दिलेला आहे.

**सदस्य श्री. अरुण आशान:—** किती टक्के वापर झाला.

**श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक:—** ३ टक्के जेवढा वापर व्हायला पाहिजे तेवढा झालेला नाही.

**सदस्य :—** नाही झालेला, त्याच कारण असं आहे साहेब, दिव्यांगांची जी संख्या आहे उल्हासनगरमध्ये त्या संख्येला अनुसरून आपल्याकडे आज कित्येक लोक अर्ज करतात, परंतु त्या अर्जावर कुठलिही सुनावणी होत नाही. ३ टक्के राखीव निधी असतांना देखील त्यांच्यावर तो खर्च केला जात नाही. इतर महानगरपालिकेत २००० रु. त्यांना द्यायचे आहे, परंतु आपली महापालिका ते देत नाही. त्यामुळे आलेला निधी हा लॅप्स होतो. एक टक्का ही वापरला जात नाही. आणि असुन सुध्दा आपण त्या लोकांना देवू शकत नाही ही शोकांतीका आहे. श्री. चौधरी साहेबांच म्हणण हेच होतं. जरा मागचा विषय पुढे घेतो. कारण हा राखीव निधी अंदाजपत्रकात देखील आपण ठेवतो तो पूर्णपणे आपण वापरलेला नाही व वापरत नाही. खरं म्हटल तर असंख्य फुटपाथ हे गॅरेजवाल्यानी आता व्यावलेले आहेत, त्यांनी कव्हर केलेले आहेत. आपण दिव्यांगांना येथे स्टॉल देवू शकतो. त्यांना रोजंदारीच एक साधन देवू शकतो. आणि आपण हा आदर्श समोर ठेवू शकतो की, तुम्ही जरी दिव्यांग असाल तरी तुम्ही सक्षम आहात आणि तुम्ही कमवू शकता. साधी योजना आहे व या योजनेमध्ये या सर्व गोष्टी समाविष्ट आहेत.परंतु सुधारणा होत नाही. आपण जर का हा ३ टक्के निधी वेळोवेळी दिला तर सरकारचा हा निधी त्यांना योग्य प्रमाणे दिला जाईल. आणि आपण काहीतरी या शहरामध्ये दिव्यांगांकरीता करत आहोत आणि त्यांचा जो हक्क आहे त्यांना तो आपण देत आहोत असं आपण करू शकतो. मला वाटत इतर महापालिकांप्रमाणे प्रमाणपत्र असलेल्या दिव्यांगांना दरमहा २०००/—रु. या ३ टक्के राखीव निधीतून दिले जावेत. चौकाचौकामध्ये महापालिकेची जी जागा आहे त्या ठिकाणी दिव्यांगांना आपण स्टॉल देवू शकतो. श्री. राजेश वधारीयाजी यांनी सांगीतल्याप्रमाणे आपण दिव्यांगांना काय—काय देवू शकतो, ती संपूर्ण योजना या सभागृहाला साहेब आपण समजावून सांगावी, ही विनंती.

**श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक:—**विभागाने ज्या योजना तयार केलेल्या आहेत त्या योजना मी ओळीने वाचून दाखवितो ज्या गोषवा—यात जोडलेल्या आहेत. शालेय शिक्षण शिष्यवृत्ती परीक्षा, जे विद्यार्थी स्पर्धा परीक्षा देतील आणि उत्तीर्ण होतील त्यांना शिष्यवृत्ती दिली जाईल. परीक्षा निहाय शिष्यवृत्तीची रक्कम त्यात नमुद केलेली आहे. त्याच्या नंतर क्रीडा शिष्यवृत्ती, काही दिव्यांग बांधव क्रीडामध्ये देखील भाग घेतात. कॅरम, बुध्दीबळ असेल किंवा अन्य खेळ असेल,जर त्यांनी त्यात राज्य, राष्ट्रीय किंवा अंतरराष्ट्रीय पातळीवर यश मिळविले तर त्यांना ही आपण क्रीडा शिष्यवृत्ती देणार आहोत. त्यानंतर पेन्शन योजना. हे आपण गोषवा—यात नमुद केलेल आहे. वार्षिक १२,०००/— रु. असा लाभ आपण त्यांना देणार आहोत. पुढची योजना आहे वैद्यकीय खर्चासाठी अनुदान. एखादा दिव्यांग बांधव हॉस्पीटलमध्ये दाखल झाला तर त्याला सी.एम. रिलीफ फंडातून जस वैद्यकीय बिल दिल जात त्याच धर्तीवर येथे केलेल आहे. यात आणखी आपण एक समाविष्ट केलेल आहे. जर दिव्यांग बांधव पुरूष असेल व त्याच्या पत्नीच सिझरींग झालेल असेल तर त्याचे ही वैद्यकीय बिल त्याला मिळू शकत. तसेच एम.एस.सी.आय.टी. परिक्षेसाठी देखील आपण अनुदान देतो. एम.एस.सी.आय.टी. परिक्षेत कोणी दिव्यांग व्यक्ती उत्तीर्ण झाली तर त्यासाठी त्यांनी जी फी भरलेली आहे ती आपण अनुदान स्वरूपात देत आहोत. त्यानंतर गतीमंद बालकांच्या पालकांना प्रोत्साहन भत्ता देत आहोत. या मुलांच्या संगोपणासाठी थोडा जादा खर्च येत असतो. आणि त्यासाठी प्रोत्साहनपर भत्ता त्यांच्या पालकांना आपण देणार आहोत. १२,०००/— रु. वार्षिक आपण त्यांना देत आहोत. जी मुलं गतीमंदत आहेत. ज्यांच आय.क्यु. पातळी सामान्यपेक्षा कमी आहे. तीव्र असतील गंभीर असतील किंवा बॉर्डर लेवलला असतील अशा मुलांच्या पालकांसाठी आपण हा प्रोत्साहन भत्ता देत आहोत.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे :—** लर्निंग डिसअॅबिलीटीपण त्यामध्ये कव्हर होते.

**श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक:—** दिव्यांगणांच्या बचत गटांना अनुदान. मला जी दिव्यांगणांनी माहिती सांगीतली त्याप्रमाणे दोन बचत गट स्थापन झालेले आहेत. त्यानंतर पुढच्या योजना अशा आहेत. सार्वजनिक वाचनालयामध्ये अंध व्यक्तींकरीता ऑडिओ लायब्ररी सुरू करणे. दिव्यांगांच्या क्रीडा, चित्रकला व इतर स्पर्धा आयोजित करणे. उल्हासनगर महापालिकेच्या तसेच शहरातील इतर शाळेतील दिव्यांगांकरीता सोयी सुविधा तयार करणे. अपंगांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणा—या योजनांचा प्रसार करणे. आणि स्थानिक परिस्थितीजन्य महत्वकांक्षी योजना अंमलात आणणे. म्हणजे अशा ब—याच योजना आहेत जी प्रसंगानुरूप सूचली. तर त्यानंतर ......

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—** एक मिनीट, या योजनांचा जो लाभ मिळणार आहे. त्यामध्ये एक दिक्कत अशी आहे की, हे दिव्यांग आहेत. त्यामुळे त्यांना आपल्या कार्यालयात आल्यानंतर पहिला माळा जा, दुसरा माळा जा अशी त्यांची हेळसांडपण होते. मला वाटत माहिती अधिकार कार्यालयाशेजारी त्यांना जर कार्यालय उपलब्ध करून दिलं तर सुरूवात इथून चांगली होईल. त्यांचे अर्ज बरोबर येतील त्यांची चौकशी बरोबर केली जाईल. आणि कुठलाही विलंब न होता त्यांना न्याय दिला जाईल. साहेब याच्यामध्ये ब—याच योजना असून त्यामध्ये घरकुल योजनापण आहे. घरकुल योजनामध्येपण त्यांना अग्रगण्य स्थान देवून लाभ देवू शकतो. या अशा १७/१८ चेकलीस्ट आहेत. अशा कित्येक योजना आहेत ज्या इतर महापालिकांनी आधिच लागू केलेल्या आहेत. तर त्या योजना देखील आपल्या महापालिकेत चालू केल्या पाहिजेत असे माझे म्हणणे आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—** यामध्ये आपण वैद्यकीय खर्चासाठी अनुदान दिले आहे, रक्कम रु.२५ हजार यामध्ये पात्रतेची जी अट आहे त्यामध्ये अ.क्र.४ वर आपण लिहीले आहे की, वरीलप्रमाणे जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे, आता जी व्यक्ती आजारी आहे, पहिली अट आहे की, ती व्यक्ती हॉस्पीटलमध्ये अॅडमीट

असावी, आता जी व्यक्ती हॉस्पीटलमध्ये ॲडमीट आहे ती हॉस्पीटलमध्ये जावून प्रमाणपत्र घेवून येईल का? आणि उल्हासनगर मध्यवरती हॉस्पीटलला जिल्हा शल्य चिकित्सकचा दर्जा मिळालेला आहे. तर याकरिता यामध्ये ठाणेच्या जागी मध्यवरती रूग्णालय उल्हासनगर असे लिहिण्यात आले पाहिजे. पहा, आपण अट लिहिली आहे की, अर्जदार उल्हासनगर शहराचा असायला पाहिजे तर उल्हासनगरचा रहिवाशी ठाण्याला जावून प्रमाणपत्र कशासाठी घेवून येईल? आणि मध्यर्ती रूग्णालयाचा जिल्हा शल्य चिकित्सकचा दर्जा मिळालेला आहे.

**श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षकः—** ठिक आहे, त्यातील ठाण्याचे रद्द करून उल्हासनगर केले जाईल.

**सदस्या, श्रीमती मीना सोनेजीः—** यामध्ये एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणू इच्छिते की, आपण दरवेळी त्यांना चिकित्सेसाठी पैसे देत आहोत. त्यांची मेडिक्लेम पॉलिसी काकाढण्यात येवू नये? आमच्याकडे यादी आहे. आज ३५० रु. भरून संपूर्ण कुटुंबासाठी एक लाख मेडिक्लेम पॉलिसी काढता येवू शकते. तर आपण त्यांना प्रत्येक चिकित्सेसाठी पैसे का द्यावेत? आपल्याकडे जीतकी यादी आहे त्यांची सर्वांची आपण मेडिक्लेम करावी. आणि दुसरी गोष्ट अशी की, आपण अपंग व्यक्तींना अपंग—अपंग म्हणून हिनवतो त्यापेक्षा त्यांच्यासाठी एक उद्योग भवन आपल्याकडे असावे. मागे आपण जे एका पायाने, एका हाताने किंवा एका डोळयाने अपंग आहेत त्यांना मोबाईल दुरूस्तीचे प्रशिक्षण दिले होते. त्याप्रमाणे प्रशिक्षण देणेसाठी एक उद्योग भवन केंद्र बनविण्यात यावे. त्यामुळे दिव्यांगाची जी अपंग म्हणून हिनावणी होते ती थांबली जाईल.

**सदस्य, श्री. जमनु पुरस्वानीः—** मा. आयुक्त साहेब हा जो प्रस्ताव आपण आज पास करत आहोत त्याची जाहिरात झाली पाहिजे. जेणेकरून जे दिव्यांग आहेत ते याचा लाभ घेवू शकतील. धन्यवाद !

**सदस्या श्रीमती अंजली साळवे :—** पेन्शन योजना जी आपल लागू करत आहोत ती आपल्या महापालिकेत वार्षिक १२ हजार रुपये लिहीली आहे. परंतु आजुबाजूच्या महापालिकेत कल्याण, पनवेल, ठाणे येथे ती वार्षिक २४ हजार रुपये आहे. तर ती सर्वानुमते मंजूर करण्यात यावी ही विनंती.

**आयुक्त, श्री.गणेश पाटीलः—** आपल बजेट कमी आहे. दोन कोटी रुपयांच आपल बजट आहे. तीन टक्क्यांप्रमाणे. याच्यामध्ये आपण शिक्षणाची योजना घेतलेली आहे. पेन्शन योजना घेतलेली आहे. मेडिकल योजना घेतलेली आहे. मेंटली रिटायर्ड लोकांच्या योजना घेतलेल्या आहेत. त्याची संख्या आपल्याला माहित नाही. या योजना आपण पहिल्यांदाच केलेल्या आहेत. जर आपल बजट पुढे वाढल, जर आपल्याला लक्षात आल की, एवढे पैसे खर्च होत नाहीत, येवढे लाभार्थी नाही आहेत तर आपल्याला रक्कम वाढविता येईल. सुरवातीला एक हजार रुपये महिन्याला आपण देवू.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** लाभार्थ्यांचे प्रथम प्राधान्य कोणाला म्हणजे एकाच कुटुंबातील दोन व्यक्ती असतील, ८० टक्के ते १०० टक्के, ६० टक्के ते ८० टक्के, ४० टक्के ते ६० टक्के, बेसिकली आपल्याकडे हा डाटा आहे का?ठिक आहे, शासन निर्णय आताचा आहे. परंतु आपल्याकडे याआधीचा डाटा असायला पाहिजे होता. दिव्यांग व्यक्ती आपल्याकडे किती आहेत. त्यांच्यावर किती टक्के खर्च झाला, तीन टक्के झाला का? आपल्याकडे सर्वे आहे का? यापुढे प्रथम प्राधान्य सर्वेला असले पाहिजे. त्याशिवाय आम्ही प्राधान्य कसे काय देणार की, एकाच कुटुंबात दोन व्यक्ती कुठल्या आहेत. त्यासाठी श्री. जमनु पुरस्वानी यांनी सांगीतल्याप्रमाणे याची आधी जाहिरात करण्यात यावी की, महापालिकेचा हा प्रकल्प आहे. आणि हा मानाचा आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारियाः—** मा.महापौरजी पेन्शन योजनेमध्ये आपण जी टीप लिहिली आहे की, अर्जदार महाराष्ट्र शासन संजय गांधी निराधार योजनेचा लाभार्थी असल्यास खालील कागदपत्र सादर करणे आवश्यक राहील. तर यामध्ये एक मोठा संभ्रम निर्माण होईल. एकतर आपण त्यांच्याकडून एक शपथपत्र लिहून घ्या की, संजय गांधी निराधार योजनेचा ते लाभ घेत नाहीत. आपण त्याची पडताळणी कशी कराल हे तर सांगा. पेन्शन योजना ज्यामध्ये आपण लिहिले आहे की, वरील कागदपत्र सादर करणे आवश्यक राहील. आपण त्यामध्ये तहसिलदार कार्यालयातून प्रमाणपत्र यावे असे सांगतात. यामुळे त्यांना परत तहसिलदार कार्यालयात जाणेचे काम वाढते. मग त्यापेक्षा हे चांगले आहे की, आपण त्यांच्याकडून एक शपथपत्र घ्या की, ते संजय गांधी निराधार योजनेचा फायदा घेत नाही. नाहीतर तहसिल कार्यालयातून आपण त्यांची यादी मागवून घ्या. त्याची आपण पडताळणी करा.

**सदस्य श्री. राजेश वदारियाः—** जे लाचार/गरीब लोक आहेत त्यांना कृपया जास्त फिरवू नका.

**महापालिका सचिवः—** दिव्यांग योजना स्वरूपास मान्यता देत आहे हा विषय पास करण्यात येत आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. १३ :—** दिव्यांग कल्याणकारी योजनेच्या स्वरुपास मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

शासन निर्णय नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि. २८ ऑक्टोबर, २०१५ नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी दिव्यांगांसाठी किमान ३: निधी राखीव ठेवण्याबाबत निर्देश देणेत आले आहेत. सदर शासन निर्णया नुसार दिव्यांगांसाठी राबवायच्या योजनांची यादी दिली आहे. तसेच या योजना राबवण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. सन २०१८—२०१९ या आर्थिक वर्षात दिव्यांग कल्याणकारी योजनातर्गत रक्कम रुपये २ कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद आहे. सन २०१८ —१९ या वर्षात उल्हासनगर शहरातील दिव्यांग बांधवांसाठी राबविण्याच्या योजनांचा आराखडा शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे दिव्यांग कल्याणकारी योजना विभागाने तयार केला आहे.

अर्जदार सदरच्या योजनांपैकी एका आर्थिक वर्षात एकावेळी एकाच योजनेसाठी अर्ज करून लाभ घेऊ शकतो, तसेच योजनेत नमुद केलेल्या अटी—शर्ती, निकष आणि कागदपत्रे यांची तपासणी केल्या नंतरच पात्र /अपात्र ठरवण्यात येईल.पात्र अर्जदारांना योजनेचा लाभ (अनुदान) धनादेश / NEFT/RTGS याद्वारे प्रदान करण्यात येईल.

सदर योजना राबवणे तसेच योजनेचे भौतिक लक्ष्य कमी अथवा जास्त करणे एखादया योजनेचा निधी योग्य कारणास्तव इतर योजनांसाठी वर्ग करणे, तसेच आवश्यकता असेल तिथे योजनानिहाय अटी व शर्ती तयार करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त सो उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांना प्रदान करणेसाठी हा विभाग सोबतच्या योजना मा.महासभेच्या मान्यतेसाठी पटलावर प्रस्तावित करत आहे .

**प्रशिक्षण प्रोत्साहन भत्ता**

| **अ.क्रं.** | **इयत्ता** | **प्रोत्साहन भत्ता** |
|---|---|---|
| १ | १ ली | रूपये १५०० |
| २ | २ री | रूपये १५०० |
| ३ | ३ री | रूपये २००० |
| ४ | ४ थी | रूपये २००० |
| ५ | ५ वी | रूपये २५०० |
| ६ | ६ वी | रूपये २५०० |
| ७ | ७ वी | रूपये २५०० |
| ८ | ८ वी | रूपये ३००० |
| ९ | ९ वी | रूपये ३५०० |
| १० | १० वी | रूपये ५००० |
| ११ | ११ वी | रूपये ५००० |
| १२ | १२ वी | रूपये ६००० |
| १३ | F.Y | रूपये ६००० |
| १४ | S.Y | रूपये ६५०० |
| १५ | T.Y | रूपये ७००० |
| १६ | I.T.I. | रूपये १०००० |
| १७ | Diploma in Eng./led{k | रूपये १०००० |
| १८ | Digree in Eng./led{k | रूपये १५००० |
| १९ | B.B.A. /led{k | रूपये १०००० |
| २० | M.B.A./led{k | रूपये १५००० |

**अटी व निकष**:—१)अर्जदार हा उल्हासनगरचा रहिवाशी असणे आवश्यक आहे.

२)विद्यार्थ्याची शैक्षणिक वर्षात ७५ : पेक्षा जास्त शाळेत/महाविद्यालयात हजेरी असणे आवश्यक आहे.

३) मुख्याध्यापक /प्राचार्य यांचे हजेरी प्रमाणतपत्र आवश्यक आहे.

४) सदरचा लाभ शैक्षणिक वर्षात एकाच वेळी दिला जाईल.

५) याशिवाय इतर विशेष शैक्षणिक पात्रता असलयास त्यास लाभ देणेबाबाचा अधिकार मा. आयुक्त सो. यांचा राहील.

६) पालकांच्या रेशनकार्डात पाल्याचे नाव असणे आवश्यक आहे.

**कागदपत्रे** :—१) शाळा / महाविद्यालयाचे ओळखपत्राची छायाकिंत प्रत सादर करणे आवश्यक आहे.

२) उतीर्ण झालेचे गुणत्रक /प्रमाणपत्राची छायाकिंत प्रत सादर करणे आवश्यक आहे.
३) अपंगाचा दाखल्याची छायाकिंत प्रत सादर करणे आवश्यक आहे.
४) रहिवाशी दाखला : पालकाचे रेशन कार्ड /आधार कार्डची छायांकित प्रत सादर करणे.
५) बॅक पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.

**शालेय शिक्षण शिष्यवृत्ती**

| अ.क्रं. | इयत्ता | शिष्यवृत्ती परीक्षेचे नाव | शिपवृत्ती रक्कम |
|---|---|---|---|
| ५ | ५ वी | १) पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा स्कॉलरशिप परीक्षा)<br>२) नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा<br>३) Olympiad Foundation मार्फत घेतल्या जाणा–या विविध स्पर्धा परीक्षा उदा.–NSO | ५००० |
| ६ | ६ वी | डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षा,Olympiad Foundation मार्फत घेतल्या जाणा–या विविध स्पर्धा परीक्षा उदा.–NSO | ८००० |
| ७ | ७ वी | Olympiad Foundation मार्फत घेतल्या जाणा–या विविध स्पर्धा परीक्षा | ४००० |
| ८ | ८ वी | १) माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा स्कॉलरशिप परीक्षा<br>२) MTSE Olympiad Foundationमार्फत घेतल्या जाणा–या विविध स्पर्धा परीक्षा | ६००० |
| ९ | ९ वी | डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षा,Olympiad Foundationमार्फत घेतल्या जाणा–या विविध स्पर्धा परीक्षा उदा.–NSO | १०००० |
| १० | १० वी | NTSE, MTSE<br>Olympiad Foundation मार्फत घेतल्या जाणा–या विविध स्पर्धा परीक्षा उदा.–NSO | १०००० |

**अटी व निकषः–**१) अर्जदार हा उल्हासनगरचा रहिवाशी असावा.
२) सदरच्यापरीक्षा शैक्षणिक स्पर्धा परीक्षा असावी.
३) सदरची शिष्यवृत्ती परीक्षानिहाय आहे.
४) या शिवाय एखादया स्पर्धा परीक्षेत विशेष यश संपादन केले असल्यास यास विशंष बाब म्हणून मान्यता देण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना राहतील.
५) पालकांच्या रेशनकार्डात पाल्याचे नाव असणे आवश्यक आहे.

**कागद पत्रेः–**१) मुख्याध्यापकाचे शिफारस पत्र आवश्यक.
२) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा गुणपत्रकाची छायाकिंत प्रत आवश्यकराहील.
३) अपंगाचा दाखल्याची छायाकिंत प्रत सादर करणे आवश्यक आहे.
४) रहिवाशी दाखला : पालकाचे रेशन कार्ड /आधार कार्डची छायांकित प्रत सादर करणे.
५) बॅक पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.

**क्रिडा शिष्यवृत्ती**

| स्तर | राज्य | राष्ट्रीय | आंतर राष्ट्रीय |
|---|---|---|---|
| रूपये | १०००० | १२००० | १५००० |

**निकष, अटी व शर्ती** : १)स्पर्धक हा उल्हासनगरचा रहिवाशी असावा.
२)स्पर्धेत यशस्वी झालेचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील
३)जिल्हा क्रिडा अधिका–याचे पत्र आवश्यक राहील.
४) स्पर्धा चालु किंवा मागिल लगतच्या आर्थिक वर्षात पार पडलेली असावी.
५) स्पर्धक प्रथम, द्वितीय, तृतीय श्रेणीत असला तरी शिष्यवृत्ती देण्यात येईल.
६) पालकांच्या रेशनकार्डात पाल्याचे नाव असणे आवश्यक आहे.

**कागदपत्रे** :– १)स्पर्धेत यशस्वी झालेचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील
२)जिल्हा क्रिडा अधिका–याचे शिफारस पत्र आवश्यक राहील.

३) अपंगाचा दाखल्याची छायाकिंत प्रत सादर करणे आवश्यक आहे.
४) रहिवाशी दाखला : पालकाचे रेशन कार्ड /आधार कार्डची छायांकित प्रत सादरकरणे.
५) बॅक पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत.

## पेन्शन योजना

| | |
|---|---|
| अनुदान रक्कम | रक्कम रूपये –१२,०००/–(वार्षिक) |
| योजनेचे स्वरूप | उल्हासनगर शहराच्या हद्दीत वास्तव्य असणा–या दिव्यांग बांधवास हि योजना लागू होईल. खालील अटी व शर्ती पूर्ण करणा–या अर्जदारास सदरचा लाभ मंजूर करणेत येईल. |
| पात्रता, निकष आणि अटी | १) अर्जदार उल्हासनगरचा रहिवाशी असावा.<br>२) लाभार्थीचे वय कमीत कमी १८ वर्षे पुर्ण असावे.<br>३) सदरचा लाभ एका आर्थिक वर्षात एकाच वेळी मिळेल. |
| कागदपत्रे | १) वयाचा पुरावा म्हणुन जन्मदाखला/शाळा सोडलेचा दाखला.<br>२) अपंगाचा दाखला साक्षाकिंत प्रत आवश्यक राहील.<br>३) ओळखपत्राची प्रत– आधार कार्ड /मतदान ओळखपत्र आवश्यक आहे.<br>४) रहिवाशी पुरावा– रेशनकार्ड/आधारकार्ड/नगरसेवकाचे पत्र.<br>५) बॅक पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत . |

टिप– अर्जदार महाराष्ट् शासनाच्या संजय गांधी निराधार योजनेचा लाभार्थी असल्यास वरील कागदपत्रे सादर करणेची आवश्यकता नाही. अशा बाबतीत अर्जदाराने त्याचे नाव संजयगांधी निराधार योजनेत असल्याबाबतचे तहसिलदार उल्हासनगर यांचे प्रमाणपत्र सादर करणे.

## वैद्यकिय खर्चासाठी अनुदान

| | |
|---|---|
| अनुदान रक्कम | रक्कम रूपये –२५,०००/– मर्यादेत |
| योजनेचे स्वरूप | १) पुढील गंभीर आणि दुर्धर आजारासाठी वैद्यकिय खर्च भागवणेकामी अनुदान<br>अ) हदयरोग ई) रक्ता संबंधी आजार<br>ब) कर्करोग फ) रक्त दाब<br>क) मधुमेहग ) क्षयरोग<br>ड) किडनी संबंधी आजार ह) सिझेरीएन प्रस्तुती (महिलासाठी) |
| निकष, पात्रता व अटी | १) अर्जदार उल्हासनगरचा रहिवाशी असावा.<br>२) रूग्ण दवाखान्यात ॲडमीट होणे आवश्यक आहे.<br>३) ज्या दवाखान्यात ॲडमीट झाला असेल त्या डॉक्टराचे खर्चाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.<br>४)वरील प्रमाणपत्रावर जिल्हाशल्य चिकित्सक,ठाणे/वैद्यकीय अधिकारी, उल्हासनगर मध्यवरती रूग्णालय यांचीप्रती स्वाक्षरी (Counter Signature)आवश्यक राहील.<br>५) खर्चाबाबतची तपशिलवार प्रमाणके (बिल) सादर करणे अवश्यक आहे.<br>६) खर्चानंतर एक वर्षाचे आत अनुदानाची मागणी करणे अनिवार्य राहील.<br>७) आर्थिक वर्षात एकाच वेळी लाभ मिळेल.<br>८) दिव्यांग बांधवाची पत्नी व आपत्य यांना योजनेचा लाभ कागदपत्र सादर केल्यास मिळेल. |
| कागदपत्रे | १) ) रहिवाशी पुरावा– रेशनकार्ड/आधारकार्ड/नगरसेवकाचे पत्र.<br>२) वैद्यकिय प्रमाणके (बिल) मुळ स्वरूपात सादर करणे आवश्यक राहील.<br>३) अपंगाचा दाखला साक्षाकींत प्रत आवश्यक राहील.<br>४) ओळखपत्राची प्रत– आधार कार्ड /मतदान ओळखपत्र आवश्यक आहे.<br>५) बॅक पास बुकाच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत . |

MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्यास अनुदान

| | |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | अपंग बांधवाने संगणकाचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी MS-CIT परीक्षाउतीर्ण करून महाराष्ट् ज्ञान महामंडळ मर्यादित यांचे प्रमाण पत्र सादर केल्यास तो लाभार्थी रूपये ४०००/—अनुदानास पात्र राहील. |
| अटी व शर्ती | १) अर्जदार हा उल्हासनगरचा रहिवाशी असावा.<br>२) अर्जदाराने महाराष्ट् ज्ञान महामंडळ मर्यादित यांचे कडे MS-CIT परीक्षा उतीर्ण केलेली असावी.<br>३) अर्जदाराने १ एप्रिल,२०१७ नंतर परीक्षा उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केले असता अनुदान मिळेल. |
| कागदपत्रे | १) ) रहिवाशी पुरावा— रेशनकार्ड/आधारकार्ड/नगरसेवकाचे पत्र.<br>२) MS-CIT परीक्षाउतीर्ण करून महाराष्ट् ज्ञान महामंडळ मर्यादित यांचे प्रमाण पत्राची साक्षांकित प्रत<br>३) अपंगाचा दाखला साक्षाकींत प्रत आवश्यक राहील.<br>४) ओळखपत्राची प्रत— आधार कार्ड /मतदान ओळखपत्र आवश्यक आहे.<br>५) बॅक पास बुकाच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत . |

## गतीमंद(मतीमंद) बालकांच्या पालकांना प्रोत्साहन अनुदान

**अनुदान रूपये —१२०००/— (वार्षिक)**

| | |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | उल्हासनगर शहरातील मतीमंद बालकांच्या पालकांना प्रेत्साहन अनुदान म्हणून या योजनेचा लाभ घेता येईल. |
| अटी व शर्ती | १) लाभार्थी हा उल्हासनगरचा रहिवाशी असावा.<br>२) लाभार्थीतीव्र किंवा अतीतीव्र मतीमंद असणे आवश्यक.<br>३) पालकाच्या रेशनकार्डात पाल्याचे नाव असणे आवश्यक आहे.<br>३) सदरचा लाभ आर्थिक वर्षात एकाच वेळी दिला जाईल. |
| कागदपत्रे | १) रहिवाशी पुरावा— आधार कार्ड, रेशन कार्ड ची छायांकित प्रत<br>२) मतीमंद असल्याचा दाखल्याची सांक्षाकित प्रत.<br>३) ओळखपत्राची प्रत— आधार कार्ड ची छायांकित प्रत<br>४) रहिवाशी पुरावा— रेशनकार्ड/आधारकार्ड/नगरसेवकाचे पत्र.<br>५) पालकाचे बॅक पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत. |

## दिव्यांगांच्या बजत गटाना अनुदान

**अनुदान रूपये २०००००/—**

| | |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | उल्हासनगर शहरातील दिव्यांगाच्या बचत गटांना अनुदान म्हणून या योजनेचा लाभ घेता येईल. |
| अटी व शर्ती | १)बचत गटाचे सर्व सदस्य हे उल्हासनगरचे रहिवाशी असावे.<br>२) बचत गट दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) अंतर्गत स्थापन झालेला असावा.<br>३)बचत गटाला फिरता निधी मिळालेला असावा.<br>४)बचत गट नियमानुसार कार्यरत असावा.<br>५)बचत गटाची सदस्यसंख्या कमीत कमी १० असवाी व यापैकी दिव्यांग सदस्य कमीत कमी ७ असावेत. |
| कागदपत्रे | १) बचत गटाचा ठरावाची छायांकित प्रत<br>२) बचत गटाचे पासबुकाची छायांकित प्रत.<br>३)अपंग असल्याचे सक्षम अधिकारी यांच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत<br>४)बचत गट कार्यरत असल्याबाबतचे दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय अभियान, उल्हासनगर महानगरपालिका,प्रकल्प अधिका—याचे स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र. |

सार्वजनिक वाचनालयामध्ये अंध व्यक्तीकरता ऑडीओ लायब्ररी बनविणे

| | |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या डॉ.बाबसाहेब आंबेडकर, अभ्यासिका येथे शासनमान्य संस्थेकडुन ऑडियो लायब्री सुरू करणे |

अपंगांच्या क्रिडा, चित्रकला इ. स्पर्धा आयोजित करणे

| | |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | उल्हासनगर शहरातील सर्व दिव्यांग बांधवांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करणे. यामध्ये कॅरम, बुध्दीबळ,चित्रकला,गायन यासारख्या स्पर्धांचे आयोजन करून यशस्वीतांचा गौरव करणे. |

उल्हासनगर महानगरपालिकेच्या तसेच शहरातील इतर शाळेतील दिव्यांगांकरीता सोयीसुविधा तयार करणे

| | |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | या योजनेची अमंलबजावणी करणेकरीता सर्व शिक्षा अभियान विभागातील कर्मचारी, सल्लागार यांचे सहाय्य घेतले जाईल. या विभागामार्फत सर्वेक्षण करून दिव्यांग विद्यार्थ्यांना लागणा—या सोयीसुविधा पुरवण्याचे काम केले जाईल. |

अपंगांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणा—या योजनांचा प्रचार/प्रसाार करणे

| | |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | अपंगांच्या शासनाच्या निर्णयानुसार वेळोवेळी राबविण्यात येणा—या कल्याणकारी योजनांची माहिती प्रसार व प्रचाराच्या माध्यमातुन दिव्यांग बांधवांना पुरविणे. यासाठी पथनाटय,व्याख्यांने, भिंतीपत्रके यासारख्या माध्यमांचा/साधनांचा वापर करययात येईल. |

स्थानिक परिस्थितीजन्य महत्वकांक्षी योजना अंमलात आणणे.

| | |
|---|---|
| योजनेचे स्वरूप | स्थानिक परिस्थिती व आवश्यकता यांचा आढावा घेऊन योग्य त्या महत्वकांक्षी योजना राबवणे. |

**महासभा ठराव क्र: २३** **दिनांक:— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिव्यांग कल्याणकारी योजनेच्या स्वरुपास मान्यता देवुन सदर योजना राबवणे तसेच योजनेचे भौतिक लक्ष्य कमी अथवा जास्त करणे एखादया योजनेचा निधी योग्य कारणास्तव इतर योजनांसाठी वर्ग करणे, तसेच आवश्यकता असेल तिथे योजनानिहाय अटी व शर्ती तयार करणेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १४ :—** परिवहन समितीवर पालिका सदस्य किंवा बाहेरुन सदस्य घेणेसाठी धोरण ठरविणेबाबत विचार विनिमय करणे

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, परिवहन समितीवर सर्व सदस्य बाहेरून घेणे, इतिवृत्ताची वाट न पाहता.

**काही सदस्य :—**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. १४ :—** परिवहन समितीवर पालिका सदस्य किंवा बाहेरुन सदस्य घेणेसाठी धोरण ठरविणेबाबत विचार विनिमय करणे

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेने दिनांक १३.७.२००७ चा ठराव क्र. ३५ व्दारे उल्हासनगर शहरांत बससेवा सुरु करण्याचे ठरविलेले होते. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५ मधील तरतुदीनुसार परिवहन उपक्रम चालविण्याच्या प्रयोजनासाठी १२ सदस्यांची एक परिवहन समिती स्थापन केली पाहिजे अशी तरतुद आहे. अणि त्यामध्ये एक स्थायी समिती सदस्य हे पदसिध्द सदस्य म्हणुन असतात. आणि महापालिकेने नेमणुक केलेल्या परिवहन समितीच्या सदस्यापैकी निम्मे सदस्य प्रत्येक दुस—या वर्षी अधिनियमातील तरतुदी नुसार निर्दिष्ट केल्या प्रमाणे निवृत्त होतील. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन—२००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर महासभा ठराव क्र. ४०, दिनांक २३/८/२००७ अन्वये परिवहन समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. व वेळोवेळी ६ सदस्य निवृत्त होवुन ६ नविन सदस्यांची नेमणूक करण्यांत आली असून प्रत्येक वर्षी नविन सभापतींची नेमणूक करण्यांत आली आहे.

तसेच सन २०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीच्यावेळी परिवहन समिती विसर्जित करुन नव्याने महासभा ठराव क्र २१ दिनांक १९/५/२०१२ अन्वये पुर्नरचना करण्यात आली. त्यावेळी देखील सेक्शन ३१ अ प्रमाणे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन सदस्यांची नेमणुक करण्यात आली.

तथापि माझ्या असे निदर्शनास आले आहे की, मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील क्र. कडोंमपा १००९/३९२/नवि—२८, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा दिनांक २१ नोव्हेंबर, २००९ चे पत्रानुसार व मा. उच्च न्यायालयाची याचिका क्र. ५१७५/२००७ प्रकरणी दिनांक २५/७/२००७ रोजीचे आदेशानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे १९४९ मधील कलम २५ मधील तरतुदीकडे लक्ष वेधण्यात येत आहे, त्यानुसार चौकशी केली असता उपरोक्त न्यायनिर्णय आणि अधिनियमातील तरतुदीनुसार पालिका सदस्यांमधून परिवहन समितीवर काही सदस्य नियुक्त/नेमणूक करावयाचे असतील तरच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ (अ) मधील तरतूद लागू होतील. तथापि, महानगरपालिकेने रिक्त पदांवरील नियुक्तीसाठी पालिका सदस्य म्हणून निवडून न आलेल्या व्यक्तींमधुन नियुक्ती करावयाचे ठरविल्यास कलम ३१ (अ) च्या तरतूदी लागू होणार नाहीत असे कळविले आहे. यापुर्वी उल्हासनगर महानगरपालिकेचे ३१ (अ) प्रमाणे नियुक्ती केली पण बाहेरुन सदस्य नेमण्यात आले जे कायदयाच्या तरतुदीशी विसंगत आहे.

सदर संदर्भात मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील क्र. कडोंमपा १००९/३९२/नवि—२८, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा दिनांक २१ नोव्हेंबर, २००९ चे पत्र व मा. उच्च न्यायालयाची याचिका क्र. ५१७५/२००७ प्रकरणी तसेच ऑल इंडिया लोकल सेल्फचे कायदेशीर मत आपल्या अवलोकनार्थ देत आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समितीवरील निम्मे ६ (सहा) सदस्य माहे एप्रिल, २०१८ ला निवृत्त होणार असल्याने निवृत्त झालेल्या सदस्यांच्या जागी रिक्त असलेल्या जागेवर नव्याने नेमणूकीसाठी प्रशासनाने नेमकी कोणती पध्दत अवलंबावी पालिका सदस्यांमधुन नेमणुक करावी कि बाहेरील व्यक्तींमधुन नेमणुक करावी हे ठरविणे आवश्यक आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता परिवहन समितीवर ६ सदस्य नियुक्तीसाठी ३१ अ ची तरतुद लागू करावी कि २५(२) नुसार सदस्य भरावे याबाबत धोरण ठरविणे आवश्यक आहे.

तसेच २५(२) मधील तरतुदीनुसार परिवहन समितीवर सदस्य घेतांना कल्याण डोंबिवली महापालिकेने गुप्त मतदान पध्दती अवलंबली आहे त्यानुसार करावे किंवा कसे याबाबत विचार विनिमय होवून धोरणात्मक निर्णयासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** २४ **<u>दिनांकः— ४/९/२०१८</u>**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे परिवहन समितीची पुर्नरचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २५(२) मधील तरतूदीनुसार करुन बाहेरुन सदस्य घेणेस व त्यांची गुप्त मतदानाद्वारे निवड करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याच वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी दुसरी सभा सुरू करायची आहे. मी आपणांस निवेदन करतो की, ही सभा स्थगीत करून दुसरी महासभा सुरू करावी.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** ही सभा स्थगीत करून आता दुसरी सभा सुरू करण्यात यावी.

**महापालिका सचिव:—** मा. महापौरांनी ही सभा स्थगीत करण्यास सांगीतले आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—**ही सभा अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

---

सूचकाचे नांव :— श्री. जमनादासज पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव :— श्री. राजेश वदारिया

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक २०/०७/२०१८ रोजी स्थगित केलेली व पुन्हा दिनांक १६/८/२०१८ रोजी स्थगित केलेली सभा दिनांक ४/९/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. २४ अ** **दिनांक : ४/०९/२०१८**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक ४/०९/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ६.१५ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— १५/९/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १५/९/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

**३—क**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/०७/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा गुरूवार दिनांक १६/८/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करून पुन्हा स्थगित करण्यात आली. सदरची सभा पुन्हा मंगळवार दिनांक ४/९/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करून काही कामकाज स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा शनिवार दिनांक १५/९/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत उपमहापौर, श्री. जीवन इदनानी हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३२ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ३ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३३ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३४ | श्रीमती श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३५ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ६ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३६ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३७ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ८ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३८ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३९ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १० | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४० | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ११ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४१ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १२ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा | ४२ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १३ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ४३ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १४ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४४ | श्रीमती सुमन राजेश सच्चदेव |
| १५ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४५ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| १६ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ४६ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १७ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ४७ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १८ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ४८ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १९ | श्रीमती शुभांगीनी निकम | ४९ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २० | श्री. भगवान शंकर भालेराव | ५० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५१ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २२ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५२ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २३ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५३ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| २४ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५४ | श्री. विजय चाहु पाटील |
| २५ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ५५ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २६ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ५६ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २७ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५७ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २८ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ५८ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २९ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ५९ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३० | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६० | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३१ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | | |

तर

१. महापौर—श्रीमती मिना कुमार आयलानी

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
२.श्री. हरेश परमानंद जग्यासी, ३.श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ४. श्रीमती पंचम उमेश कालानी, ५. श्री. स्वप्नील मिलींद बागुल, ६. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ७. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ८.

श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ९. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), १०. श्रीम. दिपा नारायण पंजाबी, ११. श्रीमती पुष्पा नाना बागुल, १२. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, १३. श्री. रवि किशनचंद जग्यासी, १४. श्री. गजानन प्रल्हाद शेळके, १५. श्री. रमेश महादेव चव्हाण, १६. श्रीमती जमिताली राजेश चान्पूर, १७. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, १८. श्री. धनंजय बाबुराव बोडारे, १९. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, २०. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, २१. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, २२. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१.श्री. गणेश पाटील, आयुक्त
२.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी
४.श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता
५.श्री. संतोष जाधव, उप लेखाधिकारी
६.श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
७.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
८.श्री. विनोद खामितकर, कनिष्ठ अभियंता
९.श्री. दिपक ढोले, कनिष्ठ अभियंता
१०.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
११. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१२ . श्री. नंदलाल सामतांनी, प्र. सहाय्यक आयुक्त
१३. श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
१४. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१५. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
१६. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१७. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षारक्षक
१८. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक
१९. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२०. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक
२१. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्रीमती नर्गिस खान, लिपीक
३. श्री. बाळु भांगरे, लिपीक

दुपारी २.३९ वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी हे महापौर स्थानी पिठासिन अधिकारी म्हणून आसनस्थ होते.

**महापालिका सचिवः—** ही दिनांक १५/९/२०१८, २०/७/२०१८, १६/८/२०१८, ४/९/२०१८ ची स्थगित सभा आहे. ही सभा सुरू होण्यापुर्वी मा. पिठासिन अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार आरोग्य विभागातर्फे शपथ विधी कार्यक्रम होणार आहे. तर श्री. केणे यांना मी मंचावर बोलवते.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** कधी, कधी आणि कसला शपथ विधी?

**सदस्य, श्री. मनोज सयानीः—** इकडे सफाई होत नाही आणि आता त्याचा शपथ विधी.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजीः—** ऑफिसर लोकांनी शपथ घ्यायला पाहीजे.

**सदस्य, श्री. मनोज सयानीः—** आम्ही लोक प्रतिनिधीनी काम केले आहे, झाडू पण हातामध्ये घेतला आहे, सर्व केले, आता तुमची वेळ आहे, तुम्ही शपथ घ्या.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** मा. महापौर, मा. आयुक्त,....

**सदस्या, श्रीमती मिना सोनेजीः—** साहेब आज जे फॉर्म पाठवले आहेत, मी फक्त एक सेंकद पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलतो, मेन म्हणजे आपल्याला तो फॉर्म इग्लिशमध्ये आलेला आहे. इट इज आऊट ऑफ ओव्हर मराठीमध्ये न येता इंग्लिशमध्ये पाठवला आहे. त्याच्यामध्ये जे पॉईंट लिहीले आहेत, ८० टक्के पॉईट इज नॉट वर्किंग तर आम्ही काय सही देणार साहेब, प्लीज.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—</u>** सर्व प्रथम शासनाने दिलेल्या गाईड लाईननुसार महात्मा गांधी जयंती, १५० वी जयंती व स्वच्छ भारत अभियान या कार्यक्रमाची ४ थी वर्षपुर्ती म्हणजे स्वच्छता ही सेवा हा उपक्रम राबवण्या बाबत शासनाने दिनांक ११/९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये स्वच्छता ही सेवा दिनांक १५ सप्टेंबर २०१८ ते २ ऑक्टोंबर २०१८.....

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** केणे साहेब, एक मिनीट स्वच्छता अभियानाचा हा तुमचा नमुना घ्या, आम्हांला पाण्याचे ग्लास दिलेली आहेत, ही बघा कशी आहेत? ही ग्लास कशी आहेत ते बघा? स्वच्छता अभियान.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—</u>** सन २०१८ पर्यंत राबवण्याचे कळविले आहे. सदर मोहीमे अंतर्गत स्वच्छता शपथ, प्रभाग फेरी, स्वच्छता श्रमदान विशेषतः झोपडपट्टयांमध्ये करण्याचे कळवले आहे. तर स्वच्छताच्या दिशेने आपण एक पाऊल पुढे टाकत सर्व मिळून स्वच्छतेची शपथ घेऊ या, मी सर्वांना विनंती करतो की, मी शपथ घेतो तुम्ही माझ्या मागे शपथ घ्या.

**<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—</u>** आम्ही नाही घेणार शपथ.

**<u>सदस्य, श्री. सुमित सोनकांबळेः—</u>** आम्ही का म्हणून शपथ घ्यायची, आम्ही झाडू हातामध्ये घेतला आहे, खराटे हातात घेतले.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानीः—</u>** मा. आयुक्त साहेब, मी या विषयावर बोलू इच्छितो की, आपण आज ज्या शपथच्या विषयी आणि स्वच्छ अभियाना बाबत बोललात, नगरसेवकांनी शपथ तर दुर राहीली झाडू हातामध्ये घेतला, काम करण्यासाठी तयार झाले. इथे ओला कचरा, सुका कचरा वेगवेगळा करायचा आहे, या सर्व गोष्टी सांगितल्या गेल्या पण आज पर्यंत काहीच झाले नाही. ओला कचरा संपवण्यासाठी आपण वेगवेगळया पध्दती अवलंबल्या आहेत, परंतु प्रशासनाकडून वेगवेगळया वार्डामध्ये ओला कचरा संपवण्यासाठी जी सुविधा देणार होते, ते काम झाले नाही. शपथ दया आणि तुम्ही सुध्दा आमच्या बरोबर शपथ घ्या आणि शपथ आयुक्त साहेब, ही घ्या की, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जी पण कामे माझ्या कार्यालयामध्ये येतील त्यांना सगळयात जास्त प्राथमिकता दिली जातील. तर मी निवेदन करतो की, जसे मी वाचेल तसे तुम्ही सर्वांनी पहीले शपथ घ्यावी. नंतर आम्ही शपथ घेऊ की स्वच्छ भारत अभियानाचा जे पण कार्य असेल ते कार्य माझ्या टेबलवर आल्या नंतर मी जेवण पण नंतर करेल आणि मी ते काम पहीले करेल. संपुर्ण शहरामध्ये किती शौचालय तुटलेले, फुटलेले पडलेले आहेत? मी किती वेळा पत्र दिले आहे की, या शौचालयाची गरज नाही, ते हटवून तिथे समाज मंदिर उभारा, ओला कचरा संपवण्यासाठी तिथे प्रोजेक्ट बनवा, तिथे सी.सी. पेसेज, नाली बनवा, तिथे दुर्गंधी येत आहे, परंतु आज पर्यंत पाच वर्षा पासून पत्र देवून सुध्दा एक पण जुने शौचाल्या तोडले नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे तुम्ही ओल्या कच—यासाठी काही वेळा बोलले आहेत की, ओला कचरा, सुका कच—यासाठी लोकांमध्ये जागृती करा की कशा प्रकारे ओला कचरा आणि सुका कचरा वेगवेगळा ठेवण्यात यावा. त्याची आपण आज पर्यंत व्यवस्था केली नाही. डंपिंग ग्राउंडची हालत एवढी खराब आहे की, संपुर्ण कॅम्प नंबर ५ मध्ये चालिया उत्सव चालला आहे, तिथे दुर्गंधी येत आहे. परंतु त्याच्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहेत. परंतु आपण कचराच संपवून टाकला तर, कच—याची उत्पती संपवली किंवा तो कमी केला तर कचरा उत्पन्नच राहणार नाही. संपुर्ण शहरामध्ये हागणदारी मुक्त करण्यासाठी जो आपण अभियान चालवला होता, या शहरामध्ये आपण भरपूर शौचालय बनवून त्यामध्ये सभागृह कार्यालयातर्फे एक दिला गेला होता. प्रत्येक वार्डामध्ये एक एक युरीनल बनायला पाहीजे. कमीत कमी एक किंवा दोन सिटाचे युरीनल प्रत्येक वार्डमध्ये लागले पाहीजे, मार्केट एरियामध्ये युरीनल लागले पाहीजेत. लोकांना त्रास होत आहे, परंतु ते काम पण पेंडींग पडले आहे. तर मी सर्वात पहीले आयुक्तांना निवेदन करतो की, आपल्या अधिका—यानी शपथ घ्यावी, आयुक्त साहेब आणि सर्व अधिका—यानी शपथ घ्यावी कि, स्वच्छ भारत अभियानचे जे पण कार्य येईल, त्यासाठी आपण प्राथमिकता देवू आणि त्या कामाचा आपण त्वरीत निपटारा करू. जो पर्यंत हे कार्य निपटणार नाही, तो पर्यंत स्वच्छ भारत सफल होणार नाही. तर मा. आयुक्तजी मी जी लाईन वाचत जाईल ती लाईन तुम्ही हात वर करून पहीले वाचत जा, की, आपण सर्व अधिका—यांबरोबर शपथ घ्या.

**<u>सदस्य, श्री. मनोज सयानीः—</u>** ही पण शपथ स्वच्छ भारत व आपल्या शहराशी जोडलेली शपथ आहे. ही शपथ साहेब तुम्हांला घ्यायची आहे. आम्ही तयार आहेत, आम्ही हातामध्ये झाडू पण घेतला आहे, गटार पण साफ केली आहे, परंतु जेव्हा तुमच्याकडे फाईल येते, तेव्हा ती साईडला जाते. तर ही शपथ तुम्हांला घ्यायची आहे, जी स्वच्छ भारतसाठी आहे. युरीनलची, टॉयलेटची, सेग्रीगेशनची या फाईल तुम्ही स्वच्छ करीत नाहीत. त्याला पहीले प्राथमिकता दया.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानीः—</u>** साहेब, एम.एम.आर.डी.ए. च्या टॉयलेटमध्ये पाण्याचे कनेक्शन नाहीत, पाईप लाईन नाहीत, स्वच्छ भारत कसे होणार?

**<u>सदस्य, श्री. सुमित सोनकांबळेः—</u>** साहेब, एकीकडून आपण शहर हागंणदारी मुक्त करण्याचा प्रयत्न करीत आहेत, भरतनगरमध्ये शौचालय नाही आणि तिथे आपण लोकांकडून फाईन वसुल करीत आहेत. तिथ

मोबाइल टॉयलेट दयायला सांगितले आहे, दिड वर्षा पासून मी प्रयत्न करीत आहे, परंतु हागंणदारी मुक्तसाठी पैसे वसुल करीत आहेत.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** आयुक्त साहेब, चेंबर चॉकअप झालेले असतात, त्यासाठी पंधरा, पंधरा दिवस गाडी मिळत नाही. रस्ते, नाल्या कुठल्याही वार्डात बनलेल्या नाहीत, तीन वर्षे फंड दिलेला नाही. एखादया चाळीत जावे तर संपुर्ण नाल्या भरलेल्या असतात. त्या खराब झाल्या आहेत, तीन वर्षे फंड दिलेला नाही आता शपथ कशासाठी घ्यायची. तीन वर्षे फंड दिलेला नाही, कामे केली नाहीत, झोपडपट्टीत कामे झालेली नाहीत. स्वच्छता अभियान कसे राबवायचे?

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मा. महापौरजी, उप महापौर, आयुक्त साहेब, आज पाच वर्षा नंतर आले आहे की, शपथ घ्यायला पाहीजे. शहराचा झिरो गार्बेज करण्यासाठी सांगितले होते. त्यासाठी ५ लाख रूपये दिले जाते.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** टॉयलेट साफ होत नाहीत, तर आम्ही शपथ घेऊन काय करणार? असे आपल्याला वाटते का काम करीत नाहीत म्हणून? आम्हांला तुम्ही सांगत आहेत शपथ घ्यायला तर प्रशासनाने शपथ घ्यावी. ते काम बरोबर करीत नाहीत, फंड ते देत नाहीत. प्रशासनाने सर्वांनी शपथ घ्यावी.
**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मी शपथ घेईल, जरूर घेईल, परंतु पहीले तुम्ही शपथ घ्या, त्या नंतर मी शपथ घेईल.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** तीन, तीन वर्षे फंड दिला नाही, रस्त्याची, नाल्यांची कामे झाले नाहीत, झोपडपट्टीत कामे झाली नाहीत आणि आम्हांला सांगतात की, शपथ घ्या.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** कर्मचारी हजेरी लावून निघून जातात.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** चेंबर भरतात, पंधरा, पंधरा दिवस गाडया येत नाहीत. शपथ तुम्ही घ्या, प्रशासनाने शपथ घ्यावी, सर्व अधिका—यांनी शपथ घ्यावी.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—** तुमच्या कर्मचा—यानी शपथ घेतली पाहीजे, सर्व कामे पुर्ण करून घ्या.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** सर्व लोकांनी पहीले वेळेवर कामावर यायला पाहीजे, त्याची पण शपथ घ्या. किती वाजता येतात आणि किती वाजता जातात, हजेरीची शपथ घ्या. सर्वांची शपथ घ्या, फक्त स्वच्छता बाबत शपथ घ्यायला सांगतात आम्ही तर तयार आहोत. परंतु याची पण शपथ घ्या की, सफाई कामगार बरोबर वेळेवर येतील आणि किती सुटया करतील, किती महीने महीने येत नाहीत, वर्षानुवर्षे येत नाहीत. लोक आहेतच नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** हजेरी लावून निघून जातात.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** मा. महापौर सर, एक सेंकद आज फाईन करण्यासाठी मुकादम आले, सगळया नगरसेवकांनी, मी सर्व नगरसेवकांना विनंती करते की, तुम्ही व्यवस्थित वाचा, हे इंग्लिशमध्ये असण्याचे कारण पण हेच आहे की, आपण चांगल्या प्रकारे लक्ष देवू शकलो नाही आणि सही दया, भरपूर लोकांनी सही दिली आहे. असेच मुकादमातर्फे आमच्याकडे आले आहे. यामध्ये जे पण पॉईंटस आहेत, मी महीला नगरसेवकांना विचारते की, यामध्ये जे दिले आहे. जे जेंडरींग टॉयलेट असतात, त्यामध्ये हॅन्ड ड्रायर, पेपर नॅपकिन, सेनिटरी पॅड, हे सर्व असतात, परंतु आपल्याला कधी दिसले का? आरसे लावले आहेत, यामध्ये लिहीले आहे की , युझींग टॅप ॲन्ड फिटींग म्हणजे लिकेज कुठे पण नाही, असे पण म्हणजे त्यांना आपण स्विकृती पत्र देतो. हीच विनंती आहे की, यांना सही देवू नका. नाही तर सर्वांनी हेच लिहा की, ८० ते ८५ टक्के असे लिहूनच सही दया प्लीज.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मा. महापौर, आयुक्त साहेब, टॉयलेटची अवस्था अशी आहे की, टॉयलेटला दरवाजे नाहीत.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी ही तुम्हांला संधी आहे की, आपण मिटींग स्थगीत करून जाऊ इथे जवळ जे पण शौचालय आहे, त्याची अवस्था आपण बघून तुम्ही डिसाईड करा. जास्त बोलत नाही, महापौरजी.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** सर दुसरे तर सोडून दया, महानगरपालिकेचे जे महीलांचे शौचालय आहेत, ते तर चेक करा साहेब.
**सदस्य, श्री. अरूण आशान:—** सचिव कार्यालयाच्या बाजूला जे शौचालय आहे, ते पण आता बघून घ्या, त्याची काय आवस्था आहे?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी, तुम्हांला चांगली संधी आहे, आज आपण महापौरांच्या स्थानी विराजमान आहेत, माझी तुम्हांला विनंती आहे की, आज संधी चांगली आहे, चौका मारा. आपण चला तुम्ही महापौर आहेत, आपण लवकर चला कोणतेही आजूबाजूवाला सार्वजनिक शौचालया व्हिजीट करू, जो आपले स्वच्छता निरीक्षक सांगतील. तो शोचालय आता जाऊन व्हिजीट करून येऊ. त्याच्या नंतर शपथ घेऊ.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** स्वच्छ भारत अभियानामध्ये टॉयलेटला दरवाजे नाहीत, अस्वच्छता तिथेच आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, स्वच्छ भारत अभियानच्या बाबतीमध्ये शपथ घ्या, नगरसेवकांनी शपथ घेतली पाहीजे, असे शासनाचे जि.आर. आहे का?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** शासनाच्या गाईड लाईन आहेत, वेळोवेळी...

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** कशाला आम्हांला शपथ देतात? आम्ही शपथ घ्यायची आणि ती शपथ काम कोण करणार आहे? प्रशासन आणि कर्मचारी ही शपथ घेतल्या नंतर शौचालय साफ ठेवू आणि काम करणा—या माणसाने काम नाही केले तर आम्ही शपथ घेऊन फायदा काय होणार?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. मुख्यमंत्र्याचे स्थायी आदेश आहेत की डंपिंग ग्राउंड नविन देवू नये.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** अहो सुर्वे एक मिनीट जर साफसफाई करणारे कर्मचारी तुमच्या अख्त्यारीत काम करीत आहेत, तुमी त्यांचे बॉस आहेत. ते काम जी व्यवस्थित करणार नसतील आणि आम्ही सांगितले की, आम्ही आमचा परिसर स्वच्छ ठेवू, आम्ही आमचे शौचालय स्वच्छ ठेवू त्यासाठी महापालिका प्रशासन काही करणार नसेल, ते कर्मचारी काम करणार नसतील तर आम्ही शपथ घेऊन काय करणार आहेत. आम्ही थोडे ते स्वच्छ करणार आहेत. जे स्वच्छ करणार आहेत, त्यांनी पण शपथ घेतली पाहीजे ना.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—** मा. महापौर, मा. आयुक्त, साहेब आपण कोणार्कला जवळ जवळ पाच लाख रूपये देतो, महापालिकेच्या माध्यमातून मग आपल्या अधिका—यांनी/कर्मचा—यानी त्यांच्याकडून काम करून घेतात का? ही तरी शपथ खावी. प्रामाणिकपणे आम्ही त्यांच्याकडून काम करून घेतो का? का चिरीमिरी घेतो. ते स्पष्ट करावे. नाही तर आम्ही स्पष्ट करून दाखवू.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मा.महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, साहेब, आता ऑफिसमध्ये तुमच्या बरोबर चर्चा झाली. जी पॉवर स्विपींग जसे मी सांगितले होते, जर अशा ठेकेदारांना ठेका मिळेल आणि ते आम्हांला ऑफर करतात की, तुम्ही कंप्लेट करू नका तर स्वच्छ भारत कसे बनणार? ठिक आहे, अशी पण कंप्लेट करा तर ठेकेदार म्हणतो की ठिक आहे, आजचे मी कटींग करतो, तर त्याने महीनाभर काम केले नाही, त्याचे पैसे त्यांना मिळतील. तर शहर चांगले कसे बनणार? कसे स्वच्छ होणार? संपुर्ण डयुटी त्यांनी केली पाहीजे, आम्ही करतो तरी शहर स्वच्छ होत नाही. आता तर प्लास्टिक पिशव्या पण बंद झाल्या आहेत.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—** आम्ही प्रुफ करून दाखवू.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** सन्माननिय महापौर, सन्माननिय सर्व सदस्य, १५ सप्टेंबर पासून तर दोन ऑक्टोंबर पर्यंत स्वच्छता ही सेवा हे अभियान चालू वर्षात आपण सुरू करीत आहोत, हे अभियान चार वर्षा पासून चालले आहे आणि आपले मा. पंतप्रधान यांनी चार वर्षा पासून सुरू केले आहे. दर वर्षी १५ सप्टेंबर तर दोन ऑक्टोंबर या कालावधीमध्ये हा पंधरा, सतरा दिवसाचा प्रोग्राम आहे. प्रोग्राममध्ये, या कालावधीमध्ये आपण स्वच्छता ही सेवा हे अभियान राबवतो. कुठलेही अभियान राबवण्या मागचे उद्देश आपल्या सर्वांना माहीती आहे, आपण सगळे जन निवडून आलेले लोकप्रतिनिधी आहेत, आपल्याला माहीती आहे, अभियानामध्ये लोक जागृती हा अतिशय महत्वाचा भाग असतो आणि या लोक जागृतीसाठी आपण ही शपथ घेणे, सेंसस्टाशन करणे एखादया त्या स्वच्छता या विषयावरती स्वच्छतेचे काम होते की नाही, स्वच्छता ही फक्त कर्मचा—यांचीच जबाबदारी आहे का? स्वच्छता ही फक्त कर्मचा—यांची जबाबदारी नाही. या देशातल्या, या शहरातल्या प्रत्येक व्यक्तीला वाटले पाहीजे की, स्वच्छता ही माझी जबाबदारी आहे. कुठे कचरा पडला तर तो कोणी फेकला आहे. तो कोणी उचलला पाहीजे. हा विषय महत्वाचा नाही. आपल्याला अशी जनजागृती निर्माण करायची आहे, असे आपल्या मा. पंतप्रधानाचे स्वप्न आहे की, कचरा पडलेला आहे, मला दिसला की तो कचरा मी उचलून टाकील. अशा स्वरूपाचे सेंसेस्टायशन करण्यासाठी आपण हा अभियान या १५ तारखेपासून आपण सुरू करीत आहोत, आज १५ तारखे पासून अभियान सुरू करायचे आहे, कर्मचा—यांना शपथ दया, कर्मचा—यांना आम्ही बोलवले तर ते शपथ घेणारच आहेत. विषय तो नाही, आज योगायोगाने आपली महासभा आहे आणि महासभेमध्ये सर्व लोकप्रतिनिधी या ठिकाणी येणार होते आणि मग मीच त्यांना सुचवले होते की, आज सर्व लोकप्रतिनिधी येणार आहेत, आपण

सर्वजण मिळून शपथ घेऊ. एकत्रित शपथ घेण्याचा उद्देश असा आहे की, हा मॅसेज जनते पर्यंत गेला पाहीजे. आता तुम्ही शपथ घेतली नाहीत तरी आम्ही लोकांपर्यत जाणार तिथे विद्यार्थ्यांना शपथ देणार. कारण आपल्याला लोकांची मानसिकता बदलायची आहे. हीच मानसिकता बदलायची आहे, हे काम याचे आहे की, हे काम त्याचे आहे. स्वच्छता हे काम एका व्यक्तीचे नाही, संपुर्ण सगळया समाजाचे काम आहे. जो पर्यंत ही भावना तळागाळातल्या व्यक्ती पर्यंत येत नाही, तो पर्यंत स्वच्छता होणारच नाही. मग म्हणूनच मला वाटते की आज बरे झाले या निमित्ताने या विषयावर चर्चा झाली. आपण आमचे बरेचसे ड्रॉबॅक याच्यामधले दाखवले. हरकत नाही, ड्रॉबॅक आहेत म्हणून स्वच्छता नाही. आपल्याला या ड्रॉबॅकला वरकम करायचे आहे. त्याच्यावर मात करून पुढे जायचे आहे आणि मुळात आपली मानसिकता बदलायची आहे आणि ती मानसिकता बदलण्यासाठी ही शपथ घेतली आपण म्हणून स्वच्छतेचा कार्यक्रम जनरल बॉडीसमोर ठेवलेला होता, याचा उद्देश एकच होता की आपण सर्व जण एकत्रीत ही शपथ घेऊ. लोकांपर्यंत हा मॅसेज गेला पाहीजे आणि लोकांपर्यंत पुढच्या पंधरा दिवसामध्ये आपल्याला प्रत्येक वार्डामध्ये कार्यक्रम घ्यायचे आहेत. त्या संदर्भात आपल्याला रॅली पण करायची आहे, जनजागृती करायची आहे आणि जनजागृतीची सुरूवात आज महासभा आहे, १५ तारेखे पासून कार्यक्रम सुरू होत आहे. आज दिल्लीला मा. पंतप्रधान यांनी कार्यक्रम सुरू केला आहे. आज आपली महासभा आहे, तिथे आपण करू या विचाराने आम्ही ही शमथ घेण्याचा कार्यक्रम ठेवलेला होतो, तो आपल्याला जर योग्य वाटत नसेल तर माझी तुम्हांला विनंती राहील की हा मानसिकता बदलण्याचा भाग आहे. स्वच्छता ही कुठल्या एका व्यक्तीची, कुठल्या कर्मचा—याची यांची जबाबदारी नाही, तर प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. हीच मुळात जी भुमिका आहे, जो पर्यंत प्रत्येक जण आक्षेप करीत नाही. तो पर्यंत स्वच्छतेचे काम होणार नाही आणि ते आपल्याला करायचे नाही. मला वाटते की आपल्याला जर याची सहमती असेल तर शपथ घेऊ या सहमती नसेल तर ठिक आहे. आम्ही आमचा कार्यक्रम करूच त्या बदल काही वाद नाही. मला वाटते सर्व सदस्यांनी आमची विनंती स्विकार करावी आणि स्वच्छतेचा कार्यक्रम करावा.

या वेळी सदस्य, श्री. दिपक सिरवानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—** साहेब तुमच्या प्रत्येक आव्हानाला आम्ही पुढे येऊन काम केलेले आहे. तुम्ही जेव्हा जेव्हा सांगितले स्वच्छता घ्या, आम्ही झाडू हातामध्ये घेतले आहेत. कुठे आम्ही कमी पडलो? तुमचे कर्मचारी कमी पडतात, त्यांना तुम्ही का नाही बघत? ठिक आहे, आमच्याकडून ऐकुन घ्या.....

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—** कोण कमी पडले हा विषय नाही?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** साहेब तुमचा विषय आमच्या लक्षात आला आहे, आम्ही इथे लोकांना दाखवण्यासाठी आम्ही खोटी शपथ घ्यावी, अशी तुमची इच्छा आहे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—** खोटी शपथ घ्यावी, असे नाही....

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** लोकांना दाखवावी असे आहे, विषय असा आहे, जनजागृती करण्याचे काम आम्ही करतो आणि नगरसेवकांना कशी जनजागृती करायची हे माहीती आहे. तुम्हांला एक छोटेसे उदाहरण देतो, गणेश उत्सव सुरू आहे, माझ्या मंडळामध्ये जनजागृती करण्यासाठी देखावा आम्ही त्याच्यावर केलेला आहे, साफसफाईवर स्वच्छता राखण्या बाबत. आम्हांला जनजागृती कशी करायची हे माहीती आहे. परंतु जनजागृती करून या शहरामध्ये स्वच्छता अभियान घेऊन शहर स्वच्छ होणार आहे का? हा विषय महत्वाचा आहे, जरी पंतप्रधानानी सांगितले असेल, ठिक आहे पंतप्रधानाचे या मागच्या वर्षी त्यांच्या आव्हानाचे स्वागत केले आणि त्या पध्दतीने काम केले. परंतु प्रशासनाच्या माध्यमातून जसे ओला कचरा, सुका कचरा वेगळा झाला पाहीजे. त्यासाठी प्रशासनाने प्रयत्न केले पाहीजेत, एकही प्रशासनाने प्रयत्न केला नाही. त्या नंतर शौचालयाचा विषय इथे निघाला, शौचालयाच्या बाबतीमध्ये आज आपण जर तिथे जाऊन बघितले तर रूमालाने नाक धरून सुध्दा जाऊन आपण उभे राहू शकत नाही. लोक झोपडपट्टीमधले कसे राहतात त्याची आपल्याला विचार करावे लागेल? दुसरा विषय असा आहे, या विषयावर शौचालयाच्या बाबतीत मी आपल्याला चार वेळा सांगितले आहे की, आमच्याकडे शौचालयाची परिस्थिती फार खराब आहे. ती सुधारण्यासाठी आपण प्रयत्न करा. आपल्या माध्यमातून तसे प्रयत्न व्हायला पाहीजे होते, एखादे शौचालय खरच खराब आहे, आम्ही सांगतो ते खोट असू शकेल. तुम्ही त्याची तिथे जागेवर जाऊन खात्री करून घ्यायला पाहीजे. ती आपण करीत नाहीत, ती केली पाहीजे. खरोखर त्याची परिस्थिती खराब असेल लोकांना त्रास असेल तिथे गेल्यावर ते पडले, त्याची जीवीतहानी जर होणार असेल, तर ते काम प्रशासनाच्या माध्यमातून व्हायला पाहीजे. आपल्याकडून तसे काही झालेले नाही आणि ते झाले नसल्यामुळे पुन्हा स्वच्छ भारत अभियान घेऊन आम्ही लोकांमध्ये जनजागृती करायची त्या वेळेला लोकांना सांगायचे उघडयावर शौचालयास बसू नका ते सांगतील तुम्ही आम्हांला शौचालय चांगले करून दया. ते जर चांगले नसणार तर आम्ही बसणार त्यांना कुठल्या पध्दतीने आपण सांगणार आम्ही तुमच्यावर कारवाई करू? तें आम्ही अगोदर केले आहे आणि केल्या नंतर आता परत परिस्थिती खराब आहे. ते बनवावे लागेल, ते जर चांगले असेल तर आम्ही त्यांना बंदी घालू शकतो, जर ते चांगले नसेल तर कुठल्या तोंडाने आम्ही लोकप्रतिनिधी बोलू शकतो? ते करण्याचे काम तुमचे होते, तुम्ही करीत नाहीत. आजही आमच्या पॅनलमध्ये

एम.एम.आर.डी.ए. चे शौचालय असतील १० वर्षा पुर्वी बनवलेले पडायला आलेले आहेत आणि ते जर पडले तर जीवीतहानी होणार आहे. प्रभाग अधिका—यांना नेऊन दाखवले आहे, एक रूपयाचे पण काम नाही, ते बघून आले तरी काहीच कारवाई नाही. यांना यादी दिली, स्वच्छता निरीक्षकांनी दिली. त्यांनी सांगितले शौचालय धोकादायक आहेत. तरी यादीवर काम केले नाही. शौचालय तोडून पडलेले आहेत, त्यांची वर्क ऑडर निघाली, वर्क ऑर्डर आपल्याला दयायची होती, मागच्या आयुक्तांनी ते मंजूर केलेले आहेत, ती दिलेली नाही. आपण सरसकट सगळी कामे रद्द करतो असे सांगितले. कारण पैसे नाहीत म्हणून, ठिक आहे पण जे गरजेचे काम आहे ते केले पाहीजे, स्वच्छ भारत अभियानमध्ये ही कामे महत्वाचे आहेत. ती आपल्याकडून केली नाहीत. पुन्ही स्वच्छ भारत अभियान राबवायचे असेल तर मोठा प्रश्न सगळयांच्या समोर आहे आणि तो प्रश्न हातळण्यासाठी आपण आता निर्णय घ्या. तर आम्ही स्वच्छ भारत अभियानामध्ये भाग घेऊ, नाही तर घेणार नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, स्वच्छ भारत अभियानामध्ये सामिल होणे आणि शपथ ग्रहण करणे, कोणी पण उल्हासनगरचे नागरीक किंवा नगरसेवक नसेल की, जो हे करणार नाही. एक वर्षापुर्वी जेव्हा स्वच्छ भारत अभियान सुरू झाले, प्रत्येक नगरसेवकांनी संपुर्ण वेळ व्हॉटस अपवर बघणार, फेसबुकमध्ये बघणार, मिडियामध्ये बघणार फक्त आणि फक्त नगरसेवक स्वच्छ भारत अभियान बनवायला लागले होते. प्रत्येकाला वाटते की, आपले शहर स्वच्छ झाले पाहीजे आणि आपले उल्हासनगर नंबर वन झाले पाहीजे. यामध्ये सर्वांनी सहयोग दिले आणि सर्वांनी झाडू घेऊन रस्त्यावर निघाले आणि लोकांमध्ये पण जनजागृती केली. हे खरे आहे की, एका अधिका—याचे आणि एका कर्मचा—यांचे हे काम नाही. स्वच्छ भारत सफल करणे. प्रत्येकाच्या मनामध्ये स्वच्छ भारताच्या प्रती प्रेम असले पाहीजे आणि स्वच्छतेच्या प्रती प्रेम असायला पाहीजे आणि सर्व लोकांनी हे दाखवले पण लोकांनी, शाळेतील विद्यार्थ्यांनी, वेगवेगळया कर्मचा—यांनी स्वच्छ भारत अभियानामध्ये भाग घेतला आणि शहरामध्ये साफसफाई दिसत होती. परंतु मी तुम्हांला निवेदन करतो की, आपण महानगरपालिकेचे मुख्य या नात्याने, आयुक्त या नात्याने कमीत कमी आपले जे अधिकारी आहेत, त्यांच्यामध्ये भावना जागृत व्हायला पाहीजे की मी एक नोकरी करीत आहे, किंवा मी डयुटी करीत आहे. डयुटी समजून डयुटी न करता मी एक उल्हासनगरचा रहिवासी आहे, भारताचा नागरीक आहे आणि स्वच्छ भारत अभियानाला प्राथमिकता देवून छोटे छोटे जे मामुली विषय त्यामध्ये फंड पण खर्च होत नाही, त्या फाईलीचे लवकरात लवकर निपटारा करू. अशा प्रकारचे भरपूर असे छोटे छोटे कामे आहेत, त्यामध्ये एक रूपया पण खर्च होणार नाही. जसे की श्री. राजेंद्र चौधरी यांनी सांगितले की, भरपूर शौचालय तुटलेले आहेत, १० ते २० वर्षा पासून तुटून पडलेले आहेत. मी माझ्या वार्डाचे एक शौचालय श्री. निंबाळकर यांना दाखवले, ते बघून हैरान झाले. कमीत कमी एक गाडी कचरा त्या शौचालयामध्ये पडलेला आहे. शौचालय तुटलेला आहे, २० वर्षा पासून कोणी पण त्या शौचालयाचा वापर केला नाही. तरी सुध्दा ते शौचालय हटवण्यासाठी आयुक्त साहेबांनी सांगितले की, हे शौचालय १० दिवसामध्ये हटवले जाईल. जर इथे आपले इंजिनयर जितूजी इथे असतील तर त्यांना बोलवा, त्या शौचालयाला १० दिवसाच्या जागी एक वर्ष जास्त झाले, त्यांनी सांगितले होते की, १० दिवस लागतील, ११ दिवस लागणार नाही. परंतु आज पर्यंत त्या शौचालयासाठी जी पण कारवाई करायला पाहीजे, ती पुर्ण झाली नाही. अशा प्रकारे छोटे छोटे काम आपले प्रशासन या गोष्टी बघून माझा वेळ आहे, सकाळी १०. ०० वाजे पासून तर सायंकाळी ५.३० वाजे पर्यंत माझी डयुटी संपत आहे, असे न समजता मी सुध्दा स्वच्छ भारत अभियानाचा एक हिस्सा आहे. अशा प्रकारे आपण जर काम केले तर हे स्वच्छ भारत अभियान सफल होईल आणि आपण या वेळी महाराष्ट्रामध्ये नंबर वन आणि देशामध्ये नंबर वन जरूर येऊ शकतो. आपण सर्वजण शपथ ग्रहण करू, परंतु तुम्ही सुध्दा आश्वासन दया की, कोणती पण फाईल जी स्वच्छ भारत अभियानाची, जास्त खर्च होणार नाही आणि तुम्हांला योग्य वाटत असेल आपण तिथे जात आहेत, त्या फाईलला वेळ न लावता त्वरीत निपटारा करण्यात यावा, आजच्या आज. अशा प्रकारे जर आपण काम केले, तर आपण जरूर नंबर वन बनू शकतो. सर्वांना निवेदन करतो की, तुम्ही शपथ दया, आम्ही सर्व शपथ घ्यायला तयार आहेत आणि आज पासून आपण आपल्या मनामध्ये ही शपथ घ्या, मी कोणतही काम स्वच्छ भारत अभियानाचे थांबवणार नाही, धन्यवाद.

यावेळी सदस्य श्री. आकाश पाटील यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** सन्माननिय महापौर, स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत माझ्या प्रभागामध्ये जूने डंपिंग ग्राउंड आहे. आता दोन वर्षा पुर्वी बंद झाले आहे. साहेब तुम्ही आजही बघा परिस्थिती एवढी खराब आहे, चालायला पुर्ण रस्त्यावर जुने डंपिंगचा कचरा येत आहे. लोक कशी राहतात, काय राहतात, कशा पध्दतीने राहतात? ही वस्तुस्थिती बघा मला वाटते अशा परिस्थितीमध्ये शौचालयाची अवस्था आमच्या इकडे एकदम दयनीय आहे. अशा परिस्थितीमध्ये आपले सन्माननिय पंतप्रधान यांनी स्वच्छ भारत अभियान सुरू केले आहे. अभिमान वाटतो पण मला साधी एक गोष्ट आठवते, चष्म्यावर लिहीले आहे स्वच्छ आणि भारत, चष्म्यावर एका बाजूला लिहीले स्वच्छ आणि दुस—या बाजूला लिहीले भारत, जिथे स्वच्छ लिहीले आहे, तिथे भारतच आहे आणि जिथे भारत आहे, तिथे स्वच्छच नाही. अशी आपली परिस्थिती झालेली आहे.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, दिनांक १५/९/२०१८ ते २ ऑक्टोंबर पर्यंत स्वच्छता अभियान आहे. साहेब, आता स्वच्छता अभियानामध्ये जेव्हा लोक प्रात:विधीला सकाळी जातात, तर चार भिंती समोर दरवाजाच नाही. आज झोपडपट्टीमध्ये अशी परिस्थिती आहे, माझ्या जय भिमनगरमध्ये, शक्ती कॉलनीमध्ये दरवाजे नाहीत. मग १५ तारखेच्या आतमध्ये दरवाजे बसतील का? स्वच्छता अभियानमध्ये जेव्हा प्रात:विधीला जातात त्या लोकांसाठी तिथे आडोसा नाही लोक पडदा लावतात, पदर लावतात, ओढनी लावतात. बसतांना, साहेब आम्हांला इथे सांगायला लाज वाटते, १५ तारखेच्या आतमध्ये दरवाजे लागतील का? स्वच्छता अभियानाची सुरूवात करतात लोकांची लाज रस्त्यावर ठेवून आणि बाहेर रस्त्यावर प्रातविधी करू नका म्हणून सांगत आहेत, नाही तर १०० रूपये, ५०० रूपये दंड घेतात, कधी त्यांना गुलाबाचे फुल देतात. दरवाजें लावा साहेब, खोटी शपथ किती दिवस घेणार? मनाला किती तसल्ली देणार? आज स्लम एरियामध्ये सकाळी लोकांची लाईन लागते. तेव्हा एक माणूस बाहेर उभा राहतो, एक माणूस आतमध्ये जातो तो सांगतो की, आतमध्ये कोणी तरी आहे. या परिस्थितीमध्ये १५ तारखेला आपण स्वच्छता अभियान राबवणार आणि शपथ घेणार आणि लोकांना सांगणार की, दरवाजा आता दोन तारखेच्या नंतर लावणार. मग अशा ठिकाणी साहेब, तुम्ही दरवाजे तरी बसवा. मग साफसफाई होत राहील. लोक घरातून पाणी घेऊन जातात, पाण्याचा पत्ताच नाही मगाशी मिना सोंडे मॅडमने सांगितले की, अठरा, अठरा कलमांचे तुम्ही पत्र पाठवले आहे. एक पण त्याच्यामधले तुमच्याकडे नाही, एक पण नाही. अशा परिस्थितीमध्ये आपण लोकांच्या लोकांच्या समजुती करीता किंवा आपल्या मनाच्या समजुती करता, साहेब तुमच्या बरोबर आम्ही शपथ घ्यायची. काय करायची शपथ, आता अर्ध्या तासात, एक तासात आम्ही वार्डामध्ये जाणार. लोक संध्याकाळी ५.०० वाजता परत प्रात:विधीला जाणार. तेव्हा एकजण बाहेर उभा असणार, बोलतो की कोणी आतमध्ये गेला आहे. साहेब, ही परिस्थिती आहे आणि ही सत्यता आहे. स्वच्छता अभियानामध्ये साहेब, आम्ही पण झाडू हातामध्ये घेतलेला आहे. आमच्या गट नेत्यांनी, श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितले की आम्ही तुमच्या बरोबरीला काम करतो. तुमचे स्विय सहाय्यक पण सांगतील आणि तुमचे स्वच्छता निरीक्षक पण सांगतील. ज्या गोष्टी खरोखर जरूरीच्या आहेत, त्यांची लाज झाका, साहेब,लाज झाका, झाकली मुठ सव्वा लाखाची म्हणतात, त्या प्रमाणे लोकांसाठी आपण तेवढे तरी करा. कमीत कमी त्यांना तरी बरे वाटेल की, चला या स्वच्छता अभियानांमध्ये एक दरवाजा तरी लागला. साहेब, खुप पोटतिडकीने बोलावे लागते कारण अशा वेळेस जेव्हा लाईन लागते ना दरवाजामध्ये संडासाला तेव्हा आवाज दयावे लागते आतमध्ये कोणी आहे? तर तो तिकडे डब्बा वाजवतो अशी परिस्थिती आहे. प्लीज स्वच्छता अभियानामध्ये आम्ही तुमच्या बरोबर आहोत, परंतु शौचालय बांधून घ्यावेत अगोदर शिवशक्ती कॉलनी तिकडे दरवाजे नाहीत, तिकडे दरवाजे लावून घ्यावेत.

या वेळी सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर व सदस्या, श्रीम. कविता पंजाबी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** मा. महापौर साहेब, आयुक्त साहेब, अरूणजीनी प्रभाग क्रमांक १३ मध्ये काही ठिकाणे सांगितली पण काही ठिकाणे त्यांच्या लक्षात राहीली नाही, विसरले असतील. मद्राशीपाडा नावे नोंद करून घ्या, मद्राशी पाडयातले चार शौचालयाचे दरवाजे नाहीत. वाल्मीकीनगरमधील महीलांचे शौचालय सहा पैकी दोन दरवाजे नाहीत आणि वाल्मीकीनगरमध्येच पुरूषांच्या शौचालयास चार दरवाजे नाहीत. बॅरेक नंबर १३५७ सितारामनगर इथे पण नाहीत. म्हणजे असे आमच्या प्रभागातील जवळ जवळ ८ ते ९ ची दरवाजे नाहीत आणि अरूणजीनी सांगितल्या प्रमाणे ती गोष्ट तेवढीच बरोबर आहे की बाहेर जो माणूस उभा राहतो किंवा लेडीज उभी राहते, ते दुस—याला थांबवते की, कोणी तरी आत गेले आहे, जरा थांबा. मला वाटते एवढा वाईट विषय कुठलाच नसेल? ज्या शौचालयाला दरवाजे नाहीत आणि आम्ही निंबाळकर साहेबांनी आमच्या प्रभागाला लागून रेल्वे लाईन आहे, तिथे काही लोक दरवाजे नसल्यामुळे रेल्वेला जावून बसायचे. त्यांना सकाळी ५.०० वाजल्या पासून मुकादम आणि कर्मचारी त्यांना बसून दयायचे नाही. त्यांना दंड आकारायचे, त्यांना मारहाण करायचे आणि ती गोष्ट आम्ही मान्य केली की बरोबर आहे. काही ठिकाणी ती अवस्था का झाली. आपण याचा पण मुख्य विचार करावा.

**<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारेः—</u>** मा. महापौर, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, दोन तीन दिवस स्वच्छतामध्ये ड्रेनेज येते, प्रत्येक गल्लीमध्ये ड्रेनेज येते, रोडवर ड्रेनेज येते आणि जास्तीत जास्त शाळेंच्या समोर. आमची जी एन.सी.टी. शाळा आहे, त्याच्या समोर आपल्याकडे ड्रेनेजची लाईन आहे. पण बिचारे कर्मचारी आतमध्ये उतरून ड्रेनेज जे साफसफाई करतात, त्यांना पेमेंटच नाही. चला संप, गाडी आहे उभी पण कर्मचारी नाहीत. का तर त्यांना पेमेंट नाही. जर स्वच्छता स्वच्छता बोलतो, तर साफसफाई करणारे जे कर्मचारी आहेत, त्यांना जर व्यवस्थित वेळेवर पगार मिळाला,तर खरच विभाग स्वच्छ होईल. तुम्ही एन.सी. टी शाळे समोर बघून या समोर शाळा चालू आहे आणि समोरून सगळे ड्रेनेज वाहत आहे. शाळेची मुले त्या रिक्षाच्या बाजुला उडया मारून बसेले आहेत. म्हणजे शाळा, त्याच्या नंतर लोकांकडे गौरी, गणपती आहेत, अक्षरश: लोक थकले आहेत की, मॅडम झाकण उघडुन ठेवले आहे, कधी येणार? गाडी आहे, सफाईवाला नाही, का नाही पेमेंट विचारा. पवार साहेबांना फोन केला काय करू गाडी आहे, पण त्यांना पेमेंट दिलेले नाही ते कामावर येणार नाहीत. त्याचे काय करणार? कधी या गाडया चालू होणार? म्हणजे

असे प्रत्येक वेळेला महासभेमध्ये येऊन ओरडत राहयचे नाही तर आम्ही सगळयांना फोन करायचे तर ती लोक सांगतात, ठेकेदार आहेत, त्यांना फोन करायचा आम्ही काय अगदी ग्राउंड लेव्हल पासून प्रत्येकाला फोन करत बसायचे ड्रेनेजची गाडी उभी आहे, माणसे पाठवा, ती माणसे पण आहेत,पण ते म्हणतात की, आम्हांला पगारच नाही तर आम्ही काम कसे करणार? तर प्लीज त्या सफाई कामगारांकडे बघा, लवकरात लवकर त्यांचे पेमेंट करा, तरच आपला एरिया स्वच्छ होईल. गणती आहेत, आम्हांला गौरी गणपतीला जायचे आहे, पण गल्ली ओव्हरफुल आहे आणि सगळयात मोठी गोष्ट म्हणजे हा हिंदुचा एवढा मोठा सण असून आम्ही पन्नास टक्के महीला आहेत, गौरी गणपतीचा सण आहे आणि आज तुम्ही मिटींग बोलवली म्हणजे लोकांच्या प्रश्नासाठी आम्हांला यावे लागले आहे. आलो आहे, पण लवकर मिटींग संपवा म्हणजे आम्हांला जायला हवे, कारण गौरी गणपतीचा सण आहे. पण सर्वांत महत्वाचे म्हणजे त्या सफाई कामगारांना पगार दया, तरच ते ड्रेनेजच्या गाडीवर येतील.

या वेळी सदस्या, श्रीम. सुमन सचदेव यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. किशोर वनवारीः—** मी दोनच शब्द बोलतो, आज सन २००२ पासून ते सन २००७ पर्यंत जेव्हा मी नगरसेवक होतो, तेव्हा प्रत्येक वार्डामध्ये २५, २५ कामगार राहत होते. सन २००७ मेध्ये ते कमी होऊन १९ झाले. सन २०१२ मध्ये १९ मधून कमी होऊन ते १६ झाले, सन २०१७ मध्ये आता ९ कामगार आहेत. प्रत्येक वार्डासाठी. सन २०१४ पासून कोणी गैरहजर आहेत, कोणी मृत्यु झाले आहेत. कोणी मोठया सुटीवर आहेत, त्यामुळे प्रत्येक वार्डामध्ये साहेब, दोन सफाई कामगार, एक सफाई कामगार नालीसाठी आहे. कमीत कमी १५०, १५० ते, २००, २०० नाल्या आहेत. प्रत्येक वार्डामध्ये नगरसेवकांकडे. परंतु त्यासाठी सफाई कामगार दोन मधून एकच हजर असतो. तो किती नाली काढेल आणि किती कचरा भरेल? किती जाग्यावर फेकेल? नंबर वन , नंबर दोन जे निंबाळकर साहेबांनी मागच्या वर्षी संडास पास केले होते, स्वच्छतेच्या दृष्टीने कुठे पण रिकाम्या जागेवर शौच नाही व्हायला पाहीजे. कोणी पण संडाससाठी रिकाम्या जागी गेले नाही पाहीजे. परंतु ते संडास आज पर्यंत चालू झाले नाहीत. एक वर्ष झाले त्याच्या नंतर आमचे सभागृह नेता जमनादास पुरस्वानी यांनी आपला फंड सर्वांना देवून सांगितले की, रिकाम्या जागेमध्ये शौच पण काय युरीनल पण व्हायला नाही पाहीजे. त्यामुळे त्यांनी आपला फंड दिला आणि प्रत्येक सदस्यांनपा वार्डामध्ये युरीनल दिले की, जिथे लोक रस्त्यावर युरीनल करतात, तिथे रेडीमेड युरीनल लावा. हे पण स्वच्छताशी संबंधित आहे आणि मी आपल्याकडे १० वेळा, १५ वेळा आलो आहे. जेवढे पण शौचालय तुटलेले आहेत, तिथे चार समस्या आहेत. एक जिथे पण नगरसवेकांच्या वार्डामध्ये शौचालय तुटलेला आहे, तिथे कचरा जमा होतो. दुसरा प्लॉट हडप करण्याची भिती असते, कोणी प्लॉट घेऊन जाईल, कोणी तिथे ऑफिस बनवले. त्यामुळे तुम्हांला विनंती केली की तिथे कंम्पाउंड वॉल बनवून आतमध्ये बोर्ड लावण्यात यावा की, हा प्लॉट महानगरपालिकेचा आहे. तुम्ही महासभेला आश्वासन दिले, काम कुठे पण कंम्पाउंड वॉल, किंवा समाज मंदिर बनवायचा असेल तर किती पण असतील तर मी करेल. तर मला वाटते अजून एक पण झाला नाही. तेव्हा सर्वांना आपण महासभेमध्ये आश्वासन दिले होते. ते पण स्वच्छतेशी संबंधित आहे, संडास तुटलेला आहे, कचरा जमा होतो, कंम्पाउंड वॉल लावले नाही तर तिथे लोक कचरा फेकतात, प्लॉट हडप होतो. अशा ब—याच गोष्टी उल्हासनगरमध्ये आहेत, मी जो तुम्हांला सांगतो, आजच्या दिवसामध्ये अनधिकृत बांधकाम बनवणे सोपे आहे, परंतु तोडणे खुप कठीण आहे. तोडण्यासाठी आजच्या दिवसामध्ये गव्हर्नमेंटचा प्लॉट हडप होते, तेव्हा विचारतात की, तु कुठे राहतो आणि कंप्लेट कुठे करतात. आज पब्लिकची ही हालत आहे, तर नगरसेवकांचे पण असेच होईल. जर आपला शौचालयाचा रिकामा प्लॅट कोणी घेत असेल, तर महानगरपालिका कंम्पाउंड लावून, बोर्ड लावण्यात यावा आणि जे आमच्या सदस्यांनी सांगितले शौचालयांना दरवाजे नाहीत, रिपेरींग होत नाहीत. साहेब,ही शपथ आहे ना ती वन साईड व्हायला नाही पाहीजे. अजून आमचे एक रूपयाचे पण काम झाले नाही.  तर आम्ही वार्डमध्ये काय रिझल्ट देणार. मागच्या वेळेस पण सर्वांनी हातात झाडू घेतले, तेव्हा आयुक्त साहेबांनी टी शर्ट घातला होता आणि नगरसेवकांनी पण टी शर्ट घातला होता. स्वच्छ भारत अभियान ओके झाले पाहीजे. त्यासाठी कॅम्प नंबर १ ते ५ पर्यंत रॅली काढली होती. त्यामुळे आपल्याला तीसरा नंबर मिळाला आहे.
**उप—महापौर मथा पीठासीन अधिकारीः—** किशोरजी तुमचे बोलणे झाले आता प्लीज.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—** मा. आयुक्त साहेब, आता गणपती उत्सवाचे तीसरा दिवस आहे, गौरी येणार आहेत, गटारीचे पाणी रस्त्यावर वाहते त्याचे काय? त्याचे उत्तर कोण देणार आहे? जे पाणी वाहते, शाळा आहेत किंवा कोणाच्या घरा समोर.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** बोडारे मॅडमनी जे सांगितले की कामगारांना पगार मिळत नाही, त्यामुळे ते काम करीत नाहीत, हे खरे आहे का? प्रशासनाने सांगितले पाहीजे ना.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाणः—** कोण सांगणार?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** ठेकेदार कोण आहे? कोणाला काम दिले आहे? तो काम का करीत नाही, हे कोण सांगणार?

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** चौधरीजी, रमेशजी तुमचे सगळयांचे बोलणे झाले असेल तर मी आयुक्त साहेबांना निवेदन करतो की....

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** माझा छोटासा प्रश्न आहे,

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—** उत्तर देणेसाठी पवार साहेब आले आहेत.

**उप महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** मी तेच बोलत आहे की, सगळयांतर्फे हा प्रश्न निर्माण केला आहे. त्याचे उत्तर

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** मा. महापौर, अजनू काही लोकांना बोलायचे आहे, कृपया करून त्यांना पण बोलण्याची संधी देण्यात यावी. खुप वेळे पासून उभा आहे.

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** दादा बोला, बोला.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** मी पहीले धन्यवाद देतो की, आपल्या देशाचे पंतप्रधान आहेत, मा. श्री. नरेंद्र मोदीजी, त्यांनी दिवसरात्र जनतेच्या सुखसुविधांसाठी प्रयत्न करीत आहेत. प्रत्येक गोष्टींचे निवारण करणेसाठी, प्रत्येक सुखसुविधा देणेसाठी ते जागृत आहेत, किती तरी वर्षा पासून आज महासभेमध्ये बसलेले जनप्रतिनिधी आहेत. ते प्रशासना बरोबर जोडलेले आहेत, कधीच प्रशासना पासून वेगळे नाहीत. परंतु प्रशासना बरोबर असतांना सुध्दा लोकांना ज्या सुविधा मिळाल्या पाहीजेत त्या सुविधा मिळत नाहीत. तर पंतप्रधानाचे जे धोरण आहे, जी धारणा आहे ती कमी होते. जसे आमच्या सर्व जनप्रतिनिधींनी तुम्हांला सांगितले आहे की, आम्ही शपथ घेऊ पण शपथ बरोबर जनतेला सुविधा मिळाल्या पाहीजेत. सुविधांची जी कमी आहे, त्याची पुर्तता कोण करणार? त्याची जबाबदारी कोण घेणार? जर ही सर्व जबाबदारी तुम्ही घेत असाल तर आम्ही जरूर तुमच्या बरोबर राहू. महाराष्ट्र शासनाने काही वर्षा पुर्वी जे लोक गोरगरीब आहेत, जे झोपडपट्टीत राहतात. प्रत्येक महानगरपालिकेला मोठा निधी देण्यात आला. जिथे जिथे तुटलेले होते, तिथे काही जागेवर एम.एम.आर.डी.ए. चे शौचालय बनले. हे शौचालय बनल्या पासून खुप लोकांना सुविधा झाली. परंतु काही असे शौचालय आहेत, ते २० ते २५ शौचालय आहेत, ते सुरूवाती पासून आज पर्यंत कोणालाच दिले नाहीत. कारण की, त्यामध्ये बरेच काही कमी होते आणि अजून पर्यंत कमी आहे. आमच्या पॅनलमध्ये बघा, पाच वर्षे निघून गेलेत, जो १६ नंबरचा पॅनल आहे, त्यासाठी जी ओरडून ओरडून थकून गेलो. जो आमच्या त्रिलोकनाथ गार्डनच्या समोर लक्ष्मीनगरमध्ये जो एम.एम.आर.डी.ए. चे जे शौचालय आहे, त्याला पाच वर्षे निघून गेले पण त्यामध्ये सुधारणा झाली नाही. आता मला पॅनल क्रमांक १७ दिला आहे, १७ नंबर पॅनलमध्ये जो राधेश्यामनगर आहे. तिथल्या एम.एम.आर.डी.ए. च्या शौचालयाची हालत बघा, किती वर्षा पासून सांगत आलो आहे, पण प्रशासनाकडे वेळ नाही किंवा ऐकण्यामध्ये काय कमी आहे, हे माहीत नाही. त्याच्या नंतर कैलासनगरच्या एम.एम.आर.डी.ए. च्या शौचालयाची हालत बघा, लाखो रूपये खर्च केल्या नंतर सुध्दा, गोरगरीबांची वस्ती असल्यामुळे तिथे आपण सुविधा देवू न शकल्यामुळे मग शपथ काय घेणार? १७ नंबर पॅनलमधून निवडून आल्या नंतर दिड वर्ष निघून गेला आहे. १७ नंबर पॅनलमध्ये एक पण शौचालय आपण चांगल्या प्रकारे निर्माण करू शकलो नाही. आमचा वाल्मीकीनगर आहे, वाल्मीकीनगरमध्ये एम.एम.आर.डी.ए. चा शौचालय बनला आहे, तो काही वर्षा पासून बंद झाला आहे. त्याच बरोबर मा. पंतप्रधानाच्या ज्या पण योजना आहेत, त्या योजनाना जर सफल करावयाच्या आहेत, जर लोकांना सुविधा दयायच्या आहेत, तर प्रशासनाला पण प्रयत्न करावे लागतील आणि जे कमी आहे, त्या समस्या पण दुर करायला पाहीजेत, धन्यवाद. जर काही चुकीचे बोललो असेल तर माफी मागतो.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौरजी, जो गणपतीचा सण सुरू आहे, आज गौरी येणार आहेत आणि महासभा पण आजच लावली आहे. तर या महासभेमध्ये जे पण विषय आहेत, ही सभा स्थगीत करून दुसरी महासभा बोलवा, कारण की इथे ज्या नगरसेविका बसल्या आहेत, त्यांची हीच चर्चा चालू आहे.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** साहेब, गौरी येण्याची वेळ झालेली आहे आणि हा हिंदुचा सण आहे, साहेब आणि याच्यासाठी जरा, आता सव्वा तीन झाले आहेत, गौरी येण्याची वेळ झालेली आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, याचे पण उत्तर दया, कॅम्प नंबर १ पासून ते कॅम्प नंबर ५ पर्यंत कोणती बिस्लेरीची बॉटल मिळत नाही. फक्त आम्हांलाच ग्लासमध्ये पाणी का देतात?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** शहरामध्ये सगळीकडे प्लास्टीकच्या बाटल्या विकल्या जातात, इथेच आपण नियम पाळत आहेत.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** कोणत्या कंपनीची बाटली मिळत नाही?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** महानगरपालिकेच्या सगळया अधिका—यांच्या ऑफिसमध्ये जा,पदाधिका—याच्या ऑफिसमध्ये जा, प्लास्टीकच्या बाटल्या मिळतील, त्यांच्याकडे प्लास्टिकच्या बाटल्या आहेत आणि आम्हांला घाण ग्लासामध्ये पाणी देतात.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** याच्यामध्ये काही टाकून दिले तर कसे काय माहीती होईल? एक एक झोपून जाणार. आयुक्त साहेब हे काय होते? पाण्यात जर काही टाकले तर?

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** नंतरच्या मिटींगमध्ये पाण्याच्या बॉटल दिल्या जातील.

**सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—** आयुक्त साहेब, तुम्ही त्या ड्रेनेजच्या गाडीच्या कर्मचा—यांना पगार दया, मग आम्ही निघतो.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत मी काही पॉईंट सुचवू इच्छिते टॉयलेट डेमॉलेशन करण्यासाठी जी लिस्ट दिलेली आहे, सर मागच्या दोन वर्षा पासून टॉयलेट डेमॉलेशन करण्यासाठी लिस्ट देवून सुध्दा ते टॉयलेट डेमॉलेशन होत नाहीत आणि त्यांची परिस्थिती आता सगळयांनीच सांगितलेली आहे की, तिथे काय परिस्थिती आहे? अतिशय घाणेरडे आहे तिथे, तीन तीन, चार चार वेळा रिमाईंड करून सुध्दा डेमॉलेशन होत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे आपण जे कच—याचे, आयुक्त सर कच—याचे जे सेग्रीगेशन करतो, मागच्या वर्षी जे स्वच्छता अभियान आपण राबवले त्याच्यामध्ये चांगल्या प्रकारे लोकांची मानसिकता तयार झाली होती. ओला कचरा, सुका कचरा आम्ही घरोघरी जाऊन हे अभियान राबवले आणि लोक चांगल्या प्रकारे ओला कचरा, सुका कचरा देत होते. पण त्यामध्ये कनस्टींटंसी नसते सर परत लोकांनी एकत्र दयायला सुरूवात केली. कारण घेणारेच एकत्र घेऊन राहीले तर या गोष्टी कनस्टींटंसी व्हायला हव्यात आणि तिसरी गोष्ट म्हणजे ड्रेनेजच्या गाडया लवकर उपलब्ध होत नाहीत. चार, चार, पाच, पाच ड्रेनेज वाहत राहाते. त्याच्यावर वर्कस नसतात. मा. आयुक्त सर ड्रेनेजची गाडी लवकर उपलब्ध करून दयायला काही तरी करायला हवे. कारण चार, चार, पाच, पाच दिवस तिथे पाणी वाहत असते. आता सगळीकडे गणपती बसलेले आहेत आणि तिथे सुध्दा हीच परिस्थिती आहे. ब—याच ठिकाणी, गणपतीच्या ठिकाणी ड्रेनेजचे पाणी वाहते.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** हिंदुचे सण करायचा की नाही? सर्व धर्म समभाव मानतो मग आपल्या हिंदू सणाला मानत नाही का?

**सदस्या, श्रीम. कविता बागुल:—** मा. महापौर आणि मा. आयुक्त साहेब, संपुर्ण प्रभाग क्रमांक १८ मध्ये एका पण शौचालयास दरवाजे नाहीत आणि त्यांचे आऊटलेट चेंबर्स पुर्णपणे फुटलेले आहेत. लोकांच्या दरवाजा समोरून घाण वाहते.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी आपल्याकडे महीलांचे प्रमाण जास्त आहे आणि आज गौरी बसणार आहेत, त्या महीलांना गौरी पुजनासाठी जाऊ दया, मी महापौरांना विनंती करतो की, यांनी ....

**सदस्या, श्रीम. कविता बागुल:—** ड्रेनेजचे पाणी रस्त्यावरून वाहत आहे, तरी कृपया एवढे तरी काम करून टाका सर.

**सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाड:—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी त्यांना आपण काही मुलभूत सुविधा दिल्या आहेत का? शौचालयांची परिस्थिती एक दम बिकट आहे. ते तर आपण स्वत: पण बघितलेले आहे. जिथे महीला शौचालय आहे, त्याच्यामध्ये आपण पत्रामध्ये काही सुविधा दिलेल्या आहेत. मा. आयुक्त साहेब, शौचालयांची परिस्थिती तर सगळयांनी तर सांगितलेलीच आहे, लोकांनी शौचालयात गेल्या नंतर परत शौचालय पडते की, काय? याची जर त्यांना भिती वाटत असेल तर त्यांनी शौचालयात जावेच कसे? जर आपल्याला शौचास लोकांना बाहेर जाऊन दयायचेच नाही, त्यामुळे ही शौचालयाची परिस्थिती लवकरात लवकर सुधारण्यात यावी. त्याच बरोबर लोकांसाठी बाकी ज्या मुलभूत सुविधा आहेत, नाले गटारे सर्व दुराअवस्था झाले आहेत आणि लोकांची सर्वात महत्वाची गरज म्हणजे आज ते गटाराचे पाणी पित आहेत. किती तरी लोकांच्या घरामध्ये पाईप लाईनद्वारे गटाराचे पाणी जात आहे आणि तेच पाणी लोक पित आहेत. मग त्या लोकांमध्ये आपण काय जनजागृती करायची? आणि त्यांची मानसिकता कशी काय बदलायची? याचे जरा तुम्ही आम्हांला मार्गदर्शन करावे. त्या लोकांना आम्ही काय सांगायचे? नाल्याचेच पणी प्या असेच सांगायचे का? जर ते लोक नाल्याचे पाणी पित असतील आणि आम्ही त्यांना स्वच्छ भारत अभियान समजावून सांगणार आहोत, त्यांच्यामध्ये जनजागृती करणार आहोत, तर त्यांना आम्ही काय सांगायचे की, स्वच्छ भारत अभियानामध्ये गटाराचेच पाणी पिणे योग्य आहे, हेच सांगायचे का? याच्यासाठी तुम्ही पहीले काय सुविधा देणार आहेत, ते सांगाा. स्वच्छ भारत अभियानामध्ये? फक्त आम्ही लोकांना दर वर्षी जाऊन सांगायचे की आपल्याला स्वच्छ भारत

अभियान राबवायचा आहे आणि त्याच्यामध्ये जी परिस्थिती आहे, ती जशीच्या तशीच आहे. रस्त्यावर कचरा पडलेला आहे, ठिक आहे आपण लोकांना सांगू तुम्ही करू नका. परंतु जे नाले भरलेले आहेत, ते कोण साफ करणार? लोकांना पिण्याच्या पाण्याची काय व्यवस्था करणार आहात? नाल्याचेच पाणी प्यायला देणार आहेत का? आयुक्त साहेब, मला तुमच्याकडून अपेक्षा आहे, प्रभाग क्रमांक ४ मध्ये ब—याच ठिकाणी लोक आज गटाराचे पाणी पित आहेत, ब—याचशा पाईप लाईन तुटलेल्या आहेत, त्या आपणही बघितलेल्या आहेत. ते लोक आमच्याकडे वेळोवेळी येतात त्यांना आम्ही काय सांगायचे? आणि त्याच्यासाठी तुम्ही काय करणार आहात? हे पहीले तुम्ही आम्हांला सांगा, नंतर आम्ही स्वच्छ भारत अभियानाची जनजागृती करू.

**<u>सदस्य, श्री. विजय पाटीलः—</u>** आयुक्त साहेब, स्वच्छता अभियान जर खरोखरच चांगल्या पध्दतीचे करायचे असेल, तर एक टीम बनवा, प्रत्येक पॅनलमध्ये खरोखर शौचालय किंवा चेंबर किती खराब आहेत? अशी एक अपण टीम बनवा आणि प्रत्येक पॅनलमध्ये त्यांना जाऊ दया आणि जिथे जिथे खरोखर जर गरज असेल तर आपण तिथे तिथे फंड दयावा. फक्त एवढीच मागणी आहे, बघा जमेल तर असे करा.

**<u>सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाडः—</u>** मा. महापौर जे शौचालय आहेत, ते ओपन ड्रेनज वाहत आहेत.

**<u>सदस्या, श्रीम. ज्योत्सना जाधवः—</u>** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आमच्या वार्डामध्ये ड्रेनेजची झाकण तुटलेली आहेत. तर मी जेव्हा फोन केला की झाकण लावायची आहेत, तर मला उत्तर काय मिळाले की, अजून पर्यंत मॅडम टेंडर निघालेला नाही. त्यामुळे ड्रेनजसाठी झाकण मिळणार नाहीत. मग ते इथून तिथून जमा करून ते देतात. मग आपण वेळेवर तहान लागल्यावर विहीर खोदायची अशी गोष्ट आहे का महानगरपालिकेची, आपल्याला ती सोय करता येत नाही का? ब्लिचींग पावडरचे सांगितले की, आता ब्लिचींग नाही टेंडर निघालेला आहे. प्रत्येक गोष्टीसाठी आपण आधीच का नाही तरतुद करून ठेवत, आपल्याला पाऊस गेल्या नंतर टाकायचे आहे का? पावसात शेवाळ आलेले आहेत, लोक सटकून पडायला लागलेत मी महानगरपालिकेच्या ग्रुपवर पण ते टाकले होते की म्हतारी लोक, लहान मुले त्याच्या वरून घसरून पडणार आहेत. पण ब्लिचींग पावडर आपल्याकडे उपलब्ध नव्हती का तर टेंडर निघालेला नाही. टेंडर कधी निघाणार होता पाऊस संपल्यावर का? मला एवढेच वाटते की, महानगरपालिकेने ज्या आवश्यक गोष्टी आहेत, त्या आपल्या शहरासाठी लागतात, त्याची आधीच तरतुद करून ठेवावी. वेळेवर टेंडर काढणार आणि नंतर भेटणार त्या गाष्टीला काहीच उपयोग नाही.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—</u>** सन्माननिय महापौर आणि सन्माननिय सदस्य, आपण आता जे काही प्रश्न मांडलेले आहेत, शौचालयाची दारे तुटली आहेत, शौचालय ब्लॉक झालेले आहेत, टाक्या फुटलेल्या आहेत. या सगळया प्रश्नांच्या संदर्भामध्ये आम्ही सर्व्हे केलेला आहे आणि सर्व्हे करून कुठल्या वार्डामध्ये, कुठल्या शौचालयाचे काय काय तुटफुट झालेली आहे? दार असेल, टॉयलेटचे भांडे तुटलेले असेल, सगळया गोष्टींची नोंद सर्व्हे करून सार्वजनिक बांधकाम विभागाला त्यांच्या रिपेरींगसाठी आम्ही दिलेले आहे. असे शौचालय मला वाटते एकुण १०० च्या आसपास जुने शौचालय जे आहेत, ते शौचालय पाडून ज्या ठिकाणी गरज नाही, त्या ठिकाणी कंपोस्टींगचे पिठ बनवणे, ज्या ठिकाणी कंपोस्टींगचे पिठ शक्य नाही त्या ठिकाणी हजेरी शेड बनवणे किंवा महापालिकेच्या उपयोगाचे काही तरी वास्तु त्या ठिकाणी बनवणे, या संदर्भातल्या १०० स्पॉटचे जो सर्व्हे आहे, तो झालेला आहे. त्याला मान्यता देखील दिलेली आहे आणि तुमच्याकडे स्थायी समितीमध्ये सगळे संडास पाडण्या संदर्भामध्ये प्रस्ताव जो आहे, तो आम्ही पुढच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये ठेवणार आहोत. मला सांगण्याचा उद्देश काय आहे? तुम्ही सगळे सांगतात ते कामे आम्ही ऑल रेडी सुरू केलेली आहेत. पण आम्ही एक काम करीत नाहीत, एक सदस्य माझ्याकडे आले माझे हे काम आहे, ते काम तशा पध्दतीने करीत नाहीत आम्ही पुर्ण महापालिकेचा विचार करतो, महापालिकेचा विचार करून पुर्ण एकत्रित सगळयांचे प्रस्ताव तयार केलेले आहेत. एकुण आपल्याला १९ नविन टॉयलेटची गरज आहे, १९ टॉयलेट बांधायची आहेत, ते स्पॉट पण आम्ही निवडलेले आहेत. आता त्या स्पॉटच्या ठिकाणी माझी काही लोकांशी चर्चा झाली की, आपण शौचालय बांधतो आणि शौचालयाचे मेंटेनेस राहत नाही. दारे बसवल्या नंतर दोन—तीन महीन्यानी दारे तुटून जातात. या शौचालयाची जबाबदारी कोणी तरी स्थानिक लोकांनी घेतली पाहीजे आणि म्हणून आम्ही प्रत्येक स्थानीक प्रत्येक शौचालयाच्या ठिकाणी आमच्या स्टाफला सांगून शौचालयाची एक समिती बनवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. सगळया ठिकाणी अजून प्रतिसाद मिळालेला नाही. स्थानिक लोकांची इनव्हालमेंट झाली पाहीजे, त्यांना वाटले पाहीजे. हे शौचालय आपल्यासाठी आहे. या शौचालयाचे कोणीही नासधूस करता कामा नये. ही सुध्दा जबाबदारी लोकांना वाटली पाहीजे. या दृष्टीकोनातून आम्ही शौचालयाची समिती बनवायला सुरूवात केलेली आहे आणि त्या समित्या काही ठिकाणी बनलेल्या आहेत, काही ठिकाणी अजून कोणी लोक समित्यामध्ये यायला तयार नाहीत, ते म्हणतात आम्ही कुठे तुमचे शौचालय सांभाळत बसणार? तर ही जी प्रॉपर्टी आहे, ती आपली प्रॉपर्टी आहे. ही मानसिकता लोकांमध्ये तयार व्हायला पाहीजे आणि ती जर तयार होणार नाही तर आपण किती वेळा रिपेरींग करणार? ते परत तुटणार. त्यासाठी आपले प्रयत्न चालू आहेत, आपल्याला ब—याच ठिकाणी यश येत आहेत. जे आपण नविन शौचालय बांधत आहेत, त्या ठिकाणी जर एखादी एजेन्सी आपल्याला मिळाली की, ज्यांनी शौचालयाचे बांधकाम केले आणि त्यांनी शौचालय पुढचे पाच, दहा वर्षे मेंटेन केले, माझी दोन, चार नगरसवेकां बरोबर त्या बददल चर्चा पण झाली, त्यांनी पण तसा प्रस्ताव सुचवला आम्ही आता अशी एजेन्सी शोधत आहेत, या

एजेन्सी जर आम्हांला मिळाल्या तर आम्ही त्याच्या सोबत बसू, बोलू शौचालयाचा खर्च आपण कितपत करायचा, कितपत त्यांनी करायचा ते एकदा ठरवून घेऊ आणि सर्व शौचालय जे १९ शौचालय नव्याने कशी बनवता येतील याच्या संदर्भामध्ये आमचे काम चालू आहे. मला वाटते निश्चितच याच्यामध्ये थोडया दिवसामध्ये प्रगती होईल. काम जे आहे, ते रोज काही तरी येत राहणार गटार फुटणार, शोचालयाचा दरवाजा तुटणार, लाईट तुटणार हे काम तर आमल्याकडे होतच राहणार. हे काम जर झाले नाही, तर आम्ही करणार नाही, असे म्हणून आपल्याला चालणार नाही. म्हणून मला हे म्हणायचे आहे की, आपण आज महासभा आहे, महासभेमध्ये सर्व सन्माननिय नगरसेवक या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत आणि त्याच्यामुळे शपथ घेतली म्हणजे आम्ही थोडे असे सांगणार आहेत की, तुम्ही शपथ घेतली मग तुम्ही हे काम नाही केले. असे नाही शपथ घेणे हा प्रक्रियेचा भाग आहे, हा प्रक्रियाचा भाग आहे, मागच्या वर्षी तुम्ही झाडू हातात घेतला, या वर्षी सुध्दा घ्यायचा आहे आणि त्या प्रक्रियची सुरूवात आपण आज पासून करीत आहे आणि त्या प्रक्रियेची सुरूवात आजच्या शपथेपासून करीत आहे. त्याच्यामुळे मला असे वाटते की, हे जे इश्यु जे आहे, हे येत राहतील आपण ते सॉल करीत जाऊ पुढच्या काळामध्ये. परंतु शपथेचा कार्यक्रम जो आहे, तो आपण पहीले करून घेऊ, कुठलेही अभियान जे ते सुरूवात करतांना एक आपल्याला काही तरी कार्यक्रम तर करायला लागेल, त्या कार्यक्रमाच्या स्वरूपामध्ये हे सर्व इमोशनल गोष्टी असतात. या सगळया गोष्टी सिबॉली आहेत. त्यामुळे मला वाटते की, आपण जे प्रश्न उपस्थित केले, ते प्रश्न यथायोग्य होते. त्या प्रश्नाला अॅट्रेस करण्यासाठी जी काही कारवाई आहे, ती बरेपैकी आम्ही केलेली आहे आणि मला वाटते आमच्याकडून चांगली कारवाई चालू आहे. कारण गेल्या चार बैठकी पासून मी बघत आहे की, दादा दरवेळेला काळा कोट घालून येतात, आज ते काळा कोट घालून आलेले नाही, याचा अर्थ आमच्या कामामध्ये चांगली प्रगती झालेली आहे. असे आम्हांला प्रमाणपत्र मिळालेले आहे, असे मी समजतो. तरी सर्वांना विनंती राहील की आपण शपथेचा कार्यक्रम करून घ्या.

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—</u>** साहेब, शपथ घ्यायला देवाची शपथ न घेता, आयुक्तांची शपथ घ्यायला पाहीजे. म्हणजे ते कामाला बरोबर लागतील. या महानगरपालिकेच्या आयुक्तांची शपथ घेते असे म्हणून आपण सुरूवात करू या सर.

**<u>सदस्य, श्री. विजय पाटीलः—</u>** शपथ म्हणजे फॉर्मुलालिटी आहे का? आयुक्त साहेब, तुम्ही म्हणतात फॉर्मुलालिटीसाठी शपथ घ्यायची काय?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—</u>** सर्व सदस्यांना विनंती करण्यात येते की, कृपया शपथ घेण्यासाठी उभे रहावे.

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—</u>** आयुक्त साहेब, शपथ घेण्यापुर्वी तुम्ही फक्त एक सांगा. १५ दिवसापुर्वी याच सभागृहामध्ये आपण आश्वासन दिले होते की, गणेश उत्सवाच्या पहील्याच दिवशी या शहरातील रस्त्याची दुरूस्ती होईल. आज किती दिवस झालेत हे सांगा, संपुर्ण रस्त्याची हालत खराब आहे. १ ते ५ सर्व रस्त्यांची हालत खराब आहे.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—</u>** सर्व सदस्यांना विनंती करण्यात येते की, शपथसाठी उभे रहावे.

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—</u>** आपण दिलेला शब्द तुम्ही पाळत नाही.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—</u>** सर्व माहीती मी तुम्हांला सांगतो आता.

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—</u>** शपथ घेण्याचा विषय नाही, तुम्ही आम्हांला आश्वासन देवून सुध्दा १५ दिवसात काही केलेले नाही आणि नुसती शपथ घेण्याला काय अर्थ आहे?

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—</u>** आम्ही त्याच्यावर माहीती देतो.

**<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—</u>** शपथ घेण्यासाठी आमचा पक्ष बांधील नाही, चौधरी साहेब, शपथ घेण्यासाठी आमचा पक्ष बांधील नाही, त्यांना घेऊ दया, शपथ. स्वच्छ भारत अभिया नही त्यांची घोषणा आहे, आपला पक्ष बांधील नाही.

**या वेळी स्वच्छता अभियानाची शपथ घेण्यात आली.**

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—</u>** महात्मागांधी यांची १५० वी जयंती व स्वच्छ भारत अभियान (नागरी) या कार्यक्रमाची ४ थी वर्ष पूर्ती हे ''स्वच्छता ही सेवा'' हा उपक्रम राबविणेबाबत शासनाकडील दिनांक ११/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये स्वच्छता ही सेवा दिनांक १५ सप्टेंबर २०१८ ते ०२ ऑक्टोबर २०१८ पर्यंत राबविणेबाबत कळविले आहे सदर मोहिम अंतर्गत स्वच्छता शपथ, प्रभातफेरी,

स्वच्छता श्रमदान विषेशत: झोपडपटयांवर करणेबाबत कळविले आहे. तरी स्वच्छतेच्या दिशेने आपणएक पाऊल पुढे टाकत सर्व मिळून स्वच्छतेची शपथ घेऊया !

मी शपथ घेतो की मी स्वत: स्वच्छतेसाठी जागरुक राहीन त्यासाठी वेळदेईन. दरवर्षी १०० तास म्हणजेच प्रत्येक आठवडयात २ तास श्रमदान करुन स्वच्छतेच्या संकल्पाचा अंगिकार करेन. मी अस्वच्छता निर्माण करणार नाही आणि करु देणार नाही.

सर्वप्रथम मी स्वतः पासून, स्वतःच्या कुटुंबा पासून माझ्या परिसरा पासून, माझे गाव आणि माझ्या कार्यस्थळा पासून याची सुरवात करेन. माझे असे मानणे आहे की जो देश स्वच्छ दिसतो त्यामागचे कारण त्या देशातील नागरिक अस्वच्छता पसरवत नाहीत आणि होऊ देत नाहीत. याच विचारधारेवर मी प्रत्येक गाव आणि परिसर स्वच्छ भारत मोहिमेचा प्रचार करेन. मी आजजी शपथ घेत आहे ती इतर १०० जणां कडून ही घेणार आहे ते सुध्दा माझ्या प्रमाणे १०० तास स्वच्छतेसाठी देतील यासाठी मी प्रयत्नशील राहीन.

मला माहित आहे की स्वच्छते कडे टाकलेले माझे एक पाऊल संपूर्ण भारत देशाला स्वच्छ करण्यासाठी मदत करणारे ठरेल.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** मा. महापौरजी, शासनाच्या आदेशानुसार स्वच्छ भारत अभियानाची शपथ सभागृहामध्ये सर्वच नगरसेवकांनी घेतली, आपल्या शहरामध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत साफसफाई आपण करणार आहोत, केली पण आहे. परंतु शहरामध्ये आणखीन एक गंभीर समस्या आहे. ही समस्या म्हणजे पाण्याची, पाण्याच्या समस्येसाठी आपण इथे शपथ घेऊ या. जेणेकरून तेही आपल्या आयुक्तांच्या किंवा अधिका—यांच्या लक्षात राहील की आपण शपथ घेतली आहे, म्हणून लोकांना पाणी दिले पाहीजे. जे लोक महापालिकेचा टॅक्स भरतात, त्यांना पाणी व्यवस्थित आले पाहीजे. तर वेळोवेळी आम्ही या ठिकाणी चर्चा करतो, आयुक्तांच्या दालनात जाऊन चर्चा करतो आणि अधिका—यांना फोन करतो. परंतु पाण्याचा प्रश्न गंभीर होत चालला आहे, तो सुटण्या जास्त गंभीर होत चाललेला आहे. आयुक्त महोदय, आपण या महापालिकेचा चार्ज घेतल्या पासून अनेक वेळा मी दोन पॅनलच्या बाबतीत बोललो, आठ वार्डाच्या बाबतीमध्ये की चार नंबर पॅनल आणि दहा नंबर पॅनल या पॅनलच्या बाबतीमध्ये आम्ही वेळोवेळी आमच्या नगरसेवकांनी पण ब—याच वेळा आपल्याशी चर्चा केलेली आहे. परंतु आपण त्या चर्चेला उत्तर देतात, पण काम काही होत नाही. त्याचे काम करणार आहेत की, नाही अशी जर आपण शपथ घेतली, तर लोकांना पाणी मिळेल आणि ही जी शहराची समस्या गंभीर आहे, ती दुर होईल. त्यासाठी आपण शपथ घ्यावी, अशी माझी आपणास सुचना आहे. त्याच बरोबर या शहरामध्ये पाण्याची समस्या ज्या पध्दतीने गंभीर होत चाललेली आहे. आता पाऊसही चांगला पडला आहे, उन्हाळा अजून सुरू झालेला नाही, अशा वेळेला जर ही परिस्थिती असेल. तर उन्हाळयामध्ये या शहरामध्ये लोकांचा अक्रोश होईल, लोक रस्त्यावर उतरतील आणि मग आमच्यासारख्या लोकप्रतिनिधींना रस्त्यावरून चालणे मुश्कील होईल. त्यासाठी आताच आपण प्रयत्न केले पाहीजेत. याला कारणे काय आहेत? ती पण शोधली पाहीजेत, आपण शोधण्याच्या भानगडीत पडत नाही आणि कुठे उपाय करण्याच्या भानगडीत पडत नाही. साहेब, एक एक नगरसेवक त्याच्या त्याच्या प्रभागामध्ये स्वत:चा वेल्डर, स्वत:ची वेल्डींग मशिन आणि स्वत:ची चार माणसे घेऊन स्वत: आम्ही काम करतो. आमच्या प्रभागामध्ये तरी आम्ही काम करतो. परंतु निधी मागितला तर नगरसेवक निधी दया, नगरसेवक निधी देवून पण आपण काम करीत नाहीत. तुम्ही प्रभाग अधिका—यांना त्याच्या मेंटेनेसचा चार्ज दिला. कुठला प्रभाग अधिकारी चार दिवस केले, आठ दिवस केले, दोन दिवस चार दिवस नळ कापायचे नाटक केले आणि मग आता दाखवा किती नळ कनेक्शन कट केलेत आणि लोकांकडे किती अनधिकृत कनेक्शन आहेत? त्याची माहीती पण मागवा, ती पण बघा आणि लिकेजचे कनेक्शन किती काढले आणि कोणाला किती पैसे दिले? तुम्ही त्यांना ५० हजाराची त्यांना मुभा दिली होती. ती पण त्यांनी केली की नाही, केली असेल तर कुठे केली? कशी केली ती दाखवा? आम्ही वेळोवेळी सांगतो की, आमची स्वत:ची माणसे कामाला लावूनही पाणी मिळत नसेल. पाण्याचा विषय सोडवण्यासाठी प्रयत्न करीत आहे. पण सोलूशन काही निघत नाही, कायम स्वरूपी सोलूशन काढत नाहीत. आम्ही आपल्याला सांगितले की आम्हांला दोन वेळा पाणी येत होते, पाणी नाही पाणी तुम्ही दोन वेळस दया. एकदा अगोदरच्या काळात तुम्ही बोलले आम्ही सांगतो, करतो. मग नंतर तुम्ही बोलले की, एकाला एक वेळा आणि दोघांना दोन वेळा कसे काय देणार? तुमचे म्हणणे बरोबर आहे, पण काही ठिकाणी आजही पाणी तीन तीन वेळा जात आहे, तीन तीन वेळा लोकांना पाणी मिळते. ते जात असेल ते बंद करा, ही आमची भुमीका नाही, पण आम्हांलाही पाणी मिळाले पाहीजे ही आमची भुमिका आहे. आपण या पाण्याच्या बाबतीमध्ये अनेक वेळा चर्चा केल्या नंतरही, आपण जर मार्ग काढणार नसाल तर आम्हांला रस्त्यावर उतरावे लागेल. आपण हे लक्षात ठेवा, प्लीज. आम्ही विनंती करून आपल्याला सांगतो, कारण असे आहे की, तुम्ही आम्हांला दोन वेळा पाणी देत नसेल तर पाण्याची क्वांटीटी वाढवा. जर एम.आय.डी.सी. पाण्याची क्वांटीटी देत नसेल, पैसे मागत असेल इतर वेळेला आपण खर्च करतो, मग पाण्याच्या वेळेला दोन पैसे महानगरपालिकेचे जास्त जात असतील आणि लोकांना जर पाणी मिळणार असेल, तर त्यासाठी आपण आयुक्त म्हणून पुढे आले पाहीजे. आपण ते करीत नाहीत, आपण ठिक आहे, महापालिकेच्या खर्चाची बचत करीत आहेत. आम्ही त्याचे स्वागत करतो. जर चुकीचे काम होत असेल, तुम्ही ते करून देत नाहीत, ते बरोबर आहे. पण पाणी देवून जर थोडे जास्त पैसे जाणार असतील आणि लोकांना जर पाणी मिळणार असेल, तर ते काम आपण केले पाहीजे, ते करीत नाहीत. आपण ते करा, पाण्याची क्वांटीटी वाढवण्याचा प्रयत्न करा, आम्हांला पाणी कसे मिळेल यासाठी आपण प्रयत्न करा? आम्ही सर्वच अनेक वेळा आपल्याला भेटलो, अनेक वेळा आपल्याला सांगण्याचा प्रयत्न केला. सगळयांच्याच वार्डामध्ये

मला वाटते की, १४ नंबर पॅनलमध्ये पाण्याचा त्रास आहे. मी फक्त दोन पॅनलचा विषय सांगितला, तुम्ही त्यासाठी काय करणार आहेत, ते सांगा? लिकेजेस होत आहेत, मेन लाईनला लिकेजेस झालेत अनेक वर्षा पासून, अनेक महीन्या पासून लोकांनी सांगितले, पण तुमचे अधिकारी तिथे लिकेजेस काढायला गेले नाहीत. काही दिवसापुर्वी आपण काढण्याचा प्रयत्न केले. ठिक आहे, आम्ही एकदा स्थायी समितीचे सभापती, त्यांच्या घरी पुजेला गेलो होतो, तिथून बाहेर आल्या नंतर बघितले तर गंगा वाहते आणि मग आमच्या बरोबर भालेराव नगरसेवक होते, त्यांना बोललो तुमचा प्रभाग आहे, हे काय आहे? त्यांनी दुस—या दिवशी तुम्हांला सांगून काम चालू केले, लिकेज बंद करण्याचे काम केले, अशी परिस्थिती नगरसेवकांची आहे. एक उदाहरण सांगितले, अनेक उदाहरणे देता येतील वेळ नाही. परंतु पाण्यासाठी जर तुम्ही काही केले नाही, तर आम्हांला नाईलाजाने रस्त्यावर उतरावे लागेल आणि रस्त्यावर उतरल्या नंतर त्याचे परिणाम आपल्याला भोगावे लागतील ही विनंती आपल्याला करतो.

<u>**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—**</u> आयुक्त साहेब, आता आपण जो मुद्दा उपस्थित केला, आता आपण सांगितले की, शहरामध्ये नविन १९ शौचालय बांधायचे आहेत. आयुक्त साहेब, एक मिनीट माझ्या प्रश्नाचे जरा उत्तर दया, आपण नविन जे १९ शौचालय बांधणार आहेत, त्यांची यादी या सभागृहामध्ये सादर करावी, अशी विनंती करतो, आयुक्त साहेब, आपण जे नविन १९ शौचालय शहरामध्ये बांधणार आहेत, त्यांची यादी प्रसिध्द करावी, म्हणजे सगळया नगरसेवकांना कळेल आणि मुख्य मुद्दा ज्या प्रभागामध्ये काही सार्वजनिक शौचालय बंद आहेत, ज्या ठिकाणी शौचालय काही लोकांनी, आता मगाशी जो मुद्दा सुर्वे साहेबांनी उपस्थित केला होता की, बॅरेक नंबर ५७ समोरील सार्वजनिक संडास, तो संडास बंद असून त्या ठिकाणी, त्या लोकांनी त्याच्यामध्ये सामान ठेवले आहे, त्या अशा संडासाची आपण दखल घ्यावी आणि असे सार्वजनिक शौचालय नविन बनवण्यात यावेत, माझी विनंती आहे की, आपण या १९ शौचालयाची यादी आताच जाहीर करावी. त्याच बरोबर दुसरा एक माझा महत्वाचा मुद्दा आहे, काही महीन्यामध्ये मला वाटते, मागच्या जानेवारी, फेब्रुवारी किंवा डिसेंबर महीन्यामध्ये असेल, या शहरामध्ये सार्वजनिक अंडर ड्रेनेजची जी आपली सिस्टीम आहे, ती अंडर ग्राउंड ड्रेनेजची सिस्टीम साफसफाई करण्यासाठी किंवा दुरूस्त करण्यासाठी साधारणतः ६५ कोटी रूपये सभागृहाने मंजूर केले होते आणि त्याचे कामकाज सुरू झाले होते, त्या ६५ कोटीच्यापैकी कुठे कुठे काम सुरू आहे? साफसफाई करण्यासाठी जी गाडी मागवली होती, ती गाडी सध्या शहरामध्ये कोणाच्या प्रभागामध्ये काम करीत आहे. हे सांगावे. स्वच्छता अभियानाची इकडून सुरूवात करावी. अगोदर भ्रष्टाचाराची साफसफाई करावी. भाडयाने घेतली असेल, काम संपले असेल मग ड्रेनेज वाहतातच कसे जे सांगत आहेत ते. ती मशिन पुढे बंद का झाली? साफसफाई त्याच्या नंतरची का झाली नाही? अशा प्रकारचे प्रश्न आहेत.

<u>**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—**</u> आयुक्त सर, मला विचारायचे आहे की, आपले सदस्य, श्री. सुरेद्र सावंत साहेब, यांनी सांगितले की आपण ६५ कोटीची मशिन घेतलेली आहे, ती कधी घेतली आम्हांला माहीतीच पडले नाही.

<u>**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—**</u> प्रदिपजी तुम्ही जास्त हुशार आहेत, आम्हांला माहीती आहे. माझी रिक्वेस्ट आहे, त्यांची चुकी झाली जो ६५ लाखाचे काम दिले होते, तुम्ही या विषयी चर्चा केली होती, तुम्ही जाणूनबुजून बोलत आहेत. हे चुकीचे आहे.

<u>**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—**</u> सुनिल साहेब, माझा प्रश्न असा आहे की, ते बोलत आहेत की, ६५ कोटीची मशिन आली आणि भ्रष्टाचार झाला, माझा आक्षेप आहे.

<u>**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—**</u> उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये जर एक रूपयाची सुई जरी आली, तरी प्रदिप रामचंदानी यांना माहीती होते की, सुई आली आहे, त्यांना ६५ कोटीचे माहीती नसणार का?

<u>**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—**</u> ते मी मान्य करतो,आमच्याकडें लक्ष केले होते की, ६५ कोटीची मशिन आलेली आहे.

<u>**उप—महापौर मथा पीठासीन अधिकारीः—**</u> पुढचे विषय घ्या, विषय घ्या.

<u>**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—**</u> मा. महापौरजी, यांचे म्हणणे असे आहे की, ६५ कोटीची फाईल चोरी झाली आहे. ६५ रोडची फाईल चोरी झाली असे त्यांचे म्हणणे आहे.

<u>**उप—महापौर मथा पीठासीन अधिकारीः—**</u> विषय चालू करा.

<u>**महापालिका सचिव :—**</u> विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १५ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>**

नगरपरिषदा, नगरपंचायत क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची शास्ती शासन

ठरविणार मा. मंत्रीमंडळाचा दिनांक २९/५/२०१८ रोजीच्या निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबतचा पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे, अनुमोदक श्री सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—** या सभागृहाच्या एका नगरसेवकाने फाईल चोरीचा प्रकार केला होता, हा फाईल चोरीचा प्रकार कसे आपण दाबले हे आपण सांगावे, तो आरोप कसा मिटला, या सभागृहामध्ये एका सदस्याने फाईल चोरीचा प्रकार केला होता, तो संपुर्ण शहराने बघितला सर्व पेपरमध्ये वाचला होता, आणि आता सांगातात की, भ्रष्टाचार झाला नाही. हा भ्रष्टाचार कुठे तरी थांबवा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** मा. महापौरजी, आपण मिटींग स्थगित करावी असे म्हणटले आहे, मला वाटते हा जो प्रस्ताव आपल्याकडे पाठवला आहे, या प्रस्तावावर जास्त चर्चा करण्याची आवश्यकता नाही. कारण की, मंत्रीमंडळ निर्णयाची प्रत त्याच्या सोबत जोडली होती आणि मंत्रीमंडळाचा निर्णय झाल्या नंतर शिवसेना पक्षाची संपुर्ण मागणी होती की, १०० टक्के माफ करावे. परंतु आमच्या पक्षाच्या मागणीनुसार काही अंशी मान्य झाले आणि मी आपणास वाचून दाखवतो. नगरपरिषदा, नगरपंचायत क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामाची शास्ती शासन ठरविणार, मा. मंत्रीमंडळाचा दिनांक २९/५/२०१८ चा निर्णय याची अंमलबजावणी करण्या बाबत. साहेब, हा जो प्रस्ताव आहे, हा या वर्षा पासून लागू करावा, अशी माझी मागणी आहे, लोगू करावा. कारण मंत्रीमंडळाचा निर्णय आपल्याला लागू करावाच लागतो. म्हणजे आता पर्यंत मी बघितले वरून आपण महासभा म्हणा किंवा अधिकारी म्हणा शासनाचा निर्णय आला की, तो लगेच मान्य करावा, असा आहे. तर मी या प्रस्तावामध्ये क्लीयर कट दिले आहे. मला वाटते सदस्यांनी मांडला नसेल तर मी पुन्हा एकदा वाचून दाखवतो, राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायत यांच्या इथील अनाधिकृत बांधकामावर शास्ती आकारतांना त्यामध्ये एक वाक्यता असावी आणि त्या सोबत अनाधिकृत निवासी बांधकामांना आळा बसणेसाठी शास्तीय दर आकारणीचे आता शासन ठरविणार आहे, यासाठी संबंधित अधिनियमात सुधारणा करून ती पुर्वलक्षी प्रभावने हा शब्द घ्या त्याच्यामध्ये दिनांक २९/५/२०१८ रोजी झालेल्या मंत्रीमंडाळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. सन २००८ चा अधिनियम कलम २ नुसार देण्यात आलेल्या निर्णयानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम १९८८, १८८८ मध्ये कलम १५२ अ, महाराष्ट्र अधिनियम कलम २६७ अ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायत, औद्योगीकनगरी अधिनियम १९६५ मध्ये कलम १८९ या कलमांचा समावेश करण्यात आला होता. या कलमानुसार बेकायदेशिर बांधकामावर दंडात्मक आमारणी करण्या बाबत या तिन्ही नियमामध्ये तरतुद करण्यात आली होती. या तरतुदीनुसार संबधित बेकायदा बांधकामावर लागू असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पटी इतकी शास्ती निश्चित करण्यात आली होती. मात्र अनाधिकृत इमारतीमध्ये राहणा—या अशा बांधकामात समावेश नसणा—या सर्व सामान्य नागरीकांना मालमत्ता कर हा दंडात्मक शास्तीसह भरावा लागतो. ही बाब लक्षात मुंबई महानगरपालिका अधिनियम १५२ अ, महाराष्ट्र महानगरपालिका १६७ अ, या दोन्हीमध्ये या पुर्वी सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम कलम ५१ अन्वये सुधारणा करण्यात आली. या सुधारणे अनुसार अनाधिकृत इमारतीवर शास्तीचा दर हा संबंधित महानगरपालिकेने ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच शास्ती कराच्या दरात सर्व महानगरपालिकांमध्ये एक वाक्यता राहण्याच्या दृष्टीने शासनाने महानगरपालिकेला निर्देशही दिले. याच धर्तीवर मी शॉर्टकटमध्ये वाचतो, ही शास्ती भरतांना ६०० चौरस फुटा पर्यंतच्या निवासी बांधकामावर कोणतीही शास्ती आकारण्यात येणार नाही. तसेच ६०० ते १००० चौरस फुटा पर्यंतच्या निवासी बांधकामांना प्रत्येक वर्षी मालमत्ता कराच्या ५० टक्के दराने शास्ती आकारण्यात येईल. १००० चौरस फुटाच्या निवासी बांधकामांवर सद्याच्या दराने म्हणजे प्रत्येक वर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात येईल, अशी सुधारणा करण्यात आलेली आहे. तर माझी या सभागृहाला, हा अशासकीय प्रस्ताव आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा.महापौरजी, मा. आयुक्त साहेब, शासनातर्फे बैठकीमध्ये निर्णय झालेला आहे. आपल्या महानगरपालिकेमध्ये याची अजून अंमलबजावणी झाली नाही. जसे की, शासनाने जो निर्णय घेतला आहे, ६०० चौरस फुटा पर्यंत जे अनाधिकृत बांधकाम आहे, त्याच्यावर कोणतीही दंडात्मक कारवाई न करता, जो त्यांचा टॅक्स आहे, तो घेण्यात यावा आणि ६०० ते १००० चौरस फुटाची जी जागा आहे, त्याच्यावर मालमत्ताकराच्या ५० टक्के दंड आणि जी १००० चौरस फुटाची जागा आहे, त्यांना दुप्पट परंतु आज आपण उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये सर्वांना दुप्पट टॅक्स लावत आहेत. तर मी मा. आयुक्तजी निवेदन करतो की, या वर्षीचा जो टॅक्स पाठवला आहे, जो सन २०१८—२०१९ चा टॅक्स पाठवला आहे. ही बाब आपण सन २०१७ पासून करीत आलेलो आहे की, त्याला दुरूस्त करायला पाहीजे. परंतु आपल्या संगणकामध्ये जो सेव आहे, सर्वांना दुप्पट पाठवून देतो आपण तर मी आपल्याला निवेदन करतो की, १००० चौरस फुटाचे जे जास्त आहे, मोठे आहेत, त्यांना दुप्पट पाठवा आणि जे ६०० फुटा पर्यंत आहेत, त्यांना कोणतीही दंड आकारणी करू नका आणि ६०० ते १००० चौरस फुटाणा ५० टक्के जे त्यांचे टॅक्स आहे, त्यांना दंड लावा आणि हा नियम आजच लागू करा. आम्ही परत परत सांगितले असतांना सुध्दा सन २०१७ मध्ये पण हा विषय आला होता, मा. आयुक्तांनी सांगितले की, त्यामध्ये सुधारणा करण्यात येईल. काही वेळा टॅक्स अधिका—यांना सुधारणा करण्यासाठी सांगितले होते. परंतु सगळयांना जो नविन टॅक्स जात आहे, तो दुप्पट होऊन जात आहे. तर मी आपल्याला निवेदन करतो की, जर टॅक्सचे बिल पाठवले असतील तर त्या लोकांकडून टॅक्स कट करून घेण्यात यावा आणि सरकारकडून जो ठराव झालेला आहे, त्या हिशोबानेच ६०० चौरस फुटाच्या छोटया

जागेवर कोणताही टॅक्सचे दंड घेण्यात येऊ नये. ६०० ते १००० चौरस फुटावर ५० टक्के आणि १००० चौरस फुटाच्या जास्त जागेवर दुप्पट दंड घेण्यात यावा, धन्यवाद.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** आयुक्त महोदय, हा जो अशासकीय ठराव मा. विराधी पक्ष नेता, श्री. धनंजय बोडारे साहेबांनी आणलेला आहे. याच्या बददल शासनाकडे असा निर्णय झालेला आहे. शासनाने जो पण निर्णय घेतलेला आहे, सन २०१७ मध्ये त्याची अंमलबजावणी हे पुर्ण आपले सभागृह एक मताने असा ठराव करून देत आहे की, आपण याची अंमलबजावणी त्वरीत करावी. कारण कसे आहे की, ही सन २०१७ ची बाब आहे आणि सन २०१८ पासून जर आमच्या महानगरपालिकेने लागू केलेले नाही. तर आमच्या उल्हासनगरच्या नागरीकांवर हा अन्याय आहे आणि या अन्याया पासून मुक्त करून आज पासूनच असे निर्देश देण्यात यावे, अशी आमची विनंती आहे. विरोधी पक्ष आणि सत्ता पक्ष सगळे मिळून एक मताने हा ठराव करीत आहेत आणि याची अंमलबजावून इतिवृत्ताची वाट न पहाता आणि आजच पासून करायचे आहे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** साहेब, या विषया सोबत आपल्याला विनंती आहे, मा. महापौरजी, या प्रश्नाकडे लक्ष टाकावे, आज अचानक १३ चौरस किलो मिटरचा शहराचा एरिया आहे आणि आपले टॅक्स विभागाचे सेंटरलायजेशन होत आहे, आता त्याचे बायफरगेशन करून प्रभाग समितीला दिले आहे. जे सदस्य, येतात, इथे नागरीकांना जी सुविधा उत्पन्न होते, ती सुविधा दयायला असुविधा देण्याचा हा प्रयत्न आहे. कारण टॅक्स निरीक्षक तिकडे असणार, इकडे नागरीक सुविधा केंद्रामध्ये येणा—या चेंज ऑफ नेम ज्या काही नागरीकांना सुविधा इथे जागेवर मिळत होत्या. त्याचे बाफरगेशन करण्यापेक्षा माझी आपणाला विनंती आणि सजेशन आहे, की होते तसेच ठेवा. वाटल्यास प्रभाग समितीला सकाळी त्यांना वेळ ठेवा, त्या वेळेस त्यांनी जावे प्रभाग समितीला डिटेल्स दयावे की, किती टॅक्स वसुल झाला, जो झाला, तो झाला जो आपल्याला अपेक्षित आहे. कारण उत्पन्न हे आपले मुख्य स्तोत्र असले पाहीजे. तरी कृपया त्याच्यावर पण खुलासा होऊन टॅक्स विभाग इथेच ठेवावा, जेनेकरून नागरीकांना एका ठिकाणी अधिका—यांना आणि कर्मचा—यांना पण बरे पडेल अशी माझी आपणास विनंती आहे, धन्यवाद.

**महापालिका सचिवः—** ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्या प्रमाणे नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामाची शास्ती शासन ठरवणार मा. मंत्री मंडाळातील दिनांक २९/५/२०१८ रोजीच्या निर्णयाची खालील प्रमाणे इथे शास्ती भरतांना ६०० फुट हे पॉईंट देते, अंमलबजावणी करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे, इतिवृत्ताची वाट न पहाता.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १५ :— प्रस्तावाची सूचना**

नगरपरिषदा, नगरपंचायत क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची शास्ती शासन ठरविणार मा. मंत्रीमंडळाचा दिनांक २९/५/२०१८ रोजीच्या निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबतचा पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयानुसार सभागृहाचें विनंती पुर्वक लक्षवेधू इच्छितो की, राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायती यांच्या क्षेत्रात अनधिकृत बांधकामावर शास्ती आकारतांना त्यामध्ये एकवाक्यता असावी आणी त्यासोबतच अनधिकृत निवासी बांधकामांना आळा बसावा यासाठी शास्ती आकारणीचे दर आता शासन ठरविणार आहे. त्यासाठी संबधीत अधिनियमात सुधारणा करून ती पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यास दिनांक २९/५/२०१८ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाचे बैठकीत मंजूरी देण्यात आली.

सन २००८ चा अधिनियम क्रमांक २ नुसार देण्यात आलेल्या निर्णयानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मध्ये कलम १५२ ए महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये कलम २६७ ए आणी महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचासयती व औद्योगीकनगरी अधिकनयम, १९६५ मध्ये कलम १८९ ए या कलमांचा समावेश करण्यात आला होता. या कलमानुसार बेकायदेशिर बांधकामावर दंडात्मक आकारणी करण्याबाबत या तिनही नियमामध्ये तरतूद करण्यात आली होती. या तरतूदीनुसार, संबधीत बेकायदा बांधकामावर लागू असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती निश्चित करण्यात आली होती.

मात्र अनधिकृत इमारतीमध्ये राहणाऱ्या, मात्र अश्या बांधकामात सहभाग नसणाऱ्या सर्वसामान्य नागरीकांना मालमत्ता कर हा दंडात्मक शास्तीसह भरावा लागतो. ही बाब लक्षात घेवून मुंबई महानगरपालिका अधिनियम १५२ ए, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये कलम २६७ ए या दोन्ही मध्ये यापुर्वी सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५१ अन्वये सुधारणा करण्यात आली या सुधारणे नुसार अनधिकृत इमारतीवर शास्तीचा दर हा संबधीत महानगरपालिकेकडून ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला तसेच शास्ती कराच्या दरात सर्व महानगरपालिकामध्ये एकवाक्यता राहण्याच्या दृष्टीने शासनाने महानगरपालिकांना निर्देश ही दिले

याच धर्तीवर नगरपरिषद अधिनियमामध्ये देखील बदल करण्याची मागणी होत होती. ही मागणी लक्षात घेवून महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती व औद्योंगीकनगर अधिनियम १९६५ मध्ये शास्ती कर दर बाबतच्या करामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला आहे. पुर्वीच्या तरतूदीनुसार, अश्या इमारतीवर बसण्या योग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्याची तरतूद होती. मंजूर करण्यात आलेल्या सुधारणेनुसार अश्या अनधिकृत इमारतीवर शासनाकडून वेळोवेळी ठरविण्ययात येणाऱ्या दराने शास्ती भरावी लागणार आहे.

ही शास्ती भरतांना ६०० चौ. फुटापर्यतच्या निवासी बांधकामावर कोणतीही शास्ती आकारण्यात येणार नाही. तर ६०१ ते १००० चौ. फुटापर्यतच्या निवासी बांधकामाना प्रतिवर्शी मालमत्ता कराच्या ५० टक्के दराने शास्ती आकारण्यात येईल १००१ चौ. फुटावरील निवासी बांधकामावर सध्याच्या दराने म्हणजे प्रतिवर्षी मालमत्ता करांच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात येईल. अश्या सुधारणा करण्याचा निर्णय मंजूर करण्यात आलेला आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात हजारोनी अनधिकृत बेकायदेशिर घरे, चाळी, इमारती बांधण्यात आल्या असून बांधकाम करणारे भुमाफीया व ठेकेदार हे घरे विकुन पळून गेलेले आहे. व शासनाचे शास्ती व दंडात्मक रक्कम भरण्याचा मानसिक त्रास मात्र सर्वसामान्य नागरीकांना सहन करावा लागत आहे. यामध्ये सर्वसामान्य जनता भरडली जात असून त्यांचे डोक्यावर अनधिकृत बांधकामांचे घरात रहात असल्याची टांगती तलवार नियमीतपणे लटकलेली असते. या सर्व प्रकारातून सर्वसामान्य जनतेची सुटका व्हावी या करीता येणाऱ्या आर्थीक वर्षात मंत्री मंडळाचे दिनांक २९/५/२०१८ रोजीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी ही महासभा सदर प्रस्ताव प्रस्तावीत करीत आहे.. सदर विषय गंभीर व उल्हासनगर मधील जनतेच्या जिव्हाळयाचा असल्याने सदर प्रस्तावावर महासभेत चर्चा विचार विनीमय होवून आवश्यक कारवाई लवकरात लवकर करण्यात यावी ही नम्र विनंती.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** २५ <u>दिनांकः— १५/९/२०१८</u>

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्या प्रमाणे नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामाची शास्ती शासन ठरवणार मा. मंत्री मंडाळातील दिनांक २९/५/२०१८ रोजीच्या निर्णयाची शास्ती भरतांना ६०० ते १००० चौरस फुटावर ५० टक्के आणि १००० चौरस फुटाच्या जास्त जागेवर दुप्पट दंड घेण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १६ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका सभा दिनांक २८/३/२०१८ रोजीचा ठराव क्र. ८५ विषयी फेरविचार करण्याबाबतचा पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

———————————————————————————————————

बोडारे साहेब, नाहीत पण श्री. सुर्वे साहेब अनुमोदक म्हणून आहेत.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** मा. सभागृहाला विनंती आहे की, हा विषय महत्वाचा आहे, आता गणपती येणार आहेत, आजच्या तारखेला महत्वाचा जरी नसला, तरी हा प्रत्येक वर्षी तोच वाद आणि तोच त्रास होत होतो. या वर्षी देखील...

**<u>सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—</u>** त्यांना बोलू दया, विनंती करणे हा त्यांचा अधिकार आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** माझी प्रशासनाला विनंती आहे, या वर्षी मर्यादा पाळली गेली नाही, हे लक्षात घ्या, ५ फुटाची मर्यादा आपण ठरवली होती आणि परवानगी एकाने पण घेतली नाही. ते महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे, माझे अजिबात म्हणणे नाही की, तुम्ही यांच्यावर आता कारवाई करा. माझे म्हणणे याच्या पुढे, याच्या पुढच्या वर्षी असा कुठलाही प्रकार साहेब, नवरात्र असेल काही असो लक्षात घ्या, याच्या पुढे अजुनही १४ तारखेला मंडप निघणार असतील असे आपल्याला आश्वासन दिले गेले होते. गणपती मुर्तीच्या संघटनेकडून आपल्याला आश्वासन मिळाले होते की, १४ तारखेला सर्व मंडप निघतील. अजूनही मंडप निघालेले नाहीत, आज १५ तारीख आहे. मा. महापौरजींना मी धन्यवाद देतो,

बरोबर त्यांनी १५ तारखेला मिटींग घेतली आणि या विषयाची चर्चा झाली. दुसरे त्यांच्यावर झालेला अन्याय जो या ठरावाद्वारे आपण आणला होता की, आपण त्या ठरावामध्ये बदल करू शकत नाहीत, पण ठरावामध्ये जी चुक झाली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर मी या ठरावाद्वारे एवढीच विनंती करतो, त्या मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर त्यांच्यावर जो अन्यायकारक दर दिवशी ५०० रूपये असा आपण कर आकारला होता. तो कर मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर प्रत्येक महीना किती स्केअर फुटवर आहे, त्या प्रमाणे आकारावा. इतिवृत्ताची वाट न पहाता पुढच्या वेळेस त्या ठरावामध्ये बदल करून मुंबई महानगरपालिकेचा जो दर आहे, तो त्यांना लागू करावा आणि याच्या पुढे साहेब, १५ तारीख आहे, उद्या सुट्टी आहे. मंडप दिसणार नाहीत, अशी अपेक्षा करतो. फक्त अपेक्षाच करू शकतो, कारण एवढी सिंपल गोष्ट आपल्याकडून होऊ शकली नाही. माझी आपल्याला विनंती आहे की नागरीकांना रस्त्यावरून चालण्यासाठी कुठेतरी सोय व्यवस्थित व्हावी, ही आपली जबाबदारी आणि कर्तव्य आहे, धन्यवाद. जय हिंद! जय महाराष्ट्र!

**महापालिका सचिव:—** मुंबई महापालिकेच्या धर्तीवर ....

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** मॅडम एक मिनीट पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलू इच्छिते साहेब याच्यात आपण वर्कींग करू शकतो की, व्ही.टी.सी. ग्राउंडमध्ये सर्व गणपती मंडळ त्यांना तिकडे शिवाजी मैदान पर्यंत मोठी ट्रॉली जाऊन टन होऊ शकत नाही अशी आयडीया मिळालेली आहे. सर कुठलाही मैदान आपण करायचा आणि त्यांना तिकडे स्टॉल म्हणून दया.  वुई कॅन टेक दि रेयन्यु फॉर्म देम आणि ट्राफिकचा पण प्राब्लेम होणार नाही आणि व्हि.टी.सी. ग्राउंड लिंक रोडला कनेक्टेड आहे सर इट कॅन गो टू कल्याण अल्सो अंबरनाथ अल्सो एव्हरीथींग.

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—** ठिक आहे, विचार केला पाहीजे.

**काही सदस्य:—** पास... पास...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी हा जो प्रस्ताव बोडारे साहेबांकडून आलेला आहे, त्याला सर्व संमतीने पास करू आणि दुसरा विषय घेण्यात यावा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मॅडम पाच फुटाची मर्यादा आणि मुंबई महापालिकेचे फक्त जे चेंजेस आहेत, तेच.

**महापालिका सचिव:—** पाच फुटाची मर्यादा ते मी टाकले आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** साहेब, सन्माननिय सदस्यांना एकदम व्यवस्थित आणि खरोखर बोलतात तिच परिस्थिती आहे, कॅम्प नंबर ३ ला जे विसर्जन घाट आहे, त्याच्या अलिकडे जे मच्छिमार्केट होते. त्या ठिकाणी पण आपल्याला त्यांना भाडेतत्वावर देता येईल.
**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** ते त्यांना सांगिले होते, आपण पुढच्या वर्षी करू.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. १६ :— प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर महानगरपालिका सभा दिनांक २८/३/२०१८ रोजीचा ठराव क्र. ८५ विषयी फेरविचार करण्याबाबतचा पालिका सदस्य श्री. धनंजय बोडारे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयानुसार श्री. गणेश मुर्तीकार सेवा संस्था, मंगलमुर्ती कला केंद्र सिध्देश्वर आळी पारनाका कल्याण यांचे दिनांक ३०/६/२०१८ रोजीचे पत्र आपल्या माहितीस्तव सविनय सादर करीत आहे.

वरील नमूद ठरावात मुर्ती कारखानदार व व्यवसायीक यांना तात्पूरते मंडप टाकण्यास ५०० दिन प्रतीदिन भाडे ४० दिवसाकरीता व ५ फुट फक्त असे नमूद केलेले आहे. या ठरावामुळे उल्हासनगर शहरातील मुर्तीकारावर उपासमारीची वेळ येणार असून गणेश भक्तांना मुर्ती उपलब्ध होवू शकणार नसल्याने त्याचाही रोष वाढणार आहे.

मुंबई महानगरपालिकेने ५०० चौ. फुटापर्यत ७९० रू. ५०० ते १२०० चौ. फुटापर्यत १२०० रू व १००० चौ. फुटाचे पेक्षा जास्त १५८० रू. दर आकारणी करीत आहे. तरी कृपया मुंबई

महानगरपालिकेपेक्षा कमी दर आकारणी करून तसेच वर नमूद ठरावाचा फेरविचार करणेसाठी सदर प्रस्ताव महासभेपुढे सादर करण्यात यावा ही विनंती.

**महासभा ठराव क्र: २६** **दिनांकः— १५/९/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा दिनांक २८/३/२०१८ रोजीचा महासभा ठराव क्र. ८५ मध्ये खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

उल्हासनगर शहातील मुर्ती कारखानदार व व्यवसायीक यांना तात्पूरते मंडप टाकण्याकामी ५ फुटापर्यंत मर्यादा ठेवुन मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर प्रति चौरस फुटानुसार दर आकारणी करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १७ :— प्रस्तावाची सूचना**

दिनांक ८/१२/२०१७ रोजीचा स्थायी समिती ठराव क्र. ६४ पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करुन त्यांच्याकडुन रक्कम वसुल करण्याबाबत चर्चा होवून निर्णय होणेबाबतची पालिका सदस्य श्री.प्रमोद टाले यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** मा. महापौरजी, मा. आयुक्त, हा जो प्रस्ताव मी आणलेला आहे, या प्रस्तावावर माझे असे मत आहे, तुम्ही ज्या पध्दतीने स्थायी समितीचा जो ठराव पास केलेला आहे. ज्या नियमान्वये तो पास केलेला आहे. माझी अशी तुम्हांला सुचना आहे की, तुमचे जर कोणी विधी अधिकारी इथे असतील किंवा लिगल ओपीनियन देणारा जर कोणी अधिकारी असेल, त्यांनी इथे येऊन त्याचे रितसर ओपीनियन दयावे. या स्थायी समितीच्या ठरावा बददल आणि स्थायी समितीचा हा ठराव कुठल्या नियमांमुळे तो बसवला गेला? जर बसवला असेल तर का बसवला गेला? आणि विधी अधिका—यांनी किंवा लिगल ओपीनियन जो देणार आहे. त्या लिगल याच्यामध्ये नसेल तर तो आज पर्यंत विखंडीत का केला नाही? याचे पण विश्लेषण व्हावे.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आयुक्त आणि श्री. भदाणे यांना कोर्टासाठी जो वकील दिला आहे, कोणार्क कंपनीवर साडे पाच करोडचा कोर्टाकडून स्टे घेऊन आले आहेत. तिथे चांगला वकील दिला नाही का? त्यामुळे महापालिकेची चांगली रिकव्हरी होईल. या अधिका—यांना आपण मंजुरी दिलेली आहे की, तुम्ही कोर्टामध्ये जाऊन हे करा.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** वकीलाची फी दिलेली आहे, तो ठराव.

**सदस्य, श्री.भारत राजवानीः—** अन्याय होत आहे ना. रिव्हेन्यु येईल उल्हासनगरसाठी डेव्हलेपमेंट होईल. यामध्ये पर्सनल काय आहे? स्थायी समितीमध्ये हा विषय जेव्हा आला होता, तेव्हा आमचा विरोध होता की हे इथे व्हायला नाही पाहीजे. त्याच्या नंतर पर्सनल कामासाठी पैसे दिले गेले. त्यांचे स्वत:ची केस आहे तर महापालिका का मदत करेल?

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** मा. आयुक्त साहेब, या स्थायी समितीच्या ठरावानुसार माजी आयुक्त, श्री. निंबाळकर आणि जनसंपर्क अधिकारी, श्री. भदाणे यांच्यावर जेव्हा ॲट्रासिटी गुन्हा दाखल झाला, त्या गुन्हयाचा खर्च करण्यासाठी महानगरपालिकेने पैसे दिलेले आहेत आणि हे पैसे देण्यासाठी स्थायी समितीचा ठराव मंजूर करण्यात आला. बहुमताने मंजूर करण्यात आला. हा महानगरपालिकेचा पैसा वैयक्तीक

कुठल्याही किंवा अॅट्रासिटी सारख्या मुद्दयाला तुम्ही खर्च देवू शकता का? आणि जर तुम्ही दिला आहे, स्थायी समितीने जर मंजूर केला असेल. तर स्थायी समितीच्या सदस्यांवर अॅट्रासिटी दाखल होऊ शकतो.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सन्माननिय आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, श्री. टाले साहेबांनी जो विषय आणला आहे. साहेब, भारताच्या इतिहासामध्ये पहील्यांदाच आरोपीला वाचवण्यासाठी पैसे दिले जातात. वकील दिले ही घटना आपण ऐकलेली आहे, आणि शासनाला वाचवण्यासाठी महापालिकेकडे आणि एकीकडे विषय म्हणजे अॅट्रासिटीच्या कायदयाच्या तरतुदीनुसार जो फिर्यादी असतो, त्या फिर्यादीला शासन मदत करते. दोन्ही प्रकरणामध्ये मा. जिल्हाधिका—यानी स्वत: मी फिर्यादी निंबाळकरच्या संदर्भात आहे आणि ढोबाळे भदाणेच्या संदर्भामध्ये फिर्यादी आहे. असे असतांना आर्थिक मदतीच्या शासनाने/ जिल्हाधिका—यांनी आम्हांला प्रस्ताव दिलेला होता, आम्ही तो घेतला नाही, तो विषय सोडून दया. पण एकीकडे फिर्यादीला शासनाला मदत करते आणि आपली महानगरपालिका आरोपीला मदत करते. मग शासनापेक्षा महानगरपालिका मोठी आहे का? हा एक विषय संशोधनाचा विषय आहे. दुसरी गोष्ट जसे माझ्या मित्राने सांगितले, कोणार्क कंपनीला आपण साडे पाच कोटी संदर्भात आपण सिनीयर वकील देवू शकत नाही. इतकी काय गरज होती? का आपण त्या मुंदरगी सारख वकील या केसच्या संदर्भामध्ये महानगरपालिकेने दिला आहे. दुसरी गोष्ट अशी की, त्या मुंदरगीची आपल्या पॅनलवर कुठल्याही प्रकारची नियुक्ती नाही. त्याचा अर्जही नाही, त्याची नियुक्ती बेकायदेशिर आहे. अशा माणसाला चेकद्वारे आपल्या महानगरपालिकेच्या जनतेच्या पैशातून आपण एका आरोपीला केस लढण्यासाठी संदर्भामध्ये पैसे पुरवलेले आहेत. हे कुठल्या नियमामध्ये आहे, याची आम्हांला शाहनिशा करावी आणि संबंधित अधिका—या संदर्भात अशी कारवाई झालेली असेल. त्या संबधिचे पैसे वसुल करण्यात यावेत. हे जनतेचे पैसे आहेत, जनतेच्या पैशाची अशा गैर मार्गाने केलेली लुट महानगरपालिकेचे सदस्य आम्ही सहन करणार नाही. म्हणून माझी विनंती आहे, हे झालेले पैसे आणि विशेष म्हणजे पैसे तुम्ही त्या सिनियर वकीलासाठी दिले आहेत आणि आता लेटेस्ट हायकोर्टाने श्री. भदाणेच्या संदर्भामध्ये आदेश पारीत केलेत की, त्यांना दिलेली ३८४ च्या संदर्भातील ८० संदर्भात, ८२ च्या संदर्भात त्यांनी अर्ज केला होता, एफ.आर.आय. च्या संदर्भातला रद्द केली की, त्यांना दिलेली सवलत यांना अटक करू नये. ती पण हायकोर्टाने आता काढून टाकले आहे, त्यांना कोणत्याही क्षणी अटक करा, असे आदेश हायकोर्टाने पारीत केले आहेत. असे असतांनी आपण पैसे दिलेत ते वसुल करण्यात यावेत अशी माझी सभागृहाला विनंती आहे आणि आपल्यानाही विनंती आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो विषय आला आहे, माझे म्हणणे आहे की, हा विषयच चुकीचा आलेला आहे. या विषयामध्यचे प्रस्तावाच्या सुचनेमध्ये लिहीले आहे. दिनांक ८/१२/२०१७ रोजीच्या स्थायी समिती ठराव क्रमांक ६४ पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करून त्यांच्याकडून वसुल करणे बाबत महासभेमध्ये चर्चा करणे. मी मा. सदस्य, श्री. प्रमोद टाले यांना सांगू इच्छितो की, ठराव क्रमांक ६४ जो स्थायी समितीने पारीत केला होता, त्याचा सदस्य मी पण आहे. त्यामध्ये आम्ही श्री. भदाणे यांना कोणतेही पैसे दयायचे आहेत, असा कोणताही ठराव केला नाही. यासाठी हा प्रस्तावच चुकीचा आला आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** कोणाला देण्यासाठी पास केला आहे?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मी सांगतो, पहीले मला बोलू दया, नंतर तुम्ही बोला.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सांगा, ना.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** ठराव क्रमांक ६४ जो आहे, मी आपल्या सचिव, प्रतिभाजी त्यांनी माझे बोलणे झाल्या नंतर वाचून दाखववावे. या ठरावामध्ये आम्ही फक्त मा. आयुक्त, श्री. निंबाळकरजी ज्यांना स्वत:चे अधिकार आहेत. परंतु त्यांनी जो प्रस्ताव आणला होता की, हा माझा स्वत:चा विषय आहे. मला वकीलासाठी फी भरायची आहे आणि जेव्हा ही केस दाखल झाली, त्या वेळी फक्त निंबाळकरसाठी, आयुक्तांसाठी ठराव क्रमांक ६४ मध्ये त्यांना वकील देण्यासाठी मान्यता दिली आहे. त्यामध्ये पैशाचे उल्लेख कुठेच नाही? की आपण किती पैसे देणार आहेत? आणि आज इथे जो ठराव आला आहे. यामध्ये लिहीले आहे की, श्री. युवराज भदाणे, युवराज भदाणे यांना पैसे दिले जावेत किंवा नाही दिले जावेत हे आयुक्तांच्या अधिकारामध्ये आहे. त्यांनी काय केले? त्याची मान्यता महासभेमध्ये आली नाही आणि स्थायी समितीमध्ये आली नाही. असा कोणताही ठराव झालेला नाही. तर आजचा हा प्रस्तावच चुकीचा आहे. यामध्ये लिहीले आहे की, श्री. भदाणे यांना १३ लाख रूपये ठराव क्रमांक ६४ दिले गेले. मी प्रतिभाजी यांना निवेदन करतो की, ठराव क्रमांक ६४ वाचून दाखवणे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** हे चुकीचे आहे, चुकीचे बोलत आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सभागृह नेताजी, सभागृहाची दिशाभुल करू नका. त्यामध्ये काय लिहीले आहे? ते चांगल्या प्रकारे वाचा. तुम्ही चांगल्या प्रकारे वाचा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** ठराव क्रमांक ६४ वाचून दाखवा, ठराव क्रमांक ६४.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u>** माझा जो प्रस्ताव आहे, स्थायी समितीचा ठराव क्रमांक ६४ रद्द करण्यासाठी, विखंडीत करण्यासाठी आणला आहे. तो ठराव विखंडीत करण्यासाठी जो पण लिगल ओपिनियन आहे. पहीले लिगल ओपिनियनला येऊ दया.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** स्थायी समितीचा ठराव रद्द करणे महासभेला अधिकार आहे. त्या अनुषंगाने आम्ही हा प्रस्ताव आणलेला आहे. त्या संदर्भातला निर्णय व्हावा.

**<u>महापालिका सचिव:—</u>** ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार फौजदारी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कल्याण येथे स्टॅम्प नं. २७४६/१७, सेशन केस न. ३११/१७, दि. ७/११/२०१७ व दावा क्र. २८७/१७ अन्वये दाखल दावा व मुंबई उच्च न्यायालयात क्र : ११६५/२०१७ अन्वये महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४८१ अन्वये दाखल याचिके बाबत केसचा बचाव करणेस व महापालिका निधीतून करण्यात येणा—या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेसाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. यात केस नंबर नमुद केले आहे,

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आम्हांला तेच सांगा, कुठल्या नियमाने आरोपीला देता येते ते नियम दाखवा आता, तुम्ही आता सांगितले ना, मला नियम दाखवा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** श्री. युवराज भदाणेचे नाव आहे का ठरावामध्ये? ठरावामध्ये १३ लाख आहेत का?

**<u>महापालिका सचिव:—</u>** नाही, नाही.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u>** मी ठराव विखंडीत करण्यासाठी बोललो आहे.

**<u>महापालिका सचिव:—</u>** त्यांनी यात स्पष्ट लिहीले आहे, श्री. शम्मी मोहम्मद, संपादक दैनिक क्लीन टाईम्स श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त हे महापालिकेत रूजू झाल्या पासून त्यांच्या विरूध्द काही अपनास्पद बातम्या छापत असल्यामुळे मा. आयुक्त यांनी त्यांच्या विरूध्द कल्याण न्यायालय वरिष्ठ येथे मानहानीचा दावा क्रमांक २८७ दाखल केला आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** एक मिनीट मॅडम, चव्हाण साहेबांना बोलवा, चव्हाण उठा बिल किती लाखाचा मंजूर केला आहे. बिल किती लाखाचा पास केला आहे, सांगा ना. त्यांना कळू दया ना, का ठराव आणला आहे? बिल किती लाखाचा मंजूर केला आहे, ते सांगा.

**<u>श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी, :—</u>** १७ लाख रूपयाचे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** बघितले.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** तुम्ही पैसे पास नाही केले ना.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** माझे असे आहे की, ठराव ६४ मध्ये कुठे आहे? युवराज भदाणेचा ठराव कुठे केला आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आपल्या ठरावानुसार बिल पास झाला आहे.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>** तुम्ही भदाणेच्या नावाने आयुक्तांना पैसे देणार का? तुम्ही सुट देत आहेत का?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** काय आहे तुमचे काय आहे? भ्रष्टाचारी माणसाला साथ देत आहेत तुम्ही. जमनुजी भ्रष्टाचारी माणसाला साथ देत आहेत. आज पंतप्रधान यांनी स्वच्छ भारत अभियानचा नारा दिला आहे आणि तुम्ही तर गलिच्छ भ्रष्टाचाराचा नारा देत आहेत.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** १७ लाख रूपये पब्लिकचे खर्च होत आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** आपण जो स्थायी समितीमध्ये ठराव केला आहे, त्या ठरावाच्या बाजूने आम्ही आहेत.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** त्याच ठरावामध्ये १७ लाख पास केले आहेत,

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** तुम्ही हे मंजूर करतात की, त्यांना १७ लाख दिले जावेत, मान्यता देत आहेत का?
**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** मा. आयुक्त महोदयजी मी तुम्हांला विचारू इच्छितो की, या ठरावामध्ये बिलकुल स्पष्ट लिहीले गेले आहे की, आयुक्तांना प्राधिकृत करू आणि त्यांनी त्यांच्या मर्जीनुसार किती पैसे खर्च केले? त्यांना पैसे खर्च करण्याचा अधिकार आहे का? आमच्या स्थायी समितीमध्ये केवळ ठराव करून दिला आहे. यासाठी आम्ही आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. तर आयुक्तांना प्राधिकृत केल्या नंतर आयुक्तांना पॉवर आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** जमनुजी तुम्ही सांगितले होते की, ४.०० वाजता मिटींग स्थगित करणार होते.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** याचे उत्तर आयुक्तांनी दिले पाहीजे की, नियमानुसार आम्ही आयुक्तांना प्राधिकृत केले आहे. तर आयुक्तांनी सांगितले पाहीजे की, कोणत्या नियमानुसार हा खर्च केला आहे. स्थायी समितीने केवळे हे सांगितले आहे की, आयुक्तांना पॉवर देण्यात येत आहे की, त्यासाठी खर्च करण्यात यावा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सन्माननिय महापौर साहेब, मतदान घ्या.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** हा प्रस्ताव स्थायी समितीने, आपण केला आहे, आपण आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** १७ लाख रूपये जनतेचे गेले आहेत आणि हे यांना मान्य आहे. भदाणे आणि निंबाळकर यांना साथ देण्यासाठी मतदान घ्यायला बघतात, भदाणेला, भ्रष्टाचा—याला साथ देण्यासाठी सभागृह नेता मतदान घ्यायला बघतात. भ्रष्टाचाराला साथ देण्यासाठी. पंतप्रधान स्वच्छ भारत अभियान चालवतात आणि इथे सभागृह नेता भ्रष्टाचाराचे अभियान चालवतात, भ्रष्टाचार करा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** या विषयावर मतदान घेण्यात यावे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** जोर जोरात ओरडून तुम्ही सांगतात की, आम्ही भदाणेचे नावच घेतले नाही. त्याच्या नंतरही तुम्ही जोर जोरात ओरडून हे सांगणार की सभागृह नेता यांनी केले आहे, तर काहीच फायदा होणार नाही. जर ओरडण्याची शर्यत ठेवायची आहे, तर आम्ही ओरडण्यासाठी तयार आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** या विषयावर मतदान करा. सर्व लोकांना गणपतीच्या दर्शनाला जायाचे आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** किती भ्रष्टाचार केला आहे?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** १७ लाख रूपये पब्लिकचे खर्च झाले आहे,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** १७ लाख रूपयांचे भ्रष्टाचार झाला आहे.

**महापालिका सचिव:—** या प्रस्तावाचे काय करायचे आहे, तुमच्यातर्फे सांगा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** जो ठराव स्थायी समितीने केला आहे, आज पण तो कायम आहे, ठराव रद्द करायचा नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** महापौरजी आम्ही पहीलेच स्थायी समितीमध्ये विरोध केला आहे.

**महापालिका सचिव:—** जे या ठरावाच्या विरूध्द आहेत.....

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** सचिव मॅडम आम्ही पहील्याच स्थायी समितीमध्ये या ठरावाला विरोध केला आहे.

**महापालिका सचिव:—** तुमचा विरोध आहे, बहुमताने.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** होय आमचा विरोध आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ज्यांना भ्रष्टाचार पाहीजे, ते त्या बाजून मतदान करतील, ज्यांना भ्रष्टाचार पाहीजे.

**महापालिका सचिवः—** जे हा ठराव रद्द करण्याच्या बाजूने नाहीत, त्यांनी कृपया हात वर करावेत.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** कुलकर्णी मॅडम, एक मिनीट मी हा ठराव....

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—** मतदान झाल्या नंतर बोला, बाकी काही बोलायचे असेल तर.....

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** मी हा जो प्रस्ताव आणला आहे, प्रस्ताव आणण्याचा उद्देश हा आहे की, स्थायी समितीचा ठराव विखंडी करण्यासाठी प्रस्ताव आणला आहे आणि मला एवढेच सांगायचे आहे की, हे कोणत्या कायदयाच्या डायरीमध्ये आहे. कोणत्या कायदयानुसार ठराव पास केला आहे, मी लिगल ओपिनियन मागितले आहे, आयुक्तांना माझे हेच म्हणणे आहे की, जे पण लिगल ओपिनियन देतील, ते समोर आणण्यात यावे. लिगल ओपिनियन देण्यात यावे, जो पर्यंत लिगल ओपिनियन देत नाहीत, तो पर्यंत हा प्रस्ताव नंतरच्या महासभेमध्ये आणण्यात यावा.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** या प्रस्तावाला श्री.प्रमोद टाले यांनी परत घेतला आहे, लिगल ओपिनियन....

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** परत घेतला नाही, भ्रष्टाचारी, भ्रष्टाचारी, सभागृह नेता भ्रष्टाचारी.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** मला लिगन ओपिनियन पाहीजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** सचिव मॅडम, हा प्रस्ताव ...

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** भ्रष्टाचा—याला साथ देणारे प्रस्ताव परत मागे घेतला नाही.

**महापालिका सचिवः—** जर हा विषय तुम्हांला नंतरच्या महासभेमध्ये आणायचा असेल तर आता डिफर होईल, नाही तर तुम्हांला हा रिजेक्ट करायला लागेल.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** लिगल ओपिनियन पुढच्या महासभेत येऊ दया ना.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी ेः—** संपुर्ण मिटींग पेडींग राहील.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मतदान झाले पाहीजे, मतदान, आमची मागणी आहे की, मतदान झाले पाहीजे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी ेः—** डिफर करून परत आणा.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** सन्माननिय महापौर आम्ही...

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—** त्यांनी सांगितले आहे की, नंतरच्या महासभेमध्ये येऊ दया, ज्यांनी प्रस्ताव आणला आहे, ते स्वतः बोलत आहेत.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** आयुक्त साहेब, माझे म्हणणे स्पष्ट आहे,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मतदान घ्या, मतदान.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** ओपिनियन पाहीजे,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** हा जो प्रस्ताव आला आहे, मी याच्यावर मतदान करणेसाठी....

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** भ्रष्टाचारी, भ्रष्टाचारी सभागृह नेता भ्रष्टाचारी.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** पहीले लिगल ओपिनियन दया, नंतर मतदान घ्या.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** लिगल ओपिनियन दया.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** पहीले लिगल ओपिनियन.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u>** कोणत्या कलमानुसार हा ठराव पास केला आहे, त्याचे मला लिगल ओपिनियन पाहीजे, आयुक्त साहेब.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>** पहीले लिगल ओपिनियन दया.

**<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>**सचिव मॅडम मतदान घ्या.

**<u>महापालिका सचिव:—</u>** कृपया मतदानाची मागणी झाली आहे आणि पिठासिन अधिकारी यांनी मतदान घ्यायला सांगितले आहे.

या वेळी सदस्या, श्रीमती रेखा ठाकुर  व सदस्य, श्री. शंकर लुंड हे सभागृहा बाहेर गेले.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** पहीले लिगल ओपिनियन झाले पाहीजे. भ्रष्टाचारी भदाणेला साथ देणा—यांचा निषेध असो.

**<u>महापालिका सचिव:—</u>** जे हा प्रस्ताव रद्द न करण्याच्या बाजूने आहेत त्यांनी हात वर करावेत.

**<u>प्रस्तावाच्या विरोधात २४ मते:—</u>**
१) श्रीम. कविता पंजाबी
२) श्रीमती इंदिरा उदासी
३) श्रीम. ज्योती भटीजा
४) श्री. विजय पाटील
५) श्री. महेश सुखरामनी
६) श्रीम.अर्चना करणकाळे
७) श्रीम. आशा बिराडे
८) श्रीम. जया माखिजा
९) श्रीम. ज्योती चैनानी
१०) श्रीम. चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग
११) श्री. जमनादास पुरस्वानी
१२) श्री. राजेश वदारिया
१३) डॉ. प्रकाश नाथानी
१४) श्री. किशोर वनवारी
१५) श्री. अशोक छाप्रु
१६) श्रीम. मिनाक्षी पाटील?
१७) श्रीम. शुभांगीनी निकम
१८) श्रीम. सविता तोरणे
१९) श्रीम. दिपा ठाकुर
२०) श्री. जीवन इदनानी
२१) श्रीम. छाया चक्रवर्ती
२२) श्री. रवि बागुल
२३) श्री. अजित गुप्ता
२४) श्री. कांचन लुंड

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** भ्रष्टाचारी भदाणेला साथ देणा—यांचा निषेध असो.

**<u>महापालिका सचिव:—</u>** **वो**टींग साठी बालेले आहे, तिस—यांदा बोलले आहे, जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत, त्यांनी कृपया हात वर करावे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** भ्रष्टाचा—यांना विरोध करणा—यांचा निषेध असो.

या वेळी काही सदस्य, एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते समजून आले नाही.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** नवसौ चुहे, नवसौ चुहे....


**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** उंदीर कोणी खाल्ले सर्व लोकांनी बघितले आहे, साहेब “नऊसौ चुहे खाकर बिली हसको चली गई”

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** भ्रष्टाचारी भदाणेला साथ देणा—यांचा निषेध असो.

**<u>महापालिका सचिवः—</u>** २४ मते आहेत.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** आमचा विरोध आम्ही स्थायी समितीमध्ये दिलेला आहे.

**<u>महापालिका सचिवः—</u>** नाही पण आता विषय आला आहे तर तुम्हांला दयावे लागेल या विषयी, आता पण विषय आणला आहे ना.

 या वेळी सदस्या, श्रीम. रेखा ठाकुर व सदस्य, श्री. शंकर लुंड यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** आमचा सगळयांचा विरोध आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** आम्ही जनतेचा पैसा फुकट जाऊन देणार नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** दलित विरोधी असणा—यांचा निषेध असो.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टालेः—</u>** महानगरपालिका दलित विरोधी आहे, हे स्पष्ट झालेले आहे. हा संविधानाचा अपमान आहे. अजुनही आयुक्तांनी कुठलीही ठोस भुमिका घेतली नाही.

 या वेळी सदस्या, श्रीम. ज्योती गायकवाड या सभागृहाच्या बाहेर गेल्या.

**<u>महापालिका सचिवः—</u>** मतदानासाठी हात वर करावेत, जे हा प्रस्ताव रद्द करण्याच्या बाजूने आहेत आणि एका बाजूनी मतदान झाले आहे, आता चर्चा न करता कृपया हात वर करावेत. कृपया महीलांनी इकडे लक्ष दयावे.

**<u>प्रस्तावाच्या बाजूने २० मतेः—</u>**
१) श्री. रमेश चव्हाण
२) श्री. सुमित सोनकांबळे
३) श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
४) श्री. सुनिल सुर्वे
५) श्रीम. चरणजितकोर भुल्लर
६) श्रीम. लिलाबाई आशान
७) श्री. सतरामदास जेसवानी
८) श्री. भारत राजवानी
९) श्री. भगवान भालेराव
१०) श्री. राजेंद्र चौधरी
११) श्री. शेखर यादव
१२) श्रीम. ज्योत्स्ना जाधव
१३) श्रीम. सुरेखा आव्हाड
१४) श्रीम. कविता बागुल
१५) श्रीम. अंजली साळवे
१६) श्रीम. सुनिता बगाडे
१७) श्रीम. सुमन सचदेव
१८) श्री. प्रमोद टाले
१९) श्री. स्वप्नील बागुल
२०) श्री. कलवंतसिंग सोहता

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** आम्ही भारतीय जनता पार्टीच्या धोरणास आमचा विरोध आहे.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानीः—</u>** असे कसे आहे, आरोपीला पैसे मिळत आहे आणि फिर्यादला पण काणूनची लढाई लढण्यासाठी.

**<u>महापालिका सचिवः—</u>** महीलांचे हात वर नाही, त्यांना मतदान करायचे आहे की नाही. हात वर करा, व्यवस्थित दिसत नाही. २० मते आहेत.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टालेः—</u>** दलित विरोधी सरकार आहे.

**महापालिका सचिव:—** हा ठराव बहुमताने मंजुर झाला आहे.

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १७ :— प्रस्तावाची सूचना**

दिनांक ८/१२/२०१७ रोजीचा स्थायी समिती ठराव क्र. ६४ पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करुन त्यांच्याकडुन रक्कम वसुल करण्याबाबत चर्चा होवून निर्णय होणेबाबतची पालिका सदस्य श्री.प्रमोद टाले यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त प्रस्तावाच्या सुचनेनुसार आपले लक्ष वेधु इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेतील मा. आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर व जनसंपर्क अधिकारी श्री. युवराज भदाणे यांच्यावर ॲक्ट्रासिटीच्या आरोपा अंतर्गत न्यायालयीन वकिलाची फी म्हणुन १३ लाख रुपये मनपाच्या तिजोरीतुन खर्च केले आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभा व इतर पत्रव्यवहार करुनही नागरी सुविधेची पॅनल निहाय कामे करण्याकरीता वारंवार भेटी व निवेदन देवून देखील मा. आयुक्तांनी आर्थिक परिस्थितीचे कारण सांगून प्रस्ताव मंजूर केले नाही. त्यामुळे प्रभागात कोणती विकासकामे होत नसल्याने नागरीक आमच्या विषयी नाराजगी व्यक्त करीत आहे.

असे असतांना प्रभागातील विकासकामांकरीता पैसे नाहीत परंतु लोकहितविरोधी व जातीयवादी आरोपासाठी महाराष्ट्र शासनाच्या विरोधात न्यायालयीन दावे लढण्यासाठी न्यायालयीन फी म्हणून १३ लाख रुपये खर्च करीत आहे हे कितपत योग्य आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेत वादग्रस्त म्हणुन जनसंपर्क अधिकारी युवराज भदाणे यांना यापुर्वीही महासभेने ठराव करुन बडतर्फ करण्याबाबत ठराव पारीत केलेला आहे.

तरी दिनांक ८/१२/२०१७ रोजीच्या स्थायी समिती ठराव क्रमांक ६४ पुर्वलक्ष्मी प्रभावाने रद्द करुन त्यांच्याकडुन रक्कम वसूल करण्याचा या प्रस्तावाच्या सुचनेनुसार येत्या महासभेत या विषयावर चर्चा होवून निर्णय व्हावा ही विनंती.

**महासभा ठराव क्र:** २७ **दिनांक:— १५/९/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा सभेत झालेल्या चर्चे अंती स्थायी समिती ठराव क्रमांक ६४, दिनांक ८/१२/२०१७ पुर्वलक्ष्मी प्रभावाने रद्द करण्याबाबत मान्यता देत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**बहुमताने**

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १८ :— प्रस्तावाची सूचना**

प्रशासनाकडुन निलंबित जनसंपर्क अधिकारी श्री. युवराज भदाणे यांच्यावर एफ.आय.आर. दाखल करण्यास होत असलेल्या दिरंगाई व टाळाटाळबाबत चर्चा होवून निर्णय होणेबाबतची पालिका सदस्य श्री. भगवान भालेराव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सभागृह कोणत्याही सदस्यांचा प्रस्ताव करा, राजेशजी किंवा कोणाचे प्रस्ताव करा मी दोन मिनीट जाऊन येतो. मला जरा बाहेर जायचे आहे, आपण कोणाचा तरी प्रस्ताव करा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** महापौरजी, गणपती उत्सव चालू आहे,

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मिटींग स्थगीत करा, म्हणजे आम्ही निघतो.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौर, उप महापौर सर्वांच्या घरी कार्यक्रम आहेत, आम्हांला घरी कार्यक्रम आहेत, महीला जवळ जवळ गेल्या आहेत आणि घरी गौरी आगमन आहे. त्याच्यामुळे आजची मिटींग स्थगीत करा. गणपती नंतर कधी पण ठेवा.

**सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे:—** गणपती नंतर कधीही मिटींग ठेवा, आजची मिटींग स्थगीत करण्यात यावी. आज गौरीचे आगमन आहे, आमच्या सर्वच महीला गेल्या आहेत. सरजी गणपतीच्या नंतर घ्या ना.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, ...

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** हा विषय संपवायला पाहीजे होता, मिटींग संपली असती ना.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** पॉईंट ऑफ आर्डरवर बोलायचे आहे, मा. आयुक्त साहेब, आमच्या वार्डामध्ये एक महापालिकेची जागा चोरून तिथे एक रूम बनवले आहे आणि श्री. गवारी यांना कंप्लेट देवून सुध्दा गवारी लक्ष देत नाहीत. आयुक्त साहेब, महापालिकेची जागा हडप होते आहे, त्यासाठी मी लिखीत कंप्लेट देवून सुध्दा आज पर्यंत कोणतीही कारवाई होत नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, आज आमचे सदस्य, इथे येऊन हजेरी लावून निघून गेले आहेत आणि आज तीन सभा होत्या, यासाठी मी विनंती केली होती की, ४.०० वाजे पर्यंत सभा चालायला पाहीजे. कारण तीन्ही सभा बरोबर स्थगीत करू शकतो. मी आपल्याला निवेदन करतो की, आजची २.०० वाजेची सभाग, ३.०० वाजेची सभा आणि ४.०० वाजेची सभा या तिन्ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगीत करण्यात यावेत.

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** आज २.०० सभा सुरू झाली ती अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे आणि ३.०० वाजेची सभा सुरू करण्यात यावी.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

सूचकाचे नांव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नांव :— श्री. राजेश वदारिया

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक २०/०७/२०१८ रोजी स्थगित केलेली व पुन्हा दिनांक १६/८/२०१८ व ४/९/२०१८ रोजी स्थगित केलेल्या सभा दिनांक १५/९/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. २७ अ** **दिनांक : १५/०९/२०१८**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १५/०९/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी

सायंकाळी ४.२३ वाजता उप महापौर तथा पिठासिन अधिकारी श्री. जीवन इदनानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— १९/१०/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/१०/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

**३—ड**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/०७/२०१८ रोजी सायंकाळी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगीत करण्यांत आल्याने सदर सभा गुरूवार दिनांक १६/८/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करून पुन्हा स्थगित करण्यात आली. सदरची सभा पुन्हा मंगळवार दिनांक ४/९/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करून काही कामकाज स्थगीत करण्यात आल्याने सदर सभा शनिवार दिनांक १५/९/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करून पुन्हा स्थगित करण्यात आली. सदर सभा पुन्हा शुक्रवार दिनांक १९/१०/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती पंचम उमेश कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. पंचम उमेश कालानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३७ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३९ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४० | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४१ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ८ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४२ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ९ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४३ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १० | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४४ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ११ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४५ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १२ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४६ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १३ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४७ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १४ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ४८ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १५ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ४९ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १६ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५० | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १७ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५१ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १८ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ५२ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १९ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५३ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २० | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५४ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| २१ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५५ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २२ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५६ | श्री. सतरामदास जेसवानी |
| २३ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५७ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २४ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५८ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २५ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५९ | श्री. कविता सुधिर बागुल |
| २६ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ६० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २७ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ६१ | श्री. किशोर नानायणदास वनवारी |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ६२ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २९ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६३ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३० | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६४ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३१ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३२ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६६ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३३ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६७ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६८ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३५ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६९ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना २. श्रीमती आशा नाना बिराडे, ३. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ४ श्री. महेश पहिलराज सुखरामनी, ५. श्रीमती पुष्पा नाना बागुल, ६. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, ७. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, ८. श्री. रमेश महादेव चव्हाण, ९. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, १०. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, ११. श्री. विजय चाहु पाटील, १२ . श्री. आकाश परशुराम पाटील.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. अच्युत हांगे, आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
४. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी
५. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
६. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता
७. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
८. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
९. श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक
१०.श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
११.श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
१२.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१३. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त
१४. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१५.श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
१६. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१७. श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता
१८. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता
१९. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२०. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक
२१. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षारक्षक
२२. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक
२३. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक
२४. श्रीमती निलिमा कदम, लेखापाल (शिक्षण मंडळ)

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्रीमती नर्गिस खान, लिपीक
३. श्री. बाळु भांगरे, लिपीक
४. श्री. अंकुश कदम, महापौरांचे स्विय्य सहाय्यक

दुपारी ३.३१ वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिवः—** हि दिनांक २०/०७/२०१८, १६/०८/२०१८, ०४/०९/२०१८ व १५/०९/२०१८ ची स्थगित सभा आहे. विषय क्र. १८ वाचुन दाखविते.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>** मा. महापौर मॅडम,

**<u>महापालिका सचिवः—</u>** मा. महापौर मॅडम, यांनी मा. आयुक्त साहेबांना सभागृहाला ओळख करून दयावी असे आदेश दिले आहेत.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>** मी त्यासाठीच बोलत आहे की, आपण आपल्याकडे सध्या दिवाळीचे दोन डबल धमाके आलेले आहेत. महापौर पण नविन आलेले आहेत व आपले आयुक्त देखील नविन आलेले आहेत. आपण विज्ञापन पाहत आहे, दिवाळीचे डबल धमाका. तर आपल्याकडे  दिवाळीचा सण येत आहे म्हणुन आपल्या येथे दोन दोन लोकांची नविन नियुक्ती झालेली आहे. तरी आपले आयुक्त देखील नविन आलेले आहे. त्याअनुषंगाने सर्व सदस्यांना आणि भारतीय जनता पार्टीच्या वतीने मी आयुक्ताचे स्वागत करतो आणि मी आपणास सांगू ईच्छितो की, मा. आयुक्त साहेबांचा कार्यकाल अल्प आहे परंतु ते कार्य अधिक करतील अशी अपेक्षा भारतीय जनता पार्टीला असुन आपले उल्हासनगर महानगरपालिकेत स्वागत आहे व उल्हासनगर मधील आपला कार्यकाल यशस्वीपूर्णजावो त्याकरीता हार्दिक शुभेच्छा तसेच इथे बसलेले सर्व महापालिका सदस्यांना आयुक्त साहेबांनी आपला परिचय करून दिला तर सर्व सदस्यांना सोयीचे होईल व मा. आयुक्त साहेबांना भेटता येईल.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टालेः—</u>** मा. महापौर महोदया, उप—महापौर, मा. आयुक्त आज जर आपण बघितले तर आज उल्हासनगर शहराचा नविन दिवस व नविन सुरूवात होत आहे. आमच्या महापौर महोदया आज प्रथमच महासभेला संबोधित करीत आहेत. त्याच वेळेस मा. आयुक्त साहेब देखील महासभेला संबोधित करीत आहे. नविन आयुक्त व महापौर यांच्या आगमनाने वर्तमान व भविष्यकाळात उल्हासनगर शहराला नविन दिशा मिळेल असे मला वाटते व मी आपणांस सांगू ईच्छितो की, माझ्याकडुन आपल्या दोघांना हार्दिक शुभेच्छा देतो व येणा—या कालावधीत उल्हासनगरशहराचा विकास नक्कीच होईल. धन्यवाद!

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—</u>** महापौर साहेबा.....

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—</u>** मा.महापौर महोदया, मा. उप—महापौर साहेब, नगरसचिव या सभागृहात उपस्थित असलेले सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते, स्थायी समितीचे सभापती, विविध समितीचे सर्व सभापती, सन्माननीय सर्व नगरसेवक/नगरसेविका या ठिकाणी उपस्थित असलेले माझे सर्व अधिकारी/कर्मचारी आणि या सभेला आर्वजून उपस्थित असलेले सर्व माध्यमांचे प्रतिनिधी/पत्रकार मित्र आणि या शहरातील नागरीक, बंधु आणि भगिनींनोआपल्या उल्हासनगर शहरामध्ये मागील १० ऑक्टोबर रोजी मी आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेचा आयुक्त पदाचा कार्यभार स्विकारला आहे. आतापर्यंत जवळ जवळ ३० वर्षे  माझी सेवा नगरविकास विभागाात झालेली आहे. यापूर्वी मराठवाडयात १२ वर्षे मी विविध नगरपालिका मध्ये काम केलेले आहे. आणि मागील १८ वर्षापासून मी महानगरपालिकेत विविध पदावर कार्यरत आहे आणि यापूर्वी मी महानगरपालिकेत सहा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उप—आयुक्तआणि चार महानगरपालिकेत आयुक्त पदी काम करण्याचा मान मला मिळाला आहे. यापूर्वी मी भिवंडी महानगरपालिका मध्ये आयुक्त पदावर काम केलेले आहे. त्यानंतर मिरा—भाईंदर महानगरपालिकेत, त्या नंतर लातुर महानगरपालिकेत आणि आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेत माझी गेल्या १० ऑक्टोबर रोजी आयुक्त पदी नियुक्ती झालेली आहे. आणि मी आपल्या महानगरपालिकेत रूजू झालो आहे. मी मुळातच बिड जिल्हयाचा रहिवाशी असून या नगरविकास विभागामध्ये सन १९८७—८८ च्या बॅचमध्ये माझे महाराष्ट्र लोकसेवा आयोग तर्फे निवड झाली आणि या सवेत आलो आणि ३० वर्षे सेवा झाली आहे मी सांगितल्या प्रमाणे सेवा केलेली आहे. उल्हासनगर शहराचे नाव लौकिक फक्त महाराष्ट्रामध्येच नाही तर संपूर्ण भारत देशात या शहराचे नाव लौकिक आहे. उल्हासनगर शहरातील बाजार हे खूप सुंदर आहे. या शहरात महाराष्ट्रातून विविध ठिकाणातून लोक येतात. मी रूजू होउन १० ते १२ दिवस झालेल आहेत. उल्हासनगर शहराच्या ब—याच म्हणजे संपूर्ण शहराच्या कानाकोप—यात गेलो नसलो तरी उल्हासनगर शहराचे १ ते ५ जे झोन आहेत त्या झोन मधील ब—याच ठिकाणी दौरा केलेला आहे. प्रभाग समितीची पाहणी केलेली आहे, त्यात प्रभाग समिती क्र. ३ व ४ ची पहाणी केली यानिमित्ताने मला उल्हासनगर शहर पाहण्याची संधी प्राप्त झाली आहे. आणि उल्हासनगर शहरात पोटॅनाशियल भरपूर आहे परंतु ती युटिलाईज झालेली नाही असे प्रथम दर्शनि लक्षात आले आहे आणि विशेष म्हणजे स्वच्छ भारत अभियानमध्ये ज्या प्रमाणामध्ये किंवा जेवढे काम व्हायला पाहिजे तेवढे काम झालेले नाही असे मला एकदरीत दिसुन आलेले आहे. त्यामुळे आम्ही पहिली बैठक घेउन स्वच्छ भारत अभियान मध्ये कामाला सुरूवात केलेली आहे की, जास्तीत जास्त प्रमाणातउल्हासनगर शहर कसे सुंदर करता येईल त्याकडेमाझे विशेष लक्ष असेल त्यामुळे त्यासाठी आपले सर्व सन्माननीय नगरसेवक या ठिकाणचे आपण लोकप्रतिनिधी आहात सर्व पदाधिकारी यांचे मला यामध्ये १०० टक्के सहकार्य राहिल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि या शहरातील नागरीकांचे सहकार्य आणि त्यांचा सहभाग, सहभाग फार महत्वाचा आहे. फक्त सहकार्य असुन चालणार नाही कारण शाासनाची कोणतीही योजना जर यशस्वी करायची असेल तर त्याठिकाणी नागरीकांचा सहभाग आणि पदाधिकारी यांचे सहकार्य व सहभाग अशी जर समजा प्रशासनाला साथ मिळाली तर या शहराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी काही विलंब लागणार नाही. असे मला एकंदरीत

वाटते. तसेच परवा मी आल्यानंतर प्रांत अधिकारी साहेबांनी आपल्याकरीता चार जागा हॅडओव्हर केलेल्या आहे ज्या डिपीमध्ये आपले आरक्षण आहे ज्यामध्ये स्टेडियम आहे, बोटक्लब आहे, स्मशान भुमी आहे आणि एक इंदिरा गांधी मार्केट आहे. त्याठिकाणी जाउन आम्ही मा.महापौर सोबत आणि पदाधिकारी सोबत दौरा देखील केलेला आहे. तर त्याचे नियोजन पुढे काय करायचे? त्या कशा पध्दतीने विकसीत करायचे आह? त्याचे प्लॅनिंग थोडयाच दिवसात आपण सुरू करणार आहोत आणि मला असे वाटते की, पाहिल्याच बैठकीत मीजास्त बालेणे उचित ठरणार नाही आपण चांगल्या पध्दतीने या शहरामध्ये काम करू आणि उल्हासनगर शहराचे नाव चांगल्या प्रकारे उज्वल होईल आणि जास्तीत जास्त नाव उज्वल करून या ठिकाणचे सर्व व्यापारी मंडळी देखील आपल्याला सहकार्य करतील अशी मी अपेक्षा ठेवतो. सर्व उल्हासनगर रहिवाशी व नागरीकांचे सहकार्य आपल्याला मिळाले तर उल्हानगर शहर स्वच्छ, सुंदर व हरित करण्याकरीता काही वेळ लागणार नाही असे मला १०० टक्के खात्री आहे आणि माझ्या अनुभवाची शिदोरी नक्कीच या ठिकाणी मी चांगले काम करण्या करीता मला साथ देईल अशी मला खात्री आहे. एवढे दोन शब्द बोलून मी माझे भाषण संपवतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

या वेळी सदस्य, श्री. मनोज सयानी व सदस्या, श्रीमती जयश्री पाटील यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** नुकतीच निवडणुक झाली आणि निवडणुक झाल्यांनतर महापौर पदी पंचम कलानी मॅडम आहेत आपण आसनस्थ झालात आणि आज आपण पहिलीच सभा चालवत आहे पिठासीन अधिकारी म्हणुन तुम्हाला तुमच्या वाटचाली बद्दल हार्दिक शुभेच्छा. हांगे साहेब संपूर्ण उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने विरोधी पक्ष नेता म्हणुन व विरोधी पक्षाच्या वतीने, सभागृहाच्या वतीने मी तुमचे या सभागृहामध्ये व उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये स्वागत करतो. आपण आल्यानंतर ही पहिलीच सभा आहे. आपण सांगितले की, आपण संपूर्ण कानाकोपरा फिरले नाही परंतु बरेसचे उल्हासनगर फिरले आहात एक, दोन, तीन, चार, पाच झोन फिरले, प्रभाग समिती फिरले त्यावरून पोटॅनशियल किती आहे? हे लक्षात आले परंतू त्याचा वापर झाला नाही हे लक्षात आले. आपण पाहिले असेल की, प्रशासनाचे कशा पध्दतीने काम चालत कधी कधी असे असते की, आपला पायगुण देखील असतो महापौर मॅडम आलात आपण आलात आणि ब—याच वर्षापासून मी सांगतो की, माझे ड्रीमप्रोजेक्ट होते की, मा. बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकुल त्या ठिकाणी व्हावे. गेल्या सात वर्षापासून मी सतत झगडत होतो शासनाचा निधी येउन पडला होता चार कमिशनर येउन गेले परंतु ॲडव्हान्स पझेशन होते ते बाकी होते. आपण आलात आणि माजी महापौर यांनी देखील यासाठी भरपूर परिश्रम केले होते. कलेक्टर गेले, कमिशनर गेले पण योग्य वेळ यावी लागते. महापौर आले, आपण आले आणि लगेच दुस—या दिवशी आपल्या ताब्यात मिळाले हे खरोखर एक चांगले संकेत आहे असे मला वाटते बोट क्लब देखील आमचे ब—याच वर्षापासून पेंडींग होते. बोट क्लब मध्येजेथे बांधा वापरा हस्तांतरीत करा प्रोजेक्ट मंजुर केला होता परंतु आपला ताबा नसल्यामुळे सदरचा प्रोजेक्ट रद्द झाला होता.सदरचा प्रस्ताव चांगला की वाईट ही नंतरची गोष्ट होती पण त्यावर आपला ताबा असला पाहिजे. व्हि.टी.सी. क्रिडा संकुल म्हणजे आता व्हि.टी.सी. असलेले व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर त्याठिकाणी चालु होते कॉम्पेनसेशन पुर्ण मालमत्तेत चार ठिकाणी विकसीत केले त्यात एक बोट क्लबझाले, टाउन हॉल झाले, व्हि.टी.सी. आणि हिराघाटचा ब्रिज झाले या पाच कॉम्पेनसेशन फुल प्रापर्टीमधुन आज वास्तु विकसीत केले आहे. पण ॲडव्हान्स पझेशन नसल्यामुळे गेल्या पाच वर्षा पासुन तो रखडलेला होता. निविदा निघालेल्या हिरे साहेब असतांना निविदा निघाल्या पण असत्या कारण शासनाकडुन १० कोटी निधी येऊन पडला होता. त्यासाठी पाठपुरावा केला होता पायाभुत सुविधाच्या अंतर्गत क्रिडांगण विकसीत करण्या करीता शासनाकडुन हिरे साहेब असतांना निधी महापालिकेत आणला होता. त्यानंतर निबांळकर साहेब आले ते म्हणाले की आपल्याकडे ॲडव्हान्स पझेशन पाहिजे महापालिकेच्या ताब्यात पाहिजे त्यामुळे सदरचा प्रोजेक्ट रखडलेला होता.त्यानंतर गणेश पाटील साहेब आले त्यांनी पाठपुरावा केला. अगोदरचे गवादे एस.डी.ओ. होते ते काही स्वत:च्या अंगावर घेत नव्हते, विजयाताई जाधव होत्या त्यांनी काही जबाबदारी घेतली नाही. गिरासे साहेब आले आणि त्यांनी आश्वासन दिले की मी करतो आणि त्यांनी दहा ते पंधरा दिवसात तो निर्णय घेतला आणि चारही जागा त्या आपल्या ताब्यात मिळाल्या. आता आपण त्याचा विकास करू शकतो त्या जागा महापालिकेच्या मालकीच्या झालेल्या आहे. असे इतरही भुखंड महापालिकचे आहेत पार्श्वभुमी सांगतो की, १९८७ साली महाराष्ट्र शासनाने जवळपास १८७ भुखंड कागदोपत्री आपल्या ताब्यात दिले. त्यापैकी बरेचसे विकसीत केले कुठे शाळा बांधल्या, कुठे गार्डन विकसीत केले, काही अतिक्रमण झाले पण ठराविक भुखंड बाकी आहे तेही भुखंड महापालिकेच्या ताब्यात घेण्या करीता जशी आता प्रक्रिया सुरू केली तशी बाकीचीही प्रक्रिया चालु करा मी ही सुरूवातीपासुन सांगत आलो आहे. नाहीतर बाकीच्या जागेवर देखील अतिक्रमण होईल सनद निघायचे प्रकार अजूनही सुरू आहे. कसे निघतात? का निघतात? तो वादग्रस्त विषय आहे तो नंतरचा प्रश्न व तो विषय कलेक्टर, एस.डी.ओ यांचा आहे तो आपला विषय नाही. जे भुखंड आपल्या ताब्यात आहे जे आपण करू शकतो ती आपण केले पाहिजे हि प्रथमदर्शनी सुचना आपणास देतो. विरोधी पक्ष म्हणुन आताच काही सांगत नाही पण एकच सांगेल की उल्हासनगर शहर छोटे आहे, १३ स्केअर किलोमीटरचे शहर आहे. पोटेंनशिल आहे जर इच्छाशक्ती असले तर चांगले विकसीत देखील करता येते परंतु आतापर्यंत प्रशासनाकडुन तसे झाले नाही. लोकप्रतिनिधीचा सहभाग असतो लोकप्रतिनिधी म्हटल्यानंतर लोकांन करीता काहीनी काही वचन देत बसतात. त्यासाठी कधी कधी कराव लागत आणि करतात. पण

अशावेळी प्रशासनाने मार्ग काढून जेथे खंबीर भुमिका घेतली पाहिजे जे लोकांच्या हिताचे आहे ती घ्याल अशी अपेक्षा त्यासाठी आम्ही संपूर्ण सभागृह, मी विरोधी पक्षाच्या वतीन तुम्हाला जाहीर आश्वासन देतो की, यासाठी विरोधासाठी विरोध कधीही झालेला नाही, यापर्वूी ही झाला नाही यापुढेही होणार नाही. पण चांगले काम आम्ही तुमच्या पाठीशी आहोत एवढीच आमची अपेक्षा उल्हासनगर शहरातील व महापालिकेच्या लोकांना कायपाहिजे पाणी, रस्ते, लाईट आणि साफसफाई, मनोरंजनाकरीता उद्याने या पाच गोष्टी जर दिल्या तर हे १३ क्स्वेअर किलोमीटरचे शहर जे पूर्वी तुम्ही सांगितले ते आम्ही सिंगापूर शहरा सोबत तुलना करत होतो आम्ही बघायचो की आमचे उल्हासनगर शहर हे संघाई होईल, सिंगापूर होईल पण संघाई नको, सिंगापूर नको उल्हासनगर शहर हे उल्हासीत ठेवा त्यासाठी जे काही सहकार्य लागेल ते सहकार्य विरोधी पक्षाच्या वतीने आश्वासन देतो पुन्हा आपले स्वागत करतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** आदरणीय डिगनीटीज, आज माझी पहिली महासभा असुन मी आपणा सर्वांना नम्र विंनती करीते की, आपले जे काही मागील जुने विषय आहेत ते सर्व विषय समाप्त करू या तसेच मागील तीन स्थगित झालेले महासभा समाप्त करू. या त्यांनतर जसे आपण पुढील विषय घेण्यात येतील त्यामध्ये उल्हासनगर शहरा कीरता काय चांगले करता येईल त्यासंबंधी असे नविन विषय घेण्यात यावे. तसेच महापालिकेच्या मुख्य विभागास माझी विनंती आहे की, ज्या कोणी विभागातील अधिकारी/कर्मचारी महासभेस येउ शकणार नाही तर त्यासंदर्भात लेखी स्वरूपात पुर्व सुचना देण्यात यावी. जेणेकरून महासभेत उपस्थित असलेले महापालिका सदस्यांना ज्या संबंधित विभागाशी प्रश्न निगडीत असतील त्यांना अगोदरच सांगण्यात येईल की संबंधित विभागातील कर्मचारी/अधिकारी महासभेस उपस्थित नाही. हि माझी विनंती आहे. धन्यवाद!

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १८...

**सदस्या, श्रीमती मीना सोनेजी:—** मॅडम एक मिनिट, मॅडम मागील महासभेत माझी एक लक्षवेधी घेण्यात आलेली आहे व ती मंजूर करण्यात आली असुन त्यावेळी उप—महापौर व्यासपीठावर होते. आम्ही विंनती केली होती की, आम्हाला स्क्रिनची आवश्यकता आहे. तर ती बैठक ५.०० वाजता आहे त्यापूर्वी स्क्रिनची सोय करण्यात यावी. धन्यवाद मॅडम!

**महापौर मॅडम तथा पिठासिन अधिकारी:—** याला कोणाचा विरोध आहे का? स्क्रिनच्या संदर्भात.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १८ :— प्रस्तावाची सूचना**

प्रशासनाकडुन निलंबित जनसंपर्क अधिकारी श्री. युवराज भदाणे यांच्यावर एफ.आय.आर. दाखल करण्यास होत असलेल्या दिरंगाई व टाळाटाळबाबत चर्चा होवून निर्णय होणेबाबतची पालिका सदस्य श्री. भगवान भालेराव यांचा प्रस्ताव विचारात घेणे. ते उपस्थित नाहीत, अनुमोदक श्री. प्रमोद टाले उपस्थित आहेत, ते बोलू शकतात.

---

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, मा. उप—महापौरजी, विषय असा आहे की, प्रशासनाकडुन....

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी :—** हा विषय मागे झालेला होता ना?

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** नाही, नाही, नाही.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी :—** कुठला विषय होता हा?

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** साहेब घेऊ का? बोलु का?

**महापालिका सचिव :—** तो ६४ ठराव नंबर तो होता.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** निलंबीत जनसंपर्क अधिकारी, श्री. युवराज भदाणे यांच्यावर एफ.आय.आर. दाखल करण्यात होणा—या दिरंगाई बाबत. मा. आयुक्त साहेब उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये जनसंपर्क अधिकारी युवराज भदाणे यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर आणि दुरूपयोग करून त्यांच्या त्या कार्यालयामध्ये बरेचसे दस्तऐवज आणि धनादेश, बोगस शासनाचे ओळखपत्र आणि बरेचसे असे काही विषय त्याच्या कार्यालयामध्ये सापडलेले आहेत आणि हे सापडल्यानंतर मागील तात्कालीन आयुक्तांनी

त्यांना निलंबित केले आहे. आजचा विषय आहे की, या तत्कालीन निलंबीत अधिका—याला, युवराज भदाणे, हा जो पीआरओ आहे त्याच्यावर एफ.आय.आर. गुन्हा दाखल करण्याबाबतचा हा विषय आहे. एखादया निलंबीत अधिकार—याने वेगवेगळया प्रकारचे खोटे दस्ताऐवज बाळगणे किंवा अजून बाकी महानगरपालिकेचे टॅक्सचे चेकस् त्यांच्याकडे सापडणे हा सरळ सरळ फसवणुकीचा गुन्हा आहे आणि तेव्हापासुन आमची सर्वाची विनंती होती की त्यांच्यावर तात्कालीन ताबडतोब एफ.आय.आर. दाखल करायला पाहिजे होता परंतु तो केला नाही. याचे कारण ते कदाचित त्यांनाच माहिती असेल की का गुन्हा दाखल केला नाही? आज मी स्वत: हायकोर्टामध्ये त्याच्या विषयी जनहित याचिका दाखल केली आहे त्यांच्यावर गुन्हा दाखल करणे संदर्भात आणि हा विषय असतांना तत्कालीन आयुक्तांनी कुठला निर्णय घेतला नाही. महासभा कुठला निर्णय घेत नाही आज मी या महासभेला आणि प्रशासनाला माझी विनंती आहे की त्याची रितसर जी चौकशी आहे किंवा अंतर्गत चौकशी जरी चालु असेल तरी तुमच्या अधिकारा मध्ये त्यांनी केलेल्या फसवणुकी बद्दल गुन्हा दाखल होऊ शकतो आणि तो तुम्ही केला पाहिजे. जर तुम्ही दिरंगाई करत असाल तर त्यात निश्चित पणे काही काळबेर असाव अस मला वाटते. मी या महासभेला विंनती करेल की, त्या निलंबीत अधिका—यावर गुन्हा दाखल करण्यासाठी आपण सर्वसंमतीने हा ठराव पास करावा. धन्यवाद!

**या** वेळी सदस्य, श्री. अजित गुप्ता यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी :—** जनतेकडुन मला दोन लेखी पत्र प्राप्त झाले असुन ते पत्र मी आयुक्त साहेबांकडे देत असुन त्याच्यावर चांगल्या प्रकारे विचार करून काय तक्रार आहे? त्याच्यावर नियमानुसार काय कार्यवाही करता येईल? धन्यवाद!

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** हा आपल्याकडे जो प्रस्ताव आलेला आहे, श्री. भालेराव आणि प्रमोद टाले यांचा हे पूर्ण प्रशासनाचा विषय आहे. प्रशासनाला जर योग्य वाटत असेल त्याच्यावर एफ.आय.आर. करावयचा आहे, त्याच्यावर जर खरोखर गुन्हा दाखल करायचा आहे हे पूर्णपणे प्रशासनाने विचार करायचा आहे. याच्यावर प्रशासन जो निर्णय घेईल तो आम्हाला मान्य असेल या व्यतिरिक्त आमचे काहीही मत नाही.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** मा. आयुक्त महोदय, प्रदिपजी जरी बोलले प्रदिपजींनी पूर्णपणे प्रशासनावर ढकलुन दिले प्रशासनाचा भाग आहे तो. परंतु आजच्या घडीला या शहरातील प्रत्येक जनता प्रत्येक, सन्माननीय सदस्य यांना चांगले माहिती आहे, भदाणे हा जो विषय आहे भदाणेंचा हा विषय आणि त्यांच्या जो इतिहास जर बघितला तर आपणांस देखील माहित आहे व आम्हाला देखील माहित आहे. आपल्याला पण माहित आहे व आम्हाला पण माहित आहे की, काय होणार आहे? आणि असे अधिकारी याला जर महापालिकेचे सदस्य जर आधार देत असतील तर येत्या काळात उल्हासनगर शहरातील जनता आपल्याना सर्व सदस्यांना कधीही माफ करणार नाही.

या वेळी सदस्या, श्रीमती ज्योती गायकवाड यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, हा जो विषय आहे, तो वेगळा आहे, निलंबीत त्यांना प्रशासनाने केले आहे. जो कनफर्म होण्याकरीता आला आहे.........

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** साहेब, हा निलंबन का मुद्दा नाही, आपला मुद्दा चुकीचा आहे. .....

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** एक मिनिट सर, एक मिनिट सर मुद्दा वेगळा वेगळा आहे. मी बोलत आहे की, मुद्दा वेगळा आहे. आपण आज जो एफ.आय.आर.चा मुद्दा आणला आहे तो वेगळा आहे व निलंबन कनफार्म चा मुद्दा वेगळा आहे. आज जो टाले साहेब यांनी सांगितले की हा जो निर्णय आहे तो होणार नाही व उल्हासनगर शहरातील जनता माफ करणार नाही प्रस्तावाची सुचना महासभेत आणणारे भगवान भालेराव साहेब कुठे आहेत? अनुमोदक आहेत, ठिक आहे पण..

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** अनुमोदक आहे ना!

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** ठिक आहे पण भगवान भालेराव साहेब मला बाहेर भेटले होते पण आता महासभेत नाही, ते कुठे आहते, एवढा मोठा गंभीर विषय जर त्यांनी महासभेत आणला आहे तर त्यांनी तर महासभेत उपस्थित राहिले पाहिजे.

**या** वेळी सदस्य, श्री. दिपक सिरवानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** सुचक नाही पण अनुमोदक तर उपस्थित आहे ना....

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** ठिक आहे, अनुमोदक उपस्थित आहेत असे सचिव मॅडम यांनी सांगितले पण ज्यांनी हा प्रस्ताव महासभेत आणला आहे त्यांनी महासभेला उपस्थित राहणे गरजेचे होते त्यामुळे ते महासभेत या विषयांवर अधिक चांगल्या प्रकारे खुलासा करू शकले असते.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** नाही, नाही आमचा दोघांचा मुद्दा एकच आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** आणि इथे जो निर्णय होतो, तो बददल होत असतो तर तसे व्हायला पाहीजे, प्रत्येक व्यक्तीने एकाच मुद्दयावर ठाम राहायला पाहीजे. आयुक्त साहेबांना श्री. प्रदिपजीने सांगितले की जे हायकोर्टमध्ये पण जाऊन आले आहेत, हायकोर्टमध्ये पण त्यांना रिलिफ मिळाले नव्हते. परंतु जे करायचे आहे, ते आयुक्त साहेबच करतील आयुक्त साहेब, जर एखादा ठराव चुकीचा होत असेल तर तो ४५१ मध्ये सरकारला कॅन्सलसाठी पाठवू शकतात. तो तर त्याचे पॉवर आहे, त्यांनीच निलंबित केले आहे. स्टाफला आयुक्त साहेबांनीच निलंबित केले आहे, जे प्रदिपजीने सांगितले की, प्रशासनाला जे उचित वाटेल ते करेल.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** मा. आयुक्त सहेबा दोन मिनीटे मी बोलतो, यांचे म्हणणे आहे की....

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** सन्माननिय महोदय, तुम्ही जी प्रस्तावना इथे सांगण्यात आलेली आहे, जो विषय आपण मांडलेला आहे, त्याच्या विषयी प्रशासन उत्तर देत आहेत.

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:—** मा. महापौर, मा. आयुक्त, उपस्थित सर्व सदस्य, या संदर्भात दोषारोपत्र तयार करण्याचे काम चालू आहे,दोषारोपपत्र बनवल्या नंतर त्यांना ते बजावण्यात येईल. त्याचे जे एक्सप्लेनेशन येतील आणि चौकशीअंती जर ते आम्हांला दोषी आढळून आले तर मग त्याच्यावर पुढील उचित कारवाई करणे उचित होईल. तर आता तातडीने एफ. आर. दाखल करणे एखादया कर्मचा—याची चौकशी न करता उचित होणार नाही असे प्रशासनाचे म्हणणे आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** मा. महापौर, मा. उप—महापौर, आता आपण ज्या भदाणे संदर्भात सांगितले असेच एक कर्मचारी राजा अडांगळे यांच्यावर तीन वर्षे चौकशी केली त्यानंतर त्यांच्यावर एफ.आय.आर. दाखल करण्यात आली. प्रशासन नेहमी आपल्या कर्मचा—यांना वाचवण्याचा प्रयत्न करते की कशी यांची सेटलमेंट होईल जेणेकरून त्यांच्यावर कारवाई होणार नाही. तर आपणांस विनंती आहे की, यांच्यावर आपण कारवाई करावी जे कायदयाच्या नियमानुसार दोषी असेल त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. आणि हा विषय इथे समाप्त करावा.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** आयुक्त महोदय, देहरकर साहेब बोलले, त्यांच्यावर निलंबनाची कारवाई झालेली आहे, पुढील कार्यवाही सुरू आहे. माझे म्हणणे असे आहे की, तत्कालीन आयुक्त यांनी त्यांना निलंबीत केले तो विषय वेगळा होता आणि आमची एफ.आय.आर. करण्याची जी मागणी आहे तो विषय पूर्णपणे वेगळा आहे. एफ.आय.आर. कुठल्या कुठल्या कारणासाठी केले पाहिजे? त्यांनी फाईल संदर्भातला विषय आहे. त्यांच्या कार्यालयात जवळपास ३०० ते ३५० फाईलस सापडल्यात आहेत. टॅक्सचे पेमेंट सापडलेले आहेत त्याला फसवणुकीचा त्यासंदर्भात त्याची एफ.आय.आर. दाखल पाहिजे आणि आम्ही निलंबनाचा हा विषय घेतलेलाच नाही आमचा विषय त्यांनी केलेल्या ज्या चुका आहेत सापडलेल्या चुका आहेत त्याविषयी तुम्ही एफ.आय.आर दाखल केला पाहिजे जर एक फक्त व्हिडीओ रेकॉर्डींग जी पीडब्ल्युडी मध्ये सापडली त्या नुस्त्या रेकॉर्डींगच्या आधारे तुम्ही एका सन्माननीय नगरसेवकावर ताबडतोब गुन्हा दाखल करता मग हे का करत नाही तुम्ही? ताबडतोब एक आमचे सन्माननीय नगरसेवक आहे खरखोट त्याचे त्यांना माहिती त्यावेळस प्रशासन ताबडतोब गुन्हे दाखल करायला जातात. म्हणजे नगरसेवक विषयी एक भुमिका आणि प्रशासनाच्या कर्मचा—या विषयी दुसरी भुमिका हे कितपत सत्य आहे. कितपत खर आहे. माझी मा. आयुक्तांना विनंती आहे की, त्यांनी ताबडतोब या संबंधित अधिका—यावर गुन्हा दाखल करण्यात यावा. धन्यवाद !

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** महापौर साहेबा, मी आपणांस विनंती करीतो की, मी यापूर्वी दोनदा बोलण्याकरीता उभा राहिलो पण मला संधी मिळाली नाही. मी आपणांस विनंती करू इच्छितो की, जर आपण मला बोलण्याची संधी दिली तर मी बोलू शकेन. सुरूवातीपासुन आमचे काही नगरसवेकांनी महापौर साहेबा, आयुक्त साहेब यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या त्याप्रमाणे माझ्या देखील आपणांस या पदाकरीता हार्दिक शुभेच्छा. आपल्या महापालिकेत बदली हून नविन आयुक्त साहेब आलेले आहेत. त्यांनाही हार्दिक शुभेच्छा. कदाचित आयुक्त साहेबाच्या येण्याने शहरात सुधारणा होईल. आपण आल्या आल्या शहराकरीता चार चांगल्या गोष्टी सांगितल्या. बातम्यांच्या माध्यमातून ऐकला मिळाले की, व्हि.टी.सी. मैदान, हिराघाटाचे मैदान, इंदिरा गांधी मार्केट आहे येथील जे लोक बेघर झालेले आहेत, ज्यांची दुकाने बाधित झालेले आहे असे बेघर रहिवाशांना व दुकानदारांना त्यांचा काहीना काही हक्क त्यांना देण्यात येईल असे चार गोष्टी सांगण्यात आलेल्या आहेत व तशी सुचना देखील मिळाली आहे. त्याकरीता धन्यवाद! येथील लोक

शासनाचे व महापालिकेचे आम्ही आभारी राहू की, सुरूवातीला आम्हाला एक चांगली गोष्ट मिळाली तसेच भविष्यात देखील अशा ब—याच काही गोष्टी आहे ज्या आपल्या महानगरपालिकेचे ब—याच वर्षापासून प्रलंबित आहे ते सर्व महापालिकेच हक्क, शहराचे हक्क आहे, जे अतिक्रमण करून ताबा घेतलेला आहे त्याकरीता आपण प्रयत्न केले तर आपली फार कृपा होईल. आणखी एक विषय आपल्यासमोर मांडू इच्छितो की, आम्ही ब—याच वर्षापासुन हया महासभे मध्ये येत आहोत, याआगोदर होउन गेलेले काही महापौर साहेब व महापौर मॅडम यांच्या समोर कित्येक वेळा महासभेत आदेश करण्यात आलेले आहेत परंतु त्यांची अंमलबजावणी झाली नाही. आणि ब—याचवेळा असे दिसुन आले की, काही विभागाच्या फाईलस ब—याच महिन्यापासुन, ब—याच वर्षापासुन त्यावर कोणत्याही प्रकारचा निर्णय संबंतिध अधिकारीकडुन घेण्यात आलेला नाही. मी सांगितल्याप्रमाणे काही महिने नाही, काही दिवस नाही तर ब—याचे वर्षापर्यंत परंतु हे शहराच्या विकासा करीता घातक बाब आहे. त्याकरीता जे नियम बनविण्यात आले आहे, जो कायदा करण्यात आला आहे त्याची माहिती महापालिकेतील सर्व अधिकारी यांना महासभेत बोलवून दिली आणि त्यावर अमंलबजावणी झाली तर ते लाभदायक ठरेल. तसेच आता एका आमच्या बंधूने सांगितले की, कोण्याएका अधिका—या कडे काही फाईल ब—याच दिवसापासून पडल्या होत्या, चेक पडले होते एक तर त्या पैशाचे सदुपयोग देखील होऊ शकला नाही व ज्या फाईलस त्यांच्याकडे पडले होते त्यांच्यावर निर्णय देखील होऊ शकला नाही भविष्यात असे होऊ नये या करीता जर कृपया करून आदेश दिले तर जनता करीता ते फार उपयुक्त ठरेल आणि मा. आयुक्त साहेब आपला मानसन्मान वाढेल व सर्व नगरसेवका देखील मानसन्मान वाढेल यात शंका नाही. आणि वेळेत काम केल्यामुळे प्रशासनाचा देखील मानसन्मान मिळेल. धन्यवाद!

**सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, प्रशासनना कडुन हया विषयाचे उत्तर मिळाले आहे. मी सर्वाना निवेदन करतो की, या विषयाला नाकारण्यात यावे, रिजेक्ट करावे . दुपारचे ४.०० वाजले आहेत दुस—या महासभेला सुरूवात करावी.

**महापालिका सचिव:—** सदर विषय हा रिजेक्ट करण्याचा ठराव आहे. मी ठराव वाचून दाखविते ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केलयाप्रमाणे जनसंपर्क अधिकारी, श्री. युवराज भदाणे यांच्यावर फौजादारी गुन्हा दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** यावर फक्त दोन मिनिट मी बोलतो. प्रशासनाने हा ठराव रद्द केलेला आहे. भारतीय जनता पार्टीने आणि सत्ताधारी पक्षाने जनतेला न्याय देण्याची भुमिका न घेता केवळ आणि केवळ एका अधिका—याला पाठीशी घालत आहात, मी सन्माननीय आयुक्तांना विनंती करणार की, तुम्ही यावर ताबडतोब एफ.आय.आर. दाखल करायला पाहिजे होते परंतु तुम्ही कुठलीही भुमिका घेतली नाही आम्ही मी स्वत: हायकोर्टात याचिका दाखल केलेली आहे. तेव्हा हायकोर्टाच्या निर्णयाला आधिन राहून जो काही निर्णय होईल तो तुम्ही घ्यावा व प्रशासनाने घ्यावा आणि यांनी घ्यावा. धन्यवाद!

**सदस्य, श्री. किशोर वनसारी :—** मा. महापौरजी......

**महापालिका सचिव :—** अमान्य सर्वसंमतीने.

**सदस्य, श्री. किशोर वनसारी:—** नाही, नाही एक मिनिट टाले साहेब म्हणत आहे की जे भारतीय जनता पार्टी करत नाही. कृपया करून पार्टीवर असा आरोप करण्यात येऊ नये. श्री.संतोष देहरकर साहेबांनी, उप—आयुक्त यांनी व्यासपीठावर येऊन बोलले की, जेव्हा जेव्हा ॲक्शनची आवश्यकता पडेल त्या त्यावेळी प्रशासनाकडुन योग्य ती ॲक्शन घेण्यात येईल यामुळे हा निर्णय कृपया करून मा. आयुक्त साहेब यांच्यावर सोडण्यात येत आहे आणि उप—आयुक्त मुख्यालय विभागाकडुन जे उत्तर मिळाले आहे, आश्वासन देण्यात आले की, जेव्हा जेव्हा वेळ येईल तेव्हा तेव्हा योग्य ती ॲक्शन घेण्यात येईल. या विषयावर अतिघाई न करता सापडलेल्या फाईल्स आणि धनादेशाचा आधारवर त्यांनी योग्य त्या कागदपत्राचा एक सेट करून त्या आधारवर आयुक्त साहेबांनी एफ.आय.आर. दाखल करून निलंबीत करण्यात आले होते. आम्हाला आमच्या सामान्य प्रशासन विभागावर विश्वास आहे की, त्यांना वेळोवेळी जो काही कायदेशीर निर्णय घ्यावयाचा वाटेल ते घेतील आम्ही कोणाला पाठीशी घालत नाही आहे. जर आम्हाला पाठीशी घालायचे असते तर आम्ही देखील महासभेला गैहजर राहिलो असतो आम्हीही महासभेच्या बाहेर असतो. याकरीता महासभेत उपस्थित राहून बोलतो आहे की, जो सामान्य प्रशासन विभाग निर्णय घेईल..

**महापालिका सचिव :—** ठिक आहे, हा प्रस्ताव...

**सदस्य, श्री.प्रमोद टाल:—** वेळोवेळी हे करावे लागते परंतु भारतीय जनता पार्टीचे सन्माननीय नगरसवेकावर ताबडतोब कारवाई करण्यात येते, ताबडतोब एफ.आय.आर. करण्यात येते त्यावेळी आपण काय करतात?

**महापालिका सचिव:—** प्रस्ताव सर्वसंमतीने अमान्य झाला आहे.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. १८ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>**

प्रशासनाकडुन निलंबित जनसंपर्क अधिकारी श्री. युवराज भदाणे यांच्यावर एफ.आय. आर. दाखल करण्यास होत असलेल्या दिरंगाई व टाळाटाळबाबत चर्चा होवून निर्णय होणेबाबतची पालिका सदस्य श्री. भगवान भालेराव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

**उपरोक्त प्रस्तावाच्या सुचनेनुसार आपले लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेतील जनसंपर्क अधिकारी श्री. युवराज भदाणे, यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर व दुरुपयोग करीत असल्यामुळे त्याची प्रत्यक्ष इनकॅमेरा झाडाझडती कार्यालयाची अधिका-यांन मार्फत घेतली असता त्यांच्याकडे एकूण 387 महापालिकेचे दस्तावेज, आपल्या नावे बोगस शासनाचे ओळखपत्र तयार करणे, विना नावाचे धनादेश, महापालिकेच्या नावाचे घरपटटीचे धनादेश महापालिकेच्या तिजोरीत जमा न करणे, महिलांची व कर्मचा-याची असभ्यतेचे वागणे, तसेच महापालिकेच्या तिजोरीतून वकीलाची फी म्हणून 13 लाख अदा करणे, अशा प्रकारचे आरोप इन कॅमेरा केलेल्या झडतीमधून सिध्द होत आहे.असे अनेक गुन्हे केल्याबददल प्रशासनामार्फत निलंबन आदेश बजावले आहे. परंतू एवढया मोठया गंभीर स्वरुपाचे आरोप पाहता फौजदारी गून्हा प्रशासनामार्फत करण्यास टाळाटाळा होत असल्याने शहरात याबाबतची चर्चा शहरात चर्चिली जात आहे.**

**याबाबत नगरसेवक श्री. प्रमोद टाले व इतर समाजसेवक संस्थेमार्फत श्री. युवराज भदाणे, यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन कार्यवाहीची मागणी होत आहे.**

**तरी महापालिकेची प्रतिमा या अधिका-यांमुळे मलिन होत असून शहरात एक चर्चेचा विषय बनुन प्रशासनावर टिका होत आहे.**

**यापुर्वीच्या महासभेमध्ये देखील श्री. युवराज भदाणे हे आपल्या अधिकाराचा गैरवापर व दुरुपयोग करीत असल्याने त्यांचा बडतर्फीचे ठराव देखील पारीत करण्यात आला होता परंतू न्यायालयाची दिशाभूल करुन त्यांनी स्थगिती मिळविलेली आहे.**

**तरी या महापालिकेचे महसूल बुडविणे, शासनाचे बोगस ओळखपत्र तयार करणे, व विविध असे गंभीर स्वरुपाचे आरोप असणारे श्री. युवराज भदाणे यांना प्रशासनाने निलंबन आदेश केलेले आहे परंतू त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याने तो दाखल करण्यात यावा व हि बाब न्यायालयाच्या देखील निर्देशनास आणण्याबाबत महासभेमध्ये चर्चा होवून निर्णय होणेबाबत.**

**<u>महासभा ठराव क्र:</u>** २८ <u>दिनांक:— १९/१०/२०१८</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे प्रशासनाकडुन निलंबित जनसंपर्क अधिकारी श्री. युवराज भदाणे यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करणेचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १९ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १९ :— प्रस्तावाची सूचना क्रमांक. १**

महानगरपालिका आणि शासनाच्या आस्थापनेवर बेकायदेशीर रित्या कार्यरत असलेले सफाई कामगार राजेंद्र भानुदान अंडागळे यांचे वर निलंबनाची कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव आगामी महासभेमध्ये ठेवणेबाबत पालिका सदस्य श्री. भारत राजवानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य , श्री. भारत राजवानी:—** निलंबीत आहे ना? नोकरीतून काढून टकाण्यात आले आहे ना?

**महापालिका सचिव:—** त्याला आधीच निलंबित केले आहे, प्रस्ताव निलंबनाचा आहे. तुम्ही प्रस्ताव मागे घेवु शकता.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** नाही, निलंबीत करण्यात आले आहे, परंतु पगार चालु आहे, बोगस नोकरीच्या आधारे त्यांना पगार देखील देण्यात येऊ नये. महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

**महापालिका सचिव:—** असे होत नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** नियुक्ती ही बेकायदेशीर आहे. कोर्टाने आजूनही रिलिफ दिलेले नाही आहे, ४० दिवस जेलमध्ये राहून आलेले आहे.

या वेळी सदस्या, श्रीम. सुमन सचदेव व सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाड या सभागृहाच्या बाहेर गेल्या.

**उप आयुक्त, मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर:—** मा.महापौर, मा. उप—महापौर, मा. आयुक्त, मा. सन्माननीय सदस्य या प्रकरणी ऑलरेडी एफ.आय.आर. दाखल करण्यात आलेले आहे. निलंबीत करण्यात आले आहे. जो पर्यंत चौकशीत दोषी आढळून येत नाही किंवा दोष सिध्द होत नाही तोपर्यंत बडतर्फ करता येणार नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे :—** सर मग याला निलंबीत का केले? तो दोषी नाही ना.

**उप आयुक्त, मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर:—** प्राथमिक चौकशी मध्ये दोषी आढळून आलेला आहे आणि इतर विभागाची त्याला आवश्यकता आहे, इतर विभाग त्या करीता पोलीसांची मदतीची देखील आवश्यकता आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे :—** प्राथमिक चौकशीत तो दोषी आढळून आला आहे ना त्यांची मागणी तीच आहे जर तो दोषी असेल आणि फसणुक केली असेल मला वाटते की फसवणुकीचा गुन्हा देखील दाखल झालेला आहे. म्हणजे दोषी आहे हे सिध्द झाले आहे आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल झालेला आहे. फक्त पुढील कारवाई बाकी आहे.

**उप आयुक्त, मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर:—** फक्त..

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे :—** ते पोलीस करतील.

**उप आयुक्त, मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर:—** होय.

**सदस्य, श्री. भारत राजवानी :—** हा प्रस्ताव मागे घेत आहे.

**महापालिका सचिव:—** हा प्रस्ताव मागे घेण्यात आला आहे.

विषय क्र. २० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २० :— प्रस्तावाची सूचना क्रमांक. २**

अग्निशमन विभागातील रिक्त असलेले पदे भरण्याबाबतची प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करणेबाबत पालिका सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौरजी, उप—महापौरजी आणि आयुक्त साहेब प्रस्ताव अग्निशामन विभागातील रिक्त पदे भरणेबाबत प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करावी. त्याच कारण असे आहे की, यापूर्वी आपण अनेक ठराव केलेले आहेत. आपण आपल्या महासभेत. ठराव क्र. ४१ आहे दिनांक ०६/०९/२०१४ रोजी ठराव केलेला आहे. परंतु आपण आजपर्यंत कुठलही कारवाई करण्यात आलेली नाही. हा विषय आपल्या महापालिकेतील सर्वच विभागात काम करणा—या कर्मचा—यांचा आहे. वाहन विभागात असतील, विदयुत विभागात असतील किंवा आरोग्य विभागामध्ये असतील आणि आपल्या सर्वच विभागामध्ये काम करणा—या कर्मचा—यांचा हा विषय आहे. आपण मागच्या वेळेला ज्या ठोक वेतनावर लोकांना कामावर घेतले होते महासभेत ठराव करून त्याही लोकांना आपण आतापर्यंत कायम करून घेतले नाही. म्हणुन माझा सर्व विभागा बाबतीत महापालिकेचे जे काही विभाग आहेत, त्यांच्या बाबत सर्वांचाच हा एक प्रस्ताव मी महासभे पुढे मांडत आहे. महापालिकेमध्ये पद रिक्त असुन देखील अनुकंपातत्वा वरील कर्मचा—यांच्या कुटुबांस कायम पदावर घेण्यास होत असलेल्या दिरंगाई बाबत येत्या महासभे मध्ये चर्चा होऊन निर्णय होण्याबाबत माझा एक प्रस्ताव आहे. प्रस्ताव सरळ आहे की, आपल्या महापालिकेच्या सर्वच विभागामध्ये अशासकीय प्रस्तावद्वारे, लक्षवेधीद्वारे लक्ष वेधू इच्छितो की, अनेक लक्षवेधी मांडल्या गेल्या महापालिकेने, महासभेने प्रशासकीय प्रस्ताव मांडले परंतु त्यावर कुठलाही निर्णय झाला नाही. तरी माझी सर्वाना, महापौरांना, उप—महापौरांना, सर्व सन्माननीय सदस्यांना विंनती आहे की, आपण सर्वच जे काही महासभेचे रिक्त पदे आहेत, महापालिकेतील सर्व विभागामध्ये जे रिक्त पदे आहेत ती भरण्याची एक प्रस्ताव मांडू या. तो प्रस्ताव मी वाचून दाखवतो, उपरोक्त विषयाचा अनुषंगाने अशासकीय प्रस्ताव द्वारे लक्षवेधी लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिका विविध विभागामध्ये विविध पदे मोठया संख्येने रिक्त पदे आहेत. या रिक्त पदे असलेल्या पदावर मुळ कार्यालय कामकाजावर ताण पडतो आणि एकाच अधिकारी व कर्मचारी वर्गाला आपले काम सांभाळून दोन दोन पदावर काम करावे लागते. असे असतांना महासभेच्या महासभे देखील नगरसवेक मार्फत लक्षवेधीवर चर्चा होऊन पदे भरणे बाबत सुचना करण्यात आल्या आहेत. तसेच अनुकंपातत्वावरील प्रकरणाबाबत संबंधित कर्मचा—यांच्या वारसामध्ये शासन धोरणानुसार कायम पदावर घेण्याबाबत वारंवार प्रशासनला सुचना करून देखील अदयाप पर्यंत त्यांना घेण्यात आलेले नाही. महापालिकेने अनुकंपातत्वावर कर्मचा—यांचा वारसांना माणुसकीच्या दृष्टीकोनातून व त्यांच्या उदरनिर्वाहाचा विचार करता ठाणे महानगरपालिकेने केलेल्या ठरावानुसार महासभा ठराव क्र. २३६/२०१४, २०१० या ठरावानुसार कर्मचा—यांचा वारसांना दर वर्षी कायम पदावर शासनाने धोरणानुसार आणि विशेष बाब म्हणुन घेत आहेत. परंतु त्यामुळे अनुकंप तत्वावर ठोक वेतनावर घेतांना त्या सर्व वारस धारकांना प्रशासनाने दिलेल्या कागदपत्राची तजबीज पूर्ण केली असतांना त्याप्रकरणात निर्णय घेतला नसल्याने आजमितीस या प्रकरणातील काही वारसांचे वय होत आले होत आहे असे सांगण्यात येऊन त्यांना अपात्र ठरवले जात आहे. असे असतांना त्या उमेदवारांनी आपल्या मुलांना या पदावर घेण्याबाबत विनंती केली आहे. तरी अशा सर्व अनुकंपतत्वावरील प्रकरणात वारसांच्या मुलांना घेण्याबाबत येत्या महासभेत चर्चा होऊन निर्णय व्हावा हि विंनती करतो अनुकंपतत्वावर देऊन जर कर्मचा—यांचा वारसांना निवृत्ती करणे बाबतचे निर्देश सन २०९४ पासुन अमंलात आहेत. सदरच्या कर्मचा—यांना वेळोवेळी रिक्त झालेल्या पदावर समाविष्ट करून घेणे आवश्यक होते. परंतु उल्हासनगर महानगरपालिकेने या संदर्भात वेळेवर निर्णय न घेतल्यामुळे अनुकंपतत्वा वरील कर्मचा—यांची स्थायीक नियुक्तीचे लाभ मिळण्यास सन २०११ पासुन ते आजपर्यंत आठ वर्षापासून वंचित राहिलेले आहे. हे योग्य नाही. अशा कर्मचा—यांना महापालिकेत सेवेत कायम नियुक्ती करून देणे करता या अगोदर ही महासभा ठराव क्र. २० दिनांक ०४/०७/२०१४, महासभा ठराव क्र. १०, १४ मार्च २०१५, महासभसा ठराव क्र. ५८, दिनांक १८/१२/२०१५ महासभा ठराव क्र. १७, दिनांक १८/०७/२०१७ किती तरी ठराव करूनही महापालिका प्रशासन आज पर्यंत महासभे मध्ये ठरावाची अंमलबजावणी केलेली नाही. हि बाब खेदजनक आहे. शासनाच्या निर्णय क्र. १२१७/१०२, .... दिनांक १२ सप्टेबर, २०१७ अन्वये अनुकपतत्वावरील योजने संदर्भातील वेळोवळी जाहिर करण्यात आलेले शासन निर्णय हा केवळ नगरपरिषदे, नगरपालिका, महानगरपालिका, महामंडळे, प्राधिकारण व्यापारी उपक्रम व इत्यादी आस्थापना वरील कर्मचा—यांना थेट लागू होणार नाही त्यासाठी संबंधित प्रशासन, प्रशासकीय विभागाने त्यांचे स्वंतत्रपणे निर्णय घेणे आवश्यक असते.दोन्ही ठराव एकच आहेत ना. दोन्ही ठराव एकत्रच घेऊन टाकू या.

🚹 🚹 या वेळी सदस्या, श्रीम. सुमन सच्चदेव व सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाड यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**महापालिका सचिव:—** नाही नाही तो दुस—या मिटिंगचा अनुकंपाचा विषय आहे. तो दुस—या मिटींगला घेण्यात येईल आता फक्त फायरब्रिगेड विषयी बोला.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** ठिक आहे, आमच्या दृष्टीकोनातून फायरचा विषय देखील तेवढाच महत्वाचा आहे. फायरचा विषय कर्मचा—या बाबतीत आपण ठोक मला वाटले दोन्ही एकच आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया :—** आपण सेंट्रल लाईन सोडून हार्बर लाईनला गेले.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** अशासकीय प्रस्तावाद्वारे अग्निशमन विभागाच्या बाबतीमध्ये आपण अनेक वेळा ठराव केलेला आहे. ठराव क्र. ४१, सन २००६, २०१४ चा विषय आहे. ते ठराव होऊनही अजून

पर्यंत आपण फायरच्या कर्मचा—यांना कायम स्वरूपी कामावर घेत नाही. आपण निविदा मार्फत ठेकेदाराच्या पध्दतीने त्या फायरच्या कर्मचा—यांना कामावर घेतले आहे आणि ते काम करीत आहेत. फायरब्रिगेडचे काम हे अतिमहत्वाची सेवा आहे. हया सेवेमध्ये काम करणारे लोक ही तेवढेच जबाबदारपणाने काम करणारे असले पाहीजेत. जर एखादया ठिकाणी आग लागली तर एखादया माणसाचा जीव तेथे जाणार असेल, प्राणहानी होणार असेल तर त्याचा प्राण वाचण्याचे काम त्या कर्मचा—याने केले पाहिजे. तो कर्मचारी प्राण वाचवण्याचे काम तेव्हा करील जेव्हा त्याच तो प्राण वाचवत असतांना त्याला काही ईजा झाली तर त्याला महापालिकेकडुन काहीतरी मोबदला मिळेल. त्याला काही तरी दुखापत झाली तर काहि तरी महापालिकेकडुन मोबदला मिळेल आणि एखादया वेळेला कळत न कळत त्याची प्राण हानी झाली तसे होऊ नये पण झाली तर त्या वेळेला त्याचा मोबदला त्याला मिळेल तरच तो दुस—याचा जीव वाचवण्याय करीता पुढे जाईल आणि जर अशा वेळेला ठेकेदार पध्दतीने जे काम करणारे कर्मचारी असतील त्यांना जर ते काम करायचे असेल तर त्यांना त्यांच्या मुलाबाळांना किंवा त्यांना काही दुखापत झाली असेल तर त्यांना आपल्या महापालिकेकडुन सेवेत मदत मिळणार असेल तरच ते चांगले काम करतील असे माल वाटते. दुसरे विषय असा आहे की, आपल्या महापालिकेमध्ये अनेक ठेका पध्दती वर काम करत असतांना फायरची लोक खास करून अनेक वेळा त्यांनी चांगले काम केले आहे. त्यांना ईजा झालेल्या आहेत. त्यांच्यावर अनेक संकटाचे प्रसंग आलेले आहेत. पण ठेके पध्दतीवर काम करीत असतांना त्यांना त्यांचा मोबदला काही मिळत नाही उदा. अनेक लोक जख्मी झालेले आहेत त्यांना औषधोपचारा करीता आपल्या महानगरपालिके कडुन पैसे मिळत नाही. काही लोकांना दिले असतील पण काही लोकांना मिळत नाही. म्हणुन यांना एक तर ठोक वेतनावर आपल्या कडे कामावर घ्यावे किंवा कायम स्वरूप पदावर कामावर घ्यावे आपल्या कडे ती पदे रिक्त आहेत आणि रिक्त असलेल्या पदावर आपण जर त्यांना कामावर घेतले तर महापालिकेचे फायरचे काम आता ज्या पध्दतीने चाललेले आहे मला वाटत आताही चांगले पध्दतीने चालेल आहे सर्व सदस्यांना माहिती आहे. पाऊस असो पूर आलेला असो किंवा आग लागलेली असो किंवा भुकंपा सारखे झटके आलेले असेल फायरचे काम आतापर्यंत चांगले आहे. कोणीही माझ्या माहितीप्रमाणे या सभागृहामध्ये फायर विषयी चर्चा केली नाही किंवा त्याच काम चुकीचे आहे असे कोणीही बोलेल नाही. अशा पध्दतीचे काम ते करीत असतील ठेकेदार पध्दतीवर तर त्यांना आपण ठोक पगारावर घेतलं तर ठोक पगारावर आणखी चांगले काम करतील आणि आपल्याला आणखी चांगली सेवा देतील आणि जी काही त्यांच्यावर संकट प्रसंग उद्‌भवतील त्या संकटप्रसंगी समोर जाण्याकरीता ते आपले प्रयत्न करतील कारण त्यांना मोबदला मिळेल अशी अपेक्षा असुन त्यापध्दतीने ते काम करतील असे मला वाटते. म्हणुन प्रशासनाला माझी विंनती आहे आजच्या या प्रशासकीय प्रस्ताव मार्फत त्यांना ठेकेदारी पध्दतीवर ठोक पगारावर ठेकेदारी पध्दतीवर आता ते काम करीत आहेत. पुढचावेळेला त्यांना ठोक पगारावर ठोक वेतनावर आपण कामाला घ्याव आणि त्यांच्याकडुन चांगली सेवा मिळून घेणे व या शहराला चांगली सेवा देण्याकरीता आपण प्रयत्न करावे. धन्यवाद!

या वेळी सदस्य, श्री. अजित गुप्ता हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**<u>सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाडः—</u>** मा. महापौर, मा. उप—महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब .....

या सदस्य, श्री. अजित गुप्ता यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u>** मा. महापौरजी, आपण स्वतः या विषयांवर एक ठराव आणुन एक विशेष महासभा घेऊन हा विषय घेण्यात आला होता की, आज जी फायरब्रिगेडच्या कर्मचा—यांची परिस्थिती आहे ती अत्यंत बिकट आहे. ते आपले प्राण धोक्यात टाकून आमची जी प्रॉपर्टी आहे, ती ते वाचवत असतात. परंतु या विषयामध्ये असे आहे की, पहीले प्रशासन काय विचार करतता, ते आपल्याला माहीती करून घ्यायची आहे. नंतर आपण आपले मत मांडू कुठे काय काय चुकी होत आहे, जबाबदारी प्रशासनाची असून त्यांनी आपले स्टॅन्ड केला पाहीजे.

**<u>सदस्या, श्रीमती सुरेखा आव्हाडः—</u>** हा जो अग्निशामन दलाचा विषय उपस्थित झालेला आहे. अग्निशामनदल ही महानगरपालिकेची सर्वात महत्वाची सेवा आहे असे मला वाटते. आपतकालीन परिस्थिती मध्ये काम करणारे हे लोक आहेत. ही जी सेवा आहे ती महापालिकेमध्ये सक्षम असायला पाहिजे. परंतु आपल्याकडे आज अशी परिस्थिती आहे की, कायम स्वरूपी काम करणा—या कर्मचा—यांची संख्या अत्यंत कमी आहे आणि ठेकेदार पध्दतीवर काम करणारे कर्मचा—यांची संख्या जास्त आहे. जर आपतकालीन परिस्थितीत या लोकांना जर आपण संरक्षण दिले नाही आणि त्यांच्या जीवनाची हमी नसेल, योग्य तो त्यांना मोबदला भेटत नसेल आणि आपतकालीन परिस्थितीत जर हया लोकांनी बंद पुकारला तर उल्हासनगर शहराला आपण कसे तारणार आहोत हा मोठा गंभीर प्रश्न आहे आणि गेले कित्येक वर्षे हे लोक अगदी कमी पगारावर काम करीत आहे. आाज जर शहरामध्ये राहायचे म्हटले तर त्यांना त्यांचा योग्य मोबदला ही भेटला पाहिजे आणि आपल्याकडे कित्येक वर्षे काम केल्यामुळे उल्हासनगर शहराला काय हव आहे काय नको आहे? आणि कुठली परिस्थिती कशी आहे? त्यांना योग्य पध्दतीने माहिती आहे. तरी पण माझी सभागृहाला, आयुक्त साहेबांना, प्रशासनाला अशी विंनती आहे की, हे जो लोक आहे ज्यांना एकदम कमी पगारावर म्हणजे सहा हजार रूपये पासून महानगरपालिके मध्ये काम केलेले आहेत

त्यातील कित्येक लोक हे ऐजबार होण्याच्या स्थितीत आहे तर या लोकांनी कुठे जायचे? त्यापेक्षा जर आपण त्यांना आपल्याच महानगरपालिकेत कायम स्वरूपी सेवा दिली तर ते चांगल्या प्रकारे आपल्या महानगरपालिकेमध्ये सेवा करू शकतात आणि त्यांचा ही उदरनिर्वाहाचा जो प्रश्न आहे हा सुटू शकतो त्यामुळे आपण भरती प्रक्रिये पूर्वी जरूर हया लोकांचा विचार करावा अशी सभागृहाला आणि प्रशासनाला माझी कळकळीची विनंती आहे. धन्यवाद!

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** मा. महापौरजी आपले प्रथम अभिनंदन, हि आपली पहिली सभा आहे. राजेशजी यांनी सांगितले की, हा विषय आपण देखील घेतला होता विशेष करून आयुक्त साहेब परिस्थिती म्हणजे आम्हाला खरंच लाजीरवाणे सारखे वाटते आहे की कर्मचा—याकरीता आम्ही बोलतोय पोटतिडकीने आता आमच्या ताईने तुम्हाला सांगितले अग्निशामक सारखा भयानक विषय असतांना ठेकेदार पध्दतीवर कसा गेला ते मला माहिती ना का ते? कमीत कमी मानसिकता एवढी तरी पाहिजे प्रशासनाची ती लोक जी आपतकालीनला काम करतात त्यांना काय झाले तर ठेकेदार पध्दतीवर असतांना त्या अपघातात त्यांच्या पाय गेला, हात गेला, जीव गेला त्याला काही तरी सेक्युरिटी पाहिजे आणि मुंबई महानगरपालिका झाले आणि बाकीच्या महानगरपालिका झाल्या ठेकेदार पध्दतीवर फार कमी लोक आहेत. आपल्या कडे ८० टक्के लोक हे ठेकेदार पध्दतीवर आहे. मला वाटते की, जर समजा ठेकेदाराला पंधरा हजार रूपये पगार देत असेल तर तो कर्मचा—याला दहा हजारच देत असेल. एकतर त्यांचे ऐजबार होत आहे, त्यांनी केलेली ट्रेनिंग, त्यांनी दिलेली सेवा मागच्या वेळेस पण श्रीरामला एक प्रकरण घडले त्यावेळेस पण त्यांचे पूर्ण हात भाजले होते. संपूर्ण आजही ते अपंग आहेत. माझी कळकळीची विंनती आहे की, हा विषय परत परत येत आहे जसे आता चौधरी साहेबांनी सांगितले की, अनुकंपाचा विषय लाज वाटते मला प्रशासनाला, प्रशासन बोलायला अनुकंपामध्ये मेलेले आपलेच कर्मचारी आता मागे कोण गेले म्हणुन पुढे झाले तो विषय देखील मी सांगतो आहे आपण आलात आज प्रथमच तुमची आहे. जर हया गोष्टी तुम्ही लक्षात घेतल्या तर हया एकदम किरकोळ गोष्टी आहेत त्यांना नियुक्ती दयायची आहे त्यांना नोकरीवर ठेवायचे आहे सगळे कायदयाच्या नियमात बसतात आहे आत ऐजबार होतात आहे ते तसे हयाचे पण तुम्ही घ्या आहो संपूर्ण सभागृह तुमच्या बरोबर आहे कोणीही तक्रार करणार नाही, पाणी पुरवठा विभागात देखील हिच परिस्थिती आहे. त्यामुळे आपल्याला रिझल्ट मिळत नाही. ते जबाबदारीने काम करू शकत नाही. मी पोटतिडकीने तुम्हाला सांगतो की, प्रशासनाने कमीत कमी याचा विचार करावा की, मी जर सुरक्षित आहे, मी जर प्रशासनामध्ये कायम स्वरूपी आहे तर माझ्या बरोबरचा सहकारी जो तात्पुरत्या स्वरूपाचा आहे तो कायम स्वरूपी कामावर का होऊ नये? त्याला आपण का मदत करू नये? ही जर भावना आली तर मला वाटत नाही हे दोन दिवसाचे देखील काम नाही . माझी आपणांला विनंती आहे, फायरब्रिगडचे लोकांचे ताबडतोब कृपया करून त्यांना ज्या भरती प्रक्रिया आहेत त्या करा त्याच्या मध्ये त्यांना विशेष प्राधान्य देऊन करता येईल.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** एक मिनिट, अनुकंपाचा आपला अग्निशमनदलाचा विषय आहे, आज महानगरपालिकेच्या अग्निशमक विभागाची अवस्था काय आहे? जर स्थायी समितीनी आता ठिक आहे आम्ही वारंवार विषय महासभा मध्ये मांडले, स्थायी समिती मध्ये मांडले, अग्निशामन विभागातील कर्मचा—यांना कायम करा कारण कॉन्ट्रक्ट पध्दतीमधील कामे करू शकत नाही. उदया स्थायी समितीमध्ये आलेला विषय कॉन्ट्रक्टचा आम्ही रद्द केला तर महापालिका प्रशासन हे अग्निशामन विभाग चालु शकत का? आज अग्निशामन विभागातील कायम स्वरूपी असलेले अधिकारी कर्मचारी आस्थापना सुची किती आहे? मंजूर किती आहे? आणि वास्तवीक किती आहे? त्याचा जरा आकडा दया.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले**:— साहेब एक मिनिट, मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब आज खरे तर परिस्थिती अशी आहे की, एकटे आयुक्त आणि त्यांचा सोबत कोणीही उप—आयुक्त पासुन अगदी खालच्या वर्गाचा कर्मचारी त्यांच्या सोबत नाही आहे. ही खरी परिस्थीती आहे. भरती प्रक्रिया राबवणे अत्यंत आवश्यक आहे. आणि हि भरती प्रक्रिया राबवतांना खेरे तर महापौर महोदयांना माझी विनंती आहे कि, त्यांच्या कालावधी मध्ये त्यांच्या कार्यकालामध्ये भरती प्रक्रिया राबविली गेली पाहिजे. आणि हे करीत असतांना जे जे लोक कॉन्ट्रक्ट मध्ये आहेत जे जे दहा दहा वीस वीस वर्षापासून काम करीत आहे. वाहन कर्मचारी असतील, सिक्युरिटी कर्मचारी असतील, सुरक्षा कर्मचारी असतील, फायर ब्रिग्रेडवाले असतील, वॉटर सप्लायचे कर्मचारी असतील हे जे लोक दहा दहा, वीस वीस वर्षापासून आपली सेवा देत आहे आणि त्यांचे संपूर्ण आयुष्य उध्दवस्त होण्याच्या मार्गावर आहे अशा लोकांना या भरती प्रक्रिये मध्ये सामावून घेतले पाहिजे अशी माझी विनंती आहे.

**उप आयुक्त, मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर**:— मा. महापौर, मा. उप—महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मानीय सदस्य उल्हासनगर महानगरपालिका आस्थापना वर जवळपास ६० ते ७० टक्के पदे रिक्त आहेत हि वस्तुस्थिती आहे आणि त्यामुळे प्रशासनाला अनेक अडचणींना तोंड दयावे लागत आहे, हि देखील एक वस्तुस्थिती आहे. मध्यंतरी पदे भरती संबंधी कार्यवाही चालु केली होती विशेष करून आम्ही फायरमन करीता आम्ही प्रयत्न करीत होतो कारण का फायरमनला इतर म्हणजे आपला कोणताही जो खर्च आहे तो ४२ टक्केच्या वरती असला तरी त्याला मर्यादा नाही आहे तरी देखील त्या करीता आम्ही प्रयत्न चालु केले होते. मिन व्हाईल त्याला परंतु एक फायरमन याकरीता रोष्टर लागू आहे, चौधरी साहेब. रोष्टर लागु आहे त्याच्यामध्ये आपल्याला रोष्टर लागु असल्यामुळे त्या पध्दतीनेच भरती करावी लागते. सध्या मराठा

आरक्षणाचा विषय असल्यामुळे शासनाने सर्व भरती प्रक्रिया हि बंद ठेवलेली आहे. त्यावर जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत दुसरी गोष्ट अशी आहे की, इतर सर्व भरती संदर्भात आपण सरकाराला तीन वेळा लेटर दिलेले आहे. तीन वेळा मा. आयुक्त साहेबांनी डीओ लेटर दिलेले आहे त्यासंदर्भात मा. मुख्यमंत्री माहेदय सोबत देखील बैठक झाली होती मा. मख्यमंत्री साहेबांनी सांगितले होते की, आम्ही तुम्हाला अट शिथिल करून देऊ तथापी अजून त्यांच्याकडुन हया प्रलंबित विषय ती येताच आम्ही देखील कार्यवाही सुरू करू.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे**:— भरती प्रक्रिया बंद आहे, पण अनुकंपाचा विषय घेऊ शकता ना त्यांना तर देऊ शकतो ना.

**उप आयुक्त, मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर**:— अनुकंपाची आमची सर्व छाननी झालेली आहे. मा. आयुक्त साहेब नविन आहेत त्यांना या अगोदर यासंदर्भात सादर कलेले आहे. त्यामुळे तो फक्त एकच विषय आहे तो आम्ही आपल्या समोरच आणणार आहोत की यापूर्वी काय झालेले होते की जे एखादयाचा सरकारच्या मार्गदर्शनानुसार संपूर्ण कागदपत्र सादर केल्यानंतर त्याच्यानंतर त्याचे नाव यादीमध्ये आले पाहिजे. परतु याठिकाणी असे झालेले होते की, अनुकंपाची हि यादी यापूर्वी घोषित करण्यात आली होती, त्याचे अनेक कागदपत्र त्यांच्या फाईलला लावण्यात आलेल्या नव्हते किंवा त्याने सादर केलेले नव्हते. हे ज्यावेळेस आम्हाला दिसुन आले तेव्हा त्यांच्याकडे आम्ही सर्व कागदपत्र मागून घेतलेले होते याव्यतिरिक्त सन्माननीय सदस्यांच्या विनंती नुसार त्यांना पंधरा दिवसा अतिरिक्त कालावधी देखील देण्यात आलेला होता. ज्यांनी सादर केलेले होते त्या सर्वांनी आता सादर केलेले आहे. हया मध्ये एकच अडचण आहे की, यापूर्वी अनुकंपाची यादी घोषित केलेली होती त्यावर हरकती आणि सजेशन मागवलेली होती ती जवळपास अंतिम टप्प्यात होती. आता ज्या त्रुटी मिळालेल्या आहेत त्यांनी जेव्हा कागदपत्र सादर केलेली आहेत ती सर्व एकाच वेळी सादर केलेली आहेत. त्यामुळे आपण अनुक्रमांक निश्चित करत असतांना कोणी सुरूवातीला सादर केले आणि कुणाची फाईल प्रथम मंजूर झाली हा वादाचा प्रश्न पुढे उभा राहणार आहे. तर त्या संदर्भात आम्ही संपूर्ण पूर्वीचीच यादी ठेवावी का किंवा कसे?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—**साहेब आपण जे म्हणता हे बरोबर आहे. कायदयाची कक्षा आणि हे आपण ठरवतो. त्याचे पालनपण झाले पाहिजे आणि त्याचे पालन होत असतांना जी आता कर्मचारी आहेत, ती ऐजबार होत आहेत. पुन्हा त्यांच्या करीता काय करू शकता? अडचण काय आहे सर, गेली आठ ते दहा वर्षापासुन अनुकंम्पा तत्वावर लोक घेतली नाही काहीतरी तेरा किंवा पंधरा लोक अशी काहीतरी घेतली आहेत. काही लोक बसता आहे माझी विनंती अशी आहे की, जास्त लोक जरा बसत असतील आणि लवकरात लवकर एक ते दोन दिवसात बसून काय आहे ते फायनल करून घ्याना जो बसतो आहे तो बसतो आहे, तो बसतो जो बसत नसेल त्याला जाऊ कोर्टात.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** मा. महापौर महोदया, मा. उप—महापौर साहेब, सन्माननीय सभागृह अनुकंपाच्या तत्वाबाबत जी चर्चा चालु आहे. आपल्याला भरती प्रक्रिये बद्दल आता देहरकर साहेबांनी सांगितले की, मराठा आरक्षणाचा जो मुद्दा चालु आहे त्यामुळे भरती प्रक्रियेवर बंदी आहे आणि जी अत्यावश्यक पदे आहे त्याकरीता तीन वेळा आयुक्तांनी मागणी पत्र दिलेले आहे. परत स्मणरपत्र देण्यात येईल आणि जी अत्यावश्यक पदे आहे जी अग्निशामकचे किंवा आरोग्य विभागामधील आहे किंवा जी कोणती अत्यावश्यक पद मध्ये मोडतात ती पदे भरण्यासाठी विशेष बाब म्हणुन शासनाकडे पत्र पाठवून आम्ही ताबडतोब या दोन ते तीन दिवसामध्ये त्यांना स्मरणपत्र पाठवू आणि राहिला प्रश्न आपला अनुकंपतत्वाचा तर दहा ते पंधरा प्रकरण आहेत आणि मला वाटते की माझ्याकडे देखील काही प्रकरण सादर झालेले आहेत ती दहा असोत की पंधरा असोत जे प्रकरण क्लिअर असतील ज्यामध्ये सर्व कागदपत्राची पूर्तता करण्यात आली असेल या प्रकरणात येत्या आठ दिवसात त्यांना नियुक्तीचे आदेश देण्यात येतील, एवढे या ठिकाणी मी आपणास आश्वासन देऊ इच्छितो.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** देहरकर साहेब, एक मिनिट, फायरच्या बाबतीत एक मिनिट राजेशजी फायर संदर्भात यांनी सांगितलेल्या प्रमाणे महाराष्ट्र शासनाने भरती प्रक्रिया बंद केलेली आहे. भरतीला बॅन लावण्यात आलेले आहे.

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर** :— रोष्टर आहे त्याला. रोष्टर नुसार आपल्याला पदे भरती करावी लागते.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** फायरब्रिगेडच्या बाबती मध्ये जे काम आपण ठेकेदार पध्दतीवर करून घेतो त्याला ठोक वेतनावर दयायची देखील शासनाची बंदी आहे का?

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर** :— तर आपल्याला ठोक वेतनावर घेता येत नाहीत अनुकंपातत्वा करीता आपण केवळ एक ऐकसेप्शन केलेले होते. ठोक वेतन ही बॅकडोअर एंट्री होते. तुम्हाला कॉन्ट्रक्ट पध्दतीने कोणतेही कर्मचारी मागवता येतात ते पण ऐजंसी मार्फत थेट पगार देता येत

नाही. यासंदर्भात सुप्रिम कोर्टाचे आदेश आहेत. बॅकडोअर एंट्रीला परवानगी नाही सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौरजी, मा. मुख्यमंत्री साहेब यांच्या बरोबर बैठक झाली होती, त्यामध्ये हा मुद्दा घेण्यात आलेला होता की, आमच्याकडे सार्वजनिक विभागात केवळ पाच अभियंता असुन आणि पाणी पुरवठा विभागात एम.जी.पी. चे लोक काम करीत आहे. त्यांचीही बदलीचे आदेश आलेले आहेत ते कधीही जाऊ शकतात. त्याच बरोबर दोन ते तीन अभियंता आहेत त्यापैकी काही नगररचना विभागात आहेत तर काही आरोग्य विभागात कार्यरत आहते. तर पूर्ण उल्हासनगर शहराचे काम होत नसून अभियंता देखील महापालिकेत नाही. विदयुत विभागात देखील कर्मचारी सेवानिवृत्त होत आहे त्या विभागात देखील कर्मचा—यांची कमतरता भासत आहे. या करीता आपणांस व महापौर साहेबा आपल्या दोघांना विनंती इच्छितो की, शासनाला या संदर्भात पत्रव्यवहार करून मा. मुख्यमंत्री सोबत बैठक घेऊन हा मुद्दा लवकरात लवकर निकाली काढण्यात यावा.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** देहरकर साहेब, अग्निशामन विभागामध्ये फायर अधिकारी पासुन खालील कर्मचा—यापर्यंत आपल्याकडे मंजुर पदे किती आहेत? यापूर्वी कार्यरत किती होते? आणि आता किती आहेत?

**प्र.अग्निशमन अधिकारी, श्री. भास्कर मिरपगारे :—** मा. महापौर साहेबा, मा. उप—महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब आणि सर्व सन्माननीय सदस्य उल्हासनगर महानगरपालका अग्निशमन विभागातील आस्थापना सुचीवर असणारे मंजुर पदाच्या बाबतीत माहिती देत आहे. अग्निशामन अधिकारी १ पद, उपस्थानक अधिकारी ६ पद, उप—अग्निशामन अधिकारी २ पदे, लिडींग फायरमन १४ पद, फायरमन ६० पदे आणि वाहन चालक आहे ते वाहन विभागाकडुन आग्निशमन विभागाकरीता देण्यात येतात.

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे :—** त्यापैकी आता किती आहेत?

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे :—** अग्निशामन अधिकारी किती आहेत?

**प्र.अग्निशमन अधिकारी, श्री. भास्कर मिरपगारे :—** अग्निशामन अधिकारी १ पद आहे ते पदोन्ती करीता ते आहेत.

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे :—** उपस्थानकीय अधिकारी करीता किती आहेत?

**प्र.अग्निशमन अधिकारी, श्री. भास्कर मिरपगारे :—** उपस्थानक अधिकारी दोन आहेत.

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे :—** सहा पैकी.

**प्र.अग्निशमन अधिकारी, श्री. भास्कर मिरपगारे :—** होय.

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे :—** चार नाहीत.

**प्र.अग्निशमन अधिकारी, श्री. भास्कर मिरपगारे :—** १४ बिल्डींग फायरमनचे पदे आहेत, त्यापैकी तीन कार्यरत आहेत.

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे :—** किती? तीन

**प्र.अग्निशमन अधिकारी, श्री. भास्कर मिरपगारे :—** होय

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे :—** बाकी.

**प्र.अग्निशमन अधिकारी, श्री. भास्कर मिरपगारे :—** ११ पदे रिक्त आहेत.

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे :—** ११ रिक्त आहेत आणि ६० पैकी

**प्र.अग्निशमन अधिकारी, श्री. भास्कर मिरपगारे :—** ६० पैकी ५१ पदे रिक्त आहेत आणि ९ पदावर कर्मचारी कार्यरत आहेत.

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे :—** अशाप्रकारे आपले अग्निशमन विभाग आहे. तरी मला समजत नाही शासनाचे याठिकाणी बंधन येतो कुठे. ६० पैकी ५१ पदे रिक्त आहेत, १४ पैकी ११ पदे रिक्त आहेत, ६ पैकी ४ पदे रिक्त आहेत, मराठा आरक्षण धरले किंवा कुठलेही आरक्षण धरले तर आरक्षण होते किती?

देहरकर साहेब एक तर तुम्ही माहिती चुकीची देत आहेत किंवा माहिती चुकीची पुटअप करीत आहेत. एक काम करा मी शासनाला कळवतो अशाप्रकारे जी महापालिका सेवा जसे की आमचे महापालिकेचे आव्हाड मॅडम आहेत त्यांनी सांगितले की, मुख्य सेवा आहे जर आग लागली तर आग विझविण्याकरीता देखील आमच्या उल्हासनगर महानगरपालिकेकडे क्षमता नाही अशी अवस्था करून ठेवली का? शासनाने. ६० पैकी ५१ रिक्त ती भरायची नाहीत ठीक आहे चार पदे, १० पदे तुमच्या रोष्टरमध्ये मनाई केलेली आहेत पण ६० पैकी ५१ पदे भरू नये का? आणि मला वाटते हे जे ९ पदे राहिलेली आहेत ते येत्या दोन वर्षात खाली होतील. रिक्त झाल्यापासुन नविन भरती झालेलीच नाही. म्हणजे पुढच्या दोन वर्षा नंतर महापालिकेच्या अग्निशमन विभागामध्ये, आस्थापना सुचीवर किंवा अग्निशमक विभाग शुन्य असेल. ते चालणार तेही खाजगी पध्दतीवर पुन्हा माझा तोच प्रश्न येतो की, जर अग्निशमक विभाग पूर्ण कॉन्ट्रक्ट पध्दतीवर चालवत असाल तर पूर्ण महानगरपालिका कॉन्ट्रक्ट पध्दतीवर चालवू या. मला काहीतरी पटत नाही साहेब, काहीतरी चुकत आहे एकतर शासनाला कळवू शकत नाही किती असणार आहे बंधन आपल्याला? रोष्टर पध्दतीवर आरक्षणाची पदे भरू शकत नाही पण ५१ पदे आरक्षणाच्या बाबतीत पण तेच सर्वच्या सर्व आरक्षित नसणार.

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर :—** याबाबत शासनाकडुन आम्ही मार्गदर्शन घेतो आहे. आणि जी काही त्या ठराविक टक्केवारी राखून खुला वर्गातील जी पदे असतील ती पदे खास भरती करीता पाठवणार आहोत.

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे :—** साहेब, सन २०१४ पासून हा विषय आहे.

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर :—** आणि एक त्यामध्ये...

**सदस्य श्री. धंनजय बोडारे :—**मला माहिती आहे की, सुर्वे साहेबांनी पहिला विषय टाकला होता आणि तेव्हापासून हा विषय चालु आहे.

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर :—** अजून एक त्यामध्ये अडचण अशी आहे फायर मध्ये बोडारे साहेब.

**सदस्य श्री. धंनजय बोडारे —**ठिक आहे.

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर :—** नाही, नाही...

**सदस्य श्री. धंनजय बोडारे :—**आयुक्त साहेब तुमच्या लक्षात आलेले आहे. पुढच्या महासभे पर्यंत याच्या बाबतीत काहीतरी निर्णय घ्या

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर :—** त्याच्या मध्ये...

**सदस्य श्री. धंनजय बोडारे :—**शासनाचे काय असतील ते आम्हाला सांगा की, शासनाकडे तुम्ही जा बाबा की शासनाचा पाठपुरावा करा. शासन झोपलेले आहे तिथे. त्यांना जाग करायचे असेल तर आम्ही जाग करतो. काहीतरी निर्णय झाला पाहिजे. पुढच्या दोन वर्षात हे सर्व पदे रिक्त होतील. ६० पैकी ६० सर्व कर्मचारी सेवा निवृत्त झाले तर करणार काय महानगरपालिका?

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर :—** बोडारे साहेब,

**सदस्य श्री. धंनजय बोडारे :—**उदया कॉन्ट्रक्ट वाले आले नाही तर आपण करायचे काय आग लागू दया.

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर :—** त्याच्यामध्ये...

**सदस्य श्री. धंनजय बोडारे :—** बिल्डींग जळू दे! आग लागु दे!

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर :—** त्याच्यामध्ये आणखी एक अडचण आहे आपल्याला ६० पदे भरता येणार नाही त्यापैकी ३० पदे भरता येणार आहे.

**सदस्य श्री. धंनजय बोडारे** :— अडचण काय असेल देहेरकर साहेब, अडचण दुर करा, प्राब्लेम सॉल्व करण्याकरीता तुम्ही आहात. फक्त प्राब्लेम सांगु नका, प्राब्लेम सॉल्व करा. मला आता लाज वाटते.

**महापौर मथा पीठासीन अधिकारी** :—सर, मी बोलू ईच्छिते की, हि माझी देखील लेक्षवेधी असुन हया विषयाला प्रथम प्राधान्य देउन, लवकरात लवकर यासंदर्भात बैठक घेउन प्रत्येक पक्षाचे लोकांना बोलुन...

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी** :— महापौर मॅडम, नेहमी प्रशासनाचे हेच उत्तर असते की, हि भरती कशी होणार नाही ते सांगितले जाते पण हि भरती कशी होणार, हे काम आम्ही कशा पध्दतीने यशस्वी करून दाखवणार हे काही सांगत नाही. हि हयांची कमतरता असुन यात जर सुधारणा झाली महापालिकेकडुन हे काम कसे नाही होणार. आताच सांगण्यात आले की भरती बंद आहे. मराठा आरक्षणामुळे सर्व भरतीवर बॅन आहे. मराठा आरक्षणाचा विषय हा आता आला. ही ५१ कर्मचारी हे अगोदरपासुनच सेवानिवृत्त झालेले आहेत.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी** :—सर, हे आपण सर्व एकत्र येउन प्रशासनास सांगू या.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी**:— हा. ठिक आहे.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी** :—बरोबर.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी** :— दुसरे जे मा. आयुक्त साहेब आपण आश्वासित केले आम्हाला की, जी काही अनुकंपातत्वावर लोक आहेत ती भरती आमच्याकडे आल्यावर ती ताबडतोब करू. पण त्याच्या अनुभव आम्हाला इतका वाईट आहे की, मी तुम्हाला सांगतो आम्ही जे काही सॅनेटरी विभागातील कर्मचारी काम करतात ती लोक सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या वारसांना कामाला घ्या म्हणुन ते अनेक वेळा आमच्याकडे अर्ज घेउन, तक्रारी करून सांगतात पण आपल महापालिकेचे डिपार्टमेंट आहे ते काम करतांना त्यांना दहा वेळा फे—या माराव्या लागतात आणि ते लोक कामावर येत नाही. त्यामुळे परिस्थिती अशी झाली आहे की, आमच्या वार्डात एका वर्षी पाच लोक सेवानिवृत्त झाली आणि पाच लोक कमी आहेत काम करण्याकरीता. त्यांच काम होत नाही आणि त्यामुळे तुमचं काही सफाई, अभियान वगैरे असेल ना त्याच्यावर त्याचा परिणाम होणार आहे. म्हणुन आरोग्य विभागातील जे कोणी लोक सेवानिवृत्त झाले आहेत त्यांचे वारसांना घ्यायचे आहे ते प्रकरण लवकर हाताळा तुमच्या स्तरावर कारण आमच्या प्रशासनाचे अधिकारी काम काही बरोबर करत नाही वारंवार लोकांना त्रास कसा होईल यासाठी जास्त प्रयत्न करतात. आणि शासनाने दिलेल्या अटी कशा आहेत ते दाखवण्याचा प्रयत्न करतात. ते झाले नाही पाहिजे लवकरात लवकर त्यांची वारस आले त्यांच्या वारसांना आपण हक्क दिला आणि ते जर कामावर आले तर आमचे काम सुरळीत होईल हे एक उदाहरण मी तुम्हाला सांगितले.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे**:— थोडक्यात चोधरी साहेबांनी हे सांगितले झारेतील शुक्राचार्य जे म्हणतो ना आपण ते चालंल आहे. प्रत्येक टेबलावर फाईल सडुन ठेवायची तो माणुस येणार नाही कामावर म्हणजे तो मेलेला सदस्य असेल किंवा सेवानिवृत्त झालेला असेल त्यालापण कामावर घेतांना एक एक वर्षे जाते पैसे मिळायला आणि हयाला. अत्यंत वाईट स्थिती आहे, सर.

**महापालिका सचिव** :— येथे मी ठराव वाचुन दाखविते हि महासभा वरील प्रस्तावनेत नमूद...

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे** :— सभागृहामध्ये अनुकंपतत्वाच्या बाबतीमध्ये भावना विचारात घेउ या.

**सदस्य श्री. राजेश वदारिया** :—साहेब, एक मिनिट करीता मी आपणांस थांबवू ईच्छितो की, याच्यात समस्या काय आहे हा जो विषय आहे हा फायरब्रिगेडचा आहे. अनुकंपाचा विषय हा पुढील महासभेतील विषय आहे. माझे असे म्हणणे आहे की, ही बैठक पूर्ण करून पुढील महासभेत हा विषय घेण्यात यावा. वेळ वाचेल साहेब, नाहीतर डबल डबल परत होणार आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे** :—रिपिटेशन होणार नाही, सन्माननीय सभागृहाची भावना विचारात घेउन माझ्या आता लक्षात आले की, सफाईच्या बाबती मध्ये जे सफाई कामगार आहेत त्यांचे आता जे सन्माननीय सदस्यांची सांगितले की, ब—याच वेळा फे—या माराव्या लागतात. पाच पाच सफाई कामगार आमच्या वार्डात कमी आहेत. १०० टक्के जेवढी हि रिक्त पदे आहेत म्हणजे सफाईच्या बाबतीत जे अनुकंपातत्वावर

आमच्या कडे जी अर्ज आलेले आहेत किंवा माझ्या टेबलावर जी रेडी प्रकरण आहेत ती तर मी आठ दिवसात निकाली काढतो परंतु दिवाळीत पूर्वी सगळया पदाचा आढवा घेउन जे अनुकंपतत्वावरील जे लोक वंचित आहे किवां ज्यांची प्रकरणे मंजुर केलेली नाहीत त्याचा निपटारा करण्याची कार्यवाही १०० टक्के करण्यात येईल पंधरा दिवसाच्या आत, दिवाळीच्या पूर्वी ऐवढे मी सभागृहाला याठिकाणी आश्वस्थ करतो. आणि सफाईच्या प्रकारामध्ये कुठल्याही प्रकारची दिरंगाई होणार नाही आम्हाला शिपाईच्या बाबतीत माणसांची आवश्यकता आहे. सन्माननीय नगरसवेकांना त्यांच्या वार्डामध्ये माणसे कमी पडणार नाही, त्याच्यामुळे आम्ही ज्या लोकांचे, सफाई मध्ये कसे आहे की, लाड समितीची एक शिफारशी प्रमाणे जर एखादया कर्मचा—याची सेवा पंधरा वर्षे किंवा वीस वर्षे झाली असेल आणि त्या कर्मचा—याकडुन काम होत नसेल किंवा त्याला लखवा झाला असेल त्याच्या पाल्याला सेवेत सामावून घेण्याचे प्रोव्हिजन आहे. त्यासाठी आपण जे बोलांत की त्यांना फे—या माराव्या लागतात हि सर्व महाराष्ट्रात वस्तुस्थिती आहे. परंतु अतिशय म्हणजेच लहान नगरपालिकेपासून इथपर्यंत आम्ही पोहोचलेलो असल्यामुळे म्हणजे दोन मिनिटामध्ये मी त्याचा निपटारा करून टाकेन म्हणुन मला एवढया दोन मिनिटात ते शक्य नाही. परंतु पंधरा दिवसाच्या आत मध्ये मी निपटारा करून दाखवेल आणि एकही प्रकरण प्रलंबित असणार नाही याची खात्री मी सभागृहाला देतो.

**महापालिका सचिव** :— या ठरावावर मी असे लिहिते की, अग्निशमक विभागातील रिक्त असलेली पदे भरण्याबाबतची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्याची प्रशासनास निर्देश देत आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २० :—प्रस्तावाची सूचना**

अग्निशमन विभागातील रिक्त असलेले पदे भरण्याबाबतची प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करणेबाबत पालिका सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेतील अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवेमध्ये मोडत असून, या अतिग्नशमन सेवेमध्ये अपूरा कर्मचारी वर्ग असल्याने आहे त्या कर्मचा—यांवर त्यांच्या क्षमतेपेक्षा कामाचे भार आहे. सध्या राज्यातील महाराष्ट्रात मोठया प्रमाणात पाउस पडत आहे अशा वेळी त्यामुळे उद्भवणा—या समस्या इमारत कोसळणे, महापूर येणे, भुकंप व इतर आपत्ती ओढविली असता अग्निशमन विभागात पुरेसा कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभा ठराव क्र. ४१, दिनांक ६/९/२०१४ रोजी ठराव करुन अग्निशमन विभागातील रिक्त असलेली पदे त्वरीत भरण्याबाबत प्रशासनास आदेशित करण्यात आले होते परंतु कोणत्याही प्रकारची प्रशासकिय प्रक्रिया प्रशासनाकडून गेल्या ०४ वर्षात केल्याचे दिसून येत नाही. ही खरोखरच खेदाची बाब असून एखादया वेळेस अचानकपणे परिस्थिती उद्भवल्यास प्रशासन याची जबाबदारी घेईल का?

तरी वरील अग्निशमन व्यवस्था पाहता अग्निशमन विभाग सुसज्ज सुस्थितीत म्हणजे आवश्यक तो कर्मचारी वर्ग भरण्याबाबत वरील महासभेने केलेल्या ठरावानुसार ठरावाची अंमलबजावणी करण्याबाबत येत्या महासभेमध्ये चर्चा होवुन निर्णय व्हावा ही विनंती.

**महासभा ठराव क्र:** २९ **दिनांक:— १९/१०/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे अग्निशमन विभागातील रिक्त असलेले पदे सध्या कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचारी यांना प्राधान्य देवुन सामावून घेण्याबाबतची प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिवः—</u>**हि पहिली सभा संपली आहे

सांयकाळी ४.४१ वाजता महापौर श्रीमती पंचम ओमेश कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**दिनांकः— २०/८/२०१८**

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/८/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

**४**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक २०/८/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/ होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | २७ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | २८ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | २९ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३० | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ७ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३१ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ८ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ३२ | श्रीमती ज्योती श्याम माने |
| ९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३३ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १० | श्रीमती आशा नाना बिराडे | ३४ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ११ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३५ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १२ | श्री. स्वप्नील मिलिंद बागुल | ३६ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १३ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ३७ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १४ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ३८ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १५ | श्री. अशोक बच्च्युमल छाप्रु | ३९ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| १६ | डॉ.प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४० | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १७ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४१ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १८ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ४२ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| १९ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ४३ | श्री. राजेश दवेंद्र वानखेडे |
| २० | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ४४ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २१ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४५ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २२ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ४६ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २३ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ४७ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २४ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ४८ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २५ | श्री. रवि किशनचंद जग्यासी | | श्री. अरूण लक्ष्मण आशान |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ४९ | |

तर

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर, २. श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर, ३. श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा, ४. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ५. श्रीमती जया प्रकाश माखिजा, ६. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ७. श्रीमती शुभांगीनी निकम, ८. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, ९. श्रीम. ज्योती प्रशांत पाटील, १०. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ११. श्री. राजेश नानिकराम वदारिया, १२. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), १३. श्रीमती पुष्पा नाना बागुल, १४. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, १५. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, १६. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे), १७. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) १८. श्री. चंद्रशेखर केशव यादव, १९. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, २०. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, २१. श्रीमती शीतल चंद्रकांत कदम, २२. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे, २३. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, २४. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, २५. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, २६. श्रीमती सुमन राजेश सच्चदेव, २७. श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे, २८.श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, २९. श्री. विजय चाहु पाटील, ३०. श्री. आकाश परशुराम पाटील, ३१. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, ३२. श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत, ३३
. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

९. श्री. गणेश पाटील, आयुक्त
१०.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
११.श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
१२.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी
१३.श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
१४.श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता
१५.श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
१६.श्री. विनायक फासे, प्र. लेखापरिक्षक
१७.श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
१८.श्री. संतोष जाधव, उप लेखाधिकारी
१९.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१२. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त

१३. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त

१४. श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त

१५. श्री. नंदलाल सामतांनी, प्र. सहाय्यक आयुक्त

१६. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी

१७. श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता

१८. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

१९. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक

२०. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक

२१. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी

२२. श्रीमती निलिमा कदम, लेखापाल (शिक्षण मंडळ)

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती नर्गिस खान, लिपीक
२. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
३. श्री. बाळु भांगरे, लिपीक

सायंकाळी ४.२६ वाजता वंदेमातृरम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.....

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**मा. महापौरजी, देशाचे माजी प्रधानमंत्री भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचे निधन झाले आहे. त्याच बरोबर आपल्या भारतीय जनता पक्षाचे माजी अध्यक्ष लोटनदास नामोमल खुबचंदानी यांचे सुध्दा निधन झाले आहे. आपल्या महापालिकेचे सदस्य श्री. राजेश वदारिया यांच्या मातोश्री श्रीमती राजकुमारी नानिकराम वदारिया यांचे सुध्दा निधन झाले आहे तर मी सभागृहास विनंती करतो की, श्रध्दांजली अर्पित करुन दोन मिनिटे मौन धारण करु या. त्यानंतर आमचे माजी प्रधानमंत्री भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी यांना आमचे सदस्य श्रध्दांजली अर्पित करु इच्छितील किंवा बोलु इच्छितील तर ते बोलतील, सभागृहातील सदस्य, मा. महापौर, उप—महापौर सर्वजण फुलांनी श्रध्दांजली अर्पित करुन दोन शब्द बोलतील. त्यापुर्वी मी सांगु इच्छितो की सर्वांनी ज्यांचे मी नाव घेतले आहे, ज्यांचे निधन झाले आहे त्यांना दोन मिनिटे मौन धारण करुन श्रध्दांजली अर्पित करु या.

**महापालिका सचिव :—**सर्वांनी दोन मिनिटे उभे राहुन मौन धारण करावे.

---

**सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी**

**श्री. मनोज सयानी**

**अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे**

**श्री. प्रमोद टाले**

## शोक प्रस्ताव

**श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचे दीर्घ आजाराने दिल्लीच्या एम्स रूग्णालयात अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. श्री. अटलबिहारी वाजपेयी हे माजी भारतीय पंतप्रधान आणि एक हिंदी कवी होते. देशातील प्रत्यक्ष नेतृत्व करणारा स्वजनशील कवि, ज्याला राजकीय दिशा होती, ज्यांनी भारताला राजकिय दिशा दिली. १९९९ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये (राष्ट्रीय लोकशाही आघाडीला**(रालोआला) घवघवीत यश मिळाले आणि अटलबिहारी वाजपेयींनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. ते १९९१ ते २००९ दरम्यान भारतीय जनता पक्षाचे लखनौ येथील खासदार होते. केवळ १३ दिवस टिकलेल्या ११ व्या लोकसभेत तसेच त्यानंतरच्या १२ व्या लोकसभेत (१९ मार्च १९९८ ते १९ मे २००४) ते पंतप्रधान होते. यासोबतच त्यांनी जनसंघाचे संस्थापक सदस्य, भारतीय जनसंघाचे अध्यक्ष (१९६८-१९७३), जनसंघाच्या संसदीय दलाचे नेते (१९५५-१९७७), जनता पक्षाचे संस्थापक सदस्य (१९७७-

१९८०), भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष (१९८०-१९८६) आणि भारतीय जनता पक्ष संसदीय दलाचे नेते (१९८०-१९८४, १९८६, १९९३-१९९६), ११ व्या लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते तसेच २४ मार्च १९७७ ते २८ जुलै १९७९ दरम्यान भारतीय परराष्ट्रमंत्री ही पदे भूषविली होती.

सन १९९९ साली तालीबान अतिरेक्यांनी IC - ८१४ या प्रवासी विमानाचे अपहरण केले . हे विमान नेपाळची राजधानी काठमांडूकडून दिल्लीला निघाले होते. अतिरेक्यांच्या या कृतीमुळे वाजपेयी सरकारने ३ अतिरेक्यांच्या बदल्यात प्रवासी विमानाची सुटका केली .

मे १९९८मध्ये वाजपेयी सरकारने जमिनीखाली ५ अणुचाचण्या केल्या. सत्ता प्राप्त केल्यावर केवळ एका महिन्यात करण्यात आलेल्या या चाचण्या जगाला, खास करून अमेरिकेला हादरवणाऱ्या ठरल्या, कारण भारताने अमेरिकेच्या हेरगिरी उपग्रहाला चुकवून त्या पार पाडल्या होत्या. पुढील २ आठवड्यांत पाकिस्तानने‍ही अणुचाचण्या केल्या. रशिया आणि फ्रान्स यांनी भारताच्या स्वसंरक्षणासाठी आणि शांततापूर्ण उपयोगासाठी अण्वस्त्रक्षमतेचे समर्थन केले. तरी अमेरिका, कॅनडा, जपान, इंग्लंड, युरोपीय महासंघ यांनी भारतावर अनेक क्षेत्रांत निर्बंध लादले. तरी वाजपेयींच्या आर्थिक धोरणांमुळे भारताला त्यांची झळ लागली नाही. अखेर भाजप आणि वाजपेयींच्या प्रतिमेच्या दृष्टीने या अणुचाचण्या लाभदायीच ठरल्या.

**श्री. अटलजी यांनी एका कार्यक्रमात परमाणु बॉम्ब विषयी एक आपल्या देशात ताकद दाखविली होती, त्यांनी विश्वात दाखविले होते की आम्ही सुध्दा एक ऑटोमॅटिक बॉम्ब बनवु शकतो. त्यांनी नागपुरच्या दिक्षाभुमीला एक कोटी निधी दिला. श्री. अटलबिहारी वाजपेयी हे भारतरत्न होते, अटलजी यांना हरपुन नाही बसलो तर एक रत्न गमाविला आहे देशासाठी.**

**त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.**

**तसेच शांतीनगर पासुन ते फर्स्ट गेट, छत्रपती शिवाजी मार्ग येथुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर येथिल कल्याण अंबरनाथ रस्ता या मार्गावर भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी मार्ग घोषित करणेस व उल्हासनगर–५ येथिल पाले गाव येथुन जाणारा गायकवाड पाडा येथिल रस्त्यावर जो प्रवेशद्वार आहे त्यास भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी प्रवेशद्वार बनविणेस प्रस्तावित.**

**महासभा ठराव क्र. ११ फ** **दिनांक:— २०/८/२०१८**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार माजी पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

**शोक प्रस्ताव**

भारतीय जनता पक्षाचे माजी अध्यक्ष लोटनदास नामोमल खुबचंदानी यांचे सुध्दा निधन झाले आहे. तसेच उल्हासनगर महापालिकेचे सदस्य श्री. राजेश वदारिया यांच्या मातोश्री श्रीमती राजकुमारी नानिकराम वदारिया यांचे सुध्दा निधन झाले आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ११ ह** **दिनांक:– २०/८/२०१८**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार लोटनदास नामोमल खुबचंदानी व श्रीमती राजकुमारी नानिकराम वदारिया यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

## शोक प्रस्ताव

**मुथुवेल करुणानिधी** यांचे कावेरी रुग्णालयात 7 ऑगस्ट 2018 रोजी निधन झाले. **मुथुवेल करुणानिधी** भारतीय राजकारणी आणि तमिळनाडूचे माजी मुख्यमंत्री होते. तेद्रविड मुनेत्र कझगम (द्रमुक) चे प्रमुख होते त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीतील प्रत्येक 60 वर्षांमध्ये आपली जागा जिंकण्याचा विक्रम केला. [7] 2004 च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी द्रमुकच्या नेतृत्वाखालील डीपीए (यूपीए आणि डावे पक्ष) यांचा तामिळनाडू आणि पुडुचेरीमध्ये नेतृत्व केले आणि सर्व 40 लोकसभा जागांवर विजय मिळविला. यानंतर 200 9 च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी द्रमुकाने 16 ते 18 पर्यंत जिंकलेल्या जागांची संख्या वाढवली आणि यूपीएला तामिळनाडू आणि पुडुचेरीचे नेतृत्व केले आणि 28 गटात विजय मिळविला. ते तमिळ सिनेमाचे नाटककार आणि पटकथा लेखक देखील आहेत. त्यांचे समर्थक त्यांना **कल्याणर** ( तामिळ : *कलालय* , "आर्ट ऑफ कला") म्हणतो.

करुणानिधींनी तमिळ चित्रपट उद्योगात पटकथालेखक म्हणून आपले करिअर सुरू केले. त्याच्या बुद्धिमत्ता आणि भाषण कौशल्य माध्यमातून, तो लवकरच एक राजकारणी बनले ते द्रविड़ आंदोलनाशी संबंधित होते आणि त्यांनी आपल्या समाजवादी आणि बुद्धीवादी आदर्शांना प्रोत्साहन देणारी ऐतिहासिक आणि सामाजिक (सुधारणावादी) कथा लिहिण्यासाठी प्रसिद्ध होते. त्यांनी तामिळ सिनेमाचा उपयोग करणे सुरु केले आणि त्यांनी *परशक्ती* नावाच्या एका चित्रपटाद्वारे आपल्या राजकीय मतांचा प्रचार करणे सुरु केले. *परशक्ती* तमिळ चित्रपटांसाठी एक टर्निंग पॉइंट ठरली, कारण त्याने द्रविडी चळवळीची विचारसरणीला पाठिंबा दिला

जस्टीस पार्टीच्या अलागिरीरस्वामी यांच्या भाषणात प्रेरणा घेऊन करुणानिधी 14 व्या वर्षी राजकारणात प्रवेश केला आणि हिंदी विरोधी आंदोलनात सहभागी झाले. त्यांनी आपल्या परिसरातील स्थानिक युवकांसाठी एक संस्था स्थापन केली.

करुणानिधी प्रथम 1 9 57 मध्ये तिरुचिरापल्ली जिल्ह्यातील कुलिथलाई विधानसभेकडून तामिळनाडू विधानसभेवर निवडून आले. 1 9 61 मध्ये ते द्रमुकचे कोषाध्यक्ष बनले आणि 1 9 62 साली विधानसभेत ते विरोधी उपनेते झाले आणि 1 9 67 मध्ये द्रमुक सत्ता स्थापन झाल्यावर ते सार्वजनिक बांधकाम मंत्री झाले. 1 9 6 9 मध्ये अण्णादुराईचा मृत्यू झाला तेव्हा करुणानिधी यांना तामिळनाडूचे मुख्यमंत्री बनवण्यात आले होते. तामिळनाडू राजकारणात त्यांच्या दीर्घ कारकीर्दीत त्यांनी पक्ष व सरकारमध्ये अनेक पदांवर कार्य केले आहे.

. त्यांच्या योगदानांमध्ये कविता, अक्षरे, स्क्रिप्ट, कादंबरी, जीवनचरित्र, ऐतिहासिक कादंबरी, स्टेज नाटक, संवाद, गाणी इत्यादींचा समावेश आहे. त्यांनी अनेक कविता, निबंध आणि पुस्तके लिहिली आहेत,

**त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.**

**महासभा ठराव क्र. ११ ज** **दिनांक:— २०/८/२०१८**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार माजी मुख्यमंत्री (केरळ) मथुवेल करुणानिधी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—**आमच्या भारतीय जनता पक्षाच्यावतीने श्री. अटलबिहारी वाजपेयी ज्यांचे निधन झाले आहे त्यांना श्रध्दांजली देतो. श्री. अटलबिहारी वाजपेयी हे भारतरत्न होते, आम्ही अटलजी यांना हरपुन नाही बसलो तर आम्ही एक रत्न गमाविला आहे देशासाठी. आज फारच चांगले झाले की सर्वांनी मिळुन श्रध्दांजली दिली. परंतु ज्यावेळी अटलबिहारी वाजपेयी यांचा मृत्यु झाला होता त्यावेळी सर्व लोक आले होते. देशातुन, परदेशातुन तसेच सर्व पक्षीय, कोणीही असा नव्हता की त्या त्या पक्षातील आला नसेल, श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या अंतिम संस्कारासाठी. मी असे पाहिले की श्री. अटलजी असे विद्वान होते, चांगले प्रवक्ता होते, चांगले कर्मी होते, चांगले पत्रकार होते अशा चांगल्या माणसास आपण गमाविले आहे. देशासाठी अशी माणसे फारच कमी मिळतात. एवढी लोक आलीत व राजकरणामध्ये एवढा वेळ घेतांना कोणीही कोणाचा शत्रु बनतो. आमचे श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचे ना देशात ना परदेशात कोणीही शत्रु नव्हते. हे एक अॅटीक पिस होते त्यांना मी कोटी कोटी प्रणाम करतो. श्री. अटलजी यांनी एका कार्यक्रमात परमाणु बॉम्ब विषयी एक आपल्या देशात ताकद दाखविली होती, त्यांनी विश्वात दाखविले होते की आम्ही सुध्दा एक ऑटोमॅटिक बॉम्ब बनवु शकतो. आजपर्यंत ब—याच लोकांनी धमकी देवुन ताकद दाखविली आहे. परंतु आम्ही दाखवुन दिले आहे, भारताने दाखवुन दिले आहे की श्री. अटलजी काय आहेत ते. दोन शब्द बोलुन मी माझ्या शब्दास पुर्ण विराम देतो व सांगतो की देवाने यांच्या आत्म्यास शांती दयावी व स्वर्गात जागा दयावी, धन्यवाद।

**सदस्य श्री. प्रमोद टाले:—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, या देशाचा सुपुत्र जेव्हा ते गेले तेव्हा मला वाटते की फक्त भाजपाच नाही तर देशातील प्रत्येक नागरीक रडला. देशातील प्रत्यक्ष नेतृत्व करणारा स्वजनशील कवि, ज्याला राजकीय दिशा होती, ज्यांनी भारताला राजकिय दिशा दिली, त्यांचे एक म्हणणे होते, सामाजिक स्वातंत्र्य, जेव्हा सामाजिक न्याय जर मिळवायचा असेल आणि खरे स्वातंत्र्य उपभोगायचे असेल तर तेव्हा खरे स्वातंत्र्य मिळते. आणि या दृष्टीकोनातुन नागपुरच्या दिक्षाभुमीला एक कोटी देणारा पहिला पंतप्रधान आणि शेवटचा पंतप्रधान कोण असेल तर श्री. अटलबिहारी वाजपेयी. श्री. अटलबिहारी वाजपेयींचे नेतृत्व हे कवि मनाचे होते. एक त्यांच्या काव्य पंक्ती आहेत त्यातुन आपल्या शहराला सुध्दा बोध घेता येईल. ''बेनकाब चेहरे है, डाग बडे गेहरे है। तुटता हुआ तिलस आज सच से भय खाता हुं, मै गित नहीं गाता हूॅ। लगी है कुछ ऐसी नजर, विक्रो शिसे सा शहर अपनों के मेल में मैं मित नहीं पाता हूॅ, मै गित नहीं गाता हूॅ। पीठ में सुरी सा चॉद, राहू गाया रेखा फान, भुतनी के क्षणो में बार बार बन जाता हूॅ, मै गित नहीं गाता हूॅ।'' एवढया सुंदर काव्य पंक्ती आपल्या या प्रत्येक माणसाला या उल्हासनगर शहरातील प्रत्येक व्यक्तीला लागु होतील. आमचा आजचा आवडता पंतप्रधान जो तीन वेळा पंतप्रधान झाला १३ दिवस झाले, त्यानंतर त्याने पुर्ण पाच वर्ष पुर्ण केले. या पाच वर्षाच्या कालावधीत या भारताला त्यांनी खरोखर दिशा देण्याचे काम केले असेल तर ते अटलबिहारी वाजपेयींनी केलेले आहे, कारगीलचे युध्दा असु दया. किंवा अटोमॅटिक बॉम्बचा प्रोजेक्ट असु दया, त्यांनी जे दरारीपणाने केले, तर त्यांचा सारखा आजपर्यंत कोण नाही असे मला वाटते. जाता जाता मी माझ्या पीपल्स रिपब्लीकन पक्षांच्यावतीने आदरांजली देतो परंतु जाता जाता त्यांच्या ज्या काव्यपंक्ती आहेत, त्या मनाला ज्या भावून जातात त्या सुध्दा मी आज बोलतो. ''जो कल थे वो आज नहीं है, जो आज है वह कल नहीं होंगे. होने न होने का क्रम इसतरही चलते रहे, हम हम है, हम रहेंगे यह भ्रम भी सदा फलता रहेगा। सत्य क्या है, होना या न होना, यह दोनो भी सत्य है, जो है उसका होना भी सत्य है, जो होना है वह भी सत्य है, जो नही है उसका होना भी सत्य है, मुझे ऐसा लगता है, होना ना होता यह सत्य के दो आयाम है, शेष सब समज का फेर, बुध्दी का व्यायाम है किंतु न होने के बाद भी क्या होता है, यह प्रश्न अनुत्तरीत है, प्रत्येक नया नचिकेता इस प्रश्न के खोज में लगा है, इस आदत को इस प्रश्न ने ठगा है, शायद यह प्रश्न, प्रश्न ही रहेगा, यदी कुछ प्रश्न अनुत्तरीत रहे, उसमं बुराई भी क्या. कोर्ट की अनुमती न रोखे, धर्म की अनुमती विज्ञान का अनुसंधान, एक दिन अवश्यही रुद्रदार खुलेगा, यह पुछनेके बजाय यक्ष उत्तर देगा, यक्ष स्वंय उत्तर देगा, धन्यवाद।

**सदस्य श्री. किशोर वनवारी:—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदय व सर्व सभागृह, मा. पुर्व प्रधानमंत्री आपल्या देशाचे आदरणीय अटलबिहारी वाजपेयी साहेबांचे कोणाशीही त्यांचे संबंध असे होते की त्यांचा कोणाबरोबरच वाद नव्हता. विरोधीपक्ष असो, देश असो, विदेश असो, त्यांचा स्वभाव असा होता की

सर्वांबरोबर मिळुनमिसळुन राहणे, आज त्यांच्याकडुन आपणांस परिंडा घेतला पाहिजे व त्यांच्या नाकनक्क्षेनुसार चालले पाहिजे. त्यांना देव त्यांच्या चरणी निवास देवो व त्यांच्या कुटुंब परिवारास व संपुर्ण देशास या सदम्याची सहनशक्ती देवो. आमचे बंधु श्री. जमनादास पुरस्वानी यांनी तिन्ही व्यक्ती ज्या मरण पावल्या आहेत त्यांना श्रध्दांजली दिली, त्यांचे मी अनुमोदन करतो व एकत्रीत विनंती करतो की, सभागृहात आपण ज्यांना कोणाला श्रध्दांजली देतो, त्याची प्रत त्यांच्या परिवारास पोहोचवली पाहिजे, तर मी सचिव महोदयांना विनंती करतो की, भले तो मरण पावलेला व्यक्ती नामवंत असो किंवा साधारण असो, जर कोणताही नगरसेवक आपल्या प्रभागातील कोणाही व्यक्तीस जो मरण पावला असेल त्यास श्रध्दांजली देतो तर त्याची प्रत त्या नगरसेवकास दयावी तो त्या व्यक्तीच्या परिवारास पोहचविणार. भलेही महाराष्ट्रातील मोठा व्यक्ती असो जसे पुर्व मुख्यमंत्री श्री. करुणानिधी यांना या सभागृहात श्रध्दांजली दिली, तर त्यांच्या परिवारास पोस्टाद्वारे पत्र पाठविले पाहिजे. येथे आपण श्रध्दांजली दिल्यानंतर सुचक व अनुमोदक व महापौरांची सही घेवुन त्याची प्रत त्यांच्या परिवारास दिली जावी अशी माझी विनंती आहे. आजची जी ही महासभा आहे, आमचे माजी पंतप्रधान आता राहिले नाहीत, जेव्हा ते व्हेंटीलेटरवर होते तेव्हा सुध्दा आपण व विरोधी पक्षवाले, सत्ताधारी पक्षवाले सर्वांनी मिळुन म्हटले होते की हीच महासभा काय तर अशा दहा महासभा जरी स्थगित केल्या तरी अशा व्यक्तीसाठी आम्ही करण्यास तयार आहोत. मी संपुर्ण सभागृहातर्फे व संपुर्ण शहरातर्फे त्यांना श्रध्दाजली देतो व त्यांच्या चरणी वारंवार नमन करतो.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—</u>**आज आपल्या भारतात दु:खद घटना घडली आहे, आपले भारतरत्न पुर्व पंतप्रधान यांना आपण गमविले आहे व दुसरे म्हणजे केरळमध्ये पावसामुळे बरेच नुकसान झाले आहे तेथे सुध्दा जेवढयांचा मृत्यु झाला आहे त्यांना सुध्दा आम्ही श्रध्दांजली अर्पण करतो, त्याचबरोबर माझा तीन महिन्याचा जो भत्ता आहे तो मी महापालिकेच्या निधीत जमा करते, केरलाच्या मदत निधीसाठी आम्ही ती रक्कम जमा करतो धन्यवाद।

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>**मा. महापौरजी, उप—महापौरजी, सचिव महोदया व सर्व सन्माननिय सदस्य, भारतरत्न व देशाचे माजी पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचे दु:खद निधन १६ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५ वाजुन ५ मिनिटांनी जशीच ही बातमी आली, ना आपले शहर, भारतीय जनता पक्षाचे सदस्य, ना महाराष्ट्र राज्य, संपुर्ण देश व विदेश मध्ये, संपुर्ण जगभर ही बातमी सोशल मिडीयाच्या माध्यमातुन, इलेक्ट्रानिक माध्यमातुन पाहिले, तर एक सन्नाटा, एक दु:ख संपुर्ण जगभर पाहायला मिळाले. त्यांनी ना राजकिय नेता व ना कोणत्या पक्षाचा असा विचार ठेवला नाही, त्यांनी सामान्य व्यक्तीसाठी भलेही तो हिंदु असो, मुस्लिम असो, बौध्द असो, पारसी असो, शिख असो, कोणताही धर्म, कोणतीही जात, कोणताही पक्ष असो त्यांच्यासाठी जेव्हा आवश्यकता भासली तेव्हा श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी ना आपले पद पाहिले ना पदास महत्व दिले, छोटयात छोटा कार्यकर्ता, सामान्य भारतीय असो जेव्हा जेव्हा आवश्यकता वाटली तेव्हा तेव्हा त्यांच्यासाठी कार्य केले. १६ ताखेस ५ वाजुन ५ मिनिटांनी त्यांच्या मृत्युची बातमी आली तर एक सन्नाटा निर्माण झाला. त्यांचा मृत्यु झाला १६ तारेखस आणि आपण आज येथे २० तारखेला सभागृहात हजर आहोत, सोशल मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडीयावर त्यांच्याबाबतीत जे सांगितले जात आहे, त्यांचे जे व्यक्तिमत्व होते किंवा काम करण्याची जी पध्दत होती, त्यांचा जो विचार होता त्यांनी कधी कविच्या रुपामध्ये देशास संबोधित केले, कधी भारतीय जनता पक्षाच्या प्रमुखाच्या रुपात त्यांनी सर्वांना पुढे केले, देशाचे तीन वेळा पंतप्रधान राहुन त्यांनी देशाला जी दिशा दिली, आज हे सर्व सांगितले जात आहे व आम्हांस सुध्दा पाच ते दहा टक्के माहित आहे. अशा पक्षाचे व देशाचे ते प्रमुख राहिले आहेत, ज्या देशात भारतात आपण राहत आहोत, ही आमची जन्मभुमी व कर्मभुमी आहे, एक गर्व राहतो, पुर्ण विश्व रडला आहे. अशा व्यक्तीमत्व आपल्या बरोबर होते त्यांना आम्ही ऐकले, त्यांच्या धोरणावर आपण चाललो त्यांचा फायदा जो देशास झाला, त्याचा फायदा आपण घेतला भारतात राहण्याच्या नात्याने. पोखरण टेस्ट परमाणु परिक्षण करुन त्यांनी संपुर्ण विश्वास एक संदेश पाठविला की जेव्हा वेळ येईल तर भारत सुध्दा परमाणु प्रशिक्षण व टेस्ट करुन एवढे सक्षम बनविले, विश्वपटलावर त्यांनी एक न्युक्लीअर शक्ती भारतास दिली. संपुर्ण विश्वास भारतासमोर झुकावे लागले व जाणावे लागले ही एक परमाणु शक्ती आहे, असे अटलबिहारी वाजपेयी होते त्यांनी ना कालचा विचार केला ना पक्षाचा विचार केला, परमाणु शक्ती करुन त्यांनी विश्वास दाखविले की भारत सुध्दा एक शक्ती आहे. मी सिंधी आहे आमच्या समाजावर त्यांचे तर एवढे मोठे योगदान होते की आमचे सर्व भारतभर किंवा विश्वात किंवा उल्हासनगरच नाही तर सर्व देशभर जेथे सिंधी समाज आहे ते सर्व त्यांचे ऋणी राहतील. श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रयत्नानेच आमची जी सिंधी भाषा आहे त्यास आठव्या शेडयुलमध्ये मान्यता मिळाली होती. ८ मध्ये त्यास डॉमिनेट

केले होते.  आज आमची सिंधी भाषा यास आठव्या शेडयुलमध्ये त्यास मान्यता प्राप्त आहे. आज आम्ही सिंधी उल्हासनगरमध्ये, महाराष्ट्रात, देशमध्ये, विदेशमध्ये लाखो करोडो आहेत आज आम्ही अटलबिहारी वाजपेयी यांचे ऋणी आहोत. त्यांचे ऋण आम्ही नाही फेडु शकत कारण त्यांनी आमच्या भाषेश व आमच्या मातृभाषेस त्यांनी मान्यता दिली. संपुर्ण विश्वामध्ये आमचा मान व सन्मान ठेवला. तर मी सिंधी समाजातर्फे व संपुर्ण विश्वातर्फे मी आज त्यांना श्रध्दांजली देतो. आज आपल्या सभागृहात बरेचसे सदस्य आहेत ते बोलु इच्छितात बरेचसे सदस्यांच्या जवळीकतेत आहेत, असे काही सदस्य आहेत त्यांनी आपला अनुभव त्यांच्या समोर घेतला.  तर अटलबिहारी वाजपेयी यांनी जी प्रेरणा आपणांस दिली, त्यांच्या कार्याची पध्दत होती व विचार होता जसे डॉ. नाथानी व श्री. किशोरजी यांनी सांगितले की, त्यांचा कुठलाही शत्रु नव्हता. सर्व त्यांचे मित्र होते त्यांनी कधीही शत्रुता ठेवली नाही. राजकारणात प्रतिद्वंदी ठेवतात ती वेगळी गोष्ट आहे. भले ते सत्तेवर असो विपक्षात असो त्यांचा कोणताही व्यक्तिगत शत्रु बनला नाही. एवढया मोठया राजकारणात श्री. जमनुजी यांनी सांगितले की ते आठ वेळा खासदार म्हणुन राहिले. दोन वेळा राज्यसभेत होते व आठ वेळा निवडून आलेत. ते लोकसभेत तसेच राज्यसभेत राहिलेत.  देशाची प्रत्येक गोष्ट साठ वर्षात त्यांच्याबरोबर, त्यांच्यासमोर झाली आहे. देशाचा जो काही निर्णय झाला आहे त्यांच्यासमोर झाला आहे.  ते एवढे मोठे नेता होते त्यांना कोणी कवी सुध्दा म्हणत होते, कोणी शायर, कोणी पत्रकार म्हणायचे. परिवारीक जीवनात सुध्दा त्यांचा फार मोठा अनुभव आहे. तर असे व्यक्ती जे आज दुर्भाग्याने आमच्याबरोबर नाही आहेत. काळाच्या गतीला कोणी थांबवु शकत नाही हे सत्य आहे. परंतु त्यांची प्रेरणा, त्यांचा आदर्श आणि त्यांचा विचार, त्यांचे धोरण प्रत्येकवेळी आमच्यासमोर राहणार. आमची येणारी जी पीढी आहे ती सुध्दा अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रेरणा व विचारास प्रत्येक वेळी प्रेरणा घेत राहील यासाठी एक प्रस्ताव ठेवतो की आमच्या उल्हासनगर शहरामध्ये जो मोठा मार्ग आहे शांतीनगरपासुन ते फर्स्ट गेट, ज्यास आपण कल्याण अंबरनाथ रस्ता म्हणतो त्या दिड किलोमिटरच्या मार्गास भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी मार्ग घोषित करण्यात यावे. त्याचबरोबर उल्हासनगर ५ येथिल जे पाले गाव आहे तेथुन जो रस्ता आपल्या शहराकडे येतो तेथे गायकवाड पाडा येथे जी एन्ट्री आहे तेथे भव्य प्रवेशद्वार भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाने बनविला जावा. तो फक्त मार्ग किंवा प्रवेशद्वार राहणार नाही तर एक प्रेरणा देत राहिल, अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाचे स्मरण होत राहिल, तेथुन जाणार तर एक प्रेरणा देत राहणार. बरेचसे सदस्य आपापल्या हिशोबाने प्रस्ताव ठेवतील.  मी माझ्यातर्फे या सभागृहासमोर लिगली सर्व पाहुन जर शक्य आहे तर कल्याण अंबरनाथ रस्त्यापासुन छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार पासुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्त्यापर्यंत जो प्रवेशद्वार आहे त्यास आपण कल्याण अंबरनाथ रस्ता म्हणतो त्या मार्गावर भारतरत्न अटलबिहारी मार्ग व उल्हासनगर ५ येथिल गायकवाड पाडा येथे जो पाले गाव येथुन जो रस्ता आपल्या शहरात येतो तेथे भव्य प्रवेशद्वार बनवुन भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी प्रवेशद्वार नावाने तेथे नाव देण्यात यावे, धन्यवाद। आभारी आहे।

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती चैनानी, सदस्य श्री. अजित गुप्ता, श्री. गजानन शेळके, श्रीमती मिनाकौर लबाना सभागृहातुन बाहेर गेले.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>**येथे सभागृहात सर्वांच्या मनामध्ये एकच गोष्ट आहे १६ तारखेला एक व्यक्तीमत्व आपल्यातुन गेला. ज्यांनी राजकारणात तत्पश्चर्या, साधना ज्यास म्हणतात, याप्रकारे एक सर्वसामान्य व्क्ती शिखरापर्यंत पोहचतो, त्यांच्या मनामध्ये कधीच असा भाव नव्हता की ते देशाचे प्रधानमंत्री बनतील. कित्येकवेळा त्यांनी आपल्या इंटरव्हयु मध्ये सांगितले की मी पत्रकार बनु इच्छित होते परंतु नियतीने मला येथे आणिले आणि १९७२ मध्ये शामा प्रसाद मुखर्जी बरोबर जे काम करत, तर ५१ च्या निवडणुकीत फक्त ३ लोकांनाच शिट मिळाले तर ते अनुभव सांगतात की एवढी मेहनत केल्यानंतर सुध्दा फक्त तीन शिट मिळाले. ते म्हणतात की त्यावेळी मी व अडवानीजी बसलो होतो तेव्हा आम्ही फार त्रस्त होत असायचो की आम्हांस लोक का नाही मतदान करत. त्यावेळी कॉंग्रेसचा फार मोठा दबदबा होता. परंतु त्यांनी हार मानली नाही १९५८ पासुन ते २००९ पर्यंत ते कुठल्या ना कुठल्या सदनाचे सदस्य होते. भाषेवर त्यांचे नियंत्रण असायचे की तिखटात तिखट बोलणे परंतु एका पध्दतीने बोलणे की हसले पाहिजे, असे त्यांनी संपुर्ण देशास शिकविले, आज त्यांचा स्वर्गवास झाला आहे तर असेम पाहण्यात आले की फक्त भारतीय जनता पक्षच नाही तर कॉंग्रेस पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, शिवसेना पक्ष, आरपीआय पक्ष यांनी आपापल्या पध्दतीने आपापल्या जागेवर या महान व्यक्तीमत्वास श्रध्दांजली दिली. असे व्यक्तीमत्व जेव्हा देव बनवितो तेव्हा एकदम फुर्सतीने बनवितो. असा व्यक्तीमत्व बनण्यासाठी प्रत्येक व्यक्ती धडपड करेल.  हे निर्सगाचे

असे व्यक्तीमत्व होते ते सर्वसामान्य व्यक्तीशी जर बोलत असेल तर गोड बोलत होते. त्यामुळे त्यांचे व्यक्तीमत्व अबाधित राहिले. मी असा व्यक्ती आहे की त्यांना भेटलो होतो. १९९९ मध्ये जेव्हा ते पंतप्रधान होते तेव्हा मी त्यांना भेटण्यास गेलो होतो तेव्हा मी त्यांना आपली व्यथा सांगितली की आमच्या सिंधी समाजात लोकसभेत कोणतेही प्रतिनिधीत्व मिळत नाही. जो सिंधी समाज आहे वाटणीनंतर वेगवेगळया जागी जावुन बसले. मी पंतप्रधान यांना सांगितले की आमच्यासाठी सुध्दा रिजर्वेशन ठेवा की जेणेकरुन सिंधी समाजाचे व्यक्ती सुध्दा तेथे प्रतिनिधीत्व करु शकणार. तेव्हा त्यांनी हसुन म्हटले की आपणांस संपुर्ण गृहमंत्रालय देतो तर त्यावेळी श्री. लालकृष्ण अडवानी हे गृहमंत्री होते. तर मी म्हणतो की ते किती सहज उत्तर दयायचे. जेव्हा १९६६ मध्ये आमच्या सिंधी भाषेचे जेव्हा त्यांनी वक्तव्य केले होते त्यावेळी त्यांनी म्हटले होते की हिंदी आमची माता आहे तर सिंधी आमची मावशी आहे. आज आपल्या देशाचा एक पंतप्रधानच नाही तर एक व्यक्तीमत्व हरपले आहे, एक मोठा पत्रकार व एक मोठा कवि हरपला आहे. त्यांच्या हिंदुत्वाची जी परिभाषा होती ती अतिशय भिन्न होती. ते हिंदुत्व आपापल्यात स्विकृत व धर्मनिरपेक्ष आहे. जेव्हा ते गुजरात मध्ये आले होते तेव्हा त्यांनी म्हटले होते की प्रजा प्रजामध्ये भेद नाही होवु शकत. न जन्माच्या आधारावर ना जातीच्या आधारावर, ते हिंदुत्व जपायचे परंतु त्यामध्ये सुध्दा किती मोठा धर्मनिरपेक्ष लपला होता त्या व्यक्तीने सिध्द करुन दाखविले व लोकतंत्राविषयी त्यांची मोठी आस्था होती, त्यांनी म्हटले शासन येईल, शासन जाईल, पक्ष बनेल, पक्ष बिघडेल परंतु लोकतंत्र अमर राहणार. लोकतंत्र राहणार तर देश राहणार. त्यांनी संघर्ष केले होते १९८४ मध्ये १९८० मध्ये त्यांचे कथन आठवत होते, अंधार होणार, कमळ फुलणार तर मला खुषी आहे भारतीय जनता पक्षाचे २८२ सदस्य, २० राज्याचे शासन यांच्या द्वारे देण्यात आलेली श्रध्दांजली फार मोठा वृक्ष झाला आहे. तर यांच्या प्रेरणाने आपण पुढे जाणार, अशा व्यक्तीस हरवुन, ज्यांचे ज्यांचे आयुष्य आहे प्रत्येकास एक दिवशी जायचे आहे, असे व्यक्ती आज आपल्यात नाही त्यांचे शब्द, कवित्व, पत्रकारीता आयुष्यभर आपली प्रेरणा बनेल तर मी अशा व्यक्तीस संपुर्ण भारतीय जनता पक्षाच्यावतीने त्यांना श्रध्दांजली देतो व आशा करतो आपण त्यांच्या सारखे एक कण सुध्दा बनायचा प्रयत्न केला तर आपले जीवन सफल होईल. धन्यवाद।

यावेळी सदस्या श्रीमती रेखा ठाकुर, श्री. राजेश वानखेडे, श्री. राजेंद्र चौधरी सभागृहातुन बाहेर गेले.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**सर्वात प्रथम मी अटलजींना संपुर्ण शहराच्यावतीने, माझ्या पक्षाच्यावतीने, व विरोधी पक्षाच्यावतीने, या सभागृहाच्यावतीने मानवंदना देतो श्रध्दांजली अर्पित करतो मागील १६ तारखेला ४ वाजता महासभा सुरु झाली होती काही लोकांचे म्हणणे होते महासभा होईल परंतु सकाळपासुन उलटसुलट बातम्या येत होत्या मग अशी व्यक्ती त्यांनी वैयक्तिक जीवनाचे काहीही शिल्लक ठेवले नाही तर देश आणि विदेश एवढेच फक्त त्यांच्या हृदयामध्ये व मेंदुमध्ये एवढेच होते व त्यांची अशी अवस्था असतांना आपण महासभेत वेगवेगळे विषय घेणे योग्य नव्हते म्हणुन आपण त्या महासभेत त्यांचे स्वास्थ सुधारावे म्हणुन प्रार्थना केली परंतु नियतीपुढे, दैवापुढे कोणाचेही काहीही चालत नाही. तो कितीही मोठा असला किंवा कितीही हवा हवासा असला तरी जे व्हायचे तेच होते आणि त्याचवेळी जेव्हा आपण महासभा स्थगित केली आणि ५–१० मिनिटातच बातमी आली की अटलजी गेले. अटलजी गेले पण ते अटल होवून गेले. कोणाच्याही हृदयातुन ते जाणार नाही अशाप्रकारे अढळ स्थान त्यांनी निर्माण केले. ते पुर्वीपासुन कर्तृत्वाने, त्यांच्या नेतृत्वाने, त्यांच्या संयमी स्वभावाने, त्यांच्या कवीमनाने, त्यांनी देशाला काय काय दिले जसे श्री. प्रदिपजी व श्री. मनोजजी यांनी सांगितले, त्यांनी देशाला काय दिले नाही तर देशाला शक्तीशाली बनविले. हा देश संपुर्ण एक आहे त्याचे वर्णन ते करतात की हा संपुर्ण देश एक आहे माणसाच्या शरीरासारखा भारत माझा देश आहे, आज मी केरळ राज्यावरुन तुम्हांला सांगत आहे. त्यांनी कश्मीरला मस्तिष्क अशी उपमा दिली. हिमालय आणि पंजाब त्यांचे दोन बाहु आहेत, बाहु म्हणजे भुजा आहे. पश्चिमीतट आणि पुर्वतट ही त्याची जांघा आहेत, आणि कन्याकुमारी हे त्याचे पाय आहेत. हा संपुर्ण भारतदेशी सुखी आणि संपन्न होण्यासाठी, शक्तीशाली होण्यासाठी काय काय केले पाहिजे. जय जवान आणि जय किसान हा पुर्वी नारा होता तर आता त्यांनी नविन जय विज्ञान असा नारा तयार केला. जय जवान आणि जय किसान, जवान सुरक्षीत राहावा म्हणुन संयम त्यांनी बाळगला. देशाला शक्तीशाली बनविले. अमेरिका आणि अन्य देशाचे जे निर्बंध होते ते त्यांनी मानले नाहीत. पुर्वीच्या पंतप्रधानांनी अणुशक्ती तयार करण्याचा प्रयत्न केला होता, श्री. नरसिंहराव होते तेव्हा, तर त्यावेळेस ते झाले नाही आता अटलबिहारी वाजपेयी असतांना त्यांनी ते करुन दाखविले. त्यामुळे भारत शक्तीशाली झाला, आज आम्ही म्हणतो की भारत महासत्ता बनण्याच्या मार्गावर आहे. आम्ही नेतृत्व करतो परंतु त्यांना दिशा देण्याचे

काम अटलजींनी केले. संपुर्ण शहर चांगले असेल तर स्वास्थ चांगले राहिल, स्वास्थ चांगले असेल तर माणुस चांगला राहिल. कुठलाही विभाग मग शहरातील पाठ खराब झाले, हात खराब झाले तर चालु शकणार नाही. किडणी गेली तरी चालु शकणार नाही. पायामध्ये जर एखादे मसल जरी खराब झाले तर तसा एखादा भारताचा कुठलाही भाग सुरक्षित, सुस्थीतीत, सुखी आणि संपन्न असला पाहिजे. तरच भारतमाता व्यवस्थित राहील आणिस त्याची संकल्पना, अशा प्रकारची संकल्पना यापुर्वी कोणी मांडली, पत्रकार म्हणुन त्यांनी सुरुवात केली आयुष्याची. मी परवाही सांगितले होते की पत्रकार, ज्यांनी देशाला नेतृत्व दिले, राज्य असेल, देश असेल किंवा पक्ष असेल, एक बाळासाहेब आणि त्यानंतर एक अटलबिहारी वाजपेयी. हिंदु हृदयसम्राट बाळसाहेब यांची सुरुवात सुध्दा पत्रकारीतने सुरुवात झाली. आणि अटलजींनी सुध्दा पत्रकारीता केली. एक वेगळयाप्रकारचे व्यक्ती आणि अशा व्यक्तीच्या जाण्यामुळे देशाचे नुकसान होतेच, त्यांनी केलेले विचार, दिलेले विचार हे आम्ही जर ठेवले आणि आत्मसात केले, १०० टक्के शक्यच नाही. काही टक्के तरी, फक्त श्रध्दांजली देवुन उपयोग नाही तर आपल्या राजकीय जीवनामध्ये, आम्ही देशाचे नेतृत्व करत नाही परंतु आपण आपल्या उल्हासनगरचे नेतृत्व करतो तर ते उल्हासनगर चांगले होण्यासाठी सुखी ठेवण्यासाठी, उल्हासनगचा व शहराचा प्रत्येक भाग चांगले होण्यासाठी आम्ही आपले योगदान काय देवु शकतो, आम्ही त्यादृष्टीने विचार करतोय का? ही विचार करण्याची वेळ आहे. श्री. टाले यांनी त्यांच्या कविता वाचुन दाखविल्या, एक हळहळ लागली समोर देशाला, नऊ वर्ष ते या राजकारणापासून, समाजकारणापासुन अलिप्त होते प्रकृती स्वास्थामुळे. १४ वर्षे त्यांनी राजकारणापासुन सन्यास घेतला. पण एकेक एकेक फुटप्रेस त्यांनी ठेवलेल्या त्या १३ दिवसाचे किंवा १३ महिन्याचे त्यांचे एकमताने शासन पडले तेव्हा त्यांना माहित होते खरीप करु शकु. जे आज चालले आहे देशात असो, संपुर्ण महाराष्ट्रात असो, सत्तेसाठी सर्वकाही पण त्यांनी सांगितले की आकडयांचे गणित आम्हांला सुध्दा येते व आम्हांला सुध्दा समजते परंतु लोक तंत्रावर जास्त विश्वास ठेवतात. म्हणुन एकमताने पडलो असतो एवढा आत्मविश्वास असता आता मी जात आहे परंतु परत येण्यासाठी अशाप्रकारचा विश्वास त्यांनी ठेवला व खरोखर त्यांनी त्याप्रकारे करुन दाखविले. आणि त्यानंतर भारताची वाटचाल, हिंदुस्तानची वाटचाल अशा प्रकारची झाली पाहिजे. मी संपुर्ण उल्हासनगरशहरवासियांच्यावतीने, विरोधीपक्षाच्यावतीने, सभागृहाच्यावतीने श्री. अटलजी यांना मानवंदना करतो त्यांना श्रध्दांजली अर्पित करतो. आणि अशाप्रकारचे व्यक्ती या देशाला पुन्हा नेतृत्व करण्यासाठी किंवा विचार देण्यासाठी अशी इश्वरचरणी प्रार्थना करतो धन्यवाद।

यावेळी सदस्य श्री. किशोर वनवारी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**सन्माननिय महापौरजी, दिव्यंगत भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या संदर्भात सर्व मान्यवरांनी शोकप्रस्तााव व्यक्त केला. अटलजी यांचेवर विशेष म्हणजे एक दोन मुद्दे बोलायचे आहे. १४ वर्षे राजकारणात नसतांना सुध्दा ही व्यक्ती दिवंगत झाल्यावर एवढी अफाट गर्दी आपल्या देशाच्या बाहेरील प्रमुख मंडळी त्यांच्या अत्यंविधीसाठी आली आणि त्यांची लोकप्रीयता, त्यांचे सामाजिक कार्य किती मोठे होते, लोकांनी पाहिलेले आणि येथे असलेल्या त्यांच्या पंतप्रधान कार्यकिर्दीतील येथे असलेल्या सदस्यांनी व लोकांनी जवळुन पाहिले आहे आणि जवळ जवळ दोन तीन दिवस सातत्याने टीव्ही चॅनलच्या माध्यमातुन त्यांचे विश्लेषण विदयार्थी दशेपासुन ते पंतप्रधान होईपर्यंत लोकांना माहित झालेले आहे. अशी व्यक्ती आपल्या भारत देशामध्ये असणे एक मोठे भाग्य आहे. मला वाटते तशाच पध्दतीने एक दु:ख संपुर्ण भारतात पसरले त्याच पध्दतीचे दु:ख केरळच्या संदर्भामध्ये जी अतिवृष्टी आली, त्यामध्ये जवळ जवळ साडेचारशे ते पाचशे लोक आपली मृत्युमुखी पडली आहेत व आपत्कालीन परिस्थिती तेथे निर्माण झालेली आहे. माझी सन्माननिय सदस्यांना विनंती आहे केरळच्या संदर्भात आमचा एक महिन्याचा पगार केरळच्या पुरग्रस्तांसाठी दयावा, मानधन त्यांना दयावे अशी घोषणा करतो तसेच अटलजी वाजपेयी आणि केरळमधील मृत्युमुखी पडलेल्यांना रिपब्लीकन पक्षाच्यावतीने भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो आणि येथेच थांबतो.

यावेळी सदस्या श्रीमती रेखा ठाकुर, श्री. राजेश वानखेडे, श्री. किशोर वनवारी, श्री. राजेंद्र चौधरी यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

यावेळी सदस्य डॉ. प्रकाश नाथानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**मा. महापौर महोदया, मी यापुर्वीच सांगितले की श्री. अटलजींच्या स्वप्नामध्ये असलेला देश म्हणजे मस्तिष्क व भुजा, तर त्यापैकीच केरळ राज्यामध्ये १०० वर्षापुर्वी किंवा त्याआधी कधी असा महाप्रलय आला नव्हता. १६ तारखेच्या सभेत आम्ही श्रध्दांजली वाहतांना म्हटले होते की केरळ राज्य आपलेच आहे त्यांना आपण श्रध्दांजली वाहिली होती. परंतु मा. पालकमंत्री श्री. शिंदे साहेब यांनी शिवसेनेच्यावतीने मदत पाठविली आहे. खासदार यांनी स्वत: एक महिन्याचे मानधन दिले आणि आमदारांना आव्हान केले आहे आणि त्यांच्या सुचनेप्रमाणे आणि आम्ही संपुर्ण गट शिवसेना पक्षाच्यावतीने आणि नगरसेवकांनी पत्र दिले, श्री. भारत गंगोत्री यांनी सुध्दा पत्र दिले, श्री. भालेराव यांनी सुध्दा पत्र दिले. तसेच श्री. टाले, बागुल महोदया आणि मी विरोधी पक्षाच्यावतीने याअगोदरच आम्ही पत्र दिलेले आहे. तर एक महिन्याचे मानधन केरळ राज्याचे जे सीएम रीलीफ फंड आहे त्यामध्ये तातडीने, आयुक्त साहेब आम्ही पत्र दिल्यानंतर आमचे मानधन तातडीने कॅलक्युलेट करुन म्हणजेच तातडीने उदयाच्या उदयाच दयावा. कारण हे संकट कोणावरही येवु शकते. त्यामुळे आमचे मानधन, आणखीन काही अधिकारी असतील आणि महापालिकेकडुन सुध्दा.

**<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:—</u>**आबा, आमचे सुध्दा मानधन दया, मी वैयक्तीक सांगतो.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>**सत्ताधारी पक्षाला मी विनंती करतो, सर्वच नगरसेवक म्हणत आहेत, तसेच महापालिकेकडून १० लाख अशाप्रकारचा निधी आपण दयावा. जेणेकरुन जास्तीत जास्त मदत त्यांना मिळेल, कारण ही रक्कम कमी आहे. संपुर्ण आकाश फाटलेले आहे. जेवढी मदत होईल तेवढी कमी आहे त्यांना. कारण शहर पुर्ण उध्दवस्त झालेले आहे. आम्ही जेवढी मदत करता येईल, तर आमचे मानधन आणि मला वाटते महापालिकेकडुन १० लाख अशा प्रकारे त्यांना देण्यात यावे. कारण प्रायव्हेट कंपनी सुध्दा मला वाटते एलएनडी कंपनीचे कामगार, त्यांनी सांगितले की आम्ही सुध्दा एक एक दिवसाचे वेतन त्यांनी केरलाला दिले आहे. महापालिकेकडुन व सदस्यांचे मानधन असा २१ लाखाचा निधी त्यांना तातडीने केरळ राज्याच्या सीएम रिलीफ फंडमध्ये डिस्ट्रेस फंड त्याचा अकांउंटनंबर सुध्दा खासदारांनी दिला आहे त्या डिस्ट्रेस फंडमध्ये टाकावा. त्यांचा अकांउंट नंबर त्यांनी दिला आहे तो मी तुम्हांला देतो. तुम्ही त्यात टाकावे अशी विनंती आहे.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**मा. महापौर, आज देशामध्ये हा फार मोठा धक्का बसला आहे श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्याबाबत, ते फार मोठे महान हस्ती होते. शक्यतो आम्हांला हे माहित नव्हते आम्हांस मिडीयावाले पेपरवाले यांच्याकडुन माहित झाले की त्यांनी देशासाठी जे कार्य केले आहे ते आज आम्हांस माहित पडत आहे. असे महान व्यक्ती जर आपल्या देशास मिळाले तर आपल्या देशासाठी फार मोठी गोष्ट होईल. मी मा. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना श्रध्दांजली देतो.


यावेळी सदस्या श्रीमती लक्ष्मी सिंग, श्रीमती रेखा ठाकुर, श्रीमती शशिकला आवारे सभागृहातुन बाहेर गेल्या.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**मा. महापौरजी, एक स्वप्न होते जे अपुर्ण राहिले, एक गित होते जे मुके झाले, एक लव होते जे अंनतात विलीन झाले. स्वप्न होते अशा भारताचे जे भय आणि भुख यापासुन विलीप्त असेल, एक गित होते एक असे महाकवि होते, ज्यात गिताची गुंज व गुलाबाचे गंध असेल, लव होती एक अशा दिपकाची, जो जळत असायचा व प्रत्येक अंधाराशी लढत असायचा व आम्हांला रस्ता दाखवुन एक प्रभातात निर्वाणात निघुन गेले. मृत्यु अटल आहे व शरीर नश्वर आहे. भारत माता आज सर्वात शोकमग्न आहे तीचा सर्वात लाडला राजकुमार हरवला, मानवता आज खिन्नमन्न आहे तिचा पुजारी झोपला आहे. शांती आज अशांत आहे तिचा रक्षक निघुन गेला. लोकांच्या डोळयाचा प्रकाश निघुन गेला, यमने म्हटले पाप झाले, विश्वाचा प्रमुख अभिनेता अंतिम अभिनय दाखवुन अंतर्ध्यान झाला. परमआदरणीय अटलबिहारी वाजपेयी यांची स्वर्गात जाण्याची किंवा वैकुंठमध्ये जाण्याची काहीही इच्छा नव्हती त्यांच्या एक पंक्तीत जो उजागर होतो, मी खुप जगलो, मी मनाने मरु, मी खुप जगलो, मी मनाने मरु, मी परत येणार, या भारतमाताची सेवा करण्यासाठी मी परत येणार. मी का घाबरु अशा त्यांनी पंक्त्या लिहिल्या होत्या. या भारतभुमीच्या ज्या काही कमतरता आहेत त्या बरोबर करणे असे त्यांचे मत होते. कवी व प्रखर वक्ता, पत्रकार अणि जननेता, बहुआयामी प्रतिभेची धनी असे भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांना

मी संपुर्ण सभागृहाच्यावतीने श्रध्दांजली अर्पित करतो व त्यांना नमन करतो. त्याचबरोबर मी संपुर्ण सभागृहास एक निवेदन सुध्दा करतो की आपल्या शहरातील गोलमैदान स्थित जी जागा प्रथम मिडटाउन रोटरी म्हणुन म्हटली जायची तर ते सभागृह व समोरील मोकळी जागेस सुशोभित करुन तेथे आपल्या मा. अटलबिहारी वाजपेयी यांनी लिहिलेली कवितांचा संग्रह, देशहितासाठी व त्यांच्यासारखे प्रशस्त मार्गावर जाण्यासाठी तसेच एक प्रबोधिनी जेथे भारतभर लोक येवुन तेथे ज्ञान प्राप्त करतील अशा प्रबोधीनीचे निर्माण तेथे केले पाहिजे. तसेच त्या प्रबोधीनीचे भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी प्रबोधीनी असे नाव देण्यात यावे. त्यांचा उद्देश असा होता की त्यांच्या मृत्युनंतर देखील लोकांनी ज्ञान घेतले पाहिजे. त्यांना भारतीय जनता पक्षातर्फे व संपुर्ण सभागृहाच्यावतीने त्यांना श्रध्दांजली अर्पित करतो. तर मा. महापौरजी मी आपणांस विनंती करतो की भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांना जशी सर्वांनी श्रध्दांजली दिली आहे, तर आजच्या या सभेस स्थगित करुन २४ तारखेला ४ वाजता ही सभा ठेवली जावी. कारण असाही देशभरात ७ दिवसाचा दुखवटा आहे, तर २४ तारखेपर्यंत ही सभा स्थगित करण्यात यावी.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**सन्माननिय महापौरजी, आम्हांला २४ तारखेला गावी जायचे आहे तर मग ही सभा ४ तारखेला ठेवण्यात यावी.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**मा. महापौरजी, २४ तारखेला २ नंबरचा चालीया पुर्ण होत आहे तर शक्यतो आम्ही सर्व तेथे व्यस्त असणार.

यावेळी सदस्या श्रीमती पंचम कालानी, श्रीमती कविता पंजाबी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**२३ तारखेस ठेवा.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**ही सभा ४ तारखेस ठेवणार तर फारच चांगले होईल. रक्षाबंधन आहे बरेचसे सण आहेत तर मग हे सर्व होवुन जावु दया. ४ तारखेस सभा ठेवा.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी, या सभेत मा. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या श्रध्दांजलीमुळे स्थगित करण्यात येत आहे तर मी असे म्हणतो की या विषयावर जास्त चर्चा न करता आपण ही सभा २३ तारखेपर्यंत स्थगित करावी, तर चांगले होईल.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**४ तारखेपर्यंत स्थगित करा.

**सदस्य श्री. भारत राजवानी:—**होय ४ तारखेपर्यंत स्थगित करा.

**सदस्या श्रीमती कविता बागुल:—**भारीप बहुजन पक्षाच्यावतीने व उल्हासनगर शहराच्यावतीने भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना भावपुर्ण श्रध्दांजली. धन्यवाद।

**महापालिका सचिव :—**सभा तहकुब करण्याची सूचना आली आहे. परंतु ही सभा तहकुब करायची आहे. परंतु यापुर्वी ज्या लक्षवेधी आल्या आहेत त्यास स्विकाराव्या लागतील. त्याआधी प्रश्नोत्तराचा तास येतो म्हणुन प्रश्नोत्तर वगळावे लागेल. लक्षवेधी स्विकारुन मग ही सभा स्थगित करावी लागेल. पण प्रश्नोत्तराचा तास वगळावा लागेल. दोन लक्षवेधी आहेत. मा. महापौर महोदया जाहिर करतील.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—**दोन मिनिट महोदया, मा. महापौर, उप—महापौर, आपण दोन मिनिटे लक्ष देवुन ऐका मागील वेळेस आपण स्वत: बोलले की आपण आमच्या येथे राजीव गांधी नगर येथे येणार होते विचारा श्री. सेलवन व श्री. शेवकानी साहेबांना कोणी आले का विचारा त्यांना. साहेब, मेहरबानी करुन मी आपणांस दोन तीन वेळा सांगितले. मागील वेळेस महासभेत हा प्रश्न मी मांडला होता.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**मा. महापौरजी, आयुक्त महोदय, मला वाटते एक वाईट गोष्ट आहे, या विषयावर आज बोलणे बरोबर नाही पण ते.......

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—**साहेब, ठिक आहे मी मान्य करतो, बोलणे बरोबर नाही ते मी मान्य करतो. पण साहेब आम्ही किती वेळा बोलायचे. आयुक्त साहेब, आपणांस मी सांगितले आपण म्हणालात मी बोलतो.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**श्री. रविजी आपण व श्री. सेलवन साहेब आयुक्तांकडे जावुन बसा म्हणजे फायनल होवुन जाईल.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—**आयुक्तांकडे बसलो होतो आयुक्तांनीच सांगितले आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**ठिक आहे, आज विषय काढायचा नाही कुठला.

**महापालिका सचिव :—**सभेपुढे सात लक्षवेधी सूचना आल्या आहेत. मी वाचुन दाखविते.

पहिली लक्षवेधी सुचना याचे सूचक श्री. महेश सुखरामानी यांची आहे

**विषय :—**शहरातील प्रभागात पाण्याच्या तक्रारी व कोणतीही पुर्व सूचना न देता प्रशासन पाण्याचे कनेक्शन कट करीत असल्याबाबतची लक्षवेधी सूचना

दुसरी लक्षवेधी सूचना याचे सूचक श्रीमती अंजली साळवे यांची आहे.

**विषय :—**उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सिध्दार्थ नगर, कैलास कॉलनी, भुखंड क्र. २४५ येथिल रहिवाश्यांना महापालिकेतर्फे सात दिवसात घरे खाली करण्याच्या नोटीसाबाबतची लक्षवेधी सूचना

तिसरी लक्षवेधी सूचना याचे सूचक श्री. सुरेंद्र सावंत यांची आहे.

**विषय :—**दैनिक प्रभात दिनांक ३/८/२०१८ रोजीच्या पत्रात पोषण आहारात उंदराच्या लेंडया सापडल्याबाबतची लक्षवेधी सूचना

चौथी लक्षवेधी सूचना याचे सूचक श्री. प्रमोद टाले यांची आहे.

**विषय:—**हक्काच्या उत्पन्नाकडे दुर्लक्ष होत असल्याबाबतची लक्षवेधी सूचना

पाचवी लक्षवेधी सूचना आहे

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

**विषय :—** उल्हासनगर महानगरपालिकेने सन १९९० ते २००० दरम्यान बांधलेल्या इमारतींना स्ट्रक्चरल स्टॅबीलीटी सर्टीफिकेटची मागणी केल्याने लोकांमध्ये घबराट पसरल्याबाबतची लक्षवेधी सूचना

ही लक्षवेधी सूचना मा. महापौर महोदया यांनी स्विकारली आहे.

सहावी लक्षवेधी सूचना आहे

सुचकाचे नाव :— श्री. सुमीत सोनकांबळे

अनुमोदकाचे नाव :— श्री. स्वप्नील बागुल

**विषय :—** भुयारी गटार योजनेवरील कामगार माहे जानेवारी पासुन कामावर येत नसल्याबाबतची लक्षवेधी सूचना

ही लक्षवेधी सूचना सुध्दा स्विकारली आहे.

सातवी लक्षवेधी सूचना श्रीमती आशा बि—हाडे यांची आहे

**विषय :—**वाहनचालकांना ठोक वेतनावर घेण्याबाबतच्या ठरावावर ताबडतोब अंमलबजावणी करण्याबाबतची लक्षवेधी सूचना

दोन लक्षवेधी सूचना मा. महापौरांनी स्विकारल्या आहेत. श्री. सुमीत सोनकांबळे व श्री. धनंजय बोडारे यांची लक्षवेधी सूचना स्विकारली आहे. व दोन्ही सदस्य उपस्थित आहेत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**श्रीमती अंजली साळवे महोदया यांच्या दोन नंबरची लक्षवेधी सूचना होती त्या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातुन आपल्या सभागृहासमोर एक विषय आणु इच्छितो की प्लॉट नं. २४३, २४४...

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी, याची चर्चा पुढील सभेत करु.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**लोकांना नोटिसा दिल्या आहेत, त्यांचे घर उजाडण्याचे काम महापालिका करत आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**मा. महापौरजी, त्यांचे म्हणणे असे आहे की दोन लक्षवेधीमध्ये ही लक्षवेधी घ्यायची होती. महत्वाची लक्षवेधी आहे.

**सदस्य श्री. मनोज सयानी:—**श्री. रविंद्र बागुल यांना आपण सांगितले की आज चर्चा करु नका सभा पुर्ण होवु दया आयुक्तांशी बोला.

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय म्हणत होते हे समजुन येत नव्हते.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**कारवाई होते तोपर्यंत आपण आदेश दया. ही चर्चा झाल्यानंतर पुढे जे पाउल उचलायचे असेल ते उचला.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—** ३०० घरे विस्थापीत होत आहेत.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सन्माननिय आयुक्त महोदय, पुढील सभेपर्यंत कारवाई थांबविली जावी.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**ही सभा २३ तारखेला ठेवा.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**ही सभा ४ तारखेला ३.०० वाजता ठेवा.

**महापालिका सचिव :—**ही गोष्ट बहुमताने होईल की कधी सभा ठेवायची आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी, सभागृहामध्ये माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांना सर्व पक्षीयांनी श्रध्दांजली दिली आहे. व त्याच कारणामुळे ही सभा स्थगित करण्यात येत आहे. देशामध्ये सात दिवसाचा दुखवटा आहे व तो २२ तारखेस संपत आहे. तर या सभेस २३ तारखेला किंवा २४ तारखेला ठेवले पाहिजे. आमच्या विरोधी पक्षातील सदस्यांना विनंती करतो की, येथे आम्ही कधी पक्षाचा भेद किंवा मतदानाची गोष्ट केली नाही. कधी कधी आपल्या शिवसेनापक्षाच्यावतीने काही गोष्टी येतात तर आम्ही त्यास सर्व संमतीने मान्य करतो. या सभागृहात सर्वांनी मिळुन मिसळुन कार्य करायचे आहे, शहरासाठी. तर मी विनंती करतो की या सभागृहात याबाबत मतदानाचा विषय झालाच नाही पाहिजे. सर्वसंमतीने निर्णय झाला पाहिजे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>**बरोबर आहे. ही सभा ४.०० तारखेस ठेवा.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**ठिक आहे विरोधी पक्षाशी आम्ही सहमत आहोत, ठिक आहे ही सभा ४ तारखेस ठेवु या, महापौर महोदया याबाबत आपण स्वत: निर्णय घ्या की याबाबत आपण काय करु इच्छिता. आम्ही अशा विषयांवर मतदान घेतले नाही तसेच भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेने आतापर्यंत सोबत सत्ता चालविली आहे. आम्ही विरोधी पक्षात सुध्दा होतो तसेच सत्तेत सुध्दा होतो. जास्त करुन आम्ही विरोधी पक्षात राहिलो परंतु आम्ही कधीही अशा विषयावर मतदान केले नाही व आज सुध्दा करणार नाही.

**<u>सदस्य श्री. शंकर लुंड:—</u>**महापौर महोदया आपण आदेश करा.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**हे पहा काय आहे, आता जसे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले, परंतु जास्तीत जास्त सभागृहातील सदस्यांचे ४ तारखेला सभा लावावी असे मत आहे तर आपण सभागृहाच्या हिशोबाने रहावे. बरोबर आहे मतदान होवु देवु नका, सभा ४ तारखेस ठेवा.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**महापौर महोदया, नाहीतर आपण ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करुन आपणांस जेव्हा योग्य वाटेल तेव्हा सभा ठेवा.

**<u>सदस्य श्री. अरुण आशान:—</u>**नाही, नाही, मा. महापौरजी, सभागृह नेता जे सांगत आहेत.....

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**सभागृहनेता आपण सभागृहाला सांभाळुन घ्यायला पाहिजे आपणांस बोलायची वेळ येते. श्री. जमनुजी आपणांस कोठे जायचे आहे का ४ तारखेला कोठे?

**<u>सदस्य श्री. अरुण आशान:—</u>**४ तारखेस सभा ठेवा.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>**ही सभा ४ तारखेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

**<u>महापालिका सचिव :—</u>**४ तारखेपर्यंत ही सभा स्थगित केली व त्यापुर्वी एक तहकुब सभा सुध्दा आहे ती सुध्दा स्थगित करावी लागेल. कारण ही सभा पुर्ण झाली.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**ही सभा स्थगीत करण्यापुर्वी अटलबिहारी वाजपेयी यांच्या फोटोला पुष्पगुच्छ वाहिले जावे.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>**तोपर्यंत मी अटलबिहारी वाजपेयी यांना लिहिलेली कविता आपणांस वाचुन दाखवितो. मी या परिस्थितीत एक कविता आपल्यासमोर मांडतो, जेव्हा बातम्या येत होत्या की अटलबिहारी वाजपेयी हॉस्पीटलमध्ये ॲडमीट आहेत व त्यांना लाईफ सपोर्ट सिस्टमवर ठेवण्यात आले आहे त्यावेळी १५ ऑगस्टचा दिवस होता व सर्वांना असे वाटत होते की काय होणार, परंतु त्यांनी १५ ऑगस्टच्या दिवशी प्राण सोडले नाही तर १६ ऑगस्टला सोडले तर त्यावर एका कविने लिहिले आहे की, ''मौत खडी थी सर पर किसी इंतजार में, ना झुकेगा ध्वज मेरा पंधरा ऑगस्ट के मौके पर, तु ठहर इंतजार कर, तु ठहर इंतजार कर, लहराने दे बुंलंद से, मैं एक दिन और ठहरुंगा मौत से, मंजुर नहीं है मुझे झुके तिरंगा मेरा, ध्वजदिन पर.'' तर असा विचार व असे उंच विचारवाले, आपले माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी होते, त्यांनी पंधरा ऑगस्टच्या दिवशी मृत्युशी झुंज दिला व आपले प्राण सोडले नाहीत. अशा पंधरा ऑगस्टच्या स्वतंत्रदिनी माझा तिरंगा झुकला नाही पाहिजे, तर ते १६ ऑगस्टपर्यंत मृत्युशी लढले व १६ ऑगस्टला त्यांनी आपला प्राण सोडला. तर अशा महान व्यक्तीसाठी मी म्हणणार संपुर्ण सभागृह श्रंध्दाजली अर्पित करावी. अटलबिहारी वाजपेयी अमर असो. ज्यांनी विश्वासाठी प्रेमाने संदेश दिला तर त्यांच्या श्रंध्दांजलीच्या दिवशी भांडणे उचीत नाही. प्रेमाने एक संदेश श्री. टालेजी यांनी सुध्दा दिला आहे. ''यमराज आये थे १५ ऑगस्टको कहा, अब चल अटल, समय हो गया, अटलजीने बोला जरा बाहर टहल, आज चला तो होगा अनर्थ, आज ध्वज तिरंगा लहराने दे, स्वतंत्र दिन मनाने दे, अटल हे मेरा वादा तुझे आज नही हम कल चल देंगे, कल चलने सें ना तेरा काम रुकेगा, ना पंधरा ऑगस्ट के दिन मेरा ध्वज रुकेगा।''

**<u>सदस्य श्री. अरुण आशान:—</u>**मा. महापौरजी, आज आपल्या भारताचे माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांना श्रध्दांजली देण्याचा कार्यक्रमासाठी महासभा स्थगित केली. परंतु मोठया खेदाने म्हणावे लागत आहे की आज या सभागृहात भाजपाचेच सदस्य अनुपस्थित आहेत.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–**राष्ट्रगित सुरु करा.

**महापालिका सचिव :–**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ५.४० वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः– ४/९/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ४/९/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

**४–अ**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक २०/०८/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करण्यात आल्याने सदर सभा मंगळवार दिनांक ४/९/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी –– महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी –– उप–महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३४ | श्री. रवी किशनचंद जग्यासी |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३५ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३७ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ७ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३८ | श्री. लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ८ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ३९ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४० | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| १० | श्रीमती आशा नाना बिराडे | ४१ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ११ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४२ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १२ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४३ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १३ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४४ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १४ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४५ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १५ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४६ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १६ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहता | ४७ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १७ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ४८ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १८ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४९ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १९ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५० | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २० | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ५१ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५२ | श्रीमती अंजली चंद्रकात साळवे |
| २२ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५३ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २३ | श्रीमती शुभांगिनी निकम | ५४ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसूळ | ५६ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २६ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५७ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २७ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५८ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २८ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५९ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २९ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ६० | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३० | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६१ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३१ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६२ | श्री. अरूण लक्ष्मणदास आशान |
| ३२ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६३ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३३ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह, २. श्री. अशोक बच्च्युमल छाप्रु, ३. अपेक्षा भगवान भालेराव, ४. श्री.भगवान शंकर भालेराव, ५. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, ६. श्री. राजेंद्र शांताराम चौधरी, ७. श्रीमती इंदिरा जमनादास उदासी, ८. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे), ९. श्रीमती ज्योती शामराव माने, १०. श्री. चंद्रशेखर केशव यादव, ११. श्रीमती शीतल चंद्रकांत कदम, १२. श्रीमती कांचन अमर लुंड, १३. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, १४. श्रीमती सुमन राजेश सच्चदेव, १५. श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी, १६. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, १७. श्री. विजय चाहु पाटील, १८. श्री. आकाश परशुराम पाटील, १९. श्री. विकास परशुराम पाटील.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

४२. श्री. गणेश पाटील, आयुक्त
४३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४४. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी
४५. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
४६. श्री. एस. के. सेलवन, कार्यकारी अभियंता
४७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
४८. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक

९. श्री. संतोष जाधव, उप लेखाधिकारी
१०.श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
११.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१२. श्री. मनीष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१३. श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
१४. श्री. नंदलाल सामतानी, प्र. सहाय्यक आयुक्त
१५. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
१६. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
१७. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१८. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक
१९. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२०. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२१. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
२२. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२३. श्रीमती निलिमा कदम, लेखापाल (शिक्षण मंडळ)
२४. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक

२५. श्री.दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. बाळु भांगरे

सांयकाळी ६.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>**महापालिका सचिव:—**</u>आता दुसरी सभा सुरू करण्यात येत आहे. यामध्ये लक्षवेधी सूचना स्विकारण्यात आल्या होत्या. पहिली लक्षवेधी सूचना श्री. धनंजय बोडारे यांची आहे.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.....................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

**विषय:—**उल्हासनगर महानगरपालिकेने सन १९९० ते २००० दरम्यान इमारतींना स्ट्रक्चर स्टॅबिलीटी सर्टिफिकेटची मागणी केल्याने लोकांमध्ये घबराट पसरल्याबाबतची लक्षवेधी सूचना आहे.

उपरोक्त लक्षवेधी सूचनुनेसार सभागृहाचे विनंती पुर्वक लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेने शहरातील सन १९९० ते २००० दरम्यान बांधलेल्या इमारतींना स्ट्रक्चरल स्टॅबीलीटी सटीफिकेट देण्याची मागणी केली असून सदर यादीमध्ये धोकादायक व धोकादायक नसलेल्या इमारतींचा समावेश करण्यात आलेला असल्याने स्ट्रक्चरल स्टॅबीलीटी सर्टीफिकेट मिळविण्यासाठी नागरीकांत भितीचे व घबराटीचे वातावरण पसरले आहे. परंतु महानगरपालिकेमार्फत एकाही व्यक्तीला, नागरीकाला, किंवा विकासकाला दुरुस्तीसाठी बांधकाम परवानगी दिलेली नसून सदर प्रकरण शासन दरबारी प्रलंबित आहे. महानगरपालिका साधे तळमाळा अधिक एक माळयाचे बांधकामास दुरुस्तीची परवानगी देवू शकत नसल्याने दुरुस्तीसाठी धोरण ठरविणेसाठी सदर लक्षवेधी सुचनेवर महासभेत चर्चा होवून दुरुस्ती परवानगीचे धोरण लवकरात लवकर ठरविण्यात यावे जेणेकरुन भविष्यात इमारती धोकादायक अवस्थेपर्यंत पोहचून होणारी जीवीत वा वित्तहानी टाळणे सुलभ होईल.

---

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** मा.महापौरजी, मा.आयुक्त साहेब मागच्या महिन्यामध्ये आपण उल्हासनगर मधील बहुतांश इमारतींना ....... नगररचना विभागासंबंधीत आहे. नगररचनाकार सांगतात की सार्वजनिक बांधकाम विभाग, कोणीतरी उत्तर द्या. आमच्या दृष्टीने महापालिका प्रशासन हे एकच आहे.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—</u>** धोकादायक इमारती हा विषय शहर अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पाहतात. त्याच्यामध्ये माझा सामावेश नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** मा.महापौरजी मी आपणांस विनंत करतो की, ही लक्षवेधी सूचना कृपया वगळण्यात यावी. आणि वेळ कमी असल्याने बाकीचे विषय घेण्यात यावेत.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** मा.आयुक्त साहेब धोकादाय इमारतींना नोटीसा दिल्या हे ठिक आहे, परंतु सन १९९० ते २००० या दरम्यानच्या इमारतींना सरसकट नोटीसा दिल्या आहेत. यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. प्रत्येक इमारतीमधील लोक आमच्याकडे येतात व आम्हाला विचारतात की नेमका हा काय प्रकार आहे. आम्ही त्यांना समजावून सांगतो की, स्ट्रक्चर ॲन्ड स्टॅबिलीटी घेणे कधीही चांगलेच. परंतु गंमत अशी की, स्ट्रक्चर ॲन्ड स्टॅबिलीटी देणेसाठी आपल्याकडे एकच नाखवा म्हणून आहे. बाकी चार आपल्या पॅनलवर काम करीत नाहीत. बाकी नाखवा हे आर्किस्ट्रेचर काम करत आहेत. आणि त्याचा परिणाम असा होतो की, ते नाखवांकडे जातात व त्यांच्या माणसांना त्यांनी काम दिल तर नाखवा हे स्ट्रक्चर स्टेबल आहे किंवा दुरूस्तीसाठी अमुक—अमुक पर्याय ते सुचवितात. आणि जर त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी ऐकल नाही तर ती इमारत धोकादायक आहे अशा प्रकारच लेखी निवेदन किंवा लेखी तक्रार महानगरपालिकेला कळवितात. मग महापालिका त्यांना इमारत खाली करणेस सांगतात. अशा दोन/तीन इमारतींबाबत मला अनुभव आलेला आहे. मग या शहरातील लोकांच्या बाबतीत अशा प्रकारच खेळ होता कामा नये म्हणून आपल्या पॅनलवर इतर आर्किट्रेक्चर नेमण गरजेच आहे. कारण इथून लोकांनी ठाण्याला जायच तिथं नाखवांची मनमानी ऐकायची. त्यासाठी ज्या आर्किट्रेक्चरनी महापालिकेत अर्ज केलेले आहेत त्यांना पॅनलवर आपण घेणार आहोत का? उल्हासनगरच्या लोकांना आपण सरसकट नोटीसा दिलेल्या आहेत, आणि त्यात काय लिहिले आहे तर स्ट्रक्चर ॲन्ड स्टॅबिलीटी घेतली नाही तर ती तुमची जबाबदारी आहे, हे काय आहे? शेवटी जबाबदारी महानगरपालिकेचीच असणार आहे. ती लोकांची जबाबदारी कशी काय असणार आहे. ती इमारत जर स्टेबल आहे, राहणेयोग्य असेल तर राहू द्यावे, नसेल तर आम्हाला खाली करावी लागणार आहे. पण शेवटच वाक्य हे हास्यास्पद आहे. जर काय झालं तर जबाबदारी तुमची असेल. अशा प्रकारचं लेखी सार्वजनिक बांधकाम विभागान दिलेल आहे. आम्ही आमची जबाबदारी टाळतोय का? हा एक प्रश्न आहे. आणि नाखवा यांची मक्तेदारी टाळणेसाठी महापालिकेने काय प्रयत्न केलेत, दुस—या इंजिनिअर्सना आपण हे काम का देत नाहीत.

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>** मा.आयुक्त साहेब, श्री.बोडारे साहेबांचा मुद्दा खूप महत्वाचा आहे कृपया याकडे लक्ष द्यावे. उल्हासनगर मधील अजून काही अभियंत्यांची या कामी नियुक्ती करावी.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—</u>** मध्यंतरी उल्हासनगर मधील ब—याचशा बांधकामांना समस्या निर्माण झाल्या होत्या. ब—याचशा बांधकामांना हिरव्या वाळूमुळे कॉंक्रिट पकडत नव्हत, सोडत होतं. सळयांना गंज पकडत होता. अशा वेळी इमारत कोसळून जीवीत हानी झाली असती म्हणून त्या नोटीस दिल्या गेल्या. आपल्या पॅनलवर पाच स्ट्रक्चरर इंजिनिअर्स आहेत. असं काही नाही आहे. मुंबई बी.एम.सी. मधला रजिस्टर स्ट्रक्चरर इंजिनिअर्स सर्टिफाय करत असेल की, ही इमारत धोकादायक नाही, राहणे योग्य आहे. त्याच्यामध्ये दुरूस्त्या करणे आवश्यक आहे व त्या दुरूस्त्या करून सदर इमारती राहण्यायोग्य होवू शकतात.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे :—</u>** म्हणजे पॅनलवरचेच पाहिजे असं काही नाही.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—</u>** नाही, अअसे काही नाही.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** बरोबर, तेच मला सांगायच होत.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—</u>** परंतु ते शासन मान्य रजिस्टर स्ट्रक्चरर इंजिनिअर्स पाहिजेत.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** स्ट्रक्चरर इंजिनिअर्सनी आपल्याकडे अर्ज केले आहेत त्यांना आपल्याकडे बोलवा. मला दोन इमारतींचा अनुभव आला की, ठरावीक 'क्ष' व्यक्तींना दुरूस्तीच काम दिल तर त्या राहणे लायक आहेत आणि नाही दिल्या तर त्या धोकादायक आहेत.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—</u>** उद्या मी नाखवा यांना माझ्या कार्यालयात बोलवून घेतो. त्याच्याशी चर्चा करतो.

**<u>सदस्या, श्रीमती मीना सोनेजीः—</u>** मा. महापौर मॅडम कृपया लक्ष द्या. नियोजन व विकास समिती सभापती म्हणून आम्ही समितीसमोर प्रस्तुत केले होते की, ज्या डुप्लिकेटेड इमारती आहेत त्यांच्याबाबत गणेश विसर्जनानंतर आम्ही येथे कॅम्प लावू. प्रभाग समिती कार्यालयात स्ट्रक्चर्स इंजिनिअर्स किंवा आर्किटेक यांचे उपस्थितीत कॅम्प लावण्यात येईल, आणि नागरिकांना एकाच ठिकाणी या सर्व सुविधा दिल्या जातील. धन्यवाद !

**<u>सदस्य, श्री. महेश सुखरामनीः—</u>** मा.महापौरजी, उपमहापौर, मा.आयुक्त साहेब मी श्री. धनंजय बोडारे यांना धन्यवाद देतो की, एवढा संवेदनशिल विषय त्यांनी येथे उपस्थित केला. ज्या इमारती धोकादायक आहेत. परंतु प्रशासनाकडे काही प्रस्ताव आहे का त्यांना परवानगी देण्याचा. आज त्यांना अनधिकृत असल्याचे सांगुन कोणी दुरूस्तीची परवानगी देत नाही. तर या गोष्टी कशा साध्य होणार. प्रशासनाकडे काही धोरण तर असावे त्यांना दिलासा देण्याचे. नियोजन व विकास समिती सभापती श्रीमती मीना सोंडेजी यांनी देखील हा मुद्दा उपस्थित केला आहे. तर माझे असे म्हणणे आहे की, इमारती खाली करणे हा आपला विषय नसावा. मध्यमवर्गीय व गरीब लोक तेथे मजबुरीने राहत आहेत. ते नवीन घर खरेदी करू शकत नाही. तर आपल्याकडे त्यांच्यासाठी काही धोरण ठरवणे आवश्यक आहे. कारण आपल्याकडे त्यांना पर्यायी जागा देणे शक्य नाही. बहुतेक लोक या समस्येने ग्रस्त आहेत. सभागृहाला मी विनंती करतो की, या विषयाकडे गांभिर्याने लक्ष देवून या विषयी चर्चा करून निर्णय घेवून त्यांना दिलासा देण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** मा. महापौर मॅडम, आता श्री. महेश सुखरामानी यांनी जो विषय मांडला तो अत्यंत गंभीर आहे. सन १९९० ते १०९२ च्या काळातील काही इमारती आपण पाडल्या त्या इमारतीमधील लोक कुठ राहतात याची आपल्याला साधी कल्पना तरी आहे का? उल्हासनगरमध्ये ते लोक राहत नाही. कारण येथील दुस—या इमारतीमध्ये राहायला गेले तर ते सांगतात ही देखील पडू शकते. म्हणजे उल्हासनगर मधील लोक बाहेर राहायला गेली. कल्याण, अंबरनाथ सारख्या इतर ठिकाणी राहायला लागली. म्हणजे उल्हासनगरमध्ये राहायला तयार नाहीत. आपण इमारती पाडतो परंतु तेथील नागरिकांची पर्यायी व्यवस्था होत नाही. आणि ते बाहेर राहायला जातात. म्हणजे आपल्या नागरिकांना आपणच स्थलांतरीत व्हायला लावतोय. त्यासाठी आपली काय व्युहरचना आहे. जी इमारत दोन वर्षांनी तीन वर्षानी पडणार असेल तर त्यांना नवीन परवानगी द्या. त्यातील नागरिकांची राहायची पर्यायी व्यवस्था करा. शासनाने ८५५ अनधिकृत इमारतींना दुरूस्ती परवानगी दिलेली आहे. तशी काय तरतूद करून त्यांना नकाशे मंजूर करून द्या. आणि त्यांना इमारत बनविण्यास परवानगी द्या. असे काही करा, नाहीतर त्या ८५५ इमारतीमधील सर्वच्या सर्व नागरिक उल्हासनगर शहर सोडून जातील. उल्हासनगर शहराची लोकसंख्या उल्हासनगर महानगरपालिकाच कमी करणार आहे का?

**<u>नगररचनाकार, श्री.मिलिंद सोनावणे:—</u>** दोन कारण आहेत काही इमारतींना टायटल आहे, काही इमारतींना टायटल नाही. यामध्ये सन २००६ मध्ये शासनाने जो जी.आर. काढला होता त्याच्यामध्ये किती इमारती बसतात, अध्यादेशामध्ये काही चुका असल्याने त्या शासनाला आम्ही पाठविल्या आहेत. आता जिल्हाधिकारी साहेब नवीन आलेत. ते दोन दिवसांमध्ये मिटींग लावणार आहेत. ज्यांच्याकडे सनद नाही, त्यांना डी—फॉर्म मिळाला तर त्यांना काहीतरी करता येईल असे आम्ही नगरविकास सचिवांना देखील लिहिलेले आहे. जो त्याच्यामध्ये अर्ज करेल त्यांना डी—फॉर्म द्यावा. स्ट्रक्चरल किंवा पायाचे नियम बघण्यात येवू नये. त्यामुळे आपल्याला परवानगी देण्यास अडचण येणार नाही. दुसरी गोष्ट ज्यांच्याकडे टायटल आहे, तर आता विकास नियंत्रण नियमावली येत आहे, मा.मुख्यमंत्री त्यांना कधीपण मंजूरी देवू शकतात. त्याच्यामध्ये याच्यासाठी ॲडिशनल एफ.एस.आय. ची तरतूद आहे. म्हणजे तीथे राहाणारे लोक बांधू शकणार नाहीत, ते बिल्डरला देवून त्याला इन्सेन्टिव एफ.एस.आय. पॉईन्ट जास्त देवून त्यांचे परत पुनर्वसन करता येईल. अशी तरतूद डिसीबलमध्ये आहे. पण ती जेंव्हा मंजूर होईल ते डीक्लोजमध्ये एका महिन्यात व्हायला पाहिजे. दुरूस्तीची तरतूद एम.आर.टी.पी. मध्ये नाही, डी.सी.रूलमध्ये नाही. ज्याला दुरूस्ती परवानगी द्यायची आहे त्याचा इमारत आराखडा मंजूर पाहिजे. आणि ही गोष्ट आपल्या शहरामध्ये प्रामुख्याने नाही. त्यामुळे ही अडचण होते.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** स्ट्रक्चर ऑडिट बद्दल जो गडबड गोंधळ चालू होता. नाखवा यांच्याबद्दल प्रत्येक सदस्याला विचारा अक्षरश: ते ब्लॅकमेल करत आहेत.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—</u>** म्हणूनच म्हणतो की, मी नाखवाला बोलावून घेतो व त्यांनी असे केले असेल तर दोन/तीन प्रकरण तपासतो आणि त्याच्यात जर आढळल की, याप्रकरणी तो गैरप्रकार करतोय तर ...

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** नाही, नाही. आमची विनंती अशी आहे की, एखादा स्ट्रक्चरल इंजिनिअर हा शासनाच्या नियमाप्रमाणे असला तर तो कुठलाही करू शकतो. आमच्याकडे काही जण ठाण्याला करतात.

**<u>नगररचनाकार, श्री.मिलिंद सोनावणे:—</u>** जे ठाण्याला काम करतात, पुण्याला काम करतात, मुंबईत काम करतात त्यांना लायसन्स नंबर दिलेले आहे अशा स्ट्रक्चरल इंजिनिअरनी ते कराव.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** म्हणजे ती प्रोसेस लवकरात लवकर होईल. नाखवांची मक्तेदारी तोडणेसाठी आज हा विषय श्री. बोडारे साहेबांनी मांडला आहे.

**<u>नगररचनाकार, श्री.मिलिंद सोनावणे:—</u>** तुम्हाला तेच म्हणतोय, असं काही नाही आहे. नाखवाला मी बोलावून घेतो आणि दोन/तीन प्रकरणे तपासून जर तो दोषी आढळला तर त्यांना काढून टाकतो.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** त्यांनी असं केलेल आहे साहेब. त्यांच्याबद्दल लोक तक्रार द्यायला तयार आहेत. धन्यवाद आयुक्त साहेब, आपला हा चांगला निर्णय आहे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:—</u>** मा.आयुक्त साहेब, स्ट्रक्चर स्टॅबिलीटीबाबत विरोधी पक्ष नेता यांनी हा विषय मांडला. त्यामध्ये साहेबांनी बोलता—बोलता एक उल्लेख केला की, त्यांच्या सर्व कागदपत्रांची पुर्तता असली पाहिजे. साहेब, आजही या महानगरपालिकेमध्ये फक्त नावाला प्लॅन पास केला जातो. प्लींथ सर्टिफिकेट, रेखीव आलेख कोरीव काम करून दिल जात. ओ.सी. आपल्याकडे कुणी घेत नाही. त्याच्या आगोदर रहिवाशी इमारतीमध्ये राहायला जातात. कालांतराने त्यांच्या रहिवासी क्षेत्रात ते इस्टाब्लिश होतात. ५/१० वर्षानंतर ते इस्टाब्लिश झाल्यानंतर हा मुद्दा परत उपस्थित होतो. आणि पुन्हा नव्याने त्यांना सांगीतल जात की, स्ट्रक्चर ऑडिटमध्ये तुमची समस्या आहे, तुमचे कागदपत्र बरोबर नाही. आणि हा जो मुद्दा विरोधी पक्ष नेता यांनी घेतलेला आहे त्याबाबत चर्चा खूप व गंभीर व्हायला पाहिजे. मा.आयुक्त महोदय, आज अशा कित्येक इमारती अशा आहेत की, त्यांना १०० टक्के ओ.सी. नाही. आजही ज्या इमारती तुम्ही मंजूर करता त्यांच प्लिंथ सर्टिफिकेट घेतल्यानंतर त्याची ओ.सी. घ्यायला कोणी येत नाही. दुरूस्तीच्या नावाखाली काही इमारती या धोकादायक असून तस सर्टिफिकेट मिळवल जात. काही—काही ठिकाणी धोकादायक इमारत असतांना सुध्दा त्या इमारतीच्या बाजूला १० फुटाच्या अंतराव नवीन इमारत बांधण्यास परवानगी दिली जाते. आपण हा जो मुद्दा सांगीतला की, त्यांच्याकडे मालकी हक्क असला पाहिजे. आपण त्यांना जर सुरूवातीलाच इमारत परवानगी दिल्यानंतर, प्लिंथ सर्टिफिकेट दिल्यानंतर आपण जोपर्यंत त्यांना ओ.सी. देत नाही तोपर्यंत त्यांना कुठल्याच सोयी—सुविधा दिल्या नाही. तर हा जो मालकी हक्काच्या कागदपत्रांचा मुद्दा आहे तो येत्या भविष्यकाळात होणार नाही. आज असं होतय की, इमारत परवानगी देतांना आपण अग्निशमनचा मुद्दा आगोदर घेतो, त्याची एन.ओ.सी. आगोदर घेतो, इमारत उभी राहण्याच्या आगोदर. ओ.सी.घेतल्यानंतर त्यांना अग्निशमनची एन.ओ.सी. द्यायची आहे आणि नंतर ओ.सी. कोणी घेत नाही. त्यामुळे फायर फायटिंग काय केलेली आहे हे कोणालाच कळत नाही. पाया भरल्यानंतर तो तपासला जात नाही. उल्हासनगरमध्ये असे कित्येक आर्किटेक आहेत की, त्यांचे लायसेन्स सीज झालेले आहेत. अशा वेळी बाहेरच्या आर्किटेकला लायसेन्स देवून इमारत नकाशा मंजूरीसाठी टाकले जातात. पाया भरल्यानंतर आर्किटेक राजीनामा देवून टाकतो, इमारत उभी राहते, ओ.सी. घेण्यास कोणी येत नाही. त्यामुळे बांधकाम जेंव्हा पूर्ण होत तेंव्हा तिथे त्यांचा इंजिनिअर तेथे नसतो. महापालिकेच्या नगररचना विभागात कर्मचारी/अधिकारी नसल्यामुळे बांधकाम कसं केलेल आहे, स्टील काय वापरलेल आहे याची आपल्याकडे काही नोंद नसते, त्याच्याबद्दल काही शहानिशा होत नाही. आणि सन १९९९ ते २००० हा जो मुद्दा उपस्थित केलेला आहे हा कायम स्वरूपी चालू राहील.खरं म्हटल तर इमारत परवानगी घेतल्यानंतर त्याच्या संपूर्ण अटी/शर्ती प्रमाणे बांधकाम केलेल आहे किंवा नाही हे नगररचनाकार यांनी बघायला पाहिजे. माझ्या निदर्शनास अशा कित्येक इमारती आहेत, मी नाव घेवून सांगू शकतो. त्यांनी प्लिंथ सर्टिफिकेट घेतलेल आहे, नकाशा मंजूर केलेला आहे. परंतु ओ.सी. नाही, आणि लोक तिकडे फर्निचरच काम करायला आलेत, वीज, पाणी अशा सुविधा मिळवून लोक तिथ राहायला आलेली आहेत आणि त्यांच्यामध्ये करारनामा देखील झालेला आहे. साहेब तुमच्याकडे ती ओ.सी. नसेल तर ती इमारत अधिकृत की अनधिकृत?

**<u>नगररचनाकार, श्री.मिलिंद सोनावणे:—</u>** अनधिकृत.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** मग अनधिकृत इमारतीला तुम्ही पाणी, वीज या सर्व गोष्टी पुरविल्यानंतर तुमच्याकडे ओ.सी. करीता कोण येणार आहे? हा स्ट्रक्चरर ऑडिटचा जो मुद्दा आलेला आहे त्याच्यामध्ये आपल्याकडे अशी एक अट राहणार आहे की, त्यांचे कागदपत्र, मग ज्या इमारतीला ओ.सी. नाही त्यांच स्ट्रक्चर ऑडिट केल्यानंतर त्यांना पुन्हा बांधणीची किंवा दुरूस्तीची परवानगी देणार का? देणार असाल तर

ती कशा पध्दतीने? साहेब हा मुद्दा फक्त ग्राउन्ड प्लस वन, ग्राउन्ड प्लस टू असा नाही कंजेस्टेड एरियामध्ये अशा कित्येक इमारती आहेत की, ज्या दुरूस्त करतांना शेजारच्या इमारतीला देखील त्रास होणार आहे. रस्त्यावर त्रास होणार आहे. कित्येक इमारतींना रंग दिलेला नाही, कित्येक इमारतींमागील ड्रेनेज लाईन खराब झाल्यामुळे असंख्य वृक्ष इतारतींवर निर्माण झालेले आहेत. त्यामुळे ते बांधकाम बाहेरून पाहतांना धोकादायक दिसत आहे. अशा इमारतींच स्ट्रक्चर ऑडिट परफेक्ट केल आणि उद्या जर काय झाल तर त्याला जबाबदार कोण? विरोधी पक्ष नेता यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्यामध्ये हा मुद्दा देखील येणार आहे की, एखादी संस्था यामध्ये त्यांना त्रास देत असेल आणि सर्टिफिकेट मिळवणेसाठी त्यांना वाम मार्गाचा वापर करावा लागत असेल तर साहेब हे कितपत योग्य आहे? मग अशा जर काय इमारती असतील तर त्या इमारतींना तुम्ही पुनर्बांधणीसाठी मंजूरी देणार का? शासनाच्या नियमाप्रमाणे की माणूसकीच्या दृष्टीकोणाने,की या शहराच हीत पाहूण, की ती लोक बेघर होणार नाहीत म्हणून. आपण कुठल धोरण यामध्ये वापरणार आहात? हा मुद्दा देखील तेवढाच गंभीर आहे. श्री. भालेराव साहेबांनी सांगीतल की, लोक शहर सोडून दुस—या शहरात जात आहेत. मग ती इमारत पुनर्बांधणी नंतर त्यांना या कार्यालयमध्ये येवून पुन्हा बिल्डींग प्लॅान पास करून त्यांना येथे राहण्यासाठी जो कालावधी जाईल त्या ज्या अटी/शर्ती तुम्हाला करून घ्याव्या लागतील त्या जर पहिलाच टपप पूर्ण नसतील तर तुम्ही त्यांना पुणर्बांधीची परवानगी कशी देणार? साहेब मुद्दा असा आहे की, लोक भयंकर भयभीत आहेत. बाजूच्या इमारतीला तडा गेला तर लोक आपली इमारत रात्री उठून तपासतात की बेसमेंटला कुठेक काही झाले नाही ना, आपली टाकी लिकेज नाही ना, लगेच जी.एम. बोलवतात व नगरसेवकाना बोलावून सांगतात की, आम्हाला अडचण आहे, आम्हाला थोडी मदत करा. आम्हाला दुरूस्त करण्याची परवानगी द्या, दुरूस्ती परवानगी घेण्यास महापालिकेत आल्यास येथे भली मोठी चेकलीस्ट मिळते. साहेब, या विषयावर गांभिर्याने जर निर्णय घ्यायचा असेल तर स्ट्रक्चर ऑडिट केल्यानंतर त्यांचा पुणर्बांधणीचा मार्ग पण सुकर आणि मोकळा झाला पाहिजे. सोनावणे साहेब, आपण सांगीतले की, नवीन डी.सी.रूल्स येणार आहे, मला वाटत नाही देतील म्हणून पण आपण सांगीतले तर येणार असेल. तर त्यामध्येही नियमांमध्ये तरतूद असेल मग त्या तरतुदीला तुम्ही बगल देवून, नजर अंदाज करून असें एखाद काही कराणार का? कारण फक्त तुम्ही स्ट्रक्चर ऑडिट सांगून, अटी/शर्ती देवून, तुम्ही बोलले ते इतिवृत्तात आले आहे, मी बोललात ते इतिवृत्तात आले आहे त्यांना सर्व कागदपत्रांची पुर्तता करायची आहे. सर्व कागदपत्रांची पुर्तता म्हणजे काय? मला जरा विस्ताराने सांगा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** मा.महापौरजी, आज जी लोकांच्या हिताची व भविष्याची चर्चा होत आहे त्याबद्दल मी पहिल्यांदा शिवसेना पार्टीला धन्यवाद देतो. ज्यांनी अशा नगरसेवकांना महासभेत पाठविले आहे. ज्यांना नागरिकांची अडचण समजत आहे. मी सन २००२ मध्ये निवडून आलो होतो, त्यावेळी श्री. पोखरकर साहेब होते. सन २००३ अखेर मी उल्हासनगर महापालिकेला पत्र लिहिले होते. प्रत्येक समस्या लिहिली. शेवटी कंटाळून मी श्री. पोखरकरांना लिहिले की, मुकी, बहीरी, नेत्रहीन, अपंग महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, प्रत्येक वेळी नगरसेवक ओरडून सांगतात, प्रत्येक वेळी चुका आपल्या निदर्शनास आणून देतो. कारण आम्ही नागरिकांचे प्रतिनिधी आहोत. त्यांना त्रास झाल्यास आम्हाला त्रास होतो. कृपया जी समस्या आपल्या समोर आम्ही आणतो तिला गांभिर्याने घ्या. आज अशी परिस्थिती आहे की, नगररचना विभागात कनिष्ठ अभियंता नाही, संपूर्ण उल्हासनगर शहरासाठी फक्त दोन कनिष्ठ अभियंता आहेत, कसे चालणार? कुठली इमारत कमजोर न बनावी, तीच्यात सिमेंट, रेती, लोखंड यांचा वापर योग्य व्हावा व योग्य नियमानुसार ती बनावी. अशी व्यवस्था करण्यात यावी की, भविष्यात कोणाला बेघर व्हावे लागणार नाही. धन्यवाद!

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** साहेब उत्तर द्या.

**<u>नगररचनाकार, मिलिंद सोनावणेः—</u>** तुम्ही जे म्हणालात की, जी परिस्थिती आहे, उल्हासनगर आणि भिवंडीमध्ये सारखी परिस्थिती आहे. इथे फक्त नकाशे मंजूर करून घेतले जातात, पुढे ओ.सी. प्लिंथ सर्टिफिकेट दिले जाते, पण पुढे ओ.सी. कोणी घेत नाही. मध्यंतरी ५/६ वर्षापूर्वी मी असतांना असा नियम काढला होता की, त्यांना वीज व नळजोडणी तोपर्यंत देवू नये जोपर्यंत ते ओ.सी. घेत नाहीत. परंतु त्यानंतर तत्कालीन मा.आयुक्तांनी तो निर्णय बदलला. आता कालच संध्याकाळी मी परत मा.आयुक्त

साहेबांना सादर केल आहे की, जोपर्यंत ओ.सी. घेतली जात नाही तोपर्यंत त्यांना वीज व नळ जोडणी देण्यात येवू नये.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** आणि त्यांच रजिस्ट्रेशन पण करू नये.

**नगररचनाकार, श्री.मिलिंद सोनावणेः—** रजिस्ट्रेशन पण करण्यात येवू नये आणि प्रभाग अधिका—यांनी पण हे लक्षात घ्यावे की, त्या इमारतीचा वापर करणे सुरू होणार नाही. अशा प्रकारच सबमिशन मी मा.आयुक्त साहेबांकडे पाठविलेले आहे. यावर आयुक्त साहेब निर्णय घेतील.

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** मा.आयुक्त साहेब याच्यावर काहीतरी धोरण निश्चित करा. विरोधी पक्षाने हा जो विषय मांडलेला आहे, याच्यावर आपणास चर्चा करून काहीतरी धोरण निश्चित करावच लागेल. जर का एखादा अधिकारी सुधारणा करून निघून गेला, आपण साहेब चांगल काम करून निघून गेलात. दुसरे अधिकारी आले त्यांनी केले नाही, परंतु हे शहर ही जनता येथेच राहणारी आहे. म्हणून कोणत्या अधिका—याच्या येण्या—जाण्यावरून हे धोरण निश्चित होत असेल तर असे चालणार नाही. या शहरासाठी एक निश्चित उत्तम प्रकारचे धोरण हे निश्चित केले पाहिजे. कारण येणारा जो काळ आहे त्यामध्ये अशा समस्या भरपूर होणार आहेत. आणि या काळामध्ये त्या लोकांना जर सुरक्षित केल नाही आणि उद्या कुठल्याही प्रकारची जीवितहानी झाली वित्तहानी झाली तर त्याला संपूर्णपणे ही महानगरपालिका जबाबदार राहणार आहे. तर त्यासाठी साहेब आपल ठोस धोरण या सभागृहासमोर आपण मांडल पाहिजे. आपण कल्पना सूचविली पाहिजे, त्या लोकांच्या भविष्याचा विचार केला पाहिजे की, त्या लोकांना सुरक्षित कस राहता येईल. त्या इमारती कशा दुरूस्त होतील. पुणर्बांधणीचा मार्ग कसा मोकळा केला जाईल यासाठी निर्णय होणे आवश्यक आहे, असे माझे मत आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** मा.महापौरजी, मा.उपमहापौर, मा.आयुक्त साहेब सोनावणे साहेबांनी आता सांगीतले की, ज्या इमारतीच बांधकाम पूर्ण होत नाही, त्या इमारतींना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देण्यात येवू नये. ज्या लोकांनी बांधकाम पूर्णत्वाचा दाखल्यासाठी अर्ज केला आहे त्या लोकांना तो का दिला जात नाही. जेंव्हा तो बिल्डर शुल्क भरण्यास देखील तयार आहे. तरी त्यांना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देण्यात येत नाही, त्याच कारण काय आहे?

**नगररचनाकार, श्री.मिलिंद सोनावणेः—** मी याबाबत स्थायी समितीमध्ये उत्तर दिले आहे. जे काम प्लॅनच्या हिशोबाने झालेले आहे, त्यांना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दिला पाहिजे. आणि झाले नसेल तर प्रत्येकाला स्कृटनी लेटर पाठविण्यात आलेले आहे. आज एकही बांधकाम असे नाही की, जेवढे पण बांधकाम पूर्णत्वाचा दाखल्यासाठी अर्ज आले आहेत त्यांच उत्तर आमच्याकडून दिलेल आहे. अशी कोणतीच फाईल प्रलंबीत नाही. बांधकाम पूर्णत्वाचा दाखल्याबाबत काय आवश्यकता आहे याबाबत प्रत्येकाला आम्ही कळविले आहे. आम्ही जे सांगीतले आहे त्याची पूर्तता ते जर करत नाहीत तर त्यांना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देता येत नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** नाही, यामध्ये माझी स्वतःची इमारत आहे, आजपर्यंत आपले काही पत्र आले नाही.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—** उद्या द्या. मी साईट व्हिजीट करतो.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानीः—</u>** केली आहे आपण. आपण मा. उच्च न्यायालयात देखील दिले आहे की सर्व ठिक आहे.

**<u>नगररचनाकार, मिलिंद सोनावणेः—</u>** बांधकाम परवानगी क्रमांक द्या.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानीः—</u>** राधास्वामी बिल्डींग आहे. रोडच्या कारणाने थांबविण्यात आले आहे. परवानगी देत नाहीत.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—</u>** ठीक आहे. उद्या साईट व्हिजीट करून सांगातो आपल्याला.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानीः—</u>** किती वेळा साईट व्हिजीट करणार,

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—</u>** मी स्वतः त्या साईटवर गेलो नाही.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानीः—</u>** ठिक आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u>** श्री.सोनवणे साहेब, एक जो स्ट्रक्चर स्टॅबिलीटीचा नियम आहे, त्यामध्ये ३० वर्षानंतर इमारतीची स्ट्रक्चर स्टॅबिलीटी घेणे आवश्यक आहे. तर आपण सन १९९० व २००० च्या इमारतींबाबत बोलत आहात ते कशासाठी? सन २०१८ मधून ३० वर्ष मागे गेलो तर १९८८ सालातील इमारती त्यामध्ये येतात. मग सन १९९० व २००० च्या इमारती त्यामध्ये कशा काय येतात? आपण कोणत्या नियमाने या इमारतींना नोटीस देत आहात याबद्दल थोडे आम्हाला समजवावे. थोडे स्पष्ट करा.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** साहेब, यांनी नोटीसा देवून लोकांना घाबरवायचे काम केलेले आहे. का? कधी?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u>** साहेब थोड थांबा, माझ बोलण अर्धवट राहिल आहे. मला पूर्ण करू द्या. मा.आयुक्त साहेब, जेव्हा एम.आर.टी.पी. ॲक्ट व बी.पी.एम.सी.ॲक्ट हे सांगते की ३० वर्ष जुन्या इमारतींकडून महानगरपालिका स्ट्रक्चर स्टॅबिलीटी मागवू शकते. ज्या इमारतींना ३० वर्ष झालेली नाहीत त्यांच्याकडून स्ट्रक्चर स्टॅबिलीटी मागण्याचे प्रयोजन काय? कोणत्या अधिकारान्वये आपण त्यांच्याकडून स्ट्रक्चर स्टॅबिलीटी मागतो? कायदयाच्या तरतुदी बिना.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** मा. महापौरजी, हे काय होत आहे?

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—</u>** ज्या अधिका—याने हे चुकीचे केले आहे, त्यांच्याकडून उत्तर मागवा.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** श्री. राजेश भाईच्या मताशी मी सहमत आहे, मा.आयुक्त साहेब हे काय होत आहे. हे वाटेल तस करीत आहेत. अच्छे दिन माझ्या मते येणार नाहीत.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** खुप चांगले दिवस आले आहेत, खुप चांगले.

**<u>सदस्य, श्री. अरुण आशानः—</u>** साहेब माझे म्हणणे असे आहे की, मगाशी राजेश भाईनी जे सांगितले की, तुम्ही असे कसे ठरवू शकता? की, १९९९ ते २०००, १९८९ पण असू शकते १९८८ पण असू शकते. म्हणजे तुम्ही जर २०/३० वर्षाच्या जावून इमारतींबाबत असे करत असाल तर सर्व साधारण सन २००० नंतरची पण इमारत अशी असेल की, जी मोडकळीस आलेली असेल. मग जर का या इमारतींच स्ट्रक्चर ऑडिट करतांना तीच नुकसान झाले किंवा काही झाले. म्हणजे आपले धोरण निश्चित नाही. विरोधी पक्ष नेत्यांच म्हणण हेच आहे की, तुम्ही जे नोटीसा देवून लोकांना घाबरवलय हा घाबरविण्याचा अधिकार महानगरपालिकेला नाही. तुम्ही ठरावीक प्रेडमधल्या लोकांना बोलून बाकीच्या लोकांना कसे गृहीत धरू शकता. सन १९८८ ची इमारत चांगली आहे किंवा २००१ ची इमारत चांगली आहे. म्हणजे काय चाललय हेच समजत नाही? म्हणून मला म्हणावे लागते की, हे काय होत आहे? तुम्ही आम्हाला स्पष्ट उत्तर द्या की, हे तुम्ही कसं ठरवले?

यावेळी सदस्य श्री. राजेंद्र चौधरी, श्री. शेखर यादव, श्री. रमेश चव्हाण, श्री. भगवान भालेराव हे सभागृहातुन बाहेर गेले. 

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—</u>** पहिली गोष्ट मी स्पष्ट करतो की, या नोटीसा माझ्या विभागातून दिल्या गेलेल्या नाहीत. मी माहिती घेतली, शहर अभियंता आणि आयुक्त कार्यालयातून या नोटीस बजावलेल्या आहेत.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** शहर अभियंता यांना विचारा, सार्वजनिक बांधकाम विभागाला की, त्यांना ही माहिती कोणी पुरविली? आणि नगररचना विभागात सार्वजनिक बांधकाम विभाग कसे काय काम करू शकतो? साहेब, शहर अभियंता असून रस्त्यांवरील खड्डे बुजविले जात नाहीत. इमारतीचं स्ट्रक्चर काय ऑडिट करणार आहेत.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारीः—</u>** अरुणजी, दोन मिनीट या विषयावर मला मण बोलायचे आहे, ही सभा अनिश्चित कालावधीसाठी येथे स्थगीत करण्यात येत आहे. आता मी मा. आयुक्त साहेबांकडे माझा राजीनामा देत आहे. मी माझ्या मर्जीने महापौर पद सोडत आहे. त्याच बरोबर हे पण सांगते की, मी आपल्या सर्वांच्या अत्यंत चांगल्या आठवणी सोबत घेवून जात आहे. सत्ता पक्ष असो अथवा विपक्ष असो मला तर माहितीच पडले नाही की, विपक्ष माझ्या बरोबर आहे. इतक प्रेम आपण दिलें माझ्या प्रत्येक कार्याला आपण सहकार्य केले याबद्दल मी उभे राहून आपले सर्वांचे अभार मानते. आपण एक बहिणीला एका भावाप्रमाणे प्रेम दिले जे माझ्यासाठी अत्यंत मोलाचे आहे. भाऊ काय असतात हे माझ्यापेक्षा कोणी समजू शकत नाही. यासाठी आपले खूप—खूप अभार. जर माझ्याकडून काय चूक झाली असेल, मुद्दाम तर मी करत नाही. पण चुकून झाली असेल तर एक बहिण समजून मला माफ करावे. श्री.जीवनजी अनेक वर्षापासून माझे बंधू आहेत. त्यांनी मला प्रत्येक वेळी मार्गदर्शन केले आहे. काय बरोबर आहे? काय चूक आहे? ते मला सांगायचे. तर त्यांचे देखील मी मनपूर्वक आभार मानते. सर्व अधिकारी, माझे सर्व भगीनी, सर्व मिडीया पर्सन या सर्वाना धन्यवाद देते. टोनी माझा मुलगा आहे. त्यांनी एक मुलाचे कर्तव्य पार पाडले आहे.

**<u>सदस्य, दिपक सिरवानीः—</u>** धन्यवाद, धन्यवाद महापौर मॅडम, आपण अत्यंत सुंदर रितीने आपला कार्यकाळ पूर्ण केला आहे, त्यामुळे धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री.किशोर वनवारी:—</u>** मा.महापौरजी आपल्या दोन मानसपुत्रांनी देखील खूप चांगल्या पध्दतीने त्यांचे कर्तव्य पार पाडले आहे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** मा.महापौरजी मी संपूर्ण सभागृह व भारतीय जनता पक्ष व विपक्ष यांच्या वतीने आपले अत्यंत आभार मानतो की, आपण आपल्या कार्यकाळात आम्हाला अत्यंत चांगल्या प्रकारे सभागृहात बोलण्याची संधी दिली. मी जेंव्हा—जेंव्हा माझा हात वर करत होतो, त्यावेळी मला पूर्णपणे बोलू दिले. आपण कोणताही पक्षपात केला नाही. पूर्ण सत्तापक्ष व विपक्ष यांचे सोबत आपण राहीलात. आपल्या जीवनात अजून खूप मोठा राजनैतीक प्रवास बाकी आहे. हे महापौर पद आज आपण सोडत आहात, परंतु ईश्वर आपल्याला यापुढे यापेक्षाही मोठे पद देवो अशी शुभकामना मी आपणांस देतो.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u>** मा.महापौरजी, आपण पद सोडले तरी महापालिका सदस्य म्हणून पाच वर्ष आपण आमच्या सोबत असणार आहेत. आणि मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशाने करारनाम्यानुसार आपण महापौर पद सोडत आहात याब्ददल आम्ही आपणांस सेल्युट करतो. आज या पदावर तुम्ही होता. उद्या कोणी दुसरा असेत तर परवा कोणी तीसरा असले हा संसाराचा नियम आहे. पण सदस्य म्हणून आपण सैदव आमच्या सोबत राहीलेत आणि तसेच आपल्याला यापुढे यापेक्षाही मोठे पद मिळो अशी आम्ही माताच्या दरबारात प्रार्थना करतो. आपण स्वस्थ रहाल व सदैव आमच्या सोबत रहाल.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** आम्हाला मोठा आनंद होत आहे की, महापौर आमच्या बरोबर राहील्या आणि आमच्या पॅनलच्या बरोबर राहील्या. आज दु:ख होत आहे की, आमच्या पॅनलच्या महापौर पदावरून उतरत आहेत. आपण पक्षपात केला नाही. ना आर.पी.आय. पाहिले ना शिवसेना पाहिली ना बी.जे.पी. आपण संपूर्ण सव्वा वर्ष शांतीपूर्वक आपला कार्यकाळ पूर्ण केला याचा मला आनंद आहे.

यावेळी सदस्य श्री. राजेंद्र चौधरी, श्री. शेखर यादव, श्री. रमेश चव्हाण यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** श्री.नाथानीजी दु:खी होऊ नका.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** मी दु:खी होत नाही.

**<u>महापौर तथा पीठासिन अधिकारी:—</u>** येथे माणसाचे जीवन देखील कायम नाही तर ही खुर्ची एक सामान्य गोष्ट आहे. आणि मी खुप भाग्यवान आहे की, मी सर्व पद अनुभवली. जीवन कायम नाही तर खुर्ची कशी कायम असेल असे समजून जर कोणी पदावरून उतरेल तर त्याला कसलेच दु:ख होणार नाही.

**<u>सदस्य, श्री. महेश सुखरामनी:—</u>** मा. महापौर मॅडम, आपला कार्यकाळ नेहमी अविस्मरणीय राहील. खरोखरच आपण आम्हा सर्वांना मिटींगमध्ये सहकार्य केले. याचा आम्ही अनुभव घेतला. आता आपण आमच्या बरोबर सामान्य सदस्य बनून आम्हाला मार्गदर्शन कराल. आपला कार्यकाळ खूपच उत्तम होता. धन्यवाद!

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** सन्माननिय महापौर मॅडम, अजून आहेत, नविन महापौर बसे पर्यंत आम्हा सर्व सदस्यांना समाविष्ट करून घेतल, गेल्या सव्वा ते दीड वर्ष सभा अत्यंत चांगल्याप्रकारे चालविली. कितीही वाद उत्पन्न झाले तरी त्यावर पांघरून घालण्याच काम तुम्ही सातत्यान प्रयत्न केले आणि महासभा कशी पुढे जाईल यासाठी प्रयत्न केले, सर्व सदस्यांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. माझे मित्र श्री. किशोर वनवारी बोलले की, हा संविधानाचा खेळ आहे, हा नियतीचा नाही, संविधानाचा खेळ आहे. त्यामुळे तुम्हाला पाय उतार व्हाव लागल. तुम्हाला चांगले आरोग्य व आयुष्य लाभो अशी सभागृहाच्या वतीने मी सदिच्छा व्यक्त करतो.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** मा.महापौरजी, हे काय होत आहे? विरोधी पक्षात असून देखील आपण आमचे सर्वांचे ऐकले. बोलण्याची संधी दिली, शहर हितासाठी आपण आमच्या बरोबर राहीलात, आपण पक्ष, विपक्ष बघितला नाही. आम्हाला या सभागृहात प्रश्न, उत्तर करण्याची संधी दिली, यापुढेही असेच होणार ही प्रथा अशीच चालेल. परंतु आपण आम्हाला जे सहकार्य केले, आम्हाला बोलावून, चर्चा करून अनेक विषयांचा निपटारा केला, आम्हाला जे योगदान व प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी माझ्या व आमच्या पक्षाच्या वतीने आभार व्यक्त करतो. आणि आशा करतो की, पुढे देखील अशाच प्रकारे ही महासभा चालेल, आम्हाला बोलण्याची संधी मिळावी, विरोधी पक्षाला त्यांचे म्हणणे मांडण्यास रोखण्यात येवू नये. तर हीच आशा ठेवून आपले आरोग्य व आयुष्यासाठी मी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. यानंतर आपण सदस्य बणून आमच्यात याल तेंव्हा देखील आपण एकविचाराने महासभेतील विषयांवर चर्चा करू, ही ईच्छा व्यक्त करून माझे दोन शब्द संपन्न करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र, जय भिम!

**<u>सदस्य, श्री. प्रमोट टाले:—</u>** मा.महापौरजी, मी एक ते सव्वा वर्षापासून आपल्यासोबत सभागृहाशी जोडलेलो आहे. आपल्या कामाची पध्दत व सभागृहाला सोबत घेवून जाण्याची पध्दत अशी आहे की, आम्ही सर्व एकप्रकारे आपल्या मुलांप्रमाणेच आहोत. आणि अशाप्रकारेच आपण आम्हाला प्रेम दिले आहे. एक थोडीशी शाहीरी मला आठवते, '' लिखा हुआ हॅ खुबसुरत सा एक पल किस्सा बन जाता हैं, जाने कब कोणसे जिंदगी का हिस्सा बन जाता हैं, कुछ लोग जिंदगी में ऐसे मिलते हैं, जिनसे ना तुटनेवाला रिस्ता बन जाता हैं.'' धन्यवाद!

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** मा.महापौर महोदया, सर्व सभागृहाने आपल्या भावना प्रकट केल्या आहेत. आपल्या कार्याबद्दल सर्वानी आपल्याला सॅल्यूट केला आहे. संपुर्ण वर्षामध्ये आपण कधी जाणवून दिले नाही की, हा विरोधी पक्ष आहे हा सत्ता पक्ष आहे. जीतके आपण सत्ता पक्षा सोबत राहिलात तितकेच विरोधी पक्षा सोबत राहिलात. आपण आपल्या कामाचा एक चांगला ठसा उमटविला आहे की, सभागृह मिळून—मिसळून चालविण्यात आले पाहिजे. कारण आपण स्वत:च्या वैयक्तीक कामासाठी नाही तर शहराच्या हितासाठी चर्चा करणेस येथे येतो. मा.आयुक्त साहेबांनी देखील एक चांगला समतोल ठेवला आहे. पुढे जावून जो कोणी या महापौरांच्या खुर्चीवर विराजमान होईल त्यांनी देखील याप्रकारची भावना ठेवावी. सर्वानी आता व्यक्त केलं की, यापुढे ही आपण शहर हितासाठी बोलत राहाल. आपण चर्चा करून शहराच्या हितासाठी चांगले निर्णय घेवून चांगले काम शहरासाठी करू या. आपल्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

**<u>सदस्या, श्रीमती मीना सोंडे:—</u>** आम्ही सतत हा अभिमान बाळगतो की, शहराच्या प्रथम नागरिक एक महिला शक्ती आहेत. आपण अत्यंत चांगल्याप्रकारे काम केले. येणा—या भावी वाटचालीबद्दल तुम्हाला शुभेच्छा!

**<u>सदस्य, श्री. रविंद बागुल:—</u>** मा.महापौरजी, तुम्ही सांगितले होते की, आता याच्यापुढील प्रक्रिया कोण करणार? आता आपण राजीनामा देत आहात, याच्या नंतरची प्रक्रिया होणार की नाही पुढे? मा.आयुक्त साहेब तर काही बोलत नाही. यापुढील प्रक्रिया होणार की नाही, का असेच राहील. मा. महापौरजी तुम्ही चॉकलेट देवू नका, आज तुमच्या आदेशाचे पालन पुढे कोण करणार? महापौरजी बोला.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u>** मा.महापौरजी, राष्ट्रवादी कॉंग्रस पार्टीतर्फे मी आपणास धन्यवाद देतो. आपल्या कार्यकाळात आपण जे आम्हाला प्रेम दिले त्याबद्दल धन्यवाद!

**<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे:—</u>** मा.महापौर मॅडम, या पूर्ण वर्षात आपण जे आम्हाला सहकार्य केले, आणि खास करून महिलांच्या प्रश्नांना आपण प्रथम प्राधान्य देवून काम केल याबद्दल मी आपणांस धन्यवाद देते. तुमच्या पुढील आयुष्यासाठी तुम्हाला शुभेच्छा देते. धन्यवाद!

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मा.महापौरजी, आज या सभागृहात प्रत्येक पक्षाच्या सदस्यांनी, सर्व पार्टीच्या पदाधिका—यांनी आपले आभार मानले आहे. जेव्हांपासून ही महानगरपालिका बनली आहे, तेंव्हापासून मी या महापालिकेचा सदस्य आहे. आणि १७ महिन्यांत मी जो आपला कार्यकाळ पाहिला आहे, भारतीय जनता पार्टीचा गट नेता या नात्याने आपण सत्ताधारी पक्षापेक्षा विरोधी पक्षाला बोलण्याची संधी दिली, त्यांना आपले म्हणणे माडण्याची संधी दिली, त्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. केवळ सभागृहातच नाही तर आपल्या दालनात देखील सर्व पक्षाच्या नगरसेवकांना आणि भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांना सोबत घेवून विषय पत्रीका काढणे, कशा पध्दतीने सभागृह चालविले जाईल, कशा प्रकारे शहरातील समस्या दूर केल्या जातील याकरिता आपण पूर्ण प्रयत्न केलेला आहे. याच्या आधी आपण मा. मुख्यमंत्री यांना या शहराच्या विकासासाठी साडेतीनशे करोड मंजूर करून घेतले ते अजून येणे बाकी आहे, हे देखील आपले एक प्रशंसनीय कार्य आहे. असा कोणताच विषय नसेल ज्यावर आपण लक्ष केंद्रीत केले नाही. पदाधिकारी व प्रशासनास बोलावून या शहराच्या विकासासाठी आपण पूर्ण मेहनत केलेली आहे. आणि आज आपण एक शिक्षिका आहात. शिक्षक दिनाच्या सायंकाळी आपण हा महापौर पदाचा राजीनामा देवून राजधर्माचे पालन केले आहे. कित्येक वर्षांपासून मी पाहत आहे की, ही खुर्ची मिळाल्यानंतर तीचा मोह सुटत नाही. कित्येक लढाया मी या सभागृहात पाहिल्या आहेत. भारतीय जनता पार्टीचा गटनेता म्हणून मी खरोखरच संपूर्ण सभागृहाच्या वतीने सेल्युट करतो. भारतीय जनता पार्टीचे जे मुख्यमंत्री आहेत, आमचे मंत्री श्री.रवि चव्हाणजी आहेत त्यांचे म्हणने मान्य करून राजधर्माचे पालन केले, तसेच आपण जी आश्वासने आमच्या मित्रांना दिली आहेत ती आम्ही पूर्ण करू शकू, आपण खुर्चीची कोणतीच पर्वा केली नाही. समयनुसार तुम्हांला जो—जो आदेश आले आहेत, त्याचे आपण पालन केले. पूर्ण शहरात कित्येक दिवसांपासून जी चर्चा होती त्या चर्चेला पूर्णविराम दिला. आणि हे दाखवून दिले की, आमची बहीण श्रीमती मीना आयलानीजी खुर्चीलालोभी नाहीत, खुर्ची त्यांच्या मागे फिरते. मी पूर्ण सभागृहाच्या वतीने आपणांस शुभेच्छा देतो. यापुढेही आपण सोबत बसून या शहराच्या विकासाकरिता काम करू. अनेक पद आपल्या मागे येतील, अनेक पदांनी आपण सन्मानित व्हाल. ईश्वर आपणांस चांगले आरोग्य देवो व शहर विकासाकरिता आपले सहकार्य असेच मिळत राहो. धन्यवाद!

**<u>सदस्या, श्रीमती कविता पंजाबी:—</u>** मा.महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब, संसार परिवर्तनशील आहे. आपल्याला कुठल्या पदाचे/खुर्चीचे दु:ख नाही व तुम्हालाही नाही. परंतु आजच्या नंतर आमच्या हृदयाच्या खुर्चीवर बसला आहात तेथून आपल्याला कोणी उतरवू शकत नाही. ही माझी मनापासून शुभेच्छा आहे. धन्यवाद!

**<u>महापालिका सचिव:—</u>** लक्षवेधी पर्यंत झाले होते, लक्षवेधी पासून सुरू झाले होते.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u>** आम्ही तेच सांगत आहेत.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>**सदरची सभा अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

सूचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. राजेश वदारिया

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक २०/०८/२०१८ रोजीची स्थगित केलेली सभा दिनांक ४/९/२०१८ रोजी सांयकाळी ४. ०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. २४ क** **दिनांक : ४/०९/२०१८**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक ४/०९/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.४५ वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— १५/९/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १५/९/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

**४ ब**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/०८/२०१८ रोजी दुपारी वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा मंगळवार दिनांक ४/९/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करून काही कामकाज स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा शनिवार दिनांक १५/९/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत उप—महापौर, श्री. जीवन इदनानी हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३२ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ३ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३३ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३४ | श्रीमती श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३५ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ६ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३६ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३७ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ८ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३८ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३९ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १० | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४० | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ११ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४१ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १२ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा | ४२ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १३ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ४३ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १४ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४४ | श्रीमती सुमन राजेश सच्चदेव |
| १५ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४५ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| १६ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ४६ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १७ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ४७ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १८ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ४८ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १९ | श्रीमती शुभांगीनी निकम | ४९ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २० | श्री. भगवान शंकर भालेराव | ५० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५१ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २२ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५२ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २३ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५३ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| २४ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५४ | श्री. विजय चाहु पाटील |
| २५ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ५५ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २६ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ५६ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २७ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५७ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २८ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ५८ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २९ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ५९ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३० | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६० | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३१ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | | |

तर

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती मिना कुमार आयलानी, २.श्री. हरेश परमानंद जग्यासी, ३.श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ४. श्रीमती पंचम उमेश कालानी, ५. श्री. स्वप्नील मिलींद बागुल, ६. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ७. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ८. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ९. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), १०. श्रीम. दिपा नारायण पंजाबी, ११. श्रीमती पुष्पा नाना बागुल, १२. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, १३. श्री. रवि किशनचंद जग्यासी, १४. श्री. गजानन प्रल्हाद शेळके, १५. श्री. रमेश महादेव चव्हाण, १६. श्रीमती जमिताली राजेश चान्पूर, १७. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, १८. श्री. धनंजय बाबुराव बोडारे, १९. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, २०. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, २१. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, २२. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१.श्री. गणेश पाटील, आयुक्त

१. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
२. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी
३. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता
४. श्री. संतोष जाधव, उप लेखाधिकारी
५. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
७. श्री. विनोद खामितकर, कनिष्ठ अभियंता
८. श्री. दिपक ढोले, कनिष्ठ अभियंता
९. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
११. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त

१२ . श्री. नंदलाल सामतांनी, प्र. सहाय्यक आयुक्त

१३. श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त

१४. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी

१५. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता

१६. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

१७. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षारक्षक

१८. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक

१९. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक

२०. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक

२१. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक

२. श्रीमती नर्गिस खान, लिपीक

३. श्री. बाळु भांगरे, लिपीक

दुपारी ४.२३ वाजता सुरूवात करण्यात आली.

या वेळी पिठासिन अधिकारी म्हणून उप महापौर, श्री. जीवन इदनानी हे आसनस्थ होते.

**महापालिका सचिवः—** दिनांक १५/९/२०१८ ची २०/७/२०१८ रोजीची दुपरी ३.०० वाजेची विशेष सभा आहे, लक्षेवधी सुचना एक पुर्ण झाली होती, लक्षवेधी सुचना दोन आहेत, सुमीत सोनकांबळे हे त्यांचे .....

**सदस्य, श्री. मनोज सयानीः—** मा. महापौरजी, ही सभा पण स्थगीत करण्यात यावी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. महापौरजी, ३.०० वाजेची सभा पण अनिश्चित कालावधीसाठी स्थगीत करण्यात यावी.

**उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानीः—** ३.०० वाजता जी सभा ठेवण्यात आली होती, ती अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे.

---

सूचकाचे नांव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नांव :— श्री. राजेश वदारिया

**स्थगित प्रस्ताव**

दिनांक २०/०८/२०१८ रोजीची स्थगित केलेली पुन्हा दिनांक ४/९/२०१८ रोजी आयोजित करुन स्थगित केलेली सभा दिनांक १५/९/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. २७ ब** **दिनांक : १५/०९/२०१८**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १५/०९/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ४.२५ वाजता उप महापौर तथा पिठासिन अधिकारी श्री. जीवन इदनानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— १९/१०/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/१०/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

**४ क**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/०८/२०१८ रोजी दुपारी वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा मंगळवार दिनांक ४/९/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करून काही कामकाज स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा शनिवार दिनांक १५/९/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता पुन्हा स्थगित करुन सदर सभा शुक्रवार दिनांक १९/१०/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. पंचम उमेश कालानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३३ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३४ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३५ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३६ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३७ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ८ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३८ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ९ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३९ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| १० | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४० | श्री. लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ११ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४१ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १२ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४२ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १३ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४३ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १४ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ४४ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १५ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ४५ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १६ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४६ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १७ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४७ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १८ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ४८ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १९ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ४९ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २० | श्रीमती शुभांगीनी निकम | ५० | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २१ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५१ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २२ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५२ | श्री. कविता सुधिर बागुल |
| २३ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५३ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २४ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५४ | श्री. किशोर नानायणदास वनवारी |
| २५ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ५५ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २६ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५६ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २७ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ५७ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २८ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ५८ | श्री. विकाश परशुराम पाटील |
| २९ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५९ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६० | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३१ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६१ | . अरूण लक्ष्मण आशान |
| ३२ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६२ | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१.श्रीमती आशा नाना बिराडे, २. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ३. श्री. महेश पहिलराज सुखरामनी, ४, श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ५. श्री. भगवान शंकर भालेराव, ६. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ७. श्रीमती पुष्पा नाना बागुल, ८. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, ९. श्री. रमेश महादेव चव्हाण, १०. श्री. चंद्रशेखर केशव यादव, ११. श्रीमती मिताली राजेश चान्पुर, १२. श्रीमती कांचन अमर लुंड, १३. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, १४. श्रीमती सुमन राजेश सच्चदेव, १५. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) १६. मिनाक्षी रवी पाटील, १७. श्री. विजय चाहू पाटील, १८. श्री. आकाश परशुराम पाटील.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१.श्री. अच्युत हांगे, आयुक्त
२.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३.श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
४.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी
५.श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
६.श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता
७.श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
८.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
९.श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक
१०.श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
११.श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
१२.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१३. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त

१४. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त

१५.श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त

१६. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी

१७. श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता

१८. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता

१९. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक

२०. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक

२१. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षारक्षक

२२. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक

२३. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक

२४. श्रीमती निलिमा कदम, लेखापाल (शिक्षण मंडळ)

खालील कर्मचारी उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्रीमती नर्गिस खान, लिपीक
३. श्री. बाळु भांगरे, लिपीक

४.        श्री. अंकुश कदम, महापौरांचे स्विय्य सहाय्यक

सांयकाळी ४.४१ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :—**दुसरी सभा सुरू होत आहे यामध्ये लक्षवेधी सुचना आली होती यामध्ये सुचकाचे नाव श्री सुमित सोनकांबळे, अनुमोदकाचे नाव श्री. स्वप्नील बागुल विषय आहे की, भुयारी गटारी योजनेवरील कामगार माहे जानेवारी पासुन कामावर येत नसल्याबाबतची लक्षवेधी आहे.
लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.....................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचकाचे नाव :—श्री. सुमित सोनकांबळे

अनुमोदकाचे नाव :— श्री. स्वप्नील बागुल

**विषय :—**भुयारी गटारी योजनेवरील कामगार माहे जानेवारी पासुन कामावर येत नसल्याबाबतची लक्षवेधी सूचना

उपरोक्त लक्षवेधी सुचनेनुसार सभागृहाचे विनंती पुर्वक लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेने शहरातील सन १९९० ते २००० दरम्यान बांधलेल्या इमारतींना स्ट्रक्चरल स्टॅबीलीटी सर्टीफिकेट देण्याची मागणी केली असून सदर यादीमध्ये धोकादायक व धोकादायक नसलेल्या इमारतींचा समावेश करण्यात आलेला असल्याने स्ट्रक्चरल स्टॅबीलीटी सर्टीफिकेट मिळविण्यासाठी नागरीकांत भिंतीचे व घबराटीचे वातावरण पसरले आहे.  परंतू महानगरपालिकेमार्फत एकाही व्यक्तीला, नागरीकाला किंवा विकासकाला दुरुस्तीसाठी बांधकाम परवानगी दिलेली नसून सदर प्रकरण शासन दरबारी प्रलंबीत आहे. महानगरपालिका साधे तळमाळा अधिक एक माळयाचे बांधकामास दुरुस्तीची परवानगी देवू शकत नसल्याने दुरुस्तीसाठी धोरण ठरविणेसाठी सदर लक्षवेधी सुचनेवर महासभेत चर्चा होवून दुरुस्ती परवानगीचे धोरणस लवकरात लवकर ठरविण्यात यावे जेणेकरुन भविष्यात इमारती धोकादायक अवस्थेपर्यंत पोहचून होणारी जीवित वा वित्तहानी टाळणे सुलभ होईल.

---

यावेळी मा. आयुक्त श्री. अच्युत हांगे हे सभागृहातुन बाहेर केले व त्यांच्या स्थानी श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त (मुख्यालय) हे आसनस्थ झाले.

**सदस्य श्री.सुमित सोनकांबळे:—**सर्वप्रथम महापौर मॅडम चे मी अभिनंदन करतो की आपण महापौर झालात अभिनंदन आता लक्षवेधी भुयारी गटारावरील कामगार माहे जानेवारी पासून कामावर नसल्याबाबतचा. मा. महोदय, उपरोक्त विषयांन्वेय नुसार सभागृहात विनंती पूर्वक लक्ष वेधू ईच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेने शहरातील सांडपाणी योजने करीता भुयारी गटार योजना राबविली असून सदर योजनेत दुरूस्तीसाठी ठेकेदार नेमण्यात आलेले असून सदरचे ठेकेदार मार्फत कर्मचा—यांची नेमणूक करण्यात आलेली होती. परंतु मागील जानेवारी पुासन कामगार सदर ठिकाणी कामावर येत नसून भुयारी गटार योजना फसका उडाला असून प्रभागातील नागरीकांना न्याय, गैरसोईला सामोरे जावे लागत आहे. याकरीता सदर लक्षवेधी सुचना मांडत आहे. तरी सदर लक्षवेधी सुचनेवरती सभागृहात चर्चा होउन आवश्यक कारवाई करण्यात यावी. हि नम्र विंनती.

**<u>सदस्य श्री. स्वप्नील बागुल :—</u>** मॅडमजी, योजना आपण राबवलेली होती मागच्या जानेवारी महिन्यापासून तिथे कामगार कामावर येत नसल्यामूळे तिथे सफाई व्यवस्थित होत नाही सांडपाण्याची तर माझी विनंती आहे की, या विषयावर चर्चा व्हावी आणि योग्य ती कारवाई व्हावी.

**<u>सदस्य श्री. सुमित सागर सोनकांबळे</u>**:— या सभागृहामध्ये कुठल्या सदस्याला ड्रेनेजच्या समस्या नाही आहे का आपल्या वार्डामध्ये

**<u>सदस्य श्री. किशोर वनवारी</u>**:—आपण जर आपले भाषण पूर्ण केले तर आम्ही बोलणार ना बंधू. पूर्ण झाले आहेत बोला आपण.

**<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा</u>** :— मा. महापौर महोदया, उप—महापौर महोदय, आयुक्त साहेब आणि सन्माननीय सदस्य सर ते उल्हासनगर मध्ये भुयारी गटारी योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

**<u>काही सदस्य</u>** :— आवाज, आवाज...

**<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा</u>** :— उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये असलेल्या भुयारी गटारी योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत १९९९ मध्ये महापालिकेकडे दैनंदिन देखभाल दुरूस्ती करीता हस्तांतरीत करण्यात आलेले होते. परंतु त्या योजना सन २००५ मध्ये झालेल्या महापूरामध्ये बरेच ठिकाणी मलशुध्दी केंद्र, पंप हाउस, मलवाहिन्या  मुख्य मलवाहिन्या नालामधून असलेल्या सगळे वाहून गेल्यामुळे त्या योजना तेव्हापासुन बंद स्थितीत आहे. महापालिका क्षेत्रामध्ये भुयारी गटार नविन भुयारी गटारी योजना राबविण्याच्या दृष्टीने प्रत्येक शासनाचा योजनेमध्ये भाग घेण्याकरीता आपल्या महापालिका मार्फत सन २००७ मध्ये केंद्र शासनाकडे ३०० कोटी खर्चाची योजना जेएनयुएम योजने अतंर्गत सादर करण्यात आले होते. परंतु सदरच्या योजने अंतर्गत आपल्या कडे निधी आज प्राप्त झाल्यामुळे त्या योजना राबविण्यात आलेल्या नाही. परंतु शहरामध्ये असलेल्या अस्तिवाद असलेला गल्लीमध्ये असलेल्या मलवाहिन्याचे जे चेंबरस आहेत वाहिन्या आहेत त्यामध्ये ब—याच नागरीकांनी आपल्या घरातील सांपडपाणी जोडलेले होते. ते सांडपाणी वाहन्याकरीता मुख्य वाहिनी वर राहण्याकरीता पर्याय नसल्यामुळे प्रत्येक गटारीमध्ये जोडण्यात आलेले आहेत. .गटरीमध्ये जोडण्यात आल्यामुळे त्या लहान लहान गल्लीमध्ये आपल्याकडे असलेले एसएससेल मशिन बाकी इतर कुठलाही जाणे मार्ग नसल्यामुळे मजदूर मार्फत त्या गल्लीमधील चेंबर साफ करण्याचे काम करीत होतो. पंरतु जानेवारी २०१८ पासुन ते पाणीपुरवठा विभाग मार्फत करायचे नाही आहे आपल्या इथे सॅनिटेशन विभागातील त्या वार्डातील उपलब्ध असलेला सफाई कर्मचा—याकडुन करू घेण्याचे तत्कालीन आयुक्त साहेब यांनी आदेश दिला होता त्यानुसार पाणीपुरवठा विभागातील सॅनिटेशन मधील सफाई कर्मचा—याकडुन सदरच्या चेंबरचे चोकअप काढण्याचे काम सुरू आहे. ठेकेदार पध्दतीने असलेले काम बंद आहे.

**<u>सदस्य श्री. सुमित सोनकांबळे</u>** :— आता जे पुढच जे काम आहे ते सॅनिटेशन विभागाकडुनच होणार का?

**<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा</u>** :— होय.

**<u>सदस्य श्री. सुमित सोनकांबळे</u>** :— ठेकेदार त्यांना परंत तुम्ही राबवणार नाही ठेकेदार पध्दतीत.

**<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा</u>** :— ठेकेदार नेमलेलेच नाही, ठेकेदार पध्दत बंदच आहे. नविन ठेकेदार नेमलेला नाही.

**<u>सदस्य श्री. सुमित सोनकांबळे</u>** :— ठिक आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे</u>** :— मा. महापौरजी, सेलवन साहेब मी फक्त आपल्या या विषय संदर्भात दोन ते तीन गोष्टी विचारू ईच्छितो आज जे ड्रेनेजचे चेंबरची जी गाडी जाते फॉग मशिन आणि त्याच्यावर मद्रासी लोक काम करतात ना? ते ठेकेदार पध्दतीवर आहेत ना? त्याच्यावर तर सफाई कामगार जात नाही. नंबर २ जो आयुक्त साहेबांनी आदेश दिला आमचे जे छोटे चेंबर आहेत प्रॉपर्टी कनेक्शन ते आजनंतर सर्व सफाई कामगार सफाई करतील. सफाई कामगांराची हालत काय आहे आयुक्त साहेब ऐका एक वेळे अशी होती पंधरा वर्षापूर्वी जेव्हा मी नगरसेवक होतो त्यावेळेस एका वार्डात पंचवीस सफाई कामगार होते.

पंचवीस नंतर १६, १६ नंतर १२ आजमिती फक्त नउ नउ सफाई कामगार एका वार्डात आहे. एक किंवा दोन नालीवाला आहे. कधी कधी तर ते रजेवर असले तर एकपण नालीवाला ड्रेनेज साफ करण्याकरीता. प्रत्येक नगरसवेकाचा वार्डात २०० ते ३०० ड्रेनेज आहेत. त्यानंतर आम्ही आज ड्रेनेज साफ करू शकत नाही. एक किवा दोन लोक. साहेब पूर्वी असे होते जेव्हा एका वार्डात पंचवीस पंचवीस सफाई कामगार होते एक ड्रेनेज साफ करण्याकरीता चार सफाई कर्मचा—यांची एक तुकडी लागते. एक कर्मचारी नाली काढतो, दुसरा भरतो, तिसरा गाडीत ते घेउन जातो आणि चौथा त्याच्यासोबत जातो आणि दोन गाडी ढकलत नेण्याकरीता. चार कर्मचारी जेव्हा असतील तेव्हा वार्डात नाली सफाईचे काम होते. आज नाली साफ करू शकत नाही तर चेंबर जे प्रॉपर्टी कनेक्शन आहे जे आमचे माननीय सदस्य या विषयावर बोलले त्यांचे बोलणे एकदम बरोबर आहे. तुम्ही लोक मद्रासी लोक ठेउ शकतात जे आपल्या सॅनिटेशन विभागात आता आता गेलेल्या गाडया. पूर्वी पाणी पूरवठा विभागात गेल्या चाळीस वर्षापासुन होते. जे प्रॉपर्टी कनेक्शनचे चेंबर वाले लोक येत होते ते पण ठेकेदार पध्दतीवर होते तेच येत होते. प्रॉपर्टी कनेक्शन आहे तर दोन कामगार जात होते आणि जर मोठे काम असेल मेन चेंबर असेल तर त्याकरीता गाडी पाठविण्यात येते. आज दिलेले उत्तर हे पूर्णपणे चुकीचे आहे की, सफाई कामगार ड्रेनेजचे काम करीतील ते लोक ओपन जे ड्रेनेज आहे ते साफ करू शकत नाही. म्हणुन कृपया करून जर आपल्या विभागाकडुन टेंडर कॉल होत असेल जे लोक गाडी वर जातात चेंबर साफ करण्याकरीता त्यामधून सुरूवातीला प्रॉप्रर्टी कनेक्शन करीता दोन दोन ज्या नगरसेवकानी तक्रार केली की, याठिकाणी लहान चेंबर आहे प्रॉपर्टी कनेक्शन तर त्याठिकाणी दोन लोक जावे आणि मेन चेबर असेल तर गाडी जाते. कृपया करून जे ठेकेदार पध्दतीवर जे मद्रासी लोक काम करतात जे गाडीवर जातात त्याच्यावर कर्मचा—यांची संख्या वाढवा प्रॉपर्टी कनेक्शन करीता ज्या नगरसेवकांनी तक्रार दिलेली आहे त्यांचे काम करण्यात यावे. आयुक्त साहेब, अहो आयुक्त साहेब आपण ऐकत आहांत ना कृपया करून सभागृह जे सदस्य आहे ते जर म्हणतील की आम्ही मद्रासी लोकांन कडुन नाली साफ होत नाही तर चेंबर काय साफ करणार. कृपया करून कर्मचा—यांच्या संख्येत वाढ करण्यात यावी. ठेकेदार पध्दतीने जरी असेल तरी चालेल.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे** :— सेलवन साहेब, जरा डायसवर या ना. मा. महापौरजी... आपल्याला बोलायचे आहे का?

**सदस्य श्री. सुमित सोनकांबळे:—**आता जे मद्रासी लोक ठेवले आहे कामावर एक तक्रारीला चार दिवस जाता साहेब. सोमवारी तक्रार केली तर गुरूवारी तुमची गाडी येणार तोपर्यंत ते लोकांना सहन करावे लागत. आणि जे मद्रासी लोक तुम्ही कामावर ठेवले आहेत त्यांना पगार किती आहे तुमच्याकडून उल्हासनगर महानगरपालिके मार्फत

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा** :— ठेकेदार पध्दतीने आमच्याकडे जे होते तेव्हा एका कर्मचा—याला आपल्या कडून मिनीमम डीएसआरचा रेटप्रमाणे.

**सदस्य श्री. सुमित सोनकांबळे** :— काय रेट आहे.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा** :— मागच्या रेट मध्ये ९० रूपये होते.

**सदस्य श्री. सुमित सोनकांबळे** :— पर डे

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा** :— ४९० रूपये होते.

**सदस्य श्री. सुमित सोनकांबळे** :— पर कॉल वर.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा** :— होय. मध्ये स्कील लेबर असा काही रेट होता.

**सदस्य श्री. किशोर वनवारी** :— साहेब, तुमच्या उल्हासनगर महानगरपालिकेकडून त्यांना पैसेच मिळत नाही अशी माहिती आमच्याकडे आहे. त्याच्यामुळे ते लोक काम करीत नाही. आणि तुम्ही म्हणता आहेत की सफाई कामगार भुयारी गटार साफ करणार शक्यच नाही साहेब जसे वनवारी साहेब बोलले की, गटारी त्यांच्याकडुन साफ होत नाही तर ऐवढे मोठे भुयारी गटारे ते कसे काय साफ करणार? माझी सभागृहाला

विनंती आहे की, आपण तिकडे आपण आणखी माणसांची नेमणूक करावी एक एक तक्रारीला चार चार दिवस लागतात काय उपयोग आहे साहेब तुमचा मला सांगा ना. माझ्या सोबत घडलेली गोष्ट आहे. शनिवार तक्रार केली गुरूवारी तुमची गाडी येते तोपर्यंत लोक सहन करणार आहात का? त्यांचे उत्तर आम्हाला दयावे लागत तुमच्या सारख माणंसाना नाही दयावे लागत. तुम्ही रस्त्यावर उतरत नाही आम्ही रस्त्यावर उतरतो कारण आम्ही लोकप्रतिनिधी आहे तिकडचे हि नाचक्की तुमची आहे. मॅडम ही खरोखर गोष्ट आहे की, एक नगरसेवक जेव्हा तक्रार करतो त्याची तक्रार चार दिवसानंतर पूर्ण होते. हि फार शरमनाक गोष्ट आहे. लोकांना उत्तर आम्हाला दयावे लागते यांना दयावे लागत नाही. माझी अशी विनंती आहे की, आताच काय निर्णय असेल तो घ्यावा आणि कर्मचारी वाढवावे इथे. त्यांना पगार मिळत नाही तर कसे काम करणार ते लोक.

**सदस्या श्रीमती कविता पंजाबी** :— मा. महापौरजी, आयुक्त साहेब माझे ही हेच म्हणणे आहे की, पूर्ण उल्हासनगर मध्ये ही फार मोठी समस्या आहे की, संपूर्ण गटर भरलेले आहेत आणि आम्ही स्वत: असमर्थ समजतो आणि लोकांना समोर आम्ही लाजिरवाणे सारखे वाटते की आम्ही त्यांच्या तक्रारीचे समाधान करू शकत नाही त्यांची गटर किंवा आणखी इरत समस्या. तर आपल्याकडुन अपेक्षा करीते की, या विषयावर लक्ष केंद्रीत करावे आणि हा मुद्दा लवकरात लवकर निकाली काढावा. धन्यवाद!

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे** :— मा. महापौरजी, सर्व सदस्यांनी जे आपल्याला जे सांगितले आयुक्त साहेब जी स्थिती आहे ती अत्यंत गंभीर आहे. ड्रेनेजच्या गाडया आपल्याकडे चार कार्यरत आहेत. त्यातली एखादी खराब असते.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १६/४/२०१८ (त्यात २/५/२०१८, २८/५/२०१८ व ४/७/२०१८) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** मागील सभेचे दिनांक दिनांक १६/४/२०१८ (त्यात २/५/२०१८, २८/५/२०१८ व ४/७/२०१८) रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. २ :—** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १६/४/२०१८ (त्यात २/५/२०१८, २८/५/२०१८ व ४/७/२०१८) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. राजेश वदारिया

**महासभा ठराव क्र. २९ अ** **दिनांक : १९/१०/२०१८**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक १६/४/२०१८ (त्यात २/५/२०१८, २८/५/२०१८ व ४/७/२०१८) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते १०४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ३:–** श्री. किशोर एल. तलरेजा, लिपिक यांना वैदयकिय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

————————————————————————————————

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :–** श्री. किशोर एल. तलरेजा, लिपिक यांना वैदयकिय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

श्री. किशोर ल. तलरेजा, लिपिक, यांना त्यांच्या पत्नीच्या वैदयकिय उपचारासाठी बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई येथील खाजगी रुग्णालयात दिनांक १४/४/२०१६ ते दिनांक १७/४/२०१६ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये १,००,६२५/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी ३/९/२०१६ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. फोर्टीज हॉस्पिटल, कल्याण हे शासन मान्यता नाहि. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ९५ टक्के व ९० टक्के अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) ह्रदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक ह्रदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॅस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, श्री. किशोर ल. तलरेजा, लिपिक यांच्या पत्नीचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार—अ.क्र १ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,००,४३५/— इतका मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणत येत आहे.

**महासभा ठराव क्र: ३०** **दिनांक:— १९/१०/२०१८**

सूचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. किशोर एल. तलरेजा, लिपिक यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,००,४३५/— इतकी रक्कम नियमाप्रमाणे वैदयकीय प्रतिपूर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

## सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :—** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये सुधारीत मंजूर विकास आराखडयातील एम ५, एसएम ३ हा २४ मी रुंद रस्ता वगळण्याबाबत किरकोळ फेरबदल करण्यास मान्यता देणे.

---

**सदस्या श्रीमती ज्योत्स्ना जाधव :—**मा. महापौर, मा. उप—महापौर साहेब व आयुक्त साहेब, मा. महापौर व मा. आयुक्त साहेब यांचा पदभार सांभाळल्या नंतरची हि पहिलीच महासभा आहे. त्याबाद्दल त्यांचे अभिनंदन तसेच या कार्यकाल मध्ये शहरामध्ये कुठल्याही नागरीकाचे नुकसान होणार नाही असा चांगला संदेश शहरामध्ये असावा अशी मी अपेक्षा ठेवते. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, मी या महासभेमध्ये पॉईट ऑफ ऑर्डर मध्ये मला बोलायचे आहे महापौर मॅडम, आयुक्त साहेब उल्हासनगर ४ मध्ये विनस टाकी ते छत्रपती शाहु महाराज उड्डाण पुल, पुलापर्यंत एमएमआरडी मार्फत ८० फुट रस्ता पास झाला असुन त्याचे काम सुरू आहे. या रस्त्यामध्ये काही घरे व दोन इमारती सुवर्ण संकेत व न्यु शिवम सोसायटी या इमारतींना १५ फुटाची मार्कीग दिल्याकारणाने त्यातील वीस ते पंचवीस परिवार रस्त्यावर येणार आहे. ऐवढेच नसून त्या सोसायटया पंचवीस ते तीस वर्षे जुन्या असल्याकारणाने त्या सोसायटयांचे तोडकाम चालु असतांना कुठलाही प्रकारचा हादरा बसला तर या इमारती कोसळून खाली पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. महापौर मॅडम कल्याण—अबंरनाथ रस्त्यामधील बाधित झालेले घरे व दुकान यांना दोन वर्षापासुन आतापर्यंत यांना कुठल्याही प्रकारची पर्यायी जागा दिलेली नाही. अस असतांना विनस टॉकीज ते छत्रपती शाहु महाराज उड्डाण पुल रस्त्यामधील रहिवाशी यांची घरे व इमारतीचे नुकसान होणार आहे. त्यांचे पुर्नवसन व इतर बाधित होणा—या घरांची पुर्नवसनाची कुठल्याही प्रकारची सोय आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेने केलेली नसतांना तेथील राहणा—या नागरिकांना नोटीस देण्यात आलेली आहे. महापौर मॅडम व आयुक्त साहेब विनस टॉकीज ते छत्रपती शाहु महाराज उड्डाण पुल हा जो रस्ता आहे तो कल्याण—अंबरनाथ रस्त्याला जोडणारा रस्ता आहे. या रस्त्यातील काही घरे व दोन इमारती मोडकळीस आणून रस्ता रूंदीकरणाचा तो उद्देश आहे तो सफल होउ शकत नाही. कारण तीन नंबर ओटी सेक्शन ते कल्याण—अंबरनाथ रस्त्याल्या जोडणारा हा रस्ता असून तीन नंबर ओटी सेक्शन याठिकाणी दाट वस्ती असल्यामुळे सध्यातरी हा रस्ता मोठा होउ शकत नाही. यामुळे मागील लाल चक्की याठिकाणाचे फक्त दोन इमारती तोडून आपला रस्ता रूंदीकरणाचा उद्देश तो सफल होत नाही. त्याचप्रमाणे नविन डीपी प्लॅन प्रमाणे विनस टॉकी ते कल्याण—अंबरनाथला जोडणारा रस्ता हा १०० फुट आहे. म्हणजे पुढे चालुन पुन्हा नागरीकांचे नुकसान होणार आहे. परंतु या शहराला क्लस्टर योजने मध्ये आणण्यासाठी शासनाच्या धोरणेप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेने क्लस्टर योजनेचा ठराव पारीत करून तो ठराव शासनाकडे पाठविलेला आहे. यामागे उद्देश एकच होते की, शहरातील सर्व नागरीकांना न्याय मिळावा रस्ता रूंदीकरणात घरे बाधित होणा—या लोकांना घरे मिळावी रस्ते व सुखसोई मिळावे हया हेतुने क्लस्टर योजना ठराव पारीत केलेला आहे. जर का आता यावेळेस लोकांचे नुकसान झाले, लोकांची घरे तोडून त्यांना रस्त्यांवर आणून ठेवलास त्यांच्यावर अन्याय होईल. तर काही लोकांना आत्महत्या देखील करावी लागेल. कारण आपला रस्ता रूंदीकरणाचा उद्देश पूर्ण होत नसल्यामुळे ज्या सध्या स्थितीमध्ये रस्ता आहे त्या

स्थितीमध्ये सिमेंटकॉंक्रिटचा रस्ता बनविण्यात यावा असे पत्र एमएमआरडी ला महासभेच्या परवानगी मार्फत व मा. महापौर व मा. आयुक्त साहेब यांच्या मार्फत एक पत्र देण्यात यावे जेणे करून नागरीकांचे नुकसान नव्हता रस्ता बनविण्यात येईल. माझी महासभेला, मा. महापौर, मा. आयुक्त यांना नम्र विंनती आहे की, याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा. धन्यवाद!

**सदस्य श्री. सुमित सोनकांबळे** :— मा. महापौर मॅडम, हा जो विषय आहे हा फार गंभीर विषय आहे. कारण की मागच्या वेळेस देखील दोन वेळा या रस्त्याची कटींग झालेली आहे. आणि त्या इमारतीत राहणारे जी काही रहिवाशी आहेत ते मागील पंचवीस वर्षापासून त्या इमारतीत राहत आहेत. ज्या दोन इमारती हयावेळे रस्ता रूंदीकरणात जाणार आहे. आणि ते सर्व नागरिक अत्यंत परेशान आहेत की हा जो रस्ता आहे तो ८० फुटाचा आहे जो रस्ता ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत जर तो सिमेंटकॉंक्रिटचा बनविण्यात यावा अशी तेथील सर्व रहिवाशांची मागणी आहे. तरी आपण या विषयांवर गांभीर्याने विचार करून जे आपल्याला उचित वाटेत ते आपण विचार पूर्वक करावे. त्यावर हि सदरची लक्षवेधी.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी** :— मा. महापौरजी, उप—महापौरजी, आमचे सदस्य श्रीम. जाधव मॅडम यांनी हा जो रस्ता रूंदीकरणाचा विषय घेतला आहे. जो जुना डीपी आहे १९७४ चा त्यामध्ये ८० फुटाचा रस्ता आहे. आणि नविन डीपी आला त्यामध्ये १०० फुटाचा रस्ता आहे. माझी अशी विनंती आहे की, नगररचनाकार साहेबांना यासंदर्भात काय माहिती आहे ते त्यांनी सांगितले चांगले राहील.

**श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार** :— जुन्या डीपी मध्ये जे रोड दाखविण्यात आलेले आहेत. आता हे टेंडर काढलेले होते बांधकाम विभागाने आम्ही फक्त तेथे मार्किंग दयायचे काम केलेले आहे. आज सकाळी देखील आयुक्त साहेब यांच्या सोबत बैठक झाली रोडच्या संदर्भातच उल्हासनगर स्टेशन वरून जो रोड येतो तो काही ठिकाणी ६० फुट आहे मला वाटत सुर्वे साहेबांच्या वार्ड मधला आहे. आयुक्त साहेबांचे म्हणणे असच पडल की.....

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी** :— हा जो रोड आहे यांची जी चर्चा चालेली आहे तो विनस चौक ते लालचक्की, लालचक्की ते ओटी सेक्शन मार्गे कल्याण—अंबरनाथ रोड, राधास्वामी संत्संग त्या हया रस्त्याची चर्चा चालु आहे. तो रस्ता जुना डीपीमध्ये किती होता आणि नविन डीपीमध्ये किती आता. जर नव्या डिपी मध्ये तो १०० फुट असले आणि जुन्या डीपी मध्ये ८० फुट असेल आणि आता ८० फुटाप्रमाणे तुम्ही आता काम केले, डिमॉलिशेन केल आणि नंतर तो १०० फुटाचा होणार असेल आणि परत त्यांना डिमॉलिशेन करावे लागणार असेल पहिल्या दोन वेळा डिमॉलिशेन झाले हे तिस—या आणि परत चौथ्या वेळेला तर त्या लोकांवर तो अन्याय आहे. आणि तो रस्ता तिथेच येउन जर आपण तेवढया पुरताच आपण डीपी मध्ये करणार असून आणि पुढचा रस्ता तेवढाच तसा छोटा असेल तर त्या लोकांना आपण बाधित करून काय मिळवणार आहे. आणि पुढच्या लोकांना तसेच ठेवणार आहे तर त्यां लोकांवर अन्याय केला असे होईल तरी तुम्ही पध्दतशीर प्रमाणे जर तो डीपी करायचा असेल १०० फुटाचा तर तो सरसगट १०० फुटाची करण्याची मार्किंग दया नविन डीपी प्रमाणे १०० फुटाचा करा सर्वांना न्याय हा एक असला पाहिजे या महापालिके मध्ये वेगळे वेगळे न्याय देण्याचा प्रयत्न करू नका. आणि नसेल तर तो १०० फुटचा जेव्हा कराल कधी तेव्हा तो रस्ता १०० फुटचा करा. म्हणजे ते लोक बाधित होणार नाही त्यांना बेघर होण्याची पाळी येणार नाही.

**श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार** :— प्रश्न असा आहे की, जेव्हा हा डीपी २६ खाली प्रसिध्द केला तेव्हा त्याला महासभेने मंजुरी दिली. त्यावेळेला हि चर्चा होउन किंवा त्याच्यावर सुधारणा होणे आवश्यक होते. परंतु आता शासनाने ते मंजूर केलेले आहे त्यामुळे त्याप्रमाणेच जावे लागेल जर त्यात काही बदल करायचा असेल तर आपल्याला ३७ ची कारवाई करावी लागेल.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी** :—त्यात आम्हाला बदल करायचा आहे तो आम्ही केला आहे. आम्ही या डीपीलाच रद्द करा म्हणुन ठराव केला आहे. तरी आपण त्या डीपी प्रमाणे काम करतो आहे. पण अशावेळेला जर आपण तसे काम करणार असाल तर त्यावेळेला तसे काम झाले पाहिजे. अगोदर ते काम करायचे आणि नंतर मग त्याचे परिणाम वाईट होतील ते नकरता तर अगोदर आपणे ते काम करा जसे त्यावेळेला ज्या ज्या वेळेला तसे काम करा. विषय हा रस्ता जरी असला तरी तुम्ही आज आत जो उल्लेख केला स्टेशन रोड स्टेशन रोड कधी संध्याकाळाचा वेळी अधिकारी, पदाधिकारी, महापौर, उप—महापौर, यांनी उल्हासनगर स्टेशन वरून मराठा सेक्शन कडे पायी चालत जाउ दाखवावे अशी परिस्थिती असतांना त्या रस्त्याचे रूंदीकरण केले नियमाप्रमाणे कायदयाप्रमाणे तर हरकत नाही. तिथे गरज आहे पण इथे गरज नसतांना हयांना पहिले काम करायचे त्यांना उध्दवस्त करायचे आणि जिथे गरज आहे तिथे मात्र लोकांना त्रास देण्याचा प्रयत्न महापालिकेच्या माध्यमातून करायचे हे चुकीचे आहे.

**सदस्य श्री. धंनजय बोडारे :—** आयुक्त साहेब, ऐकतो साहेब, देहरकर साहेब

**श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार** :— माफ करा, माफ करा.

**सदस्य श्री. धंनजय बोडारे :—** मी आयुक्त साहेब बोलतो त्यामुळे तुम्ही ऐकता आहे हेच जाणीव नाही तुम्हाला इथे बसल्यानंतर आयुक्त झाले मला वाटले आयुक्त आता तितकडे आहेत. ज्योत्स्ना ताई जाधव यांनी एक विषय आणला आहे. मला वाटते अगोदरच्या डीपीमध्ये होता तेवढा एमएमआरडीने मंजुर केला नतरच्या डीपीमध्ये मोठा झाला बरोबर ना. ८० फुट हाता तो १०० फुट झाला. आणि मग आपण मागच्या जो निधी आला होता तो ८० फुटा करीता आला होता. आयुक्तांनी मागच्या वेळेस स्पष्ट सांगितले आहे की, डीपी पेक्षा आपण वाढवू शकत नाही डीपी पेक्षा कमी करू शकतो. बरोबर आहे ना. आता आमच्या ज्योस्त्ना ताई मॅडम यांनी विषय आणलेला आहे की, त्याठिकाणी गुरूद्वारा तो खालचा पोरशन गुरूद्वारा ते पुल, ब्रिज इथपर्यंत दोन्ही बाजूला इमारती आहेत. इमारती मध्ये झालेल्या विस्थापीतांचे पुर्नवसन कसे करणार असा हा प्रश्न आहे. सध्या कल्याण—अंबरनाथ रोड आमच्याकडे तसेच पडला आहे. कारण पुर्नवसन आम्ही करू शकत नाही. २३ लोकांन करीता तो रोड गेल्या तीन वर्षापासून ज्याचे तोडले ते तोडल लोक धुळ खातायेत तसा प्रकार तिथे होता कामा नये म्हणुन आणि त्यांनी भविष्यामध्ये क्लस्टर योजना आमच्या कडे आहे. त्याच्या बाजूने सुध्दा मधून एक रोड गेलेला आहे. तो ८० फुटाचा आहे. मधुनच एक गेलेला आहे. आणि आता जो अस्तित्वात असलेला रोड तो त्याला वगळण्यात आलेला आहे. बरोबर ना. त्यामुळे आम्ही वाढउ शकत नाही पण कमी करू शकतो म्हणुन त्याठिकाणी ऐवढया लोकांना विस्थापित न करता त्यांचे पर्नवसन करू शकत नाही म्हणुन विनस ते लालचक्की चौक इथपर्यंत ८० फुटाचा पुढे त्या लोकांचे बिल्डींग आहेत कुणाचे छोटे झोपडे असते, घरे असते तर ती गोष्ट वेगळी होती बिल्डींगमधील लोकांचे पुर्नवसन करता येणार नाही, तोडता येणार नाही त्यामुळे त्याठिकाणी आहे त्या स्थितीमध्ये आपण आपल्या बद्दल आपण आमची संमती देतो.

**श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार** :— कस आहे सर , हा प्रशासनाचा निर्णय आहे रस्ता, डीपी, विडथ प्रमाणे व्हायला पहिजे अस आपेक्षित आहे की, डीपी मध्ये जी लेथ झाली आहे ती कमी नाही करता येणार तेवढी म्हणजे डीपी रोड ची विडथ आहे १०० फुट असेल, ८० फुट असेल किंवा ४० फुट असेल त्याच्याप्रमाणे .....

**सदस्य श्री. धंनजय बोडारे :—**मागच्या प्रशासनाचा विरोधही होता की, प्रशासनाच्या नुसार आपण डीपी च्या पेक्षा वाढउ शकत नाही पण डीपी पेक्षा कमी करू शकतो. कारण फंडस ॲव्हेबिलीटी बरोबर ना. तर इथे आम्ही करू शकतो ना जर १०० चा ८० करू शकतो तर ८० चा तिथे सध्या कारण क्लस्टर योजना आम्ही राबवणार आहे. राबवयाची की नाही ते तुम्ही सांगा. नसेल तर सांगा भविष्यात आम्ही कधीच क्लस्टर योजना राबवणार नाही. आम्ही आता मंजुरी देतो ते तुम्ही ठामपणे सांगा की, क्लस्टर योजना येणार नाही म्हणजे जसे आता चौधरी यांनी सांगितले की, जो डीपी आहे तो बरोबर नाही. एकतर सांगा आम्हाला क्लस्टर योजना करणार आहे किंवा नाही का तेथून मधूनच एक रोड गेलेला आहे. तुम्हाला माहित असेल सावरकर चौकाकडे आलेला आहे तो जवळपास ८० फुट आहे.

**श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार** :— कसे आहे ना सर, की अजून

**सदस्य श्री. धंनजय बोडारे :—**म्हणुन बी प्रक्टीकल, फक्त कायदा किंवा याचानुसार चालणार नाही जर का आपल्याला भविष्यात क्लस्टर योजना राबवायची सगळे रस्ते विकसीत करायचे तो मधला सावरकर चौक येथील ८० फुटाचा करायचा आहे. आहे तो रस्ता. लोकांचे नुकसान न करता कारण आम्ही पुर्नवसन त्यांचे करू शकत नाही. त्यांना मोबदला देउ शकत नाही. कुठे ठेउ शकत नाही म्हणुन त्यांची जी सुचना आहे वाटल्यास तर पुढच्या वेळेस प्रशासनावर अशासकीय प्रस्ताव आम्ही आणतो. तोपर्यंत

**श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार** :— आपण या विषयांवर आयुक्त साहेबाशी बोलतो त्याच्यावरून काही सकारात्मक

**सदस्य श्री. धंनजय बोडारे :—**होय

**श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार** :— त्याच्यावरून काही सकारात्मक निर्णय तुमच्या भावना लक्षात घेउन येत्या वेळी चर्चा करू.

**सदस्य श्री. धंनजय बोडारे :—**सकारात्मक निर्णय मिळेल अशी अपेक्षा करतो. धन्यवाद!

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** मा. महापौर, आज पहिली महासभा संबोधित करीत आहेत आणि जर मी पहिल्या वेळी बोलेले नसतो तर तेही चांगले वाटले नसते. त्यामुळे आपले स्वागत आहे, आयुक्त साहेबांचे सुध्दा स्वागत आहे, हा जो विषय आहे, मा. महापौरजी टी.पी साहेब आपला नकाशा जर का रद्द झालेला आहे, असे जर का आपण महासभेने ठरवले आहे. मग त्याच्यामध्ये आता बदलाव करण्याचा ठराव येतो कसा? आणि जर का एकाच विषयावर पुन्हा पुन्हा चर्चा करून तो डी.पी रद्द झालेला आहे किंवा नाही झालेला आहे, याचा खुलासा केलेला नाही आणि त्याच्यामध्ये हा प्रस्ताव आपल्याकडून इथपर्यंत आलेला आहे. मला वाटते कीं महासभेला काही तरी चुकीची किंवा संभ्रमीत माहिती देण्याची प्रथा महापौरजी कधी असे तर नाही केले पाहिजे की हे काय झाले? कारण की ही चुकीची प्रथा परत चालू केली आहे. आपण आणि आम्ही सर्वानी मिळून या महासभा मध्ये ज्या डी.पी ला रद्द करण्याचा प्रस्ताव पारीत केला होता. जर डी.पी रद्द आहे, तर त्याच्यावरती अमंलबजावणी कशी काय? या ठिकाणी कोणत्याही विषयाचा निर्णय चर्चा न होता पास पास करा, हा रस्ता कोणत्या ठिकाणाचा आहे? का आणला गेला आहे? जर हा रस्ता आणला गेला आहे, जर हे करायचे असेल तर शहरामध्ये असे कितीतरी रस्ते आहेत? महापौरजी की स्लम एरियामध्ये डी.पी मध्ये रस्ते बनविण्याचे आखण्यात आले आहेत. काही काही वस्त्या वस्त्या उध्वस्त होणार आहेत. आम्ही कोणाच्या विरोधात नाही आहेत, शहर विकासाच्या विरोधात नाही, परंतु शहर विकास करीत असताना जर एकाच ठिकाणी आपण जर लक्ष दिले तर हे कसे काय चालणार? महापौरजी हे जे एम.५, एस.एम.३, २४ मीटर रस्त्या विषयी हा जो विषय आला आहे. हा एक कंपनीचा विषय आहे, त्या कंपनीने दोन वेळा ज्या वेळी डी.पी. फायनल केला जात होता, तेव्हा दोन वेळा त्यांनी आपआपल्या मधील क्षेत्रामध्ये दोन वेळा दुरूस्ती करून घेतलेले आहे.आणि परत जेव्हा हरकत घेण्याचा जेव्हा वेळ होती तेव्हा सुध्दा नाही केले आणि आता त्यांना कळाले की, काम धेक्यात येवू शकते आणि हा रोड कमी केला पाहिजे. जर आपला डी.पी. च नाही आहे, मंजूर डी.पी. नाही आहे किंवा आहे तर या सभागृहाला सांगण्यात यावे. की डी.पी. मंजूर आहे तर हे सर्व विषय घेण्यात यावते. आपल्या कारकीर्दीत सर्व विषय घेण्यात यावेत. की ज्या ज्या वस्त्यांवरून नवीन नवीन रस्ते टाकण्यात आले आहे. इमारतीवरून नवीन नवीन रोड टाकण्यात आले आहेत, मॅडम, हे सुध्दा सर्व रोड काढून टाकण्यात यावेत. महापौरजी आपण एका बाजूने न्याय आणि एका बाजूने अन्याय करू शकणार नाही. या सर्व वस्त्यांमधील लोक महासभेत येणार नाहीत, की आमच्या घरावरती रोड आहे तो काढून टाका म्हणून. ही गरीब लोकवस्ती आहे ते येणार नाहीत. परंतु जर डी.पी. च नाही आहे तर डी.पी वरती आज हा प्रस्ताव आणला जात असेल, तर आपण या शहराला सांगू शकतो की हा डी.पी. रद्द आहे किंवा मंजूर आहे. साहेब सांगा की डी.पी. मंजूर आहे की मान्य आहे? रद्द असेल तर तुम्ही हा विषय आणू शकत नाही, आणि असेल तर सगळे विषय घ्या. सांगा.

**नगररचनाकार, श्री.मिलिंद सोनावणे:—** हो एम.आर.टी.पी. ॲक्ट नुसार डी.पी. मंजूरी करण्याचे अधिकार शासनाचे आहेत.

**सदस्य, श्री. घनंजय बोडारेः—** आवाज....

**नगररचनाकार, श्री.मिलिंद सोनावणेः—** एम.आर.टी.पी ॲक्टनुसार मंजूरीचे अधिकार डी.पी. चे हे शासनाला आहेत जेव्हा हा डी.पी. पब्लीश झाला, तेव्हा याच महासभेने त्याला मंजूरी दिली. त्याच्यानंतर त्याच्यावर पुढील कार्यवाही झाली. आणि त्या खाली आपण सबमीट केला.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** नाही नाही चूकीची माहिती देत आहेत, आम्ही त्यात बदल करून दिलेला आहे. शासनाने तिकडे जे जे बिल्डर गेले, त्यांच्याकडून काय व्यवहार केले? आणि मग डी.पी बनविला. हे चूकीचे उत्तर देत आहेत तुम्ही. तुम्हाला माहिती नसेल तर चूकीचे उत्तर देवू नका आम्ही बदल केले आहेत. आम्ही ८० फुट रस्ता राहिला पाहिजे, जो रिंगरूट आहे तो १२० फुटांचा आहे तो ८० फुट केला पाहिजे. तो त्या डीपी मध्ये झाला आहे का? ते सांगा.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** सोनवणे साहेब, आपण जी माहिती देत आहेत, ती माहीती देण्याची तुमची जी पध्दत आहे, त्यामध्ये थोडी सुधारणा करण्याची गरज आहे. कसे की आम्ही सेंक्शन २६ मध्ये काय मंजूर केले, सेक्शन २८ मध्ये काय झाले? सेक्शन ३० मध्ये काय झाले? हे जरा सविस्तरपण सांगण्यात यावे.

**नगररचनाकार, श्री.मिलिंद सोनावणेः—** आपले बोलणे ऐकल्यानंतर च शासनाने दिनांक २१/०४/१७ मध्ये त्याला भागशः मंजूरी दिली आणि ती मंजूरी आता आज ही कायम आहे, मागच्या महासभेमध्ये तो आपण रद्द करायचा प्रस्ताव पाठवला होता शासनाकडे. शासनाने अजूनही त्याला होय किंवा नाही निर्णय दिलेला नाही. त्यामुळे जो शासनाने डी.पी. २१/०४/१७ ला भागशः मंजूर केला आहे, तो आज फोर्स मध्ये आहे. कारण त्याच्या मध्ये मागच्या आठवडयामध्ये जो इपीक भाग होता, त्याच्या बद्दलची बैठक लावली होती, मंजूर करण्यासाठी.म्हणजे डी.पी. पूर्ण सेंक्शन होईल, त्यामुळे आपण आज असे म्हणू शकत नाही की, आपण प्रस्ताव पाठविला आहे. त्याला शासनाने अजून कारण मंजूरी देण्याचे अधिकार हे शासनाचे आहेत. आपण प्रस्ताव पाठवू शकतो, की नाही म्हणायचे हे शासनाने ठरवायचे, त्यांनी अजूनही याला मान्यता दिलेली नाही. त्यामुळे हा जेव्हा डी.पी. भागशः मंजूर झाला त्यांच्यामध्ये एम ५, एस एम ३, हा ८० फुट रस्ता आज मंजूर आहे आणि त्याच्यावर....

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** महापौरजी बघा खुलासा बघा, जर महासभेने प्रस्ताव पारीत करून शासनाककडे पाठविला आहे तर त्याचे अजून पर्यत काहीच उत्तर/निर्णय झालेले नाही आणि हीच महासभा त्याच प्लॉन वरती डी.पी. बद्दल करण्यासाठी जर प्रस्ताव आणत असेल तर त्या प्रस्तावाचे काय? जो निर्णय रदद करण्याचे ठरविले होते, त्यामुळे असे प्रस्ताव महासभे मध्ये घेवून का येतात? जो पर्यंत त्याचा निर्णय होत नाही. जर का तो शासनाकडे प्रलंबित आहे, तर शासनाचा निर्णय जो पर्यंत येत नाही, तो पर्यंत हे प्रस्ताव आला नाही पाहिजे. माझे असे म्हणणे आहे की, नाही तर तूम्ही मंजूर आहे डी. पी. असे सांगां. आणि एक वेळा तुम्ही विषेश महासभा बोलवा, की जे जे रस्त्यांने बाधीत होणारी घरे आहेत, जे नवीन नवीन रस्ते आहेत. त्याच्यावर लोकांच्या ज्या आता हाल अपेष्ठा होणार आहेत, त्यांना पण घ्या, आणि एक विषेश महासभा बोलावून ते पण क्लिअर करा. आपण साहेब काय होते? आपण शासनाकडे बाजू दाखवतात.शासनाने मुंजूर केलेले आहे, शासनाने पाठविलेले आहे. आम्ही इ.पी. वर प्रस्ताव केलेला आहे. इ.पी. डी.पी. सगळे बघितले आहेत, सूचना वैगेरे झाले हे सगळे माहिती आहे. परंतु आम्ही ज्या सूचना दिल्या होत्या, आम्ही ज्या दुरूस्त्या केल्या होत्या या महासभेने जी दुरूस्ती केले होती. ती दुरूस्ती शासनाने केली नाही. शासनाने आहे तसाच नकाशा इकडे पाठवून दिला, त्यांच्या मर्जीप्रमाणे, म्हणून या महासभेमध्ये नव्याने चर्चा झाली आणि त्यामध्ये मुददे सांगून सगळयानी उपस्थित केले, की कोणाच्या घरावरून तर कोणा इमारतीवरून रस्ता जात आहे. चौकातील बरचशी काही दुकाने कटींग होत

आहेत. ग्रीन झोन, आर झोन झाला आहे. आर झोन ला ग्रीन झोन मध्ये कनवर्ट करण्यात आले आहे. काही जागेवरती जूने जूने जे बॅरेक आहेत ते बेघर होत आहेत. त्यावेळी हया डी.पी. ला रदद करण्यासाठी शहरामधून मोर्चे, काढण्यात आले, तसेच भरपूर उपोषणे सुध्दा करण्यात आली.त्याच्यानंतर डी.पी. रदद् केला गेला आणि महासभाने मंजूरी दिलेली आहे. जर डी.पी. रदद् आहे, याच महासभेने मंजूरी दिली आहे. तर आज हा विषय कसा काय? महापौरजी हे काय होत आहे? जर याच विषयामध्ये डी.पी. रदद् करण्याचे ठराव याच महासभेने दिलेले आहे, तर याच महासभेमध्ये दुरूस्ती चा विषय कसा? साहेब तूम्ही शासनाची बाजू घेवून तो डी.पी. कसा मंजूर केला आहे? ते सांगत असाल तर ते माला मान्य नाही. कारण हा डी.पी. रदद् करण्यासाठी आम्ही ठराव केलेला आहे. हे मला मान्य आहे, हे सगळया सभागृहाला सांगायचे आहे.

**<u>नगररचनाकार, श्री.मिलिंद सोनावणे:—</u>** मी आधीही सांगितलेले आहे. ॲक्टनुसार प्रोव्हिजन आहे, आपण प्रस्ताव सादर करू शकतो. मंजूरी देण्याचे अधिकार आहेत ते शासनाला आहेत आणि शासनाने दिनांक २१/०४/१७ तो पार्टली पास केलेला आहे. त्याच्यामुळे प्रस्ताव तूम्ही पाठवलेला आहे, तात्कालीन महापौरांनी हे सगळे विषय घेतले त्याच्यामध्ये हाही विषय आहे. आयुक्तांनी सुध्दा त्यांच्या सुचना शासनाकडे पाठविल्या, त्याच्यामध्ये अजूनही काही दुरूस्ती झालेली नाही. अजून ते शासनाकडे पडलेले आहे. पण जो पर्यंत शासन हया ठरावास मान्यता देत नाही, हा आम्ही रदद् करत आहोत, तो पर्यंत हेच सुरू राहील.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** जर असे असेल महापौर महोदया, या विषयावरती साहेब जर असे उत्तरे देत असतील तर सर्व सदस्यांनी कृपया ऐकावे. सर्व लोकांच्या वार्डमध्ये या पूर्ण शहरामध्ये पूर्ण शहराची हया डी.पी. मुळे शांतता भंग पावली आहे, हया सर्व लोकांनी मान्य केलेले आहे, महापौरजी, आपण सुध्दा मान्य केले होते आज जर लहान सहान प्रस्ताव आणून चालना देवून हा डी.पी. मंजूर करून ठेवला, किंवा त्यास या महासभेमध्ये मंजूरी दिली जाईल. तर महापौरजी हा जो डी.पी पास केला आहे तो कधीच रदद् होणार नाही. जर ते रदद आहे तर त्याचे नंतर इम्पीमेटेशन होणार नाही जो पर्यंत शासनाचे मार्फत कोणताही ठोस निर्णय येत नाही. महापौरजी मी आपणास विनंती करतो की या शहरामध्ये आपण न्याय देवता आहेत, आपण कोणा एकाला न्याय देण्यामुळे शहरामध्ये दुसरा गरीब माणूस मरू नये या शहरामध्ये, याची काळजी चांगल्या प्रकाप्र असायला पाहिजे. मा. महापौरजी जर हा विषय आज या ठिकाणी मंजूर होतो तर मोठया माणसाचे काम होते आणि लहान गरीब माणूस मरतो, हे संकेत बाहेर जाईल. जर सर्वांचे काम करायचे असेल सर्वांची साथ आणि सर्वाचा विकास हा नारा आहे तर आज डी.पी. जो मंजूर नाही आहे आणि नामंजूर आहे, महापौरजी, तर हा विषय महापौरजी रदद् करण्यात यावा. ही माझी आपणास विनंती आहे. माझी आपल्या कडे एक मागणी/ दरखास्त करत आहे, की यामहासभेने जो रदद् करण्याचा जो ठराव केला आहे. जो पर्यंत त्याचा निर्णय होत नाही तो पर्यंत या विषयास रदद् करण्यात यावा महापौरजी, धन्यवाद.

**<u>सदस्या, श्रीमती अर्चना करणकाळे:—</u>** मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, ज्या प्रमाणे हा प्रस्ताव आलेला आहे २४ मीटर सेंच्युरी रेयॉन पासून हा रस्ता काढण्यात येतो, भरपूर कामगाार बेघर करण्यात येत आहेत, हा रस्ता रदद् करण्याचा प्रस्ताव याला आमची मान्यता आहे की प्रस्ताव रदद् करण्यात यावा. परंतु त्याच बरोबर काही वस्तीमध्ये रस्ता नसतानाही तिथे ते रस्ते टाकलेले आहेत ते रदद् करण्यात यावेत. आरक्षण क्रमांक ७, ८ तिथेही ३० मीटरचा रस्ता तिथे अजून रस्ता ही नाही परंतु त्या ज्या एका बिल्डरसाठी रस्ता हा शहरामध्ये येत आहे, तो ही रदद् करण्यात यावा हीच माझी नम्र विनंती आहे. तसेच शहरामध्ये जिथे वस्त्या आहेत, वस्त्यामधून रस्ते येत आहेत, ते रस्ते रदद् करावेत मा.महापौर मॅडम यांनी याच्यामध्ये चांगले लक्ष देवून गरीब लोकांना न्याय दयावा हीच माझी आपणांस विनंती राहील.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** महापौर महोदया, आयूक्त साहेब, यांनी जो मुदद्ा उपस्थित केला, एकदम शंभर टक्के बरोबर आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या उल्हासनगर मधील लोकांची एवढी घोर निराशा केली आहे, एवढी फसवणूक केलेली आहे शासनाने, सेफ कंपनीने तयार केला तेव्हाही आरोप तेच होते, त्यानंतर प्रशासनाने सागितले तूम्ही महासभा तयार करा, कमिटी बसेल सुचना आणि हरकती येतील, त्यानंतर सुचना व हरकतीवर आपण महासभा निश्‍चित करेल, तो प्रस्ताव शासन विचार करेल आणि

शासन विचार करून जो महासभेचा असेल त्याला जास्तीत जास्त मंजूरी मिळेल. असे तत्कालीन आयुक्तांनी, तत्कालीन टाऊन प्लॅनर यांनी सागितले होते..दुर्देवाने वस्तुस्थिती एकदम चूकीची झाली. सांगितले एक आणि झाले वेगळे, इथे ज्यांना पाहिजे होते ते मंजूर करून घेतले, आणि सर्व सामान्य लोकांच्या घरावंर वरवंटा फिरवला. मग तो रिंगरोड च्या माध्यमातून असेल, तसे आता सांगितले की सुरेश जाधव यांच्या घराच्या समोरून तिथे ८० फुटाचा रोड, जिथे रोड नाही आहे तिथे रोड जिथे रोड आहे तो काढून टाकण्यात आला. मोठमोठया इमारती मधून ८० फुटांचे रोड काढले इमारतीवरून. आणि तो शासनाने मंजूर केला. आता शासनाने मंजूर केल्यानंतर आमच्या सत्ताधा—याची सुध्दा गळचेपी झाली. शासनाने मंजूर केल्यानंतर नाही कसे म्हणायचे. त्यामुळे अरूणजी आपण गैरसमजमध्ये आहे लोकांची फक्त दिशाभूल करण्याची आहे, फक्त भागश: मंजूर केला पार्टली काय? आपल्या हातात काय ठेवले आहे? पूर्णत: मंजूर केलेले आहे. कशाला थापा मारतात ? पार्टली मंजूर केलेला आहे, ई.पी. ठेवलेले आहे, एक्सक्युलेड पोरशन तो ही तिथे जाईल.तिथेच मंजूर होईल, तिथे पोचणार नाही. म्हणजे मंजूर झाला सरळ सांगा ना.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—</u>** मंजूर झालेला आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** तूम्ही पार्द्रली काय म्हणता? सरळ सांगा ना मंजूर झालेला आहे. पार्टली नाही मंजूर. दुर्देवाने ते मंजूर झालेले आहे आपल्या हातात काही नाही. तुमच्या उल्हासनगरकराच्या हातात काही ठेवलेले नाही. शासनाने त्यामंळे तुम्ही जे बोलता आहे की नाही हे असे असे आहे हे मंजूर झालेले आहे. बरोबर ना. तुम्हाला आम्हाला मान्य नाही उल्हासनगरच्या एकाही नागरीकाला मान्य नसताना शासनाने तो आमच्यावर लादलेला आहे. सभागृह नेताजी बरोबर आपल्याला मंजूर नाही आहे. पहिला विरोध केला होता. प्रदिपजी बरोबर आहे ना. परंतु नंतर आपण जबरदस्ती करत विरोधी पक्षाने बसलेल्यानी आम्ही विरोध केला. त्याचे समर्थन केले. ईच्छा नसताना सुध्दा. आता फक्त तुमच्या हातात ईपी आहे. ईपी मधले मी सांगतो काय होणार आहे?

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—</u>** ई.पी. मधले पण आपल्या हातात नाही. सजेशन ऑब्जेक्शन त्यांनी घतलेले आहे. आणि त्यांना शासनाला सादर केलेले आहे. आपल्या हातात त्याचे आता काही राहीलेले नाही.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** आपल्या हातात फक्त एवढेच आहे, हयाच्यावरती बोला हेच शासन आहे जो सुट बूटमध्ये जाईल त्यांचा इ.पी. चा एस.एम. होईल. नाही तर इ.पी. चे ठराव होवून जाईल.

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u>** पोहचल्यावर पूर्ण होईल.

**<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:—</u>** साहेब सर्व सामान्य नागरीकांची उल्हासनगर वासीयांची शासनाविषयी ही भवना आहे.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणे:—</u>** साहेब, २४३ आता मंजूर झालेलेच आहे आता आपण....

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** सांगांयचे तात्पर्य हे आहे की, जेव्हा मंजूर केला त्या सेफ कंपनीने आम्ही पहिल्या पासून सांगत होतो की प्रशासनाने त्याच्यावरती कारवाई करायला पाहिजे होती. की हा चूकीचा प्लॉन बनविलेला आहे. हा जो प्रस्ताव आलेला आहे त्या वेळेला सुध्दा चर्चा झालेली होती, की पहिल्या मीटींग पासून चर्चा झाली होती. की तो जो रस्ता गेलेला आहे. एम ५ किवा अे.५ चा आहे. तो त्या केमीकल प्लॉट वरून गेलेला आहे. कसा काय गेला? अक्षरश: केमीकल प्लांट त्या ठिकाणी येतो. उल्हासनगर मध्ये एकमेव असा प्लॉट आहे मला आठवते. मी सुध्दा सेंच्युरी रेयॉन फक्त एलबीटी भरताना जास्तीत जास्तीचा चेक सेंच्युरीचा येत होता. अडचण आली महानगरपालिकेच्या अधिका—याना की सेंच्युरी

च्या लोंकाना बोलवायचे आणि त्यांचा एलबीटी चा चेक घ्या, एडव्हान्स मध्ये. ५ ते ६ हजार कर्मचारी काम करतात त्या कंपनी उध्वस्त करण्यासाठी आता त्या सेफ्ट कंपनीने कुठल्याही एका प्रोजेक्टला फेवर करण्यासाठी तिथून रोड काढला होता. आणि तो रोड प्रोजेक्ट सक्सेस होण्याठी हा रोड तसाच ठेवला. जरी या ५ हजार लोकांनी ऑब्जेक्शन घेतले या महासभेने ऑब्जेक्शन घेतले तरी म्हणून आता मायनर मॉडीफिकेशन मध्ये आले. बरोबर ना. माझे या ठिकाणी म्हणणे आहे, की अशा प्रकारचे किती रोड येतील तुमच्याकडे? आज आमच्या सुनिल सुर्वेच्या वार्ड मधले त्यांनी रोड आणला मायनर मॉडीफिकेशन मध्ये. प्रशासनाने आज आता इथून पूढे हा एक प्रस्ताव आहे. इथून पुढे जेवढे नगरसेवक आणतींल तेवढे प्रशासनाच्या वतीने ते प्रस्ताव येवू दया. कारण ते तुम्हाला मान्य नाही आहे. नाही उतर तुम्ही सांगा की तो प्रस्ताव आम्ही पाठवलेला आहे. तो डेव्हलपमेंट प्लॉन केला आहे तो तुम्ही मंजूर केला आहे का? तुम्ही पाठविलेला आहे का? जबाबदारी तुम्ही घ्या. जर तुम्ही पाठवलेला आहे तर एम. ५० मधून केमिकल प्लांट वरून रोड गेला कसा? स्टेशनच्या बाजूला जो पंचायत हॉल आहे, अरूण आशानच्या वार्डमिध्ये ८० फुटाचा रोड आहे, तिथे १० बिल्डींग पुर्ण जात आहेत, जो रोड आहे, तो दाखवला नाही आणि जिथे नाही त्या बिल्डींग वरून रोड दाखवला आहे, हा तुम्ही केला आहे का? कबुल करा की, आम्ही केला आहे. नसेल तर मी सांगतो ते करा.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—</u>** आपल्याकडे ज्या हरकती आल्या, ज्या लोकांच्या भावना आहेत, ते शासनाला पाठवले आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** तेच सांगत आहे, रींग रोडचे काय करणार आहे? आम्हांला रींगरोड नको आहे. तो पहीला आला पाहीजे शहराची भावना काय आहे? सगळया महासभेने मंजूर केला की रींगरोडची आवश्यकता नाही तो का आला नाही? तोही घ्या, अरूण अशानचे काही प्रस्ताव असतील, सुर्वे साहेबांचे काही प्रस्ताव असतील, माझे प्रस्ताव असतील तोही घ्या. तुम्ही विचारले का उल्हासनगरमधल्या नागरीकांनी किती विरोध केला होता. तरी तो डी.पी. शासनाने आमच्या माथी मारला आहे. या उल्हासनगरच्या हातात काहीच ठेवलेले नाही आहे सोकाळ. त्यामुळे तुम्ही जे बोलताय की नाही हे हे मंजूर झालेले आहे. बरोबर ना तुम्हा आम्हाला मान्य नाही उल्हानगरच्या एकाही नागरीकाला मान्य नसताना शासनाने तो आमच्यावर लादलेला आहे. सभागृहनेताजी बरोबर आहे ना आपल्याला मंजूर नाही आहे ना.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणेः—</u>** साहेब मागच्या हयामध्ये जी चर्चा झाली होती त्याच्याप्रमाणे सगळे मुदद्‌े निबांळकर साहेब असताना आपण शासनाला पाठवले आहे. याच्यामध्ये अशा ज्या भावना आहेत, पण शेवटी निर्णय घेण्याचा अधिकार हा शासनाचा असल्या कारणाने आपण त्याच्यावर दोन तीन वेळा सांगितले परवाच्यादिवशी मंत्रालयात गेलो त्याच्यावर चर्चाही झाली. करवीर साहेबांना सी.एम. साहेबाकडे मीटींग होती....

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** साहेब जर का असे असेल? तर याच्या आगोदर मी प्रस्ताव पाठविलेला होता. जो पंचायत हॉलवरून रोड गेला तो आता विरोधी पक्ष नेत्यानी सांगितले. मग तो का नाही आला तुमच्याकडे? माझ्याकडे रिसीव कॉपी आहे तुमच्याकडे दिलेली. जर का तुम्ही एक रस्ता मला वाटते ज्या वेळेस एस. एम. फायनल झाले, त्यावेळेस सेंच्युरी कंपनीचे हे तीन मुदद्‌े होते. नाव घेवून सांगतो, त्या वेळेस त्यांनी दोन रदद्‌ करून घेतले, मग तिसरा का नाही घेतला? ऑब्जक्शन सजेसनमध्ये मग तिसरा का राहीला. त्यावेळी तो डी.पी. प्लान तो प्लान त्यामध्ये नव्हता का? आज कसा प्लान आला.आणि न प्लान बघता त्याच्यावर तूम्ही रोड कसा का मार्क केला? ही तुमची एस. एम. ची कॉपी आहे. हयाच्यामध्ये तुमचे

सिरीयल नंबर ४, एस. एम.४, एम. ६ तो रिक्लेशन ओपन भाग होता, तो इन्क्लूडेड आय झोन होता.तो आहे तो इंडस्ट्रीज झोन मध्ये इन्क्लूडेड करून घेतला.नंतर एस. एम. ६, एम. ८,याच्यामध्ये रिक्लेशन भाग होता. तो डिलीट करून घेतला, तो पण आय झोन करून घेतला, मग हा का नाही करून घेतला. आणि या आगोदर आम्ही जे प्रस्ताव तुमच्याकडे प्रस्ताव पाठविले, ते महासभेत का नाही आले? हा विषय कसा आला.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** जर एखादे चूकून राहिले असेल तर मी खात्री करून पाठवतो.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** बोलून हे केले, नाही चूकून नाही म्हणजे हा नकाशा मंजूर आहे. जी गोष्ट खरी आहे का?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** आहे, आहे.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** जर का हा नकाशा मंजूर असेल तर लोकांची दिशाभूल आणि फसवणूक केलेली आहे. या उल्हासनगरमध्ये हया सभागृहाने लोकांना फसवले आहे, जनतेला फसवलेले आहे. की ठराव फक्त नावापुरता इथे नामंजूर केला, आणि लोकांची दिशाभूल केलेली आहे. खरे म्हटले तर आज तर का ही गोष्ट लोकांना कळाली की टी.पी. मंजूर आहे आणि हया ठरावाचे काहीच अर्थ नाही. म्हणजे हा ठराव नामंजूर करण्याचा आज इथे उपापोह झाला हे सारासार खोटे होते. लोकांचा विश्वास हया सभागृहाने घोटलेला आहे. हया सभागृहामध्ये लोकांना आश्वासने दिली गेलेली आहेत की डीपी नामंजूर केला आहे, डीपी रदद् केला आहे. अशी गोष्ट दिसून आली होती. आज हाच डी.पी. मंजूर आहे. आणि डी.पी. जो नामंजूर झालेला आहे त्याची मोठ मोठी हेडलाईन आल्या की आम्ही सत्ताधारी पक्षाने डी.पी. नामंजूर केला आहे. आम्ही मुख्यमत्र्यांबरोबर बोलून हे केले, तर आज कुठे आहे? आज या जनतेला, या सभागृहाने फसवलेले आहे. अनधिकृतपणे डंपींग ग्राउंड चालू आहे. सत्ताधा—यांनी फसवलेले आहे. अनधिकृतपणे सगळया गोष्टी चालू आहेत आणि सत्ताधा—यानी जर का डी.पी. नामंजूर केला आहे. तर हा प्रस्ताव बारगळला आणि जर का डी.पी. मंजूर आहे तर सत्ताधा—यांनी याच्या पुढच्या उदया पासुनच्या रोषाला जनतेसमोर तयार व्हा. साहेब, ही जनता कोणाला माफ करणार नाही. आज बलाढय माणूस बॅगा घेवून जाईल. आणि त्याचे काम करून घेईल. पण एखादा गरीब माणूस ज्यांचे घर जाते आणि त्यांच्या घरावरून रिजर्वेशन टाकलेले आहेत, ते लोक हया जनतेला ही लोक ही जनता हया सभागृहाला माफ करणार नाही. साहेब दिशाभूल करतात आपण, हा जर का ठराव मंजूर आहे, डी.पी. रदद करायचा जो पर्यंत शासन निर्णय घेत नाही, तो पर्यंत हयाच्यामध्ये फेरबदल करू नये. अशी माझी कळकळीची विनंती आहे.

या वेळी महापौर, श्रीम. पंचम कालानी या सभागृहाच्या बाहेर गेल्या आणि त्यांच्या जागेवर उप महापौर, श्री. जीवन इदनानी हे आसनस्थ झाले.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** मा. महापौरजी ,उप महापौरजी, आयुक्त साहेब, नाही हे काय बोलणार आहेत? हे तर त्यांची भाषा बोलणार, आपल्या सभागृहाची भाषा काय आहे? की डी.पी. रदद् केला गेला आहे. डी.पी. जर का रदद् करण्यात आला आहे तर तेच बोलेले पाहिजे. ही शासनाची भाषा कसे काय असेल आपण तर दोन्ही बाजूने बोलत आहेत, डी.पी. ३७ खाली रदद झाला, ठिक आहे, आपले म्हणणे काय आहे ते ठामपणे सांगा. जर ३७ (१) मध्ये मी एखादे पत्र दिले, तर त्याचा निर्णय काय असेल? तो रोडबंद स्थितीत असेल ना. म्हणजे त्याठिकाणी २०३५ पर्यत विकास होणार नाही, जो पर्यंत सरकारचा आदेश येत नाही.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** हे फक्त प्रपोजल आहे, आम्ही प्रपोजल पाठवत आहेत की मंजूर करायचे आहे किंवा नाही, हे शासनावर अवलंबून आहे. .

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** याचाच अर्थ ३७ हे फसवणूकीचा मामा बनवायचे धंदा आहे. असे आहे की आता आपण जनतेला सांगतात की डी.पी. मंजूर झाला आहे. तर आपल्याला काही अडचण आहे तर ३७ (१) मध्ये या, ३७ (१)मध्ये आल्यावर तेव्हा सरकार बोलेल, म्हणजे २०३५ पर्यंत फसविले जाईल. नाही नाही, टी.पी. साहेब आपण आपल्याला पहिले सुधारणा करून घ्या की आपण सक्षम आहे की नाही. शहरासाठी सक्षम आहे की नाही. आपण कसे प्लॉन पास करणार? जर माझे एखादया रोडविषयी ऑब्जेक्शन आहे तर आपण काय करणार? रोड बनविणार की दुस—याला परवानगी देणार.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** हे कादयानुसार प्रोसेस होईल.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** कायदयानुसार तर आपण कायदयाचे माहीर आहात आपण इथेच सांगा.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** आज जो इ.पी. आहे.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** इ.पी. सोडून दया, इ.पी. मध्ये तर बॅग भरून येईल आणि पास होणार हे मला माहिती आहे. मी सार्वजनिक बोलत आहे मी कोणालाच घाबरत नाही. जो डी.पी. मध्ये झाले ते ही माहिती आहे. जे काळयाचे पिवळे झाले हे पण महीत आहे आणि ते कसे झाले ते ही माहिती आहे? अमदाबादला बसून सेंच्युरी रेयानचा काय रोड निघत असतो का. सेंच्युरी रेयॉन मधून रोड निघत आहे म्हणजे हे तर खरे दिसून येत आहे. याठिकाणी वास्तव परिस्थितीने कोणी रोड बघितलेला नाही, हे संकेत देत आहेत की आपल्या समोर ३७ (१) चे एक प्रपोजल आले ना. म्हणजे या शहराची कोणी वास्तव परिस्थिती बघितलेली नाही. हे तर अमदाबादमध्ये बनविले आणि ते पॅनड्राइव्ह मधून उल्हासनगरमध्ये आले. कोणी काहीही पाहिले नाही. हे तर पूर्ण शहराला माहिती आहे. नविन सांगा डी.पी. पास झाला की नाही. पास झाला तर ३७ (१) चे काय होणार? आपण महणता की ३७ (१) मध्ये सेंच्यूरी रेयॉन कसे करणार? महणजेच त्या ठिकाणी वास्तूविशाराद कंपनीचा माणूस कोणी गेलेलाच नव्हता. हे संकेत देत आहेत हा की ना.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** हे तर तेच सांगणार कोणी गेलेला होता किंवा नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** आपण एवढे सक्षम अधिकारी आहात मी सक्षम अधिकारी बरोबर बोलत आहे, ते तर पुर्ण भष्ट्राचार अधिकारी होते. हे तर पॅनलचे पॅनल होते मी त्याच्यावरती आरोप लावत आहे. या लोकांनी तर शहराला बरबाद करून टाकले आहे. त्यामंळेच तर सभागृहाने एकत्रितपणे नामंजूर केले आहे, सताधारी असो किंवा विरोधी असो. सगळयानी नामंजूर म्हणून पाठविलेले आहे. त्याचे काय झाले?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** ते अजून शासनाकडे विचाराधीन आहे, त्याला अजून निर्णय...

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** कोणी पास केले? विरोध केलेला आहे, विरोधी पक्ष नेताजी आपण, मी विरोध करू का? मला ३७ (१) चे उत्तर पाहिजे, ३७ (१) मध्ये सेंच्युरी रेयॉन या ठिकाणी ज्यांनी कोणी बनविलेले आहे, त्या ठिकाणी रोड बनविला जाईल की ३७ (१) मध्ये प्रलंबित राहील. असे भरपूर मुदद् आहेत माझे वार्डातला मुददा आहे. हे तर उल्हासनगरचे सेंच्युरी रेयॉन आहे सावकार व्यक्ती आहे, त्याचे पहिले एकले जाते का? प्रत्येक वार्डवासीयांचे बोलणे ऐकायला पाहिजे. माझे वार्डात ३० फुटाचा रोड आहे ६० फुटाचा रोड देणार आहेत का? त्या ठिकाणी मेट्रो रेल चालणार आहे का?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** जर शासन...

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** माझे म्हणणे ऐकून घ्या, पहिले गरीब माणसे आलीच नाहीत, यामध्ये फार मोठी मल्टी नॅशनल कंपनी आली आहे. त्यात ३७ (१) मध्ये आणले, या अगोदर का झोपले होते का? हेच तर मी विचारत आहे ना. ३७ (१) मध्ये ऑब्जेक्शन पेंडींग राहील. मी आज ऑब्जेक्शन टाकले. जर समजा सेंच्युरीचे आज आले आहे, किंवा सभागृहात येईल किंवा येणार आहे, त्या ठिकाणी रोड बनणार किंवा नाही बनणार.सेंच्युरी वाल्यांना आपण काय सांगणार? रोड बनविणार की नाही.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—</u>** शासन जो पर्यंत मंजूर करत नाही, तो पर्यंत परिस्थिती तशीच राहणार.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>**स्टेट्स को राहील, तर आज मी माझे वार्डवासीयांना या सभागृहात सदस्यांना बोलत आहे, की कृपया करून ज्या ज्या वार्डामध्ये अडचणी आहेत, त्या ३७ (१) मध्ये सर्व टाकून दय,. जो पर्यंत मंजूरी होत नाही सन २०३५ पर्यंत असेच पडून राहील. असेच सांगितले ३७ (१)मध्ये प्रलंबित असेल तर त्याला काहीच होणार नाही. असेच बोलले आपण.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—</u>** ३७ (१)ची प्रोसीजर आहे. सेंच्युरी रेयॉन शासनाकडे सुध्दा त्यानी अर्ज केला होता. शासनाचे पत्र आले, की त्याच्यावर कार्यवाही करून आम्हाला पाठवा.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** साहेब, शासनाला तुम्ही कळविले का?

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—</u>** शासनाला हे माहिती आहे, की हा रोड त्या ठिकाणाहून जातो. त्यांनी अर्ज केला त्याच्यावर शासनाचे पत्र आले. योग्य ती उचीत कार्यवाही करून तुमचा अहवाल आमच्याकडे पाठवा. जो पर्यंत शासन हा प्रस्ताव अमान्य केला, तर तो रस्ता तसाच राहणार, जर शासनाने तो बाद केला तर तो डिलीट होणार.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** हा रस्ता वेगळा आहे का? शासनाचा रस्ता वेगळा आहे का? शासनाचा रस्ता याठिकाणहून नाही जावू शकत का? नगरपालिकाकडून, आमचा रस्ता वेगळा आहे का?

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—</u>** आपण पण पाठवा ना, ३७ (१) चा प्रस्ताव.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>** ३७ (१) चा प्रस्ताव महानगरपालिकेकडून पाठवणार, मी डायरेक्ट शासनाकडे नाही जाणार. शासन इथून चालू होते, पहिला टप्पा इथून चालू होत आहे.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** शासनाला मुजूरी महासभेची लागते.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** एक मिनीट म्हणजे प्रत्येक नागरीकाने शासनाकडे जायचे का? याचा अर्थ काय आम्ही जे पत्र देतो याला काही अर्थ नाही.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—</u>** मी हे स्टेटमेंट नाही केलेले आहे, जेव्हा मागच्या महासभेत झाले.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** एक मिनीट, सोनावणे साहेब, विषय असा आहे की, आम्हाला ३७ प्रमाणे प्रस्ताव आणायचा आहे. अणि आम्हाला शासनाकडे पहिले जावे लागेल का? की पहिले महासभेकडे यावे लागेल.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** तुही पाठवा ना.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** कोणाकडे, आम्ही कोणकडे पहिले पाठवायचे, शासनाकडे पहीले पाठवायचे का? मग यांनी सेंच्युरी वाल्यानी पहीले शासनाकडे पाठविले आमच्या आगोदर.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** त्यांनी आपल्याकडेही पाठविले होत,आणि शासनाकडेही पाठविले होते.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** मग आम्हाला दोन्हीकडे पाठवावे लागेल.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** त्यांना फास्ट ट्रॅकमध्ये का? गोरगरीब जनतेला का नाही? १२० फुटवाल्यांना का नाही? हा कोणत्या मल्टीनेशन कंपनीचा मोठा माणूस झाला. तो पण काय बॅग घेवून आला होता का? त्याला पहिले का पाठविण्यात आले. आमच्या सभागृहातील लोकांना का नाही अवगत करण्यात आले, की टी.पी. मंजूर झालेला आहे कोणला काही हरकती असतील तर घेण्यात याव्यात पहिले त्याचे कसे झाले आहे?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** हा प्रस्ताव तर आपला शासनाकडे पहिले गेलेला आहे, ना. आयुक्त साहेबांनी पाठविलेला आहे. तात्कालीन महापौर साहेबांनी पाठविलेला आहे. की हे व्हायला नाही पाहिजे. परंतु शासनाने आजपर्यंत त्याच्यावर कारवाई केलेली नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** माझे फक्त आपल्याकडे एक निवेदन आहे, जे ३७ (१) मध्ये येणार आहे, त्यास थांबवा. आणि दुसरे येणार आहेत ते सर्व एकत्र आणावे. हे सर्व एकत्र पाठवा आणि जो पर्यंत ३७ (१) उत्तर येत नाही तो पर्यंत तिथे कोणतेही कामे करू नका. आपण जून्या डी.पी. नुसार कामे करू शकता.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** हे आपण नामंजूर करा, मंजूर करून पाठववा असे शासनाने सांगितलेले नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** कोणते नामंजूर करायचे?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** नामंजूर करा ना.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** आम्ही सर्व एकत्र देवू. यालाच प्रायोरीटी का?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** दया, आपण दया मी पाठवतो.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—** देणार, आता सध्या महासभा चालू झालेली आहे. त्यामुळे देवू शकत नाही. पुढच्या महासभेत आम्ही महानगरपालिकेचे सर्व सदस्य देणार, जनता तर देणार नाही,जनेतेने याठिकाणी आम्हाला पाठविलेले आहे. आम्हाला वेळ दया आणि त्याना पण थांबवा, कोणाला घाई नाही आह, सर्वच एकत्रीत आहेत. तो पर्यंत थांबविण्यात यावे, व परवानगी देण्यात येवू नये. इथे सावकार गरीब नाही, फक्त डॉ. नाथानी गरीब आहेत. आणि जे जे ३७ (१)मध्ये येईल, त्या भागाला प्रलंबित ठेवावे.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** सोनावणे साहेब, हा प्रस्ताव आणण्याच्या पाठीमागे तुमचा मुळ उददे्श काय आहे?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** मुळ उददे्श काय म्हणजे, नाही तुम्हाला नकी काय विचारायचे आहे? हे मला ही समजू दया, म्हणजे मूळ उददे्श काय आहे? त्यांनी शासनाला कळविले आपल्याला कळविले, तात्काली महापौर...

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** तुमचा काही याच्यामध्ये जास्त काही इन्टरेस्ट आहे का?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** माझे काही इन्टरेस्ट नाही आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** सोनावणे साहेब, ३७ प्रमाणे आम्ही तुमच्याकडे प्रस्ताव पाठवू जसे यांनी सांगितल्या प्रमाणे ते पाठवत असताना आपण जो डी.पी. रदद करण्यासाठी प्रस्ताव आणि काही सुचना केलेल्या आहेत. त्या सुचनाची काही अमलबजावणी झाली नाही किंवा तो डी.पी. आपण, झाली नाही ना, अंमलबजावणी शासनाकडे.

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** अजून पर्यंत झाली नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** ती जरी झाली नसली तरी आम्ही ३७ प्रमाणे आणले, एखादा समजा रिंगरूट आहे. तो रिंगरूट रदद् करा. असा प्रस्ताव इथे आणला त्याला मंजूर केला, परत पाठवू शकतो का शासनाकडे?

**नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणे:—** पाठवू शकतो. फक्त माझे एवढेच म्हणणे आहे की खरोखर लोकांच्या याच्यावरने जाते. तुम्ही जर एकदम हजार प्रस्ताव पाठवले तर तेवढया याचेवर शासनाला, जे काही १० ते १५ प्रस्ताव असतील...

**सदस्य, श्री.धनंजय बोडारे:—** नाही नाही, एकच प्रस्ताव आणतो फक्त रिंगरूट रदद करण्याचा. रिंगरूट रदद करण्याचा प्रस्ताव तुम्ही आणा प्रशासनाने.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** आणि ज्या इमारतीमधून रस्ता गेलेला त्याचे काय?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** तो तुम्ही आणा ना वैयक्तीक तुमचा.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** दिलेला आहे मी, तो प्रस्ताव मी आगोदरच दिलेला आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** तो पण प्रस्ताव घ्या.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** पंचायत हॉल ते स्टशन रोड, एक प्रत मी तुम्हाला देतो. परतु माझा फक्त हा प्रश्न आहे डी.पी. मंजूर आहे का नामंजूर आहे. मला परत सांगावे.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलींद सोनावणेः—</u>** मी या आगोदरच उत्तर दिलेले आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** डी.पी. मंजूर झालेला आहे.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** जर का डीपी मंजूर झालेला असेल तर सरकारचे आणि हया सभागृहाच्या सत्ताधा—यांचे हयाच्यामध्ये सगळयात मोठा हिस्सा असेल. की त्यांनी या शहरावर हे संकट आणलेले आहे. जर का आता तुम्ही म्हणता की डी.पी. मंजूर आहे, महणजे तो नामंजूर करण्याचा जो ठराव केला तो फक्त बनाव होता, हे सिध्द झालेले आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** ठिक आहे, ओ, साहेब चर्चा जास्तच झालेली आहे.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** हा विषय रदद करा.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** या प्रस्तावावर आमचे एकच म्हणणे आहे. की हा प्रस्ताव तुम्ही जसा घाईगडबडीने आणला, त्या प्रस्तावाला आम्ही इथे मंजूरी देतो, परंतु आमचे ही काही प्रस्ताव आहेत. ते पण इथे असेच घाईगडबडीत आणले पाहीजेत.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** नाही, नाही, चालणार सगळे प्रस्ताव एकत्र आणा.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—</u>** माझे असे म्हणणे आहे की पूर्ण महासभेची आजचा जो प्रस्ताव आहे, त्याला आम्ही मंजूरी देत आहोत. दहा हजार कामगाार बेरोजगार होण्याची आम्हाला भिती वाटते. याच्यामागे उददेश हा आहे पण जे जे सदस्य जे प्रस्ताव आणतात इथे,त्यांना गांर्भियाने विचार करायला पाहिजे. तसेच प्रशासनाकडून ही त्यांना जे वाटत असेल जसे हे वाटले तसे प्रस्ताव प्रशासनाने आणले पाहिजे. ३७ (१) शिवाय आम्हाला काही पर्याय नाही सध्या, आम्हाला माहिती आहे की ती डी.पी. रदद केलेली आहे, तुम्ही म्हणतात ते आणून शासनाने विखंडीत करून, आपले प्रशासनाने विखंडीत करून सरकारकडे पाठविलेले आहे. आमच्याकडे फक्त ३७ (१) आहे. पण जेव्हा जेव्हा तुमच्याकडे ३७ (१) येत असेल, त्याचा गांभिर्याने विश्वास करून एक मताने पारीत करायला पाहिजे. असे मी पूर्ण महासभाच्या वतीने बोलतो. बरोबर आहे का साहेब, याच्यापुढे जो कोणी ३७ (१) मध्ये आणत असेल ते आपल्या प्रशासनाला वाटले पाहिजे की त्याची ३७ (१) दुरूस्ती झाली पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>** नाही नाही,नाही हे चूकीचे तुम्ही बोलत आहेत, जर का सभागृहामध्ये जर का हा विषय रदद झालेला आहे. तो जर का मंजूर असेल, एक मिनीटं मीना मॅडमजी, एक मीनीटं,नाही कसे झाले?

**<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—</u>** महापौर मॅडम, एक सदस्य बोलत असेल तर दुसरे कसे काय बोलत आहेत.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, माझे जाणकार मित्र बोलत आहेत की डीपी रदद केला आहे. ही महानगरपालिका महाराष्ट्र शासनाच्या अधीन आहे, आम्ही डी.पी. रदद् पण केला, परंतु शासनाने या डी.पी. ला मंजूरी देऊन पाठविलेला आहे आणि आपल्याकडे फक्त आता एकच पर्याय आहे, ज्या ज्या ठिकाणी आपल्याला ३७ (१) मध्ये अडचणी आहेत, त्याला मायनर मॉडीफीकेशन करून आपल्याला सरकारकडे पाठवायचे आहे आणि आज हा पहिला ३७ (१) चा पहिला प्रस्ताव आलेला आहे. आमच्या भगीनी श्रीम. अर्चना करणकाळेजी या ठिकाणी उपस्थित आहेत, धेबीघाटाकडून सुध्दा एक रोड जात आहे, जो रिजन्सीच्या आत मधून जात आहे ज्याची आपणास आवश्यकता नाही, असे भरपूर रोड आहेत जे सदस्याने सांगितलेले आहेत की त्याची आवश्यकता नाही आहे, किंवा जास्त मोठे आहेत. त्यामुळे ३७ (१) हे एक असे माध्यम आहे की ज्यामुळे आपण मायनर मॉडीफीकेशन करून शासनास पाठवू शकतो. जेव्हा सरकारने एकवेळा डी.पी. ला मान्यता दिली गेली, तर ही महासभा त्यांच्या अधीन काम करत आहे. तर आम्ही का असे बोलत आहोत की रदद् केले,रदद् केले, आम्ही काहीही केले, कित्येक ठराव मा. आयुक्त रदद् , विखंडीत करण्यासाठी पाठवत आसतात, शासन विखंडीत करत असते, त्याअनुषंगाने आम्ही डीपी रदद् करण्याचा ठराव केला होता, व एका प्रकारचे विखंडीत झाले आहे. मी सभागृहास निवेदन करत आहे की हा सेंच्युरी कंपनी चा जो विषय आहे, अत्यंत ही आवश्यक ज्या ठिकाणी दहा हजारापेक्षा जास्त कामगार कामे करीत आहेत त्या ठिकाणी रोड जाण्याचे काही औचित्य नाही आहे. म्हणून आपआपसातील लढाई न करता, ३७ (१) मध्ये सर्वानी आपआपले विषय घेवून येणे. आणि मी वचन देतो की जो कोणी नगरसेवक ३७ (१) मध्ये प्रस्ताव देत असतील तर या सभागृहातून जरूर पारीत करून पाठविण्यात येतील. आम्ही आपआपसात लढाई न करता, आपण अशा विषयास पास करावे, मी सभागृहास निवेदन करतो की या विषयास पास करण्यात यावे, आणि आपण आपले विषय देण्यात यावे. आम्ही त्यांना सुध्दा जरूर मंजूर करणार.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—** आताच सभागृहनेता यांनी सांगितले की डीपी मंजूर झाला आहे. याबाबत आमचे सदस्य, श्री. अरूण आशानजी पुन्हा पुन्हा विचारत होते डीपी मंजूर झाला की नाही. टी.पी. साहेबानी पण सांगितले की डी.पी. मंजूर झाला आहे. परंतु जेव्हा हा डीपी मंजूर झाला होता, त्यावेळी शहरामध्ये आंदोलने झाली होती मोर्चे निघाले होते, लोक घाबरलेले होते. त्या लोकांना आपण सांगितले होते की हा डीपी रदद् करणार. आम्ही शिवसेनेने मोर्चा काढला होता की हा डीपी रदद् झाला पाहिजे. त्या वेळी सुध्दा सभागृहात मा. महापौरजी मॅडम मीना आयलानीजी होत्या त्यांनी आम्हाला विरोधी पक्ष नेता आणि सदस्य काही बोलणार आणि त्यांच्या बाजूने निर्णय जाणार म्हणून बोलण्यास दिले नाही. आपला निर्णय आपले पत्र वाचण्याचे काम डेक्स वरून सुरू केले होते. आणि लोकांना सांगितले होते आम्ही हा डीपी रदद करणार! रदद करण्याची भषा करत होते शहरातील काही लोकांना सांगितले की रदद केला. लोक आज सुध्दा हेच समजतात की डीपी रदद झालेला आहे. परंतु आजा आपण बोलत आहात की हा डीपी मंजूर आहे. या शहरातील लोंकाबरोर फसवणूक केली जात आहे, खिलवाड होत आहे. हे चूकीचे आहे. हा जर डीपी रदद नाही झाला तर लोकांना सांगा की हा डीपी रदद झालेला नाही आहे. लोकांना आपण जे सांगितले होते ते चूकीचे आहे. हे सागण्याचे काम आपल्या माध्यमातून झाले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला जर ३७(१) प्रमाणे प्रस्ताव आणावा लागला तर असे हजारो प्रस्ताव येतील आणि असे हजारो प्रस्ताव आपण मंजूर करणार का? आणि मंजूर करून आपण जर शासनााकडे पाठविले तर शासन त्या मंजूर करेल का? आमचा पहिला प्रश्न आहे की जे रिंगरूट आहे १२० फुटांचा त्या रिंगरूटचे आपण काय करणार? जेव्हा डीपी मंजूर झाला आहे असे म्हणता तर मग या रिंगरूटचे आपण काय करणार? शहरातील लाखे लोकांचे घरे उध्वस्त होतील बरबाद होतील यांचे काय करणारयाचे? सुध्दा उत्तर दयावे लागणार. त्याचे उत्तर दया.

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** भागृहनेताजी यांनी आता जे सांगितले, मा. महापौर साहेब, जर शासनाजवळ कोणताही भुखंड आहे त्यामध्ये रिर्झेवेसन टाकायचे आहे, काढायचे आहे, त्यांची पेरी फेरी जी आहे दोन हजार मीटर चार हजार मीटरचा जो एरिया ठेवला जातो त्याला रिर्झेवेसन नॉम्स आहे, या कंपनीने जेवढे पण रिर्झवेशन टाकले होते, ते आगोदरच डिलीट झालेले आहेत. जर एवढया मोठया परीसरामध्ये रिर्झेवेसन रदद झाले, तर आमच्या गोरगरीबांच्या घरावरून जाणा—या रस्त्याला रदद करण्याचा प्रस्ताव टाकण्यात आला होता तो का नाही आणण्यात आला? आणि आम्ही जे काही शसनाकडे काही सूचना पाठवल्या होत्या त्याच्याबदद्ल महासभेने विचार का नाही केला. जर इ.पी, डी.पी मंजूर झाल्यानंतर

जर सभागृह नेताजी सांगत आहेत की हा डीपी मंजूर आहे, तर या मंजूर डीपी मध्ये आज ३७ (१) इ.पी. आणला गेला. ही या शहराची घोर चेष्टा, निंदा केलेली आहे. पहिली गोष्ट तर याचा मी विरोध करत आहे. आज निषेध व्यक्त करत आहे., जर हा डीपी मंजूर असेल तर.

**सदस्य, श्री.धंनजय बोडारेः—** महापौर महोदय,....

**सदस्य, श्री. अरूण आशानः—** एक मिनीट, जर डी.पी. आपणास मंजूर करायचा होता आणि जर एसएम मध्ये आणायचे होते तर आम्ही जे आज सर्व सभागृहाने जो जो निर्णय जो जो एस.एम. मध्ये इ.पी. मध्ये फायनल करण्यासाठी पाठविण्यात आले होते, त्याचे काय झाले? सभागृहनेताजी हे आमचे नाही आपल्या सगळयांचे शहर आहे.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानीः—** बोडारेजी आता तुम्ही बोला.

**सदस्य, श्री.धंनजय बोडारेः—** या शहरासोबत खेळ झालेले आहे हे तर स्पष्ट आहे, आपल्या लोकांची भावना होती हे असे होवू नये परंतु झाले. डी.पी. मंजूर करूवून घेण्यात आले. आम्ही इथून पाठविला, आता पर्यंत अरूण आशानजी बोलत आहेत त्याचे उत्तर अजून दिले नाही, हे ही खरे आहे, नाही तर शासनाने जाहिर करावे की हा ठराव विखंडीत केलेला आहे, असे ही नाही आहे हे पण अजून पर्यंत केलेले नाही. कमीत कमी प्रशासनाला, शासनाला माहिती असायला पाहिजे की शासनाची भुमिका काय आहे? जो महापालिकेने जो ठराव पाठविलेला आहे हा बरोबर आहे की ड्रामा आहे. शहरातील लोकांना माहिती पाहिजे. इथे आम्ही जे केले होते, सत्तापक्षाने असो की विरोधी पक्षाने, एक नाटक होते, शासनाने काही ऐकले नाही, हे लोकांना जाहीर करावे. दुसरी गोष्ट अशी की अताचा जो प्रस्ताव आलेला आहे. आमच्या ज्योतीगायकवाड त्या ठिकाणच्या नगरसेविका आहेत. अर्चनाताई करंजकाळे आणि नगरसेवक आहेत त्यांनी सुध्दा याबाबत सांगितले आहे. त्या ठिकाणचे जे सहा हजार कर्मचारी आहेत तेथील प्रशासन या सहा हजार कर्मचा—याना दाखविण्यात यावे नाही तर कंपनी बंद करावी लागेल. केमीकल प्लांट वरून हे जात आहे, ते जात आहे, ही गोष्ट खरी आहे आणि त्या ठिकाणहून रोड काढणे हे चूकीचे आहे. कारण की ही त्यांची जागा होती. त्याच्या जागे मधून दुस—या प्रोजेक्टला ॲप्रोच करण्याठी हा रोड काढण्यात आला  मी ही गोष्ट त्या वेळेस सुध्दा सांगितली होती. तेच झाले आहे. तर माझे एक म्हणणे आहे की आता आमचे जेवढे रिंगरूट चा प्रस्ताव त्यांनी सांगितले की मी पहिले हजार इनट्रेस्ट प्रशानाने सुध्दा कसे काम केले आहे.? इन्ट्रेसमध्ये काम केल पाहीजे ना. ज्या दिवशी ऑब्जेक्शन घ्यायचे होते त्या दिवशी त्यानी ३७ (१)मध्ये मॉडीफिकेशनचा प्रस्ताव घेतला होता. पंचायत हॉल ते स्टेशन रोड जो नवीन रोड होता. मी सागितले ना तिथे ८ ते १० बिल्डींग वरून ८० फुटाचा रोड जातो आहे. हा प्रशासनाने का प्रस्ताव आणला नाही. सुर्वे साहेबांनी स्टेशन परीसरातील विकसीत प्लॅान चांगला प्रस्ताव हे प्रशासनाला सुचले पाहिजे. वर ६० फुट आणि खाली चिंचोळा ४० फुट रोड दिलेला आहे आणि स्टेशनला आजिबात काहीच नाही. असा प्रस्ताव तिथे त्यांनी ३७ (१) मध्ये स्टेशन ऐरिया डेव्हलपमेंट उल्हासनगर हा प्रस्ताव दिलेला आहे तो का येत नाही? जो ६० फुटाचा रोड होता तो ४० फुटाचा केलेला आहे म्हणजे दिलिप गायकवाडांच्याच वार्ड मध्ये तो सुध्दा त्यांनी दिलेला आहे ३७ (१) मध्ये मॉडीफिकेशनमध्ये. लोक सांगतात ६० फुट आणि तिथे ४० केला, आता तो फुट ४० फुट आता आहे  असे प्रस्ताव आहेत हे प्रस्ताव आणि आता जे एक आमच्या प्रकाश नाथानी यांनी सांगितले ३७ (१)मध्ये जर एकदा दिले तर त्यानंतर तुम्ही छेडछाड करू नका, मंजूरी करण्यासाठी पाठपूरावा ताबोडतोब करा. शासन आणि प्रशासन असे दोन्ही मिळून.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—** हे महासभेपुढे येणारच आहे.

**सदस्य, श्री.धंनजय बोडारेः—** पण ते का आले नाही? असे ते म्हणत आहेत एका कंपनीने पाठपूरावा केला आणि शासनाकडून पत्र आले आहे. आम्ही प्रत्येक जण काय शासनाकडे जाणार नाही.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—** आवश्यकता नाही, मी बोललो ना. राहिले असेल चूकून.

**<u>सदस्य, श्री.धंनजय बोडारेः—</u>** म्हणून इथून पुढे प्रस्ताव तातडीने शासन अधिका—याने काय केले असेल? परंतु इथून पुढे हा प्रस्ताव कामगाराशी निगडीत असल्यामुळे नंतर अशा प्रकारचे प्रस्ताव एक सिंगल कुठल्यातरी बिल्डरला फॉर करण्यासाठी कुठल्यातरी कंपनीला फॉर करण्यासाठीते अशा प्रकारचे प्रस्ताव नाही तर गोरगरीब ते जे प्रस्ताव असतील ते जे खरोखर आवश्यक आहेत.

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—</u>** सेंच्युरी रेयॉन कंपनी जी आहे, याला मान्यता आपला डी.पी. येण्याच्या पूर्वी १९६५ ची परवानगी आहे. याला प्रीव्हएस कमीटमेंट आहे. त्यावेळेला तो रोड नव्हता, हे टाकणे खरच चूकीचे होते. जिथे जिथे प्रिवियम कमीटमेंट आहेत कोणी ले आउट मंजूर केला आहे कोणी प्लान मंजूर केला आहे. त्याच्यावर लोड टाकणे हे नियोजनाच्या विरूध्द आहे. ते प्रीव्हएस कमीटमेंट हे लक्षात घ्याव्याच लागतात. घ्यायला पाहिजेत.

**<u>सदस्य, श्री.धंनजय बोडारेः—</u>** तिथे रोड येणे हे चूकीचे होते तरी महानगरपालिकेने आपली काय सरकारकडे आपली बाजू मांडली नाही?

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—</u>** कसे आहे साहेब एकच ही कंपनी चालू होती बाकीच्या चारही लागू असलेल्या कंपन्या बंद होत्या. आय. टू. आर. मध्ये रोड पाहिजे आणि मोठा प्लॅाट आहे हा म्हणजे नाही आहे. त्यामुळे एखादया वेळे पूढच्या नियोजनाच्या मुळे हा अजून वीस वर्ष चालणार आहे. नियोजनाच्या दृष्टीने त्याने टाकला असेल असे वाटते.

**<u>सदस्य, श्री.धंनजय बोडारेः—</u>** टाकला होता पण त्याच्यावर ऑब्जेक्शन आले, महासभेने घेतलेले प्रशासनाने घेतलेले...

**<u>नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनावणेः—</u>** तसेच झाले की याच्यामध्ये त्यांचे तीन मोठे प्लॅान आहेत.

**<u>सदस्य, श्री.धंनजय बोडारेः—</u>** ठिक आहे, हा प्रस्ताव आम्ही कामगारांच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने कंपनीचा असल्याने मंजूर करतो,नंतर याठिकाण प्रस्ताव आल्यावर ते प्रशासन आहे. त्यासाठी आम्हाला सेपरेट सागांयची गरज नाही.

**<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—</u>** एक मिनीट माझी गोष्ट ऐका, यामध्ये पुढच्या महासभापर्यंत आमचा कोणाचे पण ३७ (१) चे पत्र येईल तोपर्यंत दुसरी कोणतीही कारवाई करण्यात येवू नये, कोणत्याही रोडवरती. कामाला एक महिन्याचा वेळ दया, तो पर्यंत आमचे पत्र येतील. यासाठी माझे ऑब्जेक्शन नाही आहे. सर्व नगरसेवकांचे पत्र येण्यासाठी वेळ दयायला पाहिजे. असे नाही ४ दिवस बोलले आणि काहीच ऑब्जेक्शन आले नाही. मी आपल्याकडून कमीटमेंट घेत आहे, पुढच्या महासभेपर्यंत आमहाला सांगावे.

**<u>पीठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानीः—</u>** एक मिनीट, आयुक्त साहेब, टाउन प्लानर, या ठिकाणी काही लोकांनी ३७ (१) मध्ये स्पोर्ट विषयी निवेदन केले आहे बहूतेक लोकांनी लिखित मा. आयुक्त साहेबाना ३७(१)मध्ये मॉडीफिकेशन आणण्यासाठी दिलेले आहे, की मला असे वाटते की लवकरात लवकर रिंगरोड जो १२० फुंटाचा आहे, आमचे शहरासाठी विनाशकारी आहे. त्याच्यासाठी सर्व पार्टीने निवेदन केलेले आहे की ३७ (१) मध्ये आणा, आणि त्यामध्ये मॉडीफिकेशन करा आणि जसे नाथनी जी यांचे आहे, किंवा अन्य सुर्वे जी यांचे आहे. तो असे जे विशेष रोड आहेत, या ठिकाणी भरपूर नुकसान होत आहे. रोडची गरज नाही. यासाठी आपण लवकरात लवकर पुढच्या महासभेमध्ये ३७ (१) मध्ये आणण्याचे

प्रयत्न करावे, कारण लोकांवरील ताण मुक्त होईल आणि त्यांना त्याच्या अधिकारापासून वंचित करण्यात येवू नये.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** अशाच प्रकारे ५ नंबरमध्ये सुध्दा .मेन बाजाराचा एक रोड आहे, किशोरलालजी पूर्ण ५ नंबरचा बाजार आहे, जो काही वर्षपासून ६० फुटाचा बनला आहे, त्याला अचानक ८० फुट संपुर्ण बाजारच नष्ट होऊन जाईल.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** माझे असेच म्हणणे आहे की आम्ही सुध्दा दोन चार रोड प्रस्ताव घेवून येणार,

**महापालिका सचिव :—** हा विषय सर्व समितीने पास.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४:—** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनिमय १९६६ चे कलम ३७(१) अन्वये सुधारीत मंजूर विकास आराखडयातील एम ५, एसएम ३ हा २४ मी रुंद रस्ता वगळण्याबाबत किरकोळ फेरबदल करण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहराची मुळ विकास योजना ही शासन निर्णय क्र. टीपीएस — १२०१/६०१८५ सी. आरपी. दि. २०/५/१९७४ अन्वये मंजूर केलेली असून ती दि. १/७/१९७४ पासून अंमलात आलेली आहे.

उल्हासनगर शहराची सुधारित विकास योजना दि. २१.४.२०१७ रोजी मंजूर झालेली असून सेंच्युरी रेयॉन या कंपनीच्या जागेतून २४ मी. रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

सदरहू रस्त्यामध्ये सेंच्युरी रेयॉन कंपनीची Sulphuric Acid, Effluent Treatment Plant, Carbon Sulphide Plant, अस्तिवात असल्याने या रस्त्यावर सार्वजनिक वाहतूकीसाठी वापर सूरू केल्यास अस्तित्वात असलेल्या Plant ला धोका / अपघात होउन जीवीत व वितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे कंपनीने लेखी कळविले आहे.

तसेच हे प्लॅट हलविणे शक्य नाही. रस्ता रद्द न केल्यास कंपनी बंद करावी लागेल यामुळे कमीतकमी २५००० कामगाराची रोजी रोटी बंद होवु शकते ही बाब विचारात घेता मंजुर विकास योजनेतील सदरहू प्रस्तावित रस्ता रद्द करण्यात यावा अशी विनंती. मा. महापोर यांनी संदर्भ पत्र क्र. ३ अन्वये केली आहे व यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (किरकोळ फेरबदल प्रस्ताव) ची कार्यवाही प्रस्तावित करावी लागेल. यासाठी महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

तसेच महासभेची मंजुरी घेतल्यावर वरील बदलाबाबत लोकांकडुन सुचना व हरकती मागविण्यासाठी अधिसुचना प्रसिध्द करावी लागेल व ३० दिवसांपर्यंत प्राप्त होणा—या सुचना व हरकतीसह सदरहू किरकोळ फेरबदल प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर करावा लागेल. यासाठी महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

तरी शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणे करीता मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

**महासभा ठराव क्र: ३१** **दिनांक:—१९/१०/२०१८**

सूचकाचे नाव: श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये सुधारीत मंजूर विकास आराखडयातील एम ५, एसएम ३ हा २४ मी रुंद रस्ता वगळण्याबाबत किरकोळ फेरबदल करण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे पाठविणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५ :—** वृक्षप्राधिकरणाची पुर्नस्थापना करणे.

———————————————————————————————————————

यामध्ये तुम्ही सदस्यांची नावे दयायची आहेत. नाही मागच्या वेळी हा विषयच आला नव्हता कोणी नावे दिली नाहीत. तर स्थापना आजच करायची आहे नाहीतर विषय पुर्ण डिफर करून पुढच्या महासभेत आणा, कारण कोर्टामध्ये वृक्ष कमीटी बर्खास्त केली आहे. तूम्ही नावे दिल्यानंतरच पून्हा स्थापन होणार आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:—** या विषयाला डिफर करण्यात यावे.

**महापालिका सचिव:—** हा विषय डिफर, पुढच्या वेळेस नक्की नावे दया कोर्टामध्ये हा विषय आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 👍

---

☑ **विषय क्र. ५:—** वृक्षप्राधिकरणाची पुर्नस्थापना करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ नंतर महासभा ठराव क्रमांक ६, दिनांक २४/४/२०१७ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना करण्यात आली होती. यापूर्वी देखील वृक्ष प्राधिकरणाची स्थापना करताना महापालिकेचे सदस्यच नेमण्यात आले बिनसरकारी संघटनेचे सदस्य घेण्यात आले नाही.

तथापि उपरोक्त विषयांकित संदर्भाधीन मा. न्यायालयाच्या आदेशान्वये सदर समिती कायदेशीररित्या गठित नाही. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम, २००९, सह श्शासन आदेश, अधिसूचनेन्वये आपणांस सविनय सादर करण्यांत येते की, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ यामधील प्रकरण दोन वृक्ष प्राधिकरणाची स्थापना व कार्यपध्दती यामध्ये कलम ३ (१) अन्वये वृक्षप्राधिकरणाची स्थापनेनुसार ''कोणत्याही नागरी क्षेत्रात हा अधिनियम अंमलात आणल्यानंतर,शक्य तितक्या लवकर, संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरण आपल्या सदस्यांमधून ते प्राधिकरण ठरवील अशा रितीने आणि अशा मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या, (अध्यक्ष आणि इतर यांसह) कमीत कमी पाच आणि जास्तीत जास्त पंधरा व्यक्तींचे मिळून बनलेले एक वृक्ष प्राधिकरण घटित करील.'' अशी तरतुद आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये बिनसरकारी संघटनेचे सदस्य घेणे व पालिका सदस्यामधून उच्च शिक्षीत व याविषयी अनुभव असणा—यास प्राधान्य देणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक वृक्ष प्राधिकरणास ज्यांना वृक्षांचे रोपण आणि जतन या क्षेत्रातले विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनांच्या प्रतिनिधींना वृक्ष प्राधिकरणाचे सदस्य म्हणुन नामनिर्देशित करता येईल. अशी तरतुद आहे

तसेच मा उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ९३/२००९, दिनांक २०/९/२०१३ मध्ये बिनसरकारी संघटनेमधून नामर्निदेशित सदस्य घेताना काही मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे दिल्या आहेत.

१. कृषी/वन/उदयान विदया/विषयाची पदवी किंवा डिप्लोमा तसेच शास्त्र शाखेची पदवी किंवा पदविका असणा—यांना प्राधान्य
२. वृक्षांची लागवड/संवर्धन/स्थलांतरण आधि/क्षकऐवा पर्यावरण सुरक्षा विषयाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असलेल्या पात्र व्यक्तिंना प्राधान्य
३. वृक्ष प्राधिकरणावर बिनसरकारी संघटनांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्त होण्यास नामनिर्देशित व्यक्ती शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत बिनसरकारी संघटनेचा सक्रिय सदस्य असणे आवश्यक आहे.
४. वृक्षांचे रोपण, जतन व पुनर्रोपण किंवा पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील विशेष ज्ञान व पाच ते दहा वर्षे अगर अधिक प्रत्यक्ष अनुभव
५. राष्ट्रीय पातळीवर कार्यरत बिनसरकारी संघटनांना (प्राधान्य)
६. नामनिर्देशित सदस्य स्वतंत्र बिनसरकारी संघटनेचा प्रतिनिधी असावा.

तरी मा. उच्च न्यायालयाचे आदेश व नियमाची तरतूद पहाता वृक्षप्राधिकरण नव्याने स्थापन करुन ९ लोकप्रतिनिधी व उवर्रित नामनिर्देशित सदस्य घेणेस महासभेपुढे प्रस्तावित.

<u>**महासभा ठराव क्र:**</u> **३१ अ** <u>**दिनांकः—१९/१०/२०१८**</u>

सूचकाचे नाव: श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वृक्षप्राधिकरणाची पुर्नस्थापना करणेचा प्रस्ताव या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ६ :— प्रस्तावाची सूचना**

ही माहितीचा नोंद चा विषय आहे.४८ ठिकाणी शांतता क्षेत्र म्हणून घोषीत केलेल्या अधिसूचना आणि जनहीत याचीकेवरील सूचना समन्वय समिती आहे, शासनाने गठीत केलेली आहे.

———————————————————————————————————————————

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** माहीती कोणती आहे, नुसतच पास काय समिती कोणती आहे. तिचे कामकाज काय आहे?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** शांतता क्षेत्र घेषीत झाल्यानंतर या शहरामध्ये जे गणेशोत्सव व नवरात्र उत्सव साजरे केले जातात, यावरती बंधने आलेली आहेत. कोण आहे उत्तर देणार?

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** महापौर साहेबजी आपले आयुक्त साहेब बसलेले आहेत, त्याच्याकडून काही अशी कामे मंजूर करून घेण्यात यावीत, जो बाकीचे आयुक्त बोलत नाही. हे १० ते १५ महिने आपल्याला मिळाले आहेत, जेवढे पण जरूरी कामे आहेत ती या आयुक्त साहेबाकडून पास करून घेण्यात यावीत. सर्व नगरसेवकांना विनंती आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी :—** सेलवन साहेब सर्वाचे फायदा करा. आज तुमचा मुड चांगला आहे, सर्व पास करा.

**प्र.मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती, विशाखा सावंतः—** मा. महापौर, उप महापौर, मा. आयुक्त साहेब, आणि सर्व सन्मानीय सदस्य, ध्वनी प्रदुषण नियम २०१७ अन्वये शासन नगरविकास विभागाकडे दि. १६ जुलै २०१८ रोजीच्या पत्रानुसार उल्हासनगर शहरासाठी ४८ शांतता क्षेत्र आपण घेषीत केलेले आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** सण साजरे होतात ना ते संपवण्याचा प्रयत्न करतात, भारतीय जनता पक्षावाले खास करून, हिंदू धर्म इथे संपवायला निघालेले आहेत.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** आता जो हा विषय होणार आहे, आयुक्त साहेब इथे जे आयुक्त म्हणून बसलेले आहेत. ते निर्णय घेणार का? पहिले ते तुम्ही सांगा, नंतर तुम्ही सुरूवात करा. तुम्ही जी पण माहिती देतात त्या माहितीवर अमलबजावणी आयुक्त इथे घेणार आहेत का जे बसलेले आहेत. कृपया ते पहिले सांगा आणि नंतर तुम्ही सभागृहाला संबोधीत करा.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सूर्वे:—</u>** मा. महापौरजी अधिकारी सगळे निघून गेले काय आहे?

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** किती कमीशनर निघून गेले.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सूर्वे:—</u>** महासभा चालू.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सूर्वे:—</u>** महासभा कसी काय चालवायची? अहो मा. आयुक्त, महापौरजी कुठे आहेत अधिकारी?

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** महापौरजी, अधिकारी लोक काही दिसत नाही.

**<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>** महासभेमध्ये अधिकारी नाहीत, तुम्ही सभागृहाला संबोधित करतात, याची अंमलबजावणी कोण करणार? ते माहित नाही.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सूर्वे:—</u>** महापौरजी आपला अपमान आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** पीडब्ल्युडीचे अधिकारी कुठे आहेत?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब,

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** एक मिनीट, माझा एक लहानसा प्रश्न आहे. आज नवरात्रीचे दिवस असून काही ठिकाणी विसर्जन आहे. आम्ही जी व्यवस्था केली आहे, पाण्याची व्यवस्था बरोबर नाही आहे. ही पाण्याची व्यवस्था पीडब्ल्युच्या लोकांना सांगून करून घेण्यात यावी. हे आमच्या महानगरपालिकेचे काम आहे. यासाठी पर्यायी व्यवस्था करायला पाहिजे. इथे जी विसर्जनासाठी पाण्याची व्यवस्था केलेली आहे ती बरोबर नाही आहे.

**पीठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—** विसर्जनासाठी जे श्री. चौधरीजी बोलत आहेत, पीडब्ल्युडी कडे संपर्क साधून त्या ठिकाणी व्यवस्था करणे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** कैलास कॉलनी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी,मा. आयुक्त साहेब, हा विषय जो आलेला आहे. या विषयामध्ये जी माहीती मिळाली पाहिजे, हे शांतता क्षेत्र जे घेषीत केलेले आहेत, यामध्ये जर आपण लक्ष दिले तर हे सर्व शांतता क्षेत्र गर्दीच्या ठिकाणी आहेत. ज्या ठिकाणी पूर्ण दिवसभर हॉर्न वाजतात. सकाळी ६ ते रात्री १ वाजेपर्यंत १ मीनीट पण शांताता नसते. या ठिकाणाला आपण शांतता झोन मध्ये टाकत आहात. तर हे कसे होईल? काय आपण काय फक्त दिखावा करणार का? मी आता काही नावे वाचत आहे. आणि सभागृहाचे सदस्य या शहराचे रहिवाशी आहेत. तो मला सांगा की अशा जागेला आपण शांतता क्षेत्र घेषीत करू शकतो का? मी आपल्या समोर नाव वाचत आहे. यामध्ये लिहिलेले आहे मध्यवर्ती रूग्णालय उल्हासनगर—३, याठिकाणी तर पूर्ण दिवसभर हॉर्न चालू असतात. त्यानंतर पूढे १ नंबर बस स्टॉप इथे तोमार नर्सिंग होमचे नाव लिहिलेले आहे.जे माझे वार्ड मध्ये आहे. याठिकाणी सुध्द १ मिनीट वाहनाचे आवाज बंद होत नाही.तर ठिकाणाला कसे शांतताक्षेत्र घेषित करू शकता. हया यादीचा जर अभ्यास केला तर यात भरपूर त्रृटी आहेत. दुसरी गोष्ट यामध्ये आपण समिती बनविली आहे. सभागृहाला विचारले नाही कोणला सांगून समिती बनविली? सभागृहाचे कोणही सदस्य यात नाही आहे. यामध्ये एनजीओ घेतले आहेत कोणाला विचारले? की एनजीओ कुठून आले? ही समिती कशी बनविली गेली? मला समजत नाही की विषय पत्रिका दिलेली आहे, आणि यामध्ये शांतता क्षेत्र स्वत: बनविण्यात आले आहेत. जवळजवळ सर्व हॉस्पीटलला शांतता क्षेत्र देण्यात आलेले आहेत. या सभागृहाने बरेचशे शांतताक्षेत्र उल्हासनगर महापालिका क्षेत्रात सायलेंस झोन घेषीत केलेले आहे. प्रजापिता ब्रम्हकुमारी आश्रम,ज्यांना आगोदरच सभागृहाने घेषीत केलेले आहे. कमीटी वाचा, कमीटी वाचाल तर आपणास माहीती होईल, या सभागृहाचा एकही सदस्य या कमिटी मध्ये नाही आहे आणि ही समिती दि. १३/७/२०१८ रोजी बनविली आणि आमच्याकडे दि.१९/१०/२०१८ रोजी ३ महीने ३ दिवसानंतर आली. याची आम्हाला एकही सदस्याला माहिती नाही की आम्ही कमिटी बनवत आहेत. गटनेता याच्याशी सुध्दा चर्चा नाही. हे काय चालले आहे? मा. महापौरजी मा. आयुक्त साहेब, मी आपल्याकडे निवेदन करतो की जे पण कार्य असेल आम्ही शहराला काही देवू शकतो, आम्ही सायलेंट झोन बोर्ड लावला आणि दिवसभर हॉर्न वाजत राहीले असे झाले नाही पाहिजे. आम्ही जर शहराला काही देण लागतो आमची कमिटी जर काही करत असेल, उदया जर शांतताक्षेत्र घोषीत जाहीर केला आणि आमची कमीटी त्या हॉस्पीटलजवळ जावून काय करणार. १ नंबर बस स्टॉप चा रोड बंद करणार का? आपण लिहिलेले आहे तोमर नर्सिंग होम, तर याठिकाणी शांतताक्षेत कसे काय करणार? उपाय योजना काय करणार? ॲटो रिक्षाचे स्टॅंड आहे, ट्राफीकचे ऑफीस आहे. दिवसभर वाहने उभी राहतात. त्याला काय करणार? त्याला शांतताक्षेत्र कसे करणार? म्हणून मी आपणास निवेदन करीत आहे, की त्रुटी पूर्ण आहे, चूकीचे आहे सर्व गटनेत्याची बैठक, सत्ताधारी पक्ष, विरोधी पक्ष, आम्ही या शहराच्या भल्यासाठी याठिकाणी उपस्थित आहेत. तर यामध्ये परत सुधारणा करून कुठे कुठे शांतताक्षेत्र घोषीत करू शकतो.

**<u>सदस्य,श्री. सुनिल सुर्वे:—</u>** सर्वप्रथम तुम्ही कमिटी आयुक्तांनी तुम्ही आपल्या निर्णयाने केलेली आहे ती पहिली बदली करा. लोकप्रतिनीधी आहेत का? कोणीच नाही आहे?

**<u>प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—</u>** सर, एक मिनीट मी सांगू इच्छिते, शासन निर्णय दि. ३ मे २०११ नुसार, स्थानिक स्वराज्य संस्थानी सणांचे  पर्यावरण पूरकसादरीकरण शांतता क्षेत्र साठी ही कमिटी नाही आहे. पर्यावरणाचे पूरक साजरीकरण होण्यासाठी.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** पर्यावरणमध्ये काय काय येते ते सांगा? आम्हाला पर्यावरण काय माहिती नाही का? पर्यावरणपूरक करावे आम्ही करतो पर्यावरणपूरक इथे कायदयाचे पालन कोणीच करीत नाही? परतु हे सायलेंस झोन  ज्या शाळा आहेत त्या बाहेर सायलेंस झोन, शाळा ४ ते ५ वर्षपूर्वी झाल्या उत्सव तर पूर्वी पासून आहेत. गणपती आमचे २५ वर्षापासून बसवत आहेत. अशा ठिकाणी सायलेंस झोन दिले आहे. यामुळे काय झाले माहिती आहे का? सभागृह नेत्यानी जे सांगितले, की कुठल्याही सभागृहाना, नेत्याना, गट नेत्याना, विश्वासात न घेता ही कमिटी केली, त्याच्यावर माझा विरोध आहे. दुसरा विषय असा आहे की, आम्ही जे गणेश उत्सव व नवरात्र उत्सव साजरा करतो ना त्याच्यावर बंधने आली आहेत. उल्हासनगर शहरात पहीले कधी नव्हते झाले, हया वर्षी ४ ठिकाणी नवरात्र उत्सवाला परवानगी मिळाली नाही. ही आमच्यासाठी शरमेची बाब आहे. अशा विषयाला जर शाळा सायलेंट झोन मध्ये येत असेल, ती शाळा संध्याकाळी सात च्या नंतर कुठे चालू असते? सात च्या नंतर मग त्या शाळेला सायलेंट झोन आला कुठेन? मग त्या सायलेंट झोनला परवानगी का नाकारली आमची? अशा वेळेला वाहने चालवतांना हॉर्न वाजवू नये, म्हणून जर सायलेंट झोन असेल तर नवरात्र उत्सव व गणेश उत्सव साजरा करण्याला बंधन असेल. मग अशा वेळे अमच्या वर त्याचा परिणाम जास्त होतो. खास करून हिंदूच्या सणांवर त्यांची बंदी असते. या विषयावर आम्ही सभागृहापूढे शासनाने काय नियम दिलेत ते सांगा? त्याचे उत्तर आम्ही देवू आधी कमिटीला तर आमचा विरोध आहे.

**<u>सदस्य, श्री धनंजय बोडारे:—</u>** ही जी समिती गठीत केलेली आहे, स्थानिक स्वराज्य संस्थानी करायची आहे. स्थानिक स्वराज्य संस्था महणजे फक्त आयुक्त, किवा महासभा नाही. ही समिती गठीत कोणी केलेली आहे? महासभेसमोर आलेली नाही. आयुक्त आणि महासभा हे प्रशासन आणि शासन मिळून स्थानिक स्वराज्य संस्था होते. सण, उत्सव शाांततेमध्ये पार पाडण्यासाठी, ही समिती गठीत करायची होती. आयुक्तांनी हे महासभेसमोर आणणे गरजेचे होते, की नाही. तुम्ही परस्पर  आणि आता माहितीसाठी आणता आहेत. राजपत्रामध्ये घोषीत करीत आहेत, डिक्लेअर करीत आहेत. आणि आता माहीतीसाठी आणत आहेत. आगोदर या सभागृहाच्या निदर्शनास आणायला पाहिजे होते. नंतर ती शासनाला पाठवायला पहिजे.ही झाली एक बाजू दुसरी बाजू हे शांतता क्षेत्र ४८ घोषीत केलेले आहेत. चौधरीनी सांगितले, बालाजी हॉस्पीटल, साई हॉस्पीटल, कुठली लॉर्ड कॉनवेट स्कुल ५ वर्षपूर्वी ती शाळा तिथे होती का? शाळेचे नॉम्स काय असतात? शाळेचे नॉम्स शाळेने पाळलेले आहेत? हॉस्पीटलसाठी परेशी असलेली जागा ती पूरक आहे का? तिथे इन्फ्रस्टक्चर आहे का? हे तुम्ही पाहिले आहे का आगोदर ती शाळा कायदेशीर आहे बेकायदेशीर आहे , कायदेशीर शाळेला मैदान लागते. ते पूर्ण आहे का? म्हणजे माझकडे जर का ५ ते ६ लोक आली वर्षानुवर्ष गेल्या ३५ वर्षपासून लोक ते देवी बसवतात, गणपती बसवतात. पण केवळ तुमच्या लिस्टमध्ये आल्यानंतर त्यांना संबंधित विभाग आपले मालमत्ता विभाग असेल, ट्राफिक

विभाग असेल बाकीचे विभाग त्याला परवानगी देत नाहीत. म्हणजे लोकांनी काते बंद करायचे का? तुम्ही बेकायदेशीर असलेल्या शाळांना, दवाखान्याना तिथे शांतता क्षेत्र घोषीत करणार आणि वर्षानुवर्ष तिथे त्यांची नाही काय तुमचे हात बांधले?

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—** नाही,नाही यापूर्वी सर आपल्याकडे ११६ शांतता क्षेत्र होते. आता आपण त्याची दुरूस्ती करून फक्त ४८ ठेवले आहेत.

**सदस्य, श्री धनंजय बोडारेः—** कोणी केले?

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—** ११६ यापूर्वी होते २०१२ मध्ये.

**सदस्य, श्री धनंजय बोडारेः—** ११६ कोणी केले होते?

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—** माहिती नाही? म्हणजे अधिसूचना आहे सर आपल्याकडे

**सदस्या, श्रीमती मिना सोनेंजीः—** नाही, माहीत नाही म्हणजे मॅडम.

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—** म्हणजे मालमत्ता विभागातून झाले नव्हते. हे र्प्यावरण विभागातून झाले होते.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेंजीः—** नाही पण तुम्हाला ती जबाबदारी आहे ना.

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—** अधिसुचना आहे माझेकडे, ११६ आहेत त्याच्यामध्ये सगळे...

**सदस्या, श्रीमती मिना सोनेंजीः—** नाही पण बदल कोणी केले? ते पण माहिती तुम्हाला पाहिजे मॅडम.

**प्र प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—** बदल आता आम्ही केलेत.

**सदस्या, श्रीमती मिना सोनेंजीः—** आम्ही कोणाला विचारायला जायचे?

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—** बदल आता आम्ही केलेत.

**सदस्य, श्री धनंजय बोडारेः—** असे कसे?

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** एक मिनीट, तुम्ही कोण करणारे? जर एकदा शासनाने सांगितले, न्यायालयाचा आदेश आहे स्थानिक स्वराज्य संस्थेने करायचे, स्थानिक स्वराज्य म्हणजे तुम्हीच का? आम्ही निवडून आलेले स्थानिक स्वराज्य संस्थेचे कोणी नाही का? स्थानिक स्वराज्य संस्थेचे तुम्ही कोण करणारे? मग आता आमच्याकडे आणले का? हा विषय तुम्ही कशासाठी आमच्याकडे तुम्ही आणला मंजूरीसाठी आणला की माहितीसाठी आणला?

**<u>सदस्या, श्रीमती मिना सोनेंजीः—</u>**— सर्व निर्णय तुम्ही घेता तर आणला कशाला इकडे?

**<u>सदस्य, श्री.अरूण आशानः—</u>** नाही,नाही आयुक्त साहेंब एक मिनीट, समजा समिती तुम्ही गठीत करता आणि शांतता क्षेत्रामध्ये पण तुम्ही शांतता क्षेत्र तुमच्या मर्जीप्रमाणे वगळलेले आहेत, तुमच्या कडे ११६ ची यादी आली नंतर तुम्ही ४८ घेतले. ४८ चा काय निकष धरला विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की एखादी शाळा ५ वर्षपूर्वी आली तो शांतता क्षेत्र तुम्ही लावले बरोबर आहे. आता ही जी समिती स्थापन केली. माझे फक्त पाच प्रश्न आहेत. ही समिती किती वर्ष करता? याचे कार्यकारीणी सदस्य कायम राहणार का बदलणार? बदल कशाप्रकारे होणार? १ ते ५ नंबर पर्यंत एवढे मोठे उल्हासनगर शहर आहे. हयाच्यामध्ये फक्त दोनच सदस्य बाहेरचे कसे? परत हे सदस्यामध्ये परत तुम्ही एखादया पर्यावरण प्रेमीना तुम्ही घेतलेले आहे ते कशावर घेतलेले आहे. म्हणजे तुम्ही सर्व तुमच्याबाबतीत सर्व ठरवणार. आणि आमच्याकडे देणार, आणि महासभेच्या मंजूरीमध्ये आणणार, आज जसे चौधरी साहेबांनी सांगितले हयाच्यामध्ये हिंदू धर्म मेलेला आहे. या शांतता क्षेत्रामध्ये हिंदू धर्म मेला आणि तो मारला गेला कारण हया वर्षी गणपती उत्सव आणि नवरात्र उत्सव झाले नाही, दहीहंडी उत्सव झाले नाही. जर का त्या ज्या शाळा आहेत, त्या शाळा जर का शांतता क्षेत्रामध्ये आहेत, मग त्यांचे गॅदरींग कसे? आणि त्यांच्या गॅदरींग कुठे होतात? त्यांनी गॅदरींग घेतले तेव्हा शांतता क्षेत्र नाही का? शाळेच्या आवारात त्या रस्त्यावरती वाहने उभी राहतात, रिक्शा, व्हॅन येतात त्यांचे ध्वनीप्रदुषण होत नाही का? हे तुम्ही जे बदल केले हे बदल करायच्या आगोदर हे ११६ ची सूची त्याच्यामध्ये पहिले बदल करण्याकरीता पहिले महासभेसमोर आणायला पाहिजे होती. ही समिती जी गठीत केली आणि ती महासभेसमोर ती आणली, याच्यामध्ये नावे कोणी दिली? ही नावे कशी काय तुम्ही घेतली? कोणी अर्ज केले पेपरमध्ये बातमी दिली होती का? जाहिरात होती का? कसे कळले तुम्हाला की कुठला माणूस कुठे आहे म्हणून.? मा. महापौरजी जर आपण असून सुध्दा जर माहिती होत नसेल की आपल्या शहरात काय होत आहे? आपण काय सांगणार? महापौरजी ११६शांतता क्षेत्राच्या यादीला रदद करून ४८ करण्यात आले हे कोणला माहिती नाही? महापौर साहिबा तर असे असेल तर शांतता क्षेत्रामध्ये प्रत्येक नगरसेवक, प्रत्येक विभागातील लोकांना विचारले पाहिजे कि हे शांतता क्षेत्र ठेवणे गरजेचे आहे का नाही आहे? त्याचे निकष ठेवले पाहिजे. आपण विचारले पाहिजे, प्रत्येक शाळा जर शांतता क्षेत्र म्हणून घेषीत केले, तर त्या ठिकाणी माताची ज्योत होत असते. आजूबाजूला राहणारे लोक माताची ज्योत करत असतात, तर ते करू शकत नाही का? जागरण तर दिवसा होत नाही तर रात्री करायचे नाही. जर आपण शांतता क्षेत्र घोषीत केले आहे तर यापूर्वी आपण वर्तमानपत्रामध्ये जाहीरात दिली होती का? की इतके इतके शांतता क्षेत्र आहेत. यामध्ये कोणाला हरकती असतील तर घेवून याव्यात आणि नसतील तर का?

**<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारेः—</u>** ही जी माहिती देताय ती चूकीची आहे. या ठिकाणी तुमचे गॅझेट आहे. त्याच्यामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे, शेवटचे वाक्य दोन्ही मानकांच्या प्रयोजनासाठी मुख्य नियमातील विहीत तरतूदीनुसार, औदयागिक वाणिज्यक राहिवास किंवा शांतता क्षेत्र म्हणून वर्गीकृत करीत असल्याचे अधिसुचित करण्यात येत आहे. याच्यामध्ये औदयागिक, वाणिज्यक आणि रहिवास हे कुठे आहे ते आम्हाला दाखवा. चार क्षेत्र तुम्ही घेषीत केलेले आहेत याच्यात म्हटलेले आहे. लक्षात आले का साहेब?

**<u>प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंतः—</u>** सर मी यादी वाचून दाखवते, सेंट्रल हॉस्पीटल आहे, सर आपण कमर्सिअल आणि रेसीडेन्सीअल झोन दाखविलेला आहे.

**सदस्य, श्री.धनंजय बोडारे:—** इथे तर तुम्ही फक्त शांतताच लिहिलेले आहे, सगळे शांतताच लिहीले आहे कुठेच वाणिज्य औदयोगिक लिहिलेले नाही?

**सदस्य, श्री. अरूण आशान:—** हे झोनीग तुम्ही डी.पी. प्रमाणे घेतलेले आहेत का? तुम्हाला माहिती आहे म्हणून घेतलेले आहेत.

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** डी.पी. प्रमाणे घेतलेले आहेत

**सदस्य, श्री.धनंजय बोडारे:—** ,सगळे सायलेन्स, म्हणजे माहिती देतात ती चूकीची आहे. सगळे तुम्ही शांतता लिहिलेले आहेत. आणि अधिसुचनामध्ये काय म्हटलेले आहे. औदयोगिक वाणिज्यक, रहिवास हे कुठले कुठले क्षेत्र तुम्ही चार क्षेत्र आम्हाला दाखवा? इथे तुम्ही फक्त ४८ शंतता क्षेत्रे घेषीत केलेले आहेत.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** ही जे माहिती देताहेत चूकीची माहितीदेत आहेत, तुम्ही आम्हाला माहितीसाठी सादर केलेले आहे ते पूर्णपणाने चूकीची माहिती आहे. त्याला तुम्ही दुरूस्त करून आणा. त्याच्यानंतर आम्हाला माहिती दया सध्या आम्ही ही आपली माहिती स्वीकारत नाही, ती तुमची माहिती घेत नाही.

**सदस्य,श्री राजेश वदारिया:—** मा. महापौरजी, महाराष्ट्र शासनाचा पर्यावरण विभाग दि. ३ मे २०११चे जी. आर.च्या हिशोबाने स्थानिक स्वराज्य संस्थेला हे लक्षात ठेवायचे आहे की प्रदुषण हवेमध्ये, पाण्यामध्ये आणि इतर कोणत्याही ठिकाणी नाही झाले पाहिजे. त्याची जबाबदारी जी आहे ती स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे लोकल सेल्फ सरकारला आहे. ज्यामध्ये प्यारार्ग्रॉफ नं. ८ मध्ये र्प्यावरण संग्रहाचे साजरीकरणाबाबत जनजागृती करणे,जनजागृती करण्यासाठी जो कमिटी बनविली जाते ही कमीटी बनवायची जबाबदारी लोकल सेल्फ सरकारची आहे, याचाच अर्थ महासभेची आहे. आयुक्तांची नाही आहे. यासाठी जो आयुक्तांनी माहिती प्रधान करण्यसाठी आम्हाला दिलेली आहे. आता त्यास रदद् करत आहेत, आणि आयुक्त यांना सुचना देत आहेत की ही समिती आपण परत बनविण्यात यावी आणि आमच्या समोर आणावी.

**सदस्य,श्री.राजेंद्र चौधरी:—** ती रदद् केलेली प्रत याठिकाणच्या स्थानिक पोलिस स्टेशनला देण्यात यावी. कारण की कमिटी आहे म्हणून परवानगी देत नाही. तुमच्या माहापालिका परवानगी देत नाही हे पण सांगा की हा ठराव आम्ही रदद् केलेला आहे.

**प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीमती विशाखा सावंत:—** सर कमिटी.

**सदस्य, श्री राजेश वदारिया:—** आपण जी माहिती दयायची होती ती दिलेली आहे. आम्ही आमचा ठराव केलेला आहे.मॅटर इज ओव्हर.

**सदस्य, श्री.धनंजय बोडारे:—** याबाबतीत तुम्हाला माहिती आहे, आम्ही त्याला ठराव देतो की सर्व नगरसेवक आहेत, यापूर्वीची शांतता कमीटी आता देण्यात आलेली आहे ती सर्व चूकीची आहे यात सर्व क्षेत्रे घेषीत करणे आवश्यक होत तसे न करता लोकांना त्रास कसा दयायचा अशा प्रकारचे शांतता क्षेत्र घोषीत केलेले आहे. आणि तेही आयुक्तांनी आयुक्तांच्या अधिकारामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था महासभेसमोर न आणता केले आहे. त्यामुळे नंतर आम्ही तुंम्हाला शांतता क्षेत्र कुठले किंवा रहिवास क्षेत्र

कुठले? त्याच्याबाबतीत आम्ही सुचना देवू. तो पर्यंत आगोदरची असलेली सूची शांतता ही रदद् करण्यात येत आहे.

या वेळी महापौर, श्रीमती पंचम कालानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला आणि आपल्या जागेवर आसनस्थ झाल्या.

**महापालिका सचिव:—** जे साहेबांनी सांगितले ते सर्व मुदद् ठरावात घेवून अमान्य करत आहे हा प्रस्ताव. पण ते लिहावे लागतील का अमान्य आहेत.कारणे

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६:—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी ४८ ठिकाणे शांतता क्षेत्र म्हणुन घोषित केलेल्या अधिसुचना व जनहित याचिका क्र. १३२५/२००३ अन्वये शासनाने समन्वय समिती गठीत करण्याबाबत दिलेले शासननिर्णय व त्यानुसार स्थापन केलेली समन्वय समिती याबाबत माहितीची नोंद होणेकरीता.

**प्रस्तावना**

ध्वनी प्रदुषण नियम २०१७ अन्वये शासनाच्या नगर विकास विभागाकडील दिनांक १६ जुलै, २०१८ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ३० जुन, २०१८ रोजी उल्हासनगर शहरासाठी ४८ ''शांतता क्षेत्र'' म्हणुन घोषित केलेल्या ठिकाणांची अधिसुचना प्राप्त झाली आहे.

शासनाने घोषित केलेल्या शांतता क्षेत्रांची अधिसुचना तसेच जनहित याचिका क्र. १३२५/२००३ यासंदर्भात मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार व शासनाच्या पर्यावरण विभागाकडील शासन निर्णय दिनांक ०३ मे, २०११ नुसार दरवर्षी साजरा होणा—या सणांचे पर्यावरणपुरक साजरीकरण होणेसाठी शासनाने निश्चित करून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन व जनजागृती करणेकरीता गठीत केलेल्या समन्वय समितीची सर्व सन्मा.सदस्यांना माहिती होणेकरीता जनहित याचिका क्र. १३२५/२००३ अन्वये शासनाने समन्वय समिती गठीत करण्याबाबत दिलेले शासननिर्णय व त्यानुसार स्थापन केलेली समन्वय समिती याबाबत माहितीची नोंद होणेकरीता मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** ३२ **दिनांक:—१९/१०/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी ४८ ठिकाणे शांतता क्षेत्र म्हणुन घोषित केलेल्या अधिसुचना व जनहित याचिका क्र. १३२५/२००३ अन्वये शासनाने समन्वय समिती गठीत करण्याबाबत दिलेले शासन निर्णय व त्यानुसार स्थापन केलेली समन्वय समिती याबाबत माहितीची नोंद करण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

**कारण**

१) हा माहितीसाठी आलेला प्रस्ताव चुकीचा आहे, आयुक्तांनी महासभेसमोर आणणे आवश्यक होते तसे न करता माहितीसाठी आणला आहे.

२) यामध्ये औदयोगीक, वाणिज्य आणि रहिवास यांना अधिसुचित करीत असल्याचे म्हटले आहे परंतु त्यामध्ये त्याचा समावेश नाही.
३) महाराष्ट्र शासनाचा पर्यावरण विभाग दिनांक ३ मे २०११ च्या शासन निर्णयानुसार पर्यावरणासाठी जी समिती बनविली आहे ती बनविण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे म्हणजेच महासभेची आहे त्यामुळे यास आम्ही अमान्य करीत आहे व हे क्षेत्र माहितीसाठी न देता महासभेसमोर मान्यतेसाठी आणण्यास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :– प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील चारही स्मशानभुमी महापालिकेच्या ताब्यात घेणेबाबत पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे:–** मला मा.महापौरजी, एवढा चांगला विषय आहे, या विषयावर चर्चा करावयाची ऐवजी आमचे सन्मानीय सभागृहनेते, सुपर महापौर ते जर असे बोलायला लागलेतर मला वाटते कदाचित मी चुकीच्या ठिकाणी चूकीचा विषय आणला असे वाटते. परंतु मी माझी जी आमच्याकडे चार नंबरला स्मशान भूमी आहे, मुक्तीभूमी स्मशानभूमी याची अवस्था अत्यंत बिकट आहे. जर इतर सदस्यांना वाटत असेल, स्मशान भूमी २ नंबरची, ३ नंबरचीकिंवा ५ नंबरची चांगली आहे त्याबददल त्यांनी आपले म्हणणे मांडावे म्हणजे मला सांगता येईल, २, ३, ५ नंबरची स्मशानभूमी त्यांबददल त्यांनी आपले म्हणणे मांडावे त्यांनी पहिले म्हणणे मांडावे मी ४ नंबरची स्थिती अवगत करतो. मग आपल्याला निर्णय घ्यायला सोपे जाईल. कृपया बोला २ नंबर बोला.

**सदस्य,श्री राजेश वदारिया:–** प्रस्ताव आपण ठेवला आहे पहिले आपण बोला. प्रस्ताव ठेवा नंतर आम्ही चर्चा करतो.

**सदस्य, किशोर वनवारी:—** पहिली गोष्ट म्हणजे ५ नंबरची स्मशान भूमीची हालत खराब आहे. तिथे कंपाऊड पूर्ण पडलेले आहे.

- **सदस्य श्री.सुनिल सुर्वे:—** म्हणजे सर्व सदयांची भावना ही आहे. की आपल्याला सगळया स्मशानभूमी ताब्यात घेतल्या पाहिजेत. आपण एवढी मोठी महानगरपालिका म्हणून म्हणतोय आज आमच्याकडे ४ नंबरला मुक्तीभूमी स्मशानभूमीची अवस्था अत्यंत बिकट आहे. तिथे आपण लाकडाचा पूर्ण खर्च करतो. तो करून देखील तिथे कमीत कमी ४०० रूपये चार्ज लावला जातो. लाकडे मोफत आहेत असे आपण सांगतो.रू.४०० घेतो आणि तिकडचे ट्रस्टचे वेगळे पैसे जवळ जवळ हजार रूपये जातात. एखादया गरीबाची अवस्था बिकट असताना जास्त त्यांना अडचणी येतात. दुसरे म्हणजे लहान मुले पूरायची जी जागा आहे तिथे काहि अनधिकृत बांधकामे झालेली आहेत, लहान मुले पूरायची जी जागा आहे तिथे ती राहीलेलीच नाही ही अवस्था आहे. ती स्मशानभूमी आपल्या ताब्यात घ्यावी ४ नंबरची असे मी प्रशासनाला हा प्रस्ताव देत आहे. ४ नंबर स्माशानभूमी आपल्या ताब्यात घ्यावी. धन्यवाद.
- 
- **सदस्या, श्रीमती ज्योत्सना जाधव:—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, गेली दीड वर्ष मी उल्हासनगर ४ इथल्या लहान मुलांच्या स्मशानाच्या स्वच्छतेबाबत प्रश्न करत आहे. प्रत्येक वेळी मला हेच उत्तर दिले जाते की मॅडम ते अधिकार संस्थेचे आहेत आपल्याकडे नाही आहेत, पण मग संस्था त्या स्वच्छतेकडे लक्ष देत नाही मग महानगरपालिकेचे काम नाही आहे का? तिथे स्वच्छतेकडे लक्ष दयावे म्हणून गेली दीड वर्ष मी कचरा कुंडीची मागणी करते आहे. अजून पर्यंत तिथे कचरा कुंडी तिथे उपलब्ध नाही आहे. येणारी लोक तिथे लहान मुलांची कपडे, खेळणी इतर काही सामान तिथेच टाकून जातात. अजून पर्यंत कचराकंडी उपलब्ध करून देत नाही, बरोबर दीड वर्ष मी त्या लोकांना तिथे सांगते. तिथे आपण येवून पहा नाही तर महापौर मॅडम आपण भेट दयावी. लहान मुलांच्या अस्थी कवटयाए तेथे विखुरलेल्या आहेत. कुणाचे तिथे नियोजन नाही आहे. काहीच नाही आहे. जर संस्था तिथे लक्ष देत नाही तर महानगरपालिकेने ते आपल्या अधिकारात घ्यावे असे वाटत नाही आहे का? आम्ही त्या दफन भूमीच्या सुशोभीकरणच्यासाठी डागडुजी साठी सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्रवयवहार सुध्दा करण्यात आलेला आहे. या आगोदर सुध्दा सन्मानीय आयुक्त निंबाळकार साहेब , वेळो वेळी मला त्या गोष्टीसाठी मदत केलेली आहे. पीडब्ल्युडीला त्याचे एस्टीमेंट बनविण्याचे आदेश सुध्दा देण्यात आलेले आहेत. अजून पर्यंत पीडब्ल्युडीने त्याचे एस्टीमेंट बनविलेले नाहीत. माझी आपणास एवढीच नम्र विनंती आहे की महानगरपालिकेने ती दफन भूमी आपल्या अधिकारात घेवून त्याचे एस्टीमेंट बनविण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात यावेत एवढीच माझी नम्र विंनती आहे.
- 
- **सदस्य,श्री.राजेंद्र चौधरी:—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सुर्वेजीने जो अशाकीय प्रस्ताव आणला आणि चार नंबरच्या स्मशानभूमी बाबतीत परिस्थिती फार गंभीर आहे. लहान मुलांची जी स्मशानभूमी आहे त्याचा उल्लेख केला त्या स्मशान भूमीमध्ये डुकरे तिथे आहेत आणि जसे प्रेत तिथे पूरले ते डुकरे जावून ते प्रेत उकरून काढतात. आणि त्याची दुर्दशा करतात. ही इतकी गंभीर बाब आहे ही आपल्या दृष्टीकोनातून आणि तिथे जे काही काम करणारे कर्मचारी आहेत, त्यांचे आजिबात लक्ष नाही.ते त्याची दादागीरी तेथे चालते ते कोण आपल्या महापानिकेचे कर्मचारी आहेत आणि अनधिकृत रित्या तिथे बांधकामे केलीत गेल्या अनेक वर्षापासून आम्ही महापालिकेच्या हया सगळया बाबी निदर्शनास आणून देवून पण महानगरपालिकेच्या माध्यमातून कुठली कारवाई होत नाही. त्या महापालिकेच्या कर्मचा—यांना आपली महापालिका घाबरते असा माझा आरोप आहे. जर अनाधिकृत बांधकाम त्या जागेवर केले असेल त्याची मालकी टॅक्स पावत्या वैगेरे काढल्या असतील तर त्याच्यावर कारवाई महापालिकेने केली पाहिजे. महापौरजी ही बाब फार गंभीर आहे. आपण चांगल्या प्रकारे लक्ष दया, जर कोणी दादागीगीरी करून महापालिकेची जागा आपली स्वत:ची बनवत असतो व टॅक्स पावती काढली जाते आणि ते पण ज्या ठिकाणी लहान मुल फन केले जातात. ही स्मशान भूमी आपलया कब्जात करत आहेत हयाच्या पेक्षा गंभीर बाब कोणती असू शकते? यावर आपले लक्ष असायला पाहिजे ही माझी विनंती आहे. त्या स्मशानभूमीत आतापर्यंत त्या ठिकाणी गाडया धुतल्या जातात. आणि आमची जी ट्रस्ट जी आहे ती तिथे काम करत नाही. ट्रस्टला तिथे काम करणारे लोक दादागीरी करून दाखवत आहेत. असे या संस्थेचे म्हणणे आहे. आपण ट्रस्टकडून सुध्दा माहिती घेवू शकता. याच्यावर आपण लवकरात लवकर उपाययोजना करावी. शहरात काही दुसरे करत नसाल तर कमीत कमी स्मशान भूमी तर सुधारू शकतात हे चांगल्या प्रकारे कामे करण्याचा प्रयास आपल्या माध्यमातून करण्यात यावा.
- 
- **सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौरजी, उल्हासनगर १ आणि उल्हासनगर ३ मध्ये

.

- **सदस्य, श्री.सुरेंद्र सावंत:—** राजेश जी दोन मिनीट.उल्हसनगर ४ नंबरची जी स्मशान भूमी आहे. त्या स्मशान भूमीमध्ये भरपूर प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. आपल्या महानगरपालिकेतर्फे अंत्यविधीसाठी चार

ठिकाणी मोफत लाकडे वाटप केले जातात. परंतु लाकडे मोफत दिल्यानंतर सुध्दा तिकडे प्रत्येकाकडने जे अंत्यविधी साठी येतात त्याच्याकडून ४०० रूपये अतिरिक्त घेतले जातात.४०० रूपये खर्ची पाणी देतो तो आपला प्रश्न असतो. परंतु ४०० रूपये लाकडासाठी घेतात आणि ४०० रूपये अतिरिक्त घेतात त्यामुळे नंतर रॉकेल त्या ठिकाणी उपलब्ध नसते. रोकेल आपल्याला बाहेरून काळया बाजारातून घ्यावे लागत. अंत्यविधीसाठी रॉकेल जर आपल्याला काळया बारजारातून न्यावे लागत असेल या सारखा मोठा भ्रष्ट्राचार या महापालिकेच्या हदित कुठे नसावा असे मला वाटते. रॉकेल जर भ्रष्ट्राचार करून त्या ठिकाणी घेत असेल महापालिकेतर्फे त्या ठिकाणी जर महाराष्ट्र शासनाच्या रेशन दुकानातून उपलब्ध केले तर एक चांगला रॉकेल पायंडा पडेल त्या ठिकाणी त्याच प्रमाणे जी लाकडाची व्यावस्था आहे ती सध्या लाकूड फार कमी प्रमाणात उपलब्ध होत असतो. त्यासाठी माझी आपणास एक नम्र विनंती आहे की त्याठिकाणी आपण एक विदयुत भट्टी बसवावी. एक अंबरनाथ सारख्या छोटया नगरपालिकेत आपण तिकडे गेले तर त्याच्या नगरपालिकेत त्याच्या स्मशानभुमी मध्ये एक त्या विदयुत दाहीनीमध्ये एक प्रेत टाकले तर फक्त २५० रूपयामध्ये संपूर्ण विधी पूर्ण होतो. आपण तशी विदयुत भट्टी का बनवू शकत नाहीत. मी चौकशी सुध्दा केली त्या विदयुत भटटीची जास्त किमंत सुध्दा नाही २५ ते ३० लाख रूप्ये किमंत असावी त्या विदयुत भटटीची. पण चांगला पायंडा पडेल त्याठिकाणी अंबरनाथ सारख्या नगरपालिकेमेध्ये आपण भटटी बसवू शकतो तर आपण का बसवू शकत नाहीत. आपल्याकडे ८०० कोटीचे बजेट असल्याने एक २५ ते ३० लाखाची विदयुत दाहीनी बसवावी अशी मी आपणास विनंती करतो. आणि त्यानंतर त्या स्मशानभुमीचे जर खाजगीकरण झालेले आहे कुठल्यातरी संस्थेने ते आपल्या ताब्यात घेतलेले आहेत त्यांच्याकडून ती आपल्या ताब्यात घ्यावी महराष्ट्रातली अशी एकमेव महानगरपालिका असेल ज्या महानगरपालिकेकडे स्वत:ची स्मशानभुमी नाही. हे मोठे दुर्देव आहे महाशय, महानगरपालिकेकडे आपली स्वत:ची स्मशानभूमी नाही ही अशी एकमेव महानगरपालिका असेल. आपल्या सगळयाच्या सगळया स्मशानभुमी ट्रस्टच्या ताब्यामध्ये आहेत. हया स्मशानभूमी प्राव्हेट ट्रस्टच्या ताब्यामध्ये असल्याने त्याठिकाणी प्रचंड भ्रष्ट्राचार चालतो आता मी ४ नंबरचे उदाहरण दिले आपल्या कडे जर सुधारण करायची असेल तर त्वरीत प्रायव्हेटशन थांबवावेत अशी मी आपणास विनंती करतो.

•

**<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u>** मा. महापौर मा. आयुक्त साहेब, ४ नंबर स्मशानभुमीची परिस्थिती जर आता हया सर्वानी सांगितले जिथे मोफत लाकडे आहेत तिथे हजार रूपये खर्च तिथे रात्री ९ च्या नंतर जर कुठले प्रेत न्यायचे तर प्रेत गेटच्या बाहेर तिथे पाण्याची सोय बिल्कुल नाही. तरी तिथे गाडया धुतल्या जातात. म्हणजे ही वास्तविक परिस्थिती आहे आणि तिथल्या कर्मचा—याची दादागीरी हे सर्व महत्वाचे प्रश्न आहेत. माझे म्हणणे आहे की ४ नंबरची स्मशानभुमी ताबोडतोब महानगरपालिकेने ताब्यात घेतली पाहीजे, अन्यथा मागील वेळेस देहेरकर साहेब माझे उपोषण सोडवायला तिथे आले होते. भदाणेंच्या निलंबनासाठी यावेळेस ती ताब्यात नाही घेतली तर मी पून्हा उपोषणाला बसेन आणि तूम्हाला पून्हा यावे लागेल. धन्यवाद.

**<u>सदस्य,श्री. राजेश वदारिया:—</u>** मा. महापौरजी जो चौधरी साहेबांनी आरोप लावले आहेत, ते फार गंभीर आरोप आहेत जो आमचेच कर्मचारी त्या ठिकाणी सांभाळत आहेत, तर मी त्याच्यासाठीही निवेदन करतो की जर त्यांच्या आठवणीत अशी टॅक्स पावती, टॅक्सचे बील असेल तर कृपया ते महापौरांकडे किंवा आयुक्तांकडे सुपूर्द करण्यात यावे. माझो पूर्ण होवू दया माझी अशी सलाह आहे की मा. महापौरजी आपण आपल्याकडे, आयुक्तांकडे आणि बाकी अधिकारी , सभागृह नेता, सभापती स्थायी समिती, विरोधी पक्षनेता उपमहापौर आयुक्त साहेंबाना बोलावून आणि चार स्मशानभूमी जे वेगवेगळे ट्रस्ट सांभाळत आहेत १ नंबर, ३ नंबर,४ नंबी आणि ५ नंबर येथील ट्रस्टीना सुध्दा बोलावून त्यांना सूचचना देण्यात दव्यात की यापूढे आपल्याला कशाप्रकारे हया स्मशानभूमी सांभाळायच्या आहेत कुठे कुठे काय कमी पडत आहे? ते दूर करून इन्क्रूजमेंट होवू न देता जसे की ५ नंबरमध्ये भिंत पडली आहे आणि अजून काही अडचणी असतील तर शहर अभियंता जावून तेथे भेट देवून येणे सर्व जागांवरती काय काय अडचणी आहेत ते सादर करून त्याचे एस्टीमेट बनवून त्याचे कामे करून घेण्यात यावीत आणि आपण आपल्याकडे एक मिटींग बोलावण्यात यावी. धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u>** महापौर साहेबा, उल्हासनगरची ५ नंबरची जी स्मशानभुमी आहे, माझ्या हिशोबाने तिथे कोणाचीच तक्रार येत नाही. तिथेले जे सेवाधारी आहेत, ते नेहमी प्रत्येक गोष्टीवर लक्ष ठेवत असतात आणि आमचे जे स्वामीजी आहेत, देवप्रकाशजी महाराज त्यांचा भरपुर संयोग राहत असतो. मी आपल्याला एक विनंती करतो की, चारही स्मशानभुमीमध्ये एक लिपीक काम करीत होते. सर्व नगरसेवकांना विनंती आहे की, हा खुपच महत्वाचा मुद्दा_आहे. हा चारही स्मशानभुमीसाठी आहे. महापौरां समोर एक सच्चाई ठेवणार नाही. तर याच्यावर निर्णय कसा होईल? आपले रिझवानी साहेब बसले आहेत. त्यांच्याकडून माहीती घेऊ पहीले प्रत्येक स्मशानभुमीमध्ये एक लिपीक राहत होते, तो लिपीक मृत्य

झालेल्या माणसाची नोंद स्वत: करीत होता. काही वर्षा पासून ते लिपीक काढून टाकले आहेत. कारण की आपण स्मशानभुमीशी कित्येक वर्षापासून जोडले गेलो आहोत. किशोर लालजी पण आपल्याला सांगतील जे सत्य आहे, जिथे जिथे आपली कमी आहे. त्या त्रुटी जर आपण महापौरां समोर ठेवणार नाही तर त्याचे निर्वारण कसे होणार?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** डॉ. रिझवानी साहेब ते लोक पैसे का घेतात? खुलासा तरी करा, आम्ही फुकट देतो की पैसे घेतो.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** कृपया मला बोलू दया आणि जे माझ्या भावांनी सांगितले आहे की, स्मशानभुमी महानगरपालिकेने आपल्या ताब्यात घ्यावी. जिथे जिथे आपल्याला त्रास आहे, तिथे तुम्ही जो निर्णय घ्यायचा आहे, तो निर्णय घ्या. परंतु जिथे कोणतीही समस्या नाही आहे आणि लोकांची कोणतीच तक्रार पण नाही. महानगरपालिकेकडून जर काही समस्या असतील तर ती समस्या दुर करा.तर एक लिपीक आणि जी लाकडे आपण फ्रीमध्ये देतात. स्मशान भुमीकडून माहीती येते की, आपले निंबाळकर साहेब, यांनी ३ लाख रूपये दिले होते. एक एक स्मशानभुमीसाठी निंबाळकर साहेबांनी ॲडव्हान्समध्ये ३ लाख रूपये दिले होते. आज गरज अशी आहे की, भरपुर गरीब लोक फ्रीमध्ये लाकडे घेतात. त्यांना काही त्यांना वेळेनुसार लाकडे मिळतात. बाकी जे ४०० रूपये सांगितले जातात, ते ४०० रूपये जाळण्यासाठी जो माणूस ठेवला आहे, आणि अजून ज्या गरजेच्या गोष्टी आहेत, स्मशानभुमीमध्ये पैसे कुठून आणणार. साफसफाई कशी होणार? तर खुप गरजेचे आहे, ट्रस्टी लोकांनी विचार करून ४०० रूपये किंमत ठेवली आहे. तरी कृपया असे झाले नाही पाहीजे की, स्मशानभुमीमध्ये समस्या वाढणार नाहीत. चार नंबरमध्य खरोखर तिथे जे काम करणारे आहेत, ते खुप दादागिरी करतात, लोकांच्या खुप तक्रारी आहेत, एका रात्री मी गेलो होतो, एक वृध्द महीला मृत्युं झाली होती, तेव्हा त्यांच्याकडून ३ हजार रूपये घेतले गेले. १७०० रूपये घ्यायला पाहीजे होते, तर ३ हजार रूपये घेतले. ही खुप दु:खाची गोष्ट आहे, जर कोणी माणूस मृत्यु पावतो, तेव्हा स्मशानभुमीमध्ये घेऊन जातात, तेव्हा तिथे खुप त्रास होतो, मा. महापौर साहेबा, विनंती आहे की, सत्य तपासून कारवाई करण्यात यावी.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** दादा हा विषय नंतरच्या मिटींगमध्ये घेण्यात येईल.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** धन्यवाद, मी सत्य सांगत आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, विषय जो सुर्वे साहेबांनी आणला तो खुपच गंभीर विषय आहे. जसे सदस्य, श्री. राजेश वदारिया यांनी सांगितले की, सर्व ट्रस्टी यांना बोलावून सभागृहाचे सर्व पदाधिकारी आणि गटनेता यांना बोलावून याचे समाधान काढले पाहीजे, आपल्या चार स्मशानभुमी आहेत. त्यामध्ये व्यवस्था करू शकतो आणि आपल्या महानगरपालिकेमध्ये जे कमी आहे, त्रुटी आहेत, तिथे वेळेवर फॉर्म भरण्यासाठी आपला अधिकारी असला पाहीजे. लाकडे कशा प्रकारे दिली जातात. त्याची व्यवस्था कशी आहे, या सर्व गाष्टींवर मा. महापौरजी आपण एकत्रीत बसून रस्ता काढण्यात यावा आणि हे एक चांगले कार्य होईल आणि मी सुर्वेजींना धन्यवाद देतो की, त्यांनी हा विषय आणला आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मी हा प्रस्ताव मागे घेत आहे.

**महापालिका सचिव:—** या विषयामध्ये ठराव काय करायचा आहे? अमान्य, मागे घेत आहेत, ठिक आहे, प्रस्ताव मागे घेतल्याने संपुष्टात येत आहे.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

➪**विषय क्र. ८ :— प्रस्तावाची सूचना**

प्रभाग क्र. १३ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याबाबतचा पालिका सदस्य, श्री. सुमित सोनकांबळे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** पास..पास..सर्व समंतीने पास..

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** यामध्ये निधी उपलब्ध करून...

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** महानगरपालिकेने निधी उपलब्ध करून दयायला पाहीजे.

**महापालिका सचिव:—** महापालिकेने निधी उपलब्ध करून दयावा, असे ठरावात टाकत आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र. ८:— प्रस्तावाची सूचना**

प्रभाग क्र. १३ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याबाबतचा पालिका सदस्य श्री. सुमित सोनकांबळे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्र. १३ हा राखीव प्रभाग असून येथे बहूतांशी अनुसूचित जाती जमाती/मागसवर्गीय नागरीकांची वस्ती आहे. प्रभाग क्र. १३ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धाकृती पुतळा बसविण्यात आला आहे. सदर ठिकाणी पुर्णाकृती पुतळा बसविण्यात यावा अशी स्थानिक नागरीकांची मागणी असून महापालिका प्रशासनाने देखील पुर्णाकृती पुतळा बसवून चौकांचे सुशोभिकरण करण्याचे कामास मंजूरी दिलेली आहे. परंतू आजतागायत पुढील कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने नागरीकांना तिव्र नाराजी पसरली आहे. कृपया सदर प्रस्तावावर सभागृहात चर्चा होवून प्रभाग क्र. १३ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकुती पुतळा बसविण्यात येवून चौकाचे सुशोभिकरण करण्याची कारवाई करण्यात यावी अशी विनंती करणारी लक्षवेधी सूचना मांडलेली होती. परंतू प्रशासनाने तांत्रिक कारण पूढे करुन मागासवर्गीय नागरीकांच्या जिव्हाळयाचा तसेच सदर महत्वाच्या प्रस्तावावर महासभेत चर्चा होवून तातडीने कारवाई करण्यात यावी ही विनंती.

**महासभा ठराव क्र:** ३३ **दिनांकः—१९/१०/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. सुमित सोनकांबळे

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे प्रभाग क्र. १३ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकांचा पुर्णाकृती पुतळा लवकरात लवकर बसवून चौकाचे सुशोभिकरण करण्यास व त्यासाठी महापालिकेने निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र.९ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ९ प्रस्तावाची सूचना**

महापालिकेत पद रिक्त असतांना देखील अनुकंपा तत्वावरील कर्मचा—यांच्या कुटुंबास कायमपदावर घेण्यास होत असलेल्या दिरंगाईबाबत येत्या महासभेमध्ये चर्चा होवून निर्णय होणेबाबत पालिका सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

चौधरी सर नाहीत.

————————————————————————————————————————

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम आणि सन्माननिय सदस्य, हा जो अनुकंपाचा विषय आहे,

**<u>महापालिका सचिव :—</u>** सुर्वे साहेब, आहेत ना, तुम्ही बोलू शकता.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** मॅडम चर्चा झालेली आहे. प्रस्ताव देत आहे.

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u>** मी आयुक्त साहेबांना सांगतो की, शासनाचा जी.आर. आहे की, अनुकंपा तत्वावरील सगळयांना घ्यायचे आहे, आदेश आहे.

**<u>महापालिका सचिव :—</u>** एक मिनीट मी वाचते ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ व अनुसूचीतील प्रकरण ३ मधील कलम २ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन महासभेच्या आस्थापनेवर अनुकंपा तत्वावर (ठोक वेतनावर) कार्यरत सर्व कर्मचा—यांना ज्या पदावर व संवर्गात ते कार्यरत आहेत किंवा अर्ज प्राप्त झालेले आहे. त्यांना त्या त्या पदावर वर्ग क व ड मध्ये कायमस्वरुपी नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे. ज्या कर्मचा—यांची नियुक्ती वर्ग ड मध्ये करण्यात आलेली आहे परंतु त्यांनी वर्ग क मधील पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता अर्हता धारण केली आहे त्यांना वर्ग क मध्ये समाविष्ट करण्यात यावे. तसेच कुटुंबातील पात्र सदस्यास ज्या व्यक्तीसाठी नोकरी मिळणेस संमती दिली आहे त्या व्यक्तीची महापालिकेच्या आस्थापनेवर अनुकंपा तत्वावर स्थायी पदावर नेमणूक करण्यात यावी. तसेच किमान वेतन अधिनियम व इतर कामगार कल्याण अधिनियमातील तरतूदीनुसार महापालिकेच्या आस्थापनेवर अस्थायी पदावर कार्यरत सर्व कर्मचा—यांना किमान वेतन, विशेष भत्ता, घरभाडे भत्ता, गणवेश व पावसाळी साहित्य, धुलाई भत्ता, ई.पी.एफ. वर्गणी व ई.एस.आय.सी.ची वर्गणी या सर्व भत्ते व फायदयाची रक्कम त्यांना नियुक्तीच्या दिनांकापासुन दिवाळी सणाच्या अगोदर देण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** पास...पास....

**<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास.. आठ दिवसांच्या आत.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. ९:—<u>प्रस्तावाची सूचना</u>**

महापालिकेत पद रिक्त असतांना देखील अनुकंपा तत्वावरील कर्मचा—यांच्या कुटुंबास कायमपदावर घेण्यास होत असलेल्या दिरंगाईबाबत येत्या महासभेमध्ये चर्चा होवून निर्णय होणेबाबत पालिका सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेतील विविध विभागात विविध पदे मोठयासंख्येने रिक्त आहेत. या रिक्त असलेल्या पदांमुळे कार्यालयीन कामकाजावर ताण पडून एकाच अधिकारी व कर्मचारी वर्गाला आपले काम

सांभाळून दोन दोन पदावर काम करावे लागत आहे. असे असतांना महासभेच्या सभेमध्ये देखील नगरसेवकांमार्फत लक्षवेधीवर चर्चा होवून पदे भरण्याबाबत सूचना करण्यात आल्या होत्या. तसेच अनुकंपावरील प्रकरणे बाबत संबंधीत कर्मचा—यांच्या वारसास शासन धोरणेनुसार कायमपदावर घेण्याबाबत वारंवार प्रशासनास सूचना करुनही त्यांना अदयापपर्यंत घेण्यात आले नाही. महापालिकेने अनुकंपा तत्वावरील कर्मचा—यांच्या वारसास माणुसकीच्या दृष्टीकोनातून व त्यांचा उदरनिर्वाहाचा विचार करता ठाणे महानगरपालिकेने केलेल्या ठरावानुसार महासभा ठराव क्र. २३६, दिनांक २४/११/२०१० रोजी ठोकवेतनावर घेण्यात आले. ठाणे महानगरपालिका अशा ठोकवेतनावर घेण्यात आलेल्या कर्मचा—यांच्या वारसांना दरवर्षी कायम पदावर शासनधोरणेनुसार व विशेष बाब म्हणून घेत आहे. परंतु उल्हासनगर महानगरपालिका प्रशासन येथे कोणतेही प्रकरणी न्याय देण्यास वेळकाढुपणा करीत आहे. त्यामुळे अनुकंपा तत्वावर ठोकवेतनावर घेतांना त्या सर्व वारधारकांनी प्रशासनाने दिलेल्या कागदपत्रांची तजबीज पूर्ण केली असतांना त्या प्रकरणी निर्णय घेतला नसल्याने आजमितीस त्या प्रकरणातील काही वारसाचे वय होत आहे सांगण्यात येवून त्यांना अपात्र ठरविले जात आहे. असे असतांना त्या उमेदवारांची आपल्या मुलास त्या पदावर घेण्याबाबत विनंती केली आहे. तरी अशा सर्व अनुकंपातत्वावरील प्रकरणातील वारसाच्या मुलांना घेण्याबाबत येत्या महासभेमतध्ये चर्चा होवून निर्णय व्हावा ही विनंती.

**<u>महासभा ठराव क्र:</u> ३४** **<u>दिनांक:—१९/१०/२०१८</u>**

सुचकाचे नाव :—श्री. राजेंद्र चौधरी

श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

श्री. दिपक सिरवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ व अनुसूचीतील प्रकरण ३ मधील कलम २ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन महासभेच्या आस्थापनेवर अनुकंपा तत्वावर (ठोक वेतनावर) कार्यरत सर्व कर्मचा—यांना ज्या पदावर व संवर्गात ते कार्यरत आहेत किंवा अर्ज प्राप्त झालेले आहे. त्यांना त्या त्या पदावर वर्ग क व ड मध्ये कायमस्वरुपी नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे. ज्या कर्मचा—यांची नियुक्ती वर्ग ड मध्ये करण्यात आलेली आहे परंतु त्यांनी वर्ग क मधील पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता अर्हता धारण केली आहे त्यांना वर्ग क मध्ये समाविष्ट करण्यात यावे. तसेच कुटुंबातील पात्र सदस्यास ज्या व्यक्तीसाठी नोकरी मिळणेस संमती दिली आहे त्या व्यक्तीची महापालिकेच्या आस्थापनेवर अनुकंपा तत्वावर स्थायी पदावर नेमणूक करण्यात यावी. तसेच किमान वेतन अधिनियम व इतर कामगार कल्याण अधिनमयातील तरतूदीनुसार महापालिकेच्या आस्थापनेवर अस्थायी पदावर कार्यरत सर्व कर्मचा—यांना किमान वेतन, विशेष भत्ता, घरभाडे भत्ता, गणवेश व पावसाळी साहित्य, धुलाई भत्ता, ई.पी.एफ. वर्गणी व ई.एस.आय.सी.ची वर्गणी या सर्व भत्ते व फायदयाची रक्कम त्यांना नियुक्तीच्या दिनांकापासुन दिवाळी सणाच्या अगोदर देण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल

सुचकाची <u>सही/—१)</u>

<u>२)</u>

अनुमोदकाची सही/— १)

२)

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ६.३६ वाजता महापौर तथा पिठासिन अधिकारी श्रीमती पंचम उमेश कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— १५/९/२०१८**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १५/९/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

५

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक १५/९/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत उपमहापौर, श्री. जीवन इदनानी हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३२ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ३ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३३ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३४ | श्रीमती श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३५ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ६ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३६ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३७ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ८ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३८ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३९ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १० | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४० | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ११ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४१ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १२ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा | ४२ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १३ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ४३ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १४ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४४ | श्रीमती सुमन राजेश सच्चदेव |
| १५ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४५ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| १६ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ४६ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १७ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ४७ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १८ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ४८ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १९ | श्रीमती शुभांगीनी निकम | ४९ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २० | श्री. भगवान शंकर भालेराव | ५० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५१ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २२ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५२ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २३ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५३ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| २४ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५४ | श्री. विजय चाहु पाटील |
| २५ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ५५ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २६ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ५६ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २७ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५७ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २८ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ५८ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २९ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ५९ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३० | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६० | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३१ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | | |

तर

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती मिना कुमार आयलानी, २.श्री. हरेश परमानंद जग्यासी, ३.श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ४. श्रीमती पंचम उमेश कालानी, ५. श्री. स्वप्नील मिलींद बागुल, ६. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ७. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ८. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ९. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), १०. श्रीम. दिपा नारायण पंजाबी, ११. श्रीमती पुष्पा नाना बागुल, १२. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, १३. श्री. रवि किशनचंद जग्यासी, १४. श्री. गजानन प्रल्हाद शेळके, १५. श्री. रमेश महादेव चव्हाण, १६. श्रीमती जमिताली राजेश चान्पूर, १७. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, १८. श्री. धनंजय बाबुराव बोडारे, १९. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, २०. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, २१. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, २२. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१.श्री. गणेश पाटील, आयुक्त
२.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी
४.श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता
५.श्री. संतोष जाधव, उप लेखाधिकारी
६.श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
७.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
८.श्री. विनोद खामितकर, कनिष्ठ अभियंता
९.श्री. दिपक ढोले, कनिष्ठ अभियंता
१०. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
११. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१२ . श्री. नंदलाल सामतांनी, प्र. सहाय्यक आयुक्त
१३. श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
१४. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१५. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
१६. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१७. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षारक्षक
१८. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक
१९. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२०. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक
२१. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्रीमती नर्गिस खान, लिपीक
३. श्री. बाळु भांगरे, लिपीक

सायंकाळी ४.२५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

या वेळी पिठासिन अधिकारी म्हणून उप महापौर, श्री. जीवन इदनानी हे आसनस्थ होते.

**<u>महापालिका सचिव:—</u>** या महीन्याची रेगुलर जी सभा ही सायंकाळची ४.०० वाजेची आहे, विषय क्र. १ प्रश्नोत्तरे आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मा. महापौरजी, या मध्ये लक्षवेधी स्वीकर करून ही सभा स्थगीत करण्यात यावी.

**<u>महापालिका सचिव:—</u>** लक्षवेधी केव्हा स्विकारायची असते, जेव्हा प्रश्नोत्तरे वगळण्यात येतील, तेव्हा.

**उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—** सायंकाळची ४.०० वाजेची जी सभा आहे, त्यातून प्रश्नोत्तरे वगळण्यात येत आहेत.

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय :—** प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत

सूचकाचे नांव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नांव :— श्री. राजेश वदारिया

**महासभा ठराव क्र २७ क** **दिनांक :—१५/९/२०१८**

ही महासभा आज दिनांक १५/९/२०१८ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** आता यामध्ये दोन लक्षवेधी आल्या आहेत, दोन्हींचे विषय सेमच आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** दोन्हींचा स्विकार करण्यात यावा.

**महापालिका सचिव:—** दोन्ही विषय सेम आहेत, एकत्रिम वाचले तरी चालेल, सुचकाचे नाव, श्रीम. मिना सोनेजी,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** दोन्हींवर एकत्रित चर्चा करण्यात यावी.

**महापालिका सचिव:—**लक्षवेधी सुचना क्र.१ जीचे सुचक आहेत, श्रीम. मिना सोनेजी व अनुमोदक आहेत, श्री. मनोज सयानी

## लक्षवेधी सूचना क्रमांक क्र.१

विषय :—पर्यावरणाचा समतोल राखण्याकरीता स्मशान भुमीमध्ये जाळण्यात येणा—या लाकडा ऐवजी मोक्षकार्ट (इकोफ्रेंडली) वापर होणेबाबत.

लक्षवेधी सुचना क्र.२ जीचे सुचक आहेत, श्री. सतरामदास जेसवानी

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक क्र.२</u>**

विषय:— उल्हासनगर शहर को प्रदुषण बचाये रखने अथवा कभी किये जाने शमशान भुमीयो में अग्नी —संस्कार के लिये बिजली —यंत्र इलेक्ट्रॉनिक मशनरी लग पाये.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** समाविष्ट करून दोन्ही लक्षवेधी सुचना बरोबर घेण्यात यावेत

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** सर जेव्हा या लेक्षवेधी होतील, तेव्हा आपण परवानगी दया, एक डिसप्लेसाठी एक व्हिडीओ चालवायला लागेल.

**उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—** ठिक आहे, याची मी परवानगी देतो आणि याची व्यवस्था करण्यात यावी.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** धन्यवाद.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगीत करण्यात यावी.

**उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—** ४.०० वाजेची सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगीत करण्यात येत आहे, कृपया राष्ट्र गीतावर लक्ष दयावे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

सूचकाचे नांव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नांव :— श्री. राजेश वदारिया

**<u>स्थगित प्रस्ताव</u>**

दिनांक १५/०९/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. २७ ड** **दिनांक :१५/०९/२०१८**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १५/०९/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिवः—** कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ४.५० वाजता उप महापौर तथा पिठासिन अधिकारी श्री. जीवन इदनानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः— १९/१०/२०१८**

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/१०/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

**५—अ**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक १५/९/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करून पुन्हा स्थगित करण्यात आली असून सदर सभा शुक्रवार दिनांक १९/१०/२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती पंचम उमेश कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. पंचम उमेश कालानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३४ | ज्योती प्रकाश बठिजा |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३५ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३६ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३७ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३८ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ८ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३९ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ९ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४० | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १० | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४१ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ११ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४२ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १२ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४३ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १३ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४४ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १४ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ४५ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १५ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ४६ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १६ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ४७ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १७ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४८ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४९ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १९ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५० | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २० | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५१ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५२ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २२ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५३ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २३ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५४ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २४ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५५ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| २५ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५६ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| २६ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ५७ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २७ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५८ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २८ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ५९ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २९ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ६० | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३० | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६१ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६२ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३२ | कविता लाल पंजाबी | ६३ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३३ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६४ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या  अनुपस्थित होते/होत्या.

१.श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, २. श्रीमती आशा नाना बिराडे, ३. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ४. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ५. श्री. भगवान शंकर भालेराव, ६. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ७. श्रीमती पुष्पा नाना बागुल, ८. श्री. रमेश महादेव चव्हाण, ९. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, १०. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), ११.  श्रीमती कविता सुधिर बागुल, १२. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, १३. श्री. विजय चाहु पाटील, १४. श्री. आकाश परशुराम पाटील, १५ श्रीमती सुमन राजेश सचदेव, १६. श्रीमती राजश्री चौधरी, १७. श्रीमती मिताली चान्पुर

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

४९. श्री. गणेश पाटील, आयुक्त
५०. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
५१.श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
५२. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी
५३. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
५४. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता
५५. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
५६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
५७. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
५८. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
५९. श्री. संतोष जाधव, उप लेखाधिकारी
६०. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
६१.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१४. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त
१५. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१६.श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
१७.श्री. नंदलाल सामतांनी, प्र. सहाय्यक आयुक्त
१८. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१९. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
२०. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२१. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२२. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक
२३. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
२४.श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षारक्षक
२५. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२६. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक
२७. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक
२८.श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
२९. श्रीमती निलिमा कदम, लेखापाल (शिक्षण मंडळ)

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१.श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्रीमती नर्गिस खान, लिपीक
३.श्री. बाळु भांगरे, लिपीक

सायंकाळी ६.३६  वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :—** तिस—या सभेच्या शिपाई लोकांनी सहया घ्याव्यात, तिसरी सभा सुरू होत आहे, लक्षवेधी सुचना आहे. लक्षवेधी सुचना श्रीमती मिना सोंडे आणि श्री. सतरामदास जेसवानी यांची होती दोघांची क्लब करून घेत आहोत.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

## लक्षवेधी सूचना

सुचकाचे नाव :—श्रीमती मिना सोनेजी

श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :—श्री. मनोज सयानी

**विषय :—**पर्यावरणाचा समतोल राखण्या करीता स्मशान भुमीमध्ये जाळण्यात येणा—या लाकडा ऐवजी मोक्षकार्ट (इकोफ्रेंडली) वापर होणेबाबत येत्या महासभेमध्ये विषय घेवून निर्णय होणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये या लक्षवेधीद्वारे लक्ष वेधू इच्छिते की, उल्हासनगर शहरातील शमशान भुमीमध्ये अग्निसंस्कारासाठी एका व्यक्तीस सरासरी ०५ मन लाकडे लागतातम (१ मण लाकूड म्हणजे ४० कि.लो. ग्रम ग ५ त्र २०० किलो ग्रॅम) त्याअन्वये ४००० अग्नीसंस्काराकरीता (२०० कि.ग्रॅ. ग ४००० त्र ८००००० कि ग्रॅम) म्हणजे २०,००० हजार मण लाकूड लागत आहे. यामुळे शहरात पर्यावरण समतोल राखले जात नाही तसेच होणारी झाडांची कत्तल, या सर्व बाबींचा विचार करता पर्यावरणाचा समतोल राखण्याकरीता उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्मशानभूमीमध्ये जाळण्यात येणा—या लाकडा ऐवजी मोक्षकार्ट (इकोफ्रेंडली) वापर होणेबाबत येत्या महासभेमध्ये चर्चा होवून निर्णय व्हावा.

उल्हासनगर महानगरपालिकाशहर हद्द में पर्यावरण, प्रदुषण बनाये रखने के लिये, प्रदुषण कम करने के लिये शमशान भूमीयो में जा अग्नी संस्कार के लिए (मृत्सु—प्राणी) लकडीयो का उपयोग किया जाता रहा है जिस से पर्यावरण दुषीत होता है, गौर—गरीबो के लिये उल्हासनगर महानगरपालिका लकडीयों का भूगतान करती है, महासभा में लक्षविधीद्वारा चर्चा हो, शमशान भूमीयो में बिजली यंत्र युएमसी की तरफ से लगाया जाऐ, महासभा में चर्चा हो व मान्यता दिलाये, धन्यवाद।

---

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** वेळ कमी आहे, म्हणून लक्षवेधी वगळण्यात येत आहे.

**<u>सदस्या, श्रीमती मिना सोनेंजी:—</u>** काय करायचे महापौर मॅडम?महापौर मॅडम आज संपुर्ण जगामध्ये एक बर्निंग इश्यु चाललेला आहे ग्लोबल वार्निंगचा प्रत्येक ठिकाण प्रदुषाचे जे प्रॉब्लेम आहेत, सहा वर्षापुर्वी मी स्वत: प्लास्टीक बॅन्डची जी लक्षवेधी घेतली होती, त्यावर आता निर्णय आलेला आहे. परत रेनवॉटर हार्वेस्टींग केले आहे, त्याच्यावर आता कंम्पनसेंशन येत आहेत, तर मी एक व्हिडीओ दाखवायचे आहे, आताच आपला स्मशानभुमीचा जो मुद्दा झालेला आहे. त्याच्याशी कनेक्टींग हा व्हिडीओ आहे, हा व्हिडीओ चालवण्यासाठी तुमच्याकडून परवानगी पाहीजे आणि स्मशानभुमीसाठी जी आपली मिटींग होईल त्यामध्ये पण आपण हा विषय इंक्लुड करू.

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारिया:—</u>** चर्चा करू चर्चा.

**<u>सदस्या, श्रीमती मिना सोनेंजी:—</u>** व्हिडीओ दाखवून झाल्या नंतर मला दोन मिनीट या विषयावर बोलण्याची संधी देण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारिया:—</u>** होय, होय, ठिक आहे.

**<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>** तीन विषय लवकर घेण्यात यावेत.

**<u>महापालिका सचिव:—</u>** मा. पिठासिन अधिकारी यांनी व्हिडीओ नंतर आणि विषय सुची आधी घेण्यास सांगितलेली आहे, सर्वांना मान्य आहे.

**<u>काही सदस्य:—</u>** होय, होय.

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्रीम. अंजु सुरेश लाहौरी यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

---

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारिया:—</u>** पास...पास...

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्रीम. अंजु सुरेश लाहौरी यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार कै. सुरेश हरदयाल लाहौरी, दिवंगत सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांची पत्नी श्रीम. अंजु सुरेश लाहौरी, यांनी अर्ज सादर केला आहे. त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण निरंक असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये खालिलप्रमाणे नमुद आहे.

''लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी''.

लाड कमिटीचा मुळ उद्‌देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्रीम. अंजु सुरेश लाहौरी, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने, उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र. ३५</u>** **<u>दिनांक : १९/१०/२०१८</u>**

सूचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगाराच्या पदावर नेमणुकीसाठी श्रीम. अंजु सुरेश लाहौरी यांची शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

**विषय क्र.३:—** उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेस देण्यात आलेल्या जागेचे भाडे निश्चित करणेकरीता धोरणात्मक निर्णय होणे.

————————————————————————————————————————

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...पास...

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—** ॲज पर रूल, नियमाने.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** काय आहे ते सांगा?

**महापालिका सचिव:—** पतपेढीला भाडे दिले होते, ते त्यांना बहुतेक मान्य नाही, त्यांची काही मागणी....

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** नियमानुसार.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—** नियमानुसार, नियमानुसार

**महापालिका सचिव:—** ठिक आहे, नियमानुसार घेणेस मान्य.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेस देण्यात आलेल्या जागेचे भाडे निश्चित करणेकरीता धोरणात्मक निर्णय होणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेस कार्यालयीन कामकाजासाठी दालन उपलब्ध करून देण्यात आले आहे. सदर दालनाचा गेल्या सुमारे २० वर्षापासून वापर करीत आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (ड) अन्वये सदरहु जागेची भाडेनिश्चिती होवून भाडे आकारणी करणे आवश्यक असल्याने महापालिकेच्या सार्व. बांधकाम विभागाकडून सदर जागेची भाडेनिश्चिती करण्यात आली आहे.

महापालिका कर्मचारी पतसंस्थेस महापालिका मुख्यालयातील तळमजल्यावरील एकुण २२.०५ चौ.मी. क्षेत्रफळाचे एक दालन दिलेले असुन त्याकरीता रू.१,८९,८४०/— एवढे वार्षिक भाडेमुल्य निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार माहे एप्रिल, २०१५ पासून वार्षिक भाडे रू.१,८९,८४०/— निश्चित करण्यास मा. महासभा ठराव क्र. ३२, दिनांक ९/७/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. मालमत्ता विभागामार्फत महापालिका कर्मचारी पतसंस्थेस मा. महासभा ठरावान्वये निश्चित केलेले वार्षिक भाडेशुल्क अदा करणेबाबत वारंवार नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. परंतु महापालिका कर्मचारी पतसंस्थेतर्फे महापालिकेने निश्चित केलेले वार्षिक भाडे माफ करण्याबाबत वारंवार विनंती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ (ड) अन्वये जो मोबदला घेवुन महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पटटयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतरीत करता येईल तो मोबदला असे अधिमुल्य किंवा भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतुद आहे.

महापालिका कर्मचारी पतसंस्थेकडून महासभेने निश्चित केलेले वार्षिक भाडे भरणा होत नसल्याने याबाबत मा. आयुक्त सो. यांचेकडे टिप्पणी सादर केली असता त्यांनी संबंधित पतसंस्थेच्या पदाधिका—यांशी चर्चा केली असता त्यांनी सदर पतसंस्था उल्हासनगर महानगरपालिकेतील कार्यरत कर्मचा—यांसाठी निर्माण केलेली आहे ही बाब विचारात घेवुन महासभेने यापूर्वी निश्चित केलेल्या भाडेरक्कमेच्या ५० टक्के म्हणजेच रू. ९४,९२०/— इतके वार्षिक भाडेशुल्क निश्चित करण्यासाठी विनंती केलेली आहे. सबब यासंदर्भात धोरणात्मक निर्णयाकरीता प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र: ३६** **दिनांकः—१९/१०/२०१८**

सूचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेस देण्यात आलेल्या जागेचे वार्षिक भाडेशुल्क नियमाप्रमाणे निश्चित करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

⇨ **विषय क्र. ४ :—:—**घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ''उपभोक्ता फी'' आकारणी करणे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** कॅन्सल.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—** रिजेक्ट

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र.** ४:—घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ''उपभोक्ता फी'' आकारणी करणे.

**प्रस्तावना**

घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये महापालिकेस पुरविण्यात येणाऱ्या सेवांसाठी शहरातील मिळकतधारकांवर पुढीलप्रमाणे ''उपभोक्ता फी'' [User fee] आकारणीचा प्रस्ताव स्थायी समिती व महासभेपुढे मंजुरीकरीता सादर करण्यात आला होता.

| अ.क्र | मालमत्तांचा तपशिल | अंदाजित मालमत्तांची संख्या | प्रतिमाह युजर फी | प्रतिवर्ष युजरफी | अंदाजित उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी/टीअर गर्डर बांधकाम प्रकार असलेल्या मालमत्ता | ७६६५६ | ३७५ | ४५०० | ३४,४९,५२,००० |
| २ | एसी शिट ब्रिक्स बांधकाम प्रकार असलेल्या मालमत्ता | ७९६२० | २७५ | ३३०० | २६,२७,४६,००० |
| ३ | लाकडी/मातीचे बांधकाम असलेल्या मालमत्ता | १७१९५ | १७५ | २१०० | ३,६१,०९,५०० |
| ४ | तबेले, मंगल कार्यालय, हॉटेल व रेस्टॉरंट, मॉल्स इ. मालमत्ता | २९१ | | | |
| | अ) ज्या मालमत्तांचे क्षेत्रफळ १००० चौ.फुट पर्यंत आहे :— १०० | | १००० | १२००० | १२,००,००० |
| | ब) ज्या मालमत्तांचे क्षेत्रफळ १००० चौ.फुट पेक्षा अधिक आहे:— १९१ | | ५००० | ६०००० | १,१४,६०,००० |
| ५ | औद्योगिक मिळकती | १३ | ५००० | ६०००० | ७,८०,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकुण | १७३७७५ | | | ६५,७२,४७,५०० |

परंतु स्थायी समिती ठराव क्र. ९३, दिनांक ९/२/२०१८ ठराव करुन मा. महासभेसमोर ठेवण्यात आला होता. विशेष महासभा ठराव क्र. ८३ दिनांक २७/३/२०१८ नुसार सदरील प्रस्ताव नामंजुर करण्यात आला आहे.

तद्नंतर मा. आयुक्त यांच्या मान्यतेने जा.क्र.उमपा/आवि/उप—आ/९८/२०१८ दिनांक १६/५/२०१८ रोजी मा. प्रधान सचिव (२) नगर विकास विभग, मंत्रालय, मुंबई—३२ यांच्याकडे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५१ नुसार स्थायी समिती ठराव क्र. ९३, दिनांक ९/२/२०१८ व विशेष महासभा ठराव क्र. ८३ दिनांक २७/३/२०१८ हे दोन्ही ठराव विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात आले आहेत.

विषयांकित विषयी चर्चा विनीमय करण्यासाठी जा.क्र.उमपा/आवि/उप—आ/९८/२०१८ दिनांक ३१/७/२०१८ रोजी अन्वये दिनांक ३/८/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता मा. महापौर यांचेकडे बैठक आयोजीत केली होती, तथापी काही अपरीहार्य कारणास्तव सदरची बैठक दिनांक ८/८/२०१८ दुपारी १.०० वाजता घेण्यात आली. सदर बैठकीत ''उपभोक्ता फी'' आकारणीबाबत सुधारीत प्रस्ताव सादर करणेसाठी निर्देश दिले होते.त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) सुधारीत प्रस्तावित करण्यात आलेला ''उपभोक्ता फी'' [User fee] आकारणीचा तपशिल

| अ. क्र | मालमत्तांचा तपशिल | अंदाजित मालमत्तांची संख्या | उपभोक्ता फी प्रतिदिन | प्रतिवर्ष अंदाजित उत्पन्न (३६५ दिवस) |
|---|---|---|---|---|
| | निवासी मालमत्ता | | | |
| १ | आर.सी.सी/टीअर गर्डर बांधकाम प्रकार असलेल्या मालमत्तांकरीता | ४८८९० | रूपये ३/— | ५,३५,३४,५५०/— |
| २ | एसी शिट ब्रिक्स बांधकाम प्रकार असलेल्या मालमत्तांकरीता | ६४२३२ | रूपये २/— | ४,६८,८९,३६०/— |
| ३ | लाकडी/मातीचे बांधकाम असलेल्या मालमत्तांकरीता | १६६५२ | रूपये १/— | ६०,७७,९८०/— |
| | अनिवासी मालमत्ता | | | |
| ४ | आर.सी.सी/टीअर गर्डर बांधकाम प्रकार असलेल्या मालमत्तांकरीता | २७८६१ | १२/— | १२,२०,३१,१८०/— |
| ५ | एसी शिट ब्रिक्स बांधकाम प्रकार असलेल्या | १४९७८ | १०/— | ५,४६,६९,७००/— |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मालमत्तांकरीता | | | |
| ६ | लाकडी/मातीचे बांधकाम असलेल्या मालमत्तांकरीता | ८९१ | ८/— | २६,०१,७२०/— |
| ७ | हातगाडयांवरील सर्व प्रकारचे विक्रेते (उदा. खाद्यपदार्थ, पेय, भाजी विक्रेते, खेळणी, कपडा विक्रेते ईत्यादी.) | अंदाजीत ५००० | रूपये ५००/— प्रतिमाह | ३,००,००,०००/— |
| ८ | मोठे हॉटेल्सकरीता/मंगल कार्यालय/तबेले/मॉल करीता | १००० | रूपये ७५०/— प्रतिमाह | ९०,००,०००/— |
| ९ | औद्योगिक मिळकतींकरीता | १३ | रूपये १,०००/— प्रतिमाह | १,५६,०००/— |
| एकुण | | | | ३२,४९,६०,४९०/— |

२) उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात अंदाजित १,७४,५१७ मालमत्तांची नोंद आहे. वरील तक्त्यामधील अ. क्र. १, ते ६ निवासी व अनिवासी वापर होत असलेल्या मालमत्ता वरील अकारणी व वसुली मालमत्ता कर विभागाकडून करण्यात येईल. निवासी व अनिवासी मालमत्तांकरीता कर बिलात वार्षिक ''उपभोक्ता फी'' ची रक्कम समाविष्ट करून त्याची वसुली कर विभागामार्फत करणेत यईल.

तसेच वरील तक्त्यामधील अ. क्र. ७, ८, ९ मधील मालमत्ता/खाद्य पदार्थाच्या हातगाडयांकरीता ''उपभोक्ता फी'' आकारणी व वसुलीची कार्यवाही स्वतंत्ररित्या आरोग्य विभागामार्फत पार पाडणेत येईल.

३) घरात किंवा आस्थापनेमध्ये गोळा होणारा कचरा हा त्याच ठिकाणी शास्त्रोक्त पध्द्तीने विल्हेवाट लावण्यात येत असलेल्या मिळकतींना ''उपभोक्ता फी'' ख्रेमत मिम,मधुन पूर्ण सुट देण्यात येईल. सदरचे अधिकार मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग यांना राहतील तथापी याकामी संबंधीत मिळतधारकाने प्रत्येक वर्षी अर्ज सादर करुन संबंधीत कार्यक्षेत्रातील स्वच्छता निरिक्षक, आरोग्य विभाग यांच्या पाहणी अहवाल प्रमाणपत्रा नंतर अनुज्ञेय राहील.

वरीलप्रमाणे तक्त्यात नमुद केलेप्रमाणे मालमत्ता, हातगाडयांवरील सर्व प्रकारचे विक्रेते, मोठे हॉटेल्सकरीता/मंगल कार्यालय/तबेले/मॉल यांचेकडुन ''उपभोक्ता फी'' [User fee]द्वारे मनपास प्रतिवर्षी अंदाजित रक्कम रू. ३२,४९,६०,४९०/— (रुपये बत्तीस कोटी एकोनपन्नास लाख साठ हजार चारशे नव्वद मात्र) उत्पन्न अपेक्षित आहे.

तरी सुधारीत प्रस्तावात नमुद केलेनुसार वर्ष २०१८—२०१९ पासुन ''उपभोक्ता फी'' [User fee] आकारणी करणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता सविनय सादर.

**महासभा ठराव क्र: ३७** **दिनांक:—१९/१०/२०१८**

सूचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी मालमत्ता, हातगाडयांवरील सर्व प्रकारचे विक्रेते, मोठे हॉटेल्सकरीता/मंगल कार्यालय/तबेले/मॉल यांचेकडुन वर्ष २०१८—२०१९ पासुन ''उपभोक्ता फी'' आकारणी करणेचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५** :— श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांचे निलंबन कायम करणे.

————————————————————————————————————————————

**सदस्या, श्रीमती ज्योत्स्ना जाधवः—** मा. सचिव मॅडम, महापौर मॅडम मी या निर्णयाच्या विरोधात आहे, मला असे वाटते इथे मतदान घेण्यात यावे. आता जो निर्णय घेतला आहे, भदाणेचे तुम्ही आता पास केले आहे ना. बोला ना पास बोला ना, आम्ही पास बोलले.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** मारूती कांबळे

**महापालिका सचिव :—** तुमचा निर्णय काय आहे, तो दया.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** महापौर महोदया, सन्माननिय सदस्य, हा विषय जो आणला आहे, तो प्रशासनाने आणला आहे, आणि प्रशासन कायदयानुसार निर्णय घेऊ शकते. मॅडम माझा मघाशी विषय जो होता, तो गुन्हा दाखल करण्याच्या संदर्भातला होता. निलंबाचा हा विषय माझा नाही. निलंबाचा हा जो विषय आहे, त्यावर प्रशासनाने निर्णय घ्यावा, असे मला वाटते.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** आता काय आहे? कोणी मी बोलू, मी बोलू असे करता, आता मीच बोलतो जाऊ दया, मा. महापौरजी, हा जो प्रशासनाने विषय आणला आहे, याच्या बाबतीत कायदयाची काय तरतुद आहे, ती पाहणे अत्यंत आवश्यक आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची प्रत मी आपल्याकडे देतो, त्या अनुषंगाने कायदयात काय बसत असताना तुम्ही काय करू शकता हे बघा आणि कोणाला या गाष्टीचा विरोध करायचा असेल तर त्यांनी विरोध करावा. माझे म्हणणे क्लीयरकट आहे, ९० दिवसाचा सुप्रीमकोर्टाचा जो आदेश आहे. आम्ही सवोच्च न्यायालयाच्या आधीन राहूनच सगळे, आता हायकोर्टाचे पण आपण सगळया गोष्टी ऐकतो, सर्वाच्च न्यायालयाचे ऐकणार नाही, असे मला वाटत नाही. त्यामुळे निर्णय आपण घ्यावा, मॅटचा पण निर्णय, सर्वाच्च न्यायालयाचा पण निर्णय आहे, तो तुमच्याकडे कॉपी देतील त्यानुसार कारवाई करावी.

यावेळी सदस्य श्री. किशोर वनवारी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** प्रशासनाला भुमीका मांडू दया ना, आयुक्त साहेब, महापौर मॅडम या संबधी प्रशासनाची काय भुमीका आहे?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** सर्वाच्च न्यायालयाचा अपमान न होता ते काय करता येईल ते बघा, प्रत्येक सदस्यांनी विचार करावा, माझी विनंती आहे. सदरचा विषय पुन्हा हायकोर्ट किंवा सुप्रीम कोर्टाला जाईल. मग त्या वेळेस कुठल्या सदस्यांवर किंवा प्रशासनावर जर कारवाई झाली त्याला मी

जबाबदार नाही, म्हणून मी आपणाल सुप्रीमकोर्टाचा निर्णयाचे, सर्वाच्च न्यायालयाची याचिका क्रमांक सांगतो? १९१२ सन २०१५ अजय कुमार चौधरी विरूध्द केंद्र सरकार यांचे आदेश याचिका ८४, ८८ व ८४,२७...

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** मा. महापौर, मा. आयुक्त, सन्माननिय सभागृह हा विषय जो आहे, हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५६ अन्वये महासभे समोर सादर करणे आवश्यक होते, म्हणून हा निर्णयासाठी महासभेपुढे सादर केला आहे. ५६ वाचून दाखवू का? हा महाराष्ट्र महानगरपालिकेच्यानुसार हा सादर केलेला आहे. तो मी तुम्हांला वाचून दाखवतो. प्रतीनियुक्तीवरील शासकीय अधिकारी असलेला परिवहन अधिकारी वगळून महापालिकेने किंवा अन्य कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिका—यास किंवा कर्मचा—यास महापालिकेचा आदेश होई पर्यंत निलंबित करू शकेल किंवा अशा प्रकारे निलंबित करण्यात आलेला अधिकारी हा परिवहन व्यवस्थापक किंवा कल ४५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असेल. तर असे निलंबन त्या संबधीची कारणे ताबोडतोब आयुक्तांनी महापालिकेस कळवली पाहीजेत व महापालिकेने अशा निलंबाच्या तारखेपासून सहा महीन्याच्या मुदतीत असे निलंबन कायम केले नाही, तर ते निलंबन संपुष्टात येईल. परंतु असा अधिकारी किंवा कर्मचारी याच्यावर असलेल्या अरोपाची चौकशी होई पर्यंत त्या अधिका—याचे किंवा कर्मचा—याचे निलंबन हे शास्ती असल्याचे समजण्यात येणार नाही. म्हणजे शिक्षा असल्याचे समजण्यात येणार नाही, चौकशी होई पर्यत.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** चौकशी चालू आहे का?

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** चौकशी अजून चालू नाही, दोषारोपपत्र बनवले जातात. दोषारोपपत्र बनवण्याचे काम चालू आहे, एक दोन दिवसात पुर्ण होईल आणि त्यांना पाठवले जाईल.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** एखादया व्यक्तीचे निलंबन केले, तर त्याच्या नंतर चौकशी किती दिवसात लागली पाहीजे.

**सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** सहा महीन्याच्या आत.

**सदस्य, श्री. प्रमोद टालेः—** म्हणजे अजून वेळ आहे.

**सदस्य, श्री. हरेश जग्यासीः—** मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब, आपण प्रशासनाच्या प्रस्तावाला रिजेक्ट करीत आहे.

**महापालिका सचिवः—** म्हणजे त्यांचे निलंबन कायम करीत नाही, असा ठराव येईल, रिजेक्ट.

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकरः—** याच्यामध्ये एकच आहे की, आम्ही जे ससपेंशन केलेले होते, त्या ससपेंशनला आपली मान्यता आवश्यक असते. जर सहा महीन्याच्या आत तुम्ही परवानगी दिली नाही तर तो ॲटोमेटीक पुर्नसेवेत स्थापन होऊ शकतो. तर या प्रकरणी मुळातच आम्ही जे ससपेंशन केले होते, त्याला तुम्ही रिजेक्ट करतात का आता पर्यंत पुर्नस्थापीत करून चौकशी चालू ठेवावी या बाबत. म्हणजे पुर्नरस्थापीत करणे चौकशी कारण की आता जो यांनी कोर्टाचा निर्णय सादर केला आहे, त्याच्यामध्ये असे आहे की, डीसीस्पेलॅनरी ॲक्शन जी आहे, किवा दोषारोप किंवा काही महासभा नियुक्ती प्राधिकरण असल्याने सबमिट करणे आवश्यक आहे, आयुक्त पण या बाबतीत काही करू शकत नाही. नंतर तो अहवाल आपल्याला सबमिट केला जाईल. तो पर्यंत त्यांना पुर्नरस्थापीत करणे.

**महापालिका सचिवः—** मा. आयुक्त साहेबांनी जे म्हणटले ते ठरावात टाकते व त्यांना पुर्नसेवेत घेणे आणि या निलंबनास मान्यता देत नाही आणि पुर्नरस्थापन करण्याचे निर्देश देत आहे, पास...

**उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकरः—** यात चौकशी चालू असेल ससपेंशनचे, पेमेंटचे त्या नंतर बाकी दिले जाईल, ससपेंशनचे तो पर्यत मान्यता दिली जाईल. ससपेशनला मान्यता आहे, पुढे पुर्नस्थापीत करणे.

**महापालिका सचिवः—** ठिक आहे, मी साहेबांनकडून ठराव घेते, आणि त्या प्रमाणे ठराव करते.

**<u>उप आयुक्त मुख्यालय, श्री. संतोष देहेरकर:—</u>** ससपेंशननलाच सस्पेंड केले जाते, चौकशी पुर्ण होऊन येईल  नंतर त्या बाबत निर्णय घेण्यात येईल, चौकशी चालू करायची.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ५:—** श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांचे निलंबन कायम करणे.

**<u>प्रस्तावना</u>**

श्री.युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या दालनाची दिनांक ३०/५/२०१८, ३१/५/२०१८ व दि. २/६/२०१८ रोजी तपासणी केली असता त्यांचे दालनात मोठया संख्येने त्यांच्याशी संबंधित नसलेल्या संचिका आढळून आल्याने तसेच त्यांच्या दालनात करविभागाशी संबंधित लेखा शाखेकडे जमा न केलेले धनादेश, संबंधितनसलेले इतर पदांचे शिक्के, नगरविकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे क्रमांक नसलेले उप आयुक्तपदाचे विनास्वाक्षरीचे ओळखपत्र इत्यादी दस्तऐवज आढळून आल्यामुळे महाराष्ट्र नागरीसेवा (शिस्त व अपिल) नियम १०७९ चेनियम ८ नुसारविभागीय चौकशीसुरू करून महाराष्ट्र महानगरपालिकाअधिनियम १९४९ मधील ५६(१) व महाराष्ट्र नागरीसेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ चेनियम ४ अन्वयेदिनांक ९/७/२०१८ पासून जा.क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/५७७/२०१८, दिनांक १/८/२०१८ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी हे वर्ग—२ चे अधिकारी आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५६(१)(ब) मध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

आयुक्त, प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी असलेला परिवहन अधिकारी वगळून, महानगरपालिकेने किंवा अन्य कोणत्याही सक्षम प्राधिकारणाने नियुक्त केलेल्या असा कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, महानगरपालिकेचा आदेश होईतोपर्यंत निलंबित करू शकेल व अशाप्रकारे निलंबित करण्यात आलेला अधिकारी हा असा परिवहन व्यवस्थापक किंवा कलम ४५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असेल तर असे निलंबन व त्यासंबंधिची कारणे आयुक्ताने ताबडतोब महानगरपालिकेस कळविली पाहिजेत व महानगरपालिकेने अशा निलंबनाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या मुदतीत असे निलंबन कायम केले नाही तर ते निलंबन संपुष्टात येइेल.

परंतु, असा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यावर असलेल्या आरोपांची चौकशी होईतोपर्यंत त्याअधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे निलंबन हे शास्ती असल्याचे समजण्यात येणार नाही.

महानगरपालिके मार्फत करण्यात आलेली कार्यवाही वरील प्रमाणे नमुद केलेली असून सदरची कार्यवाही महासभेसमोर माहितीस्तव सादर करण्यात येत आहे. तसेच श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांचे करण्यात आलेले निलंबन कायम करणे व त्यांची विभागीय चौकशी करण्याची मान्यता मिळणेकरीता प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र:</u> ३८** **<u>दिनांक:—१९/१०/२०१८</u>**

सुचकाचे नाव :— श्री. हरेश जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांचा प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव अमान्य करीत असून त्यांचे निलंबन रद्द करुन चौकशीच्या अधिन राहून त्यांना महापालिका सेवेत पुनर्स्थापित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मॅडम ७.०० वाजले आहत.

**काही सदस्य:—** व्हिडीओ बघयाचा आहे.

**महापालिका सचिव:—** राष्ट्रगीत झाल्या नंतर व्हिडीओ दाखवण्यात येईल. मा. पिठासिन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहीर केले आहे.

कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ७.०० वाजता महापौर श्रीमती पंचम उमेश कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**दिनांकः—२८/०९/२०१८**

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २८/९/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र. क्रमांक—साशा/का—३/नपा—२/पिठासीन अधि. /कावि ३११/उमनपा/२०१८, दिनांक ५/९/२०१८ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका महापौर पदावर निवड करणेसाठी **श्री. राजेश नार्वेकर, जिल्हाधिकारी, ठाणे** यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका महापौर पदाची निवड करण्यासाठी बोलविण्यात आलेली आजची बैठक दुपारी १२.०० वाजता **श्री. राजेश नार्वेकर, जिल्हाधिकारी, ठाणे** यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली. सदर सभेस खालील सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या. उपस्थित सदस्यांची ओळख व खात्री महापालिका सचिव श्री. विकास चव्हाण यांनी केली.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी | ३८ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी |
| २ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३९ | श्रीमती मिना कुमार आयलानी |
| ३ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ४० | श्री. रवी किशनचंद जग्यासी |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ४१ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी |
| ५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४२ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ६ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४३ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ७ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४४ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| ८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४५ | श्रीमती ज्योती प्रकाश (पिंटो) बठिजा |
| ९ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४६ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४७ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ११ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४८ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| १२ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४९ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| १३ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ५० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १४ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ५१ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| १५ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ५२ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १६ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | ५३ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १७ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ५४ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १८ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५५ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १९ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५६ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी | ५७ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५८ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| २२ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५९ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| २३ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ६० | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| २४ | श्रीमती शुभांगीनी निकम | ६१ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| २५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ६२ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २६ | श्री. भगवान शंकर भालेराव | ६३ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २७ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ६४ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २८ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ६५ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २९ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ६६ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| ३० | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ६७ | श्री. राजेश देवेंद्र  वानखेडे |
| ३१ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ६८ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| ३२ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६९ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| ३३ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ७० | श्री. विजय चाहु पाटील |
| ३४ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ७१ | कु. कविता सुरेश गायकवाड |
| ३५ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ७२ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३६ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ७३ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३७ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी | | |

तर,

खालील सदस्य/सदस्या हे सभेस अनुपस्थित होते/होत्या.

**१.** श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, २. श्रीमती सुमन सचदेव, ३. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री)

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. आयुक्त, श्री. गणेश पाटील
२. श्री. विकास चव्हाण, महापालिका सचिव तथा मुख्य लेखा अधिकारी
३. श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक
४. श्री. संतोष जाधव, सहा. लेखा अधिकारी
५. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
६. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विदयुत
७. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी
८. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
९. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१०. श्री. मनिष हिवरे, प्र. भांडार विभाग प्रमुख
११. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी

१२. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा अनिल महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. बाळु भांगरे

सर्व प्रथम वंदे मातरम् म्हणून **दुपारी १२.०५ वाजता** सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :—** महापौर पदासाठी निवडणूक नियमातील नियम ५ अन्वये महापौरांची नेमणूक करण्यासाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी श्री. राजेश नार्वेकर, जिल्हाधिकारी, ठाणे हे उपस्थित आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** उल्हासनगर महानगरपालिका निर्वाचीत सदस्यांपैकी एका सदस्याची महापौर खुला (महिला) या पदी निवड करणे .

---

माझ्याकडे प्राप्त झालेले नामनिर्देशनपत्र मी मा. पीठासीन अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करीत आहे.

**श्री. राजेश नार्वेकर (पीठासीन अधिकारी):—महापौर** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक २४/०९/२०१८** रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये **७** नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाले असून त्यांची नावे अनुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | श्री. कलवंतसिंग सहोता |
| २ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ३ | श्रीमती कालानी पंचम ओमेश | श्री. राजेश नानिकराम वधरिया | श्री. वनवारी किशोर नारायणदास |
| ४ | श्रीमती कालानी पंचम ओमेश | श्रीमती रेखा अशोक ठाकूर | श्रीमती निकम शुभांगीनी |
| ५ | श्रीमती कालानी पंचम ओमेश | श्रीमती आयलानी मिना कुमार | श्रीमती जया प्रकाश माखिजा |
| ६ | श्रीमती कालानी पंचम ओमेश | श्री. इदनानी जीवन चंद्रभान | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ७ | श्रीमती डिंपल नरेन्द्र ठाकुर (कुमारी) | श्रीमती गिता लालचंद साधनानी | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |

महापौर पदाच्या निवडणूकीसंबंधातील महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूका नियम ६ (२) अन्वये, मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. महापौर पदासाठी

१. सर्वप्रथम श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणुन श्री. स्वप्नील मिलिंद बागुल व अनुमोदक म्हणून श्री. कलवंतसिंग सहोता यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

२. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणुन श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड व अनुमोदक म्हणून श्रीमती ज्योती शामराव माने यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

३. श्रीमती कालानी पंचम ओमेश यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली. श्रीमती कालानी पंचम ओमेश यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणुन श्री. राजेश नानिकराम वधरिया व अनुमोदक म्हणून श्री. वनवारी किशोर नारायणदास यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

४. श्रीमती कालानी पंचम ओमेश यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली. श्रीमती कालानी पंचम ओमेश यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणुन श्रीमती रेखा अशोक ठाकुर व अनुमोदक म्हणून श्रीमती निकम शुभांगिनी यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

५. श्रीमती कालानी पंचम ओमेश यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली. श्रीमती कालानी पंचम ओमेश यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणुन श्रीमती आयलानी मिना कुमार व अनुमोदक म्हणून श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

६. श्रीमती कालानी पंचम ओमेश यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली. श्रीमती कालानी पंचम ओमेश यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणुन श्री. इदनानी जीवन चंद्रभान व अनुमोदक म्हणून श्रीमती कविता लाल पंजाबी यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

७. श्रीमती डिंपल नरेन्द्र ठाकुर (कुमारी) यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली. श्रीमती डिंपल नरेन्द्र ठाकुर (कुमारी) यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणुन श्रीमती गिता लालचंद साधनानी व अनुमोदक म्हणून श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

अनुक्रमांक १, २, ३, ४, ५, ६, व ७ हे नामनिर्देशनपत्र वैध घोषित करण्यात येत आहे.

छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची वैधरित्या नावे पुढीलप्रमाणे आहेतः—

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नाव** |
|---|---|
| १. | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| २. | श्रीमती कालानी पंचम ओमेश |
| ३. | श्रीमती डिंपल नरेन्द्र ठाकुर (कुमारी) |

यावेळेस दुपारचे १२ वाजुन १८ मिनिटे झाली आहेत.

वरील ३ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची आहे त्यासाठी १५ मिनिटांचा वेळ देण्यात येत आहे. ज्यांना आपली उमेदवारी मागे घ्यावयाची आहे त्यांना उमेदवारी मागे घेण्याचा विहित नमुन्यामध्ये अर्ज देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

आता दूपारचे १२ वाजुन ३३ मिनिटे झाली आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली १५ मिनिटांची वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

दिलेल्या वेळेमध्ये वरील दोन उमेदवार १) श्रीमती बठिजा ज्योती प्रकाश, २) श्रीमती ठाकुर डिंम्पल नरेंन्द्र (कुमारी) यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे.

आता, महापौर पदाच्या एका जागेसाठी एकच उमेदवार शिल्लक राहिले असून त्यांची मराठी वर्णानुक्रमे अंतिम यादी खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नाव** |
|---|---|
| १. | श्रीमती कालानी पंचम ओमेश |

मी पुढीलप्रमाणे निकालाची घोषणा करतो.

## निकाल घोषणा

महापालिका सचिवांनी दिनांक २१/९/२०१८ रोजी काढलेल्या सभा सूचने अन्वये सर्व सदस्यांना महापौर पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक २४/९/२०१८ रोजी तीन उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले होते. त्यातील दोन उमेदवार १) श्रीमती बठिजा ज्योती प्रकाश, २) श्रीमती ठाकुर डिंम्पल नरेंन्द्र (कुमारी) यांनी आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतले आहे.

महापौर पदासाठी एकमात्र उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूका घेणे) नियम २००५ मध्ये नियम ७ (१) अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये महापौर पदाचे उमदेवार **श्रीमती कालानी पंचम ओमेश** हया **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :–२८/९/२०१८

(राजेश नार्वेकर)

जिल्हाधिकारी

तथा

पीठासीन अधिकारी

उल्हासनगर महानगरपालिका

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका

सभागृह

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १२. ४० वाजता सभा संपली.

(विकास चव्हाण)

महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका